उर्दू-मराठी शब्दकोश

اُردو مراٹھی شبدکوش

संकलन - संपादक
श्री. श्रीपाद जोशी

समीक्षक - संपादक
प्रा. एम्. एस्. गोरेकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई

उर्दू-मराठी शब्दकोश

اُردو مراٹھی شبدکوش

संकलक-संपादक
श्री. श्रीपाद जोशी
५२, शुक्रवार पेठ, पुणे-२

समीक्षक-संपादक
प्रा. एन्. एस्. गोरेकर
सेंट झेवियर्स कॉलेज, मुंबई-१

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मंत्रालय, मुंबई:३२

प्रथम आवृत्ती : जानेवारी, १९६८
द्वितीयावृत्ती : जानेवारी, १९८९

पुनर्मुद्रण : सप्टेंबर १९९९

प्रकाशक : सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, तिसरा मजला
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग
दादर, मुंबई ४०० ०१४.

© प्रकाशकाधीन

मुद्रक : व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
चर्नी रोड स्टेशनजवळ,
मुंबई ४०० ००४.

किंमत : रु. १३६/-

तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

निवेदन

उर्दू-मराठी शब्दकोशाची निर्मिती महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने केली ती १९६८ मध्ये. या कोशाची दुसरी आवृत्ती १९८९ मध्ये निघाली. आज १९९९ मध्ये ही तिसरी आवृत्ती काढण्याचा योग येत आहे.

आपला देश हा बहुभाषिक देश आहे आणि देशाचे ऐक्य खऱ्या अर्थाने बळकट व्हावयाचे असेल तर भारतातील नागरिकांनी बहुभाषिक होणे ही काळाची गरज आहे. इंग्रजी भाषा ही आज जगाची ज्ञानभाषा झाली आहे. हिंदी ही आपल्या राष्ट्राची संपर्क भाषा म्हणून " राष्ट्रभाषा " ठरली आहे. मातृभाषेचा अभ्यास तर कळत न कळत होतोच. पण याही पलीकडे जाऊन देशवासियांनी आणखी एखादी तरी भारतीय भाषा अवगत करून घेणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने उर्दू-मराठी शब्दकोश हा त्यातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. म्हणून या कोशाचे महत्त्व मोठे मानले पाहिजे. तिसऱ्या आवृत्तीचा योग आल्यामुळे मराठी वाचकांनीही या कोशाला चांगला प्रतिसाद दिला हे उघड आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या विशेष प्रतिष्ठेच्या ग्रंथांपैकी हा एक ग्रंथ होय, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. म्हणूनच या कोशाच्या तिसऱ्या आवृत्तीचा योग आल्याबद्दल मंडळाला आनंद होत आहे. जिज्ञासू वाचक याही आवृत्तीचे स्वागत करतील असा मला पूर्ण विश्वास वाटतो.

प्र. शं. मोरे, संचालक व प्र. ल. पुरकर, उप संचालक, शासन मुद्रण लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय व प. ज. गोसावी, व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई व त्यांचे सहकारी तसेच मंडळाचे सचिव, चंद्रकांत वडे यांनी या पुस्तकाच्या छपाईच्या कामात स्वतः लक्ष घातल्याने हे पुस्तक वेळेवर वाचकांच्या हाती देणे शक्य झाले आहे.

द. मा. मिरासदार,
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

दसरा-१९९९.
१९ ऑक्टोबर १९९९.

निवेदन

भारत हे बहुभाषी राष्ट्र आहे. कमीत कमी १६ ते २२, कमी जास्त प्रमाणात लेखनिविष्ट व लोकांच्या दैनंदिन व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या भाषा भारतात आहेत. भारतीय १४ भाषा भारताच्या संविधानातील अनुसूचीत मान्य केलेल्या आहेत. हिंदी, उर्दू, बंगाली, पंजाबी, काश्मिरी, सिंधी, असामी, उडिया, गुजराती, मराठी, तेलगु, कानडी, तामीळ व मल्याळम् या तर संघराज्यमान्य भाषा आहेतच; त्याशिवाय, भोजपुरी, मैथिली, राजस्थानी, कोकणी, टुळू, नेपाळी इत्यादी भारतीय भाषाही लेखनिविष्ट भाषा म्हणून समजल्या जातात. शिवाय उपभाषा किंवा बोलीभाषा म्हणून परिगणन केल्यास त्यांची संख्या २०० ते २५० च्या दरम्यान उपलब्ध होते.

भारताची राष्ट्रीय एकात्मता ही पश्चिमी देशांतील एकराष्ट्र व एकभाषा अशा समीकरणाची नाही. अपवादात्मक स्वित्झर्लंड, कॅनडा इत्यादी छोटी राष्ट्रे सोडल्यास बाकीच्या पश्चिमी राष्ट्रांची एकात्मता ही भाषिक एकात्मतेशी समांतर आहे. उदयाला आलेल्या व वाढीस लागलेल्या वा महनीय परिणतपदास पोहोचलेल्या जगातील राष्ट्रांत भारत हेच एक राष्ट्र एकात्मक असून त्याच्यातील प्रत्येक एकभाषिक प्रदेश युरोपातील मोठ्या प्रगत राष्ट्राएवढा आहे. येथे वैविध्यपूर्ण, वैचित्र्यपूर्ण व साहित्यसंपन्न अशा १२ तरी भाषा आहेत.

या सर्व भारतीय भाषांच्या व साहित्याच्या देवघेवीची प्रक्रिया व सांस्कृतिक व वैचारिक विनिमयाची प्रक्रिया संस्कृत भाषेच्या द्वारे व धर्मांच्या द्वारेच आजपर्यंत झाली आहे. इंग्रजी राज्य झाल्यानंतरच्या काळात पश्चिमी संस्कृतीच्या, पश्चिमी ज्ञानाच्या व पश्चिमी आधुनिक शिक्षणाच्या द्वारा विचार व भावना यांचे संवादित्व या भारतीय भाषांमध्ये निर्माण होऊ लागले आहे. स्वातंत्र्याच्या आंदोलनाने व राजकीय एकात्मतेमुळे या भाषांचे वैचारिक संबंध अधिक निकटचे बनले आहेत.

परंतु, या भाषांचा भाषिक सीमाप्रदेश सोडल्यास अन्योन्यसंबंध आवश्यक तितका प्रभावी स्वरूपात निर्माण होत नाही. वैचारिक, भावनात्मक व सांस्कृतिक मूल्यांची देवघेव, परंपरागत धर्म व इंग्लिश भाषा यांच्या द्वारेच राखला जात आहे. हिंदी, गुजराती, मराठी, बंगाली, पंजाबी, असामी, उडिया, नेपाळी, काश्मिरी व उर्दू यांच्यामध्ये त्या इंडो-आर्यन भाषा असल्यामुळे बरेच सादृश्य आहे म्हणून त्यांत शब्दांची व कल्पनांची देवघेव आपोआप जितकी होते त्यापेक्षा दक्षिणेकडील तेलगु, तामीळ, मल्याळम् व कानडी या द्रविडी भाषा व वर उल्लेखिलेल्या इंडो-आर्यन भाषा यांच्यामध्ये त्या मानाने फारच कमी देवघेव होते. ही परस्पर देवघेव विपुल प्रमाणात होणे आपल्या सांस्कृतिक प्रगतीचा वेग वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक आहेच. परंतु त्याहीपेक्षा भारताची राष्ट्रीय एकात्मता दृढ व अभेद्य बनविण्याकरिता अधिक आवश्यक आहे.

याकरिता महत्त्वाचा उपाय म्हणजे प्रत्येक प्रादेशिक मातृभाषा बोलणाऱ्या लोक-समूहामध्ये लगतच्या किंवा दूरच्या भारतीय प्रदेशांच्या भाषा उत्तम रीतीने अवगत केलेले, त्यापैकी एक किंवा अनेक भाषा उत्कृष्ट रीतीने लिहू व बोलू शकणारे आणि त्याचप्रमाणे त्या त्या अन्यप्रदेशीय भाषांतील प्रथितयश लेखांचे, ग्रंथांचे व ग्रंथकारांचे साहित्य स्वतःच्या प्रादेशिक मातृभाषेत चांगल्या रीतीने, भावार्थ न गमावता, भाषांतरित व रूपांतरित करण्यास समर्थ झालेले सुशिक्षित निर्माण होण्याची मोठी निकड आहे.

ही निकड भागविण्याची पहिली पायरी म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य–संस्कृती मंडळाने आंतरभारतीय योजना आखली आहे. या योजनेप्रमाणे मराठी सुशिक्षित मनुष्यास उर्दू, बंगाली, कानडी, गुजराती इत्यादी इंडो-आर्यन व द्रविडी भाषा स्वप्रयत्नाने शिकता याव्यात म्हणून प्रत्येक भाषेचा द्विभाषिक कोश (दोन्हीं प्रकारे म्हणजे उर्दू-मराठी आणि मराठी-उर्दू असे), भाषाप्रवेश आणि वाचनपाठमाला अशी चार पुस्तके प्रकाशित करण्याचे ठरविले आहे. कानडी-मराठी शब्दकोश, कानडी भाषाप्रवेश व कानडी वाचनपाठमाला मंडळापाशी मुद्रणप्रतींच्या रूपाने आल्या आहेत. गुजराती-मराठी शब्दकोश, तामीळ भाषाप्रवेश, मल्याळम् भाषाप्रवेश, बंगाली भाषाप्रवेश इत्यादिकांच्या मुद्रणप्रती तयार होत आल्या आहेत.

याच आंतरभारतीय योजनेपैकी, संकलक–संपादक श्री. श्रीपाद जोशी, पुणे, यांनी रचलेला उर्दू-मराठी शब्दकोश छापून वाचकांच्या हाती देण्यास आम्हांस समाधान वाटत आहे. अन्य भाषांप्रमाणेच उर्दूचेही भाषाप्रवेश व वाचनपाठमाला मराठी वाचकांच्या हाती देण्यास लवकर संधी मिळेल अशी कार्यवाही आम्ही करीत आहोत. या कोशाच्या मुद्रणप्रतींचं संपादन व प्रुफे तपासून देण्याच्या बाबतीत समीक्षक–संपादक प्रोफेसर डॉ. निज़ामु'द्दीन एस्. गोरेकर सेंट झेवियर्स कॉलेज, मुंबई, यांनी आस्थेने साह्य केले याबद्दल त्यांचे आम्ही हार्दिक आभार मानतो. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या मुद्रण व लेखनसाहित्य विभागाने व शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयाचे व्यवस्थापक, श्री. स. आ. सप्रे यांनी काळजीपूर्वक छपाईचे काम करून दिल्याबद्दल त्यांचे आम्ही ऋणी आहोत.

लक्ष्मणशास्त्री जोशी
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य–संस्कृती मंडळ

सचिवालय, मुंबई-३२
२६ जानेवारी १९६८

प्रास्ताविक

या कोशाचे वैशिष्ट्य

पंचवीस हजारांहून अधिक उर्दू शब्दांचा मराठी भाषेत अर्थ देणारा हा पहिलाच शब्दकोश. परंतु याचे खरे वैशिष्ट्य असे की उर्दू शब्द नागरी लिपीत देऊन त्याच्या-समोरच कंसात त्या शब्दाचे उर्दू लिपीतील शुद्धलेखन देण्याचा उपक्रम याच कोशात प्रथम करण्यात आलेला आहे. त्यामुळे उर्दू शब्दाचे मूळ शुद्ध रूप लक्षात येईल. उर्दू लिपीची ओळख करून घेण्याच्या कामीही या पद्धतीचा उपयोग होईल.

इतर भारतीय भाषांप्रमाणे उर्दूतही रोज नवनवीन शब्द तयार होत असतात. हे शब्द यापूर्वीच्या कोणत्याही शब्दकोशात मिळत नाहीत. असे शब्द मिळवून या कोशात दिले आहेत. त्यासाठी वृत्तपत्रे, पुस्तके, नियतकालिके वगैरेप्रमाणेच भारतीय व पाकिस्तानी आकाशवाणीचाही संपादकाने उपयोग करून घेतलेला आहे.

प्रत्यय व उपपदे यांचा अर्थ देताना तो स्पष्ट करण्यासाठी त्याच ठिकाणी त्यांची उदाहरणेही दिली आहेत.

काही विशिष्ट शब्दांचा वापर लक्षात यावा यासाठी लोकप्रिय काव्यपंक्तीही कोशात जागजागी देण्यात आल्या आहेत.

उर्दू शब्दांचा उच्चार बिनचूक कळावा यासाठी 'क़', 'ख़', 'ग़' (कंठातून), 'ज़' (दंत्य—'जहाज़' मधील 'ज़' प्रमाणे), 'ड़' (सौम्य—'ळ' प्रमाणे), 'फ़' (दंत्योष्ठ्य) वगैरे अक्षरांखाली टिंबे देऊन फरक दाखविण्यात आला आहे. येथे एक खुलासा करणे आवश्यक वाटते. उर्दूमध्ये नागरीतील एका अक्षराकरिता एकाहून अधिक अक्षरे वापरली जातात. त्यातील जितक्यांचे उच्चाराभिन्नत्व स्पष्ट करून दाखविणे शक्य आहे, त्यांच्याखाली टिंब देऊन तसे ते दाखविले आहेत. काही उच्चार हे मूळ अरबी-फारसी भाषांत भिन्नत्वाने व्यक्त होतात. तेव्हा उर्दूतही त्यांचे वेगळेपण व्यक्त केले जाते. म्हणून या बाबतीत वेगळी चिह्ने वापरलेली आहेत. उदाहरणार्थ, 'स' साठी उर्दूत 'से', 'सीन' व 'स्वाद' अशी तीन अक्षरे आहेत. व त्यांचा उच्चार दाखविण्यासाठी या कोशात 'स' हे अक्षर तीन वेळा निरनिराळ्या प्रकारची चिह्ने लावून वापरले आहे. हीच गोष्ट 'ज' ची! 'ज' करिता उर्दूत 'जीम', 'जाल', 'जे' व 'जोय' अशी चार अक्षरे आहेत. म्हणून येथे 'ज' ही प्रत्येक वेळी निरनिराळ्या प्रकारचे चिह्न देऊन वापरलेला आहे.

उर्दूत अरबी-फारसीची अनेक लहान-लहान वाक्ये सुभाषितांसारखी वापरली जातात. त्यातील केवळ शब्दांचा अर्थ समजल्याने भागत नाही; म्हणून अशी वाक्ये या कोशात जशीच्या तशी देऊन त्यांचा अर्थ दिलेला आहे.

विशिष्ट मराठी शब्दांची व्युत्पत्ती लक्षात यावी यासाठी जेथे असे शब्द आढळले तेथे

तसा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामुळे अनेक मराठी शब्दांची व्युत्पत्ती समजण्यास मदत होईल.

हा कोश कसा वापरावा ?

या कोशात हिन्दी-उर्दूत प्रचलित असलेला शब्दक्रम स्वीकारण्यात आलेला आहे. अनुस्वारयुक्त शब्द प्रथम घेण्यात आले आहेत. उदाहरणार्थ 'कंद' हा शब्द सुरुवातीस आलेला असून 'कद' हा नंतर आला आहे. अर्थात काही ठिकाणी अनुस्वाराने काम भागण्यासारखे नसल्यामुळे हलन्त अनुनासिकाचा वापर केला गेला आहे. उदाहरणार्थ 'इंकार' हा शब्द 'इन्कार' असा दिलेला आहे. कारण 'इंकार' मधून व्यक्त होणारा 'ङ'कार त्या शब्दाच्या बाबतीत अशुद्ध आहे. काही शब्द दोन्ही प्रकारांनी लिहिले जातात, म्हणून त्यांची दोन्ही रूपे देऊन जे रूप शुद्ध असेल तेथे अर्थ देण्यात आला आहे. म्हणून जेथे अनुस्वारयुक्त शब्द असेल तेथे दोन्ही प्रकारचे शब्द पाहावेत.

अकार, इकार, उकार, एकार, ओकार आणि जोडाक्षरे या बाबतीत उर्दूमध्ये खूप मतभिन्नता आढळते. म्हणून अशा शब्दांची दोन्ही-तिन्ही रूपे त्या त्या जागी देऊन शुद्ध रूपांसमोर त्यांचे अर्थ दिले आहेत. अर्थात सर्वच अशुद्ध किंवा अप्रचलित रूपे देणे शक्य नसते. म्हणून एखादा शब्द 'अ'कारात न सापडल्यास तो 'इ'कारात किंवा 'उ'कारात पाहावा. तसेच जोडाक्षरात एखादा शब्द न आढळल्यास तो सुटया अक्षरात पाहावा. उदाहरणार्थ 'होशियार' हा शब्द 'होशयार' असा आढळेल. याचा उच्चार काही लोक 'होश्यार' असाही करतात, त्यांनाही 'होशयार' शब्द पाहावा लागेल.

एका शब्दापासून बनलेले शब्द त्याच्याच पोटात दिलेले आहेत. तसे ते देताना मूळ शब्द पुनः संपूर्ण न देता त्यांचे अस्तित्व दर्शविणारी एक लहान आडवी रेघ (–) दिलेली आहे. उदाहरणार्थ 'पंज' या शब्दातच 'पंजअर्कान', 'पंजगानः', 'पंजगूना', 'पंजतन' वगैरे शब्द दिलेले असून त्यांची रचना –'अर्कान', –'गानः', –'गूना', –'तन' अशी केलेली आहे. याच पद्धतीने वाक्प्रचार व म्हणीही त्या त्या शब्दांच्या पोटात दिल्या आहेत. परंतु ज्यावेळी त्या शब्दाचे शुद्धलेखन (स्पेलिंग) बदलते, त्यावेळी त्यापासून बनणारे शब्द त्याच्या पोटात देता येत नाहीत. अशा वेळी ते अकार विल्हेप्रमाणे दिले आहेत. उदाहरणार्थ 'बूतः' शब्दापासून बनणारे 'बूतः-ए-खाक', 'बूतः-ए-ज़र' वगैरे शब्द 'बूतः' शब्दाच्या आधी देण्यात आले आहेत.

फारसीतील षष्ठीचा प्रत्यय (-ए-) लागून बनणारे शब्द मूळ शब्दात न देता अकार विल्हेप्रमाणे दिले आहेत. उदाहरणार्थ 'नमाज़' शब्दानंतर 'नमाज़ी' हा शब्द दिला आहे व त्यानंतर 'नमाज़-ए-क़ज़ा' व 'नमाज़-ए-जनाज़ः' वगैरे शब्द दिले आहेत.

काही शब्दांची अनेकवचने वैशिष्ट्यपूर्ण असल्यामुळे ती त्या त्या शब्दांबरोबरच दिली आहेत. अर्थात अनेकवचनांमध्ये जेथे अर्थामध्ये फरक पडतो तेथे ते शब्द स्वतंत्रपणे दिले आहेत.

संपादकद्वय

जैसी पुष्पामाजी पुष्पमोगरी ।
कीं परिमळामाजी कस्तूरी ।।
तैसी भाषामाजी साजिरी ।
मराठी या ।।

— फादर स्टीफन्स

اردو زبان ہندو مسلمان دونوں کو اپنے
آبا و اجداد سے ایک مشترک و مقدس
ترکہ کی حیثیت سے ملی ہے جو قطعاً
ناقابل تقسیم ہے ۔

— سر تیج بہادر سپرو

संकेत-सूची

अ.=अरबी

अनेक.=अनेकवचन

अव्य.=अव्यय

उदा.=उदाहरणार्थ

उप.=उपपद

क्रि.=क्रियापद

ग.=गणित

तु.=तुर्की

दो. शु.=दोन्ही रूपे शुद्ध आहेत

पु.=पुल्लिगी

पोर्तु.=पोर्तुगीज

प्र.=प्रचलित

प्रत्य.=प्रत्यय

फ़ा.=फारसी

बा.=बायकी प्रयोग
(फक्त बायकांमध्ये प्रचलित)

भू.=भूगोल

यू.=यूनानी (ग्रीक)

लघु.=लघुत्वदर्शी रूप

वा.=वाक्य; वाक्यांश

वि.=विशेषण

विकृत.=विकृत रूप

व्यं.=व्यंग्यार्थाने, उपरोधाने

व्या.=व्याकरण

शु.=शुद्ध रूप

संक्षिप्त.=संक्षिप्त रूप

संबो.=संबोधन

सर्व.=सर्वनाम

सामा.=सामासिक (जोड) शब्द

स्त्री.=स्त्रीलिंगी

हिं.=हिंदुस्थानी
(हिन्दी अथवा उर्दू)

SCHEME OF TRANSLITERATION OF URDU LETTERS INTO DEVANĀGARĪ ORTHOGRAPHY

उर्दू वर्णांचे लेखन आणि उच्चारण यांचा तक्ता आणि टीप

[प्रोफेसर डॉ. एन्. एस्. गोरेकर, सेंट झेवियर्स कॉलेज, मुंबई, यांनी हा तक्ता आणि टीप तयार केली व महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळाने त्यास मान्यता दिली आहे]

ا	a	अलीफ	अ
آ	ā	अलीफ-उल्-मद्	आ
ب	b	ब	ब
بھ	bh	भ	भ
پ	p	प	प
پھ	ph	फ	फ
ت	t	त	त
تھ	th	थ	थ
ٹ	ṭ	ट	ट
ٹھ	ṭh	ठ	ठ
ث	s̱	स	स
ج	j	जीम	ज
جھ	jh	झ	झ
چ	ch	च	च
چھ	chh	छ	छ
ح	ḥ	ह	ह
خ	kh	ख	ख

د	d	दाल	द
ڈ	d̲	डाल	ड
ڈھ	d̲h	ढ	ढ
ذ	ẓ	जाल	ज़
ر	r	र	र
ڑ	ṛ	ड	ड़
ڑھ	ṛh	ढ	ढ़
ز	z	ज	ज
ژ	z̲	श	श़
س	s	सीन	स
ش	s̲h	शीन	श
ص	ṣ	स्वाद	स़
ض	ḍ	दवाद	द़
ط	ṭ	तोय	त़
ظ	ẓ̤	जोय	ज़
ع	ʿ	ऐन	'अ {'अि ('इ), 'अु ('उ), 'अे ('ए)}
غ	g̲h	गैन	ग़
ف	f	फ	फ़
ق	q	काफ	क़
ک	k	काफ	क
کھ	kh	ख	ख
گ	g	गाफ	ग
گھ	gh	घ	घ
ل	l	लाम	ल

م	m	मीम	म
ن	n	नून	न
ں	n	नून-ए-गुन्नः	◌ं ; ◌ँ [अं ; बीं]
و	o ; v ; w	वाव	ऊ ; व
ہ	h	हे	ह
ھ	h	हे	◌ः ; . [अः ; कि.]
ء	'	हमजः	'
ی	i ; y	या-ए-मअरूफ	ई ; य
ے	e ; y	या-ए-मजहूल	ए ; य

The Perso-Arabic characters are arranged according to simiiarity or shape unlike the Devanāgarī characters which are grouped phonetically. The Urdu alphabet, it must be remembered, is composed of the Arabic, Persian and Hindi letters.

The Urdu gutturals ک (kāf) and گ (gāf), pronounced by lifting the root of the tongue at the throat, correspond to क and ग while کھ (kha) and گھ (gha) with aspiration have the same articulation as ख and घ in Devanāgarī.

The harsh guttural خ (khai), pronounced with a greater force and roughness, the soft guttural غ (ghain), articulated well down in the throat with a vibration, and the deep guttural ق (qāf), sounded by the compression of the lower fauces, are denoted respectively by ख़, ग़ and क़ with a lower dot.

The pharyngeal ع ('ain), sounded by the forcible emission of breath through the tightly compressed throat, is indicated by the *Spiritus Asper* (') followed by a vowel in Devanāgarī and the slightly aspirated pharyngeal ہ (he) has as its corresponding Devanāgarī letter ह while the glottal ح (ḥai), generated deep in the throat, is styled as ह़ with a lower dot.

The palatals ج (jīm) and چ (cha), pronounced by spreading the tongue towards the side teeth and pressing the palate, have as their corresponding letters ज and च whereas چھ (chha) and جھ (jha) with aspiration correspond to छ and झ of the Devanāgarī alphabet. The strongly articulated palatal ٹ (ṭoi), pronounced by the relative positions of the tongue and teeth, is indicated by dotted ट़ in Devanāgarī.

The sibilant-palatal ش (shin), uttered with the point of the tongue reverted to the palate, has the corresponding Devanāgarī श and the harsh sibilant-palatal ژ (jshe) is shown by dotted श़, while the semivowel palatal ی (ye) corresponds to य of the Devanāgarī alphabet.

The linguals ت (te), د (dāl) and ن (nūn), pronounced by turning the tongue and then brushing the roof of the mouth forward, have as corresponding letters त, द and न whereas ټھ (tha) and ډھ (dha) with aspiration correspond to थ and ध. Again the lingual ر (re), pronounced with a sensible vibration of the tongue. has र as its corresponding letter in Devanāgarī.

The dentals ٹ (ṭa) and ڈ (ḍa). sounded by touching the roots of the upper teeth with the tip of the tongue and softly blowing the sound out, have the same articulation as ट and ड while ٹھ (ṭha) and ڈھ (ḍha) with aspiration correspond to Devanāgarī letters ठ and ढ. The soft dental ض (ḍwād), sounded by the tongue but making a sonant stop instead of a hiss, is indicated by dotted द़ in Devanāgarī.

The sibilant-dental س (sīn) has its corresponding letter स and the soft sibilant-dental ث (the), sounded with a hiss, is shown as स़ with two lower dots. And a little sharp sibilant-dental ص (ṣwād), sounded by the lateral emission of the upper teeth, is indicated by dotted स़ in Devanāgarī orthography.

The alveolar ز (ze), the soft alveolar ذ (zāl) and the strongly articulated ظ (ẓoi), pronounced with a hollow sound from the throat, are represented respectively in Devanāgarī by ज़ with a dot below the horizontal stroke, ज़ with a dot below the vertical stroke and ज़ with two lower dots.

The harsh alveolar ڑ (ṛe), sounded by striking the point of the tongue on the palate, is denoted by dotted ड़ and ڑھ (ṛhe) with an aspiration is shown by ढ़ with a lower dot in Devanāgarī.

The labials ب (be), پ (pe) and م (mīm), pronounced by first closing the lips and then forcing the sound out, correspond to ब, प and म while بھ (bha) and پھ (pha) with aspiration have the exact corresponding Devanāgarī characters भ and फ. The labio-dental ف (fe), pronounced with a thick, dull, hollow sound from the roof of the mouth, is denoted by फ़ with a lower dot. The semivowel labial و (wāv) has. as its corresponding letter व in the Devanāgarī characters.

The consonant sound ء (hamzah), uttered by the compression of the muscles of the throat with a soft breathing,. is indicated by the *Spiritus Lenis* (') in Devanāgarī orthography.

The Urdu vowel system is the same as that of Sanskrit which consists of three elementary vowels ا (alif), و (wāv) and ی (ye) or the vowel-signs–*Fatḥah* (فتحہ ـَ), *Kasrah* (کسرہ ـِ) and *Ḍammah* (ضمہ ـُ) which correspond respectively to अ, इ and उ of Devanāgarī orthography.

The long final Alif of *Alif-i-Mamdūdah* (الف ممدودہ) and *Alif-i-Maqṣūrah* (الف مقصورہ) is indicated by different distinguishing terminations like आ and आँ in Devanāgarī. The *Alif-i-Mamdūdah* or rather the Alif of prolongation, invariably preceded by a consonant inflected with *Madd* (ـٓ) as آ is denoted by a long आ, like مآل (maāl) as मआल while *Alif-i-Maqṣūrah*, more frequently in the form of ےٰ and also ٰ with a small Alif over it, is shown by a long आँ with a half-moon placed above the letter, like مجرےٰ (mu'jrā) as मुज्राँ or صلوٰت (ṣalāt) as सलाँत in Devanāgarī orthography.

The short vowels of the Urdu alphabet are shown in Devanāgarī orthography by *Hrasva* (ह्रस्व) and the long vowels by *Dirgha* (दीर्घ), like اُردو (Urdu) as उर्दू and ہندی (Hindi) as हिंदी (हिन्दी).

The consonant ع ('ain) be transcribed into Devanāgarī by the reformed and not the orthodox way of writing the vowels, preceded by the *Spiritus Asper* (ʻ), like عَدد ('adad) as 'अदद or عِطر ('iṭre) as 'अित्र ('इत्र) or عُمر ('umre) as 'अुम्र ('उम्र) or عیش ('aish) as 'अैश ('ऐश).

The nasal sound of ن (nūn), preceded by any consonant, is indicated by *Anusvāra* (अनुस्वार), generally denoted by a dot placed above the letter which is pronounced, like انگور (angūr) as अंगूर, and ں (nūn-i-ghu'nnah) is shown by *Anunāsika* (अनुनासिक), denoted by a half-moon with a dot in it (◌ँ) placed either above or after the preceding letter, like انگبیں (angabīn) as अंगबीं.

The consonant sign, called *Virāma* (विराम), denoted by placing a stroke (◌्) below it, signifying the sound of the consonant alone, without an added vowel, is generally used in the middle of a word to avoid awkward or difficult combinations, like قُدسی (qu'dsī) as क़ुद्सी or کذّاب (kaẓẓāb) as कज़्ज़ाब.

The relation of the genitive case denoted by *kasrah* (ـِ), called *Iḍāfat* (اضافت), is indicated in Devanāgarī by (-ए-), like شبِ غزل (shab-i-ghazal) as शब-ए-ग़ज़ल.

The copulative conjunction denoted by و (wāv), called *'Aṭaf* (عطف), is shown in Devanāgarī by (-ओ-), like شب و روز (shab-o-rūz) as शब-ओ-रोज़.

The final letters of nouns with the nasal vowels, denoted by nunnation, (ـً ; ـٍ ; ـٌ), called *Tanwīn* (تنوین), are shown in Devanāgarī by making the final letters end in (अन्; इन्; उन्), like وقتاً (waqtan) as वक़्तन्; نسلٍ (naslin) as नसलिन and مشارٌ (mashāru'n) as मशारून्.

The orthographical mark (ّ), placed over letters, which denotes that the letters be doubled, called *Tashdīd* (تشدید), is indicated in Devanāgarī by doubling the letter, the first of which is a conjunct or a ligate, or alternately, with a *Virāma* below the first, like حجّت (ḥu'jjat) as हुज्जत (हुज्जत) or لذّت (lazzat) as लज़्ज़त.

The Arabic definite article ال (al), linked with a noun beginning with any of the 'lunar' letters, called *Ḥu'rūf-i-Qamrī* (حروفِ قمری), is shown in Devanāgarī as clearly pronounced, like القمر (al-Qamar) as अल्-क़मर or عبدالقادر ('Abdu'l-Qādir) as 'अब्द-उल्-क़ादिर ('अब्दु'ल्-क़ादिर) or بالکل (bi'lku'l) as बि'ल्-कुल (बि'ल्कुल) while the definite article ال (al), linked with a noun beginning with any of the 'solar' letters, called *Ḥu'rūf-i-Shamsī* (حروفِ شمسی), is denoted in Devanāgarī as assimilated when so done in pronunciation, like الشّمس (ash-Shams) as अश्-शम्स or عبدالرّزاق ('Abdu'r-Razzāq) as 'अब्द-उर्-रज़्ज़ाक़ ('अब्दु'र्-रज़्ज़ाक़) or بالراست (bi'rrāst) as बि'र्-रास्त (बि'र्रास्त).

The aspirated ہ (he) at the end of a word of more than two letters, preceded by any consonant with *Fatḥah* (ـَ) is indicated by *Visarga* (विसर्ग), denoted by two dots placed one above the other (:), like نام (nāmah) as नाम: while the slightly aspirated ہ (he) at the end of a two letter-word with *Fatḥah* (ـَ) is shown by the lower dot of *Visarga* (.), like نہ (nah) as न. whereas with *Kasrah* (ـِ) is indicated by *Hrasva* followed by the lower dot of *Visarga* (.), like کہ (keh) as कि. or پہ (peh) as पि. but یہ (yih) as यह and وہ (wuh) as वह in the Devanāgarī alphabet.

Finally, it is submitted that this scheme of transcription, approved by the Maharashtra State Board of Literature and Culture, does not claim to be entirely free from imperfection. It is, indeed, a workable scheme which makes it possible to represent Urdu script into Devanāgarī orthography. This scheme which serves the purpose of reproducing in Devanāgarī, words or text written in Urdu characters, has been faithfully followed by the author, in the preparation of the *Urdu-Marathi Shabdkosh*, in his capacity as scrutiny-editor of the dictionary.

N. S. GOREKAR
SCRUTINY-EDITOR

• • •

उर्दू-मराठी शब्दकोश

अंकिश्त (انکشت) पु. (फ़ा.) कोळसा.

अंगबीं (انگبیں); **अंगबीन** (انگبین) पु. (फ़ा.) मध.

अंगार (انگار) प्रत्य. (फ़ा.) (१) इच्छिणारा. (२) विचार करणारा. [उदा. 'सहल अंगार' (سہل انگار) वि. ('अ.+फ़ा.) सुगमता इच्छिणारा; आळशी].

अंगारः (انگارہ) पु. (फ़ा.) (१) रूपरेखा; रेखाचित्र. (२) हिशेबाची वही. (३) कथा; कादंबरी. (४) अपूर्ण वस्तू.

अंगिश्त (انگشت) पु. (फ़ा.) कोळसा.

अंगुलः (انگلہ) पु. (फ़ा.) (१) गुंडी; बटण. (२) काज.

अंगुश (انگژ) पु. (फ़ा.) अंकुश.

अंगुश्त (انگشت) स्त्री. (फ़ा.) बोट; अंगुली. **–नुमा** (–نما) वि. (फ़ा.) ज्याच्याकडे लोक बोट दाखवितात असा; कुविख्यात; बदनाम. **–नुमा'ई** (–نمائی) स्त्री. (फ़ा.) अपकीर्ती; बदनामी. **–री** (–ری) स्त्री. (फ़ा.) अंगठी; मुद्रिका. **–बदंदाँ होना** (–بدنداں ہونا) आश्चर्याने तोंडात बोट घालणे.

अंगुश्त-ए-ज़िनहार (انگشت زنہار) पु. (फ़ा.) शरण-चिठ्ठी; जित्याने जेत्यासमोर आपला पराभव कबूल करण्यासाठी बोटाने खूण करणे.

अंगुश्त-ए-नर (انگشت نر) पु. (फ़ा.) अंगठा.

अंगुश्तानः (انگشتانہ) पु. (फ़ा.) (१) शिप्याचे अंगुस्तान; बोट-टोपण; अंगुलित्राण. (२) हाताच्या अंगठ्यात घालावयाची एक प्रकारची अंगठी.

अंगूर (انگور) पु. (फ़ा.) (१) द्राक्ष. (२) जखम भरली जात असता तिच्यात दिसणारे लाल दाणे किंवा मोड.

अंगूरी (انگوری) वि. (फ़ा.) द्राक्षापासून बनलेले; द्राक्षाच्या रंगाचे.

अंगेज़ (انگیز) प्रत्य. (फ़ा.) भडकविणारा; उत्पन्न करणारा; कारक. [उदा. 'हैरत अंगेज़' (حیرت انگیز) वि. ('अ.+फ़ा.) आश्चर्यकारक].

अंजल (انجل) वि. ('अ.) टपोऱ्या डोळ्यांचा; विशालाक्ष.

अंजस (انجس) वि. ('अ.) अत्यंत अपवित्र.

अंजाम (انجام) पु. (फ़ा.) (१) शेवट. (२) परिणाम; फळ. **–देना** (–دینا) पूर्ण करणे; तडीस नेणे.

अंजामकार (انجام کار) अव्य. (फ़ा.) सरते शेवटी; अखेरीस.

अंजीर (انجیر) पु. (फ़ा.) अंजीर (फळ).

अंजुदान (انجدان) पु. ('अ.) हिंगाचे झाड; हिंगाचे लाकूड.

अंजुबार (انجبار) पु. (फ़ा.) एक औषधी वनस्पती.

अंजुम (انجم) पु. ['अ. 'नज्म' (نجم) चे अनेक.] तारे.

अंजुमन (انجمن) स्त्री. (फ़ा.) (१) संस्था; मंडळ. (२) सभा.

अंजुमशनास (انجم شناس) पु. ('अ.+फ़ा.) ज्योतिष शास्त्रज्ञ; खगोलविद्यावेत्ता; ज्योतिषी.

अंदक (اندک) वि. (फ़ा.) थोडे; अल्प.

अंदर (اندر) अव्य. (फ़ा.) आत; मध्ये.

अंदरूँ (اندروں); **अंदरून** (اندرون) वि. (फ़ा.) आतील; आंतरिक. (पु.) आतील भाग.

अंदरूनी (اندرونی) वि. (फ़ा.) आतील; अंतर्गत.

'अंदलीब (عندلیب) स्त्री. ('अ.) बुलबुल (गाणारा पक्षी).

अंदलुस (اندلس) पु. ('अ.) स्पेन (देश).

अंदाख्तः (انداختہ) वि. (फ़ा.) फेकलेले; टाकलेले.

अंदाज़ (انداز) पु. (फ़ा.) (१) अनुमान; अदमास. (२) ढंग; पद्धती. (३) हावभाव. (प्रत्य.) फेकणारा; टाकणारा. [उदा. 'तीर अन्दाज़' (تیرانداز) धनुर्धारी].

अंदाज़न् (انداز) अव्य. (फ़ा.) अदमासे; अंदाजे; सुमारे.

अंदाज़ः (اندازہ) पु. (फ़ा.) अंदाज; अदमास; अनुमान; अटकळ.

अंदाम (اندام) पु. ('अ.) शरीर; देह.

अंदेश (اندیش) प्रत्य. (फ़ा.) विचार करणारा; इच्छिणारा. [उदा. 'दूर अन्देश' (دور اندیش) दूरदर्शी].

अंदेशः (اندیشہ) पु. (फ़ा.) (१) शंका. (२) काळजी. (३) भीती. (४) अनिश्चितपणा; डळमळीतपणा.

अंदोख्तः (اندوختہ) वि. (फ़ा.) कमावलेले; जमविलेले.

अंदोह (اندوہ) पु. (फ़ा.) दुःख; क्लेश.

अंदोहगीं (اندوہگیں) वि. (फ़ा.) दुःखी; कष्टी.

अंदोहनाक (اندوہناک) वि. (फ़ा.) दुःखपूर्ण; विषादपूर्ण.

'अंबर (عنبر) पु. ('अ.) (१) व्हेल माशापासून मिळणारा एक सुगंधी पदार्थ. (२) एक प्रकारचे अत्तर.

अंबार (انبار) पु. ('अ.) ढीग; रास.

अंबारख़ानः (انبارخانہ) पु. (फ़ा.) भांडार; गोदाम.

अंबिया (انبیا) पु. ['अ. 'नबी' (نبی) चे अनेक.] अनेक प्रेषित; पैगंबर.

अंबुरः (انبُرہ) पु. (तु.) अंबर; अंबूर; चिमटा; पकड.

अंबोह (انبوہ) पु. (फ़ा.) समूह; गर्दी; जमाव.

अंसार (انصار) पु. ['अ. 'नसीर' (نصیر) चे अनेक.] मदत करणारे लोक; सहायकगण; मदीनेच्या ज्या लोकांनी हजरत मुहम्मद पैगंबर व त्यांचे सहकारी यांना आपल्या घरी ठेवून घेतले होते व अन्य प्रकारे मदत केली होती त्यांना अंसार असे म्हणतात.

अंसारी (انصاری) वि. ('अ.) अंसाराशी संबंधित.

अ'अज़म (اعظم) वि. ('अ.) मोठा; महान; श्रेष्ठ.

अ'अदा (اعضا) पु. ['अ. 'अदो' (عضو) चे अनेक.] शरीराचे अवयव. **-ए-तनासुल** (-ے تناسل) पु. पुरुषाचे जननेंद्रिय; लिंग. **-ए-र'ईसः** (-ے رئیسہ) पु. शरीरातील प्रमुख अवयव (हृदय, मेंदू, यकृत वगैरे).

अ'अदा'ई (اعضائی) वि. सेंद्रिय; इंद्रियविषयक. **-मादः** (-مادہ) सेंद्रिय पदार्थ.

अ'अदाद (اعداد) पु. ['अ. 'अदद' (عدد) चे अनेक.] (१) संख्या. (२) आकडे; अंक.

अ'अमाल (اعمال) पु. ['अ. 'अमल' (عمل) चे अनेक.] (१) कामे; कृत्ये; करणी; कृती; कार्ये. (२) वागणूक; आचरण. **-नामः** (-نامہ) पु. ('अ. + फ़ा.) (१) माणसाच्या बऱ्यावाईट कृत्यांची नोंद ज्यात ठेवली जाते अशी वही किंवा कागद; शेरेबुक. (२) कैद्याच्या वर्तणुकीचे पत्रक

अ'अराब (اعراب) पु. ('अ.) अरबस्तानातील जंगली लोक; अडाणी माणसे. (हे अनेकवचन आहे, परंतु याचे एकवचन नाही).

अ'अलॉ (اعلیٰ) वि. ('अ.) सर्वश्रेष्ठ; उत्तम.

आदम को 'अजब खुदा ने रुत्बः बख़्शा ।
अदमा के लि'ए मुक़ाम अ'अलॉ बख़्शा ।।

अ'अलाम (اعلام) पु. ['अ. 'अलम' (علم) चे अनेक.] (१) नावे; नामावली. (२) जाहीर करणे; प्रकटन. **-नामः** (-نامہ) पु. ('अ. + फ़ा.) जाहीरनामा.

अ'अशारियः (اعشاریہ) वि. ('अ.) दशांश.

अ'असाब (اعصاب) पु. ['अ. 'असब' (عصب) चे अनेक.] शरीरातील अनेक स्नायू.

अक़ता'अ (اقطاع) पु. ['अ. 'क़त'अ' (قطع) चे अनेक.] तुकडे; जमिनीचे तुकडे; परगणे, तालुके वगैरे.

अक़्तार (اقطار) पु. ['अ. 'क़तर' (قطر) व 'क़तरः' (قطرہ) यांचे अनेक.] (१) किनारे; कडा. (२) थेंब; बिंदू.

'अकद (عکد) पु. ('अ.) लठ्ठ होणे; स्थूल होणे.

'अक़द (عقد) पु. ('अ.) बोलताना अडखळणे; दोरीला गाठ पडणे.

अक़दस (اقدس) वि. ('अ.) अत्यंत पवित्र, प्रतिष्ठित.

'अक़ब (عقب) पु. ('अ.) (१) मागील भाग. (२) पाठलाग. **-करना** (-کرنا) अनुसरण, पाठलाग करणे. **-में** (-میں) मागे; शेवटी.

अकबर (اکبر) वि. ('अ.) फार मोठे; महान.

अकबरआबाद (اکبرآباد) पु. ('अ. + फ़ा.) अकबराने वसविलेले आग्रा शहर.

'अक़रक़रहा (عقرقرحا) पु. ('अ.) अक्कलकाढा (वनस्पती).

'अक़रब (عقرب) पु. ('अ.) (१) विंचू. (२) वृश्चिक राशी.

अकरम (اکرم) वि. ('अ.) अत्यंत कृपाळू; दानी; श्रेष्ठ.

अकराम (اکرام) पु. ['अ. 'करम' (کرم) चे अनेक.] कृपा; दाने.

'अक़्ल (عقل) स्त्री. ('अ.) बुद्धी; ज्ञान; अक्कल.

'अक़्लन् (عقلاً) अव्य. ('अ.) ज्ञानाने; बुद्धीने; ध्यानात.

अक़्लीम (اقلیم) स्त्री. ('अ.) देश; प्रांत.

अक़्ल्ल (اقل) वि. ('अ.) फार थोडे; अल्प.

अक़्ल्लियत (اقلیت) स्त्री. ('अ.) अल्पसंख्य जनता; अल्पसंख्या; अल्पसंख्यांक.

अक़्वाम (اقوام) पु. ['अ. 'क़ौम' (قوم) चे अनेक.] राष्ट्रे; जाती; देश.

अक़्वाम-ए-मुत्तहिदः (اقوام متحدہ) पु. ('अ.) संयुक्त राष्ट्रे.

अकसर (اکثر) अव्य. ('अ.) प्रायः; बहुधा; नेहमी. (वि.) अधिकांश; पुष्कळ.

अकसरियत (اکثریت) स्त्री. ('अ.) बहुमत; बहुसंख्य लोक.

अक़सात (اقساط) पु. [अ. 'क़िस्त' (قسط) चे अनेक.] (१) हप्ते. (२) हिस्से.

अक़साम (اقسام) पु. [अ. 'क़िस्म' (قسم) चे अनेक.] अनेक प्रकार.

अक़साम (اقسام) पु. [अ. 'क़सम' (قسم) चे अनेक.] शपथा.

'अक़ा'इद (عقائد) पु. [अ. 'अक़ीदः' (عقيدہ) चे अनेक.] श्रद्धा; धर्म; विश्वास.

अक़ारिब (اقارب) पु. [अ. 'अक़रब' (اقرب) चे अनेक.] जवळचे लोक; नातेवाईक.

'अक़ारिब (عقارب) पु. [अ. 'अक़रब' (عقرب) चे अनेक.] अनेक विंचू.

अकारिम (اکارم) पु. [अ. 'अकरम' (اکرم) चे अनेक.] पूज्य व्यक्ती; श्रेष्ठ लोक.

अक़ालीम (اقالیم) पु. [अ. 'अक़लीम' (اقلیم) चे अनेक.] अनेक देश; अनेक प्रांत.

'अक़ीक़ (عقیق) पु. (अ.) एक तांबूस, कठीण, चमकदार रत्न. दृष्ट लागू नये म्हणून मुलांच्या गळघांत हे बांधतात. **–उल्-बहर** (البحر –) पोवळे; प्रवाळ.

'अक़ीक़ः (عقیقہ) पु. (अ.) मुसलमान मुलांचा मुंडन-नामकरण संस्कार. हा जन्मानंतर सातव्या दिवशी करण्यात येतो. यावेळी जी बकरी (शेळी) बळी देण्यात येते तिलाही '**अक़ीक़ः**' अशी संज्ञा आहे.

'अक़ीदत (عقیدت) स्त्री. (अ.) (१) धार्मिक श्रद्धा; निष्ठा. (२) एखाद्या धर्मातील मूलभूत गोष्ट.

'अक़ीदतमंद (عقیدت مند) वि. (अ.+फ़ा.) श्रद्धावान; निष्ठावंत.

'अक़ीदः (عقیدہ) पु. (अ.) (१) दृढ विश्वास; निष्ठा. (२) धर्म; पंथ.

'अक़ीब (عقیب) वि. (अ.) मागून येणारा; अनुयायी.

'अक़ीम (عقیم) पु. (अ.) वांझ, संतानाक्षम पुरुष, नपुसक.

'अक़ीमः (عقیمہ) स्त्री. (अ.) वंध्या स्त्री.

'अक़ील (عقیل) वि. (अ.) बुद्धिमान; हुशार.

'अक़ीलः (عقیلہ) स्त्री. (अ.) (१) बुद्धिमान स्त्री. (२) पडदानशीन स्त्री; खानदानी स्त्री; श्रीमती.

अकीलः (اکیلہ) स्त्री. (अ.) खाद्यपदार्थ.

'अक़ूबत (عقوبت) स्त्री. (अ.) (१) यातना; पीडा. (२) शिक्षा.

'अक्कास (عکاس) वि. (अ.) चित्रकार; छाया-चित्रकार.

'अक्कासी (عکاسی) स्त्री. (अ.) चित्रकला; छाया-चित्रण: नक्कल.

'अक़्द (عقد) पु. (अ.) (१) विवाह. (२) गाठ. (३) वचन; प्रतिज्ञा. (४) संबंध. (५) करार. **–करना** (–کرنا) लग्न करणे.

'अक़्दनामः (عقد نامہ) पु. (अ. + फ़ा.) लग्नाचे करारपत्र; करारनामा.

'अक़्दबंदी (عقد بندی) स्त्री. (अ.+फ़ा.) (१) विवाहाचा करार करणे; लग्न ठरविणे. (२) निश्चय करणे.

अक़्दस (اقدس) वि. (अ.) अत्यंत पवित्र; पुण्यशील.

अक्मल (اکمل) वि. (अ.) पूर्णतर; अधिक योग्य.

अक्रम (اکرم) वि. (अ.) मोठा दानी; अत्यंत दयाळू.

अक्ल (اکل) पु. (अ.) खाणे; भोजन.

'अक़्ल (عقل) स्त्री. (अ.) बुद्धी; समज; हुशारी; विवेक. **–का दुश्मन** (کا دشمن –) मूर्ख.

'अक़्लमंद (عقلمند) वि. (अ.) बुद्धिमान; शहाणा; हुशार.

'अक़्लमंदी (عقلمندی) स्त्री. (अ.) शहाणपण; हुशारी.

'अक़्ली (عقلی) वि. (अ.) (१) बुद्धीशी संबंधित. (२) तर्कसिद्ध; उचित.

'अक्स (عکس) पु. (अ.) (१) प्रतिबिंब; पडछाया. (२) चित्र; छायाचित्र. (३) आकस; वैर; हट्ट.

अक्सर (اکثر) अव्य. (अ.) प्रायः; बहुधा; अनेकदा; नेहमी. (वि.) अधिक; बहुतांश.

अक्सरियत (اکثریت) स्त्री. (अ.) बहुमत; बहुसंख्य जनता.

'अक्सी (عکسی) वि. (अ.) छायेशी संबंधित. [उदा. '**अक्सीतस्वीर**' (عکسی تصویر) छायाचित्र; फोटो].

अक्सीर (اکسیر) स्त्री. (अ.) (१) रसायन; तांबे, जस्त वगैरे हलक्या धातूंचे सोने-चांदी बनविणारा पदार्थ. (२) रोगनाशक औषध. (वि.) रामबाण; परिणामकारक. **–गर** (–گر) रसायन तयार करणारा.

अख़ (اخ) पु. (अ.) भाऊ; भ्राता.

अख़गर (اخگر) पु. (फ़ा.) आगीची ठिणगी; अग्नी-स्फल्लिंग.

अख़ज़ (اخذ) पु. ('अ.) (१) घेणे; ग्रहण करणे. (२) उद्धृत करणे. **–बि'ल्-जब्र** (– بالجبر) बळजबरीने केलेले अपहरण.

अख़्दर (اخضر) वि. ('अ.) हिरवा; गडद हिरव्या रंगाचा.

अख़नी (اخنی) स्त्री. [फ़ा. 'यखनी' (یخنی) पासून.] (१) मांसाचा रस्सा (मसाला न घातलेला). (२) घन-धान्याचा साठा.

अख़बार (اخبار) पु. ['अ. 'खबर' (خبر) चे अनेक.] (१) वृत्तपत्र. (२) बातम्या; वातमीपत्र. **–नवीस** (– نویس) पु. ('अ.+फ़ा.) (१) वृत्तपत्राचा संपादक. (२) बातम्या लिहिणारा, पाठविणारा.

अख़याफ़ी (اخیافی) पु. ('अ.) ज्यांचे बाप वेगवेगळे परंतु आई एकच आहे अशी भावंडे.

अख़यार (اخیار) पु. ['अ. 'ख़ैर' (خیر) चे अनेक.] पुण्यसमूह; सज्जन माणसे.

अख़लाक़ (اخلاق) पु. ['अ. 'ख़ुल्क़' (خلق) चे अनेक.] (१) सवयी; स्वभाव. (२) शील; माणुसकी. (३) नीती; सदाचार.

अख़लाक़ी (اخلاقی) वि. ('अ.) नैतिक.

अख़लात् (اخلاط) पु. ['अ. 'ख़लत्' (خلط) चे अनेक.] (१) मिश्रणे. (२) वात, पित्त, कफ हे त्रिदोष व रक्त हा धातू, या चारांना मिळून 'अख़्लात्-ए-अरब'अ' (اخلاط اربع) असे म्हणतात.

अख़लाफ़ (اخلاف) पु. ['अ. 'ख़लफ़' (خلف) चे अनेक.] (१) सुपुत्र; मुलगे, नातू वगैरे. (२) वारस.

अख़वान (اخوان) पु. ['अ. 'अख़' (اخ) चे अनेक.] बांधव; भाऊ.

अख़ी (اخی) पु. ('अ.) माझा भाऊ; हे माझ्या भावा!

अख़ीर (اخیر) वि. ('अ.) मागील; शेवटचा. (पु.) अखेर; अंत; समाप्ती.

अख़्ख़ा (اخا) अव्य. ('अ.) अबब! अरे बापरे! (आश्चर्योद्गार).

अख़्तर (اختر) पु. (फ़ा.) (१) तारा; नक्षत्र. (२) झेंडा. (३) शकुन.

अख़्तरशनास (اختر شناس) पु. (फ़ा.) ज्योतिषी; खगोल शास्त्रज्ञ.

अख़्तरशुमारी (اختر شماری) स्त्री. (फ़ा.) तारे मोजणे; सारी रात्र अस्वस्थतेत जागून घालविणे.

अख़्तियार (اختیار) पु. ('अ.) (१) अधिकार; सत्ता. (२) पसंती.

अख़्तः (اختہ) वि. (फ़ा.) खच्ची केलेला (पशू).

अगर (اگر) अव्य. (फ़ा.) जर; यदि. **–मगर** (– مگر) टाळाटाळ.

अगरचि. (اگرچہ) अव्य. (फ़ा.) जरी; यद्यपि.

अग़राद् (اغراض) स्त्री. ['अ. 'ग़र्द' (غرض) चे अनेक.] (१) गरजा; आवश्यकता. (२) हेतू; उद्देश.

अग़लत् (اغلط) वि. ('अ.) अत्यंत अशुद्ध; चूक; खोटे.

अग़लब (اغلب) अव्य. ('अ.) बहुत करून; निश्चितपणे; जवळजवळ.

अग़लबग़ल (اغل بغل) अव्य. (फ़ा.) आसपास; इकडेतिकडे; दोहोबाजूंस.

अचार (اچار) पु. (फ़ा.) लोणचे.

अज़ (از) प्रत्य. (फ़ा.) ने; पासून; पेक्षा. [उदा. 'अज़्तरफ़' (از طرف) बाजूने; कडून; तर्फे].

अज़्कार (اذکار) पु. ['अ. 'ज़िक्र' (ذکر) चे अनेक.] चर्चा; उल्लेख; वर्णने; जप-तप.

अज़्किया (اذکیا) पु. ['अ. 'ज़की' (ذکی) चे अनेक.] बुद्धिमान, प्रतिभाशाली माणसे.

अज़ख़ुद (از خود) अव्य. (फ़ा.) स्वतः; आपोआप.

अज़ख़ुदरफ़्तः (از خود رفتہ) वि. (फ़ा.) बेशुद्ध; स्वतःवरील ताबा सुटलेला.

अज़ग़ैबी (از غیبی) वि. (फ़ा.) (१) गुप्त. (२) रहस्यपूर्ण; दैवी.

अजज़ा (اجزا) पु. ['अ. 'जुज़' (جز) चे अनेक.] तुकडे; अंश; भाग.

अजदाद (اجداد) पु. ['अ. 'जद' (جد) चे अनेक.] पूर्वज; वाडवडील.

अजनबी (اجنبی) वि. ('अ.) (१) अपरिचित; अनोळखी. (२) परदेशी; परप्रांतीय. (३) अज्ञात.

अजनास (اجناس) स्त्री. ['अ. 'जिन्स' (جنس) चे अनेक.] जिन्नस; वस्तू; पदार्थ; सामानसुमान.

अज़्फ़र (اذفر) वि. ('अ.) उग्र वासाचे; अत्यंत सुगंधित.

'अजब (عجب) वि. ('अ.) विलक्षण; अद्भुत. (पु.) आश्चर्य.

अज़बर (از بر) अव्य (फ़ा.) तोंडपाठ; मुखोद्गत.

अज़बस (از بس) अव्य. (फ़ा.) (१) अत्यंत. (२) तरीही.

'अजम (عجم) पु. ('अ.) (१) अरबस्तानाव्यतिरिक्त इराण वगैरे इतर देश. (२) या देशांत राहाणारे लोक.

'अज़मत (عظمت) स्त्री. ('अ.) (१) श्रेष्ठत्व; महत्व. (२) प्रताप. (३) आदर; सन्मान.

अजमल (اجمل) वि. ('अ.) अत्यंत सुंदर; रूपवान.

'अजमी (عجمی) पु. ('अ.) अरबस्तानाव्यतिरिक्त इतर देशात राहाणारा; इराणी माणूस.

अजर (اجر) पु. ('अ.) (१) मोबदला; सत्कर्माचे फळ. (२) पारितोषिक.

'अज़रा (عذرا) स्त्री. ('अ.) (१) कुमारी; सुंदरी. (२) कन्या राशी. (३) छिद्र न पाडलेली मोत्ये. (४) येशूची माता मेरी.

अजराम (اجرام) पु. ['अ. 'जिर्म' (جرم) चे अनेक.] शरीरे. **अजराम-ए-फ़लकी** (اجرام فلکی) ग्रह, नक्षत्रे वगैरे.

अज़रूए (از روے) अव्य. (फ़ा.) प्रमाणें; अनुसार. [उदा. अज़रू-ए-इन्साफ़ (از روے انصاف) न्याया-प्रमाणे; न्यायतः].

अजल (اجل) स्त्री. ('अ.) (१) मृत्यू. (२) काळ. **-गिरिफ़्तः** (گرفتہ -) मरणान्मुख. **-रसीदः** (رسیدہ -) मृतप्राय.

अज़ल (ازل) स्त्री. ('अ.) (१) प्रारंभ; उगम. (२) अनादी. (३) जन्मदिन. (४) आराम. **रोज़-ए-अज़ल** (روز ازل) (१) जन्म-दिवस. (२) सृष्टीच्या उत्पत्तीचा दिवस.

अजलाफ़ (اجلاف) पु. ['अ. 'जलफ़' (جلف) चे अनेक.] नीच लोक; हलकट माणसे.

अज़ली (ازلی) वि. ('अ.) शाश्वत; अनादिअनंत.

अजल्ल (اجل) वि. ('अ.) (१) महान; श्रेष्ठ. (२) प्रतिष्ठित.

अज़्ल (اذل) वि. ('अ.) अत्यंत नीच; अधम.

अज़सर-ए-दस्त (ازسر دست) अव्य. (फ़ा.) शीघ्र; त्वरित.

अज़सर-ए-नौ (ازسر نو) अव्य. (फ़ा.) पुनः नव्याने; पुनः पहिल्यापासून.

अज़सरतापा (ازسر تا پا) अव्य. (फ़ा.) आपादमस्तक; नखशिखांत.

अजसाम (اجسام) पु. ['अ. 'जिस्म' (جسم) चे अनेक.] शरीरे; देह.

अज़हद (ازحد) वि. (फ़ा.) बेहद; अत्यंत; अमर्याद.

अज़हर (اظہر) वि. ('अ.) जाहीर; प्रकट; अधिक स्पष्ट.

अजहल (اجہل) वि. ('अ.) अत्यंत मूर्ख.

अज़ाँ (ازاں) अव्य. (फ़ा.) त्यापासून; म्हणून.

'अज़ा (عزا) स्त्री. ('अ.) (१) मृत्युशोक; विलाप. (२) सांत्वन. **-खानः** (خانہ -) (१) शोकगृह. (२) ताबूत ठेवण्याची जागा.

'अज़ाज़ील (عزازیل) पु. ('अ.) सैतान जेव्हा देवदूत होता तेव्हाचे त्याचे नाव.

अज़ान (اذان) स्त्री. ('अ.) नमाजासाठी करावयाचा पुकारा; बांग.

'अज़ाब (عذاب) पु. ('अ.) (१) पापाबद्दल मिळणारी शिक्षा. (२) यातना. (३) पाप; दुष्कर्म. (४) दुःख; कष्ट. (५) भांडण.

'अजा'इब (عجائب) पु. ['अ. 'अजीब' (عجیب) चे अनेक.] आश्चर्ये; आश्चर्यकारक वस्तू.

'अजा'इबखानः (عجائب خانہ) पु. ('अ.+फ़ा.) वस्तुसंग्रहालय; म्युझियम.

अज़ीं (ازیں) अव्य. (फ़ा.) यापासून; म्हणून.

'अज़ीज़ (عزیز) वि. ('अ.) (१) प्रिय; लाडका. (२) माननीय. (३) नात्याचा. (पु.) नातेवाईक. **-उल्-क़द्र** (القدر -) प्रिय महाशय. **-दारी** (داری -) नाते; मित्रत्व.

'अजीज़ (عجیز) वि. ('अ.) नामर्द पुरुष; नपुसक.

'अजीब (عجیب) वि. ('अ.) विलक्षण; अद्भुत; अजब. **-ओ-गरीब** (و غریب -) विचित्र; चमत्कारिक.

'अज़ीम (عظیم) वि. ('अ.) महान; श्रेष्ठ; प्रचंड.

'अज़ीम-उश्-शान (عظیم الشان) वि. ('अ.) भव्य; महान; विशाल.

'अज़ीमत (عزیمت) स्त्री. ('अ.) (१) निश्चय. (२) संकल्प. (३) मंत्र-तंत्र; जादूटोणा.

अज़ीयत (اذیت) स्त्री. ('अ.) दुःख; यातना; क्लेश.

अजीर (اجیر) पु. ('अ.) (१) गुलाम. (२) मजूर; कामगार.

'अजूज़ (عجوز) स्त्री. ('अ.) म्हातारी स्त्री; वृद्धा.

अज़ूफ़ः (اذوفہ) पु. ('अ.) शिदोरी; अन्न-पाणी.

'अज़ूबत (عذوبت) स्त्री. ('अ.) माधुर्य; गोडी; स्वाद.

'अज़ूबः (عجوبہ) पु. ('अ.) आश्चर्य; अद्भुत गोष्ट.

'अज़ूल (عجول) वि. ('अ.) (१) घाई करणारा; उतावळा. (२) वेगवान.

'अज्ज़ (عجز) पु. ('अ.) (१) नम्रता; दीनता. (२) अजीजी.

'अज़्म (عزم) पु. ('अ.) निश्चय; संकल्प. **-बि'ल्-जज़्म** (بالجزم -) दृढनिश्चय.

'अज़्मत (عظمت) स्त्री ('अ.) (१) श्रेष्ठत्व; महत्ता. (२) आदर.

अज़्मल (اجمل) वि. ('अ.) सुंदरतम; अत्यंत रूपवान.

अज्र (اجر) पु. ('अ.) (१) पुण्याचे फळ. (२) मोबदला. (३) प्रत्युपकार. (४) खर्च.

'अज़्ल (عزل) पु. ('अ.) पदच्युती; बडतर्फी.

अतकः (اتکم) पु. (तु.) दाईचा नवरा.

अतफ़ाल (اطفال) पु. ['अ. 'तिफ़्ल' (طفل) चे अनेक.] (१) मुले; बालके. (२) मुलेबाळे. **'अयाल-ओ-अतफ़ाल** (عیال و اطفال) मुलेबाळे; कुटुंब.

'अतबः (عتبہ) पु. ('अ.) (१) चौकट; उंबरा. (२) दरगा.

अतम्म (اتم) वि. ('अ.) सर्वांग; परिपूर्ण.

अतराफ़ (اطراف) पु. ['अ. 'तरफ़' (طرف) चे अनेक.] अनेक बाजू; दिशा.

अतलस (اطلس) स्त्री. ('अ.) एक प्रकारचे मौल्यवान रेशमी कापड.

अतवार (اطوار) पु. ['अ. 'तौर' (طور) चे अनेक.] (१) पद्धती; ढंग. (२) आचरण. (३) राहाणीकरणी.

'अतश (عطش) स्त्री. ('अ.) तहान; तृष्णा.

'अतशान (عطشان) वि. ('अ.) तहानलेला; तृषित.

अतहर (اطہر) वि. ('अ.) अत्यंत पवित्र.

अतहार (اطہار) पु. ('अ.) (१) पवित्र लोक. (२) स्त्रीच्या दोन मासिक धर्मातील मुदत; पवित्र काळ.

'अता (عطا) स्त्री. ('अ.) देणे; दान. **–नामः** (–نامہ) दानपत्र.

'अता'ई (عطائی) पु. ('अ.) स्वयंशिक्षित व्यक्ती; ज्याने गुरूच्या मदतीशिवाय, स्वतःच्या नैसर्गिक प्रतिभेच्या साह्याने एखादी विद्या शिकून घेतली आहे अशा.

अताबक (اتابک) पु. (तु.) (१) गुरू; वस्ताद. (२) सरदार.

अतालीक़ (اتالیق) पु. (तु.) (१) शिष्टाचार शिकविणारा. (२) गुरू; शिक्षक.

अतिब्बा (اطبا) पु. ['अ. 'तबीब' (طبیب) चे अनेक.] हकीम; वैद्य.

'अतियः (عطیہ) पु. ('अ.) इनाम; पुरस्कार; अनुदान; भेट; दिलेली वस्तू.

'अतीक़ (عتیق) वि. ('अ.) (१) प्राचीन; पुरातन. (२) मुक्त; स्वतंत्र. (३) श्रेष्ठ.

'अतफ़त (عطوفت) स्त्री. ('अ.) कृपा; अनुग्रह.

'अत्तार (عطار) पु. ('अ.) (१) गंधी; अत्तर तयार करणारा व विकणारा. (२) औषध-विक्रेता.

'अत्फ़ (عطف) पु. ('अ.) (१) इच्छा. (२) कृपा. (३) उभयान्वयी अव्यय (व, और).

'अत्ब (عتب) पु. ('अ.) निंदा; क्रोध.

अद्'अफ़ (اضعف) वि. ('अ.) अत्यंत दुर्बळ.

अदक़्क़ (ادق) वि. ('अ.) अत्यंत क्लिष्ट; गूढ; सूक्ष्म.

'अदद (عدد) पु. ('अ.) (१) अंक. (२) संख्या.

'अदद-ए-मुत्लक़ (عدد مطلق) पु. ('अ.) मूल्य अंक [एक, दोन, तीन वगैरे संख्यावाचक अंक याच्या उलट पहिला, दुसरा यांना].

'अदद-ए-वस्फ़ी ; (عدد وصفی) म्हणजे क्रमवाचक अंक असे म्हणतात.

'अदद-ए-सहीह् (عدد صحیح) पु. ('अ.) पूर्ण अंक; पूर्ण संख्या.

'अदन (عدن) पु. ('अ.) (१) ज्या ठिकाणी परमेश्वराने आदिमानवाला निर्माण करून ठेवले होते ते स्वर्गीय उपवन. (२) एडन.

अदनाँ (ادنیٰ) वि. ('अ.) (१) खालच्या दर्जाचा. (२) तुच्छ. (३) अधम; नीच. (४) मामुली; सामान्य. **–ओ-अ'अला** (– و اعلیٰ) उच्चनीच सारे; लहानथोर.

अदब (ادب) पु. ('अ.) (१) शिष्टाचार; आदर. (२) साहित्य; वाङ्मय.

अदबी (ادبی) वि. ('अ.) साहित्यिक; वाङ्मयीन.

'अदम (عدم) पु. ('अ.) (१) अभाव; नसणे. (२) यमलोक; परलोक. **–आबाद** (–آباد); **–ख़ानः** (–خانہ); **–गाह** (–گاہ) पु. परलोक. **–मौजूदगी** (–موجودگی) स्त्री. अनुपस्थिती; गैरहजेरी.

'अदम-ए-त'आवुन (عدم تعاون) पु. ('अ.) असहकार; असहयोग.

'अदम-ए-तशद्दुद (عدم تشدد) पु. ('अ.) अहिंसा.

'अदम-ए-मुदाख़िलत (عدم مداخلت) पु. ('अ.) तटस्थता; हस्तक्षेप न करणे.

अदरक (ادرک) स्त्री. (फ़ा.) आले.

'अदल (عدل) पु. ('अ.) न्याय; समता. **–परवर** (–پرور) वि. न्यायनिष्ठ; न्यायप्रिय.

अद्ला'अ (اضلاع) पु. ['अ. 'दिल'अ' (ضلع) चे अनेक.] (१) जिल्हे; भाग. (२) बरगडचा.

अदहाँ (اضحیٰ) स्त्री. ('अ.) बलिदान; कुर्बानी. [यावरून 'ईद-ए-अदहाँ' (عید اضحیٰ) किंवा

'ईद-उल्-अद्हा' (عید الاضحیٰ) म्हणजे 'बलिदानाचा सण' हा शब्द बनला आहे].

अदवात (ادوات) स्त्री. ['अ. 'अदात' (ادات) चे अनेक.] उपकरण; यंत्रे; हत्यार. **–ए-जंग** (– جنگ) शस्त्रास्त्रे.

अदविया (ادویا); **अदवियात** (ادویات) स्त्री. ['अ. 'दवा' (دوا) चे अनेक.] औषधे.

अदा (ادا) स्त्री. ('अ.) (१) हावभाव; नखरा. (२) ढंग; पद्धती. (वि.) दिलेले; फेड केलेले. **–करना** (– کرنا) (१) भागविणे; परतफेड करणे. (२) बजावणे. (३) अभिनय करणे.

अदा'इगी (ادائگی) स्त्री. ('अ.) फेड; परिपूर्ती.

अदाकार (اداکار) पु. ('अ.+फ़ा.) अभिनेता; अभिनेत्री; नट-नटी; कलाकार.

अदाबंदी (ادا بندی) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) हप्तेबंदी (कर्ज वगैरेची). (२) नायिकेच्या शृंगार चेष्टांचे वर्णन (काव्यातील).

'अदालत (عدالت) स्त्री. ('अ.) (१) न्यायालय; कचेरी. (२) न्याय; समता.

'अदालत-ए-'आलिय: (عدالت عالیہ) स्त्री. ('अ.) उच्च न्यायालय; हायकोर्ट.

'अदालत-ए-ख़फ़ीफ़: (عدالت خفیفہ) स्त्री. ('अ.) खालचे न्यायालय; स्मॉल कॉज कोर्ट.

'अदालत-ए-दीवानी (عدالت دیوانی) स्त्री. ('अ.+फ़ा.) दिवाणी कोर्ट.

'अदालत-ए-फ़ौजदारी (عدالت فوجداری) स्त्री. ('अ.+फ़ा.) फौजदारी कोर्ट.

'अदालत-ए-मातिहत (عدالت ماتحت) स्त्री. ('अ.) अधीन न्यायालय.

'अदावत (عداوت) स्त्री. ('अ.) वैर; शत्रुत्व.

'अदावती (عداوتی) वि. ('अ.) वैरी; शत्रू.

अदाशनास (ادا شناس) वि. ('अ.+फ़ा.) आपल्या मालकाचा इशारा ओळखणारा; हुशार.

अदीब (ادیب) पु. ('अ.) (१) साहित्यिक. (२) शिष्टाचार शिकविणारा; शिक्षक. (वि.) अदबशीर; नम्र.

'अदीम (عدیم) वि. ('अ.) (१) वंचित; विहीन. (२) नष्ट. (३) अप्राप्य **–उल्-फ़ुरसत** (– الفرصت) मुळीच सवड नसलेला. **–उल्-मिसाल** (– المثال) अनुपम; अद्वितीय.

'अदील (عدیل) पु. ('अ.) न्यायाधीश. (वि.) समान; तुल्य.

'अदू (عدو) पु. ('अ.) शत्रु; वैरी.

'अदूल (عدول) पु. ['अ. 'आदिल' (عادل) चे अनेक.] न्यायाधीश; न्यायी माणसे.

'अदो (عضو) पु. ('अ.) (१) अंग; अवयव. (२) भाग.

'अनक़रीब (عنقریب) अव्य. ('अ.) (१) लवकरच. (२) जवळच. (३) जवळजवळ.

अनवर (انور) वि. ('अ.) अत्यंत तेजस्वी; उज्वल.

अनवा'अ (انواع) पु. ['अ. 'नौ'अ' (نوع) चे अनेक.] अनेक प्रकार.

अनवार (انوار) पु. ['अ. 'नूर' (نور) चे अनेक.] प्रकाश; तेज.

अना (انا) सर्व. ('अ.) मी.

अना (انا) स्त्री. (तु.) माता; जननी.

'अना (عنا) स्त्री. ('अ.) त्रास; दुःख; प्रयास.

'अनादिल (عنادل) स्त्री. ['अ. 'अंदलीब' (عندلیب) चे अनेक.] अनेक बुलबुल.

अनाम (انام) पु. ('अ.) (१) मानव; प्राणी; सृष्टी. (२) भूत; पिशाच; दैत्य; राक्षस.

अनार (انار) पु. (फ़ा.) (१) डाळिंब. (२) डाळिंबाच्या आकाराची शोभेची दारू. **–दान:** (– دان) डाळिंबाचे सुकविलेले दाणे. (हे आंबट असतात व औषध म्हणून वापरले जातात).

अना'ल्-हक़्क़ (اناالحق) वा. ('अ.) मी सत्य (परमेश्वर) आहे; अहं ब्रह्मास्मि.

'अनासिर (عناصر) पु. ['अ. 'अंसर' (عنصر) चे अनेक.] पंचमहाभूते.

'अनीफ़ (عنیف) वि. ('अ.) (१) तीव्र. (२) खरखरीत. (३) भांडखोर.

अनीस (انیس) पु. ('अ.) (१) मित्र; सहकारी. (२) प्रेम करणारा, सहानुभूती बाळगणारा.

अन्सब (انسب) वि. ('अ.) अत्यंत उचित; योग्य.

'अन्सर (عنصر) पु. ('अ.) (१) मूलतत्त्व. (२) पंचमहाभूतांपैकी एक.

अन्साब (انساب) पु. ['अ. 'नसब' (نسب) चे अनेक.] वंशावळी.

अन्साब (انصاب) पु. ['अ. 'नसब' (نصب) चे अनेक.] दुःखे; संकटे.

अन्ना (انا) स्त्री. (तु.) (१) दाई. (२) आई.

अफ़'आल (افعال) पु. ['अ. 'फ़'अल' (فعل) चे अनेक.] कर्मे; कृत्ये; आचरण.

अफ़'ई (افعی) पु. ('अ.) काळा नाग; विषारी साप.

अफ़कार (افکار) स्त्री. ['अ. 'फ़िक्र' (فکر) चे अनेक.] विचार; चिंता; चिंतने.

अफ़गन (افگن) वि. (फ़ा.) झुगारणारा; हाकलून लावणारा; खाली पाडणारा. [उदा. 'शेर अफ़गन' (شیر افگن) वाघाला लोळविणारा].

अफ़ग़ान (افغان) पु. (फ़ा.) (१) अफगाणिस्तानचा रहिवासी; पठाण. (२) आरडाओरडा; गोंधळ. (३) तक्रार.

अफ़गार (افگار) वि. (फ़ा.) घायाळ; जखमी.

अफ़ज़ा (افزا) वि. (फ़ा.) वाढविणारा; भर घालणारा. [उदा. 'रोनक़ अफ़ज़ा' (رونق افزا) शोभा वाढविणारा].

अफ़ज़ायश (افزایش) स्त्री. (फ़ा.) वृद्धी; भर; विकास; संवर्धन.

अफ़ज़ूं (افزوں) वि. (फ़ा.) अधिक; जादा वाढलेला; एकूण.

अफ़ज़ल (افضل) वि. ('अ.) श्रेष्ठ; सर्वोत्तम.

अफ़यून (افیون) स्त्री. ('अ.) अफू.

अफ़राज़ (افراز) वि. (फ़ा.) वर उचलणारा; उंच करणारा [उदा. 'सर अफ़राज़' (سر افراز) मस्तक उंच करणारा].

अफ़रातफ़री (افراتفری) स्त्री. (हि.) (१) खळबळ. (२) गोंधळ; गडबड; अव्यवस्था.

अफ़राद (افراد) पु. ['अ. 'फ़र्द' (فرد) चे अनेक.] अनेक व्यक्ती; नग.

अफ़रोख़्तः (افروختہ) वि. (फ़ा.) (१) प्रज्वलित; प्रकाशित. (२) जळजळीत; भडकलेला.

अफ़रोज़ (افروز) वि. (फ़ा.) (१) प्रकाशित करणारा. (२) पेटविणारा. (३) वाढविणारा.

अफ़लाक (افلاک) पु. ['अ. 'फ़लक' (فلک) चे अनेक.] आकाश; आभाळ.

अफ़लातून (افلاطون) पु. ('अ.) (१) सुप्रसिद्ध ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो. (२) स्वतःला फार शहाणा समजणारा; घमेंडखोर. **–कासाला** (–کاسالا) अहमन्य.

अफ़वाज (افواج) स्त्री. ['अ. 'फ़ौज' (فوج) चे अनेक.] सैन्ये.

अफ़वाह (افواہ) स्त्री. ['अ. 'फ़वह' (فوہ) 'मुख' चे अनेक.] अफवा; कंडी; भुमका.

अफ़शाँ (افشاں) स्त्री. (फ़ा.) कलाबतूचे किंवा जरीचे बारीक चूर्ण. (स्त्रिया आपल्या केसांवर व गालांवर हे चूर्ण शोभेसाठी लावतात.) (वि.) शिंपडणारा; झाडणारा; ओतणारा.

अफ़शा (افشا) वि. (फ़ा.) प्रकट; जाहीर.

अफ़सर (افسر) पु. (फ़ा.) (१) अधिकारी; हुद्देदार. (२) मुकुट. (३) सरदार.

अफ़सां (افساں) पु. (फ़ा.) सहाण; धार लावण्याचा दगड.

अफ़सानः (افسانہ) पु. (फ़ा.) (१) कथा; कहाणी; गोष्ट. (२) चर्चा; उल्लेख. **–ख़्वाँ** (–خواں); **–गो** (–گو) कहाणी सांगणारा. **–नवीस** (–نویس); **–निगार** (–نگار) कथालेखक.

अफ़सुर्दगी (افسردگی) स्त्री. (फ़ा.) (१) उदासीनता; खिन्नता. (२) कोमेजून जाणे. (३) गारठून जाणे; गोठणे.

अफ़सुर्दः (افسردہ) वि. (फ़ा.) (१) उदास; खिन्न. (२) कोमेजलेला. (३) गारठलेला. **–ख़ातिर** (–خاطر); **–दिल** (–دل) उदास; खिन्न.

अफ़सूं (افسوں) पु. (फ़ा.) (१) जादू; मंत्र. (२) मायाजाल. **–सोज़** (–سوز); **–गर** (–گر) जादूगार.

अफ़सोस (افسوس) पु. (फ़ा.) (१) दुःख; शोक. (२) खेद; पश्चात्ताप. **–नाक** (–ناک) वि. (फ़ा.) खेदकारक; शोकदायक.

'अफ़िन (عفن) वि. ('अ.) घाणेरडा; दुर्गंधयुक्त.

'अफ़ीफ़ (عفیف) वि. ('अ.) सदाचारी; चारित्र्यवान.

'अफ़ीफ़ः (عفیفہ) वि. स्त्री. ('अ.) पतिव्रता; साध्वी.

'अफ़ू (عفو) पु. ('अ.) क्षमा; माफी.

'अफ़ूनत (عفونت) स्त्री. ('अ.) दुर्गंध; घाण.

अब (اب) पु. ['अ. 'अबू (ابو) चे संक्षिप्त.] बाप; पिता.

अब'आद (ابعاد) पु. ['अ. 'ब'अद' (بعد) चे अनेक.] अंतरे; दूर असणे.

अबकार (ابکار) स्त्री. ['अ. 'बिक्र' (بکر) चे अनेक.] कुमारिका; अविवाहित स्त्रिया.

अबख़रः (ابخرہ) पु. ['अ. 'बुख़ार' (بخار) चे अनेक.] (१) वाफा. (२) बाष्पीभवन. (३) ताप वाढल्याने होणारा बुद्धिभ्रंश; बेशुद्धावस्था; बरळणे.

अबजद (ابجد) स्त्री. ('अ.) (१) अरबी वर्णमाला (अलिफ़, बे वगैरे). (२) अरबी लिपीतील प्रत्येक अक्षराचे एक विशिष्ट मूल्य कल्पिण्यात आलेले असून अशी अक्षरे एकत्र आणून एखाद्याच्या जन्माची, मृत्यूची वगैरे तारीख शब्दबद्ध केली जाते. [या प्रकाराला 'तारीखगोई' (तिथिकथन) अशी संज्ञा आहे.] पहिल्या चार अक्षरांच्या नावावरून या अक्षरमूल्याला 'अबजद' असे संबोधिले जाते. ही मूल्ये अशी आहेत: अलिफ़ (ا) = १; बे

(ب) = २; जीम (ج) = ३; दाल (د) = ४; हे (ه) = ५; वाव (و) = ६; ज़े (ز) = ७; हे (ح) = ८; तोय (ط) = ९; ये (ی) = १०; काफ़ (ک) = २०; लाम (ل) = ३०; मीम (م) = ४०; नून (ن) = ५०; सीन (س) = ६०; 'ऐन (ع) = ७०; फ़े (ف) = ८०; स्वाद (ص) = ९०; क़ाफ़ (ق) = १००; रे (ر) = २००; शीन (ش) = ३००; ते (ت) = ४००; से (ث) = ५००; खे (خ) = ६००; ज़ाल (ذ) = ७००; दवाद (ض) = ८००; ज़ोय (ظ) = ९००; गैन (غ) = १०००.

['अबजद' (ابجد), 'हव्वज' (هوز), 'हुत्ती' (حطی), 'कलिमन' (کلمن), 'स'अफ़्स' (سعفص), 'क़रशत' (قرشت), 'सख़ज़' (ثخذ), 'दज़ग़' (ضظغ)].

अबतर (ابتر) वि. ('अ.) (१) खराब; दुर्दशाग्रस्त. (२) अस्ताव्यस्त; विसकटलेले. (३) दुःखी. (४) गरीब.

अबतरी (ابتری) स्त्री. ('अ.) (१) दुर्दशा; विनाश. (२) अव्यवस्था. (३) दारिद्र्य.

अबद (ابد) पु. ('अ.) अनंतकाल; अनंतता.

अबदन् (اًبدًا) अव्य. ('अ.) सदैव; अनंतकालपर्यंत.

अबदियत (ابدیت) स्त्री. ('अ.) नित्यता; अनश्वरता.

'अबदियत (عبدیت) स्त्री. ('अ.) दासता; सेवाभाव.

अबदी (ابدی) वि. ('अ.) अविनाशी; चिरकालीन; अमर.

अबयात (ابیات) स्त्री. ['अ. 'बैत' (بیت) चे अनेक.] (१) घरे; निवासस्थाने. (२) अनेक शेर; काव्यपंक्ती.

अबर (ابر) पु. (फ़ा.) ढग.

अबरक़ (ابرق) पु. (फ़ा.) अभ्रक.

अबरस् (ابرص) वि. ('अ.) अंगावर कोडाचे डाग असलेला; श्वेतकुष्ठाचा रोगी.

अबरा (ابرا) पु. ('अ.) अभ्रा; दुहेरी कपडयांतील वरचे कापड (अस्तराच्या उलट).

अबराक़ (ابراق) पु. ('अ.) एखाद्यावर वीज कोसळणे; विद्युत्पात.

अबरार (ابرار) पु. ['अ. 'बिर' (بر) चे अनेक.] संतजन; न्यायी; पवित्र लोक.

अबरी (ابری) वि. (फ़ा.) ढगाशी संबंधित; ढगाने भरलेले. (स्त्री.) पुस्तकाच्या बांधणीत वापरला जाणारा रंगीबेरंगी व गुळगुळीत कागद.

अबरू (ابرو) स्त्री. (फ़ा.) भिवई; भुवई; भ्रुकुटी.

अबरेशम (ابریشم) पु. (फ़ा.) (१) रेशीम; कच्चे रेशीम. (२) रेशमाचा कोष.

अबलक़ (ابلق) वि. ('अ.) काळावाळा; काळे व पांढरे ठिपके असलेला (घोडा); अबलख.

अबलः (ابلہ) वि. ('अ.) भोळा; मूर्ख. **–फ़रेब** (– فریب) लबाड; कपटी; ढोंगी.

अबवाब (ابواب) पु. ['अ. 'बाब' (باب) चे अनेक.] (१) अध्याय; प्रकरणे. (२) दरवाजे. (३) कर; महसूल.

'अबस (عبث) अव्य. ('अ.) व्यर्थ; निष्कारण; नाहक.

अबहार (ابحار) पु. ['अ. 'बहर' (بحر) चे अनेक.] अनेक सागर; समुद्र.

'अबा (عبا) पु. ('अ.) लांब डगला.

अबाबील (ابابیل) पु. स्त्री. ('अ.) काळपा रंगाचा एक लहान पक्षी. याच्या छातीजवळील भाग पांढरा असतो.

'अबीर (عبیر) पु. ('अ.) चंदन, केशर, कापूर, कस्तूरी यांच्या मिश्रणाने केलेला सुगंधी पदार्थ. (होळीच्या दिवसांत गुलालाप्रमाणे लोक हा एकमेकांच्या अंगावर उधळतात).

अबू (ابو) पु. ('अ.) पिता; बाप. **–'ल्-बशर** (– البشر) मानव-पिता; आदम; आदिमानव.

'अब्द (عبد) पु. ('अ.) दास; सेवक; गुलाम. **–उर्-रहमान** (– الرحمان) ईश्वराचा सेवक; देवदास.

अब्दाल (ابدال) पु. ['अ. 'बदील' (بدیل) चे अनेक.] (१) साधुसंत; धार्मिक लोक. (२) मुसलमान फकिरांचा एक पंथ. (३) हजरत मुहम्मद पैगंबर यांचे वारसदार.

'अब्दोह (عبدہ) पु. ['अ. 'आबिद' (عابد) चे अनेक.] उपासक; पूजा करणारे.

अब्बा (ابا) संबो. (फ़ा.) हे पित्या! अहो बाबा! (पु.) पिता; वडील. **–जान** (– جان) पिताजी.

'अब्बास (عباس) पु. ('अ.) (१) सिंह. (२) वाघ. (३) हजरत मुहम्मद पैगंबर यांचे चुलते.

'अब्बासी (عباسی) वि. ('अ.) (१) हजरत अब्बास यांच्याशी संबंधित. (२) निळी झाक असलेल्या लाल रंगाचे. (पु.) **गुल-ए-'अब्बासी** (گل عباسی) गुलबक्षी फूल.

अब्र (ابر) पु. (फ़ा.) ढग; मेघ. **–आलूद** (– آلود) मेघाच्छादित.

अब्र-ए-बारां (ابر باراں) पु. (फ़ा.) पावसाळी ढग; बरसणारा मेघ.

अब्रू (ابرو) स्त्री. (फ़ा.) भुवई; भिवई; भ्रुकुटी.

अब्लक्का (ابلقا) स्त्री. ('अ.) मैनेच्या जातीचा एक पक्षी.

'अम (عم) पु. ('अ.) चुलता, काका.

अमजद (امجد) वि. ('अ.) अत्यंत पवित्र; वडीलधारे; परमपूज्य.

अमजाद (امجاد) पु. ['अ. 'अमजद' (امجد) चे अनेक.] प्रतिष्ठित लोक; वडीलधारी माणसे.

अमन (امن) पु. ('अ.) (१) शांतता. (२) रक्षण; बचाव. **–ओ-अमान** (و امان –) पु. शांतता व सुरक्षितता; आबादी आबाद. **–पसन्द** (پسند –) वि. शांतताप्रिय.

अमराद (امراض) पु. ['अ. 'मर्द' (مرض) चे अनेक.] रोग; आजार.

अमरूद (امرود) पु. (फ़ा.) पेरू (फळ).

'अमल (عمل) पु. ('अ.) (१) कार्य; आचरण; कृत्य. (२) अंमल; कब्जा; अधिकार; अमदानी; सत्ता. (३) प्रभाव; परिणाम. (४) अंमलबजावणी. (५) वेळ; समय. (६) नियम; कायदा. (७) स्वभाव. (८) मंत्र; जादूटोणा. **–दर आमद** (درآمد –) पु. अंमलबजावणी; कार्यवाही; तामिली. **–दार** (دار –) पु. अंमलदार; तहसीलदार; मामलेदार **–दारी** (دارى –) स्त्री. राज्य; संस्थान; सत्ता.

अमली (عملى) वि. ('अ.) (१) अंमलात येणारे; व्यावहारिक. (२) कार्यासंबंधी. (३) अंमलबजावणी करणारा. (४) नशाबाज. **–जामः पहनाना** (جامہ پہنانا –) अंमलात आणणे; कार्यान्वित करणे.

'अमलः (عملہ) पु. ['अ. 'आमिल' (عامل) चे अनेक.] कर्मचारी; नोकर लोक; कारकून.

अमवाज (امواج) स्त्री. ['अ. 'मौज' (موج) चे अनेक.] लाटा.

अमवात (اموات) स्त्री. ['अ. 'मौत' (موت) चे अनेक.] मरणे; मृत्यू.

अमसाल (امثال) पु. ['अ. 'मसल' (مثل) चे अनेक.] म्हणी; लोकोक्ती.

अमसिलः (امثلہ) पु. ['अ. 'मिसाल' (مثال) चे अनेक.] उपमा; उदाहरणे.

अमान (امان) स्त्री. ('अ.) (१) संरक्षण. (२) शरण. (३) शांती.

अमानत (امانت) स्त्री. ('अ.) ठेव. **–में खयानत** (میں خیانت –) (१) एखाद्याची ठेव गडप करणे; अपहार. (२) विश्वास.

अमानतदार (امانتدار) पु. ('अ.+फ़ा.) ज्याच्याकडे ठेव ठेवली जाते तो; विश्वस्त; पालक; सत्यनिष्ठ.

अमानतदारी (امانت دارى) स्त्री. ('अ. + फ़ा.) (१) ठेव ठेवणे. (२) प्रामाणिकपणा; सत्यनिष्ठा.

अमानतनामः (امانت نامہ) पु. ('अ. + फ़ा.) ठेव ठेवण्यासंबंधीचे करारपत्र; विश्वासपत्र.

अमानी (امانى) स्त्री. ('अ.) (१) सरकारी मालकीची जमीन. (२) ज्या जमिनीची अथवा कामाची सर्व व्यवस्था आपल्याच हाती आहे अशी जमीन अथवा काम. (३) एखादे काम ठेक्याने (मक्त्याने) न देता स्वतःच्या देखरेखीखाली करवून घेणे.

अमानी (امانى) पु. ['अ. 'अम्नियत' (امنيت) चे अनेक.] (१) आशा; आकांक्षा. (२) सुखे.

'अमामः (عمامہ) पु. ('अ.) पगडी; पटका.

अमारत (امارت) स्त्री. ('अ.) (१) चिन्ह; लक्षण. (२) वेळ. (३) वायदा.

'अमारी (عمارى) स्त्री. ('अ.) अंबारी.

'अमीक़ (عميق) वि. ('अ.) (१) गहन; अगाध. (२) गंभीर. (३) गूढ. (४) सखोल; सूक्ष्म.

अमीन (امين) पु. ('अ.) (१) लिलाव, जप्ती वगैरे बाहेरची कामे करणारा न्यायालयाचा अधिकारी; बेलीफ. (२) जमिनीची मोजणी करणारा अधिकारी. (३) विश्वस्त. वि. (१) विश्वासू. (२) सुरक्षित.

अमीर (امير) पु. ('अ.) (१) सरदार; अधिकारी. (२) श्रीमंत; धनाढ्य. (३) उदार. (४) शासक. **–उल्-उमरा** (الامرا –) पु. सरदारांचा सरदार; अग्रणी. **–उल्-बहर** (البحر –) पु. आरमाराचा सेनापती. **–ज़ादः** (زاده –) पु. ('अ. + फ़ा.) धनिक पुत्र; राजकुमार.

अमीर-ए-कारवाँ (امير كارواں) पु. ('अ. + फ़ा.) प्रवासी तांड्याचा नेता; पुढारी.

अमीरानः (اميرانہ) वि. ('अ. + फ़ा.) श्रीमंतासारखा; राजेशाही.

अमीरी (اميرى) स्त्री. ('अ.) (१) श्रीमंती; धनाढ्यता. (२) उदारता. (३) संस्थान; राज्य; सत्ता. (४) सरदारी.

'अमूद (عمود) पु. ('अ.) (१) खांब. (२) उभी सरळ रेघ. (३) स्तंभ; कॉलम.

'अमूम (عموم) वि. ('अ.) सर्वसामान्य; साधारण.

'अमूमन् (عموماً) अव्य. ('अ.) साधारण; सामान्यतः

अमूर (امور) पु. ['अ. 'अम्र' (امر) चे अनेक.] कामे; गोष्टी; व्यवहार; प्रश्न.

अमूरात (امورات) पु. ['अ. 'अमूर' (امور) चे अनेक.] कामे.

'अम्द (عمد) पु. ('अ.) संकल्प; इरादा; विचार; इच्छा.

'अम्दन् (عمداً) अव्य. ('अ.) जाणूनबुजून; विचारपूर्वक.

'अम्म (عم) पु. ('अ.) चुलता; काका. **–ज़ादः** (زاد –) पु. चुलत भाऊ.

'अम्मज़ाद (عم زاد) वि. ('अ.) चुलत.

'अम्मज़ादः (عم زادہ) पु. ('अ.) चुलत भाऊ.

'अम्मामः (عمامہ) पु. ('अ.) एक प्रकारची पगडी.

'अम्मारी (عماری) स्त्री. ('अ.) अंबारी.

अम्मारः (امارہ) वि. ('अ.) पापास प्रवृत्त करणारा; अत्याचारी.

'अम्मू (عمو) पु. ('अ.) चुलता; काका. **–ज़ादः** (زادہ –) पु. चुलत भाऊ.

'अम्मः (عمہ) स्त्री. ('अ.) आत्या; बापाची बहीण.

अम्र (امر) पु. ('अ.) (१) काम; कार्य; कृत्य. (२) गोष्ट. (३) विषय. (४) आज्ञा; हुकूम. **–ओ-निही** (– و نہی) विधिनिषेध.

अम्र-ए-म'अरूफ़ (امر معروف) पु. ('अ.) सत्कृत्ये करण्यास सांगणे.

अम्रद (امرد) पु. ('अ.) मिसरूड न फुटलेला देखणा मुलगा. **–परस्त** (پرست –) अशा मुलांशी प्रणय करणारा.

अम्स (امس) पु. ('अ.) काल; आजच्या आधीचा दिवस.

'अयाँ (عیاں) वि. ('अ.) स्पष्ट; प्रकट; जाहीर. पाहा 'इया' (शु.)

अयाग़ (ایاغ) पु. (तु.) प्याला; चषक; पिण्याचे भांडे.

'अयादत (عیادت) स्त्री. ('अ.) आजाऱ्याची विचारपूस करणे.

'अयार (عیار) पु. ('अ.) (१) वजन करणे. (२) कसोटीवर कसणे. (३) सोन्याचे वजन करण्याचा तराजू.

अयाल (ایال) पु. (फ़ा.) घोडयाच्या किंवा सिंहाच्या मानेवरील आयाळ.

'अयाल (عیال) पु. ('अ.) कुटुंब; परिवार; मुलेबाळे. **–दार** (دار –) वि. ('अ. + फ़ा.) कुटुंबवत्सल. **–दारी** (داری –) स्त्री. ('अ.+फ़ा.) घरसंसार; पारिवारिक जीवन.

'अयूब (عیوب) पु. ['अ. 'ऐब' (عیب) चे अनेक.] दोष; दुर्गुण.

अय्याम (ایام) पु. ['अ. 'योम' (یوم) चे अनेक.] (१) अनेक दिवस. (२) समय; काळ. (३) स्त्रियांच्या रजःस्रावाचा काळ. **–से होना** (سے ہونا –) रजस्वला (विटाळशी) असणे, होणे.

'अय्यार (عیار) वि. पु. ('अ.) (१) चलाख; धूर्त. (२) लबाड; ढोंगी.

'अय्यारी (عیاری) स्त्री. ('अ.) चलाखी; लबाडी.

'अय्याश (عیاش) वि. ('अ.) विलासी; शौकीन; व्यभिचारी.

'अय्याशी (عیاشی) स्त्री. ('अ.) विलास; ऐषआराम; व्यभिचार.

अय्यूब (ایوب) पु. ('अ.) सहनशीलतेबद्दल प्रसिद्ध असलेले एक पैगंबर (प्रेषित).

अरकान (ارکان) पु. ['अ. 'रुक्न' (رکن) चे अनेक.] (१) स्तंभ; खांब; आधार. (२) तत्त्वे. (३) चरण; पदे.

अरकान-ए-दौलत (ارکان دولت); **अरकान-ए-सल्तनत** (ارکان سلطنت) पु. ('अ.) राज्याचे, सत्तेचे आधारस्तंभ, मंत्री वगैरे.

अरगजः (ارگجہ) पु. (फ़ा.) केशर, चंदन, गुलाब, चमेली, कापूर, कस्तुरी, अंबर वगैरे वस्तूंच्या मिश्रणाने तयार केले जाणारे एक सुवासिक उटणे.

अरग़न (ارغن); **अरग़नूं** (ارغنوں); **अरग़ूं** (ارغوں) पु. ('अ.) ऑर्गन नावाचे वाद्य; पायाने भाता चालवावयाची बाजाची पेटी.

अरग़वान (ارغوان) पु. (फ़ा.) (१) वसंत ऋतूत लाल फुले येणारे एक झाड. (२) लाल रंगाचे फूल. (३) लाल रंग.

अरग़वानी (ارغوانی) वि. (फ़ा.) लाल; तांबडा.

अरज़क़ (ارزق) वि. ('अ.) निळा. **–चश्म** (چشم –) वि. निळे डोळे असलेला.

अरजल (ارجل) पु. ('अ.) (१) ज्याचा एक पाय पांढरा आहे असा घोडा. हा घोडा अशुभ मानतात (२) लांब टांगांचा माणूस.

अरज़ल (ارذل) वि. ('अ.) अत्यंत नीच; हलका; निकृष्ट.

अरज़ाँ (ارزاں) वि. ('अ.) स्वस्त; कमी किमतीचे.

अरज़ानी (ارزانی) स्त्री. ('अ.) स्वस्ताई; मंदी.

अरज़ाल (ارذال) वि. ['अ. 'रजील' (رذیل) चे अनेक.] नीच लोक; हलकट माणसे.

अरद (ارض) स्त्री. ('अ.) पृथ्वी; जमीन; देश.

अरदी (ارضی) वि. ('अ.) भौतिक; भूगोलाचा; ऐहिक.

अरफ़'अ (ارفع) वि. ('अ.) अत्यंत उच्च; खूप उंच.

'अरब (عرب) पु. ('अ.) (१) अरबस्तान. (२) अरबस्तानचा रहिवासी.

अरब'अ (اربع) वि. ('अ.) चार.

अरबाब (ارباب) पु. ['अ. 'रब' (رب) चे अनेक.] (१) स्वामी; मालक. (२) अधिकारी. (३) ज्ञाते; कर्ते.

अरबाब-ए-'अिल्म (ارباب علم) पु. ('अ.) विद्वज्जन; ज्ञानवान लोक.

अरबाब-ए-क़लम (ارباب قلم) पु. ('अ.) लेखक; साहित्यिक.

अरबाब-ए-सुख़न (ارباب سخن) पु. ('अ.) कविगण.

'अरबिस्तान (عربستان) पु. ('अ.) अरबस्तान देश.

'अरबी (عربی) वि. ('अ.) अरबस्तानचा. (स्त्री.) अरबस्तानची भाषा.

अरम (ارم) पु. ('अ.) (१) स्वर्ग. (२) अरबस्तानातील एक काल्पनिक बाग.

अरमग़ान (ارمغان) पु. (फ़ा.) भेट; उपहार; बक्षीस; देणगी.

अरमान (ارمان) पु. (तु.) इच्छा; अभिलाषा; लालसा.

अरवाह़ (ارواح) स्त्री. ['अ. 'रूह़' (روح) चे अनेक.] (१) आत्मे. (२) देवदूत.

अरसलान (ارسلان) पु. (तु.) (१) सिंह. (२) वाघ. (३) गुलाम; सेवक.

'अरस़ः (عرصہ) पु. ('अ.) (१) वेळ; मुदत; कालखंड. (२) विलंब; उशीर. (३) क्षेत्र; मैदान. (४) अंतर.

अरस्तू (ارسطو) पु. [ग्रीक 'अरस्त़ात़ालीस' (ارسطا طالیس) चे संक्षिप्त रूप.] ग्रीक तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटल.

'अरा'इज़ (عرائض) स्त्री. ['अ. 'अर्ज़ी' (عرضی) चे अनेक.] अर्जे; प्रार्थनापत्रे.

अराकीन (اراکین) पु. ['अ. 'रूकन' (رکن) च्या अनेक 'अरकान' (ارکان) चे अनेक.] (१) खांब; स्तंभ. (२) व्यवस्थापक. (३) वजीर; मंत्री.

अराज़ी (اراضی) स्त्री. ['अ. 'अर्ज़' (ارض) चे अनेक.] (१) भूमी; जमीन. (२) शेत. –उफ़्तादः (اُفتادہ –) पडीत जमीन. –ए-बक़्फ़ (وقف –) इनाम जमीन.

अराबची (ارابچی) पु. (फ़ा.) गाडीवान; गाडी हाकणारा.

अराबः (ارابہ) पु. (फ़ा.) गाडी; छकडा; तोफवाहू गाडी.

'अरीज़ (عریض) वि. ('अ.) रुंद; मोठया पन्ह्याचे (कापड).

'अरीज़ः (عریضہ) पु. ('अ.)अर्ज; दरखास्त; निवेदनपत्र. (वि.) निवेदित. –निगार (نگار –) पु. ('अ.+फ़ा.) पत्रलेखक.

'अरूज़ (عروض) पु. ('अ.) छंदःशास्त्र.

'अरूब (عروب) स्त्री. ('अ.) (१) सुंदरी. (२) आपल्या पतीवर अत्यंत प्रेम करणारी स्त्री; जिच्यावर तिचा पती अत्यंत प्रेम करतो अशी स्त्री; प्राणप्रिया.

'अरूस (عروس) स्त्री. ('अ.) (१) वधू; नवरी. (२) नायिका. (पु.) वर; नवरा.

'अरूसी (عروسی) स्त्री. ('अ.) विवाह; लग्न. (वि.) विवाहासंबंधी.

'अर्क़ (عرق) पु. ('अ) (१) रस; सत्त्वांश; तत्त्वांश; सार; अर्क. (२) मद्य; आसव; स्पिरीट. (३) घाम; स्वेद. –आलूदः (آلودہ –) वि. घामाने डबडबलेला. –गीर (گیر –) पु. ('अ.+फ़ा.) मद्य काढावयाचे यंत्र; भपकारा. –रेज़ी (ریزی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) घाम गळेपर्यंत श्रम करणे; अत्यंत परिश्रमाचे काम.

'अर्क़-ए-गुलाब (عرق گلاب) पु. ('अ. + फ़ा.) गुलाबपाणी.

'अर्क़-ए-बहार (عرقِ بہار) पु. ('अ. + फ़ा.) मद्य; मदिरा.

अर्ज़ (ارز) पु. (फ़ा.) मूल्य; किंमत.

अर्ज (ارج) स्त्री. (फ़ा.) (१) किंमत. (२) योग्यता; मान. –मन्द (مند –) प्रतिष्ठित; सन्माननीय; विद्वान.

अर्जमंद (ارجمند) वि. (फ़ा.) उच्च पदस्थ; प्रतिष्ठित; घरंदाज.

अर्ज़ाँ (ارزاں) वि. (फ़ा.) स्वस्त; कमी किंमतीचा.

अर्ज़ानी (ارزانی) स्त्री. (फ़ा.) स्वस्ताई; मंदी.

अर्द़ (ارض) स्त्री. ('अ.) पृथ्वी; जमीन; भूमी.

'अर्द़ (عرض) स्त्री. ('अ.) विनंती; प्रार्थना; निवेदन. पु. रुंदी; पन्हा.

'अर्द़-ए-म'अरूद़ (عرض معروض) स्त्री. (फ़ा.) (१) विनंती; प्रार्थना.(२)अर्जातील विषय अथवा मजकूर.

'अर्द़गुज़ार (عرض گزار) वि. ('अ. + फ़ा.) अर्ज करणारा; विनंती करणारा.

'अर्द़दाश्त (عرض داشت) स्त्री. ('अ. + फ़ा.) अर्ज; विनंतीपत्र; स्मरणपत्र (हुजूरास).

अर्द़बेगी (عرض بیگی) पु. ('अ. + तु.) लोकांचे अर्ज बादशहाला (हुजूरास) सादर करणारा अधिकारी.

'अर्ज़ी (عرضی) स्त्री. ('अ.) अर्ज; निवेदन; विज्ञप्तिपत्र. –नवीस (نویس –) पु. ('अ.+फ़ा.) अर्ज लिहिणारा.

'अर्श (عرش) पु. ('अ.) (१) सर्वांत वरचा (आठवा) स्वर्ग. या ठिकाणी परमेश्वर राहतो अशी मुसलमानांची श्रद्धा आहे. (२) आकाश. (३) सिंहासन. –पर चढ़ना (پر چڑھنا –) हरभऱ्याच्या झाडावर चढणे;

घमेंड करणे. **–पर दिमाग़ होना** (– پر دماغ ہونا) गर्व होणे. **–से फ़र्श तक** (– سے فرش تک) आकाशापासून जमिनीपर्यंत.

'अर्श-ए-अ'अज़म (عرش اعظم); **'अर्श-ए-मू'अल्ला** (عرش معلیٰ) पु. ('अ.) सर्वांत उंच (आठवा) स्वर्ग.

'अर्श-ए-अकबर (عرش اکبر) पु. ('अ.) मानवी हृदय.

अर्शद (ارشد) वि. ('अ.) (१) सन्मार्ग प्राप्त करणारा; ज्याच्यासाठी गुरूने सर्वांत अधिक परिश्रम केले आहेत असा शिष्य. (२) अत्यंत प्रामाणिक.

अर्हम (ارحم) वि. ('अ.) परमदयाळू; अत्यंत दया करणारा.

अर्हाम (ارحام) पु. ['अ. 'रहम' (رحم) चे अनेक.] (१) गर्भाशये. (२) आईकडून असलेली नाती.

अल (ال) उपपद ('अ.) इंग्रजीतील प्रमाणे वापरले जाणारे उपपद. [उदा. 'अल्-हिलाल' (الہلال) चंद्रकोर].

अल (ال) प्रत्यय ('अ.) षष्ठीचा प्रत्यय; चा, ची, चे. इंग्रजीतील प्रमाणे याचा वापर होतो व संयुक्तपणे उच्चार होताना 'अल्' ची 'उल्', 'उस्' वगैरे वगैरे रूपे बनतात. [उदा. ''अब्द-उल्-ग़फ़ार' ('अब्दु'ल्-ग़फ़ार) (عبدالغفار) ईश्वराचा दास].

अलकतरा (الکترا) पु. ('अ.) डांबर.

अलग़ोज़ा (الغوزا) पु. ('अ.) अलगूज; एक प्रकारची बासरी.

अलताफ़ (الطاف) पु. ['अ. 'लुत्फ़' (لطف) चे अनेक.] दया; कृपा; मेहेरबानी.

अलफ़ (الف) वि. ('अ.) (१) हजार; सहस्र. (२) एकाकी; मित्रहीन.

'अलफ़ (علف) पु. ('अ.) गवत; चारा. **–ज़ार** (– زار) पु. ('अ.+फ़ा.) कुरण.

अलफ़ाज़ (الفاظ) पु. ['अ. 'लफ़्ज़' (لفظ) चे अनेक.] (१) शब्द; शब्दसमूह. (२) पारिभाषिक शब्द.

अलबत्तः (البتہ) अव्य. ('अ.) (१) अवश्य; अलबत; बेशक. (२) अर्थात; परंतु.

अलबम (البم) पु. (फ़ा.) चित्रसंग्रह; अलबम; चित्रमंजूषा.

अलम (الم) पु. ('अ.) दुःख; यातना; पीडा. **–नाक** (– ناک) दुःखदायक; क्लेशकारक.

'अलम (علم) पु. ('अ.) (१) झेंडा; ध्वज. (२) पर्वत. **–बरदार** (– بردار) पु. ('अ. + फ़ा.) सैन्याच्या अग्रभागी झेंडा घेऊन चालणारा.

अलमास (الماس) पु. (फ़ा.) हिरा.

'अल'ल्-ख़ुसूस़ (علی الخصوص) अव्य. ('अ.) विशेषतः; खास करून.

'अल'ल्-हाल (علی الحال) अव्य. ('अ.) तत्काळ; ताबडतोब.

'अल'ल्-हिसाब (علی الحساب) अव्य. ('अ.) हिशेब पुरा न करता; उचल म्हणून; नावावर टाकून (पैसे देणे).

'अल'स़्-स़बाह़ (علی الصباح) अव्य. ('अ.) भल्या पहाटे.

'अलवी (علوی) पु. ('अ.) हजरत अली यांच्या वंशातील सैयद लोक.

'अला'इक़ (علائق) पु. ['अ. 'इलाक़ः' (علاقہ) चे अनेक.] (१) संबंध; नाती. (२) इलाखे; प्रांत. (३) भांडणे.

'अलाक़ः (علاقہ) पु. ('अ.) (१) प्रेम; संबंध. (२) प्रांत; इलाखा.

'अलानियः (علانیہ) अव्य. ('अ.) जाहीरपणे; उघडपणे.

'अलामत (علامت) स्त्री. ('अ.) (१) खूण; चिन्ह; निशाणी. (२) ओळख; परिचय. (३) बिल्ला.

'अलामत-ए-इम्तियाज़ (علامت امتیاز) स्त्री. ('अ.) विशिष्टतादर्शक चिन्ह; बिल्ला; पदक.

'अलालत (علالت) स्त्री. ('अ.) आजार; आजारपण; रोग.

'अलावः (علاوہ) अव्य. ('अ.) शिवाय; त्याचप्रमाणे; आणखी; व्यतिरिक्त; खेरीज; तसेच. **–अज़ीं** (– ازیں); **–बरीं** (– بریں) याखेरीज; शिवाय.

'अलाहिदगी (علٰحدگی) स्त्री. ('अ.) (१) अलगता; वेगळेपणा; विभक्तपणा. (२) एकांत.

'अलाहिदः (علٰحدہ) वि. ('अ.) पृथक; विभक्त; वेगळ; अप्रस्तुत.

अलिफ़ (الف) पु. ('अ.) उर्दू वर्णमालेतील पहिले अक्षर; अ, इ, व उ या तीन स्वरांचे कार्य हे अक्षर करते. **–बे** (– بے) वर्णमाला; श्रीगणेशा. (वि.) उभा; ताठ.

'अली (علی) पु. ('अ.) (१) परमेश्वराचे नाव. (२) हजरत मुहम्मद पैगंबर यांचे जावई व चौथे खलिफा (फातमाचे पती). वि. उंच; उच्च.

'अलीक़ः (علیقہ) पु. ('अ.) तोबरा; घोडयाला चंदी देण्याची पिशवी.

'अलीधत (علی دھت) वि. ('अ.+हि.) उंचा पुरा; धिप्पाड.

'अलीबंद (علی بند) पु. ('अ.+फ़ा.) (१) मनगटावर बांधण्याचा स्त्रियांचा एक दागिना. (२) कुस्तीतील एक डाव. (३) जादूचा प्रभाव दूर करणारा एक प्रकारचा ताईत.

अलीम (الیم) वि. ('अ.) पीडादायक; दुःखकारक.

'अलीम (علیم) वि. ('अ.) (१) ज्ञानी; सर्वज्ञ; जाणकार. (२) ईश्वराचे एक नाव.

अलील (علیل) वि. ('अ.) (१) आजारी; रोगी. (२) अशक्त. (३) व्यंगयुक्त.

'अलैहा (علیها) अव्य. ('अ.) तिच्यावर.

'अलैहि (علیہ) अव्य. ('अ.) त्याच्यावर.

'अलैहिम (علیہم) अव्य. ('अ.) त्यांच्यावर; त्या सर्वांवर.

'अलैहि'स्-सलाम (علیہ السلام) वा. ('अ.) तो खुशाल असो; तो चिरंजीव होवो. (हजरत मुहम्मद पैगंबर अथवा त्यांच्यासारखे इतर श्रेष्ठ धार्मिक नेते यांच्या नावांचा उल्लेख केल्यानंतर हे वाक्य उच्चारतात).

अल्-'अज़मत'ल्लह (العظمت اللہ) वा. ('अ.) ईश्वर महान आहे.

अल्-'अब्द (العبد) वा. पु. ('अ.) (१) सेवक. (२) सेवकाची ही सही आहे. (लहान माणसे मोठ्या माणसांना पत्र लिहिल्यानंतर शेवटी सही करण्यापूर्वी हा शब्द लिहितात).

अल्-अमान (الامان) वा. ('अ.) त्राहि! देव माझे रक्षण करो.

अल्-क़त् (القط) वि. ('अ.+हिं.) (१) कापलेले. (२) रद्द केलेले. (३) समाप्त केलेले. (पु.) घृणा; त्याग.

अल्-क़िस्सः (القصہ) अव्य. ('अ.) सारांश; तात्पर्य असे की.

अल्-ग़रज़ (الغرض) अव्य. ('अ.) इत्यर्थ असा की; सारांश; तात्पर्य.

अल्-जज़ा'इर (الجزائر) पु. ('अ.) अल्जीरिया (आफ्रिकेतील एक देश).

अल्-मस्त (المست) वि. (फ़ा.) झिंगलेला; धुंद; मस्त.

अल्-मस्ती (المستی) स्त्री. (फ़ा.) धुंदी; नशा.

अल्-विदा'अ (الوداع) पु. ('अ) रमजान महिन्यातील शेवटचा शुक्रवार. (अव्य.) रामराम; नमस्ते (निरोप घेताना म्हणावयाचा शब्द); स्वस्ति.

अल्-हक़्क़ (الحق) अव्य. ('अ.) (१) वस्तुतः; खरोखर. (२) ठीक आहे.

अल्-हम्द (الحمد) स्त्री. ('अ.) कुराणाच्या पहिल्या अध्यायाचा प्रथम शब्द.

अल्-हम्दुलि'ल्लह (الحمدللہ) वा. ('अ.) सारी स्तुती परमेश्वरासाठीच आहे; स्तुती केवळ परमेश्वराची करावी.

अल्-हफ़िज़ (الحفیظ) वा. ('अ.) देव माझे रक्षण करो.

अल्-हाफ़िज़ (الحافظ) अव्य. ('अ.) याच वेळी; आता; ताबडतोब.

अल्-हासिल (الحاصل) अव्य. ('अ.) सारांश; तात्पर्य असे की.

अल्कन (الکن) वि. ('अ.) तोतरा; बोबडा; अडखळत बोलणारा.

अल्क़ाब (القاب) पु. ['अ. 'लक़ब' (لقب) चे अनेक.] (१) मायने (पत्रांचे). (२) पदव्या; किताब. **–ओ-आदाब** (– و آداب) पत्रांचे मायने; संबोधनाच्या पद्धती.

अल्तफ़ (الطف) वि. ('अ.) अत्यंत कोमल; अत्यंत पवित्र.

अल्तमिश (التمش) पु. (तु.) सेनापती. (स्त्री.) (१) आघाडीची फौज. (२) सहाची संख्या. (३) सुलतान शम्सुद्दीन घोरीची पदवी.

अल्मानियः (المانیہ) पु. ('अ.) जर्मनी.

अल्लह (اللہ) पु. ('अ.) ईश्वर; परमात्मा; खुदा; अल्ला. **अल्लहो त'आलॉ** (اللہ تعالیٰ) सर्वश्रेष्ठ ईश्वर. **–बेली** (– بیلی) ईश्वर साह्य करणारा आहे. (निरोप घेताना म्हणावयाचे वाक्य).

अल्लहो अकबर (اللہ اکبر) वा. ('अ.) ईश्वर महान आहे. (नमाजाच्या वेळी बसताना, उठताना, लढाई करताना व आश्चर्य व्यक्त करण्यासाठी वगैरे वेळी या वाक्याचा उपयोग करतात).

'अल्लामः (علامہ) पु. स्त्री. ('अ.) अत्यंत विद्वान पुरुष अथवा स्त्री.

अवा'इल (اوائل) पु. ['अ. 'अव्वल' (اول) चे अनेक.] प्रारंभ; सुरुवातीचा भाग. (वि.) प्रारंभिक; प्राथमिक. [उदा. 'अवा'इल-ए-'उम्र' (اوائل عمر) स्त्री. प्रारंभिक जीवन; बालपण; तारुण्य].

'अवाक़िब (عواقب) पु. ['अ. ''आक़िबः' (عاقبہ) चे अनेक.] (१) मागून येणारे लोक; मागून येणाऱ्या गोष्टी. (२) कार्याचे परिणाम; कर्माची फळे.

अवाख़िर (اواخر) पु. ['अ. 'आख़िर' (آخر) चे अनेक.] अंत; शेवटचे भाग.

'अवातिफ़ (عواطف) पु. ['अ. ''आतिफ़ः' (عاطفہ) चे अनेक.] कृपा; दया.

'अवान (عوان) स्त्री. ('अ.) सौभाग्यवती, सधवा स्त्री.

'अवाम (عوام) पु. ['अ. 'आम' (عام) चे अनेक.] जनता; सर्वसामान्य लोक.

'अवाम-उन्-नास (عوام الناس) पु. ('अ.) आम जनता; जनसाधारण.

'अवामिल (عوامل) पु. ['अ. 'आमिल' (عامل) चे अनेक.] अंमलबजावणी करणारे लोक; अधिकारी; कार्यकर्ते.

अवारिजः (عوارج) पु. (फा.) हिशेबाची वही; कीर्द; रोकडवही.

'अवारिद (عوارض) पु. ['अ. 'आरिदः' (عارضہ) चे अनेक.] (१) अनेक आजार; रोग. (२) कर.

'अवारिफ़ (عوارف) पु. ['अ. 'आरिफ़' (عارف) चे अनेक.] (१) ओळखणारे लोक; उपकारकर्ते. (२) सुगंध.

अव्वल (اول) वि. ('अ.) (१) प्रथम; पहिला. (२) मुख्य; प्रमुख. (३) सर्वोत्तम; सर्वश्रेष्ठ.

अव्वलन् (اولاً) अव्य. ('अ.) प्रथम; प्रारंभी.

अव्वलीन (اولین) पु. ('अ.) पूर्वीचे लोक; आधीचे लोक. (वि.) प्राचीन; प्रथम; खास; प्रमुख.

अश'आर (اشعار) पु. ['अ. 'श'अर' (شعر) चे अनेक.] अनेक काव्यचरण, पद्यसमूह.

अशकाल (اشکال) स्त्री. ['अ. 'शक्ल' (شکل) चे अनेक.] (१) रूपे. (२) आकार. (३) चेहरे. (४) उपाय.

अशखास (اشخاص) पु. ['अ. 'शख्स' (شخص) चे अनेक.] अनेक लोक; व्यक्ती; जनसमुदाय.

अशग़ाल (اشغال) पु. ['अ. 'शग़ल' (شغل) चे अनेक.] कामे; उद्योग; व्यवसाय; धंदे.

अशजार (اشجار) पु. ['अ. 'शजर' (شجر) चे अनेक.] झाडे; वृक्ष.

अशद (اشد) वि. ('अ.) अत्यंत कठोर; घोर; प्रचंड; तीव्र.

अशदहा (اژدھا) पु. (फ़ा.) अजगर.

अशदहाम (اژدھام) पु. ('अ.) जमाव; गर्दी.

अशफ़ाक़ (اشفاق) पु. ['अ. 'शफ़क़' (شفق) चे अनेक.] अनुग्रह; कृपा; दया.

अशर (اشر) वि. ('अ.) अत्यंत पाजी; दुष्ट; खटचाळ.

'अशर (عشر) वि. ('अ.) (१) दहा; दशांश. (२) जमीन महसुलाचा दशांश भाग. (मुसलमान बादशहा राज्य-कर म्हणून हा भाग घेत असत).

'अशर-ए-'अशीर (عشر عشیر) पु. ('अ.) (१) शतांश. (२) अत्यंत अल्प.

अशरफ़ (اشرف) वि. ('अ.) अत्यंत सज्जन; देवमाणूस; कुलीन; सन्मान्य.

अशरफ़ी (اشرفی) स्त्री. (फ़ा.) मोहर; सुवर्ण मुद्रा.

अशराफ़ (اشراف) पु. ['अ. 'शरीफ़' (شریف) चे अनेक.] सज्जन माणसे; कुलीन लोक; सभ्य लोक. ['शरीफ़:' (شریفہ) स्त्री. ('अ.) सज्जनता; सभ्यता; सौजन्य]

अशरार (اشرار) पु. ['अ. 'शरीर' (شریر) चे अनेक.] दुष्ट माणसे; नीच लोक.

'अशरः (عشرہ) पु. ('अ.) (१) दहा दिवस. (२) महिन्याचा दहावा दिवस; दहा तारीख. (३) मुहर्रमची दहा तारीख; मुहर्रमचे दहा दिवस. **--ए-अव्वल** (اوّل –) महिन्याचे पहिले दहा दिवस; सुरुवातीची दहा वर्षे. **–ए-सानी** (ثانی –) महिन्याचे दुसरे दहा दिवस; अकरा ते वीस वर्षे.

अशहद (اشہد) वा. ('अ.) मी साक्षी आहे. **अशहदो अन्न ला इलहा इल्ल'ल्लह** (اشہد ان لا الہ الا اللہ) ईश्वर एकच आहे, दुसरा नाही, याविषयी मी साक्षी आहे.

अशहब (اشہب) वि. ('अ.) करडचा रंगाचा; काळापांढरा. (पु.) (१) काळाबाळा घोडा. (२) घोडा.

अशया (اشیا) स्त्री. ['अ. 'शैय' (شے) चे अनेक.] अनेक वस्तू; चिजा; गोष्टी.

'अशारियः (عشاریہ) पु. ('अ.) दशांश; दहावा हिस्सा. (शुद्ध : आशारिया).

'अशीर (عشیر) पु. ('अ.) (१) दहावा भाग; दशांश. (२) कुटुंबातील व्यक्ती; स्वजन. (३) शेजारी.

'अशीरः (عشیرہ) पु. ('अ.) (१) कुटुंब; परिवार. (२) दशांश भाग.

अश्क (اشک) पु. (फ़ा.) अश्रू; आसू. **–बार** (بار–) अश्रू ढाळणारा; रडणारा.

अस'अद (اسعد) वि. ('अ.) अत्यंत शुभ; परम मंगल.

असग़र (اصغر) वि. ('अ.) लहान; छोटा; धाकटा.

असद (اسد) पु. ('अ.) सिंह; वाघ; सिंह राशी.

असद'ल्लह (اسداللہ) पु. ('अ.) अल्लाचा वाघ; हजरत अली यांची पदवी.

असना (اثنا) अव्य. ('अ.) मध्ये; दरम्यान; मध्यंतरी. (पु.) मध्यंतर; दरम्यानचा काळ.

असनाद (اسناد) स्त्री. ['अ. 'सनद' (سند) चे अनेक.] सनदा; प्रमाणपत्रे; अधिकारपत्रे.

असफ़ल (اسفل) वि. ('अ.) सर्वांत खालचा; तुच्छ; नीच. **असफ़ल-अस्-साफ़िलीन** (اسفل السافلین) स्त्री. सर्वांत खालचा, सातवा नरक.

असफ़लत (اسفلت) पु. ('अ.) डांबर.

असफ़ाँ (اصفیٰ) वि. ('अ.) निर्मळ; अत्यंत स्वच्छ.

'असब (عصب) पु. ['अ. 'असबः' (عصبہ) चे अनेक.] स्नायू.

'असबात (عصبات) पु. ['अ. 'असबः' (عصبہ) चे अनेक.] (१) स्नायू. (२) मुलगे; पुरुष नातेवाईक.

असबाब (اسباب) पु. ['अ. 'सबब' (سبب) चे अनेक.] (१) कारण; सबबी. (२) सामानसुमान; चीजवस्तू.

असबाब-ए-ख़ानःदारी (اسباب خانہ داری) पु. ('अ.+फ़ा.) घरगुती सामान, फर्निचर वगैरे.

असबाब-ए-जंगी (اسباب جنگی) पु. ('अ. + फ़ा.) युद्धोपयोगी सामान, दारूगोळा वगैरे.

'असबः (عصبہ) पु. ('अ.) स्नायू.

असम (اصم) वि. ('अ.) बहिरा.

असम (اثم) पु. ('अ.) पाप; अपराध; गुन्हा.

असमार (اثمار) पु. ['अ. 'समर' (ثمر) चे अनेक.] फळे.

असर (اسر) वि. ('अ.) अत्यंत आनंदित, खूष.

असर (اثر) पु. ('अ.) (१) परिणाम; प्रभाव. (२) गुण. (३) चिन्ह; खूण. (४) वैशिष्ट्य. (५) अधिकार. (६) काल; समय.

असरअंदाज़ (اثر انداز) वि. ('अ. + फ़ा.) परिणाम करणारा; प्रभाव पाडणारा.

असरदार (اثردار) वि. ('अ. + फ़ा.) प्रभावशाली; परिणामकारक.

असरपिज़ीर (اثر پذیر) वि. ('अ.+फ़ा.) प्रभाव मान्य, ग्रहण करणारा; प्रभावित होणारा.

असरार (اسرار) पु. ['अ. 'सिर' (سر) चे अनेक.] रहस्ये; गुप्त गोष्टी; गोपनीय गोष्टी.

असल (اصل) स्त्री. ('अ.) (१) मूळ; पाया. (२) तत्त्व; सिद्धांत. (३) मुद्दल; मूलधन. (४) कारण. (५) सारांश; सार. वि. (१) खरे; सच्चे. (२) उच्च; श्रेष्ठ. (३) शुद्ध; निर्भेळ. (४) अकृत्रिम. (५) मुख्य; महत्त्वाचे. (६) आवश्यक. (७) मूलभूत. [अनेक 'उसूल' (اصول)].

असल (اسل) पु. ('अ.) मध.

असलहः (اسلحہ) पु. ['अ. 'सिलाह्' (سلاح) चे अनेक.] शस्त्रे; अस्त्रे; हत्यारे. **–ख़ानः** (–خانہ) ('अ. + फ़ा.) शस्त्रागार.

असला (اصلا) अव्य. ('अ.) मुळीच; कदापि; बिलकुल; सदैव.

असलाफ़ (اسلاف) पु. ['अ. 'सलफ़' (سلف) चे अनेक.] पूर्वज; वाडवडील.

असलाब (اصلاب) पु. ['अ. 'सलब' (صلب) चे अनेक.] पिढ्या; पूर्वज.

असलियत (اصلیت) स्त्री. ('अ.) (१) वास्तविकता; सत्यता. (२) तथ्य. (३) मूलतत्त्व; सार. (४) मूळ.

असली (اصلی) वि. ('अ.) (१) खरा; अस्सल; अकृत्रिम. (२) मूलभूत; मुख्य. (३) विशुद्ध; निर्भेळ.

असवार (اسوار) पु. (फ़ा.) घोडेस्वार; अश्वारोही; स्वार; जॉकी. (वि.) आरूढ.

असहल (اسہل) वि. ('अ.) अत्यंत सुगम, सोपे.

असहाब (اصحاب) पु. ['अ. 'साहिब' (صاحب) चे अनेक.] साहेब; स्वामी; अधिकारी; सहकारी; मित्र; हजरत मुहम्मद पैगंबर यांचे अनुयायी. वि. अधिकार असणारे. [उदा. 'असहाब-ए-'अिल्म' (اصحاب علم) विद्वान लोक].

'असा (عصا) पु. ('अ.) (१) सोटा; दंडुका. (२) राजदंड. **–बरदार** (–بردار) पु. भालदार; चोपदार.

'असा-ए-पीरी (عصاے پیری) पु. ('अ.+फ़ा.) म्हातारपणीचा आधार; मुलगा.

असातिज़ः (اساتذہ) पु. ['अ. 'उस्ताज़' (أستاذ) चे अनेक.] शिक्षकगण; गुरुजन; शिक्षविणारे.

असामी (اسامی) पु. ['अ. 'इस्म' (اسم) च्या अनेक 'अस्मा' (اسما) चे अनेक.] (१) नावे; नामे. (२) कूळ; रयत; शेतकरी. (३) ग्राहक; व्यक्ती; प्राणी; इसम. (४) नोकरी; हुद्दा. (५) ज्याला जुगार खेळता येत नाही व जो जुगारात नेहमी हरतो असा इसम. (६) अपराधी; गुन्हेगार. (७) कर्जदार; देणेकरी. (८) ज्याला फसवावयाचे आहे असा मनुष्य. **–पाही काश्त** (–پاہی کاشت) पु. गैरहजर कूळ; याचा जमिनीवर कूळ म्हणून वंशपरंपरागत हक्क नसतो. **–ए-मौरूसी** (–موروثی) पु. वंशपरंपरागत कूळ.

'असार (عسار) स्त्री. ('अ.) दारिद्र्य; फकिरी; साधुता.

असालत (اصالت) स्त्री. ('अ.) (१) अस्सलपणा; खरेपणा; सच्चाई; वास्तविकता. (२) सौजन्य. (३) कुलीनता; खानदानीपणा. **–में फ़र्क़ होना** (–میں فرق ہونا) वर्णसंकर होणे; दुतोंडय असणे.

असालतन् (اصالتاً) अव्य. ('अ.) (१) स्वतः; खुद्. (२) पूर्णपणे; मूलतः.

असालीब (اسالیب) पु. ['अ. 'उसलूब' (اسلوب) चे अनेक.] अनेक पद्धती; ढंग; शैली.

असास (اساس) पु. ('अ.) मूळ; पाया.

असास़ (اثاث); **असास़ः** (اثاثہ); **असास़-उल्-बैत** (اثاث البیت) पु. ('अ.) सामानसुमान; कपडालत्ता; घरगुती चीजवस्तू.

असीर (اسیر) वि. ('अ.) बंदी; कैदी.

असीरी (اسیری) स्त्री. ('अ.) कैद; बंधन.

असील (اصیل) वि. ('अ.) (१) उच्च कुलीन; खानदानी. (२) शुद्ध; निर्भेळ. (३) सुशील; शांत स्वभावाचा. (४) उत्तम जातीचा (घोडा).

'असूफ़ (عسوف) वि. ('अ.) कुमार्गगामी; दुराचारी.

'अस्कर (عسکر) पु. ('अ.) (१) सैन्य; लष्कर. (२) रात्रीचा काळोख.

'अस्करी (عسکری) पु. ('अ.) सैनिक; शिपाई. (वि.) सैन्यासंबंधी.

अस्तग़फ़िरु'ल्लह (استغفرالله) वा. ('अ.) ईश्वर मला क्षमा करो. (एखादी गोष्ट नाकारताना म्हणावयाचे वाक्य).

अस्त़बल (اصطبل) पु. (फ़ा.) तबेला; अश्वशाळा.

अस्तर (استر) पु. (फ़ा.) (१) दुहेरी कपड्यांतील किंवा आतील कापड; अस्तर. (२) खेचर. (३) खालचा पदर. (४) स्त्रिया साडीच्या आत जे कापड ओढून नेसतात ते. (५) आधार; भूमी. **–कारी** (کاری –) स्त्री. (१) अस्तर लावणे. (२) भितीला गिलावा करणे.

अस्ना (اثنا) पु. ('अ.) मध्यंतर; दरम्यानचा वेळ. (अव्य.) मध्यंतरी; दरम्यान.

अस्नाद (اسناد) पु. ['अ. 'सनद' (سند) चे अनेक.] (१) सनदा; प्रमाणपत्रे. (२) परवाने.

अस्नाम (اصنام) पु. ['अ. 'सनम' (صنم) चे अनेक.] (१) मूर्ती. (२) प्रेमपात्रे.

अस्पंज (اسپنج) पु. (फ़ा.) स्पंज.

अस्प (اسپ) पु. (फ़ा.) अश्व; घोडा.

अस्पगोल (اسپغول) पु. (फ़ा.) इसबगोल; सफेद जिरे.

अस्फ़ंज (اسفنج) पु. ('अ.) (१) स्पंज. (२) कोरडा ढग.

'अस्फ़र (عصفر) पु. ('अ.) (१) फुलातील केशर. (२) कुसुंबा. (वि.) पिवळा; कुसुंबी.

अस्फ़िया (اصفیا) पु. ['अ. 'सफ़ी' (صفی) चे अनेक.] पूज्य माणसे; पवित्र लोक.

'अस्मत (عصمت) स्त्री. ('अ.) (१) पातिव्रत्य; शील. (२) पापभीरुता; पावित्र्य.

अस्मा (اسما) पु. ['अ. 'इस्म' (اسم) चे अनेक.] (१) नामे; नावे. (२) नामावळी. **–ए-हुस्नः** (– حسنہ) पु. परमेश्वराची नव्याण्णव नावे.

अस़्मार (اثمار) पु. ['अ. 'सुमर' (ثمر) चे अनेक.] फळे.

अस्मार (اسمار) पु. ['अ. 'समर' (سمر) चे अनेक.] रात्रीच्या गोष्टी; कहाण्या; शिळोप्याच्या गप्पा.

'अस्र (عصر) पु. ('अ.) (१) वेळ; काळ. (२) युग; कालखंड. (३) दिवसाचा चौथा प्रहर; सायंकाळची नमाज. हम'अस्र (هم عصر) वि. समकालीन.

अस्लन् (اصلاً) अव्य. ('अ.) वस्तुतः; यथार्थतः; खरोखरी.

अस्लम (اسلم) वि. ('अ.) (१) पुष्कळ वाचलेला; उरलेला. (२) अत्यंत सुरक्षित. (३) परिपूर्ण. (४) सहिष्णू.

अस्लह़ (اصلح) वि. ('अ.) (१) अत्यंत योग्य; उचित. (२) शुद्ध; सदाचारी.

अस्ला (اصلا) अव्य. ('अ.) (१) मुळीच; कदापि. (२) सदैव.

अस्लाफ़ (اسلاف) पु. ['अ. 'सलफ़' (سلف) चे अनेक.] पूर्वज; वाडवडील.

अस्वद (اسود) वि. ('अ.) काळा; काळाकुट्ट. **बहूर-ए-अस्वद** (بحر اسود) पु. काळा समुद्र; काळा नाग.

अहूक़ (احق) वि. ('अ.) अधिक हक्कदार; अधिकारी.

अहूकम (احکم) वि. ('अ.) फार मोठा अधिकारी; शासक; सत्ताधीश. **–अल्-हाकिमीन** (– الحاکمین) पु. सर्व शासकांना शासक; परमेश्वर.

अहूक़र (احقر) वि. ('अ.) अत्यंत तुच्छ; विनम्र; दीन.

अहूकाम (احکام) पु. ['अ. 'हुक्म' (حکم) चे अनेक.] हुकूम; आज्ञा.

अहूद (احد) वि. ('अ.) एक; एकाची संख्या. (पु.) (१) ईश्वर. (२) एकत्व; अद्वितीयत्व.

'अहद (عہد) पु. ('अ.) (१) प्रतिज्ञा; वचन; शपथ. (२) करार; तह. (३) कारकीर्द; अमदानी; अंमल. (४) काळ; कालखंड. (५) राज्य; सत्ता. (६) जबाबदारी. **–ओ-पैमाँ** (– و پیماں) पु. आणभाक; करारमदार.

'अहद-ए-जदीद (عہد جدید) पु. ('अ.) आधुनिक युग.

'अहंद-ए-ज़रीं (عہد زریں) पु. ('अ.+फ़ा.) सुवर्ण युग; सुखाचा काळ.

'अहद-ए-संग (عہد سنگ) पु. ('अ.+फ़ा.) प्रस्तर युग.

'अहद-ए-हादिर (عهد حاضر) पु. ('अ.) वर्तमान युग; प्रचलित काळ.

'अहद-ए-हुकूमत (عهد حكومت) पु. ('अ.) कारकीर्द; राज्यकाल.

'अहदनामः (عهد نامه) पु. ('अ.+फ़ा.) (१) करार-पत्र; प्रतिज्ञापत्र. (२) तहनामा; संधिपत्र.

'अहद शिकन (عهد شكن) वि. ('अ.+फ़ा.) प्रतिज्ञाभंग करणारा; शपथ मोडणारा; वचनभंग करणारा.

'अहद शिकनी (عهد شكنى) स्त्री. ('अ.+फ़ा.) वचन-भंग; प्रतिज्ञाभंग.

अहूवियत (احديت) स्त्री. ('अ.) एकता; एक असणे.

अहूदी (احدى) पु. ('अ.) अकबराच्या काळी असलेले खास सैनिक. जरूर लागल्यानंतरच यांना बोलाविले जाई. इतर वेळी ते रिकामे असत. (वि.) रिकाम-टेकडा; आळशी; सुस्त.

अहूफ़ाद (احفاد) पु. ['अ. 'हिफ़्द' (حفد) च्या अनेक 'हाफ़िद' (حافد) चे अनेक.] (१) नातू. (२) जावई; मेहुणे. (३) नोकरचाकर. (४) मित्रमंडळी.

अहूबाब (احباب) पु. ['अ. 'हबीब' (حبيب) चे अनेक.] (१) मित्र; दोस्त. (२) नातेवाईक.

अहम (اهم) वि. ('अ.) (१) महत्त्वपूर्ण; खास; निकडीचे. (२) अवघड; कठीण. (३) जोरदार.

अहमक़ (احمق) वि. ('अ.) मूर्ख; अडाणी; बेअकली; खुळसट.

अहमद (احمض) वि. ('अ.) आंबट.

अहमद (احمد) वि. ('अ.) ज्याची अत्यंत प्रशंसा करण्यात आलेली आहे असा; अत्यंत स्तुत्य; स्तवनीय. (पु.) हजरत मुहम्मद पैगंबर यांचे नाव.

अहमदी (احمدى) वि. ('अ.) अहमदाशी संबंधित. (पु.) मुसलमान.

अहमर (احمر) वि. ('अ.) लाल; तांबडा.

अहरन (اهرن) स्त्री. (फ़ा.) ऐरण.

अहरमन (اهرمن) पु. (फ़ा.) सैतान; दैत्य; इराण-मधील अग्निपूजकांच्या मतानुसार पापास प्रवृत्त करणारा देव.

अहरार (احرار) पु. ['अ. 'हुर' (حر) चे अनेक.] (१) स्वतंत्र व सज्जन लोक; बंधमुक्त. (२) उदार-मतवादी; लिबरल.

अहल (اهل) पु. ('अ.) (१) लोक; माणसे; नाग-रिक; रहिवासी. (२) अनुयायी. (३) कुटुंबातील अथवा बरोबरचे लोक. (४) स्वामी; मालक; अधिकारी. (वि.) योग्य; पात्र; सुशील. (प्रत्य.) वाले. **–ओ-'अयाल** (–و عيال) पु. मुलेबाळे.

अहल-उल्-लह (اهل الله) पु. ('अ.) (१) ईश्वर-निष्ठ; धार्मिक लोक. (२) फकीर; बैरागी.

अहल-ए-'अक़्ल (اهل عقل) पु. ('अ.) पंडीत; विद्वान.

अहल-ए-'अदम (اهل عدم) पु. ('अ.) यमलोकीचे रहिवासी; मृत व्यक्ती.

अहल-ए-आवाज़ (اهل آواز) पु. ('अ.) हौशी गायक; धंदा म्हणून नव्हे तर शोक म्हणून गाणारा.

अहल-ए-'इल्म (اهل علم) पु. ('अ.) विद्वान; पंडीत; ज्ञानी लोक.

अहल-ए-'उर्फ़ (اهل عرف) पु. ('अ.) शिकलेले, ज्ञानवान लोक.

अहल-ए-क़लम (اهل قلم) पु. ('अ.) (१) कारकून; लिहिण्याचा धंदा करणारे. (२) लेखक. (३) सुशिक्षित.

अहल-ए-कलाम (اهل كلام) पु. ('अ.) साहित्यिक; कवी.

अहल-ए-किताब (اهل كتاب) पु. ('अ.) (१) पंडीत. (२) ईश्वरी धर्मग्रंथावर श्रद्धा ठेवणारे. (३) कुरा-णात ज्या धर्मांचा उल्लेख आलेला आहे, त्या धर्मांचे अनुयायी. (४) मुसलमानाप्रमाणे यहुदी (ज्यू) व ख्रिश्चन (ईसाई) हे ग्रंथप्रामाण्यवादी असल्यामुळे मुसलमान त्यांना 'अहले किताब' असे म्हणतात. स्वतः मुसलमानही 'अहले किताब' आहेत.

अहल-ए-खानः (اهل خانه) पु. ('अ.+फ़ा.) घरची माणसे; मुलेबाळे. (स्त्री.) गृहलक्ष्मी; घराची मालकीण.

अहल-ए-ग़रज़ (اهل غرض) वि. ('अ.) गरजवंत; स्वार्थी; हितसंबंधी.

अहल-ए-ज़बान (اهل زبان) वि. ('अ. + फ़ा.) भाषापंडीत; ज्यांची भाषा प्रमाण मानली जाते असे लोक.

अहल-ए-ज़िम्मः (اهل ذمه) पु. ('अ.) (१) एखाद्या मुस्लिम राज्यात राहाणारे बिगर मुस्लिम (काफिर) प्रजाजन. हे लोक आपली धर्मकृत्ये लपूनछपून करीत असतात. (२) प्रजा.

अहल-ए-दिल (اهل دل) वि. ('अ.) (१) सहृदय. (२) समाधानी. (३) धैर्यवान. (४) उदार; दानी. (५) शूर.

अहल-ए-दुनिया (اهل دنيا) पु. ('अ.) संसारी प्राणी; संसारात गुरफटलेले लोक.

अहल-ए-नज़र (اهل نظر) वि. ('अ.) (१) तीक्ष्ण दृष्टी असलेले. (२) प्रेमदृष्टी असणारे. (३) पारख असणारे.

अहल-ए-बैत (اهل بيت) पु. ('अ.) (१) घरचे लोक. (२) मुहम्मद साहेबांची मुलगी फातिमा, जावई अली व त्यांची मुलेबाळे.

अहल-ए-रोज़गार (اهل روزگار) पु. ('अ. + फ़ा.) व्यवसायी; धंदेवाले.

अहल-ए-वतन (اهل وطن) पु. ('अ.) देशवासी; देशबांधव.

अहल-ए-सुख़न (اهل سخن) पु. ('अ.) (१) कवी. (२) वक्ता.

अहल-ए-सुन्नत (اهل سنت) पु. ('अ.) मुसलमान; सुन्नी लोक.

अहल-ए-हक़्क़ (اهل حق) पु. ('अ.) (१) सत्यनिष्ठ; प्रामाणिक लोक. (२) ईश्वर परायण महात्मे.

अहल-ए-हुनर (اهل هنر) पु. ('अ.) कलावंत; कारागीर.

अहलकार (اهلكار) पु. ('अ.+फ़ा.) (१) कर्मचारी; सरकारी नोकर; कारभारी. (२) कामकरी; गुमास्ता. (३) कारकून. (४) कारागीर.

अहलमद (اهلمد) पु. ('अ.) न्यायालयातील एक कर्मचारी; दाव्यांचे कागदपत्र व्यवस्थितपणे ठेवण्याचे व न्यायालयाच्या आदेशानुसार हुकूमनामा जारी करण्याचे काम ज्यांच्याकडे असते ते शिरस्तेदार.

अहलियत (اهليت) स्त्री. ('अ.) (१) योग्यता; लायकी; पात्रता. (२) निपुणता; हुशारी.

अहलियः (اهليه). स्त्री. ('अ.) पत्नी; स्त्री; भार्या.

अहली (اهلی) वि. ('अ.) (१) स्वदेशी; स्थानीय. (२) पाळीव (जनावर).

अह़वाल (احوال) पु. ['अ. 'ह़ाल' (حال) चे अनेक.] (१) घटना. (२) समाचार; हकीकत. (३) दशा; स्थिती. **-पुरसी** (پرسان –) वि. विचारपूस करणारा.

अह़सन (احسن) वि. ('अ.) (१) अत्यंत सुंदर. (२) योग्य. (३) उत्तम.

अह़ातः (احاطه)पु.('अ.)(१)आवार. (२)कुंपण; तट.

अह़िब्बः (احبه) पु. ['अ. 'ह़बीब' (حبيب) चे अनेक.] मित्रमंडळी; दोस्त.

आं (آں) सर्व. (फ़ा.) तो, ती. **-कि.** (کہ –) ते-की तो जो. **-जा** (جا –) अव्य. येथे. **-जहानी** (جہانی –) वि. परलोकवासी; कैलासवासी.

'आ'इद (عائد) वि. (फ़ा.) (१) लागू होणारा; प्रयुक्त होणारा. (२) परत येणारा.

आ'ईन (آئین) पु. (फ़ा.) (१) कायदा; विधान. (२) नियम; पद्धती; रीत. (३) प्रथा; रिवाज; परंपरा. (४) आरास; सजावट. **-दाँ** (دان –) वि. कायदेपंडीत; विधिज्ञ; वकील. **-बन्दी** (بندی –) स्त्री. राजाच्या किंवा पुढाऱ्याच्या स्वागतासाठी केलेली सजावट; आरास. **-साज़** (ساز –) वि. विधायिका; कायदे करणारी (सभा किंवा परिषद); घटना परिषद.

आ'ईनी (آئینی) वि. (फ़ा.) कायद्यासंबंधी; विधान-विषयक; वैधानिक.

आ'ईनः (آئینہ) पु. (फ़ा.) (१) आरसा. (२) काच. (३) आदर्श. (४) हंडघा; झुंबर. (वि.) स्वच्छ; पारदर्शक. **-ख़ानः** (خانہ –) आरसेमहाल. **-गर** (گر –) पु. आरसा किंवा काच बनविणारा. **-दार** (دار –) पु. न्हावी. (वि.) पारदर्शक; सर्व काही स्पष्ट दाखविणारा. **-रू** (رو –) पु. आरशासारखा पारदर्शक निर्मळ चेहरा असणारा. **-साज़** (ساز –) पु. आरसा किंवा काच तयार करणारा; काचकाम करणारा. **-साज़ी** (سازی –) स्त्री. आरसा किंवा काच तयार करण्याचे काम; काचकाम.

आ'इन्दः (آئندہ) वि. (फ़ा.) येणारा; येऊ घातलेला; भविष्यकालीन; आगामी. (अव्य.) यानंतर; भविष्यकाळी; यापुढे. (पु.) भविष्यकाळ.

आ'ईमः (آئمہ) पु. ('अ.) इनाम जमीन; दान म्हणून मिळालेली व जिचा सारा माफ आहे अशी भूमी.

आ'ईस (آئس) वि. ('अ.) निराश; नाउमेद.

'आक़ (عاق) वि. ('अ.) आईबापांविरुद्ध बंड करून उठणारा; आईबापांनी ज्याचा वारसाहक्क रद्द केला आहे असा. **-नामः** (نامہ –) पु. ('अ.+फ़ा.) मुलाचा वारसाहक्क रद्द करणारा दस्तैवज.

'आक़रक़रह़ा (عاقرقرحا) पु. ('अ.) अक्कलकाढा (वनस्पती).

आका (آکا) पु. (तु.) थोरला भाऊ; अग्रज.

आक़ा (آقا) पु. (तु.) (१) मालक; स्वामी. (२) ईश्वर.

आक़ासी (آقاسی) पु. (तु.) दिवाणखान्यावरील अधिकारी.

'आक़िद (عاقد) वि. ('अ.) (१) प्रतिज्ञा करणारा. (२) गाठ मारणारा.

'आकिफ़ (عاكف) वि. ('अ.) एकांतवासी; मशिदीत एकांतात बसून तपस्या करणारा.

'आक़िब (عاقب) वि. ('अ.) (१) मागून येणारा; अनुवर्ती. (२) सहाय्यक.

'आक़िबत (عاقبت) स्त्री. ('अ.) (१) मृत्यूनंतरची अवस्था. (२) परलोक. (३) अंत; समाप्ती.

(४) परिणाम. (५) भविष्यकाळ. (६) 'क़यामत' नंतरचा काळ. –अन्देश (اندیش –) वि. दूरदर्शी. –अन्देशी (اندیشی –) स्त्री. दूरदर्शीपणा.

'आक़िर (عاقر) पु. स्त्री. ('अ.) निसंतान पुरुष; वंध्या स्त्री.

आकिल (آکل) वि. ('अ.) खाणारा.

'आक़िल (عاقل) वि. ('अ.) बुद्धिमान; अक्कलवान.

'आक़िलानः (عاقلانہ) वि. ('अ.) बुद्धिमत्तापूर्ण. (अव्य.) हुशारीने; शहाणपणाने.

'आक़िलः (عاقلہ) वि. स्त्री. ('अ.) बुद्धिमती स्त्री.

आक्चः (آقچہ) पु. (तु.) रुपया; मोहर; सुवर्णमुद्रा.

आख़िज़ (آخذ) वि. ('अ.) धरणारा; ग्रहण करणारा; घेणारा.

आख़िर (آخر) वि. ('अ.) नंतरचा; शेवटचा. (अव्य.) अखेर; शेवटी. (पु.) (१) शेवट; अंत. (२) फळ; परिणाम. –उल्-अम्र (الامر –) अव्य. अखेर; शेवटी. –कार (کار –) अव्य. सरते शेवटी; अखेरीस.

आख़िरत (آخرت) स्त्री. ('अ.) (१) परलोक; यमलोक. (२) अंत; अखेर. (३) परिणाम. (४) मृत्यू (५) प्रलयदिन; 'क़यामत'. (६) मरणोत्तर जीवन.

आख़िरश (آخرش) अव्य. ('अ.) (१) त्यानंतर. (२) सरते शेवटी; अखेरीस.

आख़िरी (آخری) वि. ('अ.) शेवटचा; अंतिम; नंतरचा.

आख़ूंद (آخوند); **आख़ून** (آخون) पु. (फ़ा.) शिक्षक.

आख़ूर (آخور) पु. (तु.+फ़ा.) (१) गोठा; तबेला. (२) गवाणी. (३) कुरण. (४) चघळ; पालापाचोळा; कचरा. (वि.) खराब; निरुपयोगी. –की भरती (کی بھرتی –) स्त्री. खोगीर भरती; बाजारबुणगे.

आख़्तः (آختہ) वि. (फ़ा.) (१) खच्ची केलेला (पशू). (२) म्यानातून बाहेर काढलेली (तलवार).

आगंदः (آگندہ) वि. (फ़ा.) भरलेला (पु.) उशीत भरलेला कापूस.

आग़श्तः (آغشتہ) वि. (फ़ा.) वरबटलेला; भरलेला; माखलेला.

आग़ा (آغا) पु. (तु.) (१) मालक; स्वामी. (२) थोरला भाऊ. (३) अफगाणी पठाण. (४) सद्गृहस्थ. (५) सरदार; खान.

आग़ाज़ (آغاز) पु. (फ़ा.) सुरुवात; प्रारंभ.

आगाह (آگاہ) वि. (फ़ा.) (१) माहीतगार; जाणकार; सावधान. (२) ज्याला आधीच एखाद्या गोष्टीची सूचना मिळालेली आहे असा.

आगाही (آگاہی) स्त्री. (फ़ा.) (१) पूर्वसूचना; माहिती. (२) जाणीव; दखलगिरी. (३) सावधानी. (४) परिचय; ज्ञान.

आग़ोश (آغوش) स्त्री. (फ़ा.) (१) मांडी. (२) कस; वगल.

आचार (آچار) पु. (फ़ा.) लोणचे.

'आज (عاج) पु. ('अ.) हस्तिदंत; हत्तीचा दात.

आजमन्द (آزمند) वि. (फ़ा.) लोभी; हावरा.

आज़मा (آزما) वि. (फ़ा.) अजमावणारा; परीक्षा करणारा. [उदा. 'क़िस्मत आज़मा' (قسمت آزما) भाग्यपरीक्षा करणारा].

आज़मा'इश (آزمائش) स्त्री. (१) पारख; अनुभव; परीक्षा. (२) प्रयोग. (३) कसोटी.

आजमाना (آزمانا) क्रि. (फ़ा.+हि.) (१) अनुभव घेणं. (२) पारखणे. (३) प्रयोग करणे.

आज़मूदः (آزمودہ) वि. (फ़ा.) अजमावलेले; पारखलेले.

आज़मूदःकार (آزمودہ کار) वि. (फ़ा.) अनुभवी; प्रवीण; वापरून पाहिलेला.

आज़ाद (آزاد) वि. (फ़ा.) (१) स्वतंत्र; मुक्त; सुटका झालेला. (२) निश्चित; निष्काळजी; बेफिकीर. (३) निर्लिप्त. (४) निर्भय. (५) स्पष्ट वक्ता; निष्पक्ष. (६) फटकळ; उद्धट. (७) स्वतंत्र विचाराचा. (८) सूफी संप्रदायाचे फकीर. (हे स्वतंत्र वृत्तीचे असतात.) –गी (گی –) स्त्री. स्वातंत्र्य; मुक्ती. –तब'अ (طبع –); –मिज़ाज (مزاج –) वि. स्वतंत्र स्वभावाचा; स्वतंत्र वृत्तीचा.

आज़ादानः (آزادانہ) वि. (फ़ा.) स्वतंत्र; उन्मुख; निष्पक्ष.

आज़ादी (آزادی) स्त्री. (फ़ा.) (१) स्वातंत्र्य; मुक्ती. (२) सुटका. (३) निश्चितता. –पसन्द (پسند –) स्वातंत्र्यप्रिय; स्वातंत्र्येच्छू.

आज़ार (آزار) पु. (फ़ा.) (१) रोग; आजार; दुखणे. (२) दुःख; क्लेश. (३) संकट; आपत्ती. (प्रत्य.) दुःखदायक. [उदा. दिल आज़ार (دل آزار) वि. अंतःकरणाला दुःख देणारा]. –दिह (دہ –) वि. त्रास देणारा; दुःखदायक.

आज़ारी (آزاری) वि. (फ़ा.) दुखणेकरी; रोगी. (स्त्री.) त्रास; क्लेश.

'आजिज़ (عاجز) वि. ('अ.) (१) नम्र. (२) हैराण; त्रासलेला. (३) निर्बल; दुर्बळ. (४) लाचार; विवश; असहाय.

'आजिज़ी (عاجزی) स्त्री. ('अ.) (१) नम्रता; दीनता. (२) अजिजी; गयावया. (३) विनंती. (४) असहायता; विवशता.

'आज़िम (عازم) वि. प्रत्य. ('अ.) इच्छा करणारा; विचार करणारा; निश्चय करणारा.

'आजिर (عاذر) वि. ('अ.) क्षमा मागणारा. (पु.) जन्मेचा ऋण.

आजिर (آجر) वि. ('अ.) मजुरी देणारा.

आजिल (آجل) वि. ('अ.) उशीरा घडणारी (गोष्ट, घटना). (पु.) परलोक.

'आजिल (عاجل) वि. ('अ.) (१) वेगवान; घाई करणारा. (२) लवकर नाहीसा होणारा. (३) जग.

आज़ुर (آذر) पु. (फ़ा.) (१) इराणी वर्षाचा (सौर) नववा महिना. हा सामान्यतः पौषाच्या आसपास येतो. (२) प्रत्येक सौर महिन्याची नववी तिथी; नवमी. (३) अग्नी; ठिणगी.

आज़ुर्दगी (آزردگی) स्त्री. (फ़ा.) (१) दुखः; मानसिक क्लेश. (२) खिन्नता; उदासीनता. (३) रोष; नाराजी.

आज़ुर्दः (آزردہ) वि. (फ़ा.) (१) खिन्न; उदासीन; दुःखी. (२) रुष्ट; नाराज. (३) व्यथित; पीडित. **–ख़ातिर** (خاطر –); **–दिल** (دل –); **–हाल** (حال –) वि. दुःखी; खिन्न; उदासीन; रुष्ट.

आतश (آتش) स्त्री. (फ़ा.) (१) अग्नी; विस्तव. (२) क्रोध. (३) प्रकाश. **–अंगेज़** (انگیز –) वि. आग लावणारा; भडकविणारा; भांडण लावून देणारा. **–अफ़गन** (افگن –) वि. आग फेकणारा. **–अफ़रोज़** (افروز –) वि. आग लावणारा; राजद्रोही. **–क** (ک –) स्त्री. उपदंश; गरमी (रोग). **–क़दम** (قدم –) वि. भरभर चालणारा. **–कदः** (کدہ –) पु. (१) अग्नि-मंदीर; अग्यारी; पारसी लोकांचे पूजास्थान. (२) भट्टी; अग्निकुंड; धुरांडे. (३) अत्यंत तापलेले घर. **–का परकालः** (کا پرکالہ –) पु. (१) आगीचा गोळा; निखारा. (२) जळजळीत स्वभावाचा. (३) अत्यंत दुष्ट माणूस. (४) अत्यंत देखणी व्यक्ती. **–खानः** (خانہ –) पु. (१) अग्निशाला; अग्यारी. (२) भट्टी; भितीतील शेगडी. (३) धुरांडे. **–ख़ू** (خو –) वि. (१) रागीट; उग्र. (२) उष्ण. **–ख़्वार** (خوار –) (पु.) (१) अग्निभक्षक. (२) निखारे खाणारा एक काल्पनिक पक्षी; चकोर. (३) लाच खाणारा. **–गीर** (گیر –) वि. (१) आग धरणारा. (२) एकदम पेट घेणारा; स्फोटक. (पु.) चिमटा. **–ज़दगी** (زدگی –) स्त्री. आग लागणे; अग्निकांड; जाळपोळ. **–ज़दः** (زدہ –) वि. जळलेले; पेटलेले. **–ज़न** (زن –) वि. आग लावणारा; जाळपोळ करणारा. (पु.) (१) ज्याच्या गाण्यामुळे आग लागते असा कुक्कुस नावाचा पक्षी. (२) चकमक, गारगोटी व पोलादी पट्टी. **–ज़नी** (زنی –) स्त्री. आग लावणे; विस्तव पेटवणे. **–ज़बाँ** (زباں –) वि. आवेशयुक्त वक्तृत्व करणारा; वाणीतून आग वर्षविणारा; भांडखोर. **–तब्अ** (طبع –) वि. उग्र स्वभावाचा; भयंकर रागीट; तापट. **–दान** (دان –) पु. शेगडी; चूल; भट्टी. **–नफ़स** (نفس –) वि. ज्याच्या उच्छ्वासातून आग बाहेर पडते असा; ज्यांचे हृदय पोळलेले आहे असा; प्रेमी. **–नाक** (ناک –) वि. जळजळीत, अग्नीने भरलेला; रागीट. **–परस्त** (پرست –) पु. अग्निपूजक; पारसी; झरतुष्ट्राचा अनुयायी. **–परस्ती** (پرستی –) स्त्री. अग्निपूजा. **–पारः** (پارہ –) पु. (१) ठिणगी; निखारा. (२) अत्यंत सुंदर व्यक्ती. (३) भांडण लावून देणारा. **–फ़िशाँ** (فشاں –) वि. ठिणग्या उडविणारा; ज्यातून ज्वाला निघत आहेत असा. (पु.) ज्वालामुखी पर्वत. **–बयाँ** (بیاں –) पाहा 'आतश ज़बाँ' प्रभावशाली वक्ता; ओजस्वी वक्ता. **–बाज़** (باز –) पु. शोभेची दारू तयार करणारा व विकणारा. **–बाज़ी** (بازی –) स्त्री. (१) शोभेची दारू; दारूकाम. (२) विस्तवाशी खेळ खेळणे. **–बार** (بار –) वि. अग्निवर्षाव करणारा; जळजळीत. **–मिज़ाज** (مزاج –) वि. रागीट; तापट. **–रंग** (رنگ –) वि. अग्नीसारखा रंग असलेला; लाल. **–रेज़** (ریز –) वि. (१) अग्निवर्षाव करणारा. (२) भांडण लावणारा.

आतश-ए-अफ़्सुर्दः (آتش افسردہ); आतश-ए-ख़ामोश (آتش خاموش); आतश-ए-मुर्दः (آتش مردہ) स्त्री. (फ़ा.) विझलेली, दवलेली आग.

आतश-ए-जाँसोज़ (آتش جاں سوز) स्त्री. (फ़ा.) हृदयाला जाळणारा अग्नी; प्रणयाग्नी; प्रेमाग्नी.

आतश-ए-जिगर (آتش جگر) स्त्री. (फ़ा.) हृदयाची आग; प्रेमाग्नी.

आतश-ए-तर (آتش تر) स्त्री. (फ़ा.) ओली आग; मदिरा; दारू.

आतश-ए-दरूँ (آتش دروں) स्त्री. (फ़ा.) अंतःकरणातील आग; आंतरिक अग्नी.

आतश-ए-नुमरूद (آتش نمرود) स्त्री. (फ़ा.) नुमरूद बादशहाने हजरत इब्राहीम यांना जाळण्यासाठी पेटविलेली आग.

आतश-ए-पिनहाँ (آتش پنہاں). स्त्री. (फ़ा.) (१) लपलेली; गुप्त आग. (२) द्वेष; वैर.

आतश-ए-फ़ारस (آتش فارس) स्त्री. (फ़ा.) झरतुष्ट्राच्या काळापासून इराणात जळत असलेला व इस्लामाने विझविलेला अग्नी.

आतश-ए-बेदूद (آتش بیدود) स्त्री. (फ़ा.) धूररहित अग्नी; सूर्य.

आतश-ए-रोज़ (آتش روز) स्त्री. (फ़ा.) दिवसाची आग; सूर्य; ऊन्ह.

आतश-ए-सय्याल (آتش سیال) स्त्री. (फ़ा.) प्रवाही अग्नी; मदिरा.

आतशी (آتشیں) वि. (फ़ा.) (१) अग्नीचा; अग्निमय. (२) लाल. (पु.) शत्रू; सैतान. **–आब** (آب –) पु. लाल मद्य. **–ख़ू** (خو –) वि. रागीट; तापट. **–रुख़** (رخ –) वि. अग्नीसारखा ज्वलंत चेहरा असणारा; अत्यंत देखणा. **–रुख़सार** (رخسار –) वि. लालबुंद गाल असलेला.

आतशी (آتشی) वि. (फ़ा.) अग्नीशी संबंधित; कढत; तप्त; तापट. **–आ'ईनः** (آئینہ –) पु. ज्याच्यावर सूर्याचे किरण पडल्यास विस्तव उत्पन्न होतो अशी काच; सूर्यकांत; सूर्यकांताचे भिंग. **–'अैनक** (عینک –) स्त्री. गोल अथवा लंब वर्तुळाकार कडचात (फ्रेममध्ये) बसविलेले सूर्यकांताचे भिंग.

'आतिफ़ (عاطف) वि. ('अ.) दयाळू; कृपाळू.

'आतिफ़त (عاطفت) स्त्री. ('अ.) कृपा; दया.

'आतिर (عاطر) वि. ('अ.) (१) सुगंधित. (२) शुद्ध. (३) पवित्र; उत्तम.

आतू (آتو); **आतून** (آتون) स्त्री. (फ़ा.) शिक्षिका; अध्यापिका.

'आतूस (عاطوس) पु. ('अ.) (१) ज्याच्यायोगे शिंक येते असा पदार्थ. (२) ज्याच्यावरून शकुन ओळखला जातो असा प्राणी.

'आदत (عادت) स्त्री. ('अ.) (१) स्वभाव; प्रकृती. (२) व्यसन. (३) सवय; अभ्यास. (४) प्रथा; रिवाज.

'आदतन् (عادتاً) अव्य. ('अ.) नेहमी; सवयीने; स्वभावतया.

आदम (آدم) पु. ('अ.) (१) आदिमानव; मानव जातीचा आदिपुरुष; मनू; ॲडॅम. (२) मनुष्य; मानव. **–ए-आबी** (آبی –) पु. जलमानव; माणसाचे तोंड व माशाचे शरीर असलेला एक काल्पनिक प्राणी. **–क़द** (قد –) वि. ('अ.) पुरुषभर उंचीचा. **–ख़ोर** (خور –) वि. ('अ.+फ़ा.) मनुष्यभक्षक; नरमांसभक्षक. **–गर** (گر –) वि. ('अ. + फ़ा.) दयाळू; कृपाळू. **–गरी** (گری –) स्त्री. ('अ.+फ़ा.) माणुसकी; दयाळुपणा. **–चश्म** (چشم –) पु. ('अ.+फ़ा.) ज्याच्या डोळ्याच्या शुभ्र बुबुळाच्या कडा लालसर असतात, असा घोडा. **–ज़ाद** (زاد –) पु. ('अ.+फ़ा.) आदिमानवाची संतती; मनुष्य; मानवजाती. **–शनास** (شناس –) वि. माणसाची पारख असलेला.

आदम-ए-सानी (آدم ثانی) पु. ('अ.) हजरत नूह (नोहा) प्रलयानंतर मानवाचा वंश यांनी चालविला, असे मानले जाते.

आदमियत (آدمیت) स्त्री. ('अ.) (१) माणुसकी. (२) सुसभ्यपणा.

आदमी (آدمی) पु. ('अ.) (१) 'आदम' च्या वंशातील; मनुष्य; मानव. (२) मानवजाती. (३) सुसंस्कृत व्यक्ती. (४) नोकर. (५) पती. **–बनना** (بننا –) शिष्टाचार शिकणे; माणुसकी बाळगणे.

'आदात (عادات) पु. ['अ. 'आदत' (عادت) चे अनेक.] (१) स्वभाव. (२) सवयी.

आदाब (آداب) पु. ['अ. 'अदब' (ادب) चे अनेक.] (१) शिष्टाचार. (२) नियम; कायदे. (३) शील; मर्यादा. (४) नमस्कार; प्रणाम. (५) आदर; सत्कार. **–'अर्ज़ करना** (عرض کرنا –) प्रणाम करणे; नम्रतापूर्वक अभिवादन करणे. **–बजा लाना** (بجا لانا –) प्रणाम करणे; निरोप घेणे. **–ओ-अल्क़ाब** (و القاب –) पु. संबोधनाच्या शिष्टसंमत पद्धती; पत्राचे मायने. **–ओ-तस्लीमात** (و تسلیمات –) नम्र अभिवादन; प्रणाम.

आदाब-ए-फ़ाज़िलः (آداب فاضل) पु. ('अ.) चांगले स्वभाव; शिष्टाचार; चार सद्गुण : शूरता, शील, न्याय व विद्या.

'आदिल (عادل) वि. ('अ.) न्यायी; न्यायनिष्ठ.

'आदी (عادی) वि. ('अ.) (१) सवय असलेला; अभ्यस्त. (२) व्यसनी.

आदीनः (آدینہ) पु. (फ़ा.) शुक्रवार.

आन (آن) स्त्री. ('अ.) (१) क्षण; पळ. (२) समय; वेळ. **–की आन में** (کی آن میں –) क्षणार्धात; हा हा म्हणता.

आन (آن) स्त्री. (फ़ा.) (१) मानमर्यादा. (२) शपथ; प्रतिज्ञा. (३) ऐट; तोरा. (४) हट्ट; आग्रह. (५) हावभाव. (६) मनाई; बंधन. **–बान** (بان –) स्त्री. (१) थाटमाट. (२) ऐट; मिजास; तोरा.

आनन्-फ़ानन् (آناً فاناً) अव्य. ('अ.) तावडतोब; झट्दिशी; एकाएकी.

आनिस (آنس) वि. ('अ.) स्नेह, प्रेम करणारा.

आनिसः (آنسہ) स्त्री. ('अ.) कुमारी.

आनी (آنی) वि. ('अ.) क्षणिक; क्षणभंगुर; तात्कालिक.

आपा (آپا) स्त्री. (तु.) थोरली बहीण; अक्का.

'आफ़ (عاف) वि. ('अ.) क्षमा करणारा; माफ करणारा.

आफ़त (آفت) स्त्री. ('अ.) (१) आपत्ती; संकट. (२) दुःख; कष्ट. **–का** (–کا) वि. बेहद्द; अत्यंत; भयंकर. **–का परकाल:** (–کا پرکالہ) वि. (१)अत्यंत हुशार; चलाख. (२)आकाश-पाताळ एक करणारा; धडपडचा. (३) खोडसाळ; खटचाळ. **–ज़द:** (–زدہ); **–रसीद:** (–رسیدہ) वि. विपदग्रस्त; दुर्दशाग्रस्त.

आफ़त-ए-नागहानी (آفت ناگہانی) स्त्री. ('अ. + फ़ा.) दैवी आपत्ती; अनपेक्षित संकट.

आफ़ताब (آفتاب) पु. (फ़ा.) (१) सूर्य. (२) ऊन्ह. **–गीर** (–گیر) (१) छत्री. (२) अबदागिरी. **–परस्त** (–پرست) सूर्यपूजक.

आफ़तावी (آفتابی) वि. (फ़ा.) (१) उन्हात वाळविलेला. (२) गोल. (स्त्री.) (१) अबदागिरी. (२) एक प्रकारचा लहान पंखा. (३) एक प्रकारची ढाल. (४) एक प्रकारची शोभेची दारू.

आफ़ताब: (آفتابہ) पु. (फ़ा.) मूठ असलेला एक प्रकारचा तोटीदार लोटा; झारी.

आफ़री (آفریں) वि. (फ़ा.) उत्पादित.

आफ़रीद: (آفریدہ) वि. (फ़ा.) उत्पन्न केलेला.

आफ़रीन (آفرین) अव्य. (फ़ा.) वाहवा! शाबास!

आफ़रीनिंद: (آفرینندہ) वि. (फ़ा.) निर्माता; सृष्टिकर्ता.

आफ़रीनिश (آفرینش) स्त्री. (फ़ा.) उत्पत्ती; निर्मिती; सृष्टी.

आफ़ाक़ (آفاق) पु. [अ. 'उफ़क़' (افق) चे अनेक.] (१) क्षितिजे. (२) देश. (३) जग.

आफ़ात (آفات) स्त्री. [फ़ा. 'आफ़त' (آفت) चे अनेक.] संकटे; दुर्दैवे; दुखापती.

आफ़िंदी (آفندی) पु. (तु.) श्रीयुत; महाशय.

आफ़ियत (آفیت) स्त्री. ('अ.) क्षेम; कुशल; खुशाली.

आफ़िल (آفل) वि. ('अ.) खाली जाणारा; लुप्त होणारा.

आब (آب) पु. (फ़ा.) (१) पाणी. (२) घाम. (३) अर्क. (४) मद्य. (५) अश्रू. (स्त्री.) (१) तेज. कांती. (२) रुबाब. (३) शोभा. (४) तलवारीची धार. (५) इज्जत. **–कश** (–کش) वि. पाणी काढणारा; भिस्ती; पखाली. **–कार** (–کار) पु. दारू (मद्य) तयार करणारा अथवा विकणारा कलाल. **–कारी** (–کاری) स्त्री. (१) दारू गाळण्याची भट्टी. (२) मादक पदार्थांशी संबंधित सरकारी खाते. (वि.) दारूसंबंधी; अबकारी. **–ख़ान:** (–خانہ) शौचकूप; पायखाना. **–ख़ुर्द** (–خورد) पु. (१) खाणे पिणे. (२) नशीब; भाग्य; आजीविका; अन्नपाणी. **–ख़ोर:** (–خورہ) पु. पाणी पिण्याचे भांडे; पेला. **–गीन:** (–گینہ) पु. (१) काच; आरसा. (२) मद्य-चषक. (३) बाटली. (४) अत्यंत नाजूक काच; प्रेमिकेचे हृदय. (५) हिरा. **–गीर** (–گیر) पु. पाण्याचे डबके; हौद; तलाव. **–जू** (–جو) स्त्री. नदी; कालवा; झरा. **–जोश** (–جوش) पु. (१) मांसाचा रस्सा. (२) सोडावॉटर. (३) लाल मनुका. **–ताब** (–تاب) स्त्री. झगमगाट; भपका; चमक. **–दस्त** (–دست) पु. (१) हातपाय धुणे. (२) शौचानंतर गुद-प्रक्षालन करणे; ढुंगण धुणे. **–दान** (–دان) पु. (१) पांण्याचे भांडे. (२) तळे. **–ओ-दान:** (–و دانہ) पु.(१)अन्नपाणी. (२) आजीविका. (३) भाग्य; नशीब. **–दार** (–دار) पु. पाणक्या; पाणी पाजविणारा. (वि.) पाणीदार; चमकदार; धारदार. **–दारी** (–داری) स्त्री. तजेला; चमक; पाणी; कांती; तकाकी. **–दीद:** (–دیدہ) ज्याचे डोळे अश्रूंनी डबडबले आहेत असा; अश्रूपूर्ण; गहिवरलेला. **–दोज़** (–دوز) वि. पाण्यातील मार्ग; जलयान. **–दोज़ कश्ती** (–دوزکشتی) स्त्री. ('अ.+फ़ा.) पाणबुडी. **–नाए** (–نائے) स्त्री. सामुद्रधुनी. **–पाशी** (–پاشی) स्त्री. पाटबंधाऱ्याची व्यवस्था; शेताला पाणी देणे. **–बाज़** (–باز) पु. पोहणारा; जलतरणपटू. **–यारी** (–یاری) स्त्री. पाहा 'आबपाशी'. **–रसानी** (–رسانی) स्त्री. (फ़ा.) पाणीपुरवठा. **–शार** (–شار) (१)झरा. (२) धबधबा. **–ओ-हवा** (–و ہوا) स्त्री. हवापाणी.

आब-ए-अंगूर (آب انگور) पु. (फ़ा.) द्राक्षार्क; द्राक्षापासून बनविलेले मद्य.

आब-ए-अनार (آب انار) पु. (फ़ा.) डाळिंबाचा रस किंवा अर्क; डाळिंबाच्या रसासारखी लाल मदिरा.

आब-ए-अर्ग़वानी (آب ارغوانی) पु. (फ़ा.) लाल पाणी; मदिरा.

आब-ए-आतशरंग (آب آتشی رنگ) पु. (फ़ा.) विस्तवासारखा रंग असलेले पाणी; मदिरा.

आब-ए-आतशी (آب آتشی) पु. (फ़ा.) पेटते पाणी; विस्तवासारखे पाणी; मद्य; दारू.

आब-ए-'अिशरत (آب عشرت) पु. (फ़ा.) चैनीचे पाणी; मद्य.

आब-ए-कौसर (آب کوثر) पु. (फ़ा.) स्वर्गातील कौसर' नामक नदीचे पाणी; अमृत; पवित्र जल.

आब-ए-ख़नजर (آب خنجر) पु. (फ़ा.) खंजिराची किंवा तलवारीची धार; सुरीची धार.

आब-ए-ख़ास़: (آب خاصہ) पु. (फ़ा.) बादशहा, वजीर वगैरे खाशा स्वारीचे पिण्याचे पाणी.

आब-ए-ख़िजलत (آب خجلت) पु. (फ़ा.) शरमिंदा किंवा लज्जित झाल्यामुळे आलेला घाम.

आब-ए-ख़िज़्र (آب خضر) पु. (फ़ा.) अमृत.

आब-ए-ख़ुश्क (آب خشک) पु. (फ़ा.) विलोरी काचेचा पेला.

आब-ए-गिरियः (آب گریہ) पु. (फ़ा.) आसू; अश्रू.

आब-ए-गौहर (آب گوہر) पु. (फ़ा.) मोतीबिंदू (नेत्ररोग).

आब-ए-ज़मज़म (آب زمزم) पु. (फ़ा.) मक्केतील जमजम नावाच्या झऱ्याचे पाणी. (या झऱ्याभोवती विहीर बांधण्यात आलेली आहे.) हे पाणी पवित्र समजले जाते.

आब-ए-जारी (آب جاری) पु. (फ़ा.) वाहते पाणी.

आब-ए-जाविदाँ (آب جاوداں) पु. (फ़ा.) अमृत.

आब-ए-ज़िन्दगानी (آب زندگانی) पु. (फ़ा.) अमृत.

आब-ए-ज़ुलाल (آب زُلال) पु. (फ़ा.) शुद्ध, निर्मळ पाणी; थंड पाणी.

आब-ए-ज़ेर काह (آب زیرکاہ) पु. (फ़ा) (१) गवताखाली लपलेले पाणी. (२) कपट; धोका. (वि.) कपटी; दगाबाज.

आब-ए-तरब (آب طرب) पु. (फ़ा.) मदिरा; शराव.

आब-ए-तल्ख़ (آب تلخ) पु. (फ़ा.) (१) कडू पाणी. (२) अश्रू. (३) मद्य.

आब-ए-दन्दाँ (آب دنداں) पु. (फ़ा.) दातांचा चमकदारपणा व तीक्ष्णता. (वि.) नीच; दुर्बळ.

आब-ए-दीदः (آب دیدہ) पु. (फ़ा.) आसू; अश्रू.

आब-ए-नुक़रः (آب نقرہ) पु. (फ़ा.) पारा.

आब-ए-बक़ा (آب بقا) पु. (फ़ा.) अमृत.

आब-ए-बस्तः (آب بستہ) पु. (फ़ा.) (१) बर्फ. (२) काच.

आब-ए-बारां (آب باراں) पु. (फ़ा.) पावसाचे (ढगांचे) पाणी.

आब-ए-मर्वारीद (آب مروارید) पु. (फ़ा.) मोतीबिंदू (नेत्ररोग).

आब-ए-मुर्दः (آب مردہ) पु. (फ़ा.) साठलेले, न वाहणारे पाणी.

आब-ए-रवाँ (آب رواں) पु. (फ़ा.) (१) वाहते पाणी. (२) एक प्रकारची बारीक मलमल (कापड).

आब-ए-रूद (آب رود) पु. (फ़ा.) नदीचे पाणी; वाहते पाणी.

आब-ए-शोर (آب شور) पु. (फ़ा.) (१) खारे पाणी; समुद्राचे पाणी. (२) काळे पाणी; अंदमान.

आब-ए-सियाह (آب سیاہ) पु. (फ़ा.) (१) खोल पाणी. (२) मोतीबिंदू.

आब-ए-हयात (آب حیات) पु. (फ़ा.) अमृत.

आब-ए-हराम (آب حرام) पु. (फ़ा.) मदिरा; शराव.

आब-ओ-गिल (آب و گل) पु. (फ़ा.) पाणी व माती.

आब-ओ-हवा (آب و ہوا) स्त्री. (फ़ा.+'अ.) हवापाणी; वातावरण.

आबजू (آب جو) पु. (फ़ा.) नदीचे किंवा कालव्याचे पाणी.

आबजोश (آب جوش) पु. (फ़ा.) (१) मांसाचा रस्सा. (२) सोडाबॉटर.

आबनूस (آبنوس) पु. (फ़ा.) शिसवीसारखे एक काळे व मौल्यवान लाकूड; टेंभुर्णी. **–का कुंदः** (–کا کندہ) लठ्ठ व काळाकुट्ट माणूस.

आबनूसी (آبنوسی) वि. (फ़ा.) काळाकुट्ट; काळाठिक्कर.

आबरू (آبرو) स्त्री. (फ़ा.) (१) अब्रू; इज्जत; प्रतिष्ठा. (२) पत. (३) लज्जा. **–दार** (–دار) वि. अब्रूदार; प्रतिष्ठित; साध्वी. **–रेज़ी** (–ریزی) स्त्री. बेअब्रू; नालस्ती; विनयभंग.

आबलः (آبلہ) पु. (फ़ा.) फोड. **–ए-फ़िरंग** (–فرنگ) गर्मी; उपदंश (रोग).

आबा (آبا) पु. ['अ. 'अब' (اب) चे अनेक. 'अब' हे 'अबू' (ابو) चे परिवर्तित रूप आहे.] पूर्वज; वाडवडील. **–ओ-अजदाद** (–و اجداد) पु. पूर्वज.

आबा'ई (آبائی) वि. ('अ.) वडिलार्जित; पैतृक; आनुवंशिक.

आबाद (آباد) वि. (फ़ा.) (१) वसलेले. (२) भरभराटीचे; सुखी; संपन्न. (प्रत्य.) वसविलेले शहर; गाव. [उदा. 'औरंग+आबाद' (اورنگ+آباد) औरंगाबाद. औरंगजेबाने वसविलेले शहर]. **–कार** (–کار) पु. (१) वसविणारा; वसाहत करणारा; पडीत जमीन लागवडीस आणणारा. (२) वसाहतवादी. **–कारी** (–کاری) स्त्री. वसाहत करणे; पुनर्वसन; पडीत जमीन लागवडीस आणणे.

आबादानी (آبادانی) स्त्री. (फ़ा.) (१) वस्ती. (२) वसाहत. (३) वैभव.

आबादी (آبادی) स्त्री. (फ़ा.) (१) वस्ती; लोकसंख्या. (२) वसाहत. (३) लागवडीस आलेली जमीन. (४) संपन्नता; वैभव.

आबान (آبان) पु. (फ़ा.) इराणी वर्षाचा आठवा महिना. हा मार्गशीर्ष महिन्यात येतो.

'आबिद (عابد) पु. ('अ.) भक्त; इबादत म्हणजे उपासना करणारा; पूजक.

'आबिदः (عابدہ) स्त्री. ('अ.) उपासिका; तपस्विनी.

आबियानः (آبیانہ) पु. (फ़ा.) पाणीपट्टी.

'आबिर (عابر) पु. ('अ.) पथिक; प्रवासी.

आबिस्तः (آبستہ) स्त्री. ('अ.) गर्भवती; गरोदर स्त्री.

आबी (آبی) वि. (फ़ा.) (१) पाण्याचा; पाण्याशी संबंधित. (२) पाण्यात राहाणारा; जलचर. (३) फिक्कट निळा. (स्त्री.) पिंठी न लावता केलेली पाण्यातील जाड भाकरी किंवा रोटी.

'आम (عام) वि. ('अ.) (१) सर्वसाधारण; मामुली; गौण. (२) प्रचलित; प्रसिद्ध. (३) हलका; क्षुद्र. (पु.) सामान्य लोक; जनता. –फ़हम (فہم –) सर्वसुलभ; सर्वांना समजेल असे. –में (میں –) उघडउघड.

आमद (آمد) स्त्री. (फ़ा.) (१) आगमन; प्रवेश. (२) जमा; प्राप्ती; आवक. –आमद (آمد –) स्त्री. आगमनाची धामधूम; आगमनाची जाहिरात. –ओ-रफ़्त (و رفت –) स्त्री. आवक-जावक; रहदारी; ये-जा; दळणवळण.

आमद-ओ-ख़र्च (آمد و خرچ) पु. (फ़ा.) जमाखर्च; आयव्यय.

आमद-ओ-रफ़्त (آمد و رفت) स्त्री. (फ़ा.) येंजा; रहदारी; आयात-निर्यात.

आमदनी (آمدنی) स्त्री.(फ़ा.) (१) प्राप्ती; मिळकत; उत्पन्न; जमा. (२) आयात.

आमलः (آملہ) पु. (फ़ा.) आवळा.

आमाज (آماج) पु. (फ़ा.) लक्ष्य; नेम.

आमादगी (آمادگی) स्त्री. (फ़ा.) तयारी; तत्परता; उद्युक्तता.

आमादः (آمادہ) वि. (फ़ा.) तयार; तत्पर; उद्युक्त; सिद्ध.

आमास (آماس) पु. (फ़ा.) सूज.

आमिनः (آمنہ) स्त्री. ('अ.) हजरत मुहम्मद पैगंबर यांच्या मातेचे नाव.

'आमियानः (عامیانہ) वि. ('अ.+फ़ा.) (१) सामान्य लोकांसारखे. (२) अडाण्यांसारखे. (३) अश्लील; ग्राम्य.

'आमिर (عامر) वि. ('अ.) (१) वसलेला. (२) परिपूर्ण; भरलेला. (३) वसविणारा.

आमिर (آمر) वि. ('अ.) सत्ताधीश; हुकूमशहा.

आमिरियत (آمریت) स्त्री. ('अ.) सत्ता; हुकूमशाही.

'आमिरः (عامرہ) वि. ('अ.) (१) भरलेला; परिपूर्ण. (२) वसविणारा.

'आमिल (عامل) वि. पु. ('अ.) (१) काम करणारा; नोकर; गुमास्ता. (२) कर्तव्यपरायण. (३) अंमलदार; अधिकारी. (४) जादूटोणा करणारा (५) सिद्धपुरुष. (६) मामलेदार.

'आमिलः (عاملہ) स्त्री. ('अ.) (१) काम करणारी; कार्यकर्ती. (२) कार्यकारीणी; विषयनियामक (समिती). [उदा. 'मजलिस-ए-'आमिलः' (مجلس عاملہ) कार्यसमिती].

'आमी (عامی) वि. ('अ.) (१) सामान्य; हलक्या दर्जाचा; लोफर. (२) अडाणी. (३) आंधळा.

आमीन (آمین) अव्य. ('अ.) तथास्तु; ईश्वर करो; आमेन.

आमुर्ज़ (آمرز) पु. (फ़ा.) (१) क्षमा. (२) क्षमा करणारा. –गार (گار –) क्षमा करणारा; मोक्ष देणारा; ईश्वर.

आमुर्ज़िश (آمرزش) स्त्री. (फ़ा.) (१) क्षमा; दया. (२) मोक्ष.

आमुर्ज़ीदः (آمرزیدہ) वि. (फ़ा.) (१) क्षमित; क्षमाप्राप्त. (२) मोक्षप्राप्त.

आमूदः (آمودہ) वि. (फ़ा.) भरलेला; परिपूर्ण.

आमेख़्तः (آمیختہ) वि. (फ़ा.) मिसळलेला; भेसळ केलेला; कृत्रिम.

आमेज़ (آمیز) वि. (फ़ा.) मिसळलेला; मिश्रित; मिसळणारा. –गार (گار –) वि. सुशील; सज्जन.

आमेज़िश (آمیزش) स्त्री. (फ़ा.) मिश्रण; भेसळ.

आमोख़्तः (آموختہ) पु. (फ़ा.) शिकलेला, वाचलेला धडा; उजळणी; अभ्यास. (वि.) शिकलेला; शिकविलेला. –करना (کرنا –); –पढ़ना (پڑھنا –); –सुनाना (سنانا –) जुना धडा पुनः वाचणे; उजळणी करणे.

आमोज़गार (آموزگار) वि. (फ़ा.) (१) शिकविणारा; शिक्षक. (२) शिकणारा विद्यार्थी.

आमोज़िश (آموزش) स्त्री. (फ़ा.) शिक्षण; शिकवण.

'आम्मत-उन्-नास (عامۃ الناس); 'आम्मत-उल्-ख़ला'इक़ (عامۃ الخلایق) पु. ('अ.) सर्वसामान्य लोक; जनता.

'आम्मः (عامّہ) वि. (फ़ा.) (१) सार्वजनिक; सार्वत्रिक. (२) प्रसिद्ध; मशहूर. राय-ए-'आम्मः (رائے عامّہ) स्त्री. लोकमत; सार्वमत. सिह्हत-ए-'आम्मः (صحت عامّہ) स्त्री. सार्वजनिक आरोग्य.

आयत (آیت) स्त्री. ('अ.) (१) चिन्ह; खूण. (२) कुराणातील एखादे वाक्य; वचन. (३) कुराणातील वाक्य संपल्यानंतर करण्यात येणारे पूर्णविरामासारखे गोल चिन्ह.

आया (آیا) अव्य. (फ़ा.) काय; किंवा नाही; अथवा.

आया (آیا) स्त्री. (पोर्तु.) दाई; नर्स.

आयात (آیات) स्त्री. ['अ. 'आयत' चे अनेक.] कुराण-वचने; कुराणातील वाक्ये.

'आर (عار) पु. ('अ.) (१) लज्जा; शरम. (२) वैर. (३) तिरस्कार.

आरज़ू (آرزو) स्त्री. (फ़ा.) (१) इच्छा; अभिलाषा; आकांक्षा. (२) विनंती. (३) आशा. (४) आश्रय; आधार. **–मंद** (مند–) वि. इच्छुक; अभिलाषी.

आरब (آرد) पु. (फ़ा.) पीठ; आटा.

'आरज़ी (عارضی) वि. ('अ.) तात्पुरता; हंगामी; अस्थायी.

'आरज़ः (عارضہ) पु. ('अ.) (१) घटना. (२) रोग; आजार. (३) अडथळा; अव्यवस्था.

आरा (آرا) प्रत्य. (फ़ा.) शोभा वाढविणारा; सुशोभित करणारा. [उदा. 'जहाँ आरा' (جہاں آرا) जगाला सुशोभित करणारी].

आरा'इश (آرائش) स्त्री. (फ़ा.) आरास; सजावट.

आरा'ई (آرائی) स्त्री. (फ़ा.) सजविणे; सुशोभित करण्याची क्रिया.

आराकश (آراکش) पु. (हिं. + फ़ा.) करवत्या; करवतीने लाकूड कापणारा.

आराज़ी (آراضی) स्त्री. ['अ. 'अर्द़' (ارض) चे अनेक.] (१) जमिनी; शेते. (२) भूमी; पडीत जमीन. **–आबादी** (آبادی–) स्त्री. गावठाण जमीन. **–उफ़्तादः** (اُفتادہ–) स्त्री. ओसाड किंवा पडीत जमीन. **–ख़िराजी** (خراجی–) स्त्री. खंडाने केलेली जमीन. **–दार** (دار–) पु. जमीनदार; जमीन मालक. **–लाख़िराज मु'आफ़ी** (لاخراج معافی–) स्त्री. शेतसारा माफ असलेली जमीन.

आराबः (آرابہ) पु. (फ़ा.) (१) गाडा; छकडा; गाडी. (२) तोफवाहक गाडी.

आराम (آرام) पु. (फ़ा.) (१) सुख; चैन. (२) विश्रांती; आराम. (३) आरोग्य; स्वास्थ्य. **–कुर्सी** (کرسی–) स्त्री. (फ़ा.+'अ.) आरामखुर्ची; ईझी चेअर. **–गाह** (گاہ–) स्त्री. (१) विश्रांती-गृह. (२) शयनागार. **–तलब** (طلب–) वि. (१) सुखासीन; विलासी; चैनी. (२) आळशी; खुशालचेंडू. **–दिह** (دِہ–) वि. आरामशीर; सुखदायक.

आरामजाँ (آرام جاں) पु. (फ़ा.) अंतःकरणाला सुख देणारी वस्तू; प्रियकर; प्रियतमा; पुत्र.

आरास्तगी (آراستگی) स्त्री. (फ़ा.) सजावट; शृंगार.

आरास्तः (آراستہ) वि. (फ़ा.) (१) सजविलेला; शृंगारलेला; सुशोभित. (२) सुसज्जित; तयार (३) नटलेला.

'आरिज़ (عارض) पु. ('अ.) (१) गाल. (२) घटना. (३) अडथळा. (वि.) (१) होणारा; घडणारा. (२) अडथळा आणणारा. **–होना** (ہونا–) घडणे; अडथळा येणे, आणणे.

'आरिज़ी (عارضی) वि. ('अ.) (१) हंगामी; तात्पुरता. (२) अवास्तविक.

'आरिज़ः (عارضہ) पु. ('अ.) (१) रोग; आजार. (२) घटना; अपघात. (३) अडथळा.

'आरिफ़ (عارف) वि. ('अ.) (१) ज्ञाता; साक्षात्कारी. (२) संतोषी. (पु.) साधू; भक्त; महात्मा; सूफी संत.

'आरिफ़ानः (عارفانہ) वि. ('अ.) साधूसारखा; संतासारखा; ऋषितुल्य.

'आरियत (عاریت) स्त्री. ('अ.) (१) उसनवारी; उधार. (२) अस्थायित्व.

'आरियतन् (عاریتاً) अव्य. ('अ.) उसनवार; उधार; तात्पुरते.

'आरियती (عاریتی) वि. ('अ.) मागून आणलेले; उसनवार.

'आरी (عاری) वि. ('अ.) (१) नग्न. (२) थकलेला. (३) कंटाळलेला; विटलेला. (४) अलंकार विरहित (गद्य साहित्य). (५) असहाय; लाचार.

आरे (آرے) अव्य. (फ़ा.) होय; जी; हां. **–बले** (بلے–) पु. टाळाटाळी; 'होय' म्हणणे परंतु काम न करणे.

आरोग़ (آروغ) (पु.) (फ़ा.) ढेकर.

आलंग (آلنگ) पु. (तु.) कुरण; हिरवळ.

आल (آل) स्त्री. ('अ.) (१) संतती; मुले. (२) वंश; वंशज. (३) मुलीची संतती. **–ओ-अत़्फ़ाल** (و اطفال–) पु. मुलेबाळे.

आल (آل) वि. (तु.) लाल रंगाचा; तांबडा; मदिरा.

आल-ए-'अबा (آل عبا) पु. ('अ.) हजरत मुहम्मद पैगंबर यांची कन्या फातिमा, तिचे पती अली आणि त्यांचे मुलगे हसन व हुसैन.

आलत (آلت) स्त्री. ('अ.) (१) अवजार; उपकरण. (२) पुरुषाचे जननेंद्रिय; लिंग.

आलम (آلم) वि. ('अ.) फार त्रास देणारा; दुःखदायक.

'आलम (عالم) पु. ('अ.) (१) जग; विश्व. (२) लोक; जनसमूह. (३) अवस्था; स्थिती. (४) शोभा; बहार. **–अफ़रोज़** (افروز–) वि.

जगाला प्रकाशित करणारा; सूर्य. –आरा (آرا–) वि. जगाला सुशोभित करणारा. –आश्कार (آشکار–) वि. जगप्रसिद्ध; विश्वविख्यात. –आश्ना (آشنا–) वि. जगाला माहीत असणारा, जगाची माहिती असणारा; सर्वप्रिय. –गीर (گیر –) वि. विश्वविजयी; विश्वव्यापी. –ताब (تاب–) पाहा 'आलम-अफ़रोज़'. –पनाह (پناہ –) वि. जगाला रक्षण, शरण, आश्रय देणारा; बादशहा. –सोज़ (سوز–) वि. विश्वाला जाळणारा.

'आलम-ए-अजसाम (عالم اجسام) पु. ('अ.) मृत्युलोक; भूलोक.

'आलम-ए-अरवाह् (عالم ارواح) पु. ('अ.) आत्म्यांचे विश्व; परलोक; स्वर्ग.

'आलम-ए-'अलवी (عالم علوی) पु. ('अ.) स्वर्ग; परलोक.

'आलम-ए-असबाब (عالم اسباب) पु. ('अ.) जेथे प्रत्येक कार्याच्या मुळाशी कारण (असबाब) अवश्य असते असे विश्व; जग; मृत्युलोक.

'आलम-ए-क़ुदुस (عالم قدس) पु. ('अ.) स्वर्ग.

'आलम-ए-ख़याल (عالم خیال) पु. ('अ.) कल्पना-विश्व.

'आलम-ए-ख़ाक (عالم خاک) पु. ('अ. + फ़ा.) जग; मृत्युलोक; इहलोक.

'आलम-ए-ख़्वाब (عالم خواب) पु. ('अ.+फ़ा.) स्वप्न-जगत; निद्रावस्था.

'आलम-ए-ग़ैब (عالم غیب) पु. ('अ.+फ़ा.) अदृश्य जगत; परलोक.

'आलम-ए-जावेद (عالم جاوید) पु. ('अ.+फ़ा.) नित्य जगत; स्वर्ग.

'आलम-ए-तसव्वुर (عالم تصور) पु. ('अ.) कल्पना जगत, प्रियकर आपल्या प्रियतमेच्यां ध्यानात जेथे तल्लीन होतो असे विश्व.

'आलम-ए-फ़ना (عالم فنا); **'आलम-ए-फ़ानी** (عالم فانی) पु. ('अ.) नश्वर जग; इहलोक.

'आलम-ए-बक़ा (عالم بقا) पु. ('अ.) अविनाशी जग; परलोक; स्वर्ग.

'आलम-ए-बाला (عالم بالا) पु. ('अ.) परलोक; देवलोक; आकाश.

'आलम-ए-बेदारी (عالم بیداری) पु. ('अ. + फ़ा.) जागृतावस्था.

'आलम-ए-लाहूत (عالم لاهوت) पु. ('अ.) ब्रह्म लोक (जेथे ईश्वराखेरीज अन्य काही असत नाही).

'आलम-ए-वुजूद (عالم وجود) पु. ('अ.) जीवनावस्था; अस्तित्व.

'आलम-ए-सिफ़ली (عالم سفلی) पु. ('अ.) तुच्छ जगत; मर्त्य लोक.

'आलम-ए-सुग़रा (عالم صغریٰ) पु. ('अ.) मानवी शरीर.

'आलमी (عالمی) वि. ('अ.) जागतिक; संसारिक. [उदा. ''आलमी बैंक'' (عالمی بینک) पु. जागतिक बँक].

आला'इश (آلائش) स्त्री. (फ़ा.) (१) शरीरातील मळ अथवा इतर घाण. (२) आतडी. (३) फोडातील पू व रक्त.

आला'ईदः (آلائیدہ) वि. (फ़ा.) बरबटलेला; भरलेला; माखलेला.

आलात (آلات) पु. [अ. 'आलः' (آلہ) चे अनेक.] अवजारे; उपकरणे; साधनसामग्री; हत्यारे.

आलात-ए-जंग (آلات جنگ) पु. ('अ.+फ़ा.) युद्धोपयोगी शस्त्रे.

आलाम (آلام) पु. [अ. 'अलम' (الم) चे अनेक.] दुःखे; आपत्ती; संकटे.

आलिफ़ (آلف) वि. ('अ.) प्रेम करणारा; स्नेह करणारा.

आलिम (آلم) वि. ('अ.) त्रास देणारा; दुःखदायक.

'आलिम (عالم) वि. ('अ.) विद्वान; पंडीत; ज्ञाता.

'आलिम-ए-कुल (عالم کل) वि. ('अ.) सर्वज्ञ.

'आलिमानः (عالمانہ) वि. ('अ. + फ़ा.) विद्वानासारखा; पंडितोचित.

'आलिमः (عالمہ) स्त्री. ('अ.) विदुषी; पंडीता.

'आली (عالی) वि. ('अ.) मोठा; श्रेष्ठ; उच्च. –ख़ान्दान (خاندان–) वि. ('अ.+फ़ा.) कुलीन; खानदानी. –जनाब (جناب–) वि. ('अ.+फ़ा.) अत्यंत श्रेष्ठ; मान्यवर महाशय; परमप्रतिष्ठित. –जाह (جاہ–) वि. ('अ.) महामान्य (बादशहाचे संबोधन). –तबार (تبار–) वि. ('अ. + फ़ा.) कुलीन. –दिमाग़ (دماغ–) वि. ('अ.) बुद्धिमान; महाप्रज्ञ; उदारधी. –नज़र (نظر–) वि. ('अ.) उदार; व्यापक दृष्टिकोन असलेला. –शान (شان–) वि. ('अ.) महान; भव्य; रुबाबदार. –हुज़रत (حضرت–) वि. ('अ.) परमप्रतिष्ठित; महाशय; उच्च पदस्थ.

आलुफ़्तः (آلفتہ) वि. (फ़ा.) (१) निरंकुश; स्वच्छंद. (२) परकीय; बाहेरचा; परका.

आलू (آلو) पु. (फ़ा.) आलुबुखारा नावाचे आंबट फळ.

आलूचः (آلوچہ) पु. (फ़ा.) पंजाबच्या बाबूल होणारे एक आंबट-गोड फळ.

आलूद (آلود) वि. (फ़ा.) माख़लेला; भरलेला.

आलूदगी (آلودگی) स्त्री. (फ़ा.) (१) अपवित्रता; मलिनता; गलिच्छता. (२) लिप्तता; माखलेले असणे.

आलूदः (آلودہ) वि. (फ़ा.) भरलेला; माखलेला; बरबटलेला. **–दामन** (دامن –) वि. अपराधी; गुन्हेगार; एखाद्या दुष्कृत्यात हात असलेला.

आलूबुखारा (آلو بخارا) पु. (फ़ा.) आलुबुखार नावाचे एक आंबूस व रुचकर फळ. हे फळ बाहेरून तांबूस व काळसर असते.

आलः (آلہ) पु. ('अ.) (१) अवजार. (२) उपकरण.

आलः-ए-कार (آلۂ کار) पु. ('अ. + फ़ा.) काम करण्याचे यंत्र; कार्य करणारा.

आलः-ए-तनासुल (آلۂ تناسل) पु. ('अ.) जननेंद्रिय; शिश्न; लिंग.

आलः-ए-हर्ब (آلۂ حرب) पु. ('अ.) युद्धस्त्र; हत्यार.

आवर्दः (آوردہ) वि. (फ़ा.) (१) आणलेले; कृत्रिम. (२) वशिल्याचा; खास.

आवाज़ (آواز) स्त्री. (फ़ा.) (१) ध्वनी; शब्द; आवाज. (२) वाणी. (३) हाक. **–उठाना** (اٹھانا –) विरोध करणे. **–देना** (دینا –) हाक मारणे; ओ देणे.

आवाज़-ए-पा (آواز پا) स्त्री. (फ़ा.) चाहूल; पावलांचा आवाज.

आवाज़-ए-बाज़गश्त (آواز بازگشت) स्त्री. (फ़ा.) प्रतिध्वनी; प्रतिसाद.

आवाज़ः (آوازہ) पु. (फ़ा.) (१) ख्याती; प्रसिद्धी. (२) टोमणा; उपरोधिक बोलणे. **आवाज़े कसना** (آوازے کسنا) टोमणा मारणे.

आवारगी (آوارگی) स्त्री. (फ़ा.) उनाडकी; उडाणटप्पूपणा; मवालीपणा.

आवारः (آوارہ) वि. (फ़ा.) (१) उनाड, भटक्या; उडाणटप्पू. (२) दुराचारी; बदचलन. **–गर्द** (گرد –) वि. रिकामा हिंडणारा; उनाड. **–गर्दी** (گردی –) स्त्री. उनाडक्या; उडाणटप्पूपणा. **–मिज़ाज** (مزاج –) वि. बदमाश; बदचाल.

आवुर्दः (آوردہ) वि. (फ़ा.) (१) कृत्रिम; बनावटी. (२) वशिल्याचा; कृपापात्र.

आवेज़ (آویز) प्रत्य. (फ़ा.) लोंबकळणारा; लटकावणारा. [उदा. 'दिल आवेज़' (دل آویز) अंतःकरणाला लटकावणारा; मोहक; आकर्षक; सुंदर].

आवेज़ाँ (آویزاں) वि. (फ़ा.) लटकणारा; लोंबणारा; डुलणारा.

आवेज़िश (آویزش) (फ़ा.) (१) गुद्दागुद्दी; मारामारी. (२) लढाई.

आवेज़ः (آویزہ) पु. (फ़ा.) लोलक; कानातील डूल, इयरिंग वगैरे.

आश (آش) पु. स्त्री. (फ़ा.) (१) पेय; पातळ खाद्य. (२) मांस; खाद्य. **–पुज़** (پز –) पु. आचारी.

आशकार (آشکار); **आशकारा** (آشکارا) वि. (फ़ा.) प्रत्यक्ष; स्पष्ट; जाहीर; व्यक्त; प्रकट.

आशजौ (آش جو) पु. (फ़ा.) जव (बार्ली) भाजून व पाण्यात उकळून तयार केलेले काढ्यासारखे पाणी; बार्ली-वॉटर.

आशना (آشنا) वि. (फ़ा.) (१) परिचित; ओळखीचा. (२) माणसाळलेला. (३) प्रेमी. (पु.) मित्र; प्रेयसी; प्रेमपात्र. **–फ़रोशी** (فروشی –) स्त्री. मित्राची प्रशंसा त्याच्या तोंडावर करणे.

आशना'ई (آشنائی) स्त्री. (फ़ा.) (१) परिचय; ओळख. (२) मैत्री. (३) प्रेम. (४) गुप्त संबंध; अनुचित संबंध.

आशनारू (آشنارو) वि. (फ़ा.) तोंडओळख असलेला.

आशनासूरत (آشنا صورت) वि. (फ़ा. + 'अ.) ज्याची फक्त तोंडओळख आहे असा.

आशाम (آشام) पु. (फ़ा.) (१) तांदुळाची पेज; खीर. (२) पेय. (प्रत्य.) पिणारा. [उदा. 'मय आशाम' (مے آشام) वि. मद्यपान करणारा].

'आशिक़ (عاشق) वि. पु. ('अ.) (१) प्रियकर; प्रेमी. (२) आसक्त. (३) ईश्वरभक्तीत तल्लीन. **–मिज़ाज** (مزاج –) (१) स्वभावतःच प्रेम करणारा; प्रत्येक सुंदर व्यक्तीवर प्रेम करणारा; रंगेल. (२) विनोदी; गमत्या.

'आशिक़ानः (عاشقانہ) वि. ('अ.+फ़ा.) प्रेमिकेसारखा; प्रेमपूर्ण.

'आशिक़ी (عاشقی) स्त्री. ('अ.) प्रेम; अनुराग; आसक्ती.

आशियाँ (آشیاں); **आशियानः** (آشیانہ) पु. (फ़ा.) (१) घरटे. (२) घर; निवासस्थान.

'आशिर (عاشر) वि. ('अ.) दहावा; दशांश.

आशुफ़्तगी (آشفتگی) स्त्री. (फ़ा.) (१) दुर्दशा. (२) व्याकुळता; अस्वस्थता.

आशुफ़्तः (آشفتہ) वि. (फ़ा.) (१) अस्वस्थ; व्याकुळ; बेचैन. (२) दुर्दशाग्रस्त. (३) प्रेमात सापडलेला. (४) अस्ताव्यस्त. **–ख़याल** (خیال –) वि. (फ़ा.+'अ.) (१) अस्वस्थचित्त, ज्याच्या विचारांत गोंधळ आहे असा. (२) प्रेमी. **–मिज़ाज** (مزاج –) वि. (फ़ा.+'अ.) (१) उद्विग्न; गोंधळलेला. (२) प्रेमात सापडलेला. **–हाल** (حال –) वि. (फ़ा.) (१) दुर्दैवी; गांजलेला. (२) प्रेमिक.

'आशूर (عاشور); **'आशूरः** (عاشورہ) पु. ('अ.) (१) मुहर्रम या अरबी महिन्याची दहा तारीख या दिवशी हजरत इमाम हुसेन हुतात्मा झाले होते. (२) मुहर्रम (मोहरम) या महिन्याचे पहिले दहा दिवस.

आशोब (آشوب) पु. (फ़ा.) (१) आरडाओरडा; गोंधळ. (२) बंड; दंगा. (३) डोळ्यांची सूज व लाली. **–गाह** (گاہ –) स्त्री. भांडणतंटघाचे स्थान; जग.

आश्ती (آشتی) स्त्री. (फ़ा.) (१) मैत्री. (२) शांती. (३) तह.

आस (آس) स्त्री. (फ़ा.) (१) जाते; चक्की. (२) पत्ते; गंजीफा.

'आस (عاس) पु. ('अ.) रात्री पहारा देणारा व गस्त घालणारा.

आसफ़ (آصف) पु. ('अ.) (१) हजरत सुलेमान यांच्या अत्यंत वृद्धिमान प्रधानाचे नाव. (२) मंत्रीप्रधान. **–जाह** (جاہ –) वि. हैदराबादच्या निजामाची पदवी; किताब.

आसफ़ियः (آصفیہ) वि. ('अ.) आसफ़ जाहशी संबंधित.

आसमान (آسمان) पु. (फ़ा.) (१) आकाश. (२) स्वर्ग. **–पर चढ़ाना** (پر چڑھانا –) फार स्तुती करणे; हरभऱ्याच्या झाडावर चढविणे. **–सर पर उठाना** (سر پر اٹھانا –) खूप आरडाओरडा करणे; घर डोक्यावर घेणे. **–से तारे उतारना** (سے تارے اتارنا –) अत्यंत अवघड कार्य करणे. **–से बातें करना** (سے باتیں کرنا –) अत्यंत उंच असणे; आकाशाला भिडणे. **–सैर** (سیر –) वि. (फ़ा.+'अ.) आकाशात उडणारा.

आसमानी (آسمانی) वि. (फ़ा.) (१) आकाशी रंगाचा; निळा; अस्मानी. (२) आकाशाशी संबंधित. (३) आकस्मिक (४) दैवी; ईश्वरी.

आसमानः (آسمانہ) पु. (फ़ा.) छत; गच्ची.

आसाँ (آساں) वि. (फ़ा.) सोपे; सरळ; साधे.

आसा (آسا) प्रत्य. (फ़ा.) सारखा; समान.

आसा'इश (آسائش) स्त्री. (फ़ा.) (१) आराम; सुख; चैन. (२) आनंद. (३) सुगमता; सोय; सवलत. (४) समृद्धी.

आसान (آسان) वि. (फ़ा.) सोपे; सरळ; साधे; सुगम. **–पसन्द** (پسند –) वि. प्रत्येक काम सहजासहजी व्हावे, काही श्रास पडू नये असे इच्छिणारा.

आसानी (آسانی) स्त्री. (फ़ा.) सुगमता; सोपेपणा; सरलता; सुबोधता.

आसार (آثار) पु. ['अ. 'असर' (اثر) चे अनेक.] (१) चिन्हे; लक्षणे. (२) भितीची रुंदी. (३) प्राचीन अवशेष. (४) खाणाखुणा.

आसार-उस्-सनादीद (آثار الصنادید) पु. ('अ.) पूर्वजांच्या खुणा.

आसार-ए-क़दीमः (آثار قدیم) पु. ('अ.) पुराणवस्तू; भग्नावशेष.

आसाल (آصال) पु. ['अ. 'असील' (اصیل) चे अनेक.] सायंकाळच्या वेळा.

'आसिफ़ (عاصف) स्त्री. ('अ.) (१) जोराचे वादळ. (२) वादळी दिवस.

'आसिफ़ः (عاصفہ) स्त्री. ('अ.) (१) जोराचे वारे. (२) वावटळ.

'आसिम (عاصم) वि. ('अ.) (१) दूर ठेवणारा; अलिप्त राहाणारा. (२) चारित्र्यवान; एकपत्नीव्रती.

आसिम (آثم) वि. ('अ.) पापी; पातकी; गुन्हेगार.

आसिया (آسیا) स्त्री. (फ़ा.) चक्की; जाते.

आसिया-ए-आब (آسیائے آب) स्त्री. (फ़ा.) पाणचक्की.

आसिया-ए-बाद (آسیائے باد) स्त्री. (फ़ा.) पवन-चक्की.

आसियाब (آسیاب) स्त्री. (फ़ा.) पाणचक्की; जलप्रवाहावर चालणारी चक्की.

आसी (آسی) वि. ('अ.) (१) दुःखी; उद्विग्न. (२) वैद्य.

'आसी (عاسی) वि. ('अ.) अत्यंत म्हातारा; वृद्धतम.

'आसी (عاصی) वि. ('अ.) (१) पापी; पातकी. (२) गुन्हेगार.

आसीमः (آسیمہ) वि. (फ़ा.) (१) चकित; थक्क. (२) उद्विग्न; व्याकुळ.

आसूदगी (آسودگی) स्त्री. (फ़ा.) (१) शांती. (२) संतोष. (३) तृप्ती. (४) समृद्धी. (५) खुशाली.

आसूदः (آسودہ) वि. (फ़ा.) (१) संतुष्ट; तृप्त. (२) सुखी; संपन्न. (३) निश्चिंत; खुशाल. (४) शांत. **–ख़ातिर** (خاطر –) वि. तृप्त; सुखी. **–दिल** (دل –) वि. शांतचित्त. **–हाल** (حال –) वि. सुखवस्तू; संपन्न.

आसेब (آسیب) पु. (फ़ा.) (१) भूतबाधा. (२) आपत्ती; कष्ट. (३) नुकसान; हानी. (४) धोका. **–ज़दः** (زدہ –) वि. भुताने झपाटलेला; पछाडलेला.

आस्ताँ (آستاں); **आस्तान** (آستان); **आस्तानः** (آستانہ) पु. (फ़ा.) (१) उंबरा; उंबरठा. (२) दाराची चौकट. (३) प्रवेशद्वार. (४) एखाद्या ऋषीचा आश्रम किंवा फकिराचे निवासस्थान.

आस्तीं (آستیں); **आस्तीन** (آستین) स्त्री. (फ़ा.) कपडघाची बाही. **–का साँप** (کا سانپ –) अस्तनी-तील निखारा.

आहंग (آهنگ); **आहंज** (آهنج) पु. (फ़ा.) (१) संगीत; राग; गाणे. (२) समय; काल; वेळ. (३) संकल्प; निश्चय; इरादा.

आह (آه) स्त्री. (फ़ा.) निःश्वास; सुस्कारा; उसासा. (अव्य.) अरेरे! हाय हाय! **–पड़ना** (– پڑنا) शाप लागणे; तळतळाट लागणे. **–भरना** (– بھرنا) उसासा टाकणे.

आह-ए-नीमकश (آهِ نیم کش) स्त्री. (फ़ा.) बदनामीच्या भीतीने पूर्णपणे न सोडला जाणारा उसासा; अर्धोच्छ्वास.

आह-ए-नीमशबी (آهِ نیم شبی) स्त्री. (फ़ा.) मध्यरात्री सर्वजण झोपल्यानंतर टाकला जाणारा उसासा; विरहाच्या रात्री टाकला जाणारा निःश्वास.

आह-ओ-ज़ारी (آه و زاری) स्त्री. (फ़ा.) रडारड; विलाप.

आह-ओ-बुका (آه و بکا) स्त्री. (फ़ा.+'अ.) विलाप; आक्रोश.

आहक (آهک) पु. (फ़ा.) (१) चुना. (२) जळलेला, भाजलेला दगड.

आहन (آهن) पु. (फ़ा.) लोखंड. **–गर** (– گر) पु. लोहार. **–रुबा** (– ربا) पु. लोहचुंबक.

आहनी (آهنیں) वि. (फ़ा.) लोखंडी.

आहर्मन (آهرمن) पु. (फ़ा.) सैतान; दैत्य. पाहा 'अहरमन'.

आहा (آها) अव्य. (फ़ा.) अहाहा! वाहवा! छान!

आहार (آهار) पु. (फ़ा.) खळ (कागद वगैरे चिकटविण्याची).

'आहिर (عاهر) पु. ('अ.) व्यभिचारी; दुराचारी; विषयलंपट.

'आहिरः (عاهره) स्त्री. ('अ.) व्यभिचारीणी; कुलटा.

'आहिल (عاهل) वि. पु. ('अ.) सम्राट; बादशहा; खुदमुख्त्यार. (वि.) स्त्री. विधवा; कुमारी (नवरा नसलेली स्त्री).

आहिस्तगी (آهستگی) स्त्री. (फ़ा.) (१) धीमेपणा; मंदपणा; सावकाशी; जपून काम करण्याचे धोरण. (२) कोमलता. (३) गंभीरता; धीरगंभीरपणा.

आहिस्तः (آهسته) अव्य. (फ़ा.) (१) हळूहळू; सावकाश; आस्ते. (२) कोमलपणे. **–कार** (– کار) वि. दीर्घसूत्री.

आहिस्तः (آهسته) वि. (फ़ा.) (१) धिमा. (२) मध्यम लयीचा. (३) कोमल.

आहू (آهو) पु. (फ़ा.) (१) हरीण; मृग. (२) दोष; व्यंग. (३) प्रियतमेचे नेत्र. **–गीर** (– گیر) पु. (१) व्याघ. (२) दोष काढणारा. **–चश्म** (– چشم) वि. स्त्री. मृगनयनी; हरिणाक्षी. **–परस्ती** (– پرستی) स्त्री. शिकारीचा भयंकर नाद; मृगया-प्रेम. **–बराह** (– براہ) पु. हरिणीचे पाडस; मृगशावक. **–शिकार** (– شکار) वि.(पु.) हरिणीची शिकार करणारा; व्याघ. (वि.) स्त्री. टपोरे डोळे असलेली सुंदरी. (ही हरिणांना मुग्ध करते, असे म्हणतात).

आहू-ए-ज़र्रीं (آهوے زریں) पु. (फ़ा.) सूर्य.

आहू-ए-तर (آهوے تر) पु. (फ़ा.) काळे-पांढरे ढग.

आहेख्तः (آهیختہ). वि. (फ़ा.) लटकविलेला; टांगलेला; ओढलेला.

इंजाज़ (انجاز) पु. ('अ.) (१) प्रतिज्ञापूर्ती; वायदा पूर्ण करणे. (२) एखाद्याची गरज भागविणे.

इंज़ाम (انظام) पु. ('अ.) (१) सजविणे; शृंगारणे. (२) व्यवस्थित लावणे.

इंज़ार (انظار) पु. ('अ.) सुट्टी; रजा.

इंज़ाल (انزال) पु. ('अ.) (१) खाली येणे; उतरणे. (२) खाली आणणे. (३) स्त्री-संभोग; स्वप्नावस्था.

इंजास (انجاس) पु. ('अ.) अपवित्र करणे; विटाळणे.

इंजाह (انجاح) पु. ('अ.) इच्छापूर्ती; गरज भागविणे.

इंजिजाब (انجزاب) पु. ('अ.) मुरणे; आत्मसात होणे; आकृष्ट होणे.

इंजिमाद (انجماد) पु. ('अ.) गोठणे; घट्ट होणे.

इंजिलाब (انجلاب) पु. ('अ.) आकृष्ट होणे; ओढले जाणे.

इंज़िवा (انزوا) पु. ('अ.) एकांत; एकांतवास; निवृत्ती.

इंज़िहाक़ (انزهاق) पु. ('अ.) नष्ट होणे; विनाश; मृत्यू.

इंजील (انجیل) स्त्री. ('अ. + ग्री.) खिस्ती लोकांचा धर्मग्रंथ; बायबल; नवा करार.

इंति'आश (انتعاش) पु. ('अ.) (१) आजारातून उठणे. (२) वर चढणे; समृद्ध होणे.

इंतिक़ाद (انتقاض) पु. ('अ.) भंग; मोडणे.

इंतिक़ाद-ए-शर्त (انتقاض شرط) पु. ('अ.) अट मोडणे.

इंतिक़ाद (انتقاد) पु. ('अ.) (१) रोख रक्कम घेणे. (२) कोंडघातून धान्य निवडून काढणे. (३) टीका; समालोचन. (४) पारख.

इंतिक़ाम (انتقام) पु. ('अ.) सूड; उट्टे; बदला. **–लेना** (– لینا) सूड उगविणे; उट्टे काढणे; वैर साधणे.

इंतिक़ामानः (انتقامانہ) वि. ('अ. + फ़ा.) सूड-बुद्धीचा; शत्रुत्वपूर्ण.

इंतिक़ाल (انتقال) पु. ('अ.) (१) मृत्यू; मरण. (२) स्थलांतर; बदली; स्थानपरिवर्तन.

इंतिक़ाल-ए-अराज़ी (انتقال اراضی) पु. ('अ.) जमिनीची मालकी एकाकडून दुसऱ्याकडे जाणे; भू-स्वामित्व हस्तांतरण.

इंतिक़ाल-ए-जा'इदाद (انتقال جائداد) पु. ('अ.+फ़ा.) संपत्तीचे हस्तांतरण.

इंतिक़ाल-ए-दायमी (انتقال دایمی) पु. ('अ.) स्थायी हस्तांतरण.

इंतिक़ाल-ए-हुक़ूक़ीयत (انتقال حقیت) पु. ('अ.) अधिकाराचे हस्तांतरण.

इंतिक़ाली (انتقالی) स्त्री. ('अ.+फ़ा.) जमीनदारीचे अथवा इतर संपत्तीचे हस्तांतरण. **–बही** (بہی –) स्त्री. संपत्तीच्या हस्तांतरणाची नोंदवही (रजिस्टर). **–रुसूम** (رسوم –) पु. हस्तांतरणाचे शुल्क (फी).

इंतिख़ाब (انتخاب) पु. ('अ.) (१) निवडणूक. (२) निवड. (३) पसंती.

इंतिख़ाब-ए-जुदागानः (انتخاب جداگانہ) पु. ('अ.+फ़ा.) विभक्त मतदार संघातून होणारी निवडणूक. पृथक, निर्वासन; विभक्त मतदान पद्धती.

इंतिख़ाब-ए-मख़लूत़ (انتخاب مخلوط) पु. ('अ.) संयुक्त मतदार संघातील निवडणूक; संयुक्त मतदान पद्धती; संयुक्त निर्वाचन.

इंतिज़ा'अ (انتزاع) पु. ('अ.) उन्मूलन; विध्वंस; क्रांती.

इंतिज़ाम (انتظام) पु. ('अ.) बंदोबस्त; व्यवस्था.

इंतिज़ार (انتظار) पु. ('अ.) (१) प्रतीक्षा; वाट पाहाणे. (२) अपेक्षा; आशा.

इंतिज़ारी (انتظاری) स्त्री. ('अ.+फ़ा.) प्रतीक्षा; अपेक्षा; आशा.

इंतिफ़ा'अ (انتفاع) पु. ('अ.) नफा, लाभ, प्राप्त करणे; लाभान्वित होणे; फायदा घेणे.

इंतिबा'अ (انطباع) पु. ('अ.) मुद्रण; छापले जाणे.

इंतिबाक़ (انطباق) पु. ('अ.) एकमेकांशी मिळणे, जुळणे; लागू होणे.

इंतिबाश (انتباش) पु. ('अ.) (१) नग्न करणे. (२) थडग्यातील प्रेतावरील वस्त्र (कफन) चोरणे.

इंतिबाह (انتباہ) पु. ('अ.) (१) सावधगिरीची सूचना (चेतावणी) देणे. (२) ताकीद.

इंतिमा (انتما) पु. ('अ.) (१) अधिक होणे, विकसित होणे, असणे. (२) संबंधित असणे. (प्रत्य.) अधिक किंवा विकसित करणारा. [उदा. 'लुत़्फ़-ए-इंतिमा' (لطف انتما) वि. आनंदवर्धक; स्वाद वाढविणारा].

इंतिमास (انطماس) पु. ('अ.) लुप्त होणे; अदृश्य होणे.

इंतिलाक़ (انطلاق) पु. ('अ.) जाणे; गमन करणे.

इंतिवा (انطوا) पु. ('अ.) लिप्त, लपेटलेले असणे.

इंतिशार (انتشار) पु. ('अ.) (१) विसकटणे; अस्ताव्यस्त होणे. (२) गडबड; गोंधळ. (३) उद्विग्नता. (४) दुर्दशा. (५) कामवासना जागी होणे; जननेंद्रिय ताठ होणे.

इंतिसाक़ (انتساق) पु. ('अ.) (१) व्यवस्था. (२) क्रमबद्धता. (३) शैली.

इंतिसाफ़ (انتصاف) पु. ('अ.) (१) न्याय मिळणे. (२) अर्धे मिळणे; अर्धे होणे.

इंतिसाब (انتساب) पु. ('अ.) (१) संबंध जोडणे. (२) समर्पित करणे (पुस्तक वगैरे); समर्पण.

इंतिसाब (انتصاب) पु. ('अ.) होणे; उठणे.

इंतिसाल (انتسال) पु. ('अ.) वंशवृद्धी; संतती होणे.

इंतिसाह (انتصاح) पु. ('अ.) हितोपदेश ऐकणे; मान्य करणे.

इंतिहा (انتہا) स्त्री. ('अ.) (१) पराकाष्ठा; हद्द. (२) समाप्ती; अंत. (३) परिणाम; फळ. **–पसंद** (پسند –) वि. अतिजहाल; क्रांतिकारक.

इंतिहा'ई (انتہائی) वि. ('अ.) (१) पराकाष्ठेचा; बेहद्द. (२) अंतिम.

इंतिहाज़ (انتہاز) पु. ('अ.) (१) फुरसत, सवड मिळणे. (२) ताब्यात ठेवणे, आणणे.

इंतिहाब (انتہاب) पु. ('अ.) (१) दरवडघामध्ये लुटले जाणे; नष्ट होणे. (२) नाश करणे; लुटणे.

इंतिहाल (انتحال) पु. ('अ.) वाङ्मयचौर्य.

'इंद (عند) अव्य. वि. ('अ.) जवळ; निकट; कडे; आधी; मुळे; प्रमाणे; अनुसार.

'इंद-अत्-तलब (عندالطلب) अव्य. ('अ.) मागणी होताच; मागताच.

'इंद-अत्-तजवीज़ (عندالتجویز) वि. ('अ.) विचाराधीन; अनिर्णित.

'इंद-अत्-तह़क़ीक़ (عندالتحقیق) अव्य. ('अ.) खचित; खरोखरी.

'इंद-अद्-ज़रूरत (عندالضرورت) अव्य. ('अ.) जरुरी-प्रमाणे; गरज लागल्यावर; गरजेनुसार.

'इंद-अन्-नास (عندالناس) अव्य. ('अ.) आम जनतेच्या मते; लोकांच्या दृष्टीने.

'इंद-अल्-इस्तिफ़सार (عندالاستفسار) अव्य. ('अ.) (१) तपास केल्यानंतर. (२) उलट तपासणी चालू असता.

'इंद-अल्-वुक़ू'अ (عندالوقوع) अव्य. ('अ.) घटना घडल्यानंतर; अशा परिस्थितीत.

'इंद-अल्-वसूल (عندالوصول) अव्य. ('अ.) आल्यानंतर; वसूल झाल्यानंतर.

'इंद-अल्-लह (عندالله) अव्य. ('अ.) ईश्वराजवळ.

'इंद-अस्-सुबूत (عندالثبوت) अव्य. ('अ.) पुराव्यानुसार.

इंदाज (انضاج) पु. ('अ.) (१) पिकविणे; उबविणे. (२) शिजविणे.

इंदार (انذار) पु. ('अ.) टाकणे; फेकणे.

इंदिफ़ा'अ (اندفاع) पु. ('अ.) दूर होणे; निराकरण.

इंदिबात (انضباط) पु. ('अ.) (१) नियमबद्धता. (२) दृढता; मजबुती. (३) आत्मनियंत्रण.

इंदिबात-ए-औक़ात (انضباط اوقات) पु. ('अ.) वेळापत्रक; नित्यक्रम; परिपाठ.

इंदिमाल (اندمال) पु. ('अ.) (१) जखम भरणे. (२) बरे होणे; आजारातून उठणे. (३) सुधारणा होणे.

'इंदिय: (عندیہ) पु. ('अ.) (१) मत. (२) उद्देश. (३) विचार. [अनेक ''इंदियात'' (عندیات)].

इंदिराज (اندراج) पु. ('अ.) नोंद; नोंदणी.

इंदिला'अ (اندلاع) पु. ('अ.) पोट सुटणे; ढेरी वाढणे.

इंदिसास (اندساس) पु. ('अ.) लपणे; गुप्त होणे.

इंबा (انبا) पु. ('अ.) बातमी, सूचना देणे.

इंबार (انبار) पु. ('अ.) रास; ढीग; धान्याचा साठा. पाहा 'अंबार'.

इंबाह (انباہ) पु. ('अ.) जागे करणे; जागृत करणे.

इंबि'आस् (انبعاث) पु. ('अ.) (१) उत्थान. (२) भडकणे. (३) उत्तेजित होणे.

इंबिग़ा (انبغا) पु. ('अ.) पात्र होणे; योग्य बनणे.

इंबिसात् (انبساط) पु. ('अ.) (१) प्रसन्नता; आनंद. (२) फूल उमलणे; विकसित होणे. (३) धृष्टता.

इंबिसास् (انبثاث) पु. ('अ.) पांगापांग होणे; विसकटणे.

इ'आद: (اعادہ) पु. ('अ.) (१) परत येणे; पुनरागमन. (२) आवृत्ती; पुनरावृत्ती; पुनरुक्ती.

इ'आनत (اعانت) स्त्री. ('अ.) (१) सहायता; मदत. (२) सहकार्य.

इकबारगी (اکبارگی) अव्य. (फ़ा.) (१) एकदम; एकदाच. (२) अचानक.

इक़बाल (اقبال) पु. ('अ.) (१) भाग्य; दैव. (२) ऐश्वर्य; समृद्धी. (३) प्रताप; तेज; कीर्ती. (४) स्वीकृती; कबुली; मान्यता. **-मन्द** (- مند) वि. ('अ. + फ़ा.) (१) भाग्यवान. (२) प्रतापी. (३) तेजस्वी.

इक़बाल-ए-जुर्म (اقبال جرم) पु. ('अ.) गुन्हा कबूल करणे; अपराध; स्वीकृती.

इक़बाली (اقبالی) वि. ('अ.) आपला गुन्हा कबूल करणारा.

इक़बाह् (اقباح) पु. ('अ.) एखादी वस्तू विद्रूप, विकृत करणे.

इकराम (اکرام) पु. ('अ.) (१) इनाम; बक्षीस; पारितोषिक. (२) सन्मान; प्रतिष्ठा; सत्कार.

इक़रार (اقرار) पु. ('अ.) (१) करार; वायदा. (२) प्रतिज्ञा. (३) स्वीकृती; कबुली. **-नामः** (- نامہ) पु. ('अ.+फ़ा.) करारपत्र; प्रतिज्ञापत्र.

इक़रारी (اقراری) वि. ('अ.) (१) करारासंबंधी. (२) करार करणारा.

इक़राश (اقراش) पु. ('अ.) निंदा; नालस्ती.

इक़साम (اقسام) पु. ('अ.) (१) वाटणे; विभागणी करणे. (२) शपथ घेणे.

इकसार (اکثار) पु. ('अ.) (१) विस्ताराने सांगणे. (२) फार खाणे. (३) अधिकता.

'इक़ाब (عقاب) पु. ('अ.) (१) शिक्षा; पापाबद्दल होणारी शिक्षा. (२) यातना होणारी; कष्ट.

इक़ामत (اقامت) स्त्री. ('अ.) निवास; राहाणे. **-पिज़ीर** (- پذیر) वि. ('अ.+फ़ा.) राहाणारा.

इक़ित् (اقط); **इक़्त्** (اقط) पु. ('अ.) पनीर; खारा चक्का.

इकितताब (اکتتاب) पु. ('अ.) पुस्तकात वगैरे लिहिणे; वर्गाची यादी तयार करणे.

इक़्तिदा (اقتضا) पु. ('अ.) (१) गरज; जरूर. (२) इच्छा.

इक़्तिदा (اقتدا) स्त्री. ('अ.) (१) अनुकरण; अनुसरण. (२) इमामाच्या मागून नमाज पढणे.

इक़्तिदाब (اقتضاب) पु. ('अ.) तोडणे; कापणे.

इक़्तिदार (اقتدار) पु. ('अ.) (१) सत्ता; अधिकार. (२) प्रभाव. (३) सामर्थ्य. (४) प्रतिष्ठा.

इक़्तिदार-ए-अ'अला (اقتدار اعلیٰ) पु. ('अ.) सर्वश्रेष्ठ सत्ता; श्रेष्ठ; 'हायकमांड'.

इक़्तिना'अ (اقتناع) पु. ('अ.) मिळेल त्यावर संतुष्ट राहाणे; निस्पृहता; अल्पसंतुष्टता.

इक़्तिफ़ा (اقتفا) पु. ('अ.) अनुकरण; अनुसरण.

इक्तिफ़ा (اکتفا) पु. ('अ.) (१) पुरेसे पर्याप्त होणे. (२) संतुष्ट राहाणे.

इक्तिफ़ाल (اقتفال) पु. ('अ.) कुलुपात बंद असणे.

इक्तिबास (اقتباس) पु. ('अ.) (१) प्रज्वलित होणे, करणे; जळणे; पेटणे. (२) प्रकाशमान होणे. (३) ज्ञान प्राप्त करणे. (४) उद्धरण; एखाद्याच्या लेखातील किंवा कवितेतील भाग (त्याच्या नावाचा उल्लेख न करिता) उद्धृत करणे.

इक्तिशाफ़ (اکتشاف) पु. ('अ.) प्रकट, जाहीर होणे; कळणे.

इक्तिसाद (اقتصاد) पु. ('अ.) (१) मध्यम मार्ग. (२) काटकसर. (३) रुपये-पैसे; अर्थ.

इक्तिसादियात (اقتصادیات) स्त्री. ('अ.) अर्थशास्त्र; अर्थव्यवस्था.

इक्तिसादी (اقتصادی) वि. ('अ.) आर्थिक.

इक्तिसाब (اکتساب) पु. ('अ.) उपार्जन; प्राप्ती.

इक्तिसाब-ए-'अिल्म (اکتساب علم) पु. ('अ.) विद्योपार्जन; ज्ञानप्राप्ती.

इक्तिसाब-ए-ज़र (اکتساب زر) पु. ('अ. + फ़ा.) धनोपार्जन; द्रव्यप्राप्ती.

इक्तिसाम (اقسام) पु. ('अ.) विभाजन; वाटणी करणे.

इक्तिसार (اقتصار) पु. ('अ.) (१) संक्षिप्त करणे; संक्षेप; सारांश. (२) शब्द जंजाळ (पुष्कळ शब्द व कमी अर्थ).

इक़्दाम (اقدام) पु. ('अ.) (१) एखादे काम करण्यासाठी पुढे होणे; पाऊल टाकणे. (२) धैर्य; हिम्मत. (३) प्रयत्न.

इक़्दाम-ए-जुर्म (اقدام جرم) पु. ('अ.) गुन्हा करण्याचा प्रयत्न करणे.

इक्विदश (اکدش) पु. स्त्री. (तु.) (१) प्रेयसी; प्रियतमा. (२) जिची आई भारतीय व बाप तुर्की आहे अशी व्यक्ती. (३) ज्याची आई तुर्की व बाप अरबी आहे असा घोडा.

इक्नाफ़ (اکناف) पु. [अ. 'कनफ़' (کنف) चे अनेक.] (१) सरहद्दी; सीमा. (२) उपनगरे.

इक्फ़ा (اکفا) पु. ('अ.) अंत्यानुप्रासातील (काफ़ियामधील) एक दोष.

इक्फ़ार (اکفار) पु. ('अ.) एखाद्या आस्तिकाला नास्तिक (काफिर) ठरविणे, म्हणणे.

इक्माल (اکمال) पु. ('अ.) (१) पूर्ण करणे. (२) समाप्त करणे.

इक़्राद् (اقراض) पु. ('अ.) कर्ज काढणे; उधार घेणे; उसने घेणे.

इक्राम (اکرام) पु. ('अ.) (१) सन्मान; सत्कार. (२) प्रतिष्ठा.

इक्राह (اکراہ) पु. ('अ.) घृणा; तिटकारा; किळस.

इक़्लीदस (اقلیدس) स्त्री. ('अ.) भूमिती; ज्यामिती.

इक़्लीम (اقلیم) स्त्री ('अ.) खंड; महाद्वीप; देश.

इक़्वा (اقوا) पु. ('अ.) अंत्यानुप्रासातील एक दोष.

इक़्सास् (اقصاص) पु. ('अ.) खुनाचा बदला खुनाने घेणे; प्रतिहिंसा.

इख़बार (اخبار) पु. ('अ.) (१) बातमी देणे; सूचना देणे. (२) हेरगिरी करणे.

इख़राज (اخراج) पु. ('अ.) (१) खर्च; व्यय. (२) काढून टाकणे; बाहेर काढणे; बहिष्कार. (३) निर्गत; बाहेर जाणे; लोट (पाणलोट).

इख़राजात (اخراجات) पु. [अ. 'इख़राज' (اخراج) चे अनेक.] खर्च; बटवडा (पैशाचा).

इख़राब (اخراب) पु. ('अ.) खराब करणे; वैराण; उध्वस्त करणे.

इख़लास् (اخلاص) पु. ('अ.) (१) प्रेम; प्रीती. (२) मेळ; मिलाफ; मैत्री. (३) निष्कपटता. **-मन्द** (-مند) वि. ('अ. + फ़ा.) निष्कपट; निःस्वार्थी; प्रेमळ.

इख़्सा (اخصا) पु. ('अ.) खच्ची करणे.

इख़ाज़ (اخاذ) पु. ('अ.) घेणे; ग्रहण करणे.

इख़्तार (اخطار) पु. ('अ.) आपले प्राण धोक्यात घालणे; संकटात उडी घेणे.

इख़्तिताम (اختتام) पु. ('अ.) (१) समाप्त होणे; संपणे. (२) शेवट; समाप्ती; अंत.

इख़्तिदाब (اختضاب) पु. ('अ.) केसांना कलप लावणे.

इख़्तिफ़ा (اختفا) पु. ('अ.) लपविणे; गुप्त ठेवणे.

इख़्तियार (اختیار) पु. ('अ.) (१) हक्क; अधिकार; अखत्यार. (२) सामर्थ्य; आवाका; शक्ती. (३) सत्ता. (४) प्रभाव. (५) पसंती; निवड; विकल्प. (६) इच्छा. (७) नियंत्रण.

इख़्तियार-ए-जायज़ (اختیار جایز) पु. ('अ.) कायदेशीर सत्ता.

इख़्तियार-ए-समा'अत (اختیار سماعت) पु. ('अ.) खटल्याची सुनावणी करण्याचा अधिकार.

इख़्तियारी (اختیاری) वि. ('अ.) ऐच्छिक; वैकल्पिक.

इख़्तिरा'अ (اختراع) पु. ('अ.) शोध; शोधून काढलेली वस्तू. [अनेक 'इख़्तिरा'आत' (اختراعات)].

इख़्तिला'अ (اختلاع) पु. ('अ.) बायकोने नवऱ्याला नुकसानभरपाई देऊन घटस्फोट घेणे. 'खुला' करणे.

इख़्तिलाज (اختلاج) पु. (अ.) वडबड; हृदयाची धडधड.

इख़्तिलात (اختلاط) पु. ('अ.) (१) मैत्री; दोस्ती (२) घनिष्ठता; मिश्रण; मिलाफ; एकमेकात मिसळणे.

इख़्तिलाफ़ (اختلاف) पु. ('अ.) (१) मतभेद भिन्नता. (२) विरोध; वैमनस्य. (३) गैरसमज.

इख़्तिलाफ़-ए-राय (اختلاف رائے) पु. ('अ.) मतभेद मतभिन्नता.

इख़्तिलाल (اختلال) पु. ('अ.) (१) विघ्न; अडथळा (२) गोंधळ; अव्यवस्था. (३) गरज; आवश्यकता

इख़्तिलाल-ए-दिमाग़ (اختلال دماغ); **इख़्तिलाल-ए-हवास** (اختلال حواس) पु. ('अ.) बुद्धिभ्रंश; भ्रमिष्टपणा; वेड.

इख़्तिसाम (اختصام) पु. ('अ.) शत्रुत्व करणे; वैरी बनणे; शत्रू बनविणे.

इख़्तिसार (اختصار) पु. ('अ.) (१) संक्षिप्त करणे संक्षेप. (२) कमी करणे; सारांश.

इख़्तिसास (اختصاص) पु. ('अ.) वैशिष्ट्य असणे. प्रामुख्य; वैशिष्ट्य.

इख़्दाम (اخدام) पु. ('अ.) सेवा करणे.

इख़्फ़ा (اخفا) पु. ('अ.) लपविणे; दडवून ठेवणे. **'अल्म-ए-इख़्फ़ा** (علم اخفا) पु. अदृश्य होण्याची विद्या किंवा कला.

इख़्फ़ा-ए-जुर्म (اخفاے جرم) पु. ('अ.) गुन्हा करून तो लपविणे; अपराध कबूल न करणे.

इग़ारत (اغارت) स्त्री. ('अ.) (१) लुटणे; लुटालुट करणे. (२) धावणे; पाठलाग करणे.

इग़ासत (اغاثت) स्त्री. ('अ.) दुःखी व्यक्तीचे गाऱ्हाणे ऐकणे; अन्याय दूर करणे.

इग़ा (اغوا) पु. ('अ.) एखाद्याला युद्धास प्रवृत्त करणे; भडकावणे.

इग़ितदाब (اغتضاب) पु. ('अ.) एखाद्याला राग आणणे; क्रुद्ध बनविणे.

इग़ितनाम (اغتنام) पु. ('अ.) (१) लुटीचा माल घेणे (२) संतोष मानणे.

इग़ितफ़ार (اغتفار) पु. ('अ.) मोक्ष; मुक्ती.

इग़ितसाल (اغتسال) पु. ('अ.) (१) स्नान करणे (२) धुणे. (३) शुद्ध करणे. (४) स्नान; आंघोळ

इग़ना (اغنا) पु. ('अ.) (१) एखाद्याला श्रीमंत बनविणे. (२) निस्पृह बनविणे.

इग़मा (اغما) पु. ('अ.) बेशुद्ध, मूर्च्छित करणे.

इग़माज़ (اغماز) पु. ('अ.) (१) निंदा; तिरस्कार. (२) चहाडी.

इग़माद (اغماض) पु. ('अ.) दुर्लक्ष; कानाडोळा; उपेक्षा.

इग़राक़ (اغراق) पु. ('अ.) (१) अतिशयोक्ती. (२) जी गोष्ट घडणे असंभव नाही परंतु जी कधी घडलेली नाही, अशी गोष्ट. (३) बुडविणे.

इग़राद (اغراض) पु. ('अ.) दुःख देणे; सतावणे.

इग़राब (اغراب) पु. ('अ.) (१) नवी गोष्ट करणे. (२) अद्भुत वस्तू आणणे. (३) परदेशी होणे; प्रवास करणे. (४) पाण्याची पखाल भरणे.

इग़राम (اغرام) पु. ('अ.) (१) ठार मारणे. (२) नुकसानभरपाई घेणे. (३) हावरेपणा करणे.

इग़ला (اغلا) पु. ('अ.) (१) भाव वाढविणे. (२) महाग खरीदणे.

इग़लाक़ (اغلاق) पु. ('अ.) (१) दरवाजे बंद करून घेणे. (२) अवघड करणे. (३) दुर्बोधता.

इग़लात (اغلاط) पु. ('अ.) चूक करणे; चूक; अशुद्धी.

इग़लाम (اغلام) पु. ('अ.) गुदमैथुन; अनैसर्गिक संभोग; लौंडेबाजी.

इग़लाल (اغلال) पु. ('अ.) (१) द्वेष बाळगणे; खुनशीपणा करणे. (२) विश्वासघाताने द्रव्यापहरण करणे.

इग़वा (اغوا) पु. ('अ.) (१) अपहरण; पळवून नेणे (विशेषतः स्त्रीला). (२) बहकाविणे; फसविणे.

इज़कार (اذکار) पु. ('अ.) उल्लेख करणे; चर्चा करणे.

इजमाल (اجمال) पु. ('अ.) (१) संकलन; जमविणे गोळा करणे. (२) संक्षिप्त करणे; संक्षेप; सारांश. (३) एका संपत्तीवर अनेकांचा अधिकार असणे. **ख़ान्दान-ए-इजमाली** (خاندان اجمالی) पु. संयुक्त कुटुंब; एकत्र कुटुंब.

'इज़रा'ईल (عزرائیل) पु. ('अ.) (१) यमदूत; मृत्युदूत. (२) यमराज.

इजलास (اجلاس) पु. ('अ.) (१) कचेरी; कोर्ट. (२) बैठक; अधिवेशन.

इज़हार (اظہار) पु. ('अ.) (१) जाहीर करणे, होणे; प्रकटीकरण; प्रसिद्धी. (२) साक्ष.

इजाजत (اجازت) स्त्री. (फ़ा.) (१) परवानगी; अनुमती. (२) हुकूम; आज्ञा. **–चाहना** (– چاہنا) जाण्यासाठी परवानगी मागणे. **–नामः** (– نامہ) पु. ('अ.+फ़ा.) अनुमतिपत्र; लायसेन्स; परमीट.

इजाबत (اجابت) स्त्री. ('अ.) (१) स्वीकृती; मंजुरी: कबुली. (२) शौच; मलत्याग.

इज़ार (ازار) स्त्री. (फ़ा.) विजार; पायजमा. **–बंद** (– بند) पु. विजारीची नाडी.

'इज़ार (عذار) पु. ('अ.) (१) गाल. (२) चेहरा.

इजारः (اجارہ) पु. ('अ.) (१) मक्ता. ठेका. (२) अधिकार; मालकी. (३) भाडघाने दिलेली वस्तू. **–दार** (دار –) पु. ठेकेदार; एकमेव मालक.

इज़ालः (ازالہ) पु. ('अ.) (१) निवारण; निराकरण. (२) नुकसानभरपाई.

इज़ालः-ए-अमान (ازالۂ امان) पु. ('अ.) जप्ती; दंड; अनामत रक्कम जप्त होणे.

इज़ालः-ए-हैसियत-ए-'उर्फ़ी (ازالۂ حیثیت عرفی) पु. ('अ.) अब्रुनुकसानी; मानहानी; निंदा.

इज़्कार (اذکار) पु. ('अ.) उल्लेख करणे; चर्चा करणे.

'इज्ज़ (عجز) पु. ('अ.) (१) नम्रता. (२) अजीजी; असमर्थता.

'इज्ज़ (عز); **'इज्ज़त** (عزت) स्त्री. ('अ.) (१) इज्जत; अब्रू; शील; प्रतिष्ठा. (२) सन्मान; आदर. **–दार** (دار –) वि. प्रतिष्ठित.

इज्तनाब (اجتناب) पु. ('अ.) (१) अलिप्त राहाणे. (२) संयम. (३) घृणा; तिरस्कार.

इज्तिबा (اجتبا) पु. ('अ.) (१) निवडणे; निवडून काढणे. (२) पसंत करणे.

इज्तिमा'अ (اجتماع) पु. ('अ.) (१) जमा होणे; एकत्र होणे. (२) संमेलन; मेळावा. (३) युती. (४) गर्दी.

इज्तिमा'ई (اجتماعی) वि. ('अ.) सामूहिक; सामुदायिक.

इज्तिहाद (اجتہاد) पु. ('अ.) (१) प्रयत्न करणे. (२) योग्य मार्ग शोधून काढणे; जेथे कुराण व हदीस या धर्मग्रंथांचा स्पष्ट आदेश नसेल तेथे आपल्या बुद्धीने विधिनिषेधासंबंधी निर्णय करणे. (३) काफिराविरुद्ध युद्ध करणे; धर्मयुद्ध.

इज्दियाद (ازدیاد) पु. ('अ.) आधिक्य; बाहुल्य; वाढ.

इज्दिवाज (ازدواج) पु. ('अ.) विवाह; लग्न; शादी. **–बहुात-ए-ज़ौजः** (بحیات زوجہ –) बहुपत्नीत्व; एक पत्नी असता दुसरीशी लग्न करणे.

इज्दिहाम (ازدحام) पु. ('अ.) फार मोठा जनसमूह; गर्दी; जमाव.

इज़्न (اذن) पु. ('अ.) (१) परवानगी; अनुमती. (२) मोकळीक; सुटका. (३) मालकाने आपल्या गुलामाला एखादा व्यापार करण्याची परवानगी देणे. (४) लग्नाच्या बाबतीत वधुवरांची संमती. **–नामः** (نامہ –) पु. मृत्युपत्र; वारसापत्र.

इज़्न-ए-'आम (اذن عام) पु. ('अ.) (१) सार्वजनिक परवानगी. (२) मृताला शांतता लाभावी म्हणून केली जाणारी प्रार्थना (मुर्दे की नमाज) झाल्यानंतर लोकांना आपापल्या घरी जाण्याची परवानगी देणे.

इज़्नाब (اذناب) पु. ('अ.) (१) पाप करणे. (२) गुन्हा करणे.

इज़्नाब (اجناب) पु. ('अ.) (१) पारोसे असणे; स्नान न करणे. (२) मैथुनानंतर स्नान न करणे.

इज्बार (اجبار) पु. ('अ.) बळजबरीने काम करून घेणे; जुलूम; जबरदस्ती.

इज्मा'अ (اجماع) पु. ('अ.) (१) जमा होणे; एकत्र येणे; गोळा होणे; कायदेमंडळ; विधानसभा; जमाव. (२) एकमत होणे. **–ए-उम्मत** (امت –) सर्व जनतेचे एकमत; एखाद्या धार्मिक प्रश्नासंबंधी मुसलमानांचे बहुमत; मुसलमानांची आम सभा.

इज्मान (ازمان) पु. ('अ.) जुने होणे; प्राचीन असणे.

इज्माल (اجمال) पु. ('अ.) (१) संक्षेप; सारांश; सार-संग्रह. (२) विसकटलेल्या वस्तू गोळा करून व्यवस्थित लावणे. (३) सामुदायिक मालकी.

इज्माली (اجمالی) वि. ('अ.) (१) संयुक्त; सामुदायिक. (२) संक्षिप्त. **–महाल** (محال –) अविभक्त; संपत्ती; संयुक्त मालमत्ता.

इज्रा (اجرا) पु. ('अ.) (१) जारी करणे; अंमलबजावणी करणे; लागू करणे. (२) पाठविणे; परिपत्राने कळविणे. (३) काम चालविणे.

इज्रा-ए-कार (اجرائے کار) पु. ('अ. + फ़ा.) कार्यारंभ; एखाद्या कामाचा सूत्रपात

इज्रा-ए-डिगरी (اجرائے ڈگری) पु. ('अ. + इ.) हुकूमनामा वजावणे; डिक्रीची अंमलबजावणी करणे.

'इज्रा'ईल (عزرائیل) पु. ('अ.) (१) यमदूत; मृत्युदूत (२) यमराज.

'इज्ल (عجل) पु. ('अ.) वासरू; गायीचे वासरू.

'इज्लत (عجلت) स्त्री. ('अ.) (१) घाई; उतावळ. (२) आतुरता.

इज्लाल (اجلال) पु. ('अ.) (१) श्रेष्ठत्व; महत्त्व; मोठेपणा. (२) प्रतिष्ठा; सन्मान. (३) तेज; दीप्ती; वैभव.

इज्लास (اجلاس) पु. ('अ.) (१) कोर्ट; कचेरी; न्यायालय. (२) बैठक; अधिवेशन. **–फ़रमा** (فرما –) अध्यक्षस्थानी असणारा.

इज्लास-ए-कामिल (اجلاس کامل) पु. ('अ.) 'फुलबेंच', अनेक न्यायाधीश असलेले न्यायालय.

इज्लास-ए-वाहिद (اجلاس واحد) पु. ('अ.) 'सिंगल बेंच', एक न्यायाधीश असलेले न्यायालय.

इज्हार (اجہار) पु. ('अ.) जाहीर करणे, होणे.

इज़्हार (اظہار) पु. (अ.) (१) जाहीर करणे, होणे. प्रगट करणे; अभिव्यक्ती. (२) न्यायालयातील वादी-प्रतिवादींची जबानी; वक्तव्य. **–नामः** (– نامہ) जाहीरनामा; प्रसिद्धीकरण; प्रकटन.

इज़्हार-ए-हलफ़ी (اظہار حلفی) पु. ('अ.) शपथपूर्वक दिलेली साक्ष अथवा जबानी.

इज़्हाल (اذہال) पु. ('अ.) वेसावध करणे, होणे; गाफील बनणे.

इत्'आम (اطعام) पु. (अ.) भोजन घालणे; अन्न देणे.

इत़फ़ा (اطفا) पु. ('अ.) आग विझविणे; दिवा मालवणे.

इत़फ़ाल (اطفال) पु. ('अ.) (१) बालक बनणे; लहान मूल होणे. (२) पाहा 'अत़फ़ाल'.

इत़मा'अ (اطماع) पु. ('अ.) लालूच दाखविणे; प्रलोभन देणे.

इतमाम (اتمام) पु. ('अ.) (१) पूर्णत्व; पूर्ण; संपूर्ण करणे. (२) समाप्ती.

इतमाम-ए-हुज्जत (اتمام حجت) पु. ('अ.) एखाद्याला अखेरचे समजाऊन सांगणे. (त्यानंतर तो जे काही करील त्याची जवाबदारी इतरांवर राहणार नाही, असे त्याला बजाविणे).

इत़मीनान (اطمینان) पु. ('अ.) (१) विश्वास; खात्री. (२) संतोष; समाधान.

इत़मीनान-ए-ख़ातिर (اطمینان خاطر) पु. ('अ.) मन-संतोष; मानसिक समाधान.

'इतरत (عترت) स्त्री. ('अ.) मुलेबाळे; संतती.

इतराब (اتراب) पु. ('अ.) धुळीस मिळविणे; मातीत मिसळणे.

इत़राह़ (اطراح) पु. ('अ.) (१) फेकणे; टाकणे. (२) पाया घालणे.

इत़लाक़ (اطلاق) पु. ('अ.) (१) सोडणे; बंधमुक्त करणे. (२) लागू करणे, होणे. (३) जारी करणे; घटस्फोट घेणे, देणे.

इतलाफ़ (اتلاف) पु. ('अ.) नाश; विनाश; हर्तन.

इत़वाल (اطوال) पु. ('अ.) वाढविणे; लांबण लावणे.

इत़हार (اطہار) पु. ('अ.) पवित्र करणे.

इता'अत (اطاعت) स्त्री. ('अ.) (१) आज्ञापालन; आज्ञाधारकता. (२) ताबेदारी; सेवा. (३) पूजा. **–गुज़ार** (– گزار) वि. ('अ.+फ़ा.) आज्ञाधारक.

'इताब (عتاد) पु. ('अ.) प्रवास; प्रवासाची तयारी; सामानसुमान.

'इताब (عتاب) पु. ('अ.) (१) राग; क्रोध (२) दटावणी.

जाने क्या लिख गया था उन्हे मैं 'इताब में'।
क़ासिद की लाश आयी है ख़त के जवाब में ॥

–नामः (– نامہ) पु. ('अ.+फ़ा.) को प्रपत्र.

इताबत (اطابت) स्त्री. ('अ.) (१) खूष करणे. (२) सुगंधित करणे. (३) पवित्र करणे; ढुंगण धुणे.

इतालियः (اطالیہ) पु. ('अ.) इटली (देश).

इताहत (اطاحت) पु. ('अ.) ठार मारणे; हत्या.

इत्तक़ा (اتقا) पु. ('अ.) संयम; इंद्रियनिग्रह.

इत्तफ़ाक़ (اتفاق) पु. ('अ.) (१) ऐक्य; मैत्री मिलाफ; एकमत. (२) योगायोग.

इत्तफ़ाक़-ए-राय (اتفاق رائے) पु. ('अ.+फ़ा.) एकमत.

इत्तफ़ाक़-ए-हुस्नः (اتفاق حسنہ) पु. ('अ. + फ़ा.) अनपेक्षित भाग्य; सुदैव.

इत्तफ़ाक़न् (اتفاقاً); **इत्तफ़ाक़ियः** (اتفاقیہ) अव्य. ('अ.) आकस्मिकपणे; योगायोगाने; अचानक; अनायासे.

इत्तफ़ाक़ी (اتفاقی) वि. ('अ.) (१) आकस्मिक. (२) संयुक्त; एकत्रित.

इत्तबा'अ (اتباع) पु. ('अ.) (१) अनुकरण; अनुसरण; धार्मिक अनुयायित्व. (२) समर्थन; न्यायालयात बाजू मांडणे.

इत्ला'अ (اطلاع) स्त्री. ('अ.) (१) सूचना; माहिती. (२) खबर; बातमी. **–नामः** (– نامہ) पु. ('अ.+फ़ा.) कोर्टाचे समन्स; लेखी सूचना. **–याबी** (– یابی) स्त्री. सूचना मिळणे; नोटीस मिळण्याची पावती.

इत्तसाफ़ (اتصاف) पु. ('अ.) (१) प्रशंसा; तारीफ. (२) वर्णन. (३) योग्यता; लायकी.

इत्तसाम (اتسام) पु. ('अ.) (१) खूण; चिन्ह. (२) सही.

इत्तसाल (اتصال) पु. ('अ.) (१) संबंध. (२) युती. (३) सातत्य.

इत्तहाद (اتحاد) पु. ('अ.) (१) ऐक्य; एकी; एकजूट. (२) मैत्री. (३) तह.

इत्तहाफ़ (اتحاف) पु. ('अ.) भेट; उपहार.

इत्तहाम (اتہام) पु. ('अ.) (१) दोष लावणे; आळ घेणे; आरोप. (२) संशयात टाकणे, बुचकळ्यात पाडणे.

'इत्र (عطر) पु. ('अ.) (१) अत्तर; पुष्पसार. (२) सुगंध. **–दान** (– دان) पु. ('अ. + फ़ा.)

अत्तरदाणी. **–बेज** (بیز –) वि. अत्तराचा सुगंध पसरविणारा.

'इत्रियात (عطریات) पु. ['अ. 'इत्र' (عطر) चे अनेक.] (१) अत्तरे. (२) सुगंधित द्रव्ये.

इत्रीफ़ल (اطریفل) पु. ['अ. 'त्रिफला' चे अरबी रूप.] त्रिफळा (हिरडा, बेहडा व आवळा).

इद्'आफ़ (اضعاف) पु. ('अ.) (१) वाढविणे; दुप्पट करणे. (२) दुबळे करणे.

इदक़ाक़ (ادقاق) पु. ('अ.) बारीक करणे; चूर्ण करणे.

इदख़ाल (ادخال) पु. ('अ.) (१) दाखल करणे; प्रवेश. (२) परिचय. (३) पैसा जमा करणे. (४) आत घेऊन जाणे.

इदग़ाम (ادغام) पु. ('अ.) (१) एका अक्षरात दुसरे अक्षर मिसळणे; द्वित्व; जोडाक्षर. (२) न चावता खाणे. (३) घोडघाच्या तोंडात लगाम देणे.

इद्तिराब (اضطراب) पु. ('अ.) (१) बेचैनी; अस्वस्थता; व्याकुळता; काळजी. (२) घाई; तातडी; उतावीळपणा.

इद्तिराबी (اضطرابی) स्त्री. ('अ.) (१) क्षोभ; व्यग्रता; अस्वस्थता. (२) उतावळ; अधीरता.

इद्तिरार (اضطرار) पु. **इद्तिरारी** (اضطراری) स्त्री. ('अ.) (१) नाइलाज; अपरिहार्यता; गरज. (२) चळवळ; हिसा. (३) जुलूम. (४) आतुरता; जलदी.

इदबार (ادبار) पु. ('अ.) (१) दुर्भाग्य; आपत्ती. (२) दारिद्र्य.

इदराक (ادراک) पु. स्त्री. ('अ.) (१) बुद्धी; ज्ञान; प्रतिभा; समज. (२)अगोचर वस्तूंचा अनुभव.

इद्राब (اضراب) पु. ('अ.) (१) अवज्ञा करणे. (२) मस्तक नमविणे. (३) फळविणे. (४) तृप्त करणे. (५) अनुपम असणे.

इदरार (ادرار) पु. ('अ.)(१) जारी होणे. (२)जोराचा पाऊस येणे. (३) छात्रवृत्ती.

इद्रार (اضرار) पु. ('अ.)(१) नुकसान करणे; हानी पोहचविणे. (२)आघात, जखम करणे.

इद्लाल (اضلال) पु. ('अ.) एखाद्याला कुमार्गाला लावणे; चुकीचा मार्ग दाखविणे.

इदा'अत (اضاعت) स्त्री. ('अ.) नष्ट करणे; नाश.

इदाफ़त (اضافت) स्त्री. ('अ.) (१) परस्परसंबंध. (२) फारसीमध्ये षष्ठीच्या प्रत्ययाचे कार्य करणारे चिन्ह. [उदा. 'दर्द-ए-दिल' (درد دل) (हृदयाचे दुःख) यातील दर्द मधील दुसऱ्या 'द' (दाल) खाली दिले जाणारे चिन्ह. (ـِ) याला जेर असेही म्हणतात].

इदाफ़ी (اضافی) वि. ('अ.) नंतर वाढविलेला.

इदाफ़: (اضافہ) पु. ('अ.) (१) वृद्धी; वाढ. (२) प्रगती; उन्नती. **–ए-लगान** (لگان –) पु. ('अ. + हि.) सारावाढ; सांडवाढ.

इदाम (ادام) पु. ('अ.) तोंडी लावणे (भाजी, आमटी वगैरे).

इदामत (ادامت) स्त्री. ('अ.) नित्यता; शाश्वतता,

इदारत (ادارت) स्त्री. ('अ.) संपादन; संपादकत्व.

इदारत-उल्-बरीद (ادارۃالبرید) पु. ('अ.) डाकखाते.

इदारिय: (اداریہ) पु. ('अ.) संपादकीय; अग्रलेख.

इदार: (ادارہ) पु. ('अ.) (१) संस्था; सभा. (२)कार्यालय. (३) विभाग; खाते. (४) फिरविणे.

'इद्दत (عدت) स्त्री. ('अ.) (१) गणना; मोजणी. (२) मुस्लिम धर्मशास्त्राप्रमाणे स्त्रियांना घटस्फोट मिळाल्यानंतर व वैधव्य प्राप्त झाल्यानंतर दुसरे लग्न करण्यापूर्वी त्याच अवस्थेत काही काळ कंठावा लागतो. याला इद्दत असे म्हणतात. घटस्फोट घेतलेल्या स्त्रीची इद्दत तीन महिने व विधवेची चार महिने दहा दिवस असते. या अवधीत ती पुनर्विवाह करू शकत नाही.

इद्दि'आ (ادعا) पु. ('अ.) हक्क सांगणे; दावा करणे; हक्क; दावा.

इद्दिख़ार (ادخار) पु. ('अ.) जमा करणे; गोळा करणे; संग्रह करणे.

इन'अदाम (انعدام) पु. ('अ.) नष्ट होणे; नेस्तनाबूत होणे.

इन'आम (انعام) पु. ('अ.) इनाम; बक्षीस; पुरस्कार; पारितोषिक; भेट. **–ओ-इकराम** (–واکرام) पु. मानमरातब; भेट-देणगी. **–दार** (–دار) पु. ज्याला जमीन इनाम मिळालेली आहे असा.

'इनब (عنب) पु. स्त्री. ('अ.) द्राक्ष.

'इनां (عناں); **'इनान** (عنان) स्त्री. (फ़ा.) लगाम. **–गीर** (–گیر) वि. लगाम धरून घोडघाला अडविणारा, थांबविणारा; चालू कामात अडथळा आणणारा. **–गश्ता** (–گشتہ) ; **–गुसिस्त:** (–گسستہ) वि. लगाम तुटलेला किंवा ढिल्या लगामाचा घोडा; जोरात धावणारा; निरंकुश; बेलगाम. **–ताब** (–تاب) वि. लगामाच्या इशाऱ्यावर चालणारा घोडा; सुव्यवस्थित.

'इनाद (عناد) पु. ('अ.) शत्रुत्व; वैर.

इनाबत (انابت) स्त्री. ('अ.) पश्चात्तापपूर्वक ईश्वराचे ध्यान करणे; पश्चात्ताप.

'इनायत (عنایت) स्त्री. ('अ.) (१) कृपा; दया; अनुकंपा; अनुग्रह; मेहरबानी. (२) आधार; देणगी. **–नामः** (–نامہ) पु. ('अ.+फ़ा.) कृपापत्र.

'इनायात (عنایات) पु. स्त्री. ['अ.' 'इनायत' (عنایت) चे अनेक.] कृपा; दया.

इन्'इक़ाद (انعقاد) पु. ('अ.) व्यवस्था (सभा वगैरेची) असणे.

इन्'इकास (انعکاس) पु. ('अ.) प्रतिबिंब; प्रतिबिंबित होणे.

इन्क़ा'अ (انقاع) पु. ('अ.) (१) निवडणे; वेचणे. (२) एखाद्याच्या हाकेला ओ देणे.

इन्क़ाज़ (انقاذ) पु. ('अ.) सोडविणे; मुक्त करणे.

इन्कार (انکار) पु. ('अ.) नकार; अस्वीकृती; नामंजुरी.

इन्कास (انکاس) पु. ('अ.) उपडे करणे; उलटे करणे.

इन्क़ास़ (انقاص) पु. ('अ.) कमी करणे; दोषपूर्ण बनविणे.

इन्क़ित़ा'अ (انقطاع) पु. ('अ.) तुटणे; कापले जाणे; वेगळे होणे; बंद होणे.

इन्क़िदा (انقضا) पु. ('अ.) (१) शेवट; समाप्ती. (२) टळणे; निघून जाणे.

इन्क़िदा-ए-मी'आद (انقضاے میعاد) पु. ('अ.) मुदत टळणे; मुदतीबाहेर जाणे.

इन्क़िबाद़ (انقباض) पु. ('अ.) (१) संकुचित होणे; संकोच पावणे. (२) खोटी; खोळंबा; अटकाव. (३) बद्धकोष्ठ. (४) खिन्नता.

इन्क़ियाद (انقیاد) पु. ('अ.) (१) आज्ञाधारकता. (२) आधीन होणे; ताब्यात राहणे.

इन्क़िलाब (انقلاب) पु. ('अ.) (१) क्रांती; आमूलाग्र परिवर्तन. (२) कालचक्राचे उलटसुलट फिरणे. [अनेक 'इन्क़िलाबात' (انقلابات)].

इन्किशाफ़ (انکشاف) पु. ('अ.) जाहीर होणे; प्रकट होणे; कळणे; रहस्योद्घाटन; माहीत होणे; उघड होणे.

इन्किसाफ़ (انکساف) पु. ('अ.) सूर्यग्रहण.

इन्क़िसाम (انقسام) पु. ('अ.) विभाजन; वाटणी; विभागणी.

इन्किसार (انکسار) पु. **इन्किसारी** (انکساری) स्त्री. ('अ.) दीनता; नम्रता; अजीजी.

इन्खिफ़ाफ़ (انخفاف) पु. ('अ.) (१) संकोच पावणे; संकुचित होणे. (२) लज्जा; संकोच.

इन्ग़िमाम (انغمام) पु. ('अ.) दुःखी होणे; रंजीम येणे.

इन्जिमाद (انجماد) पु. ('अ.) गोठणे; थिजणे.

इन्ज़ाल (انزال) पु. ('अ.) (१) खाली पडणे, टाकणे. (२) वीर्यपात; स्वप्नावस्था.

इन्फ़ाक़ (انفاق) पु. ('अ.) (१) खर्च करणे. (२) नोकरी देणे; पोटाला घालणे.

इन्फ़ाज़ (انفاذ) पु. ('अ.) (१) जारी करणे. (२) पाठविणे.

इन्फ़िआल (انفعال) पु. ('अ.) लज्जित होणे; शरमिंदा होणे; लज्जा; संकोच.

इन्फ़िकाक (انفکاک) पु. ('अ.) (१) वेगळे होणे; निखळणे; मरकणे. (२) मोकळे करणे; सोडविणे.

इन्फ़िकाक-ए-रहन (انفکاک رہن) पु. ('अ.) गहाण ठेवलेली वस्तू किंवा संपत्ती सोडवून घेणे.

इन्फ़िराद (انفراد) पु. ('अ.) एकटे, एक असणे.

इन्फ़िरादियत (انفرادیت) स्त्री. ('अ.) अद्वितीयत्व; एकत्व; वैयक्तिकत्व.

इन्फ़िरादी (انفرادی) वि. ('अ.) एका व्यक्तीचे; वैयक्तिक; अद्वितीय.

इन्फ़िसाल (انفصال) पु. ('अ.) निर्णय; निकाल; फैसला; निवाडा.

इन्शा (انشا) स्त्री. ('अ.) (१) लिहिणे; लेख; मजकूर. (२) वाङ्मय; साहित्य. (३) लेखनशैली. (४) पत्रलेखन कला.

इन्शा'अल्लह (انشاءاللہ); **इन्शा'अल्लहो त'आलॉ** (انشاءاللہ تعالیٰ) अव्य. ('अ.) परमेश्वराची इच्छा असेल तर.

इन्शाद (انشاد) पु. ('अ.) कविता म्हणणे; काव्य-पाठ.

इन्शापरदाज़ (انشا پرداز) पु. ('अ.) गद्यलेखक; साहित्यिक; निबंधकार.

इन्शापरदाज़ी (انشا پردازی) स्त्री. ('अ.) लेखनकला; निबंधलेखन.

इन्शिक़ाक़ (انشقاق) पु. ('अ.) भंगणे; फुटणे; तडा जाणे.

इन्शिराह़ (انشراح) पु. ('अ.) हृदयविकास; चित्ताची प्रसन्नता.

इन्शिराह़-ए-क़ल्ब (انشراح قلب) पु. ('अ.) हृदय विकसित होणे; दिव्यदृष्टी प्राप्त होणे.

इन्स (انس) पु. ('अ.) माणसे; मानवजाती (हा शब्द अनेकवचनी वापरला जातो, परंतु याचे एकवचनी रूप नाही).

इन्सान (انسان) पु. ('अ.) (१) मनुष्य; मानव. (२) सज्जन. (३) डोळ्याची बाहुली.

इन्सान-ए-'ऐन (انسان عین) पु. ('अ.) डोळ्याची बाहुली.

इन्सानियत (انسانیت) स्त्री. ('अ.) (१) माणुसकी मानवता. (२) सौजन्य.

इन्सानी (انسانی) वि. ('अ.) मानवी; माणसासंबंधी.

इन्साफ़ (انصاف) पु. ('अ.) (१) न्याय. (२) निर्णय; निवाडा. **-पसन्द** (پسند-) वि. न्यायप्रिय; न्यायी.

इन्सिदाद (انسداد) पु. ('अ.) (१) बंद होणे; थांबणे. (२) निवारण; प्रतिबंध.

इन्सिराम (انصرام) पु. ('अ.) (१) तुटणे; अलग होणे. (२) समाप्त, पुरे होणे. (३) व्यवस्था; बंदोबस्त. (४) समाप्ती; पूर्णता. (५) तात्पर्य.

इन्सी (انسی) पु. ('अ.) (१) मनुष्य. (२) प्रत्येक अवयवाचा आतील भाग.

इन्हितात् (انحطاط) पु. ('अ.) ऱ्हास; उणीव.

इन्हिंदाम (انہدام) पु. ('अ.) (१) विध्वंस; घराची पडझड; ढासळणे; विनाश. (२) वैराण होणे.

इन्हिराफ़ (انحراف) पु. ('अ.) (१) वक्र होणे. (२) दूर होणे; अलग होणे. (३) बंड करणे. (४) अवहेलना; अवज्ञा.

इन्हिलाल (انحلال) पु. ('अ.) (१) नष्ट होणे. (२) विस्तृत होणे. (३) तुच्छ होणे.

इन्हिसार (انحصار) पु. ('अ.) अवलंबून असणे; आधार; अवलंब.

इफ़रंज (افرنج) पु. ('अ.) (१) इंग्रज; युरोपियन. (२) युरोप; इंग्लंड.

इफ़रंजी (افرنجی) पु. ('अ.) इंग्रज; युरोपियन.

इफ़राज़ (افراز) पु. ('अ.) (१) वेगळे, अलग करणे. (२) उंच करणे.

इफ़रात् (افراط) पु. ('अ.) प्राचुर्य; बाहुल्य; आधिक्य; वैपुल्य. (वि.) विपुल; पुष्कळ. **-ओ-तफ़रीत्** (-و تفریط) न्यूनाधिक्य; तारतम्य.

'इफ़रीत (عفریت) पु. ('अ.) दैत्य; राक्षस.

इफ़लाज (افلاج) पु. ('अ.) पक्षाघात, अर्धांगवायू होणे.

इफ़लास (افلاس) पु. ('अ.) दारिद्र्य; गरिबी. **-ज़दः** (-زدہ) वि. दरिद्री; गरीब.

इफ़लाह् (افلاح) पु. ('अ.) कल्याण; उपकार.

इफ़शा (افشا) पु. ('अ.) जाहीर; प्रगट; उघड करणे.

इफ़शा-ए-राज़ (افشاے راز) पु. ('अ. + फ़ा.) रहस्योद्घाटन.

इफ़साद (افساد) पु. ('अ.) दंगाधोपा; भांडणतंटा करणे.

इफ़हाम (افہام) पु. ('अ.) समजाविणे. **-ओ-तफ़हीम** (-و تفہیم) पु. विचारविनिमय; स्वतः समजून घेणे व दुसऱ्याला समजाविणे.

इफ़्हाम (افہام) पु. ('अ.) वादविवादाने एखाद्याला गप्प बसविणे.

इफ़्हाश (افحاش) पु. ('अ.) अश्लील बोलणे; गलिच्छ बोलणे.

इफ़ाक़त (افاقت) स्त्री. **इफ़ाक़ः** (افاقہ) पु. ('अ.) आजारातून बरे होणे; शुद्धीवर येणे; आजाराला उतार पडणे.

इफ़ादत (افادت) स्त्री. **इफ़ादः** (افادہ) पु. ('अ.) (१) लाभ; नफा; फायदा. (२) अर्थ; तात्पर्य.

इफ़ादियत (افادیت) स्त्री. ('अ.) लाभ; उपयुक्तता.

इफ़्क (افک) पु. ('अ.) (१) असत्य. (२) आरोप.

इफ़्तार (افتار) पु. ('अ.) उपवास, उपोषण करणे; उपाशी असणे.

इफ़्तार (افطار) पु. ('अ.) उपवास सोडणे; रोज्याचे पारणे.

इफ़्तारी (افطاری) स्त्री. ('अ.) उपवास सोडण्याची खाद्यसामुग्री.

इफ़्तिक़ाद (افتقاد) पु. ('अ.) (१) अनुकंपा; मेहेरबानी. (२) हरविणे. (३) शोधणे; शोध; संशोधन.

इफ़्तिक़ार (افتقار) पु. ('अ.) (१) दारिद्र्य. (२) साधुत्व. (३) अजीजी.

इफ़्तिख़ार (افتخار) पु. ('अ.) (१) अभिमान; गौरव; गर्व; स्वाभिमान. (२) इज्जत; मान; सन्मान. **-नामः** (-نامہ) पु. ('अ.+फ़ा.) मानपत्र.

इफ़्तिताश (افتتاش) पु. ('अ.) तपासणी; शोध; चौकशी.

इफ़्तिताह् (افتتاح) पु. ('अ.) उद्घाटन; प्रारंभ; सुरुवात.

इफ़्तिदा (افتدا) पु. ('अ.) प्राणांच्या बदली संपत्ती देणे; एखाद्याचे प्राण घेतल्यानंतर त्याच्या वारसांना धन देऊन संतुष्ट करणे; नुकसानभरपाई.

इफ़्तिदाह् (افتضاح) पु. ('अ.) फजिती; निंदा; निर्भर्त्सना.

इफ़्तिरा (افترا) पु. ('अ.) खोटा आरोप; वहीम; लोकापवाद.

इफ़्तिराक़ (افتراق) पु. ('अ.) दुफळी निर्माण करणे; वैमनस्य.

इफ़्तिराश (افتراش) पु. ('अ.) (१) निंदा; बदनामी. (२) शोध; तपास.

इफ़्ज़ाल (افضال) पु. ('अ.) (१) कृपा; दया; अनुकंपा. (२) वृद्धी करणे.

'इफ़्फ़त (عفت) स्त्री. ('अ.) (१) सदाचरण; शील. (२) परस्त्रीगमन अथवा परपुरुषगमन न करणे; व्यभिचारापासून अलिप्त राहणे. (३) पातिव्रत्य. **–मआब** (مآب –) वि. स्त्री. सती; पतिव्रता.

इब'आद (ابعاد) पु. ('अ.) दूर करणे; दूर फेकणे.

इबक़ा (ابقا) पु. ('अ.) बाकी ठेवणे; वाचविणे; शिल्लक टाकणे.

'इबरत (عبرت) स्त्री. ('अ.) (१) अद्दल; धडा. (२) ताकीद. **–अंगेज़** (انگیز –) वि. (१) धडा घेण्यासारखी गोष्ट. (२) जिची भीती वाटून मनुष्य धडा घेतो अशी (गोष्ट); अद्दल घडविणारी (गोष्ट). **–नामः** (نامہ –) पु. ('अ. + फ़ा.) कित्ता.

इबरा (ابرا) पु. ('अ.) (१) मुक्ती; सुटका. (२) उपेक्षा. (३) परतफेड. (४) पवित्र, शुद्ध होणे.

इबरा-ए-ज़िम्मः (ابراے ذمہ) पु. ('अ.) जबाबदारीतून मोकळे करणे.

इबराज़ (ابراز) पु. ('अ.) जाहीर करणे; रहस्योद्घाटन करणे.

इबराद (ابراد) स्त्री. ('अ.) (१) थंड करणे; थंड पाणी देणे. (२) त्वरित काम करणे. (३) घाईने दूत घाडणे.

'इबरानी (عبرانی) वि. ('अ.) यहुदी. (स्त्री.) हिब्रू भाषा.

इबराम (ابرام) पु. ('अ.) (१) पक्के, दृढ करणे. (२) त्रास देणे. (३) निकडीची गरज (४) कळकळीची विनंती.

इबरीक़ (ابریق) पु. ('अ.) (१) तोटी व मूठ असलेला पाण्याचा लोटा. (२) सुरई.

इबरीज (ابریج) स्त्री. ('अ.) रवी (दही घुसळण्याची).

इबरेशम (ابریشم) पु. ('अ.) रेशीम; कच्चे रेशीम; रेशमाचा कोष.

इबलाग़ (ابلاغ) पु. ('अ.) (१) पाठविणे; धाडणे. (२) पोचविणे.

इबलीस (ابلیس) पु. ('अ.) सैतान; दैत्य; राक्षस.

इबहाम (ابہام) पु. ('अ.) (१) अस्पष्टता; संदिग्धता; संशय; गोंधळ. (२) अंगठा. (वि.) संदिग्ध; अपरिचित.

इबा (ابا) पु. ('अ.) (१) नकार; इन्कार; अस्वीकृती. (२) घृणा.

'इबाद (عباد) पु. [अ. 'अब्द' (عبد) चे अनेक.] ईश्वराचे सेवक; भक्त; उपासक.

'इबादत (عبادت) स्त्री. ('अ.) उपासना; पूजाअर्चा; नमाज; तपस्या; आराधना. **–कदः** (کدہ –); **–ख़ानः** (خانہ –); **–गाह** (گاہ –) पु. ('अ.+फ़ा.) उपासनास्थान; मंदीर, मशीद, चर्च वगैरे **–गुज़ार** (گزار –) वि. उपासक; तपस्वी.

'इबारत (عبارت) स्त्री. ('अ.) (१) लेखन; लेख; मजकूर. (२) लेखनशैली 'डिक्शन'. (३) शुद्धलेखन. **–आरा'ई** (آرائی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) शब्दावडबर; अलंकारिक शैली; शब्दचित्रण.

इबाहत (اباحت) स्त्री. ('अ.) (१) परवानगी. (२) विहित असणे; निषिद्ध नसणे.

इब्त (ابط) स्त्री. ('अ.) बगल; काख.

इब्ता (ابطا) पु. ('अ.) उशीर लावणे.

इब्ताल (ابطال) पु. ('अ.) (१) खोटे ठरविणे. (२) खंडन करणे.

इब्तिज़ाल (ابتذال) पु. ('अ.) (१) अपव्यय; उधळेपणा. (२) अश्लीलता.

इब्तिदा (ابتدا) स्त्री. ('अ.) (१) आरंभ; सुरुवात. (२) पाया; उद्गम.

इब्तिदा'अ (ابتداع) पु. ('अ.) शोध; नवनिर्मिती.

इब्तिदा'ई (ابتدائی) वि. ('अ.) प्रारंभिक; प्राथमिक.

इब्तिला (ابتلا) पु. ('अ.) (१) परीक्षा; कसोटी. (२) दुःख; दुर्दैव.

इब्तिसाम (ابتسام) पु. ('अ.) (१) स्मित; हास्य. (२) फूल उमलणे; विकसित होणे.

इब्तिहाज (ابتہاج) पु. ('अ.) हर्ष; प्रसन्नता; आनंद.

इब्दा'अ (ابداع) पु. ('अ.) नवनिर्मिती; शोध; संशोधन.

इब्दाल (ابدال) पु. ('अ.) बदल; परिवर्तन; अदलाबदल.

इब्न (ابن) पु. ('अ.) पुत्र; मुलगा.

इब्न-उल्-ग़रब़ (ابن الغرض) पु. ('अ.) स्वार्थी मनुष्य.

इब्न-उल्-ग़ैब (ابن الغیب) पु. ('अ.) ज्याच्या बापाची माहिती नाही, असा मुलगा; अज्ञात कुलशील.

इब्न-उल्-वक़्त (ابن الوقت) पु. ('अ.) संधिसाधू; स्वार्थी मनुष्य.

इब्न-उस्-सबील (ابن السبیل) पु. ('अ.) पथिक; प्रवासी.

इब्न-ए-सुबह़ (ابن صبح) पु. ('अ.) सूर्य.

इब्नत (ابنت) स्त्री. ('अ.) मुलगी; कन्या.

इब्राहीम (ابراھیم) पु. ('अ.) एक पैगंबर (प्रेषित). यांना नमरूदने जाळून टाकण्याचा प्रयत्न केला होता, परंतु तो आगीचा सागर यांच्या स्पर्शाने बाग बनला.

इम'आन (امعان) पु. ('अ.) सूक्ष्मपणे पाहाणे; सूक्ष्मचिंतन.

इमकान (امکان) पु. ('अ.) (१) शक्यता; संभावना. (२) सामर्थ्य.

इमकानी (امکانی) वि. ('अ.) संभाव्य.

इमदाद (امداد) स्त्री. ('अ.) मदत; साह्य.

इमदाद-ए-बाहमी (امداد باهمی) स्त्री. ('अ.+फ़ा.) परस्पर सहकार्य; सहकार.

इमरोज़ (امروز) अव्य. (फ़ा.) आज. **-फ़र्दा करना** (-فردا کرنا) टाळाटाळ करणे; चालढकल करणे.

इमला (املا) पु. ('अ.) शुद्धलेखन (मुलांना लिहावयाला घालतात ते); लेखन; श्रुतलेख.

इमलाक (املاک) पु. ['अ. 'मिल्क' (ملک) चे अनेक.] भू-संपत्ती; खरी संपत्ती; मालमत्ता. **-ए-ग़ैरमन्क़ूलः** (-غیر منقولہ) स्थावर संपत्ती. **-ए-मन्क़ूलः** (-منقولہ) जंगम संपत्ती.

इमलाल (املال) पु. ('अ.) दुःखी, मलूल करणे.

इमलास़ (املاص) पु. ('अ.) गर्भपात करणे; घसरविणे.

इमशब (امشب) अव्य. (फ़ा.) आज रात्री; आजची रात्र.

इमसाक (امساک) पु. ('अ.) (१) अडविणे; अडथळा. (२) स्तंभन. (३) कृपणता.

इमसाल (امسال) अव्य. (फ़ा.) या वर्षी.

इमहाल (امہال) पु. ('अ.) सवड, मुदत देणे.

'इमाद (عماد) पु. ['अ. ''इमादः'' (عمادہ) चे अनेक.] अनेक खांब; आधार.

इमाम (امام) पु. ('अ.) (१) नेता; मार्गदर्शक. (२) धर्माचार्य. (३) नमाजाचे संचालन करणारा. (४) जपमाळेतील सर्वांत मोठा मणी. **-ए-ज़ामिन** (-ضامن) पु. आठवे इमाम हजरत अली बिन मूसा. **इमाम-ए-ज़ामिन का रुपयः** (امام ضامن کا روپیہ) प्रवासाला निघालेल्या व्यक्तीच्या घरचे लोक तिच्या दंडावर एखादा रुपया किंवा नाणे बांधतात. याला इमाम जामिन का रुपया म्हणतात. हा रुपया प्रवास करणाऱ्याचे सर्व आपत्तींपासून रक्षण करतो अशी समजूत असते. नंतर हा रुपया दान करण्यात येतो.

इमामत (امامت) स्त्री. ('अ.) नमाजाच्या वेळचे नेतृत्व; नमाज पढविण्याची नोकरी.

इमामबाड़ा (امام باڑا) पु. ('अ. + हिं.) ज्या ठिकाणी मुसलमान लोक ताबूत काढतात अथवा मोहरमचा उत्सव साजरा करतात ते स्थान.

इमामियः (امامیہ) वि. ('अ.) शिया पंथीय मुसलमान.

'इमामः (عمامہ) पु. ('अ.) पगडी; साफा.

'इमारत (عمارت) स्त्री. ('अ.) भवन; इमारत; पक्के घर.

इमारत (امارت) स्त्री. ('अ.) (१) सत्ता; राज्य; शासन. (२) श्रीमंती; संपन्नता.

इम्तिज़ाज (امتزاج) पु. ('अ.) मिश्रण; भेसळ; सरमिसळ.

इम्तिदाद (امتداد) पु. ('अ.) (१) दीर्घता; विस्तार; लांबण. (२) क्षेत्रफळ.

इम्तिना'अ (امتناع) पु. ('अ.) मनाई; प्रतिबंध.

इम्तिना'अ-ए-शराब (امتناع شراب) पु. ('अ.) दारूबंदी.

इम्तिनान (امتنان) पु. ('अ.) उपकार करणे; कृतज्ञ करणे.

इम्तियाज़ (امتیاز) पु. ('अ.) (१) फरक; तफावत; भेदभाव. (२) तारतम्य. (३) विशेष योग्यता; डिस्टिंक्शन.

इम्तियाज़ी (امتیازی) वि. ('अ.) मुख्य; वैशिष्ट्यपूर्ण; खास.

इम्तिला (امتلا) पु. ('अ.) (१) अपचन; अजीर्ण. (२) तुडुंब भरणे.

इम्तिस़ाल (امتثال) पु. ('अ.) आज्ञाधारकता; हुकूम पाळणे.

इम्तिहान (امتحان) पु. ('अ.) परीक्षा; तपासणी; कसोटी; शोध.

'इयाँ (عیاں) पु. ('अ.) जाहीर; स्पष्ट; प्रकट; उघड.

'इयाज़ (عیاذ) स्त्री. ('अ.) त्राण; संरक्षण; शरण.

'इयाज़न्बि'ल्लह (عیاذاً باللہ) अव्य. ('अ.) ईश्वर रक्षण करो.

'इयादत (عیادت) स्त्री. ('अ.) आजाऱ्याची विचारपूस. **-को जाना** (-کو جانا) आजाऱ्याच्या भेटीस जाणे.

'इयालत (عیالت) स्त्री. ('अ.) मुलेबाळे असणे; संसार; गृहस्थी.

इयालत (ایالت) स्त्री. ('अ.) (१) नेतृत्व; सत्ता; सरकार. (२) राखण. (३) दंड; शासन. (४) प्रांत.

इरक़ाम (ارقام) पु. ['अ. ''रक़म'' (رقم) चे अनेक.] लेखन; रक्कम लिहिणे; संख्या.

'इर्क़-उन्-निसा (عرق النسا) स्त्री. ('अ.) ढुंगणापासून टाचेपर्यंत गेलेली शीर, या शिरेचे दुखणे; साएटिका.

इरख़ा (ارخا) पु. ('अ.) सैल; ढिले करणे; सोडून देणे

इरग़ाम (ارغام) पु. ('अ.) अपमान करणे; नाक घासावयास लावणे.

इरजा'अ (ارجاع) पु. ('अ.) (१) दाखल करणे; आकृष्ट करणे; रुजू करणे. (२) परत आणणे.

'इरफ़ान (عرفان) पु. ('अ.) ज्ञान; विज्ञान; ब्रह्मज्ञान; ईश्वराचा साक्षात्कार.

इरफ़ाह (ارفاه) पु. ('अ.) सुखात ठेवणे; संपत्ती देणे; शांती देणे.

इरब (ارب) स्त्री. ('अ.) आवश्यकता; जरूर.

'इरम (ارم) पु. ('अ.) स्वर्ग; शद्दादने अरबस्तानात निर्माण केलेले एक काल्पनिक नंदनवन.

इरशाद (ارشاد) पु. ('अ.) (१) आज्ञा; हुकूम. (२) मार्गदर्शन; उपदेश. (३) ताकीद. (४) दीक्षा. **–करना** (–کرنا); **–फ़रमाना** (–فرمانا) सांगणे; आदेश देणे. **–बजा लाना** (–بجا لانا) हुकुमाची अंमलबजावणी करणे.

इरस़ (ارث) पु. ('अ.) वारसा; परंपरा.

इरसाल (ارسال) पु. ('अ.) (१) रवाना करणे; पाठविणे. (२) भेट.

'इराक़ (عراق) पु. ('अ.) (१) अरबस्तानातील पूर्वेकडील एक देश. (२) संगीतातील एक प्रातःकालीन राग.

'इराक़ी (عراقی) पु. ('अ.) अरबी घोडा.

इराग़त (اراغت); **इराग़ः** (اراغہ) पु. ('अ.) मागणे; मागणी करणे.

इरादत (ارادت) स्त्री. ('अ.) श्रद्धा; आस्था.

इरादतन् (ارادتاً) अव्य. ('अ.) जाणूनबुजून; मुद्दाम; जाणीवपूर्वक.

इरादतमन्द (ارادت مند) वि. ('अ.+फ़ा.) श्रद्धावान; भक्त.

इरादः (ارادہ) पु. ('अ.) विचार; संकल्प; इच्छा; निश्चय; नियत.

इराबत (ارابت) स्त्री. ('अ.) सशय करणे; शंका घेणे.

इर्ति'आश (ارتعاش) पु. ('अ.) कंपन; थरथर.

इर्तिक़ा (ارتقا) पु. ('अ.) उन्नती; उत्थान; उत्कर्ष; उदय.

इर्तिकाब (ارتکاب) पु. ('अ.) करणे (पाप, गुन्हा); ग्रहण करणे; हाती घेणे; सुरू करणे; बेकायदेशीर कृत्य सुरू करणे.

इर्तिकाब-ए-गुनाह (ارتکاب گناہ) पु. ('अ.+फ़ा.) पाप करणे.

इर्तिकाब-ए-जुर्म (ارتکاب جرم) पु. ('अ.) गुन्हा, अपराध करणे.

इर्तिदाद (ارتداد) पु. ('अ.) (१) बाटणे; धर्मत्याग. (२) परतणे. (३) नाकारणे.

इर्तिफ़ा'अ (ارتفاع) पु. ('अ.) उत्थान; उंच होणे; वर चढणे; उच्च पदस्थ होणे.

इर्तिबात् (ارتباط) पु. ('अ.) मैत्री; मिलाफ; संबंध जोडणे.

इर्तिशा (ارتشا) पु. ('अ.) लाच; भ्रष्टाचार.

इर्तिसाम (ارتسام) पु. ('अ.) चिन्ह, खूण करणे; चित्रित करणे; चित्र काढणे.

इर्तिहान (ارتہان) पु. ('अ.) ठेव ठेऊन घेणे; गहाण ठेवणे.

इर्तिहाल (ارتحال) पु. ('अ.) (१) प्रस्थान; प्रवास. (२) मृत्यू.

इर्दगिर्द (اردگرد) अव्य. (फ़ा.) (१) सभोवती; आसपास. (२) चोहोकडे.

इर्मन (ارمن) पु. ('अ.) कॉकेशिया (देश).

इर्वा (اروا) पु. ('अ.) पाणी देणे; तृप्त करणे.

इलक़ा (القا) पु. ('अ.) (१) पोचविणे; टाकणे. (२) ईश्वरी आदेश.

इलग़ा (الغا) पु. ('अ.) टाकणे; फेकणे; निवारण करणे.

इलज़ाम (الزام) पु. ('अ.) (१) आरोप; दोष. (२) अपराध. [अनेक 'इलज़ामात' (الزامات)].

इलबास (الباس) पु. ('अ.) कपडे घालणे; पोषाख करणे.

इलमास (الماس) पु. ('अ.) हिरा.

इलहाक़ (الحاق) पु. ('अ.) सामीलीकरण; विलीनीकरण; भर; क्षेपक.

इलहाद (الحاد) पु. ('अ.) नास्तिकता; धर्मभ्रष्टता; मूर्तिपूजकता.

इलहान (الحان) पु. ['अ. 'लहन' (لحن) चे अनेक.] (१) स्वरमाधुर्य; सुरात गाणे किंवा वाचणे; गोड आवाज. (२) संगीत.

इलहाम (الہام) पु. ('अ.) आकाशवाणी; ईश्वरी आदेश; अंतःस्फूर्ती.

'इलाक़ः (علاقہ) पु. ('अ.) (१) इलाखा; प्रांत; क्षेत्र. (२) संबंध. (३) हार्दिक प्रेम. **–दार** (–دار) पु. ('अ.+फ़ा.) (१) संबंधी; नातेवाईक. (२) मोठा जमीनदार. **–बन्द** (–بند) पु. ('अ.+फ़ा.) पटवेकरी; पटवा.

'इलाज (علاج) पु. ('अ.) (१) उपचार; औषध; चिकित्सा. (२) उपाय; प्रयत्न; युक्ती. **–पिज़ीर** (–پذیر) वि. साध्य; औषधाने बरा होण्यासारखा (रोग, रोगी).

'इलावः (علاوہ) अव्य. ('अ.) शिवाय; खेरीज.

इलाहियात (الٰهيات) स्त्री. ('अ.) ईश्वरी गोष्टी; ब्रह्मज्ञान; अध्यात्म-विज्ञान.

इलाही (الٰہی) अव्य. ('अ.) माझा ईश्वर; हे माझ्या परमेश्वरा! (वि.) ईश्वरी; दैवी; खुदा. **–खर्च** (خرچ –) पु. ('अ. + फ़ा.) प्राप्ती काही नसता खर्च मात्र अफाट असणे; बादशाही खर्च; दान. **–गज़** (گز –) पु. ('अ.+फ़ा.) अकबर बादशहाने सुरू केलेली वारपट्टी. ही ३३$\frac{३}{४}$ इंच लांब असते व इमारतीच्या कामी वापरली जाते. **–तौबः** (توبہ –) हे ईश्वरा, तू पापांपासून आमचे रक्षण कर. **–सन** (سن –) पु. अकबर बादशहाने इ. स. १५५६ साली सुरू केलेला सन.

इलियास (الیاس) पु. ('अ.) एक प्रेषित. हे जगाच्या अंतापर्यंत जिवंत राहाणार आहेत, अशी समजूत आहे.

इलः (الٰہ) पु. ('अ.) ईश्वर; खुदा.

इल्तिजा (التجا) स्त्री. ('अ.) निवेदन; विनंती; प्रार्थना; अर्ज.

इल्तिज़ाम (التزام) पु. ('अ.) (१) अनिवार्य, अपरिहार्य गोष्ट. (२) स्वतःवर ओढून घेणे.

इल्तिफ़ात (التفات) पु. स्त्री. ('अ.) (१) तिरप्या नजरेने पाहाणे. (२) कृपा; दया. (३) मैत्री; प्रेम.

इल्तिबास (التباس) पु. ('अ.) (१) सादृश्य; दोन शब्दांचा उच्चार एक परंतु अर्थ दोन असणे. (२) अस्पष्टता; जटिलता; संदिग्धता.

इल्तिमास (التماس) स्त्री. ('अ.) (१) प्रार्थना; विनंती. (२) निवेदन अर्ज.

इल्तियाम (التیام) पु. ('अ.) (१) जखम भरणे. (२) मैत्री.

इल्तिवा (التوا) पु. ('अ.) तहकुबी; स्थगित करणे; थांबविणे.

इल्तिहाब (التہاب) पु. ('अ.) आग भडकणे; पेटणे.

'इल्म (علم) पु. (१) विद्या; शिक्षण. (२) ज्ञान; विज्ञान. (३) परिचय; माहिती. (४) कला. (५) वृद्धी; विवेक. **–दाँ** (دان –) वि. पु. ('अ.+फ़ा.) विद्वान; पंडीत; शास्त्रज्ञ. **–दोस्त** (دوست –) वि. ('अ.+फ़ा.) विद्याप्रेमी.

'इल्म-उत्-तवारीख़ (علم التواریخ) पु. ('अ.) इतिहास शास्त्र; इतिहास-विज्ञान.

'इल्म-उन्-निसा (علم النسا) पु. ('अ.) कोकशास्त्र; कामशास्त्र.

इल्म-उल्-अख़्लाक़ (علم الاخلاق) पु. ('अ.) नीतिशास्त्र; नागरीक शास्त्र.

'इल्म-उल्-अग़ज़ियः (علم الاغذیہ) पु. ('अ.) आहार-शास्त्र.

'इल्म-उल्-अज्साम (علم الاجسام) पु. ('अ.) शरीर-विज्ञान.

'इल्म-उल्-अद्वियः (علم الادویہ) पु. ('अ.) औषधी-विज्ञान; वनस्पती शास्त्र.

'इल्म-उल्-अफ़्लाक (علم الافلاک) पु. ('अ.) अंतरिक्ष-विज्ञान.

'इल्म-उल्-इक़्तिसाद (علم الاقتصاد) पु. ('अ.) अर्थशास्त्र.

'इल्म-उल्-जिराहत (علم الجراحت) पु. ('अ.) शल्य-विज्ञान.

'इल्म-उल्-मिसाहत (علم المساحت) पु. ('अ.) ज्यामिती; रेखागणित.

'इल्म-उल्-हयात (علم الحیات) पु. ('अ.) जीव-विज्ञान.

'इल्म-उल्-हैवान (علم الحیوان) पु. ('अ.) प्राणिशास्त्र.

'इल्म-ए-अख़्लाक़ (علم اخلاق) पु. ('अ.) नीतिशास्त्र.

'इल्म-ए-अदब (علم ادب) पु. ('अ.) साहित्यशास्त्र.

'इल्म-ए-'अरूद (علم عروض) पु. ('अ.) छंद; शास्त्र-वृत्त शास्त्र.

'इल्म-ए-इलाहियात (علم الٰہیات); **'इल्म-ए-इलाही** (علم الٰہی) पु. ('अ.) अध्यात्मविद्या; वेदांत; ब्रह्मविद्या, वेदांत; दर्शनशास्त्र.

'इल्म-ए-कलाम (علم کلام) पु. ('अ.) (१) मीमांसा; तर्कशास्त्र. (२) अलंकार शास्त्र; वक्तृत्वशास्त्र.

'इल्म-ए-क़याफ़ः (علم قیافہ) पु. ('अ.) सामुद्रिक शास्त्र. चेहऱ्यावरून स्वभाव व भविष्य जाणण्याची विद्या.

'इल्म-ए-कीमियः (علم کیمیا) पु. ('अ.) रसायनशास्त्र.

'इल्म-ए-ग़ैब (علم غیب) पु. ('अ.) (१) परोक्ष-विज्ञान. (२) भविष्य-विज्ञान. (३) अध्यात्म विद्या.

'इल्म-ए-जमादात (علم جمادات) पु. ('अ.) खनिज-शास्त्र.

'इल्म-ए-जरासीम (علم جراثیم) पु. ('अ.) कीट-विज्ञान; कैटिकी.

'इल्म-ए-तब'इयात (علم طبعیات); **'इल्म-ए-तब'अ** (علم طبعی) पु. ('अ.) (१) पदार्थ-विज्ञान (२) भौतिक शास्त्र; भौतिकी. (३) निसर्ग-विज्ञान.

'इल्म-ए-तबक़ात-उल्-अर्द (علم طبقات الارض) पु. ('अ.) भूगर्भशास्त्र.

'इल्म-ए-तमद्दुन (علم تمدن) पु. ('अ.) नागरीक शास्त्र.

'इल्म-ए-तवारीख़ (علم تواریخ); **'इल्म-ए-तारीख़** (علم تاریخ) पु. ('अ.) (१) इतिहास शास्त्र. (२) कालगणन विद्या.

'इल्म-ए-तशरीह (علم تشریح) पु. ('अ.) शरीरशास्त्र.

'इल्म-ए-दस्त बीनी (علم دست بینی) पु. ('अ.) हस्त-सामुद्री विद्या.

'इल्म-ए-दीन (علم دین) पु. ('अ.) धर्मशास्त्र.

'इल्म-ए-नफ़्सियात (علم نفسیات) पु. ('अ.) मानस-शास्त्र.

'इल्म-ए-नबातात (علم نباتات) पु. ('अ.) वनस्पती शास्त्र.

'इल्म-ए-नुजूम (علم نجوم) पु. ('अ.) फलज्योतिष.

'इल्म-ए-फ़िक़्ह: (علم فقہ) पु. ('अ.) इस्लामी धर्मशास्त्र.

'इल्म-ए-बयान (علم بیان) पु. ('अ.) संभाषण कला; वक्तृत्वशास्त्र.

'इल्म-ए-बहस़ (علم بحث) पु. ('अ.) तर्कशास्त्र.

'इल्म-ए-मंतिक़ (علم منطق) पु. ('अं.) (१) न्यायशास्त्र. (२) तर्कशास्त्र.

'इल्म-ए-म'अक़ूल (علم معقول) पु. ('अ.) दर्शनशास्त्र; तर्कशास्त्र.

'इल्म-ए-म'अदनियात (علم معدنیات) पु. ('अ.) खनिज-विज्ञान.

'इल्म-ए-म'अरिफ़त (علم معرفت) पु. ('अ.) आध्यात्मिक शास्त्र.

'इल्म-ए-मजलिस (علم مجلس) पु. ('अ.) (१) शिष्टा-चार विद्या. (२) सभाचातुर्य.

'इल्म-ए-मु'आशरत (علم معاشرت) पु. (अ.) समाज-शास्त्र.

'इल्म-ए-मुस़ल्लस़ (علم مثلث) पु. ('अ.) त्रिकोणमिती.

'इल्म-ए-मूसीक़ी (علم موسیقی) पु. ('अ.) संगीत-शास्त्र; गान विद्या.

'इल्म-ए-मौजूबात (علم موجودات) पु. ('अ) सृष्टि-विज्ञान.

'इल्म-ए-रियाद़त (علم ریاضت) पु. ('अ.) योगशास्त्र.

'इल्म-ए-रियाद़ी (علم ریاضی) पु. ('अ.) गणितशास्त्र.

'इल्म-ए-लिसानियात (علم لسانیات) पु. ('अ.) भाषा-विज्ञान.

'इल्म-ए-स़ना'अत (علم صناعت) पु. ('अ.) शिल्पशास्त्र.

'इल्म-ए-हिंदसः (علم هندسہ) पु. ('अ.) गणितशास्त्र; अंकशास्त्र.

'इल्म-ए-हिकमत (علم حکمت) पु. ('अ.) (१) तत्त्व-ज्ञान; दर्शन. (२) वैद्यक.

'इल्म-ए-हिसाब (علم حساب) पु. ('अ.) अंकगणित.

'इल्म-ए-हैय'त (علم هیئت) पु. ('अ.) खगोलविद्या.

'इल्मियत (علمیت) स्त्री. ('अ.) विद्वत्ता; पांडित्य; योग्यता.

'इल्मी (علمی) वि. ('अ.) ज्ञानविषयक; शास्त्रीय; साहित्यिक. **–मुबाहिसः** (–مباحثہ) पु. वैज्ञानिक चर्चा.

इल्ल (ال) पु. ('अ.) (१) वचन; प्रतिज्ञा; शपथ. (२) शरण; आश्रय.

'इल्लत (علت) स्त्री. ('अ.) (१) दोष; अपराध; गुन्हा. (२) तंटा; बखेडा; भानगड; कटकट. (३) रोग; आजार. (४) आरोप. (५) कारण. (६) उणीव; कमतरता. (७) वाईट सवय; व्यसन. (८) कचरा; रद्दी.

'इल्लत-उल्-'अला (علت العلا) स्त्री. ('अ.) (१) मूळ कारण; आदी कारण. (२) परमेश्वर.

'इल्लत-ए-ग़ा'ई (علت غائی) स्त्री. ('अ.) मूळ उपयोग; फायदा; मूळ कारण.

'इल्लत-ए-फ़ा'अिली (علت فاعلی) स्त्री. ('अ.) कार्याचे कारण.

'इल्लत-ए-मशा'इख़ (علت مشائخ) स्त्री. ('अ.) म्हाताऱ्या माणसांना होणारा एक रोग. या रोगात गुदद्वारात खाज सुटते. ती शमविण्यासाठी ते गुदमैथुन करवितात.

'इल्लत-ओ-म'अलूल (علت و معلول) स्त्री. ('अ.) कारण व कार्य; कारण व परिणाम.

'इल्लती (علتی) वि. ('अ.) दुर्व्यसनी; दुराचारी.

इल्ल'ल्लह (الا اللہ) अव्य. ('अ.) हे ईश्वरा, साह्य कर.

इल्ला (الا) अव्य. ('अ.) (१) परंतु. (२) नाहीतर. (३) शिवाय.

इशक (اشک) पु. गाढव.

'इशरत (عشرت) स्त्री. ('अ.) आनंद; चैन; मजा. **–कदः** (–کدہ); **–खानः** (–خانہ); **–गाह** (–گاہ); **–सरा** (–سرا) पु. ('अ. + फ़ा.) आनंदभवन; चैन करण्याचे ठिकाण.

'इशरत-ए-इमरोज़ (عشرت امروز) स्त्री. ('अ.+फ़ा.) आजचे सुख; संसारिक सुख.

'इशरत-ए-फ़र्दा (عشرت فردا) स्त्री. ('अ. + फ़ा.) उद्याचे सुख; पारलौकिक सुख.

'इशरत-ए-फ़ानी (عشرت فانی) स्त्री. ('अ. + फ़ा.) क्षणभंगुर; भौतिक सुख.

'इशवः (عشوہ) पु. ('अ.) (१) नखरा; हावभाव; प्रणयचाळा. (२) गोंधळ. (३) चमत्कार. **–कार** (–کار); **–गर** (–گر) वि. ('अ.+फ़ा.) नखरे-बाज; आपल्या हावभावांनी मोहित करणारा (री).

'इशा (عشا) स्त्री. ('अ.) (१) निशा; रात्रीचा पहिला प्रहर. (२) रात्रीचा नमाज. (३) रात्रीचा काळोख.

इशा'अत (اشاعت) स्त्री. ('अ.) (१) प्रकाशन. (२) प्रसिद्धी; प्रकटन. (३) आवृत्ती.

इशारत (اشارت) स्त्री. ('अ.) इशारा, खूण, संकेत करणे.

इशारतन् (اشارتاً) अव्य. ('अ.) इशाऱ्याने; सांकेतिकपणे.

इशारः (اشارہ) पु. ('अ.) (१) इशारा; खूण; संकेत. (२)तात्पर्य. (३)प्रतीक. [अनेक 'इशारात' (اشارات)].

'इश्क़ (عشق) पु. ('अ.) (१) प्रेम. (२) आसक्ती. (३) मोह. (४) प्रणय. (५) व्यसन; वाईट सवय. **–बाज़** (باز–) वि. ('अ. + फ़ा.) (१) प्रेम करणारा. (२) विलासी.

'इश्क़-ए-पेचाँ (عشق پیچاں) पु. ('अ.+फ़ा.) जाईची वेल व फूल.

'इश्क़-ए-मजाज़ी (عشق مجازی) पु. ('अ.) भौतिक, शारीरिक प्रेम.

'इश्क़-ए-हक़ीक़ी (عشق حقیقی) पु. ('अ.) आध्यात्मिक, ईश्वरी प्रेम.

इश्काल (اشکال) पु. ('अ.) दुष्करता; मुष्कीलपणा.

इश्ति'आल (اشتعال) पु. ('अ.) (१) पेट घेणे; भडकणे.(२) उग्र रूप धारण करणे. (३) भडकाविणे. (४) चिथावणी देणे.

इश्तिक़ाक़ (اشتقاق) पु. ('अ.) व्युत्पत्ती.

इश्तिग़ाल (اشتغال) पु. ('अ.) तन्मयता; तल्लीनता.

इश्तिदाद (اشتداد) पु. ('अ.) (१) आधिक्य. (२) तीव्रता. (३)प्रचंडता. (४) अत्याचार; जुलूम.

इश्तिबाह (اشتباہ) पु. ('अ.) शंका; संदेह; अनिश्चितता; अविश्वास; संदिग्धता.

इश्तिमाल (اشتمال) पु. ('अ.) सामील करणे; मिसळणे; एकत्र करणे.

इश्तिमाल-ए-अराज़ी (اشتمال اراضی) पु. ('अ.) जमिनीच्या तुकड्यांचे एकीकरण.

इश्तिमालियत (اشتمالیت) स्त्री. ('अ.) साम्यवाद; कम्युनिझम.

इश्तियाक़ (اشتیاق) पु. ('अ.) (१) षोक; अभिलाषा; अनुराग. (२) उत्कंठा.

इश्तिरा (اشترا) पु. ('अ.) विकत घेणे; खरीदणे.

इश्तिराक (اشتراک) पु. ('अ.) (१) भागीदारी; वाटा. (२) समानता. (३) साम्यवाद; कम्युनिझम

इश्तिराकियत (اشتراکیت) स्त्री. ('अ.) साम्यवाद; समाजवाद.

इश्तिराकी (اشتراکی) वि. ('अ.) (१) समाजवादी: सोशालिस्ट. (२) साम्यवादी; कम्युनिस्ट.

इश्तिरात् (اشتراط) पु. ('अ.) पैज लावणे.

इश्तिहा (اشتہا) स्त्री. ('अ.) (१) भूक. (२) इच्छा. (३) रुची.

इश्तिहार (اشتہار) पु. ('अ.) (१) जाहिरात; प्रकटन. (२) प्रचार. (३) घोषणा.

इश्तिहारी (اشتہاری) वि. ('अ.) जाहीर केलेला (गुन्हेगार); घोषित केलेला.

इश्फ़ाक़ (اشفاق) पु. ('अ.) (१) कृपा; दया. (२)भय.

इसपंद (اسپند) पु. (फ़ा.) दृष्ट काढण्यासाठी वापरले जाणारे मोहरीसारखे एक काळे धान्य; मोहरी.

इसबात (اثبات) पु. ('अ.) शाबीत करणे; प्रमाणित करणे.

इसम (اثم) पु. ('अ.) पाप; पातक.

इसरा'ईल (اسرائیل) पु. ('अ.) हजरत यूसुफ यांचे वडील हजरत याकूब यांचे नाव.

इसरा'ईली (اسرائیلی) वि. ('अ.) हजरत याकूब यांच्या पंथाचा अनुयायी; यहुदी.

इसराफ़ (اسراف) पु. ('अ.) अपव्यय; उधळपट्टी.

इसराफ़ील (اسرافیل) पु. ('अ.) अंतिम निवाडघाच्या (कयामतच्या) दिवशी जो मृतात्म्यांना जागे करण्यासाठी सूर नावाची तुतारी फुंकणार आहे तो देवदूत.

इसरार (اسرار) पु. ('अ.) लपविणे; रहस्य; गुप्त ठेवणे.

इसरार (اصرار) पु. ('अ.) (१) हट्ट; आग्रह; जिद्द. (२) पुनः पुनः सांगणे.

इसहाक़ (اسحاق) पु. ('अ.) हजरत इब्राहिम यांचे सुपुत्र. हे एक पैगंबर होते.

इसहाल (اسحال) पु. ('अ.) शौच; शौचास पातळ होणे; अतिसार.

इसा'अत (اساعت) स्त्री. ('अ.) (१) निंदा. (२) पाप.

इसाबत (اصابت) स्त्री. ('अ.) (१) प्रवेश; शिरकाव. (२) यथार्थता; सत्यता.

'इसाबः (عصابہ) पु. ('अ.) शस्त्रयांच्या डोकीला बांधावयाचा कपडा, पट्टी.

'इसियाँ (عصیاں) पु. ('अ.) अपराध; पाप; गुन्हा.

इस्कंदर (اسکندر) पु. ('अ.) शिकंदर; अलेक्झांडर.

इस्कंदरियः (اسکندریہ) स्त्री. ('अ.) शिकंदराने बांधलेले इजिप्तमधील प्रसिद्ध बंदर; अलेक्झांड्रा.

इस्कात (اسکات) पु ('अ.) गप्प बसविणे; शांत करणे.

इस्क़ात् (اسقاط) पु. ('अ.) पडणे; पाडणे; गर्भपात.

इस्क़ात्-ए-हूमल (اسقاط حمل) पु. ('अ.) गर्भपात; गर्भस्राव.

इस्कान (اسکان) पु. ('अ.) शांती; निवांतपणा.

इस्तंबोल (استنبول) पु. (तु.) युरोपियन तुर्कस्तानची राजधानी; कॉन्स्टंटिनोपल.

इस्त (است) पु. ('अ.) मलद्वार; गुदद्वार.

इस्तबर्क़ (استبرق) पु. ('अ.) (१) मौल्यवान रेशमी कापड. (२) हिरवे सॅटिन.

इस्तादगी (استادگی) स्त्री. (फ़ा.) (१) उभे, ताठ राहाणे. (२) पुरुषाच्या जननेंद्रियाची जागृती, उत्थान.

इस्तादः (استاده) वि. (फ़ा.) उभा; ताठ; ताठलेला.

इस्तिजा (استنجا) पु. ('अ.) (१) शौच किंवा लघुशंका केल्यानंतर ती इंद्रिये धुणे, स्वच्छ करणे (पाण्याने किंवा मातीच्या ढेकळाने). (२) अशुद्धता दूर करणे; हातपाय धुणे.

इस्तिंबात् (استنباط) पु. ('अ.) (१) काढून घेणे; उणे करणे. (२) एका गोष्टीतून दुसरी गोष्ट काढणे.

इस्तिंबाह (استنباه) पु. ('अ.) चेतावणी, ताकीद इच्छिणे; खबरदारी घेणे.

इस्ति'अमाल (استعمال) पु. ('अ.) पूर्ण करणे; पूर्णत्वाची इच्छा धरणे.

इस्ति'आनत (استعانت) स्त्री. ('अ.) साह्य इच्छिणे; मदत मागणे.

इस्ति'आरः (استعاره) पु. ('अ.) (१) रूपक (अलंकार). (२) उसनवार घेणे.

इस्तिकबार (استکبار) पु. ('अ.) गर्व; घमेंड; जिद्दीपणा.

इस्तिक़बाल (استقبال) पु. ('अ.) (१) स्वागत; आदरसत्कार. (२) भविष्यकाळ (व्या.).

इस्तिक़बालियः (استقبالیہ) वि. ('अ.) स्वागताचे (भाषण वगैरे).

इस्तिक़रा (استقرا) पु. ('अ.) (१) शोध लावणे; निष्कर्ष काढणे. (२) अनुसरण करणे.

इस्तिक़राज़ (استقراض) पु. ('अ.) कर्ज काढणे, मागणे; उसने घेणे.

इस्तिक़रार (استقرار) पु. ('अ.) (१) स्थिर होणे; स्थिरावणे; थांबणे. (२) शांत होणे; सुखाने राहाणे. (३) नक्की होणे, करणे. (४) जाहीर करणे. (५) प्रमाणित करणे.

इस्तिक़रार-ए-हुक़्क़ (استقرار حق); **इस्तिक़रार-ए-हक़ीक़त** (استقرار حقیقت) पु. ('अ.) आपला हक्क शाबीत करणे.

इस्तिक़राह (استقراه) पु. ('अ.) द्वेष, घृणा करणे; नावड.

इस्तिक़लाल (استقلال) पु. ('अ.) (१) पक्केपणा; दृढता. (२) दृढनिश्चय. (३) धैर्य; धीर.

इस्तिकशाफ़ (استکشاف) पु. ('अ.) (१) प्रकटीकरण; उघड करणे. (२) साक्षात्कार.

इस्तिक़सार (استقصار) पु. ('अ.) कमी करणे; कमी करण्याची इच्छा बाळगणे.

इस्तिकसार (استکثار) पु. ('अ.) जास्तीची इच्छा करणे.

इस्तिक़ामत (استقامت) स्त्री. ('अ.) (१) दृढता; मजबुती; पक्केपणा. (२) स्थिरता. (३) सरळपणा; सरळ उभे राहाणे.

इस्तिख़दाम (استخدام) पु. ('अ.) (१) सेवा करण्याची इच्छा बाळगणे; नोकरीसाठी अर्ज करणे. (२) सेवा घेणे; वापरणे; नोकरी देणे.

इस्तिख़फ़ाफ़ (استخفاف) पु. ('अ.) (१) तुच्छतेने वागविणे; तुच्छता; तिरस्कार. (२) लज्जा; संकोच.

इस्तिख़राज (استخراج) पु. ('अ.) (१) बाहेर काढणे; हाकलून लावणे. (२) नाकारणे.

इस्तिख़लास (استخلاص) पु. ('अ.) सोडून देणे; बंधमुक्त करणे.

इस्तिख़ारः (استخاره) पु. ('अ.) (१) एखाद्या कार्यात यश मिळावे म्हणून ईश्वराची प्रार्थना करणे. (२) अमुक काम शुभ आहे की नाही हे धार्मिक पद्धतीने पाहाणे; ओळखणे; शकुन पाहाणे.

इस्तिग़ना (استغنا) पु. ('अ.) (१) निस्पृहता; निश्चितता. (२) बेपर्वाई.

इस्तिग़फ़ार (استغفار) पु. ('अ.) (१) परमेश्वराकडे क्षमायाचना करणे; शरण जाणे. (२) मोक्षाची इच्छा करणे. (३) पाप न करण्याची शपथ घेणे.

इस्तिग़राक़ (استغراق) पु. ('अ.) (१) गर्क होणे; तल्लीनता; तन्मयता. (२) संलग्नता.

इस्तिग़राब (استغراب) पु. ('अ.) (१) थक्क करणे; आश्चर्य. (२) अत्यंत प्रशंसा करणे.

इस्तिग़ासः (استغاثہ) पु. ('अ.) दावा; फिर्याद. **–दायर करना** (– دایر کرنا) फिर्याद दाखल करणे.

इस्तिजबार (استجبار) पु. ('अ.) (१) गर्व, घमेंड करणे. (२) अवज्ञा करणे.

इस्तिजलाब (استجلاب) पु. ('अ.) आकर्षित करणे.

इस्तिज़हार (استظہار) पु. ('अ.) (१) मदतीची याचना करणे. (२) आठवणे; तोंडपाठ म्हणणे. (३) सामर्थ्यवान बनणे.

इस्तिजाज़ः (استجازہ) पु. ('अ.) परवानगी मागणे.

इस्तिजाबत (استجابت) स्त्री. ('अ.) (१) मान्य करणे; ऐकणे (प्रार्थना, विनंती). (२) प्रश्नाचे उत्तर देणे.

इस्तिज्ला (استجلا) पु. ('अ.) प्रकाशमान करणे.

इस्तिता'अत (استطاعت) स्त्री. ('अ.) सामर्थ्य; जोर; शक्ती.

इस्तितार (استتار) पु. ('अ.) (१) लपणे; लुप्त होणे. (२) लपविणे.

इस्तिदराक (استدراک) पु. ('अ.) (१) समजण्याची इच्छा बाळगणे. (२) प्राप्ती.

इस्तिदलाल (استدلال) पु. ('अ.) (१) युक्तिवाद करणे; पुरावा मागणे. (२) पुरावा; आधार.

इस्तिदाद (استداد) पु. ('अ.) (१) हट्ट; जिद्द. (२) जुलूम. (३) इतरांच्या विरोधाची पर्वा न करता आपल्या मनाप्रमाणे वागणे.

इस्तिदामत (استدامت) स्त्री. ('अ.) सातत्य राखण्याचा प्रयत्न करणे; नित्यता इच्छिणे.

इस्तिद्'आ (استدعا) स्त्री. ('अ.) प्रार्थना; विनंती; अर्ज; इच्छा; मागणे.

इस्तिनाद (استناد) पु. ('अ.) (१) आधार देणे; टेकू लावणे. (२) पुरावा मागणे. (३) शाबीत होणे.

इस्तिन्कार (استنکار) पु. ('अ.) नकार; न ओळखणे.

इस्तिफ़राग़ (استفراغ) पु. ('अ.) ओकारी; उलटी.

इस्तिफ़सार (استفسار) पु. ('अ.) (१) विचारणे; चौकशी करणे. (२) प्रश्न; तपासणी.

इस्तिफ़हाम (استفہام) पु. ('अ.) (१) स्पष्टीकरण मागणे; विचारपूस करणे. (२) प्रश्न.

इस्तिफ़ा (اصطفا) पु. ('अ.) (१) श्रेष्ठत्व; प्रतिष्ठा. (२) निवड; निवडले जाणे. (३) निवडणे.

इस्तिफ़ादः (استفادہ) पु. ('अ.) फायदा, लाभ घेणे.

इस्तिफ़ाफ़ (اصتفاف) पु. ('अ.) ओळीत राहाणे; पंक्तिवद्ध होणे.

इस्तिबरा (استبرا) पु. ('अ.) मुक्त होण्याची इच्छा धरणे; पावित्र्य; शुद्धी.

इस्तिबाग़ (اصطباغ) पु. ('अ.) (१) बाप्तिस्मा देणे; बाटविणे. (२) रंगविणे. (३) बुडी मारणे.

इस्तिबार (اصطبار) पु. ('अ.) सबूर करणे; धीर धरणे.

इस्तिमज़ाज (استمزاج) पु. ('अ.) परवानगी मागणे; अनुमती.

इस्तिमदाद (استمداد) पु. ('अ.) मदत मागणे.

इस्तिमरार (استمرار) पु. ('अ.) (१) स्थायित्व; कायमपणा. (२) निरंतर अधिकार. (३) कमीजास्त न होणारा सारा. **–दार** (– دار) पु. ('अ.+फ़ा.) कायम कूळ; कायम मालक.

स्तिमरारी (استمراری) वि. ('अ.) (१) नित्य; कायमचा; स्थायी. (२) भूतकाळाचा एक प्रकार (नित्यभूत). **–बन्द-ओ-बस्त** (– بندوبست) पु. ('अ.) कायम धारा पद्धती.

इस्तिमा'अ (استماع) पु. ('अ.) (१) ऐकणे; श्रवण. (२) अफवा. (३) पुरावा.

इस्तिमालत (استمالت) स्त्री. ('अ.) (१) आकृष्ट करणे. (२) सुटका. (३) प्रोत्साहन; खुशामत.

इस्तिम्ना (استمنا) पु. ('अ.) वीर्यपात करण्याची इच्छा.

इस्तिरज़ा (استرضا) पु. स्त्री. ('अ.) परवानगी घेणे; अनुमती; मर्जी.

इस्तिरदाद (استرداد) पु. ('अ.) परत घेणे; रद्द करणे.

इस्तिराक़ (استراق) पु. ('अ.) दुसऱ्याचे बोलणे चोरून ऐकणे. (हा मोठा दुर्गुण समजला जातो).

इस्तिराहत (استراحت) स्त्री. ('अ.) सुख; आराम; निश्चितता.

इस्तिलाह् (اصطلاح) स्त्री. ('अ.) (१) परिभाषा. (२) अभिव्यक्ती. [अनेक 'इस्तिलाहात' (اصطلاحات)].

इस्तिलाही (اصطلاحی) वि. ('अ.) पारिभाषिक.

इस्तिवा (استوا) पु. ('अ.) (१) समानता; बरोबरी. (२) मध्यान्ह. (३) विषुववृत्त.

इस्तिशहाद (استشہاد) पु. ('अ.) (१) पुरावा; साक्ष मागणे. (२) शहीद होणे (हुतात्मा) (धर्मासाठी). **–नामः** (– نامہ) पु. ('अ.+फ़ा.) प्रमाणपत्र; सनद.

इस्तिशारः (استشارہ) पु ('अ.) सल्लामसलत करणे.

इस्तिस्ना (استثنا) पु.स्त्री. ('अ.) (१) सूट; अपवाद. (२) नकार. (३) वेगळे काढणे.

इस्तिस्लाम (استسلام) पु. ('अ.) (१) शांती, क्षमा इच्छिणे. (२) माथा नमविणे. (३) वसूल होणे.

इस्तिस्वाब (استصواب) पु. ('अ.) (१) स्वीकृती मिळविणे. (२) दुरुस्ती इच्छिणे. (३) वास्तविक स्थिती जाणून घेण्याची इच्छा बाळगणे.

इस्तिहूक़ाक़ (استحقاق) पु. ('अ.) हक्क; स्वत्व; अधिकार.

इस्तिहूक़ाक़-ए-इम्तिना'अ (استحقاق امتناع) पु. ('अ.) विशेषाधिकार; व्हेटोचा अधिकार.

इस्तिहूकाम (استحکام) पु. ('अ.) दृढता; स्थिरता.

इस्तिहूक़ार (استحقار) पु. ('अ.) अपमान; निंदा; तुच्छ समजणे.

इस्तिहूलाफ़ (استحلاف) पु. ('अ.) शपथ घेणे, घेवविणे.

इस्तिहूसाल (استحصال) पु. ('अ.) घेणे; प्राप्त करणे. **–बि'ल्-जब्र** (– بالجبر) पु. बळजबरीने घेणे; अपहरण

इस्ती'आब (استیعاب) पु. ('अ.) (१) संपूर्ण, सर्व घेणे. (२) उन्मूलन.

इस्तीफ़ा (استیفا) पु. ('अ.) पूर्ण करणे; सर्व घेणे.

इस्तीसाल (استیصال) पु. ('अ.) उखडून टाकणे; नष्ट करणे.

इस्ते'अजाल (استعجال) पु.('अ.)(१) घाई; शीघ्रता. (२) घावणे.

इस्ते'अदाद (استعداد) पु. स्त्री. ('अ.) (१) योग्यता. (२) विद्वत्ता. (३) सामर्थ्य. (४) दक्षता.

इस्ते'अफ़ा (استعفا) पु. ('अ.) (१) राजीनामा; त्यागपत्र. (२) क्षमा मागणे.

इस्ते'अबाद (استعباد) पु. ('अ.) ताबेदार; गुलाम बनविणे.

इस्ते'अमाल (استعمال) पु. ('अ.) उपयोग; वापर; सेवन.

इस्ते'अमाली (استعمالی)वि. ('अ.)(१) वापरलेला; जुना. (२) प्रचलित.

इस्ते'अमाश (استعماش) पु. ('अ.) डोळे अधू होणे; कमी दिसणे.

इस्ते'अला (استعلا) पु. ('अ.) उंच, मोठे, प्रतिष्ठित होणे.

इस्दाक़ (اصداق) पु. ('अ.) एखाद्या गोष्टीचे समर्थन करणे; पुष्टी, टेकू देणे.

इस्ना'अशर (اثنا عشر) वि. ('अ.) बारा इमाम.

इस्ना'अशरी (اثنا عشری) वि. ('अ.) बारा इसमांना मानणारा; शिया.

इस्नाद (اسناد) पु. ('अ.) एका वस्तूला दुसऱ्या वस्तूचा आधार देणे; संबंध जोडणे.

इस्पंज (اسپنج) पु. (फ़ा.) स्पंज.

इस्पंद (اسپند) पु. (फ़ा.) दृष्ट काढण्याचे काळे धान्य; मोहरी.

इस्पग़ोल (اسپغول) पु. (फ़ा.) इसबगोल.

इस्पात (اسپات) पु. (पोर्तु.) (१) पोलाद. (२) बीड.

इस्फ़ंदयार (اسفندیار) पु. (फ़ा.) इराणचा एक शूर बादशहा; याला रुस्तुमने आंधळा करून ठार मारले होते.

इस्फ़ंदार (اسفندار)पु. (फ़ा.) इराणचा बारावा महिना.

इस्फ़हान (اصفہان) पु. (फ़ा.) इराणची राजधानी.

इस्बाग़ (اسباغ) पु. (फ़ा.) पूर्ण, समाप्त करणे.

इस्म (اسم) पु. ('अ.) (१) नावं. (२) नाम (व्या.).

इस्म-ए-अ'अज़म (اسم اعظم) पु. ('अ.) महामंत्र; ईश्वराचे नाव.

इस्म-ए-'अदद (اسم عدد) पु. ('अ.) संख्यावाचक विशेषण.

इस्म-ए-इशारः (اسم اشارہ) पु. ('अ.) दर्शक सर्वनाम.

इस्म-ए-इस्तिफ़हाम (اسم استفہام) पु. ('अ.) प्रश्नार्थक सर्वनाम.

इस्म-ए-कुल्ली (اسم کلی) पु. ('अ.) सामान्यनाम.

इस्म-ए-जलाली (اسم جلالی) पु. ('अ.) तेजस्वी नाव; ईश्वराचे नाव.

इस्म-ए-जामिद (اسم جامد) पु. ('अ.) मूळनाम.

इस्म-ए-जिन्स (اسم جنس) पु. ('अ.) सामान्यनाम.

इस्म-ए-तन्कीर (اسم تنکیر) पु. ('अ.) अनियमित सर्वनाम.

इस्म-ए-दमीर (اسم ضمیر) पु. ('अ.) सर्वनाम.

इस्म-ए-नकिरः (اسم نکرہ) पु. ('अ.) जातिवाचक नाम.

इस्म-ए-फ़र्ज़ी (اسم فرضی) पु. ('अ.) काल्पनिक, टोपण नाव.

इस्म-ए-फ़ा'इल (اسم فاعل) पु. ('अ.) कर्ता (व्या.)

इस्म-ए-म'अरिफः (اسم معرفہ) पु. ('अ.) विशेषनाम.

इस्म-ए-मौसूल (اسم موصول) पु. ('अ.) संबंधी सर्वनाम.

इस्म-ए-शरीफ़ (اسم شریف) पु. ('अ.) शुभनाम, नाव आदरार्थी किंवा (शिष्टाचार म्हणून).

इस्म-ए-सिफ़त (اسم صفت) पु. ('अ.) विशेषण.

'इस्मत (عصمت) स्त्री. ('अ.) शील; पातिव्रत्य; पावित्र्य. **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) बलात्कार करणारा. **–फ़रोश** (فروش –) वि. स्त्री. शीलाची विक्री करणारी; वेश्या. **–मआब** (مآب –) वि. स्त्री. सती; साध्वी.

इस्मनवीसी (اسم نویسی) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) नावे लिहिणे. (२) न्यायालयास सादर केली जाणारी साक्षीदारांच्या नावांची सूची. (३) फाईल; कॅटलॉग.

इस्मा (اسما) पु. ['अ. 'इस्म' (اسم) चे अनेक.] (१) नावे. (२) नामे. पाहा 'अस्मा'.

इस्मा'अ (اسماع) पु. ['अ. 'सम'अ' (سمع) चे अनेक.] (१) कान. (२) ऐकणे. (३) गाणे (४) शिव्या देणे.

इस्लाफ़ (اسلاف) पु. ('अ.) पुढे पाठविणे.

इस्लाम (اسلام) पु. ('अ.) (१) मान लवविणे; ईश्वरी आदेशापुढे मान तुकविणे. (२)शांती इच्छिणे. (३) मुसलमान होणे. (४) मुस्लिम धर्म. (५) काम सोपविणे. (६) धर्मासाठी प्राण देण्यास तयार रहाणे.

इस्लामियात (اسلامیات) स्त्री. ('अ.) इस्लामी साहित्य.

इस्लामी (اسلامی) वि. ('अ.) इस्लामसंबंधी. (पु.) मुसलमान.

इस्लाल (اسلال) पु. ('अ.) (१) लाच देणे; (२) चोरी करणे.

इस्लाह (اصلاح) स्त्री. ('अ.) (१) सुधारणा; दुरुस्ती. (२) मैत्री. (३) हजामत, दाढी. **–बनाना** (بنانا –) दाढी करणे.

ई (ای) सर्व. (फ़ा.) हा, ही, हे. **–जानिब** (جانب –) (सर्व.) आम्ही. (मोठी माणसे लहानाशी बोलताना स्वत:संबंधी वापरतात).

ईज़ा (ایذا) स्त्री. ('अ) इजा; कष्ट; दुखापत. **–रसाँ** (رساں –) वि. त्रासदायक.

ईजाज़ (ایجاز) पु. ('अ.) संक्षिप्त करणे; संक्षेप.

ईजाद (ایجاد) पु. ('अ.) शोध; निर्मिती.

ईजाब (ایجاب) पु. ('अ.) (१) कबूल करणे; स्वीकृती. (२) अनिवार्य करणे. (३) सूचना; विनंती; मागणी (लग्नाची). **–ओ-क़बूल** (وقبول –) पु. (१) लग्नाची मागणी व तिला मान्यता. (२) एखादी वस्तू विकण्याची सूचना व तिच्या खरेदीला मान्यता.

ईजार (ایجار) पु. ('अ.) भाडघाने देणे.

ईज़िद (ایزد) पु. (फ़ा.) ईश्वर.

ईज़िदी (ایزدی) वि. (फ़ा.) ईश्वरी; दैवी.

ईतिलाफ़ (ایتلاف) पु. ('अ.) (१) एकत्र येणे, होणे. (२) मैत्री.

'ईद (عید) स्त्री. ('अ.) (१) हर्ष; आनंद; खुषी. (२) आनंदाचा दिवस. (३) मुसलमानांचा एक सण. **–का चांद** (کا چاند –) दुर्मिळ; क्वचित भेटणारा. **–गाह** (گاہ –) स्त्री. ('अ.+फ़ा.) ईदच्या दिवशी सर्व मुसलमान एकत्र येऊन जेथे नमाज पडतात ते ठिकाण; मैदान.

'ईद-उल्-अद्हाँ (عیدالاضحیٰ) स्त्री. ('अ.) 'जिल्हिज्', महिन्यांच्या दहा तारखेस येणारा सण; बकरीद.

'ईद-उल्-फ़ित्र (عیدالفطر) स्त्री. ('अ.) शव्वाल महिन्याच्या पहिल्या तारखेस येणारा मुस्लिम सण; रमजान महिन्यातील उपवासाचे पारणे या दिवशी होते.

'ईद-उल्-मीलाद (عیدالمیلاد) स्त्री. ('अ.) (१) हजरत मुहम्मद पैगंबर यांची जयंती. (रबी-उल अव्वलच्या बारा तारखेस). (२) खिसमस डे; नाताळ.

'ईद-ए-अद्हाँ (عیداضحیٰ); **ईद-ए-क़ुर्बान** (عید قربان) स्त्री. ('अ.) हज (तीर्थयात्रेला) च्या आनंदाप्रित्यर्थ साजरी केली जाणारी ईद; बकरीद.

'ईदी (عیدی) स्त्री. ('अ.) ईदच्या दिवशी दिली जाणारी बक्षिसी; गुरुदक्षिणा. (वि.) ईदशी संबंधित.

ईफ़ा (ایفا) पु. ('अ.) पूर्तता; पूर्ण पालन करणे.

ईफ़ा-ए-'अहद (ایفاے عہد); **इफ़ा-ए-क़ौल** (ایفاے قول); **'इफ़ा-ए-व'अद:** (ایفاے وعدہ) पु. ('अ.) वचनपूर्ती करणे; वायदा पुरा करणे; प्रतिज्ञेचे पालन करणे.

ईफ़ा'अ (ایفاع) पु. ('अ.) मुलगा वयात येणे; उंच होणे.

ईमा (ایما) पु. ('अ.) इशारा; संकेत.

ईमान (ایمان) पु. ('अ.) (१) धर्मावरील दृढ श्रद्धा; धर्म; पंथ; आस्तिकता. (२) इनाम; नियत; सच्चेपणा. (३) न्याय. **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) (१) धर्मनिष्ठ; धर्मभीरू. (२) विश्वसनीय. (३) न्यायी. **–फ़रोश** (فروش –) वि. ('अ.+फ़ा.) बेइमान; आपले इमान विकणारा. **–लाना** (لانا –) विश्वास, श्रद्धा ठेवणे; चा धर्म स्वीकारणे.

ईमान-ए-कामिल (ایمان کامل) पु. ('अ.) पूर्ण धर्मविश्वास.

ईरान (ایران) पु. (फ़ा.) इराण; फारस; पर्शिया.

ईल (ایل) पु. (तु.) मित्र. सुरयानी (सीरियन) भाषेत याचा अर्थ परमेश्वर, खुदा असा आहे.

ईवान (ایوان) पु. (फ़ा.) (१) प्रासाद; भवन. (२) परिषद; कौन्सिल.

ईवान-ए-ज़ेरीं (ایوان زیریں) पु. (फ़ा.) खालचे सभागृह; लोअर हाऊस.

ईवान-ए-बाला (ایوان بالا) पु. (फ़ा.) वरचे सभागृह; अपर हाऊस.

'ईसवी (عیسوی) वि. ('अ.) (१) ईसा (येशू) ख्रिस्ताशी संबंधित. (२) इसवी सन.

'ईसाँ (عیسیٰ) पु. ('अ.) येशू ख्रिस्त, ख्रिश्चन धर्माचे संस्थापक.

'ईसा'ई (عیسائی) वि. ('अ.) ईसाचा अनुयायी; ख्रिस्ती.

'ईसाँनफ़स (عیسیٰ نفس) वि. ('अ.) ज्याच्या फुंकरीने मृत प्राणी जिवंत होतो असा मृतांना जिवंत करणारा.

'ईसाँमसीह (عیسیٰ مسیح) पु. ('अ.) येशू ख्रिस्त.

ईसार (ایسار) पु. ('अ.) श्रीमंत होणे; घनाढ्यता; संपन्नता.

ईसार (ایثار) पु. ('अ.) (१) त्याग; तपस्या; इतरांसाठी स्वार्थत्याग. (२) ग्रहण करणे. **–पेश:** (پیشہ –) त्यागी; स्वार्थत्यागी.

ईसाल (ایصال) पु. ('अ.) पाठविणे; धाडणे.

ईसाल-ए-सवाब (ایصال ثواب) पु. ('अ.) मृतात्म्यांना कुराण पठनाचे किंवा भोजन देण्याचे पुण्य पोचविणे.

ईस्तगाह (ایستگاہ) स्त्री. ('अ.) रेल्वे स्टेशन.

ईहाम (ایہام) पु. ('अ.) (१) भ्रम; भ्रांती. (२) एक अर्थालंकार. (एका शब्दाचे दोन अर्थ होतात.) प्रमाण.

'उक़्बाँ (عقبیٰ) पु. ('अ.) (१) परलोक. (२) सृष्टीचा अंत, अंतिम काळ.

'उक़ला (عقلا) पु. [अ. 'आक़िल' (عاقل) चे अनेक.] शहाणे, विद्वान लोक.

'उक़्लः (عقلہ) पु. ('अ.) बांध; धरण.

'उक़ाब (عقاب) पु. ('अ.) (१) गरुड. (२) गिधाड.

'उक़ूबत (عقوبت) स्त्री. ('अ.) शिक्षा; पीडा.

'उक़्द (عقد) पु. [अ. 'उक़्दः' (عقدہ) चे अनेक.] गाठी; ग्रंथी.

'उक़्दः (عقدہ) पु. ('अ.) (१) गाठ; ग्रंथी. (२) समस्या. **–कुशा** (–کشا) वि. ('अ.+फ़ा.) (१) गाठ, समस्या सोडविणारा; दुःख दूर करणारा. (२) परमेश्वर.

'उक़्दः-ए-लायनहूल (عقدۂ لاینحل) पु. ('अ.) निरगाठ; कठीण समस्या.

उक़्लीदिस (اقلیدس) स्त्री. ('अ.) ग्रीक गणितज्ञ यूक्लिडच्या नावावरून बनलेला शब्द; रेखागणित; भूमिती.

उख़्त (اخت) स्त्री. ('अ.) भगिनी; बहीण.

उख़ुव्वत (اخوت) स्त्री. ('अ.) बंधुत्व.

उज़्बक (ازبک) पु. (तु.) एका तार्तर जमातीचे नाव. (वि.) असभ्य; मूर्ख; जंगली.

उजरत (اجرت) स्त्री. ('अ.) (१) मजुरी; पारिश्रमिक. (२) भाडे. (३) मोबदला.

'उज़लत (عزلت) स्त्री. ('अ.) एकांतवास; वैराग्य; एकांत. **–गुज़ीं** (–گزیں) वि. ('अ. + फ़ा.) एकांतप्रिय; विरक्त.

'उजलत (عجلت) स्त्री. ('अ.) घाई; त्वरा.

'उजाब (عجاب) पु. ('अ.) आश्चर्य; विस्मय.

'उज़ूबः (عجوبہ) पु. ('अ.) अद्‌भुत गोष्ट; चमत्कार.

'उज़्न (اذن) पु. ('अ.) कान.

'उज्ब (عجب) पु. ('अ.) अहंकार; गर्व; घमेंड.

'उज़्र (عذر) पु. ('अ.) (१) बहाणा; सबब. (२) आक्षेप; विरोध; हरकत. (३) नकार; इन्कार (४) क्षमायाचना. **–ख़्वाः** (–خواہ) वि. ('अ.+फ़ा.) क्षमा चाहणारा; माफी मागणारा. **–दार** (–دار) वि. ('अ.+फ़ा.) हरकत घेणारा; विरोध, तक्रार करणारा. **–बेगी** (–بیگی) पु. ('अ.) पेशकार; शिरस्तेदार; बादशहासमोर लोकांचे अर्ज सादर करणारा. **–मअ'ज़रत** (–معذرت) स्त्री. क्षमायाचना.

'उज़्र-ए-ज़नाँ (عذر زناں) पु. ('अ. + फ़ा.) स्त्रियांचा मासिक धर्म; विटाळ.

उज्रां (اُجرىٰ) पु. ('अ.) (१) छात्रवृत्ती; शिष्यवृत्ती; वृत्ती. (२) रोजचे ठराविक भोजन; भत्ता.

उताक़ (اتاق) पु. (तु.) घर; खोली; कोठी.

'उतारिद (عطارد) पु. ('अ.) बुध (ग्रह).

'उताश (عطاش) स्त्री. ('अ.) सारखी तहान लागण्याचा रोग.

उत्तू (اتو) पु. (फ़ा.) (१) इस्त्री. (२) कापडावर खडी काढण्याचे लोखंडी यंत्र; ठसा; छाप. **–करना** (–کرنا); **–बनाना** (–بنانا) अंगावर वळ उठेपर्यंत मारणे.

उदबा (ادبا) पु. [अ. 'अदीब' (ادیب) चे अनेक.] साहित्यिक; लेखक.

'उदूल (عدول) पु. ('अ.) अवज्ञा; अवहेलना. **–ए-हुक्मी** (–حکمی) अवज्ञा; हुकूम न पाळणे; बंडखोरी.

'उद्व (عضو) पु. ('अ.) शरीराचा एखादा भाग; अंग; अवयव.

'उद्व-ए-तनासुल (عضو تناسل) पु. ('अ.) संतती उत्पन्न करण्याचा अवयव; जननेंद्रिय; लिंग.

'उद्वान (عدوان) पु. ('अ.) शत्रुत्व; जुलूम; अत्याचार.

उनास (اُناس) पु. अनेक. ('अ.) लोक; जनसमुदाय. (या शब्दाचे एकवचन नाही).

'उनुक़ (عنق) स्त्री. ('अ.) गळा; मान.

'उन्क़ा (عنقا) पु. ('अ.) एक काल्पनिक पक्षी, फिनीक्स. (वि.) (१) दुर्मिळ; अप्राप्य. (२) आपत्ती; संकट. (३) लांब मानेची स्त्री.

'उन्नाब (عناب) पु. ('अ.) लाल रंगाचे एक औषधी फळ; प्रियतमेचे लाल ओठ (जंगली बोरांसारखे).

'उन्नाबी (عنابی) वि. ('अ.) फिकट लाल; वैंगणी.

'उन्फ़ुवान (عنفوان) पु. ('अ.) सुरुवात; प्रारंभ; यौवनातील पदार्पण.

'उन्वान (عنوان) पु. ('अ.) (१) शीर्षक; मथळा; हेडिंग. (२) शैली; पद्धती. (३) पत्राचा मायना. (४) प्रारंभ. (५) प्रस्तावना. (६) उपाय; युक्ती.

उन्स (انس) पु. ('अ.) प्रेम; माया; प्रीती; ममता.

उन्सां (اُنثیٰ) स्त्री. ('अ.) मादी; स्त्री.

'उन्सुर (عنصر) पु. ('अ.) पंचमहाभूते; मूलतत्त्वे.

'उन्सुरी (عنصری) वि. ('अ.) प्राथमिक; मूलभूत.

'उन्सुल (عنصل) पु. ('अ.) जंगली कांदा.

उफ़ (اُف) अव्य. ('अ.) अरेरे! हाय हाय! **–तक न करना** (تک نہ کرنا –) हू का चू न करणे; सहन करणे.

उफ़क़ (اُفق) पु. ('अ.) क्षितिज.

'उफ़ूनत (عفونت) स्त्री. ('अ.) दुर्गंधी; घाण.

उफ़्तां (اُفتاں) वि. (फ़ा.) ढासळणारा; पडणारा. **–ओ-खेज़ां** (– و خیزاں) अव्य. धडपडत; कसेबसे. उठत-बसत; रखडत.

उफ़्ताद (اُفتاد) स्त्री. (फ़ा) संकट; दैवी आपत्ती; कहर; दुर्घटना; अपघात.

उफ़्तादगी (اُفتادگی) स्त्री. (फ़ा.) (१) दीनता. (२) दारिद्र्य. (३) आपत्ती.

उफ़्तादः (اُفتادہ) वि. (फ़ा.) (१) कोसळलेला; पडलेला. (२) पडीत (जमीन); रिकामा; वापरात नसलेला. (३) दीन; विनीत; दुःखी.

'उबाब (عباب) पु. ('अ.) (१) खारकेच्या झाडाचे पान. (२) मोठा पूर. (३) बाहुल्य.

उबुव्वत (اُبوت) स्त्री. ('अ.) पितृत्व; पिता होणे.

'उबूर (عبور) पु. ('अ.) (१) रस्त्याने जाणे. (२) नदी किंवा समुद्र पार करणे; ओलांडणे. (३) पारंगतता; प्राविण्य; प्रभुत्व. **–ए-दरया-ए-शोर** (– دریاے شور) काळपाणी (शिक्षा).

'उबूदियत (عبودیت) स्त्री. ('अ.) भक्ती (ईश्वराची); सेवा (देवाची).

'उब्बाद (عباد) पु. ['अ. 'आबिद' (عابد) चे अनेक.] उपासना करणारे; भक्त मंडळी.

उमम (اُمم) स्त्री. ['अ. 'उम्मत' (اُمت) चे अनेक.] अनेक धर्म-पंथ; संप्रदाय.

उमरा (اُمرا) पु. ['अ. 'अमीर' (امیر) चे अनेक.] (१) श्रीमंत लोक. (२) सरदार; उमराव.

'उमुक़ (عمق) पु. ('अ.) सखोलता; खोली; गंभीरता.

'उमूम (عموم) पु. ('अ.) सार्वत्रिक होणे; सर्वसामान्य असणे.

'उमूमन् (عموماً) अव्य. ('अ.) सामान्यतः; साधारणतः; बहुधा.

उमूर (اُمور) पु. ['अ. 'अम्र' (امر) चे अनेक.] (१) कामे; गोष्टी. (२) प्रश्न; समस्या. [अनेक 'उमूरात' (امورات)].

उमूर-ए-'आम्मः (اُمور عامہ) पु. ('अ.) सार्वजनिक हिताची कामे.

'उम्दगी (عمدگی) स्त्री. ('अ.) (१) उत्कृष्टता; सुंदरता; उत्तमता. (२) श्रेष्ठत्व. (३) उमदेपणा.

'उम्दः (عمدہ) वि. ('अ.) (१) उत्तम; उत्कृष्ट; उमदा. (२) सुंदर; मनोहर. (३) विश्वसनीय.

उम्म (اُم) स्त्री. ('अ.) माता; आई.

उम्म-उल्-'उलूम (اُم العلوم) स्त्री. ('अ.) सर्व विद्यांची माता; व्याकरण.

उम्म-उल्-किताब (اُم الکتاب) स्त्री. ('अ.) पवित्र ग्रंथाची माता; कुराणाचा पहिला अध्याय; सूराए फातिहा; कुराण.

उम्म-उल्-ख़बा'इस (اُم الخبائث) स्त्री. ('अ.) सर्व दुर्गुणांचो माता; दारू; मद्य.

उम्म-उल्-जरा'इम (اُم الجرائم) स्त्री. ('अ.) सर्व गुन्ह्यांची माता; दारिद्र्य.

उम्म-उस्-सबियान (اُم الصبیان) स्त्री. ('अ.) (१) अपस्मार (रोग); फेफरे; मिरगी. (२) सैतानाची बायको. (ही मुलांना झोपेत भिववते). (३) मुलांची आई.

उम्म-ए-मिल्दम (اُم ملدم) स्त्री. ('अ.) मृत्यूची माता; क्षयरोग.

उम्म-ए-वलद (اُم ولد); **उम्म-उल्-वलद** (اُم الولد) स्त्री. ('अ.) जिला आपल्या मालकापासून अपत्य झाले आहे अशी दासी. (अशा दासीला तिचा मालक विकू शकत नाही व त्याच्या मृत्यूनंतर तिच्याबर कोणाचा वारसाहक्क न राहता ती दास्यमुक्त होते).

उम्मत (اُمت) स्त्री. ('अ.) (१) एखाद्या प्रेषिताचे किंवा धर्माचे सारे अनुयायी (विशेषतः मुसलमान व यहुदी). (२) जमात. (३) पंथ.

उम्मती (اُمتی) पु. ('अ.) पैगंबरी धर्माचा अनुयायी. **ला उम्मती** (لا اُمتی) वि. नास्तिक.

उम्महात (اُمہات) स्त्री. ['अ. 'उम्महत' (اُمہت) चे अनेक.] माता, आया. (केवळ मानवांसाठी हा वापरला जातो).

उम्महात-ए-सिफ़्ली (اُمہات سفلی) स्त्री. ('अ.) चार महाभूते (हवा, पाणी, माती व अग्नी).

'उम्माल (عمال) पु. ['अ. 'आमिल' (عامل) चे अनेक.] (१) कर्मचारी वर्ग; स्टाफ. (२) अधिकारी; राज्यकर्ते.

उम्मी (امی) वि. ('अ.) (१) लहानपणी आईबाप निवर्तल्यामुळे ज्याचे शिक्षण झालेले नाही असा. (२) अशिक्षित; अडाणी. (३) मुहम्मद साहेब. (यांनी कोणाजवळ शिक्षण घेतले नव्हते).

उम्मीद (اُمید) स्त्री. (फ़ा.) (१) उमेद; भरवसा; आशा. (२) अभिलाषा. **–वार** (–وار) वि. (१) उमेदवार; इच्छुक. (२) शिकाबू. (३) गर्भवती (मुलाची अपेक्षा असणारी).

'उम्र (عمر) स्त्री. ('अ.) (१) वय; उमर. (२) आयुष्य. **–दराज़** (دراز –) दीर्घायुषी भव; आयुष्मान हो. **–रसीदः** (رسیدہ –) वि. वयस्क; म्हातारा.

'उम्र-ए-जाविदां (عمر جاوداں); **'उम्र-ए-जावेद** (عمر جاوید) स्त्री. ('अ.+फ़ा.) कायमचे जीवन; अमरत्व.

'उम्र-ए-तब'ई (عمر طبعی) स्त्री. ('अ.) माणसाचे स्वाभाविक आयुष्य. (हे १२० वर्षांचे समजले जाते).

'उम्र-ए-नूह (عمر نوح) स्त्री. ('अ.) नोहाचे आयुष्य; शेकडो वर्षे.

'उम्रः (عمرہ) पु. ('अ.) हजची यात्रा करणाऱ्यांचा एक धार्मिक विधी. (मक्केपासून तीन मैलांवर असलेल्या 'तनईम' नामक स्थानी नमाज पढून परत आल्यावर काठघाला प्रदक्षिणा घालणे).

'उयूब (عیوب) पु. ['अ. ''ऐब' (عیب) चे अनेक.] दोष; उणीवा.

'उयूल (عیول) स्त्री. ('अ.) (१) संन्यास; फकिरी. (२) दारिद्र्य.

उरदाबेगनी (اُردا بیگنی) स्त्री. (तु.) राजमहालात पुरुषासारखा वेश धारण करून सशस्त्र पहारा देणारी स्त्री.

'उरफ़ा (عرفا) पु. ['अ. ''आरिफ़' (عارف) चे अनेक.] महात्मे; बहुज्ञानी लोक.

'उरफ़ी (عرفی) वि. ('अ.) सामान्य; साधारण. (स्त्री.) पंचायत; हंगामी सरकार.

'उरुब (عرب) स्त्री. ['अ. ''अरूब' (عروب) चे अनेक.] पतीवर प्रेम करणाऱ्या स्त्रिया.

'उरूक़ (عروق) स्त्री. ['अ. ''इर्क़' (عرق) चे अनेक.] (१) अर्क; रस. (२) शिरा; नसा. (३) झाडाच्या मुळ्या; वारीक मुळे.

'उरूज (عروج) पु. ('अ.) (१) वर चढणे; उन्नती; उत्कर्ष; उदय. (२) अत्युच्च बिंदू; शिखर.

'उरूज-ए-माह (عروج ماہ) पु. ('अ.+फ़ा.) शुक्लपक्ष. (चंद्राचा उत्कर्ष).

उरेब (اُریب) वि. (फ़ा.) (१) वाकडा; वक्र; तिरकस. (२) कुटिल; कपटी.

उर्दुन (اردن) पु. ('अ.) जॉर्डन.

उर्दी (اُردی); **उर्दीबिहिश्त** (اُردی بہشت) पु. (फ़ा.) इराणी वर्षाचा दुसरा महिना. हा चैत्र-वैशाख (एप्रिल-मे) महिन्याच्या सुमारास येतो.

उर्दू (اُردو) पु. (तु.) (१) सैन्याचा तळ; छावणी. (२) लष्कराचा बाजार. (स्त्री.) उर्दू भाषा; मुख्यतः फारसी लिपीत लिहिली जाणारी व अरबी-फारसी शब्दांचे प्राचुर्य असणारी हिन्दी भाषा; हिन्दोस्तानी. **–बाज़ार** (بازار –) पु. (तु.+फ़ा.) (१) छावणी; तळ. (२) लष्कराचा बाजार. (३) मुख्य बाजारपेठ.

उर्दू-ए-मु'अल्ला (اُردوے معلیٰ) स्त्री. (तु.+'अ.) उच्च दर्जाची व शुद्ध उर्दू भाषा. दिल्लीच्या लाल किल्ल्यातील बेगमा बोलत असत ती भाषा; प्रतिष्ठित व साहित्यिक उर्दू.

'उरूज़ (عروض) पु. ('अ.) (१) जाहीर होणे; प्रकट होणे. (२) लागू होणे.

'उर्फ़ (عرف) पु. ('अ.) उपनाव; टोपण नाव; ऊर्फ.

'उर्फ़ी (عرفی) वि. ('अ.) प्रसिद्ध; मशहूर.

'उर्यां (عریاں) वि. ('अ.) (१) नग्न; नागवा. (२) अश्लील. **–नवीस** (نویس –); **–निगार** (نگار –) वि. ('अ. + फ़ा.) अश्लील लेख लिहिणारा.

'उर्यानी (عریانی) स्त्री. ('अ.) (१) नग्नता; नंगेपणा. (२) अश्लीलता.

'उर्स (عرس) पु. ('अ.) (१) लग्नाची जेवणावळ. (२) एखाद्या मुस्लिम संताची पुण्यतिथी व त्यानिमित्त होणारा उत्सव; उरूस.

उलंग (اُلنگ) पु. (तु.) कुरण; हिरवळ.

'उलमा (علما) पु. ['अ. ''आलिम' (عالم) चे अनेक.] पंडीत; विद्वान लोक.

उलाक़ (اُلاق); **उलाग** (اُلاغ) पु. (तु.) (१) पत्रवाहक; निरोप्या. (२) टपाल वाहून नेणारा घोडा. (३) भारवाहक; गाढव.

उलुग (اُلغ) पु. (तु.) महापुरुष; वडील माणूस.

'उलूवियां (علویاں) पु. (फ़ा.) (१) देवदूत. (२) तारे (३) सैयद लोक.

'उलू (علو) पु. ('अ.) उच्चता; उंची.

'उलूक़ (علوق) पु. ('अ.) (१) गर्भ राहणे. (२) लोंबकळणे. (गर्भाशयामध्ये जीव निर्माण होण्याच्या वेळी पुरुषाच्या वीर्यासह स्त्रीचे रक्त गोठणे).

'उलूफ़ः (علوفہ) पु. ('अ.) रोजचे भोजन; खाद्यपदार्थ; रोजमुरा; शिधा; भत्ता.

'उलूम (علوم) पु. ['अ. ''इल्म' (علم) चे अनेक.] शास्त्रे; विज्ञाने.

'उलूम-ए-'अक़्ली (علوم عقلی) पु. ('अ.) बुद्धिनिष्ठ शास्त्रे.

'उलूम-ए-नक़्ली (علوم نقلی) पु. ('अ.) ग्रंथनिष्ठ शास्त्रे (धर्म वगैरे).

उल्फ़त (اُلفت) स्त्री. ('अ.) (१) प्रेम; प्रीती; स्नेह. (२) मैत्री.

'उल्या (علیا) वि. स्त्री. ['अ. 'अ'अलॉ' (اعلیٰ) चे स्त्रीलिंगी रूप.] महीपी; आला हजरत (पुरुषासाठी) व उल्या हजरत (स्त्रीसाठी).

उशाक़ (اُشاق) पु. (तु.) दाढी मिशी नसलेला सुंदर मुलगा.

उश्तुर (اُشتر) पु. (फ़ा.) उंट.

'उश्बः (عشبہ) पु. ('अ.) सार्सापरिल्ला.

'उश्र (عشر) वि. ('अ.) दशांश; दहावा भाग.

'उश्र-ए-'अशीर (عشر عشیر) वि. ('अ.) शतांश; दहाव्याचा दहावा भाग.

'उश्शाक़ (عشاق) पु. ['अ. 'आशिक़' (عاشق) चे अनेक.] (१) प्रेम करणारे; प्रेमी. (२) तिसऱ्या प्रहरी (दिवसा) गावयाचा एक राग (संगीत).

'उसारः (عصارہ) पु. ('अ.) झाडाची पाने वाटून काढलेला रस; अर्क.

उसूल (اُصول) पु. ['अ. 'अस्ल' (اصل) चे अनेक.] (१) तत्त्वे; सिद्धांत; मूलभूत गोष्टी; नियम. (२) ताल (संगीत). -ए-मौज़ू'अः (موضوع -) पु. गृहीत प्रमेय; गृहीत सिद्धांत (गणित) -ओ-फ़ुरू'अ (و فروع -) स्त्री. कारणे व परिणाम.

उसूली (اُصولی) वि. ('अ.) मूलभूत; आधारभूत.

'उसैलः (عسیلہ) पु. ('अ.) (१) मैथुनाचा आनंद. (२) वीर्य.

उस्क़ुफ़ (اُسقف) पु. ('अ.) ख्रिस्ती धर्मगुरू; पाद्री; बिशप.

उस्ताज़ (اُستاذ) पु. ('अ.) उस्ताद (اُستاد) पु. (फ़ा.) (१) शिक्षविणारा; शिक्षक; प्राध्यापक (२) चलाख; बनेल; वस्ताद.

उस्तादी (اُستادی) स्त्री. (फ़ा.) (१) शिक्षकाचा पेशा, कार्य. (२) चातुर्य. (३) चलाखी; धूर्तता.

उस्तानी (اُستانی) स्त्री. (फ़ा.+हिं.) (१) शिक्षिका; अध्यापिका. (२) गुरुपत्नी.

उस्तुख़्वान (اُستخوان) पु. (फ़ा.) हाड; अस्थी. -दार (دار -) वि. दृढ; मजबूत; स्थिर.

उस्तुरः (اُسترہ) पु. (फ़ा.) वस्तरा.

उस्तुर्लाब (اُصطرلاب) पु. ('अ.) ग्रह-नक्षत्रांची मोजणी करणारे यंत्र.

उस्तुवार (اُستوار) वि. (फ़ा.) दृढ; मजबूत; स्थिर.

उस्तुवारी (اُستواری) स्त्री. (फ़ा.) दृढता.

उस्तूल (اُسطول) पु. ('अ.) युद्धनौका; लढाऊ जहाजांचा काफिला.

'उस्फ़ूर (عصفور) पु. ('अ.) चिमणी (पक्षी).

'उस्मान (عثمان) पु. ('अ.) मुसलमानांचे तिसरे खलिफा.

'उस्र (عسر) पु. 'उस्रत (عسرت) स्त्री. ('अ.) (१) दुष्करता; काठीण्य; अवघडपणा. (२) दारिद्र्य.

उस्लूब (اُسلوب) पु. ('अ.) (१) पद्धती; शैली. (२) आचरण.

उस्वः (اُسوہ) पु. ('अ.) पुढारी; नेता; अवघड समस्या सोडविणारा नेता.

ऊ (اُو) सर्व. (फ़ा.) तो, ती, ते.

ऊक़ियानूस (اُوقیانوس) पु. ('अ.) अटलांटिक महासागर.

'ऊज (عوج); 'ऊजबिन'ऊक़ (عوج بن عوق) पु. ('अ.) (१) आदमच्या काळी जन्मास आलेला व मोझेसच्या काळपर्यंत म्हणजे तीन हजार पाचशे वर्षे जगलेला एक अत्यंत उंच माणूस. याच्या बापाचे नाव ऊक (२) उंच व मूर्ख माणूस.

'ऊद (عود) पु. ('अ.) (१) ऊद; धूप; अगरू. (२) एक वाद्य, बिन. -सोज़ (سوز -) पु. ('अ.+फ़ा.) धूपदाणी; बर्वत.

'ऊदी (عودی) वि. ('अ.) (१) उदासंबंधी. (२) उदाच्या रंगाचा पिंगट; तपकिरी.

'ऊर (عور) वि. ('अ.) नग्न; नागवा.

ऊलु'ल्-'अज़्म (اُولوالعزم) वि. ('अ.) धैर्यवान; धाडसी.

ऊलु'ल्-'अज़्मी (اُولوالعزمی) स्त्री. ('अ.) धाडस; हिम्मत.

ऊलु'ल्-अम्र (اُولوالامر) वि. ('अ.) (१) सत्ताधीश; शासक. (२) युगपुरुष.

ऊलुश (اُولوش) पु. (तु.) (१) एखाद्या संताच्या पुढील उरलेले अन्न; उच्छिष्ट; प्रसाद. (२) श्रीमंतांच्या ताटांत उरलेले अन्न. (यावर नोकरांचा हक्क असतो).

ऊलुस (اُولوس) पु. (तु.) (१) राष्ट्र. (२) जाती; जमात.

ए (اے) अव्य. (फ़ा.) हे, ए, अरे (संबोधन).

ए'अज़ाज़ (اعزاز) पु. ('अ.) मान; सन्मान; प्रतिष्ठा; आदर.

ए'अजाज़ (اعجاز) पु. ('अ.) चमत्कार; करामत.

तेरे ए'अजाज़ की है धूम जमाने भर में।
मैं जो बच जाऊँ तो समझूँ कि. मसीहा'ई है॥

ए'अजाज़-ए-'इसवी (اعجاز عیسوی); ए'अजाज़-ए-मसीहा'ई (اعجاز مسیحائی) पु. ('अ.) मृतांना जिवंत करण्याचा चमत्कार. (येशू ख्रिस्ताने हा चमत्कार केला होता, असे म्हणतात).

ए'अज़ाज़ी (اعزازی) वि. ('अ.) मानद; अवैतनिक.

ए'अजाब (اعجاب) पु. ('अ.) गर्व; अभिमान; घमेंड.

ए'अजाल (اعجال) पु. ('अ.) घाई करणे; जलदी; शीघ्रता.

ए'अता (اعطا) पु. ('अ.) देणे; बक्षीस; इनाम; पारितोषिक.

ए'अताक़ (اعتاق) पु. ('अ.) दास्यमुक्त करणे.

ए'अतिक़ाद (اعتقاد) पु. ('अ.) श्रद्धा; खात्रीपूर्ण विश्वास.

ए'अतिकाफ़ (اعتکاف) पु. ('अ.) ईश्वरी उपासनेसाठी एकांतवास पत्करणे; वैराग्य.

ए'अतिज़ाज़ (اعتزاز) पु. ('अ.) प्रतिष्ठा; इज्जत; महत्त्व.

ए'अतिज़ार (اعتذار) पु. ('अ.) (१) तक्रार करणे. (२) हरकत घेणे. (३) माफी मागणे.

ए'अतिज़ाल (اعتزال) पु. ('अ.) (१) निवृत्त; अलग होणे; एकांतवास पत्करणे. (२) गर्भसंभव होऊ नये म्हणून संभोगाच्या वेळी वीर्य रोखून धरणे. (३) पाप-पुण्याची जबाबदारी स्वतः माणसावर आहे, ईश्वरी इच्छेचा त्याच्याशी संबंध नाही, असे मानणे.

ए'अतिदाल (اعتدال) पु. ('अ.) (१) समतोल; बरोबरी; समानता. (२) मध्यम मार्ग; नेमस्तपणा. (३) संयम.

ए'अतिना (اعتنا) पु. ('अ.) (१) सहानुभूती (२) दया; कृपा. (३) शुश्रूषा.

ए'अतिनाक़ (اعتناق) पु. ('अ.) आलिंगन देणे; गळ्यात गळा, हात घालणे.

ए'अतिबार (اعتبار) पु. ('अ.) (१) विश्वास; भरवसा. (२) पत. (३) उपदेश. (४) परीक्षा. (५) प्रतीती.

ए'अतिबारी (اعتباری) वि. ('अ.) विश्वसनीय, विश्वासार्ह.

ए'अतिमाद (اعتماد) पु. ('अ.) (१) विश्वास; खात्री. (२) पत. (३) आधार.

ए'अतिराद (اعتراض) पु. ('अ.) (१) विरोध; हरकत; आडकाठी. (२) शंका. **–ए-बाबितः** (ضابطہ –) तांत्रिक हरकत.

ए'अतिराफ़ (اعتراف) पु. ('अ.) स्वीकृती; कबुली; मान्यता.

ए'अतिसाम (اعتصام) पु. ('अ.) संयम; इंद्रियनिग्रह; पापापासून किंवा अपराधापासून दूर राहणे.

ए'अतिसार (اعتسار) पु. ('अ.) गरिबांवर जुलूम करणे, वेठीस लावणे.

ए'अराद (اعراض) पु. ('अ.) तोंड फिरविणे; उपेक्षा.

ए'अराफ़ (اعراف) पु. ('अ.) स्वर्ग व नरक यांच्या मधील दरम्यानचे अंतर (मुसलमानांच्या मते).

ए'अराब (اعراب) पु. ('अ.) (१) अरबी लिपीतील अकार, इकार व उकार दर्शविणारी चिन्हे (ज़बर, ज़ेर व पेश.) (२) स्पष्ट, प्रगट करणे; दर्शविणे.

ए'अलान (اعلان) पु. ('अ.) घोषणा; दवंडी; प्रकटन.

ए'अलाम (اعلام) पु. ('अ.) कळविणे; जाहीर करणे. **–नामः** (– نامہ) पु. ('अ.+फ़ा.) जाहीरनामा.

एज़िद (ایزد) पु. (फ़ा.) ईश्वर; खुदा. **–परस्त** (– پرست) वि. ईश्वरपूजक; आस्तिक.

एज़िदी (ایزدی) वि. (फ़ा.) ईश्वरी; दैवी.

एलची (ایلچی) पु. ('अ.) परराष्ट्रीय वकील; राजदूत.

'एवद (عوض) पु. ('अ.) (१) मोबदला; प्रतिफळ; भरपाई. (२) बदला; सूड. (३) ऐवजी काम करणारा; बदली प्रतिनिधी. (अव्य.) ऐवजी, साठी.

'एवदी (عوضی) वि. ('अ.) बदली; प्रतिनिधी; दुसऱ्यांच्या जागी काम करणारा.

एस्तादः (ایستادہ) वि. (फ़ा.) सरळ उभा असलेला; ताठलेला.

एहक़ाक़ (احقاق) पु. ('अ.) (१) सत्य सांगणे, जाणणे. (२) हक्क शाबीत करणे. (३) दुरुस्त करणे.

एहज़ान (احزان) पु. ('अ.) दुःखात लोटणे; दुःखी करणे.

एहतिकार (احتکار) पु. ('अ.) साठेबाजी; भाव वाढल्यानंतर विकण्यासाठी धान्य साठवून ठेवणे.

एहतिक़ार (احتقار) पु. ('अ.) तुच्छ समजणे; तिरस्कार करणे.

एहतिजाज (احتجاج) पु. ('अ.) (१) वादविवाद करणे; हुज्जत घालणे. (२) निषेध किंवा विरोध करणे, नोंदविणे.

एहतिज़ाज़ (احتظاظ) पु. ('अ.) आनंद, मजा, स्वाद लुटणे.

एहतिदा (اهتدا) पु. ('अ.) सन्मार्ग प्राप्त होणे.

एहतिदार (احتضار) पु. ('अ.) (१) समोर येणे; हजर होणे. (२) मृत्यू येवून ठेपणे; मरणे. (३) नागरिक बनणे.

एहतिफ़ाल (احتفال) पु. ('अ.) सभा करणे; मंफल भरविणे.

एहतिबास (احتباس) पु. ('अ.) (१) अवरोध; बंद होणे. (२) बंदिस्ती; कैद. (३) विटाळ बंद होणे.

एहतिमाम (اهتمام) पु. ('अ.) (१) व्यवस्था; देखरेख (इतमाम). (२) प्रयत्न. (३) अधिकार क्षेत्र; राज्य.

एहतिमाल (احتمال) पु. ('अ.) (१) शंका; संदेह. (२) शक्यता; संभावना. (३) सहन करणे.

एहतियाज (احتياج) स्त्री. ('अ.) (१) आवश्यकता; जरूर. (२) दारिद्र्य. [अनेक 'एहतियाजात' (احتياجات.)]

एहतियांज (احتباز) पु. ('अ.) जमा होणे; एकत्र येणे.

एहतियात (احتياط) स्त्री. ('अ.) (१) सावधगिरी; हुशारी. (२) संरक्षण; बचाव. (३) दूरदर्शित्व. (४) संयम.

एहतियातन् (احتياطاً) अव्य. ('अ.) सावधगिरी म्हणून.

एहतियाल (احتيال) पु. ('अ.) सबब सांगणे; बहाणा करणे.

एहतिराक़ (احتراق) पु. ('अ.) जळणे; पेटणे.

एहतिराज (احتراز) पु. ('अ.) (१) संयम; दूर राहणे; टाळणे. (२) घृणा, तिरस्कार करणे.

एहतिराम (احترام) पु. ('अ.) आदर; सन्मान; इज्जत.

एहतिलाम (احتلام) पु. ('अ.) स्वप्नावस्था; स्वप्नदोष.

एहतिशाम (احتشام) पु. ('अ.) (१) वैभव. (२) थाट. (३) हाताखाली नोकरचाकर असणे.

एहतिसाब (احتساب) पु. ('अ.) (१) हिशोब करणे. (२) लोकांनी निषिद्ध वस्तूंचा वापर (मद्य वगैरे) करू नये म्हणून त्यांच्यावर नियंत्रण, पहारा ठेवणे; पोलीस बंदोबस्त.

एहमाल (اهمال) पु. ('अ.) (१) विसरून जाणे. (२) उपेक्षा, दुर्लक्ष करणे. (३) सोडून देणे. (४) विलंब लावणे.

एहमाल (احمال) पु. ('अ.) ओझे वाहणे; हमाली करणे.

एहमाली (اهمالی) वि. ('अ.) (१) सुस्त; बेकार. (२) उदासीन.

एहया (احيا) पु. ('अ.) जिवंत करणे; पुनरुज्जीवन करणे. **-उल्-मवात** (الموات -) पु. मृताला जिवंत करणे; पडीत जमीन लागवडीस आणणे.

एहराक़ (احراق) पु. ('अ.) जाळणे; पेटविणे.

एहराम (احرام) पु. ('अ.) (१) स्वतःसाठी एखादी वस्तू निषिद्ध ठरविणे, सोडणे; बंदी. (२) हजची यात्रा करण्याचा संकल्प करणे. **जामः-ए-एहराम** (جامۂ احرام) पु. ('अ. + फ़ा.) हजची यात्रा करताना वापरावयाची चादर, वस्त्र. (हे वस्त्र न शिवलेल्या धोतरासारखे असते).

एहराम (اهرام) पु. ('अ.) अत्यंत वृद्ध होणे; जराजर्जरत्व.

एहलाक (اهلاک) पु. ('अ.) (१) हत्या, वध करणे. (२) पतन; कहर.

एहसा (احصا) पु. स्त्री. ('अ.) (१) गणना; मोजणी. (२) मर्यादित करणे.

एहसान (احسان) पु. ('अ.) उपकार; कल्याण; कृपा. **-नाशनास्** (ناشناس -) वि. ('अ.+फ़ा.) उपकार न ओळखणारा; कृतघ्न. **-फ़रामोश** (فراموش -) वि. ('अ. + फ़ा.) उपकार विसरणारा; कृतघ्न. **-फ़रोश** (فروش -) वि. ('अ. + फ़ा.) उपकार केल्यानंतर त्याची जाहिरात करणारा. **-मन्द** (مند -) वि. ('अ.+फ़ा.) कृतज्ञ; आभारी. **-शनास** (شناس -) वि. ('अ.+फ़ा.) उपकार जाणणारा; कृतज्ञ.

एहसान (احصان) पु. ('अ.) (१) विवाह करणे. (स्त्रीने पुरुषाची व पुरुषाने स्त्रीची इच्छा बाळगणे). (२) गरोदर असणे. (३) मजबूत करणे. (४) वेढा घालणे.

एहसार (احصار) पु. ('अ.) (१) गणना, मोजणी करणे. (२) वेढा घालणे; घेरणे. (३) हजला न जाणे.

एहसास (احساس) पु. ('अ.) जाणीव; ज्ञान; अनुभूती; संवेदना. [अनेक 'एहसासात' (احساسات)].

ऐ (اے) अव्य. ('अ.) हे! अरे! (संबोधन).

ऐदन (ايضاً) अव्य. ('अ.) वरील प्रमाणे, तसेच.

'ऐन (عين) पु. ('अ.) (१) नेत्र; डोळा; दृष्टी. (२) झरा; लहान नदी. (वि.) (१) बरोबर; अगदी योग्य. (२) समान. (३) खरोखरी. (४) सरळ; थेट. (५) सख्खा (भाऊ वगैरे). **-उल्-माल** (المال -) पु. (१) सरकारी खजिना. (२) मुद्दल. (३) निव्वळ नफा. **-उल्-यक़ीन** (اليقين -) पु. ('अ.) प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिल्यानंतर वाटणारा विश्वास. **-सान** (غين -) वि. एकसारखे दिसणारे.

'ऐनक (عينک) स्त्री. (फ़ा.) चष्मा; चाळिशी; उपनेत्र.

'ऐना (عينا) स्त्री. ('अ.) मीनाक्षी, सुंदर डोळे असलेली स्त्री.

'ऐब (عيب) पु. ('अ.) (१) दोष; दुर्गुण; वाईट खोड. (२) पाप; गुन्हा. (३) अशुद्धी; उणीव; चूक; व्यंग. **-गो** (گو -) वि. ('अ.+फ़ा.) दोष सांगणारा; निंदा करणारा. **-गो'ई** (گوئی -) स्त्री. ('अ.+फ़ा.) निंदा; बदनामी. **-चीं** (چیں -); **-जू** (جو -) वि. ('अ.+फ़ा.) छिद्रान्वेषी. **-चीनी** (چینی -); **-जो'ई** (جوئی -) स्त्री. ('अ.+फ़ा.) छिद्रान्वेषण. **-तराश** (تراش -) वि. ('अ.+फ़ा.) दोष काढणारा. **-दार** (دار -) वि. ('अ.+फ़ा.) दोषयुक्त; सदोष; खराब; पाजी. **-पोश** (پوش -) वि. ('अ. + फ़ा.) दोष

झाकणारा; दुर्गुणावर पांघरूण घालणारा. –पोशी (پوشی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) दोष झाकून ठेवणे. –बीं (بیں –); –बीन (بین –) वि. ('अ.+फ़ा.) व्यंग पाहणारा; छिद्रान्वेषी; काकदृष्टी.

'ऐबी (عیبی) वि. ('अ.+फ़ा.) (१) दोषयुक्त; सदोष. (२) लबाड. (३) खटपाळ; दुष्ट. (४) व्यंगयुक्त; तिरळा.

ऐयाम (ایام) पु. ['अ. 'यौम' (یوم) चे अनेक.] अनेक दिवस; काळ.

'ऐयार (عیار) वि. ('अ.) (१) धूर्त; चलाख. (२) कपटी; दगलबाज.

'ऐयारी (عیاری) स्त्री. ('अ.) (१) धूर्तता; चलाखी. (२) लबाडी.

'ऐयाश (عیاش) वि. ('अ.) (१) ऐषआरामी; विलासी. (२) व्यभिचारी; कामुक; बदचलन; लंपट.

'ऐयाशी (عیاشی) स्त्री. ('अ.) (१) विलास; ऐषआराम. (२) व्यभिचार; कामुकता.

ऐयूब (ایوب) पु. ('अ.) एका प्रेषिताचे नाव. (हे सहनशीलतेबद्दल प्रसिद्ध होते).

ऐर (ایر) पु. ('अ.) पुरुषाचे जननेंद्रिय; शिश्न; लिंग

'ऐलः (عیلہ) स्त्री. ('अ.) संन्यास; फकिरी.

ऐवान (ایوان) पु. (फ़ा.) (१) राजवाडा; महाल; प्रासाद. (२) विधिमंडळ; संसद. (३) मंडळ.

ऐवान-ए-ज़ेरीं (ایوان زیریں) पु. (फ़ा.) निम्न सदन; कनिष्ठ विधिमंडळ.

ऐवान-ए-बाला (ایوان بالا) पु. (फ़ा.) उच्च सदन; वरिष्ठ विधिमंडळ.

'ऐश (عیش) पु. ('अ.) (१) विलास; चैन; ऐषआराम. (२) विषयवासना; व्यभिचार; संभोग. –तलब (طلب –) वि. ('अ.+फ़ा.) विलास इच्छिणारा. –परस्त (پرست –) वि. ('अ.+फ़ा.) विलासी; लंपट; कामुक. –मंज़िल (منزل –); –महल (محل –) पु. –महफ़िल (محفل –) स्त्री. ('अ.+फ़ा.) रंगमहाल; विलास भवन.

'ऐश-ओ-'इशरत (عیش و عشرت); **'ऐश-ओ-निशात** (عیش و نشاط) पु. ('अ.) ऐषआराम; चैन; विलास.

'ऐस (عیث) पु. ('अ.) लांडग्याने मेंढरांच्या कळपाचा नाश करणे; विनाश; विध्वंस.

ऐस (ایس) पु. ('अ.) निराशा; नैराश्य.

ऐसर (ایسر) वि. ('अ.) अत्यंत सोपे; सुगम.

ओ (او) अव्य. ('अ.) अथवा; किंवा.

ओ (او) सर्व. (फ़ा.) तो, ती, ते.

'ओहदः (عہدہ) पु. ('अ.) हुद्दा; पद; स्थान; पदाधिकार. –दार (دار –) वि. ('अ.+फ़ा.) पदाधिकारी; हुद्देदार; अधिकारी. –बरा (برا –) वि. ('अ.+फ़ा.) जबाबदारी पार पाडणारा.

औक़ात (اوقات) पु. ['अ. 'वक़्त' (وقت) चे अनेक.] वेळा; समय. (स्त्री.) (१) प्रतिष्ठा; इज्जत. (२) सामर्थ्य; पत. (३) उपजीविका; उदरनिर्वाहाचे साधन. –बसरी (بسری –) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) उदरनिर्वाह. (२) वेळ घालविणे. (३) व्यवसाय.

औक़ाफ़ (اوقاف) पु. ['अ. 'वक़्फ़' (وقف) चे अनेक.] देवस्थानांना इनाम दिलेल्या जमिनी वगैरे; धर्मादाय संपत्ती.

औज (اوج) पु. ('अ.) (१) उच्चता. (२) उंची. (३) उन्नती. (४) उच्चपद; प्रतिष्ठा. (५) सर्वोच्च बिंदू.

'औज (عوج) पु. ('अ.) (१) वाकडेपणा; वक्रता. (२) वळणे; परत फिरणे.

'औज़ (عوذ) पु. ('अ.) ईश्वराला शरण जाणे; आश्रयास जाणे; आसरा.

औज़ान (اوزان) पु. ['अ. 'वज़न' (وزن) चे अनेक.] वजने; मापे.

औज़ार (اوزار) पु. ['अ. 'विज़्र' (وزر) चे अनेक.] (१) अवजारे; उपकरणे. (२) गुन्हे; पापे.

'औद (عود) पु. ('अ.) परत फिरणे; परती.

औज़ह (اوضح) वि. ('अ.) अत्यंत स्पष्ट; साफ.

'औदा'अ (اوضاع) पु. ['अ. 'वद्'अ' (وضع) चे अनेक.] (१) रचना; बनावटी. (२) फॅशन्स; पद्धती; ढंग.

'औन (عون) वि. ('अ.) मदतगार; साह्यकर्ता.

औबाश (اوباش) पु. ['अ. 'बौश' (بوش) चे अनेक.] बदमाष, दुराचारी, लफंगे, मवाली, उडाणटप्पू लोक.

औरंग (اورنگ) पु. (फ़ा.) (१) राजसिंहासन. (२) बुद्धिमत्ता. –ज़ेब (زیب –) पु. वि. (फ़ा.) सिंहासनाची शोभा; सत्ताधीश. –ज़ेबी बात (زیبی بات –) लबाडीची गोष्ट; फसवे भाषण. –नशीं (نشیں –) वि. सिंहासनारूढ.

'और (عور) पु. ('अ.) एकाक्ष, काणा असणे.

'औरत (عورت) स्त्री. ('अ.) (१) स्त्री; महिला. (२) पत्नी.

औराक़ (اوراق) पु. ['अ. 'वरक़' (ورق) चे अनेक.] पृष्ठे; पाने.

'औरात (عورات) स्त्री. ['अ. ''औरत' (عورت) चे अनेक.] स्त्रिया; वायका.

'औल (عول) पु. ('अ.) (१) पालनपोषण; दान. (२) गृहस्थ.

औलॉ (اولیٰ) वि. ('अ.) अत्यंत उत्तम; श्रेष्ठ; उचित.

औलाद (اولاد) पु. ['अ. 'वल्द' (ولد) चे अनेक.] (१) संतती; संतान. (२) वंश; कूळ.

औलिया (اولیا) पु. ['अ. 'वली' (ولی) चे अनेक.] (१) साधु-संत; फकीर; महात्मे. (२) वारस; उत्तराधिकारी.

'औस् (عوص) पु. ('अ.) कठीणता; अवघडपणा; अडचण.

औस'अ (اوسع) वि. ('अ.) विस्तृत; व्यापक.

औसत् (اوسط) वि. ('अ.) मधला; मध्यम; सरासरी; सामान्य; सर्वसाधारण.

औसत्-उल्-हाल (اوسط الحال) वि. ('अ.) मध्यम वर्गीय.

औसतन् (اوسطاً) अव्य. ('अ.) सरासरीने; सामान्यपणे.

औसान (اوسان) पु. ['अ. 'वसन' (وسن) चे अनेक.] (१) शांती; मनाची शांतता. (२) बुद्धी; संवेदना. (३) धैर्य; अवसान; शक्ती. **–ख़ता होना** (–خطا ہونا) गर्भगळित होणे.

औसाफ़ (اوصاف) पु. ['अ. 'वस्फ़' (وصف) चे अनेक.] (१) गुण. (२) वैशिष्ट्ये; खुब्या. (३) चांगल्या गोष्टी.

औसाफ़-ए-हमीदः (اوصاف حمیدہ) पु. ('अ.) चांगले गुण; सद्गुण.

औहद (اوحد) वि. ('अ.) अद्वितीय; अनुपम.

औहाम (اوھام) पु. ['अ. 'वहम' (وھم) चे अनेक.] खोटचा समजुती; भ्रम; गैरसमज.

कंज (کنز) पु. ('अ.) खजिना; कोष; निधी.

क़ंतरः (قنطرہ) पु. ('अ.) (१) मोठा पूल; सेतू. (२) प्रासाद; महाल.

क़ंद (قند) पु. स्त्री. ('अ.) (१) पांढरी शुभ्र दाणेदार साखर; साखर्‍या. (२) खडीसाखर. (वि.) फार गोड.

कंद (کند) पु. (तु.) गाव; खेडे.

कंदन (کندن) क्रि. (फ़ा.) (१) खोदणे. (२) कोरणे; नक्षी करणे.

क़ंदील (قندیل) स्त्री. ('अ.) (१) टांगता दिवा; फाणस. (२) कंदील. (३) चोहोबाजूंस काचा किंवा अभ्रक असलेला दिवा; आकाशदिवा.

कंदूरी (کندوری) पु. (फ़ा.) जेवणाच्या वेळी ताटाखाली अंथरावयाची मोठी चादर; टेबल क्लॉथ.

कंदः (کندہ) वि. (फ़ा.) (१) खोदलेला; कोरलेला. (२) नक्षी केलेला. **–कार** (–کار); **–गर** (–گر) वि. सोने; चांदी; लाकूड वगैरेवर नक्षीकाम करणारा, कोरणारा.

कंदः (کندہ) पु. (फ़ा.) खंदक; खाई.

क़'अब (قعب) पु. ('अ.) मोठा लाकडी पेला.

क'अबतैन (کعبتین) पु. ('अ.) (१) जुगार खेळण्याचे दोन फासे. (२) जेरुसलेम व मक्का ही दोन तीर्थस्थाने.

क'अबः (کعبہ) पु. ('अ.) (१) मक्का येथील एक इमारत. मुसलमान लोक या इमारतीला ईश्वराचे घर समजतात व तिची यात्रा (हज) करतात. (२) चौकोनी इमारत किंवा वास्तू. (३) फासा (जुगाराचा).

क़'अलची (قعلچی) पु. (तु.) बादशहाच्या शिकारीची व्यवस्था करणारा मुख्य अधिकारी.

क़'ईद (قعید) वि. ('अ.) समवेत बसणारा; सभासद.

क़'ऊद (قعود) पु. ('अ.) (१) बसणे. (२) विटाळ बंद होणे.

क़'ऊर (قعور) पु. ('अ.) अत्यंत खोल विहीर; अथांग (पाणी).

कचकोल (کچکول) पु. ('अ.) फकिराचे भिक्षापात्र; झोळी; नरोटी.

कचः (کچہ) पु. (फ़ा.) छल्ला; वळे; साधी अंगठी (खडा न बसविलेली).

कज़ (کز) पु. (फ़ा.) कच्चे रेशीम. (वि.) वक्र; वाकडा.

कज (کج) पु. (फ़ा.) (१) वक्रता; वाकडेपणा. (२) दोष; उणीव. (वि.) वक्र; वाकडा. **–'अक़्ल** (–عقل) वि. (फ़ा. + 'अ.) वक्रमती; विपरीत बुद्धी. **–अदा** (–ادا) वि. (फ़ा.) असभ्य; बेमुर्वतखोर; बदचलन. **–कुलाह** (–کلاہ) वि. (फ़ा.) (१) वाकडी टोपी घालणारा; प्रेमपात्र; मापूक. (२) सत्ताधीश; राजा. **–ख़ुल्क़** (–خلق) वि. (फ़ा. + 'अ.) असभ्य; उद्धट. **–तब'अ** (–طبع) वि. वाकडचा ('अ. + फ़ा.) स्वभावाचा; कुटिल. **–नज़र** (–نظر); **–निगाह** (–نگاہ) वि. (फ़ा.) (१) तिरळा. (२) रागीट. **–फ़हम** (–فہم) वि. (फ़ा. + 'अ.) वक्रबुद्धी; मूढ. **–बाज़** (–باز) वि. (फ़ा.) (१) धंद्यात फसवाफसवी करणारा. (२) भांडखोर. **–बीं** (–بیں) वि. (फ़ा.) काकदृष्टी; केवळ दोष पाहणारा. **–मज** (–مج) वि. (फ़ा.) तोतरा; मूर्ख. **–मिज़ाज** (–مزاج) वि. (फ़ा. + 'अ.) कुटिल; दुष्ट. **–रफ़्तार** (–رفتار); **–रौ** (–رو) वि. (फ़ा.) वाकडे चालणारा; दुराचारी; जुलमी.

कजक (کجک) पु. (फ़ा.) अंकुश.

कजदुम (کزدم) पु. (फ़ा.) विंचू.

क़ज़्फ़ (قذف) पु. ('अ.) (१) शिवीगाळ करणे. (२) साध्वी स्त्रीवर व्यभिचाराचा आरोप करणे.

क़ज़्म (قزم) स्त्री. ('अ.) अधमता; नीचपणा. (पु.) नीच लोक.

क़ज़ल (قزل) वि. ('अ.) लंगडा.

कजावः (کجاوہ) पु. (फ़ा.) उंटाच्या पाठीवर घालावयाचा लाकडी होदा. याच्या दोन्ही बाजूंस माणसे बसतात.

कज़िब (کذب) वि. ('अ.) खोटा; असत्यभाषी.

क़ज़िर (قذر) वि. ('अ.) अपवित्र; मलिन.

क़ज़िल (قزل) वि. ('अ.) लंगडा; पंगू.

कज़ी (کجی) स्त्री. (फ़ा.) वक्रता; वाकडेपणा.

क़ज़ीफ़ (قذف) पु. ('अ.) विशाल मैदान; विस्तृत जंगल.

क़ज़्ज़ाक़ (قزاق) पु. (तु.) लुटारू; दरवडेखोर.

क़ज़्ज़ाक़ी (قزاق) स्त्री. (तु.) दरवडेखोरी; लुटारूपणा. (वि.) लुटारूसारखा.

कज़्ज़ाब (کذاب) वि. ('अ.) (१) खोटारडा; अत्यंत खोटा. (२) वाचाळ.

क़ज़्फ़ (قذف) पु. ('अ.) (१) दगड-मारणे; शिवीगाळ करणे. (२) एखाद्या व्यक्तीवर व्यभिचाराचा आरोप करणे.

क़त् (قط) पु. ('अ.) (१) लेखणीचे टोक. (२) वोरूच्या लेखणीचे टोक कापणे (तिरपे). **–गीर** (گیر –); **–ज़न** (زن –) पु. ('अ.+फ़ा.) ज्याच्यावर ठेवून लेखणीचे टोक कापण्यात येते असे चपटे लाकूड किंवा हस्तिदंत. **–लगाना** (لگانا –) टोक कापणे; 'कट' मारणे.

क़त्'अ (قطع) स्त्री. ('अ.) (१) कापणे; तुकडे करणे. (२) वेशभूषा; फॅशन; कपडे कापण्याची पद्धती (कट). **–कलाम करना** (کلام کرنا –) बोलण्यात अडथळा आणणे; मध्येच थांबविणे. **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) फॅशनेबल; स्टाईलिश. **–नज़र** (نظر –) अव्य. ('अ.) शिवाय; खेरीज. **–बुरीद** (بریدہ –) स्त्री. काटछाट; बनावट.

क़त्'अ-ए-त'अल्लुक़ (قطع تعلق) पु. ('अ.) (१) संबंध-विच्छेद. (२) विवाह-विच्छेद; घटस्फोट.

क़त्'अ कीजि'ए न. त'अल्लुक़ हमसे ।
कुछ नहीं है तो 'अदावत ही सही ।।

क़त्'अन् (قطعاً) अव्य. ('अ.) मुळीच; कदापि.

क़त्'ई (قطعی) अव्य. ('अ.) (१) मुळीच; विलकूल; कदापि. (२) अत्यंत. (वि.) (१) मजबूत. (२) अटळ; नक्की. (३) अंतिम; शेवटचा.

क़त्'अः (قطعہ) पु. ('अ.) (१) तुकडा; खंड. (२) जमिनीचा तुकडा. (३) कवितेचा एक प्रकार. यामध्ये गझलाप्रमाणे यमक असते व एका कवितेत एकच विषय असतो.

कतख़ुदा (کتخدا) पु. (फ़ा.) विवाहित स्त्री अथवा पुरुष. [हा शब्द मूलतः 'कदख़ुदा' (کدخدا) म्हणजे 'घरचा स्वामी' असा होता.] गृहस्वामी.

क़तख़ुदा'ई (کتخدائی) स्त्री. (फ़ा.) विवाह; शादी; निकाह.

कतबः (کتبہ) पु. ('अ.) एखाद्या इमारतीवर किंवा समाधीवर लावलेला तिच्यासंबंधी माहिती देणारा शिलालेख; अभिलेख.

क़त्म (قطم) पु. ('अ.) आत्यंतिक कामातुरता.

कतां (کتاں) पु. (फ़ा.) (१) जवस; अळशी (धान्य). (२) एक प्रकारची अत्यंत मौल्यवान मलमल. (३) रेशमी कापड.

क़ताम (قتام) पु. ('अ.) धूळ; माती.

क़तार (قطار) स्त्री. ('अ.) पंक्ती; रांग; ओळ. (शुद्ध : कितार).

क़तारः (قطارہ) पु. (फ़ा.) कटयार; खंजीर; तलवार.

कतिफ़ (کتف) पु. ('अ.) खांदा.

कतीबः (کتیبہ) पु. ('अ.) सैन्य; लढकर.

कतीरा (کتیرا) पु. (फ़ा.) (१) एक प्रकारचा कातासारखा डिंक; (हा अधिक खाल्ल्यास नपुसकत्व येते). (२) गरम मसाला.

क़तील (قتیل) वि. ('अ.) ज्याची कत्तल करण्यात आली आहे असा; हुतात्मा; निहत.

क़तूर (قتور) वि. ('अ.) कृपण; कंजूष.

क़त्ताम: (قطامہ) स्त्री. ('अ.) (१) अत्याधिक कामवासना असणारी विलासिनी स्त्री. (२) कुलटा; छिनाल. (ही एक शिवी आहे).

क़त्ताल (قتال) वि. ('अ.) (१) भयंकर कत्तल करणारा. (२) प्रेमपात्र. [स्त्री. 'क़त्ताल:' (قتالہ) प्रेमिका; माशुका].

कत्फ़ (کتف) पु. ('अ.) (१) खांदा. (२) दोन्ही हात मागे बांधणे.

कत्म (کتم) पु. ('अ.) पडदा; आड लपविणे.

कत्म-ए-'अदम (کتم عدم) पु. ('अ.) जीवात्मा; उत्पत्तीच्या पूर्वी जेथे राहतो ते स्थान.

क़त्र् (قطر) पु. ('अ.) पाऊस; वर्षा.

क़त्रः (قطرہ) पु. ('अ.) (१) थेंब; बिंदू. (२) तुकडा. (३) घालवणे. **–ज़न** (زن –) वि. ('अ. + फ़ा.)

भरभर चालणारा; धावणारा; प्रत्येक गोष्टीत घाई करणारा.

क़त्ल (قتل) पु. ('अ.) कत्तल; हत्या; वध. **–गाह** (–گاہ) स्त्री. ('अ.+फ़ा.) वधस्थल; वधभूमी.

क़त्ल-ए-'अम्द (قتل عمد) पु. ('अ.) जाणूनबुजून, इरादापूर्वक केलेली हत्या.

क़त्ल-ए-'आम (قتل عام) पु. ('अ.) सरसहा कत्तल; संहार.

क़त्लों (قتلیٰ) पु. ['अ. 'क़तील' (قتیل) चे अनेक.] मारले गेलेले लोक; हुतात्मे.

कद (کد) स्त्री. ('अ.) (१) दुःख. (२) वैमनस्य. द्वेष. (३) प्रयत्न; परिश्रम. (४) हट्ट.

क़द (قد) पु. ('अ.) उंची; बांधा; आकार.

क़द-ओ-क़ामत (قد و قامت) पु. ('अ.) शरीराची ठेवण; बांधा; डौल.

क़द-ओ-क़ामत यार का समझा अंधेरी रात में।
धोके धोके में बहुत बोसे लि'ए शहतीर के॥

कद-ओ-काविश (کد و کاوش) स्त्री. (फ़ा.) धावपळ; मेहनत; परिश्रम.

क़दआवर (قدآور) वि. ('अ.+फ़ा.+तु.) उंचापुरा; धिप्पाड.

क़दग़न (قدغن) पु. (तु.) मनाई; ताकीद. **–ची** (–چی) पु. (तु.) प्रतिबंधक; अडविणारा.

कदबानू (کدبانو) स्त्री. (फ़ा.) गृहिणी; गृहस्वामिनी.

क़दम (قدم) पु. ('अ.) (१) पाऊल; पाय. (२) एका पावलाचे अंतर. (३) घोडघाच्या चालीचा एक प्रकार; दुडकी चाल. (याने घोडा दमत नाही). **–उठाकर चलना** (–اُٹھا کر چلنا) भरभर चालणे. **–चः** (–چہ) पु. ('अ.+फ़ा.) संडासातील पाय ठेवण्याचे दगड. **–चूमना** (–چومنا) अत्यंत आदर व्यक्त करणे. **–छूना** (–چھونا) चरण स्पर्श करून नमस्कार करणे. **–ब क़दम** (–بقدم) अव्य. (१) पावलांशी पाऊल जुळवून; बरोबरीने. (२) पावलापावलाने उन्नती करणे. **–बाज** (–باز) वि. ('अ.+फ़ा.) भरभर चालणारा; वेगवान. **–बोस** (–بوس) वि. ('अ.+फ़ा.) पायाचे चुंबन घेणारा; अत्यंत नम्र. **–बोसी** (–بوسی) स्त्री. ('अ.+फ़ा.) पादचुंबन; पादस्पर्श; नम्रता; मोठ्यांच्या भेटीस जाणे. **–रंजगी** (–رنجگی) स्त्री. ('अ.+फ़ा.) आगमन; पदार्पण. **–रंजः** (–رنجہ) वि. ('अ.+फ़ा.) पदार्पण करणारा; येणारा. **–ए-रसूल** (–رسول) पु. ('अ.) मुहम्मद साहेबांचे चरण, पदचिन्हे. **–ए-शरीफ़** (–شریف) पु. ('अ.) (१) शुभ चरण. (२) मुहम्मद साहेबांची पावले. **सब्ज़ क़दम** (سبز قدم) वि. (फ़ा.+'अ.) अशुभ पायाचा; पांढऱ्या पायाचा.

क़दर (قدر) स्त्री. ('अ.) (१) भाग्य; नशीब. (२) आदेश; हुकूम. (३) पराकाष्ठा. (४) अनुमान. (५) सामर्थ्य; शक्ती. **क़द्र अन्दाज़** (قدرانداز) वि. ('अ.+फ़ा.) नेमबाज; अचूक नेम मारणारा.

क़दह (قدح) पु. ('अ.) (१) प्याला; चषक. (२) मद्याचा पेला. **–कश** (–کش); **–ख्वार** (–خوار); **–नोश** (–نوش) वि. ('अ.+फ़ा.) मद्यपी; दारुडा

क़दा (قضا) स्त्री. ('अ.) (१) मृत्यू; मरण. (२) दैव; भाग्य. (३) न्याय; निवाडा. (४) वेळेवर न केलेली उपासना.

क़दा-ए-इलाही (قضاے الٰہی) स्त्री. ('अ.) स्वाभाविक मृत्यू.

क़दा-ए-नागहानी (قضاے ناگہانی) स्त्री. ('अ.+फ़ा.) आकस्मिक मृत्यू.

क़दा-ए-मुब्रम (قضاے مبرم) स्त्री. ('अ.) अटळ मृत्यू; अटळ दैव.

क़दा-ए-हाजत (قضاے حاجت) स्त्री. ('अ.) मलमूत्रत्याग; शौच; लघुशंका.

क़दा-ओ-क़द्र (قضا و قدر) स्त्री. ('अ.) ईश्वरी इच्छा; दैव. (सृष्टीच्या प्रारंभ-दिनी ईश्वराने साऱ्या विश्वासाठी घालून दिलेले नियम).

क़दाकार (قضا کار) अव्य. ('अ.+फ़ा.) (१) अकस्मात; अचानक. (२) योगायोगाने.

क़दामत (قدامت) स्त्री. ('अ.) प्राचीनत्व; जुनेपणा. **–परस्त** (–پرست); **–पसन्द** (–پسند) वि. ('अ.+फ़ा.) सनातनी; रुढिवादी; परंपराप्रिय.

क़दाया (قضایا) पु. ['अ. 'क़दिय:' (قضیہ) चे अनेक.] (१) झगडे; भांडणे. (२) हुकूम; आज्ञा. (३) वाक्ये; बातम्या. (४) दावे; फिर्यादी.

क़दिय: (قضیہ) पु. ('अ.) (१) भांडण; झगडा. (२) आदेश; हुकूम. (३) कज्जा; फिर्याद. (४) बातमी. **–दलाल** (–دلال) वि. कज्जेदलाल; भांडणे लावणारा. **–पाक होना** (–پاک ہونا) भांडण मिटणे.

कदिर (کدر) वि. ('अ.) मळकट; घाणेरडा; गलिच्छ.

क़दीब (قضیب) पु. ('अ.) (१) झाडाची फांदी. (२) पुरुषाचे जननेंद्रिय. (३) तलवार; हंटर. (४) रेल्वेचा रूळ.

क़दीम (قضیم) पु. ('अ.) (१) वैरण; चारा; चंदी. (२) क्षमाशील; सहनशील व्यक्ती.

क़दीम (قدیم) वि. ('अ.) **क़दीमानः** (قدیمانہ) वि. ('अ.+फ़ा.) **क़दीमी** (قدیمی) वि. ('अ.) जुना; प्राचीन; पुरातन; अनादी.

क़दीम-उल्-ऐयाम (قدیم الایام) वि. ('अ.) जुन्या काळचा; पुरातन.

क़दीर (قدیر) वि. पु. ('अ.) सर्वशक्तिमान; ईश्वर.

कद्दू (کدو) पु. (फ़ा.) (१) मद्यचषक; दारूची बाटली. (२) दुध्या भोपळा, कडू भोपळा (वाळलेला) **–कश** (–کش) पु. (फ़ा.) किसणी.

कदेवर (کدیور) पु. (फ़ा.) (१) शेतकरी; माळी. (२) गृहस्वामी.

कदः (کدہ) पु. (फ़ा.) घर; स्थान; आलय. [उदा. 'मैकदः' (میکدہ) मंदिरालय].

क़द्द-ए-आदम (قد آدم) वि. ('अ.) पुरुषभर उंचीचा; माणसाच्या आकाराचा.

कद्दू (کدو) पु. ('अ.) पाहा 'कद्दू'. **–दानः** (–دانہ) पु. पोटात होणारे अळ्यासारखे बारीक पांढरे किडे. (हे शौचावाटे बाहेर पडतात).

क़द्र (قدر) स्त्री. ('अ.) (१) मान; प्रतिष्ठा. (२) किंमत; मूल्य. (३) आदर; सत्कार. (४) कदर; पारख. (५) मात्रा; परिमाण. **–दाँ** (–داں); **–दान** (–دان) वि. ('अ.+फ़ा.) गुणग्राहक; कदर करणारा; मूल्य ओळखणारा. **–दानी** (–دانی) स्त्री. ('अ.+फ़ा.) गुणग्राहकता. **–ओ-मंज़िलत** (–و منزلت) स्त्री. ('अ.) प्रतिष्ठा; इज्जत. **–शनास** (–شناس) वि. ('अ. + फ़ा.) गुणज्ञ; गुणग्राहक. **इस क़द्र** (اس قدر) अव्य. (हिं.) इतका; असा. **किसी क़द्र** (کسی قدر) अव्य. (हिं.) थोडेसे; अल्प.

क़द्रे (قدرے) वि. ('अ.) थोडासा; अल्प; किंचित.

कन (کن) प्रत्य. (फ़ा.) खोदणारा; खणणारा. (कोहकन पर्वत खोदणारा). ['कंदन' (کندن) खोदणे या फारसी क्रियापदाचे आज्ञार्थक रूप, खोद].

कन'आँ (کنعاں); **कन'आन** (کنعان) पु. ('अ.) (१) यहुद्यांचा देश; पॅलेस्टाईन. (२) हजरत नूह (नोहा) यांचा नातू ('हाम' चा मुलगा. हा नास्तिक होता).

कनफ़ (کنف) पु. ('अ.) (१) किनारा. (२) बाजू. (३) शरण.

क़ना'अत (قناعت) स्त्री. ('अ.) संतोष; समाधान; अल्पसंतुष्टता. **–गुज़ी** (–گزیں) ('अ.+फ़ा.) **–शि'आर** (–شعار) वि. ('अ.) जे काही मिळेल त्यात समाधान मानणारा; अल्पसंतुष्ट.

क़नात (قنات) स्त्री. (तु.) तंबूची कापडी भिंत किंवा त्याच्या भोवतालचा कापडी पडदा, कनात.

क़नादील (قنادیل) स्त्री. ['अ. क़ंदील' (قندیل) चे अनेक.] दिवे; कंदील.

कनानः (کنانہ) वि. ('अ.) पुरातन; जीर्ण; जुनाट.

कनार (کنار) पु. स्त्री. (फ़ा.) (१) मांडी; कंस. (२) किनारा. (३) कुशीत झोपणे. **–गरम होना** (–گرم ہونا) एकत्र झोपणे.

कनारः (کنارہ) पु. (फ़ा.) (१) किनारा; तट. (२) कोपरा; कोना. (३) समास; मार्जिन. (४) टोक; शेवट. (५) एकांत. (६) पदर; काठ. **–करना** (–کرنا); **–खींचना** (–کھینچنا) दूर होणे; अलग होणे. **–कश** (–کش) वि. (फ़ा.) (१) अलग; दूर राहाणारा; फटकून राहाणारा. (२) एकांतवासी.

कनिंदः (کنندہ) वि. (फ़ा.) खोदणारा; खणणारा.

कनिश (کنش) स्त्री. (फ़ा.) द्वेष; वैमनस्य.

कनीज़ (کنیز) स्त्री. (फ़ा.) दासी; मोलकरीण.

कनीफ़ (کنیف) पु. ('अ.) (१) शौचकूप. (२) स्नानगृह. (३) तळघर.

क़नूत (قنوط) वि. ('अ.) निराश; नाउमेद

क़नूती (قنوطی) वि. ('अ.) निराशावादी.

कनूद (کنود) वि. ('अ.) कृतघ्न.

क़न्नाद (قناد) पु. ('अ.) (१) हलवाई. (२) साखर बनविणारा. **–ख़ानः** (–خانہ) पु. ('अ.+फ़ा.) (१) हलवायाचे दुकान. (२) साखरेचा कारखाना.

कन्नास (کناس) पु. ('अ.) (१) भंगी; झाडूवाला. (२) फाशी देणारा: मांग.

कन्पक (کنپک) पु. ('अ.) कांबळे; घोंगडी; गोधडी.

कन्फ़ (کنف) पु. ('अ.) (१) देखरेख करणे. (२) मदत करणे.

कपी (کپی) पु. (फ़ा.) वानर; कपी.

कफ़ (کف) पु. (फ़ा.) (१) फेस. (२) हातापायाचा तळवा; शटंचा कफ. (३) थुंकी; कफ; श्लेष्मा.

कफ़ (کف) पु. ('अ.) (१) हाताचा किंवा पायाचा तळवा; पंजा. (२) रोखणे; बंद करणे.

पहचानि'ए तो किसका यह नक़्श-ए-कफ़-ए-पा है।
अक्सीर उठा लाया दुश्मन की गली से मैं ॥

कफ़-ए-अफ़सोस मलना (کف افسوس ملنا) पश्चात्तापाने हात चोळत बसणे.

कफ़-ए-दस्त (کف دست) पु. (फ़ा.) हाताचा तळवा; करतल.

कफ़-ए-पा (کف پا) पु. (फ़ा.) पायाचा तळवा; पदतल.

कफ़-ए-मार (کف مار) पु. (फ़ा.) सापाचा फणा.

कफ़क (کفک) स्त्री. (फ़ा. + 'अ.) (१) तळवा. (२) पाणी व साबण यांचा फेस. (३) मेंदी लावलेला पायाचा अथवा हाताचा तळवा.

कफ़गीर (کفگیر) पु. स्त्री. (फ़ा.) (१) चमचा; डाव. (२) उलथणे. (३) झारा.

कफ़चः (کفچہ) पु. (फ़ा.) (१) चमचा. (२) उलथणे. (३) सापाचा फणा.

कफ़तार (کفتار) पु. (फ़ा.) (१) तरस. (२) रानमांजर; ऊद.

कफ़न (کفن) पु. ('अ.) प्रेतावर घातलेले वस्त्र. **–खसोट** (–کھسوٹ); **–चोर** (–چور) पु. ('अ. + हिं.) प्रेतावरील वस्त्र चोरणारा; अट्टल चोर; निर्दय. **–दुज़्द** (–دزد) पु. ('अ.+फ़ा.) प्रेतावरील वस्त्र चोरून त्यावर उपजीविका चालविणारा; बेइमानी. **–फाड़ कर बोलना** (–پھاڑ کر بولنا) भयंकर जोराने ओरडणे; अचानक किंकाळी फोडणे. **–सर से बांधना** (–سر سے باندھنا) जिवावर उदार होणे; तळहातावर शिर घेणे.

कफ़नी (کفنی) स्त्री. (फ़ा.) (१) प्रेताच्या गळ्यात घालावयाचा बिनबाह्यांचा अंगरखा. (२) साधूची कफनी. (३) मुलाचे झबले.

कफ़पा'ई (کف پائی) पु. स्त्री. (फ़ा.+हिं.) चप्पल; स्लीपर (विशेषतः बायकांचे).

कफ़रः (کفرہ) पु. ['अ. 'काफ़िर' (کافر) चे अनेक.] नास्तिक लोक.

क़फ़स (قفس) पु. ('अ.+फ़ा.) (१) पिंजरा; सापळा. (२) तुरुंग. (३) देह. **–आशना** (–آشنا) वि. ('अ. + फ़ा.) ज्याला पिंजऱ्यात राहाण्याची सवय झालेली आहे असा; तुरुंगात जाऊन आलेला.

कफ़ा (کفا) पु. (फ़ा.) (१) दुःख. (२) परिश्रम. (३) जुलूम.

क़फ़ा (قفا) पु. स्त्री. ('अ.) मागील भाग; पाठ.

कफ़ाफ़ (کفاف) पु. ('अ.) (१) अनुमान; अंदाज. (२) रोजमुरा; निर्वाह.

कफ़ालत (کفالت) स्त्री. ('अ.) (१) जामीन; हमी; जामीनकी; प्रतिभूती. (२) जबाबदारी. **–उल्-माल** (–المال) स्त्री. आर्थिक जामीन. **–नामः** (–نامہ) पु. ('अ. + फ़ा.) जामीनपत्र; प्रतिभूती पत्र. **–ब्रि'न्-नफ़्स** (–بالنفس) पु. ('अ.) वैयक्तिक जामीन.

कफ़ील (کفیل) पु. ('अ.) (१) जामीन; प्रतिभू. (२) पालक.

कफ़ूर (کفور) वि. ('अ.) कृतघ्न.

क़फ़्क़ाज़ (قفقاز) पु. (फ़ा.) कॉकेशिया.

कफ़्तः (کفتہ) वि. (फ़ा.) फाटलेला; विदीर्ण.

कफ़्फ़ारः (کفارہ) पु. ('अ.) पापाचे प्रायश्चित्त.

क़फ़्फ़ाल (قفال) पु. ('अ.) कुलुपे बनविणारा, विकणारा.

कफ़्श (کفش) स्त्री. (फ़ा.) पादत्राण; चप्पल; जोडा. **–कार** (–کار); **–गर** (–گر); **–दोज़** (–دوز) पु. (फ़ा.) जोडे बनविणारा चांभार. **–खानः** (–خانہ) (फ़ा.) गरिबाचे घर (स्वतःच्या घरासंबंधी बोलताना वापरावयाचा शब्द). **–बरदार** (–بردار) पु. (फ़ा.) जोडे उचलणारा; विनम्र; श्रद्धावान.

कफ़्श-ए-पा (کفش پا) स्त्री. (फ़ा.) पादत्राण.

कबक (کبک) पु. (फ़ा.) चकोर (पक्षी).

क़बक़ (قبق) पु. (तु.) दुध्या भोपळा.

क़बक़ अन्दाज़ (قبق انداز); **क़बक़ अफ़गन** (قبق افگن) नेमबाज; अचूक नेम मारणारा.

क़बद (قبض) पु. ('अ.) पोटातील मुरडा; कळ.

क़बा (قبا) स्त्री. ('अ.) लांब; ढिला अंगरखा; झगा; गाउन. **–दोज़** (–دوز) पु. ('अ. + फ़ा.) गाउन शिवणारा.

क़बा'इल (قبائل) पु. ['अ. 'क़बीलः' (قبیلہ) चे अनेक.] कुटुंबे; जमाती; टोळ्या.

क़बा'इली (قبائلی) वि. ('अ.) पाकिस्तान व अफगाणिस्तान यांच्या सरहद्दीवरील जमाती; टोळ्या.

क़बाचः (قباچہ) स्त्री. ('अ.) लहान झगा; छोटा गाउन.

कबाब (کباب) पु. (फ़ा.) (१) विस्तवावर सळईच्या सहाय्याने भाजलेले मांस. (२) कढईत तळलेले मांसाचे गोल तुकडे.

कबाबचीनी (کباب چینی) स्त्री. (फ़ा.) कंकोळ; कापुरचिनी.

कबाबी (کبابی) पु. (फ़ा.) (१) कबाब बनविणारा; विकणारा. (२) मांसाहारी.

क़बालः (قبالہ) पु. ('अ.) (१) खरेदीपत्र; विक्रीपत्र. (२) मालकी हक्काचे कागदपत्र. **–नवीस** (–نویس) पु. ('अ. + फ़ा.) दस्तऐवज लिहिणारा.

क़बाह (قباح) पु. ('अ.) निकृष्ट; खराब होणे.

क़बाहत (قباحت) स्त्री. ('अ.) (१) दोष; बिघाड, वाईटपणा. (२) आपत्ती; अडथळा; अडचण.

कबिद (کبد) पु. ('अ.) (१) काळीज. (२) यकृत.

कबीदः (کبیدہ) वि. (फ़ा.) (१) दुहेरी; तुकडे केलेला. (२) दुःखी; पीडित. **–ख़ातिर** (–خاطر) वि. (फ़ा.+'अ.) विमनस्क; दुःखी.

कबीर (کبیر) वि. ('अ.) श्रेष्ठ; महान; उत्तम; मोठा.

कबीरः (کبیرہ) पु. ('अ.) महापातक. (स्त्री.) मोठी, श्रेष्ठ स्त्री.

क़बील (قبیل) पु. ('अ.) (१) कबूल करणारा. (२) दल; समुदाय. (३) प्रकार. (फ़ा.) पती.

क़बीलः (قبیلہ) पु. ('अ.) (१) वंश; गोत्र; घराणे. (२) टोळी; जमात. (३) जात. (४) पत्नी; परिवार; कुटुंब.

क़बीसः (کبیسہ) पु. ('अ.) (१) मातीने भरलेली विहीर अथवा नदी. (२) अधिक मास; धोंड महिना.

क़बीह् (قبیح) वि. ('अ.) (१) निकृष्ट; खराब. (२) कुरूप. (३) लज्जास्पद.

कबूतर (کبوتر) पु. (फ़ा.) पारवा; कबुतर; कपोत. **–खानः** (–خانہ) (१) खुराडे (२) लोकांच्या येण्याजाण्याचे स्थान. **–बाज़** (–باز) कबुतरे पाळणारा; उडविणारा.

कबूद (کبود) पु. (फ़ा.) फिकट निळा रंग; अस्मानी रंग.

कबूदी (کبودی) वि. (फ़ा.) निळा; अस्मानी; निळसर.

क़बूल (قبول) वि. ('अ.) मान्य; स्वीकृत; मंजूर; पसंत; कबूल. **–ख़त** (–خط) पु. ('अ.) कबुलायत; करारपत्र. **–सूरत** (–صورت) वि. ('अ.) सुंदर; मोहक; प्रियदर्शन.

क़बूल-ए-'आम (قبول عام) वि. ('अ.) सर्वसामान्य; लोकप्रिय.

क़बूलियत (قبولیت) स्त्री. ('अ.) (१) स्वीकृती; मान्यता. (२) कबुलायत; दस्तऐवज; करारपत्र.

क़बूली (قبولی) स्त्री. ('अ.) (१) हरभऱ्याची डाळ घालून केलेला पुलाव किंवा खिचडी. (२) कबुली; स्वीकृती.

क़बूह् (قبوح) वि. ('अ.) निकृष्ट; खराब.

कब्क (کبک) पु. (फ़ा.) चकोर (पक्षी).

कब्क-ए-दरी (کبک دری) पु. (फ़ा.) डोंगरी चकोर. (याची चाल मोठी सुंदर असते).

क़ब्ज़ (قبض) पु. ('अ.) (१) मलावरोध; बद्धकोष्ठ. (२) पकड; अधिकार; कबजा. **–अल्-वसूल** (–الوصول) पु. ('अ.) पावती; पगार मिळाल्याच्या सह्या असलेले नोकरांचे रजिस्टर.

क़ब्ज़ियत (قبضیت) स्त्री. ('अ.) मलावरोध; शौचास साफ न होणे.

क़ब्ज़ः (قبضہ) पु. ('अ.) (१) ताबा; अधिकार. (२) मूठ (अवजाराची) (३) बिजागरी; सांधेपट्टी.

क़ब्र (قبر) स्त्री. ('अ.) क़बर; थडगे; प्रेत पुरण्यासाठी खोदलेला खड्डा अथवा त्यावर बांधलेला चवुतरा. **–पर क़ब्र नही बनती** (–پر قبر نہیں بنتی) कर्जावर कर्ज मिळत नसते. **–में पांव लटकाना** (–میں پاؤں لٹکانا) मरावयास टेकणे.

क़ब्रस (قبرس) पु. ('अ.) सायप्रस (बेट).

क़ब्रिस्तान (قبرستان) पु. ('अ. + फ़ा.) स्मशान; कबरस्थान.

क़ब्ल (قبل) वि. ('अ.) पहिला; आधीचा. (अव्य.) आधी; पूर्वी. **–अज़ वक़्त** (–از وقت) अव्य. ('अ.+फ़ा.) योग्य ठरलेल्या वेळेच्या आधी; अवेळी. [म्हण : **क़ब्ल अज़ मर्ग वावैला** (قبل از مرگ واویلا) संकट येण्यापूर्वीच आरडाओरडा सुरू करणे.] **–अज़ीं** (–ازیں) अव्य. ('अ.+फ़ा.) यापूर्वी. **–अल्-वुक़ू'अ** (–الوقوع) अव्य. ('अ.) घटनेपूर्वी.

कमंद (کمند) स्त्री. (फ़ा.) जंगली पशू पकडण्याची सरक फासाची दोरी; जाळे; घोरपडीला बांधलेला दोर (उंच जागी चढण्यासाठी वापरवयाचा; घोरपड घट्ट चिकटून बसते).

क़िस्मत की देखो खूबी टूटी कहाँ कमंद।
दो चार हाथ जब कि. लब-ए-बाम रह गया॥

–अन्दाज़ (–انداز) वि. (फ़ा.) जाळे फेकणारा.

कम (کم) वि. ('अ.) (१) किती. (२) पुष्कळ; अधिक.

कम (کم) वि. (फ़ा.) (१) अल्प; थोडा; कमी. (२) विहीन. **–'अक़्ल** (–عقل) वि. (फ़ा.+'अ.) निर्बुद्ध; मूर्ख. **–अज़ कम** (–ازکم) अव्य. (फ़ा.) कमीत कमी; निदानरहित. **–अस्ल** (–اصل); **–ज़ात** (–ذات) वि. (फ़ा.+'अ.) (१) संकरज; अनौरस; अकुलीन. (२) नीच; हलका. **–आज़ार** (–آزار) वि. (फ़ा.) कमी त्रास देणारा. **–आमेज़** (–آمیز); **–इख़्तिलात** (–اختلاط) वि. (फ़ा.) माणूसघाणा; एकलकोंडा; संकोची; आतल्या गाठीचा; न मिसळणारा. **–'एयार** (–عیار) वि. (फ़ा.+'अ.) हिणकस (सोने, चांदी); वाईट (व्यक्ती). **–'इल्म** (–علم) वि. (फ़ा.+'अ.) कमी शिकलेला; अल्पज्ञ. **–'उम्र** (–عمر) वि. (फ़ा. + 'अ.) अल्पवयस्क; लहान. **–औक़ात** (–اوقات); **–क़द्र** (–قدر) वि. (फ़ा + 'अ. तुच्छ; महत्त्व, पत नसलेला. **–कम** (–کم) अव्य. (फ़ा.) थोडाथोडा; हळूहळू. **–क़ीमत** (–قیمت) वि. (फ़ा.+'अ.) कमी किमतीचा; स्वस्त. **–क़ुव्वत** (–قوت) वि. (फ़ा. + 'अ.) कमकुवत; दुबळ; कमजोर. **–ख़र्च** (–خرچ) वि. (फ़ा.) काट-कसरी; मितव्ययी. **–ख़र्ची** (–خرچی) स्त्री. (फ़ा.) काटकसर; मितव्यय. **–ख़ोर** (–خور) वि. (फ़ा.) कमी खाणारा; मिताहारी. **–ख़्वाब** (–خواب) वि. (फ़ा.) कमी झोपणारा. **–गो** (–گو) वि. (फ़ा.) मितभाषी. **–ज़न** (–زن) वि. (फ़ा.) कमी हिम्मत असलेला; भित्रा. **–ज़र्फ़** (–ظرف) वि. (फ़ा.+'अ.) (१) नीच; तुच्छ. (२) हलक्या जातीचा. (३) संकुचित; अनुदार. **–ज़िहन** (–ذہن) वि. (फ़ा. + 'अ.) (१) निर्बुद्ध. (२) विसराळू. **–ज़ोर** (–زور) वि.

(फ़ा.) दुबळा; अशक्त. **–ज़ोरी** (زوری –) स्त्री. (फ़ा.) दुर्बळता; अशक्तपणा. **–तर** (تر –) वि. (फ़ा.) पुष्कळ कमी; लहान. **–तरीन** (ترین –) वि. (फ़ा.) अत्यंत कमी; तुच्छ. (बोलणारी व्यक्ती, आपली नम्रता व्यक्त करण्यासाठी स्वत:करिता या शब्दाचा प्रयोग करते). **–तवज्जुही** (توجہی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) दुर्लक्ष; उपेक्षा. **–तालि'अ** (طالع –); **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) भित्रा; भ्याड; कचखाऊ. **–नज़र** (نظر –) वि. (फ़ा.+'अ.) दृष्टी अधू असलेला. **–नसीब** (نصیب –) वि. (फ़ा. + 'अ.) दुर्दैवी; अभागी. **–निगही** (نگہی –); **–निगाही** (نگاہی –) स्त्री (फ़ा.) (१) उपेक्षा; दुर्लक्ष; बेपर्वाई. (२) कृपणता. **–पायगी** (پایگی –) स्त्री. (फ़ा.) पदवी, हुद्दा वगैरे बाबतीत कमी असलेला. **–पायः** (پایہ –) वि. (फ़ा.) ज्याच्याजवळ विशेष पदवी अथवा सन्मान नाही असा. **–फ़हम** (فہم –) वि. (फ़ा.+'अ.) अल्पबुद्धी; मूर्ख; अडाणी; अर्धवट. **–फ़ुर्सत** (فرصت –) वि. (फ़ा.+'अ.) सवड नसलेला; कार्यव्याप्त. **–बख़्त** (بخت –) वि. (फ़ा.) दुर्दैवी; अभागी. **–बख़्ती** (بختی –) स्त्री. (फ़ा.) दुर्दैव; दुर्भाग्य. **–बीं** (بیں –) वि. (फ़ा.) अल्पदृष्टी; अदूरदर्शी; संकुचित. **–बीनी** (بینی –) स्त्री. (फ़ा.) (१) कमी दिसणे. (२) अनुदारता; अदूरदर्शित्व. **–मश्क़** (مشق –) वि. (फ़ा. + 'अ.) नवशिक्या; अनभ्यस्त. **–मायगी** (مایگی –) स्त्री. (फ़ा.) निर्धनता; पत नसणे. **–मायः** (مایہ –) वि. (फ़ा.) (१) निर्धन. (२) नीच; क्षुद्र. **–याब** (یاب –) वि. (फ़ा.) दुर्मिळ; दुष्प्राप्य. **–याबी** (یابی –) स्त्री. (फ़ा.) दुर्मिळता; चणचण. **–रसी** (رسی –) स्त्री. (फ़ा.) शिक्षण वा विद्वत्ता यांची उणीव, अभाव. **–रू** (رو –) वि. (फ़ा.) कुरूप; उच्च स्थानावर न शोभणारा. **–रौ** (رو –) वि. (फ़ा.) मंद; सावकाश चालणारा. **–संज** (سنج –) वि. (फ़ा.) कमी वजन करणारा; दांडी मारणारा. **–साल** (سال –); **–सिन** (سن –) वि. (फ़ा.+'अ.) अल्पवयस्क; लहान. **–सुख़न** (سخن –) वि. (फ़ा.) कमी बोलणारा; अबोल; मितभाषी. **–हरकत** (حرکت –) वि. (फ़ा.+'अ.) सुस्त; आळशी. **–हिम्मत** (ہمت –) वि. (फ़ा. + 'अ.) धाडस नसलेला; भित्रा. **–हैसियत** (حیثیت –) (वि.) (फ़ा.+'अ.) (१) पत नसलेला. (२) अप्रतिष्ठित. (३) अकुलीन. **–हौसलः** (حوصلہ –) वि. (फ़ा.+'अ.) हिम्मत नसलेला; भ्याड.

कम-ओ-बेश (کم و بیش) वि. (फ़ा.) थोडेबहुत; कमीअधिक.

कमख़्वाब (کمخواب) पु. (फ़ा.) किनखाबाचे कापड; जरीच्या वेलबुट्टीचे काम केलेले रेशमी कापड.

क़मची (قمچی) स्त्री. (तु.) (१) कामटी; लवचिक छडी; चाबूक. (२) डहाळी.

कमर (کمر) स्त्री. (फ़ा.) (१) कंबर; कटी. (२) प्रत्येक वस्तूचा मधला भाग. **–बन्द** (بند –) पु. (फ़ा.) (१) कंबरपट्टा; कमरेला बांधावयाचे कापड. (२) विजारीची नाडी. (वि.) कंबर कसून तयार; उद्यत. **–बस्तः** (بستہ –) वि. (फ़ा.) कटिबद्ध; बद्धपरिकर; तयार; सन्नद्ध. **–शिकस्तः** (شکستہ –) वि. (फ़ा.) ज्याची कंबर मोडली आहे असा; निराधार.

क़मर (قمر) पु. ('अ.) (१) चंद्र. (२) चांदी (रसायनशास्त्र). **–तल्'अत** (طلعت –) वि. ('अ.) चंद्रासारखी प्रभा असलेला; चंद्रकांत. **–पैकर** (پیکر –) वि. ('अ. + फ़ा.) चंद्रासारखे शरीर असणारी; चंद्रांगना.

क़मरी (قمری) वि. ('अ.) (१) चंद्राशी संबंधित. (२) चांद्रमास.

क़मरैन (قمرین) पु. ('अ.) चंद्र-सूर्य.

कमरः (کمرہ) पु. खोली.

क़मल (قمل) पु. केसांत किंवा कपडयांत उवा पडणे.

कमां (کماں); **कमान** (کمان) स्त्री. (फ़ा.) (१) धनुष्य. (२) कमान, महिराप. (३) सारंगी वाजविण्याचा गज; धनुकली; बो. (४) इंद्रधनुष्य. **–अंदाज़** (انداز –) पु. (फ़ा.) धनुर्धर; तिरंदाज. **–अबू** (ابرو –) वि. बाकदार व मोहक भुवया असणारा-री. (स्त्री.) प्रेमिका; प्रेयसी. **–कश** (کش –) वि. (फ़ा.) धनुष्य खेचणारा; धनुर्धारी. **–गर** (گر –) वि. (फ़ा.) धनुष्य बनविणारा; धनुष्कार. **–गीर** (گیر –) वि. पु. (फ़ा.) धनुर्धर; तिरंदाज. **–गुरोह** (گروہ –) स्त्री. (फ़ा.) गलोल; गोफण. **–चः** (چہ –) पु. (फ़ा.) (१) लहान धनुष्य; धनुकली. (२) कमानदार छप्पर. (३) स्प्रिंग. **–जोलः** (جولہ –) पु. (फ़ा.) धनुष्य अडकविण्याचा गळधातील चामडधाचा पट्टा. **–दार** (دار –) पु. (फ़ा.) धनुर्धर. (वि.) कमान असलेला; बाकदार. **–पुश्त** (پشت –) वि. (फ़ा.) कुबडा. **–बरदार** (بردار –) वि. (फ़ा.) धनुष्य घेऊन चालणारा; धनुर्धर.

कमान-ए-शैतां (کمان شیطاں) स्त्री. (फ़ा.) इंद्रधनुष्य.

कमानी (کمانی) स्त्री. (फ़ा.) (१) स्प्रिंग. (२) सारंगी वाजविण्याचा गज. (३) अंतर्गळाच्या आजारात कमरेला बांधावयाचा पट्टा. (४) गिरमीट चालविण्याचे सुताराचे अवजार.

कमाल (کمال) पु. ('अ.) (१) पूर्णता. (२) नैपुण्य; कौशल्य; योग्यता. (३) गुण; वैशिष्ट्य; खुबी. (४) विद्वत्ता. (५) कारागिरी; कला. (६) अद्भुत

काम; चमत्कार. (७) आधिक्य. (८) चलाखी; धूर्तपणा. [अनेक 'कमालात' (کمالات)].

कमाहूक्कहु (کماحقہ) वि. ('अ.) अगदी बरोबर; हूबेहूब; सुयोग्य.

कमी (کمی) स्त्री. (फ़ा.) (१) उणीव; कमतरता; न्यूनता. (२) हानी; तोटा. **-बेशी** (بیشی -) स्त्री. (फ़ा.) अधिकउणे; कमीजास्त.

कमीन (کمین) पु. स्त्री. ('अ.) (१) दबा; दबा धरून बसणे. (२) लपून बसण्याचे स्थान. **-गाह** (گاہ -) स्त्री. ('अ. + फ़ा.) शिकारीसाठी दबा धरून बसण्याची जागा.

कमीन (کمین) वि. (फ़ा.) (१) थोडा; कमी. (२) पतित.

कमीनः (کمینہ) वि. (फ़ा.) नीच; हलकट; क्षुद्र. **-पन** (پن -) पु. (फ़ा.+हिं.) नीचपणा; क्षुद्रता.

क़मीस़ (قمیص) स्त्री. ('अ.) सदरा; शर्ट; खमीस.

कमून (کمون) पु. ('अ.) जिरे.

कमूनी (کمونی) स्त्री. ('अ) ज्यात जिरे आहे असा अवलेह. (माजूनकमूनी-जीरकावलेह).

क़मूस (قموس) पु. ('अ.) अत्यंत खोल विहीर.

कम्मियत (کمیت) स्त्री. ('अ.) मात्रा; प्रमाण.

कम्मी (کمی) वि. ('अ.) शूर; वीर.

कम्मून (کمون) पु. ('अ.) जिरे.

क़म्ल (قمل) स्त्री. ('अ.) ऊ.

कयां (کیاں) पु. [फ़ा. 'कै' (کے) चे अनेक.] राजे; सम्राट; इराणात झालेले चार सम्राट; कैकाऊस; कैखुसरौ; कैकुबाद; कैलोहास्व.

कयानी (کیانی) वि. (फ़ा.) 'कयां' (सम्राटां) शी संबंधित.

क़य्यूम (قیوم) वि. ('अ.) (१) कायमचा; अविनाशी; कायम ठेवणारा. (२) परमेश्वराचे एक नाव.

क़य्यूर (قیور) वि. ('अ.) ज्याच्या कुळाची माहिती नाही असा; अज्ञात कुलशील; संकरज.

क़रंतीनः (قرنطینہ) पु. ('अ.) क्वारंटाइन; साथीच्या रोगापासून सावधगिरी म्हणून जहाजाला किंवा माणसांना काही दिवस वेगळे ठेवणे.

कर (کر) वि. (फ़ा.) बहिरा.

कर (کر) पु. (फ़ा.) (१) शक्ती. (२) उद्दिष्ट. **-ओ-फ़र** (و فر -) थाटमाट; रुबाब; भव्यता.

करख़्त (کرخت) वि. (फ़ा.) कठोर; कडक. **-गी** (گی -) स्त्री. (फ़ा.) कठोरता.

करगदन (کرگدن) पु. (फ़ा.) गेंडा (पशू).

करगस (کرگس) पु. (फ़ा.) (१) गिधाड. (२) बाण.

करगह (کرگہ) पु. (फ़ा.) (१) माग (विणण्याचा). (२) मागाच्या खालची पाय ठेवण्याची जागा, खड्डा.

क़रनफ़ल (قرنفل) स्त्री. ('अ.) कर्णफूल; कानातील चमकी (दागिना) (संस्कृत 'कर्णफुल्ल' पासून बनलेला हा शब्द अरबी भाषेत दीड हजार वर्षांपासून प्रचलित आहे).

करब (کرب) पु. ('अ.) दुःखी राहणे; कष्टी होणे.

करम (کرم) पु. ('अ.) (१) दया; कृपा. (२) औदार्य. **-गुस्तर** (گستر -) वि. ('अ. + फ़ा.) दयाळू; कृपाळू. **-फ़रमा** (فرما -) वि. ('अ. + फ़ा.) (१) कृपाळू. (२) मित्र. (३) आगमन करणारा.

करमकल्ला (کرم کلا) पु. (फ़ा.) कोबी; कोबीचा गड्डा.

करां (کراں); **करान** (کران) पु. (फ़ा.) (१) किनारा. (२) काठ. (३) सीमा.

क़रा (قرا) पु. (तु.) काळा रंग.

क़रा'इन (قرائن) पु. [अ. 'करीनः' (قرینہ) चे अनेक.] (१) लक्षणे; अनुमाने. (२) पद्धती. (३) शिष्टाचार.

क़राक़िर (قراقر) पु. ('अ.) पोटातील गुरगुर.

क़राबत (قرابت) स्त्री. ('अ.) (१) सामीप्य; सानिध्य. (२) नाते; संबंध. **-दार** (دار -) वि. ('अ.+फ़ा.) नातेवाईक; स्वजन. **-दारी** (داری -) स्त्री. ('अ.+फ़ा.) नाते; संबंध.

क़राबत-ए-क़रीबः (قرابت قریبہ) स्त्री. ('अ.) जवळचे नाते.

क़राबादिन (قرابادین) पु. स्त्री. (तु.) युनानी वैद्यकीतील औषधांची माहिती देणारा ग्रंथ; निघंटु.

क़राबीन (قرابین) स्त्री. (तु.) कडाबीन; तोडघाची बंदूक; रुंद तोंडाची आखूड बंदूक.

क़राबः (قرابہ) पु. ('अ.) वनस्पतीचे अर्क वगैरे माठवून ठेवण्याचे काचेचे मोठे भांडे; मद्याची सुरई; खूप मोठी वाटली. **-कश** (کش -); **-नोश** (نوش -) वि. ('अ.+फ़ा.) मद्यपी; सुरईभर दारू पिणारा; दारुडा.

करामत (کرامت) स्त्री. ('अ.) (१) चमत्कार; अद्भुत कार्य. (२) कृपा. (३) प्रतिष्ठा. **-नामः** (نامہ -) पु. ('अ.+फ़ा.) कृपापत्र.

करामात (کرامات) स्त्री. ['अ. 'करामत' (کرامت) चे अनेक.] (१) अनेक चमत्कार. (२) वैशिष्ट्ये; खुब्या.

करामाती (کراماتی) वि. ('अ.) (१) चमत्कार करणारा; सिद्धपुरुष. (२) जादूगार. (३) धूर्त; फसवा.

क़रार (قرار) पु. ('अ.) (१) स्थैर्य. (२) शांतता. (३) सांत्वन. (४) धैर्य; धीर. (५) आराम; स्वस्थता. (६) वायदा; करार; प्रतिज्ञा. **–दाद** (داد –) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) ठराव; प्रस्ताव. (२) निश्चय. (३) आधी ठरविलेला हुंडा. **–मदार** (مدار –) पु. ('अ.) वचन; आणभाक. **बोलो** (विशेषत: स्त्रिया हा शब्द वापरतात). **–ए-वाक़ई** (واقعی –) अव्य. ('अ.) पूर्णपणे; निश्चितपणे.

क़रारी (قراری) वि. ('अ.) नक्की केलेले; ठरविलेले.

क़रावल (قراول) पु. (तु.) (१) आंघाडीवरील शिपाई. (२) सैनिक. (३) पहारेकरी. (४) बंदूक चालविणारा. (५) शिकारी. (६) घोडेस्वार.

कराहत (کراهت); **कराहियत** (کراهیت) स्त्री. ('अ.) (१) घृणा; तिरस्कार. (२) अरुची; नापसंती. (३) उदासीनता; अप्रसन्नता.

क़री (قریں); **क़रीन** (قرین) वि. ('अ.) (१) जवळचा. (२) युक्त; सुसंगत. (अव्य.) जवळ; निकट. (पु.) सोबती; सखा; सभासद.

क़रीन-ए-'अक़्ल (قرین عقل) वि. ('अ.) बुद्धिगम्य; बुद्धिग्राह्य; तर्कसंगत.

क़रीन-ए-इन्साफ़ (قرین انصاف) वि. ('अ.) न्यायोचित; न्यायसंगत.

क़रीन-ए-क़ियास (قرین قیاس) वि. ('अ.) अनुमानगम्य; ज्ञानगम्य.

क़रीन-ए-मस्लिहत (قرین مصلحت) वि. ('अ.) योग्य; उचित; उपयुक्त.

क़रीनः (قرینہ) पु. ('अ.) (१) तऱ्हा; पद्धती. (२) क्रम. (३) योग्यता. (४) अक्कल; बुद्धी. (५) अनुमान.

क़रीब (قریب) अव्य. ('अ.) (१) जवळ; निकट; समीप. (२) सुमारे; जवळजवळ. **–तर** (تر –) वि. ('अ.+फ़ा.) अधिक जवळचा; निकट.

क़रीब-उल्-इख़्तिताम (قریب الاختتام) वि. ('अ.) संपावयास आलेला; समाप्तप्राय.

क़रीब-उल्-इनहिदाम (قریب الانہدام) वि. ('अ.) पडावयास आलेला; भग्नप्राय; नष्टप्राय.

क़रीब-उल्-ख़त्म (قریب الختم) वि. ('अ.) (१) समाप्तप्राय. (२) मरणासन्न.

क़रीब-उल्-फ़हम (قریب الفہم) वि. ('अ.) सुबोध; समजण्यासारखा.

क़रीब-उल्-मर्ग (قریب المرگ); **करीब-उल्-मौत** (قریب الموت) वि. ('अ.) मृतप्राय; मरणासन्न.

करीम (کریم) वि. ('अ.) (१) कृपाळू; दयाळू. (२) दानी; उदार. (पु.) ईश्वराचे एक विशेषण; ईश्वर.

करीम-उन्-नफ़्स (کریم النفس) वि. ('अ.) सदाचारी; पुण्यात्मा.

करीमा (کریما) अव्य. (फ़ा.) हे परमेश्वरा! हे दयावंता!

करीमी (کریمی) स्त्री. ('अ.) कृपा; दया; ईश्वरी माया.

करीमः (کریمہ) स्त्री. ['अ. 'करीम' (کریم) चे स्त्रीलिंगी रूप.] (१) दयावती. (२) कुमारी (अविवाहित स्त्रीच्या नावापूर्वी योजावयाचा शब्द).

करीह (کریہ) वि. ('अ.) (१) घृणास्पद; किळसवाणा. (२) कुरूप. **–मंज़र** (منظر –) वि. कुरूप; किळसवाणा.

करीह-उस्-सूरत (کریہ الصورت) वि. ('अ.) किळसवाणा; कुरूप.

करीह-उस्-सौत (کریہ الصوت) वि. ('अ.) कर्कश आवाजाचा; कर्णकटु.

क़रोल (قرول) पु. (तु.) शिकारी (व्यक्ती).

क़रौली (قرولی) स्त्री. (तु.) (१) शिकारीसाठी दबा धरून बसणे; शिकारीचा पाठलाग करणे. (२) शिकार करताना वापरावयाचा सुरा (लांब व सरळ).

क़र्क़ (قرق) पु. (तु.) मांसल शेपटीचा मेंढा; दुंबा.

क़र्क़ुफ़ (قرقف) पु. ('अ.) (१) मदिरा. (२) पारशांचे तीन धर्मग्रंथ.

कर्द (کرد) पु. (फ़ा.) (१) कार्य. (२) कृती. **–गार** (گار –) वि. (फ़ा.) सर्वशक्तिमान परमेश्वर. **–नी** (نی –) वि. (फ़ा.) करणीय, करण्यास शक्य अथवा योग्य; (स्त्री.) करणी.

क़र्द (قرض) पु. ('अ.) कर्ज; ऋण. **–ख़्वाह** (خواہ –) वि. ('अ.+फ़ा.) (१) कर्ज देणारा; धनको. (२) कर्ज घेऊ इच्छिणारा; ऋणको; कर्ज घेणारा. **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) कर्ज घेणारा; ऋणको.

क़र्द-ए-हस्नः (قرض حسنہ) पु. ('अ.) ज्या कर्जावर व्याज द्यावे लागत नाही, जे परत मागता येत नाही असे कर्ज. ऋणकोने स्वत:च्या खुशीने फेडावयाचे कर्ज.

कर्दार (کردار) पु. (फ़ा.) (१) आचरण; वागणूक. (२) काम. (३) पात्र.

क़र्दः (قرضہ) पु. ('अ.) कर्ज; ऋण.

कर्दः (کردہ) वि. (फ़ा.) केलेले; बनविलेले. **–कार** (کار –) वि. (फ़ा.) अनुभवी.

क़र्न (قرن) पु. ('अ.) (१) शिंग. (२) युग; दीर्घ कालखंड. (३) केस.

क़र्ना (قرنا) पु. स्त्री. (फ़ा.) तुतारी; शिंग; कर्णा. [मूळ शब्द 'ख़र्ना' (خرنا) मोठी बासरी असा आहे].

कर्पास (کرپاس) पु. (फ़ा.) जाड, सुती कपडा. [सं. 'कर्पास' (कापूस) वरून बनलेला फारसी शब्द].

कर्फ़श (کرفش) स्त्री. (फ़ा.) पाल (प्राणी).

कर्ब (کرب) पु. ('अ.) (१) अस्वस्थता; बेचैनी. (२) व्यथा; दुःख; यातना.

कर्बला (کربلا) पु. ('अ.) (१) इराकमधील एक स्थान. येथे हजरत अली यांचे चिरंजीव हजरत इमाम हुसैन शहीद (हुतात्मा) झाले होते. तेथे त्यांची समाधी आहे. (२) मोहरमच्या वेळी मुसलमान लोक ज्या ठिकाणी ताबुतांचे विसर्जन किंवा दफन करतात ती जागा. (३) पाण्याची टंचाई असलेले स्थान.

कर्बला'ई (کربلائی) वि. (फ़ा.) (१) 'कर्बला' ची यात्रा करणारा. (२) एक प्रकारचा पोषाख.

क़र्यः (قریہ) पु. ('अ.) खेडेगाव; ग्राम.

करं (کر) पु. ('अ.) (१) हल्ला करणे. (२) शत्रूला मागे हटविणे. **–ओ-फ़र** (–و فر) पु. थाटमाट; वैभव.

करार (کرار) वि. ('अ.) (१) शत्रूच्या सैन्यावर पुनः पुनः हल्ला चढविणारा. (२) हजरत अली यांची एक पदवी.

क़लंदर (قلندر) पु. (फ़ा.) (१) मुसलमान फकिरांचा एक वर्ग; हे लोक डोकीचे व दाढीचे मुंडन करून मुक्त जीवन घालवितात. (२) बेफिकीर व बेपर्वा व्यक्ती; आपल्याच मस्तीत असलेला. (३) अस्वल किंवा माकड नाचविणारा. (४) तंबूचा हूक किंवा आकडा; तंबूच्या दारावरील पडदा. (वि.) अवलिया.

क़लंदरा (قلندرا) पु. ('अ.) (१) एक प्रकारचे रेशमी कापड. (२) तंबूचा आकडा.

क़लंदरी (قلندری) स्त्री. ('अ.) (१) कलंदराचे काम. (२) एक प्रकारची राहुटी. (३) एक प्रकारचे रेशमी कापड.

क़ल'ई (قلعی) स्त्री. ('अ.) (१) कल्हई. (२) मुलामा. (३) दिखाऊपणा; पोकळ डामडौल. **–खुलना** (–کھلنا) विंग फुटणे. **–गर** (–گر) पु. ('अ.+फ़ा.) कल्हईवाला.

क़ल'अः (قلعہ) पु. ('अ.) किल्ला; गड; कोट. **–गीर** (–گیر) वि. ('अ. + फ़ा.) किल्ला जिंकणारा; शूर वीर. **–दार** (–دار) पु. ('अ. + फ़ा.) गडकरी; किल्लेदार. **–शिकन** (–شکن) वि. ('अ. + फ़ा.) किल्ला उध्वस्त करणारा; दुर्गभेदी (तोफ वगैरे).

क़लक़ (قلق) पु. ('अ.) (१) अस्वस्थता; बेचैनी. (२) दुःख; खेद; उद्विग्नता. (३) पश्चात्ताप. **–अंगेज़** (–انگیز) वि. ('अ.+फ़ा.) शोकजनक; दुःखदायक.

कलग़ी (کلغی) स्त्री. (तु.) (१) कोंबडघाच्या डोक्यावरील तुरा. (२) शहामृग, मोर वगैरे पक्ष्यांची सुंदर पिसे. (३) शिखर.

कलफ़ (کلف) पु. ('अ.) (१) चेहऱ्यावरील काळे डाग. (२) कापडाला लावावयाची खळ. (३) चंद्रावर दिसणारे डाग.

क़लम (قلم) पु. ('अ.) (१) लेखणी; टाक. (२) चित्रकाराचा ब्रश; कुंचली. (स्त्री.) (१) झाडाची फांदी कापून लावणे; कलम. (२) कानशिलावरील केस; कट. (३) कापलेली, छाटलेली, तासलेली वस्तू. (४) एखाद्या पदार्थाचा बारीक व लांब तुकडा. **–अन्दाज़ करना** (–انداز کرنا) लिहिताना शब्द सोडणे, गाळणे. **–करना** (–کرنا) छाटण. **–कश** (–کش) वि. ('अ.+फ़ा.) (१) लिहिणारा. (२) कापणारा; पुसून टाकणारा. **–कार** (–کار) पु. ('अ. + फ़ा.) (१) लिहिणारा. (२) चित्रकार. (३) नक्षीकाम करणारा. **–कारी** (–کاری) स्त्री. ('अ. + फ़ा.) (१) लेखन. (२) चित्रकला; रंगकाम. (३) नक्षीकाम. **–ज़द** (–زد) वि. ('अ. + फ़ा.) खोडलेला; रद्द केलेला. **–ज़न** (–زن) वि. ('अ.+फ़ा.) (१) लिहिणारा. (२) चित्रकार. (३) खोडणारा. **–तराश** (–تراش) पु. ('अ. + फ़ा.) लेखणी, पेन्सिल वगैरे करण्याचा चाकू. **–दरकशीदः** (–درکشیدہ) वि. ('अ.+फ़ा.) खोडलेला; पुसून टाकलेला. **–दस्त** (–دست) वि. ('अ. + फ़ा.) (१) लेखक. (२) चित्रकार. **–तोड़ना** (–توڑنا) लेखनाच्या बाबतीत कमाल पराकाष्ठा करणे; अत्यंत उत्कृष्ट लिखाण करणे. **–दान** (–دان) पु. ('अ. + फ़ा.) (१) दौत, टाक, वाळू वगैरे ठेवण्याची छोटी पेटी. (२) हुद्दा; पदवी. **–पाक** (–پاک); **–पाककुन** (–پاک کن) पु. ('अ. + फ़ा.) लेखणीची शाई पुसण्याचे कापड. **–बंद** (–بند) वि. ('अ.+फ़ा.) (१) लिहिलेले; लिपिबद्ध. (२) ब्रश बनविणारा. (३) योग्य; पूर्ण. **–बरदाश्तः** (–برداشتہ) वि. ('अ.+फ़ा.) लेखणी उचलून विचार केल्याशिवाय लिहिलेले लिखाण. **–रौ** (–رو) स्त्री. ('अ. + फ़ा.) राष्ट्र; राज्य; सत्ता.

क़लम-ए-फ़ौलाद (قلم فولاد) पु. ('अ.+फ़ा.) फाऊंटन पेन; लौह-लेखणी.

क़लम-ए-रसास् (قلم رصاص); **क़लम-ए-सुर्ब** (قلم سرب) पु. ('अ.) शिसपेन्सिल.

क़लमी (قلمی) वि. ('अ.) (१) लिहिलेले. (२) हस्तलिखित (विशेषत: प्राचीन). (३) कलम केलेले; कलमी झाडाचे (फळ वगैरे). (४) लांबट व बारीक पदार्थ.

कलाँ (کلاں) वि. (फ़ा.) (१) मोठा; थोरला; ज्येष्ठ. (२) विशाल.

क़लाक़ना (قلاقنا) क्रि. (हिं.) टोमणे मारणे; बनविणे (बा.).

क़लाक़न्द (قلاقند) पु. स्त्री. (हिं.) खव्याची वर्फी.

कलाग़ (کلاغ) पु. (फ़ा.) जंगली कावळा.

कलात (کلات) पु. (फ़ा.) (१) खेडे; गाव. (२) डोंगरी किल्ला.

कलानी (کلانی) स्त्री. (फ़ा.) (१) मोठेपण; ज्येष्ठत्व. (२) गुरुत्व.

कलापेस: (کلاپیسہ) पु. (फ़ा.) डोळघांचा रंग बदलणे (रागात किंवा मैथुनाच्या वेळी).

कलाबतून (کلابتون); **कलाबत्तू** (کلابتو) पु. (तु.+हिं.) कलाबूत; रेशमी किंवा सुती दोऱ्यावर गुंडाळलेला जर.

कलाब: (کلاب) पु. (फ़ा.) टकळीवर किंवा चरख्यावर काढलेले कच्चे सूत; सुताची लडी; गुंडी.

कलाम (کلام) पु. ('अ.) (१) शब्द; वाक्य; वाणी; वचन; उक्ती. (२) संभाषण. (३) लिखाण. (४) मीमांसा; चर्चा. (५) काव्य. (६) शंका; आक्षेप; हरकत. (७) वायदा; कबुली. **–करना** (–کرنا) बोलणे; चर्चा करणे.

कलाम-उल्-लह (کلام اللہ); **कलाम-ए-मजीद** (کلام مجید) पु. ('अ.) (१) देववाणी; ईश्वरी वचन (२) कुराण. (३) बायबल.

कलाम-ए-मुस्तदाम (کلام مستدام) पु. ('अ.) ईश्वराकडून प्रेषिताला मिळणारा आदेश.

कलालत (کلالت); **कलाल:** (کلال) स्त्री. ('अ.) थकवा; ग्लानी.

कलाव: (کلاوہ) पु. (फ़ा.) (१) लग्नात किंवा गंडघासाठी वापरले जाणारे लाल-पिवळे सूत. (२) हत्तीची मान.

क़लिक़ (قلق) वि. ('अ.) व्याकुळ; दु:खी; बेचैन.

कलिम (کلم) पु. ['अ. 'कलिम:' (کلم) चे अनेक.] वाक्ये; वचने.

कलिमत-उल्-ख़ैर (کلمۃالخیر) पु. ('अ.) हितवचन; कल्याणवचन.

कलिमत-उल्-हक़्क़ (کلمۃالحق) पु. ('अ.) सत्य; न्यायाची गोष्ट; सदुक्ती.

कलिमात (کلمات) पु. ['अ. 'कलिम:' (کلم) चे अनेक.] शब्द; वचने; मंत्र.

कलिम: (کلمہ) पु. ('अ.) (१) वाक्य; शब्द; वचन. (२) मुसलमानांचा मूळ धर्ममंत्र [लाइलह इल्ल'ल्लह मुहम्मद-उर्-रसूल'ल्लह (لاالہ الااللہ محمدالرسول اللہ) एका परमेश्वराशिवाय दुसरा परमेश्वर नाही आणि मुहम्मद त्याचा प्रेषित आहे.] **–पढ़ना** (–پڑھنا) (१) मुसलमान बनणे. (२) अनुयायित्व पत्करणे. **–पढ़ाना** (–پڑھانا) मुसलमानी धर्माची दीक्षा देणे. **–भरना** (–بھرنا) (१) कलिमा उच्चारणे. (२) श्रद्धा ठेवणे. (३) अनुयायित्व स्वीकारणे. **–ख़्वाँ** (–خواں); **–गो** (–گو) वि. ('अ.+फ़ा.) कलिमा म्हणणारा मुसलमान.

कलिम:-ए-शहादत (کلمۂ شہادت) पु. ('अ.) इस्लामवर श्रद्धा व्यक्त करणारे वचन. [अशहद अन्न्ला इलह इल्ल'ल्लह व अशहद अन्न् मुहम्मदन 'अब्दहू व रसूलहू (اشہدان لاالہ الااللہ و اشہد ان محمداً عبدہ و رسولہ) मी अशी साक्ष देतो की, अल्लाखेरीज दुसरा कोणी उपास्य नाही आणि अशी साक्ष देतो की मुहम्मद हे त्या परमेश्वराचे सेवक व प्रेषित आहेत].

क़लियान (قلیان) पु. (फ़ा.) हुक्का; गुडगुडी.

क़लिय: (قلیہ) पु. ('अ.) तळलेले, भाजलेले मांस.

क़लीच (قلیچ) पु. (तु.) तलवार.

कलीद (کلید) स्त्री. (फ़ा.) किल्ली; चावी.

क़लीदस (قلیدس) पु. ('अ.) (१) रेखागणित; भूमिती. (२) यूक्लिड.

कलीम (کلیم) वि. ('अ.) (१) बोलणारा; वक्ता. (२) जखमी; घायाळ. (३) हजरत मूसा (मोझेस).

कलीम-उल्-लह (کلیم اللہ) पु. ('अ.) (१) ईश्वराशी बोलणारा. (२) मूसा (मोझेस).

कलील (کلیل) वि. ('अ.) (१) सुस्त; शिथिल. (२) बोथट.

क़लील (قلیل) वि. ('अ.) (१) थोडा; अल्प; किंचित. (२) ह्रस्व; लहान. **–तरीन** (–ترین) वि. ('अ.+फ़ा.) (१) अत्यंत थोडा. (२) खूप लहान.

क़लील-उल्-क़ीमत (قلیل القیمت) वि. ('अ.) स्वस्त.

क़लील-उस्-समा'अत (قلیل السماعت) वि. ('अ.) कमी ऐकणारा; बहिरा.

क़लीस (قلیس) वि. ('अ.) कृपण; कंजूष.

कलीसा (كليسا) **कलीसः** (كليسه); पु. (यू.+फ़ा.) (१) ख्रिश्चन व यहुदी लोकांचे प्रार्थनाघर; चर्च. (२) मंदीर.

क़ल्तबान (قلتبان) पु. (फ़ा.) (१) आपल्या पत्नीला परपुरुषाकडे पाठविणारा निर्लज्ज पुरुष. (२) स्त्रीच्या वाईट कमाईवर जगणारा. (३) वेश्यांचा दलाल; भडवा.

क़ल्पाक़ (قلپاق) स्त्री. (तु.) टोपी; पगडी.

कल्फ़ (كلف) पु. ('अ.) मोहित होणे.

क़ल्फ़ः (قلفه) पु. ('अ.) अध्यक्ष; सभापती.

कल्ब (كلب) पु. ('अ.) कुत्रा.

क़ल्ब (قلب) पु. ('अ.) (१) हृदय; अंतःकरण; मन. (२) मध्यभाग. (३) खोटे नाणे. (४) बुद्धी. (वि.) उपडा; उलटा. **–गाह** (–گاه) स्त्री. ('अ.+फ़ा.) जेथे सैन्याचा मघला भाग असतो ते स्थान. **–साज़** (–ساز) वि. ('अ.+फ़ा.) खोटी नाणी तयार करणारा.

क़ल्बी (قلبی) वि. ('अ.) (१) हार्दिक. (२) हृदयासंबंधी. (३) खोटा; बनावटी. (४) उलटा; उपडा.

क़ल्लांच (قلانچ) पु. (फ़ा.+तु.) (१) निर्धन; गरीब. (२) दुर्दैवी. (३) लुच्चा.

कल्ला (كلا) अव्य. ('अ.) (१) होय; खरे आहे. (२) असे नव्हे; मुळीच नाही.

क़ल्लाश (قلاش) पु. (तु.) (१) नीच; हलकट. (२) निर्धन; कंगाल.

कल्लः (كلم) पु. (फ़ा.) (१) जबडा. (२) कानशील. (३) डोके. (४) गळा. (५) गाल; गालफड. (६) आवाज. **–तोड़** (–توڑ) वि. (फ़ा.+हिं.) समर्पक; सडेतोड. **–दराज़** (–دراز) वि. (फ़ा.) वाचाळ; बडबड्या; तोंडाळ; फटकळ.

क़वद (قود) पु. ('अ.) प्रतिहिंसा; खुनाबद्दल सूड घेणे.

कवल (كول) पु. (फ़ा.) (१) तळे; तलाव. (२) कांबळे; घोंगडी.

क़वा'इद (قواعد) पु. ['अ. 'क़ा'इदः' (قاعده) चे अनेक.] (१) नियमावली. (२) परंपरा. (स्त्री.) (१) व्याकरण. (२) परेड; कवायत. **–गाह** (–گاه) स्त्री. ('अ.+फ़ा.) कवायतीचे मैदान; परेड-ग्राउंड. **–वां** (–داں) वि. ('अ. + फ़ा.) (१) कवायत शिकलेला. (२) एखाद्या कामाचे नियम माहीत असलेला.

कवा'इफ़ (كوائف) पु. स्त्री. ['अ. 'कैफ़ियत' (كيفيت) चे अनेक.] (१) अहवाल. (२) बातम्या. (३) घटना. (४) समस्या. (५) परिस्थिती.

कवा'इद-ए-अंजुम (كوائب انجم) स्त्री. ('अ.) सप्तर्षी मंडळ.

क़वानीन (قوانين) पु. ['अ. 'क़ानून' (قانون) चे अनेक.] कायदे.

क़वाफ़िल (قوافل) पु. ['अ. 'क़ाफ़िलः' (قافله) चे अनेक.] काफिले; तांडे (प्रवाशांचे).

क़वाफ़ी (قوافی) पु. ['अ. 'क़ाफ़ियः' (قافيه) चे अनेक.] यमके; अंत्यानुप्रास.

क़वाम (قوام) पु. ('अ.) (१) सत्यता. (२) सरलता. (३) न्याय.

क़वी (قوی) वि. ('अ.) सामर्थ्यशाली; शक्तिमान; ईश्वर. **–उल्-जुस्सः** (–الجثہ) वि. ('अ.) धष्टपुष्ट; दांडगा. **–उन्-नफ़्स** (–النفس) वि. ('अ.) दृढनिश्चयी; धैर्यवान; दृढ मनाचा. **–दस्त** (–دست) वि. ('अ. + फ़ा.) जोरदार; शक्तिशाली. **–पुश्त** (–پشت) वि. ('अ. + फ़ा.) जोरदार पाठबळ असलेला; ज्याच्या पाठीशी मोठे सामर्थ्य आहे असा. **–बाज़ू** (–بازو) वि. ('अ. + फ़ा.) दृढबाहू; पराक्रमी; धाडसी. **–हैकल** (–هيكل) वि. ('अ.) मजबूत बांध्याचा; प्रचंड आकाराचा.

क़ोरमः (قورمه) पु. (तु.) हळद न घातलेले, भाजलेले मांस; रस्सा नसलेले मसालेदार मांस. (हाच उच्चार शुद्ध आहे; परंतु उर्दूत 'कोरमा' किंवा 'कोर्मः' हा उच्चार विशेष प्रचलित आहे).

क़व्वाल (قوال) पु. ('अ.) (१) कवाली गाणारा. (२) बडबड्या.

क़व्वाली (قوالی) स्त्री. ('अ.) (१) इस्लामी भक्तिगीते; मजार (समाधी) वगैरे ठिकाणी गायिले जाणारे इस्लामी गीत; सूफी भक्तिसंगीत. (२) कव्वालाचा व्यवसाय.

क़व्वास (قواس) वि. ('अ.) धनुष्ये तयार करणारा.

कश (كش) पु. (फ़ा.) (१) ओढ; आकर्षण. (२) झुरका (चिलमीचा); दम. (३) रबर. (४) छाती; कूस. (प्रत्य.) (१) ओढणारा; आकर्षित करणारा. [उदा. 'कमानकश' (كمان كش) धनुष्य ओढणारा; धनुर्धारी. 'दिलकश' (دلكش) चित्ताकर्षक]. (२) सहन करणारा. [उदा. 'सितम कश' (ستم كش) जुलूम सहन करणारा].

कशफ़ (كشف) पु. (फ़ा.) कासव; कूर्म.

कशमकश (كشمكش) स्त्री. (फ़ा.) (१) ओढाताण. (२) गर्दी; खेचाखेच. (३) दुरध्यात पडणे; मनाची चलबिचल. (४) संघर्ष; लढाई. (५) पराक्रम. (६) धावपळ. (७) वैमनस्य.

कशां (كشاں) प्रत्य. (फ़ा.) ओढत; खेचत. **–कशां** (–كشاں) अव्य. (फ़ा.) फरफटत; जबरदस्तीने.

कशाकश (كشاكش) स्त्री. (फ़ा.) (१) ओढाताण. (२) संघर्ष. (३) दु:ख. (४) स्पर्धा; चढाओढ. (५) चलबिचल. (६) आश्चर्य.

कशावर्ज़ (كشاورز) पु. (फ़ा.) शेतकरी ('अ.) जमीनदार.

कशिश (كشش) स्त्री. (फ़ा.) (१) ओढ; आकर्षण. (२) वैमनस्य; वेबनाव. (३) प्रवृत्ती.

कशिश-ए-सिक़्ल (كشش ثقل) स्त्री. (फ़ा. + 'अ.) गुरुत्वाकर्षण.

कशीबगी (كشيدگی) स्त्री. (फ़ा.) (१) वैमनस्य; वेबनाव; तेढ. (२) अडथळा.

कशीदः (كشيده) पु. (फ़ा.) कशिदा; वेलबुट्टीचे काम. (वि.) ताणलेला; नाराज. **–क़द** (قد –) **–क़ामत** (قامت –) वि. (फ़ा. + 'अ.) उंच; उंचापुरा. **–कमर** (كمر –) वि. (फ़ा.) ज्याची कंबर वाकली आहे असा. **–कार** (كار –) वि. (फ़ा.) कशिदा काढणारा. **–कारी** (كاری –) स्त्री. (फ़ा.) कशिद्याचे काम. **–ख़ातिर** (خاطر –) वि. (फ़ा. + 'अ.) अप्रसन्न; नाराज; दु:खी. **–रू** (رو –) वि. (फ़ा.) (१) लांबट तोंडाचा. (२) रुष्ट.

कश्क (كشک) पु. (फ़ा.) जवा (बार्ली) चे कढण (आजाऱ्यांना द्यावयाचे).

कश्कोल (كشكول) पु. (फ़ा.) भिक्षापात्र; नरोटी.

क़श्क़: (قشقه) पु. (फ़ा.) गंधाचा टिळा; गंध.

कश्ती (كشتی) स्त्री. (फ़ा.) (१) नौका; नाव. (२) नावेच्या आकाराची थाळी; तबक. (३) विशेष प्रकारचा मद्य.

जोश-ए-तूफ़ाँ, शोर-ए-दर्या, बर्क-ए-लर्ज़:, बाद-ए-तुंद।
कश्ति-ए-'उम्र-ए-रवाँ, यारब! बड़ी मुश्किल में है ॥

–बान (بان –); **–राँ** (راں –) वि. (फ़ा.) नावाडी; कर्णधार.

कश्नीज़ (كشنيز) पु. (फ़ा.) कोथिंबीर; धणे.

कश्फ़ (كشف) पु. ('अ.) (१) प्रकट, जाहीर होणे, करणे. (२) ईश्वरी प्रेरणा. (३) आत्मशक्तीने गूढ गोष्टी जाणणे.

कश्मीर (كشمير) पु. (फ़ा.) काश्मीर. [वि. 'कश्मीरी' (كشميری) काश्मीरी].

कश्वर (كشور) पु. स्त्री. (फ़ा.) (१) देश; प्रदेश. (२) महाद्वीप; खंड. **–कुशा** (كشا –) वि. (फ़ा.) सत्ताधीश; शासक. **–सिताँ** (ستاں –) वि. (फ़ा.) विश्वविजयी.

क़श्वर (قشور) स्त्री. ('अ.) विटाळ बंद झालेली स्त्री.

कश्शाफ़ (كشاف) वि. ('अ.) जाहीर, प्रकट, उघडे करणारा.

कस (كس) पु. (फ़ा.) व्यक्ती; माणूस; मित्र. **–ओ-को** (وكو –) पु. (फ़ा.) मित्र; स्वजन. **–ओ-ना कस** (وناكس –) पु. (फ़ा.) बरा-वाईट; लहान-मोठा; प्रत्येकजण. **फ़ी कस** (فی كس) दर डोई; दर माणशी.

क़स़ब (قصب) पु. ('अ.) (१) बोरू; पोकळ वेत. (२) पोकळ वस्तू.

क़स़ब-उल्-ह़बीब (قصب الحبيب) पु. ('अ.) ऊस.

क़स़बः (قصبه) पु. ('अ.) (१) लहान शहर. (२) फांदी; शाखा.

क़सम (قسم) स्त्री. ('अ.) (१) शपथ; आणभाक. (२) नकार. **–उतारना** (اُتارنا –) (१) प्रतिज्ञा पूर्ण करणे. (२) 'शपथ सुटली' असे म्हणणे. **–खाना** (كهانا –) शपथ घेणे; प्रतिज्ञा करणे. **–खानेको** (كهانے كو –) नाममात्र.

कसमपुर्सी (كسمپرسی) स्त्री. (फ़ा.) कोणी विचारपूस करणारे नाही अशी स्थिती; असहायता; निराधार अवस्था.

कसल (كسل) पु. ('अ.) (१) आजार; रुग्णता. (२) शैथिल्य; सुस्ती. (३) थकवा. **–मंद** (مند –) वि. ('अ.+फ़ा.) आजारी; थकलेला.

क़सी'इद (قصائد) पु. ['अ. 'क़सीद:' (قصيده) चे अनेक.] स्तुतिस्तोत्र; प्रशंसाकाव्य.

क़सा'ई (قصائی) पु. ('अ.+हिं.) (१) खाटीक; कसाई. (२) मांग. (३) निर्दय, निष्ठुर, जुलमी व्यक्ती.

कसाद (كساد) पु. ('अ.) मंदी; स्वस्ताई.

कसाफ़त (كثافت) स्त्री. ('अ.) (१) मलिनता; गलिच्छपणा; घाण. (२) लठ्ठपणा; बेढबपणा.

क़साबः (قصابه) पु. ('अ.) बायकांचा डोकीला बांधावयाचा रुमाल.

क़सावत (قصاوت) स्त्री. ('अ.) निर्दयता; निष्ठुरता.

क़सी (قصی) वि. ('अ.) निर्दय; निष्ठुर.

कसीदः (كسيده) पु. ('अ.) प्रचारात नसलेला, विकला न जाणारा माल.

क़सीदः (قصيده) पु. ('अ.) प्रशंसा गीत; चारणगीत; स्तुतिस्तोत्र. **–ख़्वाँ** (خواں –); **–गो** (گو –) वि. ('अ.+फ़ा.) (१) यशोगान गाणारा; स्तुतिकाव्य वाचणारा. (२) भाट; खुशामतखोर. **–ख़्वानी** (خوانی –); **–गो'ई** (گوئی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) स्तुतिस्तोत्र गाणे; भाटगिरी.

कसीफ़ (كثيف) वि. ('अ.) (१) जाडजूड; स्थूल. (२) बेढब. (३) मलिन; घाणेरडा; अपवित्र.

कसीफ़-उत्-तब'अ (كثيف الطبع); **कसीफ़-उल्-बातिन** (كثيف الباطن) वि. ('अ.) ज्याचे मन, हृदय, अपवित्र आहे असा; दुष्ट; पापी.

क़सीम (قسيم) वि. ('अ.) (१) भागीदार; वाटेकरी. (२) विभाजन करणारा.

क़सीर (قصير) वि. ('अ.) (१) ह्रस्व; लहान. (२) बुटका; गिट्ठा.

कसीर (كثير) वि. ('अ.) पुष्कळ; अधिक. **–उल्-अख़्लाक़** (الاخلاق –) वि. ('अ.) अत्यंत सच्छील; मनमिळाऊ. **–उल्-अद्‌ला'अ** (الاضلاع –) वि. ('अ.) बहुभुज आकृती; क्षेत्र. **–उल्-अत्फ़ाल** (الاطفال –); **–उल्-अयाल** (العيال –); **–उल्-औलाद** (الاولاد –) वि. बहुसंतती; बहुप्रसवा; पुष्कळ मुलेबाळे व कमी प्राप्ती असलेला-ली. **–उल्-'इल्म** (العلم –) वि. ('अ.) बहुविद्; विद्वान. **–उल्-औसाफ़** (الاوصاف –) वि. ('अ.) बहुगुणी. **–उल्-कलाम** (الكلام –) वि. ('अ.) बडबड्या; वाचाळ. **–उल्-ख़ैर** (الخير –) वि. ('अ.) दानशूर; दानी. **–उल्-म'अनी** (المعنى –) वि. ('अ.) ज्यातून अनेक अर्थ निघतात असा शब्द, वाक्य अथवा कविता.

कसे (كسے) वि. (फ़ा.) कोणी; कोणीतरी. **–बाशद** (باشد –) वा. (फ़ा.) कोणीही असो; कोणी का असेना.

क़स्द (قصد) पु. ('अ.) संकल्प; निश्चय; इरादा; हेतू; बेत; इच्छा.

क़स्द-ए-मुस्मिम (قصد مصمم) पु. ('अ.) दृढनिश्चय.

क़स्दन् (قصداً) अव्य. ('अ.) जाणूनबुजून; हेतुपूर्वक; निश्चयपूर्वक.

क़स्ब (قصب) पु. ('अ.) कापणे; तोडणे.

कस्ब (كسب) पु. ('अ.) (१) कमाई; प्राप्ती; उपार्जन. (२) धंदा; व्यवसाय; रोजगार. (३) कसब; कला. (४) वेश्याव्यवसाय.

कस्ब-ए-'इल्म (كسب علم) पु. ('अ.) विद्योपार्जन; ज्ञानार्जन.

कस्ब-ए-कमाल (كسب كمال) पु. ('अ.) गुणोपार्जन.

क़स्बाती (قصباتی) पु. ('अ.) शहरी माणूस.

कस्बी (كسبی) वि. ('अ.) (१) परिश्रमाने मिळणारी विद्या. [याच्या उलट 'वहबी' (وهبی) ईश्वरदत्त]. (२) धंदेवाईक. (स्त्री.) वेश्या.

क़स्बः (قصبہ) पु. ('अ.) शहराहून लहान व खेड्याहून मोठे गाव; कसबा. [अनेक 'क़स्बात' (قصبات)].

क़स्म (قسم) पु. ('अ.) (१) वाटणे; विभाजन करणे. (२) दान करणे.

क़स्माक़स्मी (قسما قسمی) स्त्री. ('अ.) आणभाक; परस्पर वचनबद्धता (बा.).

क़स्मियः (قسميہ) अव्य. ('अ.) शपथपूर्वक; शपथेवर.

क़स्र् (قصر) पु. ('अ.) प्रासाद; महाल. (स्त्री.) (१) उणीव; त्रुटी. (२) प्रवासातील संक्षिप्त नमाज.

कस्र (كسر) पु. ('अ.) (१) तोडणे; मोडतोड. (२) उर्दूतील 'जेर' (इकारा) ची मात्रा (ـِ). (३) अपूर्णांक (गणित). (४) उणीव; कसर; न्यूनता. (५) तोटा; नुकसान. (६) द्वेष; मनोमालिन्य. (७) एखादी वस्तू वाळल्यामुळे अथवा तिच्यातील कचरा काढून टाकल्याने होणारी उणीव. **–निकालना** (نكالنا –) (१) नुकसान भरून काढणे. (२) उट्टे काढणे. **–रखना** (ركھنا –) (१) अपूर्ण ठेवणे. (२) अनिष्ट इच्छिणे.

कस्र-ए-'अशारियः (كسر عشاريہ) स्त्री. ('अ.) दशांश अपूर्णांक.

कस्र-ए-नफ़्सी (كسر نفسی) स्त्री. ('अ.) नम्रता; विनीतता.

कस्र-ए-शान (كسر شان) स्त्री. ('अ.) अपमान; अप्रतिष्ठा.

कस्रत (كسرت) स्त्री. ('अ.) व्यायाम. **–गाह** (گاہ –) स्त्री. ('अ.+फ़ा.) व्यायामशाळा; तालीम.

कस्रत (كثرت) स्त्री. ('अ.) आधिक्य; वैपुल्य; बाहुल्य; प्राचुर्य.

क़स्साब (قصاب) पु. ('अ.) (१) कसाई; खाटीक. (२) निर्दय, निष्ठुर व्यक्ती. **–ख़ानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) कसाईखाना.

क़स्साम (قسام) वि. ('अ.) (१) वाटणारा; विभागणी करणारा. (२) भाग्य देणारा; भाग्य विधाता.

क़स्साम-ए-अज़ल (قسام ازل) पु. ('अ.) ईश्वर.

क़स्सार (قصار) पु. ('अ.) धोबी; परीट.

कह (کہ) स्त्री. [फ़ा. 'काह' (کاہ) चे संक्षिप्त.] वाळलेले गवत.

कहकशाँ (کہکشاں) स्त्री. (फ़ा.) आकाशगंगा.

क़हक़हः (قہقہہ) ('अ.) खदखदा हसणे; हास्यस्फोट.

किसी के क़हक़हे में प्यार की रंगीन अंगड़ा'ई।
उतर आयी हज़ारों बार दिल में छूके गहरा'ई॥

कहगिल (کہگل) स्त्री. (फ़ा.) गिलावा (भितीचा); गारा.

क़हत् (قحط) पु. ('अ.) (१) दुर्भिक्ष; दुष्काळ. (२) अभाव; चणचण. **–ज़दः** (زدہ –) वि.

('अ. + फ़ा.) दुष्काळ पीडित. **–साली** (سالی –) वि. ('अ.+फ़ा.) दुष्काळ; अवर्षण.

क़हूबः (قحبہ) स्त्री. ('अ.) व्यभिचारीणी (शुद्ध : 'कुहबः').

क़हर (قہر) पु. ('अ.) (१) क्रोध; कोप; दैवी कोप; दैवी आपत्ती; संकट; कहर. (२) जुलूम. [म्हण : **क़हर-ए-दरवेश बर जान-ए-दरवेश** (قہر درویش بر جان درویش) गरिबाचा राग स्वतःवरच चालू शकतो; गरीब रागावला तर स्वतःचेच प्राण घालवून बसणार].

क़हरन् (قہراً) अव्य. ('अ.) नाइलाजाने, जबरदस्तीने.

क़हरमान (قہرمان) पु. (तु.) कामकरी; कार्यकर्ता. (फ़ा.) (१) सत्ता; शासन; जुलमी राजवट. (२) सत्ताधीश.

कहरुबा (کہربا) पु. (फ़ा.) एक प्रकारचा गोंद किंवा खडा. (हा कपडयावर घासून गवताजवळ नेला असता गवताला आकर्षून घेतो). अंबर; तृणमणी; राळ. **–ई** (ئی –) वि. (फ़ा.) विद्युत्संबंधी.

कहूल (کحل) पु. ('अ.) (१) दुष्काळी वर्ष. (२) डोळघांत सुरमा घालणे.

कहल (کہل) पु. ('अ.) मध्यम वयाचा मनुष्य.

क़हवः (قہوہ) पु. ('अ.) कॉफी (पेय). **–खानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) कॉफीगृह.

क़हार (قہار) वि. ('अ.) महाकोपी; परमेश्वर.

कहालत (کہالت) स्त्री. ('अ.) सुस्ती; आळस.

कहूल (کہول) वि. ('अ.) ज्याच्या दाढीचे केस काळे-पांढरे आहेत असा; मध्यम; वयस्क.

कहूहाल (کحال) पु. ('अ.) नेत्रवैद्य.

क़ा (قا) पु. स्त्री. (हिं.) कावळघाची कावकाव.

क़ाआन (قاآن) पु. वि. (तु.) (१) न्यायी राजा. (२) चीन व तुर्कस्थान येथील बादशहांची पदवी. (३) चंगेजखानाच्या मुलाचे नाव. (४) मोठा धर्मात्मा.

क़ा'इद (قاعد) वि. ('अ.) बसलेला. (स्त्री.) विटाळ व बाळंतपण बंद झालेली स्त्री.

क़ा'इद (قائد) पु. ('अ.) (१) नेता; पुढारी. (२) सेनापती. (३) आंधळयाची काठी धरून पुढे चालणारा.

क़ा'इद-ए-अ'अज़म (قائد اعظم) पु. ('अ.) (१) महान नेता; श्रेष्ठ पुढारी; सेनापती. (२) पाकिस्तानचे संस्थापक मरहूम महम्मद अली जिना यांना लोकांनी दिलेली पदवी.

क़ा'इदः (قاعدہ) पु. ('अ.) (१) नियम; प्रथा. (२) कायदा; विधान. (३) सिद्धांत. (४) पद्धती; विधी. (५) अंकलिपी. (६) क्रमे; व्यवस्था. (७) स्वभाव. (८) शिष्टाचार. (९) त्रिकोणाचा पाया. **–दाँ** (داں –) वि. ('अ.+फ़ा.) कायदेपंडीत; विधिज्ञ.

का'इनात (کائنات) स्त्री. ('अ.) (१) सृष्टी; विश्व; ब्रह्मांड. (२) मूल्य; भांडवल. (३) सामर्थ्य; पत.

क़ा'इम (قائم) वि. ('अ.) (१) उभा; सरळ; लंब. (२) स्थिर; कायमचा दृढ; मजबूत. (३) निश्चित; ठरविलेला. **–अंदाज़** (انداز –) वि. ('अ. + फ़ा.) (१) अत्यंत सामर्थ्यवान. (२) बुद्धिबळपटू. **–मक़ाम** (مقام –) वि. ('अ.) एखाद्याच्या ऐवजी किंवा जागी काम करणारा; बदल्या. **–मिज़ाज** (مزاج –) वि. ('अ.) दृढनिश्चयी; स्थिरबुद्धी.

क़ा'इमः (قائمہ) पु. ('अ.) (१) नव्वद अंशाचा कोन. (२) लंब रेषा.

क़ा'इल (قائل) वि. ('अ.) (१) सांगणारा. (२) समजूत पटल्यावर कबुल किंवा मान्य करणारा; निरुत्तर. **–करना** (کرنا –) गळी उतरविणे; निरुत्तर करणे; करावयास लावणे. **–होना** (ہونا –) मान्य करणे; निरुत्तर होणे.

का'ऊस (کاؤس) पु. (फ़ा.) कैकाऊस; इराणचा सम्राट. (याच्या पदरी सुप्रसिद्ध पहिलवान रुस्तुम हा होता).

काक (کاک) स्त्री. (फ़ा.) जाड व लहान भाकरी; रोट.

क़ाक़ (قاق) पु. (तु.) (१) वाळविलेले, सुके मांस. (२) रोडका माणूस.

क़ाक़ (قاق) वि. ('अ.) खूप उंच व्यक्ती.

काकरेज़ (کاکریز) पु. (फ़ा.) जांभळा किंवा किरमिजी, उदी रंग.

काका (کاکا) पु. (तु.) (१) थोरला भाऊ. (२) घरातील म्हातारा नोकर.

क़ाक़ुम (قاقم) पु. (फ़ा.) मुंगुसाच्या जातीचा एक कैसाळ प्राणी; याचे कातडे अत्यंत मऊ असते.

काकुल (کاکل) स्त्री. (फ़ा.) कैसाची बट; कानावर येणारे केस.

काकुल-ए-परेशाँ (کاکل پریشاں) स्त्री. (फ़ा.) विसकटलेले केस.

काकुल-ए-पेचाँ (کاکل پیچاں) स्त्री. (फ़ा.) कुरळे केस.

काकुल-ए-शम्'अ (کاکل شمع) स्त्री. (फ़ा.+'अ.) दिव्याचा किंवा मेणबत्तीचा धूर.

क़ाक़ुलः (قاقلہ) स्त्री. ('अ.) मोठा वेलदोडा.

काख़ (کاخ) पु. (फ़ा.) (१) प्रासाद; महाल. (२) वरचा मजला. (३) पाऊस.

काग़ (کاغ) पु. (फ़ा.) (१) अग्नी. (२) खंत. (३) आक्रोश.

काग़ज़ (كاغذ) पु. ('अ.) (१) कागद. (२) दस्तैवज; कागदपत्र. (३) वर्तमानपत्र. **–गर** (–گر) वि. ('अ.+फ़ा.) कागद बनविणारा.

काग़ज़-ए-ज़र (كاغذ زر) पु. ('अ.+फ़ा.) प्रॉमिसरी नोट; नोट.

काग़ज़ात (كاغذات) पु. ['अ. 'काग़ज़' (كاغذ) चे अनेक.] कागदपत्रे.

काग़ज़ी (كاغذى) वि. ('अ.) (१) कागदी; पातळ. (२) कागद बनविणारा, कागदी.

काचार (كاچار); **काचाल** (كاچال) पु. (फ़ा.) घरगुती सामानसुमान.

क़ाज़ (قاز) पु. (तु.) हंसाच्या जातीचा एक पक्षी. (हा थंड प्रदेशांतून हिवाळ्यात भारतात येतो व नंतर परत जातो).

काज़िब (كاذب) वि. ('अ.) खोटे बोलणारा; खोटारडा.

काज़िब (كازب) वि. ('अ.) आपल्या मालावर जास्तीत जास्त नफा मिळवू पहाणारा लोभी व्यापारी.

काज़िम (كاظم) वि. ('अ.) क्रोधावर ताबा ठेवणारा; राग आला असता न रागावणारा.

काज़ः (كازه) पु. (फ़ा.) ज्या ठिकाणी शिकारी दबा धरून बसतो, असा खड्डा.

कात (كات) पु. (फ़ा.) (१) विडघात घालावयाचा कात. (२) इराणच्या खुरासान प्रांतातील एक नगर.

क़ाति'अ (قاطع) वि. ('अ.) (१) कापणारा; तोडणारा. (२) प्रवासी.

क़ाति'अ-उत-त़रीक़ (قاطع الطريق); **क़ाति'अ-ए-त़रीक़** (قاطع طريق) पु. ('अ.) वाटेत लुटणारा; लुटारू; दरवडेखोर.

क़ाति'अ-ए-बाह़ (قاطع باه) पु. (फ़ा.) वीर्यनाशक खाद्य-पदार्थ.

क़ाति'ऑन (قاطعين) पु. ['अ. 'क़ाति'अ' (قاطع) चे अनेक.] प्रवासी; यात्रेकरू.

क़ातिन (قاطن) वि. ('अ.) थांबलेला; मुक्कामास असलेला; प्रवासात नसलेला. ['मुसाफ़िर' (مسافر) च्या उलट].

कातिब (كاتب) वि. पु. ('अ.) (१) लिहिणारा; लेखक. (२) कारकून. (३) नकला करणारा. (४) लिथो प्रेस (शिळा प्रेस) वर छापण्यासाठी एका विशिष्ट कागदावर विशिष्ट शाईने लिहिण्याचे काम करणारा.

कातिब-ए-अज़ल (كاتب ازل) पु. ('अ.) माणसाचे भाग्य लिहिणारा; परमेश्वर.

कातिब-ए-अ'अमाल (كاتب اعمال) पु. ('अ.) चित्रगुप्त.

कातिब-ए-क़िस्मत (كاتب قسمت); **कातिब-ए-क़ुदरत** (كاتب قدرت); **कातिब-ए-तक़दीर** (كاتب تقدير) पु. ('अ.) भाग्य लेखक; परमेश्वर.

क़ातिबतन् (قاطبتًا) अव्य. ('अ.) (१) मुळीच; अत्यंत; पूर्णपणे. (२) सर्व.

क़ातिम (قاتم) वि. ('अ.) काळा.

क़ातिल (قاتل) वि. ('अ.) (१) कत्तल करणारा; खुनी. (२) कसाई. (३) क्रूर. (४) प्रेमिका.

क़ादिम (قادم) वि. ('अ.) प्रवास करून परत आलेला.

क़ादिर (قادر) वि. ('अ.) (१) बलवान; सामर्थ्यशाली. (२) ईश्वर. **–अंदाज़** (–انداز) वि. ('अ.+फ़ा.) अचूक नेम मारणारा; लक्ष्यवेधी; शब्दभेदी. **–दस्त** (–دست) वि. ('अ.+फ़ा.) प्रवीण.

क़ादिर-उल्-कलाम (قادر الكلام) वि. ('अ.) वाक्पटू; वक्तृत्वशाली.

क़ादिर-ए-मुत़लक़ (قادر مطلق) वि. पु. ('अ.) सर्व-शक्तिमान; ईश्वर.

क़ादिरी (قادرى) पु. ('अ.) सूफी मुसलमानांचा एक पंथ; शेख मुहीउद्दीन अब्दुल कादिर जीलानी यांचे अनुयायी.

क़ादिस (قادس) पु. ('अ.) मोठी नौका; स्टीमर.

क़ाज़ी (قاضى) पु. ('अ.) (१) न्यायाधीश. (२) लग्न लावणारा; निका पढविणारा. (३) देणारा; दाता. **–उल्-ह़ाजात** (–الحاجات) पु. ('अ.) इच्छा पूर्ण करणारा; ईश्वर.

कान (كان) स्त्री. (फ़ा.) खाण. **–कन** (–كن) वि. (फ़ा.) खाण खोदणारा; खाण कामगार.

क़ानि'अ (قانع) वि. ('अ.) अल्पसंतुष्ट; निस्पृह.

क़ानित (قانت) वि. ('अ.) (१) आज्ञाधारक (२) नमाजामध्ये दुवा (मागणे) मागणारा.

क़ानी (قانى) वि. (तु.) अत्यंत लाल.

क़ानून (قانون) पु. ('अ.) (१) कायदा; विधान. (२) नियम; सिद्धांत. (३) रीत; पद्धती. (४) रिवाज; परंपरा. **–गो** (–گو) पु. ('अ.+फ़ा.) (१) ज्याच्याजवळ सबंध जिल्ह्यातील जमिनींच्या वहिवाटीची व वसुलाची नोंद असते असा अधिकारी. (२) तलाठ्यांच्या कामावर देखरेख ठेवणारा अधिकारी; कानगो; कानुगो. **–दाँ** (–داں) वि. ('अ.+फ़ा.) कायदेपंडीत; विधिज्ञ. **–शिकनी** (–شكنى) स्त्री. ('अ. + फ़ा.) कायदेभंग. **–साज़** (–ساز) वि. ('अ. + फ़ा.) कायदा बनविणारा; विधायिका; घटना समिती.

क़ानून-उल्-अव्वल (كانون الاول); **क़ानून-ए-अव्वल** (كانون اول) पु. ('अ.+फ़ा.) एक तुर्की महिना (डिसेंबरमध्ये येणारा).

कानून-उल्-आखिर (كانون الاخر); **कानून-ए-आखिर** (كانون آخر) पु. ('अ.+फ़ा.) जानेवारीमध्ये येणारा तुर्की महिना.

क़ानून-ए-त'अज़ीरात (قانون تعزيرات) पु. ('अ.) फौजदारी कायदा; दंड विधान.

क़ानूनदाँ (قانوندان) वि. ('अ.+फ़ा.) कायदेबाज; भांडकुदळ.

क़ानूनन् (قانوناً) अव्य. ('अ.) कायद्याप्रमाणे; कायदेशीररीत्या.

क़ानूनी (قانونی) वि. ('अ.) (१) कायद्यासंबंधी. (२) बॅरिस्टर. (३) भांडखोर.

क़ाफ़ (قاف) पु. (फ़ा.) (१)उर्दूचे एक अक्षर 'क़' (ق). (२) जगाच्या सभोवार पसरलेला एक काल्पनिक पर्वत. (येथे सुंदर परया राहातात). (३) कॉकेशिया, सौंदर्याविषयी प्रसिद्ध असलेला पर्वत, प्रदेश. **–ता क़ाफ़** (تا قاف –) सारे जग.

काफ़ (كاف) पु. (फ़ा.) (१) उर्दूचे एक अक्षर 'क' (ک). (२) फट; भेग.

काफ़-ए-राँ (كاف راں) स्त्री. (फ़ा.) योनी; स्त्रीचे जननेंद्रिय.

क़ाफ़िय: (قافيہ) पु.('अ.)यमक; अनुप्रास; अंत्यानुप्रास. **–तंग करना** (–تنگ کرنا) नाकी नऊ येणे; हैराण होणे. **–पैमा** (–پیما) वि. ('अ.+फ़ा.) केवळ यमके जुळविणारा; यमक्या. **–बंदी** (–بندی) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) कविता; काव्यरचना. (२) केवळ यमके जुळविणे; निकृष्ट दर्जाची कविता.

काफ़िर (كافر) पु. ('अ.) (१)नास्तिक. (२) एकेश्वरवाद न मानणारा; नाकारणारा. (३) सत्य झाकणारा. (४) ईश्वरी देणग्यांबद्दल कृतज्ञता प्रकट न करणारा. (५) इस्लाम न मानणारा. (६) दुष्ट; निर्दय. (७) प्रेमिका; प्रेमपात्र. (८) नदी. (९) शेतकरी. **–माजरा** (–ماجرا) वि. ('अ.) बाह्यत: काफिरासारखा दिसणारा, वागणारा.

काफ़िर-ए-ने'अमत (كافرنعمت) पु. ('अ.) कृतघ्न व्यक्ती.

काफ़िरी (كافری) स्त्री. ('अ.) नास्तिकता.

काफ़िल (كافل) वि. ('अ.) जामीन; प्रतिभू; जामीनदार.

क़ाफ़िल: (قافلہ) पु. ('अ.) प्रवाशांचा तांडा; व्यापाऱ्यांचा तांडा. **–सालार** (–سالار) पु. ('अ.+फ़ा.) काफिल्याचा नेता.

काफ़ी (كاف) वि. ('अ.) (१) पुरेसे; भरपूर. (२) पुष्कळ; अधिक.

काफ़ूर (كافور) पु. (फ़ा.) कापूर. **–ख्वार** (–خوار) वि. (फ़ा.) कापूर खाणारा; नपुसक; नामर्द. **–होना** (–ہونا) नाहीसे होणे.

काफ़ूरी (كافوری) वि. (फ़ा.) (१)कापराच्या रंगाचा; स्वच्छ व पारदर्शक. (२) कर्पूरयुक्त. **–शम'अ** (–شمع) स्त्री. (फ़ा.) कापुरी मेणबत्ती. (हिचा प्रकाश अत्यंत स्वच्छ पडतो).

काफ़्फ़: (كافہ) वि. ('अ.) सर्व; समस्त.

काफ़्फ़:-ए-अनाम (كافۂ انام) पु. ('अ.) जनता; सर्वसामान्य लोक.

क़ाब (قاب) पु. (फ़ा.) (१) चष्मा, आरसा ठेवण्याचे घर. (२) फासा (जुगार).

क़ाब (قاب) पु. (तु.) मोठी थाळी; परात.

क़ाबिद् (قابض) वि. ('अ.) (१) ताब्यात घेणारा; ज्याने कबजा घेतला आहे असा; कावीज करणारा. (२) मलावरोध करणारा पदार्थ.

क़ाबिद्-ए-अरवाह् (قابض ارواح) पु. ('अ.) प्राण काढून घेणारा; यम.

काबिर (كابر) वि. ('अ.) प्रतिष्ठित; पूज्य.

क़ाबिल (قابل) वि. ('अ.) (१) योग्य; लायक. (२) विद्वान. (३) उचित. (४) दक्ष; निपुण; प्रवीण.

क़ाबिल-ए-अदब (قابل ادب) वि.('अ.)आदरणीय; पूज्य.

क़ाबिल-ए-अदा (قابل ادا) वि. ('अ.) (१)दिले पाहिजे असे; देय. (२) देता येण्यासारखे.

क़ाबिल-ए-इंतिक़ाल (قابل انتقال) वि. ('अ.) नावावर चढवून देता येण्याजोगा; देता किंवा विकता येण्यासारखी संपत्ती.

क़ाबिल-ए-इख़राज (قابل اخراج) वि. ('अ.) काढून टाकण्यास योग्य.

क़ाबिल-ए-इन'आम (قابل انعام) वि. ('अ.) पारितोषिक देण्यास योग्य.

क़ाबिल-ए-ए'अतिबार (قابل اعتبار) वि. ('अ.) विश्वसनीय; विश्वासार्ह.

क़ाबिल-ए-ए'अतिराद् (قابل اعتراض) वि. ('अ.) आक्षेपार्ह.

क़ाबिल-ए-ग़ौर (قابل غور) वि. ('अ.) विशेष ध्यान देण्यासारखे.

क़ाबिल-ए-ज़िक्र (قابل ذکر) वि. ('अ.) उल्लेखनीय.

क़ाबिल-ए-तस्लीम (قابل تسليم) वि. ('अ.) ग्राह्य; स्वीकाराहं.

क़ाबिल-ए-तहसीन (قابل تحسين); **क़ाबिल-ए-त'अरीफ़** (قابل تعريف) वि. ('अ.) प्रशंसनीय.

क़ाबिल-ए-नफ़रत (قابل نفرت) वि. ('अ.) तिरस्करणीय; गर्ह्य.

क़ाबिल-ए-बरदाश्त (قابل برداشت) वि. ('अ.+फ़ा.) सह्य.

क़ाबिल-ए-रहम (قابل رحم) वि. ('अ.) दयनीय; लाचार.

क़ाबिल-ए-समा'अत (قابل سماعت) वि. ('अ.) श्रवणीय; ज्याची सुनावणी होऊ शकेल असा (खटला).

क़ाबिलानः (قابلانہ) वि. ('अ. +फ़ा.) विद्वत्तापूर्ण; नैपुण्ययुक्त.

क़ाबिलियत (قابلیت) स्त्री. ('अ.) (१) विद्वत्ता. (२) योग्यता; लायकी. (३) पात्रता; क्षमता. (४) कौशल्य; नैपुण्य.

क़ाबिलः (قابلہ) स्त्री. ('अ.) (१) विदुषी; लायक स्त्री. (२) दाई.

काबीन (کابین) पु. (फ़ा.) लग्नामध्ये वराने वधूला द्यावयाची रक्कम अथवा दागिने; हुंडा. **–नामः** (نامہ –) पु. (फ़ा.) हुंडा देण्यासंबंधीचे करारपत्र.

काबीनः (کابینہ) पु. स्त्री. ('अ.+फ़ा.) मंत्रिमंडळ.

काबुक (کابک) पु. (फ़ा.) कबुतरांचे खुराडे.

काबुल (کابل) पु. (फ़ा.) अफगाणिस्तानची राजधानी.

काबुली (کابلی) वि. (फ़ा.) काबूलचा, अफगाणिस्तानचा रहिवासी, पठाण; अफगाण.

क़ाबू (قابو) पु. (तु.) (१) ताबा; वर्चस्व; अधिकार. (२) फुरसत.

क़ाबूची (قابوچی) पु. (तु.) दरबान; पहारेकरी. (वि.) स्वार्थी; नीच.

काबूस (کابوس) पु. ('अ.) एक प्रकारचा रोग. (या रोगात रोग्याला स्वप्नात असा भास होतो की कोणीतरी आपला गळा दाबत आहे, आणि तो भीतीने किंचाळण्याचा प्रयत्न करतो).

काम (کام) पु. (फ़ा.) (१) इच्छा; मनोरथ. (२) उद्देश. (३) कार्य. (४) गरज. **–गर** (گر –); **–गार** (گار –) वि. (फ़ा.) सफल; भाग्यवान.

क़ामत (قامت) पु. ('अ.) (१) आकार; आकृती. (२) शरीर; देह.

कामदार (کامدار) पु. ('अ.) (१) कर्मचारी; कार्यकर्ता. (२) व्यवस्थापक.

कामनाकाम (کام نا کام) अव्य. (फ़ा.) नाइलाजाने.

कामयाब (کامیاب) वि. (फ़ा.) सफल; यशस्वी; कृतार्थ.

कामयाबी (کامیابی) स्त्री. (फ़ा.) यश; सफलता.

कामरां (کامراں); **कामरान** (کامران) वि. (फ़ा.) यशस्वी; सफलमनोरथ.

कामरानी (کامرانی) स्त्री. (फ़ा.) यश; सफलता.

क़ामि'अ (قامع) वि. ('अ.) विध्वंसक.

कामिल (کامل) वि. ('अ.) (१) पूर्ण; संपूर्ण. (२) योग्य; लायक. (३) साक्षात्कारी साधू; चमत्कार करून दाखविणारा.

क़ामूस (قاموس) पु. ('अ.) (१) सखोल नदी. (२) शब्दकोश.

कामः (کامہ) पु. (फ़ा.) (१) कामना; इच्छा. (२) उद्देश. (३) कढी.

कार (کار) पु. (फ़ा.) (१) कार्य; काम. (२) धंदा; पेशा. (३) कला. (४) विषय. **–आगाह** (آگاہ –); **–आज़मूदः** (آزمودہ –) वि. (फ़ा.) (१) कार्यक्षम. (२) अनुभवी. **–आमद** (آمد –) वि. (फ़ा.) उपयोगी; उपयुक्त. **–करदः** (کردہ –) वि. (फ़ा.) (१) कार्यक्षम. (२) अनुभवी. **–कुन** (کن –) वि. पु. (फ़ा.) (१) कार्यकर्ता; कर्मचारी. (२) व्यवस्थापक. **–ख़ानः** (خانہ –) पु. (फ़ा.) (१) कारखाना; उद्योगशाला. (२) कामधंदा. (३) व्यवस्था. (४) घटना. (५) क्रिया. **–ख़ानःदार** (خانہ دار –) पु. (फ़ा.) कारखानदार; कारखान्याचा मालक. **–गर** (گر –) वि. (फ़ा.) (१) परिणामकारक. (२) उपयुक्त. (३) गुणकारी. **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) (१) कार्यालय. (२) कपडा विणण्याचे स्थान; माग. **–गुज़ार** (گزار –) वि. (फ़ा.) कार्यपटू; कार्यक्षम; तरबेज; हुशार. **–गुज़ारी** (گزاری –) स्त्री. (फ़ा.) प्राविण्य; कार्यक्षमता; हुशारी. **–चोब** (چوب –) पु. (फ़ा.) (१) कापडावर कशिदा काढताना तें ज्या लाकडी चौकटी (फ्रेम) मध्ये बसवितात ती चौकट. (२) कशिदा काढणारा. **–चोबी** (چوبی –) स्त्री. (फ़ा.) कशिदा. **–ज़ार** (زار –) पु. (फ़ा.) युद्ध; लढाई. **–तलब** (طلب –) वि. (फ़ा.+'अ.) शूर; बहादूर. **–दाँ** (داں –); **–दार** (دار –) वि. (फ़ा.) जाणकार; अनुभवी. **–नामः** (نامہ –) पु. ('अ.) (१) अविस्मरणीय कामगिरी; कर्तबगारी. (२) अहवाल; इतिहास. (३) चित्रसंग्रह; अल्बम. **–परदाज़** (پرداز –) वि. (फ़ा.) व्यवस्थापक; कार्यकर्ता. **–फ़रमा** (فرما –) वि. (फ़ा.) (१) काम करणारा. (२) प्रभाव पाडणारा. (३) बादशहा; अधिकारी. (४) आचार्य. **–बंद** (بند –) वि. (फ़ा.) (१) आज्ञाधारक. (२) अंमलबजावणी करणारा. **–बरारी** (براری –) स्त्री. (फ़ा.) (१) कामनापूर्ती. (२) सिद्धी; स्वार्थ. **–ओ-बार** (وبار –) पु. (फ़ा.) (१) कामकाज. (२) व्यवसाय;

व्यापार. **–बारी** (بار ی –) वि. (फ़ा.) व्यावसायिक; धंदेवाईक. **–मंद** (مند –) वि. (फ़ा.) दास; नोकर. **–रवा'ई** (روائی –) स्त्री. (फ़ा.) (१) कामकाज. (२) कार्यवाही. (३) प्रक्रिया. (४) व्यवस्था. **–शनास** (شناس –) वि. (फ़ा.) अनुभवी. **–साज़** (ساز –) बिघडलेले काम सुधारणारा; चतुर; ईश्वर. **कारस्तानी** (کارستانی) स्त्री. (हि.) चलाखी; लबाडी.

कार-ए-आब (کار آب) पु. (फ़ा.) मद्यपान.

कार-ए-ख़ैर (کار خیر) पु. (फ़ा.+'अ.) पुण्य कार्य; कल्याण कार्य.

कार-ए-दस्त बस्तः (کار دست بستہ) पु. (फ़ा.) सगळ्यांनाच करता येणार नाही, एखाद्यालाच करता येईल असे अवघड कार्य.

कार-ए-नुमायां (کار نمایاں) पु. (फ़ा.) सर्वश्रेष्ठ काम; डोळ्यांत भरण्यासारखे कार्य.

कार-ए-सवाब (کار ثواب) पु. (फ़ा. + 'अ.) पुण्य कार्य.

कार-ओ-बार (کاروبار) पु. (फ़ा.) व्यापार; व्यवसाय; कामधंदा.

कारद (کارد) पु. (फ़ा.) चाकू.

कारवाँ (کارواں) पु. (फ़ा.) प्रवाशांचा तांडा; काफिला. **–सरा** (سرا –) स्त्री. (फ़ा.) धर्मशाळा; पथिकाश्रम. **–सालार** (سالار –) पु. (फ़ा.) काफिल्याचा सरदार; नेता.

कारिंदः (کارندہ) पु. (फ़ा.) (१) कार्यकर्ता; कर्मचारी. (२) जमीनदाराचा गुमास्ता; मुनीम; कारभारी.

क़ारिद् (قارض) वि. ('अ.) कर्ज देणारा; ऋणको.

क़ारी (قاری) पु. वि. ('अ.) वाचणारा; शुद्ध उच्चारांसह कुराण वाचणारा.

कारी (کاری) वि. (फ़ा.) (१) भरपूर. (२) प्रभावकारक; परिणामकारक. (३) भयंकर; विघातक.

कारीगर (کاریگر) पु. (फ़ा.) कारागीर; शिल्पकार; गवंडी; चांभार. (वि.) निपुण; दक्ष.

कारीगरी (کاریگری) स्त्री. (फ़ा.) (१) कारागिरी; कामगिरी; कला. (२) हुशारी.

क़ारूँ (قاروں); **क़ारून** (قارون) पु. ('अ.) (१) प्राचीन काळच्या एका अत्यंत श्रीमंत पण कृपण माणसाचे नाव. (२) अत्यंत श्रीमंत व कंजूष व्यक्ती. **–का ख़ज़ानः** (کا خزانہ –) पु. ('अ.) अपरंपार धन; कुबेराची संपत्ती.

क़ारूरः (ہ ارورہ) पु. ('अ.) (१) बाटली. (२) रोग्याचे मूत्र; मूत्र भरून ठेवण्याची बाटली. (३) स्फोटाची दारू भरलेली बाटली. (ही पेटवून शत्रूवर फेकत असत).

क़ाल (قال) पु. ('अ.) (१) वचन; उक्ती. (२) चर्चा; वादविवाद. **–मक़ाल** (مقال –) स्त्री. ('अ.) वादविवाद; हुज्जत.

क़ाल-ओ-क़ील (قال و قیل) स्त्री. ('अ.) वादविवाद; बोलाचाली; हुज्जत.

कालबुद (کالبد) पु. (फ़ा.) (१) शरीर; देह. (२) आकार; साचा. (३) चांभाराचा बूट वगैरे बनविण्याचा साचा.

क़ालिब (قالب) पु. ('अ.) (१) शरीर. (२) सांगाडा. (३) टोपी किंवा पगडी बनविण्याचा साचा.

क़ाली (قالی); **क़ालीचः** (قالیچہ); **क़ालीन** (قالین) पु. (तु.) गालिचा.

काव काव (کاو کاو) स्त्री. (फ़ा.) खूप परिश्रम; प्रयत्न.

कावली (کاولی) स्त्री. (फ़ा.) वेश्या.

कावह (کاوہ) पु. (फ़ा.) इराणमधील एका लोहाराचे नाव. (याने 'जहाक' नावाच्या अत्याचारी राजाविरुद्ध बंड केले होते आणि त्याचा पराभव करून फरीनदूला त्याच्या जागी बसवून स्वतः त्याचा प्रधान बनला होता).

काविश (کاوش) स्त्री. (फ़ा.) (१) खोदकाम. (२) शोध; चौकशी. (३) जिज्ञासा; डोके खाजविणे. (४) शत्रुत्व.

काश (کاش); **काशकि.** (کاش کہ) अव्य. (फ़ा.) (१) ईश्वर करो; असे व्हावे. (२) असे झाले असते तर किती बरे झाले असते!

क़ाश (قاش) स्त्री. (तु.) लांब तुकडा; फोड; फाक.

क़ाश-ए-ज़ी (قاش زیں) स्त्री. (तु.+फ़ा.) खोगीराचा वर आलेला भाग.

काशानः (کاشانہ) पु. (फ़ा.) (१) घर; झोपडी. (२) काचेचे घर (श्रीमंतांचे हिवाळ्यात रहाण्याचे). (३) घरटे.

काशिफ़ (کاشف) वि. ('अ.) उद्घाटक; प्रकट करणारा.

काशिफ़-ए-असरार (کاشف اسرار) पु. रहस्योद्घाटन करणारा.

क़ाशूर (قاشور) पु. ('अ.) भयंकर दुष्काळ. (वि.) अशुभ; अपशकुनी.

काशेह (کاشح) पु. ('अ.) वाह्यतः मैत्री व आतून शत्रुत्व करणारा.

काश्त (کاشت) स्त्री. (फ़ा.) (१) शेत. (२) शेती; खंडाने केली जाणारी शेती. **–कार** (کار –) पु. (फ़ा.)

शेतकरी; खंडकरी; कूळ. **–कारी** (کاری–) स्त्री. (फ़ा.) (१) शेती; कसणूक. (२) खंडाने केलेली शेती. **–नी** (نی–) वि. (फ़ा.) शेतीस योग्य.

काश्तः (کاشتہ) वि. (फ़ा.) नांगरलेले, पेरलेले (शेत).

कास (کاس) पु. (फ़ा.) (१) मोठा नंगारा; दुंदुभी. (२) डुक्कर.

कास (کاس) पु. ('अ.) (१) मद्याने भरलेला पेला. (२) पेला; चषक.

क़ासित् (قاسط) वि. ('अ.) (१) अत्याचारी; जुलमी. (२) न्यायी.

कासिद (کاسد) वि. ('अ.) (१) खोटा, नकली. (२) अप्रचलित.

क़ासिद (قاصد) वि. ('अ.) (१) इरादा बाळगणारा. (२) पत्र घेऊन जाणारा दूत; पोस्टमन.

कासिफ़ (کاسف) वि. ('अ.) (१) लपविणारा. (२) दुर्दशाग्रस्त. (३) कटु स्वभावाचा.

कासिब (کاسب) वि. ('अ.) उद्योग, परिश्रम करून पोट भरणारा.

क़ासिम (قاسم) वि. ('अ.) वाटणारा; वाटणी करणारा. **–उल्-अरज़ाक़** (الارزاق–) वि. ('अ.) रोजची भाकरी देणारा ईश्वर. **–महरूम** (محروم–) वाटी तो बोटे चाटी; वाटणाऱ्याला उरत नाही.

कासिर (کاسر) वि. ('अ.) तोडणारा; फोडणारा; भंजक.

क़ासिर (قاسر) वि. ('अ) जबरदस्तीने काम करून घेणारा.

क़ासिर (قاصر) वि. ('अ.) (१) उणीव असलेला; असमर्थ; वंचित. (२) कमी करणारा; कसर ठेवणारा. **–उल्-बयान** (البیان–) वि. ('अ.) बोलण्यास किंवा वर्णन करण्यास असमर्थ. **–होना** (ہونا–) नाईलाज होणे; कसर ठेवणे.

कासः (کاسہ) पु. ('अ.) पेला; प्याला. **–गर** (گر–) वि. ('अ.+फ़ा.) पेले बनविणारा; कासार; कुंभार. **–बाज़** (باز–) वि. ('अ.+फ़ा.) (१) पेल्यांचा खेळ करून दाखविणारा जादूगार. (२) कपटी; लबाड.

कासः-ए-गदा'ई (کاسہ گدائی) पु. ('अ.+फ़ा.) भिक्षापात्र; नरोटी.

कासः-ए-सर (کاسہ سر) पु. ('अ.+फ़ा.) कवटी; डोके.

कास्त (کاست) पु. (फ़ा.) उणीव; घट; नुकसान.

कास्तः (کاستہ) वि. (फ़ा.) घटलेला; कमी झालेला.

कास्नी (کاسنی) स्त्री. (फ़ा.) एक औषधी वनस्पती; कासणी.

काह (کاہ) स्त्री. (फ़ा.) वाळलेले गवत; काडी. **–कशां** (کشاں–) स्त्री. (फ़ा.) आकाशगंगा. **–गिल** (گل–) स्त्री. (फ़ा.) मातीत गवत मिसळून केलेला गारा; गिलावा.

क़ाह (قاہ) पु. ('अ.) आज्ञाधारकता.

क़ाहिर (قاہر) वि. ('अ.) कोप करणारा; भयंकर रागीट.

क़ाहिरः (قاہرہ) वि. ('अ.) (१) जबरदस्त; जोरदार. (२) जुलमी. (पु.) ईजिप्तची राजधानी कैरो.

काहिल (کاہل) वि. ('अ.) आळशी; सुस्त; मंद.

काहिल-उल्-वुजूब (کاہل الوجود); **काहिल-ए-वुजूब** (کاہل وجود) वि. ('अ.) अत्यंत आळशी; रिकामटेकडा.

काहिली (کاہلی) स्त्री. ('अ.) आळस; सुस्ती.

काहिश (کاہش) स्त्री. (फ़ा.) उणीव; घट.

काहिश-ए-जां (کاہش جاں) स्त्री. (फ़ा.) ज्याच्यामुळे आयुष्य कमी होते असा आघात; भयंकर आघात.

काही (کاہی) वि. (फ़ा.) गवताच्या रंगाचा; काळसर हिरवा.

काहीदगी (کاہیدگی) स्त्री. (फ़ा.) (१) घट; कमतरता. (२) हडकुळे होणे.

काहीदः (کاہیدہ) वि. (फ़ा.) घटलेला; कमी झालेला; हडकुळा; ऱ्हस्व. **–तन** (تن–) वि. (फ़ा.) हडकुळा; वाळलेल्या शरीराचा. **–रू** (رو–) वि. (फ़ा.) ज्याचा चेहरा उतरला आहे असा; म्लानमुख.

काहू (کاہو) पु. (फ़ा.) कोबीसारखी एक औषधी वनस्पती. हिचे बी मेंदूची दुर्बलता नाहीशी करते.

किगाश (کنگاش) पु. (तु.) सल्ला.

कि. (کہ) अव्य. (फ़ा.) (१) की. (२) तत्क्षणी; इतक्यात. (३) अथवा. (४) अशासाठी की.

किज़्ब (کذب) पु. ('अ.) असत्य; खोटे.

क़िज़िल (قزل) वि. (तु.) लाल; तांबडा. **–बाश** (باش–) पु. (तु.) लाल टोपीवाला सैनिक.

किताब (کتاب) स्त्री. ('अ.) (१) पुस्तक; ग्रंथ. (२) वही. **–खानः** (خانہ–) पु. ('अ. + फ़ा.) (१) ग्रंथालय. (२) पुस्तकाचे दुकान. **–चः** (چہ–) पु. ('अ. + फ़ा.) पुस्तिका. **–वाला** (والا–) पु. ('अ. + फ़ा.) पाहा 'अहल-ए-किताब'.

किताब-उल्-लह (كتاب الله); **किताब-ए-आस्मानी** (كتاب آسمانی); **किताब-ए-इलाही** (كتاب الٰہی) स्त्री. ('अ.) ईश्वरी ग्रंथ; क़ुराण शरीफ़.

किताबत (كتابت) स्त्री. ('अ.) (१) लिखाण लिहिणे. (२) लिथो (शिलाप्रेस), साठी लिहिण्याचे काम. **ख़त-ओ-किताबत** (خط و كتابت) ('अ. + फ़ा.) पत्रव्यवहार.

किताबिस्तान (كتابستان) पु. ('अ.+फ़ा.) पुस्तकालय; ग्रंथभांडार.

किताबी (كتابی) वि. ('अ.) (१) पुस्तकी; ग्रंथासंबंधी. (२) लांबट. **–चेहरः** (چہرہ –); **–रुख़** (رخ –); **–रू** (رو –) पु. ('अ. + फ़ा.) लांबट चेहरा; प्रियतमेचे सुंदर मुख.

किताबः (كتابہ) पु. ('अ.) शिलालेख; अभिलेख.

क़ितार (قطار) स्त्री. ('अ.) ओळ; पंक्ती; श्रेणी; वर्ग. (हाच उच्चार शुद्ध आहे, परंतु उर्दूत 'क़तार' असे बोलतात).

क़िताल (قتال) पु. ('अ.) रक्तपात; युद्ध.

क़िफ़्फ़ (كف) पु. ('अ.) खांदा.

क़िदम (قدم) पु. ('अ.) (१) प्राचीनत्व. (२) अनश्वरता.

क़िदवः (قدوہ) पु. ('अ.) नेता; सरदार. (वि.) श्रेष्ठ.

किनायत (كنايت) स्त्री. ('अ.) (१) गुप्त गोष्ट. (२) रूपक; लक्षण; इशारा; संकेत.

किनायतन् (كنايتاً) अव्य. ('अ.) सांकेतिकपणे; गुप्तपणे; लाक्षणिकरीत्या.

किनायः (كنايہ) पु. ('अ.) (१) गुप्त गोष्ट; संकेत; इशारा. (२) रूपक अलंकार. (उपमेयाचे वर्णन न करता उपमानाचे वर्णन करणे); लक्षण (अलंकार).

किनार (كنار) पु. स्त्री. (फ़ा.) (१) कूस; बगल. (२) किनारा. **–बर किनार** (برکنار –) अव्य. (फ़ा.) दूरच राहिले.

किनारः (کنارہ) पु. (फ़ा.) तट; किनारा (शुद्ध: 'कनारः').

किफ़ायत (كفايت) स्त्री. ('अ.) (१) बचत; नफा. (२) काटकसर. (३) पुरेसे, हवे तेवढे असणे. **–शि'आर** (شعار –) वि. ('अ.) मितव्ययी; काटकसरी. **–शि'आरी** (شعاری –) स्त्री. ('अ.) काटकसर.

किफ़ायती (كفايتی) वि. ('अ.) कमी खर्चाचा; काटकसरी.

किफ़्ल (كفل) पु. ('अ.) (१) खंड; अंश; तुकडा. (२) ज्याला घोडधावर बसता येत नाही असा. (३) घोड्याचे खोगीर.

किबार (كبار) पु. ['अ. 'कबीर' (كبير) चे अनेक.] मोठी माणसे.

किब्र (كبر) स्त्री. ('अ.) श्रेष्ठत्व; मोठेपणा; ज्येष्ठत्व. **–सिन** (سن –) वि. ('अ.) वयोवृद्ध.

किब्रिया (كبريا) पु. ('अ.) महत्ता; श्रेष्ठत्व; परमेश्वर.

किब्रिया'ई (كبريائی) स्त्री. ('अ.) प्रतिष्ठा; महत्ता; ईश्वरत्व.

किब्रीत (كبريت) पु. स्त्री. ('अ.) गंधक.

किब्रीत-ए-अह़मर (كبريت احمر) पु. स्त्री. ('अ.) (१) लाल गंधक. (२) परीस.

क़िब्लः (قبلہ) पु. ('अ.) (१) मक्केतील 'काबा' चे मंदीर. (२) मक्केत जेथे हूजरे अस्वद (काळा पाषाण) आहे, (ज्याच्याकडे तोंड करून मुसलमान नमाज पडतात) ते स्थान. (हे स्थान भारताच्या पश्चिमेस आहे, म्हणून पश्चिम). (३) पूज्य व्यक्ती. (४) पिता; राजा. (५) धूर्त (उपहासाने). **–ओ-क'अबः** (وکعبہ –) आदरसूचक शब्द. **–गाह** (گاہ –) वि. ('अ.+फ़ा.) पूज्य; श्रद्धेय; पिता. **–नुमा** (نما –) पु. ('अ. + फ़ा.) मक्केची दिशा (परीघ) दर्शविणारे यंत्र; होकायंत्र. **–परस्त** (پرست –) पु. ('अ. + फ़ा.) मुसलमान. **–रू** (رو –) वि. ज्याचे तोंड पश्चिमेकडे आहे असा.

क़िब्लः-ए-ह़ाजात (قبلۂ حاجات) पु. ('अ.) इतरांच्या गरजा भागविणारा; मनोरथ पूर्ण करणारा.

क़िब्लः-ए-'आलम (قبلۂ عالم) पु. ('अ.) जगतपूज्य; महाराज; बादशहा; वडीलधारे माणूस.

यह बातें रज़ाकी हैं क़िब्ल-ए-'आलम भी पीते हैं।

क़िमार (قمار) पु. ('अ.) जुगार; द्यूत. **–ख़ानः** (خانہ –) पु. ('अ. + फ़ा.) जुगाराचा अड्डा; द्यूतगृह. **–बाज़** (باز –) वि. ('अ.+फ़ा.) जुगारी. **–बाज़ी** (بازی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) जुगार; द्यूत.

क़िमाश (قماش) पु. ('अ.) (१) प्रकार. (२) तऱ्हा; ढब. (३) पत्त्यांचा एक खेळ.

क़ियादत (قیادت) स्त्री. ('अ.) (१) नेतृत्व; मार्गदर्शन. (२) दलाली.

क़ियाफ़ः (قیافہ) पु. ('अ.) (१) चेहरा; मुखाकृती. (२) चेहरा पाहून माणसाचा स्वभाव व भूत-भविष्य सांगणे; सामुद्रिक विद्या. (३) शरीरावरील खाणाखुणा; सामुद्र. **–दाँ** (دان –); **–शनास** (شناس –) पु. ('अ. + फ़ा.) मुखसामुद्रिक विद्या जाणणारा; ज्योतिषी.

आदमी पहचान लेते हैं क़ियाफ़ः देखकर।
ख़त का मज़मूँ भांप लेते हैं लिफ़ाफ़ः देखकर॥

क्रियाम (قیام) पु. ('अ.) (१) मुक्काम; तात्पुरता निवास. (२) स्थापना. (३) निश्चय; खात्री. (४) नमाजासाठी उभे राहाणे. **–गाह** (–گاہ) स्त्री. ('अ.+फ़ा.) निवासस्थान. **–पिज़ीर** (–پذیر) वि. ('अ.+फ़ा.) थांबलेला; मुक्काम केलेला.

क्रियामत (قیامت) स्त्री. ('अ.) (१) महाप्रलय. (२) अंतिम दिवस; मुसलमान, यहुदी व दिवरजी यांच्या कल्पनेप्रमाणे सृष्टीचा शेवटचा दिवस. (या दिवशी सारे मृतात्मे थडग्यांतून बाहेर येतील व ईश्वरासमोर त्यांच्या पापपुण्याचा हिशेब होईल, अशी समजूत आहे). (३) विध्वंस; संकट. (४) अन्याय; जुलूम. (वि.) (१) दीर्घ मुदतीचा; फार मोठा; अवघड; भयंकर. (२) अत्यंत सुंदर. **–अंगेज़** (–انگیز); **–खेज़** (–خیز) वि. ('अ.+फ़ा.) भयंकर; प्रलयकारी.

क्रियास (قیاس) पु. ('अ.) (१) कयास; अनुमान; अंदाज. (२) विचार.

क्रियासत (کیاست) स्त्री. ('अ.) (१) चातुर्य. (२) दक्षता; निपुणता.

क्रियासन् (قیاساً) वि. ('अ.) अंदाजाने; अनुमानतः

क्रिर'अत (قرأت) स्त्री. ('अ.) (१) वाचन; पठण. (२) शुद्ध उच्चारांसह कुराणाचे पठण.

किरा'इंदः (کرائندہ) वि. (फ़ा.) भाडयाने घेणारा.

क्रिरान (قران) पु. ('अ.) (१) समीपता; निकटता. (२) दोन ग्रहांची युती. (३) शुभ योग. **साहूब-ए-क्रिरान** (صاحب قران) भाग्यवान.

क्रिरान-उस्-स'अदैन (قران السعدین) पु. ('अ.) दोन शुभ ग्रहांची युती; शुभ योग.

किराम (کرام) पु. [अ. 'करीम' (کریم) चे अनेक.] दयाळू, दानी, पूज्य, प्रतिष्ठित लोक.

किरायः (کرایہ) पु. ('अ.) भाडे. **–दार** (–دار) पु. ('अ. + फ़ा.) भाडेकरू. **–नामः** (–نامہ) पु. ('अ.+फ़ा.) भाडेचिठ्ठी.

किरिश्मः (کرشمہ) पु. (फ़ा.) (१) नेत्रसंकेत; इशारा. (२) हावभाव. (३) जादू; चमत्कार. (४) आश्चर्य. **–कार** (–کار); **–साज़** (–ساز) पु. (फ़ा.) (१) जादूगार. (२) चमत्कार करणारा.

क्रिर्तूस (قرطوس) पु. ('अ.) फार मोठी दैवी आपत्ती.

क्रिर्तास (قرطاس) पु. ('अ.) कागद; कागदपत्र.

क्रिर्तास-ए-अब्यज़ (قرطاس ابیض) पु. ('अ.) पांढरा कागद; श्वेतपत्र.

किर्दार (کردار) पु. (फ़ा.) (१) कार्य; कृत्य. (२) चारित्र्य; शील. (३) शैली. (४) कथा-कादंबरीतील पात्र. **–निगारी** (–نگاری) स्त्री. (फ़ा.) स्वभावचित्रण; स्वभावरेखन.

किर्बास (کرباس) पु. ('अ.) पांढरे कापड; श्वेत वस्त्र; सुती कपडा.

किर्म (کرم); **किर्मक** (کرمک) पु. (फ़ा.) कृमी; कीटक. **–कुश** (–کش) वि. (फ़ा.) कीटकनाशक; कृमिनाशक. **–खुर्दः** (–خوردہ) वि. (फ़ा.) किडयांनी खाल्लेले. **–पीलः** (–پیلہ) पु. (फ़ा.) रेशमाचा किडा.

किर्म-ए-शब अफ़रोज़ (کرم شب افروز); **किर्म-ए-शब चिराग़** (کرم شب چراغ); **किर्म-ए-शब ताब** (کرم شب تاب) पु. (फ़ा.) काजवा; खद्योत.

किर्म-ए-शिकम (کرم شکم) पु. (फ़ा.) पोटातील कृमी; जंत.

किर्मक-ए-शब ताब (کرمک شب تاب) पु. (फ़ा.) काजवा; खद्योत.

क्रिर्मिज़ (قرمز) पु. ('अ.) एक प्रकारचे बारीक लाल किडे. (हे वाळवून त्यांनी रेशीम रंगवितात).

क्रिर्मिज़ी (قرمزی) वि. ('अ.) लाल; किरमिजी.

किलक (کلک) स्त्री. (फ़ा.) (१) बोरू. (२) बोरूची लेखणी.

क्रिला'अ (قلاع) पु. [अ. 'क़ल'अः' (قلعہ) चे अनेक.] किल्ले; गड.

क्रिलादः (قلادہ) पु. ('अ.) गळपट्टा; जनावरांच्या गळ्यांतील पट्टा.

क्रिलीच (قلیچ) पु. (तु.) तलवार.

किलीद (کلید) स्त्री. (फ़ा.) किल्ली; चावी.

किलीद-ए-कामरानी (کلید کامرانی) स्त्री. (फ़ा.) यशाची गुरुकिल्ली.

किलीद-ए-बिहिश्त (کلید بہشت) स्त्री. (फ़ा.) स्वर्गाची किल्ली; पुण्यकर्म.

किलीसा (کلیسا) पु. (फ़ा.) चर्च; गिरजाघर. **–'ई** (–ئی) पु. (फ़ा.) ख्रिश्चन.

क्रिल्यान (قلیان) पु. (फ़ा.) हुक्का; गुडगुडी.

क्रिल्लत (قلت) स्त्री. ('अ.) (१) कमतरता; टंचाई; तुटवडा. (२) अडचण.

क्रिल्लत-ओ-कसरत (قلت و کثرت) पु. ('अ.) न्यूनाधिक्य; कमीअधिकपणा.

क्रिवाम (قوام) पु. ('अ.) (१) मूलतत्त्वे. (२) क्रम व्यवस्था. (३) पाक; अर्क; अवलेह. (४) पाकातील सुगंधी तंबाखू.

किशमिश (کشمش) स्त्री. (फ़ा.) बेदाणा; किसमिस.

किशमिशी (کشمشی) वि. (फ़ा.) (१) बेदाण्याचा. (२) फिकट हिरवा (रंग).

किशावर्ज़ (کشاورز) पु. (फ़ा.) शेतकरी.

किशिक (کشک) पु. (तु.) पहारा; रखवाली. **–ची** (چی –) पु. (तु.) **–दार** (دار –) पु. (तु.+फ़ा.) पहारेदार; रखवालदार.

किश्त (کشت) स्त्री. (फ़ा.) (१) शेती. (२) बुद्धिबळातील शह. **–कार** (کار –) पु. (फ़ा.) शेतकरी. **–ज़ार** (زار –) पु. (फ़ा.) हिरवीगार शेते असलेले स्थान.

क़िश्र (قشر) पुं. ('अ.) साल; टरफल.

किश्वर (کشور) पु. (फ़ा.) देश; प्रदेश. **–कुशा** (کشا –); **–सितां** (ستاں –) वि. (फ़ा.) विश्वविजयी; दिग्विजयी.

क़िस्स़ (قصص) पु. ['अ. 'क़िस्स:' (قصہ) चे अनेक.] गोष्टी; कहाण्या; कथा.

क़िसास़ (قصاص) पु. ('अ.) खुनाचा सूड खुनाने घेणे; प्रतिहिंसा.

क़िस्त़ (قسط) स्त्री. ('अ.) (१) हप्ता; भाग; अंश. (२) न्याय. **–बंदी** (بندی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) हप्तेबंदी. **–वार** (وار –) अव्य. ('अ.+फ़ा.) हप्त्याने.

क़िस्म (قسم) स्त्री. ('अ.) (१) प्रकार; तऱ्हा; जात. (२) पद्धत; ढंग.

क़िस्मत (قسمت) स्त्री. ('अ.) (१) भाग्य; नशीब; दैव. (२) विभाजन. (३) विभाग; हिस्सा; इलाखा. **–आज़मा'ई** (آزمائی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) भाग्य परीक्षा; अवघड कसोटी, कार्य. **–वर** (ور –) वि. ('अ.+फ़ा.) भाग्यवान.

किस्रा (کسریٰ) पु. ('अ.) इराणच्या बादशहाची पदवी.

किस्वत (کسوت) स्त्री. ('अ.) (१) कपडे; पोषाख. (२) न्हाव्याची धोपटी.

क़िस्सीस (قسیس) पु. ('अ.) किरिस्तावांचा धर्मगुरू; पाद्री.

क़िस्स: (قصہ) पु. ('अ.) (१) गोष्ट; कथा; कहाणी. (२) वृत्तांत; बातमी; हकीगत. (३) समस्या. (४) झगडा; भांडण. **–कोताह** (کوتاہ –) अव्य. ('अ.+फ़ा.) सारांश काय की, तात्पर्य हे की. **–ख़्वां** (خواں –); **–गो** (گو –) पु. ('अ.+फ़ा.) कहाणी सांगणारा; गोष्टी सांगून उपजीविका करणारा. **–पाक करना** (پاک کرنا –) (१) भांडण मिटविणे. (२) निकाल लावणे. (३) खून करणे. **–मुख़्तस़र** (مختصر –) अव्य. ('अ.) थोडक्यात असे की, सारांश हा की.

किहीं (کہیں) वि. (फ़ा.) अत्यंत लहान; क्षुद्र.

किहीनः (کہینہ) वि. (फ़ा.) (१) वयाने लहान. (२) क्षुद्र.

क़िहफ़ (قحف) पु. ('अ.) कवटी.

कीन (کین); **कीनः** (کینہ) पु. (फ़ा.) वैर; द्वेष. **–अंदोज़** (اندوز –); **–कश** (کش –); **–परवर** (پرور –); **–वर** (ور –) वि. (फ़ा.) वैर बाळगणारा; खुनशी.

कीपा (کیپا) पु. (तु.) बकऱ्याच्या आतडधात तांदूळ व मसाला भरून तयार केला जाणारा पुलाव.

क़ीफ़ (قیف) स्त्री. (फ़ा.) नरसाळे; गाळणे; फनेल.

क़ीमत (قیمت) स्त्री. ('अ.) (१) किंमत; मूल्य. (२) प्रतिष्ठा; महत्त्व.

क़ीमतन् (قیمتاً) अव्य. ('अ.) किंमत देऊन; विकत.

क़ीमती (قیمتی) वि. ('अ.) मौल्यवान; बहुमोल; महाग.

कीमिया (کیمیا) स्त्री. ('अ.) (१) रसायनशास्त्र. (२) किमया; सोने चांदी बनविण्याची कला. (३) रासायनिक क्रिया. **–असर** (اثر –) वि. ('अ.) अत्यंत गुणकारी; मातीचे सोने बनविणारी वस्तू. **–गर** (گر –); **–साज** (ساز –) पु. ('अ.) (१) रसायन बनविणारा. (२) तांबे वगैरेपासून सोने बनविणारा. (३) चमत्कार करून दाखविणारा; हुशार.

कीमुख़्त (کیمخت) पु. (फ़ा.) घोडयाचे किंवा गाढवाचे कमावलेले कातडे.

क़ीमः (قیمہ) पु. (फ़ा.) खिमा; बारीक तुकडे केलेले मांस.

क़ीर (قیر) पु. (फ़ा.) डांबर; काळे रोगण. **–गूं** (گوں –) वि. (फ़ा.) काळाकुट्ट.

क़ीरात़ (قیراط) स्त्री. ('अ.) चार रतींचे एक वजन.

क़ील (قیل) पु. ('अ.) शब्द; वचन; भाषण. **–ओ-क़ाल** (وقال –) स्त्री. ('अ.). (१) वादविवाद; चर्चा. (२) हुज्जत. (३) संभाषण.

कीस (کیس) पु. ('अ.) **कीसः** (کیسہ) पु. (फ़ा.) (१) खिसा. (२) पिशवी. **–तराश** (تراش –); **–बुर** (بر –); **–वर** (ور –) पु. (फ़ा.) खिसेकापू; खिसा कापणारा; भामटा.

क़ीह़ (قیح) स्त्री. ('अ.) पू (जखमेतील).

कुंग (کنگ) वि. (फ़ा.) घष्टपुष्ट; सामर्थ्यवान.

कुंगुर (کنگر); **कुंगुरः** (کنگرہ) पु. (फ़ा.) (१) कंगोरा; कड; किनार. (२) प्रासाद वगैरेचा लहान घुमट; शिखर; कळस. (३) किल्ल्यावरील माऱ्याची जागा; बुरूज.

कुंज (کنج) पु. (फ़ा.) कोपरा; एकांत.

दुनिया में रंज-ओ-ग़म से जो फ़ुर्सत न मिल सकी।
आख़िर को थक के सो गये कुंज-ए-मज़ार में ॥

कुंज-ए-इंज़िवा (کنج انزوا); **कुंज-ए-'उज़्लत** (کنج عزلت); **कुंज-ए-ख़ल्वत** (کنج خلوت); **कुंज-ए-तन्हा'ई** (کنج تنہائی) पु. (फ़ा. + 'अ.) एकांत स्थान; निर्जन कोपरा.

कुंज-ए-क़फ़स (کنج قفس) पु. (फ़ा.+'अ.) (१) पिंजऱ्याचा कोपरा. (२) कारागृह.

कुंज-ए-दहन (کنج دہن) पु. (फ़ा.) तोंडाचा कोपरा.

कुंज-ए-लहद (کنج لحد) पु. ('अ.+फ़ा.) थडग्यातील कोपरा; एकांत.

कुंजकावी (کنج کاوی) स्त्री. (फ़ा.) (१) शोध. (२) जिज्ञासा. (३) चिंतन. (४) परिश्रम.

कुंजद (کنجد) पु. स्त्री. (फ़ा.) तीळ (धान्य).

कुंजारः (کنجارہ) पु. (फ़ा.) पेंड.

कुंजिश्क (کنجشک) स्त्री. (फ़ा.) चिमणी (पक्षी).

कुंद (کند) वि. (फ़ा.) (१) बोथट. (२) मंद. (३) मूढ. (४) सुस्त. **–ज़िहन** (ذہن –) वि. (फ़ा.+'अ.) मंदबुद्धी; मठ्ठ.

कुंदावर (کنداور) पु. (फ़ा.) (१) बुद्धिमान; शहाणा मनुष्य; वैज्ञानिक. (२) मल्ल.

कुंदी (کندی) स्त्री. (फ़ा.) सुस्ती; आळस.

कुंदू (کندو) पु. (फ़ा.) पात्र; भांडे.

कुंदः (کندہ) पु. (फ़ा.) (१) लाकडाचा मोठा ओंडका. (२) बंदुकीचा दस्ता. (३) खोडा.

कुंदः-ए-नातराश (کندۂ ناتراش) पु. (फ़ा.) न तासलेला ओंडका; मठ्ठ; असभ्य मनुष्य.

क़ु'अुद (قعود) पु. ('अ.) बसणे; बैठक; नमाजातील बसणे.

क़ुक़्नस (ققنس) पु. ('अ.) अत्यंत मधुर कंठ असलेला एक काल्पनिक पक्षी. (ग्रीक लोकांनी याच्यापासून गायन विद्या शिकून घेतली व याच्या गाण्याने आग लागे अशी समजूत आहे).

कुख़्कुख़ (کخ کخ) पु. (फ़ा.) खोकण्याचा आवाज.

कुजा (کجا) अव्य. (फ़ा.) कोठे? कोणत्या ठिकाणी?

कुतल (کوتل) पु. (तु.) खास स्वारीचा घोडा.

कुतावः (کتابہ) पु. ('अ.) मशीद; थडगे अथवा महाल यांवर लावण्यात येणारा शिलालेख; दगडावर खोदलेला स्तुतिलेख; अभिलेख.

कुतुब (کتب) पु. स्त्री. ['अ. 'किताब' (کتاب) चे अनेक.] पुस्तके; ग्रंथ. **–ख़ानः** (خانہ –) पु. ('अ. + फ़ा.) ग्रंथालय. **–फ़रोश** (فروش –) पु. ('अ. + फ़ा.) ग्रंथविक्रेता.

क़ुतुब (قطب) पु. ('अ.) (१) ध्रुवतारा. (२) पृथ्वीचा आस. (३) जाते ज्याच्यावर फिरते तो खिळा. (४) सरदार; नेता; श्रेष्ठ ऋषी. **–नुमा** (نما –) पु. ('अ.+फ़ा.) होकायंत्र.

क़ुतुब-ए-जुनूबी (قطب جنوبی) पु. ('अ.) दक्षिण ध्रुव.

कुतुब-ए-शिमाली (قطب شمالی) पु. ('अ.) उत्तर ध्रुव.

क़ुतुबैन (قطبین) पु. ('अ.) उत्तर व दक्षिण दोन्ही ध्रुव.

कुत्कः (کتکہ) पु. (तु.) जाडजूड सोटा.

क़ुत्ती (قتی) स्त्री. (तु.) पेटी; लहान पेटारा.

क़ुत्र (قطر) पु. ('अ.) व्यास; गोलाला मधोमध छेदणारी रेषा.

क़ुत्रब (قطرب) पु. ('अ.) (१) पाण्यावर सतत धावणारा एक किडा; निवळी. (२) वेडाचा एक प्रकार. (या प्रकारचा रोगी एके ठिकाणी बसत नाही, सारखा धावत असतो).

क़ुदमा (قدما) पु. ['अ. 'क़दीम' (قدیم) चे अनेक.] जुने लोक. प्राचीन काळचे विद्वान व शास्त्रज्ञ.

क़ुदात (قضات) पु. ['अ. 'क़ादी' (قاضی) चे अनेक.] लग्न लावणारे काजी; न्यायदान करणारे काजी.

क़ुद्दुस (قدس) वि. ('अ.) पवित्र. (पु.) पावित्र्य.

क़ुदूरत (کدورت) स्त्री. ('अ.) (१) मलिनता; गलिच्छपणा. (२) मनोमालिन्य.

क़ुद्दूस (قدوس) स्त्री. ('अ.) अत्यंत पवित्र. (पु.) परमेश्वर.

क़ुद्रत (قدرت) वि. ('अ.) (१) निसर्ग; प्रकृती. (२) स्वभाव. (३) सामर्थ्य; प्रभुत्व. (४) रचना. (५) दैवी माया. (६) समृद्धी. **–के कारख़ाने** (کے کارخانے –); **–के खेल** (کے کھیل –) दैवी लीला.

क़ुद्रत-ए-हक़्क़ (قدرت حق) स्त्री. ('अ.) ईश्वरी माया.

क़ुद्रतन् (قدرتاً) अव्य. ('अ.) निसर्गतः; नैसर्गिकरीत्या.

क़ुद्रती (قدرتی) वि. ('अ.) (१) स्वाभाविक; नैसर्गिक. (२) दैवी.

क़ुद्स (قدس) पु. ('अ.) (१) पावित्र्य. (२) जेरुसलेम-मधील एक पर्वत.

क़ुद्सियाँ (قدسیاں) पु. ['अ. 'क़ुद्सी' (قدسی) चे अनेक.] (१) देवदूत. (२) ऋषी-मुनी.

क़ुद्सी (قدسی) वि. ('अ.) पवित्र (पु.) देवदूत. **–सिफ़ात** (صفات –) पु. ('अ.) दैवी गुण.

कुन (کن) प्रत्य. (फ़ा.) करणारा. [उदा. 'कारकुन' (کارکن) काम करणारा].

कुन (کن) क्रि. ('अ.) हो! (हा शब्द ईश्वराच्या तोंडून निघाला व सृष्टीची उत्पत्ती झाली).

कुनह (کنہ) स्त्री. ('अ.) (१) तथ्य; वास्तविकता. (२) सूक्ष्मता.

कुनार (کنار) पु. (फ़ा.) बोर (फळ).

कुनिश्त (کنشت) पु. (फ़ा.) उपासनागृह; मंदीर; अग्निशाळा.

क़ुनूत (قنوت) पु. ('अ.) (१) आज्ञापालन करणे. (२) नमाजामध्ये स्तब्ध उभे रहाणे.

क़ुनूत (قنوط) पु. ('अ.) निराशा; नाउमेद.

क़ुनूतियत (قنوطیت) स्त्री. ('अ.) निराशावाद.

क़ुनूती (قنوطی) वि. ('अ.) निराशावादी.

कुन्यत (کنیت); **कुन्नियत** (کنیت) स्त्री. ('अ.)अरबी पद्धतीप्रमाणे आई, बाप किंवा मुलगा यांच्याशी असलेला संबंध व्यक्त करणारे नाव. [उदा. 'अबु'ल्-हसन' (ابوالحسن) हसनचा पिता.] वंशाचे किंवा गोत्राचे नाव.

क़ुफ़ल (قفل) पु. ('अ.) कुलूप; टाळे.

कुफ़ूर (کفور) पु. ('अ.) कृतघ्नता.

कुफ़्फ़ार (کفار) पु. ['अ. 'काफ़िर' (کافر) चे अनेक.] नास्तिक लोक.

क़ुफ़्फ़ः (قفہ) पु. ('अ.) उंचवटा; उच्च स्थान. (वि.) उच्च.

कुफ़् (کفر) पु. ('अ.) (१)नास्तिकता. (२)नाकबुली; इस्लाम न मानणे. (३) कृतघ्नता. **–आश्ना** (آشنا –) वि. ('अ.+फ़ा.) नास्तिक व नास्तिकता यांच्याविषयी प्रेम बाळगणारा; पाप परायण. **–तोड़ना** (توڑنا –) (१) मुसलमान बनविणे. (२) हट्ट सोडावयास लावणे.

कुफ़्-ओ-इल्हाद (کفر و الحاد) पु. ('अ.) नास्तिकता.

कुफ़्रान (کفران) पु. ('अ.) कृतघ्नता.

कुफ़्रान-ए-नि'अमत (کفران نعمت) पु. ('अ.) ईश्वराने दिलेल्या दुर्लभ वस्तूंबद्दल कृतज्ञता न मानणे.

कुफ़्रिस्तान (کفرستان) पु. ('अ.+फ़ा.) नास्तिकांचा देश; जुलमी लोकांमुळे जेथे न्याय-नीती उरलेली नाही असे स्थान.

क़ुफ़्ल (قفل) पु. ('अ.) कुलूप; टाळे. **–शिकनी** (شکنی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) कुलूप मोडणे; चोरी होणे.

क़ुफ़्ली (قفلی) स्त्री. (हि.) (१) झाकण असलेले भांडे. (२) चिलमीच्या आकाराचे फिरकीचे भांडे; साचा. (३) एकात एक बसणारी फिरकीची भांडी. [यापासून 'कुलफ़ी' (मलई, बर्फ वगैरे) हा शब्द बनला आहे.] (४) कुस्तीतील एक पेच.

कुबरा (کبرا) पु. ['अ. 'कबीर' (کبیر) चे अनेक.] श्रेष्ठ लोक.

क़ुबूर (قبور) स्त्री. ['अ. 'क़ब्र' (قبر) चे अनेक.] थडगी; समाध्या.

क़ुबूल (قبول) पु. ('अ.) समोर येणे; हजर होणे.

क़ुबूल (قبول) वि. (फ़ा.) पसंत; मान्य केलेला; प्रिय असलेला.

क़ुब्बः (قبہ) पु. ('अ.) (१) लहान घुमट; घुमटी; कळस. (२) कळशी.

कुब्रां (کبریٰ) स्त्री. ['अ. 'अक्बर' (اکبر) चे स्त्री.] फार मोठी. [उदा. 'क़ियामत-ए-कुब्रां' (قیامت کبریٰ) स्त्री. ('अ.) घोर आपत्ती].

क़ुब्ल (قبل) स्त्री. ('अ.) स्त्रीचे जननेंद्रिय; योनी; भग.

क़ुब्लः (قبلہ) पु. ('अ.) चुंबन; मुका.

क़ुब्हू (قبح) पु. ('अ.) दोष; खोड; उणीव.

क़ुम (قم) क्रि. ('अ.) 'उठून बैस'; 'जिवंत हो'; 'उभा राहा'. (हा शब्द उच्चारून येशू ख्रिस्त मृतांना जिवंत करीत असत).

कुमक (کمک) स्त्री. (तु.) मदत; युद्धातील कुमक.

क़ुमक़ुमः (قمقمہ) पु. ('अ.) (१) काचेचा गोल, पोकळ गोळा. (हा शोभेसाठी छताला टांगतात). (२) अभ्रकाचा पोकळ गोळा. (यात गुलाल किंवा अबीर घालून एकमेकावर फेकतात–होळीच्या किंवा रंगपंचमीच्या दिवशी.) गुलाल गोटा. (३) एक प्रकारचा लहान दिवा. (४)विजेच्या दिव्याचा बल्ब. (५) पेला.

क़ुमरी (قمری) स्त्री. ('अ.) जंगली कबुतर; पारवा; होला.

क़ुमल (قمل) स्त्री. ('अ.) ऊ.

कुमाच (کماچ) स्त्री. (तु.) रोटगा; रोट.

क़ुमाश (قماش) पु. ('अ.) (१) वस्त्र; पोषाख. (२) घरगुती सामान. (३) कला; हुन्नर. (४) गुण.

कुमेज़ (کمیز) पु. (फ़ा.) मूत्र; लघ्वी.

कुमैत (کمیت) पु. ('अ.) (१) काळसर झाक असलेला लाल रंगाचा घोडा. (२) काळसर तांबडा रंग (शु.).

क़ुम्मलः (قملہ) पु. ('अ.) गोचीड.

क़ुम्मा (قما) स्त्री. (तु.) दासी; मोलकरीण.

क़ुम्मः (قم) पु. ('अ.) (१) टोक; अग्र. (२) जनसमुदाय.

कुरंग (کرنگ) पु. (फ़ा.). लाल रंगाचा घोडा.

क़ुर (قر) पु. ('अ.) हिवाळा.

क़ुरआन (قرآن) पु. ('अ.) मुसलमानांचा धर्मग्रंथ. (यात ३० 'पारे', ११४ 'सूरते', ६६४० 'आयते' व ५४० 'रुकू'अ' आहेत. हा ग्रंथ ईश्वरी, अपौरुषेय मानला जातो). (मूळ शब्दार्थ: वाचणे; पठण करणे). **–ख़्वाँ** (خواں –) वि. ('अ.+फ़ा.) कुराणपठण करणारा. **–ख़्वानी** (خوانی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) कुराणपठण.

क़ुर'अः (قرعہ) पु. ('अ.) शकुन पाहण्यासाठी वापरला जाणारा फासा. **–अंदाज़** (انداز –) पु. ('अ. + फ़ा.) फासा टाकून भविष्य वर्तविणारा. **–अंदाज़ी** (اندازی –) स्त्री. ('अ. + फ़ा.) फासा टाकणे; फासा टाकून निर्णय करणे.

कुरगः (کورگم) पु. (तु.) मोठा नगारा; दुंदुभी.

कुरमसाक़ (کرم ساق) पु. (तु.) आपल्या पत्नीला शरीरविक्रय करावयास लावून उपजीविका चालविणारा निर्लज्ज पुरुष; भडवा; दलाल (वेश्यांचा).

क़ुरशी (قرشی) वि. ('अ.) कुरैश वंशाशी संबंधित. (या अर्थाने वापरला जाणारा 'क़ुरैशी' शब्द अशुद्ध आहे).

कुरह (کرہ) पु. ('अ.) (१) वर्तुळ; घेर. (२) गोळा. (३) मंडळ. (४) चेंडू.

कुरा'अ (کراع) पु. ('अ.) (१) पशूंचे खूर, पाय. (२) घोडे. (३) पर्वत-शिखर.

कुरासः (کراسہ) पु. ('अ.) (१) ग्रंथ. (२) कुराण.

क़ुरून (قرون) पु. ['अ. 'क़र्न' (قرن) चे अनेक.] युगे; अनेक कालखंड.

क़ुरून-ए-ऊलॉ (قرون اولیٰ) पु. ('अ.) (१) प्रारंभिक युग. (२) इस्लामचा प्रारंभिक काळ.

क़ुरून-ए-वुस्तॉ (قرون وسطیٰ) पु. ('अ.) (१) मध्ययुग. (२) इस्लामचे मध्ययुग.

कुरूब (کروب) पु. ['अ. 'किर्ब' (کرب) चे अनेक.] यातना; पीडा.

क़ुरैश (قریش) पु. ('अ.) अरबस्तानातील एक प्रतिष्ठित घराणे. [याच घराण्यात (वंशात) हजरत मुहम्मद पैगंबर यांचा जन्म झाला होता].

कुरोह (کروہ) पु. (फ़ा.) एक कोस; दोन मैल.

क़ुर्क़ (قرق) वि. (तु.) (१) निषिद्ध; वर्जित. (२) जप्त केलेला. (३) देखरेख. (४) अडविलेला. **–ए-अमीन** (امین –) पु. (तु. + 'अ.) न्यायालयाच्या आज्ञेप्रमाणे मालाची जप्ती व लिलाव करणारा अधिकारी; बेलीफ.

क़ुर्क़ी (قرقی) स्त्री. (तु.) जप्ती.

कुर्कुम (کرکم) पु. (फ़ा.) केशर.

क़ुर्तु (قرط) पु. ('अ.) कानात घालावयाचा डूल, लोलक.

कुर्ती (کرتی) स्त्री. (तु.+हिं.) (१) चोळी; ब्लाऊझ. (२) सैनिकांचे जाकीट.

कुर्तः (کرتم) पु. (तु.) सदरा; कुडने.

कुर्द (کرد) पु. (तु.) तुर्की लोकांची एक भटकी व शूर जमात.

कुर्दक (کردک) पु. (फ़ा.) धष्टपुष्ट व बलवान माणूस.

कुर्दिस्तान (کردستان) पु. (तु.+फ़ा.) कुर्द जमातीचा प्रदेश.

कुर्निश (کورنش) स्त्री. (तु.) कुर्निसात; लवून केलेला प्रणाम.

क़ुर्ब (قرب) पु. ('अ.) सामीप्य; निकटता.

क़ुर्ब-ओ-जुवार (قرب و جوار) पु. ('अ.) आजूबाजू; आसपास; चोहोकडे.

क़ुर्बत (قربت) स्त्री. ('अ.) (१) सामीप्य. (२) सहवास; सोबत. (३) मैथुन.

कुर्बत (کربت) स्त्री. ('अ.) क्लेश; दुःख; यातना.

क़ुर्बां (قرباں); **क़ुर्बान** (قربان) पु. ('अ.) बळी; बलिदान; अर्पण केलेली वस्तू. **–गाह** (४ –) स्त्री. ('अ.+फ़ा.) बलिवेदी; वधस्थल.

क़ुर्बान (قربان) पु. (फ़ा.) धनुष्य ठेवावयाचा गळघातील पट्टा.

क़ुर्बानी (قربانی) स्त्री. ('अ.) (१) बलिदान; बळी. (२) त्याग.

कुर्म (کرم) पु. ('अ.) आत्यंतिक शोक व दुःख.

क़ुर्र (قر) पु. ('अ.) हिवाळा.

क़ुर्रत-उल्-'ऐन (قرۃ العین) पु. ('अ.) डोळ्यांची ज्योती किंवा शीतलता. (बहुधा पुत्राला उद्देशून हा शब्द वापरतात).

कुर्रम (قرم) पु. (हिं.) (१) वेश्यांचा दलाल; भडवा. (२) हलकट (बा.).

कुर्रासः (کراسہ) पु. ('अ.) (१) ग्रंथाचा एखादा भाग किंवा अध्याय. (२) कुराणाचा एक 'पारा'.

क़ुर्रः (۴قر) पु. ('अ.) (१) शीतलता. (२) ज्योती; प्रकाश. (३) सुख.

कुर्रः (۴کر) पु. (फ़ा.) (१) घोड्याचे किंवा गाढवाचे पिल्लू; शिंगरू. (२) चाबूक.

कुर्रः (۴کر) पु. ('अ.) गोळा; वर्तुळ; वाटोळा.

कुर:-ए-अर्द (کرۂ ارض) पु. ('अ.) भूगोल; भूमंडळ; पृथ्वीचा गोल.

कुर:-ए-आफ़्ताब (کرۂ آفتاب) पु. ('अ.+फ़ा.) सूर्यमंडळ.

कुर:-ए-नार (کرۂ نار) पु. ('अ.) अग्निमंडळ.

कुर:-ए-बाद (کرۂ باد) पु. ('अ.+फ़ा.) वायुमंडळ; वातावरण.

कुर:-ए-शम्स (کرۂ شمس) पु. ('अ.) सूर्यमंडळ.

क़ुर्स (قرص) पु. ('अ.) (१) रोटी; भाकरी. (२) चकली; गोल वडी (औषधाची). (३) चांदीची गोल नाणी; मोड.

क़ुर्स-ए-ज़र्रीं (قرص زریں) पु. ('अ.+फ़ा.) सूर्य.

क़ुर्स-ए-रो'ईन (قرص روئین) पु. ('अ.+फ़ा.) घडघाळ; तान (काशाचा गोल तुकडा—वेळ दर्शविण्यासाठी वाजविला जाणारा).

क़ुर्स-ए-सीमीं (قرص سیمیں) पु. ('अ.+फ़ा.) चंद्र.

कुर्सी (کرسی) स्त्री. ('अ.) (१) खुर्ची. (२) चौकी; सिंहासन. (३) आठवा स्वर्ग. (४) घराचे जोते; पाया; चौथरा. (५) पिढी. **–नशीं** (–نشیں) वि. ('अ.+फ़ा.) हुद्देदार; पदाधिकारी. **–नामः** (–نامہ) पु. ('अ.+फ़ा.) वंशावळ; वंशवृक्ष.

क़ुर्हः (قرحہ) पु. ('अ.) घाव; जखम.

कुलंग (کلنگ) पु. (फ़ा.) (१) करकोचा; सारस. (२) लांबटांग्या माणूस.

कुल (کل) वि. ('अ.) (१) सर्व; संपूर्ण; एकूण. (२) परमेश्वर. **–जम'अ** (–جمع) स्त्री. ('अ.) एकूण रक्कम; एकूण बेरीज. (अव्य.) एकूण फक्त. **–मीज़ान** (–میزان) पु. ('अ.) एकूण बेरीज.

क़ुल (قل) पु. ('अ.) (१) एखाद्या महापुरुषाच्या पुण्यतिथीच्या प्रसंगी पढला जाणारा शेवटचा फातिहा; अंत; परिसमाप्ती. (२) 'कुल हो अल्लाह' हा कुरणाचा आशीर्वादात्मक 'सूरा' म्हणणे. (३) उरसाच्या कार्यक्रमाच्या शेवटी प्रसाद वाटणे. (४) एखाद्याच्या 'फतिहा' मध्ये पठण केले जाणारे चार लहान 'सुरे' **–हो अल्लह पढ़ना** (–هو اللہ پڑھنا) फोटात कावळे ओरडणे.

क़ुल अ'ऊज़ी (قل اعوذی) पु. ('अ.) फुकटचे खाऊन मशिदीत पडून राहणारा मुल्ला; ऐतखाऊ; नीच व तुच्छ व्यक्ती.

क़ुलक़ुल (قلقل) स्त्री. (फ़ा.) (१) सुरईतून मदिरा बाहेर येताना होणारा आवाज. (२) निरर्थक बडबड.

क़ुलांच (قلانچ) स्त्री. (फ़ा.+हिं.) (१) उडी; झेप; कोलांटी उडी. (२) कापड मोजण्याचा गज.

कुला'अ (کلاع) पु. ('अ.) तोंड येणे (आजार).

क़ुलाबः (قلاب) पु. ('अ.) (१) बिजागरी. (२) मोरी. (३) मासे पकडण्याचा गळ.

कुलाल (کلال) पु. (फ़ा.) कुंभार.

कुलालः (کلالہ) पु. (फ़ा.) कुरळे केस; लट.

कुलाह (کلاہ) पु. स्त्री. (फ़ा.) (१) टोपी. (२) मुकुट. **–उतारना** (–اتارنا) अपमान करणे.

क़ुली (قلی) पु. (तु.) (१) सेवक; नोकर. (२) हमाल.

कुलीचः (کلیچہ) पु. (फ़ा.) बिस्कीट; लहान रोटी (खमीर घातलेली).

कुलुम्बः (کلمبہ) पु. (फ़ा.) गोड भरण घातलेली रोटी; करंजी.

कुलूख (کلوخ) पु. (फ़ा.) मातीचे ढेकूळ; विटेचा तुकडा; दगड. **–अंदाज़** (–انداز) वि. (फ़ा.) (१) ढेकूळ मारणारा. (२) गोफण. (३) किल्ल्याच्या तटांमध्ये बंदुकीच्या गोळ्या मारण्यासाठी ठेवलेली भोके.

क़ुलूब (قلوب) पु. ['अ. 'क़ल्ब' (قلب) चे अनेक.] हृदये.

कुलः (کلہ) स्त्री. [फ़ा. 'कुलाह' (کلاہ) चे लघु.] (१) टोपी. (२) शिश्न; लिंग.

कुलः-ए-शजरः (کلۂ شجرہ) पु. (फ़ा.+हिं.) (१) वंशवृक्ष. (२) सामानसुमान.

क़ुल्ज़ुम (قلزم) पु. ('अ.) (१) नदी. (२) समुद्र.

कुल्फ़त (کلفت) स्त्री. ('अ.) कष्ट; दुःख; त्रास; यातना.

क़ुल्फ़ः (قلفہ) पु. ('अ.) पुरुषाच्या जननेंद्रियाचे पुढे आलेले, न कापलेले कातडे; शिश्नाग्र. [मुसलमानी धर्मानुसार हे कातडे कापून टाकले जाते. याला 'खत्नः' (ختنہ) (सुंता) असे म्हणतात].

कुल्बः (کلبہ) पु. (फ़ा.) लहानसे घर; झोपडी; दुकानाचा कोपरा.

क़ुल्बः (قلبہ) पु. (फ़ा.) नांगर. **–रां** (–راں) पु. (फ़ा.) नांगर चालविणारा; शेतकरी. **–रानी** (–رانی) स्त्री. (फ़ा.) नांगर चालविणे; शेती.

क़ुल्माश (قلماش) वि. (फ़ा.) असभ्य; अशिष्ट.

कुल्यः (کلیہ) पु. ('अ.) मूत्रपिंड.

कुल्लहुम (کل ہم) अव्य. ('अ.) एकूण; पूर्णपणे; मुळीच.

क़ुल्लाब (قلاب) पु. ('अ.) (१) लोखंडी आकडा; हूक. (२) मासे पकडण्याचा गळ.

कुल्लियः (کلیہ) पु. ('अ.) सर्वत्र लागू होणारे, व्यापक नियम.

कुल्लियात (کلیات) पु. [अ. 'कुल्लियः' (کلیہ) चे अनेक.] (१) अनेक व्यापक नियम. (२) एखाद्या लेखकाच्या किंवा कवीच्या संपूर्ण साहित्याचा संग्रह; समग्र संग्रह.

कुल्ली (کلی) वि. ('अ.) संपूर्ण; एकूण; सर्वसामान्य. (स्त्री.) समाविष्ट; एकूण बेरीज.

क़ुल्लः (قلہ) पु. ('अ.) (१) पर्वत-शिखर. (२) मोठा रांजण.

क़ुवा (قوا); **क़ुवाँ** (قویٰ) पु. [अ. 'क़ुव्वत' (قوت) चे अनेक.] (१) सामर्थ्य; जोर. (२) इंद्रिये.

क़ुवा-ए-नफ़्सानी (قوائے نفسانی) पु. ('अ.) इंद्रियाची सामर्थ्य.

क़ुवा-ए-शहवानी (قوائے شہوانی) पु. ('अ.) जननेंद्रिय.

क़ुवा-ए-हैवानी (قوائے حیوانی) पु. ('अ.) जीवरक्षण करणाऱ्या शक्ती.

क़ुवारः (قوارہ) पु. ('अ.) कात्रण; तुकडा.

क़ुव्वत (قوت) स्त्री. ('अ.) (१) शक्ती; कुवत; ताकद; सामर्थ्य. (२) आधार. (३) इंद्रिय; जाणीव. **–आज़मा** (آزما –) वि. ('अ. + फ़ा.) सामर्थ्य-दर्शक; एखाद्या कामात शक्ती लावणारा. **–आज़मा'ई** (آزمائی –) स्त्री. ('अ. + फ़ा.) सामर्थ्य-प्रदर्शन. **–बख़्श** (بخش –) वि. ('अ.+फ़ा.) शक्तिदायक; बलवर्धक.

क़ुव्वत-ए-इरादी (قوت ارادی) स्त्री. ('अ.) संकल्पशक्ती.

क़ुव्वत-ए-ईजाद (قوت ایجاد) स्त्री. ('अ.) शोध-शक्ती; कल्पनाशक्ती.

क़ुव्वत-ए-कशिश (قوت کشش) स्त्री. ('अ. + फ़ा.) आकर्षणशक्ती.

क़ुव्वत-ए-ग़ाज़िय़ः (قوت غاذیہ) स्त्री. ('अ.) पचनशक्ती.

क़ुव्वत-ए-गोया'ई (قوت گویائی) स्त्री. ('अ.+फ़ा.) वाक्शक्ती.

क़ुव्वत-ए-ज़ा'इक़ः (قوت ذائقہ) स्त्री. ('अ.) स्वाद घेण्याची शक्ती, रसनेंद्रिय.

क़ुव्वत-ए-नातिक़ः (قوت ناطقہ) स्त्री. ('अ.) वाक्शक्ती.

क़ुव्वत-ए-नामियः (قوت نامیہ) स्त्री. ('अ.) विकास-शक्ती.

क़ुव्वत-ए-फ़िक्र (قوت فکر) स्त्री. ('अ.) विचारशक्ती.

क़ुव्वत-ए-बरदाश्त (قوت برداشت) स्त्री. ('अ.+फ़ा.) सहनशक्ती.

क़ुव्वत-ए-बर्क़ी (قوت برقی) स्त्री. ('अ.) विद्युतशक्ती.

क़ुव्वत-ए-बाज़ू (قوت بازو) स्त्री. ('अ. + फ़ा.) बाहुबल; स्वतः केलेले परिश्रम.

क़ुव्वत-ए-बासिरः (قوت باصرہ) स्त्री. ('अ.) दृष्टि-शक्ती; दृक्शक्ती.

क़ुव्वत-ए-बाह़ (قوت باہ) स्त्री. ('अ.) **क़ुव्वत-ए-मर्दानगी** (قوت مردانگی) स्त्री. ('अ.+फ़ा.) संभोगशक्ती; कामशक्ती.

क़ुव्वत-ए-मुतख़य्यिलः (قوت متخیلہ) स्त्री. ('अ.) विचारशक्ती; कल्पनाशक्ती.

क़ुव्वत-ए-रूह़ानी (قوت روحانی) स्त्री. ('अ.) आत्मबल; आत्मिक सामर्थ्य.

क़ुव्वत-ए-लामिसः (قوت لامسہ) स्त्री. ('अ.) स्पर्श-शक्ती.

क़ुव्वत-ए-शाम्मः (قوت شامہ) स्त्री. ('अ.) घ्राणशक्ती.

क़ुव्वत-ए-सामि'अः (قوت سامعہ) स्त्री. ('अ.) श्रवण-शक्ती.

क़ुव्वत-ए-हाज़िमः (قوت ہاضمہ) स्त्री. ('अ.) पचन-शक्ती.

क़ुव्वत-ए-ह़ाफ़िज़ः (قوت حافظہ) स्त्री. ('अ.) स्मरण-शक्ती.

कुश (کش) प्रत्य. (फ़ा.) ठार मारणारा. [उदा. 'देव कुश' (دیو کش) दैत्याला मारणारा; दानवनाशक].

कुशा (کشا) प्रत्य. (फ़ा.) उघडणारा; दूर करणारा; जिंकणारा. [उदा. 'दिल कुशा' (دلکشا) अंतःकरणाला जिंकणारा; मोहक. 'मुश्किल कुशा' (مشکل کشا) संकटाचे हरण करणारा].

कुशा'इश (کشائش) स्त्री. (फ़ा.) विस्तार; वृद्धी; वाढ.

कुशाद (کشاد) स्त्री. (फ़ा.) (१) हर्ष; आनंद. (२) प्राप्ती; लाभ; नफा. (३) विजय. (४) उद्घाटन; उघडे होणे.

कुशादकार (کشاد کار) स्त्री. (फ़ा.) सफलता; इच्छा-पूर्ती.

कुशादगी (کشادگی) स्त्री. (फ़ा.) (१) विस्तार; फैलाव. (२) समावेशकता. (३) खुलेपणा. (४) प्रसन्नता. (५) उदारता.

कुशादः (کشادہ) वि. (फ़ा.) (१) मोकळा. (२) विस्तृत; व्यापक; विशाल. **–क़फ़** (کف –); **–दस्त** (دست –) वि. (फ़ा.) मुक्तहस्त; दानशूर. **–जबीं** (جبیں –); **–पेशानी** (پیشانی –) वि. (फ़ा.) हसतमुख. **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) उदारहृदय. **–नफ़स** (نفس –) वि. (फ़ा. + 'अ.) बडबड्या. **–रू** (رو –) वि. (फ़ा.) प्रफुल्लवदन.

कुशायश (کشایش) स्त्री. (फ़ा.) (१) विस्तार; व्याप. (२) वृद्धी; वाढ.

कुर्शिदः (کشندہ) वि. (फ़ा.) मारणारा; वध करणारा.

कुशूं (کشوں) पु. (तु.) (१) सैन्यलष्कर. (२) छावणी; कँप.

कुशूद (کشود) स्त्री. (फ़ा.) उघडेपणा; उघडे असणे.

कुशूदः (کشودہ) वि. (फ़ा.) उघडा; उघडलेला.

कुश्क (کشک) पु. (फ़ा.) प्रासाद; महाल.

कुश्त (کشت) पु. (फ़ा.) कत्तल; हत्या. **–ओ-ख़ून** (– و خون) पु. (फ़ा.) रक्तपात; कत्तल.

कुश्तन (کشتن) क्रि. (फ़ा.) ठार मारणे; कत्तल करणे.

कुश्तनी (کشتنی) वि. (फ़ा.) ठार मारण्यास योग्य.

कुश्ती (کشتی) स्त्री. (फ़ा.) कुस्ती; मल्लयुद्ध. **–गीर** (– گیر); **–बाज़** (– باز) पु. (फ़ा.) पहिलवान; मल्ल.

कुश्तः (کشتہ) वि. (फ़ा.) ठार मारलेला; वधित. (पु.) (१) धातूंवर रासायनिक क्रिया करून बनविलेले भस्म. (२) प्रेमी; प्रियकर.

कुश्तः-ए-'इश्क़ (کشتۂ عشق) वि. (फ़ा. + 'अ.) प्रेमाग्नीत भस्म झालेला; प्रेमी; प्रियकर.

कुश्तः-ए-हिज्र (کشتۂ ہجر) वि. (फ़ा. + 'अ.) विरहदग्ध.

कुश्नीज़ (کشنیز) पु. (फ़ा.) धणे.

कुस (کس) स्त्री. (फ़ा.) स्त्रीचे जननेंद्रिय; भग; योनी.

कुसूफ़ (کسوف) पु. ('अ.) सूर्यग्रहण.

क़ुसूर (قصور) स्त्री. ['अ. 'क़स्र' (قصر) चे अनेक.] भाग; अंश; तुकडे; अपूर्णांक संख्या. **–वार** (– وار) वि. ('अ. + फ़ा.) अपराधी; दोषी; गुन्हेगार.

कुसर (کسور) पु. ['अ. 'कस्र' (کسر) चे अनेक.] (१) दोष; अपराध; चुका; उणीव. (२) राजवाडे; प्रासाद; हवेल्या.

कुसूर-ए-अ'अशारियः (کسور اعشاریہ) स्त्री. ('अ.) दशांश अपूर्णांक.

क़ुस्तुन्तुनियः (قسطنطنیہ) पु. ('अ.) कॉन्स्टंटिनोपल; इस्तबूल.

कुह (کہ) पु. [फ़ा. 'कोह' (کوہ) चे संक्षिप्त.] पर्वत; डोंगर; जोडशब्दात येणारा. [उदा. 'कुहसार' (کہسار) पु. (फ़ा.) डोंगराळ प्रदेश; डोंगर; पर्वतमाला].

कुहन (کہن) वि. (फ़ा.) प्राचीन; पुरातन; जुना. **–साल** (– سال) वि. (फ़ा.) वयोवृद्ध; म्हातारा. **–साली** (– سالی) स्त्री. (फ़ा.) म्हातारपण; वृद्धत्व.

कुहनगी (کہنگی) स्त्री. (फ़ा.) प्राचीनत्व; जीर्णता; जुनेपणा.

कुहनः (کہنہ) वि. (फ़ा.) जुना; प्राचीन; पुरातन. **–मश्क़** (– مشق) वि. (फ़ा. + 'अ.) अनुभवी; अभ्यस्त. **–साल** (– سال) वि. (फ़ा.) वृद्ध; म्हातारा.

क़ुहबः (قحبہ) स्त्री. ('अ.) वेश्या; व्यभिचारीणी ['अ. 'क़हिब' (قحب) खाकरणे; वेश्या पुरुषांना खाकरून बोलावतात. त्यावरून हा शब्द बनला आहे]. **–ख़ानः** (– خانہ) पु. ('अ. + फ़ा.) वेश्यालय; वेश्यांची आळी.

कुहराम (کہرام) पु. ('अ.) हाहाःकार; शोक; विलाप; खळबळ.

कुहुल (کحل) पु. ('अ.) (१) सुरमा; नेत्रांजन. (२) दुष्काळी वर्ष.

कुहुल-उल्-जवाहिर (کحل الجواہر) पु. ('अ.) मोती वगैरे घालून तयार केलेला सुरमा.

कुहुल-उल्-बसर (کحل البصر) पु. ('अ.) नेत्रज्योती वाढविणारा सुरमा.

कुहुली (کحلی) वि. ('अ.) सुरम्याच्या रंगाचा; काळसर; करडा.

कुहूहाल (کحال) पु. ('अ.) नेत्र वैद्य.

कूँ (کوں) स्त्री. [फ़ा. 'कून' (کون) चे संक्षिप्त.] मलद्वार; गुद.

कू (کو) अव्य. (फ़ा.) की तो.

कू (کو) पु. [फ़ा. 'कूचः' (کوچہ) चे संक्षिप्त.] गल्ली.

कू-ए-ख़राबात (کوے خرابات); **कू-ए-मुग़ाँ** (کوے مغاں) पु. (फ़ा.) मदिरागृहाची गल्ली; दारूच्या गुत्त्याची आळी.

कू-ए-जानाँ (کوے جاناں); **कू-ए-यार** (کوے یار) पु. (फ़ा.) प्रियतमेची गल्ली; प्रियकराची आळी.

कूक (کوک) स्त्री. (फ़ा.) (१) सुरेल आवाज; वाद्ये जुळविणे; स्वर लावणे. (२) खाकरणे. (३) किंकाळणे.

कूख (کوخ) पु. ('अ.) गवताची झोपडी (खिडकी वगैरे नसलेली).

कूच (کوچ) पु. (फ़ा.) (१) प्रस्थान; रवानगी; निघणे. (२) मृत्यू. **–करना** (– کرنا) (१) निघणे; जाणे. (२) मरणे. **–मुक़ाम** (– مقام) पु. (फ़ा. + 'अ.) चालणे व थांबणे; मजल दरमजल.

कूचः (کوچہ) पु. (फ़ा.) गल्ली; आळी; बोळ. **–गर्द** (– گرد) पु. (फ़ा.) उडाणटप्पू; मवाली. **–गर्दी** (– گردی) स्त्री. (फ़ा.) उनाडपणा; मवालीगिरी. **–दर कूचः** (– در کوچہ) **–ब कूचः** (– بکوچہ) अव्य. (फ़ा.) गल्लोगल्ली; दारोदार. **–बंदी** (– بندی) स्त्री. (फ़ा.) गल्लीच्या रक्षणासाठी फाटक वगैरे बसविणे.

कूचः-ए-ख़मोशां (کوچۂ خموشاں) पु. (फ़ा.) स्मशान; कबरस्तान.

कूचः-ए-नौ (کوچۂ نو) पु. (फ़ा.) वेश्यांची गल्ली.

कूज़ (کوز) वि. (फ़ा.) वाकडा; वक्र. **–पुश्त** (–پشت) वि. पु. (फ़ा.) कुबडा; कुब्ज.

कूज़ (کوز) पु. ('अ.) खुजा; पाणी पिण्याचे मातीचे भांडे.

कूज़ः (کوزہ) पु. (फ़ा.) (१) मूठ असलेले भांडे. (२) खुजा; मातीचे भांडे; मातीचा पेला, वाडगा. (३) कुबडा. (४) खडीसाखर. **–क़िमार** (–قمار) वि. (फ़ा+'अ.) जुगारी लोकांना उसने पैसे देऊन जुगार खेळावयास लावणारा. **–गर** (–گر) पु. (फ़ा.) मातीचे पेले अथवा खुजे बनविणारा; कुंभार. **–पुश्त** (–پشت) वि. पु. (फ़ा.) कुबडा. **–फ़रोश** (–فروش) पु. (फ़ा.) मातीचे पेले विकणारा.

क़ूत (قوت) स्त्री. ('अ.) भोजन; आहार; अन्न. **–बसरी** (–بسری) स्त्री. ('अ. + फ़ा.) पोटापुरते अन्न मिळणे; कसेबसे जीवन चालविणे.

क़ूतलायमूत (قوت لایموت) स्त्री. ('अ.) जीव जगविण्यापुरता आहार; अत्यंत थोडे अन्न.

कूद (کود) पु. (फ़ा.) अन्नाचा ढीग.

कून (کون) स्त्री. (फ़ा.) मलद्वार; गुद.

कून-ए-ख़र (کون خر) स्त्री. (फ़ा.) गाढवाचे मलद्वार. (वि.) अत्यंत मूर्ख व निरुपयोगी माणूस.

कूनस्तः (کونستہ) पु. (फ़ा.) (१) नितंब; ढुंगण. (२) गुदद्वार.

कूफ़ (کوف) पु. (फ़ा.) घुबड.

कूफ़ी (کوفی) पु. ('अ.) कूफा नगरचा रहिवासी; अत्यंत निर्दय व बेइमान माणूस. (कारण कूफी लोकांनी इमाम हुसैन यांना मोठमोठी वचने देऊन बोलाविले होते; परंतु ऐनवेळी त्यांना एकटे सोडून दिले. यामुळे ते शत्रूकडून मारले गेले).

कूफ़ः (کوفہ) पु. ('अ.) इराकमधील एक शहर.

क़ूबा (قوبا) स्त्री. ('अ.) गजकर्ण (चर्म रोग).

कूरः (کورہ) पु. (फ़ा.) आवा; विटा भाजण्याची भट्टी.

क़ूलंज (قولنج) पु. ('अ.) उदरशूळ; पोटदुखी.

कूस (کوس) पु. (फ़ा.) नगारा; दुंदुभी.

कूस-ए-रहील (کوس رحیل); **कूस-ए-रेहलत** (کوس رحلت) पु. (फ़ा + 'अ.) प्रस्थानवाद्य; काफिला (तांडा) प्रस्थान करतो, चालू लागतो त्यावेळी वाजविला जाणारा नगारा.

केद (کید) पु. (फ़ा.) केतू (एक अशुभ ग्रह).

केर (کیر) पु. (फ़ा.) पुरुषाचे जननेंद्रिय; शिश्न.

केश (کیش) पु. (फ़ा.) (१) धर्म; पंथ. (२) आचरण. (३) बाणांचा भाता.

केहाँ (کیہاں) पु. (फ़ा.) (१) जग; विश्व. (२) काल.

क़ैंची (قینچی) स्त्री. (तु.) (१) कात्री. (२) कात्री-प्रमाणे एकमेकास तिरपे दोन वासे जोडून केलेली रचना.

क़ै (قے) स्त्री. ('अ.) उलटी; ओकारी; वांती.

कै (کے) पु. (फ़ा.) सम्राट; बादशहा. (इराणमध्ये चार प्रसिद्ध सम्राट होऊन गेले. कैकाऊस; कैकुबाद; कैखुस्मौ; कैलोहस्प).

कै (کے) पु. ('अ.) तापलेल्या लोखंडाने डागणे; डागणीच्या द्वारे रोगचिकित्सा; उपचार.

कैक (کیک) पु. (फ़ा.) पिसू.

क़ैंची (قینچی) स्त्री. (तु.) कात्री.

क़ैतून (قیطون) स्त्री. (तु.) (१) कपडयाच्या पदराला व काठाला लावण्यात येणारा रेशमी व जरीचा गोट (किनारी). (२) एक प्रकारचे बारीक रीळ.

कैद (کید) स्त्री. ('अ.) कपट; फसवणूक; दगा.

क़ैद (قید) स्त्री. ('अ.) (१) घरपकड; अटक. (२) तुरुंगवास; तुरुंगाची शिक्षा. **–क** (–ک) स्त्री. ('अ. + फ़ा.) फाइल. **–ख़ानः** (–خانہ) पु. ('अ. + फ़ा.) तुरुंग; कारागृह.

क़ैद-ए-तनहा'ई (قید تنہائی) स्त्री. ('अ. + फ़ा.) अंधार कोठडीची किवा एकांतवासाची शिक्षा.

क़ैद-ए-फ़िरंग (قید فرنگ) स्त्री. ('अ.+फ़ा.) इंग्रजी कैदी (प्रचंड व भयंकर शिक्षा).

क़ैद-ए-महज़ (قید محض) स्त्री. ('अ.) साधी शिक्षा.

क़ैद-ए-शदीद (قید شدید) स्त्री. ('अ.) **क़ैद-ए-सख़्त** (قید سخت) स्त्री. ('अ. + फ़ा.) सक्तमजुरीची शिक्षा; सश्रम कारावास.

क़ैद बा मशक़्क़त (قید با مشقت) स्त्री. ('अ.+फ़ा.) सक्तमजुरीची शिक्षा (सश्रम कारावास).

क़ैद बिला मशक़्क़त (قید بلا مشقت) स्त्री. ('अ.) **क़ैद बे मशक़्क़त** (قید بے مشقت) स्त्री. ('अ.+फ़ा.) साधी शिक्षा. (अश्रम कारावास).

क़ैदी (قیدی) पु. ('अ.) बंदी; अटकेत असलेला.

क़ैन (قین) पु. ('अ.) लोहार.

कैफ़ (کیف) पु. ('अ.) (१) नशा; मद. (२) आनंद; मस्ती. (३) तल्लीनता. **–दान** (–دان) पु. ('अ.+फ़ा.) मादक वस्तू ठेवण्याची डबी.

रफ़्तः रफ़्तः यह हुआ कैफ़-ए-तसव्वुर का असर।
दिल के आ'ईने में तस्वीर उतर आ'ई है॥

कैफ़र (کیفر) पु. (फ़ा.) पापाचे प्रायश्चित्त; शिक्षा.

कैफ़र-ए-किरदार (کیفر کردار) पु. (फ़ा.) दुष्कृत्यां-बद्दल शिक्षा; कर्म-दंड.

कैफ़ियत (کیفیت) स्त्री. ('अ.) (१) स्थिती. (२) हकीगत; बातमी. (३) आनंद; मजा. (४) नशा. (५) विवरण; खुलासा; तपशील. (६) नशा; तल्लीनता. (७) टिप्पणी. (८). जाब; जबानी. **–तलब करना** (–طلب کرنا) जाब मागणे; खुलासा विचारणे.

कैफ़ी (کیفی) वि. ('अ.) (१) मस्त; झिंगलेला. (२) मदोन्मत्त.

क़ैमाक़ (قیماق) स्त्री. (तु.) साय; मलई.

क़ैमाज़ (قیماز) स्त्री. (फ़ा.) दासी; सेविका.

कैयाद (کیاد) वि. ('अ.) अत्यंत कपटी; धोकेबाज.

कैयाल (کیال) वि. ('अ.) मापाड्या; धान्य वगैरे मापणारा.

क़ैयूम (قیوم) वि. ('अ.) अविनश्वर; नित्य; ईश्वराचे एक नाव.

क़ैयूर (قیور) वि. ('अ.) अज्ञात कुलशील; संकरज.

क़ैरूती (قیروطی) स्त्री. ('अ.) छाती वगैरेवर चोळण्याचे एक मलम.

क़ैलूलः (قیلولہ) पु. ('अ.) वामकुक्षी; दुपारच्या जेवणानंतर थोडावेळ झोपणे.

कैवां (کیواں); **कैवान** (کیوان) पु. (फ़ा.) (१) शनी (ग्रह). (२) सातवा स्वर्ग.

क़ैस (قیس) पु. ('अ.) लैलाचा प्रेमी. (लोक याला 'मजनूं' म्हणजे 'वेडा' असे म्हणत. याचे 'मजनूं' हेच नाव कालांतराने विशेष प्रसिद्ध झाले).

क़ैसर (قیصر) पु. ('अ.) (१) रोमन सम्राटांची पदवी. (२) सम्राट ["रोमन भाषेत 'कैसर' याचा अर्थ आईच्या पोटातून शस्त्रक्रियेच्या द्वारे बाहेर काढले जाणारे मूल असा आहे. रोमचा सम्राट 'ऑगस्टिस' (ज्यूलियस सीझर) अशा प्रकारे जन्मास आला होता. म्हणून त्याने ही पदवी धारण केली. त्यानंतर प्रत्येक सम्राटाला 'कैसर' असे म्हणण्यात येऊ लागले". –लुग़ात-ए-स ओदी (पृ. ४४८)].

कोक (کوک) स्त्री. (फ़ा.) (१) वाद्य लावणे; स्वर जुळविणे. (२) खाकरणे; खोकला.

कोकनार (کوکنار) पु. (फ़ा.) अफूचे बोंड; खसखस.

कोकब (کوکب) पु. ('अ.) तेजस्वी तारा. (शुद्ध: कौकब).

कोकलताश (کوکلتاش) पु. (तु.) दूधभाऊ (एकाच दाईचे दूध पिणारी वेगवेगळ्या आईबापांची मुले).

कोकः (کوکہ) पु. (तु.) दूधभाऊ.

कोख (کوخ) पु. (फ़ा.) खिडकी वगैरे नसलेली झोपडी.

कोचक (کوچک) वि. (फ़ा.) लहान; लघु. **–दिल** (–دل) वि. (फ़ा.) (१) संकुचित अंत:करणाचा अनुदार. (२) कोमल हृदयाचा.

कोतल (کوتل) पु. (तु.) (१) खाशा स्वारीचा घोडा. (२) मिरवणुकीकरिता सजविलेला, शोभेचा घोडा.

कोताह (کوتاہ) वि. (फ़ा.) (१) लहान; ह्रस्व. (२) कमी; अल्प. (३) क्षुद्र. **–अंदेश** (–اندیش) वि. (फ़ा.) अदूरदर्शी; अविचारी; मूर्ख. **–क़द** (–قد) वि. (फ़ा. + 'अ.) बुटका; गिड्डा. **–क़लम** (–قلم) वि. (फ़ा. + 'अ.) (१) कमी लिहिणारा. (२) पत्रव्यवहाराच्या बाबतीत आळशी. **–क़ामत** (–قامت) वि. (फ़ा. + 'अ.) बुटका. **–गर्दन** (–گردن) वि. (फ़ा.) आखूड मानेचा (अशी माणसे धूर्त किंवा दुष्ट असतात). **–दस्त** (–دست) वि. (फ़ा.) (१) आखूड हातांचा. (२) एखाद्या स्थानापर्यंत किंवा कार्यापर्यंत ज्याचे हात पोचत नाहीत असा. **–दामन** (–دامن) वि. (फ़ा.) विशेष उत्साह किंवा हिम्मत नसलेला. **–नज़र** (–نظر) वि. (फ़ा.) अदूरदर्शी; अनुदार. **–फ़हम** (–فہم) वि. (फ़ा.+'अ.) मंदबुद्धी; कमी समज असलेला. **–बीं** (–بیں) वि. (फ़ा.) पाहा 'कोताह नज़र'. **–हिम्मत** (–ہمت) वि. (फ़ा.) भित्रा; विशेष हिम्मत नसलेला.

कोताही (کوتاہی) स्त्री. (फ़ा.) (१) लघुता. (२) उणीव; कमतरता. (३) संक्षेप. (४) गफलत; बेपर्वाई. (५) चूक.

कोतः (کوتہ) वि. [फ़ा. 'कोताह' (کوتاہ) चे संक्षिप्त.] (१) लहान. (२) कमी.

कोद (کود) पु. (फ़ा.) विष्ठा; मैला.

कोदक (کودک) पु. (फ़ा.) (१) बालक. (२) किशोर.

कोफ़्त (کوفت) स्त्री. (फ़ा.) (१) मनस्ताप; त्रास. (२) परिश्रम; प्रयास; थकवा. (३) कुटणे; बडविणे. **–कोब** (–کوب) पु. (फ़ा.) चोप; मार; बडविणे. **–गर** (–گر) पु. (फ़ा.) गिलीट, मुलामा करणारा.

कोफ़्तः (کوفتہ) वि. (फ़ा.) (१) कुटलेला; बडविलेला. (२) थकलेला. (पु.) (१) खिम्याचे तुकडे; मांसाचे एक विशिष्ट तोंडी लावणे. (२) भडवेगिरीने मिळविलेला पैसा. **–बेतः** (–بیختہ) वि. (फ़ा.) कुटून गाळून घेतलेली वस्तू..

कोब (کوب) प्रत्य. (फ़ा.) कुटणारा; बडविणारा. [उदा. 'सरकोब' (سرکوب) डोके बडविणारा; दमन करणारा].

कोबां (کوباں) वि. (फ़ा.) कुटत, बडवीत असलेला.

कोबः (کوبہ) पु. (फ़ा.) माती वगैरे कुटण्याचे लाकडी बडवणे; मोगरा; ठोकणी; चोपणे. **–कारी** (کاری –) स्त्री. (फ़ा.) (१) चोपण्याचे काम; बडविणे. (२) मारणे.

कोर (قور) पु. (तु.) (१) शस्त्र; हत्यार. (२) नखाचा अग्रभाग. (३) काठ; किनारी. (४) रिवीन. **–खानः** (خانہ –) पु. (तु.+फ़ा.) शस्त्रागार. **–ची** (چی –) पु. (तु.) (१) सशस्त्र सैनिक. (२) लोहार. **–बेगी** (بیگی –) पु. (तु.) शस्त्रागाराचा संरक्षक.

कोर (کور) वि. (फ़ा.) आंधळा; दृष्टिहीन; लक्ष न देणारा. **–अक़्ल** (عقل –) वि. (फ़ा.+'अ.) मठ्ठ (निर्बुद्ध). **–चश्म** (چشم –); **–दीदः** (دیدہ –) वि. (फ़ा.) नेत्रहीन. **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) पाहा 'कोरबातिन'. **–देह** (دہ –) जेथे गरजेच्या वस्तू मिळत नाहीत अशा अडचणीच्या जागी वसलेले खेडे. **–नमक** (نمک –) वि. (फ़ा.) निमकहराम; कृतघ्न. **–बख़्त** (بخت –) वि. (फ़ा.) दुर्दैवी. **–बातिन** (باطن –) वि. (फ़ा.+'अ.) ज्याच्या अंतःकरणात ज्ञानाचा प्रकाश पडलेला नाही असा; अंधात्मा; धर्महीन. **–मग़ज़** (مغز –) वि. (फ़ा.+'अ.) मंदबुद्धी; मूढ.

कोर-ए-मादरज़ाद (کور مادرزاد) वि. (फ़ा.) जन्मांध.

कोर-ए-मुक्री (کور مقری) वि. (फ़ा.+'अ.) जन्मांध. (पु.) मुलांना शिकविणारा; आंधळा हाफिज (कुराण तोंडपाठ म्हणणारा).

कोर-ओ-कर (کور و کر) वि. (फ़ा.) आंधळा व बहिरा.

कोरदीं (کوردیں) पु. (फ़ा.) घोंगडी; कांबळे.

कोरनिश (کورنش) स्त्री. (तु.) कुर्निसात; सलाम. (शुद्ध : कुर्नुश).

क़ोरमः (قورمہ) पु. (तु.) भाजलेले मांस.

कोरी (کوری) स्त्री. (फ़ा.) अंधत्व.

कोरः (کورہ) पु. (फ़ा.) (१) भाग; हिस्सा. (२) इराणचा पाचवा भाग.

कोल (کول) पु. (फ़ा.) तळे; तलाव.

कोलाब (کولاب) पु. (फ़ा.) तलाव; सरोवर.

कोश (کوش) पु. (फ़ा.) प्रत्येक इराणी महिन्याची १४ वी तारीख. चतुर्दशी (प्रत्य.) प्रयत्न (कोशिश) करणारा.

कोशक (کوشک) पु. (फ़ा.) भवन; प्रासाद; महाल.

कोशां (کوشاں) वि. (फ़ा.) प्रयत्न करणारा; यत्नशील.

कोशिश (کوشش) स्त्री. (फ़ा.) (१) प्रयत्न; प्रयास; उद्योग. (२) परिश्रम.

कोस (کوس) पु. (फ़ा.) नगारा; डंका.

कोस्त (کوست) पु. (फ़ा.) मनस्ताप; खेद; आघात.

कोस्तः (کوستہ) वि. (फ़ा.) कुटलेले.

कोह (کوہ) पु. (फ़ा.) पर्वत; डोंगर. **–कन** (کن –) वि. (फ़ा) पर्वत खोदणारा; डोंगर पोखरणारा. (पु.) फरहाद. (याने 'शीरीन' च्या आज्ञेवरून डोंगर पोखरून कालवा काढला होता).

कह दो यह कोहकन से कि. मरना नहीं कमाल।
मरमर के हिज्र-ए-यार में जीना कमाल है॥

–कनी (کنی –) स्त्री. (फ़ा.) (१) डोंगर खोदणे. (२) अत्यंत अवघड व परिश्रमाचे काम. **–चः** (چہ –) टेकडी; उंचवटा. **–जिगर** (جگر –) वि. (फ़ा.) बज्रहृदयी; साहसी. **–पायः** (پایہ –) वि. (फ़ा.) पर्वतासारखा महान. (पु.) पर्वताच्या पायथ्याजवळील भूमी; तराई. **–पैकर** (پیکر –) वि. (फ़ा.) अजस्र; प्रचंड शरीराचा; महाकाय. **–पैमा** (پیما –) वि. (फ़ा.) डोंगरात भटकणारा. (पु.) गिर्यारोहक. **–पैमा'ई** (پیمائی –) स्त्री. (फ़ा.) गिर्यारोहण. **–वक़ार** (وقار –) वि. (फ़ा.+'अ.) (१) मेरूसारखा धैर्यवान. (२) महाप्रतिष्ठित. **–सार** (سار –) पु. (फ़ा.) (१) डोंगराळ प्रदेश. (२) पर्वतमाला.

कोह-ए-आतिशफ़िशां (کوہ آتش فشاں) पु. (फ़ा.) ज्वालामुखी.

कोह-ए-आदम (کوہ آدم) पु. (फ़ा.+'अ.) लंकेतील एक पर्वत-शिखर.

कोह-ए-क़ाफ़ (کوہ قاف) पु. (फ़ा.+'अ.) (१) कॉकेशियातील एक पर्वत. येथील सौंदर्य प्रसिद्ध आहे. (२) अत्यंत दूरचे स्थान.

कोह-ए-तर (کوہ طور) पु. (फ़ा.+'अ.) हजरत मूसा (मोझेस) यांना जेथे ईश्वरी प्रकाश (नूर) दिसला होता तो पर्वत.

कोह-ए-नूर (کوہ نور) पु. (फ़ा.+'अ.) प्रकाशाचा पर्वत. गोवळकोंडाच्या खाणीत सापडलेला जगातील सर्वश्रेष्ठ कोहिनूर हिरा. (सध्या हा ब्रिटिश सम्राटाच्या मुकुटात आहे).

कोह-ए-बेसुतूं (کوہ بیستوں) पु. (फ़ा.) कॉकेशियातील एक पर्वत. (फरहादने खोदलेला).

कोह-ए-सफ़ा (کوہ صفا) पु. (फ़ा.+'अ.) मक्केतील एक टेकडी. हिच्यापासून दोनशे पावलांवर मर्वः नावाची दुसरी टेकडी आहे. या दोहोंमध्ये यात्रेकरू (हाजी) धावतात.

कोह-ए-सीना (کوہ سینا) पु. (फ़ा.+'अ.) सीरीयातील एक पर्वत.

कोहान (کوہان); **कोहः** (کوہہ) पु. (फ़ा.) बैलाचे वर्शिड; उंटाची मदार.

कोहिस्तान (کوهستان) पु. (फ़ा.) डोंगराळ प्रदेश; पर्वतांच्या रांगा.

कोहिस्तानी (کوهستانی) वि. (फ़ा.) डोंगरी; पहाडी; गिरिजन.

कोही (کوهی) वि. (फ़ा.) पर्वताशी संबंधित.

कौंचा (کونچا) पु. (फ़ा. + हिं.) भडभुंजाचा वाळू काढण्याचा झारा.

कौकब (کوکب) पु. ('अ.) तेजस्वी तारा.

कौकबः (کوکبہ) पु. ('अ.) (१) जनसमूह; गर्दी. (२) थाटमाट.

कौदन (کودن) वि. ('अ.) (१) मूर्ख; मठ्ठ. (२) मरतुकडा व हळू चालणारा घोडा.

कौन (کون) पु. ('अ.) (१) अस्तित्व; तथ्य. (२) जग; सृष्टी. (३) उत्पत्ती.

कौन-ओ-मकान (کون و مکان) पु. ('अ.) जग; विश्व.

कौनैन (کونین) पु. ('अ.) इहलोक व परलोक.

क़ौन्सल (قونصل) पु. ('अ.) परराष्ट्रीय वकील; राजदूत. **-ख़ानः** (-خانہ) पु. ('अ. + फ़ा.) परराष्ट्रीय वकिलात; दूतावास.

क़ौम (قوم) स्त्री. ('अ.) (१) जाती; जमात; वर्ण. (२) राष्ट्र. (३) वंश; घराणे. (४) सत्ता; राज्य. **-दार** (-دار) (हिं.) **-परस्त** (-پرست) वि. ('अ. + फ़ा.) राष्ट्रीय; देशभक्त; राष्ट्रवादी. (१) चांगल्या जातीचा. (२) खानदानी.

क़ौमियत (قومیت) स्त्री. ('अ.) (१) राष्ट्रीयत्व. (२) बंधुता; वर्ण; जातीयता.

क़ौमी (قومی) वि. ('अ.) (१) राष्ट्रीय. (२) जमाती-संबंधी; जातीय.

कौर (کور) पु. ('अ.) वृद्धी; समृद्धी.

क़ौल (قول) पु. ('अ.) (१) कथन; वचन; उक्ती. (२) प्रतिज्ञा; वायदा.

क़ौल-ए-सालेह (قول صالح) पु. ('अ.) खरी गोष्ट; सत्यवचन; खरे मत.

क़ौल-ओ-क़रार (قول و قرار) पु. ('अ.) आणभाक; वचन-शपथ.

क़ौल-ओ-फ़िअल (قول و فعل) पु. ('अ.) बोलणे व करणे; उक्ती व कृती.

क़ौलन् (قولاً) अव्य. ('अ.) तोंडाने; तोंडी; शब्दाने.

क़ौस (قوس) स्त्री. ('अ.) (१) धनुष्य. (२) धनू राशी.

क़ौस-उन्-नहार (قوس النہار) स्त्री. ('अ.) सूर्याचा पूर्वेकडून पश्चिमेकडे होणारा प्रवास. (हा १२ तासांत पूर्ण होतो व त्याचा मार्ग धनुष्याकृती असतो).

क़ौस-उस्-समा (قوس السما) स्त्री. ('अ.) आकाशमंडळ. (हे धनुष्याप्रमाणे दिसते).

क़ौस-ए-क़ज़ह (قوس قزح); **क़ौस-ए-शैतान** (قوس شیطان) स्त्री. ('अ.) इंद्रधनुष्य.

कौसर (کوثر) पु. ('अ.) स्वर्गातील एक कुंड किंवा हौद (अमृताचा).

क़ौसैन (قوسین) स्त्री. ('अ.) (१) दोन धनुष्ये. (२) कंस.

खंजर (خنجر) पु. ('अ.) कटार; खंजीर; सुरी. **-ज़न** (-زن) वि. ('अ.+फ़ा.) कटार भोसकणारा. **-बकफ़** (-بکف) वि. ('अ.+फ़ा.) हातात खंजीर घेतलेला; खुनास उद्युक्त.

खंजरी (خنجری) स्त्री. ('अ.) खंजिरी; टिमकी; लहान डफडी.

खंदक़ (خندق) स्त्री. ('अ.) (१) शहराच्या किंवा किल्ल्याच्या भोवतालचा चर; खंदक. (२) खाई; मोठा खळगा.

खंदाँ (خنداں) वि. (फ़ा.) हसत असलेला.

खंदः (خندہ) पु. (फ़ा.) (१) स्मित; अस्फुट हास्य. (२) मुक्त हास्य; खदखदून हसणे. **-ज़न** (-زن) वि. (फ़ा.) (१) हसणारा. (२) थट्टा करणारा; टर उडविणारा. **-ज़नी** (-زنی) स्त्री. (फ़ा.) (१) स्मित; हास्य. (२) थट्टा **-दहन** (-دہن); **-पेशानी** (-پیشانی), **-रू** (-رو) वि. (फ़ा.) हसतमुख; आनंदी; सुस्वभावी. **-लब** (-لب) वि. (फ़ा.) ज्याच्या ओठावर स्मित खेळत आहे असा.

खंदः-ए-ज़ख़्म (خندۂ زخم) पु. (फ़ा.) जखम उघडी होणे.

खंदः-ए-ज़मीं (خندۂ زمیں) पु. (फ़ा.) भूमीतून हिरवळ व फुले-फळे वर येणे; झाडे उगवणे.

खंदः-ए-जाम (خندۂ جام) पु. (फ़ा.) पेल्यात मद्य ओतताना होणारा आवाज.

खंदः-ए-ज़ेर-ए-लब (خندۂ زیرلب) पु. (फ़ा.) अस्फुट स्मित.

खंदः-ए-दंदाँनुमा (خندۂ دنداں نما) पु. (फ़ा.) दात दिसतील असे मुक्त हास्य.

खंदः-ए-सुबह् (خندۂ صبح) पु. (फ़ा. + 'अ.) प्रातः-कालीन अरुणिमा.

खच्चर (خچر) पु. (तु.) खेचर; गर्दभाश्व.

ख़ज़फ़ (خذف); **ख़ज़फ़** (خزف) स्त्री. ('अ.) (१) खापर; मातीच्या भांडयाचा तुकडा. (२) मातीचे

भांडे; मातीचे परळ. **–रेज़ः** (ریز –) पु. ('अ.+फ़ा.) मातीच्या भांडघाचे तुकडे.

खज़ब (خزب) पु. ('अ.) (१) मूर्खता. (२) लांबी.

खज़र (خزر) पु. ('अ.) उत्तर तुर्कस्तानातील एक प्रदेश. (येथील लोक अत्यंत सुंदर असतात).

खजल (خجل) पु. ('अ.) (१) खजील होणे. (२) नखरा करणे. (३) चिखलात रुतणे.

खजलत (خجلت) स्त्री. ('अ.) लज्जा; खजीलपणा. **–ज़दः** (زدہ –) वि. ('अ. + फ़ा.) खजील; लज्जित.

खज़ाँ (خزاں) स्त्री. (फ़ा.) पानगळ. (तु.) हिवाळा; हेमंत ऋतू. **–आश्ना** (آشنا –) वि. (फ़ा.) पानगळ ऋतूत व निर्जन स्थानी रहाण्याची सवय असलेला पक्षी. **–दीदः** (دیدہ –) वि. (फ़ा.) पानगळाचे दुःख सहन केलेला वृक्ष किंवा पान; ज्याने पुष्कळ दुःखे सहन केली आहेत असा. **–रसीदः** (رسیدہ –) वि. (फ़ा.) ज्याच्यावर पानगळाचे संकट आले आहे असा.

खज़ा'इन (خزائن) पु. ['अ. 'खजानः' (خزانہ) चे अनेक.] खजिने; कोष; भांडारे.

खज़ानची (خزانچی) पु. ('अ. + फ़ा.) खजिनदार; कोषाध्यक्ष.

खज़ानः (خزانہ) पु. ('अ.) खजिना; राजकोष; भांडार (शुद्ध : 'खिजानः').

खज़ानः-ए-'आमिरः (خزانۂ عامرہ) पु. ('अ.) भरलेला खजिना.

खजालत (خجالت) स्त्री. ('अ.) (१) लज्जा; संकोच; शरम. (२) पश्चात्ताप.

खजिल (خجل) वि. ('अ.) (१) खजील; लज्जित; शर्मिंदा. (२) नम्र.

खज्न (خزن) पु. ('अ.) धन जमा करणे; पैसा जमिनीत पुरणे; रहस्य लपविणे.

खत़ (خط) पु. ('अ.) (१) पत्र; चिठ्ठी. (२) रेघ; रेषा. (३) दाढी; मिशा. (४) लेख. (५) परवानगी; राजाज्ञा. (६) चिन्ह; खूण. (७) हस्ताक्षर; अक्षर. **–आना** (آنا –) मिसरूड फुटणे. **–कश** (کش –) पु. ('अ.+हि.) एकदा विकत घेतल्यानंतर परत न करता येणारा माल ('जांगड' च्या उलट). **–कशीदः** (کشیدہ –) वि. ('अ.+फ़ा.) रेघ मारलेला; ज्याच्या खाली रेघ मारलेली आहे असा. **–तराश** (تراش –) वि. ('अ.+फ़ा.) हजामत करणारा न्हावी; नापित.

खत़-ए-'अमूद (خط عمود) पु. ('अ.) लंबरेषा; सरळ उभी रेघ.

खत़-ए-इस्तिवा (خط استوا) पु. ('अ.) विषुववृत्त; भूमध्यरेषा.

खत़-ए-जद्दी (خط جدی) पु. ('अ.) मकरवृत्त.

खत़-ए-तक़दीर (خط تقدیر) पु. ('अ.) भाग्यरेषा.

खत़-ए-तस्दीक़ (خط تصدیق) पु. ('अ.) प्रमाणपत्र; सर्टिफिकेट; समर्थन करणारे पत्र.

खत़-ए-तस्लीम (خط تسلیم) पु. ('अ.) सरळ रेषा.

खत़-ए-तहरीर (خط تحریر) पु. ('अ.) पत्राचे अक्षर; मजकुराचे पत्र.

मुद्दतों के ब'अद क़ासिद आज लाया है पयाम।
फ़ैसलः क़िस्मत का ज़ाहिर है खत़-ए-तहरीर से॥

खत़-ए-नस्त'अलीक (خط نستعلیق) पु. ('अ.) (?) ज्या लिपीत आधुनिक उर्दूची पुस्तके (लिथोवर) छापली जातात ती लिपी. (२) सुंदर वळणदार अक्षर.

खत़-ए-निस्फ़-उन्-नहार (خط نصف النہار) पु. ('अ.) जेथे आल्यानंतर सूर्य दिवसाला दोन समान भागांत विभाजित करतो ती कल्पित रेषा.

खत़-ए-मुतवाज़ी (خط متوازی) पु. ('अ.) समांतर; समांतर रेषा.

खत़-ए-मुनह़नी (خط منحنی) पु. ('अ.) वक्र रेषा.

खत़-ए-मुमास (خط مماس) पु. ('अ.) समांतर रेषा.

खत़-ए-मुस्तक़ीम (خط مستقیم) पु. ('अ.) सरळ रेषा.

खत़-ए-मुस्तदीर (خط مستدیر) पु. ('अ.) गोल रेषा.

खत़-ए-शिकस्तः (خط شکستہ) पु. ('अ.+फ़ा.) गिचमिड अक्षर; घाईने खरडलेले अक्षर.

खत़-ए-सर्त़ान (خط سرطان) पु. ('अ.) कर्कवृत्त.

खत़-ओ-किताबत (خط و کتابت) स्त्री. ('अ.) पत्र-व्यवहार.

खतन (ختن) पु. ('अ.) जावई; जामात. (पत्नीच्या नात्यातील कोणीही पुरुष—मेहुणा, सासरा वगैरे).

खतम (ختم); **खतमः** (ختمہ) वि. ('अ.) मुद्रांकित; मोहर केलेला.

खत़र (خطر) पु. ('अ.) (१) भय. (२) शंका. (३) संकट; धोका. **–नाक** (ناک –) वि. ('अ.+फ़ा.) (१) भयंकर; भीषण. (२) धोक्याचा.

खत़रः (خطرہ) पु. ('अ.) (१) भय. (२) शंका. (३) धोका.

खत़ल (خطل) पु. ('अ.) (१) सुस्ती; मंदता. (२) उतावळेपणा; घाई.

खता (خطا) पु. ('अ.) (१) दोष; अपराध. (२) पाप. (३) चूक. **–कार** (کار –); **–गर** (گر –); **–वार** (وار –) वि. ('अ. + फ़ा.) दोषी; अपराधी;

गुन्हेगार. **–पोश** (پوش –) वि. ('अ.+फ़ा.) पापाकडे, दोषांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करणारा. **–बख़्श** (بخش –) वि. ('अ.+फ़ा.) पापाबद्दल, अपराधाबद्दल क्षमा करणारा; मोक्ष देणारा. **–बीं** (بیں –) ('अ.+फ़ा.) दोष व पाप पहाणारा; ईश्वर. **–शि'आर** (شعار –) वि. ('अ.) सतत पाप करणारा; पापप्रवण.

ख़ताफ़ (خطاف) पु. ('अ.) सैतान; राक्षस.

ख़ताबः (خطاب) पु. ('अ.) व्याख्यान देणे; 'ख़ुत्बः' पढणे.

ख़तियः (خطیہ) पु. ('अ.) पाप; गुन्हा.

ख़तीब (خطیب) पु. ('अ.) (१) 'ख़ुत्बः' पढणारा. (२) व्याख्यान देणारा; वक्ता. (३) लेक्चरर; प्राध्यापक. (४) धर्मोपदेशक.

ख़तीबी (خطیبی) स्त्री. ('अ.) 'ख़ुत्बः' पढण्याचे काम; व्याख्यान देण्याचे काम.

ख़तीबः (خطیبہ) स्त्री. ('अ.) व्याख्यान देणारी; व्याख्याती.

ख़तीर (خطیر) वि. ('अ.) (१) अत्यधिक. (२) महान; श्रेष्ठ.

ख़त्नः (ختنہ) पु. ('अ.) मुसलमानी धर्मानुसार पुरुषाच्या जननेंद्रियाचे पुढे आलेले कातडे कापून टाकणे; सुंता.

ख़त्म (ختم) वि. ('अ.) (१) समाप्त; पूर्ण. (२) मृत. (३) संपूर्ण. (पु.) समाप्ती.

ख़दंग (خدنگ) पु. (फ़ा.) (१) ज्याच्या लाकडाचे बाण बनविले जातात ते झाड. (२) लहान बाण.

ख़द'अः (خدعہ) पु. ('अ.) कपट; दगा; फसवणूक.

ख़दफ़ (خضف) पु. ('अ.) पादणे.

ख़दब (خضب) पु. ('अ.) रंगविणे; रंग लावणे.

ख़दम (خدم) पु. ['अ. 'ख़ादिम' (خادم) चे अनेक.] नोकरचाकर.

ख़दिर (خدر) वि. ('अ.) (१) सुन्न; अचेतन. (२) सुस्त.

ख़दिर (خضر) पु. ('अ.) हिरवीगार फांदी; हिरवळ.

ख़दीब (خضیب) वि. ('अ.) रंगविलेला.

ख़दीज (خدیج) वि. ('अ.) पूर्ण दिवस भरण्यापूर्वी जन्मास आलेले अव्यंग मूल.

ख़दीजः (خدیجہ) स्त्री. ('अ.) हजरत मुहम्मद पैगंबर यांची पहिली पत्नी.

ख़दीव (خدیو) पु. (तु.) (१) तुर्कांनी ईजिप्तच्या बादशहांना दिलेली पदवी. (२) स्वामी; सम्राट.

ख़द्शः (خدشہ) पु. ('अ.) (१) भीती; आशंका. (२) शंका. [अनेक 'ख़द्शात' (خدشات)].

ख़द्रा (خضرا) पु. ('अ.) हिरवळ.

ख़द्रा-ए-दिमन (خضرائے دمن) पु. ('अ.+फ़ा.) उकीरड्यावर उगवलेली हिरवळ; सुंदर परंतु बदचाल स्त्री.

ख़नाक (خناک) पु. ('अ.) घटसर्प (रोग).

ख़नाजिर (خناجر) पु. ['अ. 'ख़ंजर' (خنجر) चे अनेक.] कटचारी; खंजीर; सुरे.

ख़नाज़ीर (خنازیر) पु. ['अ. 'ख़िंज़ीर' (خنزیر) चे अनेक.] (१) डुकरे. (२) गंडमाळा; कंठमाळा (रोग).

ख़न्नास (خناس) पु. ('अ.) (१) राक्षस; दैत्य; सैतान; पिशाच. (२) अहंकार.

ख़फ़क़ान (خفقان) पु. ('अ.) (१) हृदय धडधडण्याचा विकार. (२) उन्माद रोग (हिस्टेरिया).

ख़फ़गी (خفگی) स्त्री. (फ़ा.) (१) नाराजी; रोष; राग. (२) गळा दाबणे.

ख़फ़ा (خفا) वि. (फ़ा.) क्रुद्ध; रुष्ट; नाराज. (पु.) आडपडदा; रहस्य.

गर मुझ से हो ख़फ़ा तो उसे दीजि'ए निकाल ।
तुम कौन रखनेवाले हो मेरे मलाल के ॥

ख़फ़ी (خفی) वि. ('अ.) (१) गुप्त; लपलेला. (२) बारीक.

ख़फ़ीफ़ (خفیف) वि. ('अ.) (१) थोडा; अल्प. (२) हलका. (३) तुच्छ; सामान्य. (४) लज्जित.

ख़फ़ीफ़-उत्-तब'अ (خفیف الطبع); **ख़फ़ीफ़-अल्-हरकात** (خفیف الحرکات) वि. ('अ.) क्षुद्र स्वभावाचा; वाह्यात चाळे करणारा.

ख़फ़ीफ़ः (خفیفہ) स्त्री. ('अ.) लहानसहान खटले चालविणारे दिवाणी न्यायालय; स्मॉल कॉज कोर्ट.

ख़फ़ीर (خفیر) वि. ('अ.) (१) मार्गदर्शक. (२) त्राता; पालक. (३) निकृष्ट.

ख़फ़ः (خفہ) पु. (फ़ा.) (१) गळा दाबणे. (२) ज्याचा गळा बसला आहे असा.

ख़फ़्तः (خفتہ) वि. ('अ.) झुकलेला; वाकलेला.

ख़फ़्द (خفض) पु. ('अ.) (१) ऐषआराम. (२) सुस्ती; हळूहळू चालणे. (३) एखाद्याला त्याच्या स्थानावरून खाली ओढणे.

ख़फ़्फ़ाफ़ (خفاف) पु. ('अ.) (१) कातडी मोजे शिवणारा व विकणारा. (२) पादत्राणे बनविणारा व विकणारा.

ख़बर (خبر) स्त्री. ('अ.) (१) बातमी; वृत्तांत. (२) माहिती. (३) निरोप. (४) काळजी; रक्षण. (५) सावधपणा; शुद्धी. (६) पत्ता; शोध.

(७) संदेश; मुहम्मद साहेबांचे प्रवचन (हदीस). **–गीर** (گیر –) वि. ('अ. + फ़ा.) (१) काळजी घेणारा; पालनपोषण करणारा. (२) देखरेख करणारा. (३) हेर; गुप्तचर. (४) बातमी देणारा. **–दार** (دار –) वि. ('अ. + फ़ा.) सावध; जागृत; सावधान. **–दिहंद:** (دھندہ –) वि. ('अ. + फ़ा.) सूचना, बातमी देणारा. **–रसाँ** (رساں –) वि. ('अ.+फ़ा.) बातमी पोचविणारा; पत्रवाहक. **–रसानी** (رسانی –) स्त्री. ('अ. + फ़ा.) सूचना, बातमी पोचविणे. **–लगाना** (لگانا –) बातमी, माहिती काढणे. **–लेना** (لینا –) (१) मदत करणे. (२) विचारपूस करणे. (३) फैलावर घेणे. **–होना** (ہونا –) माहिती असणे.

ख़बस़ (خبث) स्त्री. ('अ.) (१) अपवित्रता. (२) घाण; गलिच्छता.

ख़बा (خبا) पु. ('अ.) (१) लपविणे. (२) पाऊस. (३) गवत; हिरवळ.

ख़बा'इस़ (خبائث) पु. ('अ.) अपवित्र, गलिच्छ गोष्टी.

ख़बासत (خباثت) स्त्री. ('अ.) दुष्टता; नीचता; मलिनता.

ख़बीर (خبیر) वि. ('अ.) (१) चांगला माहितगार; जाणकार. (२) ईश्वर.

ख़बीस (خبیس) वि. ('अ.) विनोदी; गमत्या.

ख़बीस़ (خبیث) वि. ('अ.) कुटिल; मलिन अंत:करणाचा; खवीस; दुष्ट; खुनशी. (पु.) राक्षस; पिशाच; सैतान.

ख़ब्त (خبط) पु. ('अ.) (१) वेड; मेंदूतील विकृती. (२) छांदिष्टपणा; नाद.

ख़ब्ती (خبطی) वि. ('अ.) विक्षिप्त; वेडा; चक्रम; विकृत मनाचा.

ख़ब्न (خبن) पु. ('अ.) सदऱ्याचा वगैरे शेवट (पदर) दुमडणे किंवा शिवणे.

ख़ब्बाज़ (خباز) वि. ('अ.) पावरोटी भाजणारा.

ख़म (خم) पु. (फ़ा.) वक्रता; वाकडेपणा; झुकाव. (वि.) वाकडा; झुकलेला; वळलेला. **–ज़द:** (زدہ –) वि. (फ़ा.) पळून गेलेला. **–ठोकना** (ٹھوکنا –) दंड थोपटणे; पड्डू मारणे. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) वाकलेला; वाकडा.

ख़म-ओ-चम (خم وچم) पु. (फ़ा.) सुंदर स्त्रिया चालताना करतात ते हावभाव; नखरा; तोरा.

ख़मर (خمر) पु. स्त्री. ('अ.) मदिरा; दारू.

ख़मी (خمی) स्त्री. (फ़ा.) वक्रता; बाक.

ख़मीद: (خمیدہ) वि. (फ़ा.) वाकलेला; वक्र; बाकदार. **–क़द** (قد –) वि. (फ़ा.+'अ.) ज्याचे शरीर वाकले आहे असा; अत्यंत वृद्ध. **–कमर** (کمر –) वि. (फा.) ज्याची कंबर वाकली आहे असा; खूप म्हातारा.

कमर ख़मीद: नहीं बे वजह द्'ओफ़ी में ।
ज़मीन ढूंड रहा हूं मज़ार के क़ाबिल ।।

ख़मीर (خمیر) पु. ('अ.) (१) आंबवण; आंब. (२) तिवविलेली कणीक (सोडा व मीठ घालून). (३) औषधीमध्ये पाणी घालून त्या कुजवून काढलेला अर्क; अननस, गरे वगैरे आंबवून काढलेले पाणी. **–माय:** (مایہ –) एखाद्या वस्तूच्या वाढीस कारण होणारी गोष्ट; वस्तू.

ख़मीरी (خمیری) वि. (फ़ा.) खमीर घालून केलेली वस्तू. (स्त्री.) खमीर घालून केलेली चपाती; पावरोटी.

ख़मीर: (خمیرہ) पु. (फ़ा.) (१) एक प्रकारचा सुगंधित तंबाखू (ओढण्याचा). (२) अवलेह; चाटण.

ख़मीस (خمیس) पु. ('अ.) (१) गुरुवार. (२) पाच विभाग असलेले सैन्य.

ख़म्मार (خمار) वि. (फ़ा.) दारू बनविणारा; विकणारा. **–ख़ान:** (خانہ –) पु. ('अ. + फ़ा.) दारूचा गुत्ता.

ख़म्याज़: (خمیازہ) पु. (फ़ा.) (१) जांभई. (२) आळोखे पिळोखे देणे; आळस झटकणे. (३) परिणाम. (४) वाईट कर्माचे फळ; अद्दल. **–कश** (کش –) वि. (फ़ा.) (१) आळस झाडणारा; आळेपिळे, जांभई देणारा. (२) कृत कर्माचे फळ भोगणारा.

ख़म्र (خمر) पु. ('अ.) (१) मदिरा. (२) खमीर तयार करणे.

ख़म्स: (خمسہ) पु. ('अ.) (१) पाच वस्तूंचा समूह. (२) पाच बोटे. (३) पाच चरणांचे एक कडवे; अशी अनेक कडवी असलेले उर्दू काव्य.

ख़म्स:-ए-मुतहय्यिर: (خمسۂ متحیرہ) पु. ('अ.) सूर्य व चंद्र यांच्या व्यतिरिक्त इतर पाच ग्रह. (त्यांची चाल वेडीवाकडी असते).

ख़म्सं:-ए-मुस्तरिक़: (خمسۂ مسترقہ) पु. ('अ.) इराणी वर्षातील प्रत्येक महिना तीस दिवसांचा असतो; परंतु 'इस्फंदार' या बाराव्या महिन्याचे ३५ दिवस धरतात. या वाढलेल्या पाच दिवसांना 'ख़म्स:-ए-मुस्तरिक:' असे म्हणतात.

ख़याल (خیال) पु. ('अ.) (१) विचार; ध्यान; कल्पना. (२) भावना. (३) प्रवृत्ती. (४) स्मृती;

आठवण. (५) लक्ष. (६) अनुमान. (७) मत. (८) इरादा. (९) आदर. (१०) शास्त्रीय संगीताचा एक प्रकार; ख्याल. **–आरा'ई** (آرائی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) कल्पनाविलास; काव्यासाठी विषय शोधणे. **–बंदी** (بندی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) कल्पनाविलास. (२) ख्यालाची रचना.

ख़याल-ए-ख़ाम (خیال خام) पु. ('अ.+फ़ा.) **ख़याल-ए-फ़ासिद** (خیال فاسد); **ख़याल-ए-बातिल** (خیال باطل) पु. ('अ.) चुकीची कल्पना; भ्रम; चुकीची समजूत.

ख़यालात (خیالات) पु. ['अ. 'ख़याल' (خیال) चे अनेक.] विचार; कल्पना.

ख़याली (خیالی) वि. ('अ.) काल्पनिक; कपोलकल्पित.

ख़य्यात् (خیاط) पु. ('अ.) शिंपी.

ख़य्यात्-ए-अज़ल (خیاط ازل) पु. ('अ.) परलोकात आत्म्याला शरीररूपी वस्त्र देणारा; परमेश्वर.

ख़य्याम (خیام) पु. ('अ.) (१) वाज विणणारा. (२) तंबू शिवणारा. (३) फारसीचा प्रसिद्ध कवी उमर ख़य्याम.

ख़र (خر) पु. (फ़ा.) गाढव; गर्दभ; मूर्ख. (वि.) महान; श्रेष्ठ; मोठा. **–कस** (کس –) वि. (फ़ा.) मठ्ठ; मूर्ख. **–ज़न** (زن –) पु. (फ़ा.) चाबूक. **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) भित्रा. **–दिमाग़** (دماغ –) वि. (फ़ा.+'अ.) (१) घमेंडखोर. (२) मूर्ख. **–नफ़स** (نفس –) वि. (फ़ा. + 'अ.) (१) अत्यधिक कामवासना असलेला. (२) मोठघा जननेंद्रियाचा. **–पाचः** (پاچہ –) गाढवाचे पिलू. **–बंदः** (بندہ –) पु. (फ़ा.) गाढवाचा मालक. **–बत्** (بط –) पु. (फ़ा.) (१) मोठे बदक. (२) महामूर्ख. **–बातशदीद** (باتشدید –) वि. (फ़ा.) महामूर्ख. **–मस्ती** (مستی –) स्त्री. (फ़ा.) वेडाचा एक प्रकार. (यामध्ये रोगी गाढवासारखे मूर्खपणाचे व अश्लील चाळे करतो). **–वार** (وار –) पु. (फ़ा.) एका गाढवाचे ओझे.

ख़रक़ (خرق) पु. ('अ.) (१) लज्जित, खजील होणे. (२) मूर्खपणा.

ख़रख़िशः (خرخشہ) पु. (फ़ा.) भांडण; दंगा.

ख़रगह-ए-मह (خرگہ مہ) पु. (फ़ा.) कर्क राशी.

ख़रगाह (خرگاہ) पु. (फ़ा.) मोठा तंबू.

ख़रगोश (خرگوش) पु. (फ़ा.) ससा.

ख़रचंग (خرچنگ) पु. (फ़ा.) (१) खेकडा. (२) कर्क राशी.

ख़रचोब (خرچوب) पु. (फ़ा.) सतार वगैरे वाद्यांवर असलेला लाकडाचा लहान तुकडा. (यात तारा अडकविलेल्या असतात).

ख़रफ़ (خرف) पु. ('अ.) बुद्धिनाश; म्हातारपणामुळे होणारा बुद्धिभ्रंश.

ख़रबुज़ः (خربزہ); **ख़रबूज़ः** (خربوزہ) पु. (फ़ा.) खरबूज (खरखरीत सालीचे मोठे फळ) ['ख़र' (خر) म्हणजे मोठे आणि 'बूज़ः' (بوزہ) म्हणजे मधुर व सुगंधित फळ].

ख़रमगस (خرمگس) पु. (फ़ा.) एक प्रकारची मोठी माशी. (ही जखमेवर बसली असता जखमेत किडे पडतात).

ख़रमोहरः (خرمہرہ) पु. ('अ.) लहान शंख; कवडी.

ख़रसंग (خرسنگ) पु. (फ़ा.) (१) मोठा फत्तर; शिळा. (२) प्रतिस्पर्धी.

ख़रह (خرہ) पु. ('अ.) कोंबडा.

ख़राज (خراج) पु. ('अ.) (१) भूमिकर; शेतसारा. (२) चौथाई; मांडलिक-कर. **–गुज़ार** (گزار –) वि. ('अ.+फ़ा.) कर देणारा; मांडलिक.

ख़राज-ए-'अक़ीदत (خراج عقیدت) पु. ('अ.) श्रद्धांजली; धन्यवाद.

ख़रातीन (خراطین) पु. (फ़ा.) गांडूळ; दानवे.

ख़रातीम (خراطیم) पु. ['अ. 'खुर्तूम' (خرطوم) चे अनेक.] (१) हत्तीच्या सोंडी. (२) राष्ट्रातील अथवा जमातीतील मोठे लोक; पुढारी.

ख़राब (خراد) पु. (फ़ा.) लाकूड किंवा धातू तासून गुळगुळीत करण्याचे चाक; लेथ कातकामाचा चरक. [मूळ अरबी शब्द 'ख़रात' (خراط) असा होता. फारसी भाषिकांनी तो घेताना त्यातील ط च्या ऐवजी ت केले व त्यानंतर 'त' चे 'द' झाले. उर्दूवाल्यांनी हा फारसीकडून घेतला]. **–पर चढ़ाना** (پر چڑھانا –) व्यवस्थित; ठीकठाक करणे.

ख़राब (خراب) वि. ('अ.) (१) वाईट. (२) निकृष्ट; पतित; हलकट; दुराचारी. (३) विकृत; दूषित. (४) अपवित्र. (५) विध्वस्त; उध्वस्त; वैराण. **–हाल** (حال –) वि. ('अ.) दुर्दशाग्रस्त; गांजलेला.

ख़राबात (خرابات) पु. (फ़ा.) (१) मदिरागृह; दारूचा गुत्ता. (२) द्यूत गृह.

ख़राबाती (خرابای) वि. (फ़ा.) (१) झिंगलेला; दारुड्या. (२) जुगारी.

ख़राबी (خرابی) स्त्री. (फ़ा.) (१) नासाडी. (२) दुर्दशा. (३) हानी. (४) बिघाड.

ख़राबः (خرابہ) पु. (फ़ा.) (१) वैराण मुलूख; शत्रूचा प्रदेश (२) उध्वस्त घर. **–आबाद** (آباد –) पु. (फ़ा.) जग; मृत्युलोक.

ख़राश (خراش) स्त्री. (फ़ा.) ओरखडा; टवका.

ख़रास (خراس) पु.स्त्री. (फ़ा.) बैलांकडून चालविली जाणारी धान्य दळण्याची चक्की (जाते) किंवा तेल्याचा घाणा.

ख़रीतः (خريطہ) पु. ('अ.) (१) खलिता; लखोटा. (२) पैशांची किंवा पत्रांची थैली.

ख़रीद (خريد) स्त्री. (फ़ा.) (१) खरेदी; क्रय. (२) मूळ किंमत. **–फ़रोख़्त** (– فروخت) स्त्री. (फ़ा.) खरेदी-विक्री.

ख़रीद-ओ-फ़रोख़्त (خريد و فروخت) स्त्री. (फ़ा.) खरेदी-विक्री; क्रयविक्रय.

ख़रीदार (خريدار) वि. (फ़ा.) विकत घेणारा; गिऱ्हाईक; ग्राहक.

ख़रीदः (خريدہ) स्त्री. ('अ.) कुमारिका; लज्जाशील स्त्री; भोक न पाडलेले मोती; अनघड मोती.

ख़रीदः (خريدہ) वि. (फ़ा.) विकत घेतलेला.

ख़रीफ़ (خريف) स्त्री. ('अ.) (१) शरद ऋतू; पानगळ ऋतू. (२) या ऋतूत मळले जाणारे धान्य; कार्तिकात तयार होणारे पीक; पहिले पावसाळी पीक. ['ख़र्फ़' (خرف) म्हणजे फळ गोळा करणे. पानगळ ऋतूत फळे पिकून तयार झालेली असतात. त्यावरून हा शब्द बनला आहे].

ख़रोश (خروش) पु. (फ़ा.) (१) आरडाओरडा. (२) विलाप; गाऱ्हाणे.

ख़र्क़ (خرق) पु. ('अ.) (१) लज्जित होणे. (२) तुकडे होणे; मोडणे. (३) तोडणे.

ख़र्क़-ए-'आबत (خرق عادت) पु. ('अ.) निसर्गाविरुद्ध कार्य; चमत्कार.

ख़र्च (خرچ); **ख़र्चः** (خرچہ) पु. (फ़ा.) (१) खर्च; व्यय. (२) वापर; उपभोग.

ख़र्ज (خرج) पु. ('अ.) (१) बाहेर पडणे. (२) खर्च.

ख़र्त़ (خرط) पु. ('अ.) लाकडावर रंधा फिरवून ते गुळगुळीत करणे.

ख़र्दल (خردل) स्त्री. ('अ.) मोहरी; राई.

ख़र्फ़ (خرف) पु. ('अ.) फळे गोळा करणे.

ख़र्राज़ (خراز) वि. ('अ.) कातडे शिवणारा; चांभार.

ख़र्रात़ (خراط) पु. ('अ.) **ख़र्राद** (خراد) पु. (फ़ा.) लथवर काम करणारा; रंधा चालविणारा; सुतार.

ख़र्रास (خراس) पु. ('अ.) कुंभार.

ख़र्रास़ (خراص) वि. ('अ.) अनुमान घपक्याने बोलणारा; मिथ्यावादी; खोटारडा.

ख़र्श (خرش) पु. ('अ.) (१) सोलणे; तासणे. (२) कुटुंबासाठी पैसा मिळविणे.

ख़र्स (خرس) पु. ('अ.) कुंभ; मडके; मातीची घागर.

ख़र्स़ (خرص) पु. ('अ.) (१) उभ्या पिकाचा अंदाज करणे. (२) खोटे बोलणे.

ख़लक़ (خلق) पु. ('अ.) जुने कपडे. [अनेक 'ख़लक़ान' (خلقان)].

ख़लख़ाल (خلخال) स्त्री. ('अ.) नूपुर; पैजण.

ख़लख़ाल-ए-ज़र (خلخال زر); **ख़लख़ाल-ए-फ़लक** (خلخال فلک) पु. (फ़ा.) सूर्य-चंद्र.

ख़लजान (خلجان) पु. ('अ.) (१) चिंता. (२) द्विधा वृत्ती. (३) भांडण. (४) कटकट.

ख़लद (خلد) पु. ('अ.) (१) हृदय. (२) मन. (३) आत्मा.

ख़लफ़ (خلف) पु. ('अ.) (१) मुलगा; सुपुत्र. (२) वारस. (वि.) मागून येणारा.

ख़लफ़-उर्-रशीद (خلف الرشيد); **ख़लफ़-उस्-सिद्क़** (خلف الصدق) पु. ('अ.) सुपुत्र. **नाख़लफ़** (ناخلف) अयोग्य; नालायक.

ख़लल (خلل) पु. ('अ.) (१) विघ्न; बाधा. (२) अडथळा; अडकणी; हस्तक्षेप. (३) विकार; बिघाड. **–अंदाज़** (– انداز) वि. ('अ.+फ़ा.) आडकाठी आणणारा; हस्तक्षेप करणारा. **–अंदाज़ी** (– اندازی) स्त्री. ('अ. + फ़ा.) हस्तक्षेप करणे; अडथळा आणणे.

ख़लल-ए-दिमाग़ (خلل دماغ) पु. ('अ.) मेंदूतील बिघाड; वेड लागणे.

ख़ला (خلا) पु. ('अ.) (१) अंतरिक्ष; अवकाश. (२) शून्य; पोकळी. (३) एकांत.

ख़ला'अत (خلاعت) स्त्री. ('अ.) (१) आईबापाची आज्ञा न पाळणे; अवज्ञा करणे. (२) पापकर्म; दुराचार.

ख़ला'इक़ (خلائق) स्त्री. ['अ. 'ख़लीक़:' (خليقہ) चे अनेक.] जनता; सर्वसामान्य लोक.

ख़ला'इफ़ (خلائف) पु. ['अ. 'ख़लीफ़:' (خليفہ) चे अनेक.] प्रतिनिधी मंडळी; वदली काम करणारे.

ख़ला'ई (خلائی) वि. ('अ.) अवकाशसंबंधी. **–जहाज़** (– جہاز) पु. ('अ.) अवकाशयान.

ख़लाबत (خلابت); **ख़लाबः** (خلابہ) स्त्री. ('अ.) एखाद्याला गोड बोलून मुग्ध, मोहित करणे.

ख़लामला (خلا ملا) पु. ('अ.) घनिष्ठ मैत्री; दाट प्रेम.

ख़लाश (خلاش) पु. (फ़ा.) कोलाहल; आरडाओरडा.

ख़लाशाँ (خلاشاں); **ख़लाशः** (خلاشہ) पु. (फ़ा.) केरकचरा; शत्रुत्व करणारे लोक.

ख़लास़ (خلاص) पु. ('अ.) मुक्ती; सुटका. (वि.) मुक्त; सुटका झालेला. (हिं.) वीर्यपात.

ख़लासी (خلاصی) स्त्री. (तु.) मुक्ती; सुटका. (हिं.) तोफखान्यावरील किंवा जहाजावरील कामगार.

खलिश (خلش) स्त्री. (फ़ा.) (१) टोचणी; बोचणी. (२) खुपणे; दुखणे. (३) चिंता; काळजी.

खली'अ (خليع) पु. ('अ.) ज्याचा डाव हुकला आहे असा जुगारी किंवा शिकारी; आज्ञा न मानणारी व्यक्ती. **–उल्-'इज़ार** (العزار –) वि. ('अ.) ज्याचा लगाम तुटला आहे असा; बेलगामी; बेछूट.

खलीक़ (خليق) वि. ('अ.) (१) सुशील; सुस्वभावी. (२) मनमिळाऊ.

खलीक़ः (خليقة) पु. ('अ.) (१) सर्वसामान्य लोक; जनता. (२) जगातील प्रत्येक वस्तू. (३) स्वभाव; प्रकृती.

खलीज (خليج) स्त्री. ('अ.) खाडी; उपसागर.

खलीत् (خليط) वि. ('अ.) (१) एखाद्या संपत्तीतील वाटेकरी. (२) पती. (३) चुलत भाऊ.

खलीत्ः (خليطه) पु. (फ़ा.) लहान थैली.

खलीत्ः-ए-तूफ़ान (خليطهٔ طوفان) वि. (फ़ा.) दंगलीला चिथावणी देणारा; भडकविणारा.

खलीफ़ (خليف) पु. ('अ.) (१) मागून येणारा. (२) दोन डोंगरांमधील मार्ग.

खलीफ़त-उल्-मुस्लिमीन (خليفة المسلمين) पु. ('अ.) मुसलमानांचा नेता. (मुहम्मद साहेबांच्या वारसदारांची पदवी; मुस्लीम शासकांचा किताब).

खलीफ़ः (خليفه) पु. ('अ.) (१) प्रतिनिधी; नेता; सरदार; एखाद्याच्या गैरहजेरीत त्याच्या जागी काम करणारा. (२) वारस. (३) हजरत मुहम्मद पैगंबर यांचे वारसदार. (भारतात शिपी, न्हावी वगैरेनाही 'खलिफा' म्हणतात).

खलीयः (خليه) वि. स्त्री. ('अ.) (१) जिला घटस्फोट (तलाक) देण्यात आला आहे अशी स्त्री; विवाह-विच्छिन्ना. (२) सोडून दिलेला उंट.

खलील (خليل) पु. ('अ.) सच्चा मित्र.

खलील-उल्-लह (خليل الله) पु. ('अ.) ईश्वराचा मित्र; हजरत इब्राहीम.

खलीस् (خليص) वि. ('अ.) मिश्रित; भेसळ.

खल्क़ (خلق) पु. ('अ.) उत्पत्ती करणे. (स्त्री.) सृष्टी; प्राणी; मानव जाती.

खल्क़-उल्-लह (خلق الله); **खल्क़-ए-खुदा** (خلق خدا) स्त्री. ('अ.) ईश्वराने रचलेली सृष्टी; प्राणिमात्र; मानव जाती.

खल्त् (خلط) पु. ('अ.) मिसळणे; मिश्रण. **–मल्त्** (ملط –) वि. (तु.) मिसळलेला; मिश्रित; एकरूप झालेला.

खल्त्-मबहूस् (خلط مبحث) पु. ('अ.) एका विषयासंबंधी बोलणे चालले असता मध्येच दुसरा विषय काढणे; एक काम चालू असता मध्येच दुसरे काम सुरू करणे.

खल्फ़ (خلف) पु. ('अ.) कुपुत्र; वाईट मुलगा.

खल्लाक़ (خلاق) वि. पु. ('अ.) खूप मोठ्या प्रमाणावर उत्पन्न, निर्माण करणारा; सृष्टी निर्माण करणारा; ईश्वर.

खल्वत (خلوت) स्त्री. ('अ.) (१) निर्जन स्थान; एकांत. (२) स्त्री-पुरुषांचा एकांतवास. **–कदः** (کدہ –); **–खानः** (خانہ –) पु. **–गाह** (گاہ –); **–सरा** (سرا –) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) एकांतस्थान. (२) जनानखाना. **–गुज़ी** (گزیں –); **–नशीं** (نشیں –) वि. ('अ.+फ़ा.) एकांतवासी. **–दोस्त** (دوست –); **–पसंद** (پسند –) वि. ('अ.+फ़ा.) एकांतप्रिय. **–ओ-जल्वत में** (و جلوت میں –) अव्य. ('अ.) खाजगीरीत्या व जाहीरपणे; एकांतात व उघडपणे.

खल्वत-ए-सहीह (خلوت صحیح) स्त्री. ('अ.) विवाहानंतर पती-पत्नी संभोगार्थ एकांतात एकत्र रात्र घालविणे.

खल्वतियाँ (خلوتیاں) पु. ('अ.+फ़ा.) ['अ. 'खल्वती' (خلوتی) चे अनेक.] एकांतात राहाणारे; एकांतवासी व्यक्तीकडे जाणारे.

खल्वती (خلوتی) वि. ('अ.) (१) एकांतवासी; एकांतवासी व्यक्तीकडे जाणारा. (२) अंतरंग; मित्र.

खवाक़ीन (خواقين) पु. ['अ. 'खाक़ान' (خاقان) चे अनेक.] सम्राट.

खवातिफ़ (خواطف) पु. ['अ. 'खातिफ़' (خاطف) चे अनेक.] (१) पळवून नेणारे; हरण करणारे. (२) संकटे; आपत्ती.

खवातिम (خواتم) पु. ['अ. 'खातिमः' (خاتمہ) चे अनेक.] अंत; शेवट.

खवातिर (خواطر) पु. ['अ. 'खातीर' (خاطر) चे अनेक.] मनात येणारे विचार.

खवातीन (خواتين) स्त्री. ['अ. 'खातून' (خاتون) चे अनेक.] स्त्री. ('अ.) स्त्रिया; उच्चकुलीन स्त्रिया; बेगमा.

खवानीन (خوانين) पु. ['अ. 'खान' (خان) चे अनेक.] मोठमोठे सरदार; 'खान' ही पदवी धारण करणारे लोक.

खवारिज (خوارج) पु. ['अ. 'खारिजी' (خارجي) चे अनेक.] 'खारिजी' संप्रदायाचे लोक. (हे लोक हजरत अली यांना खलिफा मानीत नाहीत).

खवास् (خواص) पु. ['अ. 'खास्' (خاص) चे अनेक.] खास लोक; महत्त्वाची मंडळी. (स्त्री.) (१) बादशहाच्या

एकांतात त्याच्याकडे जाऊ शकणारी खास दासी. (२) श्रीमंताच्या घरच्या दासी. ['अ. 'खास्सः' (خاصہ) चे अनेक.] वैशिष्ट्ये; गुणधर्म. **–ओ-'अवाम** (– و عوام) पु. ('अ.) विशेष व सर्वसामान्य लोक.

ख़वासी (خواصی) स्त्री. ('अ.) (१) नोकरी; सेवा. (२) हत्तीच्या अंबारीची मागील बैठक.

ख़शख़श (خشخش); **ख़शख़ाश** (خشخاش) स्त्री. (फ़ा.) खसखस. (वि.) सशक्त व्यक्ती; सशस्त्र व्यक्ती.

ख़श्म (خشم) पु. (फ़ा.) क्रोध; राग. **–आलूद** (– آلود); **–गीं** (– گیں); **–नाक** (– ناک) वि. ('अ.+फ़ा.) रागाने लाल झालेला; क्रुद्ध.

ख़श्शाम (خشام) वि. ('अ.) मोठे नाक असणारा; नाकपुड्या मोठ्या असलेला.

ख़स (خس) स्त्री. (फ़ा.) (१) वाळलेले गवत. (२) वाळा (सुगंधी मूळ्या). **–ओ-ख़ाशाक** (– و خاشاک) पु. (फ़ा.) केरकचरा; गवताच्या काड्या वगैरे तुच्छ वस्तू. **–ख़ानः** (– خانہ) पु. (फ़ा.) गवताची झोपडी. **–पोश** (– پوش) वि. (फ़ा.) वाळलेल्या गवताने झाकलेले.

ख़सक (خسک) पु. (फ़ा.) (१) सराटा; गोखरू. (२) वहाणांच्या तळांना मारावयाचे खिळे (सराट्यासारखे).

ख़सरः (خصرہ) पु. ('अ.) (१) गावातील शेताचे नंबर, क्षेत्रफळ, कुळाचे नाव वगैरे गोष्टी नमूद केलेली यादी, नकाशा. (२) हिशेबाची कच्ची वही.

ख़सा'इल (خصائل) पु. ['अ. 'ख़स्लत' (خصلت) चे अनेक.] चांगले (वाईट) स्वभाव.

ख़सारत (خسارت) स्त्री. **ख़सारः** (خسارہ) पु. ('अ.) तोटा; नुकसान; हानी.

ख़सारः-ए-नक़दी (خسارۂ نقدی) पु. ('अ.) आर्थिक नुकसान.

ख़सासत (خساست) स्त्री. ('अ.) (१) कृपणता; कंजुषी. (२) नीचता; अधमता.

ख़सासः (خصاصہ) पु. ('अ.) दारिद्र्य; दैन्य; फकिरी.

ख़सीम (خصیم) पु. ('अ.) शत्रू; दुष्मन.

ख़सीस (خسیس) वि. ('अ.) (१) कृपण; चिक्कू. (२) नीच; अधम.

ख़सीसः (خسیسہ) स्त्री. ('अ.) अधमता; नीचता.

ख़सीसः (خصیصہ) स्त्री. ('अ.) स्वभाव; प्रकृती.

ख़सूर (خسور) वि. ('अ.) ज्याचे नुकसान झाले आहे असा; दिवाळखोर.

ख़स्तगी (خستگی) स्त्री. (फ़ा.) (१) शिथिलता; थकवा. (२) जखमी स्थिती. (३) खुसखुशीतपणा; कुरकुरीतपणा.

ख़स्तः (خستہ) वि. (फ़ा.) (१) जखमी; घायाळ. (२) दुर्दशाग्रस्त; दुःखी. (३) थकलेला. (४) कुरकुरीत; खुसखुशीत. (५) खारीक वगैरे फळांची बी; कोय. **–ख़ानः** (– خانہ) पु. (फ़ा.) इस्पितळ (जखमी लोकांसाठी असलेले). **–जाँ** (– جاں); **–जिगर** (– جگر); **–दिल** (– دل) वि. (फ़ा.) ज्यांचे हृदय घायाळ झाले आहे असा; दुःखी; प्रेमी; प्रणयपीडित. **–तन** (– تن) वि. (फ़ा.) ज्याचे सारे शरीर जखमी किंवा थकलेले आहे असा. **–हाल** (– حال) वि. (फ़ा.) दुर्दशाग्रस्त; दुःखी; दरिद्री.

ख़स्तः-ए-ग़म (خستۂ غم) वि. ('अ.+फ़ा.) दुःखाने दुर्दशा झालेला; प्रेमरोगाने पीडित.

ख़स्फ़ (خسف) पु. ('अ.) (१) जमिनीच्या पोटात जाणे; जमीन खचणे. (२) चंद्रग्रहण. (३) डोळे खोल जाणे.

ख़स्फ़ (خصف) पु. ('अ.) नाल मारणे; जोडणे; चिकटविणे.

ख़स्म (خصم) पु. ('अ.) (१) शत्रू; वैरी. (२) पती; नवरा. (३) मालक.

ख़स्मानः (خصمانہ) पु. ('अ.+फ़ा.) देखरेख.

ख़स्ल (خصل) पु. ('अ.) जुगारामध्ये एका वेळी लावले जाणारे धन; पैज; पण.

ख़स्लत (خصلت) स्त्री. ('अ.) (१) स्वभाव; प्रकृती; सवय. (२) गुण; वैशिष्ट्य.

ख़स्साफ़ (خصاف) पु. ('अ.) (१) नाल मारणारा; नालबंद. (२) मिथ्यावादी.

ख़स्सी (خصی) पु. ('अ.) (१) खच्ची केलेला पशू (बैल, बकरा). (वि.) खच्ची केलेला; नपुसक. (२) हिजडा.

ख़ाँ (خاں) पु. [फ़ा. 'खान' (خان) चे संक्षिप्त.] (१) सरदार; अमीर. (२) अध्यक्ष. (३) प्रतिष्ठित व्यक्ती.

ख़ा'इन (خائن) वि. ('अ.) अप्रामाणिक; पैशाचा अपहार करणारा.

ख़ा'इफ़ (خائف) वि. ('अ.) भयभीत; घाबरलेला.

ख़ा'इब (خائب) वि. ('अ.) (१) हताश; निराश. (२) वंचित.

ख़ाक (خاک) स्त्री. (फ़ा.) (१) धूळ; माती. (२) राख. (३) जमीन; भूमी. **–अंदाज़** (– انداز) पु. (फ़ा.) कचरा टाकण्याची टोपली; उकीरडा; कचऱ्याचा ढिगारा. **–उड़ना** (– اُڑنا) धुळधाण होणे; अपमानित होणे. **–छानना** (– چھاننا) दीनवाणे फिरणे. **–ज़ाद** (– زاد) वि. (फ़ा.) मातीतून उत्पन्न झालेला; प्राणिजात. **–दान** (– دان) पु. (फ़ा.) (१) कचरा टाकण्याचे स्थान. (२) जग. **–नशीं** (– نشیں)

वि. (फ़ा.) (१) जमिनीवर बसणारा; विनम्र. (२) दीन; लाचार. **–नाय** (نائے –) पु. स्त्री. (फ़ा.) संयोगभूमी. **–बसर** (بسر –) वि. (फ़ा.) डोकीत राख घालून घेणारा; शोकाने विलाप करणारा. **–बाज़** (باز –) वि. (फ़ा.) धूळ उडविणारा; मातीशी खेळणारा. **–बेज़** (بیز –) वि. (फ़ा.) माती चाळणारा; मातीतून सोने-चांदी शोधून काढणारा. **–रूब** (روب –) वि. (फ़ा.) झाडूवाला; भंगी. **–सार** (سار –) वि. (फ़ा.) विनम्र; विनीत; दीन. (बोलणारा स्वत:ला उद्देशून नम्रतेने हा शब्द वापरतो). **–सारी** (ساری –) स्त्री. (फ़ा.) नम्रता; दीनता.

ख़ाकसारी से नहीं बेहतर जहाँ में मुन'अमी ।
मिल ग'ई जिसको यह दौलत कीमियागर हो गया ।।

ख़ाक-ए-जिगरगीर (خاک جگرگیر) स्त्री. (फ़ा.) जेथून दुसरीकडे जाण्यास मन तयार होत नाही असे स्थान.

ख़ाक-ए-पा (خاک پا) स्त्री. (फ़ा.) चरण रज; पायधूळ. (बोलणारी व्यक्ती मोठ्या माणसांसमोर स्वत:ला उद्देशून हा शब्द वापरते)

ख़ाक-ए-फ़रामोशाँ (خاک فراموشاں) स्त्री. (फ़ा.) समाधी; कबर; थडगे.

ख़ाक-ए-मुरक्कब (خاک مرکب) स्त्री. (फ़ा.+'अ.) प्राणिवर्ग, वनस्पतिवर्ग व खनिजवर्ग.

ख़ाक-ए-मुर्दः (خاک مردہ) स्त्री. (फ़ा.) पडीत, नापीक जमीन.

ख़ाक-ए-शिफ़ा (خاک شفا) स्त्री. (फ़ा. + 'अ.) रोगमुक्त करणारी माती; एखाद्या महात्म्याच्या दारातील धूळ; करबला येथील माती. (हिच्या माळा वगैरे केल्या जातात).

ख़ाक-ए-सियाह (خاک سیاہ) स्त्री. (फ़ा.) काळीकुट्ट राख. **–होना** (ہونا –) (१) जळून खाक होणे. (२) नष्ट होणे.

ख़ाकअंगेज़्तः (خاک انگیختہ) स्त्री. (फ़ा.) पृथ्वी; भूगोल.

ख़ाक़ान (خاقان) पु. (तु.) सम्राट; सुलतान. (तुर्की व चिनी राज्यकर्त्यांची पदवी).

ख़ाक़ानी (خاقانی) वि. (तु.) राजेशाही; सार्वभौमिक. (पु.) इराणचा एक प्रख्यात कवी.

ख़ाकिस्तर (خاکستر) स्त्री. (फ़ा.) राख; भस्म.

ख़ाकिस्तरी (خاکستری) वि. (फ़ा.) खाकी; मळकट रंगाचा. (स्त्री.) खाकी रंग.

ख़ाकी (خاکی) वि. (फ़ा.) (१) करडा; खाकी रंगाचा; खाकी रंग. (२) मातीशी संबंधित; मृण्मय. **–निहाद** (نہاد –) मातीतून निर्माण झालेला प्राणी; मानवजाती.

ख़ाकः (خاکہ) पु. (फ़ा.) (१) रूपरेषा; आराखडा; कच्चा नकाशा. (२) मसुदा. (३) कच्ची यादी. (४) अंदाजपत्रक. (५) कथानक. **–उड़ाना** (اڑانا –) टर उडविणे.

ख़ाग (خاگ) पु. (फ़ा.) कोंबडीचे अंडे.

ख़ागीनः (خاگینہ) पु. (फ़ा.) अंड्याचे आमलेट; तळलेली अंडी; अंड्याची कढी.

ख़ाज (خاج) स्त्री. ('अ.) ख्रिश्चनांचा क्रूस; क्रॉस.

ख़ाज़नः (خازنہ) स्त्री. ('अ.) मेहुणी; साली. (बायकोची बहीण).

ख़ाज़िन (خازن) वि. पु. ('अ.) कोषाध्यक्ष; खजिनदार.

ख़ाज़ः (خازہ) पु. (फ़ा.) गिलाव्याची ओली माती; गारा.

ख़ात (خات) स्त्री. (फ़ा.) घार (पक्षी).

ख़ातम (خاتم) स्त्री. ('अ.) (१) अंगठी; मुद्रा. (२) शिक्का; मोहोर. **–कार** (کار –); **–बंद** (بند –); **–साज़** (ساز –) पु. वि. ('अ. + फ़ा.) हस्तिदंत किंवा लाकूड यावर नक्षीकाम करणारा. **–कारी** (کاری –); **–बंदी** (بندی –); **–साज़ी** (سازی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) हस्तिदंत अथवा लाकूड यावर नक्षीकाम करून ते छतात किंवा अन्यत्र बसविणे.

ख़ातिफ़ (خاطف) वि. ('अ.) (१) हिसकावून घेणारा; हिरावून घेणारा. (२) डोळ्यांची दृष्टी काढून घेणारी (वीज).

ख़ातिब (خاطب) पु. ('अ.) (१) एखाद्या स्त्रीला लग्नाची मागणी घालणारा पुरुष; पती. (२) जावई.

ख़ातिम (خاتم) वि. ('अ.) (१) खतम करणारा; समाप्त करणारा. (२) सर्वांत शेवटचा.

ख़ातिमः (خاتمہ) पु. ('अ.) (१) शेवट; निकाल. (२) अंत; मृत्यू. (३) परिणाम; फळ. **–बिल्-ख़ैर** (بالخیر –) पु. ('अ.) (१) सद्गती; मोक्षप्राप्ती. (२) सकुशल मरणे.

ख़ातिर (خاطر) स्त्री. ('अ.) (१) मनात उत्पन्न होणारा विचार. (२) हृदय; मन. (३) आदर; सन्मान; आतिथ्य. (अव्य.) साठी; करिता. **–आज़ुर्दः** (آزردہ –) वि. ('अ. + फ़ा.) नाराज; दुःखी. **–ख़्वाह** (خواہ –) वि. ('अ. + फ़ा.) अनुरूप; मनाजोगा; मनपसंत; यथेच्छ. **–जम्'अ** (جمع –) स्त्री. ('अ.) समाधान; खात्री. **–तवाज़ो'अ** (تواضع –) स्त्री. ('अ.) आदरसत्कार; आतिथ्य. **–दारी** (داری –) स्त्री. ('अ.+फ़ा.) सन्मान; आदरातिथ्य. **–नशीं** (نشیں –) वि. ('अ.+फ़ा.) अंत:करणात

जाऊन बसणारी (गोष्ट); हृदयंगम. **–में नह लाना** (– میں نہ لانا) दुर्लक्ष करणे.

खातिरन् (خاطراً) अव्य. ('अ.) एखाद्याचे मन राखण्यासाठी; प्रेमाखातर.

खाती (خاطی) वि. ('अ.) जाणूनबुजून चूक किंवा अपराध करणारा.

खातून (خاتون) स्त्री. (तु.) कुलीन स्त्री; बेगम.

खातून-ए-'अरब (خاتون عرب) स्त्री. (तु. + 'अ.) (१) काबा. (२) मुहम्मद साहेबांची कन्या, फातिमा.

खातून-ए-खानः (خاتون خانہ) स्त्री. (तु. + फ़ा.) गृहिणी; धर्मपत्नी.

खातून-ए-जन्नत (خاتون جنت) स्त्री. (तु. + 'अ.) स्वर्गाची राजकन्या; फातिमा.

खातून-ए-फ़लक (خاتون فلک) स्त्री. (तु.+'अ.) सूर्य.

खातून-ए-महफ़िल (خاتون محفل) स्त्री. (तु. + 'अ.) समाजात मोकळेपणाने वागणारी स्त्री; कुलीन स्त्री.

खातून-ए-यग्मा (خاتون یغما) स्त्री. (तु.) सूर्य.

खाद (خاد) स्त्री. (फ़ा.) घार (पक्षी).

खादि'अ (خاضع) वि. ('अ.) विनीत; विनम्र; सुशील.

खादिम (خادم) पु. ('अ.) सेवक; दास; नोकर.

खादिम-उत्-तुलबा (خادم الطلبا) पु. ('अ.) अध्यापक; प्राध्यापक.

खादिम-उल्-खुद्दाम (خادم الخدام) वि. ('अ.) नोकरांचा नोकर; दासानुदास.

खादिमः (خادمہ) स्त्री. ('अ.) दासी; मोलकरीण.

खान (خان) पु. [फ़ा. 'खानः' (خانہ) चे संक्षिप्त.] (१) घर. (२) हॉटेल. (३) धर्मशाळा.

खान (خان) पु. (तु.) (१) अध्यक्ष. (२) अमीर; सरदार. (३) अत्यंत प्रतिष्ठित व्यक्ती. (४) मालक. (५) पठाण.

खान-ए-खानाँ (خانخاناں); **खान-ए-खानान** (خانخانان) पु. (फ़ा.) (१) सरदारांचा सरदार. (२) प्रधानमंत्री. (३) हॉटेलचा मालक.

खानक़ाह (خانقاہ) स्त्री. [फ़ा. 'खानगाह' (خانگاہ) चे अरबी रूप.] फकीर व साधू लोकांचे निवासस्थान; आश्रम; मठ; विहार (मुसलमानी).

खानगी (خانگی) वि. (फ़ा.) (१) घरगुती. (२) वैयक्तिक; खासगी. (स्त्री.) पडद्यात राहून घरगुती पद्धतीने वेश्याव्यवसाय करणारी स्त्री; रखेली.

खानदान (خاندان) पु. (फ़ा.) कूळ; वंश; घराणे.

खानदानी (خاندانی) वि. (फ़ा.) (१) उच्चकुलीन. (२) वंशपरंपरागत. (३) घराण्याशी संबंधित; कौटुंबिक. **–मन्सूबःबंदी** (– منصوبہ بندی) स्त्री. ('अ.+फ़ा.) कुटुंबनियोजन.

खानम (خانم) स्त्री. (तु.) खानाची पत्नी; सरदाराची पत्नी; कुलीन स्त्री.

खानवादः (خانوادہ) पु. (फ़ा.) वंश; कूळ; घराणे.

खानसामाँ (خانساماں); **खानसामान** (خانسامان) पु. (फ़ा.) जेवणाचे पदार्थ तयार करणारा; बबरची; बटलर; स्वयंपाकी; वाढप्या.

खानसालार (خان سالار) पु. (फ़ा.) श्रीमंताच्या घरी स्वयंपाक चाखून पाहाणारा अधिकारी.

खानि'अ (خانع) वि. ('अ.) दुराचारी; दुष्टबुद्धी.

खानिक़ (خانق) वि. (फ़ा.) (१) ज्याचा घसा बसलेला आहे असा. (२) गळा दाबून ठार मारणारा.

खानी (خانی) पु. (फ़ा.) लहान हौद.

खानुमाँ (خانماں) पु. [फ़ा. 'खान-ओ-माँ' (خان و ماں) चे संक्षिप्त.] घरचे सामान; कुटुंब; बिऱ्हाड. **–खराब** (– خراب) वि. (फ़ा.) उध्वस्त; दुर्दैवी.

खानः (خانہ) पु. (फ़ा.) (१) घर; स्थान. (२) कप्पा; खण. (३) रकाना; कोष्टक. (४) भोक; छेद. (५) खुराडे. (६) पत्नी; कुटुंब. **–आबाद** (آباد –) वि. (फ़ा.) भरभराटीत असलेला; एक प्रकारचा शुभाशीर्वाद. **–आबाद दौलत ज़्यादः** (– آباد دولت زیادہ) 'धनधान्याने घर भरलेले राहो'. (एक आशीर्वाद). **–आबादाँ** (– آباداں) वि. (फ़ा.) मागला पुढला विचार न करता बेघडकपणे काम करणारा; परिश्रमी. **–आबादी** (– آبادی) स्त्री. (फ़ा.) गृहस्थी; विवाह. **–कन** (– کن) वि. (फ़ा.) घरदार नष्ट करणारा; कुपुत्र. **–खराब** (– خراب) वि. (फ़ा.) (१) ज्याचे घरदार व सर्वस्व नष्ट झालेले आहे असा; विधूर; दुर्दैवी. (२) उडाणटप्पू; लफंगा; बदचलन. (३) एक प्रकारचा शाप. **–खराबी** (– خرابی) स्त्री. (फ़ा.) घरादाराचा नाश; दुर्दैव. **–जंगी** (– جنگی) स्त्री. (फ़ा.) गृहयुद्ध; यादवी; अंतःकलह. **–ज़ाद** (–زاد) वि. (फ़ा.) (१) घरात जन्मलेला. (२) घरच्या दासीपासून झालेला; दासी पुत्र. **–तलाशी** (–تلاشی) स्त्री. (फ़ा.) घराची झडती. **–दामाद** (– داماد) पु. (फ़ा.) घरजावई. **–दामादी** (– دامادی) स्त्री. (फ़ा.) घरजावईपणा; घरजावई होण्याच्या अटीवर लग्न करणे. **–दार** (– دار) वि. (फ़ा.) गृहस्थ; कुटुंबवत्सल. **–दारी** (– دادی)स्त्री. (फ़ा.) गृहस्थजीवन; घरच्या कटकटी. **–नशीं** (– نشیں) वि. (फ़ा.) (१) संसारिक जीवनातून निवृत्त होऊन एकांतात राहणारा. (२) कामकाज सोडून घरात बसणारा; बेकार. **–पुरी** (– پری) स्त्री. (फ़ा.+हिं.) कोष्टके; अर्जातील मोकळ्या जागा भरणे,

रकाने भरणे; वेठ म्हणून एखादे काम करणे. **-बखानः** (بخانہ –) अव्य. (फ़ा.) घरोघरी. **-बदोश** (بدوش –) वि. (फ़ा.) आपले बिऱ्हाड पाठीवर घेऊन हिंडणारा; भटक्या. **-बरअन्दाज़** (برانداز –) वि. (फ़ा.) घरदार उध्वस्त करणारा. **-बरबादी** (بربادی –) स्त्री. (फ़ा.) घरादाराचा नाश; दुर्भाग्य. **-बाग़** (باغ –) पु. (फ़ा.) घराभोवती बाग; गृहोद्यान. **-शुमार** (شمار –) पु. (फ़ा.) घरांची मोजणी करणारा. **-शुमारी** (شماری –) स्त्री. (फ़ा.) घराची मोजणी; खानेसुमारी. **-साज़** (ساز –) वि. (फ़ा.) घरी बनविलेली (वस्तू). **-सियाह** (سیاہ –) वि. (फ़ा.) (१) दुर्दैवी; अभागी. (२) कृपण. **-सोज़** (سوز –) वि. (फ़ा.) घराला आग लावणारा.

खानः-ए-खुदा (خانۂ خدا) पु. (फ़ा.) ईश्वराचे घर; मशीद.

खानः-ए-खुर्शीद (خانۂ خورشید) पु. (फ़ा.) सिंह राशी.

खानः-ए-चश्म (خانۂ چشم) पु. (फ़ा.) डोळ्यांची खोबण; नेत्ररूपी घर (ज्यात प्रेमिका रहाते).

खानः-ए-तीर (خانۂ تیر) पु. (फ़ा.) मिथुन राशी.

खानः-ए-माही (خانۂ ماهی) पु. (फ़ा.) जलचरांचे घर; पाणी; तलाव.

खाफ़िक़ (خافق) वि. ('अ.) डुलक्या घेणारा; पेंगणारा.

खाफ़िकैन (خافقین) पु. ('अ.) पूर्व व पश्चिम.

खाफ़िद (خافض) वि. ('अ.) खाली आणणारा; पराभूत करणारा; परमेश्वर.

खाफ़िदः (خافضہ) स्त्री. ('अ.) बायकांचे 'लोख' (सुंता) करणारी स्त्री.

खाम (خام) वि. (फ़ा.) (१) कच्चा; अपरिपक्व. (२) असंस्कृत. (३) वाईट; निकृष्ट. (४) अननुभवी. (५) सुती कपडा. **-'अक़्ल** (عقل –) वि. (फ़ा.+'अ.) अपरिपक्व बुद्धीचा; अननुभवी. **-काम** (کام –) वि. (फ़ा.) चुकीचे काम करणारा; अनुभवहीन. **-ख़याली** (خیالی –) स्त्री. (फ़ा. + 'अ.) चुकीची कल्पना; भ्रम. **-चर्म** (چرم –) वि. (फ़ा.) मानवी शरीर. **-तब'अ** (طبع –) वि. (फ़ा.+'अ.) मूर्ख; मंदबुद्धी. **-दस्त** (دست –) वि. (फ़ा.) (१) अननुभवी. (२) उघळघा. **-पारः** (پارہ –) स्त्री. (फ़ा.) छिनाल; व्यभिचारीणी (एक शिवी). **-रीश** (ریش –) वि. (फ़ा.) (१) मूर्ख. (२) विदूषक. **-सामां** (ساماں –) पु. (फ़ा.) कच्चा माल. **-सोज़** (سوز –) वि. (फ़ा.) वरून जळलेला पण आतून कच्चा असलेला पदार्थ.

ख़ामिल (خامل) वि. ('अ.) ज्याची आठवण कोणालाही होत नाही असा; अप्रसिद्ध; तुच्छ.

ख़ामिस (خامس) वि. ('अ.) पाचवा; पंचम.

ख़ामी (خامی) स्त्री. (फ़ा.) (१) कच्चेपणा; अपरिपक्वता. (२) अननुभवीपणा; अनुभवहीनता. (३) उणीव; कमतरता.

ख़ामुशी (خامشی) स्त्री. [फ़ा. 'ख़ामोशी' (خاموشی) चे संक्षिप्त.] मौन; स्तब्धता; शांतता; नीरवता.

ख़ामोश (خاموش) वि. (फ़ा.) (१) गप्प; चूप. (२) मूक. (३) शांत.

ख़ामः (خامہ) पु. (फ़ा.) लेखणी. **-दान** (دان –) पु. (फ़ा.) दौत-टाक ठेवण्याची छोटी पेटी; लाकडी ठाकळा. **-फ़रसा** (فرسا –) वि. (फ़ा.) लेखणी घासणारा; खर्डेघाशी करणारा; लिहिणारा.

ख़ामः-ए-तस्वीर' (خامۂ تصویر) पु. (फ़ा.) कुंचली; ब्रश.

ख़ायः (خایہ) पु. (फ़ा.) (१) अंडे. (२) अंडकोश. **-बरदारी** (برداری –) स्त्री. (फ़ा.) निकृष्ट दर्जाची खुशामत. **-रेज़** (ریز –) पु. (फ़ा.) आमलेट; अंडघाची आंबोळी.

ख़ार (خار) पु. (फ़ा.) (१) काटा; कंटक. (२) खुपणारी गोष्ट. (३) असूया; द्वेष. (४) कोंबडघाची नखी. **-कश** (کش –) पु. (फ़ा.) लाकूड-तोडघा; मोळीविक्या. **-ख़सक** (خسک –) पु. (फ़ा.) सराटा; गोखरू. **-ख़ार** (خار –) वि. (फ़ा.) चिंतीत; उद्विग्न. (पु.) चिंता; काळजी. **-चंग** (چنگ –) पु. (फ़ा.) खेकडा. **-बी** (چیں –) पु. (फ़ा.) शेता-भोवती घातलेले काटेरी कुंपण. **-दार** (دار –) वि. (फ़ा.) काटेरी. **-पुश्त** (پشت –) स्त्री. (फ़ा.) पाठीवर काटे असलेला प्राणी; साळिंदार. **-बंद** (بند –); **-बस्त** (بست –) पु. (फ़ा.) काटेरी कुंपण. **-होना** (ہونا –) सलत राहणे.

ख़ार-ए-'अक़्रब (خار عقرب) पु. (फ़ा.) (१) वृश्चिक राशी (तारे). (२) विंचवाची नांगी. (वि.) अशुभ.

ख़ार-ए-मुग़ीलां (خار مغیلاں) पु. (फ़ा.) बाभळीचा काटा.

ख़ार-ओ-ख़स (خار و خس) पु. (फ़ा.) केरकचरा.

ख़ारिक़ (خارق) वि. ('अ.) फोडणारा; फाडणारा.

ख़ारिक़-ए-'आदात (خارق عادات) वि. पु. ('अ.) (१) स्वभाव मोडणारा. (२) दैवी पुरुषाने केलेला चमत्कार.

ख़ारिज (خارج) वि. ('अ.) (१) बाहेर निघणारा; निघालेला. (२) वगळलेला; वेगळा; अलग. (३) फेटाळून लावलेला; रद्द केलेला. (४) बहिष्कृत. **-अज़ 'अक़्ल** (از عقل –) वि. ('अ. + फ़ा.) (१) बुद्धीला अगम्य. (२) मूर्ख. **-अज़ क़ियास** (از قیاس –) वि. ('अ. + फ़ा.) अनुमानाहून

अधिक; अत्याधिक. **-अज़ बहस़** (ازبحث –) वि. ('अ.+फ़ा.) (१) निर्विवाद (गोष्ट). (२) निरर्थक. **-अज़ आहंग** (ازآهنگ –) वि. ('अ.+फ़ा.) बेसूर. **-अज़ क़िस्मत** (ازقسمت –) पु. ('अ.) भागाकार; भागफल. **-अज़ इस्ति'अमाल** (ازاستعمال –) वि. ('अ.+फ़ा.) वापरातून गेलेला.

ख़ारिज-उल्-बलद (خارج البلد) वि. ('अ.) हद्दपार करण्यात आलेला.

ख़ारिजन् (خارجاً) अव्य. ('अ.) बाहेरून; उडत-उडत; वरवर.

ख़ारिजी (خارجی) वि. ('अ.) (१) बाहेरचा; बाह्य; परराष्ट्रीय. (२) हज़रत अली यांना खलिफा न मानणारा मुस्लिम पंथ. (३) वसतिगृहात न राहाणारा (विद्यार्थी).

ख़ारिजः (خارجہ) वि. ('अ.) (१) बाहेरचा; परराष्ट्रीय. (२) पृथक; वेगळा. (३) पावतीचा दुसरा भाग. **-पालिसी** (پالسی –) स्त्री. ('अ.+इं.) परराष्ट्रीय धोरण. **उमूर-ए-ख़ारिजः** (امور خارجہ) परराष्ट्रीय गोष्टी; समस्या; मुद्दे. **ख़ाविय:-ए-ख़ारिजः** (زاویہ خارجہ) पु. ('अ.) बाह्यकोन.

ख़ारिम (خارم) वि. ('अ.) त्रास देणारा; उपद्रवकारक.

ख़ारिश (خارش); **ख़ारिश्त** (خارشت) स्त्री. (फ़ा.) खाज · खरूज.

ख़ारिशी (خارشی); **ख़ारिश्ती** (خارشتی) वि. (फ़ा.) खरूज झालेला; लूत भरलेला. [म्हण : **ख़ारिशी कुतिया मख़मल की झोल** (خارشی کتیا مخمل کی جھول) कुरूप माणसाने झकपक कपडे घालणे].

ख़ारिस्तान (خارستان) पु. (फ़ा.) काटचांचे जंगल.

ख़ारः (خار); **ख़ारा** (خارا) पु. (फ़ा.) (१) एक प्रकारचा कठीण दगड. (२) सूर्याच्या उन्हात फाटणारे एक प्रकारचे रेशमी कापड. **-शिकन** (شکن –); **-शिगाफ़** (شگاف –) वि. (फ़ा.) दगडाला भोक पाडणारा; फातरफोड; पाषाणभेदी. **-संग** (سنگ –) पु. (फ़ा.) वज्रतुंड दगड.

ख़ाल (خال) पु. ('अ.) (१) शरीरावरील तीळ. (२) मामा. (३) श्रेष्ठत्व. (४) बुद्धी. (५) अहंकार. **-ख़ाल** (خال –) अव्य. ('अ.) कोठेकोठे; क्वचित; एखाद दुसरा; फार थोडा.

ख़ाल-ए-'आरिज़ (خال عارض) पु. ('अ.) गालावरील तीळ.

ख़ालिक़ (خالق) वि. ('अ.) (१) सृष्टिकर्ता; परमेश्वर. (२) उत्पत्तिकर्ता.

ख़ालिक़-ए-कुल (خالق کل) पु. ('अ.) ब्रह्मांडातील प्रत्येक वस्तू निर्माण करणारा; परमेश्वर.

ख़ालिद (خالد) वि. ('अ.) (१) नित्य; अनश्वर. (२) इस्लामचे एक सेनापती. (यांचा कधी पराभव झाला नाही).

ख़ालिय: (خالیہ) वि. ('अ.) (१) प्राचीन; पुरातन. (२) विगत; मागील.

ख़ालिस़ (خالص) वि. ('अ.) शुद्ध; पवित्र; निर्भेळ. (अव्य.) केवळ.

ख़ालिस़-उन्-नस्ल (خالص النسل); **ख़ालिस़-उल्-अस्ल** (خالص الاصل) वि. ('अ.) कुलीन; शुद्ध; घराण्यातील.

ख़ालिस़: (خالصہ) पु. ('अ.) (१) राजाची (सरकारी) खासगी जमीन व संपत्ती. (२) शिखांचा एक पंथ. (वि.) शुद्ध; निर्भेळ.

ख़ाली (خالی) वि. ('अ.) (१) रिकामा; रिता; मोकळा. (२) वृथा; वायां. (३) निरुपयोगी. (४) वापरात नसलेला. (५) बेकार. (६) रहित; वाचून; विहीन. (७) केवळ; फक्त.

ख़ालू (خالو) पु. ('अ.) (१) मावसा; मावशीचा नवरा. (२) मामा. (३) अस्वल.

ख़ाल: (خالہ) स्त्री. ('अ.) मावशी; आईची बहीण. **-ज़ाद** (زاد –) वि. ('अ.+फ़ा.) मावस (भाऊ, बहीण).

ख़ावंद (خاوند) पु. [फ़ा. 'ख़ुदावंद' (خداوند) चे संक्षिप्त.] (१) स्वामी; मालक. (२) पती.

ख़ावंदी (خاوندی) स्त्री. (फ़ा.) (१) स्वामित्व; मालकी. (२) पतित्व. (३) कृपा.

ख़ावर (خاور) पु. (फ़ा.) (१) पूर्व. (२) पश्चिम. (दोन्ही अर्थांनी येतो).

ख़ाश (خاش) स्त्री. (फ़ा.) सासू (पतीची अथवा पत्नीची आई).

ख़ाशि'अ (خاشع) वि. ('अ.) विनम्र; विनीत.

ख़ाशः (خاشہ); **ख़ाशाक** (خاشاک) पु. (फ़ा.) कैरकचरा.

ख़ास़ (خاص) वि. ('अ.) (१) विशेष; प्रमुख. (२) खासगी; स्वत:चा. (३) निखालस; शुद्ध. (४) केवळ. **-कर** (کر –) अव्य. ('अ. + हि.) विशेषत:; मुख्यत: **-ख़वास़** (خواص –) स्त्री. ('अ.) राजाची खास दासी. **-क़लम** (قلم –) पु. ('अ.) खासगी चिटणीस; प्रायव्हेट सेक्रेटरी. **-तराश** (تراش –) पु. ('अ. + फ़ा.) राजाचा न्हावी. **-दान** (دان –) पु. ('अ.+फ़ा.) पानदान; पान (विडा) ठेवण्याचा डबा किंवा तबक. **-नवीस** (نویس –) पु. ('अ. + फ़ा.) खासगी चिटणीस; खासगी पत्रे लिहिणारा; बादशहाला प्रत्येक गोष्टीची माहिती देणारा. **-बरदार** (بردار –) पु. ('अ.+फ़ा.)

सोटा किंवा बंदूक घेऊन आपल्या मालकासमोर चालणारा; भालदार-चोपदार. **-महल** (محل -) पु. ('अ.) खासगी महाल. (स्त्री.) राजाची पहिली पत्नी.

खास-ओ-'आम (خاص و عام) पु. ('अ.) लहान मोठे सर्व लोक; सामान्य जनता.

खासगी (خاصگی) पु. ('अ. + फ़ा.) (१) राजे लोकांच्या जवळ असणारा. (२) खजिनदार. (३) सेनापती. (स्त्री.) (१) जिच्याशी राजा संभोग करतो अशी दासी. (२) कोणतीही सुंदर वस्तू.

खासियत (خاصیت) स्त्री. ('अ.) (१) गुण. (२) धर्म; स्वभाव. (३) वैशिष्ट्य.

खासी (خاصی) वि. स्त्री. ('अ.+हिं.) (१) उत्तम; मध्यम. (२) सरदार लोकांची बंदूक.

खासः (خاصہ) पु. ('अ.) (१) राजे लोकांचे भोजन. (२) एक प्रकारची मलमल. (३) खास घोडा. (वि.) (१) खास. (२) उत्तम. (३) भरपूर. (४) रोगरहित.

खास्सः (خاصہ) पु. ('अ.) विशेष गुण; वैशिष्ट्य; गुणधर्म.

खिंग (خنگ) वि. (फ़ा.) पांढरा; श्वेत. (पु.) (१) पांढरा घोडा. (२) दुराचारी व्यक्ती. **-बुत** (بت -) पु. (फ़ा.) (१) पांढऱ्या दगडाची मूर्ती. (२) स्फटिकाचा पेला. (३) गोरी प्रेमिका. **-मगसी** (مگسی -) पु. (फ़ा.) तांबडे किंवा काळे ठिपके असलेला पांढरा घोडा.

खिजानः (خزانہ) पु. ('अ.) (शु.) खजिना.

खिता (خطا) स्त्री. ('अ.) (शु.) पाहा 'खता'.

खितान (ختان) पु. ('अ.) 'खत्नः' करणे; जननेंद्रियाचे पुढे आलेले कातडे; लिंगाग्र.

खिताब (خطاب) पु. ('अ.) (१) पदवी; किताब. (२) संभाषण; संबोधन. (३) व्याख्यान. **-करना** (کرنا -) (१) बोलणे; संबोधणे. (२) समोर भाषण करणे. **-ओ-'इताब** (و عتاب -) पु. ('अ.) टाकून बोलणे; निर्भर्त्सना करणे.

खिताबत (خطابت) स्त्री. ('अ.) (१) संबोधन. (२) पदवी. (३) व्याख्यान देणे. (४) 'खुतबा' पढणे.

खित्तः (خطہ) पु. ('अ.) (१) प्रदेश; इलाखा. (२) जमिनीचा तुकडा; प्लॉट.

खित्बः (خطبہ) पु. ('अ.) एखाद्या स्त्रीला लग्नासाठी मागणी घालणे; विवाहाची इच्छा.

खिदमत (خدمت) स्त्री. ('अ.) (१) सेवा; चाकरी; नोकरी. (२) शुश्रूषा. (३) कामकाज; कार्यक्रम. (४) जवळ. **-गार** (گار -) पु. ('अ.+फ़ा.) सेवक; चाकर. **-गारी** (گاری -) स्त्री. ('अ.+फ़ा.) नोकरी; परिचर्या. **-गुजार** (گزار -) वि. ('अ.+फ़ा.) आज्ञाधारक; स्वामिनिष्ठ.

खिदमत-ए-खल्क (خدمت خلق) स्त्री. ('अ.) जनसेवा; देशसेवा.

खिदमती (خدمتی) वि. ('अ.) सेवक; नोकर.

खिदमात (خدمات) स्त्री. ['अ. 'खिदमत' (خدمت) चे अनेक.] सेवा; नोकऱ्या.

खिदा'अ (خداع) पु. ('अ.) फसवणूक; कपट.

खिदाज (خداج) पु. ('अ.) (१) हानी; नुकसान. (२) अपूर्णता. (३) दिवस भरण्यापूर्वी बाळंत होणे.

खिदाब (خضاب) पु. (फ़ा.) रंग; केस रंगविण्याचा कलप.

खिदारत (خدارت) स्त्री. ('अ.) स्त्रीने पडद्यात राहणे; पडदानशीन.

खिदेव (خدیو) पु. (तु.) (१) बादशहा. (२) पती. (३) तुर्कांनी इजिप्तच्या राजाला दिलेला किताब.

खिद्र (خضر) पु. ('अ.) (१) एका प्रेषिताचे नाव. (यांनी अमृत प्राशन केल्यामुळे ते अमर आहेत. हे अरण्यात राहतात व वाट चुकलेल्यांना मार्ग दाखवितात); मार्गदर्शक. (२) कास्पियन समुद्र. (३) दीर्घायुषी देवदूत.

गुजार दुं तेरे ग़म में जो 'उम्र-ए-खिद्र मिले।

-सूरत (صورت -) वि. ('अ.) खिज्र साहेबांप्रमाणे दयाळू दिसणारा.

खिद्र-ए-मंजिल (خضر منزل) पु. ('अ.) **खिद्र-ए-राह** (خضر راہ) पु. ('अ. + फ़ा.) मार्गदर्शक; शेवटपर्यंत मार्ग दाखविणारा.

क्या मिला खिद्र से सिकंदर को।
किसको अब रहनुमा करे को'ई॥

खिन्सिर (خنصر) स्त्री. ('अ.) करंगळी; कनिष्ठिका.

खिफ़ा (خفا) पु. ('अ.) (१) खोळ; अभ्रा. (२) लपविणे; दडविणे. (३) रहस्य.

खिफ़्फ़त (خفت) स्त्री. ('अ.) (१) लज्जा; शरम. (२) संकोच. (३) नीचता; हलकटपणा. (४) हलकेपणा. (५) अपमान. (६) उणीव; कमतरता.

खिबा (خبا) पु. ('अ.) तंबू; राहुटी.

खिब्रत (خبرت) स्त्री. ('अ.) (१) परीक्षा; कसोटी. (२) बुद्धिमत्ता; हुशारी. (३) दक्षता; चातुर्य.

खिमार (خمار) स्त्री. ('अ.) ओढणी; दुपट्टा.

खियरः (خیرہ) पु. ['अ. 'खैर' (خیر) चे अनेक.] (१) सज्जन माणसे. (२) कल्याणप्रद गोष्टी.

ख़ियात (خیاط) स्त्री. ('अ.) सुई, दोरा वगैरे.

ख़ियातत (خیاطت) स्त्री. ('अ.) कपडे शिवण्याचे काम; शिपीकाम.

ख़ियानत (خیانت) स्त्री. ('अ.) (१) अफरातफर; अपहरण. (२) अप्रामाणिकपणा.

ख़ियाबाँ (خیابان); **ख़ियाबान** (خیابان) पु. (फ़ा.) (१) उद्यान; बाग. (२) राजमार्ग. (३) दुतर्फा वृक्ष असलेला मार्ग.

ख़ियार (خیار) पु. ('अ.) काकडी; खिरा.

ख़ियू (خیو) पु. (फ़ा.) थुंकी.

ख़िरद (خرد) स्त्री. (फ़ा.) बुद्धी; अक्कल. **–परवर** (– پرور); **–मंद** (– مند); **–वर** (– ور) वि. (फ़ा.) बुद्धिमान; मेधावी. **–मंदी** (– مندی) स्त्री. (फ़ा.) बुद्धिमत्ता; हुशारी.

ख़िराम (خرام) स्त्री. (फ़ा.) (१) चाल; गती; वेग. (२) सावकाश, डुलत डुलत, नाजुकपणे चालणे; हंसगती (प्रत्य.) चालणारा. **सबुक ख़िराम** (سبک خرام) शीघ्रगती.

ख़िरामाँ (خرامان) वि. (फ़ा.) ठुमकत, मुरडत चालणारा. **–ख़िरामाँ** (– خرامان) अव्य. (फ़ा.) हळूहळू; मंदगतीने (चालत).

ख़िर्क़ (خرق) वि. ('अ.) (१) विनोदी; गमत्या. (२) मूर्ख. (३) शूर.

ख़िर्क़: (خرقہ) पु. ('अ.) गोधडी; फाटके कपडे; एखाद्या साधुसंताने वापरलेले जुने कपडे. **–पोश** (– پوش) पु. ('अ.+फ़ा.) फकीर; साधू.

ख़िर्मन (خرمن) पु. (फ़ा.) (१) खळे. (२) धान्याचा ढीग; रास. (३) कोंडा असलेले धान्य; कोंडा न काढलेले धान्य. **–गाह** (– گاہ) स्त्री. (फ़ा.) खळे.

ख़िर्मन-ए-माह (خرمن ماہ) पु. (फ़ा.) चंद्राला पडणारे खळे.

ख़िर्स (خرص) पु. (फ़ा.) (१) अस्वल. (२) बरछी; भाला.

ख़िल'अत (خلعت) स्त्री. ('अ.) सन्मानाचा पोषाख; राजाकडून मिळणारी मानाची वस्त्रे. (ही कमीत कमी तीन असतात).

ख़िल'अत-ए-फ़ाख़िरः (خلعت فاخرہ) स्त्री. ('अ.) सन्मानाचा संपूर्ण पोषाख. (यात सात कपडे, मोत्यांची माळ, रत्नजडित पगडीचा तुरा, तलवार वगैरे वस्तू असतात).

ख़िला'अ (خلاع) स्त्री. [अ. 'ख़िल'अत' (خلعت) चे अनेक.] मानाची वस्त्रे.

ख़िलाफ़ (خلاف) वि. ('अ.) विरुद्ध; उलट; प्रतिकूल. (पु.) शत्रू. **–गो'ई** (– گوئی); **–बयानी** (– بیانی) स्त्री. ('अ.) खोटे बोलणे; असत्य भाषण. **–वर्ज़ी** (– ورزی) स्त्री. ('अ.+फ़ा.) उल्लंघन; अवज्ञा; आज्ञाभंग.

ख़िलाफ़-ए-उम्मीद (خلاف امید) वि. ('अ. + फ़ा.) आशा नसलेला; अनपेक्षित; आशेहून अधिक; आशातीत.

ख़िलाफ़-ए-क़ा'इदः (خلاف قاعدہ) वि. ('अ.) नियमाविरुद्ध; कायद्याविरुद्ध; बेकायदेशीर.

ख़िलाफ़-ए-दाबितः (خلاف ضابطہ); **ख़िलाफ़-ए-क़ानून** (خلاف قانون) वि. ('अ.) बेकायदेशीर; अवैध.

ख़िलाफ़-ए-क़ियास (خلاف قیاس) वि. ('अ.) अचिन्त्य; अतर्क्य.

ख़िलाफ़-ए-तवक़्क़ो'अ (خلاف توقع) वि. ('अ.) अनपेक्षित; आशातीत.

ख़िलाफ़-ए-दस्तूर (خلاف دستور) वि. ('अ. + फ़ा.) परंपरेविरुद्ध; नियमाविरुद्ध.

ख़िलाफ़-ए-मर्ज़ी (خلاف مرضی) वि. ('अ.) इच्छेविरुद्ध.

ख़िलाफ़-ए-मिज़ाज (خلاف مزاج) वि. ('अ.) स्वभावाविरुद्ध; इच्छेविरुद्ध.

ख़िलाफ़-ए-मौक़ू'अ (خلاف موضوع) वि. ('अ.) विषयांतर केलेला; अप्रासंगिक.

ख़िलाफ़-ए-वज़'अ (خلاف وضع) वि. ('अ.) परंपरेविरुद्ध.

ख़िलाफ़-ए-वज़'अ-ए-फ़ित्री (خلاف وضع فطری) पु. ('अ.) अनैसर्गिक मैथुन. (स्त्री खेरीज इतरांशी केलेला संभोग).

ख़िलाफ़-ए-शान (خلاف شان) वि. ('अ.) आपल्या प्रतिष्ठेच्या विरुद्ध; मर्यादेच्या विरुद्ध.

ख़िलाफ़त (خلافت) स्त्री. ('अ.) (१) प्रतिनिधित्व. (२) मुहम्मद साहेबांनंतर त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खलिफांचे पद अथवा स्थान; खलिफांची राजवट. (३) वारसा. (४) सर्व मुस्लिम बादशहांवर असणारी खलिफांची सत्ता.

ख़िलाफ़त-ए-राशिदः (خلافت راشدہ) स्त्री. ('अ.) मुहम्मद साहेबांनंतर आलेल्या चार खलिफांची कारकीर्द व राजवट.

ख़िलाब (خلاب) स्त्री. ('अ.) चिखल; राड.

ख़िलाल (خلال) पु. ('अ.) (१) मध्यभाग; मधील अंतर. (२) मैत्री. (३) दात कोरणे. (४) पत्त्याच्या खेळातील पराभव.

ख़िलाश (خلاش) पु. ('अ.) रस्त्यातील चिखल.

ख़िलास (خلاص) पु. ('अ.) (१) शुद्ध चांदी व सोने. (२) खरे प्रेम. (वि.) निर्भेळ; श्रेष्ठ; उत्तम.

खिल्क़त (خلقت) स्त्री. ('अ.) (१) उत्पत्ती; सृष्टी. (२) जनता; लोक.

खिल्क़ी (خلقی) वि. ('अ.) (१) जन्मसिद्ध. (२) नैसर्गिक.

खिल्त् (خلط) स्त्री. ('अ.) (१) शरीरातील वात, पित्त, कफ आणि रक्त या चार धातूंपैकी एक. (यूनानी). (२) मिश्रण; भेसळ. **–मिल्त्** (ملط –) वि. ('अ.+फ़ा.) मिसळलेला; मिश्रित; भेसळ.

खिल्त्-ए-फ़ासिद (خلط فاسد) स्त्री. ('अ.) दूषित, प्रकुपित धातू (वात, पित्त वगैरे).

खिल्त्-ए-सालेह् (خلط صالح) स्त्री. ('अ.) शुद्ध, अविकारी धातू (त्रिदोष).

खिल्तः (خلطہ) पु. ('अ.) मिश्रण. (स्त्री.) पुरुषांत मिसळणारी स्त्री.

खिल्म (خلم) पु. ('अ.) मित्र; सखा..

खिश्त (خشت) स्त्री. (फ़ा.) वीट.

खिश्तक (خشتک) पु. (फ़ा.) (१) सदऱ्याच्या किंवा अन्य कपडचाच्या कांखेत लावली जाणारी चौकोनी कापडी पट्टी. (२) दोन मांडयांमधील गुह्यभाग झाकणारी विजारीची चौकोनी जोडलेली पट्टी; खिस्तक. [ही पट्टी विटेच्या (लांबट चौकोनी) आकाराची असते, त्यावरून हा शब्द बनला असावा].

खिश्तबारी (خشتباری) स्त्री. (फ़ा.) विटा फेकणे; विटांचा मारा.

खिश्म (خشم) पु. (फ़ा.) क्रोध; कोप.

खिसांदः (خساندہ) पु. (फ़ा.) पाण्यात भिजत घालून (न उकळता) घ्यावयाचे औषध. [उकळून घ्यावयाच्या औषधाला 'जोशांदा' (काढा) असे म्हणतात].

खिसाम (خصام) पु. ['अ. 'खस्म' (خصم) चे अनेक.] (१) भांडणारे लोक. (२) योद्धे. (३) युद्ध करणे.

खिसाल (خصال) पु. स्त्री. ['अ. 'खस्लत' (خصلت) चे अनेक.] सवयी; स्वभाव; गुणधर्म.

खिस्ब (خصب) पु. ('अ.) वैभव; समृद्धी; बाहुल्य. (गवताचे व भाजीपाल्याचे).

खिस्सत (خست) स्त्री. ('अ.) कृपणता. **–मआब** (مآب –) वि. ('अ.) कृपण; चिक्कू.

खी (خی); **खीक** (خیک); **खीग** (خیگ) स्त्री. (फ़ा.) पाणी भरण्याची पखाल.

खीफ़ः (خیفہ) पु. ('अ.) भीती; भय.

खीम (خیم) स्त्री. ('अ.) स्वभाव; प्रकृती; सवय.

खीरगी (خیرگی) स्त्री. (फ़ा.) (१) अंधार; काळोख. (२) डोळे दिपणे. (३) आश्चर्य. (४) धृष्टता; अगाऊपणा. (५) निर्लज्जता.

खीरः (خیرہ) वि. (फ़ा.) (१) धृष्ट; फाजील; अगाऊ. (२) निर्लज्ज. (३) डोळे दिपलेला. (४) काळोखी (५) आश्चर्यचकित; थक्क. (६) सुन्न; बधिर (७) निष्कारण. **–कुश** (کش –) वि. (फ़ा.) अकारण हत्या करणारा; निर्दय. **–चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) निर्लज्ज. **–बातिन** (باطن –) वि. (फ़ा.+'अ.) पापी अंतःकरणाचा. **–सर** (سر –) वि. (फ़ा.) (१) उद्धट; बंडखोर; स्वच्छंदी. (२) लोभी.

खीस (خیس) वि. (फ़ा.) ओला; भिजलेला.

खुंक (خنک) वि. (फ़ा.) थंड; गार.

खुंदगार (خندگار) पु. [फ़ा. 'खुदावंदगार' (خداوندگار) चे संक्षिप्त.] सम्राट; बादशहा; शासक. ['खवांदगार' (خواندگار) चे संक्षिप्त.] शिक्षक; अध्यापक.

खुंबक (خنبک) पु. (फ़ा.) (१) आरडाओरडा; कोलाहल; नगाऱ्याचा आवाज. (२) टाळी; ताल. (३) फकिरांचा जाडाभरडा कपडा.

खुजस्तः (خجستہ) वि. (फ़ा.) शुभ; कल्याणकारक.

खुतूत (خطوط) पु. ['अ. 'खत' (خط) चे अनेक.] (१) पत्रे; चिठ्ठया. (२) रेघा; रेषा.

खुतून (ختون) पु. ('अ.) जावई बनणे; विवाह करणे.

खुत्क (ختک); **खुत्का** (ختکا) पु. ('अ. + हिं.) (१) सोटा; दंडा. (२) आंगठा.

खुत्बः (خطبہ) पु. ('अ.) (१) ईश्वराची स्तुती; पैगंबराचा संदेश वगैरे गोष्टींनी युक्त असलेले प्रवचन (नमाजानंतरचे). (२) प्रशंसा; स्तुती. (३) धर्मोपदेश. (४) व्याख्यान; लेक्चर. (५) राजासाठी केलेली प्रार्थना व तो गादीवर आल्याची घोषणा. (६) पुस्तकाची प्रस्तावना.

खुद (خود) अव्य. (फ़ा.) स्वतः; खुद्द; जातीने. **–अंदोख्तः** (اندوختہ –) वि. (फ़ा.) स्वकष्टार्जित (धन वगैरे). **–आरा** (آرا –) वि. (फ़ा.) स्वतःला सजविणारा; आत्मप्रदर्शन करणारा. **–आरा'ई** (آرائی –) स्त्री. (फ़ा.) स्वतःची सजावट; शृंगार. **–इख्तियारी** (اختیاری –) स्त्री. (फ़ा. + 'अ.) आत्मशासन; स्वायत्तता. **–इत्मीनानी** (اطمینانی –) स्त्री. (फ़ा.+ 'अ.) आत्मसंतोष. **–इन्तज़ामी** (انتظامی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) स्वयंशासन; स्वातंत्र्य. **–ए'अतिमादी** (اعتمادی –) स्त्री. (फ़ा. + 'अ.) आत्मविश्वास. **–कफ़ालत** (کفالت –) स्त्री. (फ़ा.+'अ.) स्वावलंबन; आत्मनिर्भरता. **–कर्दः** (کردہ –) वि. (फ़ा.) स्वतः केलेले; स्वनिर्मित. **–काम** (کام –) वि. (फ़ा.) (१) स्वार्थी; मतलबी. (२) निरंकुश; स्वच्छंद. **–काश्त** (کاشت –) वि. (फ़ा.) स्वतः केलेली (शेती); खुद्द कसत असलेली. **–कुशी** (کشی –) स्त्री. (फ़ा.) आत्महत्या. **–गरज़** (غرض –) वि. (फ़ा. + 'अ.)

स्वार्थी; आपमतलबी. **–ग़रज़ी** (غرضی –) स्त्री. (फ़ा. + 'अ.) स्वार्थ. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) स्वाभिमानी. **–नविश्त** (نوشت –) वि. स्वलिखित. **–नुमा** (نما –) वि. (फ़ा.) आत्मप्रदर्शन करणारा; भपकेबाज; घमेंडखोर. **–नुमा'ई** (نمائی –) स्त्री. (फ़ा.) आत्मप्रदर्शन; भपका; घमेंड. **–परस्त** (پرست –) वि. (फ़ा.) आत्मपूजक; अहंकारी; अहंप्रेमी; स्वार्थी. **–परस्ती** (پرستی –) स्त्री. (फ़ा.) आत्मपूजा; अहंकार; स्वार्थ. **–पसंद** (پسند –) वि. (फ़ा.) आत्मप्रेमी; अहंकारी; स्वतःला उत्कृष्ट व श्रेष्ठ समजणारा. **–फ़रामोश** (فراموش –) वि. (फ़ा.) स्वतःचाही विसर पडलेला; आत्मविस्मृती; तन्मय. **–फ़रेबी** (فریبی –) स्त्री. (फ़ा.) आत्मवंचना. **–फ़रोश** (فروش –) वि. (फ़ा.) स्वार्थासाठी स्वतःला विकणारा; राष्ट्रद्रोही. **–ब ख़ुद** (بخود –) अव्य. (फ़ा.) आपोआप; स्वतः; स्वाभाविक. **–ब दौलत** (بدولت –) अव्य. (फ़ा.) आपण स्वतः; महाराज; हुजूर. **–बीं** (بیں –) वि. (फ़ा.) अहंकारी; इतरांपेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजणारा. **–बीनी** (بینی –) स्त्री. (फ़ा.) अहंकार; घमेंड. **–मुख़्तार** (مختار –) वि. (फ़ा. + 'अ.) (१) स्वतंत्र. (२) स्वैर; निरंकुश. **–मुख़्तारी** (مختاری –) स्त्री. (फ़ा. + 'अ.) (१) स्वातंत्र्य. (२) स्वच्छंदता. **–रफ़्तः** (رفتہ –) वि. (फ़ा.) स्वतःची शुद्ध नसलेला; बेशुद्ध. **–रा'ई** (رائی –) स्त्री. (फ़ा. + 'अ.) स्वतःच्या मताप्रमाणे वागणे; स्वच्छंदता. **–राय** (رائے –) वि. (फ़ा. + 'अ.) स्वच्छंदी; स्वेच्छाचारी. **–रौ** (رو –) वि. (फ़ा.) आपोआप उगवलेला. **–शनास** (شناس –) वि. (फ़ा.) स्वतःचे गुणदोष ओळखणारा. **–शिकन** (شکن –) (फ़ा.) विनीत; विनम्र. **–सना** (ثنا –) पाहा 'खुदसिता'. **–सर** (سر –) वि. (फ़ा.) उद्धट; उर्मट; बंडखोर. **–साख़्तः** (ساختہ –) वि. (फ़ा.) (१) आत्मनिर्मित. (२) कपोलकल्पित. **–सिता** (ستا –) वि. (फ़ा.) आत्मश्लाघा करणारा. **–सिता'ई** (ستائی –) स्त्री. (फ़ा.) आत्मश्लाघा; आत्मस्तुती.

ख़ुद'अः (خدعہ) वि. ('अ.) लोकांकडून फसविला जाणारा.

ख़ुदा (خدا) पु. (फ़ा.) ईश्वर; परमात्मा; अल्लाह. **–'ई** (ئی –) स्त्री. (फ़ा.) (१) सृष्टी; जग. (२) ईश्वरत्व. (वि.) दैवी; ईश्वरी. **–'ई ख़्वार** (ئی خوار –) वि. (फ़ा.) उडाणटप्पू; मवाली. [म्हण : **ख़ुदा'ई ख़्वार गधे सवार** (خدائی خوار گدھے سوار) स्त्री. (फ़ा. + हिं.) दुर्दशाग्रस्त; उडाणटप्पू.] **–'ई रात** (ئی رات –) स्त्री. (फ़ा. + हिं.) जागर; रात्रभर जागून ईशस्मरण करणे व गोरगरिबांना देण्यासाठी प्रसाद तयार करणे. (मुस्लिम स्त्रियांचे एक व्रत. संकटाच्या वेळी देवाला नवस करून तो अशा प्रकारे त्या पूर्ण करतात). **–का घर** (کا گھر –) पु. (फ़ा. + हिं.) (१) स्वर्ग. (२) मंदीर; मशीद; चर्च. **–ख़ुदा करके** (خدا کرکے –) (फ़ा. + हिं.) मोठ्या कष्टाने; कसेबसे. **–तरस** (ترس –) वि. (फ़ा.) (१) देवभीरू. (२) दयाळू. **–ए-त'आलाँ** (تعالیٰ –) पु. (फ़ा. + 'अ.) परमेश्वर. **–दाद** (داد –) वि. (फ़ा.) ईश्वरदत्त; स्वाभाविक. **–नख़्वास्तः** (نخواستہ –); **–ना कर्दः** (ناکردہ –); **–ना ख़्वास्तः** (ناخواستہ –) अव्य. (फ़ा.) असे न होवो; ईश्वर असे न करो; असे झाले तर. **–ना तरस** (ناترس –) वि. (फ़ा.) देवाला न भिणारा; निर्दय. **–परस्त** (پرست –) वि. (फ़ा.) (१) ईश्वरपूजक; देवभक्त; आस्तिक. (२) सत्यनिष्ठ; धर्मनिष्ठ. (पु.) मुनी; ऋषी. **–परस्ती** (پرستی –) स्त्री. (फ़ा.) धर्मनिष्ठा; आस्तिकता; देवभक्ती. **–यगाँ** (یگاں –) पु. (फ़ा.) (१) स्वामी; मालक. (२) राजा; बादशहा. **–या** (یا –) अव्य. (फ़ा.) हे ईश्वरा! अरे देवा! **–रा** (را –) अव्य. (फ़ा.) ईश्वरासाठी; कृपा करून. **–लगती** (لگتی –) वि. (फ़ा. + हिं.) खरी; सत्य. (न्यायपूर्ण गोष्ट). **–वंद** (وند –); **–वंदगार** (وندگار –) पु. (फ़ा.) (१) ईश्वर. (२) स्वामी; मालक. **–वंदा** (وندا –) अव्य. (फ़ा.) हे ईश्वरा! **–वंदी** (وندی –) स्त्री. (फ़ा.) ईश्वरत्व. **–शनास** (شناس –) वि. (फ़ा.) (१) ईश्वराला जाणणारा; ब्रह्मज्ञानी. (२) न्यायी. **–साज़** (ساز –) वि. (फ़ा.) ईश्वरनिर्मित. **–हाफ़िज़** (حافظ –) वा (फ़ा. + 'अ.) ईश्वर तुमचे रक्षण करो. (निरोप देतं, घेते वेळी उच्चारावयाचे वाक्य).

ख़ुदारः (خضارہ) पु. ('अ.) नदी.

ख़ुदी (خودی) स्त्री. (फ़ा.) (१) स्वत्व; अस्मिता. (२) अहंकार; अहम्; गर्व. (३) स्वार्थ.

न. होती गर ख़ुदी हम में तो जो तू था वही हम थे।
यह पर्दः किस लि'ए डाला है यारब दरमियाँ तू ने॥

ख़ुदू'अ (خضوع) पु. ('अ.) नम्रता; शालीनता.

ख़ुदूक (خدوک) पु. (फ़ा.) (१) क्रोध. (२) लज्जा. (३) उद्विग्नता. (४) ईर्ष्या.

ख़ुद्दाम (خدام) पु. ['अ. 'ख़ादिम' (خادم) चे अनेक.] नोकरचाकर.

ख़ुद्री (خضری) पु. ('अ.) भाजी विकणारा.

ख़ुनक (خنک) वि. (फ़ा.) थंड; शीतल.

ख़ुनकी (خنکی) स्त्री. (फ़ा.) (१) थंडी; शीतलता. (२) हिवाळा.

ख़ुनू'अ (خنوع) पु. ('अ.) (१) विनम्रता. (२) लाचारी.

ख़ुनूस (خنوس) पु. ('अ.) मागे राहणे; एखाद्या वस्तूच्या मागे दडणे.

ख़ुन्ना (خنا) स्त्री. ('अ.) (१) असभ्य, अश्लील भाषण. (२) (बा.) मूर्ख पुरुष; चिडखोर स्त्री.

ख़ुन्नाक़ (خناق) पु. ('अ.) घटसर्प (रोग).

ख़ुन्नास (خناس) पु. ('अ.) सैतान; राक्षस. (वि.) दुष्ट; हरामखोर.

ख़ुन्या (خنیا) पु. ('अ.) (फ़ा.) (१) संगीत; गायन. (२) वाद्य. **–गर** (گر –) पु. (फ़ा.) (१) गायक; गवई. (२) वादक.

ख़ुन्सॉ (خنثیٰ) पु. ('अ.) हिजडा; नपुसक; शिखंडी (स्त्री व पुरुष दोन्ही असणारा)..

ख़ुफ़ियः (خفیہ) वि. ('अ.) लपलेला; गुप्त. **–नवीस** (نویس –) पु. ('अ.+फ़ा.) गुप्त बातम्या लिहिणारा; गुप्तचर; गुप्त पोलीस.

ख़ुफ़्तः (خفتہ) वि. [फ़ा. 'ख़ुफ़्तन' (خفتن) झोपणे पासून.] झोपलेला; निद्रित. [अनेक 'ख़ुफ़्तगान' (خفتگان).] (१) झोपलेले. (२) मेलेले. **–नसीब** (نصیب –) वि. (फ़ा. + 'अ.) **–बख़्त** (بخت –) वि. (फ़ा.) ज्याचे भाग्य झोपलेले आहे असा; हतभागी.

ख़ुफ़्फ़ (خف) पु. ('अ.) (१) मोजा. (२) तळवा.

ख़ुफ़्फ़ाश (خفاش) पु. ('अ.) वटवाघुळ.

ख़ुबस़ (خبث) वि. ('अ.) (१) अपवित्र. (२) मलिन; गलिच्छ.

ख़ुब्स़ (خبث) पु. ('अ.) घाण; मळ. **–उल्-हदीद** (الحدید –) पु. ('अ.) लोखंडाचा मळ; गंज.

ख़ुब्स़-ए-नफ़्स (خبث نفس); **ख़ुब्स़-ए-बातिऩ** (خبث باطن) पु. ('अ.) आत्म्याची मलिनता; अंतःकरणाचे मालिन्य; पाप.

ख़ुम (خم) पु. (फ़ा.) (१) घागर; घडा; हंडा. (२) दारूचे मडके; मद्याचे पिंप.

ख़ुम के ख़ुम पी जाऊंगा मैं ऐसा बादः नोश हूं ।

ख़ुम-ए-अफ़लातून (خم افلاطون) पु. (फ़ा. + 'अ.) अफलातून (प्लेटो) चा रांजण. (मरताना तो या रांजणात बसला, त्यानंतर त्याचे शव रांजणासह डोंगराच्या गुहेत ठेवण्यात आले.)

ख़ुम-ए-'ईसॉ (خم عیسیٰ) पु. (फ़ा. + 'अ.) येशू ख्रिस्ताचा हंडा. (यात कोणत्याही रंगाचा कपडा टाकला तरी येशूच्या करामतीने तो पांढरा किंवा काळा बनून बाहेर येई).

ख़ुम-ए-मय (خم مے) पु. (फ़ा.) दारूची घागर; मद्यपात्र. **–कदः** (کدہ –); **–ख़ानः** (خانہ –) पु. (फ़ा.) मद्यपानगृह; दारूचा गुत्ता. **–कश** (کش –) वि. (फ़ा.) घागरभर दारू पिणारा; दारुडा.

ख़ुमरः (خمرہ) पु. ('अ.) (१) लहान चटई. (नमाजाच्या वेळी हिच्यावर गुडघे टेकतात). (२) चटई बनविणारे लोक. (३) एक प्रकारचे मुसलमान फकीर. (४) मुसलमान पाणक्या.

ख़ुमार (خمار) पु. ('अ.) (१) कैफ; नशा; मद; धुंदी. (२) नशा उतरण्याची अवस्था. (यावेळी किंचित डोके दुखते व हातपाय वळून येतात). (३) जागरणामुळे येणारा थकवा.

आंखों ने मय-ए-ह़ुस्न पिला'ई थी एक रोज ।
अंगड़ाइयां लेता हूं अभी तक ख़ुमार में ॥

–आलूद (آلود –); **–आलूदः** (آلودہ –) वि. (फ़ा.) धुंद; नशा चढलेला; कैफात असलेला; मादक. (प्रेयसीच्या नेत्रांना उद्देशून हा शब्द वापरला जातो).

ख़ुमारआलूदः नज़रें तीरसी दिल में उतरती हैं ।

ख़ुमासी (خماسی) पु. ('अ.) पाच अक्षरे असलेला अरबी शब्द.

ख़ुमूद (خمود) पु. ('अ.) (१) विस्तव विझणे. (२) बेशुद्ध होणे. (३) झोपणे.

ख़ुमूल (خمول) पु. ('अ.) अज्ञातवास.

ख़ुर (خور) पु. (फ़ा.) (१) सूर्य. (२) भोजन; खाणे; आहार.

ख़ुरजी (خرجی) स्त्री. (फ़ा.) (१) थैला; मोठी पिशवी. (२) खोगीर. (३) घोडयाच्या पाठीवरील गोणी.

ख़ुरदाद (خورداد); **ख़ुर्दाद** (خرداد) पु. (फ़ा.) एक इराणी (सौर) महिना. (हा ज्येष्ठ-आषाढाच्या सुमारास येतो).

ख़ुरशीद (خورشید) पु. (फ़ा.) सूर्य.

ख़ुराक (خوراک) स्त्री. (फ़ा.) (१) भोजन. (२) खाद्य वस्तू. (३) खाण्याचे (औषधाचे) प्रमाण; मात्रा. (४) चंदी.

ख़ुराज (خراج) पु. ('अ.) फोड; जखम.

ख़ुराफ़त (خرافت) स्त्री. ('अ.) बडबड; वटवट; वाह्यात बोलणे.

ख़ुराफ़ात (خرافات) स्त्री. [अ. 'ख़ुराफ़त' (خرافت) चे अनेक.] बरळणे; बडबडी; कटकटी; भानगडी.

ख़ुरासान (خراسان) पु. (फ़ा.) इराणचा एक प्रांत. (शब्दशः अर्थ 'पूर्व' असा आहे. हा प्रांत पूर्वेस असल्यामुळे त्याला हे नाव पडले).

ख़ुरासानी (خراسانی) वि. (फ़ा.) खुरासानशी संबंधित; खुरासानचा रहिवासी. **–अजवायन** (اجوائن –) स्त्री. (फ़ा. + हिं.) काळा ओवा; खुरसानी ओवा.

ख़ुरूज (خروج) पु. ('अ.) (१) बाहेर पडणे; उसळी मारणे. (२) बंड करणे.

ख़ुरूस (خروس) पु. (फ़ा.) कोंबडा.

ख़ुरोश (خروش) पु. (फ़ा.) कोलाहल; गोंधळ; आरंडाओरडा.

ख़ुर्जी (خورجین) पु. (फ़ा.) (१) गोणी. (२) कातडी थैली.

ख़ुर्तूम (خرطوم) पु. ('अ.) (१) हत्तीची सोंड. (२) जमातीचा पुढारी.

ख़ुर्द (خرد) वि. (फ़ा.) (१) लहान; लघु. (२) क्षुद्र. (३) ह्रस्व. (४) किरकोळ. **–बीं** (بیں –) वि. (फ़ा.) बारीक वस्तु, गोष्टी पाहाणारा. **–बीन** (بین –) स्त्री. (फ़ा.) सूक्ष्मदर्शक यंत्र. **–साल** (سال –) वि. (फ़ा.) अल्पवयी; लहान.

ख़ुर्द (خورد) क्रि. (फ़ा.) खाल्ले.

ख़ुर्दबुर्द (خورد برد) वि. (फ़ा.) खाल्लेले; अपहरण केलेले (धन). (पु.) (१) अपव्यय; उधळपट्टी. (२) अपहार.

ख़ुर्दी (خردی) स्त्री. (फ़ा.) लहानपणा; लघुत्व.

ख़ुर्दः (خوردہ) वि. [फ़ा. 'ख़ुर्दः अस्त' (خوردہ است) खाल्ले आहे चे संक्षिप्त.] खाल्लेले. सामा. शब्दांच्या शेवटी हा शब्द वापरला जातो. [उदा. 'ज़ख़्मख़ुर्दः' (زخم خوردہ) घाव खाल्लेला; घायाळ].

ख़ुर्दः (خردہ) पु. (फ़ा.) (१) तुकडा; खंड. (२) मोड; चिल्लर. (३) फुटकळ; किरकोळ वस्तू. (४) दोष; उणीव. **–कार** (کار –) वि. (फ़ा:) सूक्ष्म कामाची आवड असलेला; अवघड काम सहज करणारा. **–गीर** (گیر –) वि. (फ़ा.) छिद्रान्वेषी. **–फ़रोश** (فروش –) वि. (फ़ा.) किरकोळ विक्रेता. **–बीं** (بیں –) वि. (फ़ा.) दोष शोधणारा; छिद्रान्वेषी.

ख़ुर्मा (خرما) पु. (फ़ा.) (१) खारीक. (२) खजूर.

ख़ुर्रम (خرم) वि. (फ़ा.) प्रसन्न; आनंदित.

ख़ुर्रमी (خرمی) स्त्री. (फ़ा.) प्रसन्नता; हर्ष; आनंद.

ख़ुर्सन्द (خرسند) वि. (फ़ा.) प्रसन्न; खूष.

ख़ुर्सन्दी (خرسندی) स्त्री. (फ़ा.) खुषी; आनंद.

ख़ुल (خل) पु. ('अ.) मित्र; सखा.

ख़ुलफ़ा (خلفا) पु. ['अ. 'ख़लीफ़:' (خلیفہ) चे अनेक.] (१) खलिफे; प्रतिनिधी; बदली काम करणारे. (२) मुस्लिम सत्ताधारी.

ख़ुला'अ (خلع) पु. ('अ.) नवऱ्याला काही मोबदला (पैशाच्या किंवा मालाच्या रूपाने) देऊन त्याच्याकडून बायकोने घटस्फोट मिळविणे.

ख़ुलासः (خلاصہ) पु. ('अ.) (१) सार; संक्षेप. (२) सारांश. (३) परिणाम; निकाल. (वि.) निवडक; वेचक.

ख़ुलूब (خلوب) पु. ('अ.) (१) रिक्त; रिकामे होणे. (२) रिक्तता; अवकाश; पोकळी.

ख़ुलूद (خلود) पु. ('अ:) स्थायित्व; नित्यता.

ख़ुलूस़ (خلوص) पु. ('अ.) (१) सरळपणा; निष्कपटता. (२) सत्यता; सच्चाई. (३) निष्ठा; पावित्र्य.

ख़ुल्क़ (خلق) पु. ('अ.) (१) सौजन्य; शालीनता; सदाचार. (२) स्वभाव; सवय.

ख़ुल्क़ान (خلقان) पु. ('अ.) जुने कपडे. (वि.) जनाट.

ख़ुल्त (خلت) पु. ('अ.) सुस्वभाव; सत्प्रवृत्ती

ख़ुल्तः (خلطہ) पु. ('अ.) (१) भागीदारी; वाटा; हिस्सा. (२) मैत्री; सहकार्य

ख़ुल्द (خلد) पु. ('अ.) (१) स्वर्ग. (२) नित्यता. (स्त्री.) चिचुंद्री; घूस. **–आशयां** (آشیاں –); **–नशीं** (نشیں –) वि. ('अ. + फ़ा.) **–मकां** (مکاں –) वि. ('अ.) स्वर्गवासी; दिवंगत.

ख़ुल्द-ए-बरीं (خلدبریں) पु. ('अ. + फ़ा.) सर्वोत्तम वरचा; सातवा स्वर्ग.

ख़ुल्फ़ (خلف) पु. ('अ.) वचनभंग; प्रतिज्ञाभंग.

ख़ुल्लत (خلت) स्त्री. ('अ.) मैत्री; दोस्ती.

ख़ुल्लान (خلان) पु. ['अ. 'ख़लील' (خلیل) चे अनेक.] मित्रमंडळी.

ख़ुश (خوش) वि. (फ़ा.) (१) प्रसन्न; आनंदी; खूष; संतुष्ट. (२) उत्तम; चांगला. (३) शुभ. (४) सुंदर. (५) पवित्र. (६) श्रेष्ठ. (७) हिरवागार; प्रफुल्लित. **–अंजाम** (انجام –) वि. (फ़ा.) शुभ; परिणामी. **–अख़्त** (اختر –) वि. (फ़ा.) भाग्यवान. **–अख़्लाक़** (اخلاق –) वि. (फ़ा.+'अ.) सुशील; सौजन्यशील; विनम्र; सुस्वभावी. **–अख़्लाक़ी** (اخلاق –) स्त्री. (फ़ा.+'अ.) सौजन्य; सुस्वभाव. **–अत्वार** (اطوار –) वि. (फ़ा.+'अ.) सदाचारी; सच्छील. **–अदा** (ادا –) वि. (फ़ा.) ज्याचे हावभाव चांगले आहेत; ज्याची वर्णनशैली चांगली आहे असा. **–'अमल** (عمل –) वि. (फ़ा.+'अ.) सदाचरणी. **–असलूब** (اسلوب –) पाहा 'ख़ुश उस्लूब' **–आब** (آب –) वि. (फ़ा.) चमकदार; चकचकीत. **–आमदीद** (آمدید –) अव्य. (फ़ा.) सुस्वागतम. आपले आगमन शुभ होवो. (आमदीद = ते सर्व आले). **–अ'अमाल** (اعمال –) वि. (फ़ा.+'अ.) सदाचारी; सत्कृत्य करणारा. **–आयंद** (آیند –) वि. (फ़ा.) ज्याचे भविष्य उज्वल आहे असा; उत्कृष्ट. **–इंतिज़ाम** (انتظام –) वि. (फ़ा.+'अ.) व्यवस्था; कुशल. **–इक़बाल** (اقبال –) वि. (फ़ा.+'अ.) भाग्यवान. **–इक़बाली** (اقبالی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) सद्भाग्य. **–'इयार** (عیار –)

वि. (फ़ा. + 'अ.) चोख; बावनकशी (सोने). **–इल्हान** (الحان–) वि. (फ़ा.+'अ.) मधुर कंठ असलेला; गोड गळ्याचा. **–उस्लूब** (اُسلوب –) वि. (फ़ा.+'अ.) (१) चांगली वर्तणूक असलेला; शिष्टाचार पाळणारा. (२) सुरेख; देखणा. **–उस्लूबी** (اسلوبی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) शिष्टाचार; चांगली वर्तणूक. **–औक़ात** (اوقات –) वि. (फ़ा.+'अ.) आपला वेळ चांगल्या कामात घालविणारा; वेळच्या वेळी काम करणारा. **–क़दम** (قدم –) वि. (फ़ा. + 'अ.) चांगल्या पायाचा; शुभ. **–क़लम** (قلم –) वि. (फ़ा.+'अ.) चांगले अक्षर काढणारा; सुलेखक. (पु.) गुळगुळीत व उत्कृष्ट कागद. **–कलाम** (کلام –) वि. (फ़ा.+'अ.) मधुरभाषी. **–क़ामत** (قامت –) वि. (फ़ा. + 'अ.) रेखीव; सुडौल शरीराचा; देखणा. **–क़िस्मत** (قسمت –) वि. (फ़ा.+'अ.) भाग्यवान; सुदैवी. **–कुन** (کن –) प्रत्य. (फ़ा.) रूप करणारा. **–ख़त** (خط –) वि. (फ़ा.+'अ.) सुंदर हस्ताक्षर असलेला; सुलेखक. **–ख़बरी** (خبری –) स्त्री. (फ़ा.+'अ.) आनंदाची वार्तमी. **–ख़याल** (خیال –) वि. (फ़ा.+'अ.) चांगले विचार असणारा. **–ख़रीद** (خرید –) वि. (फ़ा.) (१) रोख पैसे देऊन विकत घेतलेली (वस्तू). (२) शेतातील पीक तयार होण्यापूर्वी स्वस्त दराने विकत घेणे. **–ख़िराम** (خرام –) वि. (फ़ा.) डौलात चालणारा; गजगामिनी. **–ख़िरामी** (خرامی –) स्त्री. (फ़ा.) हंसगती; डौलदार चाल. **–ख़ुराक** (خوراک –) वि. (फ़ा.) उत्कृष्ट खाद्य खाणारा; खाण्याचा शोकीन. **–ख़ुल्क़** (خلق–) वि. (फ़ा.+'अ.) सौजन्यशील; खेळीमेळीने वागणारा. **–ख़ू** (خو –) वि. (फ़ा.) सुस्वभावी; सच्छील. **–गप** (گپ –) वि. (फ़ा.) हसत खेळत गप्पागोष्टी करणारा. **–ग़िलाफ़** (غلاف –) वि. (फ़ा.) (१) म्यानातून चटकन बाहेर येणारी, उत्कृष्ट (तलवार). (२) फार लवकर, सहजासहजी परपुरुषाशी रत होणारी (स्त्री). **–गुफ़्तार** (گفتار –) वि. (फ़ा.) मधुरभाषी; उत्तम वक्तृत्व करणारा. **–गुलू** (گلو –) वि. (फ़ा.) गोड गळ्याचा; मधुर आवाजाचा. **–गुवार** (گوار –) वि. (फ़ा.) मनोहर; स्वादिष्ट; प्रिय. **–चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) (१) सुनेत्रा; सुलोचना. (२) प्रेयसी. **–जमाल** (جمال –) वि. (फ़ा.+'अ.) सुंदर; सौंदर्यवती; रूपवान. **–ज़ा'इक़ः** (ذائقہ –) वि. (फ़ा. + 'अ.) स्वादिष्ट; मजेदार. **–ज़ौक़** (ذوق –) वि. (फ़ा.+'अ.) रसिक; मर्मज्ञ. **–तक़रीर** (تقریر –) वि. (फ़ा.+'अ.) वाक्पटू; चांगला वक्ता. **–तक़दीर** (تقدیر –) वि. (फ़ा.+'अ.) भाग्यवान. **–तब्'अ** (طبع –) वि. (फ़ा.+'अ.) आनंदी; उत्साही; रसिक. **–तर** (تر –) वि. (फ़ा.) अधिक उत्तम. **–तराश** (تراش –) वि. (फ़ा.) उत्तम प्रकारे बेतलेला (कपडा). **–दामन** (دامن –) स्त्री. (फ़ा.) सासू. **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) प्रसन्नचित्त; विनोदप्रिय; गनत्या. **–नवीस** (نویس –) वि. (फ़ा.) सुंदर अक्षर काढणारा; सुलेखक. **–नसीब** (نصیب –) वि. (फ़ा.+'अ.) भाग्यवान. **–निगाह** (نگہ –) वि. (फ़ा.) सुंदर; मनोहर. **–नीयत** (نیت –) वि. (फ़ा.+'अ.) प्रामाणिक; सत्प्रवृत्त. **–नुमा** (نما –) वि. (फ़ा.) मनोरम; मनोहर. **–नूद** (نود –) वि. (फ़ा.) प्रसन्न; संतुष्ट. **–नूदी** (نودی –) स्त्री. (फ़ा.) आनंद; संतोष. **–पोश** (پوش –); **–पोशाक** (پوشاک –) वि. (फ़ा.) चांगले कपडे वापरणारा. **–फ़हम** (فہم –) वि. (फ़ा.+'अ.) (१) चटकन एखादी गोष्ट समजणारा; तीव्रबुद्धी. (२) इतरांविषयी चांगली भावना बाळगणारा. **–फ़े'अली** (فعلی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) मनोरंजन; थट्टामस्करी. **–बख़्त** (بخت –) वि. (फ़ा.) भाग्यवान; सुदैवी. **–बयान** (بیان –) वि. (फ़ा.+'अ.) उत्तम वक्ता; मधुरभाषी. **–बाश** (باش –) वि. (फ़ा.) (१) उत्तम प्रकारे जीवन घालविणारा. (२) सुखात राहा (एक आशीर्वाद). **–बू** (بو –) वि. (फ़ा.) सुगंधी. (स्त्री.) सुगंध. **–बूदार** (بودار –) वि. (फ़ा.) सुवासिक. **–मंज़र** (منظر –) वि. (फ़ा.+'अ.) मनोहर; प्रियदर्शन. **–म'आश** (معاش –) वि. (फ़ा.+'अ.) चांगल्या मार्गाने उपजीविका चालविणारा; सदाचारी ('बदम'आश' च्या उलट). **–मज़ाक़** (مذاق –) वि. (फ़ा.+'अ.) रसिक; विनोदी. **–मनिश** (منش –) वि. (फ़ा.) सज्जन. **–मिज़ाज** (مزاج –) वि. (फ़ा.+'अ.) विनोदी; रसिक; आनंदी. **–रंग** (رنگ –) वि. (फ़ा.) सुंदर रंग असलेला. **–रफ़्तार** (رفتار –) वि. (फ़ा.) डौलदार चालीचा; हळूहळू, ठुमकत चालणारी. **–रू** (رو –) वि. (फ़ा.) रूपवान; देखणा; सुंदर. **–लहजः** (لہجہ –) वि. (फ़ा.+'अ.) उत्कृष्ट उच्चारण असलेला; मधुर कंठ असलेला. **–वक़्त** (وقت –) वि. (फ़ा. + 'अ.) (१) ज्याचा वेळ उत्तम प्रकारे जातो असा; सुखी; समृद्ध. (२) भाग्यवान. **–ओ-ख़ुर्रम** (و خرم –) वि. (फ़ा.) सुखी; आनंदी; सुखवस्तू. **–वद'अ** (وضع –) वि. (फ़ा.+'अ.) (१) ढंगदार. (२) परंपरा न सोडणारा. **–सलीक़ः** (سلیقہ –) वि. (फ़ा.+'अ.) पद्धतशीर; शिष्टाचार संपन्न. **–सीरत** (سیرت –) वि. (फ़ा.+'अ.) सुस्वभावी; सच्छील. **–हाल** (حال –) वि. (फ़ा.+'अ.) संपन्न; सुखी; समृद्ध. **–हाली** (حالی –) समृद्धी; संपन्नता; सुस्थिती.

खुशा (خوشا) अव्य. (फ़ा.) वाहवा ! छान ! किती सुखी !

खूशा नसीब ! तपिशहा-ए-'आलम-ए-बेदाम ।
हमारे सर पि. तुम्हारा हसीन सायः है ।।

–क़िस्मत (قسمت –); **–नसीब** (نصیب –) अव्य. (फ़ा.+'अ.) अहो भाग्य ! वारे नशीब ! मी किती भाग्यवान !

खुशामद (خوشامد) स्त्री. (फ़ा.) खुशामत; मिथ्या प्रशंसा; हांजी हांजी. **–गो** (گو –) वि. (फ़ा.) हांजीखोर. **–पसंद** (پسند –) वि. (फ़ा.) खुशामत आवडणारा. **–शि'आर** (شعار –) वि. (फ़ा.+'अ.) खुषमस्कऱ्या.

खुशामदी (خوشامدی) वि. (फ़ा.) हांजीखोर; लाळघोटघा.

खुशी (خوشی) स्त्री. (फ़ा.) (१) आनंद; प्रसन्नता. (२) इच्छा; मर्जी. (३) मुलाचा जन्म. (४) स्वीकृती. (वि.) आनंदित.

खुशू'अ (خشوع) पु. ('अ.) (१) नम्रता. (२) तारा मावळू लागणे. (३) झोपेने डोळे मिटणे.

खुशूनत (خشونت) स्त्री. ('अ.) रखरखीतपणा; रुक्षता.

खुश्क (خشک) वि. (फ़ा.) (१) कोरडा; शुष्क. (२) कफल्लक. (३) नीरस; अरसिक. (४) अनुदार. **–दिमाग़** (دماغ –); **–मग़ज़** (مغز –) वि. (फ़ा.+'अ.) रुक्ष स्वभावाचा; चिडखोर. **–मिज़ाज** (مزاج –) वि. (फ़ा.+'अ.) नीरस स्वभावाचा; अरसिक. **–लब** (لب –) वि. (फ़ा.) तहानेला; तहानेने ओठ कोरडे पडलेला. **–साल** (سال –) वि. **–साली** (سالی –) स्त्री. (फ़ा.) अवर्षण; दुष्काळ; दुष्काळी वर्ष.

खुश्की (خشکی) स्त्री. (फ़ा.) (१) शुष्कता; कोरडेपणा. (२) नीरसता. (३) असभ्यपणा; अशिष्टता. (४) कोरडे पीठ (पोळघा लाटताना वापरले जाणारे). (५) जमीन. **–की राह** (راہ کی –) खुष्कीच्या मार्गाने; जमिनीवरून.

खुश्कः (خشکہ) पु. (फ़ा.) उकडलेले तांदूळ; भात.

खुसुर (خسر) पु. (फ़ा.) श्वशुर; सासरा (पत्नीचा अथवा पतीचा पिता). **–ख़ानः** (خانہ –) पु. (फ़ा.) सासुरवाडी; सासर. **–दादः** (دادہ –) पु. (फ़ा.) मेहुणा (बायकोचा भाऊ); साला.

खुसरवानः (خسروانہ) वि. (फ़ा.) बादशाही, राजेशाही थाटाचा.

खुसूफ़ (خسوف) पु. ('अ.) चंद्रग्रहण.

खुसूमत (خصومت) स्त्री. ('अ.) द्वेष; शत्रुत्व.

खुसूस (خصوص) पु. ('अ.) वैशिष्ट्य.

खुसूसन् (خصوصاً) अव्य. ('अ.) खास करून; विशेषतः; मुख्यतः.

खुसूसियत (خصوصیت) स्त्री. ('अ.) वैशिष्ट्य; प्राधान्य. [अनेक 'खुसूसियात' (خصوصیات)].

खुसूसी (خصوصی) वि. ('अ.) खास; मुख्य; वैशिष्ट्यपूर्ण.

खुस्यतैन (خصیتین) पु. ('अ.) दोन्ही अंडकोष.

खुस्यः (خصیہ) पु. ('अ.) अंडकोष; अंड. **–बरदार** (بردار –) वि. ('अ.+फ़ा.) खुशामतखोर; लाळघोटघा.

खूल (خسر); **खुस्रान** (خسران) पु. ('अ.) तोटा; हानी.

खूस्रो (خسرو) पु. (फ़ा.) (१) सम्राट; बादशहा. (२) परवेजचा मुलगा. (याने फरहादला ठार मारविले होते). (३) चौदाव्या शतकातील उर्दू-हिंदी भाषेचा एक श्रेष्ठ कवी.

खूं (خوں) पु. [फ़ा. 'खून' (خون) चे संक्षिप्त.] (१) रक्त. (२) हत्या; खून. **–आलूद** (آلود –); **–आलूदः** (آلودہ –) वि. (फ़ा.) रक्ताने भरलेला, माखलेला. **–आशाम** (آشام –) वि. (फ़ा.) रक्त पिणारा; निर्दय. **–आशामी** (آشامی –) स्त्री. (फ़ा.) रक्तशोषण; जुलूम. **–ख़्वार** (خوار –) वि. (फ़ा.) (१) रक्तपिपासू. (२) निर्दय; क्रूर; भयंकर. **–ख़राबः** (خرابہ –) पु. (फ़ा.) रक्तपात. **–ख़्वाह** (خواہ –) वि. (फ़ा.) (१) रक्ताचा इच्छुक. (२) सुडाची इच्छा धरणारा. **–गर्मी** (گرمی –) स्त्री. (फ़ा.) प्रेम; मैत्री. **–गिरिफ़्तः** (گرفتہ –) वि. (फ़ा.) वधेच्छू; मरणासन्न. **–चिकाँ** (چکاں –) वि. (फ़ा.) रक्तबंबाळ. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) खुनी; हिंसक. **–नाबः** (نابہ) पु. (फ़ा.) रक्ताचे अश्रू; निढळाचा घाम गाळणे. **–नाबः-फ़िशाँ** (نابہ فشاں –) वि. (फ़ा.) रक्ताचे अश्रू ढाळणारा; खूप काबाडकष्ट करणारा. **–फ़िशाँ** (فشاں –) वि. (फ़ा.) रक्त वाहविणारा; रक्तबंबाळ. **–बहा** (بہا –) पु. (फ़ा.) खुनाची किंमत; प्राणांचे मूल्य. (एखाद्याचा खून झाल्यानंतर त्याच्या प्राणांच्या बदल्यात त्याच्या वारसदारांना दिली जाणारी रक्कम). **–बार** (بار –) वि. (फ़ा.) रक्ताचा वर्षाव करणारा. **–रेख़्तः** (ریختہ –) वि. (फ़ा.) ज्याचे रक्त सांडण्यात आले आहे असा. **–रेज़** (ریز –) वि. (फ़ा.) रक्तपात करणारा; निर्दय; क्रूर. **–रेज़ी** (ریزی –) स्त्री. (फ़ा.) रक्तपात; निर्दयता; क्रूरता.

खू (خو) स्त्री. (फ़ा.) स्वभाव; प्रकृती; सवय.

खू-ए-बद (خوے بد) स्त्री. (फ़ा.) वाईट स्वभाव; वाईट सवय.

खूक (خوک) पु. (फ़ा.) शूकर; डुक्कर.

खूगर (خوگر) वि. (फ़ा.) (१) सवय असलेला; अभ्यस्त. (२) व्यसनी.

खून (خون) पु. (फ़ा.) (१) रक्त; रुधिर. (२) हत्या; कत्तल (सामासिक शब्दासाठी). **–का घूंट पीना** (–کا گھونٹ پینا) अपमान गिळून टाकणे; सहन करणे. **–का प्यासा** (–کا پیاسا) रक्तपिपासू. **–के आंसू बहाना** (–کے آنسو بہانا) अत्यंत शोक करणे. **–खौल उठना** (–کھول اٹھنا) रक्त उसळणे. **–सरपर सवार होना** (–سر پر سوار ہونا) खून चढणे. **–सफ़ेद होना** (–سفید ہونا) प्रेम न राहणे.

खून-ए-कबूतर (خون کبوتر) पु. (फ़ा.) लाल मदिरा; लाल रंग.

खून-ए-जिगर पीना (خون جگر پینا) (१) राग गिळणे. (२) दुःख सहन करणे. (३) फार परिश्रम करणे.

खून-ए-नामूस (خون ناموس) पु. (फ़ा.+'अ.) मदिरा; मद्य.

खून-ए-नाहक़ (خون ناحق) पु. (फ़ा.+'अ.) निष्कारण केलेली हत्या.

खूनी (خونی) वि. (फ़ा.) (१) रक्ताने भरलेला, माखलेला. (२) रक्तासंबंधीचा. **–कफ़न** (–کفن) वि. (फ़ा.) ज्याचे प्रेतवस्त्र रक्ताने माखलेले आहे असा; प्रेमासाठी हुतात्मा झालेला; प्रीतीचा बळी. **–जिगर** (–جگر) वि. (फ़ा.) ज्याचे हृदय रक्ताने माखलेले आहे असा; प्रीतीने घायाळ केलेला; प्रेमिक. **–नवा** (–نوا) वि. (फ़ा.) ज्याचा स्वर ऐकून श्रोत्यांची अंतःकरणे रक्तबंबाळ होतात असा; प्रेमिक.

खूनी (خونی) वि. (फ़ा.) खून करणारा; खुनी.

खूब (خوب) वि. (फ़ा.) (१) सुंदर. (२) उत्तम. (३) निर्मळ. (४) मोहक. (५) शुभ. (वि.) वाहवा! छान! **–तर** (–تر) वि. (फ़ा.) अत्युत्तम. **–तरीन** (–ترین) वि. (फ़ा.) सर्वोत्तम. **–रू** (–رو) वि. (फ़ा.) (१) रूपवान. (२) प्रियतमा. **–रू'ई** (–روئی) स्त्री. (फ़ा.) सौंदर्य. **–सूरत** (–صورت) वि. (फ़ा.+'अ.) सुंदर. **–सूरती** (–صورتی) स्त्री. (फ़ा.+'अ.) सुंदरता.

खूबकलां (خوب کلاں) स्त्री. (फ़ा.) शैत्यगुण (थंडपणा) असलेले एक औषधी बी; खुपकला; खाकशी (हिंदी).

खूबां (خوباں) पु. स्त्री. [फ़ा. 'खूब' (خوب) चे अनेक.] (१) सुंदर स्त्रिया. (२) प्रेयसी; प्रियतमा.

खूबानी (خوبانی) स्त्री. (फ़ा.) जर्दाळू.

खूबी (خوبی) स्त्री. (फ़ा.) (१) गुण; वैशिष्ट्य. (२) सौंदर्य. (३) उत्तमता; चांगुलपणा. (४) सज्जनता. (५) कला; हुन्नर. (६) नाविन्य.

खूर (خور) पु. (फ़ा.) खाणे; भोजन; खुराक.

खूरिंदः (خورندہ) वि. (फ़ा.) खाणारा.

खूरिश (خورش) स्त्री. (फ़ा.) भोजन; खाणे; खुराक.

खूलिंजान (خولنجان) पु. (फ़ा.) (१) खाण्याच्या पानाचे मूळ, देठ. (२) एक औषधी कोष्ठ; कोळंजन; कुलंजन (हिंदी).

खेज (خیز) क्रि. (फ़ा.) ऊठ. (स्त्री.) (१) पाण्याची लाट; तरंग. (२) कबुतरीला आलेला माज. (प्रत्य.) (१) उठविणारा; निर्माण करणारा. [उदा. तूफ़ान खेज (طوفان خیز) वादळ उठविणारा. (२) वाढविणारा. 'दहशत खेज' (دہشت خیز) भीती वाढविणारा].

खेज-ओ-मेज़ (خیز و میز) पु. (फ़ा.) (१) मेळमिलाफ; मैत्री; प्रेम. (२) पोक; आवड.

खेजरां (خیزراں) पु. (फ़ा.) बेत; बेताचे झाड.

खेज़ां (خیزاں) वि. (फ़ा.) वर उठणारा. **उफ़्तां-ओ-खेज़ां** (اُفتاں و خیزاں) अव्य. (फ़ा.) उठत-पडत; धडपड.

खेज़िश (خیزش) स्त्री. (फ़ा.) (१) उत्थान; वर उठणे. (२) जननेंद्रिय ताठ होणे.

खेमः (خیمہ) पु. ('अ.) तंबू; राहुटी. **–गाह** (–گاہ) स्त्री. ('अ.+फ़ा.) तंबू उभारण्याची जागा. **–ज़दन** (–زدن) (क्रि.) तंबू. **–दोज़** (–دوز) पु. ('अ.+फ़ा.) तंबू शिवणारा; तंबू बनविणारा; गाडणे, उभा करणे. **–ज़न** (–زن) पु. ('अ.+फ़ा.) तंबू उभारणारा.

खेवे (خوے) पु. (फ़ा.) (१) घाम. (२) थुंकी.

खेश (خیش) पु. (फ़ा.) खेस; एक प्रकारचे जाड कापड.

खेश (خویش) पु. (फ़ा.) (१) नातेवाईक; सोयरा. (२) आपण; स्वतः. (३) जावई. (४) प्रिय व्यक्ती. **–तन** (–تن) पु. (फ़ा.) स्वतः; आपण. **–दार** (–دار) वि. (फ़ा.) संकटापासून स्वतःचे रक्षण करीत जीवन कंठणारा. **–पर्वर** (–پرور) वि. (फ़ा.) आपल्या कुटुंबीजनांचे व मित्रांचे पालनपोषण करणारा. **–ओ-अक़ारिब** (–و اقارب) पु. (फ़ा.+'अ.) नातेवाईक; स्वजन.

खेशान (خویشان); **खेशावंद** (خویشاوند) पु. (फ़ा.) नातेवाईक; स्वजन.

खेशी (خویشی) स्त्री. (फ़ा.) नाते; आत्मीयता; स्वजनत्व.

खेत् (خیط) पु. ('अ.) (१) सूत; दोरा. (२) पाठीच्या कण्यातील मगज.

ख़ैत्-ए-अब्यद (خیط ابیض) पु. ('अ.) प्रातःकालीन पांढुरता; सकाळचा उजेड.

ख़ैत्-ए-अस्वद (خیط اسود) पु. ('अ.) रात्रीची काळोखी; अंधार.

ख़ैफ़ (خیف); **ख़ैफ़ः** (خیفہ) पु. ('अ.) भीती; भय.

ख़ैबत (خیبت) स्त्री. ('अ.) (१) निराशा; नैराश्य. (२) दुर्दैव.

ख़ैमः (خیمہ) पाहा 'ख़ेमः'.

ख़ैयात् (خیاط) पु. ('अ.) शिंपी.

ख़ैयाब (خیاب) वि. ('अ.) (१) निराश; नाउमेद. (२) दुर्दैवी.

ख़ैयाम (خیام) वि. ('अ.) तंबू बनविणारा, शिवणारा. (पु.) इराणाच्या ख़ुरासाण प्रांतातील नैशापुरचा रहिवासी प्रसिद्ध कवी उमर ख़य्याम. पूर्ण नाव : उमरू बिन इब्राहीम ख़ैयामी. [हे इनाम (धार्मिक नेते) वैद्य व ज्योतिषी होते. यांच्या मद्यपानाविषयीच्या आख्यायिका पूर्णपणे खोट्या आहेत].

ख़ैर (خیر) स्त्री. ('अ.) (१) क्षेमकुशल; सुरक्षितता; आरोग्य ख़ुशाली. (२) मंगल; शुभ. (३) उपकार; भलाई; चांगुलपणा. (४) पुण्य. (५) दान. (६) असो; अस्तु; ठीक; काही हरकत नाही. **-अंदेश** (اندیش –) वि. ('अ.+फ़ा.) शुभचिंतक; हितचिंतक; मित्र. **-अंदेशी** (اندیشی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) शुभचिंतन; हितचिंतक. **-ख़्वाह** (خواہ –) वि. ('अ. + फ़ा.) शुभेच्छू; हितेच्छू. **-ख़्वाही** (خواہی –) स्त्री. ('अ. + फ़ा.) शुभेच्छा. **-बाद** (باد –) वा. ('अ. + फ़ा.) कल्याण होवो. (निरोप घेताना उच्चारावयाचा शब्द). **-बाशद** (باشد –) वा. ('अ. + फ़ा.) कसे काय? ठीक आहे ना? **-मक़्दम** (مقدم –) पु. ('अ.) शुभागमन; स्वागत. **-सिगाल** (سگال –) वि. ('अ. + फ़ा.) शुभचिंतक. **-सिगाली** (سگالی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) शुभेच्छा; शुभ कामना. **-सिंगाली वफ़्द** (سگالی وفد –) पु. ('अ.+फ़ा.) सदिच्छा मंडळ. **-सल्ला** (سلا –) स्त्री. ('अ. + हिं.) क्षेमकुशल; विचारपूस (वा.).

ख़ैर-ओ-'आफ़ियत (خیر و عافیت) स्त्री. ('अ.) ख़ुशाली; क्षेमकुशल; शांती.

ख़ैर-ओ-बरकत (خیر و برکت) स्त्री. ('अ.) कल्याण व समृद्धी.

ख़ैरात (خیرات) स्त्री. ['अ. 'ख़ैर' (خیر) चे अनेक.] (१) उपकार; कल्याणे; चांगल्या गोष्टी; पुण्ये. (२) दान; दानधर्म. **-ख़ानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) अन्नसत्र.

ख़ैराती (خیراتی) वि. ('अ.) दानासंबंधी; दानाचा; धर्मार्थ. **-शिफ़ा ख़ानः** (شفاخانہ –) पु. ('अ.+फ़ा.) धर्मार्थ दवाखाना.

ख़ैरियत (خیریت) स्त्री. ('अ.) (१) कल्याण; ख़ुशाली. (२) घडगत. **-नामः** (نامہ –) पु. ('अ.+फ़ा.) ख़ुशालीचे पत्र.

ख़ैरी (خیری) पु. ('अ.) **-ख़ैरू** (خیرو) पु. (फ़ा.) एक झाड. (याची फुले पिवळी, पांढरी, तांबडी व निळी असतात).

ख़ैल (خیل) पु. ('अ.) (१) समूह; गर्दी; समुदाय. (२) घोड्यांचा कळप. (३) घोडेस्वारांचा समुदाय. (वि.) अधिक; पुष्कळ. **-ख़ानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) वंश; कुटुंब; घराणे. **-ताश** (تاش –) पु. ('अ.+तु.) एकाच मालकाचे गुलाम अथवा नोकर.

ख़ैला (خیلا) स्त्री. ('अ.) घमेंडखोर व मूर्ख स्त्री. (वि.) मूर्ख; मठ्ठ.

ख़ैले (خیلے) अव्य. (फ़ा.) अत्यधिक; फार. **-ख़ैले** (خیلے –) अव्य. (फ़ा.) जास्तीत जास्त.

ख़ैश (خیش) पु. (फ़ा.) खेस; जाड कापड.

ख़ैशूम (خیشوم) पु. ('अ.) नाकपुडी; नाकाचे हाड.

ख़ैस् (خیص) पु. ('अ.) (१) कमी होणे. (२) एक डोळा मोठा व एक लहान असणे. (३) लिहिण्याची शाई.

ख़ोगीर (خوگیر) पु. (फ़ा.) पलाण; खोगीर; घोड्यावर घालावयाचे जीन. **-की भरती** (کی بھرتی –) अवजड व कुच किंमतीच्या वस्तूंची भरताड. **-दोज़** (دوز –) पु. (फ़ा.) खोगीर शिवणारा; तयार करणारा.

ख़ोजः (خوجہ) पु. [फ़ा. 'ख़्वाजः' (خواجہ) चे संक्षिप्त.] (१) मुसलमानाची एक जात. (२) जनानख़ान्यातील हिजडा.

ख़ोद (خود) पु. (फ़ा.) शिरस्त्राण.

ख़ोर (خور) प्रत्य. (फ़ा.) खाणारा. (पु.) घोडेसे खाणे; खाद्य.

ख़ोल (خول) पु. (फ़ा.) (१) खोळ; अभ्रा. (२) वेष्टन. (३) म्यान.

ख़ोशीदः (خوشیدہ) वि. (फ़ा.) वाळलेला; सुकविलेला.

ख़ोशः (خوشہ) पु. (फ़ा.) (१) गव्हाची लोंबी. (२) गुच्छ. (३) तुरा. **-चीं** (چیں –) वि. (फ़ा.) (१) धान्य वेचणारा; फळे गोळा करणारा. (२) फायदा घेणारा. **-चीनी** (چینی –) स्त्री. (फ़ा.) (१) धान्य अथवा फळे गोळा करणे. (२) लाभ; प्राप्ती.

ख़ोशः-ए-अंगूर (خوشۂ انگور) पु. (फ़ा.) द्राक्षांचा घोस.

ख़ोशः-ए-गंदुम (خوشۂ گندم) पु. (फ़ा.) गव्हाची लोंबी.

ख़ोशः-ए-चर्ख़ (خوشۂ چرخ) पु. (फ़ा.) कन्या राशी.

ख़ोशः-ए-पर्वीं (خوشۂ پروین) पु. (फ़ा.) कृत्तिका नक्षत्र.

ख़ोद (خود) स्त्री. ('अ.) नाजुक व सुंदर स्त्री.

ख़ौद (خوض) पु. ('अ.) चिंतन; मनन; गंभीर विचार. (हा शब्द 'ग़ौर' या शब्दासहच येतो). **ग़ौर-ओ-ख़ौद** (غور و خوض) पु. ('अ.) चिंतन; मनन.

ख़ौफ़ (خوف) पु. ('अ.) (१) भय; भीती. (२) शंका; संदेह. **-ज़दः** (-زدہ) वि. (अ.+फ़ा.) भयभीत; भीतियस्त. **-नाक** (-ناک) वि. ('अ.+फ़ा.) भीषण; भयंकर.

ख़ौश (خوش) स्त्री. ('अ.) नितंब; ढुंगण. (पु.) (१) भाला मारणे. (२) घेणे.

ख़्वाँ (خواں) प्रत्य. (फ़ा.) (१) वाचणारा; पठण करणारा. (२) सांगणारा; गाणारा. [उदा. 'क़ुरआनख़्वाँ' (قرآں خواں) कुराण पठण करणारा. 'क़िस्सःख़्वाँ' (قصہ خواں) गोष्टी सांगणारा].

ख़्वाँ (خواں) पु. [फ़ा. 'ख़्वान' (خوان) चे संक्षिप्त.] ताट; थाळी.

ख़्वांदगी (خواندگی) स्त्री. (फ़ा.) वाचन; पठण; विधी मंडळातील विधेयकाचे नांव.

ख़्वांदः (خواندہ) वि. (फ़ा.) (१) शिकविलेला; सुशिक्षित. (२) निमंत्रित.

ख़्वाजः (خواجہ) पु. (तु.+फ़ा.) (१) घराचा मालक; गृहस्वामी. (२) सरदार; नेता. (३) धनाढ्य व्यक्ती. (४) प्रतिष्ठित पुरुष. (५) सेवक; नोकर; अंतःपुरातील हिजडा; नपुंसक. (६) संत. (७) श्रीयुत. **-कर्दन** (-کردن) क्रि. (फ़ा.) खच्ची करणे. **-ताश** (-تاش) पु. (फ़ा.+तु.) एका मालकाचे नोकर. **-सरा** (-سرا) पु. (तु.+फ़ा.) अंतःपुरातील खच्ची केलेला नोकर; हिजडा; अंतःपुराचा राखणदार.

ख़्वान (خوان) पु. (फ़ा.) (१) भोजनाचे ताट; वाढलेले ताट. (२) ट्रे. **-चः** (-چہ) पु. (फ़ा.) (१) छोटी थाळी किंवा परात. (२) मिठाई, भेळ वगैरे विकण्याची थाळी. **-पोश** (-پوش) पु. (फ़ा.) भोजनाच्या ताटावर किंवा ट्रेवर झाकण्याचे कापड.

ख़्वाना (خوانا) वि. (फ़ा.) (१) वाचणारा. (२) बोलावणारा; पुकारणारा.

ख़्वानिंदः (خواننده) वि. (फ़ा.) (१) बोलावणारा. (२) शिकविणारा; शिक्षक. (३) गवई; गायक.

ख़्वानी (خوانی) स्त्री. (फ़ा.) पठण; वाचन.

ख़्वाब (خواب) पु. (फ़ा.) (१) स्वप्न. (२) झोप; निद्रा. **-आलूदः** (-آلودہ) वि. (फ़ा.) पेंगणारा; झोपेने भारलेला; अर्धोन्मीलित. **-आवर** (-آور) वि. (फ़ा.) झोप आणणारे (औषध); निद्राकारक. **-गाह** (-گاہ) स्त्री. (फ़ा.) शयनागार; बेडरूम.

ख़्वाब-ए-ख़रगोश (خواب خرگوش) पु. (फ़ा.) (१) फसवणूक; कपट. (२) गाढ निद्रा.

ख़्वाब-ए-ग़फ़लत (خواب غفلت) पु. (फ़ा.+'अ.) गाढ झोप.

ख़्वाब-ए-परीशाँ (خواب پریشاں) पु. (फ़ा.) अस्वस्थ; गाढ नसलेली झोप.

ख़्वाब-ए-सैयाद (خواب صیاد) पु. (फ़ा.+'अ.) कृत्रिम झोप; कपट.

ख़्वाबिंद (خوابند) वि. (फ़ा.) झोपलेला.

ख़्वाबीदः (خوابیدہ) वि. (फ़ा.) (१) झोपलेला. (२) बसलेला. (३) जीर्ण; पुरातन.

ख़्वार (خوار) वि. (फ़ा.) (१) अपमानित; तिरस्कृत. (२) दुर्दशाग्रस्त. (प्रत्य.) खाणारा. [उदा. 'नमक ख़्वार' (نمک خوار) मीठ खाणारा; स्वामिभक्त].

ख़्वारी (خواری) स्त्री. (फ़ा.) (१) अपमान. (२) दुर्दशा.

ख़्वाल (خوال) पु. (फ़ा.) भोजन. **-गर** (-گر); **-गीर** (-گیر) वि. (फ़ा.) आचारी; स्वयंपाकी.

ख़्वास्त (خواست) स्त्री. (फ़ा.) (१) इच्छा. (२) मागणी. (३) प्रेम. **-गार** (-گار) वि. (फ़ा.) (१) इच्छुक. (२) मागणारा. (३) प्रेमी. **-गारी** (-گاری); **-गी** (-گی) स्त्री. (फ़ा.) (१) इच्छा. (२) मागणी (लग्नाची).

ख़्वास्तः (خواستہ) वि. (फ़ा.) (१) मागितलेला. (२) इच्छिलेला.

ख़्वाह (خواہ) प्रत्य. (फ़ा.) इच्छिणारा. [उदा. 'तरक़्क़ी ख़्वाह' (ترقی خواہ) वढती किंवा प्रगती इच्छिणारा; 'ख़ातिरख़्वाह' (خاطرخواہ) वि. ('अ.+फ़ा.) मनपसंत. (अव्य.) अथवा; नाहीतर; किंवा. **-मख़्वाह** (-مخواہ) अव्य. (फ़ा.) (१) इच्छा असो अथवा नसो; जबरदस्तीने. (२) नाइलाजाने. (३) अवश्य.

ख़्वाहर (خواہر) स्त्री. (फ़ा.) भगिनी; बहीण.

ख़्वाहाँ (خواہاں) वि. (फ़ा.) (१) इच्छुक. (२) मागणारा; याचक.

ख़्वाहिंदः (خواہندہ) वि. (फ़ा.) (१) इच्छुक. (२) याचक.

ख़्वाहिश (خواہش) स्त्री. (फ़ा.) इच्छा; आकांक्षा; अभिलाषा. **-मंद** (-مند) वि. (फ़ा.) इच्छुक; अभिलाषी.

ख़्वाहीदः (خواہیدہ) वि. (फ़ा.) इच्छिलेले; अभिप्सित.

गंग (گنگ) स्त्री. (फ़ा.) गंगा नदी. **–बरार** (–برار) स्त्री. (फ़ा.) मळीची जमीन; नदीचा प्रवाह बदलल्यामुळे वर आलेला जमिनीचा भाग. **–शिकस्त** (–شکست) पु. (फ़ा.) नदीच्या प्रवाहाने वाहून गेलेली जमीन.

गंग-ओ-जमन (گنگ و جمن) स्त्री. (फ़ा.) गंगा व यमुना.

गंगुल (گنگل) पु. (फ़ा.) (१) थट्टा; मस्करी. (२) उपचार. (३) जादू.

गंज (گنج) पु. (फ़ा.) (१) निधी; खजिना; संपत्ती. (२) ढीग; रास. (३) संग्रह; कोठार. (४) धान्याचा बाजार. **–दान** (–دان) पु. (फ़ा.) जेथे धन पुरले आहे असे स्थान; खजिना. **–बख़्श** (–بخش) वि. (फ़ा.) संपत्ती देणारा; उदार; मोठा दानी.

गंज-ए-इलाही (گنج الٰہی) पु. (फ़ा.) (१) कुराण. (२) समाधान; धीर.

गंज-ए-क़ारून (گنج قارون) पु. (फ़ा.) कारून नावाच्या श्रीमंताची अफाट संपत्ती. (ही संपत्ती ४ लाख ४० हजार पोती भरतील एवढी होती. यांतील एक पैसाही तो दानधर्मात खर्च करीत नसे. अखेर हजरत मूसा यांच्या शापामुळे तो आपल्या संपत्तीसह जमिनीत गाडला गेला).

गंज-ए-गाव (گنج گاو) पु. (फ़ा.) जमशेदच्या अनेक खजिन्यांपैकी एक. (हा बहराम गोर याला मिळाला होता व त्याने तो गोरगरिबांना वाटून टाकला होता).

गंज-ए-बादआवर (گنج بادآور); **गंज-ए-बादआवर्द** (گنج بادآورد) पु. (फ़ा.) (१) फुकटात मिळालेली संपत्ती. (२) वायुदत्त धन. पाहा 'गंज-ए-शायगाँ'.

गंज-ए-रवाँ (گنج رواں) पु. (फ़ा.) प्रवाही संपत्ती; 'कारून' ची संपत्ती. (कारण प्रलयापर्यंत ती जमिनीत घुसतच रहाणार आहे).

गंज-ए-शहीदाँ (گنج شہیداں) पु. (फ़ा.) स्मशान; कब्रस्तान. (जेथे अनेक हुतात्म्यांना, मृतांना पुरण्यात आलेले आहे असे स्थान).

गंज-ए-शायगाँ (گنج شایگاں) पु. (फ़ा.) 'गंज-ए-बादआवर्द' चे दुसरे नाव. [तुर्कस्तानच्या बादशहाने खुस्रो पर्वेजच्या भीतीने आपली संपत्ती अनेक जहाजांत भरून एका बेटाकडे पाठविली होती. परंतु वाऱ्याच्या प्रतिकूलतेमुळे ती पर्वेजच्याच देशाला येऊन लागली. ही संपत्ती प्रचंड (शायगाँ) होती, म्हणून तिला हे नाव प्राप्त झाले].

गंजार (غنجار) पु. (अ.) **गंजारः** (گنجارہ) पु. (फ़ा.) तोंडाला लावायची सुगंधी फेस पावडर; मुखचूर्ण.

गंजिफ़ः (گنجفہ) पु. (फ़ा.) एक प्रकारचा पत्त्यांचा खेळ. (याचे पत्ते गोल असतात. यात आठ रंगाचे एकूण ९६ पत्ते असतात. हल्लीचे पत्ते प्रचारात येण्यापूर्वी हा प्रचलित होता). **–बाज** (–باز) पु. (फ़ा.) (१) पत्ते खेळणारा. (२) धूर्त; लबाड.

गंजीदः (گنجیدہ) वि. (फ़ा.) सामावलेला. ['गंजीदन' (گنجیدن) वि. (फ़ा.) सामावणे; मावणे].

गंजीनः (گنجینہ) पु. (फ़ा.) (१) खजिना; कोष. (२) कोठार. **–दार** (–دار); **–संज** (–سنج) पु. (फ़ा.) खजिनदार; कोषाध्यक्ष.

गंजीनः-ए-ज़र (گنجینۂ زر) पु. (फ़ा.) सुवर्ण निधी; सोन्याचा साठा.

गंजूर (گنجور) पु. (फ़ा.) खजिनदार; कोषाध्यक्ष.

गंद (گند) स्त्री. (फ़ा.) दुर्गंध; घाण.

गंदगी (گندگی) स्त्री. (फ़ा.) (१) घाण; गलिच्छता. (२) दुर्गंध.

गंदना (گندنا) पु. (फ़ा.) (१) लसुणासारखी एक भाजी. (२) एक औषधी बीज. **–गूँ** (–گوں) वि. (फ़ा.) खाकी; मळकट; हिरवा-पिवळा (रंग).

गंदीरः (گندیرہ) वि. (फ़ा.) (१) सडलेला; कुजलेला. (२) दुर्गंधी.

गंदुम (گندم) पु. (फ़ा.) गहू. **–गूँ** (–گوں) वि. (फ़ा.) गव्हाळी रंगाचा; निमगोरा. **–नुमा जौ फ़रोश** (–نما جو فروش) वि. (फ़ा.) गहू दाखवून जव देणारा; फसव्या; लबाड.

गंदुम-ए-किरमानी (گندم کرمانی) पु. (फ़ा.) शेवया.

गंदुमी (گندمی) वि. (फ़ा.) (१) गव्हाशी संबंधित. (२) निमगोरा; गव्हाळी (रंग).

गंदः (گندہ) वि. (फ़ा.) (१) गलिच्छ; घाणेरडा. (२) अपवित्र. (३) दुर्गंधयुक्त. (४) दूषित. (५) मळलेला; मळकट. (६) असभ्य; अश्लील. **–दहन** (–دہن) वि. (फ़ा.) (१) शिवीगाळ करणारा. (२) गलिच्छ; दुर्गंधयुक्त तोंडाचा. **–दिमाग़** (–دماغ) वि. (फ़ा. + अ.) (१) घमेंडखोर. (२) उपद्रवी. **–बग़ली** (–بغلی) स्त्री. (फ़ा.) काखेतून दुर्गंध येण्याचा रोग. **–मग़ज़** (–مغز) वि. (फ़ा.) घमेंडखोर; अहंकारी.

गच (گچ) स्त्री. (फ़ा.) (१) इमारतीसाठी तयार केलेला चुना; प्लॅस्टर. (२) चुनेगच्ची केलेली जमीन; फरशी. **–कारी** (–کاری) स्त्री. (फ़ा.) भितीला किंवा जमिनीला चुन्याचा गिलावा करणे. **–बरी करदन** (–بری کردن) क्रि. (फ़ा.) भितीच्या गिलाव्यावर नक्षी काढणे.

गज़ंद (گزند) पु. स्त्री. (फ़ा.) (१) हानी; नुकसान. (२) त्रास; कष्ट. (३) दुर्दैव.

गज़ (گز) पु. (फ़ा.) (१) कापड वगैरे मोजण्याची लाकडी अथवा धातूची पट्टी; १ वार (यार्ड) लांबीचे माप. (२) एक प्रकारचा बाण. (३) सारंगी, व्हायोलिन वगैरे वाजविण्याची धनुकली. **–करदन** (کردن –) क्रि. (फ़ा.) मोजणे; मापणे. **–पा** (پا –) पु. (फ़ा.) लांब पायांचा एक पक्षी, करकोचा. **–बाज़ी** (بازی –) स्त्री. (फ़ा.) नृत्याचा एक प्रकार.

गज़क (گزک) पु. स्त्री. (फ़ा.) (१) दारूबरोबर खाण्याचा पदार्थ. (२) दारू प्याल्यानंतर चव बदलण्यासाठी किंवा तोंडाची घाण जावी म्हणून खावयाचा पदार्थ (भेळ, भजी वगैरे). (३) तिळाची वडी.

गज़र (گزر) पु. (फ़ा.) गाजर.

ग़ज़ल (غزل) स्त्री. ('अ.) (१) प्रियतमेशी प्रीतीच्या व जवानीच्या गोष्टी बोलणे; प्रेमपात्राशी गुजगोष्टी करणे व खेळणे. (२) उर्दू-फारसी कवितेचा एक प्रकार; गझल. [यात प्रामुख्याने प्रीतीचे वर्णन असते. एका गझलात सामान्यतः ५ ते ७ शेर (श्लोक) असतात. प्रत्येक शेराची दुसरी पंक्ती सयमक असते. प्रत्येक शेरात वेगवेगळा विषय असतो. पहिल्या शेराला 'मत्ल'अ' (مطلع) असे म्हणतात. त्याचे दोन्ही चरण सानुप्रास असतात. शेवटच्या शेराला 'मक़्त'अ' (مقطع) असे नाव आहे. त्यात कवीचे उपनाम असते]. **–कहना** (کہنا –) गझल लिहिणे. **–ख़्वाँ** (خواں –); **–गो** (گو –) वि. ('अ.+फ़ा.) गझल लिहिणारा, म्हणणारा, ऐकविणारा. **–ख़्वानी** (خوانی –); **–गो'ई** (گوئی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) गझल लिहिणे, ऐकविणे, म्हणणे. **–सरा** (سرا –) वि. ('अ.+फ़ा.) गझल ऐकविणारा, म्हणणारा. **–सरा'ई** (سرائی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) गझल गायन; गझलपाठ.

ग़ज़वः (غزوہ); **ग़ज़ा** (غزا) पु. ('अ.) धर्मयुद्ध; इस्लामसाठी केलेले युद्ध.

गज़ाफ़ (گزاف); **गज़ाफ़ः** (گزافہ) पु. (फ़ा.) (१) असत्य; कपट. (२) घमेंड.

ग़ज़ाल (غزال) पु. ('अ.) (१) हरिणाचे पाडस; मृगशावक. (२) हरीण. (३) सूर्य. **–चश्म** (چشم –) वि. ('अ.+फ़ा.) हरिणाक्षी; टपोरे डोळे असलेला (ली).

ग़ज़ाली (غزالی) वि. (फ़ा.) गजाला गावचा रहिवासी. (पु.) इमाम मुहम्मद ग़जाली (एक विद्वान लेखक).

ग़ज़ालः (غزالہ) पु. स्त्री. ('अ.) (१) मृगशावक; हरिणाचे पाडस (स्त्री.) (२) सूर्य. **–चश्म** (چشم –) वि. ('अ. + फ़ा.) मृगनयनी. (३) इराणातील एक गाव.

द'अवाँ जुबाँ का लखनऊवालों के सामने।
इज़हार-ए-बू-ए-मुश्क ग़ज़ालों के सामने॥

गज़िंदः (گزندہ) वि. (फ़ा.) चावणारा; डसणारा; डंख मारणारा.

गज़ीं (گزیں) वि. (फ़ा.) उत्तम; पसंत पडलेले.

गज़ी (گزی) स्त्री. (फ़ा.+हिं.) जाडेभरडे सुती कापड; खादी; मांजरपाट.

गज़ीत (گزیت) पु. (फ़ा.) (१) कर. (२) जमीनधारा; सारा. (३) खंडणी.

गज़ीद (گزید) स्त्री. (फ़ा.) (१) कर. (२) सारा. (वि.) कापलेला; चावला गेलेला.

गज़ीदः (گزیدہ) वि. (फ़ा.) चावला गेलेला; दंश झालेला.

ग़ज़ीर (غزیر) पु. वि. ('अ.) (१) बाहुल्य; अधिकता. (२) खूप पाऊस पडणे; अतिवृष्टी. (३) खूप पाणी असलेले तळे किंवा विहीर. (४) अश्रूंनी डंबडबलेले नेत्र.

ग़ज़्ज़ाल (غزال) पु. ('अ.) दोऱ्या वळणारा व विकणारा.

ग़ज़नवी (غزنوی) वि. (फ़ा.) 'ग़ज़नी' चा रहिवासी. (पु.) सुलतान महमूद गझनवी.

ग़ज़नी (غزنی); **ग़ज़नी** (غزنی) पु. (फ़ा.) अफगाणीस्तानातील एक प्रसिद्ध शहर.

ग़ज़ल (غزل) पु. ('अ.) (१) दोरी वळणे. (२) दोरी वळण्याची सुते.

गज़लक (گزلک) पु. (फ़ा.) चाकू; सुरी.

ग़ज़वः (غزوہ) पु. ('अ.) (१) धर्मासाठी, इस्लामसाठी केले जाणारे युद्ध. (२) ज्या धर्मयुद्धात स्वतः हजरत मुहम्मद पैगंबरांनी भाग घेतला होता असे युद्ध.

ग़तफ़ (غطف) पु. ('अ.) नेत्राची विशालता; भुवयांची दीर्घता.

ग़तीत् (غطیط); **ग़तीतः** (غطیطہ) पु. ('अ.) घोरणे; घोरण्याचा आवाज.

ग़तस (غطوس) वि. ('अ.) युद्धात व संकटाच्या वेळी पुढे राहणारा; शूर.

ग़त्त (غط) पु. ('अ.) (१) पाण्यात डुबकी देणे; बुडविणे. (२) आरडाओरडा करणे. (३) झाकणे; लपविणे.

ग़त्तास (غطاس) पु. ('अ.) (१) पाणबुडी. (२) पाणबुड्या; मोती शोधण्यासाठी समुद्राच्या तळाशी जाणारा. (३) खंड्या (पक्षी).

गद (گد) पु. [फ़ा. 'गिदयः' (گدیہ) चे संक्षिप्त.] भिक्षा मागणे; फकिरी.

ग़द (غد) पु. ('अ.) उद्याचा दिवस.

ग़ज़्ज़र (غضنفر) पु. ('अ.) (१) सिंह. (२) वाघ. (३) बहादूर; वीर.

ग़दफ़ (غدف) पु. ('अ.) समृद्धी; संपन्नता; वैपुल्य.

ग़ज़ब (غضب) पु. ('अ.) (१) क्रोध; राग. (२) कोप; दैवी प्रकोप; आपत्ती. (३) जुलूम; अन्याय; हिंसा. **–आलूद** (آلود –); **–आलूदः** (آلودہ –) वि. ('अ.+फ़ा.) क्रोधयुक्त; जुलूम करणारा. **–का** (ناک –) वि. ('अ.+हिं.) (१) विलक्षण कमालीचा. (२) भयंकर. (३) परिणामकारक. (४) अत्यंत वाईट. **–नाक** (ناک –) वि. ('अ. + फ़ा.) (१) क्रुद्ध. (२) भयंकर.

ग़ज़्बान (غضبان) वि. ('अ.) क्रुद्ध; चवताळलेला पु. (फ़ा.) शत्रूवर मारा करावयाचें दगड.

ग़दर (غدر) पु. ('अ.) (१) काळोखी रात्र. (२) खडकाळ जमीन.

गदा (گدا) वि. (फ़ा.) (१) भिकारी. (२) भिक्षुक; फकीर. **–ई** (ئی –) स्त्री. (फ़ा.) भीक; भिक्षावृत्ती **–गर** (گر –) पु. (फ़ा.) (१) भिकारी. (२) भिक्षुक; फकीर. **–गरी** (گری –) स्त्री. (फ़ा.) भीक मागण्याचे काम; भिक्षावृत्ती; भीक.

ग़दीद (غضیض) वि. ('अ.) (१) नवीन; ताजा. (२) प्रफुल्लित. (पु.) नवी कळी.

ग़दीर (غدیر) पु. ('अ.) तळे; डबके. (वि.) फसवा; कपटी.

ग़दीरः (غدیرہ) पु. ('अ.) केसांची वेणी.

ग़दूर (غدور) वि. ('अ.) कृतघ्न.

ग़द्दार (غدار) वि. ('अ.) (१) बंडखोर. (२) बेइमान; कृतघ्न. (३) देशद्रोही. (४) खूप मोठा; विशाल (नगर).

ग़द्दारी (غداری) स्त्री. ('अ.) (१) बंडखोरपणा. (२) कृतघ्नता. (३) देशद्रोह.

ग़द्र (غدر) पु. ('अ.) (१) बंड: (२) क्रांती. (३) खळबळ; दंगाधोपा; लुटालूट. (४) भयंकर अव्यवस्था; गोंधळ.

ग़द्व (غدو) पु. ('अ.) उद्या; उद्याचा दिवस.

ग़द्वः (غدوہ) पु. ('अ.) उषा; उषःकाल.

ग़नम (غنم) स्त्री. ('अ.) (१) बकरी; शेळी. (२) मेंढी.

ग़ना (غنا) पु. ('अ.) (१) लाभ; नफा; प्राप्ती. (२) संपत्ती; समृद्धी.

ग़ना'इम (غنائم) पु. ['अ. 'ग़नीमत' (غنیمت) चे अनेक.] युद्धात लुटलेली मालमत्ता.

ग़नी (غنی) वि. ('अ.) (१) श्रीमंत; धनवान. (२) निश्चित; बेपर्वा. (३) निस्पृह. (४) स्वतंत्र.

ग़नीम (غنیم) पु. ('अ.) (१) लुटारू. (२) शत्रू; प्रतिस्पर्धी.

ग़नीमत (غنیمت) स्त्री. ('अ.) (१) युद्धामध्ये लुटालुटीत मिळालेला शत्रूचा माल; लूट. (२) फुकटचा माल; परिश्रम न करता मिळालेली वस्तू. (३) दुःखात सुखाची गोष्ट. (४) वैपुल्य. (वि.) उत्तम; उत्कृष्ट. **–जानना** (جاننا –) कदर करणे.

ग़नूदगी (غنودگی) स्त्री. ('अ.) झोपेची झापड; पेंग.

गप (گپ) स्त्री. (फ़ा.) **ग़प** (غپ) स्त्री. (हिं.) (१) गप्पागोष्टी. (२) गप्पा थाप; बनावट गोष्ट. (३) अफवा. **–बाज** (باز –) वि. (फ़ा.) थापेबाज; थापाडधा; गप्पीदास. **–शप** (شپ –) स्त्री. (फ़ा.+हिं.) गप्पागोष्टी.

ग़फ़ (غف) वि. ('अ.) (१) जाड; दाट; दाट विणीचे (कापड). (२) कुरळे (केस).

ग़फ़र (غفر) पु. ('अ.) (१) बारीक गवत; हिरवळ. (२) चेहऱ्यावरील केस; लव. (३) मानेवरील केस.

ग़फ़ीर (غفیر) वि. ('अ.) (१) खूप; पुष्कळ; मोठा. (२) झाकून टाकणारा; इतकी भयंकर गर्दी की पलीकडील काही दिसू नये. (पु.) सबंध डोके झाकून टाकणारी पोलादी टोपी; शिरस्त्राण.

ग़फ़ूर (غفور) वि. ('अ.) (१) क्षमा करणारा. (२) मोक्षदाता. (३) ईश्वराचे एक विशेषण.

ग़फ़्फ़ार (غفار) वि. ('अ.) (१) खूप मोठा; दया करणारा; दयाळू. (२) मोक्षदाता. (३) ईश्वराचे एक नाव.

ग़फ़्र (غفر) पु. ('अ.) (१) झाकणे. (२) पापाची क्षमा करणे. (३) केसांना रंग लावून त्याचा पांढरेपणा लपविणे. (४) वैभवाचे आधिक्य; ऐषआराम.

ग़फ़्ल (غفل) पु. ('अ.) (१) निश्चेष्टता; जडता. (२) विस्मृती.

ग़फ़्लत (غفلت) स्त्री. ('अ.) (१) बेसावधगिरी; असावधानी; दुर्लक्ष. (२) निष्काळजीपणा; उपेक्षा; बेपर्वाई. (३) निश्चेष्टता; बेशुद्धी. (४) उणीव. (५) चूक. (६) आळस. (७) गाढ झोप. **–आश्ना** (آشنا –) वि. ('अ.+फ़ा.) सुस्त; आळशी. **–कदः** (کدہ) पु. ('अ.+फ़ा.) बेसावधगिरीचे स्थान; जग. **–कार** (کار –) वि. ('अ. + फ़ा.) बेसावध. **–जदः** (زدہ –) वि. ('अ.+फ़ा.) (१) बेसावध. (२) बेशुद्ध. (३) आळशी. **–पेशः** (پیشہ –) वि. ('अ.+फ़ा.) **–शि'आर** (شعار –) वि. ('अ.) बेसावध; आळशी.

ग़फ़्स (غفص) वि. ('अ.) जाडजूड; घट्ट; दाट.

ग़बग़ब (غبغب) पु. ('अ.) (१) लठ्ठ माणसाच्या हनुवटीखाली वाढलेले मांस. (हे एक सौंदर्याचे

लक्षण समजले जाते). (२) जनावरांच्या मानेखालील पोळी.

ग़बन (غبن) पु. ('अ.) (१) बुद्धिभ्रंश; विस्मृती. (२) बेशुद्ध करणे.

ग़बरः (غبرہ) पु. ('अ.) धूळ; माती. (पुष्कळ झाडे असलेली जमीन).

ग़बावत (غباوت) स्त्री. ('अ.) बुद्धिमांद्य; मूढता.

ग़बी (غبی) वि. ('अ.) मंदबुद्धी; मूढ.

ग़बीन (غبین) वि. ('अ.) अस्थिर मताचा; चुकीची मते बाळगणारा.

ग़बूक़ (غبوق) स्त्री. ('अ.) (१) सायंकाळचे मद्यपान. (२) मद्य; व्हिस्की.

गब्ज़ (گبز) पु. (फ़ा.) (१) गुबगुबीत. (२) लठ्ठ; जाडजूड.

ग़ब्न (غبن) पु. ('अ.) (१) माल देण्याघेण्यातील तूट; नुकसान. (२) अफरातफर; अपहरण.

ग़ब्न-ए-फ़ाश (غبن فاش) पु. ('अ.) जाहीर अफरातफर; फार मोठी अफरातफर.

ग़ब्न-ए-फ़ाहिश (غبن فاحش) पु. (फ़ा.) (१) व्यापारातील मोठी ठोकर. (२) निर्लज्जपणे केलेली अफरातफर.

गब्र (گبر) पु. (फ़ा.) अग्निपूजक; पारशी.

ग़ब्रा (غبرا) पु. ('अ.) खूप धूळ; माती; झाडे असलेली जमीन.

ग़म (غم) पु. ('अ.) (१) दुःख; शोक. (२) चिंता; काळजी. (३) खेद; मनस्ताप. (४) क्लेश. (५) ईर्षा. (६) विलाप. **–अंगेज़** (انگیز –) वि. ('अ.+फ़ा.) दुःख वाढविणारा. **–आगी** (آگیں –); **–आलूद** (آلود –); **–आलूदः** (آلودہ –) वि. ('अ.+फ़ा.) दुःखपूर्ण. **–कदः** (کدہ –) पु. ('अ.+फ़ा.) दुःखाचे घर; शोकगृह; जेथे कोणीतरी वारले आहे असे घर. **–कश** (کش –) वि. ('अ.+फ़ा.) दुःख सहन करणारा; शोकग्रस्त. **–खानः** (خانہ –) पु. ('अ. + फ़ा.) शोकगृह. **–खाना** (کھانا –) दुःख सहन करणे. **–ख़ोर** (خور –) वि. ('अ.+फ़ा.) दुःख सहन करणारा; सहनशील. **–ख़्वार** (خوار –) वि. ('अ. + फ़ा.) (१) दुःखात सहानुभती बाळगणारा; सहभागी होणारा. (२) सहनशील. **–ख़्वारी** (خواری –) स्त्री. ('अ.+फ़ा.) सहानुभूती. **–ग़लत़** (غلط –) पु. ('अ.) (१) मनोरंजनाचे साधन; दुःख विसरण्याचे साधन. (२) खेळ. (३) मद्य. **–ग़लत़ करना** (غلط کرنا –) दुःखाचा विसर पाडणे; मन वितणे. **–गी** (گیں –); **–गीन** (گین –) वि.('अ.+फा.) (१) दुःखी. (२) उदास; खिन्न. **–गीनी** (گینی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) उदासीनता; दुःख. **–गुसार** (گسار –) वि. ('अ. + फ़ा.) दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होणारा; दुःखभार हलका करणारा; मित्र. **–गुसारी** (گساری –) स्त्री. ('अ.+फ़ा.) सहानुभूती. **–ज़दः** (زدہ –) शोकग्रस्तता; दुःखात असणे. **–ज़दगी** (زدگی –) वि. ('अ. + फ़ा.) शोकग्रस्त; दुःखी. **–दीदः** (دیدہ –) वि. ('अ. + फ़ा.) दुःखी. **–दोस्त** (دوست –) वि. ('अ.+फ़ा.) दुःखात रममाण होणारा; निराशावादी. **–नाक** (ناک –) वि. ('अ.+फ़ा.) दुःखपूर्ण; हृदयद्रावक. **–रसीदः** (رسیدہ –) वि. ('अ. + फ़ा.) दुःखी; शोकार्त.

ग़म-ए-गीती (غم گیتی) पु. ('अ. + फ़ा.) संसारिक दुःख; ऐहिक कष्ट.

ग़म-ए-दिल (غم دل) पु. ('अ.+फ़ा.) हृदयव्यथा.

ग़म-ए-दौरां (غم دوراں) पु. ('अ.+फ़ा.) ऐहिक दुःख.

ग़म-ए-पिन्हां (غم پنہاں) पु. ('अ.+फ़ा.) (१) मानसिक दुःख. (२) प्रीतीची व्यथा.

ग़म-ए-रोज़गार (غم روزگار) पु. ('अ. + फ़ा.) संसारिक दुःख.

ग़म-ओ-रंज (غم و رنج) पु. ('अ.+फ़ा.) दुःख व त्रास; संकटे.

ग़मज़ (غمز) पु. ('अ.) (१) अशक्त पुरुष किंवा पशू. (२) वाईट माल. (३) कुमार्गाने मिळविलेले धन.

ग़मरात (غمرات) पु. ['अ. 'ग़मरः' (غمرہ) चे अनेक.] संकटे; जुलूम; आपत्ती.

ग़मी (غمی) स्त्री. ('अ.) (१) विलाप; शोक. (२) मृत्यू. (३) दुःख.

ग़म्ज़ (غمز); **ग़म्ज़ः** (غمزہ) पु. ('अ.) (१) नेत्रसंकेत; इशारा. (२) प्रेमिकेचा नखरा; हावभाव; नेत्रकटाक्ष.

ग़म्द़ (غمض) पु. ('अ.) (१) लपलेला खड्डा. (२) सहजासहजी लक्षात न येणारी, सूक्ष्म गोष्ट.

ग़म्माज़ (غماز) वि. (फ़ा.) (१) चहाडखोर. (२) डोळ्यांच्या खुणेने चहाडी करणारा. (३) हेर. (४) दोष शोधणारा.

ग़म्माज़ी (غمازی) स्त्री. ('अ.) चहाडी; निंदा; अपशब्द.

ग़म्र (غمر) पु. ('अ.) (१) खूप पाणी. (२) उदार, दानी पुरुष. (३) शूर. (४) तहानेला असणे.

ग़म्स़ (غمص) पु. ('अ.) (१) एखाद्याला तुच्छ समजणे; दोष काढणे. (२) कृतघ्नता.

ग़यावत (غیابت) स्त्री. ('अ.) (१) लुप्त होणे. (२) विहिरीची खोली.

ग़यूर (غیور) वि. ('अ.) (१) स्वाभिमानी. (२) लज्जा बाळगणारा; लाजाळू. (३) हेवा करणारा.

ग़य्याफ़ (غیاف) वि. ('अ.) लांब व दाट दाढी असणारा.

गर (گر) अव्य. [फ़ा. 'अगर' (اگر) चे संक्षिप्त.] जर; यदि.

गर (گر) प्रत्य. (फ़ा.) करणारा; बनविणारा. [उदा. 'ज़रगर' (زرگر) सुवर्णकार; सोनार. 'सितमगर' (ستم گر) अत्याचार करणारा].

ग़र (غر) स्त्री. (फ़ा.) व्यभिचारी; कुलटा. (वि.) म्याड; भित्रा.

ग़रक़ (غرق) पु. ('अ.) पाण्यात बुडणे. (वि.) (१) बुडालेला. (२) तल्लीन.

ग़रक़ाब (غرقاب) वि. ('अ.) पाण्यात बुडालेला. (पु.) पुरुषभर पाणी.

ग़रक़ी (غرق) स्त्री. ('अ.) पूर.

ग़रग़रः (غرغرہ) पु. ('अ.) (१) गुळणी; चूळ. (२) शिजण्याचा आवाज. (३) घशाची घरघर.

ग़रज़ (غرض) स्त्री. ('अ.) (१) इच्छा. (२) उद्देश. (३) आशय; तात्पर्य; अर्थ; प्रयोजन. (४) गरज; जरुरी; उपयोग. (५) स्वार्थ. (६) संबंध. (अव्य.) थोडक्यात असे की; सारांश. **–आश्ना** (آشنا –) वि. ('अ.+फ़ा.) स्वार्थी; स्वार्थपरायण. **–मंद** (مند –) ('अ.+फ़ा.) गरजू; इच्छुक.

ग़रज़ियः (غرضیہ); **ग़रज़ी** (غرضی) वि. ('अ.) (१) गरजू. (२) स्वार्थी.

ग़रदिल (غردل) वि. ('अ. + फ़ा.) (१) म्याड; भित्रा. (२) दुर्बळ.

ग़रज़ी कि. (غرضی کہ) अव्य. ('अ.+फ़ा.) तात्पर्य हे की; सारांश.

ग़रर (غرر) पु. ('अ.) (१) शंका. (२) भीती. (३) अट.

ग़रा'इब (غرائب) पु. [अ. 'ग़रीबः' (غریبہ) चे अनेक.] अद्‌भुत गोष्टी; आश्चर्यकारक घटना.

ग़राम (غرام) पु. ('अ.) (१) दंड. (२) दुष्टता. (३) लोभ; मोह. (४) हत्या; यातना. (५) प्रेम.

ग़रारः (غرارہ) पु. (फ़ा.) गुळणी; चूळ.

ग़रारः (غرارہ) पु. ('अ.) (१) फसणे; फसवणूक. (२) अपरिपक्वता; अननुभवीपणा.

ग़रीक़ (غریق) वि. ('अ.) पाण्यात बुडालेला; निमग्न.

ग़रीक़-ए-रह़मत (غریق رحمت) वि. ('अ.) ईश्वरी दयेत निमग्न (मृत व्यक्तीसाठी).

ग़रीज़ (غریز); **ग़रीज़त** (غریزت) स्त्री. ('अ.) मूळ प्रकृती; सवय; स्वभाव.

ग़रीज़ी (غریزی) वि. ('अ.) स्वाभाविक; प्राकृतिक; नैसर्गिक.

ग़रीद (غریض) वि. ('अ) ताजा; नवीन; प्रफुल्ल. (पु.) पावसाचे पाणी; प्रत्येक ताजी व शुभ्रवस्तू; कळी.

ग़रीब (غریب) वि. ('अ.) (१) प्रवासी; प्रवासात असलेला. (२) परदेशी. (३) निर्धन; दरिद्री. (४) दीन; लाचार. (५) दुःखी. (६) विचित्र. **–आज़ार** (آزار –) वि. ('अ.+फ़ा.) गोरगरिबांना त्रास देणारा; दीनपीडक. **–ख़ानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) गरीबाचे घर; जेथे काही सुखसोयी नाहीत असे घर. (बोलणारा स्वतःच्या घराचा उल्लेख करताना 'माझे घर' या अर्थाने 'ग़रीबखाना' हा शब्द वापरतो). **–ग़ुरबा** (غربا –) पु. ('अ.) गोरगरीब लोक. **–ज़ादः** (زادہ –) पु. ('अ.+फ़ा.) भटक्याचा मुलगा; वेश्यापुत्र; ज्याच्या पित्याची माहिती नाही असा मुलगा. **–नवाज़** (نواز –); **–परवर** (پرور –) वि. ('अ. + फ़ा.) गरीबांचा कैवारी; कनवाळू; दीनवत्सल.

ग़रीब-उद्-दयार (غریب الدیار); **ग़रीब-उल्-वतन** (غریب الوطن) वि. ('अ.) (१) मुसाफीर; प्रवासी; आपल्या मातृभूमीपासून दूर असलेला. (२) ज्याला घरदार किंवा मातृभूमी नाही असा.

ग़रीब-ए-शहर (غریب شہر) वि. ('अ. + फ़ा.) शहरामध्ये ज्याची कोणाशी ओळखपाळख नाही असा; बिचारा.

ग़रीबी (غریبی) स्त्री. ('अ.) (१) आपल्या घरापासून, देशापासून दूर असणे; प्रवासात असणे; विदेशवास. (२) दारिद्र्य. (३) दीनता.

ग़रीबः (غریبہ) पु. स्त्री. ('अ.) (१) दुर्मिळ; दुर्लभ वस्तू. (२) अद्‌भुत गोष्ट.

ग़रीम (غریم) वि. ('अ.) ऋणको; कर्जदार; ऋणी.

ग़रीर (غریر) पु. ('अ.) सुस्वभाव; चांगली सवय. (वि.) (१) अननुभवी (तरुण). (२) जामीन; प्रतिभू.

ग़रूर (غرور) वि. ('अ.) फसवा; धोकेबाज. (स्त्री.) जग. (पु.) (१) सैतान. (२) गुळण्या करण्याचे औषध.

ग़र्क़ (غرق) पु. ('अ.) पाण्यात बुडणे. (वि.) बुडालेला; निमग्न.

ग़र्क़ाब (غرقاب) पु. ('अ. + फ़ा.) (१) बुडणे. (२) पुरुषभर खोलीपेक्षा जास्त पाणी; खोल पाणी. (वि.) बुडालेला.

ग़र्क़ी (غرق) स्त्री. ('अ.) (१) बुडणे. (२) पूर. (३) विणकरांच्या मागाचा खड्डा.

ग़र्क़ः (غرقہ) वि. ('अ.) बुडालेला; निमग्न.

ग़र्क़ः-ए-ख़ूं (غرقۂ خوں) वि. ('अ. + फा.) रक्तात बुडालेला.

ग़र्चक (غرچک) वि. (फ़ा.) मूर्ख; मठ्ठ.

ग़र्चः (غرچہ) वि. (फ़ा.) (१) नपुंसक; नामर्द. (२) मठ्ठ.

ग़र्चि. (گرچہ) अव्य. [फा. 'अगर्चि.' (اگرچہ) चे संक्षिप्त.] जरी; यद्यपि.

गर्दंग (گردنگ) पु. (फ़ा.) भडवा; आपल्या पत्नीचा शीलविक्रय करावयास लावून त्यावर पोट भरणारा.

गर्द (گرد) स्त्री. (फ़ा.) (१) धूळ; माती; राख. (२) शहर. (३) सूर्य. (४) खेद. (५) लाभ. (प्रत्य.) फिरणारा [उदा. 'जहाँगर्द' (جہاں گرد) जगभर भटकणारा]. **-आलूद** (آلود –); **-आलूदः** (آلودہ –) वि. (फ़ा.) धुळीने भरलेला; गलिच्छ; धूलिधूसरित. **-ख़ोर** (خور –) वि. (फ़ा.) मळखाऊ.

गर्द-ए-मलाल (گرد ملال) स्त्री. (फ़ा. + 'अ.) मनातील घाण; मनोमालिन्य.

गर्द-ए-सफ़र (گرد سفر) स्त्री. (फ़ा.+'अ.) प्रवासाचा शीण.

गर्दन (گردن) स्त्री. (फ़ा.) मान; गळा; कंठ. **-कश** (کش –) वि. (फ़ा.) (१) उद्धट; घमेंडखोर. (२) अवज्ञा करणारा; बंडखोर. **-कशी** (کشی –) स्त्री. (फ़ा.) (१) अवज्ञा; बंड. (२) उद्धटपणा. **-ज़न** (زن –) वि. (फ़ा.) मान कापणारा; कसाई; मांग. **-फ़राज़** (فراز –) वि. (फ़ा.) मान ताठ करून चालणारा; गौरवशाली; श्रेष्ठ स्थानावर असलेला. **-बंद** (بند –) पु. (फ़ा.) (१) काजवा. (२) नेकटाय. **-बारीक** (باریک –) वि. (फ़ा.) (१) दीन; लाचार. (२) नम्र.

गर्दनी (گردنی) स्त्री. (फ़ा.) (१) अर्धचंद्र; मानेवर मारलेली थप्पड. (२) घोड्याच्या पाठीवर घालण्याचे एक कापड. (३) कुस्तीतील एक पेच. (४) सदऱ्याचा गळा.

गर्दनः (گردنہ) पु. (फ़ा.) (१) डोंगराची चढण. (२) डोंगरातील घाट.

गर्दां (گرداں) वि. (फ़ा.) फिरणारा; फिरत असलेला.

गर्दान (گردان) स्त्री. (फ़ा.) (१) फिरणे; फेरे घालणे. (२) क्रियापदे वगैरे चालविणे; पुनरावृत्ती (व्या.).

गर्दिन्दः (گردندہ) वि. (फ़ा.) गोलगोल फिरणारा; चक्कर खाणारा.

गर्दिश (گردش) स्त्री. (फ़ा.) (१) फेरा; चक्कर; चक्र. (२) दुर्दैव. (३) विपत्ती; संकट. (४) कालचक्र. (५) भ्रमण; भटकणे. **-ज़दः** (زدہ –) वि. (फ़ा.) कालचक्रग्रस्त; विपत्तिग्रस्त.

गर्दिश-ए-अय्याम (گردش ایام); **गर्दिश-ए-ज़मानः** (گردش زمانہ); **गर्दिश-ए-दौरां** (گردش دوراں) स्त्री. (फ़ा.+'अ.) कालचक्र; बरेवाईट दिवस.

गर्दिश-ए-क़िस्मत (گردش قسمت) स्त्री. (फ़ा.+'अ.) **गर्दिश-ए-बख़्त** (گردش بخت) स्त्री. (फ़ा.) नशिबाचा फेरा; भाग्यचक्र.

गर्दिश-ए-पैमानः (گردش پیمانہ) स्त्री. (फ़ा.) मद्यचषकाचा फेरा; आळीपाळीने मद्यपान करणे.

गर्दिश-ए-पैहम (گردش پیہم) स्त्री. (फ़ा.) निरंतर चक्र; सतत आपत्ती येणे.

गर्दिश-ए-लैल-ओ-निहार (گردش لیل و نہار) स्त्री. (फ़ा.+'अ.) रात्र व दिवस यांचे चक्र; कालचक्र.

गर्दीदः (گردیدہ) वि. (फ़ा.) (१) फिरलेला. (२) परत आलेला.

गर्दूं (گردوں) पु. (फ़ा.) (१) आकाश; अंतरिक्ष. (२) गाडी; छकडा; रथ; चाक. **-असास** (اساس –) वि. (फ़ा. + 'अ.) ज्याचा पाया आकाशात आहे असा; अत्यंत उच्च स्थान असलेला. **-इक़्तिदार** (اقتدار –) वि. (फ़ा.+'अ.) आकाशासारखी विशाल सत्ता असणारा; अत्यंत प्रतिष्ठित. **-जाह** (جاہ –) वि. (फ़ा.) खूप मोठ्या स्थानावरील; प्रतिष्ठित. **-सरीर** (سریر –) वि. (फ़ा.+'अ.) ज्याचे सिंहासन आकाशात आहे असा; अत्यंत महत्त्वाचे स्थान असलेला. **-सिरिश्त** (سرشت –) वि. (फ़ा.) (१) घमेंडखोर. (२) स्वार्थी; नीच.

गर्दः (گردہ) पु. (फ़ा.) (१) धूळ; माती. (२) चित्रकारांचा आराखडा; सुईने कागदाला भोके पाडून त्यावर कोळशाची पूड फासून वेलबुट्टी काढली जाते. या कोळशाच्या भुकटीला अथवा भोके पाडलेल्याही 'गर्दः' असे म्हणतात.

ग़र्नातः (غرناطہ) पु. ('अ.) स्पेनमधील एक शहर; ग्रॅंडा.

ग़र्ब (غرب) पु. ('अ.) (१) पश्चिम (दिशा). (२) खाली बसणे; मावळणे. (३) पाण्याचा मोठा पोहरा; डोणी.

ग़र्बाल (غربال) स्त्री. ('अ.) चाळण; चाळणी.

ग़र्बी (غربی) वि. ('अ.) पश्चिमेशी संबंधित; पाश्चात्य.

गर्म (گرم) वि. (फ़ा.) (१) कढत; तापलेला; ऊन्ह; उष्ण. (२) तीव्र; कडक. (३) क्रुद्ध. (४) वेगवान.

(५) तत्पर. (६) तेजीचा. **–इख़्तिलाती** (اختلاطی –) स्त्री. (फ़ा. + 'अ.) दाट; घनिष्ठ मैत्री. **–'इनां** (عنان –) वि. (फ़ा. + 'अ.) वेगवान घोडा. **–ख़ुं–** (خوں –) वि. (फ़ा.) (१) घनिष्ठ. मित्र; लंगोटियार. (२) दयाळू. **–ख़ू** (خو –) वि. (फ़ा.) तापट. **–ख़ेज़** (خیز –) वि. (फ़ा.) तत्पर; उत्साही. **–गर्म** (گرم –) वि. (फ़ा.) गरमागरम. **–जोशी** (جوشی –) स्त्री. (फ़ा.) उत्साह; प्रेम; औत्सुक्य; आस्था; दिलखुलासपणा. **–जौलां** (جولاں –) वि. (फ़ा.) द्रुतगती; शीघ्रगामी. **–तर** (تر –) वि. (फ़ा.) (१) अधिक उष्ण. (२) ज्या औषधात उष्णते-वरोबरच ओलावा आहे असे. **–दिमाग़** (دماغ –) वि. (फ़ा. + 'अ.) घमेंडखोर; तापट. **–बाजारी** (بازاری –) स्त्री. (फ़ा.) तेजी; चांगली विक्री. **–मिजाज** (مزاج –) वि. (फ़ा. + 'अ.) तापट; चिडखोर. **–रफ़्तार** (رفتار –); **–रौ** (رو –) वि. (फ़ा.) वेगवान. **–रवी** (روی –) स्त्री. (फ़ा.) वेगाने चालणे; वेग. **–सेर** (سیر –) पु. (फ़ा.) जेथील हवामान उष्ण आहे असे स्थान. **–सर्द** (سرد –) वि. (फ़ा.) कोमट.

गर्म-ए-सुख़न (گرم سخن) वि. (फ़ा.) संभाषण करीत असलेला.

गर्म-ओ-सर्द (گرم و سرد) वि. (फ़ा.) शीतोष्ण; कोमट. (पु.) संसारिक सुखदुःखे. **–चशीदः** (چشیدہ –) वि. (फ़ा.) संसारिक सुखदुःखे ज्याने सहन केली आहेत असा; अनुभवी.

गर्मक (گرمک) वि. (फ़ा.) कमी उष्ण. (पु.) (१) सफेद खरबूज. (२) उकडलेले मटार.

गर्मा (گرما) पु. (फ़ा.) ग्रीष्म ऋतू; उन्हाळा.

गर्मा'ई (گرمائی) स्त्री. (फ़ा. + हिं.) (१) गरमी; उष्णता. (२) शरीरात उष्णता उत्पन्न करणारा पदार्थ; उत्तेजक वस्तू.

गर्मागर्मी (گرما گرمی) स्त्री. (फ़ा.) (१) बाचाबाची; बोलाचाली. (२) आवेश; उत्साह.

गर्माबः (گرمابہ) पु. (फ़ा.) (१) कढत पाणी मिळण्याचे ठिकाण; स्नानगृह. (२) कढत पाण्याची टाकी. (३) गरम पाण्याचे स्नान.

गर्मी (گرمی) स्त्री. (फ़ा.) (१) उष्णता; तपमान. (२) उन्हाळा. (३) उपदंश; गर्मी (रोग). (४) काम-वासना. (५) क्रोध. (६) तीव्रता. (७) घमेंड. **–दानः** (دانہ –) पु. (फ़ा.) घामोळे.

गर्मी-ए-बाज़ार (گرمئ بازار) स्त्री. (फ़ा.) बाजारातील तेजी; मालाला खूप मागणी असणे.

ग़र्रः (غرہ) पु. ('अ.) (१) गर्व; घमेंड. (२) मुग्ध, मोहित होणे.

ग़र्स़ (غرث) स्त्री. ('अ.) भूक; क्षुधा.

ग़र्स़ान (غرثان) वि. ('अ.) उपाशी; क्षुधित.

ग़ल (غل) पु. ('अ.) (१) येणे. (२) आणणे.

ग़लत़ (غلط) वि. ('अ.) (१) चुकीचे; चुकलेले. (२) अशुद्ध. (३) असत्य; खोटे. (४) अनुचित. (पु.) (१) चूक. (२) हिशेबातील. चूक. **–अंदाज़** (انداز –) वि. ('अ.+फा.) (१) ज्याचा नेम चुकला आहे किंवा चुकतो असा. ('निमबाज़' च्या उलट) लक्ष्यभ्रष्ट. (२) गैरसमज करणारी (दृष्टी); तिरळी (नजर). **–कार** (کار –) वि. ('अ.+फ़ा.) चुका करणारा; सदोष काम करणारा. **–गो** (گو –) वि. ('अ. + फ़ा.) खोटे बोलणारा; असत्यवादी. **–नामः** (نامہ –) पु. ('अ. + फ़ा.) शुद्धिपत्र (ग्रंथातील). **–फ़हमी** (فہمی –) स्त्री. ('अ.) (१) गैरसमज; समजुतीचा घोटाळा. (२) भ्रम. **–बयाँ** (بیاں –) वि. ('अ.) खोटे बोलणारा. **–बयानी** (بیانی –) स्त्री. ('अ.) असत्य भाषण; खोटे बोलणे. **–बर्दार** (بردار –) वि. पु. ('अ.+फ़ा.) (१) खोडरबर, कागदावर लिहिलेला चुकीचा मजकूर खोडणारे रबर. (२) ज्याच्यावरील अक्षरे सहज पुसली जातात असा कागद. **–बीं** (بیں –) वि. ('अ.+फ़ा.) वि. ज्याला इतरांचे केवळ दोषच दिसतात असा, दोषैकदृष्टी. **–बीनी** (بینی –) स्त्री. ('अ. +फ़ा.) केवळ दोष पहाणे. **–समझना** (سمجھنا –) गैरसमज करून घेणे; चुकीचा ग्रह करून घेणे.

ग़लत़-उल्-'अवाम (غلط العوام) पु. ('अ.) अशिक्षित व अडाणी लोकांची केलेली अथवा ते करीत असलेली चूक.

ग़लत़-उल्-'आम (غلط العام) पु. ('अ.) शिकलेले व अशिक्षित असे सर्वच लोक करीत असलेली चूक; विद्वानांनी मान्यता दिलेली (शुद्ध : मानलेली) चूक.

ग़लती (غلطی) स्त्री. ('अ.) (१) चूक; भूल. (२) भ्रम. **–से** (سے –) चुकून.

ग़लत़ः (غلط) पु. ('अ.) (१) एक प्रकारचे जाड कापड. (२) तलवारीचे कातडी म्यान.

ग़लफ़ (غلف) पु. ('अ.) (१) एखाद्या वस्तूला आवरण (गिलाफ) घालणे; पत्र लखोटचात घालणे. (२) 'ख़त्नः' न करणे; खूप संभोग करणे. (३) वैभवाचे बाहुल्य; खाद्यवस्तूंची विपुलता.

ग़लबः (غلبہ) पु. ('अ.) (१) प्रभुत्व; सत्ताजोर. (२) प्राधान्य. (३) प्राचुर्य; आधिक्य. (४) बहुमत. (५) विजयप्राप्ती. (६) आक्रमण; मोठा दंगा.

ग़लयान (غلیان) पु. ('अ.) उकळी.

ग़लल (غلل) स्त्री. ('अ.) (१) तृष्णा; तहान. (२) दाह. (३) मनस्ताप.

ग़ला (غلا) पु. ('अ.) (१) दुष्काळ. (२) भाववाढ.

ग़लीज़ (غليظ) वि. ('अ.) (१) गलिच्छ; घाणेरडा; अशुद्ध. (२) सघन; जाडजूड; दळदार; भरीव. (पु.) विष्ठा; घाण.

ग़लील (غليل) वि. ('अ.) तहानेला. (पु.) (१) तहान. (२) द्वेष.

ग़ल्ताँ (غلطاں) वि. (फ़ा.) घरंगळत जाणारा; लोळणारा. **–ओ-पेचाँ** (– و پیچاں) वि. (फ़ा.) लोळत, गडगडत जाणारा; गोंधळून गेलेला; विचारात गुरफटलेला.

ग़ल्म (غلم) पु. ('अ.) कामातुर होणे; कामवासनेने बेचैन होणे.

गल्लः (گلہ) पु. (फ़ा.) कळप; झुंड; मेंढघा, गायी वगैरे पशूंचा कळप. **–बान** (بان –) पु. (फ़ा.) (१) धनगर; गुराखी. (२) धर्मरक्षक पैगंबर.

ग़ल्लः (غلہ) पु. ('अ.) (१) धान्य; पीक; अन्नधान्य. (२) दुकानात रोज जमणारी विक्रीची रोकड; विक्रीची रक्कम ठेवण्याची पेटी. **–दान** (دان –) पु. ('अ. + फ़ा.) धान्याचे कोठार. **–फ़रोश** (فروش –) पु. ('अ.+फ़ा.) धान्याचा व्यापारी. **–फ़िशाँ** (فشاں –) पु. ('अ. + फ़ा.) सूप (धान्य पाखडण्याचे).

गव (گو) पु. (फ़ा.) (१) पैलवान; मल्ल. (२) योद्धा. (३) खड्डा. [अनेक 'गवाँ' (گواں)].

ग़वामिद् (غوامض) ['अ. 'ग़ामिदः' (غامض) चे अनेक.] लपलेल्या गोष्टी; गूढ, सूक्ष्म गोष्टी.

गवार (گوار) प्रत्य. (फ़ा.) पसंत पडणारा; आवडणारा; योग्य. [उदा. 'खुशगवार' (خوش گوار) मनोहर; मनपसंत].

गवारा (گوارا); **गवारः** (گوارہ) वि. (फ़ा.) (१) पसंत; अनुकूल. (२) सह्य. **–करना** (کرنا –) सहन करणे.

गवाह (گواہ) पु. (फ़ा.) साक्षीदार; साक्षी.

गवाह-ए-'अैनी (گواہ عینی) पु. (फ़ा.+'अ.) **गवाह-ए-चश्मदीद** (گواہ چشم دید); **गवाह-ए-मुशाहिदः** (گواہ مشاهدہ) पु. (फ़ा.) प्रत्यक्षदर्शी; वस्तुस्थिती (फ़ा.+'अ.) ज्याने स्वतःच्या डोळघांनी पाहिलेली आहे असा साक्षीदार.

गवाह-ए-त'अलीमी (گواہ تعلیمی) पु. (फ़ा.+'अ.) पढविलेला साक्षीवार.

गवाह-ए-समा'अी (گواہ سماعی); **गवाह-ए-सम'अी** (گواہ سمعی) पु. (फ़ा.+'अ.) ऐकलेल्या गोष्टी सांगणारा साक्षीदार.

गवाह-ए-मर्क़ूम-उल्-हाशियः (گواہ مرقوم الحاشیہ); **गवाह-ए-हाशियः** (گواہ حاشیہ) पु. (फ़ा.+'अ.) ज्याने दस्तऐवजाच्या समासात साक्षीदार म्हणून सही केली आहे असा.

गवाह-ए-मुन्दर्जः-ए-दस्तावेज़ (گواہ مندرجۂ دستاویز) पु. (फ़ा.+'अ.) ज्यान एखाद्या दस्तऐवजावर साक्ष घातली आहे असा.

गवाही (گواهی) स्त्री. (फ़ा.) साक्ष; पुरावा.

ग़वी (غوی) वि. ('अ.) पथभ्रष्ट; मार्ग चुकलेला.

ग़व्वास् (غواص) पु. ('अ.) बुडी मारणारा; पाणबुडघा.

ग़व्वासी (غواصی) स्त्री. ('अ.) बुडी मारणे; बुडी मारून मोती काढणे.

गश (گش) वि. (फ़ा.) (१) सुंदर. (२) नखऱ्यात चालणारा (री).

ग़श (غش) पु. ('अ.) मूर्च्छा; ग्लानी.

ग़शी (غشی) स्त्री. ('अ.) मूर्च्छा; चक्कर.

गश्त (گشت) क्रि. (फ़ा.) झाले; फिरले. (पु.) (१) फिरणे; पर्यटन; दौरा; भ्रमणचक्र. (२) रात्रीचा फिरता पहारा; गस्त. **–लगाना** (لگانا –) फिरता पहारा देणे.

गश्ती (گشتی) वि. (फ़ा.) फिरणारा; पहारा देणारा; गस्तवाला. (पु.) प्रहारेकरी. **–चिठ्ठी** (چٹھی –) स्त्री. (फ़ा.+हि.) परिपत्र; सर्क्युलर.

गश्तः (گشتہ) प्रत्य. (फ़ा.) झालेला; फिरलेला; उलटलेला; बदललेला.

ग़सक (غسک) पु. (फ़ा.) ढेकूण.

ग़सक़ (غسق) स्त्री. ('अ.) रात्रीचा काळोख.

ग़स़यान (غثیان) पु. ('अ.) मळमळणे; ओकारी.

ग़सील (غسیل) वि. ('अ.) धुतलेला; शुद्ध; स्वच्छ.

ग़स्ब (غصب) पु. ('अ.) (१) अपहरण; जबरदस्तीने हिरावून घेणे. (२) एखाद्याची ठेव गडप करणे; अन्यायाने गिळंकृत करणे.

ग़स्ल (غسل) पु. ('अ.) धुणे; पाण्याने स्वच्छ करणे.

ग़स्साल (غسّال) पु. ('अ.) (१) न्हाऊ घालणारा. (२) प्रेताला स्नान घालण्याचा व्यवसाय करणारा.

गह (گہ) प्रत्य. [फ़ा. 'गाह' (گاہ) चे संक्षिप्त.] स्थान.

गहवारः (گہوارہ) पु. (फ़ा.) (१) पाळणा. (२) झोपाळा. **–ए-जुंबाँ** (جنباں –) वि. (फ़ा.) पाळणा हलविणारा (री); झोका देणारा (री).

गहे (گہے) अव्य. [फ़ा. 'गाहे' (گاہے) चे संक्षिप्त.] कधीकधी; एखाद्या वेळी.

गाँ (گاں) प्रत्य. [फ़ा. 'गान' (گان) चे संक्षिप्त.] पट; प्रकार.

ग़ा'इत (غائط) पु. ('अ.) (१) सखल जमीन. (२) विष्ठा.

ग़ा'इब (غائب) वि. ('अ.) (१) लपलेला; अंतर्धान पावलेला; अनुपस्थित. (२) लुप्त. (३) अदृश्य. (पु.) भविष्यकाळ. **–बाज़** (باز –) वि. ('अ.+फ़ा.) बुद्धिबळपटू. (समोर प्रत्यक्ष डाव नसताना बुद्धिबळे खेळणारा).

ग़ा'इबानः (غائبانہ) अव्य. ('अ.+फ़ा.) गैरहजेरीत; अनुपस्थितीत; पाठीमागे.

ग़ा'इर (غائر) वि. ('अ.) खोलात शिरणारा; खूप खोल जाणारा.

ग़ाग़रः (غاغر) पु. (फ़ा.) पुदीना.

ग़ाज़ (گاز) पु. (फ़ा.) (१) हिरवे गवत. (२) कात्री. (३) डोंगरातील गुफा; डोंगरावरील प्रार्थनागृह, मंदीर. (४) गॅस; वायू. (५) झोपाळा.

ग़ाज़ियः (غازیہ); **क़ुव्वत-ए-ग़ाज़ियः** (قوت غازیہ) स्त्री. ('अ.) पचनशक्ती.

ग़ाज़ी (گازی) पु. (फ़ा.) केवडा; केवड्याचे कणीस.

ग़ाज़ी (غازی) पु. ('अ.) (१) 'ग़ज़ाः' (धर्मयुद्ध) करणारा; विधर्मियांना ठार मारणारा; धर्मयोद्धा (२) वीर; बहादूर. **–मर्द** (مرد –) पु. ('अ.+फ़ा.) (१) वीरपुरुष. (२) घोडा.

ग़ाज़ी (غازی) पु. (फ़ा.) डोंवारी.

ग़ाज़ुर (گازر) पु. (फ़ा.) धोवी; परीट.

ग़ाज़ः (غازہ); **ग़ाज़ः-ए-रुख़** (غازۂ رخ) पु. (फ़ा.) गालांना लावण्याचे सुगंधित चूर्ण; फेस पावडर.

ग़ादिफ़ (غادف) पु. ('अ.) नावाडी; नाविक.

ग़ादिर (غادر) वि. ('अ.) (१) कृतघ्न. (२) वचनभंग करणारा.

गान (گن); **गाँ** (گاں) प्रत्य. (फ़ा.) ज्या फारसी शब्दांच्या शेवटी विसर्ग (हे) असतो त्यांचे अनेकवचन बनविणारा प्रत्यय. [उदा. 'परिन्दः' (پرندہ) चे अनेक 'परिन्दगान' (پرندگان) अनेक पक्षी].

गान (گان); **गानः** (گانہ) प्रत्य. (फ़ा.) (१) संख्यावाचक विशेषणाच्या शेवटी हा प्रत्यय जोडून 'पट' किंवा 'प्रकार' हा अर्थ व्यक्त केला जातो. [उदा. 'पंजगानः' (پنجگانہ) पाच प्रकारचा (पाचपट). (२) आपला. [उदा. 'ग़गानः' (یگانہ) आपला; स्वजन. 'बेगानः' (بےگانہ) आपला नसलेला; परका].

ग़ानिमन् (غانماً) अव्य. ('अ.) लुटीचा माल ठेऊन घेत; फायदा घेत.

ग़ाफ़ (گف) पु. [फ़ा. 'शिगाफ़' (شگاف) चे संक्षिप्त.] भेग; फट.

ग़ाफ़ (گف) पु. (फ़ा.) बडबड; वाह्यात गप्पा; थापा.

ग़ाफ़िर (غافر) वि. ('अ.) झाकणारा; क्षमा करणारा; पापांवर पांघरूण घालणारा.

ग़ाफ़िल (غافل) वि. ('अ.) बेसावध; गाफील; सुस्त; बेपर्वा.

ग़ाबः (غابہ) पु. ('अ.) (१) अरण्य; जंगल. (२) सिंहाची गुहा.

गान (گم) पु. (फ़ा.) पाय; पाऊल. (प्रत्य.) बोलणारा. [उदा. 'तेज़गाम' (تیزگم) जोरात चालणारा.] **–ज़न** (زن –); **–फ़र्सा** (فرسا –) वि. (फ़ा.) चालणारा; चालत असलेला.

ग़ामिद (غامض) वि. ('अ.) (१) गहन; दुर्बोध; गूढ; अज्ञात. (२) अपमानित.

ग़ामी (غامی) वि. (फ़ा.) निर्बल; दुर्बळ.

ग़ायंदः (گیندہ) वि. (फ़ा.) मैथुन करणारा.

ग़ायत (غایت) स्त्री. ('अ.) (१) शेवट; परिणाम. (२) उद्देश्य; हेतू; कारण. (३) पराकाष्ठा; हद. (वि.) अत्यंत; आत्यंतिक; असामान्य; असाधारण. **–उल्-मराम** (المرام –); **–दरजः** (درجہ –) वि. ('अ.) आत्यंतिक; अत्याधिक. **–माफ़ि'ल-बाब** (مافی الباب –) स्त्री. ('अ.) अंतिम निर्णय; शेवटचे म्हणणे; सारांश.

ग़ायत-उल्-अम्र (غایت الامر) अव्य. ('अ.) अखेर; नाइलाजाने.

गार (گر) प्रत्य. (फ़ा.) (१) करणारा. [उदा. 'मददगार' (مددگار) सहाय्यक; मदत करणारा.] (२) कारण. [उदा. 'यादगार' (یادگار) स्मृती; स्मरणाचे कारण.] (३) लायक; योग्य. ['रस्तगार' (رستگار) बंधमुक्त; बंधमुक्त होण्यास योग्य].

ग़ार (غار) पु. ('अ.) (१) खळगा; खड्डा. (२) गुहा; गुफा.

ग़ारत (غارت) वि. ('अ.) गारद; नष्ट; लुटलेला. (स्त्री.) लुटालूट; विध्वंस; हल्ला. **–गर** (گر –) वि. ('अ.+फ़ा.) लुटारू; दरवडेखोर; विध्वंसक. **–गाह** (گاہ –) स्त्री. ('अ.+फ़ा.) लुटालूट करण्याचे स्थान. **–शोल** (غول –) वि. ('अ.+हि.) नष्ट; उध्वस्त (वा.).

ग़ारतीदः (غارتیدہ) वि. ('अ. + फ़ा.) लुटालूट करण्यात आलेला.

ग़ारिक़ (غارق) वि. ('अ.) बुडालेला; बुडणारा.

गाल (گال) पु. (फ़ा.) (१) बाजरी. (२) फसवणूक. (३) कोल्हा.

ग़ालिब (غالب) वि. ('अ.) (१) सामर्थ्यवान; बलशाली. (२) विजयी. (३) संभवनीय. (४) वरचढ; श्रेष्ठ; प्रभावशाली. **–आना** (آنا –) वरचढ ठरणे; जिकणे; प्रभाव पाडणे.

ग़ालिबन् (غالباً) अव्य. ('अ.) (१) बहुधा; संभवतः (२) बहुतेक सारखा.

ग़ालिबानः (غالبانہ) वि. ('अ. + फ़ा.) बलवानांसारखा; जबरदस्तांसारखा.

ग़ाली (غالی) वि. ('अ.) (१) मर्यादेचे उल्लंघन, अतिक्रमण करणारा. (२) भारी; वजनदार; मौल्यवान. (पु.) हजरत अली यांना परमेश्वर मानणारा एक मुस्लिम पंथ.

ग़ालीचः (غالیچہ) पु. (फ़ा.) लहान गालिचा.

गाव (گاو) पु. (फ़ा.) (१) गाय; बैल. (२) गायीच्या आकाराचा मद्यचषक. (३) लोड; मोठा तक्या. (४) पैलवान; मल्ल; वीर. **–'अंबर** (عنبر –) पु. (फ़ा.+'अ.) (१) गाईसारखा एक सागरी पशू. (याची विष्ठा म्हणजेच 'अंबर' हा सुगंधी पदार्थ होय, अशी समजूत आहे). (२) ज्याच्यामुळे इतरांचा लाभ होतो, असा श्रीमंत मनुष्य. **–आहन** (آہن –) पु. (फ़ा.) नांगराचा फाळ; फावडे. **–कुशी** (کشی –) स्त्री. (फ़ा.) गोवध. **–कून** (کون –) वि. (फ़ा.) मूर्ख; मठ्ठ. **–ख़रास** (خراس –) पु. (फ़ा.) घाण्याचा बैल. (स्त्री.) बैलाकडून चालविली जाणारी चक्की. **–ख़ानः** (خانہ –) पु. (फ़ा.) (१) गोठा. (२) कोंडवाडा. **–ख़ुर्द** (خورد –) वि. (फ़ा.) गाईने खाल्लेले; नष्ट; उच्छिष्ट; अपहृत. **–चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) एक गाईच्या डोळ्यांसारखे टपोरे नेत्र असलेला (ली). (पु.) एक फूल. **–ज़बाँ** (زباں –) स्त्री. (फ़ा.) वनस्पती; गोजिव्हा; पाथरी; दवली. **–ज़ोर** (زور–) वि. (फ़ा.) अत्यंत बलवान; जुलूम करणारा. **–ज़ोरी** (زوری–) स्त्री. (फ़ा.) बळजबरी; अन्याय. **–तकियः** (تکیہ –) पु. (फ़ा.) मोठा तक्या; लोड. **–ताज़ी** (تازی –) स्त्री. (फ़ा.) फुशारकी; पोकळ दमवाजी. **–दीदः** (دیدہ –) वि. (फ़ा.) पाहा 'गा'वचश्म'. **–दुम** (دم –) वि. (फ़ा.) गाईच्या शेपटीसारखा निमूळता, उतरता. **–दोश** (دوش –); **–दोशः** (دوشہ –) पु. (फ़ा.) दूध काढण्याची चरवी. **–पुश्त** (پشت –) वि. (फ़ा.)गाईच्या पाठीसारखा उतरता. (पु.) आकाश. **–पैकर** (پیکر –) वि. (फ़ा.) खोंडासारखे शरीर असलेला; पुष्ट. **–मेश** (میش –) स्त्री. (फ़ा.) म्हैस. **–रस** (رس –) पु. (फ़ा.) बाजरी. **–रीश** (ریش –) वि. (फ़ा.) मूर्ख; मठ्ठ. **–शीर** (شیر –) पु. (फ़ा.) एक प्रकारचा औषधी चीक. **–सर** (سر –) वि. (फ़ा.) बैलासारखे मस्तक असणारा.

गाव-ए-गर्दूं (گاو گردوں); **गाव-ए-फ़लक** (گاو فلک) पु. (फ़ा.) वृषभ राशी.

गाव-ए-ज़मीं (گاو زمیں) पु. स्त्री. (फ़ा.) जिच्या शिंगावर पृथ्वी आधारलेली आहे अशी समजूत आहे, ती गाय.

गाव-ए-सिफ़ाली (گاو سفالیں) पु. (फ़ा.) मद्याचा डेरा.

गावदी (گاودی) वि. (फ़ा.) मूर्ख; मठ्ठ; अडाणी.

गाश् (گاژ) पु. (फ़ा.) स्थान; जागा.

ग़ाशियः (غاشیہ) पु. (फ़ा.) (१) गाशा; खोगिराचे आच्छादन; पातळ गादी. (२) महाप्रलय. (३) नरकातील आग. **–बरदार** (بردار –); **–बरदोश** (بردوش –) वि. (फ़ा.) घोडघाबरोबर गाशा घेऊन चालणारा; सईस; नोकर; आज्ञाधारक.

ग़ासिक़ (غاسق) पु. ('अ.) (१) चंद्र. (२) रात्रीचा काळोख.

ग़ासिब (غاصب) वि. ('अ.) बळजबरीने हिरावून घेणारा; अपहरण करणारा.

गाह (گاہ) स्त्री. (फ़ा.) (१) स्थान; जागा. (२) समय; वेळ. (३) सिंहासन. (४) तंबू; राहुटी. (अव्य.) कधी; केव्हातरी. **–गाह** (گاہ –); **–ब गाह** (بگاہ –) अव्य. (फ़ा.) कधीकधी; अधुनमधून.

गाहे (گاہے) अव्य. (फ़ा.) कधीतरी; कधीकधी. **–गाहे** (گاہے–); **–ब गाहे** (بگاہے –) अव्य. (फा.) कधीकधी; अधुनमधून. **–माहे** (ماہے –) अव्य. (फ़ा.) कधीकधी; महिन्यातून एकदा.

सरसरी उनसे मुलाक़ात है गाहे गाहे।
सोहबत-ए-गर्म है गाहे सर-ए-राहे गाहे॥

ग़िचक (غچک) स्त्री. (फ़ा.) सारंगी (वाद्य).

ग़िचली (غچلی) वि. (फ़ा. + हिं.) गलिच्छ; घाणेरडा.

ग़िज़ा (غذا) स्त्री. ('अ.) भोजन; आहार; खाद्यपदार्थ; अन्न. **–'ई** (ئی –) वि. ('अ.) आहारविषयक.

ग़िज़ा-ए-रूहानी (غذائے روحانی) स्त्री. ('अ.) आत्म्याचे भोजन; संगीत; मधुर कंठ.

ग़िज़ा-ए-लतीफ़ (غذائے لطیف) स्त्री. ('अ.) पचनास हलके अन्न.

ग़िज़ा-ए-सक़ील (غذائے ثقیل) स्त्री. ('अ.) जडान्न.

ग़िज़ा'इयत (غذائیت) स्त्री. ('अ.) अन्नांश; अन्नतत्व.

गिज़्लिक (گزلک) पु. (फ़ा.) लेखणी करण्याचा चाकू.

ग़िज़ीफ़ (غطریف) वि. ('अ.) (१) कुलीन; घरंदाज. (२) वीर. (३) पूज्य.

ग़िज़ाब (غضاب) पु. ('अ.) डोळघांत उडालेला केरकचरा.

ग़िदीर (غدیر) वि. ('अ.) अत्यंत कृतघ्न; निमकहराम.

गिद्यः (گدیہ) स्त्री. (फ़ा.) भीक मागणे; भिक्षाटन.

ग़िना (غنا) पु. ('अ.) गायन; संगीत; गाणे.

गिनॉं (غنىٰ) पु. ('अ.) समृद्धी; श्रीमंती; निस्पृहता.

गिब्तः (غبطہ) पु. ('अ.) (१) एखाद्याचे नुकसान व्हावे अशी इच्छा न बाळगता त्याच्या संपत्तीचा हेवा करणे. (२) बिशप, पादरी वगैरेंच्या नावापूर्वी लावण्यात येणारे आदरसूचक उपपद.

गियार (غیار) पु. ('अ.) सदैव जवळ बाळगण्याचे धार्मिक चिन्ह. (जानवे, क्रॉस अथवा यहुदी लोकांचे पिवळे कापड. हे कापड अंगावरील वस्त्रास खांद्यावर शिवून टाकलेले असते).

गियास़ (غیاث) पु. स्त्री. ('अ.) (१) संकटात साह्य करणे. (२) गाऱ्हाणे ऐकणे. (वि.) दुःखात साह्य करणारा; गाऱ्हाणे ऐकणारा.

गियाह (گیاہ); **गिया** (گیا) स्त्री. (फ़ा.) हिरवे गवत.

गिरॉं (گراں) वि. (फ़ा.) (१) भारी; जड; वजनदार. (२) मौल्यवान; महाग. (३) अप्रिय. (४) अवघड. **–क़द्र** (قدر –) वि. (फ़ा. + 'अ.) (१) बहुमूल्य; महत्त्वपूर्ण. (२) उच्च पदस्थ. **–क़ीमत** (قیمت –) वि. (फ़ा.+'अ.) मौल्यवान; महाग. **–ख़ातिर** (خاطر –) वि. (फ़ा.+'अ.) (१) उदास; दुःखी. (२) अप्रिय. (३) असह्य. **–ख़्वाब** (خواب –) वि. (फ़ा.) गाढ झोपणारा; गाफील. **–गोश** (گوش –) वि. (फ़ा.) ज्याला कमी ऐकू येते असा; बहिरा. **–जॉं** (جاں –) वि. (फ़ा.) (१) आळशी. (२) चिवट; सहजासहजी न मरणारा. (३) जिवाला कंटाळलेला; ज्याला जगणे कठीण झाले आहे असा. **–तरीन** (ترین –) वि. (फ़ा.) अत्यंत वजनदार; अत्यंत महाग. **–ताब** (تاب–) वि. (फ़ा.) चांगला तापविलेला. **–पायः** (پایہ –) वि. (फ़ा.) उच्च पदस्थ; महत्त्वपूर्ण. **–फ़रोश** (فروش –) वि. (फ़ा.) महाग विकणारा. **–बहा** (بہا –) वि. (फ़ा.) मौल्यवान; महत्त्वपूर्ण. **–बार** (بار –) वि. (फ़ा.) (१) भारी; वजनदार. (२) ओझ्याखाली दबलेला. **–मायः** (مایہ –) वि. (फ़ा.) (१) बहुमूल्य. (२) महत्त्वपूर्ण. (३) श्रेष्ठ; प्रतिष्ठित. **–रिकाब** (رکاب –) वि. (फ़ा.+'अ.) (१) सावकाश चालणारा घोडा. (२) युद्धात पाय मागे न घेणारा; दृढ; धैर्यवान. **–संग** (سنگ –) वि. (फ़ा.) (१) भक्कम. (२) गंभीर. (३) आत्मसंतुष्ट. **–सर** (سر –) वि. (फ़ा.) (१) घमेंडखोर. (२) रूढ; अप्रसन्न.

गिरानी (گرانی) स्त्री. (फ़ा.) (१) वजनदारपणा; जडपणा. (२) महागाई.

गिरामी (گرامی) वि. (फ़ा.) (१) पूज्य; आदरणीय. (२) महान; श्रेष्ठ. (३) प्रिय. **–क़द्र** (قدر –) पु. (फ़ा. +'अ.) (१) महाशय; महाराज. (२) महत्त्वपूर्ण; श्रेष्ठ. **–नामः** (نامہ –) पु. (फ़ा.) कृपापत्र. **–मनिश** (منش –) वि. (फ़ा.) पुण्यात्मा; आदरणीय.

गिरायश (گرایش) स्त्री. (फ़ा.) (१) इच्छा; अभिलाषा. (२) रुची; प्रवृत्ती.

ग़िरार (غرار) पु. ('अ.) (१) आचारविचार. (२) भाकातील मंदी. (३) हानी; नुकसान.

ग़िरारः (غرارہ) पु. ('अ.) गोणी; पोते (धान्याचे).

गिरिफ़्त (گرفت) स्त्री. (फ़ा.) (१) पकड; तावा. (२) हिशेबातील चूक काढणे; गुन्हा धरणं. (३) हरकत; विरोध. (४) मूठ; दस्ता. **–गी** (گی –) स्त्री. (फ़ा.) (१) पकड. (२) पडणे; वसणे (आवाज). (३) उदासीनता.

गिरिफ़्तार (گرفتار) वि. (फ़ा.) (१) पकडलेला. (२) अडकलेला; ग्रस्त. (३) प्रेमी; आपक.

गिरिफ़्तारी (گرفتاری) स्त्री. (फ़ा.) (१) अटक; धरपकड. (२) ग्रस्त होणे. (३) अडकणे; प्रेमात सापडणे.

गिरिफ़्तः (گرفتہ) वि. (फ़ा.) (१) पकडलेला; धरलेला. (२) संकुचित. (३) उपरोध; टोमणा. **–ख़ातिर** (خاطر –) वि. (फ़ा.+'अ.) दुःखी; उदास. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) थापेबाज; टोमणा मारणारा. **–ज़बॉं** (زباں –) वि. (फ़ा.) तोतरा; बोबडा. **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) उदासीन. **–लब** (لب –) वि. (फ़ा.) मूक; गप्प.

गिरिह (گرہ) स्त्री. (फ़ा.) (१) गाठ; पीळ. (२) समस्या. (३) उद्विग्नता. (४) खिसा. (५) पेर; जोड. (६) सव्वा दोन इंचांचे माप; गिरा. (७) कोलांटी उडी; गिरकी. (८) खेद; दुःख. **–कट** (کٹ –) वि. (फ़ा. + हि.) खिसेकापू. **–कुशा** (کشا –) वि. (फ़ा.) गाठ सोडविणारा; समस्येचे निराकरण करणारा; अडचण दूर करणारा. **–गीर** (گیر –) वि. (फ़ा.) पीळ पडलेला. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) गाठीगाठीचा. **–बर गिरिह** (بر گرہ –) अव्य. (फ़ा.) दुःखावर दुःख; संकटावर संकट. **–ब्रु** (بر –) वि. (फ़ा.) खिसेकापू.

गिरीबॉं (گریباں) पु. [फ़ा. 'गिरीबान' (گریبان) चे संक्षिप्त.] (१) गळपट्टी; सदरा; कुडते इत्यादींचा छातीवरील अथवा गळ्यावरील भाग; कॉलर ['गिरे' (گرے) गळा; 'बॉं' (باں) संरक्षक; गिरेबान—गळ्याचे रक्षण करणारा]. (२) छाती व गळा यांचे संरक्षण करणारा कपड्याचा पदर. **–गीर** (گیر –) वि. (फ़ा.) गळा पकडणारा; फार तगादा करणारा. **–चाक** (چاک –) वि. (फ़ा.) ज्याने आपल्या सदऱ्याचा गळा फाडला आहे

असा; वेडा; प्रेमी. **–बर** (بر –) वि. (फ़ा.) आपल्या कुडत्याचा गळा फाडणारा वेडा; प्रेमी. **–दरीदः** (دریدہ –) पाहा 'गिरिबां चाक'.

गिरेबां (گریباں) वि. (फ़ा.) पाहा 'गिरीबां' (दोन्ही शु.).

गिरेबान (گریبان) पु. (फ़ा.) (१) गळा; मान. (२) कुडते, सदरा इत्यादींचा गळा. (३) कॉलर. (४) वस्त्राचा छातीवरील भाग.

गिरेबान-ए-कोह (گریبان کوہ) पु. (फ़ा.) पर्वताचा पायथा; तराई.

गिरेव (غریو) पु. (फ़ा.) कोलाहल; आरडाओरडा.

गिरेवां (غریواں) वि. (फ़ा.) आरडाओरडा करणारा.

गिरोह (گروہ) पु. (फ़ा.) (१) झुंड; टोळी; समूह. (२) पक्ष; जमात.

गिरौ (گرو) वि. (फ़ा.) ग्रहाण ठेवलेले. (पु.) गहाण.

गिर्द (گرد) पु. (फ़ा.) (१) वर्तुळ; घेरा. (२) आसपासचे स्थान; आसपास. **–बगिर्द** (بگرد –) अव्य. (फ़ा.) आसपास; चोहोकडे. **–बाद** (باد –) पु. (फ़ा.) वावटळ; वातचक्र. **–बालिश** (بالش –); **–बाश** (باش –) पु. (फ़ा.) गालाखाली घरण्याची गोल, छोटी उशी; गोल उशी. **–बुर** (بر –) पु. (फ़ा.) मुताराचे गिरमिट.

गिर्दक (گردک) स्त्री. (फ़ा.) (१) राहुटी. (२) खोली.

गिर्दगां (گرداں) पु. (फ़ा.) अक्रोड.

गिर्दागिर्द (گرداگرد) अव्य. (फ़ा.) चोहोकडे; आसपास.

गिर्दाब (گرداب) पु. (फ़ा.) पाण्यातील भोवरा.

गिर्दावर (گرداور) वि. (फ़ा.) (१) चोहोकडे फिरत पहारा देणारा; गस्ती. (२) जकात नाक्यावरील अधिकारी. (३) पर्यवेक्षक; सुपरिंटेंडेंट.

गिर्दः (گردہ) पु. (फ़ा.) (१) गोल चकती. (२) अक्रोड. (३) कुंपण. (४) गोल तक्या; गिरदी. (५) गोल तवक. (६) चक्र; वर्तुळ. (७) पानाच्या तबकात ठेवावयाचे गोल फडके. (८) हुक्क्याखाली ठेवावयाचा सतरंजीचा गोल तुकडा. (९) एक प्रकारची रोटी.

गिर्बाल (غربال) स्त्री. (फ़ा.) चाळण; चाळणी.

गिर्यः (گریہ) पु. (फ़ा.) रुदन; रडे; अश्रुपात. **–आवर** (آور –) अश्रू आणणारा; रडविणारा. **–कुनां** (کناں –) वि. (फ़ा.) रडत असलेला. **–ओ-ज़ारी** (و زاری –) स्त्री. (फ़ा.) आक्रोश; विलाप.

गिर्यः-ए-ग़म (گریۂ غم) पु. (फ़ा. + 'अ.) शोक; विलाप.

गिर्यः-ए-शादी (گریۂ شادی) पु. (फ़ा.) आनंदाश्रू येणे.

गिर्वी (گروی) वि. (फ़ा.) गहाण ठेवलेला; गहाण.

गिर्वीदगी (گرویدگی) स्त्री. (फ़ा.) आसक्ती; मोह; आकर्षण; प्रेम.

गिर्वीदः (گرویدہ) वि. (फ़ा.) मुग्ध; मोहित; लुब्ध; आसक्त; प्रेमी. **–ग़र्स** (غرس –) पु. ('अ.) गर्भाभोवती असणारी वार.

गिल (گل) स्त्री. (फ़ा.) (१) माती. (२) ओली माती; गिलावा; चिखल. **–अंदाज़ी** (اندازی –) स्त्री. (फ़ा.) बांध; बंधारा; बांधाचा रस्ता. **–अंबूदः** (اندودہ –) वि. (फ़ा.) मातीने सारविलेला. **–कार** (کار –) पु. (फ़ा.) (१) कुंभार. (२) गवंडी. **–ख़ोरः** (خورہ –) पु. (फ़ा.) गांडूळ (माती खाणारा). **–नाक** (ناک –) वि. (फ़ा.) मातकट; मळका. **–मालः** (مالہ –) पु. (फ़ा.) गवंडघाची करणी; थापी.

गिल-ए-अरमनी (گل ارمنی) स्त्री. (फ़ा.) एक प्रकारची औषधी माती; गेरू; काव.

गिल-ए-ख़ुरासानी (گل خراسانی) स्त्री. (फ़ा.) शाडूची माती.

गिल-ए-चस्पां (گل چسپاں) स्त्री. (फ़ा.) चिकणमाती.

गिल-ए-मख़्तूम (گل مختوم) स्त्री. (फ़ा.) 'गिल-ए-अरमनी' हून वेगळी काव.

गिल-ए-हिकमत (گل حکمت) स्त्री. (फ़ा. + 'अ.) (१) कापड पोतळ चिखलात भिजवून ते धातूच्या अथवा काचेच्या भांडघाच्या तळाशी चिकटवितात व ते अग्नीवर ठेवतात. त्यामुळे भांडे जळत नाही. या प्रक्रियेला 'गिल-ए-हिकमत' असे नाव आहे. (२) सीमेंट.

ग़िलज़ (غلظ) पु. **ग़िलज़त** (غلظت) स्त्री. ('अ.) घट्टपणा; जाडपणा.

ग़िलाज़ (غلاظ) पु. ['अ. 'ग़लीज़' (غلیظ) चे अनेक.] (१) दाट; घट्ट पदार्थ. (२) घाण; विष्ठा.

ग़िलाज़त (غلاظت) स्त्री. ('अ.) (१) घाण; गलिच्छपणा; विष्ठा. (२) अपवित्रता. (३) घट्टपणा. **–ख़ानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) उकीरडा. **–ख़ोर** (خور –) वि. ('अ.+फ़ा.) विष्ठा खाणारा; वाईट मार्गाने पोट भरणारा. (पु.) डुक्कर.

ग़िलाफ़ (غلاف) पु. ('अ.) (१) खोल अभ्रा. (२) टरफल. (३) म्यान. (४) लिफाफा. (५) रजई. **–उल्-क़ल्ब** (القلب –) पु. ('अ.) हृदयावरील आवरण.

गिलाबः (گلاب) पु. (फ़ा.) **गिलावा** (گلاوا) पु. (फ़ा.+हिं.) गिलावा; लिपण.

गिली (گلیں); **गिली** (گلی) वि. (फ़ा.) मातीचा; मृण्मय.

गिलीम (گلیم) पु. (फ़ा.) कांबळे; घोंगडे; ब्लॅंकेट; रग.

गिलेवाज़ (غلیواز) स्त्री. (फ़ा.+'अ.) घार (पक्षी).

गिलः (گلہ) पु. (फ़ा.) (१) तक्रार. (२) गाऱ्हाणे. (३) बोल लावणे; दोष देणे.

गिलः-ए-रोज़गार (گلۂ روزگار) पु. (फ़ा.) दुर्दैवाचे रडगाणे.

ग़िल्मां (غلماں) पु. ['अ. 'ग़िल्मान' (غلمان) चे संक्षिप्त.] स्वर्गातील गुलाम, सेवक.

ग़िल्मः (غلمہ) पु. ['अ. 'ग़ुलाम' (غلام) चे अनेक.] (१) दास; नोकरचाकर. (२) मुलगे; स्वर्गामध्ये पुण्यवान लोकांच्या सेवेसाठी असलेले देखणे छोकरे (दाढी मिशा न फुटलेले). (हा शब्द उर्दू-फारसीत एकवचनामध्येही वापरला जातो).

ग़िल्ल (غل) पु. ('अ.) (१) द्वेष; हेवा. (२) अपहरण; फसवणूक. (३) गलिच्छपणा.

ग़िल्लीम (غلیم) वि. ('अ.) अत्यधिक कामवासना असणारा.

ग़िशा (غشا) स्त्री. **ग़िशावः** (غشاوہ) पु. ('अ.) (१) पडदा; पटल. (२) खोळ; पापुद्रा.

ग़िश्यान (غشیان) पु. ('अ.) मैथुन; रतिक्रीडा.

ग़िश्श (غش) स्त्री. ('अ.) (१) अपहरण; अफरातफर. (२) द्वेष. (३) भेसळ.

गीं (گیں) प्रत्य. [फ़ा. 'गीन' (گین) चे संक्षिप्त.] युक्त; पूर्ण. [उदा. 'ग़मगीं' (غمگیں) दुःखयुक्त; दुःखी].

गी (گی) प्रत्य. (फ़ा.) ज्या फारसी शब्दांच्या अंती विसर्ग (हे) असतो त्यांच्या शेवटी हा प्रत्यय लावल्याने भाववाचक नाम बनते. [उदा. 'ज़िन्दः' (زندہ) जिवंतपासून 'ज़िन्दगी' (زندگی) जिवंतपणा; जीवन].

गीद (گید) पु. (फ़ा.) (१) घार. (२) गिधाड; गृध्र.

गीदी (گیدی) वि. (फ़ा.) (१) भित्रा; भ्याड. (२) मूर्ख. (३) निर्लज्ज. **—ख़र** (خر—) वि. (फ़ा.) शुद्ध गाढव; निर्बुद्ध.

गीन (گین) प्रत्य. [फ़ा. 'आगीन' (آگین) 'भरलेला' चे संक्षिप्त.] युक्त; परिपूर्ण. [उदा. 'अंदोहगीन' (اندوہگین) दुःखपूर्ण].

ग़ीबत (غیبت) स्त्री. ('अ.) कुचाळकी; चहाडी.

गीर (گیر) प्रत्य. (फ़ा.) (१) पकडणारा. [उदा. 'माहीगीर' (ماہی گیر) मासे पकडणारा.] (२) जिंकणारा. [उदा. ''आलमगीर' (عالم گیر) जगज्जेता.] (३) कापणारा. [उदा. 'गुलगीर' (گل گیر) दिव्याची काजळी कापणारी कात्री].

गीरख़ (گیرخ) स्त्री. (फ़ा.) जिच्यावर ठेवून ज्ञानेश्वरी, कुराण वगैरेसारखे ग्रंथ वाचतात ती लाकडी घोडी; रॅक.

गीरमाल (گیرمال) पु. (फ़ा.) मोडलेले हाड जोडणारा; सरकलेले हाड बसविणारा; मालिश करणारा.

ग़ीलान (غیلان) पु. ['अ. 'ग़ूल' (غول) चे अनेक.] (१) भुते-खेते; दैत्य; राक्षस. (२) साम.

गुंग (گنگ) वि. (फ़ा.) मुका; मूक. **—महल** (محل—) पु. (फ़ा.+'अ.) अकबर बादशहाने बांधविलेला एक महाल. (१) असे सांगतात की मुक्या आईबापांच्या पोटी जन्मलेल्या मुलांना बोलता येते की नाही अथवा ती कोणती भाषा बोलतील हे शोधून काढण्यासाठी अकबराने या ठिकाणी अशी मुले ठेविली होती. परंतु तीही आईबापाप्रमाणेच मुकी निघाली. (२) माणसाची स्वाभाविक भाषा शोधून काढण्यासाठी अकबराने हा महाल बांधविला होता असे म्हणतात.

गुंचः (غنچہ) पु. (फ़ा.) कळी; पुष्पकलिका. **—दहन** (دہن—); **—दहाँ** (دہاں—) वि. (फ़ा.) गुलाब कळीसारखे सुंदर व नाजुक मुख असलेली स्त्री. **—लब** (لب—) वि. (फ़ा.) गुलाबाच्या कळीसारखे नाजुक व गुलाबी ओठ असलेली स्त्री.

गुंचः-ए-ना शिगुफ़्तः (غنچۂ ناشگفتہ) पु. (फ़ा.) अविकसित कळी.

गुंज (غنج) पु. ('अ.) नखरा; हावभाव.

गुंजलक (گنجلک) स्त्री. (फ़ा.+हिं.) (१) गाठ. (२) सुरकुती. (३) भांडण.

गुंजा'इश (گنجائش) स्त्री. (फ़ा.) (१) स्थान; जागा. (२) समावेश; सोय. (३) फायदा; नफा. (४) सामर्थ्य. (५) विस्तार. (६) प्रेम; उदारता.

गुंजान (گنجان) वि. (फ़ा.) दाट; निबिड; घट्ट; गहन.

गुंजिश्क (گنجشک) स्त्री. (फ़ा.) चिमणी (पक्षी).

गुंडा (گنڈا); **गुंडः** (غنڈہ) पु. (हिं.) गुंड; मवाली; बदमाष.

गुंदः (گندہ) वि. (फ़ा.) (१) जाड; लठ्ठ. (२) कणकीचा गोळा.

गुंबद (گنبد) पु. (फ़ा.) (१) घुमट; कळस. (२) बुरूज; किल्ला. (३) महिरप.

गुंबद-ए-आब (گنبد آب) पु. (फ़ा.) पाण्याचा बुडबुडा.

गुंबद-ए-गर्दूं (گنبد گردوں) पु. (फ़ा.) आकाशाचा घुमट; आकाश वर्तुळ.

गुंबद-ए-गुल (گنبد گل) पु. (फ़ा.) कळी.

गुंबद-ए-चारबंद (گنبد چار بند) पु. (फ़ा.) (१) जग. (२) आकाश.

गुंबद-ए-तेज़गश्त (گنبد تیز گشت) पु. (फ़ा.) वेगाने फिरणारा घुमट; आकाश.

गुंबद-ए-लाजवर्दी (گنبد لاجوردی) पु. (फ़ा.) आकाश; अस्मान.

गुज़र (گذر) स्त्री. (फ़ा.) (१) निर्वाह; गुजराण. (२) प्रवेश; पोहोच. (३) रस्ता; मार्ग. (४) गदा. **–गाह** (–گاہ) स्त्री. (फ़ा.) रस्ता; मार्ग. **–नामः** (–نامہ) पु. (फ़ा.) पारपत्र; पासपोर्ट. **–बसर** (–بسر) स्त्री. (फ़ा.) उदरनिर्वाह; उपजीविका. **–बान** (–بان) वि. (फ़ा.) रस्त्याचा राखणदार.

गुज़रान (گذران) स्त्री. (फ़ा.) गुजराण; उदरनिर्वाह.

गुज़राब (گذرآب) स्त्री. (फ़ा.) कालवा; पाण्याचा पाट.

गुज़रिंदः (گذرندہ) वि. (फ़ा.) जाणारा; व्यतीत होणारा.

गुज़री (گذری) स्त्री. (फ़ा.+हिं.) रस्त्याच्या कडेला सायंकाळी भरणारा बाजार.

गुज़श्तः (گذشتہ) वि. (फ़ा.) गेलेला; व्यतीत झालेला; मागचा; भूतकालीन.

गुज़ाफ़ (گزاف) स्त्री. (१) बडबड; बकवा. (२) घमेंड; बढाई.

गुज़ार (گزار) स्त्री. (फ़ा.) (१) मार्ग; रस्ता. (२) देणे; अंमलबजावणी करणे. (प्रत्य.) (१) करणारा. [उदा. 'खिदमत गुज़ार' (خدمت گزار) सेवा करणारा]. (२) देणारा. [उदा. 'माल गुज़ार' (مال گزار) धन, कर देणारा].

गुज़ारिंदः (گزارندہ) वि. (फ़ा.) (१) व्यतीत करणारा. (२) देणारा; फेडणारा (कर्ज).

गुज़ारिश (گذارش) स्त्री. (फ़ा.) (१) विनंती; निवेदन ; अर्ज. (२) टीका; विश्लेषण. (३) स्वप्नफल. **–गर** (–گر) वि. (फ़ा.) अर्ज करणारा. **–नामः** (–نامہ) पु. (फ़ा.) (१) विनंतीपत्र; अर्ज. (२) लहानाने मोठ्यास लिहिलेले पत्र. **–पिज़ीर** (–پذیر) वि. (फ़ा.) (१) विनंती मान्य करणारा. (२) अर्ज करण्यास योग्य. [अनेक 'गुज़ारिशात' (گزارشات)].

गुज़ारः (گذار) पु. (फ़ा.) (१) निर्वाह; उपजीविका; चरितार्थ. (२) उपजीविकेसाठी दिली जाणारी रक्कम. (३) जकातीचे नाके. (४) नदी ओलांडणे (पुलावरून किंवा नावेने). (५) समावेश; शक्यता. **–की नाव** (–کی ناؤ) नदीतून पलीकडे जाण्यायेण्याची नाव.

गुज़ाश्त (گذاشت) स्त्री. (फ़ा.) (१) सूट; माफी; इनाम जमीन. (२) त्याग; काढून टाकणे; कमी करणे.

गुज़ाश्तः (گذاشتہ) वि. (फ़ा.) सोडलेला; व्यक्त.

गुज़ी (گزیں) प्रत्य. (फ़ा.) निवडणारा; पसंत करणारा; स्वीकारणारा. [उदा. 'खल्वत गुज़ी' (خلوت گزیں) एकांतप्रिय].

गुज़ीदः (گزیدہ) वि. (फ़ा.) पसंत केलेला; निवडलेला.

गुज़ीर (گزیر); **गुज़ीरी** (گزیری) पु. स्त्री. (फ़ा.) **गुज़ीरः** (گزیرہ) पु. (१) उपाय; इलाज; साधन. (२) सुटका; मदत. **नागुज़ीर** (ناگزیر) वि. (फ़ा.) अनिवार्य; अपरिहार्य; असहाय.

गुदाख़्तः (گداختہ) वि. (फ़ा.) वितळलेला; विरघळलेला.

गुदाज़ (گداز) वि. (फ़ा.) (१) वितळविणारा; विरघळविणारा. (२) थुलथुलीत; मांसल; मऊ; लठ्ठ (शरीर). (प्रत्य.) (१) विरघळविणारा. [उदा. 'दिल गुदाज' (دل گداز) हृदयाला पाझर फोडणारा.] (२) वितळविणारा. [उदा. 'आहन गुदाज' (آہن گداز) लोखंड वितळविणारा].

गुद्दूद (غدود) पु. ('अ.) शरीरातील ग्रंथी; गाठी.

गुद्दः (غدہ) पु. ('अ.) शरीरातील सांध्यात असणारी गाठ; ग्रंथी.

गुज़्फ़ (غضروف) पु. स्त्री. (फ़ा.) अस्थिकूर्चा; मृदु अस्थींचे वेष्टन. (हे शरीरात सांध्यांत असते). चावले जाणारे आहारातील हाड.

गुनगुनाना (گنگنانا) वि. (हिं.) नाकातून बोलणे.

गुनाह (گناہ) पु. (फ़ा.) (१) पाप; पातक. (२) गुन्हा; अपराध; दोष. **–गार** (–گار) वि. (फ़ा.) (१) गुन्हेगार; अपराधी. (२) पापी. **–गारी** (–گاری) स्त्री. (फ़ा.) (१) गुन्हेगारी; अपराध. (२) पाप कर्म. **–बख़्शना** (–بخشنا) अपराधाची क्षमा करणे; पापमुक्त करणे.

गुनाह-ए-कबीरः (گناہ کبیرہ) पु. (फ़ा. + 'अ.) महापातक.

गुनाह-ए-बेलज़्ज़त (گناہ بے لذت) पु. (फ़ा.) काही फायदा नसताना निष्कारण केलेला गुन्हा किंवा पाप.

गुनाह-ए-सग़ीरः (گناہ صغیرہ) पु. (फ़ा.+'अ.) लहान गुन्हा; पातक.

गुनूदगी (غنودگی) स्त्री. [फ़ा. 'गुनूदन' (غنودن) पेंगणे.] (१) पेंग; डुलकी. (२) कैफ, नशा.

गुनूबः (غنودہ) वि. (फ़ा.) पेंगत असलेला; झोपेस आलेला.

गुन्नः (غنہ) पु. ('अ.) अनुस्वार; अनुनासिक वर्ण.

गुफ़ूल (غفول) पु. ('अ.) (१) विस्मरण; विस्मृती. (२) गाफील राहाणे; बेशुद्धी.

गुफ़्त (گفت) स्त्री. (फ़ा.) कथन; बोलणे; संभाषण; भाषण.

गुफ़्त-ओ-शुनीद (گفت وشنید) स्त्री. (फ़ा.) (१) बोलणे व ऐकणे. (२) बोलाचाली; हुज्जत; वादविवाद.

गुफ़्तगू (گفتگو) स्त्री. (फ़ा.) संभाषण; बातचीत.

गुफ़्तनी (گفتنی) वि. (फ़ा.) बोलण्यास योग्य; कथनीय; जे सांगणे आवश्यक आहे असे.

गुफ़्तार (گفتار) स्त्री. (फ़ा.) (१) भाषण; संभाषण. (२) वाणी; भाषा. (३) शब्द. (४) आवाज.

गुफ़्तः (گفتہ) वि. (फ़ा.) सांगितलेले; बोललेले; उक्त.

गुफ़्रां (غفراں) पु. ['अ. 'गुफ़्रान' (غفران) चे संक्षिप्त.] (१) मोक्ष; मुक्ती. (२) क्षमा. (३) इनाम; बक्षीस. **–मआब** (ماب –) वि. ('अ.) मोक्षप्राप्त; स्वर्गीय; कैलासवासी. (थोर लोकांच्या आत्म्याला उद्देशून हा शब्द वापरला जातो).

गुबार (غبار) पु. ('अ.) (१) धूळ; धुरळा. (२) मनोमालिन्य; मनात दाबून ठेवलेला राग, द्वेष वगैरे. **–आलूद** (آلود –); **–आलूदः** (آلودہ –) वि. ('अ. + फ़ा.) धुळीने भरलेला; धूलिधूसर. **–निकालना** (نکالنا –) राग, द्वेष व्यक्त करणे; मनातील मळमळ ओकून टाकणे; सूड घेणे.

गुबार-ए-ख़ातिर (غبار خاطر) पु. ('अ.) मनोमालिन्य; मनात धुमसणारा राग, क्रोध; मनातील घाण.

गुबारः (غبارہ) पु. (फ़ा.) (१) फुगा. (२) विमान.

गुम (گم) वि. (फ़ा.) (१) हरवलेला; गमावलेला. (२) अप्रसिद्ध; गुप्त; लपलेला. (३) वाट चुकलेला. (४) तल्लीन. (५) गाफील; बेसावध. **–कर्दः** (کردہ –) वि. (फ़ा.) हरवलेला; विसरलेला; हरवून टाकलेला. **–कर्दः-ए-राह** (راہ کردہ –) वि. (फ़ा.) वाट चुकलेला; पथभ्रष्ट. **–गश्तः** (گشتہ –) वि. (फ़ा.) हरवलेला; वाट चुकलेला.

लाओ देखें कहीं मेरा दिल-ए-गुमगश्तः न. हो।
आप कहते हैं कि. इक चीज़ पड़ी पा'ई है॥

–ज़दः (زدہ –) वि. (फ़ा.) हरवलेला; वाट चुकलेला. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) नेस्तनाबूत करणारा; नष्ट करणारा. **–नाम** (نام –) वि. (फ़ा.) (१) निनावी. (२) अज्ञात; अप्रसिद्ध. **–नामी** (نامی –) स्त्री. (फ़ा.) प्रसिद्धीचा अभाव; अज्ञात स्थिती. **–बूदगी** (بودگی –) स्त्री. ('अ.) दुःखी होणे. **–राह** (راہ –) वि. (फ़ा.) (१) वाट चुकलेला; पथभ्रष्ट. (२) कुमार्गी; दुराचारी. (३) धर्मभ्रष्ट; नास्तिक. **–राहकुन** (راہ کن –) वि. (फ़ा.) पदभ्रष्ट करणारा; संभ्रम किंवा विकल्प निर्माण करणारा. **–राही** (راہی –) स्त्री. (फ़ा.) (१) पदभ्रष्टता; वाट चुकणे. (२) धर्महीनता; नास्तिकता. (३) गुन्हा करण्याची प्रवृत्ती. **–शुदः** (شدہ –) वि. (फ़ा.) (१) हरविलेला. (२) वाट चुकलेला. **–सुम** (سم –) वि. (फ़ा.+हिं.) गप्प; स्तब्ध.

गुमां (گماں) पु. [फ़ा. 'गुमान' (گمان) चे संक्षिप्त.] शंका; भ्रम. **–बरी** (بری –) स्त्री. (फ़ा.) शंका घेणे.

गुमान (گمان) पु. (फ़ा.) (१) शंका; भ्रम. (२) अनुदान. (३) अहंकार.

गुमान-ए-क़वी (گمان قوی); **गुमान-ए-ग़ालिब** (گمان غالب) पु. (फ़ा. + 'अ.) खात्रीच्या अवस्थेला गेलेली शंका.

गुमान-ए-बद (گمان بد) पु. (फ़ा.) एखाद्याविषयी वाईट भावना बाळगणे; दुर्भावना; दुराग्रह; पूर्वग्रह.

गुमान-ए-सहीह् (گمان صحیح) पु. (फ़ा.+'अ.) खरी ठरणारी शंका; खरे ठरलेले अनुमान.

गुमानी (گمانی) वि. (फ़ा.+हिं.) गर्विष्ठ; घमेंडखोर.

गुमाम (غمام) पु. ('अ.) पडसे; सर्दी.

गुमार (غمار) पु. ('अ.) (१) आधिक्य; बाहुल्य. (२) गर्दी.

गुमाश्तगी (گماشتگی) स्त्री. (फ़ा.) (१) नियुक्ती; नेमणूक. (२) दलाली.

गुमाश्तः (گماشتہ) वि. [फ़ा. 'गुमाश्तन' (گماشتن) नेमणे; सोडणे.] (१) नियुक्त केलेला; नेमलेला. (२) प्रतिनिधी; गुमास्ता; मुनीम; कारभारी.

गुमूम (غموم) पु. ['अ. 'ग़म' (غم) चे अनेक.] दुःखे; शोक; खेद.

गुम्रक (گمرک) पु. (फ़ा.) जकात; टोल. **–ख़ानः** (خانہ –) पु. (फ़ा.) टोलनाका; जकात घर; कस्टम हाऊस.

गुरबा (غربا) पु. ['अ. 'ग़रीब' (غریب) चे अनेक.] (१) गरीब लोक; दरिद्री लोक. (२) परदेशी माणसे. **–परवर** (پرور –) दीन दुःखी लोकांवर दया करणारा.

गुरसंगी (گرسنگی) स्त्री. (फ़ा.) भूक; क्षुधा.

गुरस्नः (گرسنہ) वि. (फ़ा.) उपाशी; क्षुधित. **–चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) (१) लोभी; लोलुप. (२) कृपण. (३) भिकारी.

गुराज़ (گراز) पु. (फ़ा.) (१) जंगली डुक्कर. (२) गावठी डुक्कर. (३) शूर वीर; बहादूर. (४) अत्याचारी; जुलमी.

गुराब (غراب) पु. ('अ.) (१) कावळा; डोमकावळा. (२) लहान नौका. **-उल्-बैन** (اَلبَین –) पु. ('अ.) ज्याचा शब्द ऐकला असता प्रिय व्यक्तींचा विरह घडतो असा अशुभ कावळा.

गुरिंज (گرنج) पु. (फ़ा.) तांदूळ.

गुरुब (غرب) वि. ('अ.) अद्‌भुत; अभूतपूर्व; विलक्षण.

गुरूब (غروب) पु. ('अ.) अस्त; मावळणे; सूर्यास्त.

गुरूर (غرور) पु. ('अ.) अभिमान; अहंकार; घमेंड; गर्व.

गुरेख्तः (گریختہ) वि. (फ़ा.) पळून गेलेला; पलायन केलेला.

गुरेज़ (گریز) स्त्री. [फ़ा. 'गुरेज़ीदन' (گریزیدن) पळून जाणे.] (१) अलिप्तता; दूर रहाणे. (२) पैळ काढणे; सुटका. (३) विषयांतर. (४) उपेक्षा. (५) तिटकारा. **-करना** (کرنا –) टाळणे; पळून जाणे. **-गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) आश्रयस्थान. **-पा** (پا –) वि. (फ़ा.) पळपुटा; वारंवार पळून जाणारा.

गुरेज़ाँ (گریزاں) वि. (फ़ा.) पळत असलेला; जवळ न येणारा.

गुरेज़िंदः (گریزندہ) वि. (फ़ा.) पळून जाणारा; उपेक्षा करणारा.

गुरोह (گروہ) पु. (फ़ा.) (१) समुदाय; समूह. (२) पक्ष; गट. **-बरगुरोह** (در گروہ –) वि. (फ़ा.) झुंडीच्या झुंडी; खूप अधिक. **-बंदी** (بندی –) स्त्री. (फ़ा.) गटबाजी; पक्षबाजी.

गुर्ग (گرگ) पु. (फ़ा.) लांडगा; वृक. **-आशना'ई** (آشنائی –) स्त्री. (फ़ा.) वरून मैत्री व आतून शत्रुत्व; मुत्सद्दीपणा. **-ज़ादः** (زاد –) पु. (फ़ा.) (१) लांडग्याचे पिलू. (२) दुष्ट माणसाचा मुलगा; खलपुरुष.

गुर्ग-ए-बग़ल (گرگ بغل) पु. (फ़ा.) कुशीतील लांडगा; अस्तनीतील निखारा.

गुर्ग-ए-बाराँदीदः (گرگ باراں دیدہ) पु. (फ़ा.) (१) ज्याने अनेक पावसाळे पाहिले आहेत असा लांडगा. (२) धूर्त, अनुभवी व्यक्ती.

गुर्गीनः (گرگینہ) पु. (फ़ा.) केसाळ कातडघाचा कोट; फरकोट.

गुर्ज़ (گرز) पु. (फ़ा.) गदा. **-बरदार** (بردار –) वि. (फ़ा.) गदाधर; गदायुद्ध करणारा.

गुर्जिस्तान (گرجستان) पु. (फ़ा.) जॉर्जिया (देश).

गुर्जी (گرجی) वि. (फ़ा.) (१) जॉर्जियाचा रहिवासी (२) जॉर्जियन कुत्रा. (३) नोकर.

गुर्ज़ः (گرزہ) पु. (फ़ा.) (१) नागाची फणा. (२) वाफा; आळे. (वि.) भयंकर; भीतीदायक. **-बंदी** (بندی) स्त्री. (फ़ा.) वाफे करणे; बांध घालणे (शेताला).

गुर्द (گرد) पु. (फ़ा.) (१) मल्ल; पहिलवान. (२) वीर; योद्धा.

गुर्दः (گردہ) पु. (फ़ा.) (१) मूत्राशय; मूत्रपिंड. (२) हिम्मत; शौर्य.

गुर्नीक़ (غرنیق); **गुर्नूक़** (غرنوق) पु. ('अ.) (१) देखणा व नाजुक तरुण. (२) बगळा; करकोचा.

गुर्फ़ः (غرفہ) पु. ('अ.) (१) खिडकी; झरोका. (२) गच्ची. (३) माडी. (४) एकांत स्थान. **-की बात चीत** (کی بات چیت –) गुप्त खलबत. **-नशीं** (نشیں –) वि. ('अ. + फ़ा.) खिडकीत बसणारा (री).

गुर्बत (غربت) स्त्री. ('अ.) (१) परदेशात असणे; परदेश. (२) प्रवासात असणे. (३) दारिद्र्य. **-ज़दः** (زدہ –) वि. ('अ.+फ़ा.) (१) आपल्या मातृभूमीपासून दूर जाऊन पडलेला. (२) दरिद्री.

गुर्बुज़ (گربز) वि. [फ़ा. 'गुर्ग' (گرگ) लांडगा + बुज़ (بز) शेळी—वरून शेळीसारखा गरीब दिसणारा लांडगा.] (१) फसवा; धोकेबाज. (२) कपटी.

गुर्बः (گربہ) स्त्री. (फ़ा.) मांजर; मांजरी. **-चुं** (چوں –) वि. (फ़ा.) धूर्त; कपटी. **-चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) (१) घाऱ्या डोळघांचा. (२) असभ्य; दुराचारी; उद्धट.

गुर्बः-ए-मिस्कीं (گربۂ مسکیں) वि. ('अ. + फ़ा.) वरून भोळी दिसणारी पण आतून लुच्ची असणारी व्यक्ती.

गुर्रिश (غرش) स्त्री. (फ़ा.) (१) गुरगुरणे; रागाने ओरडणे. (२) राग. (३) भीती; धाक.

गुर्रः (غرہ) पु. ('अ.) (१) घोडघाच्या कपाळावरील पांढरा डाग. (२) चांद्रमासाची पहिली तारीख उत्तम (भारतीय पंचांगाप्रमाणे शुक्लपक्षाची तृतीया). (३) उज्वल भाल. (४) चांदरात. (५) प्रत्येक वस्तू. (६) दास; दासी. (७) दातांची शुभ्रता; चमकदारपणा. (८) खाडा; सुट्टी.

गुर्सनगी (گرسنگی) स्त्री. (फ़ा.) भूक; क्षुधा.

गुर्सं (گرس) स्त्री. (फ़ा.) (१) भूक. (२) तहान.

गुर्सनः (گرسنہ) वि. (फ़ा.) भुकेला; क्षुधित. **-चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) (१) लोभी. (२) कृपण. (३) भिकारी; फकीर.

गुल (غل) पु. (फ़ा.) आरडाओरडा; कोलाहल; हलकल्लोळ. **–गपाड़ः** (–گپاڑ) पु. (फ़ा.+हि.) गोंधळ; गडबड.

गुल (غل) पु. ('अ.) (१) कैद्यांच्या गळघांतील लोखंडी पट्टा; बिल्ला. (२) मनस्ताप; जळफळाट. (३) तहान.

गुल (گل) पु. (फ़ा.) (१) फूल; गुलाबाचे फूल. (२) दिव्याच्या वातीचा जळलेला किंवा जळत असलेला भाग. (३) जनावरांच्या अंगावरील रंगीत ठिपका. (४) शरीरावरील डागल्याची खूण. (५) निखारा. (६) हसताना गालाला पडणारी खळी. (७) चिलमीतील जळालेला तंबाखू. (८) डोळघात पडणारे फूल (रोग). (९) प्रियतमा. (१०) पादत्राणाच्या टाचेला लावण्यात येणारे कातडे. **–अंदाम** (اندام –) वि. (फ़ा.) फुलासारखे नाजुक शरीर असणारा (री); कुसुम; पुष्पांगी; कोमलांगी. **–अफ़्शां** (افشاں –) वि. (फ़ा.) पुष्पवृष्टी करणारा; गोड बोलणारा. **–'अिज़ार** (عذار –) वि. (फ़ा.+'अ.) गुलाबासारखे नाजुक गाल असणारा (री). **–क़ंद** (قند –) पु. (फ़ा.) गुलकंद. **–कदः** (کدہ –) पु. (फ़ा.) फुलांनी भरलेले घर; कुसुमालय. **–करना** (کرنا –) मालवणे. **–कार** (کار –) वि. (फ़ा.) वेलबुट्टी, कशिदा काढणारा (री). **–कारी** (کاری –) स्त्री. (फ़ा.) वेलबुट्टी; नक्षीकाम. **–केश** (کیش –) वि. (फ़ा.) नखरेल; नखरेबाज. **–खन** (خن –) पु. (फ़ा.) भट्टी; चूल. **–ख़ाल** (خال –) वि. (फ़ा.) ठिपके असलेला; चितकबरा. **–खिलना** (کھلنا –) (१) अघटित घटना घडणे. (२) तंटा-बखेडा होणे. **–ख़ुर्दः** (خوردہ –) वि. (फ़ा.) डागळलेला; डागलेला. **–गश्त** (گشت –) पु. (फ़ा.) बागेत फिरावयास जाणे; फिरण्याचे ठिकाण. **–गीर** (گیر –) पु. (फ़ा.) दिव्याची वात नीट करण्याची कात्री. **–गूँ** (گوں –) वि. (फ़ा.) (१) गुलाबी रंगाचा. (२) उत्तम घोडा. (३) शीरीनच्या घोडघाचे नाव. **–गूनः** (گونہ –) पु. (फ़ा.) तोंडाला लावावयाचे सुगंधित चूर्ण, पावडर. **–चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) ज्याच्या डोळघात फूल पडले आहे असा. **–चहर** (چہر –) वि. (फ़ा.) (१) गुलाबाच्या फुलासारखा चेहरा असलेला (ली); सुंदर. (२) प्रियतमा. **–चीं** (چیں –) वि. (फ़ा.) फुले तोडणारा; माळी; गंमत पाहाणारा; तमासगीर. **–चेहरः** (چہرہ –) पाहा 'गुलचहर'. **–ज़मीं** (زمیں –) स्त्री. (फ़ा.) जेथे पुष्कळ फुले फुलतात असे स्थान; पुष्पवन. **–ज़ार** (زار –) पु. (फ़ा.) (१) बाग; उद्यान. (२) प्रफुल्लित स्थान. (३) शोभा; आनंद. (वि.) सुंदर; रम्य; शोभिवंत; हिरवेगार. **–तराश** (تراش –) पु. (फ़ां.) (१) दिव्याची वात कापावयाची कात्री. (२) दिवे विझविणारा नोकर. (३) बागेतील झाडे कापण्याची माळघाची कात्री. **–दस्तः** (دستہ –) पु. (फ़ा.) (१) फुलांचा गुच्छ. (२) संग्रह (लेखांचा, कवितांचा). (३) मासिक पत्र. **–दान** (دان –) पु. (फ़ा.) फुलदाणी. **–दाम** (دام –) पु. (फ़ा.) फुलांची जाळी. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) (१) डाग असलेला. (२) वेलबुट्टी असलेला. **–दुम** (دم –) पु. (फ़ा.) बुलबुल (पक्षी). **–दोज़** (دوز –) वि. (फ़ा.) जिच्यावर वेलबुट्टी काढलेली आहे अशी वस्तू. **–दोज़ी** (دوزی –) स्त्री. (फ़ा.) रेशमाने किंवा जरीने वेलबुट्टी काढण्याचे काम. **–नार** (نار –) पु. (फ़ा.) (१) डाळिंबाचे फूल. (२) डाळिंबी रंग; शेंदरी रंग. (३) डाळिंबाची एक जात. (या झाडाला फळे येत नाहीत. याची फुले औषघाच्या कामी येतात). **–पाश** (پاش –) वि. (फ़ा.) पुष्पवृष्टी करणारा. **–पाशी** (پاشی –) स्त्री. (फ़ा.) पुष्पवृष्टी. **–पैरहन** (پیرہن –) वि. (फ़ा.) गुलाबी रंगाचे व नाजुक कपडे परिधान केलेला (ली). **–पोश** (پوش –) वि. (फ़ा.) फुलांनी झाकून टाकलेला; फुलांनी सजविलेला. **–फ़ाम** (فام –) वि. (फ़ा.) (१) गुलाबी रंगाचा. (२) सुंदर. (स्त्री.) प्रियतमा. **–फ़िशाँ** (فشاں –) वि. (फ़ा.) (१) पुष्पवृष्टी करणारा. (२) दिव्याची काजळी झाडणारा. (३) उत्तम वक्ता. (स्त्री.) फुलबाजी. **–फ़िशानी** (فشانی –) स्त्री. (फ़ा.) पुष्पवृष्टी. **–बंद** (بند –) पु. (फ़ा.) (१) लग्नाच्या वेळी दारावर बांधावयाचे तोरण. (२) एक प्रकारचे रंगीत कापड. **–ए-बकावली** (بکاولی –) पु. स्त्री. (फ़ा.+हि.) (१) एक पांढरे व सुवासिक फूल. (२) एका राजकन्येचे नाव. **–बदन** (بدن –) वि. (फ़ा.) गुलाबासारखे सुंदर व नाजुक शरीर असलेला (ली); सुंदर. (पु.) एक प्रकारचे रेघांचे रेशमी कापड. **–बर्ग** (برگ –) पु. (फ़ा.) गुलाबाची पाकळी. **–बांग** (بانگ –) स्त्री. (फ़ा.) (१) लग्न वगैरेसारख्या मंगल प्रसंगी होणारा गलबला; हर्षध्वनी; पक्ष्यांची मधुर चिवचिव; किलबिल. (२) आनंदाची बातमी. **–बाज़** (باز –) वि. (फ़ा.) फुलांचा षोकीन; रसिक; रंगेल. **–बाज़ी** (بازی –) स्त्री. (फ़ा.) एकमेकांच्या अंगावर फुले फेकण्याचा खेळ; पुष्पक्रीडा. **–बुन** (بن –) पु. (फ़ा.) गुलाबाचे झाड. **–बू** (بو –) स्त्री. (फ़ा.) पुष्पसुगंध. **–बेज़** (بیز –) पु. (फ़ा.) चाळणी. **–मेख़** (میخ –) स्त्री. (फ़ा.) एक प्रकारचा खिळा. (हा लहान असून याचे डोके पसरट असते). **–रंग** (رنگ –) वि. (फ़ा.) गुलाबी रंगाचा. **–रुख़** (رخ –) वि. (फ़ा.) गुलाबाच्या फुलासारखा सुंदर चेहरा असणारा (री); सुंदर. **–रुख़सार** (رخسار –) वि. (फ़ा.) गुलाबी गाल असलेला (ली). **–रू** (رو –) पाहा 'गुलरुख़'. **–रेज़** (ریز –) वि. (फ़ा.)

जिच्यातून फुले पडतात अशी (वस्तू). (स्त्री.) फुलबाजी. –रेज़ी (ریزی –) स्त्री. (फ़ा.) पुष्पवृष्टी. –शकर (شکر –) पु. (फ़ा.) गुलकंद. –शन (شن –) पु. (फ़ा.) बाग; उद्यान. –शन आरा (شن آرا –) वि. (फ़ा.) बागेची सजावट करणारा; माळी. –होना (ہونا –) विझणे; मालवणे.

गुल-ए-'अब्बास (گل عباس) पु. (फ़ा.+'अ.) गुलबक्षीचे फूल; गुलबक्षी.

गुल-ए-अश्रफ़ी (گل اشرفی) पु. (फ़ा.+'अ.) झेंडूचे फूल; गेंदा.

गुल-ए-अहमर (گل احمر) पु. (फ़ा.+'अ.) गुलाब; लाल गुलाब.

गुल-ए-आतशी (گل آتشیں) पु. (फ़ा.) बारा महिने फुलणारा गुलाब.

गुल-ए-आफ़्ताब (گل آفتاب) पु. (फ़ा.) सूर्यमुखी.

गुल-ए-क़हर-ओ-आतशी (گل قہر و آتشی) पु. (फ़ा.) लाजाळूचे फूल.

गुल-ए-काग़ज़ी (گل کاغذی) पु. (फ़ा.+'अ.) (१) कागदी फूल. (२) दिखावटी वस्तू.

गुल-ए-ख़ंदाँ (گل خنداں) पु. (फ़ा.) उमललेले फूल.

गुल-ए-ख़त्मी (گل خطمی) पु. (फ़ा.) एक जंगली फूल.

गुल-ए-ख़ुदरो (گل خودرو) पु. (फ़ा.) आपोआप उगवलेल्या झाडाचे फूल.

गुल-ए-ख़ैरा (گل خیرا) पु. (फ़ा.) एक प्रकारचे भपकेदार फूल.

गुल-ए-चश्म (گل چشم) पु. (फ़ा.) डोळ्यात पडलेले फूल (रोग).

गुल-ए-चांदनी (گل چاندنی) पु. (फ़ा.+हिं.) चंद्रमुखी (फूल).

गुल-ए-ज'अफ़री (گل جعفری) पु. (फ़ा.) (१) पिंवळघा रंगाचे एक फूल. (२) पिवळा रंग.

गुल-ए-तुर्रः (گل طرہ) पु. (फ़ा.) कोंबडा (फूल): लाल रंगाचे एक फूल.

गुल-ए-नाशिगुफ़्तः (گل ناشگفتہ) पु. (फ़ा.) (१) न उमललेले फूल; कळी. (२) कुमारिका; कुमारी.

गुल-ए-पिलास (گل پلاس) पु. (फ़ा.) पळसाचे फूल (संस्कृत : पलाशपुष्प).

गुल-ए-पियादः (گل پیادہ) पु. (फ़ा.) (१) लहान झाडाचे किंवा लहान आकाराचे फूल. (२) आपोआप उगवलेले झाडाचे फूल. (३) वास नसलेला एक प्रकारचा गुलाब.

गुल-ए-बेगानः (گل بیگانہ) पु. (फ़ा.) आपोआप उगवलेले झाडाचे फूल.

गुल-ए-मख़मल (گل مخمل) पु. (फ़ा.) कोरांटी.

गुल-ए-मेंहदी (گل مہندی) पु. (फ़ा.) मेंदीचे फूल. आश्विनात फुलणारे एक लहानसे झाड. (याला एकेरी पाकळघांची अनेकरंगी फुले येतात).

गुल-ए-यासमीन (گل یاسمن) पु. (फ़ा.) चमेली; मालती; नवमल्लिका.

गुल-ए-र'अना (گل رعنا) पु. (फ़ा.) (१) आतून तांबडे व बाहेरून पिवळे असलेले एक सुंदर फूल; सुगंधी गुलाब. (२) प्रेमिका; प्रेमपत्र.

गुल-ए-लालः (گل لالہ) पु. (फ़ा.) पेल्याच्या आकाराचे एक फूल.

गुल-ए-वर्द (گل ورد) पु. (फ़ा.+'अ.) गुलाबाचे फूल.

गुल-ए-शबअफ़ोज़ (گل شب افروز); **गुल-ए-शबबो** (گل شب بو); **गुल-ए-शब्बू** (گل شبو) पु. (फ़ा.) रातराणी; रजनीगंधा.

गुल-ए-शम्'अ (گل شمع) पु. (फ़ा.+'अ.) दिव्याची किंवा मेणबत्तीची ज्योत; जळणारी किंवा जळालेली वात.

गुल-ए-सद बर्ग (گل صد برگ) पु. (फ़ा.) शंभर पाकळघांचे फूल; गुलाब; झेंडू.

गुल-ए-सरसबद (گل سرسبد) पु. (फ़ा.) (१) परडीतील सर्वांत वरचे व सर्वोत्कृष्ट फूल. (२) सर्वश्रेष्ठ व्यक्ती. (३) सर्वोत्तम वस्तू.

गुल-ए-सुर्ख़ (گل سرخ) पु. (फ़ा.) (१) गुलाब. (२) सूर्य.

गुल-ए-सूरी (گل سوری) पु. (फ़ा.) एक प्रकारचा गुलाब.

गुल-ए-सोसन (گل سوسن) पु. (फ़ा.) जिभेसारखी पाकळी असलेले अस्मानी रंगाचे एक फूल, भुईकमळ.

गुल-ए-हज़ारः (گل ہزارہ) पु. (फ़ा.) झेंडूचे झुपकेदार फूल; गेंदा.

गुलग़ुलः (غلغلہ) पु. ('अ.) (१) कोलाहल; गलबला. (२) किलबिल. (३) हर्षध्वनी.

गुलाज़ (غلاظ) वि. ('अ.) (१) लठ्ठ; जाड. (२) कडक; कठीण.

गुलाब (گلاب) पु. (फ़ा.) (१) गुलाबाचे फूल व झाड. (२) गुलाबपाणी. **–जामुन** (جامن –) पु. स्त्री. (फ़ा.+हिं.) (१) गुलाबाचा सुगंध असलेले एक प्रकारचे जांभूळ. (२) जांभुळाच्या आक्राराची एक प्रकारची मिठाई; गुलाबजाम. **–पाश** (پاش –) पु. (फ़ा.) गुलाबदाणी.

गुलाबी (گلابی) वि. (फ़ा.) गुलाबाच्या रंगाचा; फिकट तांबडा. (स्त्री.) (१) रंगीत काचेची

मद्याची सुरई. (२) मद्यचषक. (३) गुलाबदाणी. (४) गुलाबपाणी घातलेली मिठाई (गुलाबी रेवडी). **–जाड़ा** (جاڑا –) पु. (फ़ा.+हिं.) गुलाबी थंडी.

गुलाम (غلام) पु. ('अ.) (१) दास; गुलाम; केवळ अन्न व कपडे देऊन ठेवलेला नोकर. (२) पराधीन व्यक्ती. (३) वयात आलेला मुलगा. (४) पत्त्यांतील गुलाम. **–गर्दिश** (گردش –) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) वाड्याच्या सभोवताली नोकरांना राहण्यासाठी बांधलेली छपरी. (२) जनानखाना व पुरुषांचा दिवाणखाना यामध्ये पडद्यासारखी असलेली भित. **–चापार** (چاپار –) पु. ('अ.+फ़ा.) पोस्टमन; पत्रवाहक. **–ज़ादः** (زادہ –) पु. ('अ.+फ़ा.) (१) दासीपुत्र. (२) माझा मुलगा (विनयाने). **–माल** (مال –) पु. ('अ. + फ़ा.) सदैव सेवेस हजर असणारी वस्तू; घोंगडी.

गुलाम-ए-जरख़रीद (غلام زر خرید) पु. ('अ.+फ़ा.) विकत घेतलेला गुलाम.

गुलाम-ए-बेदाम (غلام بے دام) पु. ('अ.+फ़ा.+हिं.) फुकटचा गुलाम; निकृष्ट चाकर.

गुलामानः (غلامانہ) वि. ('अ.+फ़ा.) गुलामासारखा; दासोचित.

गुलामी (غلامی) स्त्री. ('अ.) गुलामगिरी; दास्य; पराधीनता.

गुलालः (غلالہ) स्त्री. (फ़ा.) प्रियतमेच्या केसांची बट.

गुलिस्ताँ (گلستان) पु. [फ़ा. 'गुलिस्तान' (گلستان) चे संक्षिप्त.] (१) बाग; पुष्पोद्यान. (२) शेख; स'अदीचा प्रख्यात उपदेश-ग्रंथ. **–ज़ादः** (زادہ –) पु. (फ़ा.) बागेतील हिरवळ; फूल.

गुलिस्तान (گلستان) पु. (फ़ा.) बाग; उपवन.

गुली (گلی) वि. (फ़ा.+हिं.) (१) फुलांशी संबंधित. (२) डाग किंवा ठिपके असलेला. (३) एक प्रकारचे कबुतर. याच्या पायांवर ठिपके असतात.

गुलू (غلو) पु. (फ़ा.) कोलाहल; आरडाओरडा.

गुलू (گلو) पु. (फ़ा.) (१) गळा; मान; कंठ. (२) आवाज. **–ख़लासी** (خلاصی –) स्त्री. (फ़ा.) सुटका; बंधनमुक्ती. **–गीर** (گیر –) वि. (फ़ा.) (१) गळा धरणारा; आरोप करणारा. (२) आवाज रुद्ध करणारा. **–तः** (تہ –) पु. (फ़ा.) लहान मुलांची कुंची; टोपडे; गलोते. **–बंद** (بند –) पु. (फ़ा.) (१) गळपट्टा; मफलर; नेकटाय. (२) गळघातील एक दागिना. **–बस्तः** (بستہ –) वि. (फ़ा.) (१) ज्याचा आवाज बसला आहे असा. (२) स्तब्ध; गप्प. **–बुरीदः** (بریدہ –) वि. (फ़ा.) ज्याचा गळा कापला गेला आहे असा; वधित. **–शाख़शाख़** (شاخ شاخ –) पु. (फ़ा.) अनेक लोकांसमोर मोठ्या आवाजात सांगितल्या जाणाऱ्या कहाण्या. **–सोज़** (سوز –) वि. (फ़ा.) (१) अत्यंत सुंदर; उत्कृष्ट. (२) फार गोड. (३) चमचमीत.

गुलूल (غلول) पु. ('अ.) द्रव्याचे अपहरण; विश्वासघात.

गुलूलः (گولہ) पु. (फ़ा.) (१) गोळी (बंदुकीची अथवा औषधाची). (२) गोळा. (३) जंगल. **–बाज़ी** (بازی –) स्त्री. (फ़ा.) बिलियर्ड (खेळ). **–रेज़** (ریز –) पु. (फ़ा.) बंदुकीच्या गोळ्या तयार करण्याचा साचा.

गुलेल (غلیل) स्त्री. (फ़ा. + हिं.) गोफण **–ची** (چی –); **–बाज़** (باز –) वि. (फ़ा. + हिं.) गोफण मारण्यात पटाईत.

गुलेलः (غلیلہ) पु. (फ़ा.+हिं.) गोफणीचा दगड किंवा ढेकूळ.

गुलैम (غلیم) पु. [अ. 'गुलाम' (غلام) चे लघु.] लहान मुलगा; देखणा; गोजिरवाणा मुलगा.

गुल्मत (غلمت); **गुल्मः** (غلمہ) पु. ('अ.) कामापुरता.

गुल्ल (غل) पु. ('अ.) (१) कैद्याच्या गळघातील लोखंडी पट्टा किंवा बिल्ला. (२) तृष्णा; तहान. (३) मनस्ताप; व्यथा; पीडा.

गुल्लः (غلہ) पु. (फ़ा.) (१) गोफणीतील दगड किंवा ढेकूळ. (२) कोलाहल. (३) तृष्णा; तहान. (४) अरुंद तोंडाचे भांडे.

गुवार (گوار); **गुवारः** (گوارہ) वि. (फ़ा.) (१) पसंत; अनुकूल. (२) सह्य. **–करना** (کرنا –) सहन करणे. (शुद्ध उच्चारण हेच आहे, परंतु उर्दूत 'गवारा' प्रचलित आहे).

गुवारिंदः (گواردہ) वि. (फ़ा.) (१) आवडणारा. (२) लवकर पचणारा.

गुवारिदः (گوارىدہ) वि. (फ़ा.) (१) आवडलेला. (२) पचलेला.

गुवास़ (غواث) पु. ('अ.) फिर्याद; गाऱ्हाणे ऐकणारा; न्याय करणारा.

गुवाह (گواہ) पु. (फ़ा.) साक्षीदार (शु.+उ.).

गुश (غش) वि. ('अ.) (१) दगाबाज; अपहरण करणारा. (२) वाईट चिंतणारा; हितशत्रू.

गुश्नी (گشنی) स्त्री. (फ़ा.) मैथुन; संभोग.

गुश्नीज़ (گشنیز) पु. (फ़ा.) धणे; कोथिंबीर.

गुसार (گسار) प्रत्य. [फ़ा. 'गुसारीदन' (گساریدن) (१) खाणे. (२) तोडणे. (३) सोडून देणे.] खाणारा; पिणारा. [उदा. 'ग़म गुसार' (غم گسار) दुःख गिळणारा; दुःख सहन करणारा].

गुसारिंदः (گسارندہ) वि. (फ़ा.) (१) खाणारा. (२) त्याग करणारा.

गुसुल (غسل) पु. ('अ.) (१) सर्व शरीर धुणे. (२) स्नान करणे.

गुस्तर (گستر) प्रत्य. [फ़ा. 'गुस्तर्दन' (گستردن) अंथरणे; पसरणे.] अंथरणारा; पसरविणारा. [उदा. 'करम गुस्तर' (کرم گستر) कृपा पसरविणारा; कृपाळू].

गुस्ताख़ (گستاخ) वि.(फ़ा.) अशिष्ट; अमर्यादशील; धृष्ट; आडदांड. **–तबअ** (طبع –) वि. (फ़ा.+'अ.) उद्धट; फटकळ; उर्मट.

गुस्ताख़ानः (گستاخانہ) वि. (फ़ा.) उद्धटासारखा; धृष्टपणे.

गुस्ताख़ी (گستاخی) स्त्री. (फ़ा.) बेअदबी; अनादर; धाष्टर्य; उर्मटपणा.

गुस्न (غسن) वि. ('अ.) अशक्त; दुर्बळ.

गुस्न (غصن) पु. ('अ.) झाडाची फांदी; शाखा.

गुस्ल (غسل) पु. ('अ.) स्नान; आंघोळ. **–ख़ानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) स्नानगृह.

गुस्ल-ए-मैयत (غسل میت) पु. ('अ.) मृत व्यक्तीच्या शरीराला (शवाला) स्नान घालणे.

गुस्ल-ए-सेह्‌त (غسل صحت) पु. ('अ.) आजारातून बरे झाल्यानंतर करण्यात येणारे प्रथम स्नान.

गुस्स (غس) वि. ('अ.) (१)दुर्बळ; अशक्त. (२) वृद्ध. (३) नीच; दुष्ट.

गुस्सैल (غصیل); **गुस्सैला** (غصیلا) वि. ('अ.+हिं.) रागीट; चिडखोर.

गुस्सः (غصہ) पु. ('अ.) क्रोध; राग; कोप. **–उतारना** (اتارنا –) एखाद्यावर राग काढणे. **–थूक देना** (تھوک دینا –) मनातून राग काढून टाकणे; जाऊ देणे. **–पी जाना** (پی جانا –) राग आवरणे; सहन करणे; राग गिळणे. **–वर** (ور –) वि. ('अ.+फ़ा.) रागीट.

गुहर (گہر) पु. [फ़ा. 'गौहर' (گوہر) चे संक्षिप्त.] मोती; मोत्ये; मौक्तिक. **–अफ़्शां** (افشاں –) वि. (फ़ा.) मोती उधळणारा; गोड बोलणारा. **–बार** (بار –) वि. (फ़ा.) (१) मोत्यांची वृष्टी करणारा. (२) रुदन करणारा. (३) अश्रुपूर्ण (नेत्र).

दामन पि. तेरे ग़ैर के माथे का पसीनः।
और वह भी मेरी चश्म-ए-गुहर बार के आगे ।।

–शनास (شناس –) वि. (फ़ा.) (१) मोत्यांची पारख करणारा; जवाहिऱ्या. (२) गुणग्राहक.

गूँ- (گوں) पु. (फ़ा.) (१) रंग. (२) प्रकार (प्रत्य.) रंगाचा. [उदा. 'नील गूँ' (نیل گوں) निळ्या रंगाचा].

गू (گو) पु. (फ़ा.) चेंडू : पोलोचा चेंडू.

गूक (گوک) पु. (तु.) आकाश; अस्मानी रंग.

गूक (غوک) पु. (फ़ा.) बेडूक.

गूगिर्द (گوگرد) स्त्री. (फ़ा.) गंधक.

गूगिर्द-ए-अह्‌मर (گوگرد احمر) स्त्री. (फ़ा.+'अ.) (१) तांबडा गंधक (सुवर्णक्रियेत उपयोगी). (२) सर्वगुणसंपन्न व दुर्मिळ व्यक्ती, वस्तू.

गूतः (غوطہ) पु. ('अ.) बुडी मारणे. (हा उच्चार शुद्ध आहे, परंतु उर्दूत 'गोतः' प्रचलित आहे).

गूदः (گودہ) पु. (तु.) शरीर; देह.

गून (گون) पु. (फ़ा.) रंग; वर्ण.

गूना (گونا) पु. (फ़ा.) (१) रंग; वर्ण. (२) फेस पावडर; मुखचूर्ण. (३)नियम. (४) प्रकार; पद्धती.

गूनागूँ (گوناگوں) वि. (फ़ा.) रंगीबेरंगी; चित्र-विचित्र तऱ्हेतऱ्हेचे.

गूनाब (گوناب) पु. (फ़ा.) तोंडाला लावावयाचे सुगंधी चूर्ण; पावडर.

गूनिया (گونیا) पु. (फ़ा.) काटकोन्या; गुण्या. (सुतार व गवंडी यांचे एक अवजार—काटकोन निश्चित करण्याचे).

गूनः (گونہ) पु. (फ़ा.) (१) रंग. (२) ढंग; पद्धत. (प्रत्य.) पट. [उदा. 'दो गूनः' (دو گونہ) दुप्पट. 'यक गूनः' (یک گونہ) एकपट; थोडासा; एकटा]. यक गूनः बेखुदी मुझे दिन रात चाहि'ए ।

गूल (غول) पु. ('अ.) (१) भूत; राक्षस; सैतान. (२) दैवी आपत्ती. (३) साप; नाग.

गूल (غول) पु. ('अ.) कान; कर्ण.

गूल (غول) पु. (तु.) सेनापती; विद्यमान असलेले सैन्य.

गूल-ए-बियाबाँ (غول بیاباں); **गूल-ए-बियाबानी** (غول بیابانی) पु. ('अ.+फ़ा.) जंगलांत हिंडणारी भुते-खेते.

गूलः (غولہ) वि. (फ़ा.) मूर्ख; मठ्ठ.

गेज (گیج) वि. (फ़ा.) (१)उद्विग्न; बेचैन. (२) मूर्ख; घर्मेडखोर.

गेती (گیتی) स्त्री. (फ़ा.) जग; विश्व; दुनिया. **–अफ़्रोज़** (افروز –) वि. (फ़ा.) जगाला प्रकाशमय बनविणारा. **–आरा** (آرا –) वि. (फ़ा.) जगाला शोभिवंत बनविणारा; जहान आरा. **–नवर्द** (نورد –) **–पैमा** (پیما –) वि. (फ़ा.) जगभर हिंडणारा; जगप्रवासी.

गेसू (گیسو) पु. (फ़ा.) केसाची बट; पाठीवर रुळणारे केस. **–दराज़** (دراز –) वि. (फ़ा.) जिचे केस लांबसडक आहेत अशी (व्यक्ती). **–दार** (دار –) वि. पु. (फ़ा.) (१) दासीपुत्र. (२) शेंडे नक्षत्र; धूमकेतू. **–बुरीदः** (بریدہ –) वि. स्त्री. (फ़ा.) जिचे केस कापले आहेत अशी स्त्री; निर्लज्ज, बदचलन स्त्री.

ग़ै (غے) पु. (अ.) (१) निराशा; नाउमेदी. (२) कुमार्ग. (३) नरकातील एक स्थान.

ग़ैज़ (غیظ) पु. (अ.) क्रोध; कोप.

ग़ैज़-ओ-ग़ज़ब (غیظ و غضب) पु. (अ.) भयंकर क्रोध; कोप.

ग़ैन (غین) पु. (अ.) (१) अरबी वर्णमालेतील एकोणिसावे, फारसीचे बाविसावे व उर्दूचे पंचविसावे अक्षर (غ); 'अबजद' (ابجد) प्रमाणे याचे संख्यामूल्य १००० आहे. (२) भरून आलेले मेघ; अभ्र. (३) तहान. (४) काळोख.

ग़ैब (غیب) वि. पु. (अ.) (१) अप्रत्यक्ष; अपरोक्ष; अदृश्य. (२) गैरहजर; अनुपस्थित. (३) भाग्य; नियती. (४) दुर्मिळता. (५) परलोक.

काम रुकनेका नहीं ऐ दिल-ए-नाही को'ई ।
खुदबखुद ग़ैब से होजा'एगा सामाँ को'ई ।।

–त (ت –) स्त्री. (अ.) (१) अनुपस्थिती; गैरहजेरी; अपरोक्ष. (२) अंतर्धान पावणे; लुप्त होणे. **–दाँ** (داں –). **–दान** (دان –) वि. (अ. + फ़ा.) गुप्त गोष्टी जाणणारा; रहस्ये जाणणारा; भविष्यवेत्ता. **–दानी** (دانی –) स्त्री. (अ.+फ़ा.) रहस्यज्ञान; भविष्यज्ञान. **'आलम-ए-ग़ैब** (عالم غیب) पु. (अ.) परलोक.

ग़ैबानी (غیبانی) स्त्री. (अ.+हिं.) स्त्रियांसाठी वापरली जाणारी एक शिवी; भांडकुदळ स्त्री; रांड.

ग़ैबी (غیبی) वि. (अ.) (१) पारलौकिक; अस्मानी. (२) दैवी. (३) परोक्ष; अज्ञात.

ग़ैम (غیم) पु. (अ.) (१) ढग; मेघ. (२) तृष्णा; तहान.

ग़ैयूर (غیور) वि. (अ.) (१) स्वाभिमानी. (२) हेवा करणारा.

ग़ैर (غیر) वि. (अ.) (१) अन्य; दुसरा. (२) परका. (३) विभिन्न. (४) विरुद्ध. (पु.) (१) लाभ करून देणे. (२) पावसाच्या द्वारे जमिनीला पाणी देणे. (३) परकी व्यक्ती. (अव्य.) शिवाय; खेरीज. (प्रत्य.) नकार किंवा विरोध दर्शविणारा उपसर्ग. **–अहम** (اہم –) वि. (अ.) महत्त्वहीन; मामुली; सामान्य. **–आ'ईनी** (آئینی –) वि. (अ. + फ़ा.) बेकायदेशीर; अवैध. **–आबाद** (آباد –) वि. (अ. + फ़ा.) निर्जन; वैराण. **–इख़्तियारी** (اختیاری –) वि. (अ.) ऐच्छिक नसलेला; अनिवार्य; अपरिहार्य. **–इन्सानी** (انسانی –) वि. (अ.) अमानूष; अमानवी. **–इन्साफ़** (انصاف –) क्रि. (अ.) अन्याय्य; विषम. **–इन्साफ़ी** (انصافی –) स्त्री. (अ.) अन्याय; विषमता; जुलूम. **'अिलाक़ः** (علاقہ –) पु. (अ.) दुसऱ्याचा मुलूख; परकीय प्रदेश. **–क़ानूनी** (قانونی –) वि. (अ.) बेकायदेशीर; अवैध. **–कारआमद** (کارآمد –) वि. (अ.+फ़ा.) अनुपयुक्त; निरुपयोगी. **–जानिबदार** (جانبدار –) वि. (अ. + फ़ा.) तटस्थ; अलिप्त; निष्पक्ष. **–जानिबदारी** (جانبداری –) स्त्री (अ.+फ़ा.) तटस्थता; निष्पक्षता; अलिप्तता. **–ज़िम्मःदार** (ذمہدار –) वि. (अ. + फ़ा.) बेजबाबदार. **–ज़िम्मःदारी** (ذمہداری –) स्त्री. (अ.+फ़ा.) बेजबाबदारी; बेपर्वाई. **–ज़ी'अक़्ल** (ذی عقل –) (अ.) निर्बुद्ध; विवेकहीन. **–ज़ी रूह** (ذی روح –) वि. (अ.) निष्प्राण; निर्जीव. **–ज़ीशु'ऊर** (ذی شعور –) वि. (अ.) जाणीवरहित; चैतन्यहीन; जड; विवेकहीन. **–तनख़्वाहदार** (تنخواہ دار –) वि. (अ.+फ़ा.) अवैतनिक; बिनपगारी. **–तरबियतयाफ़्तः** (تربیت یافتہ –) वि. (अ. + फ़ा.) अशिक्षित; असभ्य; बेशिस्त. **–तहज़ीबयाफ़्तः** (تہذیب یافتہ –) वि. (अ.+फ़ा.) असभ्य; अशिष्ट. **–त'अलिमयाफ़्तः** (تعلیم یافتہ –) वि. (अ.+फ़ा.) (१) अशिक्षित; निरक्षर. (२) असभ्य. **–ज़रूरी** (ضروری –) वि. (अ.) अनावश्यक; निरर्थक. **–पसंदीदः** (ناپسندیدہ –) वि. (अ.+फ़ा.) (१) नापसंत; अप्रिय. (२) अनुचित; अयोग्य. **–पा'इदार** (پائدار –) वि. (अ.+फ़ा.) डळमळीत; अस्थिर; कच्चा. **–पुख़्तः** (پختہ –) वि. (अ. + फ़ा.) (१) कच्चे; अपरिपक्व (फळ). (२) अनिश्चित; नक्की नसलेला. (३) कच्च्या विटांनी बांधलेले. **–फ़सीह** (فصیح –) वि. (अ.) (१) लालित्यहीन; प्रसादरहित (शब्द वगैरे). (१) अप्रचलित. **–फ़ानी** (فانی –) वि. (अ.) शाश्वत; अनश्वर. **–फ़ित्री** (فطری –) वि. (अ.) अनैसर्गिक; अप्राकृतिक; अस्वाभाविक. **–मक़्तू'अ** (مقطوع –) वि. (अ.) अखंडित; न तुटलेला; अखंड. **–मक़्फ़ूल** (مکفول –) वि. (अ.) गहाण नसलेला; मुक्त. **–मक़्बूल** (مقبول –) वि. (अ.) लोकप्रिय नसलेला; अमान्य; अप्रिय. **–मक्रूह** (مکروہ –) वि. (अ.) दिसावयास वाईट नसलेला; सुंदर; मनोहर. **–मख़्सूस** (مخصوص –) वि. (अ.) सर्वसामान्य; आम. **–मग़शूश** (مغشوش –) वि. (अ.) निर्भेळ; अकृत्रिम.

–मज़रू'अ (مزروع); **–मज़रू'अः** (مزروعہ –) वि. ('अ.) पडीत जमीन. **–मत्बू'अ** (مطبوع –) वि.('अ.) नापसंत; अप्रिय. **–मत्बू'अः** (مطبوعہ –) वि. ('अ.) अप्रकाशित (ग्रंथ); हस्तलिखित; पांडुलिपी. **–मत्रूक** (متروک –) वि. ('अ.) प्रचलित; त्याज्य नसलेला; रूढ. **–मत्रूकः** (متروکہ –) वि. ('अ.) न सोडलेली किंवा न टाकलेली वस्तू. **–मत्लूब** (مطلوب –) वि. ('अ.) अवांछित; अनिच्छित (वस्तू). **–मद'ऊ** (مدعو –) वि. ('अ.) अनिमंत्रित. **–मद्खूलः** (مدخولہ –) वि. ('अ.) (१) रखेली नसणारी स्त्री. (२) दाखल न केलेली (वस्तू). **–मन्क़ूल** (منقول –) वि. ('अ.) ज्याची नक्कल, प्रत करण्यात आलेली नाही असा; ज्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही असा. **–मन्क़ूलः** (منقولہ –) वि. ('अ.) स्थावर (संपत्ती); अचल. **–मन्कूह** (منکوح –) वि. पु. ('अ.) अविवाहित (पुरुष). **–मन्कूहः** (منکوحہ –) वि. स्त्री. ('अ.) अविवाहित (स्त्री.) रखेली. **–मफ़्तूह** (مفتوح –) वि. ('अ.) अपराजित; अजिंक्य. **–मम्नू'अ** (ممنوع –) वि. ('अ.) निषिद्ध; वर्जित नसलेला; विहित. **–मम्नून** (ممنون –) वि. ('अ.) अकृतज्ञ; कृतघ्न. **–मर्'ई** (مرئی –) वि. ('अ.) अगोचर; अदृश्य. **–मर्'ऊब** (مرعوب –) वि. ('अ.) ज्याला धाक वाटत नाही असा; निर्भय; प्रभावित न होणारा. **–मर्ग़ूब** (مرغوب) –वि. ('अ.) नापसंत; अप्रिय; असुंदर. **–मर्तूब** (مرطوب –) वि. ('अ.) (१) कोरडा. (२) उष्ण; गरम. **–मर्बूत** (مربوط –) वि. ('अ.) क्रमबद्ध नसलेला; अव्यवस्थित. **–मल्फ़ूज़** (ملفوظ –) वि. ('अ.) लिहिला जाणारा परंतु बोलण्यात रूढ नसलेला (शब्द.) **–मश्कूक** (مشکوک –) वि. ('अ.) असंदिग्ध; निःशंक. **–मश्रूत** (مشروط –) वि. ('अ.) अट नसलेला; बिनशर्त. **–मश्हूर** (مشہور –) वि. ('अ.) अप्रसिद्ध. **–मस्कूक** (مسکوک –) वि. ('अ.) (१) शिक्का नसलेली (चांदी किंवा सोने). (२) मोहर नसलेला. **–मस्मूम** (مسموم –) वि. ('अ.) विषरहित; निर्विष. **–महदूद** (محدود –) वि. ('अ.) अमर्याद. **–म'अमूल** (معمول –); **–म'अमूली** (معمولی –) वि. ('अ.) असामान्य; महत्त्वपूर्ण. **–मायूस** (مایوس –) वि. ('अ.) निराश नसलेला; आशावान. **–म'असूम** (معصوم –) वि. ('अ.) पापी; कलुषित अंतःकरणाचा. **–माहिर** (ماہر –) वि. ('अ.) तज्ज्ञ नसलेला; अनभिज्ञ. **–मु'अय्यन** (معین –) वि. ('अ.) अनिश्चित; नक्की नसलेले. **–मुकम्मिल** (مکمل –) वि. ('अ.) अपूर्ण; अर्धवट. **–मुकर्रर** (مکرر –) वि. ('अ.) पुनः न होणारा; अपरिचित. **–मुक़र्रर** (مقرر –); **–मुक़र्ररः** (مقررہ –) वि. ('अ.) अनिश्चित; न ठरलेले. **–मुजज़्ज़ा** (مجزیٰ –) वि. ('अ.) संबद्ध; एकत्रित. **–मुजस्सम** (مجسم –) वि. ('अ.) आकाररहित; निराकार. **–मुजाज़** (مجاز –) वि. ('अ.) अनधिकारी. **–मुत'अल्लिक़** (متعلق –) वि. ('अ.) असंबद्ध; असंगत. **–मुत'अस्सिब** (متعصب –) वि. ('अ.) धार्मिक किंवा जातीय बाबतीत अभिनिवेश नसलेला; उदार; विशाल अंतःकरणाचा. **–मुतग़ैयिर** (متغیر –) वि. ('अ.) अविकृत; मूळ स्वरूपातील. **–मुतनाही** (متناهی –) वि. ('अ.) अपार; अनंत; अमर्याद. **–मुतमद्दिन** (متمدن –) वि. ('अ.) असभ्य; अशिष्ट; जंगली. **–मुतवक़्क़'अ** (متوقع –) वि. ('अ.) आशातीत; अनपेक्षित. **–मुतशद्दिद** (متشدد –) वि. ('अ.) अहिंसक. **–मुतशद्दिदानः** (متشددانہ –) वि. ('अ.+फ़ा.) शांततापूर्ण; अहिंसक (मार्गाचा). **–मुतह्क़िक़** (متحقق –) वि. ('अ.) तपास न केलेला; संदिग्ध. **–मुतहम्मिल** (متحمل –) वि. ('अ.) असहिष्णू. **–मुतहर्रिक** (متحرک –) वि. ('अ.) गतिहीन; निश्चल. **–मुतास्सिर** (متاثر –) वि. ('अ.) अप्रभावित; निष्पक्ष; तटस्थ. **–मुत'अह्द** (متعہد –) वि. ('अ.) (१) बेजबाबदार. (२) ज्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा करार झालेला नाही असा. **–मुदल्लल** (مدلل –) वि. ('अ.) अप्रमाणित; तर्करहित; अतर्क्य. **–मुनज़्ज़म** (منظم –) वि. ('अ.) असंघटित; असंबद्ध. **–मुनासिब** (مناسب –) वि. ('अ.) (१) अयोग्य; अनुचित. (२) अश्लील. (३) असभ्य; अशिष्ट. **–मुम्किन** (ممکن –) वि. ('अ.) असंभव; अशक्य. **–मुरव्वज** (مروج –) वि. ('अ.) अप्रचलित. **–मुवस्सक़** (موثق –) वि. ('अ.) अप्रमाणित; पुरावा नसलेला; अनिश्चित. **–मुशल्लस** (مشخص –) वि. ('अ.) ज्याचे निदान झाले नाही असा; ज्याच्या कुळाची (घराण्याची) माहिती मिळत नाही असा. **–मुशाबहः** (مشابہہ –) वि. ('अ.) एकमेकांशी साम्य नसलेले; फरक असलेला. **–मुश्तबः** (مشتبہ –) वि. ('अ.) निःसंदिग्ध; नक्की. **–मुसद्दक़ः** (مصدقہ –) (वि.) ('अ.) जिला दुजोरा मिळालेला नाही अशी (बातमी); अप्रमाणित; अविश्वसनीय. **–मुसल्लम** (مسلم –) वि. ('अ.) अमान्य; अप्रमाणित; निराधार. **–मुसल्लह** (مسلح –) वि. ('अ.) निःशस्त्र. **–मुसल्सल** (مسلسل –) वि. ('अ.) खंडित; अनिरंतर. **–मुसावी** (مساوی –) वि. ('अ.) असमान; विषम. **–मुस्तक़िल** (مستقل –) वि. ('अ.) तात्पुरता; हंगामी; अस्थायी. **–मुस्तती'अ** (مستطیع –) वि. ('अ.) (१) अशक्त; दुर्बल. (२) निर्धन. **–मुस्तनद** (مستند –) वि. ('अ.) प्रमाणपत्र नसलेला; अप्रमाणित; अविश्वसनीय. **–मुस्तह्क़** (مستحق –) वि ('अ.) अपात्र; अयोग्य; अनधिकारी. **–मुस्त'अमल** (مستعمل –) वि. ('अ.) वापरात नसलेला; अप्रचलित. **–मुहज़्ज़िब**

(مہذب –) वि. ('अ.) असभ्य; असंस्कृत. **–मु'अतबर** (معتبر –) वि. ('अ.) अविश्वसनीय; बेभरवशाचा. **–मौजूद** (موجود –) वि. ('अ.) अविद्यमान; अनुपस्थित. **–मौजूदगी** (موجودگی –) स्त्री. ('अ.) अनुपस्थिती. अविद्यमानता. **–मौरूसी** (موروثی –) वि. ('अ.) (१) वडिलार्जित नसलेली (जमीन किंवा संपत्ती). (२) परंपरेने जमीन न कसणारे कूळ. **–रस्मी** (رسمی –) वि. ('अ. + फ़ा.) अनौपचारिक; सामान्य. **–रा'इज** (رائج –) वि. ('अ.) अप्रचलित; चालू नसलेला. **–वाक़ि'ओ** (واقعی –) वि. ('अ.) (१) असत्य; अवास्तविक. (२) अनुचित. **–वाक़ि'अ** (واقع –) वि. ('अ.) (१) खोटे; असत्य. (२) अशिष्ट. **–वाजिब** (واجب –) वि. ('अ.) गैरवाजवी; अयोग्य. **–वादिह्** (واضح –) वि. ('अ.) अस्पष्ट; अप्रकट; अस्फुट. **–वुक़ू'ओ** (وقوعی –) वि. ('अ.) (१) नालायकी; अयोग्यता. (२) नकलीपणा. **–शरीफ़** (شریف –) वि. ('अ.) अकुलीन; नीच; अधम. **–सहीह** (صحیح –) वि. ('अ.) (१) असत्य. (२) अशुद्ध; चूक. **–साकिन** (ساکن –) वि. ('अ.) रहिवासी नसलेला; उपरा. **–सालिह्** (صالح –) वि. ('अ.) (१) अशुद्ध; दूषित. (२) असभ्य. **–हाज़िर** (حاضر –) वि. ('अ.) गैरहजर; अनुपस्थित. **–हाज़िरी** (حاضری –) स्त्री. ('अ.) गैरहजेरी; अनुपस्थिती.

ग़ैरत (غیرت) स्त्री. ('अ.) (१) लज्जा; लाज. (२) अब्रू; शील. (३) स्वाभिमान. **–दार** (دار –); **–मंद** (مند –) वि. ('अ.+फ़ा.) (१) लज्जाशील; विनयी; अब्रूदार. (२) स्वाभिमानी.

ग़ैरियत (غیریت) स्त्री. ('अ.) (१) परकेपणा; दुजाभाव. (२) विरोध.

ग़ैल (غیل) पु. ('अ.) (१) बाळसेदार मूल. (२) गुबगुबीत दंड. (३) संभोगाच्या वेळी किंवा गरोदरपणी स्त्री आपल्या मुलाला पाजते ते दूध.

ग़ैलम (غیلم) स्त्री. ('अ.) (१) वयात आलेली व कामवासना जागृत झालेली सुंदर मुलगी. (२) बेडूक. (३) कासव.

ग़ैहम (غیہم) स्त्री. ('अ.) अंधार; काळोख.

गैहां (گیہاں); **गैहान** (گیہان) पु. (फ़ा.) जग; विश्व.

गो (گو) अव्य. (फ़ा.) जरी; यद्यपि. **–कि.** (کہ –) अव्य. (फ़ा.) जरी (प्रत्य.) सांगणारा; बोलणारा. [उदा. 'कमगो' (کم گو) मितभाषी; अबोल].

गो (گو) पु. (फ़ा.) (१) खड्डा. (२) चेंडू. (३) पहिलवान.

गो (گو) पु. स्त्री. [फ़ा. 'गाव' (گاو) चे संक्षिप्त.] गाय; म्हैस.

गो'इंदः (گوئندہ) वि. (फ़ा.) सांगणारा; प्रवक्ता (पु.) गुप्तचर; हेर.

गो'ई (گوئی) स्त्री. प्रत्य. (फ़ा.) कथन; बोलणे. [उदा. 'ऐब गो'ई' (عیب گوئی) दोषकथन; निंदा].

गोए (گوے) पु. (फ़ा.) (१) चेंडू. (२) सूर्य. (३) काजे (बटणाचे). **–अंगलः** (انگلہ –) पु. (फ़ा.) बटण; काज; गुंडी. **–गिरीबाँ** (گریباں –) पु. (फ़ा.) गळघाजवळचे बटण. **–चौगाँ** (چوگاں –) पु. (फ़ा.) पोलोचा चेंडू. **–बाज़ी** (بازی –) स्त्री. (फ़ा.) चेंडूफळीचा खेळ; क्रिकेट. **–बुरदन** (بردن –) क्रि. (फ़ा.) जिकणे. **–सीमीं** (سیمیں –) पु. (फ़ा.) सूर्य-चंद्र.

ग़ोक (غوک) पु. (फ़ा.) बेडूक.

ग़ोचः (غوچہ) पु. (तु.) कोंबड्याचा तुरा; पक्ष्यांचा तुरा.

गोज़ (گوز) पु. (फ़ा.) अपानवायू; पाद (पादणे).

गोज़ (گوز); **गोज़न** (گوزن) पु. (फ़ा.) (१) सांबर. (२) जंगली गाय.

गोज़-ए-शुतुर (گوزشتر) पु. (फ़ा.) उंटाचे पादणे; कोणालाही ऐकू न जाईल असे बोलणे; निरर्थक बोलणे.

ग़ोज़ः (غوزہ) पु. (फ़ा.) कपाशीचे न उमललेले बोंड.

ग़ोत् (غوط) पु. ('अ.) (१) गंभीर चिंतन; ध्यान. (२) आकाशात उडणारा पतंग खाली येणे. (३) मूर्च्छा; बेशुद्धी.

ग़ोतः (غوطہ) पु. ('अ.) बुडी; बुचकुळी. **–खाना** (کھانا –) गोत्यात येणे; संकटात सापडणे. **–ख़ोर** (خور –); **–ज़न** (زن –); **–बाज़** (باز –) वि. पु. ('अ. + फ़ा.) (१) बुडी मारणारा; पाणबुड्या. (२) खंड्या (पक्षी).

गोनिया (گونیا) स्त्री. (फ़ा.) गुण्या; काटकोन्या (गवंड्याचे अवजार).

गोमगो (گومگو) वि. (फ़ा.) (१) संदिग्ध; अस्पष्ट. (२) घोटाळ्याचा. (३) गुप्त.

गोयंदः (گویندہ) वि. (फ़ा.) (१) बोलणारा; वक्ता. (२) हेर; गुप्तचर.

गोयाँ (گویاں) वि. (फ़ा.) बोलत असलेला; सांगत असलेला.

गोया (گویا) अव्य. (फ़ा.) जणू काय; अर्थात; जसे काय. (वि.) बोलणारा. **–'ई** (ئی –) स्त्री. (फ़ा.) वाक्शक्ती; वक्तृत्व; संभाषण.

ग़ोर (غور) पु. (फ़ा.) (१) अफगाणिस्थानातील एक शहर. (२) कंदहार जवळील एक प्रदेश. [मुहम्मद गोरी (घोरी) ची मातृभूमी].

गोर (گور) स्त्री. (फ़ा.) (१) थडगे; कबर; समाधी. (२) जंगल; अरण्य. (३) मदिरा. (४) विलास. **–कन** (کن –) पु. (फ़ा.) (१) कबर खोदणारा; थडग्यासाठी खड्डा खणणारा. (२) थडगी खणून प्रेते खाणारा एक हिंस्र पशू; रानमांजर; ऊद. **–ख़र** (خر –) पु. (फ़ा.) जंगली गाढव. **–ख़ानः** (خانہ –) पु. (फ़ा.) (१) कब्रस्तान; स्मशान. (२) समाधि-भवन. **–परस्त** (پرست –) वि. (फ़ा.) (१) समाधि-पूजक. (२) साधुसंतांच्या कबरींची पूजा करणारा एक मुस्लिम संप्रदाय. **–परस्ती** (پرستی –) स्त्री. (फ़ा.) समाधि-पूजन; थडगी पुजणे. **–स्तान** (ستان –) पु. (फ़ा.) स्मशान.

गोर-ए-ग़रीबाँ (گورِ غریباں) पु. (फ़ा.) (१) गरिबांचे स्मशान; गरीब लोकांची मोडकी तोडकी थडगी असलेले स्थान. (२) प्रवासी किंवा परदेशी लोकांचे स्मशान.

गोर-ओ-कफ़न (گور و کفن) पु. (फ़ा.) प्रेतवस्त्र गुंडाळणे व थडग्यात पुरणे; अंत्यसंस्कार; मूठमाती; उत्तरक्रिया.

गोरिस्तान (گورستان) पु. (फ़ा.) स्मशान; कबरस्तान.

ग़ोरी (غوری) वि. (फ़ा.) 'ग़ोर' चा रहिवासी; घोरी. (स्त्री.) थाळी; तबक.

ग़ोरः (غورہ) पु. (फ़ा.) कच्ची द्राक्षे.

गोल (گول) वि. (फ़ा.) मूर्ख; मूढ; अडाणी.

ग़ोल (غول) पु. (फ़ा.) (१) झुंड; समूह; टोळी. (२) कान. (३) भूत.

ग़ोल (غول) पु. (तु.) सेनापती बरोबर असलेले सैन्य.

ग़ोलक (غولک) पु. स्त्री. (फ़ा.) जमा होणारी रोख रक्कम ठेवण्याचे अरुंद तोंडाचे भांडे अथवा पेटी; जमिनीत किंवा भिंतीत पुरलेली तिजोरी.

गोलः (گولہ) पु. (फ़ा.) (१) गोळा. (२) तोफेचा गोळा; बाँब. (३) चेंडू. (४) नारळ; खोबरे. **–अंदाज़** (انداز –) पु. (फ़ा.) गोलंदाज; तोफ डागणारा; तोफची. **–अंदाज़ी** (اندازی –) स्त्री. (फ़ा.) तोफ डागणे. **–बारी** (باری –) स्त्री. (फ़ा.) तोफेच्या गोळ्यांचा भडिमार; अग्निवर्षाव.

गोश (گوش) पु. (फ़ा.) कान; कर्ण. **–कर्दन** (کردن –) लक्ष देणे; मन लावून ऐकणे. **–ख़ा** (خا –) स्त्री. (फ़ा.) गोम (कानात शिरून त्रास देणारा किडा). **–गिराँ** (گراں –) वि. (फ़ा.) बहिरा. **–गुज़ार** (گزار –) वि. (फ़ा.) ऐकलेले; सांगितलेले. **–गुज़ार करना** (گزار کرنا –) सांगणे; माहिती देणे. **–ज़द** (زد –) वि. (फ़ा.) ऐकलेले. **–ज़द होना** (زد ہونا –) ऐकले जाणे. **–ता गोश** (تا گوش –) वि. (फ़ा.) या टोकापासून त्या टोकापर्यंत. **–दादन** (دادن –) लक्षपूर्वक ऐकणे. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) (१) एखादी गोष्ट ऐकण्यासाठी कान टवकारलेला. (२) निरीक्षक. **–बर आवाज़** (بر آواز –); **–बराह** (براہ –) वि. (फ़ा.) एखादी गोष्ट; बातमी ऐकण्यास उत्सुक; बातमीची प्रतीक्षा करणारा. **–माल** (مال –) वि. (फ़ा.) कान पिरगळणारा. **–माली** (مالی –) स्त्री. (फ़ा.) (१) कान पिरगळणे; कानउघडणी; कानपिचकी. (२) शिक्षा; दंड; तंबी. **–माही** (ماہی –) पु. (फ़ा.) शिंप; शिंपला; शंख. **–वारः** (وارہ –) पु. (फ़ा.) (१) कानातील कुंडल. (२) खूप मोठा मोती. (३) शिरपेच. (४) हिशेबाचा सारांश; अहवाल; बेरीज.

गोश-ए-होश (گوشِ ہوش) पु. (फ़ा.) हुशारी; सावधगिरी.

गोशः (گوشہ) पु. (फ़ा.) (१) कोना; कोपरा. (२) एकांत स्थान. (३) कोण; कोन. **–गीर** (گیر –); **–गुज़ीं** (گزیں –); **–नशीं** (نشیں –) वि. (फ़ा.) एकांतवासी. **–दार** (دار –). वि. (फ़ा.) कोनें किंवा कोपरे असलेला.

गोशः-ए-'आफ़ियत (گوشۂ عافیت) पु. (फ़ा.) जेथे कसलाही भांडणतंटा होत नाही असे शांत स्थान; निवांत स्थान.

गोशः-ए-कमाँ (گوشۂ کماں) पु. (फ़ा.) प्रत्यंचा; धनुष्याची दोरी.

गोशः-ए-चश्म (گوشہ چشم) पु. (फ़ा.) डोळ्याचा कोपरा.

गोशः-ए-तनहा'ई (گوشۂ تنہائی) पु. (फ़ा.) एकांत स्थान; निर्जन स्थान.

सैकड़ों हस्ते आबाद किये हैं इस में।
कौन कहता है कि. दिल गोशः-ए-तनहा'ई है ।।

गोश्त (گوشت) पु. (फ़ा.) मांस. **–ख़ोर** (خور –); **–ख़्वार** (خوار –) वि. (फ़ा.) मांसाहारी; हिंस्र (पशू). **–ख़ोरी** (خوری –); **–ख़्वारी** (خواری –) स्त्री. (फ़ा.) मांसाहार.

गोश्तीन (گوشتین) वि. (फ़ा.) मांसल; मांसयुक्त. (सामान्यतः हे विशेषण जिभेलाच लावतात). [म्हण : **ज़ुबान-ए-गोश्तीन अस्त तेग़-ए-आहनीन** (زبان گوشتیں است تیغ آہنین) जीभ ही जरी मांसाची असली तरी ती पोलादी तलवार आहे].

गोसालः (گوسالہ) पु. (फ़ा.) गायीचे वासरू; गोवत्स.

गोसालः-ए-फ़लक (گوسالۂ فلک) पु. (फ़ा. + अ.) वृषभ राशी.

गोस्पंद (گوسپند); **गोस्फ़ंद** (گوسفند) स्त्री. (फ़ा.) शेळी; बकरी.

गौग़ा (غوغا) पु. (फ़ा.) कोलाहल; आरडाओरड; गोंधळ. **–ई** (ئی –) वि. (फ़ा.) (१) आरडाओरड करणारा. (२) निरर्थक.

गौज़ (غوز) पु. ('अ.) संकल्प; निश्चय.

ग़ौर (غور) पु. ('अ.) (१) सूक्ष्म विचार; चिंतन; मनन. (२) ध्यान. (३) बारकाईने लक्ष देणे. **–तलब** (طلب –) वि. ('अ.) विचारणीय; विचार करण्यासारखा; मननीय. **–परदाख़्त** (پرداخت –) स्त्री. ('अ. + फ़ा.) देखभाल; काळजी; पालनपोषण.

ग़ौर-ओ-ख़ौद (غور وخوض) पु. ('अ.) गंभीर विचार; चिंतन.

ग़ौर-ओ-परदाख़्त (غور و پرداخت) स्त्री. ('अ.+फ़ा.) देखरेख; पालनपोषण.

ग़ौल (غول) पु. ('अ.) (१) दुर्दशा. (२) डोके फिरणे. (३) दुःख. (४) हत्या.

ग़ौवास़ (غواص) वि. ('अ.) बुडी मारणारा; पाणबुडघा.

ग़ौस़ (غوث) पु. ('अ.) मुस्लिम महात्मा; सत्पुरुष. (वि.) (१) गाऱ्हाणे ऐकणारा; न्याय देणारा. (२) न्याय मागणारा; धावा करणारा.

ग़ौस़ (غوص) पु. ('अ.) पाण्यात बुडी मारणे.

गौहर (گوهر) पु. (फ़ा.) (१) मोती; मोत्ये. (२) मूळ प्रकृती. (३) मोत्यांचे किंवा तलवारीचे पाणी (तेज). (४) पुत्र. (५) बुद्धिमत्ता. **–अफ़्शां** (افشاں –); **–फ़िशां** (فشاں –) वि. (फ़ा.) (१) मोती उधळणारा. (२) गोड बोलणारा; उत्तम वक्ता. **–फ़रोश** (فروش –) वि. (फ़ा.) जवाहिऱ्या. **–बार** (بار –); **–रेज़** (ریز –) वि. (फ़ा.) (१) मोत्यांचा वर्षाव करणारा. (२) रुदन करणारा (डोळा). **–शनास** (شناس –) वि. (फ़ा.) मोत्यांची पारख करणारा; गुणग्राहक; पारखी. **–संज** (سنج –) वि. (फ़ा.) (१) मोत्यांचे वजन करणारा; जवाहिऱ्या; पारखी. (२) टीकाकार. (३) उत्तम कविता करणारा.

गौहर-ए-ताबां (گوهر تابان) पु. (फ़ा.) चमकदार, पाणीदार मोती.

गौहर-ए-दंदां (گوهر دندان) पु. (फ़ा.) मोत्यांसारखे दात; मोतीरुपी दात.

गौहर-ए-यकता (گوهر یکتا) पु.(फ़ा.) शिंपल्यात एकच असलेला मोती. हा मोती मोठा व मौल्यवान असतो.

गौहरी (گوهری) पु. (फ़ा.) जवाहिऱ्या; पारखी.

चंग (چنگ) पु. स्त्री. (फ़ा.) (१) एक प्रकारचे सारंगीसारखे वक्र वाद्य. (२) प्रत्येक वाकडी वस्तू. (३) पंजा (हाताचा). (४) रात्री उडविण्याचा एक प्रकारचा पतंग. (५) पत्र्याचा एक डाव. (६) अंकुश. **–नवाज़** (نواز –) वि. (फ़ा.) चंगवादक. **–लूक** (لوک –) वि. (फ़ा.) (१) ज्याचे हातपाय वाकडे झाले आहेत असा. (२) दोऱ्याचे रीळ. (३) देवी (रोग).

चंगाल (چنگال) पु. (फ़ा.) हिंस्र पशूंचा अथवा पक्ष्यांचा पंजा.

चंगी (چنگی) वि. (फ़ा.) चंग वाजविणारा (री). [हल्ली हा शब्द मुख्यतः स्त्रीलिंगी समजला जातो. कारण चंग वाजविण्याचे काम मुख्यतः स्त्रिया करतात. या बहुधा कलावंतिणी असतात. यामुळे 'चंगी' ही एक शिवीही बनली आहे. मराठी, चंगीभंगी : भंगी=भांग पिणारा; भंगड (गुजराती)].

चंगुल (چنگل) पु. (फ़ा.) पंजा (माणूस, पशु, पक्षी, इत्यादींचा). **–में आना** (میں آنا –); **–में फंसना** (میں پھنسنا –) पकडीत, तावडीत सापडणे.

चंगेज़ (چنگیز) पु. (तु.+फ़ा.) मोठा माणूस. **–ख़ाँ** (خاں –) पु. (तु. + फ़ा.) वाराव्या शतकात होऊन गेलेल्या तुर्कस्तानचा एक जुलमी बादशहा. **–नशादान** (نژادان –) वि. (तु. + फ़ा.) उज्वुक वंशाचे लोक; चंगेजखानाच्या वंशातील लोक.

चंद (چند) वि. (फ़ा.) थोडे; काही. **–गाह** (گاہ –) अव्य. स्त्री. (फ़ा.) कित्येकदा; बहुधा; नेहमी. **–दर चंद** (در چند –) वि. (फ़ा.) अनेक; कित्येक. **–मर्दः** (مردہ –) वि. (फ़ा.) अनेक माणसांचे काम एकटा करणारा. **–रोज़ः** (روزہ –) वि. (फ़ा.) थोडघा दिवसांचा; तात्पुरता; नश्वर. **–सालः** (سالہ –) वि. (फ़ा.) थोडघा वर्षांचा; अल्पायुषी. **–हा** (ہا –) अव्य. (फ़ा.) अनेकदा.

चंदन (چندن) पु. (फ़ा.) चंदन. [याचे अरबी रूप 'संदल' (صندل) असे आहे].

चंदाँ (چنداں) अव्य. (फ़ा.) (१) एवढा; इतका. (२) किती; केवढा. (३) मुळीच; थोडाही. **–कि.** (کہ –) अव्य. (फ़ा.) इतका की; इतक्यात; असे असूनही; अनेकदा.

चंदाल (چنداں) पु. (फ़ा.) (१) चांडाळ; अधम; नीच. (२) चांभार; भंगी. (३) रखवालदार; पहारेकरी.

चंदावल (چنداول) पु. (फ़ा.) सैन्यातील पिछाडीची तुकडी.

चंदीं (چندیں) अव्य. (फ़ा.) (१) इतके; एवढे. (२) किती; केवढे.

चंदे (چندے) अव्य. (फ़ा.) थोडे दिवस; थोडघा मुदतीकरिता; थोडा वेळ. (वि.) थोडासा. **–आफ़ताब चंदे महताब** (آفتاب چندے مہتاب –) सौंदर्याच्या बाबतीत सूर्य-चंद्राशी बरोबरी करणारा; अत्यंत सुंदर.

चंदः (چندہ) पु. (फ़ा.) (१) वर्गणी; पट्टी. (२) दात; देणगी.

चंपा (چنپا); **चम्पा** (چمپا) पु. (फ़ा.) चाफा (फूल)

चंबक (چنبک) पु. (फ़ा.) (१) लोहचुंबक. (२) वर उनळी मारणे.

चंबर (چنبر) पु. (फ़ा.) (१) घेरा; परीघ. (२) डफ. (३) गळघात घालावयाचा गोल दागिना; हसळी; मगे. (४) कैद; कारावास. (५) चिलमीवरील भांके असलेले झाकण. **–गर्दन** (گردن –) पु. (फ़ा.) (१) कुत्र्याच्या गळघातील पट्टा. (२) गळपट्टी. (३) गळसरी. **–चर्ख** (چرخ –) पु. (फ़ा.) आकाशाचा घुमट. **–बाजी** (بازی –) स्त्री. (फ़ा.) गिरकी मारणे; नृत्य.

चंबल (چنبل) पु. (फ़ा.) (१) फकीर; भिकारी. (२) भिक्षापात्र. (स्त्री.) मध्य भारतातील एका नदीचे नाव (चर्मण्वती).

चक्र (چق) पु. (फ़ा.) रवी (दही घुसळण्याची).

चक (چک) पु. (फ़ा.) (१) सीमा; हद्द (जमीन वगैरेची). (२) क्षेत्रफळ. (३) बाग; उद्यान. (४) कसाई. (५) हुकूमनामा. (६) हाताच्या पंजाच्या आकाराचे एक लाकडी अवजार याने खळ्यातील धान्य गोळा करतात. त्यावेळी धान्य व कोंडा ही वेगवेगळी होतात. (७) काव्य; वाङ्मय; साहित्य. (८) भांडण. (९) जमाव (वा.). **–तराशी** (تراشی –) स्त्री. (फ़ा.) जमिनीचे वेगवेगळे तुकडे करणे. **–दान** (دان –) पु. (फ़ा.) कवी; साहित्यिक. **–बंदी** (بندی –) स्त्री. (फ़ा.) जमिनीच्या सीमा निश्चित करणे; मोजणी.

चक-ओ-चानः (چک و چانہ) पु. (फ़ा.) विद्वत्ता; योग्यता; पात्रता (शाब्दिक अर्थ : हनुवटी; हनुवटीचे हाड).

चकाचक (چکاچک); **चक्राचक्र** (چقاچق) स्त्री. (फ़ा.) (१) सपासप (माणसाच्या शरीरावर तलवारीचे भराभर घाव पडण्याने होणारा आवाज). (२) बरबटलेला; धबधबलेला (बा.).

चकाद (چکاد); **चकादः** (چکادہ) पु. (फ़ा.) कपाळ; ललाट.

चकावक (چکاوک) पु. (फ़ा.) चंडोल (पक्षी).

चकीदः (چکیدہ) वि. (फ़ा.) ठिबकलेला; गळलेला.

चक़माक़ (چقماق) पु. स्त्री. (तु.+फ़ा.) (१) गारगोटी; चकमक. (२) टोमणा.

चक्मः (چکمہ) पु. (फ़ा.) (१) पायमोजा. (२) बूट.

चक्लः (چکلہ) पु. (तु.) वेश्यांची आळी; वेश्यांची गल्ली.

चक्श (چکش) पु. (तु.+फ़ा.) (१) लोहाराचा घण. (२) बंदुकीचा घोडा. (३) बुलबुल वगैरे पक्ष्यांना बसविण्याचा लाकडी ठोकळा.

चक्सीदन (چکسیدن) (फ़ा.) लज्जित होणे.

चक्सः (چکسہ) पु. (फ़ा.) कागदात किंवा पानात बांधून दिलेले औषध; माल बांधून दिलेली पुडी.

चख़ (چخ) स्त्री. (फ़ा.) (१) भांडण; झगडा. हमरीतुमरी. (२) आरडाओरड; (३) तलवारीचे म्यान. (४) सुरी. **–चख़** (چخ –) स्त्री. (फ़ा.+हि.) बोलाचाली; तंटा; भांडण.

चख़ाचख़ (چخاچخ) स्त्री. (फ़ा.) युद्धातील तलवारींचा खणखणाट.

चख़िदः (چخندہ) वि. (फ़ा.) लढणारा; भांडणारा.

चग (چغ) स्त्री. (फ़ा.) रवी (दही घुसळण्याची).

चग़ाज़ (چغاز) स्त्री. (फ़ा.) (१) व्यभिचारीणी. (२) शिवीगाळ करणारी स्त्री.

चत्र (چتر) पु. (फ़ा.) (१) छत्र (राजाच्या मस्तकावरील). (२) छत्री. (३) डोकीवरील आखूड केस. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) खाली डोके वर पाय करून राहाणारा. **–पोश** (پوش –) वि. (फ़ा.) छत्रीने झाकलेला.

चत्र-ए-'अंबरी (چتر عنبری) पु. (फ़ा.+'अ.) रात्र; निशा.

चत्र-ए-आबगूं (چتر آبگوں) पु. (फ़ा.) आकाश; आभाळ.

चत्र-ए-कुहली (چتر کحلی) पु. (फ़ा. + 'अ.) (१) काळे ढग. (२) आकाश.

चत्र-ए-ज़र निगार (چتر زرنگار) पु. (फ़ा.) (१) जरीचे काम असलेले छत्र. (२) तारकाखचित आकाश.

चत्र-ए-ज़र्री (چتر زری) पु. (फ़ा.) (१) सुवर्णछत्र. (२) सूर्य.

चत्र-ए-नूर (چتر نور) पु. (फ़ा.) तेजछत्र; सूर्य.

चत्र-ए-शाही (چتر شاهی) पु. (फ़ा.) राजछत्र.

चत्र-ए-सीमाबी (چتر سیمابی); **चत्र-ए-सीमीं** (چتر سیمیں) पु. (फ़ा.) पूर्णचंद्र.

चनाब (چناب) पु. (फ़ा.) (१) तंबूचा किंवा राहुटीचा खांब जिच्यातून बाहेर निघालेला असतो ती भोक असलेली लाकडी फळी. (२) पंजाबमधील एक नदी; चिनाब.

चनार (چنار) पु. (फ़ा.) चिनार वृक्ष. याची पाने लाल रंगाची व माणसाच्या पंजाच्या आकाराची असतात. प्रियतमेच्या हाताच्या तळव्याला चनाराच्या पानाची उपमा दिली जाते. रात्री या झाडातून ठिणग्या निघतात, असा समज आहे. या वृक्षाला फळ येत नाही. याचे आयुष्य हजार वर्षांचे असते. हिवर; हिवराचे लाकूड.

चप (چپ) वि. (फा.) (१) डावा; डावीकडील. (२) उलटा; परत आलेला. **–अंदाज़** (–انداز) वि. (फ़ा.) (१) ज्याचा बाण लक्ष्यवेध करून परत येतो असा तिरंदाज. (२) फसव्या; भुरळ पाडणारा.

चप-ओ-रास्त (چپ و راست) पु. (फ़ा.) डावीकडे-उजवीकडे; इकडेतिकडे; दोहोबाजूस.

चपकन (چپکن) स्त्री. (फ़ा.) एक प्रकारची अचकन (कोट); एक प्रकारचा अंगरखा.

चपक़लश (چپقلش) स्त्री. (तु.) (१) ओढाताण; गडबड; संघर्ष; भांडण. (२) जागेची टंचाई; गर्दी. (३) तलवारीचे युद्ध.

चपचलः (چپچلہ) पु. (फ़ा.) (१) झोपाळा; हिंदोळा. (२) उंच टेकडी. (३) घसरणे; निसरणे. (४) घसरगुंडी (मुलांचा खेळ).

चपत (چپت) स्त्री. (फ़ा.) चापट; थप्पड.

चपदादन (چپیدادن) क्रि. (फ़ा.) (१) सोडणे; त्याग करणे. (२) फसविणे.

चपर (چپر) पु. (फ़ा.) छप्पर.

चपरास (چپراس) स्त्री. (फ़ा.) (१) कमरेला बांधण्याचा पट्टा वा पट्ट्यात पितळेची अक्षरे कोरलेली पट्टी किंवा बिल्ला असतो. (२) सदऱ्याच्या खांद्यावर लावली जाणारी रुंद पट्टी. (३) बक्कल.

चपरासी (چپراسی) पु. (फ़ा.) (१) पट्टेवाला; शिपाई. (२) समन्स लागू करणारा शिपाई.

चपात (چپات) स्त्री. (फ़ा.) थप्पड; चापट; चपराक.

चपाती (چپاتی) स्त्री. (फ़ा.) हाताने थापटून तयार केलेली लहान पातळ भाकरी; पोळी; चपाती.

चप्पा (چپا) पु. (हिं.) (१) चार अंगुळे जमीन. (२) जमिनीचा लहान तुकडा. **–चप्पा** (چپا –) तसूभरसू जमीन; सर्व जागा.

चप्पः (چپہ) पु. (फ़ा.) (१) डावखुरा माणूस. (२) वल्हे.

चफ़ (چف) पु. (फ़ा.) हातमोजा.

चफ़ालः (چفالہ) पु. (फ़ा.) (१) पक्ष्यांचा थवा. (२) सैन्य.

चफ़्त (چفت) स्त्री. (फ़ा.) द्राक्षे वगैरेच्या वेली चढविण्याचा मांडव.

चफ़्ती (چفتی) स्त्री. (फ़ा.+हिं.) (१) रेघा आखण्याची चपटी पट्टी; फूटपट्टी. (२) खुशामत करणारा.

चफ़्तः (چفتہ) वि. (फ़ा.) वक्र; वाकडा. (पु.) आळ; तोहमत.

चबुतरः (چبوترہ) पु. (फ़ा.) ओटा; चबुतरा.

चम (چم) पु. [फ़ा. 'चमीदन' (چمیدن) ठुमकत चालणे.] (१) नखरेल चाल. (२) वक्रता. (३) उणीव. **–गर्दिश** (–گردش) स्त्री. (फ़ा.) नखऱ्यात, ठुमकत चालणे.

चम-ओ-ख़म (چم و خم) पु. (फ़ा.) नखरा; हावभाव.

चमक (چمک) स्त्री. (फ़ा.) (१) चकाकी; शोभा; प्रकाश. (२) सामर्थ्य. **–दमक** (–دمک) स्त्री. (फ़ा. + हिं.) लखलखाट; थाट; शोभा. **–दार** (–دار) वि. (फ़ा.) चकचकीत; पाणीदार.

चमचः (چمچہ) पु. (तु.) चमचा: पळी.

चमन (چمن) पु. (फ़ा.) (१) उपवन; बाग (२) रमणीय स्थान. (३) मैफल. **–आरा** (–آرا); **–तराज़** (–طراز); **–पैरा** (–پیرا); **–सरा** (–سرا); **–साज़** (–ساز) वि. (फ़ा.) बाग सजविणारा; माळी. **–ज़ार** (–زار) पु. (फ़ा.) कुरण; हिरवळ असलेले मैदान. **–बंदी करना** (–بندی کرنا) बागेची आखणी करणे; बाग लावणे.

ज़बाने-ए-बर्ग-ए-गुल ने की दुआ रंगीं 'अिबारत में'।
ख़ुदा सरसब्ज़ रक्खे इस चमन को मिहरबाँ होकर ।।

चमनिस्ताँ (چمنستاں); **चमनिस्तान** (چمنستان) पु. (फ़ा.) बाग; उपवन.

चमाँ (چماں); **चमान** (چمان) वि. (फ़ा.) नखऱ्यात चालणारा (री). (पु.) (१) मद्यचषक. (२) घाणीतील किडे.

चमानी (چمانی) वि. (फ़ा.) नखऱ्यात चालणारा (री). (पु.) मद्य पाजविणारा (री); मदिरा देणारा (री).

चमानः (چمانہ) पु. (फ़ा.) (१) दारूचा पेला. (२) कडू भोपळ्याची नरोटी.

चमीगो'इयाँ (چمیگوئیاں) स्त्री. (हिं.) गप्पागोष्टी; विचारपूस.

चमीद (چمید) स्त्री. (फ़ा.) नखरेल चाल; ठुमकणे.

चमीन (چمین) पु. (फ़ा.) लघ्वी; विष्ठा.

चरंद (چرند); **चरंदः** (چرندہ) पु. (फ़ा.) चरणारा प्राणी; पशू. **–ओ-परंदः** (–و پرندہ) पु. (फ़ा.) पशुपक्षी.

चर (چر) प्रत्य. (फ़ा.) चरणारा. [उदा. 'काहचर' (کاہ چر) गवत खाणारा (पशू)].

चरपोज़ (چرپوز) वि. (फ़ा.) (१) मूर्ख. (२) वाह्यात; नीच; हलका.

चरस (چرس) पु. (फ़ा.) (१) कारागृह. (२) खोडा. (३) द्राक्षांतून दारू काढण्याचे यंत्र. (४) भीक मागून आणलेल्या वस्तू. **–दान** (–دان) पु. (फ़ा.) भिक्षापात्र.

चरा (چرا) अव्य. (फ़ा.) का? कशासाठी? (पु.) (१) चरण्याची जागा; कुरण. (२) चरणे

–गर (گر –) वि. (फ़ा.) चरणारा. **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) कुरण; गोचर जमीन.

चराग़ (چراغ) पु. (फ़ा.) (१) दिवा; दीपक. (२) प्रकाश. (३) पुत्र. (४) चरणे. **–दान** (دان –) पु. (फ़ा.) दिवा ठेवण्याचा आधार; ठाणवई. **–पा** (پا –) पु. (फ़ा.) दिव्याचा आधार. (वि.) अत्यंत रागावलेला; मागील दोन पायांवर उभा राहिलेला (घोडा). **–वार:** (وار –) पु. (फ़ा.) (१) दिव्याचा स्टँड. (२) कंदील; दिवा.

चराग़-ए-आस्मानी (چراغ آسمانی) पु. (फ़ा.) (१) वीज. (२) सूर्य. (३) चंद्र.

चराग़-ए-कुश्त: (چراغ کشتہ) पु. (फ़ा.) विझलेलं दिवा.

चराग़-ए-गोर (چراغ گور) पु. (फ़ा.) समाधीवरील दिवा.

चराग़-ए-तह-ए-दामन (چراغ تہ دامن) पु. (फ़ा.) पदराआड धरलेला दिवा.

चराग़-ए-बहरी (چراغ بحری) पु. (फ़ा.+'अ.) समुद्रातील दीपस्तंभ.

चराग़-ए-मज़ार (چراغ مزار) पु. (फ़ा.) समाधीवरील दिवा; विशेषत: प्रेमिकेच्या थडग्यावर तेवणारा दिवा.

चराग़-ए-सहरी (چراغ سحری) पु. (फ़ा. + 'अ.) (१) पहाटेचा दिवा; विझू लागलेला दिवा. (२) अत्यंत म्हातारा; मरणोन्मुख (माणूस). (३) फार थोडघा दिवसांचा सोबती; नश्वर.

चराग़ाँ (چراغاں) पु. (फ़ा.) रोषणाई; दिव्यांची आरास.

चराग़ी (چراغی) स्त्री. (फ़ा.) (१) एखाद्या सत्पुरुषाच्या समाधीवर दिवा लावण्यासाठी दिली जाणारी रक्कम. (२) नजराणा; भेट.

चराज़न (چرازن); **चरिंद** (چرند); **चरिंद:** (چرندہ) वि. पु. (फ़ा.) चरणारा; पशू.

चर्क (چرک) पु. (फ़ा.) (१) मळ; पू. (२) मैला. (३) लोखंडाचा गंज.

चर्कन (چرکن) पु. (फ़ा.) (१) गलिच्छ माणूस. (२) पू वाहात असलेली जखम.

चर्कस (چرکس) पु. (तु.) तुर्कस्तानातील एक कष्टाळू व शूर जात.

चर्ख़ (چرخ) पु. (फ़ा.) (१) चक्र; चाक; चरक. (२) चरखा. (३) कुंभाराचे चाक. (४) आकाश. (५) गोफण. (६) रहाट; विहिरीतून पाणी काढण्यासाठी वसविलेले चाक; कप्पी. (७) नशीब. (८) लेथ. (९) गरगर फिरणे; फकिरांचे रात्रीच्या वेळी फिरणे. (१०) सदऱ्याचा गळा. (११) धनुष्य. (१२) गोफण. **–अंदाज़** (انداز –) वि. (फ़ा.) उत्तम तिरंदाज; धनुर्धर. **–ख़याली** (خیالی –) पु. (फ़ा.) शिवण्याचे यंत्र. **–गर** (گر –) वि. (फ़ा.) चाकू-काऱ्यांना धार लावणारा. **–गी** (گی –) स्त्री. (फ़ा.) (१) चक्कर मारणे; गोल फिरणे. (२) कुस्ती मारल्यानंतर विजयी पैलवान आखाडघात विशिष्ट पद्धतीने नाचतो ते. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) (१) फिरणारा प्रवासी. (२) नाचणारा (री). नर्तकी. **–ज़नी** (زنی –) स्त्री. (फ़ा.) (१) नृत्य. (२) पर्यटन. **–रीसक** (ریسک –) पु. (फ़ा.) रातकिडा. **–हिंडोल:** (ہنڈولہ –) पु. (फ़ा. + हिं.) लाकडी घोडे किंवा बैठका बसविलेले फिरते चक्र; पाळणा (जत्रेतील).

चर्ख़-ए-अख़्दर (چرخ اخضر) पु. (फ़ा. + 'अ.) ['अख़्दर' (اخضر) हिरवा.] अवकाश; शून्य; पोकळी (आकाशातील).

चर्ख़-ए-अत्लस (چرخ اطلس) पु. (फ़ा.) नववा स्वर्ग (त्या ठिकाणी तारे नसतात); अत्युच्च आकाश.

चर्ख़-ए-अस्ीर (چرخ اثیر) पु. (फ़ा.+'अ.) अत्युच्च आकाश.

चर्ख़-ए-आबनूस (چرخ آبنوس) पु. (फ़ा.) पहिला स्वर्ग; पहिले आकाश.

चर्ख़-ए-आसिया (چرخ آسیا) पु. (फ़ा.) दळण्याचे यंत्र, जाते.

चर्ख़-ए-कमाँ (چرخ کماں) पु. (फ़ा.) धनुष्याची कमान.

चर्ख़-ए-ज़र्रीं कास: (چرخ زریں کاسہ) पु. (फ़ा.) चौथे आकाश. (या ठिकाणी सूर्य असतो).

चर्ख़-ए-फ़लक (چرخ فلک); **चर्ख़-ए-बरीं** (چرخ بریں) पु. (फ़ा.+'अ.) सर्वोच्च आकाश. (या ठिकाणी ईश्वराचे सिंहासन असते).

चर्ख़-ए-सूफ़ी जामः (چرخ صوفی جامہ) पु. (फ़ा.) आकाश.

चर्ख़ाब (چرخاب) पु. [फ़ा. 'चर्ख़' (چرخ) चक्र + 'आब' (آب) पाणी.] पाण्यातील भोवरा; जलावर्त.

चर्ख़ी (چرخی) स्त्री. (फ़ा.) (१) कपाशीतून सरकी काढण्याचे यंत्र. (२) पतंगाचा दोरा गुंडाळण्याचे मोठे रीळ. (३) विहिरीतून पाणी काढावयाचे चाक; कप्पी. (४) लहान चरखा. (५) चाकाप्रमाणे फिरणारी वस्तू.

चर्ख़ुश्त (چرخشت) पु. (फ़ा.) चरक; घाणा.

चर्ख़ीक (چرخوک) पु. (फ़ा.) भोवरा (मुलांचा खेळण्याचा).

चर्ख़ः (چرخہ) पु. (फ़ा.) सूत किंवा लोकर कातण्याचा रहाट; चरखा. **–रीस** (ریس –) स्त्री. (फ़ा.) सूत कातणारी स्त्री. **–हो जाना** (ہوجانا –) जीर्ण, रुग्ण किंवा वृद्ध होणे.

चर्ग़ (چرغ) पु. (फ़ा.) (१) वहिरी ससाणा. (२) तरस.

चर्ग़ाब (چرغاب) पु. (फ़ा.) रातकिडा.

चर्ग़ीन; **चर्ग़ीनः** (چرغین) वि. (फ़ा.) नीच; हलकट; अधम.

चर्ज़ः (چرذہ); **चर्दः** (چردہ) पु. (फ़ा.) रंग; वर्ण; कातडीचा रंग. [हा शब्द फक्त सिहाय (काळा) या शब्दाबरोबर वापरला जातो. 'सियाह चर्दः' (سیاہ چردہ) वि. (फ़ा.) काळघा रंगाचा; काळघा कातडीचा; हबशी].

चर्ब (چرب) वि. (फ़ा.) (१) स्निग्ध; तेलकट. (२) तळलेला; तेल, तूप चोपडलेला. (३) चपळ; प्रभावशाली; विजयी होणारा. **–आख़ोर** (آخور –) वि. (फ़ा.) सुखात वाढलेला; सुखंच मे शयनंच मे करणारा; फुकटचा. **–क** (چربک) पु. (फ़ा.) (१) पुरी; तुपात तळलेली चपाती. (२) मलई. (३) चित्राची नक्कल करण्याचा पातळ कागद; बटर पेपर. **–क़ामत** (قامت –) वि. (फ़ा.+'अ.) सुडौल बांध्याचा; उंचापुरा; देखणा. **–रिज़ा** (غذا –) स्त्री. (फ़ा.+'अ.) स्निग्ध आहार; उत्कृष्ट आहार. **–ज़बान** (زبان –) वि. (फ़ा.) (१) गोडबोल्या; बडबडघा. (२) खुशामतखोर. **–ज़बानी** (زبانی –) स्त्री. (फ़ा.) खुशामत. **–दस्त** (دست –) वि. (फ़ा.) निपुण; हुशार; सिद्धहस्त. **–दस्ती** (دستی –) स्त्री. (फ़ा.) नैपुण्य. **–पहलू** (پہلو –) वि. (फ़ा.) (१) गुबगुबीत; लठ्ठ (२) ज्याच्या सान्निध्यामुळे फायदा होतो असा; श्रीमंत.

चर्ब-ओ-ख़ुश्क (چرب و خشک) पु. (फ़ा.) बरे-वाईट. (वि.) कृपण-उदार; बरा-वाईट.

चर्बाक (چربانک); **चर्बाक** (چرباک) वि. (फ़ा.+हिं.) चलाख; धूर्त; कपटी. (वा.). **–दीदः** (دیدہ –) स्त्री. (फ़ा.+हिं.) जहांबाज स्त्री; ढालगज भवानी; हुशार बाई.

चर्बिंदः (چربندہ) वि. (फ़ा.) विजेता.

चर्बी (چربی) स्त्री. (फ़ा.) (१) मेद; चरबी. (२) स्निग्धता; तुळतुळीतपणा.

चर्दः (چردہ) पु. (फ़ा.) (१) आराखडा; रेखाचित्र. (२) नक्कल; प्रतिकृती. (३) प्रतिकृती काढण्याचा पातळ व गुळगुळीत कागद. (४) साय.

चर्म (چرم) पु. (फ़ा.) कातडे; चामडे. **–दान** (دان –) पु. (फ़ा.) कातडघाची पिशवी. **–दोज़** (دوز –) पु. (फ़ा.) चांभार; कातडे शिवणारा.

चर्म-ए-आहू (چرم آہو) पु. (फ़ा.) मृगाजिन; हरिणाचे कातडे.

चर्म-ए-गोर (چرم گور) पु. (फ़ा.) धनुष्याची दोरी; प्रत्यंचा.

चर्मी (چرمیں); **चर्मीन** (چرمین) वि (फ़ा.) चामडघाचा; कातडी.

चर्मीनः (چرمینہ) पु. (फ़ा.) कातडघाची वस्तू. **–दोज़** (دوز –) पु. (फ़ा.) कातडघाच्या वस्तू बनविणारा; चांभार.

चर्विंदः (چروندہ) वि. (फ़ा.) (१) घाबरणारा; घाबपळ करणारा. (२) उपाय, इलाज शोधणारा.

चर्लिंदः (چلیندہ) वि. [फ़ा. 'चलीदन' (چلیدن) चालणे.] चालणारा; जाणारा; पळणारा.

चलीपा (چلیپا) पु. (फ़ा.) क्रूस; क्रॉस. (वि.) वाकडा; वक्र. ['जुल्फ़-ए-चलीपा' (زلف چلیپا) कुरळे केस; प्रियतमेची बट].

चल्पासः (چلپاسہ) स्त्री. (फ़ा.) पाल (प्राणी).

चश (چش) प्रत्य. [फ़ा. 'चशीदन' (چشیدن) चाखणे] चाखणारा. [उदा. 'लज़्ज़त चश' (لذت چش) वि. ('अ.+फ़ा.) स्वाद; चाखणारा; आनंद घेणारा].

चशक (چشک) स्त्री. (फ़ा.) चव; स्वाद.

चशीदः (چشیدہ) वि. (फ़ा.) चाखणारा; स्वाद घेणारा.

चशः (چشہ) पु. (फ़ा.) चाटण; अवलेह.

चश्पर (چشپر) पु. (फ़ा.) पावलाचे चिन्ह, विशेषत: श्वापदाच्या पावलाची खूण.

चश्म (چشم) स्त्री. (फ़ा.) (१) डोळा; नेत्र; नयन. (२) आशा; उमेद. ['आहू चश्म' (آہو چشم) वि. (फ़ा.) हरिणाक्षी.] **–खानः** (خانہ –) पु. (फ़ा.) डोळघाची खोबण. **–गश्तः** (گشتہ –) वि. (फ़ा.) तिरळा. **–चहार करदन** (چہار کردن –) क्रि. (फ़ा.) डोळघाला डोळा भिडविणे; प्रेमात पडणे. **–ज़ख़्म** (زخم –) पु. (फ़ा.) (१) दृष्ट लागणे. (२) नेत्रशल्य. **–ज़द** (زد –) पु. (फ़ा.) (१) निमिष; क्षण. (२) पापणी लवणे. (३) नेत्रसंकेत. (४) दृष्ट लागणे, लावणे. (५) घाबरणे. **–ज़दन** (زدن –) क्रि. (फ़ा.) (१) पापणी लवविणे; डोळघाची उघडझाप करणे. (२) दृष्ट लावणे. (३) डोळघाने खूण करणे. (४) घाबरणे. (५) लाज वाळगणे. **–ए-ज़ाग़** (زاغ –) वि. (फ़ा.) निर्लज्ज; अशिष्ट. **–ए-बरीदः** (بریدہ –)

वि. (फ़ा.) (१) निर्लज्ज. (२) धृष्ट; फाजील. –दाश्त (داشت –) स्त्री. (फ़ा.) आशा; उमेद; मरवसा. –दीद (دید –) वि. (फ़ा.) प्रत्यक्ष; डोळ्यांनी पाहिलेले खरे. –नुमा'ई (نمائی –) स्त्री. (फ़ा.) डोळे वटारणे; धमकी, तंबी देणे. –पोशी (پوشی –) स्त्री. (फ़ा.) डोळेझाक; दुर्लक्ष. –बंद (بند –) पु. (फ़ा.) (१) नजरबंदी; जादू. (२) जादूगार; जादूने किंवा मंत्राने झोप उडवून लावणारा. (३) नजरबंदीचा मंत्र. –बंदक (بندک –) पु. (फ़ा.) लपंडाव. –बंदी (بندی –) स्त्री. (फ़ा.) नजरबंदी; जादू; जादूने झोप उडवून लावणे. –बरजा (برجا –) वि. (फ़ो.) टक लावलेला; टक लावून पाहाणारा. –बर ज़मीं अफ़गन्दन (بر زمیں افگندن –) वि. (फ़ा.) (१) खाली पाहाणे; लज्जेने किंवा संकोचाने जमिनीकडे पाहाणे. (२) गुडघे टेकून नमस्कार करणे. –बरहम ज़दन (برهم زدن –) पु. (फ़ा.) अत्यंत थोडा वेळ; क्षण; पळ. –बराह (براه –) वि (फ़ा.) वाटेकडे डोळे लावून बसलेला; प्रतीक्षा करणारा. –बराह दाश्तन (براه داشتن –) क्रि. (फ़ा.) वाटेकडे डोळे लावून बसणे; प्रतीक्षा करणे. –रसीदः (رسیده –) वि. (फ़ा.) ज्याला दृष्ट लागलेली आहे असा. –रोशनी (روشنی –) स्त्री. (फ़ा.) अभिनंदन.

चश्म-ए-खरूस (چشم خروس) स्त्री. (फ़ा.) (१) गुंज. (२) लाल मदिरा.

चश्म-ए-खूंआलूद (چشم خوں آلود) स्त्री. (फ़ा.) (१) रागाने लाल झालेले डोळे. (२) ज्यात खून उतरला आहे असे खुनी डोळे.

चश्म-ए-ज़ाहिर (چشم ظاهر) स्त्री. (फ़ा.+'अ.) बाह्य नेत्र; चर्मचक्षू.

चश्म-ए-नम (چشم نم) स्त्री. (फ़ा.) अश्रुपूर्ण नेत्र; पाणावलेले डोळे.

चश्म-ए-नीमबाज़ (چشم نیم باز) स्त्री. (फ़ा.) अर्धवट मिटलेले डोळे; मादक नेत्र धुंद डोळे.

चश्म-ए-नीमवा (چشم نیم وا) स्त्री. (फ़ा.) अर्धवट मिटलेले डोळे; मादक नेत्र; धुंद डोळे.

चश्म-ए-पुरआब (چشم پرآب); **चश्म-ए-पुरनम** (چشم پرنم) स्त्री. (फ़ा.) अश्रूंनी डबडबलेले नेत्र; भरून आलेले डोळे.

चश्म-ए-फ़िरंगी (چشم فرنگی) स्त्री. (फ़ा.) चष्मा; उपनेत्र; चाळिशी.

चश्म-ए-बद (چشم بد) स्त्री. (फ़ा.) दृष्ट; वाईट नजर. –दूर (دور –) वा. (फ़ा.) इडापिडा टळो; दृष्ट न लागो.

चश्म-ए-बातिन (چشم باطن) स्त्री. (फ़ा.+'अ.) अंतर्चक्षू; अंतर्दृष्टी; ज्ञानचक्षू; दिव्यदृष्टी.

चश्म-ए-बीना (چشم بینا) स्त्री. (फ़ा.) पाहाणारा डोळा; उत्तम दृष्टी.

चश्म-ए-बीमार (چشم بیمار) स्त्री. (फ़ा.) आळसावलेली दृष्टी; अर्धोन्मीलित नेत्र (प्रियतमेचे डोळे).

चश्म-ए-बेआब (چشم بے آب) स्त्री. (फ़ा.) ज्यात पाणी (तेज) नाही असे डोळे. (वि.) निर्लज्ज; उद्धट.

चश्म-ए-बेदार (چشم بیدار) स्त्री. (फ़ा.) जागृत नेत्र; उघडलेले डोळे.

चश्म-ए-शब (چشم شب) स्त्री. (फ़ा.) रात्रीचा नेत्र; चंद्र.

चश्म-ए-शोर (چشم شور) स्त्री. (फ़ा.) ज्याची दृष्ट लागते असा वाईट डोळा; दृष्ट; वाईट नजर.

चश्म-ए-सियाह (چشم سیاه) स्त्री. (फ़ा.) (१) सुंदर नेत्र (प्रेमिकेचे). (२) अंधत्व; तेजहीन नेत्र (स्वतःचे). (३) दृष्ट. –करदन (کردن –) क्रि. (फ़ा.) (१) हेवा करणे. (२) दृष्ट लावणे. (३) अघाशीपणाने पाहाणे.

चश्म-ए-हिस्सी (چشم حسی) स्त्री. (फ़ा.+'अ.) पाहाण्याची शक्ती असलेला डोळा; चर्मचक्षू.

चश्म-ओ-चराग़ (چشم و چراغ) पु. (फ़ा.) स्वतःसाठी नेत्र व घरासाठी दीपक; पुत्र; अत्यंत प्रिय व्यक्ती.

चश्मः (چشمه) पु. (फ़ा.) (१) पाण्याचा झरा; ओढा; लहान नदी. (२) पाण्याचे नैसर्गिक कुंड. (३) चष्मा; चाळिशी. (४) सुईचे नेढे. (५) भोक; खिडकी. –गाह (گاه –) स्त्री. (फ़ा.) झरा असलेले स्थान. –ज़ार (زار –); –सार (سار –) पु. (फ़ा.) जेथे अनेक झरे आहेत असे स्थान.

चश्मः-ए-आफ़ताब (چشمهٔ آفتاب) पु. (फ़ा.) सूर्य.

चश्मः-ए-ख़िज़्र (چشمهٔ خضر) पु. (फ़ा.+'अ.) (१) अमृत कुंड. (२) प्रियतमेचे मुख.

चश्मः-ए-गर्म (چشمهٔ گرم) पु. (फ़ा.) उन्हाळे; गरम पाण्याचा झरा.

चश्मः-ए-तराज़ू (چشمهٔ ترازو) पु. (फ़ा.) तराजूतील पासंग; पासंगाचा दगड.

चश्मः-ए-नूर (چشمهٔ نور) पु. (फ़ा.) सूर्य.

चश्मः-ए-शापूर (چشمه شاپور) पु. (फ़ा.) शापूरने दगडांतून खणून काढलेला अत्यंत निर्मळ पाण्याचा झरा. (वि.) स्वच्छ; पारदर्शक.

चश्मः-ए-सीमाब (چشمهٔ سیماب); **चश्मः-ए-सीमाबरेज़** (چشمهٔ سیماب ریز) पु. (फ़ा.) चंद्र; सूर्य.

चश्मः-ए-होर (چشمهٔ هور) पु. (फ़ा.) सूर्य.

चश्मः-ए-हैवाँ (چشمهٔ حیوان) पु. (फ़ा.+'अ.) पाहा 'चश्मः-ए-ख़िज़्र'.

चश्मक (چشمک) स्त्री. [फ़ा. 'चश्म' (چشم) चे लघु.] (१) चष्मा; चाळिशी. (२) डोळ्याचा इशारा; नेत्रसंकेत. **–ज़दन** (زدن –); **–दादन** (دادن –) क्रि. (फ़ा.) नेत्रसंकेत करणे; डोळा मारणे, घालणे. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) नेत्रसंकेत करणारा; डोळा मारणारा.

चश्महा (چشمها) पु. [फ़ा. 'चश्म' (چشم) चे अनेक.] अनेक डोळे. **–दीदः** (دیده –) वि. (फ़ा.) अनेक डोळे पाहिलेला; अनुभवी.

चस्तः (چسته) पु. (फ़ा) (१) जनावराच्या मांडीचे व ढुंगणावरचे मांस. (२) राग (संगीत). **–ख़्वार** (خوار –) वि. (फ़ा) ज्याला परिश्रम न करता उत्तम आहार मिळतो असा; फुकटघा.

चस्पाँ (چسپاں) वि. (फ़ा.) (१) चिकटविलेला; डकविलेला. (२) बरोबर लागू होणारा; चपखल. **–करना** (کرنا –) चिकटविणे; डकविणे.

चस्पीदगी (چسپیدگی) स्त्री. (फ़ा.) (१) चिकटपणा. (२) प्रेम.

चस्पीदः (چسپیده) वि. (फ़ा.) (१) चिकटलेला; चिकटविलेला. (२) लळा लागलेला.

चह (چه) पु. [फ़ा. 'चाह' (چاه) चे लघु.] (१) विहीर. (२) डबके. (३) हौद. **–बच्चः** (بچه –) पु. (फ़ा.) सांडपाणी साठविण्यासाठी असलेला खड्डा; डबके; हौद.

चहचहः (چهچهه) पु. (फ़ा.) पक्ष्यांची किलबिल.

चहल (چهل) वि. (फ़ा.) चाळीस. **–क़दमी** (قدمی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) (१) शतपावली; हळूहळू फिरणे. (२) मुस्लिम अंत्यसंस्काराच्या वेळी कबरीजवळ अंतिम प्रार्थना करण्यापूर्वी चाळीस पावले मागे जाऊन पुनः पुढे येण्याची एक धार्मिक क्रिया अथवा प्रथा.

चहार (چهار) वि. (फ़ा.) चार. **–गानः** (گانه –) वि. (फ़ा.) चाराशी संबंधित; चार प्रकारचा. **–गामः** (گام –) वि (फ़ा.) वेगाने धावणारा (घोडा). **–गाह** (گاه –) पुं. (फ़ा.) गाण्याचा एक प्रकार; एक राग. **–गोशः** (گوشه –) वि. (फ़ा.) (१) चार कोपरे असलेला; चौकोनी. (२) शवपेटी. **–चंद** (چند –) वि.(फ़ा.) चौपट; चौपदरी. **–जानिब** (جانب –); **–ज़बान** (زبان –) वि. (फ़ा.) आपले बोलणे वारंवार बदलणारा; अविश्वासार्ह. अव्य. (फ़ा.+'अ.) चोहोकडे; चारी बाजूंस. **–तारः** (تار –) पु. (फ़ा.) चार तारा असलेले एक वाद्य. **–दरीचः** (دریچه –) पु. (फ़ा) कान, नाक, डोळे व तोंड (चार खिडक्या). **–दह** (ده –) वि. (फ़ा.) चौदा. **–दहुम** (دهم –) वि. (फ़ा.) चौदावा. (स्त्री.) चतुर्दशी. **–दांग** (دانگ –) पु. (फ़ा.) चारी दिशा; सर्व जग. **–पहलू** (پهلو –) वि. (फ़ा.) चार कोपरे असलेला; चौकोनी. **–बसीत** (بسیط –) पु.(फ़ा.) चार महाभूते (पृथ्वी, आप, तेज, वायू). **–बाश** (باش –) पु.(फ़ा.) (१) सिंहासन; लोड. (२) चार महाभूते (पृथ्वी, आप, तेज, वायू). (३) सर्व विश्व. **–मीर** (میر –) पु. (फ़ा.+'अ.) मुहम्मद साहेबांनंतर होऊन गेलेले मुसलमानांचे चार खलिफा (अबूबक्र, उमर, उस्मान, अली). **–मेख-ए-हयात** (میخ حیات –) स्त्री. (फ़ा. +'अ.) चार महाभूते (पृथ्वी, आप, तेज, वायू). **–मौजः** (موجه –) पु. (फ़ा.) पाण्यातील भोवरा. **–शंबः** (شنبه –) पु. (फ़ा.) बुधवार.

चहारुम (چهارم) वि. (फ़ा.) (१) चौथा. (२) चतुर्थांश.

चा' (چا) स्त्री. (फ़ा.) चहा (पेय). **–दान** (دان –); **–पोची** (پوچی –) पु. (फ़ा.) चहादाणी.

चाक़ (چاق) वि. (तु.+फ़ा.) (१) धष्टपुष्ट; निरोगी. (२) तत्पर; हुशार. **–चौबंद** (چوبند –) वि. (तु.) (१) निरोगी. (२) पिळदार शरीराचा. (३) हुशार.

चाक़ (چاق) पु. (तु.) काळ; समय.

चाक (چاک) पु. (फ़ा.) (१) तडा; फट. (२) अस्तनीच्या किंवा सदऱ्याच्या बाजूचा उघडा, फाडलेला भाग. (वि.) **–करना** (کرنا –) फाडणे; चिरणे. **–चाक** (چاک –) वि. (फ़ा.) तुकडे तुकडे केलेला; चिंध्या केलेला.

चाक-ए-गिरेबाँ (چاک گریباں) पु. (फ़ा.) सदऱ्याचा गळा फाडणे, कापणे. (वि.) ज्याने सदऱ्याचा गळा फाडला आहे असा; शोकाकुल.

चाक-ए-जिगर (چاک جگر) पु. (फ़ा.) हृदय फाटणे, फाडणे; हृदयाची जखम; प्रीतीची जखम.

चाक-ए-दामन (چاک دامن) पु. (फ़ा.) शोकावेगाने सदऱ्याची बाजू फाडणे.

चाक-ए-राँ (چاک راں) पु. (फ़ा.) जांघेतील फट, चीर; योनी; भग.

चाकर (چاکر) पु. (फ़ा.) नोकर; चाकर; सेवक.

चाकरी (چاکری) स्त्री. (फ़ा.) नोकरी; सेवा.

चाकसू (چاکسو) पु. (फ़ा.) डोळ्यांच्या उपचारासाठी वापरले जाणारे एक प्रकारचे काळे बी.

चाक़ू (چاقو) पु. (फ़ा.) चाकू; लेखणी करण्याचा चाकू.

चाच (چاچ) पु. (फ़ा.) तूरान (रशियन तुर्कस्थान) चे एक शहर, ताश्कंद. (येथील धनुष्ये अत्यंत उत्कृष्ट असत).

चाची (چاچی) वि. (फ़ा.) (१) ताश्कंदचे संबंधित; ताश्कंदचे धनुष्य. (२) दवंडी पिटणारा.

चादर (چادر) स्त्री. (फ़ा.) (१) पांघरण्याचे वस्त्र; उपरणे. (२) पलंगपोस; चादर; पासोडी. (३) एखाद्या धातूचा पातळ पत्रा. (४) छावणी; तंबू. (५) घबघब्याचे पाणी पडत असताना पाण्याच्या पातळीचा दिसणारा समपृष्ठ भाग. (६) समाधीवर वाहिली जाणारी फुलांची जाळी. **–उतारना** (اتارنا –) अपमान करणे; स्त्रीची बेइज्जत करणे. **–बदोश** (بدوش –) वि. (फ़ा.) खांद्यावर उपरणे टाकलेला; चादर पांघरलेला.

चादर-ए-आब (چادر آب) स्त्री. (फ़ा.) पाण्याची पातळी.

चादर-ए-महताब (چادر مہتاب) स्त्री. (फ़ा.) शुभ्र चांदणे.

चादरा (چادرا) पु. (फ़ा.+हिं.) (१) पासोडी; मोठी चादर; लहान चादर.

चानः (چانہ) पु. (फ़ा.) (१) हनुवटीचे हाड. (२) पोळीसाठी केलेला कणकेचा गोळा. (३) पेढा.

चाप (چاپ) पु. (फ़ा.) छाप; ठसा; मुद्रण. **–ची** (چی –) वि. (फ़ा.) छापणारा; मुद्रक.

चापलूस (چاپلوس) वि. (फ़ा.) खुशामत करणारा; खुशामत्या.

चापलूसी (چاپلوسی) स्त्री. (फ़ा.) खुशामत.

चापाती (چاپاتی) स्त्री. (फ़ा.) चपाती; हातावर केलेली पातळ भाकरी.

चापार (چاپار) पु. (फ़ा.) टपाल घेऊन जाणारा; टपाल; पोस्टमन. **–खानः** (خانہ –) पु. (फ़ा.) पोस्ट ऑफीस; डाकखाना; टपाल कचेरी.

चाबुक (چابک) पु. (फ़ा.) चाबूक; हंटर; प्रतोद. (वि.) निपुण; तत्पर; उत्साही; दक्ष; चपळ; जागरूक. **–खिराम** (خرام –) वि. (फ़ा.) वेगवान; भरभर चालणारा. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) चाबूक मारणारा. **–दस्त** (دست –) वि. (फ़ा.) कुशलहस्त; उत्तम कारागीर; भरभर काम करणारा; चपळ; तल्लख. **–स्वार** (سوار –) पु. (फ़ा.) (१) घोंड्यांना शिकविणारा; तयार करणारा; अश्वशिक्षक. (२) उत्तम घोडेस्वार; अश्वारोहणात तरबेज. **–स्वारी** (سواری –) स्त्री. (फ़ा.) (१) घोड्यांना शिकवून तयार करणे. (२) उत्कृष्ट अश्वारोहण.

चाबुकी (چابکی) स्त्री. (फ़ा.) जल्दी; चपळता; हुशारी. (वि.) वेगवान (अश्व).

चाम (چام) पु. (फ़ा.) डोंगरातील घाट. **–चाम** (چام –) पु. (फ़ा.) डोंगरातील वेडीवाकडी वळणे; अवघड रस्ते.

चामक़ (چامق); **चामग़** (چامغ) पु. (तु.) खोल विहीर; आड.

चामिदः (چامیدہ) वि. [फ़ा. 'चामीदन' (چامیدن) लघ्वी करणे]. लघ्वी करणारा; मुतणारा.

चामीन (چامین) पु. (फ़ा.) लघ्वी व विष्ठा; घाण.

चामः (چامہ) पु. (फ़ा.) कविता; काव्य. **–गो** (گو –) पु. (फ़ा.) कवी.

चाय (چائے) स्त्री. (फ़ा.) चहा (पेय).

चार (چار) वि. [फ़ा. 'चहार' (چہار) चे संक्षिप्त.] चार. (पु.) [फ़ा. 'चारः' (چارہ) चे संक्षिप्त.] इलाज; उपाय. (पु.) (फ़ा.) कुंभाराचा आवा; भट्टी. **–अबू** (ابرو –) पु. (फ़ा.) (१) दाढी, मिशी, डोके व भिवया यांचे केस. (२) नुकतीच मिसरूड फुटलेला सुंदर छोकरा; प्रेमपात्र. **–आ'ईनः** (آئینہ –) पु. (फ़ा.) चिलखत; पोलादी अंगरखा. **–क़द** (قد –) पु. (फ़ा.) (१) बायका डोकीला बांधतात तो रुमाल. (२) मफलर. **–क़ुब** (قب –) पु. (तु.) श्रीमंत लोक वापरतात असे एक विशेष वस्त्र. **–ख़म** (خم –) पु. (फ़ा.) (१) कुस्तीतील एक पेच. (२) पूर्ण ताणलेले धनुष्य. (३) एक प्रकारचे धनुष्य. **–ख़ानः** (خانہ –) पु. (फ़ा.) चौकटीचे कापड. **–गाम** (گام –); **–गामः** (گامہ –) वि. (फ़ा.) चौखूर उधळलेला; वेगवान (घोडा). **–गाह** (گاہ –) पु. (फ़ा.) (१) मानवी शरीर (पृथ्वी, आप, तेज व वायू या चार तत्त्वांचे बनलेले). (२) एक रागिणी. **–चंद** (چند –) वि. (फ़ा.) चौपट; चौपदरी. **–चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) निर्लज्ज; उद्धट. **–ज़बां** (زباں –) वि. (फ़ा.) बडबड्या; वाचाळ. **–जा'ई** (جائی –) स्त्री. (फ़ा.+हिं.) वाईट चालीची स्त्री; व्यभिचारीणी (बा.). **–ज़ानू** (زانو –) वि. (फ़ा.) उकिडवा; मांडी घालून बसलेला. **–जामः** (جامہ –) पु. (फ़ा.) जीन; खोगीर. **–ताक़** (طاق –) पु. (फ़ा.) चार कोने असलेला तंबू; राहुटी. **–ताक़ अफ़गन** (طاق افگن –) वि. (फ़ा.) राहुटी ठोकणारा व बिछाईत घालणारा. **–तुख़्म** (تخم –) पु. (फ़ा.) अतिसारावरील एक औषध. (यात तुख्म-ए-रेहान, इसपग़ोल, बलंगा व ख़ुर्फ़ः हे चार प्रकारचे बी असते). **–नाचार** (ناچار –) अव्य. (फ़ा.) (१) नाइलाजाने; लाचार होऊन. (२) नक्की; निश्चितपणे. **–वह** (دہ –) वि. (फ़ा.) चौदा. **–बहुम** (دہم –) वि. (फ़ा.) चौदावा. **–बांग** (دانگ –) पु. (फ़ा.) जग; सारे विश्व. **–दीवार** (دیوار –) स्त्री. (फ़ा.) (१) जगाच्या चारी दिशा. (२) रात्र. **–दीवारी** (دیواری –) स्त्री. (फ़ा.) तट; आवार; आवाराची भिंत. **–पा** (پا –); **–पायः** (پایہ –) पु. (फ़ा.) चतुष्पाद प्राणी;

पशू. **–पा'ई** (پائی –) स्त्री. (फ़ा.+हिं.) बाज; खाट. **–पारः** (پارہ –) पु. (फ़ा.) बंदुकीचा छरा. **–बंद** (بند –) पु. (फ़ा.) चार बाजू (वर, खाली, डावीकडे, उजवीकडे); जग. **–बर्ग** (برگ –) पु. (फ़ा.) चार पाकळ्या असलेले एक फूल. **–बाग़** (باغ –) पु. (फ़ा.) सर्व प्रकारची झाडे असलेले विशाल उपवन. **–बालिश** (بالش –) पु. (फ़ा.) लोड; मोठा तक्या; सिंहासन; सोफा; कोच. **–बेख़** (بیخ –) स्त्री. (फ़ा.) चार वनौषधींच्या मुळ्या. (कासणी, बडीशेप, अजमोदा व द्राक्ष यांच्या मुळ्या'). **–मग़ज़** (مغز –) पु. (फ़ा.) (१) अक्रोड (फळ). (२) काकडी, दुध्या, कलिंगड व टरबूज यांच्या बिया (औषधी). **–मेख़** (میخ –) स्त्री. (फ़ा.) चार खुंट्या गाडून त्यांना गुन्हेगाराचे हातपाय बांधण्याची एक शिक्षा. **–मौजः** (موجہ –) पु. (फ़ा.) पाण्यातील भोवरा. **–यार** (یار –) पु. (फ़ा.) मुहम्मदानंतरचे चार खलिफा (अबूबक्र, 'उमर, 'उस्मान व 'अली). **–शंबः** (شنبہ –) पु.(फ़ा.) बुधवार. **–शानः** (شانہ –) वि. (फ़ा.) धष्टपुष्ट; धिप्पाड. **–सू** (سو –) अव्य. (फ़ा.) चोहोकडे; सर्वत्र. **–हर्फ़** (حرف –) पु. (फ़ा.+हिं.) धिक्कार. **–हर्फ़ भेजना** (حرف بھیجنا –) धिक्कार करणे; निषेध करणे.

चार-ओ-नाचार (چار و ناچار) अव्य. (फ़ा.) नाइलाजाने.

चारक (چارک) पु. (फ़ा.) (१) भालदार; चोपदार. (२) काफिल्याचा पुढारी.

चारः (چارہ) पु. (फ़ा.) (१) उपाय. (२) इलाज. (३) प्रयत्न. (४) आधार; मदत. (५) कपट. (६) अधिकार. **–गर** (گر –) वि. (फ़ा.) वैद्य; इलाज करणारा. **–गरी** (گری –) स्त्री. (फ़ा.) उपचार; औषधपाणी. **–जो'ई** (جوئی –) स्त्री.(फ़ा.) (१) प्रयत्न; धावपळ. (२) तक्रार;. गाऱ्हाणे; फिर्याद. **–पिज़ीर** (پذیر –) वि. (फ़ा.) उपचार होऊ शकेल असा; साध्य (रोग). **–साज़** (ساز –) वि. (फ़ा.) उपचार करणारा. **–साज़ी** (سازی –) स्त्री. (फ़ा.) उपचार; इलाज.

चारः-ए-कार (چارۂ کار) पु. (फ़ा.) (१) उपाय. (२) शेवटचा प्रयत्न.

चारः-ए-दर्द (چارۂ درد) पु. (फ़ा.) (१) व्यथेचा इलाज. (२) प्रेम रोगावरील उपचार.

चाल (چال) पु. (फ़ा.) (१) खड्डा. (२) विहीर. (३) चकोर. (४) पक्ष्याचे घरटे. (५) जुगारातील एक डाव. (६) तांबडा व पांढरा रंग असलेला घोडा.

चाला (چالہ) पु. (फ़ा.) (१) मोठे भोक. (२) खड्डा. (३) तवा.

चालाक (چالاک) वि. (फ़ा.) (१) चलाख; धूर्त; लबाड. (२) चतुर; दक्ष; निपुण. (३) तीव्र. (४) वेगवान; चपळ. **–दस्त** (دست –) वि. (फ़ा.) (१) भरभर काम करणारा. (२) हातचलाखी करून फसविणारा.

चालाकी (چالاکی) स्त्री. (फ़ा.) (१) चलाखी; लबाडी. (२) दक्षता; चपळाई.

चाश (چاش) पु. (फ़ा.+तु.) कोंडा काढून घेतलेले धान्य.

चाश्त (چاشت) स्त्री. (फ़ा.) (१) सूर्योदयापासून एक प्रहरापर्यंतचा काळ. (२) सकाळची न्याहारी. **–नमाज़** (نماز –) स्त्री. (फ़ा. + 'अ.) सकाळची नमाज.

चाश्नी (چاشنی) स्त्री. (फ़ा.) (१) साखरेचा अगर गूळाचा पाक. (२) चाखणे; मद्य किंवा अन्न चाखून पहाणे. (३) कसोटी. (४) स्वाद; लज्जत. (५) आंबट-गोड स्वादाचे मिश्रण. **–गीर** (گیر –) पु. (फ़ा.) स्वयंपाकी; आचारी. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) आंबट-गोड.

चाह (چاہ) पु. (फ़ा.) (१) विहीर; आड. (२) खड्डा. **–कन** (کن –) वि. (फ़ा.) (१) विहीर खोदणारा. (२) दुसऱ्याच्या कामात विघ्न आणणारा. (३) धोकेबाज; दगाबाज; जुलमी. **–जू** (جو –); **–पोश** (پوش –) पु. (फ़ा.) विहिरीत पडलेली वस्तू काढावयाचा गळ.

चाह-ए-कन'आं (چاہ کنعاں); **चाह-ए-यूसुफ़** (چاہ یوسف) पु. (फ़ा.+'अ.) हजरत यूसुफ यांना त्याच्या भावांनी जिच्यात फेकून दिले होते ती कोरडी विहीर.

चाह-ए-ख़स पोश (چاہ خس پوش) पु. (फ़ा.) गवताने झाकलेली विहीर.

चाह-ए-ग़बग़ब (چاہ غبغب); **चाह-ए-ज़क़न** (چاہ ذقن); **चाह-ए-ज़नख़** (چاہ زنخ); **चाह-ए-ज़नख़दां** (چاہ زنخداں) पु. (फ़ा.) हनुवटीवरील खड्डा; खळी.

चाह-ए-नख़्शब (چاہ نخشب); **चाह-ए-मुक़न्न'अ** (چاہ مقنع) पु. (फ़ा.) तुर्कस्तानातील नख्शब या शहराजवळील एक विहीर. (त्या काळचे प्रसिद्ध शास्त्रज्ञ हकीमइब्ने मुखन्ना यांनी एक कृत्रिम चंद्र तयार केला होता. तो दिवसा या विहिरीत गडप होई व रात्री वर येई. त्याचा प्रकाश बारा मैलपर्यंत पसरत असे).

चाह-ए-नाफ़ (چاہ ناف) पु. (फ़ा.) बेंबी.

चाह-ए-निस्यां (چاہ نسیاں) पु. (फ़ा.+'अ.) पाणी नसलेली ओसाड विहीर; अंधकूप.

चाह-ए-बाबुल (چاہ بابل) पु. (फ़ा.) इराकमधील फरात नदीच्या काठावर वसलेली बाबुल शहरातील एक विहीर. (एके काळी बाबुल हे शहर जादुबद्दल प्रसिद्ध होते). या विहिरीत 'हारूत' व 'मारूत' या नावाचे दोन देवदूत राहात असत. ते लोकांना जादू शिकवीत असत.

चिक़ (چق) स्त्री. (तु.) बांबूच्या बारीक कामट्यांचा किंवा बोरूंचा पडदा; चिकाचा पडदा.

चिकन (چکن) स्त्री. (फ़ा.) (१) एक प्रकारचा सुती किंवा रेशमी कशिदा. (२) अशा प्रकारचा कशिदा काढलेले कापड. **–दोज़** (–دوز) पु. (फ़ा.) चिकन-कशिदा काढणारा.

चिकाँ (چکاں) वि. (फ़ा.) ठिबकत असलेला. (प्रत्य.) ठिबकविणारा; सांडणारा. [उदा. 'खूंचिकाँ' (خونچکاں) वि. (फ़ा.) रक्त ठिबकविणारा; रक्तबंबाळ].

चिकारः (چکارہ) वि. (फ़ा.) निरुपयोगी; बेकार.

चिप्लक (چپلک) वि. (फ़ा.) गलिच्छ; घाणेरडा; घाणीने भरलेला.

चिरा (چرا) अव्य. (फ़ा.) का ? कशासाठी ?

चिर्क (چرک) पु. (फ़ा.) (१) घाण. (२) विष्ठा. (३) पू. (४) डोळ्यांतील घाण. **–आलूद** (آلود –) वि. (फ़ा.) गलिच्छ; घाणेरडा.

चिर्कीं (چرکیں); **चिर्कीन** (چرکین) वि. (फ़ा.) गलिच्छ. (पु.) विष्ठा.

चिल (چل) वि. [फ़ा. 'चिहिल' (چہل) चे लघु.] (१) चाळीस. (२) मूर्ख. (पु.) चीड नावाचा देवदारासारखा एक वृक्ष. **–गोज़ः** (چلغوزہ –) (पु.) (फ़ा.) चीड वृक्षाचे फळ. हे खारकेच्या बीच्या आकाराचे असते. वरील टरफल पातळ व आत गर असतो.

चिलतः (چلتہ) पु. (फ़ा.) चिलखत; कवच.

चिलम (چلم) स्त्री. (फ़ा.) चिलीम. **–पोश** (–پوش) पु. (फ़ा.) चिलमीतील विस्तव उडू नये म्हणून वापरले जाणारे झाकण.

चिलमची (چلمچی) स्त्री. (तु. + हिं.) हात धुण्याचे एक भांडे; तस्त.

चिलमन (چلمن) स्त्री. (फ़ा.+हिं.) चिकाचा पडदा.

चिल्क़द (چلقد); **चिल्क़ब** (چلقب); **चिल्तः** (چلتہ) पु. (फ़ा.) चिलखत; कवच.

चिल्पासः (چلپاسہ) स्त्री. (फ़ा.) पाल (प्राणी).

चिल्लः (چلہ) पु. (फ़ा.) (१) कोना; कोपरा; एकांत. (२) चाळीस दिवस एकांतात बसून करावयाचे व्रत किंवा पुरश्चरण. (३) चाळीस दिवसांचा अवधी. (४) चाळीस दिवसांचा उपवास. (५) बाळंतीण स्त्रीने चाळीस दिवसांनंतर करावयाचे विशेष स्नान. (६) चाळीस दिवसांचे क्वारंटाईन. **–कश** (–کش) वि. (फ़ा.) चाळीस दिवस नियमाने मंत्रोच्चार व जप वगैरे करणारा. **–ख़ानः** (–خانہ) पु. (फ़ा.) जेथे बसून चाळीस दिवसांचे पुरश्चरण केले जाते असे स्थान.

चिश्त (چشت) पु. (फ़ा.) अफगाणिस्तानातील एक गाव.

चिश्ती (چشتی) वि. (फ़ा.) चिश्त गावचा राहणारा. (पु.) हजरत मुईनुद्दीन चिश्ती, यांची समाधी अजमेरला आहे.

चिह् (چہ) अव्य. (फ़ा.) काय ? कोठे ? कशासाठी ? **–ख़ुश** (–خوش) छान ! वाहवा ! **–गूनः** (–گونہ) अव्य. (फ़ा.) कशा प्रकारे ? कसे ? **–म'अनी** (–معنی) अव्य. (फ़ा.) कशासाठी ? कार्य कारण ?

चिहा (چہا) अव्य. (फ़ा.) काय काय ? कसे काय ? किती ?

चिहिल (چہل) वि. (फ़ा.) चाळीस. **–क़दमी** (–قدمی) स्त्री. (फ़ा.+अ.) शतपावली करणे; सावकाश फिरणे. **–तन** (–تن) पु. (फ़ा.) चाळीस संतपुरुष. यांच्यावर जगाचा सर्व भार असतो. **–रोज़ः** (–روزہ) वि. (फ़ा.) चाळीस दिवसांचे (काम, कार्यक्रम).

चिहिलुम (چہلم) वि. (फ़ा.) चाळीसावा. (पु.) मृत व्यक्तीचे चाळीसाव्या दिवशीचे श्राद्ध.

ची (چیں) स्त्री. [फ़ा. 'चीन' (چین) चे संक्षिप्त.] (१) सुरकुती. (२) आठी. **–ब.अबू** (–بہ ابرو) वि. (फ़ा.) भ्रुकुटीभंग; भ्रूसंकोच किंवा भ्रूभंग करणारा; रुष्ट; रागावलेला. **–ब.जबीं** (–بہ جبیں); **–बरजबीं** (–بر جبیں) वि. (फ़ा.) ज्याच्या कपाळाला आठ्या पडलेल्या आहेत असा; रुष्ट.

ची (چی) प्रत्य. (तु.) असणारा; ठेवणारा; करणारा; वापरणारा. [उदा. 'तोपची' (توپچی) पु. (तु.) गोलंदाज. 'नक़्क़ारची' (نقارچی) पु. ('अ.+तु.) नगारा वाजविणारा].

चीज़ (چیز) स्त्री. (फ़ा.) (१) वस्तू; पदार्थ; द्रव्य. (फ़ा.+हिं.) (२) दागिने. (३) गाणे; राग. (४) मिठाई. (५) ठेव. (६) वस्तुस्थिती. **–मीज़** (–میز); **–लीज़** (–لیز) स्त्री. (फ़ा.) थोडीशी वस्तू; किडुकमिडुक; थोडेसे भांडवल.

चीदः (چیدہ) वि. [फ़ा. 'चीदन' (چیدن) निवडणे; गोळा करणे.] (१) गोळा केलेला. (२) निवडलेला; निवडक. **–चीदः** (–چیدہ) वि. (फ़ा.) निवडक; खास.

चीन (چیں) स्त्री. (फ़ा.) सुरकुती; आठी. (पु.) चीन देश. (प्रत्य.) निवडणारा; गोळा करणारा.

[उदा. 'गुलचीन' (گلچین); 'गुलची' (گلچی) पु. (फ़ा.) फुले गोळा करणारा; माळी].

चीन-ए-अबू (چین ابرو) स्त्री. (फ़ा.) भिवईची मुरकुती; आठी.

चीन-ए-पेशानी (چین پیشانی); **चीं ब. जबीं** (چیں بہ جبیں) स्त्री. (फ़ा.) कपाळाची आठी.

चीनी (چینی) वि. (फ़ा.) (१) चीनचा रहिवासी. (२) चिनी भाषा. (३) चिनी माती (पांढरी).

चीनः (چینہ) पु. (फ़ा.) (१) धान्याचे दाणे टिपणारे पक्षी. (२) पक्षी टिपतात ते धान्य. **–दान** (دان –); **–दानः** (دانہ –) पु (फ़ा.) पक्ष्यांचे पोट; कोठा; पक्ष्यांच्या गळघांतील पिशवी. (यात ते धान्य साठावितात).

चीरगी (چیرگی) स्त्री. (फ़ा.) (१) शौर्य; बहादुरी. (२) अन्याय.

चीरः (چیرہ) वि. (फ़ा.) (१) शूर; बहादूर. (२) विजेता; प्रभाव. (३) पगडी पाडणारा. **–दस्त** (دست –) वि. (फ़ा.) अत्याचारी; अन्यायी. **–दस्ती** (دستی –) स्त्री. (फ़ा.) अन्याय; जुलूम. **–बंद** (بند –) वि. (फ़ा.) पगडी बांधणारा; पगडबंद. (स्त्री.) अद्यापि कुमारी असलेली वेश्या-कन्या.

चीलदो (چیلدو) पु. (तु.) इनाम; बक्षीस.

चीस्त (چیست) अव्य. (फ़ा.) काय आहे ?

चीस्तां (چیستاں) स्त्री. (फ़ा.) कोडे; कूट प्रश्न; समस्या.

चुंबल (چنبل) पु. (फ़ा.) भिक्षापात्र; कमंडलू.

चुक़ंदर (چقندر) पु. (फ़ा.) एक फळभाजी; बीट.

चुग़द (چغد) पु. (फ़ा.) (१) घुबड. (२) मूर्ख; निर्बुद्ध.

चुग़ुल (چغل) वि. (तु.) चहाडखोर; चहाडी करणारा. **–ख़ोर** (خور –) वि. (तु.) चहाडखोर. (वस्तुतः 'चुग़ल' मध्ये हाच अर्थ अंतर्भूत आहे. त्यामुळे पुनः 'ख़ोर' हा प्रत्यय लावणे व्याकरणदृष्टया चूक आहे. परंतु रुढीमुळे तो वापरला जातो). **–ख़ोरी** (خوری –) स्त्री. (तु.) चहाडी; चुगली.

चुग़ुली (چغلی) स्त्री. (तु.) चहाडी; चुगली.

चुग़ः (چغہ) पु. (तु.) पायघोळ अंगरखा.

चुनाँ (چناں) वि. अव्य. (फ़ा.) तसे; त्या प्रकारचे; तेवढे; असे; इतके. **–चुनीं** (چنیں –) स्त्री. (फ़ा.) (१) असातसा. (२) चर्चा; वादविवाद; टीका. (३) झगडा. (४) पोकळ बडबड. (५) अलंकारिक भाषा. **–चुनीं करना** (چنیں کرنا –) दोष काढणे; वाद घालणे.

चुनांचि. (چنانچہ) अव्य. (फ़ा.) (१) जसे; उदाहरणार्थ. (२) म्हणून; याकरिता.

चुनिंदः (چنندہ) वि. [फ़ा. 'चीदः' (چیدہ) चे विकृत.] (१) निवडक; वेचक. (२) उत्कृष्ट; उत्तम.

चुनीं (چنیں) वि. अव्य. (फ़ा.) असा; असे; अशा प्रकारे.

चुनीदः (چنیدہ) वि. (फ़ा.) (१) निवडक; वेचक. (२) उत्कृष्ट.

चुनू (چنو) अव्य. [फ़ा. 'चूं' (چوں) चे संक्षिप्त.] (१) कसे? कशा प्रकारे? (२) जेव्हा. (वि.) समान; तुल्य.

चुपत (چفت) वि. (फ़ा.) (१) जाडजूड; लठ्ठ. (२) चपळ.

चुमाक़ (چماق) पु. (तु.) (१) लोखंडी, षट्कोणी गदा. (२) शिश्न; लिंग.

चुर्बक (چربک) पु.(फ़ा.) (१) खुशामत. (२) टोमणा. थट्टा. (३) लज्जा. (४) अश्लीलता.

चुलबुलः (چلبلہ) वि. (फ़ा.) (१) चुळबुळ करणारा; चंचल; खोडकर. (२) नखरेल.

चुलाव (چلاو) पु. (फ़ा.) मांसविरहित पुलाव; मसालेभात.

चुलिस्तां (چلستاں) पु. (तु.) (१) जेथे पाणी नाही असे अरण्य. (२) वैराण, ओसाड माळ.

चुली (چلی) स्त्री. (फ़ा.) (१) भ्याडपणा. (२) नामर्दपणा; नपुसकत्व.

चुवाक (چواک) स्त्री. (फ़ा.) पुरी; तुपात तळलेली चपाती.

चुस (چس) पु. (फ़ा.) आवाज न करता पादणे; फुसकुली.

चुस्त (چست) वि. (फ़ा.) (१) घट्ट; आवळ; तंग. (२) चपळ; तरतरीत; हुशार; चलाख. (३) दृढ; मजबूत. (४) चपखल. **–ओ-चालाक** (– و چالاک) वि. (फ़ा.) चपळ; दक्ष; तत्पर.

चुस्ती (چستی) स्त्री. (फ़ा.) (१) चलाखी; चपळता; तरतरीतपणा. (२) दृढता.

चुस्तः (چستہ) पु. (फ़ा.) शेळी वगैरे पशूंची कास.

चूं (چوں) अव्य. (फ़ा.) (१) कसे ? कशा प्रकारे ? (२) जेव्हा. (३) समान; तुल्य. (४) कारण; यासाठी; म्हणून. (५) जो. (६) जर. **–कि.** (کہ –) अव्य. (फ़ा.) कारण की; यासाठी की; जर. **–तक न. करना** (تک نہ کرنا –) ब्र देखील न काढणे; निमूटपणे ऐकणे. **–ओ-चिरा करना** (– و چرا کرنا) हुज्जत घालणे; कारणे विचारणे; भांडणे.

चू (چو) अव्य. (फ़ा.) (१) समान; प्रमाणे. (२) जर; यदि.

चूखा (چوخا) पु. (फ़ा. + तु.) (१) केसांनी शिवलेला एक प्रकारचा डगला. (हा डगला फकीर घालतात). (२) ओव्हरकोट.

चूज़ः (چوزه) पु. (फ़ा.) (१) कोंबडीचे पिलू; पक्ष्याचे पिलू. (२) तरुण मुलगा अथवा मुलगी.

चेचक (چیچک) स्त्री. (तु.) देवी (रोग). **–रू** (رو –) वि. (तु.+फ़ा.) चेहऱ्यावर देवीचे वण असलेला.

चेहरः (چہرہ) पु. (फ़ा.) (१) तोंड; मुख; चेहरा. (२) पुढचा भाग. (३) मुखवटा. **–कुशा** (کشا –) वि. (फ़ा.) तोंडावरील आवरण काढणारा; चित्रकार. **–कुशा'ई** (کشائی –) स्त्री. (फ़ा.) (१) एखाद्या चित्रावरील पडदा बाजूस सारण्याची क्रिया. (२) चित्रकारी. **–ख़ेज़** (خیز –) वि. (१) स्वच्छ; निर्मळ. (२) स्पष्ट. **–नवीस** (نویس –) वि. (फ़ा.) शरीरावरील खाणाखुणा लिहून ठेवणारा (विशेषतः आरोपीच्या शरीरावरील). **–पर्दाज़** (پرداز –) पु. (फ़ा.) चित्रकार. **–मुहरः** (مہرہ –) पु. (फ़ा.+हि.) तोंडवळा; चेहऱ्याची ठेवण. **–शाही** (شاہی –) वि. (फ़ा.) राजाचा किंवा राणीचा मुखवटा असलेले (नाणे).

चेहल (چہل) वि. (फ़ा.) चाळीस.

चेहलुम (چہلم) पु. (फ़ा.) चाळीसावा दिवस.

चो (چو) अव्य. (फ़ा.) (१) जर; यदि. (२) जेव्हा. (३) जो.

चोख़ीदः (چوخیدہ) वि. [फ़ा. 'चोख़ीदन' (چوخیدن) घसरणे; पडणे.] निसरून पडलेला; घसरलेला.

चोग़ः (چوغہ) पु. (तु.) पोकळ; पायघोळ अंगरखा; लांब कोट.

चोब (چوب) स्त्री. (फ़ा.) (१) लाकूड; काठी; छडी; दंडा; सोटा; लाठी. (२) नगारा वाजविण्याची लहान काठी. (३) तंबूचा खांब. **–क** (ک –) स्त्री. (फ़ा.) (१) लहान काठी; छडी. (२) नगारा वाजविण्याची टिपरी. **–कज़न** (کزن –) वि. (फ़ा.) (१) नगारा वाजविणारा. (२) पहारेकऱ्यांचा मुख्य. (हा फळीवर काठी आपटून आवाज करतो. त्यायोगे पहारेकरी सावध रहातात). **–कारी** (کاری –) स्त्री. (फ़ा.) एक प्रकारचा कशिदा. **–की** (کی –) पु. (फ़ा.) चोपदार. **–ख़्वार** (خوار –) पु. (फ़ा.) लाकूड खाणारा किडा; वाळवी. **–कश** (کش –) पु. (फ़ा.) कपाशीतून सरकी काढावयाचे लाकडी यंत्र. **–गज़** (گز –) पु. (फ़ा.) कापड व लाकूड मापण्याची काठी; गज. **–चीनी** (چینی –) स्त्री. (फ़ा.) चोपचिनी. (चीन देशातून येणारी ही औषधी वनस्पती लाल रंगाची व रक्त शुद्ध करणारी असते). **–दस्त** (دست –); **–दस्ती** (دستی –) स्त्री. (फ़ा.) फिरावयास जाताना हातात ठेवावयाची काठी; छडी. **–दार** (دار –) पु. (फ़ा.) चोपदार; द्वारपाल.

चोब-ए-त़रीक़ (چوب طریق) स्त्री. (फ़ा. + 'अ.) अशिष्ट व असभ्य लोकांना शिष्टाचार शिकविण्यासाठी सरकारी नोकराची छडी; पोलिसाचा दंडा.

चोब-ए-त'अलीम (چوب تعلیم); **चोब-ए-त'अलीमदः** (چوب تعلیم دہ) स्त्री. (फ़ा. + 'अ.) शिक्षकाची छडी. (शिक्षण देणारी छडी).

चोबा (چوبا) पु. (फ़ा.) (१) खांब. (२) लोखंडी खुंटी; खिळा. (३) बाऊनिश्चयाच्या वेळी वाढण्यात येणारा एक प्रकारचा गोड भात.

चोबीं (چوبیں); **चोबी** (چوبی) वि. (फ़ा.) लाकडी, लाकडाचा.

चोबः (چوبہ) पु. (फ़ा.) (१) बाण; तीर. (२) खुंट; खुंटा.

चोशिदः (چوشندہ) वि. [फ़ा. 'चोशीदन' (چوشیدن) चोखणे; शोषणे.] चोखणारा; शोषून घेणारा.

चौगाँ (چوگاں) पु. [फ़ा. 'चौगान' (چوگان) चे संक्षिप्त.] (१) पोलो; हॉकी. (२) हॉकीस्टिक; दांडू (विटीदांडूतील). (३) क्रीडांगण. **–बाज़** (باز –) पु. (फ़ा.) पोलो खेळणारा. **–बाज़ी** (بازی –) स्त्री. (फ़ा.) पोलो किंवा हॉकी खेळणे.

चौगान (چوگان) पाहा 'चौगाँ'.

चौगानी (چوگانی) पु. (फ़ा.) पोलोच्या खेळात तरबेज असलेला घोडा. (घोड्यावर बसून पोलो खेळतात).

चौतरः (چوترہ) पु. (फ़ा.) चौथरा; चबुतरा.

चौपाँ (چوپاں); **चौपान** (چوپان) पु. (फ़ा.) धनगर; गुराखी.

चौपायः (چوپایہ) पु. (फ़ा. + हि.) चतुष्पाद प्राणी; पशू.

चौबग़ला (چوبغلا) पु. (फ़ा.+हि.) अंगरख्याच्या काखेतील भाग; सदऱ्याच्या बगलेखालचा भाग.

चौबच्चः (چوبچہ) पु. (फ़ा. + हि.) लहान हौद. (स्त्री.) कुंड.

चः (چہ) अव्य. (फ़ा.) लघुरूप बनविण्यासाठीही याचा उपयोग केला जातो. [उदा. 'बाग़' (باغ) पासून 'बाग़ीचः' (باغیچہ) 'कू' (کو) पासून 'कूचः' (کوچہ) गल्ली, वगैरे. अर्थात या ठिकाणी शब्द तोच असला तरी उच्चारात थोडा फरक पडतो]. **चि.** (چہ) अव्य. (फ़ा.) काय? किती? कोठे? (दुसऱ्या शब्दाशी समास झाल्यानंतर यातील 'हे' लुप्त होतो). [उदा. 'चिगूनः' (چگونہ) अव्य. (फ़ा.)

कसे ?] अद्यारचि. (اگرچہ) अव्य. (फ़ा.) यद्यपि; जरी. आंचि. (اگر) वि. (फ़ा.) ते जे वगैरे शब्दांत हेच अव्यय आहे.

जंग (زنگ) पु. (फ़ा.) (१) गंज; तांबेरा. (२) घाण. (३) पाप. (४) घंटा. (५) कसर (बाळवी). (६) ॲबिसीनिया. (७) कडक मद्य. –आलूदः (آلودہ –); –खुर्दः (خوردہ –) वि. (फ़ा.) गंजलेला; तांबरलेला.

जंग (جنگ) पु. स्त्री. (फ़ा.) (१) युद्ध; लढाई. (२) भांडण. (३) शत्रुत्व; वैर. –आज़्मा (آزما –) वि. (फ़ा.) युद्धाचा अनुभव असलेला; युद्धकुशल; युद्धरत. –आज़्मा'ई (آزمائی –) स्त्री. (फ़ा.) लढाई; लढाईचा अनुभव. –आज़्मूदः (آزمودہ –) वि.) (फ़ा.) अनेक लढाया ज्याने मारल्या आहेत असा; युद्धकुशल. –आज़्मूदगी (آزمودگی –) स्त्री. (फ़ा.) युद्धाचा अनुभव; युद्धकौशल्य. –ख़्वाह (خواہ –) वि. (फ़ा.) लढाई इच्छिणारा; युद्धखोर. –गाह (گاہ –) स्त्री. (फ़ा.) युद्धक्षेत्र; रणमैदान. –जू (جو –) वि. (फ़ा.) (१) लढवैय्या; लढाऊ. (२) भांडखोर. –जू'ई (جوئی –) स्त्री. (फ़ा.) लढाऊपणा; लढाई. –पसंद (پسند –) वि. (फ़ा.) युद्धप्रिय. –बंदी (بندی –) स्त्री. (फ़ा.) युद्धबंदी. –बाज़ (باز –) वि: (फ़ा.) युद्धखोर.

जंग-ए-आज़ादी (جنگ آزادی) स्त्री. (फ़ा.) स्वातंत्र्य युद्ध.

जंग-ए-ज़रगरी (جنگ زرگری) स्त्री. (फ़ा.) (१) लुटुपुटीचे युद्ध. (२) दुसऱ्यांना फसविण्यासाठी केलेली वरवरची लढाई.

जंग-ए-बरी (جنگ بری) स्त्री. (फ़ा. + 'अ.) जमिनीवरील युद्ध; स्थलयुद्ध.

जंग-ए-बहरी (جنگ بحری) स्त्री. (फ़ा. + 'अ.) आरमारी लढाई; जलयुद्ध.

जंग-ए-हवा'ई (جنگ ہوائی) स्त्री. (फ़ा. + 'अ.) हवाई युद्ध; आकाशातील लढाई.

जंग-ओ-जदल (جنگ و جدل); जंग-ओ-जिदाल (جنگ و جدال) स्त्री. (फ़ा.+'अ.) भांडणतंटा; रक्तपात; मारामारी.

जंगल (جنگل) पु. (फ़ा.) (१) अरण्य; वन. (२) वाळवंट; ओसाड माळ. –जाना (جانا –) शौचाला जाणे (ग्रामीण).

जंगली (جنگلی) वि. (फ़ा.) (१) जंगलाशी संबंधित. (२) असभ्य; रानटी.

ज़ंगार (زنگار) पु. (फ़ा.) (१) हिरवा गंज; तांब्यावर किंवा लोखंडावर चढणारा निळसर क्षार; गंज. (२) गंजापासून बनविलेले एक औषध; मोरचूद. (३) हिराकस.

ज़ंगारी (زنگاری) वि. (फ़ा.) (१) निळसर हिरवा. (२) मोरचूदयुक्त (औषध).

जंगाह (جنگاہ) स्त्री. [फ़ा. 'जंग गाह' (جنگ گاہ) चे संक्षिप्त.] रणक्षेत्र.

जंगी (جنگی) वि. (फ़ा.) (१) लढाईसंबंधी; सामरिक. (२) लढाऊ. (३) प्रचंड; धिप्पाड. –जहाज़ (جہاز –) पु. (फ़ा.) युद्धनौका. –बेड़ा (بیڑا –) पु. (फ़ा. + हिं.) (१) युद्धसामुग्रीने भरलेली जहाजे. (२) आरमार. –लाट (لاٹ –) पु. (फ़ा. + इं.) सरसेनापती.

ज़ंगी (زنگی) पु. (फ़ा.) (१) ॲबिसीनियाचा रहिवासी; हबशी; निग्रो. (२) अत्यंत काळा मनुष्य. –नश्राद (نژاد –) वि. (फ़ा.) हबशी वंशाचा; निग्रो –हड्ड (ہڈ –) स्त्री. (फ़ा.+हिं.) काळा हिरडा; बाळ हिरडा.

जंगुलः (زنگلہ); जंगूलः (زنگولہ) पु. (फ़ा.) (१) आंज. (२) घुंगरू; घुंगूर. (३) टाळ. (४) संगीतातील एक राग.

जंब (جنب) पु. ('अ.) (१) बाजू; बगल. (२) वक्षस्थळ.

जंब (زنب) पु. ('अ.) पाप; गुन्हा.

जंबिल (زنبیل) स्त्री. ('अ.) (१) टोपली. (२) पेटारा. (३) थैली.

जंबूर (زنبور) पु. ('अ.) (१) मधमाशी; गांधीलमाशी. (२) लहान तोफ. (३) चिमटा; गावी. (४) बाणाचे पाते. –क (ک –) पु. (तु.) उंटावरून नेता येणारी लहान तोफ. –ख़ानः (خانہ –) पु. (फ़ा.) मधमाशांचे पोळे; गांधीलमाशांचे मोहोळे. –ची (چی –) पु. (तु.) गोलंदाज; तोफची.

जंबूर-ए-'असल (زنبور عسل) पु. (फ़ा.+'अ.) मधमाशी.

जंबूरी (زنبوری) पु. (फ़ा.+'अ.) जाळीचे कापड.

जंबूरः (زنبورہ) पु. (फ़ा.) (१) बाणाचे पाते. (२) लहान तोफ. (३) गांधीलमाशी; मधमाशी.

ज'अद (جعد) स्त्री. ('अ.) केसाची बट; वेणी; कुरळे केस.

ज़'अफ़र (زعفر); ज़'अफ़रां (زعفراں); ज़'अफ़रान (زعفران) पु. ('अ.) केशर.

ज़'अफ़रानी (زعفرانی) वि. ('अ.) केशरी.

ज'अफ़री (جعفری) वि. ('अ.) (१) केशरी; पिवळा. (पु.) (२) झेंडूचे फूल. (३) शुद्ध सोने. (४) कामटघाचा तट्टघा किंवा चौकट.

ज'अल (جعل) पु. ('अ.) (१) कपट; फसवेगिरी. (२) बदलणे; खोटे कागदपत्र बनविणे. –साज़ (ساز –) वि. ('अ.+फ़ा.) खोटे कागदपत्र किंवा बनावटी नाणी तयार करणारा; ठग; फसव्या.

–साज़ी (سازی–)स्त्री. ('अ.+फ़ा.) (१)लबाडी; फसवेगिरी. (२) खोटे कागदपत्र अगर नकली नाणी बनविणे.

ज'अली (جعلی) वि. ('अ.) बनावटी; नकली; खोटा.

ज़'ओम (زعیم) पु. ('अ.) नेता; पुढारी; मार्गदर्शक. **–उल्-मिल्लत** (الملت–) पु. ('अ.) राष्ट्राचा, जमातीचा नेता.

ज़क (زک) स्त्री. (फ़ा.) (१) पराभव. (२) हानी; नुकसान. (३) अपमान.

ज़क़न (ذقن) स्त्री. ('अ.) हनुवटी.

ज़कर (ذکر) पु. ('अ.) (१) पुरुषाचे लिंग; शिश्न. (२) नर; पुरुष.

ज़करिया (زکریا) पु. ('अ.) एक पैगंबर. (यांना करवतीने कापण्यात आले होते).

ज़का (ذکا) स्त्री. ('अ.) (१) बुद्धी; बुद्धिमत्ता. (२) विवेक.

ज़कात (زکوٰۃ) स्त्री. ('अ.) (१) दान; खैरात (इस्लामी धर्मशास्त्राप्रमाणे प्रत्येक मुसलमानाने आपल्या संपत्तीचा १/४० भाग, अथवा अडीच टक्के, गोरगरीबांना दानधर्म म्हणून द्यावयाचा असतो. याला 'ज़कात' असे नाव आहे). (२) महसूल; कर; जकात.

ज़क़ाब (زکاب) स्त्री. ('अ.) लिहिण्याची शाई.

ज़कावत (ذکاوت) स्त्री. ('अ.) (१) बुद्धिमत्ता. (२) मनीषा. (३) प्रतिभा.

ज़किय: (ذکیہ) स्त्री. ('अ.) बुद्धिमान स्त्री; प्रतिभावान स्त्री.

ज़की (زکی) वि. ('अ.) (१) पवित्र; शुद्ध. (२) निस्पृह.

ज़की (ذکی) वि. ('अ.) बुद्धिमान; मेधावी; हुशार. **–उल्-हिस** (الحس–) वि. ('अ.) तीव्र संवेदना असलेला; संवेदनशील.

ज़कीक (زکیک) स्त्री. ('अ.) मंद गती; सावकाश चालणे.

ज़क़ोम (زقوم) (फ़ा.) **ज़क़्क़ूम** (زقوم) पु. ('अ.) नरकातील एक काटेरी झाड. (या झाडाची फळे म्हणजे राक्षसांची मुंडकी. पापी लोकांना ही मुंडकी खावी लागतात).

ज़ख़ा'इर (ذخائر) पु. [अ. 'ज़खीर:' (ذخیرہ) चे अनेक.] (१) खजिने. (२) कोठारे. (३) संग्रह.

ज़ख़ीर: (ذخیرہ) पु. ('अ.) (१) संचय; साठा; ढीग; संग्रह. (२) कोठार; भांडार. (३) खजिना. (४) वस्तुसंग्रहालय. **–अंदोज़** (اندوز–) वि. ('अ.+फ़ा.) धान्य वगैरेचा साठा करणारा; साठेबाज. **–अंदोज़ी** (اندوزی–)स्त्री. ('अ.+फ़ा.) साठेबाजी.

ज़ख़ीर:-ए-'अमल (ذخیرۂ عمل) पु. ('अ.) परलोकासाठी असलेला पापपुण्याचा संचय.

ज़ख़ीर:-ए-आख़िरत (ذخیرۂ آخرت) पु. ('अ.) परलोकांत उपयोगी पडणारी कर्मे; जपतप वगैरेचा संचय.

ज़ख़्ख़ार (زخار) वि. ('अ.) अपार; अफाट; जिच्या लाटा काठाला धडका मारीत आहेत अशी (नदी).

ज़ख़्ख़ार (زخار) वि. [फ़ा. 'ज़ुख़' (زخ) कोलाहल; आकोश.] आरडाओरडा करणारा; आक्रोश करणारा; गरजणारा.

ज़ख़्म (زخم) पु. (फ़ा.) (१) जखम; घाव; आघात. (२) हानी; नुकसान. **–कोस** (کوس –) पु. (फ़ा.) मोठा नगारा. **–ख़ुर्द:** (خوردہ –); **–दीद:** (دیدہ –); **–रसीद:** (رسیدہ –) वि. (फ़ा.) (१) जखमी; घायाळ. (२) नुकसान झालेला.

ज़ख़्म-ए-कारी (زخم کاری) पु. (फ़ा.) खोल जखम; प्राणांतिक घाव.

ज़ख़्म-ए-कुहन: (زخم کہنہ) पु. (फ़ा.) जुनाट जखम.

ज़ख़्म-ए-ख़न्दां (زخم خندان) पु. (फ़ा.) उघडी जखम; वाहती जखम.

ज़ख़्म-ए-जिगर (زخم جگر) पु. (फ़ा.) हृदयाची जखम; प्रीतीची जखम.

ज़ख़्म-ए-दामनदार (زخم دامندار) पु. (फ़ा.) मोठी, रुंद जखम.

ज़ख़्म-ए-पिनहां (زخم پنہاں) पु. (फ़ा.) अंतरीची दुखापत; प्रीतीची जखम.

ज़ख़्मी (زخمی) वि. (फ़ा.) जखमी; घायाळ.

ज़ख़्मः (زخمہ) पु. (फ़ा.) (१) नखी, सतार वगैरे तंतुवाद्ये वाजविण्याचे साधन; बो. (२) हलकेच आघात करणे. (३) संभोगाची क्रिया. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) तंतुवाद्य वाजविणारा.

ज़ख़्रफ़: (زخرف) पु. ('अ.) खोटे हे खरे असल्याचे भासविणे; ठकबाजी; दगाबाजी.

ज़ग़ंद (زغند) स्त्री. (फ़ा.) उडी; उड्डाण.

ज़ग़न (زغن) स्त्री. (फ़ा.) (१) घार (पक्षी) (२) उड्डाण; उडी.

जगह (جگہ) स्त्री. [फ़ा. 'जायगाह' (جاے گاہ) जागा चे हिंदी रूप.] (१) स्थान; जागा. (२) सधी. (३) नोकरी; हुद्दा; पद.

ज़च: (زچہ) स्त्री. (फ़ा.) बाळंतीण; सूतिका; प्रसूता. **–ख़ान:** (خانہ –) पु. (फ़ा.) प्रसूतिगृह; सूतिकागृह; बाळंतीणीची खोली.

जज़ा (جزا) स्त्री. ('अ.) (१) मोबदला; वक्षीस. (२) बऱ्यावाईट कर्माचे फळ; परिणाम.

(३) प्रतिकार, सूड; बदला. [अरबीमध्ये 'पापपुण्याचे फळ' या अर्थाने हा शब्द आहे; परंतु फारसीमध्ये फक्त 'पुण्याचे फळ' या अर्थाने हा वापरला जातो व 'पापाचे फळ' यासाठी 'सज़ा' (سزا) हा शब्द येतो].

जज़ा'इर (جزائر) पु. ['अ. 'जज़ीरः' (جزیرہ) चे अनेक.] अनेक बेटे; द्वीपसमूह.

जज़ाक'ल्लह (جزاک اللہ) अव्य. ('अ.) देव तुझे भले करो! छान! शाबास!

जज़ाज (زجاج) पु. ('अ.) काच.

जज़ालत (جزالت) स्त्री. ('अ.) (१) दृढता. (२) सुंदरता. (३) वैशिष्ट्य.

जज़ीरः (جزیرہ) पु. ('अ.) द्वीप; बेट. **-नुमा** (-نما) पु. ('अ.+फ़ा.) द्वीपकल्प. (तीन बाजूनी पाण्याने वेढलेले स्थान).

जज़ील (جزیل) वि. ('अ.) (१) दृढ; मजबूत. (२) सुंदर (३) उत्तम.

जज़्ब (جذب) पु. ('अ.) (१) आकर्षण. (२) शोषण. (३) तल्लीनता; ब्रह्मलीनता. (वि.) तल्लीन झालेला; गढून गेलेला.

जज़्ब-ए-दिल (جذب دل) पु. ('अ.+फ़ा.) हृदयाचे आकर्षण; प्रेम.

जज़्ब-ए-मिक़्नातीसी (جذب مقناطیسی) पु. ('अ.) लोहचुंबकीय आकर्षण.

जज़्बात (جذبات) पु. ['अ. 'जज़्बः' (جذبہ) चे अनेक.] भावना; विचार.

जज़्बाती (جذباتی) वि. ('अ.) भावनाविवश; भावना-प्रधान.

जज़्बी (جذبی) वि. ('अ.) आकर्षण अथवा शोषण यांच्याशी संबंधित; शोषून घेणारा.

जज़्बः (جذبہ) पु. ('अ.) (१) भावना; मनोवृत्ती. (२) आवेश. (३) क्रोध. (४) आकर्षण.

जज़्बः-ए-कामिल (جذبۂ کامل) पु. ('अ.) पूर्णाकर्षण; प्रेमाकर्षण.

रफ़्तः रफ़्तः जज़्बः-ए-कामिल ने दिखाया यह असर।
पहले जो मुझमें थी उल्फ़त अब वह उनके दिल में है॥

जज़्म (جزم) वि. ('अ.) दृढ; पक्का; मजबूत. (पु.) एखादे अक्षर हलन्त (स्वरविरहित व्यंजन) आहे हे दाखविण्याचे अरबी-फारसी-उर्दू लिपीतील चिन्ह (◌ْ). ['अज़्म बि'ल्-जज़्म' (عزم بالجزم) दृढनिश्चय].

जज़्र (جذر) पु. ('अ.) (१) वर्गमूळ. (२) मूळ.

जज़्र (زجر) स्त्री. ('अ.) झिडकारणे; धमकावणे.

जज़्र (جزر) पु. ('अ.) (१) ओहोटी (समुद्राची). (२) घट. (३) कापणे.

जज़्र-उल्-माल (جزرالمال) पु. ('अ.) चतुर्थमूल.

जज़्र-ए-कुसूर-ए-अ'अशारियः (جزر کسور اعشاریہ) पु. ('अ.) दशांश अपूर्णांकाचे वर्गमूळ.

जज़्र-ओ-मद (جزر ومد) पु. ('अ.) भरती-ओहोटी (समुद्राची).

जद (جد) पु. ('अ.) (१) आजोबा; पूर्वज. (२) श्रीमंती. (३) भाग्य.

ज़द (زد) स्त्री. (फ़ा.) (१) आघात; घाव. (२) लक्ष्य; नेम. (३) नुकसान; हानी.

ज़द-ओ-कोब (زد وکوب) स्त्री. (फ़ा.) मारपीट लाथाळी; हाणामारी.

ज़दगी (زدگی) स्त्री. (फ़ा.) आघात करण्याची क्रिया.

ज़दन (زدن) क्रि. (फ़ा.) (१) मारणे; आघात करणे. (२) खाणे; पिणे; करणे. (३) अथरणे. (४) लिहिणे. (५) फेकणे. (६) ठेवणे.

जदल (جدل) पु. स्त्री. ('अ.) (१) युद्ध; लढाई. (२) भांडण. (३) वादविवाद; हुज्जत.

जदावल (جداول) पु. ['अ. 'जदवल' (جدول) चे अनेक.] (१) पुस्तकाच्या चारी बाजूंचे समास. (२) सारिण्या; कोष्टके; तक्ते. (३) जन्म-लग्न-पत्रिका.

जदी (جدی) पु. ('अ.) (१) शेळीचे पिलू; कोकरू. (२) मकर राशी. पाहा 'ख़त्-ए-जदी'.

जदीद (جدید) वि. ('अ.) (१) नवीन; आधुनिक; नूतन. (२) पाश्चात्य. (३) रंगरूट. (४) नुकताच मुसलमान बनलेला.

जदीदान (جدیدان) पु. ('अ.) दिवस व रात्र. (दोन नव्या गोष्टी).

ज़दः (زدہ) वि. [फ़ा. 'ज़दन' (زدن) मारणे.] मारला गेलेला; घायाळ झालेला. (प्रत्य.) ज्याच्यावर आघात झालेला आहे असा. [उदा. 'मुसीबत ज़दः' (مصیبت زدہ) विपत्तिग्रस्त].

जद्द (جد) पु. ('अ.) (१) आजोबा; पितामह. (२) प्रयत्न; खटपट.

जद्द-ए-अमजद (جد امجد) पु. ('अ.) आजोबा; पितामह.

जद्द-ए-अ'अलॉ (جد اعلیٰ) पु. ('अ.) मूळ पुरुष; वंशप्रवर्तक.

जद्द-ए-क़ासिद (جد فاسد) पु. ('अ.) आजोबा; मातामह.

जद्दी (جدی) वि. ('अ.) (१) वंशपरंपरागत; पैतृक. (२) एका आजोबाच्या वंशातील.

जद्दः (جدہ) स्त्री. ('अ.) (१) आजी; पितामही; मातामही. (२) अरबस्तानातील प्रसिद्ध शहर.

जद्वल (جدول) स्त्री. ('अ.) (१) कालवा; लहान नदी. (२) समास. (३) कोष्टक; तक्ता.

जद्वार (جدوار) स्त्री. (फ़ा.) विष उतरविणारे एक औषध.

ज़न (زن) स्त्री. (फ़ा.) (१) स्त्री; बाई. (२) पत्नी. (प्रत्य.) मारणारा; आघात करणारा. [उदा. 'रहजन' (رهزن) वाटमाऱ्या; लुटारू.] **–ख़ा** (خا –) पु. (फ़ा.+हिं.) (१) हिजडा; नपुसक. (२) बायकी हावभाव करणारा; बारीक कंबर असलेला; बायकांसारखा बोलणारा. **–गूलः** (گول –) पु. (फ़ा.) (१) घंटा. (२) घुंगरू. (३) झांज. **–चक** (چک –) स्त्री. (फ़ा.) व्यभिचारीणी; वेश्या. **–परस्त** (پرست –); **–मुरीद** (مرید –) वि. (फ़ा.) पत्नीपूजक; बाईलवुद्धया; पत्नीभक्त; बायल्या; बाईलवेडा. **–मुज्द** (مزد –) पु. (फ़ा.) बायकोचा शीलविक्रय करून पोट भरणारा; भडवा.

ज़न-ए-मदख़ूलः (زن مدخولہ) स्त्री. (फ़ा. + 'अ.) रखेली; उपपत्नी.

ज़न-ए-मन्कूहः (زن منکوحہ) स्त्री. (फ़ा. + 'अ.) जिच्याशी निकाह (विवाह) झालेला आहे अशी; विवाहिता; धर्मपत्नी.

ज़न-ओ-फ़र्ज़न्द (زن و فرزند) पु. (फ़ा.) बायकामुले; पत्नी व मुलेबाळे.

ज़नख़ (زنخ) पु. (फ़ा.) हनुवटी. **–दाँ** (دان –) पु. (फ़ा.) हनुवटीवरील खड्डा, खळी.

ज़नब (ذنب) पु. ('अ.) (१) पुच्छ; शेपूट. (२) राहू (ग्रह). **–उल्-फ़रस** (الفرس –) पु. ('अ.) राहू (ग्रह).

ज़नाँ (زناں); **ज़नान** (زنان) स्त्री. [फ़ा. 'ज़न' (زن) चे अनेक.] स्त्रिया; बायका. (प्रत्य.) मारीत असलेला. [उदा. 'तेग़ ज़नाँ' (تیغ زناں) वि. (फ़ा.) तलवार मारीत असलेला].

ज़नान-ए-बाज़ारी (زنان بازاری) स्त्री. (फ़ा.) वेश्या; बाजारबसव्या.

ज़नाख़ (زناخ) स्त्री. (फ़ा.+हिं.) कोंबडघाच्या किंवा कबुतराच्या छातीचे हाड. याच्या दोन शाखा असतात.

ज़नाख़ी (زناخی) स्त्री. (फ़ा. + हिं.) (१) सखी. (२) निर्लज्ज स्त्री. (३) स्त्रीची कामवासना पूर्ण करणारी स्त्री.

जनाज़ः (جنازہ) पु. ('अ.) (१) प्रेतवस्त्रात गुंडाळलेले शव; प्रेत. (२) शवपेटी; तिरडी; ताबूत. **–बरदार** (بردار –) वि. ('अ. + फ़ा.) शवपेटी (तिरडी) उचलणारे. **–बरदोश** (بردوش –) वि. ('अ.+फ़ा.) खांद्यावर शवपेटी घेतलेले.

ज़नादिक़ः (زنادقہ) पु. ['अ. 'जिन्दीक़' (زندیق) चे अनेक.] नास्तिक व धर्मभ्रष्ट लोक.

ज़नानख़ानः (زنانخانہ) पु. (फ़ा.) अंतःपुर; राणीवसा.

ज़नानः (زنانہ) वि. (फ़ा.) स्त्रियांशी संबंधित; स्त्रीलिंगी. (पु.) (१) पडदानशीन स्त्रिया; बायका; कुटुंब. (२) अंतःपुर. (३) हिजडा; नपुसक; नेभळट पुरुष.

जनाब (جناب) पु. ('अ.) (१) महाशय; महाराज; श्रीयुत. (२) देवडी; चौकट; उंबरठा. (३) आश्रम; दर्गा.

जनाब-ए-'आली (جناب عالی); **जनाब-ए-मुकर्रम** (جناب مکرم); **जनाब-ए-मोहतरम** (جناب محترم); **जनाब-ए-वाला** (جناب والا) वि. ('अ.) मान्यवर; महोदय; आदरणीय महाशय; महाराज.

जनाब-ए-मन (جناب من) वि. ('अ.) प्रिय महाशय.

जनाबत (جنابت) स्त्री. ('अ.) (१) अपवित्रता; पारोसेपणा. (२) अलिप्तता. (कारण अपवित्र स्थितीत नमाजापासून अलिप्त रहावयाचे असते). (३) संभोगानंतर स्नान करण्याची आवश्यकता.

ज़नाशो'ई (زناشوئی) वि. (फ़ा.) स्त्री-पुरुषांचा; दांपत्यविषयक.

जनाह़ (جناح) पु. ('अ.) (१) पंख. (२) बाहू; भुजा. (३) आघाडीचे सैन्य.

जनीन (جنین) पु. ('अ.) पोटातील मूल; गर्भ.

जनीन-ए-मुर्दः (جنین مردہ) पु. ('अ.+फ़ा.) पोटातच मेलेले मूल.

जनूब (جنوب) पु. ('अ.) दक्षिण; दक्खन.

जनूबी (جنوبی) वि. ('अ.) दक्षिणी; दाक्षिणात्य; दक्षिणेकडील.

ज़न्चक (زنچک); **ज़न्चः** (زنچہ) स्त्री. (फ़ा.) वेश्या; व्यभिचारीणी.

ज़न्ज़बार (زنجبار) पु. ('अ.) झांजीबार. (आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील एक बेट. येथून लवंगा भारतात येतात).

ज़न्ज़बील (زنجبیل) स्त्री. ('अ.) (१) सुंठ. (२) स्वर्गातील एक झरा.

ज़न्जरः (زنجرہ) पु. ('अ.) रातकिडा.

ज़न्जीर (زنجیر) स्त्री. (फ़ा.) (१) साखळी; शृखला. (२) बेडी. (३) दोराची कडी. (४) क्रम; संबंध. **–कशीदः** (کشیدہ –) वि. (फ़ा.) बंधमुक्त. **–खानः** (خانہ –) पु. (फ़ा.) तुरूंग; कारागृह. **–गर** (گر –) बेडघा तयार करणारा. **–गुसिस्तः** (گسستہ –) वि. (फ़ा.) ज्याचे बंधन तुटले आहे असा; स्वतंत्र. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) संबंध ठेवणारा; अनुयायी. **–बान** (بان–) पु. (फ़ा.) तुरूंगाधिकारी; जेलर. **–मू** (مو –); **–सर** (سر –) वि. (फ़ा.) कुरळे केस असलेला (ली). **–साज** (ساز –) पाहा 'ज़ंजीरगर'. **–सोज़** (سوز –) वि. (फ़ा.) शृंखला जाळून, तोडून टाकणारा.

ज़न्जीर-ए-आहन (زنجیر آہن) स्त्री. (फ़ा.) लोखंडी शृंखला.

ज़न्जीर-ए-जुनूं (زنجیر جنوں) स्त्री. (फ़ा. + 'अ.) वेडघाला जिने बांधतात ती साखळी.

ज़न्जीरः (زنجیرہ) पु. (फ़ा.) (१) गळघातील हार (दागिना). (२) लाट; तरंग. (३) नाण्याच्या किंवा कपडघाच्या कडेला असलेल्या नागमोडी रेघा; तशा प्रकारची शिलाई. **–बंदी** (بندی –) स्त्री. (फ़ा.) साखळीतील दुव्याप्रमाणे दोन वस्तूंचा अनिवार्य संबंध.

ज़न्द (زند) पु. ('अ.) मनगट.

ज़न्द (زند); ज़न्द (ژند) पु. (फ़ा.) (१) पारशी लोकांचा धर्मग्रंथ; अवेस्ता; जिदावेस्ता. (२) मोठा; महान.

ज़न्दख़्वां (زند خواں); ज़न्दबाफ़ (زندباف); ज़न्दलाफ़ (زندلاف) पु. (फ़ा.) गाणारा पक्षी; बुलबुल.

ज़न्दर्मः (جندرمہ) पु. ('अ.) पोलीस; पोलीस खाते.

ज़न्दल (جندل) पु. ('अ.) शिळा; मोठा दगड.

ज़न्दः (زندہ) वि. (फ़ा.) मोठा; महान. **–पील** (پیل –) पु. (फ़ा.) मोठा हत्ती. **–रूद** (رود –) पु. (फ़ा.) नद; महानदी.

ज़न्न (ظن) पु. ('अ.) (१) विचार; कल्पना. (२) शंका. (३) वाईट मत.

ज़न्न-ए-ग़ालिब (ظن غالب) पु. ('अ.) (१) खात्री. (२) दाट संशय; शक्यता.

ज़न्न-ए-फ़ासिद (ظن فاسد) पु. ('अ.) चुकीची कल्पना; वाईट विचार.

ज़न्न-ए-बद (ظن بد) पु. ('अ.+फ़ा.) वाईट मत; कलुषित मत.

ज़न्न-ए-बातिल (ظن باطل) पु. ('अ.) चुकीची कल्पना; शंका.

जन्नत (جنت) स्त्री. ('अ.) (१) स्वर्ग. (२) नंदनवन. **–आरामगाह** (آرام گاہ –) वि. ('अ.+फ़ा.) स्वर्गात विश्रांती घेणारा; दिवंगत; कैलासवासी. **–नशीं** (نشیں –) वि. ('अ.+फ़ा.) स्वर्गात राहणारा. **–नसीब** (نصیب –) वि. ('अ.) स्वर्गवासी; ज्याच्या भाग्यात स्वर्ग आहे असा. **–मकां** (مکاں –) वि. ('अ.) स्वर्ग हेच ज्याचे घर आहे असा; स्वर्गीय; स्वर्गस्थ.

जन्नत-उल्-मावा (جنت الماوی) स्त्री. ('अ.) सर्वांत वरचा स्वर्ग.

जन्नतनज़र (جنت نظر); जन्नतनिगाह (جنت نگاہ) स्त्री. ('अ.) दृष्टीला स्वर्गसुख देणारी (वस्तू); अत्यंत सुंदर.

जन्नती (جنتی) वि. ('अ.) (१) स्वर्गस्थ; स्वर्गीय. (२) पुण्यात्मा; सदाचारी.

ज़न्नी (ظنی) वि. ('अ.) काल्पनिक; कल्पित.

ज़फ़र (ظفر) पु. स्त्री. ('अ.) (१) विजय. (२) यश; सफलता. **–क़री** (قریں –) वि. ('अ.) **–निशां** (نشاں –); **–पैकर** (پیکر –); **–मौज** (موج –); **–याब** (یاب –) वि. ('अ.+फ़ा.) विजयी; विजेता. **–याबी** (یابی –) स्त्री. ('अ. + फ़ा.) जय; विजयप्राप्ती.

जफ़ा (جفا) स्त्री. (फ़ा.) (१) सक्ती. (२) जुलूम; अत्याचार. (३) संकट. **–कफ़ा** (کفا –) स्त्री. (फ़ा.) विपत्ती; जुलूम. **–कश** (کش –) वि. (फ़ा.) कष्ट सहन करणारा; मेहनती; सहनशील. **–कार** (کار –) वि. (फ़ा.) अत्याचारी; जुलमी. **–जू** (جو –) वि. (फ़ा.) नवनवीन जुलूम व अत्याचार शोधणारा. **–परस्त** (پرست –) वि. (फ़ा.) (१) भयंकर अत्याचारी; अनीतिपूजक. (२) प्रेमपात्राच्या अत्याचारांची पूजा करणारा; प्रेमी. **–पर्वर** (پرور –) वि. (फ़ा.) अत्याचारांना प्रोत्साहन देणारा. **–शि'आर** (شعار –) (वि.) (फ़ा.) स्वभावतःच अत्याचारी असलेला.

ज़फ़ाफ़ (زفاف) पु. ('अ.) वधुवरांची पहिली मीलनरात्र.

ज़फ़ीर (زفیر); ज़फ़ीरी (زفیری); ज़फ़ील (زفیل) स्त्री. ('अ.) शिटी; शीळ.

जफ़्र (جفر) पु. ('अ.) मंत्रविद्या; दैवी विद्या; परीक्षाज्ञान.

ज़बर (زبر) पु. ('अ. + फ़ा.) (१) उर्दू-अरबी-फारसी लिपीतील एक चिन्ह (ـَ). हे अक्षरावर दिले असता ते अक्षर 'अ' स्वराने युक्त आहे असे समजले जाते. 'अ' कार-चिन्ह. याला 'फ़त्ह्' (فتح) किंवा 'फ़त्हः' (فتحہ) असेही म्हणतात. (वि.) (१) बलवान; शक्तिशाली. (२) मजबूत; जबरदस्त. (३) वजनदार; जड. (४) वरचा; वरील. **–जद** (جد –) पु. (फ़ा.) पिवळघा रंगाचे एक रत्न; पुखराज (पुष्पराज); गोमेद; राहूचा खडा. **–दस्त** (دست –) वि. (फ़ा.) (१) बळकट; शक्तिवान; मजबूत.

(२) प्रचंड; तीव्र; जोरदार. (३) अत्याचारी; जुलमी. **–दस्ती** (دستی –) स्त्री. (फ़ा.) अत्याचार; जुलूम; अन्याय. (अव्य.) जुलमाने, जबरदस्तीने; इच्छेविरुद्ध. **–होना** (ہونا –) शिरजोर होणे.

जबरूत (جبروت) पु. ('अ.) प्रतिष्ठा; श्रेष्ठत्व.

जबल (جبل) पु. ('अ.) पर्वत; डोंगर; टेकडी. **–उत्-तारिक़** (الطارق –) पु. ('अ.) जिब्राल्टर.

जबहः (جبہہ) स्त्री. ('अ.) मघा (नक्षत्र).

ज़बां (زباں); **ज़बान** (زبان) स्त्री. (फ़ा.) (१) जीभ; जिव्हा (२) भाषा; बोलभाषा. (३) उक्ती; वचन. (४) करार; प्रतिज्ञा; वायदा. **–आवर** (آور –) वि. (फ़ा.) भाषाविद; भाषाशास्त्री; वक्तृत्वशाली; वाक्पटू. (पु.) कवी; साहित्यिक. **–आवरी** (آوری –) स्त्री. (फ़ा.) (१) भाषापटुत्व; वाणीचा अस्खलितपणा (२) काव्य; साहित्य. **–गीर** (گیر –) वि. (फ़ा.) गुप्तचर; हेर **–ज़द** (زد –) वि. (फ़ा.) प्रचलित; प्रसिद्ध **–ज़द होना** (زد ہونا –) सर्वांच्या तोंडी होणे; पसरणे; प्रचलित होणे **–दराज़** (دراز –) वि. (फ़ा.) ज्याची जीभ फार लांब आहे असा; उर्मट; फटकळ. **–दराज़ी** (درازی –) स्त्री. (फ़ा.) उर्मटपणा; फाजीलपणाने बोलणे; दुर्वचन. **–दां** (داں –) वि. (फ़ा.) भाषाविद; भाषाशास्त्री. **–दानी** (دانی –) स्त्री. (फ़ा.) एखाद्या भाषेतील प्राविण्य **–फ़रोश** (فروش –) वि. (फ़ा.) बडबडघा; वाचाळ **–बंद** (بند –) पु. (फ़ा.) शत्रूची वाचा बंद करण्यासाठी लिहिला जाणारा मंत्र किंवा गंडा. **–बंदी** (بندی –) स्त्री. (फ़ा.) (१) बोलण्याची बंदी; भाषणबंदी (२) स्तब्धता; नीरवता. (३) जबानी; साक्ष.

जबान-ए-क़लम (زبان قلم) स्त्री. (फ़ा.+'अ.) बोरूचे टोक; टाकाचे निब.

ज़बानी (زبانی) वि. (फ़ा.) तोंडी; मौखिक; तोंडपाठ. **–जमअ़ख़र्च** (جمع خرچ –) निष्फळ बडबड; तोंडची वाफ.

जबानः (زبانہ) पु. (फ़ा.) (१) ज्वाला; अग्निशिखा; ज्योत (२) तराजूच्या दांडीचा मधोमध असलेला दोरा. **–कश** (کش –) वि. (फ़ा.) ज्वाला काढणारा; ज्यातून आग बाहेर पडत आहे असा.

जबीं (جبیں) स्त्री. (फ़ा.) कपाळ; मस्तक; ललाट **–फ़रसा** (فرسا –) वि. (फ़ा.) जमिनीवर मस्तक टेकवून नमस्कार करणारा; अत्यंत दीन. [**चीं ब-जबीं** (چیں بہ جبیں) कपाळाला आठ्या पडलेला; नाराज; रुष्ट.] **–सा** (سا –) पाहा 'जबीं फ़रसा'. **–सा'ई** (سائی –) स्त्री. (फ़ा.) अत्यंत नम्रता अथवा दीनता व्यक्त करणे.

मु'आज़'ल्लह ! तसव्वुर का यह अंदाज-ए-जबीं सा'ई ।
कि. होता ही नहीं महसूस उनका दूर हो जाना ।।

ज़बीह (ذبیح) वि. ('अ.) (१) वध किंवा कत्तल केलेला; मान कापलेला. (२) बळी दिलेला.

ज़बीह-उल्-लह (ذبیح اللہ) पु. ('अ.) हजरत इस्मा'ईल यांची पदवी. (त्यांचे पिता हजरत इब्राहीम यांनी त्यांना परमेश्वरी आज्ञेनुसार बळी देण्याची तयारी केली होती).

ज़बीहः (ذبیحہ) पु. ('अ.) ज्याची कत्तल किंवा वध केला आहे असा पशू; धार्मिक पद्धतीने बळी दिलेला पशू.

ज़बूं (زبوں); **ज़बून** (زبون) वि. (फ़ा.) (१) वाईट; निकृष्ट. (२) दुष्ट. **–हाल** (حال –) वि. (फ़ा.+'अ.) दुर्दशाग्रस्त.

ज़बूनी (زبونی) स्त्री. (फ़ा.) (१) निकृष्टता; दुःख. (२) दुष्टता. (३) तिरस्कार.

ज़बूर (زبور) स्त्री. ('अ.) हजरत दाऊद यांना ईश्वरी प्रेरणेने स्फुरलेला धर्मग्रंथ.

जब्बार (جبار) वि. ('अ.) (१) जबरदस्त; बळजबरी करणारा; मुडे घेणारा (२) तुटलेल्याला जोडणारा. (३) ईश्वराचे एक नाव. (४) विजयी; सर्वशक्तिमान.

जब्र (جبر) पु. ('अ.) (१) जुलूम; अत्याचार; अन्याय; हिंसा. (२) मनुष्य असहाय आहे व ईश्वरच सर्व काही घडवून आणतो हा दार्शनिक सिद्धांत.

जब्र-ए-मशीयत (جبر مشیت) पु. ('अ.) दैवाचा जुलूम; हट्ट.

जब्र-ओ-त'अद्दी (جبر و تعدی) स्त्री. ('अ.) जुलूम; अन्याय; अत्याचार.

जब्र-ओ-मुक़ाबलः (جبر و مقابلہ) पु. ('अ.) बीजगणित.

जब्रन् (جبراً) अव्य. ('अ.) बळजबरीने; जबरदस्तीने. **–ओ-क़हरन्** (– و قہراً) अव्य. ('अ.) बळजबरीने; इच्छा असो किंवा नसो.

जब्रियः (جبریہ); **जब्री** (جبری) वि. ('अ.) (१) जुलमाचा; बळजबरीचा. (२) मनुष्य असहाय असून ईश्वरच सर्व काही करवितो हा सिद्धांत मानणारा.

जम (جم) पु. [फ़ा. 'जमशीद' (جمشید) चे संक्षिप्त.] (१) जमशेद बादशहा. (२) हजरत सुलेमान. (३) शिकंदर.

जम (جم) पु. ('अ.) गर्दी; जमाव.

ज़म (ذم) पु. ('अ.) (१) निंदा; दूषण; खरडपट्टी; वाभाडे. (२) अश्लीलता.

ज़म (زم) पु. ('अ.) थंडी; हिवाळा. (वि.) टणक; घट्ट; भरलेला.

जम'अ (جمع) वि. ('अ.) (१) एकत्र केलेला; गोळा, जमा केलेला. (२) मिळविलेला. (३) एकूण. (स्त्री.) (१) प्राप्ती; जमा; आय; आवक (२) संचित धन; मुद्दल; भांडवल. (३) जमीन महसूल. (४) बेरीज (गणित). (५) अनेकवचन (व्या.) (६) नेम; लक्ष्य **-अंदाज़** (انداز-) वि. ('अ.+फ़ा.) नेमबाज; लक्ष्यभेदी **-खर्च** (خرچ-) पु. ('अ.+फ़ा.) आयव्यय; हिशेब; जमाखर्च; चालू खाते; रोख खाते. **-खर्चनवीस** (خرچ نویس-) वि. ('अ.+फ़ा.) हिशेबनीस. **-दार** (دار-) पु. ('अ.+फ़ा.) शिपायांवरील नाईक; जमादार; पुढारी. **-बंदी** (بندی-) स्त्री. ('अ. + फ़ा.) (१) जमिनीचे उत्पन्न (२) कुळांच्या जमीन महसुलाची नोंदवही (३) कुळांच्या शेतसाऱ्याचा जमाखर्च लिहिलेली तलाठ्याची वही. **-मुहाल मीर बहर** (محال میر بحر-) समुद्रमार्गे येणाऱ्या-जाणाऱ्या मालाच्या जकातीचा हिशेब.

जम'ओयत (جمعیت) स्त्री. ('अ.) (१) जमात; समुदाय; समूह; दल. (२) संतोष; समाधान. (३) सभा; परिसंवाद. (४) संस्था; मंडळी.

जम'ओयत-उल्-'उलमा (جمعیت العلما) स्त्री. ('अ.) विद्वानांचा संघ; समूह; विद्वन्मंडळी; विद्वद् परिषद.

जम'ओयत-ए-ख़ातिर (جمعیت خاطر) स्त्री. ('अ.) मनसंतोष; आत्मसंतोष.

ज़मज़म (زمزم) पु. ('अ.) (१) मुसलमानांचे पवित्र क्षेत्र मक्का येथील काब्याजवळील एक पवित्र विहीर. हिचे पाणी गंगाजलाप्रमाणे पवित्र मानले जाते. (२) या विहिरीचे पाणी.

जमज़म (زمزم) पु. (फ़ा.) (१) खर्ज स्वरातील गाणे. (२) अग्निपूजक (पारशी) लोक अग्नीची पूजा करताना अथवा जेवताना, पाणी पिताना व स्नान करताना हळूहळू म्हणतात ते मंत्र.

ज़मज़मी (زمزمی) स्त्री. ('अ.) ज़मज़मचे पाणी ठेवण्याची कुप्पी किंवा लोटी.

ज़मज़मः (زمزمہ) पु. (फ़ा.) (१) गीत; संगीत. (२) पक्ष्यांची किलबिल; कलरव. **-ख़्वाँ** (خواں-); **-परदाज़** (پرداز-); **-पैरा** (پیرا-); **-संज** (سنج-) वि. (फ़ा.) (१) गायक; गवई. (२) किलबिल; कलरव करणारा (पक्षी). (३) गोड, मधुर भाषण करणारा.

जमजाह (جم جاہ) वि. (फ़ा.) जमशेदसारखा तेजस्वी; महाप्रतापी.

जमन (جمن) स्त्री. पु. (फ़ा.) यमुना; जमना. (नदीच्या अर्थाने वापरला जाणारा 'दरया' हा शब्द पुल्लिगी असल्यामुळे 'जमन' हा शब्दही पुल्लिगी वापरला जातो).

ज़मन (زمن) पु. ('अ.) (१) काळ; जमाना; समय. (२) जग; विश्व. (३) आपत्ती; विपत्ती; संकट.

ज़मर्रुद (زمرد) पु. (फ़ा.) पन्ना (रत्न); हिरव्या रंगाचा खडा.

जमल (جمل) पु. ('अ.) उंट.

जमशेद (جمشید) पु. (फ़ा.) इराणचा एक प्राचीन बादशहा, 'कैखुस्रू' यांच्याजवळ एक पेला होता. या पेल्यात पाहिले असता जगातील सगळी हकीगत समजत असे.

ज़मां (زماں) पु. ['अ. 'ज़मान' (زمان) चे संक्षिप्त.] (१) काळ; जमाना; कालावधी. (२) जग; विश्व **-ओ-मकाँ** (و مکاں-) पु. ('अ.) स्थळ-काळ.

जमा'अत (جماعت) स्त्री. ('अ.) (१) जमात; जात; वर्ग. (२) समुदाय. (३) शाळेतील वर्ग; कक्षा; क्लास. (४) ओळ; क्रम. (५) नमाज पढणाऱ्यांची ओळ. (६) सभा. (७) कंपनी; संस्था.

जमा'अत-ए-सनद याफ़्तः (جماعت سند یافتہ) स्त्री. ('अ.+फ़ा.) संबद्ध संस्था.

जमा'अत-ए-मुत्तफ़िक़ः (جماعت متفقہ) स्त्री. ('अ.) संस्था; मंडळी.

जमाद (جماد) स्त्री. ('अ.) जड पदार्थ; निर्जीव पदार्थ (दगड वगैरे).

जमादात (جمادات) स्त्री. ['अ. 'जमाद' (جماد) चे अनेक.] निर्जीव व जड पदार्थ; दगड व खनिज पदार्थ.

जमादी (جمادی) वि. ('अ.) जड, निर्जीव पदार्थांशी संबंधित.

ज़मान (زمان) पु. ('अ.) (१) काळ; कालावधी. (२) जग; विश्व.

ज़मानः (زمانہ) पु. ('अ.) (१) समय; वेळ; काळ; कालावधी; युग. (२) विलंब; उशीर. (३) खूप दिवस. (४) स्थिती; अवस्था. (५) जग; विश्व. **-मुवाफ़िक़ होना** (-موافق ہونا) दैव अनुकूल असणे, होणे. **-शनास** (-شناس) वि. ('अ.+फ़ा.) काळवेळ ओळखणारा; समयानुकूल काम करणारा. **-साज** (-ساز) वि. ('अ.+फ़ा.) रागरंग पाहून वागणारा; चतुर; धूर्त; संधिसाधू.

ज़मान:-ए-क़दीम (زمانۂ قدیم) पु. ('अ.) प्राचीन काळ.

ज़मान:-ए-जदीद (زمانۂ جدید) पु. ('अ.) आधुनिक काळ; वर्तमान काळ.

ज़मान:-ए-जाहिलियत (زمانۂ جاہلیت) पु. ('अ.) अडाणीपणाचा काळ; अज्ञानाचा कालखंड; इस्लामच्या उदयापूर्वीचा काळ.

ज़मानः-ए-दराज़ (زمانۂ دراز) पु. ('अ.+फ़ा.) दीर्घ काळ; फार पूर्वीचा काळ.

जमानः-ए-माक़ब्लतारीख़ (زمانۂ ماقبل تاریخ) पु. ('अ.) इतिहासपूर्व काळ; प्राक्ऐतिहासिक काळ.

ज़मानः-ए-मादी (زمانۂ ماضی) पु. ('अ.) भूतकाळ.

ज़मानः-ए-सलफ़ (زمانۂ سلف) पु. ('अ.) प्राचीन काळ.

जमाल (جمال) पु. ('अ.) (१) सौंदर्य; रूप; लावण्य. (२) शोभा; सफाई; सुरेखपणा.

जमालियात (جمالیات) पु. ('अ.) सौंदर्यशास्त्र; रूपविज्ञान.

जमाली (جمالی) वि. ('अ.) (१) सौंदर्ययुक्त; सौंदर्याशी संबंधित. (२) ज्यात प्राण जाण्याची भीती नसते असा जप ('जलाली' च्या उलट).

जमाहीर (جماهیر) पु. ['अ. 'जम्हूर' (جمهور) चे अनेक.] जनसमुदाय; जमाव.

ज़मिस्तां (زمستاں); **ज़मिस्तान** (زمستان) पु. (फ़ा.) हिवाळा; शरदऋतू.

ज़मीं (زمیں); **ज़मीन** (زمین) स्त्री. (फ़ा.) (१) भूमी; जमीन; भुई. (२) पृथ्वी; धरती. (३) देश; मुलूख. (४) पुरश्चरण. (५) पार्श्वभूमी. (६) गझलातील यमक, प्रास, वृत्त वगैरे. **–आस्मान एक करना** (– آسمان ایک کرنا) आकाशपाताळ एक करणे; भगीरथ प्रयत्न करणे; पराकाष्ठेची धडपड करणे. **–आस्मान का फ़र्क़** (–آسمان کا فرق) जमीन अस्मानाचे अंतर; फार मोठी तफावत. **–आस्मान के क़ुलाबे मिलाना** (– آسمان کے قلابے ملانا) फारच अतिशयोक्ती करणे; थापा मारणे. **–गीर** (– گیر) वि. (फ़ा.) जमिनीला खिळलेला (रोगी). **–दार** (– دار) पु. (फ़ा.) भूस्वामी. **–दारी** (– داری) स्त्री. (फ़ा.) मोठी शेतीवाडी; वतनदारी. **–दोज़** (– دوز) वि. (फ़ा.) जमीनदोस्त; नष्ट; उध्वस्त.

जमी'अ (جمیع) वि. ('अ.) सर्व; समग्र; संपूर्ण.

ज़मीम (ذمیم) वि. ('अ.) सदोष; वाईट; निकृष्ट.

जमील (جمیل) वि. ('अ.) सुंदर; देखणा; रूपवान.

जम्म (جم) पु. ('अ.) गर्दी; जमाव.

जम्म-ए-ग़फ़ीर (جم غفیر) पु. ('अ.) खूप मोठा जमाव; फार मोठी गर्दी.

जम्माश (جماش) वि. ('अ.) (१) शूर; साहसी; धैर्यवान. (२) चंचल.

जम्रः (جمرہ) पु. ('अ.) (१) ठिणगी. (२) खडा; बारीक दगड. (३) बारीक फोड.

जम्हूर (جمهور) पु. ('अ.) जनता; समाज; सर्वसामान्य लोक.

जम्हूरियत (جمہوریت) स्त्री. ('अ.) लोकशाही; गणराज्य.

जम्हूरी (جمہوری) वि. ('अ.) सार्वजनिक; जनतांत्रिक; लोकशाही. **–सल्तनत** (سلطنت –) स्त्री. ('अ.) लोकशाही सरकार; गणराज्य.

ज़र (زر) पु. (फ़ा.) (१) सोने. (२) संपत्ती. (३) जर; कलाबतू. **–अंदूदः** (اندودہ –) वि. (फ़ा.) सोन्याने मढविलेला. **–अफ़्शां** (افشاں –) वि. (फ़ा.) सुवर्णवृष्टी करणारा; अत्यंत अधिक दानी; उदार. **–क** (ک –) पु. (फ़ा.) सोन्याच्या वर्ख्याचा बारीक चुरा. **–कश** (کش –) वि. (फ़ा.) सोन्याचांदीच्या तारांपासून जर किंवा कलाबतू तयार करणारा. (पु.) जरीचे कापड. **–कशी** (کشی –) स्त्री. (फ़ा.) जरीचे काम; कलाबतूचे काम. **–का जूता** (کا جوتا –) जरीचे काम केलेला जोडा. **–कूब** (کوب –) वि. (फ़ा.) सोने-चांदी ठोकून वर्खे बनविणारा; सोन्याचा वर्खे चढविलेली (वस्तू). **–ख़रीद** (خرید –) वि. (फ़ा.) पैसे देऊन विकत घेतलेला (गुलाम); क्रीतदास. **–ख़ेज़** (خیز –) वि. (फ़ा.) सोने निर्माण करणारी (जमीन); सुपीक. **–गर** (گر –) पु. (फ़ा.) सोनार. **–गरी** (گری –) स्त्री. (फ़ा.) सोनारकाम. **–तार** (تار –) वि. (फ़ा.) जरतारी; जरीचा. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) श्रीमंत; धनवान. **–दारी** (داری –) स्त्री. (फ़ा.) श्रीमंती. **–दोज़** (دوز –) पु. (फ़ा.) कलाबतूचे काम करणारा. **–दोज़ी** (دوزی –) स्त्री. (फ़ा.) कलाबतूचे, जरीचे काम. **–दोस्त** (دوست –) वि. (फ़ा.) धनलोभी; कृपण. **–निगार** (نگار –) वि. (फ़ा.) सोन्याचा मुलामा दिलेला; कलाबतूचे काम केलेला. **–परस्त** (پرست –) वि. (फ़ा.) धनदास; लोभी; कृपण. **–पाश** (پاش –) वि. (फ़ा.) सोने शिंपडणारा; सोन्याची वृष्टी करणारा; दानशूर. **–फ़िशां** (فشاں –); **–अफ़्शां** (افشاں –); **–बफ़्त** (بفت –) वि. जरतारी; भरजरी (कापड). **–बाफ़** (باف –) पु. (फ़ा.) जरीचे कापड तयार करणारा. **–रेज़** (ریز –) वि. (फ़ा.) सोन्याचा वर्षाव करणारा; दानशूर.

ज़र-ए-अमानत (زر امانت) पु. (फ़ा.+'अ.) ठेवीची रक्कम; ठेव; चलनी नाणे.

ज़र-ए-अस्ल (زر اصل) पु. (फ़ा.+'अ.) (१) मूलधन; मुद्दल. (२) खरा रुपया; चलनी नाणे. (३) शुद्ध सोने.

ज़र-ए-क़ल्ब (زر قلب) पु. (फ़ा.+'अ.) खोटे नाणे.

ज़र-ए-ख़ालिस (زر خالص) पु. (फ़ा.+'अ.) (१) खरे नाणे. (२) शुद्ध सोने.

ज़र-ए-गुल (زر گل) पु. (फ़ा.) पराग; पुष्परज.

ज़र-ए-तावान (زر تاوان) पु. (फ़ा. + 'अ.) दंडाची रक्कम; दंड.

ज़र-ए-नक़द (زرِ نقد) पु. (फ़ा.+'अ.) रोख रक्कम.

ज़र-ए-नातिक़ (زرِ ناطق) पु. (फ़ा.+'अ.) बोलणारे धन; नोकराचा कर; पशुधन.

ज़र-ए-फ़ाज़िल (زرِ فاضل) पु. (फ़ा.+'अ.) अतिरिक्त धन; जास्तीचा पैसा.

ज़र-ए-बै'आनः (زرِ بیعانہ) पु. (फ़ा.+'अ.) बयाणा; सचकार; इसारा.

ज़र-ए-मस्कूक (زرِ مسکوک) पु. (फ़ा.+'अ.) शिक्का असलेले धन; नाणे; रुपया.

ज़र-ए-मु'आवज़ः (زرِ معاوضہ) पु. (फ़ा. + 'अ.) मोबदल्याची रक्कम; नुकसानभरपाईची रक्कम.

ज़र-ए-मुतालबः (زرِ مطالبہ) पु. (फ़ा.+'अ.) हुकूमनाम्या (डिक्री) प्रमाणे द्यावयाची रक्कम; हक्काची रक्कम.

ज़र-ए-मुबादलः (زرِ مبادلہ) पु. (फ़ा. + 'अ.) परदेशी चलन; विनिमय मुद्रा.

ज़र-ए-याफ़्तनी (زرِ یافتنی) पु. (फ़ा.) येणे असलेली रक्कम; येणे.

ज़र-ए-सुफ़ेद (زرِ سفید) पु. (फ़ा.) चांदी; शुभ्र सोने.

ज़र-ए-सुर्ख़ (زرِ سرخ) पु. (फ़ा.) सोने.

ज़र-ओ-गौहर (زر و گوہر) पु. (फ़ा.) सोने व मोती.

ज़र-ओ-जवाहिर (زر و جواہر) पु. (फ़ा.+'अ.) सोने व रत्ने.

ज़र'अ (زرع) पु. ('अ.) (१) उगविणे; पेरणे. (२) शेती.

ज़रग़ल (زرغل) वि. (फ़ा.) निकृष्ट; खराब.

ज़रदआलू (زرد آلو) पु. (फ़ा.) पिवळघा रंगाचे आलू बुखारासारखे एक प्रकारचे फळ; खुबानी जर्दाळू.

ज़रदुश्त (زردشت) पु. (फ़ा.) पारसी धर्माचे संस्थापक; झरतुष्ट्र. [पहलवी भाषेत 'जर्त' (زرت) याचा अर्थ शूर किंवा क्रुद्ध असा असून 'श्त' (شت) म्हणजे उट. जरतुश्त—रागावलेला किंवा राग आणणारा उंट].

जरम (جرم) पु. ('अ.) इलाज; उपाय; उपचार.

जरयान (جریان) पु. ('अ.) (१) स्राव; प्रवाह. (२) प्रमेह (रोग); धातुस्राव होण्याचा रोग; लघवीतून वीर्य जाणे.

जरयान-ए-तमस (جریان طمس) पु. ('अ.) रजस्राव; अंगावर जाणे; फार विटाळ जाणे.

जरयान-ए-मनी (جریان منی) पु. ('अ.) वीर्यस्राव; लघवीतून वीर्य जाणे; प्रमेह (रोग).

जरस (جرس) पु. ('अ.) घंटा; टोल; प्रवाशांच्या तांडघाबरोबर असणारी, प्रस्थानाची सूचना देणारी मोठी घंटा.
मेरे दिल ने वह नालः पैदा किया है।
जरस का भी जो होश खोता रहेगा ।।

ज़रा (ذرا) वि. अव्य. (तु.) (१) थोडा; किंचित; कमी. (२) मुळीच. (३) थोडा वेळ. [अरबी 'ज़र्रः' (ذرہ) कण; रेणू यावरून बनलेला तुर्की शब्द.] **–सा** (سا –); **–सी** (سی –) वि. ('अ.+हि.) एवढासा; लहान. **–सा मुंह निकल आना** (سا منہ نکل آنا –) तोंड उतरणे; चिमणी एवढे तोंड होणे.

जरा'इद (جرائد) पु. ['अ. 'जरीदः' (جریدہ) चे अनेक.] वृत्तपत्रे; वर्तमानपत्रे.

ज़रा'ए'अ (ذرائع) पु. ['अ. 'ज़री'अः' (ذریعہ) चे अनेक.] साधने; उपाय; माध्यमे.

ज़राफ़ (زراف) पु. ('अ.) जिराफ.

ज़राफ़त (ظرافت) स्त्री. ('अ.) (१) हास्य; विनोद; मनोरंजन; गंमत. (२) थट्टा; मस्करी. (३) टोमणा; उपहास. **–अंगेज़** (انگیز –) वि. ('अ. + फ़ा.) विनोद निर्माण करणारा; विनोदी. **–आमेज़** (آمیز –) वि. ('अ.+फ़ा.) विनोदपूर्ण. **–निगार** (نگار –) वि. ('अ.+फ़ा.) विनोदी लेखक. **–पसंद** (پسند –) वि. ('अ.+फ़ा.) विनोदप्रिय; विनोदी.

ज़राब (زراب) पु. (फ़ा.) (१) सोन्याचे पाणी; सोन्याचा मुलामा. (२) पिवळघा रंगाची मदिरा.

जरायम (جرایم) पु. ['अ. 'जरीमः' (جریمہ) चे अनेक.] गुन्हे; पापे; अनेक अपराध. **–पेशः** (پیشہ –) वि. ('अ. + फ़ा.) धंदेवाईक गुन्हेगार; गुन्हेगार जमातीचा.

जरायम-ए-ख़फ़ीफ़ः (جرایم خفیفہ) पु. ('अ.) लहान-सहान गुन्हे.

जरायम-ए-संगीन (جرایم سنگین) पु. ('अ.) गंभीर, भयंकर गुन्हे.

जरासीम (جراثیم) पु. ['अ. 'जुर्सूमः.' (جرثومہ) चे अनेक.] सूक्ष्म जंतू; रोगजंतू; कीटाणू. **–कुश** (کش –) वि. ('अ.+फ़ा.) कीटनाशक; कीटाणुनाशक; जंतुघ्न.

जराहत (جراحت) स्त्री. ('अ.) (१) घाव; जखम. (२) शल्यक्रिया; ऑपरेशन.

ज़री (زری) वि. (फ़ा.) जरीचा; सोन्याचा.

जरी (جری) वि. ('अ.) शूर; बहादूर; उत्साही. **–दिल** (دل –) वि. ('अ. + फ़ा.) निर्भय; साहसी; धाडसी.

ज़री (زری) स्त्री. (फ़ा.) जर; जरीचे कापड. (वि.) जरीचा; सोन्याचा.

ज़रीअः (ذریعہ) पु. ('अ.) (१) साधन. (२) मार्ग. (३) माध्यम. (४) उपाय. (अव्य.) द्वारा; मार्फत.

जरीद (جرید) पु. ('अ.) (१) पत्रवाहक; दूत. (२) गुप्तचर; हेर.

जरीदः (جریدہ) पु. ('अ.) वृत्तपत्र; वर्तमानपत्र. (वि.) एकाकी; एकटा. **–निगार** (نگار –) वि. ('अ. + फ़ा.) पत्रकार; वृत्तपत्रकार. **–निगारी** (نگاری –) स्त्री. ('अ. + फ़ा.) पत्रकारित्व; वृत्तपत्रव्यवसाय.

ज़रीनः (زرینہ) वि. स्त्री. (फ़ा.) सोन्याची सोनुबाई; सोनेरी (वस्तू).

ज़रीफ़ (ظریف) वि. ('अ.) (१) विनोदी; थट्टेखोर. (२) प्रतिभाशाली. **–तब'अ** (طبع –); **–मिज़ाज** (مزاج –) वि. ('अ.) विनोदी स्वभावाचा; थट्टेखोर.

ज़रीफ़-उत्-तब'अ (ظریف الطبع); **ज़रीफ़-उल्-मिज़ाज** (ظریف المزاج) वि. ('अ.) विनोदी स्वभावाचा; विनोदप्रिय; गमत्या; थट्टेखोर.

ज़रीफ़ानः (ظریفانہ) वि. ('अ.+फ़ा.) विनोदी.

जरीब (جریب) स्त्री. ('अ.) (१) जमीन मापण्याची ६० यार्डांची किंवा २०० फुटांची साखळी; जमीन मोजणीचे साधन. (२) हातात धरण्याची छडी. **–कश** (کش –) वि. (फ़ा.) जमिनीची मोजणी करणारा.

जरीमः (جریمہ) पु. ('अ.) (१) पाप; पातक. (२) गुन्हा; अपराध.

जरीह़ (جریح) वि. ('अ.) घायाळ; जखमी.

ज़र्क़ (زرق) पु. ('अ.) असत्य; ढोंग; कपट.

ज़र्क़बर्क़ (زرق برق) वि. ('अ.) भडकदार; डोळे दिपविणारा; झगझगीत.

जर्गः (جرگہ) पु. (तु.) (१) दल; समूह. (२) जमात; खानदान; गोत्र; वंश.

ज़र्द (زرد) वि. (फ़ा.) (१) पिवळा; सोनेरी. (२) फिकट; निस्तेज. **–आब** (آب –) पु. (फ़ा.) (१) जखमेतून किंवा फोडातून वाहाणारा पू अथवा पिवळे पाणी; बिघडलेले रक्त. (२) पित्त. **–आलू** (آلو –) पु. (फ़ा.) जर्दाळू. **–क** (ک –) स्त्री. (फ़ा.) गाजर. **–गोश** (گوش –) वि. (फ़ा.) (१) कपटी; धूर्त. (२) द्विधाचित्त; बुचकळ्यात पडलेला. **–चोब** (چوب –) स्त्री. (फ़ा.) हळद. **–रू** (رو –) वि. (फ़ा.) (१) लज्जित; शरमिंदा. (२) फिकट; अंगात रक्त नसलेला; अशक्त. **–रू'ई** (روئی –) स्त्री. (फ़ा.) (१) लज्जा; शरम. (२) अंगात रक्त नसणे.

ज़र्दआब (زرد آب) पु. (फ़ा.) फोडातून वाहाणारा पू किंवा अशुद्ध रक्त.

ज़र्दी (زردی) स्त्री. (फ़ा.) (१) पिवळेपणा; (२) फिकटपणा; निस्तेजपणा. (३) अंड्यातील पिवळा बलक. (४) कावीळ.

ज़र्दः (زردہ) पु. (फ़ा.) (१) सुगंधी तंबाखू; जर्दा. (२) केशरी भात. (३) पिवळेपणा. (४) अंड्यातील पिवळा बलक.

ज़र्नीख़ (زرنیخ) स्त्री. पु. (फ़ा.) (१) हरताळ (एक पिवळे विषारी औषधी द्रव्य). (२) सोमल.

ज़र्फ़ (ظرف) पु. ('अ.) (१) भांडे; पात्र. (२) योग्यता; बुद्धिमत्ता. (३) गंभीरता; सहनशीलता. (व्या.) क्रियाविशेषण; नाम. **'आली ज़र्फ़** (عالی ظرف) उदार; धाडसी; धैर्यवान. **कम ज़र्फ़** (کم ظرف) नीच; हलका.

ज़र्फ़-ए-आफ़ताब (ظرف آفتاب) पु. ('अ.+फ़ा.) मद्य-चषक; मदिरेचा प्याला.

ज़र्फ़-ए-ज़मां (ظرف زماں) पु. ('अ.) (१) कालवाचक क्रियाविशेषण (आज, उद्या वगैरे). (२) कालवाचक नाम (सकाळ; संध्याकाळ).

ज़र्फ़-ए-मकां (ظرف مکاں) पु. ('अ.) स्थानवाचक क्रियाविशेषण. (२) स्थलवाचक नाम (शाळा, घर वगैरे).

जर्र (جر) पु. ('अ.) (१) आकर्षण. (२) 'इ' काराचे चिन्ह; जेर.

जर्र-ए-सक़ील (جر ثقیل) पु. ('अ.) खूप मोठे वजन सहजासहजी उचलण्याची विद्या; गुरुत्वाकर्षण.

ज़र्राफ़ (ظراف) वि. ('अ.) (१) विनोदी; गमत्या. (२) प्रतिभाशाली; बुद्धिमान.

जर्रार (جرار) वि. ('अ.) (१) लढवैया; शूर. (२) मोठे सैन्य; मोठा जमाव.

जर्राह़ (جراح) पु. ('अ.) शल्यचिकित्सक.

जर्राही (جراحی) स्त्री. ('अ.) शल्यचिकित्सा. **–का 'अमल** (کا عمل –) शल्यक्रिया.

ज़र्रीं (زریں) **ज़र्रीन** (زرین) वि. (फ़ा.) सोन्याचा; सोनेरी; भरजरी.

ज़र्रः (ذرہ) पु. ('अ.) (१) कण; अणुरेणू; अंश. (२) किडामुंगी. **–नवाज़** (نواز –); **–परवर** (پرور –) वि. ('अ.+फ़ा.) दीनदयाळू; दीनबंधू. **–सिफ़त** (صفت –) वि. ('अ.) नम्र; विनीत.

ज़र्रः-ए-नाचीज़ (ذرۂ ناچیز); **ज़र्रः-ए-बेमिक़दार** (ذرۂ بے مقدار) पु. ('अ.+फ़ा.) अत्यंत सूक्ष्म

कण; क्षुद्र व्यक्ती. (बोलणारा स्वत:ला उद्देशून हा शब्द वापरतो).

जर्ह (جرح) स्त्री. ('अ.) (१) उलटतपासणी. (२) हुज्जत; तकरार. (३) आघात. **–करना** (–کرنا) उलटतपासणी करणे; प्रश्न विचारणे.

जर्ह-ओ-क़द्ह (جرح و قدح) स्त्री. ('अ.) वादविवाद; हुज्जत.

जलक़ (جلق) स्त्री. ('अ.) हस्तमैथुन; मुष्टिमैथुन. [अरबीच्या 'ज़लक़' (زلق) घसरणे या शब्दापासून फारसीवाल्यांनी हा शब्द बनविला आहे. अरबीतील 'जलक़' (جلق) शब्दाचा मूळ अर्थ हजामत करणे, हसताना दात बाहेर काढणे असा आहे, पण तो विशेष प्रचलित नाही].

ज़लक़ (زلق) स्त्री. ('अ.) (१) निसरणे; घसरणे. (२) हस्तमैथुन.

ज़लमानी (ظلمانی) वि. ('अ.) अंधकारपूर्ण; काळोखी.

ज़लम: (ظلم) पु. ['अ. 'ज़ालिम' (ظالم) चे अनेक.] जुलमी, अत्याचारी लोक.

ज़लल (زلل) पु. ('अ.) (१) निसरडे. (२) ऱ्हास. (३) उणीव; कमतरता.

जला (جلا) पु. ('अ.) (१) हद्दपारीची शिक्षा देणे; देशातून घालवून देणे. (२) देशत्याग करणे. **–वतन** (–وطن) वि. ('अ.) ज्याला हद्दपार करण्यात आलेले आहे असा; ज्याने आपणहून देशत्याग केला आहे असा; परदेशात राहाणारा; निर्वासित; शरणार्थी. **–वतनी** (–وطنی) स्त्री. ('अ.) (१) हद्दपारी; निर्वासन. (२) देशत्याग.

ज़लाज़िल (زلازل) पु. ['अ. 'ज़ल्ज़ल:' (زلزل) चे अनेक.] अनेक भूकंप, धरणीकंप.

ज़लाम (ظلام) पु. ('अ.) सायंकाळचा अंधार; रात्रीच्या सुरुवातीचा पुसट काळोख.

ज़लाल (ظلال) पु. ('अ.) ढगाची सावली; सावलीची जागा.

जलाल (جلال) पु. ('अ.) (१) तेज; प्रकाश; प्रभा. (२) श्रेष्ठत्व; प्रताप. (३) एखाद्या महापुरुषाचा किंवा ऋषिमुनीचा प्रभाव; दरारा; वचक. **–त** (–ت) स्त्री. ('अ.) श्रेष्ठत्व; प्रताप; महत्ता.

जलालिय: (جلالیہ) पु. ('अ.) (१) ईश्वराच्या रुद्र (उग्र) रूपाचे उपासक; शाक्त. (२) एक प्रकारचे फकीर.

जलाली (جلالی) वि. ('अ.) (१) प्रतापी; तेजस्वी. (२) ज्यामध्ये प्राण जाण्याची भीती आहे असा जप ('जमाली' च्या उलट). (३) भीषण; विकराल.

जली (جلی) वि. ('अ.) (१) प्रकट; स्पष्ट. (२) मोठ्या, जाड अक्षरांत लिहिलेले.

ज़लील (ذلیل) वि. ('अ.) (१) तुच्छ; क्षुद्र; हलकट. (२) अपमानित; बदनाम. **–करना** (–کرنا) अपमान करणे; बदनाम करणे.

जलील (جلیل) वि. ('अ.) प्रतिष्ठित; पूज्य; श्रेष्ठ; महान. **–उल्-क़द्र** (–القدر) वि. ('अ.) अत्यंत प्रतिष्ठित; महानता.

जलीस (جلیس) वि. ('अ.) जवळ बसणारा; सहचर; साथी; सखा.

ज़लू (زلو); **ज़लूक** (زلوک) स्त्री. (फ़ा.) जळू (किडा); जळूका.

ज़लूम (ظلوم) वि. ('अ.) अत्यंत अत्याचारी; जुलमी.

ज़लक़ (زلق) स्त्री. ('अ.) हस्तमैथुन.

ज़ल्ज़ल: (زلزلہ) पु. ('अ.) भूकंप. **–अफ़गन** (–افگن) वि. ('अ.+फ़ा.) भूकंप करणारा. **–पैमा** (–پیما) पु. ('अ.+फ़ा.) भूकंपमापक यंत्र; भूकंपदर्शक यंत्र.

जल्द (جلد) अव्य. (फ़ा.) शीघ्र; लवकर; त्वरित; ताबडतोब. **–अज़जल्द** (–از جلد) अव्य. (फ़ा.) लवकरात लवकर; ताबडतोब. **–बाज़** (–باز) वि. (फ़ा.) घिसाडघाई करणारा; उतावळा. **–बाज़ी** (–بازی) स्त्री. (फ़ा.) घाई; उतावळेपणा.

जल्दी (جلدی) स्त्री. ('अ.) घाई; तातडी. (अव्य.) लवकर.

जल्ब (جلب) स्त्री. ('अ.) (१) घेणे; मिळविणे. (२) व्यापारातील नफा. (३) आरडाओरडा. (४) स्वस्त व खराब माल. (५) गुन्हा; पाप.

जल्ल (جل) क्रि. ('अ.) श्रेष्ठ झाला. (वि.) श्रेष्ठ; महान. **–जलालहु** (–جلالہ) वा. ('अ.) त्याचा प्रताप महान आहे; त्याचा महिमा अगाध आहे. (ईश्वराच्या नावाबरोबर हे वाक्य उच्चारले जाते).

ज़ल्लत (ذلت) स्त्री. ('अ.) (१) निसरडे. (२) उणीव; कमतरता.

जल्लाद (جلاد) पु. ('अ.) (१) अपराध्याना फटके मारणारा; गुन्हेगारांना फाशी देणारा किंवा त्यांची मान उडविणारा. (२) क्रूर, निर्दय मनुष्य. (३) प्रेमपात्र.

जल्लादी (جلادی) स्त्री. ('अ.) क्रूरता; निर्दयता.

ज़ल्ल: (زلہ) पु. ('अ.) (१) उच्छिष्ट; उष्टे अन्न (२) नोकरांसाठी ठेवलेले अन्न. **–रुबा** (–ربا) वि. ('अ.+फ़ा.) उच्छिष्ट खाणारा; परान्न खाणारा आश्रित.

जल्वत (جلوت) स्त्री. ('अ.) (१) प्राकट्य; जाहीरपणा; आत्मप्रदर्शन; स्वत:ला सर्वांना

दाखविणे. ['ख़ल्वत' (خلوت) च्या उलट]. (२) गर्दी; जमाव.

जल्वः (جلوہ) पु. ('अ.) (१) दर्शन; शोभा; तेजोवलय. (२) आत्मप्रदर्शन; नटूनथटून लोकांसमोर येणे. (३) लग्नानंतर वधुवरांनी एकमेकांसमोर बसून एकमेकांना पाहाणे. **–आरा** (آرا –) वि. ('अ. + फ़ा.) नटूनथटून हजर राहाणारा. (मोठ्या व्यक्तींच्या उपस्थितीला उद्देशूनही हा शब्द वापरला जातो). **–गर** (گر –) वि. ('अ. + फ़ा.) हजर; जाहीर होणारा; प्रकट होणारा. **–गाह** (گاہ –) पु. ('अ.+फ़ा.) (१) आपला थाट दाखविण्याचे स्थान; दर्शन देण्याचे स्थान. (२) विवाहवेदी; बोहले. (३) जग. **–दिखाना** (دکھانا –) दर्शन देणे.

जल्सः (جلسہ) पु. ('अ.) (१) सभा; अधिवेशन; बैठक. (२) उत्सव; समारंभ. (३) जलसा; मैफल (नाचगाण्याची). **–गाह** (گاہ –) स्त्री. ('अ. + फ़ा.) (१) सभास्थान; मैफलीची जागा.

जल्सः-ए-त'अज़ियत (جلسۂ تعزیت) पु. ('अ.) दुखवटयाची सभा; शोकसभा.

जवाँ (جواں) पु. [फ़ा. 'जवान' (جوان) चे संक्षिप्त.] (१) तरुण; युवक. (२) शिपाई सैनिक. वि. (१) तरुण; वयात आलेला. (२) शूर. **–बख़्त** (بخت –) वि. (फ़ा.) भाग्यवान. (ज्याचे भाग्य जोरावर आहे असा). **–मर्ग** (مرگ –) वि. (फ़ा.) तरुणपणी मरणारा; अकाली निधन पावणारा. **–मर्द** (مرد –) वि. (फ़ा.) (१) शूर; धाडसी. (२) दानशूर. **–साल** (سال –) वि. (फ़ा.) तरुण; नवयुवक.

ज़वा'इद (زوائد) पु. ['अ. 'ज़ा'ईद' (زائد) चे अनेक.] (१) जरुरीपेक्षा जास्त असलेल्या गोष्टी; फालतू किंवा फाजील वस्तू. (२) निरर्थक गोष्टी.

जवाज़ (جواز) पु. ('अ.) (१) शास्त्रविहित असणे; धर्मानुकूल असणे; उचित असणे; सनदशीर असणे. (२) पासपोर्ट; पारपत्र.

जवाद (جواد) वि. ('अ.) (१) मुक्त हस्ताने दान करणारा; दानशूर. (२) ईश्वराचे एक नाव.

जवान (جوان) पु. (फ़ा.) (१) तरुण. (२) सैनिक. (वि.) (१) तरुण; वयात आलेला. (२) नवीन. (३) मजबूत.

जवानानः (جوانانہ) वि. (फ़ा.) तरुणांसारखा.

जवानिब (جوانب) स्त्री. ['अ. 'जानिब' (جانب) चे अनेक.] (१) अनेक दिशा. (२) अनेक बाजू, पैलू. (३) अनेक भाग.

जवानी (جوانی) स्त्री. (फ़ा.) तारुण्य; यौवन.

जवाब (جواب) पु. ('अ.) (१) उत्तर; जबाब. (२) फेड; बदला. (३) बरोबरीची किंवा जोडीची वस्तू. (४) नकार; नोकरीवरून काढून टाकणे. **–तलब** (طلب –) वि. ('अ.) ज्याचे उत्तर अपेक्षित किंवा आवश्यक आहे असे पत्र वगैरे. **–तलब करना** (طلب کرنا –) एखाद्या चुकीबद्दल जाब विचारणे; फैलावर घेणे. **–ए-दा'वा** (دعوی –) पु. ('अ.) वादीच्या अर्जास प्रतिवादीने दिलेले उत्तर. **–दिह** (دہ –) वि. ('अ.+फ़ा.) जबाबदार; उत्तर देणारा; उत्तरदायी. **–दिही** (دہی –) स्त्री. ('अ. + फ़ा.) जबाबदारी; उत्तरदायित्व.

जवाब-उल्-जवाब (جواب الجواب) पु. ('अ.) प्रत्युत्तर.

जवाब-ए-क़त'ई (جواب قطعی) पु. ('अ.) निश्चित उत्तर.

जवाब बा सवाब (جواب باصواب) पु. ('अ. + फ़ा.) योग्य, रास्त उत्तर.

जवाबी (جوابی) वि. ('अ.) उत्तराचे; उत्तराशी संबंधित; प्रत्युत्तर म्हणून. [उदा. 'जवाबी हमलः' (جوابی حملہ) शत्रूवर उलट हल्ला करणे. 'जवाबी कार्ड' (جوابی کارڈ) जोडकार्ड].

जवारिश (جوارش) स्त्री. (फ़ा.) पचनशक्ती वाढविणारा एक अवलेह.

ज़वाल (زوال) पु. ('अ.) (१) पतन; अवनती; ऱ्हास. (२) जंजाळ, संकट. **–आबाद** (آباد –) वि. ('अ. + फ़ा.) जग. **–आमादः** (آمادہ –) वि. ('अ. + फ़ा.) (१) पतनाकडे जाण्यास तयार असलेला; ऱ्हासोन्मुख. (२) नश्वर. **–पिज़ीर** (پذیر –) वि. ('अ. + फ़ा.) पतन होत असलेला; क्षणभंगुर.

जवासीस (جواسیس) पु. ['अ. 'जासूस' (جاسوس) चे अनेक.] अनेक हेर; गुप्तचर.

जवाहिर (جواہر) पु. ['अ. 'जौहर' (جوہر) चे अनेक.] रत्ने; जडजवाहिर. **–ख़ानः** (خانہ –) पु. ('अ. + फ़ा.) रत्नागार. **–निगार** (نگار –) वि. ('अ. + फ़ा.) रत्नजडित. **–रक़म** (رقم –) वि. ('अ.) रत्नासारखे (मोत्यासारखे) अक्षर काढणारा.

ज़वाहिर (ظواہر) पु. ['अ. 'ज़ाहिर' (ظاہر) चे अनेक.] (१) प्रकट व जाहीर गोष्टी. (२) शेतातील उत्पन्न; पीक. (३) उंच स्थान.

ज़वी (ذوی) पु. ['अ. 'जी' (ذی) चे अनेक.] अनेक धनी; मालक; महाशय; अधिपती; परमेश्वर. **–उल्-इरहाम** (الارحام –) पु. ('अ.) आईकडून नाते असलेले लोक. **–उल्-इक़्तिदार** (الاقتدار –) पु. ('अ.) सत्ताधारी लोक; सामर्थ्यवान अधिपती. **–उल्-क़ुर्बा** (القربیٰ –) पु. ('अ.) जवळचे नातेवाईक.

जव्व (جو) पु. ('अ.) अंतरिक्ष; पृथ्वी व आकाश यांच्यामधील पोकळी; अंतराळ.

ज़व्वार (زوار) वि. ('अ.) तीर्थयात्रा करणारा; यात्रेकरू.

जश्न (جشن) पु. (फ़ा.) (१) उत्सव; समारंभ. (२) आनंदोत्सव; आनंद; हर्ष.

जश्न-ए-'अज़ीम (جشن عظیم) पु. (फ़ा. + 'अ.) महोत्सव.

जश्न-ए-'अरूस (جشن عروس) पु. (फ़ा. + 'अ.) विवाहोत्सव; लग्नसमारंभ.

जश्न-ए-आज़ादी (جشن آزادی) पु. (फ़ा.) स्वातंत्र्योत्सव.

जश्न-ए-चराग़ाँ (جشن چراغاں) पु. (फ़ा.) दीपोत्सव; दिवाळी.

जश्न-ए-नौरोज़ (جشن نوروز) पु. (फ़ा.) नव-वर्षोत्सव.

जश्न-ए-मीलाद (جشن میلاد); **जश्न-ए-विलादत** (جشن ولادت) पु. (फ़ा. + 'अ.) जन्मोत्सव; जयंती-उत्सव.

जश्न-ए-सीमीं (جشن سیمیں) पु. (फ़ा.) रजत जयंती-उत्सव; रौप्यमहोत्सव.

जसद (جسد) पु. ('अ.) शरीर; देह.

जसामत (جسامت) स्त्री. ('अ.) (१) लांबी, रुंदी व उंची (किंवा जाडी); विस्तार; क्षेत्रफळ. (२) लठ्ठपणा; जाडी; स्थूलता.

जसारत (جسارت) स्त्री. ('अ.) (१) शौर्य; बहादुरी. (२) धृष्टता.

जसीम (جسیم) वि. ('अ.) स्थूल; लठ्ठ.

जस्त (جست) स्त्री. [फ़ा. 'जस्तन' (جستن) उडी मारणे.] उडी, उड्डाण.

जस्तः (جستہ) वि. (फ़ा.) उडी मारलेला. **–जस्तः** (– جستہ) अव्य. (फ़ा.) उडतउडत; अधूनमधून. (विशेषतः पुस्तक वाचण्याच्या बाबतीत हा शब्द वापरला जातो).

जस्र (جسر) पु. ('अ.) पूल; सेतू.

ज़ह (ہ ز) पु. (फ़ा.) (१) वीर्य. (२) गर्भ. (३) मूल. **–दान** (– دان) पु. (फ़ा.) गर्भाशय. **दर्द-ए-ज़ह** (درد ہ ز) प्रसूतिवेदना.

जहद (جہد) पु. ('अ.) (१) प्रयत्न; धडपड. (२) पराक्रम; परिश्रम. (३) सामर्थ्य; जोर. (४) दुःख; कष्ट; त्रास. (पाहा 'जिफ़ोजहद').

जहद-ए-जहीद (جہد جہید) पु. ('अ.) फार मोठा प्रयत्न; पराकाष्ठेची धडपड.

जहन्नम (جہنم) पु. ('अ.) (१) नरक; पहिल्या नरकाचे नाव; रौख. (२) खोल विहीर. ('जहन्नुम' हा शब्द अशुद्ध आहे).

जहन्नमी (جہنمی) वि. ('अ. + फ़ा.) नरकातील; पापी; नीच.

ज़हमत (زحمت) स्त्री. ('अ.) (१) दुःख; कष्ट; क्लेश. (२) त्रास; कटकट.

ज़हर (زہر) पु. (फ़ा.) विष; जहर. **–आगीं** (– آگیں) वि. (फ़ा.) विषारी. **–आमेज़** (– آمیز); **–आलूद** (– آلود); **–आलूदः** (– آلودہ) वि. (फ़ा.) विषमिश्रित; विषारी; विषपूर्ण. **–ख़ंद** (– خند) पु. (फ़ा.) ओशाळवाणे हसे. **–ख़ुर्दः** (– خوردہ) वि. (फ़ा.) ज्यान विष खाल्ले आहे असा; ज्याला विष घालण्यात आले आहे असा. **–ख़ूरी** (– خوری) स्त्री. (फ़ा.) विष खाणे; विष खाऊन आत्महत्या करणे. **–ताब** (– تاب) वि. (फ़ा.) विषारी बनविलेला (बाण, तलवार वगैरे). **–दार** (– دار) वि. (फ़ा.) विषारी. **–दारू** (– دارو) स्त्री. (फ़ा.) विषावरील उतारा, औषध. **–दुम** (– دم) वि. (फ़ा.) ज्याच्या शेपटीत विष आहे असा (विंचू वगैरे); विष पुच्छ. **–नवा** (– نوا) वि. (फ़ा.) ज्याच्या वाणीत विष आहे असा; कटुभाषी. **–नोश** (– نوش) वि. (फ़ा.) (१) विष प्राशन करणारा. (२) अत्यंत कडक दारू पिणारा. (३) कटु बोलणे सहन करणारा. **–बा** (– با) वि. (फ़ा.) विषमिश्रित अन्न (शत्रूला मारण्यासाठी). **–बाद** (– باد) पु. (फ़ा.) ज्याचे विष सर्वांग शरीरात पसरते असा एक फोड; काळपुळी. **–मोहरः** (– مہرہ) पु. (फ़ा.) (१) विष शोषून घेणारे एक मौल्यवान रत्न. (२) एक प्रकारचा काळा दगड. (याने सापाचे विष उतरते अशी समजूत आहे).

ज़हर-ए-क़ातिल (زہر قاتل) पु. (फ़ा. + 'अ.) प्राणघातक विष; जहाल विष.

ज़हर-ए-हलाहल (زہر ہلاہل) पु. (फ़ा.) भयंकर विष; जहाल विष.

ज़हरमार (زہر مار) पु. (फ़ा.) सापाचे विष.

ज़हरा (زہرا) स्त्री. ('अ.) (१) गोरी स्त्री; गौरांगना. (२) हजरते फातिमा (मुहम्मद साहेबांच्या कन्या) यांचे एक नाव.

ज़हराब (زہراب); **ज़हराबः** (زہرابہ) पु. (फ़ा.) (१) विषमिश्रित पाणी; विषारी पाणी. (२) क्रोध व दुःख.

ज़हराब-ए-ग़म (زہراب غم); **ज़हराबः-ए-ग़म** (زہرابۂ غم) पु. (फ़ा. + 'अ.) दुःखरुपी विषाचे पाणी.

ज़हरीला (زہریلا) वि. (फ़ा. + हिं.) (१) विषारी; भयंकर. (२) भडकविणारा.

ज़हरः (زہرہ) पु. (फ़ा.) (१) पित्त; पित्ताशय. (२) हिम्मत; धाडस. (३) शौर्य; बहादुरी.

–आब होना (– آب ہونا); **–पानी होना** (– پانی ہونا) भयभीत होणे; गाळण उडणे.

जहल (جہل) पु. ('अ.) (१) अज्ञान; अडाणीपणा. (२) मूर्खता. (३) असभ्यता.

जहल-ए-बसीत (جہل بسیط); **जहल-ए-मुतलक़** (جہل مطلق) पु. ('अ.) संपूर्ण अज्ञान; अगदी अडाणीपणा.

जहल-ए-मुरक्कब (جہل مرکب) पु. ('अ.) काहीही कळत नसता सर्वज्ञतेचा आव आणणे; चुकीची समजूत करून घेणे व तेच खरे आहे असे समजणे.

जहला (جہلا) पु. ['अ. 'जाहिल' (جاہل) चे अनेक.] अडाणी, अशिष्ट, असभ्य लोक.

जहाँ (جہاں) पु. [फ़ा. 'जहान' (جہان) चे संक्षिप्त.] जग; विश्व. **–आरा** (آرا –) वि. (फ़ा.) जगाला सुशोभित करणारा (री). **–आफ़रीं** (آفریں –) वि. (फ़ा.) सृष्टिकर्ता. **–गर्द** (گرد –) वि. (फ़ा.) जगभर फिरणारा; जगप्रवासी. **–गीर** (گیر –) वि. (फ़ा.) विश्वविजयी. **–ताब** (تاب –) पु. (फ़ा.) सूर्य. **–दार** (دار –) पु. (फ़ा.) पृथ्वीपती; सम्राट. **–दीदः** (دیدہ –) वि. (फ़ा.) जग पाहिलेला; अनुभवी. **–पनाह** (پناہ –) वि. (फ़ा.) (१) विश्वाचे रक्षण करणारा; जगाला आश्रय देणारा. (२) सम्राटाचे संबोधन. **–बानी** (بانی –) स्त्री. (फ़ा.) शासन; सत्ता; राज्य.

जहाज़ (جہاز) पु. ('अ.) गलबत; जहाज; पोत; जलयान. **–का जहाज़** (کا جہاز –) भला मोठा; धूड. **–रां** (راں –) वि. ('अ. + फ़ा.) जहाज चालविणारा; खलाशी. **–रानी** (رانی –) स्त्री. ('अ. + फ़ा.) जहाज चालविण्याचे काम किंवा व्यवसाय (पेशा); नौकानयन.

जहाज़-ए-आबी (جہاز آبی) पु. ('अ. + फ़ा.) जलयान; गलबत.

जहाज़-ए-बहरी (جہاز بحری) पु. ('अ.) समुद्रात चालणारे जहाज.

जहाज़-ए-हवा'ई (جہاز ہوائی) पु. ('अ.) विमान; वायुयान.

जहाज़ी (جہازی) वि. ('अ.) जहाजाशी संबंधित. (पु.) नावाडी; खलाशी. **–डाकू** (ڈاکو –) पु. ('अ. + हिं.) चाचा; समुद्रावरील लुटारू.

जहावत (زہادت) स्त्री. ('अ.) संयम; इंद्रियनिग्रह; मनोनिग्रह.

जहान (جہان) पु. (फ़ा.) जग; विश्व.

जहान-ए-फ़ानी (جہان فانی) पु. (फ़ा. + 'अ.) नश्वर जग; इहलोक.

जहान-ए-बाक़ी (جہان باقی) पु. (फ़ा. + 'अ.) शाश्वत जग; परलोक.

जहानत (ذہانت) स्त्री. ('अ.) (१) बुद्धिमत्ता; प्रतिभा. (२) दक्षता; विवेक; हुशारी.

ज़हाब (ذہاب) पु. ('अ.) गमन; प्रस्थान.

जहालत (جہالت) स्त्री. ('अ.) (१) अज्ञान; अडाणीपणा. (२) मूर्खता. (३) निरक्षरता. (४) असभ्यता; अशिष्टता.

ज़हीन (ذہین) वि. ('अ.) बुद्धिमान; हुशार; तैलबुद्धी; प्रतिभावान.

जहीर (جہیر) वि. ('अ.) (१) देखणा. (२) खणखणीत आवाज असलेला; मोठ्याने बोलणारा.

ज़हीर (ظہیر) वि. ('अ.) (१) उमललेले; विकसित. (२) उज्वल; तेजस्वी.

ज़हीर (زحیر) स्त्री. ('अ.) मुरडा; आव; अतिसार.

ज़हीर (ظہیر) वि. ('अ.) मदतगार; सहाय्यक; पाठीराखा.

जहूद (جہود) पु. (फ़ा.) यहुदी.

जाँ (جاں) स्त्री. [फ़ा. 'जान' (جان) चे संक्षिप्त.] (१) प्राण; जीव; हृदय. (२) आत्मा. (३) उत्साह; सामर्थ्य. (४) सार; तत्त्व. (५) प्रियकर; प्रेमिका; प्रेमपात्र; प्राणप्रिय व्यक्ती. **–आज़ार** (آزار –) वि. (फ़ा.) सतावणारा; दुःखदायक. **–आज़ारी** (آزاری –) स्त्री. (फ़ा.) (१) दुःख; त्रास. (२) जुलूम; अत्याचार. **–आफ़रीं** (آفریں –) वि. (फ़ा.) शरीरात प्राण घालणारा; सृष्टिकर्ता; परमेश्वर. **–आहन** (آہن –) वि. (फ़ा.) (१) पाषाणहृदयी; निष्ठुर. (२) शूर; निर्भय. **–कंदन** (کندن –) पु. (फ़ा.) (१) शरीरातून प्राण बाहेर पडणे; मरून जाणे. (२) मरेमरेतो राबणे. **–कन** (کن –) वि. (फ़ा.) प्राणघातक. **–कंदनी** (کندنی –); **–कनी** (کنی –) स्त्री. (फ़ा.) (१) शरीरातून प्राण निघून जाण्याची अवस्था. (२) मरणांतिक वेदना. (३) यमयातना. (४) अखेरची उचकी लागणे; श्वास अडखळणे. **–काह** (کاہ –) वि. (फ़ा.) आयुष्य कमी करणारा; अत्यंत त्रासदायक; भीषण; भयंकर. **–काही** (کاہی –) स्त्री. (फ़ा.) मरेमरेतो राबणे; कष्ट करणे. **–गुज़ा** (گزا –) वि. (फ़ा.) प्राणांना डसणारा; हृदयात सलणारा; अत्यंत त्रासदायक. **–गुदाज़** (گداز –) वि. (फ़ा.) प्राणांना विरघळविणारा; कष्टदायक. **–गुसिल** (گسل –) वि. (फ़ा.) हृदयविदारक; प्राणघातक. **–दादः** (دادہ –) वि. (फ़ा.) मुग्ध; मोहित; लुब्ध. **–दाद** (داد –) वि. (फ़ा.) प्राणवान. (पु.) (१) प्राणी. (२) मित्र.

–बिही (دهی –) स्त्री. (फ़ा.) (१) परिश्रम; प्रयत्न. (२) तल्लीनता. **–नवाज़** (نواز –) वि. (फ़ा.) (१) दयाळू; कृपाळू. (२) प्रेमपात्र. **–निसार** (نثار –) वि. (फ़ा.) इतरांसाठी प्राणार्पण करणारा; इतरांसाठी प्राणावर उदार होणारा; प्राणांची कुरवंडी करणारा. **–पनाह** (پناہ –) वि. (फ़ा.) प्राणांचे रक्षण करणारा; आधार देणारा. **–फ़र्सा** (فرسا –) वि. (फ़ा.) आयुष्य कमी करणारा; भीषण. **–फ़िज़ा** (فزا –) वि. (फ़ा.) प्राणवर्धक; आयुष्यवर्धक. **–फ़िशानी** (فشانی –) स्त्री. (खूप परिश्रम; पराकाष्ठेची धडपड.) जिवावर उदार होऊन काम करणे. **–बख़्श** (بخش –) वि. (फ़ा.) (१) प्राण प्रदान करणारा; प्राण वाचविणारा. (२) फाशीचा हुकूम रद्द करणारा; जीवदान देणारा. **–बख़्शी** (بخشی –) स्त्री. (फ़ा.) जीवदान; क्षमा; फाशीचा हुकूम रद्द करणे. **–बर** (بر –) वि. (फ़ा.) जिवंत; सुरक्षित राहाणारा. **–बरी** (بری –) स्त्री. (फ़ा.) जीव वाचणे; जिवंत राहाणे. **–बलब** (بلب –) वि. (फ़ा.) ओठांशी (कंठाशी) प्राण आलेला; मरणोन्मुख; मरणासन्न. **–बहक़** (بحق –) वि. (फ़ा. + 'अ.) प्राण ईश्वराला समर्पित केलेला; मृत; मेलेला. **–बहक़ तस्लीम होना** (بحق تسلیم ہونا –) मरणे. **–बाज़** (باز –) वि. (फ़ा.) (१) एखाद्या कामासाठी जिवावर उदार होणारा; तळहातावर शिर घेणारा. (२) खूप परिश्रम करणारा. **–सिताँ** (ستاں –) वि. (फ़ा.) (१) प्राणघातक; प्राण घेणारा. (२) प्रेमपात्र. **–सितानी** (ستانی –) स्त्री. (फ़ा.) (१) प्राण घेणे. (२) जुलूम; अत्याचार. **–सिपार** (سپار –) वि. (फ़ा.) एखाद्याला (प्रेयसीला) आपल्या प्राणांचा स्वामी बनविणारा. **–सोख़्तः** (سوختہ –) वि. (फ़ा.) ज्याचे प्राण जळून गेले आहेत असा; दग्धहृदय; प्रेमी. **–सोज़** (سوز –) वि. (फ़ा.) (१) आपले प्राण जाळून घेणारा; त्रास सहन करणारा. (२) सहानुभूती बाळगणारा. (३) हृदयद्रावक.

ज़ाँपेश (زاں پیش) अव्य. (फ़ा.) यापूर्वी.

ज़ाँब'अद (زاں بعد) अव्य. (फ़ा.) यानंतर.

जा (جا) स्त्री. (फ़ा.) जागा; स्थान; ठिकाण. **–नमाज़** (نماز –) स्त्री. (फ़ा. + 'अ.) नमाज पढण्यासाठी वापरावयाची सतरंजी किंवा चटई. **–नशीन** (نشین –) पु. (फ़ा.) (१) दुसऱ्याच्या जागेवर बसलेला; स्थानापन्न; दुसऱ्याच्या जागी काम करणारा. (२) वारसदार. **–बजा** (بجا –) अव्य. (फ़ा.) जागजागी; ठिकठिकाणी. **–बेजा** (بے جا –) वि. (फ़ा.) योग्य-अयोग्य; बरावाईट; योग्य प्रसंग असो अथवा नसो.

ज़ा (زا) प्रत्य. (फ़ा.) उत्पन्न करणारा. [उदा. 'फ़रहतज़ा' (فرحت زا) वि. (फ़ा.) आनंद निर्माण करणारा.] (सर्व.) हा मनुष्य.

ज़ा'इक़ (ذائق) वि. पु. ('अ.) स्वाद घेणारा चाखणारा. [स्त्री. 'ज़ा'इक़ः' (ذائقہ)].

ज़ा'इक़ः (ذائقہ) पु. ('अ.) (१) चव; स्वाद. (२) रस; रसनेंद्रियाची शक्ती. (३) लज्जत; मजा. (४) अपकार; अद्दल. **–चश** (چش –) वि. ('अ.+फ़ा.) (१) स्वाद घेणारा. (२) शिक्षा भोगणारा. **–दार** (دار –) वि. ('अ. + फ़ा.) चवदार; स्वादिष्ट. **–पसंद** (پسند –) वि. ('अ.+ फ़ा.) स्वादलोलुप.

ज़ा'इचः (زائچہ) पु. (फ़ा.) जन्मकुंडली; जन्मपत्रिका; लग्नकुंडली.

जा'इज़ (جائز) वि. ('अ.) (१) योग्य; उचित; सनदशीर; नियमानुकूल. (२) बरोबर; अचूक. (३) धर्मानुकूल. **–रखना** (رکھنا –) कायदेशीर मानणे; स्वीकार करणे.

जा'इज़ः (جائزہ) पु. ('अ.) (१) तपासणी; निरीक्षण. (२) परीक्षा. (३) देखरेख.

ज़ा'इद (زائد) वि. ('अ.) (१) अधिक; पुष्कळ. (२) जास्तीचा; अतिरिक्त; फालतू. **–अज़ उम्मीद** (از اُمید –) वि. ('अ. + फ़ा.) अपेक्षातीत; आशातीत. **–अज़ ज़रुरत** (از ضرورت –) वि. ('अ.+ फ़ा.) जरुरीपेक्षा जास्त. **–उल्-मी'आद** (المیعاد –) वि. ('अ.) लांब मुदतीचा; दीर्घकालीन.

ज़ा'इदः (زائدہ) पु. ('अ.) (१) शरीरावरील वाढलेले मांस. (२) जास्त वाढलेली वस्तू.

ज़ा'इब (ذائب) वि. ('अ.) वितळणारा; वितळलेला; द्रवीभूत.

ज़ा'इर (زائر) वि. ('अ.) यात्रेकरू; तीर्थयात्रा किंवा साधुसंतांचे दर्शन करणारा. [स्त्री. 'ज़ा'इरः' (زائرہ); अनेक 'ज़ा'इरीन' (زائرین); अनेक 'ज़ा'इरात' (زائرات)].

ज़ा'इर-ए-कर्बला (زائر کربلا) पु. ('अ.+फ़ा.) कर्बला (इराक) येथे जाऊन हजरत इमाम हुसैन यांच्या समाधीचे दर्शन घेणारा.

ज़ा'इर-ए-हरम (زائر حرم) पु. ('अ.) मक्केला जाऊन काब्याचे दर्शन घेणारा.

ज़ा'इर-ए-हरमैन (زائر حرمین) पु. ('अ.) मक्का व मदीना या दोन्ही तीर्थक्षेत्रांची यात्रा करणारा.

ज़ा'इल (زائل) वि. ('अ.) दूर होणारा; नष्ट; समाप्त.

जा'इल (جائل) वि. ('अ.) उत्पन्न करणारा; निर्माता.

जा'ई (جائی) वि. (फ़ा.) स्थानासंबंधी. (स्त्री.) जाईचे फूल.

ज़ा'ईदः (زائیدہ) वि. (फ़ा.) जन्मलेला; उत्पन्न झालेला.

जाए (جائے) स्त्री. [फ़ा. 'जा' (جا) चे सामासिक शब्दात येणारे रूप.] स्थान. **–अम्न** (امن –) स्त्री. (फ़ा.+'अ.) शांतिस्थान; निर्धोक ठिकाण. **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) जागा; ठिकाण. **–ज़रूर** (ضرور –) स्त्री. (फ़ा.+'अ.) अत्यावश्यक स्थान; शौचकूप; संडास. **–दीगर** (دیگر –) स्त्री. (फ़ा.) दुसरे स्थान. **–नमाज़** (نماز –) स्त्री. (फ़ा.+'अ.) नमाज पढण्याचे स्थान; नमाज पढण्याचे वस्त्र वगैरे. **–पनाह** (پناہ –) स्त्री. (फ़ा.) आश्रयस्थान; रक्षणस्थान.

जा'ए'अ (جائع) वि. ('अ.) उपाशी; भुकेलेला.

जा'एदाद (جائداد) स्त्री. (फ़ा.) जमीनजुमला; मालमत्ता.

जा'एदाद-ए-ग़ैरमन्क़ूलः (جائداد غیر منقولہ) स्त्री. (फ़ा.+'अ.) स्थावर संपत्ती (घर, जमीन वगैरे).

जा'एदाद-ए-ग़ैरमर्हूनः (جائداد غیر مرھونہ) स्त्री. (फ़ा+'अ.) गहाण नसलेली संपत्ती.

जा'एदाद-ए-मन्क़ूलः (جائداد منقولہ) स्त्री. (फ़ा.+'अ.) जंगम संपत्ती (गुरे, पैसा वगैरे).

जा'एदाद-ए-मौक़ूफ़ः (جائداد موقوفہ) स्त्री. (फ़ा.+'अ.) एखाद्या विशिष्ट कार्यासाठी राखून ठेवलेली संपत्ती.

ज़ाक (زاک) स्त्री. (फ़ा.) तुरटी.

ज़ाकिर (ذاکر) वि. ('अ.) वर्णन, उल्लेख करणारा; इमाम हुसैन यांच्या हौतात्म्याचे वर्णन; स्मरण करणारा.

ज़ाग़ (زاغ) पु. (फ़ा.) कावळा. **–चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) निळघा डोळघाचा; निलाक्ष. **–ज़बां** (زباں –) वि. (फ़ा.) ज्याची शापवाणी लगेच खरी ठरेल असा. **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) निर्दय; निष्ठुर. **–नोल** (نول –) पु. (फ़ा.) कुदळ; कुदळी. ['नोल' (نول) चोच]. **–पा** (پا–) पु. (फ़ा.) टोमणा; कटाक्ष.

ज़ाग़-ए-आबी (زاغ آبی) पु. (फ़ा.) (१) पाणकावळा. (२) पाणबुडी.

ज़ाग़-ए-कमां (زاغ کماں) पु. (फ़ा.) धनुष्याच्या दोन्ही टोकांना लावण्यात येणारे शिगाचे काळे तुकडे.

जाग़र (جاغر) पु. (तु.) पक्ष्यांच्या गळघांतील खाद्य साठविण्याची पिशवी.

जागीर (جاگیر) स्त्री. (फ़ा.) जहागीर; लहान संस्थान; मोठी जमीनदारी. **–दार** (دار –) पु. (फ़ा.) जहागीरदार; जहागिरीचा मालक. **–दाराना** (دارانہ –) वि. (फ़ा.) जहागीरदारांसारखा; थाटाचा. **–दारी** (داری –) स्त्री. (फ़ा.) जहागीरदारी शासन व्यवस्था.

ज़ाज (زاج) स्त्री. (फ़ा.) तुरटी.

जाज़िब (جاذب) वि. ('अ.) शोषण करणारा; शोषून घेणारा; आत्मसात करणारा. **–ए-काग़ज़** (کاغذ–) पु. ('अ.) कागद; ब्लॉटिंग पेपर.

जाज़िब-ए-तवज्जुह (جاذب توجہ) वि. ('अ.) लक्ष वेधून घेणारा; चित्ताकर्षक.

जाज़िबियत (جاذبیت) स्त्री. ('अ.) आकर्षण.

जाज़िबः (جاذبہ) स्त्री. ('अ.) आकर्षणशक्ती; शोषून घेण्याची शक्ती.

जाजिम (جاجم) स्त्री. (तु.) जाजम; गालिचा.

जाज़िम (جازم) वि. ('अ.) (१) अक्षराचा हलन्त (स्वररहित) करणारा; कापणारा; पाय मोडणारा. ['जज़्म' (جزم) देणारा]. (२) दृढनिश्चयी.

ज़ाजिर (زاجر) वि. ('अ.) झिडकारणारा; निर्भर्त्सना करणारा.

ज़ात (ذات) स्त्री. ('अ.) (१) कूळ; वंश. (२) जाती; जात. (३) व्यक्तित्व. (४) अस्तित्व. (५) स्वतः. (६) स्वभाव; निसर्ग. (७) प्रतिष्ठा. (८) सत्त्व; तत्त्व. (९) शरीर; वाला; असणारा.

ज़ात-उल्-'इमाद (ذات العماد) वि. ('अ.) अनेक खांब असलेली इमारत; मोठा प्रासाद.

ज़ात-उल्-कुर्सी (ذات الکرسی) स्त्री. ('अ.) स्त्रीच्या आकाराचा एक तारकापुंज; शर्मिष्ठा.

ज़ात-उल्-जंब (ذات الجنب) पु. ('अ.) बरगडघांचे दुखणे; प्लूरिसी; उरोग्रह.

ज़ात-उल्-बुरूज (ذات البروج) पु. ('अ.) राशींचे आकाश; सर्वांत वरील आकाश; स्वर्ग.

ज़ात-उल्-बैन (ذات البین) पु. ('अ.) दोन व्यक्ती किंवा पक्ष यांच्यात तडजोड घडवून आणणारा; मध्यस्थ.

ज़ात-उल्-यमीन (ذات الیمین) वि. ('अ.) अंतिम निवाडघाच्या दिवशी ज्यांची कर्मपत्रके उजव्या हातात असतील असे; सदाचारी; पुण्यवान.

ज़ात-उल्-यसार (ذات الیسار) वि. ('अ.) अंतिम निवाडघाच्या दिवशी ज्यांची कर्मपत्रके डाव्या हातात असतील असे; दुराचारी; पापी.

ज़ात-उस्-सद्र (ذات الصدر) पु. ('अ.) अंतर्यामी; परमेश्वर.

ज़ात-ए-शरीफ़ (ذات شریف) वि. ('अ.) सज्जन व्यक्ती. (उपरोधाने) वस्ताद; धूर्त; लुच्चा.

ज़ातियात (ذاتیات) स्त्री. ('अ.) खासगी व वैयक्तिक गोष्टी.

ज़ाती (ذاتی) वि. ('अ.) (१) वैयक्तिक; खासगी. (२) स्वत:चा. (३) स्वाभाविक. (४) आवश्यक.

ज़ाद (زاد) पु. ('अ.) पाथेय; शिदोरी.

ज़ाद (زاد) प्रत्य. (फ़ा.) जन्मलेला; उत्पन्न झालेला. [उदा. 'परीज़ाद' (پریزاد) परी किंवा अप्सरा हिच्यापासून जन्मलेला; अत्यंत सुंदर.] **–बूम** (بوم –) स्त्री. (फ़ा.) जन्मभूमी; मातृभूमी.

ज़ाद-ए-'उक़्बॉ (زاد عقبیٰ) पु.(फ़ा.+'अ.) परलोकाची शिदोरी; पुण्यकृत्ये.

ज़ाद-ए-राह (زاد راہ) पु. (फ़ा.) **ज़ाद-ए-सफ़र** (زاد سفر) पु. (फ़ा.+'अ.) पाथेय; शिदोरी.

जाबिल (جادل) वि. ('अ.) (१) लढणारा; योद्धा. (२) वादविवाद करणारा.

जाबुरूर (جاضرور) पु. (फ़ा.) शौचकूप; संडास.

जादू (جادو) पु. (फ़ा.) जादू; चेटूक; इंद्रजाल; अभिचार; जारणमारण; नजरबंदी. **–कुश** (–کش) वि. (फ़ा.) जादुगारांना मारणारा. **–गर** (–گر) वि (फ़ा.) जादूगार; चेटक्या. **–गरी** (–گری) स्त्री. (फ़ा.) जादूगिरी; चेटूक; मोहिनी. **–नज़र** (–نظر); **–निगाह** (–نگاہ) वि. (फ़ा.) ज्याच्या डोळ्यात जादू आहे असा; प्रेमपात्र; मोहक दृष्टीचा. **–फ़न** (–فن) वि. (फ़ा.) जादूगार. **–बयान** (–بیان) वि. (फ़ा. + 'अ.) ज्याच्या बोलण्यात जादू आहे असा; मोहक वाणीचा; प्रभावशाली वक्तृत्व असलेला.

जादः (جادہ) पु. (फ़ा.) पायवाट; अरुंद रस्ता; मार्ग. **–पैमा** (–پیما) वि. (फ़ा.) वाटसरू; प्रवासी.

ज़ादः (زادہ) वि. (फ़ा.) उत्पन्न झालेला; जन्मलेला. (पु.) पुत्र. (प्रत्य.) जन्म घेतलेला. [उदा. 'शहज़ादः' (شہزادہ) राजपुत्र].

ज़ादः-ए-ख़ाक (زادۂ خاک) पु. (फ़ा.) मातीतून निघालेले; संपत्ती; सोने-चांदी.

जान (جان) स्त्री. (फ़ा.) (१) प्राण; जीव; प्राणवायू. (२) आत्मा. (३) बळ. (४) सार; तत्त्व. (५) उत्साह. **–दार** (–دار) वि. (फ़ा.) (१) प्राणवान; सजीव. (२) शक्तिशाली; जोरदार. (पु.) प्राणी; मानव. **–बख़्शी** (–بخشی) स्त्री. (फ़ा.) प्राणदान; जीवदान. **–वर** (–ور) वि. (फ़ा.) (पु.) प्राणी, पशुपक्षी वगैरे; मनुष्याखेरीज इतर प्राणी.

जान-ए-जहाँ (جان جہاں) पु. (फ़ा.) जगत्-प्राण; परमेश्वर.

जान-ए-जाँ (جان جاں); **जान-ए-जानाँ** (جان جاناں) पु. (फ़ा.) (१) परमप्रिय व्यक्ती; परमेश्वर. (२) प्रेमपात्र.

जान-ए-मन (جان من) पु. स्त्री. (फ़ा.) माझा प्राण. (संबो.) मत्प्रिय; लाडके; लाडक्या.

जानाँ (جاناں) पु. (फ़ा.) (१) प्रेमपात्र; प्रेयसी. (२) आत्मे; प्राण.

जानानः (جانانہ) पु. (फ़ा.) प्रेमपात्र; प्रियकर; प्रेयसी.

जानिब (جانب) स्त्री. ('अ.) (१) दिशा. (२) बाजू. (३) पक्ष. (४) पैलू. **–दार** (–دار) वि. ('अ. + फ़ा.) (१) बाजू घेणारा; समर्थक. (२) पक्षपाती. **–दारी** (–داری) स्त्री. ('अ.+फ़ा.) पक्षपात; तरफदारी.

जानिबैन (جانبین) पु. ['अ. 'जानिब' (جانب) चे द्विवचन.] दोन्ही पक्ष; दोन्ही बाजू.

ज़ानियः (زانیہ) स्त्री. ['अ. 'जिना' (زنا) व्यभिचार.] व्यभिचारीणी; स्वैरिणी.

ज़ानी (زانی) पु. ('अ.) व्यभिचारी पुरुष; परस्त्रीगामी; विषयलंपट.

जानी (جانی) वि. ('अ.) (१) पापी; गुन्हेगार. (२) फळे वेचणारा.

जानी (جانی) वि. (फ़ा.) (१) प्राणांशी संबंधित. (२) घनिष्ठ; जीवश्चकंठश्च.

ज़ानू (زانو) पु. (फ़ा.) (१) गुडघा. (२) मांडी. **–पोश** (–پوش) पु. (फ़ा.) जेवताना गुडघ्यावर किंवा मांडीवर पसरावयाचे कापड. **–ब.ज़ानू** (–بہ زانو) वि. (फ़ा.) गुडघ्याला गुडघा लावून, ओळीत (बसणे). **दो ज़ानू बैठना** (دو زانو بیٹھنا) गुडघे टेकून बसणे.

जानः (جانہ) पु. (फ़ा.) (१) प्राण. (२) शस्त्रास्त्रे. **–दार** (–دار) वि. (फ़ा.) (१) प्राणवान. (२) सशस्त्र. (३) मित्र.

जाबिर (جابر) वि. ('अ.) अत्याचार, जुलूम; अनीती करणारा.

ज़ाबिलिस्तान (زابلستان) पु. (फ़ा.) इराणचा एक प्राचीन प्रदेश; सीसतान. (ही रुस्तमची जन्मभूमी होती).

ज़ाबिह़ (ذابح) वि. ('अ.) वध करणारा; पशुहत्या करणारा; कसाई.

जाम (جام) पु. (फ़ा.) (१) पेला; प्याला. (२) मद्यचषक. (३) आरसा. (४) खुरासान प्रांतातील एक शहर. **–चलना** (–چلنا) मद्यपान

चालणे. **–बकफ़** (بکف –) वि. (फ़ा.) हातात मद्याचा प्याला घेतलेला. **–बलब** (بلب –) वि. (फ़ा.) तोंडाला मद्यचषक लावलेला; मद्यपान करीत असलेला. **–लबरेज़ होना** (لبریز ہونا –) मरणोन्मुख होणे (शब्दश: प्याला काठोकाठ भरणे).

जाम-ए-'आली (جام عالی) पु. (फ़ा. + 'अ.) फार मोठा प्याला.

जाम-ए-जम (جام جم); **जाम-ए-जमशेद** (جام جمشید) **जाम-ए-जहांनुमा** (جام جہان نما); **जाम-ए-जहांबीं** (جام جہاں بیں) पु. (फ़ा.) इराणचा बादशहा जमशेद याने तयार करविलेला एक पेला. (यात पाहिले असता जगाची सारी हकिगत कळत असे, किंवा भविष्यातील घटना दिसत असत, अशी समजूत आहे).

जाम-ए-सिफ़ाल (جام سفال); **जाम-ए-सिफ़ाली** (جام سفالی); **जाम-ए-सिफ़ालीय:** (جام سفالیہ) पु. (फ़ा.) मातीचा पेला; परळ.

जाम-ए-जमसे तो मेरा जाम-ए-सिफ़ाल अच्छा है।

जामगी (جامگی) स्त्री. (फ़ा.) (१) रतीब. (२) पेल्याच्या तळाशी उरलेला मद्याचा अंश; गाळ. (३) जुना कपडा.

जामदानी (جامدانی) स्त्री. [फ़ा. 'जाम:' (جامہ) + दानी (دانی).] (१) कपडयांची पेटी; कातडी बॅग. (२) एक प्रकारचे वेलबुट्टीदार कापड (विशेषत: मलमलीचे).

जामि'अ (جامع) वि. ('अ.) (१) जमा, गोळा करणारा. (२) सामील. (३) सर्व; संपूर्ण; एकत्रित. (पु.) संग्रह. **–उल्-'उलूम** (العلوم –) पु. ('अ.) सारसंग्रह; ज्ञानकोश. **–उल्-कमालात** (الکمالات –) वि. ('अ.) बहुगुणसंपन्न; महापंडित. **–उल्-मुतफ़र्रिक़ीन** (المتفرقین –) वि. ('अ.) विखुरलेल्यांना अथवा दूर गेलेल्यांना एकत्र आणणारा; मीलन घडवून आणणारा. **–उल्-लुग़ात** (اللغات –) पु. ('अ.) ज्यात एखाद्या भाषेतील सर्व शब्द संग्रहीत करण्यात आलेले आहेत असा शब्दकोश. **–मस्जिद** (مسجد –) स्त्री. ('अ.) शहरातील सर्वांत मोठी व प्रमुख मशीद. या मशिदीत शहरातील बहुसंख्य मुसलमान नमाजासाठी गोळा होतात (विशेषत: शुक्रवारी).

जामि'अ: (جامعہ) स्त्री. ('अ.) विश्वविद्यालय; विद्यापीठ.

जामिद (جامد) वि. ('अ.) (१) घन; भरीव. (२) जड; चैतन्यरहित. **इस्म-ए-जामिद** (اسم جامد) स्वयंभू शब्द; ज्याच्यापासून दुसरा शब्द निघालेला नाही अथवा जो स्वत: दुसऱ्या शब्दापासून निघालेला नाही असा शब्द. **–उल्-'अक़्ल** (العقل –) वि. ('अ.) जडबुद्धी; मठ्ठ; निर्बुद्ध.

जामिह (جامح) वि. ('अ.) बंडखोर; उद्दाम.

जामी (جامی) वि. (फ़ा.) (१) 'जाम' शहराचा निवासी किंवा संबंधित. (२) मद्यपी; मदिरापान करणारा.

जामूस (جاموس) पु. ('अ.) रेडा.

जामूस: (جاموسہ) स्त्री. ('अ.) म्हैस.

जामे'अ (جامع) वि. ('अ.) (१) संग्रह करणारा; संग्राहक. (२) संपादक. (३) व्यापक; विस्तृत.

जाम: (جامہ) पु. (फ़ा.) (१) कपडा; पोषाख; वस्त्र. (२) खमीस; सदरा. (३) वरातीच्या वेळी नवऱ्याने घालावयाचे कपडे. **–कन** (کن –) पु. (फ़ा.) स्नानागारातील पहिली खोली. येथे कपडे काढून लुंगी गुंडाळण्यात येते. **–ज़ेब** (زیب –) वि. (फ़ा.) ज्याला सर्व प्रकारचे कपडे शोभतात असा. **–तलाशी** (تلاشی –) स्त्री. (फ़ा.) अंगावरील कपडयांची तपासणी करणे; अंगझडती. **जामे से बाहर होना** (جامے سے باہر ہونا) अत्यंत क्रुद्ध होणे; मनावरील ताबा सुटणे.

जाम:-ए-एह्राम (جامۂ احرام) पु. (फ़ा. + 'अ.) हजरतचे यात्रेकरू यात्रेच्या वेळी वापरतात (नेसतात) ते वस्त्र.

जाम:-ए-सूरत (جامۂ صورت) पु. (फ़ा.+'अ.) चित्रे काढलेले वस्त्र; चित्रपट.

जार (جار) पु. ('अ.) (१) शेजारी. (२) भागीदार. (३) पती; संरक्षक. (४) शरणागत. (५) मदतगार; सहाय्यक.

जार (جار) पु. (तु.) (१) समुदाय; समूह. (२) दवंडी; घोषणा; आवाज. **–ची** (چی –) पु. (तु.) (१) दवंडी पिटणारा. (२) हेर; बातमी देणारा.

ज़ार (زار) वि. (फ़ा.) (१) क्षीण; अशक्त; दुर्बळ. (२) दीन; दु:खी. **–ज़ार रोना** (زار رونا –); **–ओ-क़तार रोना** (و قطار رونا –) ओक्साबोक्शी रडणे; अश्रूंची संततधार वाहविणे. **–नाली** (نالی –) स्त्री. (फ़ा.) आक्रोश; विलाप; गाऱ्हाणे.

ज़ार-ओ-क़तार (زار و قطار) वि. (फ़ा.+'अ.) अत्यंत अधिक; ओक्साबोक्शी (रडणे).

ज़ार-ओ-नज़ार (زار و نزار) वि. (फ़ा.) अत्यंत दुर्बळ; हडकुळा; मरतुकडा.

ज़ार-ओ-नालां (زار و نالاں) वि. (फ़ा.) अत्यंत दु:खी व रडणारा; दीन.

जारिय: (جاریہ) स्त्री. ('अ.) (१) प्रवाही वस्तू; नौका. (२) दासी; रखेली.

जारिह (جارح) वि. ('अ.) (१) जखम करणारा. (२) हिंस्र (श्वापद).

जारिहानः (جارحانہ) वि. ('अ.) क्रूर; हिंसक; अत्याचारी.

जारिहः (جارحہ) स्त्री. ('अ.) (१) सुरी; जखम करणारी वस्तू. (२) शिकारी जनावर; हिंस्र श्वापद. (३) हात, पाय वगैरे शरीराचे अवयव.

जारी (جاری) वि. ('अ.) (१) चालू असलेले (काम वगैरे). (२) वाहात असलेले (पाणी). (३) लागू; प्रचलित (कायदा).

ज़ारी (زاری) स्त्री. (फ़ा.) विलाप; आक्रोश. **आह्-ओ-ज़ारी** (آہ و زاری) शोक; रुदन; विलाप.

ज़ारीदः (زاریدہ) वि. (फ़ा.) रडलेला; रोदित.

जारोबं (جاروب) स्त्री. (फ़ा.) केरसुणी; झाडू. **–कश** (–کش) पु. (फ़ा.) झाडूवाला; भंगी.

जार्रं (جار) वि. ('अ.) (१) ओढणारा; आकर्षित करणारा. (२) देखरेख ठेवणारा; रक्षक. (व्या.) (१) शब्दयोगी अव्यय. (२) जेर ची खूण देऊन षष्ठीच्या प्रत्ययाचे काम घेणारा.

ज़ाल (زال) वि. (फ़ा.) ज्याच्या डोकीचे केस पिकले आहेत असा; म्हातारा; म्हातारी. (पु.) रुस्तमच्या बापाचे नाव. (हाही रुस्तमप्रमाणे प्रख्यात पहिलवान होता).

जालि'अ (جالع) वि. ('अ.) निर्लज्ज; नंगा; अश्लील बोलणारा.

जालिब (جالب) वि. ('अ.) आपल्याकडे आकर्षून घेणारा; व्यापारी माल घेऊन जाणारा.

ज़ालिम (ظالم) वि. ('अ.) जुलूम करणारा; क्रूर; अत्याचारी. **–गुदाज़** (–گداز) वि. ('अ. + फ़ा.) अत्याचाऱ्यांचा नाश करणारा; शांतता व सुव्यवस्था राखणारा.

ज़ालिम-ए-अज़्लम (ظالم اظلم) वि. ('अ.) भयंकर; अत्याचारी.

ज़ालिममज़्लूमनुमा (ظالم مظلوم نما) वि. ('अ.+फ़ा.) वरून गरीब (अत्याचार पीडित) दिसणारा पण आतून अत्याचारी.

ज़ालिमानः (ظالمانہ) वि. ('अ.+फ़ा.) क्रूर; जुलमी.

जालिस (جالس) वि. ('अ.) बसणारा; बसलेला.

जाली (جالی) वि. ('अ.) चकचकीत करणारा; शुद्ध करणारा.

जालीनोस (جالینوس) पु. ('अ.) प्रसिद्ध ग्रीक वैद्य गॅलेन.

जाविदां (جاوداں) वि. (फ़ा.) नित्य; शाश्वत; अविनाशी; सदैव टिकणारा.

जाविदानी (جاودانی) स्त्री. (फ़ा.) नित्यता; शाश्वतता.

ज़ाविय: (زاویہ) पु. ('अ.) (१) कोन; कोण. (२) कोना; कोपरा. **–पैमा** (–پیما) पु. ('अ. + फ़ा.) कोनमापक.

ज़ाविय:-ए-क़ा'इमः (زاویہ قائمہ) पु. ('अ.) नव्वद अंशांचा कोन; काटकोन; समकोन.

ज़ाविय:-ए-ख़ारिजः (زاویہ خارجہ) पु. ('अ.) **ज़ाविय:-ए-बेरूनी** (زاویہ بیرونی) पु. ('अ.+फ़ा.) बाह्यकोन.

ज़ाविय:-ए-दाख़िलः (زاویہ داخلہ) पु. ('अ.) **ज़ाविय:-ए-अंदरूनी** (زاویہ اندرونی) पु. ('अ.+फ़ा.) अंत:कोन.

ज़ाविय:-ए-नज़र (زاویہ نظر) पु. ('अ.) **ज़ाविय:-ए-निगाह** (زاویہ نگاہ) पु. ('अ.+फ़ा.) दृष्टिकोन.

ज़ाविय:-ए-मुतबादलः (زاویہ متبادلہ) पु. ('अ.) व्युत्क्रम कोन.

ज़ाविय:-ए-मुन्फ़रिजः (زاویہ منفرجہ) पु. ('अ.) नव्वद अंशांहून मोठा कोन; विशाल कोन.

ज़ाविय:-ए-हादः (زاویہ حادہ) पु. ('अ.) नव्वद अंशांहून लहान कोन; लघु कोन.

जावेद (جاوید); **जावेदां** (جاوداں) वि. (फ़ा.) शाश्वत; स्थायी; अमर; अविनाशी.

जासूस (جاسوس) पु. ('अ.) हेर; जासूद; गुप्त पोलीस; गुप्तचर.

जासूसी (جاسوسی) स्त्री. ('अ.) हेरगिरी. (वि.) हेरगिरीशी संबंधित. **–नावेल** (–ناول) पु. ('अ. + इं.) रहस्यकथा.

जाह (جاہ) पु. (फ़ा.) (१) प्रतिष्ठा; इज्जत. (२) श्रेष्ठ पद; किताब. (३) सत्कार; कदर. **–परस्त** (–پرست) वि. (फ़ा.) पदलोलुप; मोठेपणाची हाव बाळगणारा; थोरामोठ्यांचा भक्त.

जाह-ओ-जलाल (جاہ و جلال); **जाह-ओ-हुशम** (جاہ و حشم) पु. ('अ.) (१) थाट; वैभव. (२) दबदबा; रुबाब.

जाह-ओ-मंज़िलत (جاہ و منزلت); **जाह-ओ-मंसब** (جاہ و منصب) पु. ('अ.) महत्त्वाचे स्थान; उच्च पद; प्रतिष्ठा.

ज़ाहिद (زاہد) पु. ('अ.) (१) कर्मठ. (२) संयमी. (३) विरक्त. (४) उपासक; धर्मनिष्ठ; जपतप करणारा.

लुत्फ़-ए-मय तुझसे क्या कहूँ ज़ाहिद ।
हाय कम्बख्त तूने पी ही नहीं ।।

ज़ाहिद-ऐ-ख़ुश्क (زاہد خشک) पु. ('अ.+फ़ा.) शुष्क व नीरस वृत्तीचा; रुक्ष; अनुदार (कर्मठ)

ज़ाहिदः (زاهدة) स्त्री. ('अ.) तपस्विनी; साध्वी; विरक्त स्त्री.

ज़ाहिर (ظاهر) वि. ('अ.) (१) जाहीर; प्रकट. (२) स्पष्ट; व्यक्त. (३) ज्ञात. **–दार** (– دار) वि. ('अ. + फ़ा.) (१) दिखाऊ; दिखावटी. (२) भपकेबाज. (३) संधिसाधू. **–दारी** (– داری) स्त्री. ('अ. + फ़ा.) (१) दिखाऊपणा; भपका. (२) व्यवहार. **–दारी बरतना** (– داری برتنا) दिखाऊपणा करणे; आव आणणे. **–परस्त** (– پرست) वि. ('अ.+फ़ा.) बाह्य अवडंबराला महत्त्व देणारा; भपक्याला भुलणारा. **–बीं** (– بیں) वि. ('अ.+फ़ा.) बाह्य गोष्टी पाहाणारा; बहिर्मुख. **–बीनी** (– بینی) स्त्री. ('अ. + फ़ा.) बहिर्मुखता; भपक्याचे आकर्षण.

ज़ाहिर-ओ-बातिन (ظاهر و باطن) पु. ('अ.) आत व बाहेर; अंतर्बाह्य; बोलणे व अंतःकरण.

ज़ाहिरन् (ظاهراً); **ज़ाहिरा** (ظاهرا) अव्य. ('अ.) (१) उघडपणे; बाह्यतः. (२) सकृत्दर्शनी; वरवर पाहाता.

ज़ाहिरी (ظاهری) वि. ('अ.) (१) बाह्य; उघड; जाहीर. (२) दिखावटी.

जाहिल (جاهل) वि. ('अ.) (१) मूर्ख; अडाणी. (२) निरक्षर. (३) असभ्य; असंस्कृत; अशिष्ट; गावठी.

जाहिल-ए-मुत्लक़ (جاهل مطلق) वि. ('अ.) (१) अत्यंत मूर्ख; मठ्ठ. (२) अगदी निरक्षर.

जाहिलियत (جاهلیت) स्त्री. ('अ.) पाहा 'जहालत'.

ज़िंदगानी (زندگانی) स्त्री. (फ़ा.) (१) जीवन. (२) आयुष्य.

ज़िंदगी (زندگی) स्त्री. (फ़ा.) (१) जीवन; आयुष्य; प्राण. (२) अस्तित्व. **–बख़्श** (– بخش) वि. (फ़ा.) जीवन देणारा; प्राणदायक.

ज़िंदाँ (زنداں) पु. (फ़ा.) कारागृह; तुरुंग. **–ख़ानः** (– خانہ) पु. (फ़ा.) कैदखाना; तुरुंग.

ज़िंदानी (زندانی) वि. (फ़ा.) कैदी; बंदी; कारागृहवासी.

ज़िंदीक़ (زندیق) पु. ('अ.) (१) 'ज़िंद' चा अनुयायी; पारशी धर्माचा अनुयायी; अग्निपूजक. (२) नास्तिक; धर्मभ्रष्ट.

ज़िंदः (زندہ) वि. (फ़ा.) (१) जिवंत; प्राणवान. (२) नवीन; ताजे. [उदा. ज़िंदः ख़ून (زندہ خون) ताजे रक्त.] **–दर गोर** (– در گور) वि. (फ़ा.) (१) जिवंत असून मेलेला; भयंकर कष्टात दिवस कंठणारा. (२) जीवन्मृत. (३) मरणोन्मुख. **–दार** (– دار) वि. (फ़ा.) फार जागणारा. **–दिल** (– دل) वि. (फ़ा.) (१) आनंदी; प्रसन्न. (२) विनोदी; रसिक. **–दिली** (– دلی) स्त्री. (फ़ा.) प्रसन्नता; रसिकता; विनोदी वृत्ती. **–बाद** (– باد); **–बाश** (– باش) वा. (फ़ा.) (१) चिरायू हो; चिरंजीव हो; दीर्घायुषी हो (आशीर्वाद). (२) शाबास.

जिंदा बाद ऐ रंज-ए-उल्फ़त जान-ओ-दिल तुझ पर निसार।
क्यों कि. इक तेरे सबब से याद उसकी दिल में है ॥

ज़िंदः-ए-जावेद (زندۂ جاوید) पु. (फ़ा.) सदैव जिवंत राहाणारा; अमर.

ज़िक़्क़ (زق) स्त्री. ('अ.) पखाल (पाण्याची).

ज़िक्र (ذکر) पु. ('अ.) (१) चर्चा; उल्लेख. (२) ईश्वराचे नामस्मरण; जप. **–ए-मज़्कूर** (– مذکور) पु. ('अ.) संभाषण; चर्चा; उल्लेख.

ज़िक्र-ए-अर्रः (ذکرارہ) पु. ('अ.) योग मार्गातील एक जप. हा हृदयातून व मुखातून बाहेर पडतो.

ज़िक्र-ए-ख़फ़ी (ذکر خفی) पु. ('अ.) मनातल्या मनात करावयाचा जप.

ज़िक्र-ए-ख़ैर (ذکر خیر) पु. ('अ.) (१) शुभ चर्चा; चांगले संभाषण. (२) धर्मग्रंथाचे पठण.

ज़िक्र-ए-ग़ैर (ذکر غیر) पु. ('अ.) (१) (प्रेमातील) प्रतिस्पर्ध्याचा उल्लेख. (२) इतर चर्चा.

ज़िक्र-ए-जहर (ذکر جہر) पु. ('अ.) उच्चारासह मोठ्याने करावयाचा जप.

जिगर (جگر) पु. (फ़ा.) (१) यकृत; काळीज. (२) हृदय; आत्मा. (३) हिम्मत; साहस; धैर्य. **–अफ़्गार** (– افگار) वि. (फ़ा.) भग्नहृदय; अत्यंत दुःखी. **–कावी** (– کاوی) स्त्री. (फ़ा.) अत्यधिक परिश्रम; जिवापाड मेहनत. **–ख़राश** (– خراش) वि. (फ़ा.) दुःखदायक; हृदयविदारक. **–ख़्वार** (– خوار) वि. (फ़ा.) काळीज खाणारा; दुःखदायक. **–गोशः** (– گوشہ) पु. (फ़ा.) (१) काळजाचा तुकडा. (२) पुत्र. **–ताब** (– تاب) वि. (फ़ा.) काळीज गरम करणारा; हृदयाला उब देणारा. **–दोज़** (– دوز) वि. (फ़ा.) हृदयाला घरे पाडणारा; क्लेशदायक. **–पारः** (– پارہ) पु. (फ़ा.) हृदयाचा, काळजाचा तुकडा; पुत्र. **–फ़िगार** (– فگار) वि. (फ़ा.) हृदयाचे तुकडे झालेला; अत्यंत दुःखी. **–बंद** (– بند) पु. (फ़ा.) (१) काळीज, फुप्फुसे व हृदय यांचा समुदाय. (२) मुलगा; पुत्र. **–सा** (– سا) वि. (फ़ा.) काळीज सोलणारा; कष्टदायक. **–सोख़्तः** (– سوختہ) वि. (फ़ा.) शोकामुळे ज्याचे काळीज होरपळून गेले आहे असा; दग्धहृदय. **–सोज़** (– سوز) वि. (फ़ा.) (१) काळीज जाळणारा; दुःखदायक. (२) सहानुभूती बाळगणारा.

लख़्त-ए-जिगर (لخت جگر) काळजाचा तुकडा; पुत्र. हमारी आह्-ए-मसीहा'ई के रूबरू। गर्दूं पि. लेके तुह्फ़: लख़्त-ए-जिगर ग'ई ।।

जिगरा (جگرا) पु. (फ़ा. + हिं.) हिम्मत; धैर्य.

जिगरी (جگری) वि. (फ़ा.) (१) आंतरिक; अंत:करणातील; हार्दिक. (२) जिव्हाभावाचा; घनिष्ठ; जीवश्चकंठश्च.

ज़िच (زچ) स्त्री. (फ़ा. + हिं.) (१) पेच-प्रसंग; अडवणूक; नाईलाज; कोंडी; असहायता. (२) बुद्धिबळाच्या डावातील पेचप्रसंग; राजाची कोंडी होणे; पराभवाशिवाय अन्य मार्ग न उरणे. (वि.) त्रासलेला; सतावलेला.

जिज़बिज़ (جزبز) वि. (फ़ा.) रुष्ठ; नाराज; किरकिरा.

जिज़्य: (جزیہ) पु. ('अ.) (१) कर; जमीन महसूल; सारा. (२) मुस्लिम शासक आपल्या बिगर मुस्लीम प्रजेकडून तिच्या प्राणांचे व संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी एक विशेष कर घेत असत, तो कर. या कराचे प्रमाण दरडोई दरसाल ३ ते १२ रुपयांपर्यंत असे.

जिद (جد) स्त्री. ('अ.) (१) प्रयत्न. (२) धडपड.

जिद-ओ-जहद (جد و جہد) स्त्री. ('अ.) (१) प्रयत्न; धडपड. (२) पराक्रम.

ज़िदा (زدا) प्रत्य. (फ़ा.) शुद्ध, स्वच्छ करणारा.

जिदार (جدار) स्त्री. ('अ.) भित.

जिदाल (جدال) पु. ('अ.) (१) युद्ध. (२) वाद-विवाद.

जिद्दत (جدت) स्त्री. ('अ.) (१) नाविन्य; नवीनता. (२) अद्भुतता. (३) शोध. (४) ताजेपणा. **–तराज़** (–طراز) वि. ('अ + फ़ा.) नाविन्य निर्माण करणारा; नवीन शोध लावणारा. **–पसन्द** (–پسند) वि. ('अ.+फ़ा.) नाविन्यप्रिय.

जिद्दन् (جداً) अव्य. ('अ.) प्रयत्न करून; प्रयासाने.

जिन (جن) पु. ('अ.) भूत; पिशाच.

ज़िनहार (زنہار) स्त्री. (फ़ा.) (१) त्राण; आधार; शरण. (२) संरक्षण. (३) खबरदारी; काळजी. (४) प्रतिज्ञा. (५) तक्रार. (अव्य.) मुळीच; कदापि. **–ख़्वार** (–خوار) वि. (फ़ा.) प्रतिज्ञाभंग करणारा. **–ख़्वाह** (–خواہ) वि. (फ़ा.) शरण किंवा संरक्षण मागणारा.

ज़िनहारी (زنہاری) वि. (फ़ा.) (१) आधार मागणारा. (२) शरण आलेला. (३) प्रतिज्ञा करणारा.

जिनां (جناں) स्त्री. ['अ. 'जिनान' (جنان) चे संक्षिप्त.] (१) अनेक स्वर्ग. (२) उपवने; बागा. (हा शब्द उर्दूमध्ये एकवचनी वापरला जातो).

ज़िना (زنا) पु. ('अ.) व्यभिचार; परस्त्रीगमन; परपुरुषगमन. **–कार** (–کار) वि. ('अ. + फ़ा.) व्यभिचारी; व्यभिचारीणी. **–बि'ल्-जब्र** (–بالجبر) पु. ('अ.) जबरी संभोग.

जिनान (جنان) स्त्री. ['अ. 'जन्नत' (جنت) चे अनेक.] (१) अनेक स्वर्ग. (२) उपवने; बागा. (उर्दूमध्ये हा शब्द एकवचनात वापरला जातो).

जिनायत (جنایت) स्त्री. ('अ.) (१) पाप. (२) गुन्हा. [अनेक 'जिनायात' (جنایات)].

ज़िन्नत (زلت) स्त्री. ('अ.) आरोप; आळ.

जिन्नी (جنی) पु. ('अ.) भुताखेतावर ताबा मिळविलेला मांत्रिक.

जिन्न: (جنہ); **जिन्नात** (جنات) पु. ['अ. 'जिन' (جن) चे अनेक.] भुते; पिशाचे.

जिन्स (جنس) स्त्री. ('अ.) (१) वस्तू; जिन्नस; पदार्थ. (२) धान्य. (३) लिंग. (४) प्रकार; तऱ्हा. (५) सामान; सामग्री. **–ख़ान:** (–خانہ) पु. ('अ. + फ़ा.) कोठी; भांडार. **ब.जिन्सिहि** (ہ جنسہ) हुबेहूब; पूर्णपणे; जसेच्या तसे; तपशीलवार. **–वार** (–وار) पु. स्त्री. ('अ +फ़ा.) पेरणीचे नोंदणी बुक. पान तलाठी शेतातील धान्यांची नोंद करतो. (वि.) जिन्नसवार; क्रमवार **अबना-ए-जिन्स** (ابنائے جنس) मानव जाती; मानव.

जिन्स-ए-अ'अलॉ (جنس اعلیٰ) स्त्री. ('अ.) उत्कृष्ट वस्तू; उत्तम जातीचे, प्रतीचे धान्य.

जिन्स-ए-अदनॉ (جنس ادنیٰ) स्त्री. ('अ.) हलक्या जातीची वस्तू; हलक्या प्रतीचे धान्य.

जिन्स-ए-कासिद (جنس کاسد) स्त्री. ('अ.) **जिन्स-ए-नाकार:** (جنس ناکارہ) स्त्री. ('अ.+फ़ा.) **जिन्स-ए-नाक़िस्** (جنس ناقص) स्त्री ('अ.) बाजारात. विकली न जाणारी खराब किंवा क्षुद्र वस्तू.

जिन्सियत (جنسیت) स्त्री. ('अ.) (१) लैंगिकता; नर किंवा मादी असणे. (२) जातीयता; राष्ट्रीयता. (३) एकसारखे असणे.

जिन्सी (جنسی) वि. ('अ.) (१) वस्तूसंबंधी. (२) लैंगिक.

ज़िफ़ाफ़ (زفاف) पु. ('अ.) (१) वधूची वराच्या घरी पाठवणी. (२) वधुवरांची प्रथम भेट.

ज़िबस (زبس) अव्य. (फ़ा.) (१) पूर्णपणे. (२) बेपुल्याने.

जिबाल (جبال) पु. [अ. 'जबल' (جبل) चे अनेक.] अनेक पर्वत; डोंगर.

जिबिल्ली (جبلی) वि. ('अ.) नैसर्गिक; स्वाभाविक.

जिब्त (جبت) पु. ('अ.) (१) पूजिली जाणारी ईश्वराखेरीजची वस्तू; मूर्ती. (२) जादू; जादूगार.

ज़िम्र (زبر) स्त्री. ('अ.) पुस्तक; ग्रंथ.

जिब्रील (جبریل) पु. ('अ.) प्रेषितांना ईश्वराचे संदेश पोचविणारा एक देवदूत, जिब्राईल.

ज़िब्ल (زبل) पु. ('अ.) लीद (घोड्याचे किंवा गाढवाचे शेण).

ज़िब्ह (ذبح) वि. ('अ.) ज्याचा वध करण्यात आला आहे असा; वधित. (पु.) कत्तल; कापाकापी; गळा कापणे; मुस्लीम धर्माज्ञेप्रमाणे पशुहत्या करणे, बकरे वगैरे कापणे.

ज़िब्ह-ए-अक्बर (ذبح اکبر) पु. ('अ.) (१) हजरत इस्माईल यांच्याऐवजी देवाच्या नावाने कापण्यात आलेला मेंढा. (२) ईदुज्जुहाच्या दिवशी कापले जाणारे जनावर; मोठा बळी.

ज़िब्ह-ए-'अज़ीम (ذبح عظیم) पु. ('अ.) हजरत इमाम हुसैन यांचे महान बलिदान.

जिमा'अ (جماع) पु. ('अ.) मैथुन; संभोग. **-उल्-इस्म** (الاثم –) पु. ('अ.) मद्यपान; मदिरा.

ज़िमाम (زمام) पु. ('अ.) (१) प्रतिष्ठा; इज्जत. (२) स्वत्व; हक्क.

ज़िमाम (زمام) स्त्री. ('अ.) उंटाची वेसण; लगाम.

ज़िमाम-ए-हुकूमत (زمام حکومت) स्त्री. ('अ.) शासन-सूत्र; सत्तेची सूत्रे.

जिमार (جمار) स्त्री. [अ. 'जम्रः' (جمرہ) चे अनेक.] (१) बारीक दगड, खडे. (२) हजच्या यात्रेतील सैतानाला खडे मारण्याची एक प्रथा.

जिम्मत (ذمت) स्त्री. ('अ.) (१) प्रतिज्ञा. (२) जामीन, जबाबदारी.

ज़िम्मी (ذمی) पु. ('अ.) इस्लामी राज्यात राहणारी बिगर मुस्लीम प्रजा. या प्रजेला 'जिझिया कर द्यावा लागे.

ज़िम्मः (ذمہ) पु. ('अ.) (१) हमी; जबाबदारी; जिम्मा. (२) देखरेख; तावा. (३) कर्तव्य; प्रतिज्ञा. (४) जामीन. **-दार** (دار –); **-वार** (وار –) वि. ('अ.–फा.) जबाबदार; उत्तरदायी. **-दारी** (داری –); **-वारी** (واری –) स्त्री. (अ.+फा.) जबाबदारी; उत्तरदायित्व; जामीन.

ज़ियां (زیاں) पु. (फ़ा.) (१) नुकसान; तोटा; हानी. (२) अनिष्ट. **-कार** (کار –) वि. (फ़ा.) (१) नुकसान करणारा. (२) दुराचारी. **-कारी** (کاری –) स्त्री. (फ़ा.) (१) नुकसान करणे. (२) दुराचार.

ज़ियाद (زیاد) पु. ('अ.) (१) पुष्कळपणा; अधिकता. (२) इमाम हुसेन यांची हत्या करणारा; इब्ने जियाद.

ज़ियादत (زیادت) स्त्री. ('अ.) अधिकता; बाहुल्य; वैपुल्य.

ज़ियादती (زیادتی) स्त्री. ('अ.) (१) अधिकता. (२) बळजबरी; जुलूम.

ज़ियादः (زیادہ) वि. ('अ.) (१) पुष्कळ; जादा; अधिक; जास्त; फार. (२) जास्तीचे; अतिरिक्त. **-खोर** (خور –) वि. ('अ.+फा.) फार खाणारा; खादाड. **-गो** (گو –) वि. ('अ.+फा.) फार बोलणारा; बडबड्या; थापाड्या. **-तर** (تر –) वि. ('अ.+फा.) अधिकतर; अधिकाश; बहुतेक. **-सरी** (سری –) स्त्री. ('अ. + फा.) (१) स्वच्छंदता; स्वैरपणा. (२) घमेंड; गर्व. **-सितानी** (ستانی –) स्त्री. ('अ.+फा.) आपल्या वाट्यापेक्षा जास्त घेणे.

ज़ियाबीत़स (ذیابیطس) पु. ('अ.) एक रोग. यात फार तहान लागते व सारखे लघ्वीस होते.

ज़ियारत (زیارت) स्त्री. ('अ.) (१) दर्शन; देवदर्शन. (२) तीर्थयात्रा; क्षेत्राटन; एखाद्या महापुरुषाच्या समाधीचे दर्शन. **-कदः** (کدہ –) (पु.) **-गाह** (گاہ –) स्त्री. ('अ. + फा.) तीर्थस्थान; एखाद्या साधुसंताची समाधी.

ज़ियारती (زیارتی) वि. ('अ.) यात्रेकरू.

ज़िरा'अ (ذراع) पु. ('अ.) (१) एक हाताचे माप; एक वार. (२) पुनर्वसू (नक्षत्र).

ज़िरा'अत (زراعت) स्त्री. ('अ.) (१) शेती. (२) लागवड केलेली जमीन. (३) पीक. **-पेशः** (پیشہ –) वि. ('अ. + फा.) शेतीचा व्यवसाय करणारा; शेतकरी.

ज़िरा'अती (زراعتی) वि. ('अ.) शेतीसंबंधी; शेतीविषयक.

जिराहत (جراحت) स्त्री. ('अ.) (१) घाव; जखम; आघात. (२) शल्यक्रिया.

ज़िरिह (زرہ) स्त्री. (फ़ा.) कवच; चिलखत. **-पोश** (پوش –) वि. (फ़ा.) चिलखत घातलेला; कवचधारी. **-बाफ़** (باف –); **-साज** (ساز –) वि. (फ़ा.) चिलखते बनविणारा.

जिर्म (جرم) पु. ('अ.) (१) शरीर; पिंड. (२) आकाशस्थ, ग्रह, तारे वगैरे. (३) जड पदार्थ. **जिर्म-ए-क़मर** (جرم قمر) चंद्राचे शरीर.

जिर्यान (جریان) पाहा 'जरयान' (शु.).

ज़िल (ظل) पु. ('अ.) (१) सावली. (२) पडछाया; प्रतिबिंब.

जिला (جلا) स्त्री. ('अ.) चकाकी; चमक; पॉलीश; पाणी. **–दार** (دار –) वि. ('अ. + फ़ा.) चकचकीत; चमकदार.

ज़िलेबा (زلیبا) पु. (फ़ा.) जिलबी (पक्वान्न).

जिलौ (جلو) पु. (तु.) (१) खाशा स्वारीचा घोडा; शोभेचा, मिरवणुकीचा घोडा. (२) लगाम. **–खानः** (خانہ –) पु. (तु. + फ़ा.) तबेला; अश्वशाला. **–दार** (دار –) पु. (तु. + फ़ा.) (१) घोडयाचा लगाम धरून स्वाराबरोबर धावणारा नोकर; मोतद्दार; साईस. (२) उत्कृष्ट घोडयाचा मालक. **–रेज़** (ریز –) वि. (तु.+फ़ा.) घोडयावरून वेगात धावणारा.

ज़ि'ल्-क़'अदः (ذی القعدہ) पु. ('अ.) अरबी वर्षाचा अकरावा महिना.

ज़ि'ल्-हिज्जः (ذی الحجہ) पु. ('अ.) अरबी वर्षाचा बारावा महिना.

ज़िल्ज़ाल (زلزال) पु. ('अ.) कंपित करणे; गदगदा हलविणे.

जिल्द (جلد) स्त्री. ('अ.) (१) त्वचा; कातडी. (२) चामडे; कातडे. (३) पुस्तकाचा पुठ्ठा; पुष्टिपत्र; बांधणी; बाईंडिंग. (४) पुस्तकाची एक प्रत किंवा एक भाग. **–बंद** (بند –); **–साज** (ساز –) पु. ('अ. + फ़ा.) पुस्तकांची बांधणी करणारा; बुकबाइंडर. **–बंदी** (بندی –); **–साज़ी** (سازی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) ग्रंथबांधणी; बुकबाईंडिंग.

ज़िल्ल (ظل) पु. ('अ.) छत्र; छाया; सावली; आधार. **दामज़िल्लहु** (دام ظلہ) त्याची सावली सदैव राहो; सदा भरभराट होवो.

ज़िल्ल-ए-'आतिफ़त (ظل عاطفت); **ज़िल्ल-ए-'इनायत** (ظل عنایت) पु. ('अ.) कृपाछत्र; दयेची सावली.

ज़िल्ल-ए-इलाही (ظل الٰہی) ('अ.) **ज़िल्ल-ए-ख़ुदा** (ظل خدا) पु. ('अ. + फ़ा.) (१) परमेश्वरी कृपाछत्र. (२) उत्तम राजा.

ज़िल्ल-ए-ज़मीन (ظل زمین) पु. ('अ. + फ़ा.) रात्र; निशा.

ज़िल्ल-ए-सुबहानी (ظل سبحانی); **ज़िल्ल-ए-हक़्क़** (ظل حق) पु. ('अ.) ईश्वराची सावली; ईश्वरी कृपा.

ज़िल्ल-ए-हुमा (ظل ھما) पु. ('अ. + फ़ा.) हुमा पक्ष्याची सावली. (ज्याच्या अंगावर ही सावली पडते तो राजा होतो).

ज़िल्लत (زلت) स्त्री. ('अ.) (१) घसरणे. (२) पातक; पाप. (३) चूक.

ज़िल्लत (ذلت) स्त्री. ('अ.) अपमान; तिरस्कार. **–आमेज़** (آمیز –) वि. ('अ.+फ़ा.) तिरस्कारयुक्त; अपमानजनक. **–उठाना** (اٹھانا –) अपमानित होणे; शर्मिंदा होणे.

ज़िल्ल'ल्लह (ظل اللہ); **ज़िल्ल-ए-अल्लह** (ظل اللہ) पु. ('अ.) (१) ईश्वरी छत्र; छाया. (२) उत्तम राज्यकर्ता.

जिल्वः (جلوہ) पाहा 'जल्वः' (शुद्ध उच्चार: 'जिल्वः').

जिवार (جوار) पु. ('अ.) (१) शेजार; जवळीक. (२) आसपास.

ज़िश्त (زشت) वि. (फ़ा.) निकृष्ट; वाईट; कुरूप. **–अ'अमाल** (اعمال –) वि. (फ़ा.+'अ.); **–कार** (کار –) वि. (फ़ा.) दुराचारी; बदचाल. **–ख़ू** (خو –) वि. (फ़ा.) (१) नीच प्रकृती; दुःशील; दुराचारी. (२) वाईट स्वभावाचा. **–रू** (رو –) वि. (फ़ा.) कुरूप. **–रू'ई** (روئی –) स्त्री. (फ़ा.) कुरूपता.

ज़िश्ती (زشتی) स्त्री. (फ़ा.) (१) निकृष्टता; नीचता. (२) कुरूपता.

जिस्म (جسم) पु. ('अ.) (१) शरीर; देह. (२) स्थूलपणा; लठ्ठपणा.

जिस्म-ए-ख़ाकी (جسم خاکی) पु. ('अ.+फ़ा.) मातीचे शरीर; मानवदेह; नश्वर शरीर

जिस्म-ए-जमादी (جسم جمادی) पु. ('अ.) जड शरीर. धातूचे शरीर; खनिज शरीर.

जिस्म-ए-जौहरी (جسم جوھری) मूलभूत वस्तू; अंगभूत भाग. [शरीर हे स्वयंभू आहे. त्याला 'जौहर' (جوھر) अशी संज्ञा आहे. रंगरूप हे शरीराधारित आहे. त्याला ''अर्द' (عرض) अशी संज्ञा आहे].

जिस्म-ए-त'अलीमी (جسم تعلیمی) पु. ('अ.) लांबी, रुंदी व खोली असलेली वस्तू.

जिस्म-ए-नबाताती (جسم نباتاتی) पु. ('अ.) उद्भिज शरीर.

जिस्म-ए-फ़ानी (جسم فانی) पु. ('अ.) नश्वर देह; नाशवंत शरीर.

जिस्म-ए-हैवानी (جسم حیوانی) पु. ('अ.) प्राणिशरीर; जीव-देह.

जिस्मानी (جسمانی); **जिस्मी** (جسمی) वि. ('अ.) शारीरिक; दैहिक.

जिस्र (جسر) पु. ('अ.) पूल; सेतू.

ज़िह (ہ) स्त्री. (फ़ा.) (१) धनुष्याची दोरी; टोक; प्रत्यंचा. (२) नाभी; बेंबी; गर्भ. (३) प्रसूती. (४) चांगल्या कृत्याचे फळ. (५) वीर्य; शुक्र; संतती **–गीर** (گیر –) स्त्री. (फ़ा.) बाण सोडताना

बोटात घालावयाचे टोपण; अंगुलित्राण. **दर्द-ए-ज़िह** (دردِ زہ) पु. (फ़ा.) प्रसूती वेदना.

ज़िहन (ذهن) पु. ('अ.) (१) बुद्धी; मेधा. (२) प्रतिभा. (३) स्मरणशक्ती. (४) दक्षता; हुशारी. **–नशीन** (نشین –) वि. ('अ.+फ़ा.) ठसलेला; मनात पक्का रुजलेला. **–नशी होना** (نشیں ہونا –) मनात ठसणे; लक्षात येणे. **–लड़ाना** (لڑانا –) डोके चालविणे; खूप विचार करणे.

ज़िहन-ए-रसा (ذهن رسا) पु. ('अ.+फ़ा.) एखादी गोष्ट चटकन समजून घेणारी बुद्धी.

ज़िहन-ए-सालेह (ذهن صالح) पु. ('अ.) बरे व वाईट यात विवेक करणारी बुद्धी; सद्सद्विवेक बुद्धी.

ज़िहनियत (ذهنیت) स्त्री. ('अ.) (१) प्रकृती; स्वभाव. (२) अंत:करण.

ज़िहनी (ذهنی) वि. ('अ.) हार्दिक; मानसिक.

ज़िहमत (زحمت) स्त्री. ('अ.) सडलेले मांस किंवा कुजलेली मासळी याची घाण; असह्य दुर्गंध.

जिहाज़ (جہاز) पु. ('अ.) (१) लग्नातील हुंडा; करणी. (२) पाथेय; प्रवासाची सामग्री. (३) अंत्यक्रियेचे सामान.

जिहाद (جہاد) पु. ('अ.) धर्मासाठी विधर्मी लोकांशी लढणे; धर्मयुद्ध (विशेषत: मुसलमानांचे).

जिहाद-ए-अक्बर (جہاد اکبر) पु. ('अ.) मोठे धर्मयुद्ध; इंद्रियदमन.

जिहाद-ए-असग़र (جہاد اصغر) पु. ('अ.) लहान धर्मयुद्ध; बाह्य धर्मयुद्ध.

ज़िहाफ़ (زحاف) पु. ('अ.) उणीव; कमतरता; न्यून.

ज़िहाम (زحام) पु. ('अ.) (१) गर्दी; जनसमुदाय. (२) आधिक्य.

ज़िहार (ظہار) पु. ('अ.) (१) सहायक व अनुकूल होणे. (२) पतीने पत्नीला 'तू मला आईसारखी आहेस,' असे म्हणणे. असे म्हटल्याने ती त्याची पत्नी रहात नाही व अशा प्रकारे त्याला घटस्फोट मिळतो.

ज़िहे (زہے) अव्य. (फ़ा.) छान! वाहवा! शाबास!

जिहेज़ (جہیز) पु. (फ़ा.) लग्नामध्ये वधूला देण्यात येणारे सामान व हुंडा; वधूच्या हक्काचा भाग; स्त्रीधन.

ज़ीं (زیں) स्त्री. [फ़ा. 'ज़ीन' (زین) चे संक्षिप्त.] जीन; खोगीर. (अव्य.) यामुळे; यायोगे.

ज़ी (ذی) उपसर्ग ('अ.) असणारा; बाळगणारा; 'वाला'; स्वामी. **–अक़्ल** (عقل –) वि. ('अ.) बुद्धिमान; हुशार. **–आबरू** (آبرو –) वि. ('अ.+फ़ा.) अब्रूदार; प्रतिष्ठित. **–इक़्तिदार** (اقتدار –) वि. ('अ.) सत्ताधारी; अधिकारी. **–इख़्तियार** (اختیار –) वि. ('अ.) अधिकार असलेला; स्वतंत्र. **–इस्ति'अदाद** (استعداد –) वि. ('अ.) योग्यता; विद्वत्ता असलेला. विद्वान; लायक. **–कमाल** (کمال –) वि. ('अ.) गुणवान; गुणी; कलावंत. **–ख़िरद** (خرد –) वि. ('अ.+फ़ा.) बुद्धिमान; शहाणा. **–जाह** (جاہ –) वि. ('अ.) उच्च पदस्थ; प्रतिष्ठित. **–फ़हम** (فہم –) वि. ('अ.) (१) बुद्धिमान; हुशार; प्रतिभावान. (२) दूरदर्शी. (३) समजूतदार. **–बाल** (بال –) वि. ('अ.+फ़ा.) (१) पंख असलेला; पक्षी. (२) प्रतिष्ठित. **–मर्तबत** (مرتبت –); **–रुत्ब:** (رتبہ –) वि. ('अ.) प्रतिष्ठित; उच्च पदस्थ. **–रूह** (روح –) वि. ('अ.) प्राणवान; प्राणी. **–वक़ार** (وقار –); **–वजाहत** (وجاہت –); **–शु'ऊर** (شعور –) वि. ('अ.) (१) सभ्य; सुसंस्कृत; विवेकी; शिष्टाचार पाळणारा. (२) हुशार. **–हक़्क़** (حق –) वि. ('अ.) हक्कदार; अधिकारी. **–हयात** (حیات –) वि. ('अ.) प्राणवान; प्राणी; जिवंत. **–हिस** (حس –) वि. ('अ.) (१) संवेदनशील. (२) ज्याला आपल्या गुणदोषांची जाणीव आहे असा. (३) स्वाभिमानी. **–हैसिय्यत** (حیثیت –) वि. ('अ.) (१) पत असलेला; प्रतिष्ठित; सामर्थ्यवान. (२) श्रीमंत. **–होश** (ہوش –) वि. ('अ.) (१) सावध; सावधान; हुशार. (२) दूरदर्शी.

ज़ीक़'अद: (ذی قعدہ) पु. ('अ.) अरबी वर्षाचा अकरावा महिना.

जीग़: (جیغہ) पु. (फ़ा.) पगडीचा तुरा; रत्नजडित आभूषण.

ज़ीज (ذیج) स्त्री. (फ़ा.) पंचांग.

ज़ीन (زین) पु. (फ़ा.) (१) खोगीर; जीन. (२) एक प्रकारचे जाड सुती कापड. **–पोश** (پوش –) पु. (फ़ा.) खोगीरावर घालावयाचे कापड. **–साज** (ساز –) पु. (फ़ा.) खोगीर बनविणारा; जिनगर.

ज़ीनत (زینت) स्त्री. ('अ.) (१) शोभा; श्री. (२) शृंगार; सजावट. **–कद:** (کدہ –) पु. ('अ.+फ़ा.) (१) शृंगारलेले, सजविलेले स्थान, घर वगैरे. (२) प्रेयसीचे निवासस्थान. **–दिह** (دہ –) वि. ('अ.+फ़ा.) शोभा वाढविणारा; सुशोभित करणारा.

ज़ीनत-ए-आग़ोश (زینت آغوش) स्त्री. ('अ.+फ़ा.) मांडीवर बसलेला; मांडी सुशोभित करणारा.

ज़ीनत-ए-बज़्म (زینت بزم) स्त्री. ('अ.+फ़ा.) **ज़ीनत-ए-मेहफ़िल** (زینت محفل) स्त्री. ('अ.) सभेची शोभा; मैफलीची शोभा वाढविणारा.

ज़ीनः (زینہ) पु. (फ़ा.) (१) पायरी. (२) जिना. (३) शिडी.

ज़ीफ़ः (جیفہ) पु. ('अ.) मृत पशू; मरून सडत असलेले जनावर. **–ख़्वार** (–خوار) वि. ('अ.) मृत पशूचे मांस खाणारा.

ज़ीबक़ (زیبق) पु. ('अ.) पारा.

ज़ीर (زیر) पु. स्त्री. (फ़ा.) हलका आवाज; खालचा स्वर.

ज़ीर-ओ-बम (زیر و بم) पु. (फ़ा.) स्वरांचा चढ-उतार; सप्त सूर.

ज़ीरक (زیرک) वि. (फ़ा.) (१) प्रवीण; प्रतिभाशाली. (२) चतुर; समजूतदार.

ज़ीरः (ہزیرہ) पु. (फ़ा.) जिरे.

जीवः (ہجیوہ) पु. (फ़ा.) पारा.

ज़ीस्त (زیست) स्त्री. (फ़ा.) जीवन; अस्तित्व.

गर ज़ीस्तमें फ़ाक़ः हो तो ग़म को'ई न. खा'ए।
और वक़्त-ए-मुसीबत में को'ई पास न. आ'ए ।।

यूँ प्यास में ला कर को'ई पानी न. पिला'ए।
और ब'अद-ए-फ़ना फ़ातिहः शर्बत पि. दिला'ए ।।

जुंद (جند) पु. ('अ.) सैन्य; लढकर; फौज.

जुंदी (جندی) पु. ('अ.) सैनिक; शिपाई. (वि.) लढकरी.

जुंबां (جنباں) वि. (फ़ा.) कंपायमान; हलणारा. (प्रत्य.) हलविणारा. [उदा.'सिलसिलः-ए-जुंबां' (سلسلہ جنباں) साखळी हलविणारा].

जुंबिश (جنبش) स्त्री. (फ़ा.) (१) कंप; कंपन. (२) गती; हालचाल.

जुंबीदः (ہجنبیدہ) वि. (फ़ा.) हललेला; कंपित.

जु'अमा (زعما) पु. [अ. 'ज'ईम' (زعیم) चे अनेक.] नेते; पुढारी.

जु'अमा-ए-मिल्लत (زعماے ملت) पु. ('अ.) राष्ट्राचे पुढारी; जमातीचे नेते.

जु'आफ़ (زعاف) वि. पु. ('अ.) हालाहल; भयंकर (विष); प्राणघातक.

ज़ुका (ذکا) स्त्री. ('अ.) सूर्य; प्रभात; प्रातःकाल.

ज़ुका (ذکی) वि. ('अ.) ज्याच्याजवळ पुष्कळ चांदी आहे असा; श्रीमंत; भांडवलदार.

ज़ुकाम (زکام) पु. ('अ.) पडसे; सर्दी.

ज़ुग़ाल (زغال); **ज़ुग़ाल** (زغال) पु. (फ़ा.) कोळसा.

ज़ुग़ात (جغرات) पु. (फ़ा.) दही.

ज़ुग़्राफ़ियः (جغرافیہ) पु. ('अ.) भूगोल; भूगोल विज्ञान. **–दाँ** (–داں) वि. ('अ.+फ़ा.) भूगोलज्ञ. **–नवीस** (–نویس) वि. ('अ.+फ़ा.) भूगोल लेखक.

जुज़ (جز) पु. [अ. 'जुज़्व' (جزو) चे संक्षिप्त.] (१) खेड; भाग; तुकडा. (२) ग्रंथाचा भाग; अध्याय; प्रकरण. (३) पुस्तकाचा फॉर्म (१६ किंवा ८ पानांचा). (४) अवयव; अंग. (अव्य.) शिवाय; अतिरिक्त; खेरीज. (वि.) अपूर्ण; कमी. **–दान** (–دان) पु. ('अ.+फ़ा.) मुलांचे दप्तर; पुस्तकाची पिशवी; जुगदान. **–बंदी** (–بندی) स्त्री. ('अ.+फ़ा.) पुस्तकाच्या बांधणीमध्ये प्रत्येक फॉर्मची स्वतंत्र शिलाई; सेक्शन शिलाई. **–रस** (–رس) वि. ('अ.+फ़ा.) (१) काटकसरी. (२) कंजूप.

जुज़-अल्-क'अब (جزا لکعب) पु. ('अ.) घनमूळ.

जुजाज (زجاج) पु. ('अ.) काच.

जुज़ाम (جزام) पु. ('अ.) कुष्ठ; महारोग.

जुज़्'इयात (جزئیات) पु. ('अ.) (१) एखाद्या गोष्टीच्या सर्व बाजू, पैलू. (२) लहानसहान; बारीकसारीक गोष्टी.

जुज़्व (جزو) पु. ('अ.) (१) अंश. (२) भाग. (३) फॉर्म. (४) अवयव. पाहा 'जुज़'.

जुज़्वी (جزوی) वि. ('अ.) आंशिक; थोडासा; अल्प; जुजबी.

जुदा (جدا) वि. (फ़ा.) (१) वेगळा; विभक्त; पृथक; अलग. (२) भिन्न; अन्य. (३) विरहग्रस्त; वियुक्त. **–'ई** (–ئی) स्त्री. (फ़ा.) (१) वियोग; विरह. (२) पृथकत्व. (३) वैमनस्य. **–गानः** (–گانہ) वि. (फ़ा.) वेगळा; स्वतंत्र; विभक्त. (अव्य.) अलगपणे; विभक्तपणे.

जुद्दी (جدی) पु. ('अ.) उत्तर ध्रुव; उत्तर ध्रुवाजवळील तारा.

जुद्री (جدری) स्त्री. ('अ.) देवी (रोग) ['जुद्र' (جدر) म्हणजे जखमेची खूण; यावरून हा शब्द बनला आहे].

जुनूं (جنوں) पु. [अ. जुनून (جنون) चे संक्षिप्त.] वेड; चळ; उन्माद. **–अंगेज़** (–انگیز) वि. ('अ.+फ़ा.) वेड, उन्माद वाढविणारा. **–ख़ेज़** (–خیز) वि. ('अ.+फ़ा.) वेड निर्माण करणारा; उन्मादोत्पादक **–जौलाँ** (–جولاں) वि. ('अ.+फ़ा.) तीव्र उन्मादक; वेड वाढविणारा.

जुनून (جنون) पु. ('अ.) (१) वेड; खूळ; चळ; उन्माद. (२) प्रेम. (३) क्रोध. (४) नाद; छंद.

जुनून-ए-'इश्क़ (جنون عشق) पु. ('अ.) प्रणयोन्माद; प्रीतीची मस्ती.

सुन ऐ जुनून-ए-'इश्क़ तुझे इसमें क्या मिला :
बरसों जो कोह-ओ-दश्त घुमाया किया मुझे ।।

जुन्नार (زنار) पु. ('अ.) यज्ञोपवीत; जानवे. **–गुसिस्तः** (–گسستہ) वि. ('अ.+फ़ा.) ज्याने जानवे तोडून टाकले आहे असा, धर्मभ्रष्ट हिंदू (ब्राह्मण). **–दार** (–دار); **–पोश** (–پوش); **–बंद** (–بند) वि. ('अ.+फ़ा.) जानवे घालणारा; हिंदू; ब्राह्मण.

ज़ु'न्-नून (ذوالنون) पु. ('अ.) हजरत युनूस यांचे नाव किंवा विशेषण. ['नून' (نون) मासा. युनूसना माशाने गिळले होते].

जुफ़्त (جفت) पु. (फ़ा.) (१) जोडी; युगुल; युग्म; जोडा. (२)पादुका; वाहणा; जोडे. (३) सम संख्या. (४) जोडीदार. **–क** (–ک) पु. (फ़ा.) चक्रवाक पक्ष्यांचा जोडा. **–फ़रोश** (–فروش) वि. (फ़ा.) पादत्राणे विकणारा. **–साज़** (–ساز) वि. (फ़ा.) पादत्राणे तयार करणारा.

जुफ़्ती (جفتی) स्त्री. (फ़ा.) पशुपक्ष्यांची संभोग क्रिया; जुगणे.

ज़ुफ़्र (ظفر) पु. ('अ.) नख.

ज़ुबानः (زبانہ) स्त्री. (फ़ा.) विशाखा (नक्षत्र).

ज़ुब्द (زبد); **ज़ुब्दः** (زبدہ) पु. ('अ.) (१) सार; मख्ख. (२) लोणी; नवनीत. (वि.) सर्वश्रेष्ठ; शिरोमणी.

ज़ुब्बः (جبہ) पु. ('अ.) लांब अंगरखा; पायघोळ सदरा; झब्बा; गाऊन. **–पोश** (–پوش) वि. ('अ.+फ़ा.) पायघोळ सदरा किंवा झगा घातलेला.

ज़ुब्र (زبر) पु. ('अ.) पूर्वा (नक्षत्र); पूर्वा फाल्गुनी.

जुम'अरात (جمعرات) स्त्री. ('अ.+हि.) गुरुवार. [शुक्रवारची रात्र. चांद्रमास सूर्यास्तापासून सुरू होतो. त्यामुळे सौरमासातील गुरुवारची रात्र सुरू होताच चांद्रमासातील शुक्रवार सुरू होतो. हा शब्द फक्त हिंदुस्थानात चालतो. याच्यासाठी फारसी शब्द 'पंज शंबः' (پنج شنبہ)].

जुम्'अः (جمعہ) पु. ('अ.) शुक्रवार. ['जम'अ' (جمع) पासून बनलेला शब्द. या दिवशी सारे मुसलमान मशिदीत नमाजासाठी गोळा होतात त्यावरून हा शब्द बनला आहे].

जुमरः (زمرہ) पु. ('अ.) (१) गर्दी; समुदाय. (२) दल; सैन्य; पक्ष.

जुमल (جمل) वि. ('अ.) (१) सुंदर; देखणा. (२) सुस्वभावी; सच्छील.

जुमल (جمل) पु. ('अ.) अरबी वर्णमाला; वर्णमालेतील अक्षरांचा हिशेब; संख्या मूल्य. पाहा 'अबजद'.

जुमलगी (جملگی) स्त्री. ('अ.+फ़ा.) संपूर्णता; सर्वत्व; समस्तपणा.

जुमादी (جمادی) पु. ('अ.) (१) अरबी वर्षाचे दोन महिने. (२) अश्रू नसलेले, कोरडे डोळे.

जुमादी-उल्-उख़्रा (جمادی الاخری) पु. ('अ.) अरबी वर्षाचा सहावा महिना. ['जुमादी-उल्-आखिर' (جمادی الآخر) हे द्विनाव प्रचलित आहे].

जुमादी-उल्-ऊला (جمادی الاولیٰ) पु. ('अ.) अरबी वर्षाचा पाचवा महिना. ['जुमादी-उल्-अव्वल' (جمادی الاول) हे द्विनाव प्रचलित आहे].

जुमान (جمان) पु. ('अ.) (१) मोती. (२) मोत्याच्या आकाराची चांदीची बटणे (गुंडया).

जुमु'अः (جمعہ) पु. ('अ.) शुक्रवार.

जुमुर्रुद (زمرد) पु. (फ़ा.) पन्ना; पाचू (रत्न).

जुमूद (جمود) पु. ('अ.) (१) थिजणे; गोठणे (पाणी वगैरे). (२) जडता; स्थिरता; पेचप्रसंग (३) खिन्नता; निराशा.

जुम्जुमः (جمجمہ) पु. ('अ.) कवटी; डोके.

जुम्लगी (جملگی) पाहा 'जुमलगी'.

जुम्लः (جملہ) पु. ('अ.) (१) वाक्य; वाक्यांश; शब्दसमूह. (२) एकूण वेरीज. (वि.) एकूण; सर्व. **–हक़ूक़** (–حقوق) पु. ('अ.) सर्व हक्क; सर्वाधिकार. **फ़ि'ल्-जुम्लः** (فی الجملہ) अव्य. ('अ.) एकूण; सारांश. **मिन्-जुम्लः** (من جملہ) अव्य. ('अ.) संपूर्णतून; सर्वांतून; सर्वांपैकी.

जुम्लः-ए-इन्शा'इयः (جملۂ انشائیہ); **जुम्लः-ए-इस्मियः** (جملۂ اسمیہ); **जुम्लः-ए-खबरियः** (جملۂ خبریہ) पु. ('अ.) क्रियापद नसलेले वाक्य; नामात्मक वाक्य.

जुम्लः-ए-इस्तिफ़हामियः (جملۂ استفہامیہ) पु. ('अ.) प्रश्नार्थक वाक्य.

जुम्लः-ए-मु'अतरिदः (جملۂ معترضہ) पु. ('अ.) मूळ विषयाशी संबंधित नसलेले वाक्य.

जुम्हूर (جمہور) पु. ('अ.) (१) जनता; सामान्य लोक. (२) रेतीचा ढीग; समूह.

जुम्हूर-ए-अनाम (جمہور انام) पु. ('अ.) जनता; सर्वसामान्य लोक.

जुम्हूरियत (جمہوریت) स्त्री. ('अ.) लोकशाही गणतंत्र.

जुम्हूरी (جمہوری) वि. ('अ.) (१) लोकशाही पद्धतीचा. जनतांत्रिक. (२) सार्वजनिक.

ज़ुरफ़ा (ظرفا) पु. ['अ. 'ज़रीफ़' (ظریف) चे अनेक.] थट्टेखोर माणसे; विनोदी लोक.

जुराफ़ (زراف); **जुराफ़ः** (زرافہ) पु. ('अ.) जिराफ (प्राणी).

ज़र्फ़ (ظروف) पु. ['अ. 'ज़र्फ़' (ظرف) चे अनेक.] भांडी.

जु'अंत (جرأت) स्त्री. ('अ.) (१) साहस; हिम्मत. (२) उत्साह. (३) धाष्टर्य; धृष्टता; अगाऊपणा. **–अफ़्ज़ा** (افزا –) वि. ('अ.+फ़ा.) साहसवर्धक; उत्साहवर्धक. **–आज़मा** (آزما –) वि. ('अ.+फ़ा.) धैर्याची परीक्षा पाहाणारा. **–मंद** (مند –) वि. ('अ.+फ़ा.) उत्साही; धाडसी.

जु'अ्फ़ः (جرعہ) पु. ('अ.) घोट (पाण्याचा वगैरे). **–कश** (کش –); **–नोश** (نوش –) वि. ('अ.+फ़ा.) (१) घोटघोट पिणारा. (२) मदिरापान करणारा.

जुर्म (جرم) पु. ('अ.) (१)अपराध; गुन्हा. (२)आरोप. **–का मुर्तकिब होना** (کا مرتکب ہونا –) गुन्हा करणे; गुन्हा घडणे. **–ना कर्दः** (ناکردہ –) वि. ('अ.+फ़ा.) निरपराधी.

जुर्मानः (جرمانہ) पु. (फ़ा.) दंडाची शिक्षा; आर्थिक दंड.

जुर्राब (جراب) पु. ('अ.) पायमोजा.

जुर्रियत (ذریت) स्त्री. ('अ.) मुलेबाळे; संतती.

जुर्रः (جرہ) पु. (फ़ा.) बहिरीससाणा.

जुह्र (جرح) पु. ('अ.) जखम; क्षत.

ज़ुलमात (ظلمات) पु. ['अ. 'ज़ुल्मत' (ظلمت) चे अनेक.] अंधार; काळोख.

जुलाल (ذلال) पु. ('अ.) स्वच्छ व थंड पाणी; निथळलेले, निर्मळ पाणी.

जुलाहा (جلاہا) पु. (फ़ा.+हिं.) विणकर; कोष्टी; साळी.

जुलूस (جلوس) पु. ('अ.) (१) बसणे; राज्यावर बसणे; राज्याभिषेक. (२) समारंभ; मिरवणूक; वरात; स्वारी.

जुलैखा (زلیخا) स्त्री. ('अ.) ईजिप्तचा बादशहा ''अजीज' याची पत्नी. ही हजरत यूसुफ यांच्यावर मोहित झाली होती.

जु'ल्-क़र्नैन (ذوالقرنین) पु. ('अ.) (१) सम्राट शिकंदर (अलेक्झांडर) याचा खिताब. त्याच्या दोन्ही खांद्यांवर त्याच्या डोकीचे केस रुळत असत. (२) दोन शिंगे (पूर्व व पश्चिम) असलेला.

जु'ल्-जनाह् (ذوالجناح) पु. ('अ.) हजरत शिकंदर इमाम हुसेन यांचा घोडा. हा अत्यंत वेगवान होता. यामुळे याला 'पंख असलेला घोडा' अशी संज्ञा मिळालेली होती.

जु'ल्-जलाल (ذوالجلال) पु. ('अ.) तेजस्वी; प्रतापी; परमेश्वर.

जु'ल्-फ़क़ार (ذوالفقار) स्त्री. ('अ.) हजरत अली यांना बद्राच्या युद्धात हजरत मुहम्मद यांच्याकडून मिळालेली दुधारी तलवार.

जु'ल्-फ़ुनून (ذوالفنون) वि. ('अ.) हरहुन्नरी; गुणवान.

जु'ल्-मिनन (ذوالمنن) वि. ('अ.) पुष्कळ वैभवे देणारा; ईश्वर.

जुल्फ़ (زلف) स्त्री. (फ़ा.) (१) डोकीचे लांबसडक केस; केशपाश. (२) केसाची बट; कुरळे केस. (३) कानावरील केस; झुलूप. **–बदोश** (بدوش –) वि. (फ़ा.) खांद्यावर केस रुळत असलेला (ली).

जुल्फ़-ए-दराज़ (زلف دراز) स्त्री. (फ़ा.) लांबसडक केस.

जुल्फ़-ए-परीशाँ (زلف پریشان) स्त्री. (फ़ा.) विसकटलेले केस; झिंजा.

जुल्फ़-ए-पुरख़म (زلف پرخم) स्त्री. (फ़ा.) कुरळे केस.

जुल्फ़-ए-बरहम (زلف برہم) स्त्री. (फ़ा.) विसकटलेले केस; अस्ताव्यस्त केस.

जुल्फ़-ए-रसा (زلف رسا) स्त्री. (फ़ा.) कंबरेपर्यंत पोचणारे लांब केस.

जुल्फ़ैन (زلفین) स्त्री. (फ़ा.) शृंखला; साखळी.

ज़ुल्म (ظلم) पु. ('अ.) जुलूम; अत्याचार; अन्याय; हिंसा; संकट; बलात्कार. **–गुदाज़** (گداز –) वि. ('अ.+फ़ा.) अन्याय नष्ट करणारा. **–तीनत** (طینت –) वि. ('अ.) अत्याचारी स्वभावाचा. **–दोस्त** (دوست –) वि. ('अ.+फ़ा.) अन्यायप्रिय. **–पर्वर** (پرور –) वि. ('अ.+फ़ा.) जुलमी; अन्यायाला प्रोत्साहन देणारा. **–पेशः** (پیشہ –) वि. ('अ.+फ़ा.) घंदेबाईक अत्याचारी. **–रसीदः** (رسیدہ –) वि. ('अ.+फ़ा.) अत्याचार पीडित. **–शि'आर** (شعار –) वि. ('अ.) स्वभावतः जुलूम करणारा.

ज़ुल्मत (ظلمت) स्त्री. ('अ.) अंधार; काळोख. **–आबाद** (آباد –) पु. ('अ.+फ़ा.) अत्यंत काळोखी जागा; जग. **–कदः** (کدہ –) पु. ('अ.+फ़ा.) अंधाराचे माहेरघर; जग; इहलोक.

ज़ुल्मात (ظلمات) स्त्री. ['अ. 'ज़ुल्मत' (ظلمت) चे अनेक.] (१) अनेक काळोख; दाट अंधकार. (२) अमृत कुंडापर्यंत जाताना शिकंदराला लागलेला दाट काळोख. (३) अमृत कुंडाजवळ असलेला दाट अंधार.

जुल्लाब (جلاب) पु. ('अ.) रेचक; जुलाबाचे औषध.

जुवार (جوار) पु. ('अ.) शेजार; आसपास; सभोवार.

जुशा (جشا) पु. ('अ.) ढेकर; उद्गार.

जुस्त (جست); जुस्तजू (جستجو); जुस्त-ओ-जू (جست و جو) स्त्री. (फ़ा.) शोध; तपास; हुडकून काढण्याची धडपड.

जुस्सः (جثہ) पु. ('अ.) देह; शरीर.

जुहद (زهد) पु. ('अ.) संयम; इंद्रियनिग्रह; विरक्ती. –शि'आर (شعار –) वि. ('अ.) संयमी; विरक्त; जितेंद्रिय.

जुहद (جهد) पु. ('अ.) (१) सामर्थ्य; पराक्रम. (२) प्रयत्न; धडपड.

ज़ुहर (ظهر) स्त्री. ('अ.) दुपारी सूर्य पश्चिमेकडे कलल्यानंतरची वेळ; दुपारी बारा वाजल्यानंतरचा समय; दुपारच्या नमाजाची वेळ.

जुहरः (زهره) स्त्री. ('अ.) (१) शुक्र (ग्रह). (२) रती; सुंदर स्त्री. –जबीं (جبیں –) वि. ('अ. + फ़ा.) ज्याचे ललाट उज्वल आहे असा, (अशी) सुंदरी; चंद्रमुखी. –नवा (نوا –) वि. ('अ.+फ़ा.)अत्यंत सुंदर व मधुर आवाजाचा(ची). –रुख़ (رخ –) वि. ('अ. + फ़ा.) –शमा'इल (شمائل –) वि. ('अ.) सुंदर; चंद्रमुखी; सुंदरी.

जुहल (زحل) पु. ('अ.) शनी (ग्रह).

जुहला (جهلا) पु. ['अ. 'जाहिल' (جاهل) चे अनेक.] अडाणी लोक; असंस्कृत लोक.

जुहाद (زهاد) पु. ['अ. 'जाहिद' (زاهد) चे अनेक.] कर्मठ लोक; रुक्ष वृत्तीचे लोक; तपस्या करणारे.

ज़ुहूक़ (زهوق) पु. ('अ.) विनाश.

ज़ुहूर (ظهور) पु. ('अ.) (१) जाहीर होणे; प्राकट्य; आविर्भाव; अवतार. (२) उत्पत्ती; निर्मिती.

ज़ुहूल (ذهول) पु. ('अ.) विस्मरण; गफलत.

ज़ू (ذو) उपसर्ग ('अ.)(१) मालक. (२) परमेश्वर. (३) असणारा; बाळगणारा; 'वाला'. [उदा. 'ज़ूज़नब' (ذو ذنب) शेपूट असणारा; सपुच्छ.] या उपसर्गानंतर 'अल' (ال) हा अरबी षष्ठीचा प्रत्यय आल्यास अनेकदा हा ऱ्हस्व बनतो. यामुळे असे अनेक शब्द 'ज़ुल्' मध्ये सापडतील. 'ज़ु'ल्ज़लाल', 'ज़ु'ल्फ़िकार' वगैरे. –इद्'आफ़ (اضعاف –) पु. ('अ.) दुपटभाजक. –अद्'आफ़-ए-अक़ल (اضعاف اقل –) पु. ('अ.) लघुत्तम साधारण विभाज्य. –जसदैन (جسدین –) वि. ('अ.) (१) दोन शरीरे असलेला. (२) मिथुन राशीचा. (३) बुध (ग्रह). –ज़ुनाबः (ذنابہ –) पु. ('अ.) ज्याचे पुच्छ पूर्वेला आहे असा तारा. –ज़ुवाबः (ذوابہ –) पु. ('अ.) ज्याचे पुच्छ पश्चिमेकडे आहे असा तारा. –नाब (ناب –) पु. ('अ.) हिंस्र श्वापद (नाब पुढचे मोठे दात). –फ़ुनून (فنون –) वि. ('अ.) बहुगुणी; कलावंत. –म'अनीं (معنیٰ –); –म'अनी (معنی –) वि. ('अ.) द्वयर्थी शब्द; वाक्य किंवा कविता. –लुबाब (لباب –) वि. ('अ.) बुद्धिमान.

जू (جو) स्त्री. (फ़ा.) (१) नदी. (२) कालवा. (३) झरा. (४) जू (बैलाच्या मानेवरील).

जू-ए-ख़ूं (جوے خوں) स्त्री. (फ़ा.) रक्ताची नदी.

जू-ए-शीर (جوے شیر) स्त्री. (फ़ा.) दुधाचा कालवा. (शीरीनसाठी फ़रहादने हा कालवा खोदला होता).

जू'अ (جوع) स्त्री. ('अ.) भूक; क्षुधा; बुभुक्षा. –उल्-अर्द (الارض –) स्त्री. ('अ.) भूमीची भूक; राज्यविस्तार करण्याची हाव. –उल्-कल्ब (الکلب –) स्त्री. ('अ.) पोट भरलेले असताही भूक लागल्याची भावना ज्यात होते असा एक रोग. –उल्-बक़र (البقر –) स्त्री. ('अ.) बैलाची भूक; कितीही खाल्ले तरी ज्यात भूक कमी होत नाही असा एक रोग.

जू'ई (جوئی) स्त्री. [फ़ा. 'जू'ईदन' (جوئیدن) धुंडणे; शोधणे; पाहणे.] धुंडण्याची क्रिया.

जूक़ (جوق) स्त्री. (तु.) समूह; गर्दी; झुंड. –दर जूक़ (در جوق –) वि. (तु. + फ़ा.) झुंडीच्या झुंडी.

जूद (جود) पु. ('अ.) दानशूरता.

जूद (زود) अव्य.(फ़ा.)त्वरित; ताबडतोब; लागलीच; लवकर. –असर (اثر –) वि. (फ़ा. + 'अ.) त्वरित परिणाम करणारे (औषध); प्रभावकारक. –आश्ना (آشنا –) वि. (फ़ा.) फार लवकर मिळून मिसळून जाणारा; लवकर मैत्री होणारा. –ख़ेज़ (خیز –) वि. (फ़ा.) चपळ. –गो (گو –) वि. (फ़ा.) शीघ्रकवी; आशुकवी; आधी तयारी न करता व्याख्यान देऊ शकणारा. –गो'ई (گوئی –) स्त्री. (फ़ा.) शीघ्र कवित्व. –तर (تر –) वि. (फ़ा.) –नवीस (نویس –) वि. (फ़ा.) अतित्वरित लिहिणारा. –पशेमाँ (پشیماں –) वि. (फ़ा.)भरभर. (१) लाजाळू; लवकर लाजणारा. (२) आपल्या चुकीबद्दल लागलीच पस्तावणारा. –फ़हम (فہم –) वि. (फ़ा.+'अ.) चटकन समजणारा; शीघ्रबुद्धी. –बूद (بود –) वि. (फ़ा.) (१) अपार; अमर्याद; बेहद्द. (२) अनुचित. –रंज (رنج –) वि. (फ़ा.) (१) रागीट; शीघ्रकोपी. (२) संवेदनशील; शीघ्रदुःखी. –रफ़्तार (رفتار –) वि. (फ़ा.) भराभर चालणारा; शीघ्रगामी. –रस (رس –) वि. (फ़ा.)

एखाद्या गोष्टीच्या तळापर्यंत जाणारा; कुशाग्रबुद्धी. **–सेर** (سیر –) वि. (फ़ा.) त्वरित तृप्त होणारा. **–हदम** (هضم –) वि. (फ़ा.+'अ.) त्वरित पचणारा (पदार्थ).

ज़ूदी (زودی) स्त्री. (फ़ा.) शीघ्रता; त्वरितता; त्वरा.

ज़ूदी (جودی) पु. ('अ.) हजरत नूह (नोहा) यांची नौका प्रलयामध्ये येऊन थांबली होती तो पर्वत.

ज़ूर (زور) पु. (फ़ा.) कपट; फसवणूक.

ज़ूर-ओ-मक्र (زور و مکر) पु. (फ़ा.) फसवाफसवी; लबाडी.

ज़ूलाँ (جولاں); **ज़ूलान** (جولان) स्त्री. (फ़ा.) वेडी; शृंखला.

ज़ूलाह़ (جلاہ); **ज़ूलाहा** (جلاہا) पु. (फ़ा.) विणकर; कापटी.

जेब (جیب) स्त्री. ('अ.) (१) सदरा, खमीस वगैरेचा गळा. (२) सदऱ्याच्या गळ्याखाली लावण्यात येणारी पिशवी; खिसा. (हल्ली हा खिसा कोठेही लावला जातो). (३) हृदय; छाती.

जेब (جیب) स्त्री. ('अ.) खिसा. **–कट** (کٹ –); **–कतरा** (کترا –) वि. ('अ. + हि.) खिसेकापू. **–ख़र्च** (خرچ –) पु. ('अ. + फ़ा.) किरकोळ खर्चाकरिता असलेला पैसा; किरकोळ, वरकड खर्च. **–तराश** (تراش –) वि. ('अ.+फ़ा.) खिसेकापू.

जेब (زیب) स्त्री. (फ़ा.) शोभा; सौंदर्य; थाट; आराम. (वि.) (१) उपयुक्त. (२) शोभा वाढविणारा. **–देना** (دینا –) शोभणे; योग्य दिसणे.

जेब-ओ-ज़ीनत (زیب و زینت); **जेब-ओ-ज़िन** (زیب و زین) स्त्री. (फ़ा.+'अ.) शृंगार; सजावट; थाटमाट.

जेबा (زیبا) वि. (फ़ा.) (१) शोभणारे; योग्य दिसणारे. (२) सुंदर; मनोरम; आकर्षक; ललित. **–अंदाम** (اندام –) वि. (फ़ा.) सुंदर व डौलदार शरीर असलेला (ली). **–'इश** (ئش –); **–'ई** (ئی –) स्त्री. (फ़ा.) शोभा; शृंगार; सजावट. **–क़ामत** (قامت –) वि. (फ़ा. + 'अ.) सुडौल शरीराचा (ची) **–क़ामती** (قامتی –) वि. (फ़ा.+ 'अ.) शरीरसौष्ठव. **–त़ल'अत** (طلعت –) वि. (फ़ा.+'अ.) सुंदर मुख असलेला. **–रू** (رو –) वि. (फ़ा.) मोहक चेहऱ्याचा. **–शिमा'इल** (شمائل –) वि. (फ़ा.+'अ.) सुस्वभावी.

जेबी (جیبی) वि. ('अ.) खिशात ठेवता येण्यासारखा; लहानसर.

जेबीदः (زیبیدہ) वि. (फ़ा.) शोभिवंत; सुंदर.

ज़ेर (زیر) वि. (फ़ा.) (१) खालचा; हाताखालचा; आधीन. (२) दुर्बळ; निराधार; पराभूत. (अव्य.) खाली (पु.) (१) उर्दू लिपीतील 'इ' कार दर्शक चिन्ह (–). (२) खालच्या सप्तकातील सूर; खर्ज. **–अंदाज़** (انداز –); **–अफ़गन** (افگن –); **–चाक** (چاک –) वि. (फ़ा.) (१) ताबेदार; अधीन. (२) गुदमैथुन करविण्याचे व्यसन असलेला. **–जामः** (جامہ –) पु. (फ़ा.) (१) कमरेखाली नेसावयाचे वस्त्र; अधोवस्त्र. (२) घोडयाच्या पाठीवर जिनाखाली घालावयाचा कपडा. **–दस्त** (دست –) वि. (फ़ा.) (१) अधीन; पराजित; ताबेदार. (२) दुःखी. **–पा'ई** (پائی –) स्त्री. (फ़ा.) पादत्राण (विशेषतः स्लिपर) **–अफ़गन** (افگن –) पु. (फ़ा.) (१) सतरंजी; गादी. (२) भैरव राग. **–बंद** (بند –) पु. (फ़ा.) घोडयाच्या पोटापाठीवरून आवळावयाची कातडी वादी. **–बार** (بار –) वि. (फ़ा.) (१) ओझ्याखाली दबलेला; खर्चाने किंवा कर्जाने जेरीस आलेला. (२) कर्जदार; ऋणको. (३) आभारी; कृतज्ञ. **–बारी** (باری –) स्त्री. (फ़ा.) (१) ऋणभार; कर्जाचे ओझे. (२) कृतज्ञता.

ज़ेर-ए-असर (زیر اثر) वि. (फ़ा. + 'अ.) एखाद्याच्या प्रभावाखाली असलेला; आधीन.

ज़ेर-ए-आब (زیر آب) वि. (फ़ा.) पाण्याखाली बुडालेली (जमीन).

ज़ेर-ए-आस्माँ (زیر آسماں) अव्य. (फ़ा.) आकाशाखाली; सबंध जगात.

ज़ेर-ए-इस्ति'अमाल (زیر استعمال) वि. (फ़ा.+'अ.) वापरातील (वस्तू); घेतले जाणारे (औषध).

ज़ेर-ए-क़दम (زیر قدم) वि. (फ़ा.+'अ.) (१) पायाखालचा (रस्ता). (२) सुगम; सोपा.

ज़ेर-ए-ख़ाक (زیر خاک) वि. (फ़ा.) मातीखालचा. (अव्य.) थडग्यात; जमिनीखाली.

ज़ेर-ए-ग़ौर (زیر غور) वि. (फ़ा.+'अ.) विचाराधीन; ज्याच्यासंबंधी विचार चालू आहे असे (प्रकरण).

ज़ेर-ए-तज्वीज़ (زیر تجویز) वि. (फ़ा.+'अ.) ज्याच्या निर्णयासंबंधी विचार चालू आहे असा (विषय).

ज़ेर-ए-तन्क़ीद (زیر تنقید) वि. (फ़ा.+'अ.) ज्याच्यावर टीका लिहिली जात आहे असा (ग्रंथ).

ज़ेर-ए-तह़क़ीक़ात (زیر تحقیقات) वि. (फ़ा.+'अ.) ज्याचा तपास अथवा चौकशी चालू आहे असा (विषय).

ज़ेर-ए-त'अमीर (زیر تعمیر) वि. (फ़ा.+'अ.) ज्याचे बांधकाम चालू आहे असे (घर).

ज़ेर-ए-तालीफ़ (زیر تالیف) वि. (फ़ा.+'अ.) ज्याचे संपादन, लेखन चालू आहे असा (ग्रंथ, मासिक).

ज़ेर-ए-नगीं (زیر نگیں) वि. (फ़ा.) अधिपत्याखालील; जिंकलेला (प्रदेश).

जेर-ए-नाफ़ (زیر ناف) पु. (फ़ा.) बेंबीखालचा भाग; ओटीपोटी; उपस्थ.

जेर-ए-मश्क़ (زیر مشق) वि. (फ़ा.+'अ.) (१) ज्याच्यावर एखाद्या गोष्टीचा अभ्यास किंवा सराव केला जातो अशी (वस्तू). (२) ज्याला एखाद्याची सारी कामे नाइलाजाने करावी लागतात असा. (पु.) (१) लिहिण्याचा सराव करताना कागदाखाली घरावयाचा चामडघाचा तुकडा. (२) एखाद्या पुरुषाशी अनैसर्गिक संबंध असलेला मुलगा, छोकरा.

जेर-ए-रां (زیر ران) वि. (फ़ा.) मांडीखालचा (घोडा); ताठघातील.

जेर-ए-लब (زیر لب) वि. (फ़ा.) ओठातील; ओठाखालचा. (अव्य.) तोंडातल्या तोंडात; पुटपुटत; अस्पष्ट.

जेर-ए-सायः (زیر سایہ) वि. (फ़ा.) आश्रित. (अव्य.) आश्रयाखाली; कृपाछत्राखाली.

जेर-ए-हिरासत (زیر حراست) वि. (फ़ा.) कच्च्या कैदेतील; नजर कैदेतील.

जेर-ए-हुकूमत (زیر حکومت) वि. (फ़ा.) सत्तेखालील; अधिकारातील.

जेर-ओ-जबर (زیر و زبر); **जेर-ओ-बाला** (زیر و بالا) वि. (फ़ा.) उलटसुलट; वर-खाली; अस्ताव्यस्त.

जेरअंदाज़ (زیر انداز) पु. (फ़ा.) (१) एखाद्या वस्तूच्या सुरक्षिततेसाठी तिच्याखाली अंथरण्यात येणारे कापड; गालिचा; तरट. (२) हुक्क्याखाली घालण्यात येणारे कापड.

जेरा (زیرا) अव्य. (फ़ा.) (१) म्हणून; अशासाठी. (२) कशासाठी. **–कि.** (کہ –) अव्य. (फ़ा.) (३) अशासाठी की; यामुळे की.

जेराब (زیراب) स्त्री. (फ़ा.) (१) जमिनीखालून घातलेले पाण्याचे नळ. (२) जमिनीखालून वाहणारे गटार.

जेरीं (زیریں) वि. (फ़ा.) खालचा; निम्नगत.

जेवर (زیور) पु. (फ़ा.) दागिना; आभूषण; अलंकार.

जेवरात (زیورات) पु. [फ़ा. 'जेवर' (زیور) चे अनेक.] दागिने; भूषणे.

जेहन (ذهن) पु. ('अ.) (१) बुद्धी. (२) प्रतिभा. (३) स्मरणशक्ती. **–रसा** (رسا –) वि. ('अ.+फ़ा.) कुशाग्रबुद्धी; कोणत्याही गोष्टींच्या तळाशी जाणारा.

जेहनियत (ذهنیت) स्त्री. ('अ.) (१) स्वभाव. (२) प्रकृती. (३) धारणाशक्ती.

जैत (زیت); **ज़ैतून** (زیتون) पु. ('अ.) ऑलिव्हचे झाड, फळ अथवा तेल.

जैद (زید) पु. ('अ.) (१) काल्पनिक व्यक्तीचे नाव. (२) हजरत उमर यांचे टोपण नाव. (३) अधिक होणे, करणे.

जैदी (زیدی) वि. ('अ.) शिया पंथीयांच्या एका वंशातील.

जैन (زین) स्त्री. ('अ.) शोभा; सजावट; शृंगार.

जैनब (زینب) स्त्री. ('अ.) हजरत इमाम हुसैन यांची बहीण. हिने हुसैन साहेबांच्या बलिदानानंतर जुलमी 'यजीद' चे अत्याचार मोठघा शौर्याने उजेडात आणले होते.

ज़ैफ़ (زیف) पु. ('अ.) शिक्का किंवा मोहर यांचा खोटेपणा.

जैयद (جید) वि. ('अ.) (१) धुरंधर; प्रचंड; महान (विद्वान). (२) खरा. (३) सामर्थ्यवान.

ज़ैल (ذیل) पु. ('अ.) (१) खालचा भाग; कपडघाचा मागील सोगा; पदर. (२) पूरक भाग. **–दार** (دار –) पु. ('अ.+फ़ा.) महालकरी; काही गावांवरील सरकारी अधिकारी. **–में** (میں –) खाली; पुढे; पुढीलप्रमाणे. **हस्ब-ए-ज़ैल** (حسب ذیل) खालीलप्रमाणे.

जैश (جیش) पु. ('अ.) (१) सैन्य. (२) हृदयाचा आदेश.

जैहून (جیحون) पु. ('अ.) मध्य आशियातील 'बचख़' शहराजवळून वाहाणारी एक नदी.

ज़ो'अम (زعم) पु. ('अ.) (१) कल्पना; समजूत. (२) अहंकार; घमेंड.

ज़ो'अम-ए-बातिल (زعم باطل) पु. ('अ.) (१) चुकीची कल्पना; गैरसमजूत. (२) खोटा अहंकार.

जो'इंदः (جوئندہ) वि. (फ़ा.) शोधणारा; तपास करणारा; जिज्ञासू.

जो'ई (جوئی) स्त्री. [फ़ा. 'जो'ईदन' (جوئیدن) धुंडणे.] (१) शोधणे; शोधण्याची क्रिया. (२) सांत्वन.

जो'ईदः (جوئیدہ) वि. (फ़ा.) शोधलेला; शोधून काढलेला.

जोयां (جویاں) वि. (फ़ा.) शोधीत असलेला; धुंडीत असलेला.

जोया (جویا) वि. (फ़ा.) शोधणारा; धुंडणारा.

ज़ोर (زور) पु. (फ़ा.) (१) बळ; सामर्थ्य; जोर. (२) प्रयत्न; धडपड. (३) काबू; अधिकार; ताबा. (४) अत्याचार; जुलूम. (५) आश्रय; आधार. (६) प्रचंडता; प्रबलता; वेग. (७) दहशत; धाक. **–आज़मा** (آزما –) वि. (फ़ा.) सामर्थ्य आजमावून पाहाणारा; सामना करणारा; युद्ध करणारा; जोर दाखविणारा. **–आज़मा'ई** (آزمائی –) स्त्री. (फ़ा.) प्रतिकार; सामना; युद्ध; कुस्ती. **–आवर** (آور –) वि. (फ़ा.) शक्तिशाली; बलवान.

–दार (دار –) वि. (फ़ा.) (१) जोराचा. (२) प्रचंड. (३) महत्त्वाचा. (४) समर्थ. **–मंद** (مند –) वि. (फ़ा.) जोरदार; ताकदवान. **–शिकन** (شکن –) वि. (फ़ा.) बळ खच्ची करणारा; दमन करणारा.

ज़ोर-ए-बाज़ू (زور بازو) पु. (फ़ा.) बाहुबल.

ज़ोर-ओ-शोर (زور و شور) पु. (फ़ा.) (१) धामधूम; धूमधडाका. (२) कोलाहल. (३) उत्साह.

ज़ोरक़ (زورق) स्त्री. (फ़ा.) लहान नौका.

ज़ोरक़ी (زورقی) स्त्री. (फ़ा.) नावेच्या आकाराची टोपी. (ही टोपी फकीर घालतात).

जोल (جول) पु. (फ़ा.) जंगल; अरण्य.

जोलः (جولہ) वि. (फ़ा.) विसकटलेला; अस्ताव्यस्त.

जोश (جوش) पु. (फ़ा.) (१) आवेश; उत्साह; जोम. (२) मनोवेग; मनाची अस्वस्थता. (३) उकळी; उसळी. (४) क्रोध. (५) तीव्रता. (६) चिथावणी. **–खाना** (کھانا –) उकळणे; कढ येणे; उकळी येणे; उसळी मारणे. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) उकळणारा. **–ज़नी** (زنی –) स्त्री. (फ़ा.) **–देना** (دینا –) उकळणे; कढ देणे.

जोश-ए-अश्क (جوش اشک) पु. (फ़ा.) अश्रूंचा आवेग; रुदनाचा जोर.

जोश-ए-'इश्क़ (جوش عشق) पु. (फ़ा.+'अ.) प्रीतीचा आवेश; प्रणयोन्माद.

जोश-ए-ख़ूं (جوش خوں) पु. (फ़ा.) (१) रक्तवाहुल्य. (२) आपल्या घराविषयीचे प्रेम; रक्ताचे प्रेम. (३) रक्तदोष.

जोश-ए-ग़ज़ब (جوش غضب); **जोश-ए-ग़ैज़** (جوش غیظ) पु. (फ़ा.+'अ.) क्रोधावेश; घुस्सा; रागाचा सपाटा.

जोश-ए-जवानी (جوش جوانی) पु. (फ़ा.) तारुण्याचा आवेश, उत्साह; तारुण्योन्माद.

जोश-ए-जुनूं (جوش جنوں) पु. (फ़ा.+'अ.) वेडाचा झटका; आवेग.

जोश-ओ ख़रोश (جوش و خروش) पु. (फ़ा.) (१) उत्साह; आवेश. (२) धामधूम.

जोशन (جوشن) पु. (फ़ा.) (१) कवच; चिलखत. (२) बाजूबंद. **–बंद** (بند –) चिलखत धारण करणारा; कवचधारी.

जोशाँ (جوشاں) वि. (फ़ा.) उकळणारा; उकळत असलेला.

जोशांदः (جوشاندہ) पु. (फ़ा.) काढा (वनस्पतीचा) पडशासाठी घेतला जाणारा काढा; कषाय.

जोशानीदः (جوشانیدہ) वि. (फ़ा.) उकळलेला; आटवलेला.

जोशिश (جوشش) स्त्री. (फ़ा.) (१) उकळी. (२) तीव्रता; जोर.

जोशिश-ए-दहन (جوشش دہن) स्त्री. (फ़ा.) तोंड येणे (आजार); तोंडाचा फोड येणे.

जोशीदः (جوشیدہ) वि. (फ़ा.) उकळलेला; आटवलेला

जौ (جو) पु. (फ़ा.) यव; जव; सातू; खपली गहू. **–ब.जौ** (بہ جو –) वि. (फ़ा.) संपूर्ण. **–भर** (بھر –) (१) तिळभर; थोडेसे. (२) मुळीच. [म्हण : **इन'आम सौ सौ का हिसाब जौ जौ का** (انعام سو سو کا حساب جو جو کا) देणग्या किंवा बक्षिसे वाटेल तेवढी मोठी देण्यास हरकत नाही, परंतु त्यांच्या पैन् पैचा हिशेब मात्र ठेवला पाहिजे].

जौ'अ (جوع) स्त्री. ('अ.) भूक; क्षुधा.

जौ'अ-उल्-कल्ब (جوع الکلب) वि. ('अ.) खादाड; अघाशी; बखवखलेला.

जौ'आन (جوعان) वि. ('अ.) उपाशी; भुकेलेला.

जौक़ (جوق) पु. ('अ.) (१) जनसमूह; गर्दी. (२) सैन्य; लढकर.

ज़ौक़ (ذوق) पु. ('अ.) (१) स्वाद; चव; मजा; रसानुभव. (२) षोक; रसिकता. (३) अभिरुची. **–आफ़रीं** (آفریں –) वि. ('अ.+फ़ा.) रस; आवड, षोक निर्माण करणारा. **–से** (سے –) मजेत; आनंदाने.

ज़ौक़-ए-शे'अर (ذوق شعر) पु. ('अ.) काव्य रसिकता; कविता प्रेम.

ज़ौक़-ए-सलीम (ذوق سلیم) पु. ('अ.) उच्च अभिरुची; शुद्ध रसिकता.

ज़ौक़-ए-सुख़न (ذوق سخن) पु. ('अ.+फ़ा.) काव्य रसिकता; कवितेची आवड.

ज़ौक़-ओ-शौक़ (ذوق و شوق) पु. ('अ.) रसिकता; षोक.

जौकोब (جوکوب) वि. (फ़ा.) भरडलेला; भरड; जाड दळलेला.

ज़ौज (زوج) पु. ('अ.) (१) पती; स्वामी. (२) जोडी; जोडपे; जोडा. (३) समसंख्या.

जौज़ (جوز) पु. ('अ.) (१) अक्रोड (फळ). (२) जायफळ. (३) नारळ; खोबरे.

जौज़-ए-बोयः (جوز بویہ) पु. ('अ.+फ़ा.) जायफळ.

जौज़-ए-मासल (جوز مائل) पु. ('अ.) धोत्रा (वनस्पती).

जौज़न (جوزن) पु. (फ़ा.) जादूगार.

जौज़ा (جوزا) पु. ('अ.) मिथुन (राशी).

जौजियत (زوجیت) स्त्री. ('अ.) (१) पती बनणे; पतित्व. (२) पत्नी बनणे; पत्नीत्व. **–में लाना** (– میں لانا) लग्न करणे.

जौजैन (زوجین) पु. ('अ.) पतिपत्नी; दंपती; नवराबायको.

जौजः (زوجہ) स्त्री. ('अ.) धर्मपत्नी; बायको.

जौजः-ए-सानी (زوجۂ ثانی) स्त्री. ('अ.) दुसरी बायको; द्वितीय भार्या.

जौद (جود) पु. ('अ.) (१) चांगुलपणा; चांगल्या गोष्टी. (२) शौर्य. (३) खूप जोराचा पाऊस. (वि.) चांगला; सच्छील.

जौदत (جودت) स्त्री. ('अ.) (१) चांगुलपणा; सच्छीलता. (२) उत्तमता. (३) बुद्धीची कुशाग्रता. (४) मनोरंजन.

जौफ़ (جوف) पु. ('अ.) (१) पोकळी. (२) खड्डा. (३) पोट.

जौर (جور) पु. ('अ.) जुलूम; अत्याचार.

जौरक़ (زورق) पु. ('अ.) होडी; लहान नौका; नाव.

जौरब (جورب) पु. ('अ.) पायमोजा; मोजा.

जौलाँ (جولاں); **जौलान** (جولان) पु. ('अ.) (१) घोडयाला फिरविणे; रपेट करविणे. (२) फिरणे; धावणे; फेऱ्या घालणे. **–गरी** (– گری) स्त्री. ('अ.+फ़ा.) जोरात धावणे. **–गाह** (– گاہ) स्त्री. ('अ.+फ़ा.) घोडे पळविण्याचे मैदान; रपेटीचे मैदान. (३) बेडी. **पाब.जौलाँ** (پابجولاں) वि. (फ़ा. + 'अ.) ज्याच्या पायांत बेडया आहेत असा; शृंखलाबद्ध.

जौलानी (جولانی) स्त्री. ('अ.) (१) घोडा. (२) मद्यचषक. (३) चपळता. (४) मानसिक उत्साह; हौस.

जौश (جوش) पु. ('अ.) (१) छाती; वक्षस्थळ. (२) मध्यरात्र.

जौशन (جوشن) पु. ('अ.) चिलखत; कवच.

जौसंग (جوسنگ) वि. (फ़ा.) एका जवाच्या वजनाइतकें (वजन).

जौसक़ (جوسق) पु. ('अ.) (१) प्रासाद; महाल. (२) आकाशातील बारा राशी.

जौहर (جوھر) पु. ['अ. फ़ारसी 'गौहर' (گوھر) मोती या शब्दाचे अरबी रूप.] (१) रत्न; जवाहीर; मोती. (२) सार; तत्त्व; सत्त्व. (३) गुण; वैशिष्ट्य (४) कला; हुन्नर. (५) धर्म. (६) चमक; पाणी (तलवारीचे). (७) रहस्य. (८) चलाखी; धूर्तता. (९) स्वयंभू; प्रमुख वस्तू. (शरीर हे 'जौहर' व त्याच्या अनुषंगाने असणारे रूप व रंग ही 'अरज' आहेत). (१०) तलवारीवरील किंवा पोलादावरील बारीक रेषा. त्यांच्यावरून त्या वस्तूंचा उत्कृष्टपणा दिसून येतो. **–खुलना** (– کھلنا) दोष किंवा अपराध उजेडात येणे. **–दार** (– دار) वि. ('अ.+फ़ा.) (१) गुणी. (२) पाणीदार (तलवार) **–नाशनास** (– ناشناس) वि. ('अ.+फ़ा.) गुणांची पारख नसणारा. **–शनास** (– شناس) वि. ('अ.+फ़ा.) रत्नपारखी; गुणग्राहक. **अहल-ए-जौहर** (اھل جوھر) गुणी माणसे.

जौहर-ए-अन्देशः (جوھر اندیشہ) पु. ('अ. + फ़ा.) कल्पनाशक्तीची सूक्ष्मता.

जौहर-ए-अव्वल (جوھر اول) पु. ('अ.) दहा देवदूतांपैकी पहिला; जिब्राईल; जिब्रील.

जौहर-ए-आ'ईनः (جوھر آئینہ) पु. ('अ.+फ़ा.) पोलादी आरशावरील त्याचा उत्कृष्टपणा दाखविणाऱ्या रेषा. (पूर्वी आरसा पोलादाचा बनवीत असत).

जौहर-ए-फ़र्द (جوھر فرد) पु. ('अ.) (१) ज्याचे तुकडे होऊ शकत नाहीत असा सूक्ष्म कण; परमाणू. (२) अद्वितीय पुरुष.

जौहर-ए-लतीफ़ (جوھر لطیف) पु. ('अ.) सत्त्व; मूलतत्त्व; खरे रत्न.

जौहर-ए-शम्शीर (جوھر شمشیر) पु. ('अ.+फ़ा.) तलवारीचा उत्कृष्टपणा दाखविणाऱ्या बारीक रेषा.

जौहरी (جوھری) पु. ('अ.) (१) रत्नपारखी. (२) जवाहिऱ्या; जडजवाहीर विकणारा.

क़द्र-ए-गौहर शाह दानद या बिदानद जौहरी।
क़द्र-ए-गुल बुलबुल बिदानद, क़द्र-ए-दुलदुल रा 'अली ॥

तंग (تنگ) वि. (फ़ा.) (१) आवळलेला; घट्ट; तंग. (२) त्रासलेला; जिकीरीस आलेला. (३) संकुचित; अरुंद. (४) अल्प; कमी. (५) दरिद्री; कंगाल (६) दुःखी; असहाय. (७) अपुरा; अपर्याप्त (पु.) खोगीर आवळण्याचा कातडी पट्टा किंवा वादी; कमणी; तंग. **–आना** (– آنا) त्रासणे; हैराण होणे. **–'अैश** (– عیش) वि. (फ़ा.+'अ.) (१) दरिद्री; कंगाल. (२) दुर्दशाग्रस्त. **–ख़याल** (– خیال) वि. (फ़ा.+'अ.) (१) क्षुद्र विचारांचा; संकुचित विचार असलेला; अनुदार. (२) धर्मांध; जातीयवादी **–ख़याली** (– خیالی) स्त्री. (फ़ा.+'अ.) अनुदारता; संकुचितपणा. **–चश्म** (– چشم) वि. (फ़ा.) (१) कृपण; कंजूष. (२) नीच; क्षुद्र **–ज़र्फ़** (– ظرف) वि. (फ़ा.+'अ.) (१) लहान भांडे असलेला. (२) संकुचित अंतःकरणाचा. (३) भ्याड.

–तलबी (طلبی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) जोराचा तगादा. **–ताबी** (تابی –) स्त्री. (फ़ा.) अशक्तपणा; दुर्बळता. **–दस्त** (دست –) वि. (फ़ा.) पैशाची चणचण असलेला; गरीब. **–दस्ती** (دستی –) स्त्री. (फ़ा.) पैशाची ओढघस्त; दारिद्र्य. **–दहन** (دهن –) वि. (फ़ा.) (१) लहान तोंडाचा (ची). (२) सुंदरी; प्रेमपात्र. **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) (१) क्षुद्र अंतःकरणाचा; संकुचित वृत्तीचा. (२) कृपण; कंजूष. **–दिली** (دلی –) स्त्री. (फ़ा.) अनुदारता; क्षुद्रता; जातीयता. **–नज़र** (نظر –) वि. (फ़ा.+'अ.) संकुचित दृष्टीचा; अनुदार; धर्मांध. **–नाए** (نائے –) पु. (फ़ा.) (१) अगदी लहान जागा. (२) अरुंद गल्ली. (३) समाधी; कबर. **–पोश** (پوش –) वि. (फा.) आवळ किंवा घट्ट कपडे घालण्याची आवड असणारा; तंग कपडे घालणारा. **–फ़ुर्सत** (فرصت –) वि. (फ़ा. + 'अ.) सवड, फुरसत, वेळ नसलेला. **–बख़्त** (بخت –) वि. (फ़ा.) मंदभागी; हतभागी; दुर्दैवी; दरिद्री. **–बख़्ती** (بختی –) स्त्री. (फ़ा.) दुर्दैव; दारिद्र्य. **–बार** (بار –) वि. (फ़ा.) ज्याच्याजवळ सहजासहजी जाता येत नाही असा; ज्याच्यापर्यंत प्रत्येकजण जाऊन पोहोचू शकत नाही असा. **–म'आश** (معاش –) वि. (फ़ा.+'अ.) निर्धन; पोटाची भ्रांत असलेला. **–मायगी** (مایگی –) स्त्री. (फ़ा.) (१) दारिद्र्य. (२) नीचता. (३) विद्येचा अभाव. **–माय:** (مایہ –) वि. (फ़ा.) (१) दारिद्री. (२) अधम. (३) विद्याहीन. **–सार** (سار –) स्त्री. (फ़ा.) (१) मूर्खता; निर्बुद्धपणा. (२) आत्म्याने दोनदा खालच्या योनीत जन्म घेणे. (उदा. मानवी आत्म्याने एकदा पशूचे व नंतर वनस्पतीचे शरीर धारण करणे). **–साल** (سال –) पु. (फ़ा.) दुष्काळ; दुर्भिक्ष. **–हाल** (حال –) वि. (फ़ा.+'अ.) दुर्दशाग्रस्त; निर्धन. **–हाली** (حالی –) स्त्री. (फ़ा. + 'अ.) दुर्दशा; दारिद्र्य. **–हौसलगी** (حوصلگی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) (१) उत्साहाचा अभाव. (२) भित्रेपणा. **–हौसलः** (حوصلہ –) वि. (फ़ा.+'अ.) (१) निरुत्साही. (२) भित्रा.

तंगार (تنگار) पु. (फ़ा.) टाकणखार; क्षार; पाचनक.

तंगि-ए-जा (تنگئی جا) स्त्री. (फ़ा.) जागेची टंचाई.

तंगि-ए-म'आश (تنگئی معاش) स्त्री. (फ़ा. + 'अ.) आजीविकेची, पैशाची चणचण.

तंगि-ए-रिज़्क़ (تنگئی رزق) स्त्री. (फ़ा. + 'अ.) भाकरीची टंचाई; पोटाला पुरेसे न मिळणे.

तंगि-ए-रोज़गार (تنگئی روزگار) स्त्री. (फ़ा.) (१) बेकारी. (२) कालचक्र; वाईट दिवस.

तंगी (تنگی) स्त्री. (फ़ा.) (१) टंचाई; चणचण. (२) दुःस्थिती; अडचण; संकट. (३) गरिबी; दारिद्र्य. (४) कमतरता; न्यूनता. (५) संकुचितपणा. (६) कृपणता. (७) आवळपणा; घट्टपणा.

तंगूज़ (تنگوز) पु. (तु.) डुक्कर; वराह; शूकर.

तंगः (تنگہ) पु. (तु.) चलनी नाणे.

तंज़ (طنز) स्त्री. ('अ.) टोमणा; व्याजोक्ती; खोच; वक्रोक्ती; व्यंग्योक्ती; उपरोध; उपहास. **–आमेज़** (آمیز –) वि. ('अ.+फ़ा.) व्याजोक्तिपूर्ण; व्यंग्ययुक्त; औपरोधिक. **–निगार** (نگار –) वि. ('अ.+फ़ा.) औपरोधिक साहित्य लिहिणारा; व्यंग्य लेखक.

तंज़न् (طنزاً) अव्य. ('अ.) उपरोधाने; वक्रोक्तीने.

तंज़ियात (طنزیات) स्त्री. ('अ.) (१) औपरोधिक लेखांचा अथवा कवितांचा संग्रह. (२) टोमणे.

तंज़ियः (طنزیہ) वि. ('अ.) व्यंग्यपूर्ण; औपरोधिक.

तंज़ियः (تنزیہ) स्त्री. ('अ.) शुद्ध; पवित्र करणे; दोषरहित बनविणे.

तंज़ीम (تنظیم) स्त्री. ('अ.) (१) व्यवस्था; बंदोबस्त. (२) संघटना. (३) निर्मिती.

तंजीम (تنجیم) स्त्री. ('अ.) ज्योतिष; ग्रहताऱ्यांशी संबंधित शास्त्र.

तंज़ील (تنزیل) स्त्री. ('अ.) (१) खाली आणणे; उतरविणे. (२) आकाशवाणी. (३) कुराण. (हे हळूहळू स्वर्गातून खाली उतरले होते, मुहम्मद साहेबांना स्फुरले होते, त्यावरून).

तंजीस (تنجیس) स्त्री. ('अ.) अपवित्र करणे; घाण करणे.

तंतनः (طنطنہ) पु. ('अ.) (१) दहशत; भीती; दबदबा; क्रोध. (२) घमेंड. (३) रुबाब.

तंदूर (تندور) पाहा 'तनूर' (शु.).

तंदूरी (تندوری) वि. स्त्री. (फ़ा.+हिं.) भट्टीत भाजलेली भाकरी किंवा जाड रोटी.

तंबाकू (تمباکو) पु. (फ़ा.) तंबाखू. **–नोश** (نوش –) वि. (फ़ा.) तंबाखू पिणारा, ओढणारा; धूम्रपान करणारा.

तंबीह (تنبیہ) स्त्री. ('अ.) (१) सावधगिरीची सूचना; पूर्वसूचना. (२) तंबी; धमकी; निर्भर्त्सना. (३) शिकवण; उपदेश. (४) ताकीद; लहानशी शिक्षा; कानउघाडणी; खरडपट्टी. **–करना** (کرنا –) (१) ताकीद देणे; कानउघाडणी करणे. (२) उपदेश करणे.

तंबीहन् (تنبیہاً) अव्य. ('अ.) ताकीद म्हणून.

तंबुल (تنبل) वि. (फ़ा.) (१) आळशी; सुस्त. (२) फोफसा; लठ्ठ.

तंबुली (تنبلی) स्त्री. (फ़ा.) (१) आळस; सुस्ती. (२) लठ्ठपणा; फोफसेपणा.

तंबूर (تنبور); **तंबूरः** (تنبورہ) पु. (फ़ा.) **तंबूर** (طنبور); **तंबूरः** (طنبورہ) पु. ('अ.) तंबोरा (चार तारा असलेले एक तंतुवाद्य).

तंबूरची (تنبورچی) वि. (फ़ा. + तु.) तंबोरा वाजविणारा.

तंसीक़ (تنسیق) स्त्री. (अ.) (१) व्यवस्था करणे. (२) क्रमबद्ध करणे; क्रम लावणे.

तंसीख़ (تنسیخ) स्त्री. ('अ.) रद्द करणे; फिरविणे; खोडणे; निरसन करणे.

तंसीफ़ (تنصیف) स्त्री. ('अ.) दोन सारखे भाग करणे; द्विधाछेदन.

तंसीम (تنسیم) स्त्री. ('अ.) श्वास घेणे.

त'अक़ीद (تعقید) स्त्री. ('अ.) (१) अस्पष्ट बोलणे; अर्थ समजणे अवघड जाईल अशा प्रकारे एखाद्या वाक्यात शब्दांची अदलाबदली करणे. (२) खूप गाठी मारणे. (३) वशिलेबाजी.

त'अक़ीद-ए-म'अनवी (تعقید معنوی) स्त्री. ('अ.) एखाद्या वाक्यातील किंवा कवितेतील शब्दाचा प्रचलित नसलेला अर्थ घेणे.

त'अक़ीद-ए-लफ़्ज़ी (تعقید لفظی) स्त्री. ('अ.) एखाद्या वाक्यातील किंवा कवितेतील शब्दांची उलटापालट करून अर्थ बदलणे.

त'अक़्क़ुद (تعقد) पु. ('अ.) (१) घट्ट होणे. (२) गाठ मारणे.

त'अक़्क़ुफ़ (تعقف) पु. ('अ.) वळणे; वाकडे होणे.

त'अक़्क़ुब (تعقب) पु. ('अ.) (१) पाठलाग करणे. (२) खोदून विचारणे. (३) दोष शोधणे.

त'अक़्क़ुल (تعقل) पु. ('अ.) विचार करणे; अक्कल चालविणे.

तअक्कुल (تاکل) पु. ('अ.) भोजन करणे; खाणे; सहभोजन.

तअख़्ख़ुर (تاخر) पु. ('अ.) उशीर लावणे; मागे राहणे; शेवटी राहणे.

त'अज़ियत (تعزیت) स्त्री. ('अ.) एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या घरी दुःखप्रदर्शन करण्यासाठी जाणे; दुखवटा. **–नामः** (نامہ –) पु. ('अ.+फ़ा.) शोकप्रदर्शक पत्र.

त'अज़ियः (تعزیہ) पु. ('अ.) ताबूत; हजरत इमाम हुसैन यांच्या समाधीची (थडग्याची) प्रतिकृती किंवा प्रतिमा; डोला. **–ठंडा करना** (–ٹھنڈا کرنا) ताबूत नदीत बुडविणे किंवा जमिनीत पुरणे. **–दार** (دار –) पु. ('अ.+फ़ा.) (१) ताबूत बनविणारा, उचलणारा. (२) विलाप; मृत्युशोक करणारा.

त'अज़ीब (تعذیب) स्त्री. ('अ.) कष्ट, त्रास, यातना देणे.

त'अज़ीम (تعظیم) स्त्री. ('अ.) (१) आदर, मान, सन्मान. (२) प्रणाम; सन्मानार्थ उठून लवून मुजरा करणे

त'अज़ीर (تعزیر) स्त्री. ('अ.) शिक्षा देणे; सजा; दंड.

त'अज़ीरात (تعزیرات) स्त्री. ['अ. 'त'अज़ीर' (تعزیر) चे अनेक.] अनेक प्रकारच्या शिक्षा; शिक्षांशी संबंधित न्यायग्रंथ; पिनल कोड; दंडविधान. **त'अज़ीरात-ए-हिन्द** (تعزیرات ہند) भारतीय दंडविधान; फौजदारी कायदा.

तअज़्ज़ी (تاذی) स्त्री. ('अ.) खिन्न होणे; दुःख झेलणे.

त'अज्जुब (تعجب) पु. ('अ.) आश्चर्य; विस्मय; अचंबा. **–अंगेज़** (انگیز –); **–ख़ेज़** (خیز –); **–नाक** (ناک –) वि. ('अ.+फ़ा.) आश्चर्यकारक; विस्मयकारक.

त'अज़्ज़ुम (تعظم) पु. ('अ.) पूज्य होणे; आदरणीय असणे.

त'अज़ुर (تعذر) पु. ('अ.) (१) विघ्न येणे; बाधा पडणे. (२) हरकत घेणे. (३) क्षमा मागणे; असमर्थता प्रकट करणे.

त'अतील (تعطیل) स्त्री. ('अ.) (१) सुट्टी; रजा. (२) फुरसत. (३) रिकामपण.

त'अत्तुफ़ (تعطف) पु. ('अ.) कृपा; दया; मेहेरबानी.

त'अत्तुर (تعطر) पु. ('अ.) सुगंधित होणे.

त'अत्तुल (تعطل) पु. ('अ.) (१) रिकामटेकडेपणा; बेकार सुटी. (२) पेचप्रसंग.

त'अत्तुश (تعطش) पु. ('अ.) तहान; तहान लागणे.

त'अदाद (تعداد) स्त्री. ('अ.) (१) संख्या. (२) गणती; गणना. (३) अंदाज.

त'अदियः (تعدیہ) पु. ('अ.) (१) अकर्मक क्रियापदाला सकर्मक बनविणे. (२) रोग-संक्रमण. (रोग शरीराच्या एका भागातून दुसऱ्या भागात किंवा एका व्यक्तीकडून दुसरीकडे जाणे).

त'अद्दा (تعدا) पु. **त'अद्दी** (تعدی) स्त्री. ('अ.) जुलूम; अत्याचार.

त'अद्दुद (تعدد) पु. ('अ.) (१) मोजणे; गणना करणे. (२) नियमापेक्षा किंवा हिशेबापेक्षा अधिक होणे.

त'अन (طعن) स्त्री. पु. ('अ.) (१) टोमणा. व्याजोक्ती. (२) तीर मारणे.

त'अन-ओ-तश्नी'अ (طعن و تشنیع) स्त्री. ('अ.) टोमणे मारणे; छद्मीपणाने बोलणे; घालूनपाडून बोलणे.

त'अनः (طعنہ) पु. ('अ.) (१) टोमणा; उपरोधिक बोलणे; व्यंग्य. (२) निंदा; कुचाळकी. **–ज़न** (زن –) वि. ('अ. + फ़ा.) टोमणा मारणारा; खोचक बोलणारा.

तअन्नी (تانی) स्त्री. ('अ.) (१) विलंब. (२) सुस्ती; ढिलेपणा; नरमाई.

त'अन्नी (تعنی) स्त्री. ('अ.) (१) दुःखी होणे; शोक करणे. (२) दुःख देणे.

त'अन्नुत (تعنت) पु. स्त्री. ('अ.) निंदा; दोषदर्शन.

तअन्नुस (تانس) पु. ('अ.) (१) प्रेम बसणे; आत्मीयता वाटणे. (२) सवय लागणे, होणे.

त'अफ़्फ़ुन (تعفن) पु. ('अ.) घाण; दुर्गंध; सडलेला किंवा कुजलेल्या वस्तूचा दुर्गंध.

त'अफ़्फ़ुफ़ (تعفف) पु. ('अ.) संयम; इंद्रियनिग्रह; साधुत्व; धार्मिकता.

त'अब (تعب) पु. ('अ.) (१) परिश्रम; मेहनत; कष्ट. (२) दुःख. (३) क्लांती; थकवा.

त'अबियः (تعبیہ) पु. ('अ.) (१) सजविणे; शृंगारणे. (२) क्रमाने लावणे. (३) लढाईसाठी सैन्य तयार करणे. (४) जडावाचे काम.

त'अबीर (تعبیر) स्त्री. ('अ.) (१) स्वप्नाचे शुभाशुभ फल. (२) खुलासा; स्पष्टीकरण; अर्थ लावणे.

त'अब्बुद (تعبد) पु. ('अ.) उपासना; पूजा करणे.

त'अम (طعم) पु. ('अ.) स्वाद; रस; मजा; चव.

त'अमियः (تعمیہ) पु. ('अ.) (१) आंधळे करणे; डोळे फोडणे. (२) लपविणे. (३) 'अबजद' च्या हिशेबाने काढलेल्या तारखेमध्ये एखादी संख्या वाढविणे. ['तख़्रिजः' (تخریج) च्या उलट].

त'अमीम (تعمیم) स्त्री. ('अ.) एखादी गोष्ट सार्वत्रिक (आम) करणे.

त'अमीर (تعمیر) स्त्री. ('अ.) (१) निर्मिती; रचना. (२) इमारतीचे बांधकाम. (३) सुधारणा. (४) घडण; बनावट. (५) इमारत.

त'अमीर-ए-क़ौम (تعمیر قوم) स्त्री. ('अ.) (१) राष्ट्र-निर्मिती. (२) देश, जाती वगैरेची सुधारणा.

त'अमीर-ए-नौ (تعمیر نو) स्त्री. ('अ. + फ़ा.) नव-निर्मिती.

त'अमीरी (تعمیری) वि. ('अ.) (१) रचनात्मक; विधायक. (२) सुधारणात्मक.

त'अमील (تعمیل) स्त्री. ('अ.) (१) आज्ञापालन. (२) अंमलबजावणी; कार्यवाही. [अनेक 'त'अमीलात' (تعمیلات) स्त्री. ('अ.) समन्स वगैरेची अंमलबजावणी].

त'अम्मुक़ (تعمق) पु. ('अ.) एखाद्या गोष्टीच्या तळापर्यंत जाऊन पोचण्यासाठी गंभीर चिंतन करणे.

तअम्मुल (تامل) पु. ('अ.) (१) विचार; चिंतन. (२) विलंब; उशीर. (३) शंका; संदेह; भ्रम; गोंधळ (मानसिक). (४) संकोच. (५) द्विधा मनःस्थिती; बुचकळा; अनिश्चितपणा.

त'अम्मुल (تعمل) पु. ('अ.) अंमलात येणे; कार्यान्वित होणे.

त'अय्युन (تعین) पु. ('अ.) (१) नेमणूक; नियुक्ती. (२) निश्चय करणे; ठरविणे; मूल्य नक्की करणे. (३) अस्तित्व. [अनेक 'त'अय्युनात' (تعینات)].

त'अय्युश (تعیش) पु. ('अ.) ऐषआराम; विलास; चैन करणे; इंद्रियसुख घेणे. [अनेक 'त'अय्युशात' (تعیشات)].

त'अरीज़ (تعریض) स्त्री. ('अ.) (१) समोर ठेवणे. (२) टोमणा. (३) हरकत.

त'अरीफ़ (تعریف) स्त्री. ('अ.) (१) प्रशंसा; स्तुती. (२) परिचय; माहिती. (३) वर्णन; लक्षण; व्याख्या; परिभाषा. (४) वैशिष्ट्य; गुण.

त'अरीब (تعریب) स्त्री. ('अ.) दुसऱ्या एखाद्या भाषेतील शब्दाचे अरबीकरण करणे.

त'अर्री (تعری) स्त्री. ('अ.) नग्न होणे.

त'अर्रुज़ (تعرض) पु. ('अ.) (१) घडणे. (२) समोर जाणे; अडथळा करणे. (३) विरोध; अडथळा.

त'अर्रुफ़ (تعرف) पु. ('अ.) (१) परिचय; ओळख. (२) विचारणे; शोधणे.

त'अलीक़ (تعلیق) स्त्री. ('अ.) (१) टांगणे; टेकविणे; एखादी वस्तू दुसऱ्या वस्तूच्या आधाराने ठेवणे. (२) अडकवून ठेवणे. (३) दार बंद करणे. तहकूब करणे.

त'अलीक़ः (تعلیقہ) पु. ('अ.) (१) वादाचा निर्णय लागेपर्यंत शेतातील माल अडवून ठेवणे. (२) जप्ती; लिलाव. (३) जप्त केलेल्या वस्तूंची यादी, सूची.

त'अलीम (تعلیم) स्त्री. ('अ.) (१) शिक्षण; अभ्यास. (२) उपदेश; गुरुमंत्र. **–गाह** (گاہ –) स्त्री. ('अ.+फ़ा.) शिक्षण-मंदीर; पाठशाळा. **–याफ़्तः** (یافتہ –) वि. ('अ. + फ़ा.) (१) सुशिक्षित. (२) सुसंस्कृत.

त'अलीम-ए-जदीद (تعلیم جدید) स्त्री. ('अ.) आधुनिक शिक्षण; नवे शिक्षण.

त'अलीम-ए-निस्वां (تعلیم نسواں) स्त्री. ('अ.) स्त्री-शिक्षण.

त'अलीम-ए-बालिगां (تعلیم بالغاں) स्त्री. ('अ.) प्रौढ-शिक्षण; लोकशिक्षण.

त'अलील (تعلیل) स्त्री. ('अ.) (१) कारणे सांगणे; पुरावा देणे. (२) 'अलिफ' (ا); 'वाव' (و); अथवा 'ये' (ے ی) या स्वरामध्ये बदल करणे (व्या.). (३) रोग दूर करणे. 183

त'अल्ली (تعلی) स्त्री. ('अ.) (१) उंच होणे. (२) गर्व; घमेंड. (३) अतिशयोक्ती.

त'अल्लुक़ (تعلق) पु. ('अ.) (१) संबंध; संपर्क. (२) नाते; स्वजनता. (३) प्रेम. (४) सेवा; नोकरी. (५) पक्षपात. (६) अनैतिक संबंध. [अनेक 'त'अल्लुक़ात' (تعلقات) पु. ('अ.) अनेक संबंध].

त'अल्लुक़-ए-ख़ातिर (تعلق خاطر) पु. ('अ.) हार्दिक संबंध; प्रेम; स्नेह

त'अल्लुक़ः (تعلقہ) पु. ('अ.) (१) तालुका. (२) मोठी जमीनदारी; जहागीर. (३) जमीनजुमला. (४) क्षेत्र; इलाखा. **-दार** (دار –) पु. ('अ.+फ़ा.) मोठा जमीनदार; जहागीरदार; खोत. **-दारी** (داری –) स्त्री. ('अ.+फ़ा.) मोठी जमीनदारी; जहागीरदारी; खोती.

तअल्लुफ़ (تالف) पु. ('अ.) (१) परस्पर प्रेम; स्नेह. (२) एकत्र येणे.

तअल्लुम (تالم) पु. ('अ.) (१) पीडित; दुःखी होणे. (२) त्रास होणे.

त'अल्लुम (تعلم) पु. ('अ.) शिक्षण; विद्या; शिकणे.

त'अवीक़ (تعویق) स्त्री. ('अ.) (१) विलंब; उशीर. (२) अडथळा. (३) टाळाटाळ.

त'अवीज़ (تعویذ) पु. ('अ.) (१) ताईत; मंत्रचक्र; रक्षाकवच. (२) थडग्यावरील शवपेटीच्या आकाराचा एक भाग.

त'अव्वुज़ (تعوذ) पु. ('अ.) शरण येणे; आश्रय घेणे; 'अ'ऊजुबि'ल्लह्' (اعوذ باللہ) हा मंत्र म्हणणे.

त'अव्वुद (تعود) पु. ('अ.) सवय होणे; अभ्यस्त होणे.

त'अश्शी (تعشی) स्त्री. ('अ.) रात्रीचे जेवण करणे.

त'अश्शुक़ (تعشق) पु. ('अ.) मोहित होणे; प्रेमात सापडणे; प्रेम; स्नेह.

तअस्सुफ़ (تاسف) पु. ('अ.) खेद; पश्चात्ताप; दुःख.

त'अस्सुब (تعصب) पु. ('अ.) (१) धर्म, जात, जमात वगैरे बद्दलचा फाजील पक्षपात. (२) दुरभिमान; पक्षाभिनिवेश. (३) धर्मवेड. (४) दूषित पूर्वग्रह.

तअस्सुर (تاثر) पु. ('अ.) प्रभावित होणे; प्रभाव.

त'अस्सुर (تعسر) पु. ('अ.) अवघड होणे; अडकाठी; अडचण; संकट.

त'अह्हुद (تعہد) पु. ('अ.) (१) एखादे काम करण्याचा विडा उचलणे; प्रतिज्ञा. (२) करार. (३) जामीन; हमी.

तअह्हुल (تاہل) पु. ('अ.) विवाह करणे; संसार करणे.

त'आक़ुद (تعاقد) पु. ('अ.) आपसात प्रतिज्ञा करणे; वचन देणे; करार करणे.

त'आक़ुब (تعاقب) पु. ('अ.) पाठलाग करणे; मागून धावणे.

त'आतुफ़ (تعاطف) पु. ('अ.) एकमेकावर कृपा, दया करणे.

त'आनुक़ (تعانق) पु. ('अ.) आलिंगन देणे; एकमेकांना मिठी मारणे.

त'आरुज़ (تعارض) पु. ('अ.) (१) समोरासमोर होणे (२) बरोबरी करणे. (३) हस्तक्षेप; कलह; झगडा; हुज्जत.

त'आरुफ़ (تعارف) पु. ('अ.) एकमेकांना ओळखणे; परस्पर परिचय.

त'आलॉ (تعالیٰ) वि. ('अ.) श्रेष्ठ; महान. (ईश्वरासाठी वापरले जाणारे विशेषण).

त'आवुन (تعاون) पु. ('अ.) परस्पर सहकार्य; सहयोग; साह्य.

त'आहुद (تعاہد) पु. ('अ.) (१) आपसात आणाभाका करणे; वचन देणे. (२) जामीन रहाणे.

तक (تک) वि. (फ़ा.) (१) थोडा; कमी. (२) एकरी; एकरात. (पु.) (३) चोच. (४) भाल्याचे टोक. (५) घास.

तक़त्तु'अ (تقطع) पु. ('अ.) (१) तुकडे तुकडे करणे. (२) तुकडे होणे.

तक़द्दुम (تقدم) पु. ('अ.) (१) पुढे असणे; प्रथम असणे. (२) प्राधान्य; प्राथमिकता. **-बि'ज़्-ज़मान** (بالزمان –) पु. ('अ.) कालक्रमानुसार आधी आगमन झाल्यामुळे येणारे श्रेष्ठत्व. [उदा. हजरत आदम (आदिमानव) व इतर प्रेषित हे हजरत मुहम्मद पैगंबराच्या पूर्वी होऊन गेले असल्यामुळे ते मुहम्मद साहेबांपेक्षा अधिक श्रेष्ठ ठरतात.] अधिक वयामुळे अग्रगण्य ठरणे. **-बि'र्-रुत्बः** (بالرتبہ –) पु. ('अ.) पद किंवा स्थान यामुळे येणारे श्रेष्ठत्व. **-बि'श्-शर्फ़** (بالشرف –) पु. ('अ.) श्रेष्ठत्वामुळे अग्रगण्य ठरणे. (हजरत मुहम्मद पैगंबर हे आपल्या अंगभूत गुणांमुळे इतर प्रेषितांपेक्षा श्रेष्ठ ठरतात).

तकद्दुर (تكدر) पु. ('अ.) (१) मलिन; गलिच्छ होणे. (२) मलिनता; गलिच्छपणा. (३) उदासपणा; निरुत्साह.

तक़द्दुस (تقدس) पु. ('अ.) (१) पावित्र्य; पुनीतता. (२) महत्ता; श्रेष्ठत्व. **–मआब** (– مآب) वि. ('अ.) परमश्रेष्ठ; महात्मा.

तकफ़्फ़ुल (تكفل) पु. ('अ.) (१) जामीन; हमीदार. (२) जबाबदार असणे.

तकब्बुर (تكبر) पु. ('अ.) गर्व; अहंकार; घमेंड.

तक़ब्बुल (تقبل) पु. ('अ.) कबूल करणे; मान्य; स्वीकार करणे.

तक़य्युद (تقيد) पु. ('अ.) (१) कैद होणे; बंदी होणे. (२) बंदी; बंधन; अट.

तक़र्रुब (تقرب) पु. ('अ.) समीपता; निकटता; सामीप्य.

तकर्रुम (تكرم) पु. ('अ.) कृपा करणे; कृपा; दया; दान.

तक़र्रुर (تقرر) पु. ('अ.) (१) नेमणूक; नियुक्ती. (२) निश्चित, नक्की होणे.

तक़ल्क़ुल (تقلقل) पु. ('अ.) (१) व्याकुळता; बेचैनी. (२) सुरईतून पाणी वगैरे ओतताना होणारा खळ्खळ् आवाज.

तकल्लू (تكلو) पु. (तु.) (१) खोगीर; नमदा. (२) दाढीमिशी.

तक़ल्लुब (تقلد) पु. ('अ.) (१) अनुयायी बनणे; अनुसरण करणे. (२) जबाबदार असणे, होणे.

तकल्लुफ़ (تكلف) पु. ('अ.) (१) औपचारिकपणा; शिष्टाचार; संकोच. (२) तसदी घेणे. (३) भपका; थाटमाट. (४) परकेपणा. (५) लज्जा. [अनेक 'तकल्लुफ़ात' (تكلفات)].

तक़ल्लुब (تقلب) पु. ('अ.) उलटणे; बदलणे; क्रांती; परिवर्तन होणे.

तकल्लुम (تكلم) पु. ('अ.) संभाषण करणे; बातचित.

तकव्वुन (تكون) पु. ('अ.) होऊन जाणे; उत्पन्न होणे; सृजन.

तक़श्शुफ़ (تقشف) पु. ('अ.) (१) ओले कोरडे खाणे; जाडेभरडे वस्त्र वापरणे. (२) संन्यास. (३) खडबडीतपणा.

तकश्शुफ़ (تكشف) पु. ('अ.) नग्न होणे.

तकस्सुर (تكثر) पु. ('अ.) प्राचुर्य; बाहुल्य; आधिक्य.

तकस्सुर (تكسر) पु. ('अ.) मोडणे; तुटणे; तुकडे होणे.

तकस्सुल (تكسل) पु. ('अ.) आळस; सुस्ती.

तक़ा'उद (تقاعد) पु. ('अ.) काम न करणे; सेवानिवृत्त होणे; पेन्शन; सेवानिवृत्ती.

तक़ाज़ा (تقاضا) पु. ('अ.) (१) तगादा; निकड. (२) गरज; आवश्यकता. **–ए-'उम्र** (– ے عمر) पु. ('अ.) वयाच्या दृष्टीने एखादे काम करणे किंवा न करणे; योग्य अथवा आवश्यक असणे. **–ए-वक़्त** (– ے وقت) पु. ('अ.) काळाच्या किंवा युगाच्या दृष्टीने योग्य अथवा निकडीची असणारी गोष्ट. **–ए-शदीद** (– ے شديد) पु. ('अ.) जोराचा तगादा. [हा अरबी शब्द मुळात 'तक़ादी' (تقاضى) असा होता परंतु फारसीवाल्यांनी 'ई' कार काढून त्या जागी 'आ' कार आणला].

तक़ादीर (تقادير) स्त्री. ['अ. 'तक़दीर' (تقدير) चे अनेक.] भाग्ये; नशीबे; ईश्वरी इच्छा.

तक़ादुम (تقادم) पु. ('अ.) प्राचीन; पुरातन असणे; प्राचीनत्व.

तकान (تكان) स्त्री. (फ़ा.) (१) थकवा; सुस्ती; शैथिल्य. (२) झटकणे; हलविणे; सोडणे.

तक़ाबुल (تقابل) पु. ('अ.) समोरासमोर येणे; सामना होणे.

तक़ारीर (تقارير) पु. ['अ. 'तक़्रीर' (تقرير) चे अनेक.] भाषणे; व्याख्याने.

तक़ारुब (تقارب) पु. ('अ.) एकमेकाच्या समीप येणे; सामीप्य.

तकालीफ़ (تكاليف) पु. ['अ. 'तक्लीफ़' (تكليف) चे अनेक.] अनेक त्रास; तसद्या; कष्ट.

तक़ावी (تقاوى) स्त्री. ['अ. 'क़वी' (قوى) सामर्थ्यवान.] (१) बळ देणे; सामर्थ्यवान बनविणे. (२) तगाई; शेतकऱ्याला शेतीच्या सुधारणेसाठी दिले जाणारे कर्ज.

तक़ासुम (تقاسم) पु. ('अ.) (१) आपसात वाटून घेणे. (२) एकमेकांना वचन देणे; आणाभाका होणे.

तक़ियः (تقيه) पु. ('अ.) भीतीने केलेली गोष्ट; मनाविरुद्ध करावी लागलेली गोष्ट. (स्त्री.) साध्वी; तपस्विनी. ['तक़ी' (تقى) चे स्त्री.].

तक़ी (تقى) वि. ('अ.) (१) संयमी; इंद्रियनिग्रही. (२) धर्मभीरू; धर्मनिष्ठ.

तक़य्युद (تقيد) स्त्री. ('अ.) (१) कैद करणे. (२) बंदी घालणे.

तक़्क़ार (تقار) पु. ('अ.) (१) फार बोलणारा; वडबड्या. (२) उत्कृष्ट भाषण देणारा; वक्तृत्वशाली.

तक्ज़ीब (تكذيب) स्त्री. ('अ.) (१) खंडन करणे. (२) खोटे ठरविणे.

तक़त़ी'अ (تقطیع) स्त्री. ('अ.) (१) तुकडे तुकडे करणे; भाग पाडणे. (२) कवितेचे वृत्त तपासून पाहाणे; छंदाच्या मात्रा मोजणे.

तक़त़ीर (تقطیر) पु. ('अ.) अर्क काढणे; ठिबकविणे.

तक़्दमः (تقدمہ) पु. ('अ.) (१) सामोरे जाणे; स्वागत. (२) नेता; पुढारी. (३) विस्तार; वयाणा. (४) ग्रंथ वगैरे समर्पित करणे, अर्पण करणे. (५) अंदाजपत्रक; अंदाज.

तक़्दीम (تقدیم) स्त्री. ('अ.) पुढे करणे; प्राधान्य देणे.

तक़्दीर (تقدیر) स्त्री. ('अ.) भाग्य; दैव; नशीब. **–आज़्मा'ई** (آزمائی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) भाग्य-परीक्षा.

तक़्दीस (تقدیس) स्त्री. ('अ.) (१) पावित्र्य; पुनीतता. (२) श्रेष्ठत्व.

तक्फ़ीन (تکفین) प्रेतावर कफन (प्रेतवस्त्र) घालणे. (हा शब्द 'तजहीज़' शब्दासह वापरला जातो): शवपेटीत शव असणे.

तक्फ़ीर (تکفیر) स्त्री. ('अ.) (१) एखाद्या मुसलमानाने कुफ (नास्तिकपणा) केल्याचा निर्णय देणे. (२) प्रायश्चित्त देणे. (३) एखाद्याला धर्मच्युत ठरविणे.

तक़्फ़ील (تقفیل) स्त्री. ('अ.) कुलूप लावणे; कुलुपात ठेवणे.

तक्बीर (تکبیر) स्त्री. ('अ.) (१) 'अल्लहो अकबर' (ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे) हा मंत्र म्हणणे. (२) नमाजाच्या वेळी वाकताना, बसताना अथवा उभे राहताना 'अल्लहो अकबर' म्हणणे: (३) ईशस्तुती. ['न'अरः-ए-तक्बीर' (نعرۂ تکبیر) 'अल्लहो अकबर' ची घोषणा].

तक़्बीह़ (تقبیح) स्त्री. ('अ.) वाईट कृत्य करणे.

तक्मिलः (تکملہ) पु. ('अ.) (१) पूर्णता; परिपूर्ती. (२) परिशिष्ट; पुरवणी.

तक्मील (تکمیل) स्त्री. ('अ.) पूर्ती; पूर्णता. **–को पहुचाना** (–کو پہنچانا) पूर्ण करणे; पुरे करणे.

तक्यः (تکیہ) पु. (फ़ा.) (१) उशी; तक्या. (२) कबरस्तान. (३) विश्रांतीची जागा. (४) फकीर लोकांचे राहाण्याचे स्थान. (५) भरवसा; आधार. **–करना** (–کرنا) अवलंबून राहाणे. **–कलाम** (–کلام) पु. ('अ.) सवयीमुळे बोलण्यात वारंवार येणारा निरर्थक शब्द किंवा वाक्य. (उदा. 'आपलं हे 'काय म्हणतात', 'देवा', 'महाराजा' वगैरे). **–दार** (–دار) वि. पु. ('अ.+फ़ा.) स्मशानात (कबरस्तानात) राहाणारा फकीर. **–नशीन** (–نشین) वि. पु. ('अ.+फ़ा.) फकीर. **–लगाना** (–لگانا) एखाद्या वस्तूला टेकून बसणे.

तक्रार (تکرار) स्त्री. ('अ.) (१) वादविवाद, हुज्जत; विवाद. (२) तंटावखेडा. (३) द्विरुक्ती; पुनरावृत्ती.

तक़्री'अ (تقریع) स्त्री. ('अ.) निंदा, नालस्ती करणे, दोष देणे.

तक़्रीज़ (تقریظ) स्त्री. ('अ.) (१) जिवंत व्यक्तीची प्रशंसा; स्तुती. (२) टीका; समालोचन; पुस्तक परीक्षण. **–निगार** (–نگار) वि. ('अ.+फ़ा.) टीकाकार; समालोचक.

तक़्रीब (تقریب) स्त्री. ('अ.) (१) जवळ येणे; समीपता. (२) हेतू; कारण. (३) उत्सव; समारंभ (लग्न वगैरेचा). (४) प्रसंग; शुभ प्रसंग. (५) शुभ मीलन.

तक़्रीबन् (تقریباً) अव्य. ('अ.) जवळजवळ; अंदाजे; सुमारे.

तक़्रीबात (تقریبات) स्त्री. ['अ. 'तक़्रीब' (تقریب) चे अनेक.] लग्ने; उत्सव; समारंभ.

तक्रीम (تکریم) स्त्री. ('अ.) आदरसत्कार; इज्जत; सन्मान.

तक्रीर (تکریر) स्त्री. ('अ.) द्विरुक्ती; पुनरुक्ती; आवृत्ती.

तक़्रीर (تقریر) स्त्री. ('अ.) (१) भाषण; व्याख्यान. (२) संभाषण; चर्चा. (३) वर्णन; वक्तव्य.

तक़्रीरन् (تقریراً) अव्य. ('अ.) तोंडी; मौखिक.

तक़्रीरी (تقریری) वि. ('अ.) (१) मौखिक; तोंडी. (२) वादग्रस्त.

तक़्लीद (تقلید) स्त्री. ('अ.) (१) अनुकरण; अंधानुकरण; नक्कल. (२) अनुसरण; अनुयायित्व.

तक्लीफ़ (تکلیف) स्त्री. ('अ.) (१) कष्ट; दुःख, क्लेश; त्रास; तसदी. (२) व्यथा; पीडा; रोग. (३) आपत्ती. (४) दारिद्र्य. **–दिही** (–دہی) स्त्री. ('अ.+फ़ा.) त्रास, तसदी, दुःख देणे. **–देह** (–دہ) वि. ('अ.+फ़ा.) त्रासदायक; क्लेशकारक. **–फ़र्मा** (–فرما) वि. ('अ. + फ़ा.) तसदी, त्रास घेणारा; येणारा; आलेला.

तक्लीफ़-ए-नज़'अ (تکلیف نزع) स्त्री. ('अ.) मरणयातना; अंतकाळच्या वेदना.

तक़्लीब (تقلیب) स्त्री. ('अ.) उलटापालट; क्रांती; परिवर्तन.

तक़्लीम (تقلیم) स्त्री. ('अ.) (१) कलम करणे, कापणे (२) नखे काढणे.

तक्लीम (تكليم) स्त्री. ('अ.) (१) घायाळ, जखमी करणे. (२) बोलणे; संभाषण करणे.

तक़्लील (تقليل) स्त्री. ('अ.) कमी करणे; उणीव; न्यूनता.

तक़्लील-ए-गिज़ा (تقليل غذا) स्त्री ('अ.) अल्पाहार; मिताहार.

तक़्वा (تقوىٰ) पु. ('अ.) संयम; इंद्रियनिग्रह; सदाचार. **–शि'आर** (شعار –) वि. ('अ.) संयमी; जितेंद्रिय.

तक़्वियत (تقويت) स्त्री. ('अ.) (१) बळ; शक्ती; जोर. (२) समर्थन; पुष्टी. (३) सांत्वन; धीर; प्रोत्साहन. (४) साह्य; पाठबळ; पाठिंबा.

तक्वीन (تكوين) स्त्री. ('अ.) सृजन; निर्मिती; उत्पत्ती.

तक़्वीम (تقويم) स्त्री. ('अ.) (१) सरळ करणे. (२) मूल्य ठरविणे. (३) पंचांग; कॅलेंडर; दिनदर्शिका. **–उल्-बुल्दान** (اَلبلدان –) स्त्री. ('अ.) भूगोल; भूवर्णन.

तक़्वीम-ए-पारीनः (تقويم پارينہ) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) जुने पंचांग. (२) निरुपयोगी वस्तू.

तक़्शीर (تقشير) स्त्री. ('अ.) सोलणे; साल काढणे.

तक़्सीत् (تقسيط) स्त्री. ('अ.) हप्तेबंदी; हप्त्याने देणे, घेणे; हप्ते ठरविणे.

तक़्सीम (تقسيم) स्त्री. ('अ.) (१) विभागणी; वाटणी; विभाजन. (२) भागाकार. **–बह्रिस्सः रसदी** (بحصہ رسدی –) हिस्सेरशीने वाटणी करणे.

तक़्सीम-ए-कार (تقسيم كار) स्त्री. ('अ. + फ़ा., कामाची विभागणी, वाटणी.

तक़्सीम-ए-मुरक्कब (تقسيم مركب) स्त्री. ('अ.) मिश्र भागाकार.

तक़्सीम-ए-मुल्क (تقسيم ملک) स्त्री. ('अ.) देशाची फाळणी; देश-विभाजन.

तक़्सीम-ए-हिस्स (تقسيم حصص) स्त्री. ('अ.) नफ्याच्या हिश्शांची वाटणी; पैशांची वाटणी.

तक़्सीर (تقصير) स्त्री. ('अ.) (१) कमतरता; उणीव. (२) चूक; दोष. (३) अपराध; कर्तव्यच्युती. **–मंद** (مند –); **–वार** (وار –) वि. ('अ. + फ़ा.) अपराधी; दोषी; पापी.

तक्सीर (تكسير) स्त्री. ('अ.) (१) तोडणे; फोडणे; तुकडे करणे. (२) एखाद्या कोष्टकात किंवा चक्रात अशा प्रकारे संख्या भरणे की ज्यायोगे सर्व बाजूंची बेरीज सारखी यावी.

तक्सीर (تكثير) स्त्री. ('अ.) वाढविणे; अधिक करणे; प्राचुर्य.

तख़्ती (تختی) स्त्री. ('अ.) पुढे जाणे; लोकांच्या डोकीवरून पळून जाणे.

तख़ब्बुत् (تخبط) पु. ('अ.) (१) कुमार्गाने चालणे. (२) भूत लागणे.

तख़य्युल (تخيل) पु. ('अ.) (१) विचार; कल्पना. (२) कल्पनाशक्ती; प्रतिभा. (३) भ्रम. [अनेक 'तख़य्युलात' (تخيلات) पु. ('अ.) अनेक कल्पना; भ्रम].

तख़ल्लुफ़ (تخلف) पु. ('अ.) वचनभंग करणे; प्रतिज्ञा मोडणे.

तख़ल्लुस् (تخلص) पु. ('अ.) उपनाम; टोपण नाव.

तख़ारुज (تخارج) पु. ('अ.) वाटले, विभागले जाणे; संपत्तीची वाटणी.

तख़ालुफ़ (تخالف) पु. ('अ.) (१) परस्पर शत्रुत्व; यादवी; वैर. (२) फेरबदल; क्रांती. (३) प्रतिकूलता.

तख़्'ईल (تخئيل) स्त्री. ('अ.) (१) ध्यान; चिंतन. (२) कल्पनाशक्ती.

तख़्त (تخت) पु. (फ़ा.) (१) राजसिंहासन. (२) लाकडी फळयांचा पलंग; माचा. (३) सत्ता; राज्य. **–की रात** (کی رات –) विवाह रजनी. **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) राजधानी. **–नशीन** (نشين –) वि. (फ़ा.) सिंहासनाधिष्ठित; राजा; शासक. **–नशीनी** (نشينی –) स्त्री. (फ़ा.) राज्यारोहण. **–पोश** (پوش –) पु. (फ़ा.) (१) चादर (२) तक्तपोशी. **–बख़्त** (بخت –) पु. (फ़ा.) (१) राजसत्ता व नशीब. (२) संसार व संपत्ती; ऐषआराम. **–या तख़्तः** (یا تختہ –) सिंहासन किंवा तिरडी. (विजय किंवा मरण).

तख़्त-ए-आबनूसी (تخت آبنوسی) पु. (फ़ा.) रात्र.

तख़्त-ए-ख़्वाब (تخت خواب) पु. (फ़ा.) पलंग.

तख़्त-ए-ता'ऊस (تخت طاؤس)पु. (फ़ा.) मयूरसिंहासन.

तख़्त-ए-रवाँ (تخت رواں) पु. (फ़ा.) ज्यावर बसून राजा इकडे तिकडे जातो असे सिंहासन; फिरते सिंहासन.

तख़्त-ए-शाही (تخت شاهی) पु. (फ़ा.) राजसिंहासन.

तख़्त-ए-सुलैमानी (تخت سليمانی) पु. (फ़ा.+'अ.) ज्याच्यावर बसून हजरत सुलेमान आकाशात संचार करीत ते सिंहासन.

तख़्त-ओ-ताज (تخت و تاج) पु. (फ़ा.) राज्यकारभार; शासन व्यवस्था.

तख़्ती (تختی) स्त्री. (फ़ा.) (१) लहान लाकडी फळी. (२) मुलांची अक्षरे गिरविण्याची लाकडी फळी; पाटी.

तख़्तः (تختہ) पु. (फ़ा.) (१) लांब व रुंद फळी (लाकडी). (२) तक्तपोशी. (३) जहाजाची लाकडी फरशी. (४) कागदाचा ताव. (५) वाफा. (६) ज्यावर प्रेताला स्नान घालण्यात येते तो पाट; तिरडी. **–उलटना** (اُلٹنا –) (१) दिवाळे निघणे; राजसत्ता हातून जाणे. (२) उजाड होणे. **–बंद** (بند –) वि. (फ़ा.) (१) कैदी; बंदी. (२) मोडलेले हाड जोडण्यासाठी बांधली जाणारी फळी. **–बंदी** (بندی –) स्त्री. (फ़ा.) (१) वाफे बनविणे. (२) भितीला आतून फळ्या मारून सुरक्षित करणे.

तख़्तः-ए-काग़ज़ (تختۂ کاغذ) पु. (फ़ा. + 'अ.) कागदाचा ताव.

तख़्तः-ए-ताबूत (تختۂ تابوت) पु. (फ़ा. + 'अ.) शवपेटी; तिरडी.

तख़्तः-ए-त'अलीम (تختۂ تعلیم) पु. (फ़ा. + 'अ.) मुलांना अक्षरे व गणित शिकविण्याची फळी; फळा.

तख़्तः-ए-मश्क़ (تختۂ مشق) पु. (फ़ा. + 'अ.) (१) मुलांची अभ्यासाची फळी; पाटी. (२) फार वापरात असलेली वस्तू.

तख़्तः-ए-मीना (تختۂ مینا) पु. (फ़ा.) आकाश.

तख़्तः-ए-मुसत्तह़ (تختۂ مسطح) पु. (फ़ा. + 'अ.) मोजण्याच्या कामी उपयोगी पडणारे टेबल.

तख़्दीर (تخدیر) स्त्री. ('अ.) (१) शरीराचा एखादा भाग औषधाने सुन्न किंवा संज्ञाहीन (बधिर) बनविणे. (२) स्त्रीला पडद्यात ठेवणे.

तख़्फ़ीफ़ (تخفیف) स्त्री. ('अ.) (१) कमी; संक्षिप्त; हलके बनविणे; घट; संक्षेप. (२) विश्रांती; आराम.

तख़्मीन (تخمین) स्त्री. ('अ.) अनुमान करणे; अंदाज करणे.

तख़्मीनन् (تخمیناً) अव्य. ('अ.) अदमासे; सुमारे; अंदाजे.

तख़्मीनः (تخمینہ) पु. ('अ.) (१) अनुमान; अंदाज; अटकळ, (२) अंदाजपत्रक.

तख़्मीर (تخمیر) स्त्री. ('अ.) आंबविणे.

तख़्मीस़ (تخمیص) स्त्री. ('अ.) पाच बनविणे; दोन काव्यपंक्तींत तीन काव्यपंक्ती जोडून पाच बनविणे.

तवाली-ए-इज़ाफ़ात (توالئ اضافات) स्त्री. ('अ.) एखाद्या वाक्यात षष्ठीचे अनेक प्रत्यय वापरले जाणे. [उदा. आमच्या भावाच्या मुलाच्या लग्नाच्या वेळचा हा पोषाख किंवा

गुल-ए-सरसब्ज़-ए-बाग़-ए-खुल्द-ए-बरीं

(گل سر سبز باغ خلد بریں)

सातव्या स्वर्गाच्या बागेतील ताजे फूल (ए=चा)].

तवालुद (توالد) पु. ('अ.) संतती निर्माण करणे; जन्म देणे. (हा शब्द 'तनासुल' सह वापरला जातो).

तवालुद-ओ-तनासुल (توالد و تناسل) पु. ('अ.) संतानोत्पत्ती; प्रजोत्पादन.

तवील (طویل) वि. ('अ.) (१) लांब. (२) उंच. (३) विस्तृत. (४) कंटाळवाणा. पाहा 'तूल'.

तवेलः (طویلہ) पु. ('अ.) (१) घोडघाच्या मागील पायाला बांधण्याची लांब दोरी. (२) घोडे बांधण्याची जागा; तबेला; पागा. (३) मोत्यांचा हार.

तशक्की (تشکی) स्त्री. ('अ.) तक्रार करणे. पाहा 'शिकायत'.

तशक़्क़ुक़ (تشقق) पु. ('अ.) फाटणे; चिरणे; भेग पडणे. पाहा 'शक़'.

तशक्कुक (تشکک) पु. ('अ.) भ्रमात पडणे; शंका येणे; शंका; संदेह; भ्रम.

तशक्कुर (تشکر) पु. ('अ.) आभार मानणे; धन्यवाद देणे. पाहा 'शुक्रियः'.

तशक्कुल (تشکل) पु. ('अ.) साकार बनणे; आकार धारण करणे.

तशख़्ख़ुस़ (تشخص) पु. ('अ.) (१) नक्की, निश्चित होणे. (२) श्रीमंती.

तशत्तुत (تشتت) पु. ('अ.) विसकटणे; अस्ताव्यस्त होणे; विखुरणे.

तशद्दुद (تشدد) पु. ('अ.) (१) हिंसा; मारहाण. (२) सक्ती; आक्रमण; बळजबरी. (३) कठोरता. **'अदम-ए-तशद्दुद** (عدم تشدد) पु. ('अ.) अहिंसा.

तशन्नुज (تشنج) पु. ('अ.) आखडणे (हात, पाय वगैरे); पेटका; झटका.

तशफ़्फ़ी (تشفی) स्त्री. ('अ.) (१) सांत्वन; समाधान. (२) रोगमुक्ती; आरोग्यप्राप्ती.

तशब्बुह (تشبہ) पु. ('अ.) सादृश्य; एकरूपता. पाहा 'तश्बीह'.

तशयी'अ (تشیع) पु. ('अ.) (१) स्वतःला 'शी'आ' (शिया) म्हणवून घेणे; शिया पंथाचा स्वीकार करणे. (२) अनुयायित्व करणे.

तशर्रु'अ (تشرع) पु. ('अ.) शरीअत (धर्मशास्त्र) प्रमाणे वागणे.

तशह्हुद (تشہد) पु. ('अ.) 'कलिमः-ए-शहादत' चा मंत्र म्हणणे. पाहा 'कलिमः'.

तशा'उर (تشاعر) पु. ('अ.) आपण शायर (कवी) आहोत असे सांगणे; कवी असल्याची बतावणी करणे.

तशाबुह (تشابہ) पु. ('अ.) (१) एकमेकांसारखे असणे; साम्य असणे. (२) कुराणातील वाक्ये

एकमेकांसारखी असल्यामुळे कुराणपठण करणाऱ्याने वाटेल ते वाक्य वाटेल तिथे नेऊन जोडणे.

तशावुर (تشاور) पु. ('अ.) आपसात सल्लामसलत करणे; विचारविनिमय.

तश्कीक (تشکیک) स्त्री. ('अ.) शंका; भ्रम निर्माण करणे.

तश्कील (تشکیل) स्त्री. ('अ.) आकृती बनविणे; आकार देणे. **–देना** (– دینا) साकार बनविणे; घडविणे; अंमलात आणणे.

तश्ख़ीस़् (تشخیص) स्त्री. ('अ.) (१) नेमणूक; नियुक्ती. (२) नक्की करणे; ठरविणे; निदान करणे. (३) मूल्यमापन करणे.

तश्ख़ीस़्-ए-मर्ज़ (تشخیص مرض) स्त्री. ('अ.) रोग-निदान.

तश्त (تشت) पु. (फ़ा.) (१) मोठे तबक; थाळी; परात. (२) तस्त; पिकदाणी. **–अज़ बाम होना** (– از بام ہونا) जगज़ाहीर होणे; बिंग फुटणे.

तश्तरी (تشتری) स्त्री. (फ़ा.) थाळी; ताटली; तबक; बशी.

तश्दीद (تشدید) स्त्री. ('अ.) (१) एक अक्षर दोनदा वाचणे किंवा लिहिणे; द्वित्व. (२) उर्दू लिपीतील द्वित्वाचे चिन्ह. (ّ) [उदा. 'क्क' (کّ)].

तश्नगी (تشنگی) स्त्री. (फ़ा.) (१) तहान; तृष्णा. (२) अभिलाषा.

तश्नी'अ (تشنیع) स्त्री. ('अ.) (१) निंदा; नालस्ती; कुचाळकी. (२) टोमणा. (३) ठपका; खरडपट्टी.

तश्नः (تشنہ) वि. (फ़ा.) (१) तहानेला; तृषित; अतृप्त. (२) उत्कट अभिलाषा बाळगणारा. **–काम** (– کام) वि. (फ़ा.) ज्याचे मनोरथ सफल झालेले नाहीत असा; अतृप्त. **–जिगर** (– جگر) वि. (फ़ा.) अयशस्वी; भग्नमनोरथ. **–लब** (– لب) वि. (फ़ा.) तहानेने ज्याचे ओठ कोरडे पडले आहेत असा; अत्यंत तहानेला.

उम्मीद-ए-लुत़्फ़ आप से है इक ख़याल-ए-ख़ाम।
कब तश्नः लब की प्यास बुझी है सराब से॥

तश्नः-ए-ख़ून (تشنۂ خون) वि. (फ़ा.) (१) रक्त-पिपासू; रक्तप्रिय; हिंसक; हिंस्र. (२) जानी दुष्मन; हाडवैरी.

तश्नः-ए-दीदार (تشنۂ دیدار) वि. (फ़ा.) दर्शनाभिलाषी; दर्शनाचा भुकेला.

तश्बीह (تشبیہ) स्त्री. ('अ.) उपमा (अलंकार); दृष्टांत; दाखला.

तश्बीह-ए-ताम (تشبیہ تام) स्त्री. ('अ.) पूर्णोपमा.

तश्बीह-ए-नाक़िस़् (تشبیہ ناقص) स्त्री. ('अ.) लुप्तोपमा.

तश्रीफ़ (تشریف) स्त्री. ('अ.) (१) प्रतिष्ठा; सन्मान; महत्त्व. (२) सन्मानाची वस्त्रे वगैरे; मानाचा पोषाख. (३) पदार्पण; आगमन; शुभागमन. **–अर्ज़ानी** (– ارزانی); **–आवरी** (– آوری) स्त्री. (फ़ा.) आगमन करणे; पदार्पण करणे; विराजमान होणे. **–फ़र्मा'ई** (– فرمائی) स्त्री. (फ़ा.) थांबणे; बसणे; विराजमान होणे. **–बरी** (– بری) स्त्री. (फ़ा.) परत जाणे; निरोप घेणे. **–फ़रमाना** (– فرمانا); **–रखना** (– رکھنا) बसणे; विराजमान होणे. **–लाना** (– لانا) आगमन करणे; येणे. **–ले जाना** (– لے جانا) परत जाणे; निघून जाणे.

तश्रीफ़ात (تشریفات) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) मिरवणूक; स्वारी. (२) मानाची वस्त्रे. **–बुर्दन** (– بردن) क्रि. ('अ.+फ़ा.) मरणे; परलोकी जाणे.

तश्रीफ़ाती (تشریفاتی) पु. ('अ. + फ़ा.) सरकारी स्वारीतील नोकर मंडळी.

तश्रीह् (تشریح) स्त्री. ('अ.) (१) स्पष्टीकरण; खुलासा. (२) भाष्य; टीका; टिप्पणी. (३) भाषांतर. (४) शरीरशास्त्र; शारीर. **–उल्-अब्दान** (– الابدان) स्त्री. ('अ.) (१) शरीरशास्त्र. (२) मृत शरीराची चिरफाड.

तश्वीश (تشویش) स्त्री. ('अ.) (१) चिंता; काळजी; विवंचना. (२) त्रास; जिकीर. (३) भीती. (४) व्याकुळता; बेचैन. **–अंगेज़** (– انگیز) वि. ('अ. + फ़ा.) चिंताजनक. **–नाक** (– ناک) वि. ('अ. + फ़ा.) (१) काळजी करण्यासारखा. (२) धोक्याचा.

तश्हीर (تشہیر) स्त्री. ('अ.) (१) एखाद्याला सार्वजनिकरीत्या बदनाम करणे. (गाढवावरून धिंड काढणे वगैरे मार्गांनी). (२) जाहीर करणे; दवंडी पिटणे.

तसख़्ख़ुर (تسخر) पु. ('अ.) (१) मस्करी. (२) टर; उपहास.

तस़द्दुक़ (تصدق) पु. ('अ.) (१) बलिदान; समर्पण. (२) दानधर्म. (३) दया; कृपा; अनुकंपा. (४) बळी; ओवाळून टाकणे.

जिस जगह देख लिया जान तस़द्दुक़ कर दी।
मैं तो पाबन्द नहीं क'अबे या बुतख़ाने का॥

तस़न्नु'अ (تصنع) पु. ('अ.) (१) कृत्रिमता; बनावटीपणा; बाह्य अवडंबर. (२) कारागिरी. (३) शृंगार; सजावट. (४) कपट. (५) खुशामत.

तसन्नुन (تسنن) पु. ('अ.) सुन्नी बनणे; मुहम्मद साहेबांचे अनुयायित्व पत्करणे.

तस़र्रुफ़ (تصرف) पु. ('अ.) (१) खर्च; वापर. (२) अधिकार; कबजा. (३) परिवर्तन; बदल.

(४) अपहार; अफरातफर. (५) काटछाट करून वापरणे. (६) चमत्कार; करामत.

तसर्रुफ़-ए-बेजा (تصرف بےجا) पु. ('अ. + फ़ा.) गैरवापर; अपहरण.

तसल्ली (تسلی) स्त्री. ('अ.) (१) समाधान; संतोष. (२) सांत्वन; धीर.

तसल्लुत् (تسلط) पु. ('अ.) अधिकार; कबजा; प्रभुत्व.

तसल्सुल (تسلسل) पु. ('अ.) निरंतरता; शृंखलाबद्धता; अखंडता.

तसव्वुफ़ (تصوف) पु. ('अ.) (१) 'सूफ़ी' पंथाचे तत्त्वज्ञान; ब्रह्मवाद; अध्यात्मवाद. (२) वेदांत; ज्ञानमार्ग. (३) वैराग्य. (४) भक्तिमार्ग.

तसव्वुर (تصور) पु. ('अ.) (१) ध्यान; चिंतन; लक्ष. (२) विचार; कल्पना.

तसादुम (تصادم) पु. ('अ.) (१) टक्कर. (२) संघर्ष; लढाई. (३) हानी.

तसानीफ़ (تصانیف) स्त्री. ['अ. 'तस्नीफ़' (تصنیف) चे अनेक.] लिखाणे; पुस्तके; ग्रंथ; साहित्य; कृती.

तसाबीह् (تسابیح) स्त्री. ['अ. 'तस्बीह' (تسبیح) चे अनेक.] जपमाळा.

तसामुह् (تسامح) पु. ('अ.) (१) वीरता; बहादुरी. (२) दुर्लक्ष; चुकीचे ऐकणे. (३) सोपे करणे; समजणे. (४) आपसात सज्जनपणाने वागणे. (५) निष्पक्षपणा; तटस्थता.

तसावी (تساوی) स्त्री. ('अ.) समानता; बरोबरी.

तसावीर (تصاویر) स्त्री. ['अ. 'तस्वीर' (تصویر) चे अनेक.] तसबिरी; चित्रे.

तसाहुल (تساهل) पु. ('अ.) (१) आळस; सुस्ती. (२) सोपे समजणे. (३) दुर्लक्ष.

तस्कीन (تسکین) स्त्री. ('अ.) (१) संतोष; समाधान. (२) सांत्वन; धीर. (३) उतार (आजारातील); बरे वाटणे. (४) एखाद्या स्वरयुक्त अक्षराला व्यंजन किंवा 'हलन्त' बनविणे. पाहा 'साकिन' **–बख्श** (بخش –) वि. ('अ. + फ़ा.) (१) संतोषदायक. (२) धीर देणारा.

तस्ख़ीर (تسخیر) स्त्री. ('अ.) (१) ताबा मिळविणे; कबजात घेणे; जिंकणे. (२) भुताखेताने वश करून घेणे. (३) मोहित करणे; जादू करणे.

तस्ख़ीर-ए-क़ुलूब (تسخیر قلوب) स्त्री. ('अ.) लोकांची मने जिंकणे.

तस्ख़ीर-ए-हमज़ाद (تسخیر همزاد) स्त्री. ('अ.+फ़ा.) मंत्राच्या सामर्थ्याने 'हमज़ाद' नावाच्या वेताळाला प्रसन्न करून घेणे. 'हमज़ाद' वश झाला की माणूस वाटेल ते करू शकतो.

तस्जील (تسجیل) स्त्री. ('अ.) (१) कर्जरोखा; दस्तऐवज लिहिणे. (२) नोंदणी करणे; रजिस्टर करणे.

तस्दी'अ (تصدیع) स्त्री. ('अ.) (१) डोकेदुखी; कटकट. (२) त्रास; तसदी.

तस्दीक़ (تصدیق) स्त्री. ('अ.) (१) सत्यपरीक्षा; सत्यनिर्णय. (२) पुष्टी; समर्थन; बळकटी; आधार. (३) पुरावा. (४) खरेपणा. **–बिला तस्व्वुर** (بلا تصور –) स्त्री. ('अ.+फ़ा.) गृहीत धरणे; पूर्वकल्पना.

तस्निय: (تثنیہ) पु. ('अ.) द्विवचन. (संस्कृत व अरबी या भाषांमध्ये द्विवचन आहे. याचा उपयोग विशेषणासारखा केला जातो).

तस्नीफ़ (تصنیف) स्त्री. ('अ.) (१) पुस्तक लिहिणे; लिखाण; कृती; कविता; रचना. (२) कपोलकल्पित गोष्ट; काल्पनिक गोष्ट. **–करना** (کرنا –) लिहिणे; रचणे. **हुक़ूक़-ए-तस्नीफ़** (حق تصنیف) लिखाणाचा सर्वाधिकार. [अनेक 'तस्नीफ़ात' (تصنیفات) पुस्तके; लिखाणे].

तस्नीम (تسنیم) पु. स्त्री. ('अ.) स्वर्गातील एका झऱ्याचे किंवा कालव्याचे नाव.

तस्फ़िय: (تصفیہ) पु. ('अ.) (१) निर्णय; निवाडा; निकाल. (२) आपसातील तडजोड; समझोता; गैरसमज दूर होणे; खुलासा. (३) शुद्ध, स्वच्छ करणे; मनातील किल्मिष दूर करणे. **–तलब** (طلب –) वि. ('अ.+फ़ा.) ज्यांचा निर्णय किंवा खुलासा होणे आवश्यक आहे अशा गोष्टी. **–नाम:** (نامہ –) पु. ('अ. + फ़ा.) (१) निकालपत्र. (२) तडजोडपत्र.

तस्बीह् (تسبیح) स्त्री. ('अ.) (१) 'सुब्हान् अल्लह' (ईश्वर अत्यंत पवित्र आहे) असे म्हणणे; या मंत्राचा जप करणे. (२) जपमाळ. **–ख़्वाँ** (خواں –) वि. ('अ.+फ़ा.) 'सुब्हान'ल्लह' हा मंत्र जपणारा; जप करणारा. **–पढ़ना** (پڑھنا –); **–फेरना** (پھیرنا –) जप करणे; माळेतील मणी मोजीत देवाचे नाव घेणे.

तस्मः (تسمہ) पु. (फ़ा.) (१) कातडी पट्टा; वादी. (२) बुटाचे बंद. (३) कातडी चाबूक; हंटर. **–कश** (کش –) वि. (फ़ा.) गळ्याला फास लावून ठार मारणारा; ठग; मांग. **–खींचना** (کھینچنا –) गळा दाबून ठार मारणे. **–पा** (پا –) वि. (फ़ा.) ज्याच्या पायात वादी किंवा दोरी बांधली आहे असा. **–बाज़** (باز –) वि. (फ़ा.) (१) कपटी; फसव्या.

(२) जुगारी. **–बाज़ी** (بازی –) स्त्री. (फ़ा.) (१) कपट. (२) एक प्रकारचा जुगार.

तस्मियः (تسمیہ) पु. ('अ.) 'बिस्मिल्लह' (ईश्वराच्या नावाने) असे म्हणणे; सुरुवात करणे; मुलाचे नाव ठेवणे; नामकरण. **–ख्वानी** (خوانی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) मुलाला शाळेत घालणे. शिक्षणास प्रारंभ करणे; श्रीगणेशा करणे; विद्यारंभ.

तस्मीम (تصمیم) स्त्री. ('अ.) दृढ, मजबूत बनविणे.

तस्लीख़ (تسلیخ) स्त्री. ('अ.) कातडे सोलणे; कातडे काढणे.

तस्लीब (تصلیب) स्त्री. ('अ.) सुळावर चढविणे; फाशी देणे.

तस्लीम (تسلیم) स्त्री. ('अ.) (१) सलाम, प्रणाम करणे. (२) स्वीकार; मान्य करणे. (३) आज्ञापालन करणे. (४) सोपविणे; सुपूर्द करणे.

तस्लीमात (تسلیمات) स्त्री. ['अ. 'तस्लीम' (تسلیم) चे अनेक.] अनेक नमस्कार. (हा शब्द एकवचनी वापरला जातो).

तस्लीस़ (تثلیث) स्त्री. ('अ.) (१) तीन भाग करणे. (२) त्रिमूर्ती; ख्रिश्चनांचे तीन देव. (पिता, पुत्र व पवित्र आत्मा).

तस्वियः (تسویہ) पु. ('अ.) (१) समान; बरोबर करणे. (२) सरळ करणे.

तस्वीद (تسوید) स्त्री. ('अ.) (१) काळे करणे; पांढऱ्यावर काळे करणे. (२) लिहिणे. (३) कच्चा मसुदा तयार करणे; आराखडा.

तस्वीर (تصویر) स्त्री. ('अ.) (१) चित्र; तसबीर. (२) छायाचित्र; फोटो. (३) प्रतिमा; मूर्ती; मूर्तिमंत सौंदर्य. **–कशी** (کشی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) चित्रकारी; चित्र काढणे. **–ख़ानः** (خانہ –) पु. ('अ. + फ़ा.) (१) चित्रशाळा; चित्रमंदीर. (२) चित्रप्रदर्शनालय. (३) जेथे अनेक सुंदर स्त्रिया आहेत असे स्थान.

तस्वीर-ए-'अक्सी (تصویر عکسی); **'अक्सी तस्वीर** (عکسی تصویر) स्त्री. ('अ.) छायाचित्र; फोटो.

तस्वीर-ए-ख़याली (تصویر خیالی); **ख़याली तस्वीर** (خیالی تصویر) स्त्री. ('अ.) काल्पनिक चित्र; कल्पनेने स्फुरलेले चित्र.

तस्वीर-ए-गिली (تصویر گلی) स्त्री. ('अ.+फ़ा.) मातीची मूर्ती.

तस्वीर-ए-नीमरुख़ (تصویر نیم رخ) स्त्री. ('अ.+फ़ा.) चेहऱ्याचे एका बाजूने घेतलेले किंवा रेखाटलेले चित्र.

तस्हील (تسہیل) स्त्री. ('अ.) सुगम, सोपे बनविणे; सरलता.

तस्हील-ए-विलादत (تسہیل ولادت) स्त्री. ('अ.) बाळंतपणाची सुगमता; सोपे असलेले बाळंतपण.

तस्हीह़ (تصحیح) स्त्री. ('अ.) (१) शुद्ध, दुरुस्त करणे: सुधारणे. (२) ताडून पाहाणे; प्रूफ पाहाणे.

तह (تہ) स्त्री. (फ़ा.) (१) तळ; खालचा भाग; पाया (२) घडी; थर. (३) थांग; अंत. (४) बूड. (५) रहस्य; गहन अर्थ. (६) गाळ. **–ख़ानः** (خانہ –) पु. ('अ.) तळघर. **–ए-जुर्अः** (جرعہ –) स्त्री. (फ़ा.+'अ.) पाणी, मदिरा वगैरेचा खाली उरलेला गाळ; उच्छिष्ट. **–दार** (دار –) वि. ('अ.) अर्थपूर्ण; गूढ; गंभीर. **–देगी** (دیگی –) स्त्री. (फ़ा.) भांड्याच्या तळाशी असलेली खरवड. **–देना** (دینا –) रंगाचा वगैरे हलका किंवा पातळ थर देणे. **–नशी** (نشیں –); **–नशीन** (نشین –) वि. (फ़ा.) (१) खाली बसलेला. (२) तळाला उरलेला (गाळ). **–निशान** (نشان –) पु. (फ़ा.) तलवारीच्या मुठीवरील सोन्याचांदीची कलाकुसर. **–पेच** (پیچ –) पु. (फ़ा.) पगडीच्या खाली (आत) घालावयाची टोपी किंवा कापड; लुंगीच्या आतील बाजूस नेसावयाचे कापड किंवा कपडा; पागोटघाचे आधी बांधावयाचे टोक. **–पोश** (پوش –) पु. (फ़ा.) साडीच्या आत नेसावयाची चड्डी; अंडरवेअर. **–बंद** (بند –) पु. (फ़ा.) (१) लुंगी. (२) कमरेखाली नेसावयाचे वस्त्र; अधोवस्त्र. **–बंदी** (بندی –) स्त्री. (फ़ा.) (१) पुस्तकांच्या बांधणीचा एक प्रकार. (प्रत्येक फॉर्म स्वतंत्रपणे शिवणे; सेक्शन शिलाई). (२) कापड रंगविण्यापूर्वी पार्श्वभूमी म्हणून दुसरा एक रंग देणे. **–ब.तह** (بہ تہ –) अव्य. (फ़ा.) एकाखाली एक; थराबर थर; घडया घालून. **–बाज़ारी** (بازاری –) स्त्री. (फ़ा.) बाजारातील फूटपाथवर किंवा रस्त्यावर बसणाऱ्या दुकानदारांकडून घेतला जाणारा कर किंवा जागा-भाडे. **–मद** (مد –) स्त्री. (फ़ा.+ह़ि.) लुंगी; पंचा. **–मैदानी** (میدانی –) पु. (फ़ा.) घरदार नसलेला; भटक्या.

तह-ए-आब (تہ آب) स्त्री. (फ़ा.) पाण्याचा तळ.

तह-ए-ख़ाक (تہ خاک) अव्य. (फ़ा.) जमिनीखाली; थडग्यामध्ये.

तह-ए-तेग़ (تہ تیغ) वि. (फ़ा.) तलवारीने मारला गेलेला; ठार झालेला.

तह-ओ-बाला (تہ و بالا) अव्य. वि. (फ़ा.) (१) वरचे खाली व खालचे वर; उलटसुलट; उलथेपालथे. (२) उध्वस्त; अस्ताव्यस्त.

तह़क़ीक़ (تحقیق) स्त्री. ('अ.) (१) चौकशी; तपास; शोध; संशोधन. (२) ताडून किंवा पारखून पाहाणे; नक्की करणे. (३) सत्य; वस्तुस्थिती.

(वि.) (१) निश्चित; नक्की. (२) प्रमाणित. [अनेक 'तहक़ीक़ात' (تحقیقات) चौकशी. हा शब्द एकवचनीच वापरला जातो].

तहक़ीक़-ए-हक़्क़ (تحقیق حق) स्त्री. ('अ.) सत्याचा शोध.

तहक़ीर (تحقیر) स्त्री. ('अ.) (१) अपमान; अनादर; बेअब्रू. (२) घृणा; उपेक्षा.

तहक्कुम (تحکم) पु. ('अ.) (१) हुकूमशाही करणे; जुलूम करणे. (२) सत्ता.

तहज़ीक़ (تحذیق) पु. ('अ.) शहाणपणाचा आव आणणे.

तहज़ीब (تہذیب) स्त्री. ('अ.) (१) सभ्यपणा; शिष्टाचार. (२) संस्कृती; सुसंस्कृतपणा. (३) सुस्वभाव. **–याफ़्तः** (یافتہ –) वि. ('अ. + फ़ा.) सुसंस्कृत; सुसभ्य.

तहज़ीब-ए-अख़्लाक़ (تہذیب اخلاق) स्त्री. ('अ.) शिष्टाचार; संस्कृती; सुसंस्कृतपणा; सद्वर्तन.

तहज़ीब-ए-जदीद (تہذیب جدید) स्त्री. ('अ.) नवीन संस्कृती; आधुनिक, पाश्चात्य, नवे शिष्टाचार.

तहज़ीर (تحذیر) पु. ('अ.) (१) भिवविणे; भीती दाखविणे. (२) ताकीद देणे.

तहज्जी (تہجی) स्त्री. ('अ.) (१) निदानालस्ती करणे; विडंबन. (२) शब्दाचे हिज्जे (शुद्धलेखन) करणे. **हुरूफ़-ए-तहज्जी** (حروف تہجی) पु. ('अ.) वर्णमाला; मुळाक्षरे.

तहज्जुद (تہجد) पु. ('अ.) (१) मध्यरात्री नंतरची नमाज (प्रार्थना). (२) रात्री झोपणे व रात्रीच उठणे.

तहज्जुन (تحزن) पु. ('अ.) शोकग्रस्त, दुःखी होणे.

तहज्जुर (تحجر) पु. ('अ.) दगडाप्रमाणे टणक किंवा कठोर होणे.

तहत (تحت) वि. अव्य. ('अ.) (१) खाली; हाताखाली; हाताखालचा; अधीन. (२) ताब्यातील. (पु.) (१) अधिकार; कबजा; ताबा. (२) पराधीनता. **–ए-तसर्रुफ़** (– تصرف) पु. ('अ.) **–ए-फ़र्मान** (– فرمان) पु. ('अ. + फ़ा.) ताबा; सत्ता; अधीनता. **–ए-लफ़्ज़ी** (– لفظی) वि. ('अ.) शाब्दिक; शब्दशः **–ए-हुकूमत** (– حکومت) पु. ('अ.) अधिकारक्षेत्र. **–में आना** (– میں آنا) आधिपत्याखाली येणे. **–में रखना** (– میں رکھنا) ताब्यात ठेवणे. **–में लाना** (– میں لانا) ताब्यात आणणे; जिंकून घेणे.

तहत-उल्-लफ़्ज़ (تحت اللفظ) पु. ('अ.) काव्यपाठ; कविता गाऊन न म्हणता गद्याप्रमाणे वाचणे.

तहत-उश्-शु'आ'अ (تحت الشعاع) पु. ('अ.) ज्यावेळी चंद्र न दिसण्याइतका लहान असतो असे दोन किंवा तीन दिवस. (वद्य चतुर्दशी, अमावास्या व शुद्ध प्रतिपदा). हे दिवस अशुभ मानले जातात.

तहत-उस्-सरा (تحت الثریٰ) पु. ('अ.) पृथ्वीचा सर्वांत खालचा भाग; पाताळ.

तहतानी (تحتانی) पु. ('अ.) ज्या अक्षरांच्या खाली नुक्ते (टिंबे) आहेत अशी उर्दू अक्षरे (ب، پ، ج) वगैरे.

तहती (تحتی) अव्य. ('अ.) खाली दिल्याप्रमाणे. **दफ़'अ-ए-तहती** (دفعہ تحتی) स्त्री. ('अ.) पोटकलम.

तहत्तुक (تہتک) पु. ('अ.) (१) बेइज्जती; बेअब्रू; अपमान. (२) भांडण; हमरीतुमरी.

तहदियः (تہدیہ) पु. ('अ.) (१) भेट; उपहार; उपायन. (२) भेट देणे.

तहदीद (تہدید) स्त्री. ('अ.) (१) भीती दाखविणे; भिवविणे. (२) निर्भर्त्सना.

तहदीद (تحدید) स्त्री. ('अ.) (१) हद्द निश्चित करणे; मर्यादित करणे. (२) तीव्र करणे; वेग वाढविणे.

तहदीस़ (تحدیث) स्त्री. ('अ.) (१) संभाषण करणे; बोलणे. (२) 'हदीस़' या धर्मग्रंथाचे पठण अथवा विवेचन करणे.

तहफ़्फ़ुज़ (تحفظ) पु. ('अ.) (१) रक्षण; राखण. (२) बचाव.

तहफ़्फ़ुज़-ए-हक़ूक़ (تحفظ حقوق) पु. ('अ.) हक्कांचे संरक्षण; अधिकार रक्षण.

तहब्बुज (تہبج) पु. ('अ.) थोडीशी सूज येणे.

तहमतन (تہمتن) वि. (फ़ा.) (१) बहादूर; वीर; महारथी. (२) रुस्तमची पदवी. [अरबी 'तहम' (تہم) वयस्क, थोर व बलवान मनुष्य. या शब्दाला 'तन' (تن) शरीर हा शब्द जोडून फारसीवाल्यांनी हा शब्द बनविला आहे].

तहमतनी (تہمتنی) स्त्री. ('अ.) शौर्य; बहादुरी.

तहमीद (تحمید) स्त्री. ('अ.) 'हम्द' (स्तुती) करणे; प्रशंसा.

तहम्मुल (تحمل) पु. ('अ.) (१) सहिष्णुता; सहनशीलता; धैर्य. (२) नम्रता. (३) गांभीर्य.

तहय्युर (تحیر) पु. ('अ.) आश्चर्य; अचंबा; विस्मय.

तहरीक (تحریک) स्त्री. ('अ.) (१) गती देणे; चालना देणे; प्रवृत्त करणे; हालचाल. (२) चळवळ; आंदोलन. (३) ठराव; प्रस्ताव. (४) फूस; भडकावणे. (५) उत्तेजन; प्रोत्साहन.

तहरीफ़ (تحریف) स्त्री. ('अ.) (१) अक्षरांत फेरफार करून अर्थ बदलणे; 'ध' चा 'मा' करणे. (२) एखाद्या वस्तूचा आकार व बाह्यरूप बदलणे. (३) लिहिण्यातील चूक. पाहा 'हर्फ़'.

तहरीम (تحریم) स्त्री. ('अ.) (१) एखादी गोष्ट निषिद्ध (हराम) किंवा त्याज्य ठरविणे. (२) कमावणे (कातडे); पवित्र करणे.

तहरीमः (تحریمہ) पु. ('अ.) (१) नमाजाला सुरुवात करण्यापूर्वी 'अल्लहो अकबर' हा मंत्र म्हणणे. (२) यात्रेकरूचे (हजला जाण्याचे) कपडे घालणे.

तहरीर (تحریر) स्त्री. ('अ.) (१) लिहिणे; लेखन; लिखाण. (२) अक्षर; लिखावट; लिहिण्याची मोड, शैली; लपेटा. (३) लेखी पुरावा; दस्त-ऐवज. (४) लेखनशैली. (५) बारीक रेघ, रेषा. (६) सुरम्याची रेघ (डोळ्यांत सुरमा घालताना बनणारी). (७) सनद; प्रमाणपत्र. (८) लिखाणाची मजुरी; लेखन-पारिश्रमिक. (९) पत्र; चिठ्ठी. (१०) गुलामांना बंधमुक्त करणे. (११) गाण्याचा आवाज. (१२) चित्रकला; नक्षीकाम. (१२) भूमिती. **–करना** (کرنا –) (१) लिहिणे. (२) नमूद करणे. **–होना** (ہونا –) लिहिले जाणे; नमूद होणे.

तहरीर-ए-उक़्लीदिस (تحریر اُقلیدس) स्त्री. ('अ.) भूमितीची मूलतत्त्वे.

तहरीर-ए-ज़हरी (تحریر ظہری) स्त्री. ('अ.) दस्तऐवज; हुंडी (चेक) वगैरेच्या पाठीवर शेरा लिहून सही करणे.

तहरीरन् (تحریراً) अव्य. ('अ.) लेखी स्वरूपात; लिखित.

तहरीरी (تحریری) वि. ('अ.) लेखी; लिखित.

तहरीस् (تحریص) स्त्री. ('अ.) लालूच दाखविणे; प्रलोभन; प्रेरणा; लालूच.

तहर्रुक (تحرک) पु. ('अ.) हालचाल करणे; गती.

तहलुकः (تہلکہ) पु. ('अ.) (१) खळबळ; धुमाकूळ; घबराट; गोंधळ. (२) मृत्यू; नाश.

तहलील (تحلیل) स्त्री. ('अ.) (१) विरघळणे; (२) पचणे. (३) क्षीणता; दौर्बल्य.

तहलील (تہلیل) स्त्री. ('अ.) 'ला इलह इल्ल'ल्लह' (لاالٰہ الاّ اللہ) (एका ईश्वराखेरीज दुसरा ईश्वर नाही) हा मंत्र म्हणणे; ईशस्तुती करणे.

तहवील (تحویل) स्त्री. ('अ.) (१) हवाली करणे; सोपविणे. (२) अनामत ठेव. (३) फिरणे; फिरविणे. (४) रोकड जमा; जमाखर्चाच्या वहीत लिहिली जाणारी रोख शिल्लक. (५) खजिना; मुद्दल. (६) सूर्य, चंद्र वगैरे ग्रहांचा एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश; संक्रमण. **–ए-तसर्रुफ़** (تصرف –) स्त्री. ('अ.) अपहार; द्रव्यापहार. **–दार** (دار –) पु. ('अ.+फ़ा.) खजीनदार; कोषाध्यक्ष.

तहवील-ए-आफ़ताब (تحویل آفتاب) स्त्री. ('अ.+फ़ा.) सूर्याचा एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश; संक्रमण.

तहव्वुर (تہور) पु. ('अ.) बहादुरी; शौर्य. **–शि'आर** (شعار –) वि. ('अ.) शूर.

तहशियः (تحشیہ) पु. ('अ.) (१) भर घालणे. (२) एखाद्या ग्रंथाला पादु-टीपा किंवा तळ-टीपा लिहिणे.

तहश्शुम (تحشم) पु. ('अ.) (१) खूप नोकरचाकर असणे; रुबाब दाखविणे. (२) क्रोध व्यक्त करणे.

तहसीन (تحسین) स्त्री ('अ.) स्तुती; प्रशंसा; वाहवा. **खिराज-ए-तहसीन** (خراج تحسین) पु. ('अ.) प्रशंसांजली; मानपत्र; आदरांजली.

तहसीन-ए-तलफ़्फ़ुज़ (تحسین تلفظ) स्त्री. ('अ.) शाब्दिक स्तुती.

तहसीन-ए-नाशनास (تحسین ناشناس) स्त्री. ('अ.+फ़ा.) अनभिज्ञ व्यक्तीने केलेली स्तुती.

तहसील (تحصیل) स्त्री. ('अ.) (१) प्राप्त करणे; मिळविणे. (२) गोळा करणे; जमविणे. (३) सारा; सारा वसुली. (४) प्राप्ती; फायदा. (५) तालुका; तहसील. (६) मामलेदार कचेरी. (७) सारांश; तात्पर्य. **–दार** (دار –) पु. ('अ.+फ़ा.) मामले-दार. **–दारी** (داری –) स्त्री. ('अ. + फ़ा.) मामलेदाराचा हुद्दा, काम अथवा अधिकारक्षेत्र.

तहसील-ए-'इल्म (تحصیل علم) स्त्री. ('अ.) विद्योपार्जन.

तहसील-ए-ख़ाम (تحصیل خام) स्त्री. ('अ. + फ़ा.) जमीनदारीची सर्व रक्कम.

तहसील-ए-ज़र (تحصیل زر) स्त्री. ('अ.+फ़ा.) पैसा मिळविणे; धनोपार्जन.

तहसील-ए-हासिल (تحصیل حاصل) स्त्री. ('अ.) जे मिळालेले आहे, तेच मिळविण्याचा प्रयत्न करणे; निरर्थक धडपड.

तहस्सुर (تحسر) पु. ('अ.) (१) दुःख. (२) खेद; पश्चात्ताप.

तहा'इफ़ (تحائف); **तहायफ़** (تحایف) पु. [अ. 'तुहफ़ः' (تحفہ) चे अनेक.] भेटी; नजराणे.

तहारत (طہارت) स्त्री. ('अ.) (१) नमाजापूर्वी हात-पाय धुणे; स्नान. (२) शौच; 'इस्तिंजा'; शरीर-शुद्धी. (३) पावित्र्य; शुद्धता.

तहालुफ़ (تحالف) पु. ('अ.) (१) एखाद्या कटाची आपसात शपथ घेणे. (२) आणाभाका; शपथेवर खरे सांगणे.

तहावुर (تحاور) पु. ('अ.) एकमेकांना उत्तर देणे; संभाषण.

तहाशी (تحاشی) स्त्री. ('अ.) (१) कडेला होणे; बाजूस राहाणे. (२) कंटाळा; घृणा. यापासून फारसीतील बनलेला शब्द 'बेतहाशा' पाहा.

तहियत (تحیت) स्त्री. ('अ.) (१) सलाम; प्रणाम. (२) जीवन दान करणे; जीवदान; दीर्घायुषी होणे. (३) सत्ता; राज्य. [अनेक 'तहियात' (تحیات) प्रणाम; मागणे (देवाकडे)].

तहियः (تہیہ) पु. ('अ.) (१) तयारी; तत्परता. (२) निर्धार; निश्चय; संकल्प.

तहूर (طہور) वि. ('अ.) (१) पवित्र; शुद्ध; निर्मळ. (२) पवित्र बनविणारा.

ता (تا) अव्य. (फ़ा.) (१) पर्यंत; जोपर्यंत; तोपर्यंत. (२) वाह ! पाहा ! बापरे ! (प्रत्य.) (१) मात्र; केवळ; अनुपम. [उदा. 'यकता' (یکتا) वि. (फ़ा.) अद्वितीय.] (२) थर; पट. [उदा. 'दोता' (دوتا) वि. (फ़ा.) दुहेरी; जाड]. **–कि.** (کہ –) अव्य. (फ़ा.) यासाठी; यामुळे; अशासाठी की. **–कुजा** (کجا –) अव्य. (फ़ा.) कोठपर्यंत ? केव्हापर्यंत ? **–चंद** (چند –) अव्य. (फ़ा.) कुठवर ? किती ? **–चंदबार** (چندبار –) अव्य. (फ़ा.) किती वेळा ? कितीदा ? **–ज़िंदगी** (زندگی –) अव्य. (फ़ा.) जन्मभर; आमरण. **–ज़ीस्त** (زیست –) अव्य. (फ़ा.) जन्मभर; आजन्म; आजीवन. **–दम** (دم –) अव्य. (फ़ा.) जिवात जीव असेपर्यंत. **–दम-ए-ज़ीस्त** (دم زیست –) अव्य. (फ़ा.) शेवटचा श्वास असेपर्यंत; जन्मभर. **–ब.इम्कां** (بہ امکاں –) अव्य. (फ़ा.+'अ.) यथासंभव; यथाशक्ती. **–ब.कमर** (بہ کمر –) अव्य. (फ़ा.) कमरेपर्यंत. **–ब.कुजा** (بہ کجا –); **–ब.कै** (بہ کے –) अव्य. (फ़ा.) कोठपर्यंत ? कुठवर ? **–ब.खानः** (بہ خانہ –) अव्य. (फ़ा.) घरापर्यंत. **–ब.गुलू** (بہ گلو –) अव्य. (फ़ा.) गळ्यापर्यंत. **–ब.ज़ीस्त** (بہ زیست –) अव्य. (फ़ा.) आजन्म; जीवनभर. **–ब.मक़्दूर** (بہ مقدور –) अव्य. (फा.) यथाशक्ती; शक्यतो. **–ब.हद्दे** (بہ حدے –) अव्य. (फ़ा.+'अ.)या (ज्या) मर्यादेपर्यंत. **–ब.हयात** (بہ حیات –) अव्य. (फ़ा. + 'अ.) जन्मभर; आजीवन. **–लब-ए-गोर** (لب گور –) अव्य. (फ़ा.) थडग्याच्या कडेपर्यंत. **–वक़्ते कि.** (وقتے کہ –) अव्य. (फ़ा.+'अ.) जोपर्यंत; तोपर्यंत की. **–हम** (ہم –) अव्य. (फ़ा.) तरी; तरी देखील; तरीपण. **–हयात** (حیات –) अव्य. (फ़ा.+'अ.) तहहयात; आजन्म. **–हाल** (حال –) अव्य. (फ़ा.+'अ.) आतापर्यंत; अजूनपर्यंत; तरीही.

ता-ए-क़रशत (تاے قرشت) स्त्री. ('अ.) 'अवजद' प्रमाणे 'क़रशत' मधील ते (ت) अक्षर. पाहा 'अबजद'

ता-ए-सक़ीलः (تاے ثقیل) स्त्री. ('अ.) हिंदीतील (नागरी लिपीतील) 'ट' (ٹ) अक्षर.

तां'अत (طاعت) स्त्री. ('अ.) (१) उपासना; आराधना; पूजा. (२) आज्ञापालन; सेवा. **–गाह** (–گاہ) स्त्री. ('अ.+फ़ा.) पूजास्थान; मशीद. [अनेक 'तां'आत' (طاعات) स्त्री. ('अ.) उपासना; पूजा].

तां'इन (طاعن) वि. ('अ.) (१) बाण मारणारा; घायाळ करणारा. (२) टोमणा मारणारा; निंदा, कुचाळकी करणारा. (३) खरडपट्टी काढणारा.

तां'इफ़ (طائف); **तायफ़** (طایف) वि. ('अ.)प्रदक्षिणा घालणारा; परिक्रम करणारा. (पु.) (१) स्वप्नात होणारा दृष्टांत. (२) रात्रीचा पहारा.

तां'इफ़ः (طائفہ); **तायफ़ः** (طایفہ) पु. ('अ.) (१) समुदाय; दल; जमात. (२) तांडा. (३) गाणे बजावणे करणारी बाई व तिचे सार्जिदे; नर्तकींचा ताफा.

ता'इब (تائب) वि. ('अ.) पाप न करण्याची प्रतिज्ञा (तौबा) करणारा.

तां'इर (طائر); **तायर** (طایر) पु. ('अ.) पक्षी.

तां'इर-ए-'अर्श (طائرعرش) पु. ('अ.) (१) स्वर्गापर्यंत जाणारा पक्षी; उंच उडणारा. (२) जिब्रील नावाचा देवदूत.

तां'इर-ए-क़िब्लःनुमा (طائرقبلہنما) पु. ('अ.+फ़ा.) होकायंत्राची सुई.

तां'इर-ए-क़ुद्स (طائرقدس) पु. ('अ.) पाहा 'तां'इर-ए-'अर्श'.

तां'इर-ए-लाहूत (طائرلاھوت) पु. ('अ.) ब्रह्म लोकांपर्यंत उडणारा पक्षी; आत्मा.

तां'इर-ए-सिद्रः (طائرسدرہ) पु. ('अ.) आकाशापर्यंत जाणारा पक्षी. पाहा 'तां'इर-ए-'अर्श'.

तां'इल (طائل) पु. ('अ.) लाभ; फायदा.

तां'ई (طائی) पु. ('अ.) अरबस्तानातील एक जमात अथवा वंश. याच घराण्यात हातिम ताई होऊन गेला.

ता'ईद (تائید) स्त्री. ('अ.) (१) समर्थन; पाठिंबा; टेकू; पुष्टी; अनुमोदन. (२) सहायता; मदत. (३) पक्षपात. **शहादत-ए-ता'ईदी** (شہادت تائیدی) स्त्री. ('अ.) पाठिंबा देणारा पुरावा.

ता'ईद-ए-आस्मानी (تائید آسمانی); **ता'ईद-ए-ग़ैबी** (تائید غیبی); **ता'ईद-ए-रब्बानी** (تائید ربانی) स्त्री. ('अ.+फ़ा.) दैवी मदत; अनपेक्षित साह्य.

ता'ईद-ए-द'अवाँ (تائید دعویٰ) स्त्री. ('अ.) हक्काचे अथवा अधिकाराचे समर्थन; दाव्याचा पुरावा.

तां'ऊन (طاعون) पु. ('अ.) प्लेग (रोग).

तां'ऊस (طاؤس) पु. ('अ.) मोर; मयूर.

ताक (تاک) स्त्री. (फ़ा.) (१) द्राक्षाचा वेल. (२) शिके.

ताक़ (طاق) पु. ('अ.) (१) कोनाडा. (२) विषम संख्या (३, ५, ७ वगैरे). (वि.) (१) दक्ष; निपुण; चतुर. (२) अद्वितीय. (३) समाप्त; नष्ट. या अर्थाने हा शब्द केवळ 'ताक़त' या शब्दाच्या संदर्भात वापरला जातो. उदा. 'ताकत हो गई' (शक्ती संपली). **–करना** (کرنا –) अद्वितीय बनविणे. **–चः** (چہ –) पु. ('अ.+फ़ा.) लहान कोनाडा. **–पर रखना** (پر رکھنا –) बाजूला सारणे; सोडून देणे. **–भरना** (بھرنا –) मशिदीतील किंवा एखाद्या समाधीवरील कोनाडघात दिवा लावून फुले, बत्तासे वगैरे ठेवणे.

ताक़-ए-निस्यां (طاق نسیاں) पु. ('अ.) विस्मृतीचा कोनाडा; विस्मरणरूपी कोनाडा.

ताक़त (طاقت) स्त्री. ('अ.) (१) ताकद; सामर्थ्य; बळ. (२) धाडस. (३) उत्साह. (४) सत्ता; राज्य. (५) पात्र; भांडे. **–आज़मा'ई** (آزمائی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) सामर्थ्य अजमावून पाहाणे; जोर लावणे; प्रयत्न करणे. **–वर** (ور –) वि. ('अ.+फ़ा.) सामर्थ्यवान; सशक्त.

ताक़ी (طاق) स्त्री. (फ़ा.) कोनाडघाच्या आकाराची उंच टोपी. (वि.) ('अ.) (१) पांढरे (करडे) डोळे असलेला घोडा. (२) एक डोळा लहान व एक डोळा मोठा असलेला घोडा. (३) तिरळा (मनुष्य).

ताकीद (تاکید) स्त्री. ('अ.) (१) बजावून सांगणे; जोर देऊन सांगणे; ताकीद. (२) एखादी गोष्ट करण्याची किंवा न करण्याची सक्त आज्ञा करणे. (३) हट्ट; आग्रह. **–करना** (کرنا –) बजावणे.

ताकीद-ए-अकीद (تاکید اکید) स्त्री. ('अ.) सक्त ताकीद; कडक ताकीद.

ताकीद-ए-शदीद (تاکید شدید) स्त्री. ('अ.) सक्त ताकीद; खरमरीत हुकूम.

ताकीदन् (تاکیداً) अव्य. ('अ.) ताकीदपूर्वक; जोर देऊन; आग्रहपूर्वक.

ताकीदी (تاکیدی) वि. ('अ.) अत्यावश्यक; जरुरीचा; बजावून सांगितलेला.

ताक़ः (طاقہ) पु. ('अ.) (१) तागा; कपडघाचे ठाण. (२) लोकरीच्या किंवा रेशमी कापडाचा तुकडा.

ताख़ीर (تاخیر) स्त्री. ('अ.) (१) विलंब; उशीर. (२) ढिलाई.

सब्र बड़ा दुश्वार तलब, चाह बड़ी ताखीर पसंद।

ताख़्त (تاخت) स्त्री. (फ़ा.) (१) आक्रमण; हल्ला. (२) लुटालूट. (३) धापवळ.

ताख़्त-ओ-ताराज (تاخت و تاراج) स्त्री. (फ़ा.) (१) विनाश; विध्वंस. (२) लुटालूट.

ताग़ी (طاغی) वि. ('अ.) आज्ञेचे उल्लंघन करणारा; बंडखोर; राजद्रोही.

ताग़ूत (طاغوت) पु. ('अ.) (१) सैतान; राक्षस. (२) निर्दय व्यक्ती. (३) ईश्वराखेरीज इतरांची उपासना करणारा.

ताज (تاج) पु. (फ़ा.) (१) मुकुट; राजमुकुट. किरीट. (२) पक्ष्याच्या डोकीवरील तुरा; पिसारा; कलगी. (३) आग्र्याचा ताजमहाल. (४) फकिरांची विशिष्ट टोपी. (५) पक्ष्यांच्या जोडातील एकरंगी पाने. **–दार** (دار –) पु. (फ़ा.) मुकुटधारी; राजा; बादशहा; सम्राट. **–पोशी** (پوشی –) स्त्री. (फ़ा.) राज्याभिषेक; गादीवर बसणे. **–बख़्श** (بخش –) पु. (फ़ा.) सम्राट; बादशहा. **–वर** (ور –) पु. (फ़ा.) राजा; नरेश; बादशहा.

ताज (تاز) पु. (फ़ा.) (१) हल्ला; धावपळ. (२) प्रेमपात्र; अनैसर्गिक संभोग करून घेणारा छोकरा. (प्रत्य.) हल्ला करणारा. [उदा. 'यक्कः ताज' (یکہ تاز) वि. (फ़ा.) एकटघाने हल्ला करणारा.] **–बाज** (باز –) वि. (फ़ा.) अनैसर्गिक संभोग करणारा; लौंडेबाज. **–ओ-तक** (و تک –) पु. (फ़ा.) धावपळ; प्रयत्न; धडपड.

ताज़गी (تازگی) स्त्री. (फ़ा.) (१) ताजेपणा; प्रफुल्लता; टवटवी. (२) नवीनता; नाविन्य. (३) प्रसन्नता. (४) शीतलता.

ताज़ियानः (تازیانہ) पु. (फ़ा.) चाबूक; हंटर; कोरडा; आसूड.

ताजिर (تاجر) पु. ('अ.) व्यापारी; सौदागर.

ताज़ी (تازی) वि. (फ़ा.) अरबस्तानशी संबंधित. (पु.) (१) अरबी घोडा. (२) शिकारी कुत्रा. (३) अरब. (स्त्री.) अरबी भाषा. **–ख़ानः** (خانہ –) पु. (फ़ा.) कुत्र्यांचा तबेला; श्वानगृह.

ताजीक (تاجیک); **ताज़ीक** (تازیک) पु. (फ़ा.) (१) अरबस्तानच्या बाहेर (विशेषतः इराणात) लहानाचे मोठे झालेले अरब स्त्री-पुरुष. (२) मिश्र जातीचा घोडा.

ताज़ः (تازہ) वि. (फ़ा.) (१) ताजा; नवीन. (२) हिरवागार; टवटवीत. (३) तत्कालीन; नुकताच झालेला, केलेला, आलेला. (४) आरोग्य-संपन्न; लठ्ठ; सुखी; धष्टपुष्ट. **–कार** (کار –) वि. (फ़ा.) नवशिक्या. **–दम** (دم –) वि. (फ़ा.) न थकलेला; ताज्या दमाचा. **–बताज़ः** (بتازہ –) वि. (फ़ा.) अगदी ताजा; गरमागरम. **–मश्क़** (مشق –) वि. (फ़ा.+'अ.) नवशिक्या; नवीन.

–वारिद (وارد –) वि. (फ़ा. + 'अ.) नुकताच बाहेरून, परगावाहून किंवा परदेशातून आलेला; नवागत. **–बिलायत** (ولایت–) वि. (फ़ा.+'अ.) नुकताच परदेशातून आलेला; अनभिज्ञ.

तातार (تاتار) पु. (फ़ा.) (१) तुर्कस्तानचा एक प्रदेश. (२) या प्रदेशाचा रहिवासी.

तातारी (تاتاری) पु. (फ़ा.) तातारचा राहाणारा; तुर्क.

तातूरः (تاتورہ) पु. (फ़ा.) धोत्रा (विषारी वनस्पती).

तादीब (تادیب) स्त्री. ('अ.) (१) अदब; शिष्टाचार शिकविणे; शिस्त लावणे; जरबेत ठेवणे. (२) साहित्याचे शिक्षण देणे. (३) सुधारणे. **–खानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) सुधारणागृह.

तानीस़ (تانیث) स्त्री. ('अ.) स्त्रीलिंगी असणे; स्त्रीलिंग (व्या.).

ताफ़्तः (تافتہ) वि. (फ़ा.) (१) वळलेली (दोरी); पीळदार; पीळ दिलेला. (२) चमकदार. (३) गरम; उबदार. (पु.) (१) एक प्रकारचे रेशमी कापड. (२) फीत. (३) एका विशिष्ट रंगाचा घोडा.

ताब (تاب) स्त्री. (फ़ा.) (१) उष्णता; ताप; ऊब. (२) ज्योती; आभा; चमक; प्रकाश. (३) बळ; सामर्थ्य. (४) सहनशक्ती; धैर्य; संयम. (५) पेच; पीळ; मुरड; वळण. (प्रत्य.) प्रकाशित करणारा. [उदा. ''आलमताब' (عالم تاب) वि. ('अ. + फ़ा.) जगाला प्रकाशमान करणारा.] **–खानः** (خانہ–) पु. (फ़ा.) (१) तापलेले; तापविलेले घर किंवा खोली. (२) गरम पाण्याचे स्नानगृह. (३) चुलाण किंवा भट्टी असलेली खोली. **–दादः** (دادہ –) वि. (फ़ा.) पीळ दिलेला; वळलेला. **–दान** (دان –) पु. (फ़ा.) खिडकी. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) (१) ज्योतिर्मय; तेजस्वी. (२) पीळ दिलेला; वळलेला; पीळदार. **–नाक** (ناک –) वि. (फ़ा.) प्रकाशमान; चमकदार.

ताब-ए-ग़म (تاب غم) स्त्री. (फ़ा.+'अ.) दुःख सहन करण्याची शक्ती.

ताब-ए-दब्त़ (تاب ضبط) स्त्री. (फ़ा.+'अ.) सहनशक्ती.

ताब-ओ-तुवाँ (تاب و توان) स्त्री. (फ़ा.) शक्ती; सामर्थ्य.

ताबाँ (تاباں) वि. (फ़ा.) (१) प्रकाशमान, चमकदार. (२) ज्वलंत; गरम.

ताबानी (تابانی) स्त्री. (फ़ा.) (१) प्रकाश; तेजोवलय; दीप्ती. (२) उष्णता.

ताबिंदः (تابندہ) वि. (फ़ा.) प्रकाशमान; चमकणारा.

ताबि'अ (تابع) वि. ('अ.) (१) ताब्यातील; हाताखालील; अधीन. (२) अनुयायी; आज्ञांकित. **–दार** (دار –) वि. ('अ. + फ़ा.) (१) आज्ञाधारक. (२) अनुयायी. (३) अधीन.

ताबि'अ-ए-फ़रमान (تابع فرمان) वि. ('अ.) (१) आज्ञाधारक. (२) एकनिष्ठ; भक्त.

ताबि'अ-ए-मुहमल (تابع مہمل) पु. ('अ.) एखाद्या शब्दाच्या जोडीने वापरला जाणारा निरर्थक शब्द. (उदा. 'पुस्तक बिस्तक'. यातील 'बिस्तक' शब्द).

ताबि'ओ (تابعی) पु. ('अ.) (१) अनुयायी; सेवक. (२) ज्याने हजरत मुहम्मद साहेबांच्या निकटवर्ती लोकांना पाहिले होते व त्यांची भेट घेतली होती असा अरब मनुष्य. [याचे अनेक 'ताबि'ओन' (تابعین). या 'ताबि'ओन' लोकांना ज्यांनी पाहिले त्यांना 'तब'अ-ए-ताब'ओन' (تبع تابعین) अशी संज्ञा आहे].

ताबिश (تابش) स्त्री. (फ़ा.) (१) उष्णता. (२) प्रकाश; चमक.

ताबिस्तान (تابستان) पु. (फ़ा.) उन्हाळा; ग्रीष्म.

ताबीदः (تابیدہ) वि. (फ़ा.) प्रकाशमान; चमकदार.

ताबूत (تابوت) पु. ('अ.) (१) शवपेटी; तिरडी. (२) एक प्रकारचा ताजा; डोला; ताबूत. **–गर** (گر –) पु. (फ़ा.) (१) शवपेटी बनविणारा. (२) ताबूत तयार करणारा.

यूँ हाथ न. थामें जो गिरे बन्दः-ए-म'अबूद ।
ताबूत को देना हो जो कांधा तो हैं मौजूद ।।

ताम (تام) वि. ('अ.) सर्व; समस्त; संपूर्ण.

त़ामि'अ (طامع) वि. ('अ.) लोभी; लोलुप; हावरा; अधाशी.

त़ामिह (طامح) वि. ('अ.) (१) उद्धट; अवज्ञा करणारा; बंडखोर. (२) उच्च; उंच. (स्त्री.) नवऱ्याच्या परवानगीशिवाय माहेरी जाणारी स्त्री; परपुरुषांकडे पाहाणारी स्त्री.

त़ाम्मः (طامہ) स्त्री. ('अ.) (१) आपत्ती. (२) प्रलय. (३) जुलूम.

तार (تار) पु. (फ़ा.) (१) तार. (२) धागा; तंतू. (३) क्रम. (४) टेलिग्राम. (५) पाकाची तार. (६) संतत धार; झड. (वि.) [फ़ा. 'तारीक' (تاریک) चे संक्षिप्त.] अंधार; काळोख. **–कश** (کش –) पु. (फ़ा.) धातूंची तार तयार करणारा. **–तार** (تار –) वि. (फ़ा.) तुकडे तुकडे; चिंध्या. **–पोद** (پود –); **–ओ-पोद** (و پود –) पु. (फ़ा.) विणीचे उभे-आडवे धागे.

तार-ए-'अंकबूत (تار عنکبوت) पु. (फ़ा.+'अ.) कोळ्याच्या जाळ्याचा तंतू; अत्यंत कमजोर वस्तू.

तार-ए-अश्क (تار اشک) पु. (फ़ा.) अश्रुधारा.

तार-ए-नफ़स (تار نفس) पु. (फ़ा.+'अ.) श्वासोच्छ्वासाचा धागा.

तार-ए-बर्क़ी (تار برقی) पु.(फ़ा.+'अ.) विजेची तार.

तार-ए-बारां (تار باراں) पु. (फ़ा.) पावसाची झड; सतत धार.

तारक (تارک) पु. (फ़ा.) (१) भांग (केसांचा). (२) वेणी. (३) शिखर. (४) शिरस्त्राण.

तारा (تارا); **तारः** (تارہ) पु. (फ़ा.+तु.) (१) तारा. (२) नक्षत्र. (३) डोळ्याचे बुबुळ.

ताराज (تاراج) पु. (फ़ा.) (१) विनाश; विध्वंस. (२) लुटालूट.

तारिक़ (طارق) पु. ('अ.) (१) अपघात; दुर्घटना. (२) प्रातःकाळी उगवणारा एक तारा. (३) इस्लामचा एक प्रसिद्ध सेनापती. (४) रात्री बाहेर पडणारा; चोर; लुटारू.

तारिक (تارک) वि. ('अ.) (१) त्याग करणारा. (२) घमेंडखोर. पाहा 'तर्क'.

तारिक-उद्-दुन्या (تارک الدنیا); **तारिक-ए-दुन्या** (تارک دنیا) वि. ('अ.) ज्याने जगाचा त्याग केला आहे असा; विरक्त; वैराग्यशील.

तारिक-ए-लज़्ज़ात (تارک لذات) वि. ('अ.) अस्वाद व्रत पाळणारा; निस्पृह.

तारी (طاری) वि. ('अ.) (१) पसरलेला; व्यापून राहिलेला. (२) झाकून टाकणारा.

तारीक (تاریک) वि. (फ़ा.) अंधःकारपूर्ण; काळोखी. **–दमीर** (ضمیر –) वि. (फ़ा. + 'अ.) मलिन; पापी अंतःकरणाचा. **–दर्रे** (دروں –); **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) **–बातिन** (باطن –) वि. (फ़ा.+'अ.) ज्याच्या अंतःकरणात धर्माचा प्रकाश पडलेला नाही असा; दुष्टात्मा.

तारीकी (تاریکی) स्त्री. (फ़ा.) अंधःकार; काळोख.

तारीख़ (تاریخ) स्त्री. ('अ.) (१) तारीख; तिथी; दिनांक. (२) कोर्टाची तारीख. (३) इतिहास. (४) 'अबजद' च्या साह्याने काढलेले एखाद्या घटनेचे वर्ष. **–गो** (گو –) वि. ('अ. + फ़ा.) 'अबजद' च्या हिशेबाने एखाद्या घटनेचे वर्ष वाक्यात किंवा काव्यपंक्तीत शब्दबद्ध करणारा कवी. **–गो'ई** (گوئی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) एखादी घटना अशा प्रकारे शब्दबद्ध करणे की त्या शब्दातून त्या घटनेचे वर्ष अथवा संपूर्ण तिथी निघावी. **–दाँ** (داں –) वि. ('अ. + फ़ा.) इतिहासज्ञ. **–नवीस** (نویس –) वि. ('अ.+फ़ा.) इतिहासकार; इतिहास लेखक.

तारीख़ी (تاریخی) वि. ('अ.) ऐतिहासिक.

तारुम (طارم) पु. ('अ.) (१) प्रासाद; महाल. (२) गच्ची. (३) लाकडी घर.

ताल (تال) पु. (फ़ा.) (१) ताड (झाड). (२) थाळी; परात. (३) रंग.

ताल'ल्लह (طال اللہ) अव्य. ('अ.) ईश्वर वाढ करो, ईश्वर अधिक करो.

तालाब (تالاب) पु. (फ़ा.) सरोवर; तळे. ['ताल' (تال) थाळी + 'आब' (آب) पाणी].

तालार (تالار) पु. (फ़ा.) शेतात पाखरे हाकलण्यासाठी केलेला माळा; माचा; मचाण; मंच.

ताली'अ (طالع) पु. ('अ.) दैव; ग्रह भाग्य; नशीब; (वि.) उगवणारा; उदय पावणारा. **–आज़मा'ई** (آزمائی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) भाग्यपरीक्षा. (२) प्रयत्न. **–मंद** (مند –); **–वर** (ور –) वि. ('अ.+फ़ा.) (१) भाग्यवान. (२) श्रीमंत; तालेवार. **–शनास** (شناس –) वि. ('अ.+फ़ा.) फलज्योतिषी.

ताली'अ-ए-ख़ुफ़्तः (طالع خفتہ) पु. ('अ. + फ़ा.) झोपलेले नशीब; दुर्भाग्य.

ताली'अ-ए-बेदार (طالع بیدار) पु. ('अ. + फ़ा.) जागृत नशीब; सद्भाग्य.

तालिब (طالب) वि. ('अ.) (१) इच्छिणारा; इच्छुक. (२) याचक; मागणारा. (३) अभिलाषा, लालसा बाळगणारा.

तालिब-ए-'इल्म (طالب علم) पु. ('अ.) विद्यार्थी; छात्र.

तालिब-ए-'उक़्बां (طالب عقبیٰ) पु. ('अ.) परलोक इच्छिणारा; मोक्षार्थी; धर्मनिष्ठ.

तालिब-ओ-मतलूब (طالب و مطلوب) पु. ('अ.) प्रेमी व प्रेमिका; नायक व नायिका.

तालीफ़ (تالیف) स्त्री. ('अ.) (१) संग्रह; अनेक लेखकांच्या साहित्याचे एकत्रित संकलन. (२) संपादन.

तालीफ़-ए-क़ुलूब (تالیف قلوب) स्त्री. ('अ.) लोकांची मने जिंकणे; लोकांची अंतःकरणे मैत्रीच्या धाग्यात गुंफणे.

तालूत (طالوت) पु. ('अ.) एक यहुदी सत्ताधीश. हा भिस्ती होता. याने आपले सेनापती हजरत दाऊद यांच्या साह्याने 'जालूत' नावाच्या एका नास्तिक व जुलमी गृहस्थाला ठार मारले होते.

तालेह (طالح) वि.('अ.) दुराचारी; बदफैली; दुर्वर्तनी.

तावान (تاوان) पु. (फ़ा.) (१) दंड (शिक्षा). (२) नुकसानभरपाई. (३) पराभूत पक्षाने अथवा राष्ट्राने विजेत्याला द्यावयाचे धन अथवा सामानसुमान.

तावील (تاویل) स्त्री. ('अ.) (१) स्पष्टीकरण; व्याख्या. (२) एखाद्या गोष्टीचा मूळ अर्थापेक्षा वेगळा अर्थ लावणे. (३) स्वप्नफल.

ताश (تاش) पु. (फ़ा.) (१) घरचा मालक; गृहस्वामी. (२) परमेश्वर.

ताश (تاش) प्रत्य. (तु.) साथी; सहकारी; भागीदार. [उदा. 'ख्वाज:ताश' (خواجہ تاش) वि. (तु.) एका मालकाचे नोकर].

ताश (تاش) पु. (हिं.) खेळण्याचे पत्ते; गंजीफा.

ताशकंद (تاشکند); **ताशक़ंद** (تاشقند) पु. (फ़ा.) रशियन तुर्कस्थानातील एक शहर. हे पूर्वी इराणमध्ये होते.

ताशः (تاشہ) पु. ['अ. 'तासः' (طاسہ) चे हिंदुस्थानी रूप.] ताशा (वाद्य).

तास (طاس) पु. (फ़ा.) (१) मोठी थाळी; परात. (२) घटिका पात्र. (३) एक प्रकारचे रेशमी व जरीचे कापड.

तासि'अ (تاسع) वि. ('अ.) नववा; नवम.

तासीर (تاثیر) स्त्री. ('अ.) (१) प्रभाव; परिणाम. (२) गुणधर्म.

तासीस (تاسیس) स्त्री. ('अ.) (१) पाया; पाया घालणे. (२) आधार; न्यास. (३) मजबूत बनविणे.

तासः (طاسہ) पु. ('अ.) ताशा; गळघात अडकवून वाजविण्याचे कातडे लावलेले एक वाद्य.

ताहम (تاہم) अव्य. (फ़ा.) तरी; तरीदेखील; तथापि.

ताहिर (طاہر) वि. ('अ.) पवित्र; शुद्ध.

ताहिरी (طاہری) स्त्री. ('अ. + हिं.) एक प्रकारचा पुलावा.

तिक्कः (تکہ) पु. (फ़ा.) (१) मांसाचा तुकडा (बारीक व लांब). (२) विजारीची नाडी. (३) कंबरपट्टा. **–बोटी करना** (بوٹی کرنا –) तुकडे तुकडे करणे.

तिजारत (تجارت) स्त्री. ('अ.) व्यापार; व्यवसाय.

तिजारती (تجارتی) वि. ('अ.) व्यापारासंबंधी; व्यापारी. **–वफ़्द** (وفد –) पु. ('अ.) व्यापारी शिष्टमंडळ.

तिनाब (طناب) स्त्री. ('अ.) तणावा; तंबू, राहुटी वगैरे ज्याच्या आधारावर उभे राहतात तो मोठा दोर.

तिफ़्ल (طفل) पु. ('अ.) बालक; मूल. **–क** (ک –) पु. ('अ.+फ़ा.) लहान मूल; शिशू. **–मश्रब** (مشرب –); **–मिज़ाज** (مزاج –) वि. ('अ.) लहान मुलांसारखे वागणारा; पोरकट; निरागस.

तिफ़्ल-ए-अश्क (طفل اشک) पु. ('अ.+फ़ा.) अश्रुबिंदू; आसू.

तिफ़्ल-ए-आतश (طفل آتش) पु. ('अ.+फ़ा.) अग्निकण; ठिणगी.

तिफ़्ल-ए-मक्तब (طفل مکتب) पु. वि. ('अ.) (१) श्रीगणेशा शिकणारा; शाळकरी पोरगा. (२) निरक्षर; मूर्ख; अडाणी.

तिफ़्ल-ए-शश रोज़ः (طفل شش روزہ) पु. ('अ.+फ़ा.) जग; इहलोक. (शश = सहा)

तिफ़्ल-ए-शीर ख्वार (طفل شیر خوار) पु. स्त्री. ('अ.+फ़ा.) दूध पिणारे मूल; तान्हे मूल.

तिफ़्ल-ए-हिन्दू (طفل ہندو) पु. ('अ.+फ़ा.) डोळघांतील बाहुली. (हिंदू याचा अर्थ 'काळा माणूस' असाही आहे. त्यावरून डोळघाच्या बुबुळाला उद्देशून तो शब्द वापरला गेला आहे).

तिफ़्लान-ए-चमन (طفلان چمن) पु. ('अ. +फ़ा.) बागेतील लहान झाडे, फुले, कळघा वगैरे.

तिफ़्लानः (طفلانہ) वि. ('अ.+फ़ा.) मुलासारखा; पोरकट; बालोचित. (पु.) शैशव.

तिफ़्ली (طفلی) स्त्री. ('अ.) (१) बाळपण; लहानपण; पोरकटपणा.

तिब (طب) स्त्री. ('अ.) वैद्यक; आयुर्वेद; युनानी चिकित्साशास्त्र; उपचारशास्त्र.

तिबा'अ (تباع) पु. ('अ.) अनुसरण; अनुकरण.

तिबा'अ (طباع) स्त्री. ['अ. 'तब्'अ' (طبع) व 'तबी'अत' (طبیعت) चे अनेक.] (१) तब्येती; प्रकृत्या. (२) स्वभाव; प्रकृती.

तिबाबत (طبابت) स्त्री. ('अ.) (१) वैद्यकी; डॉक्टरी. (२) वैद्यक; आयुर्वेद.

तिब्न (تبن) स्त्री. ('अ.) गवत; वाळलेले गवत.

तिब्बी (طبی) वि. ('अ.) युनानी वैद्यकासंबंधी; वैद्यकीय.

तिब्यान (تبیان) पु. ('अ.) (१) प्रगट; व्यक्त होणे. (२) व्यक्त करणे. (३) अभिव्यक्ती; कथन; वचन.

तिमुर (تیمور) पु. (तु.) (१) तैमूरलंग. (बादशहा) [तुर्की भाषेत ی (ई) व و (ऊ) यांचा उच्चार ह्रस्व होतो. हे माहीत नसलेल्यांनी या शब्दाचा उच्चार 'तैमूर' असा केला व तोच रूढ झाला. शुद्ध उच्चार 'तिमुर' असा आहे.] (२) लोखंड; पोलाद.

तिम्सा़ल (تمثال) स्त्री. ('अ.) (१) आकृती. (२) मूर्ती. (३) चित्र. (४) राजाज्ञा. **–गर** (گر –); **–दार** (دار –) पु. ('अ. + फ़ा.) (१) मूर्तिकार. (२) चित्रकार.

तिम्साह़ (تمساح) पु. ('अ.) मगर; सुसर.

तिराज़ (طراز) पु. (फ़ा.) (१) रूप; आकृती. (२) कलाकुसर; वेलबुट्टी; चित्रकला. (३) चित्रकार. (प्रत्य.) तयार करणारा. [उदा. 'दिबाचः तिराज़'

(دیباچہ طراز) पु. (फ़ा.) प्रस्तावना लिहिणारा; उपन्यास करणारा].

तिर्याक़ (ترياق) पु. ('अ.) **तिर्याक** (ترياک) पु. (फ़ा.) (१) विषावरील उतारा; विषनाशक औषध. (२) अफू.

तिर्याकी (ترياکی) वि. (फ़ा.) अफू खाणारा; अफूबाज.

तिलवासः (تلواسہ) पु. स्त्री. (फ़ा.) बेचैनी; अस्वस्थता.

तिला (تلا) पु. (फ़ा.) सोने.

तिला (طلا) पु. (फ़ा.) (१) सोने; सुवर्ण. (२) कामवर्धक तेल (हे पुरुषाच्या जननेंद्रियाला चोळून लावले जाते); मलम. **–कार** (کار –) वि. ('अ.+फ़ा.) ज्याच्यावर सोन्याचे नक्षीकाम किंवा मुलामा केला आहे असा. (पु.) सोन्याचे नक्षीकाम किंवा मुलामा करणारा. **–कोब** (کوب –) पु. ('अ. + फ़ा.) सोन्याचा वर्ख तयार करणारा. **–दोज़** (دوز –); **–बाफ़** (باف –) पु. ('अ.+फ़ा.) पाहा 'तिलाकार'. **–साज़** (ساز –) पु. (फ़ा.) (१) सोने बनविणारा. (२) किमया करणारा.

तिला-ए-अह़मर (طلاے احمر) पु. ('अ.) **तिला-ए-नाब** (طلاے ناب) पु. ('अ.+फ़ा.) शुद्ध सोने; बावनकशी सोने.

तिला'ई (طلائی) वि. (फ़ा.) सोन्याने मढविलेला; सोनेरी.

तिलादानी (تلا دانی) स्त्री. (फ़ा. + हिं.) सुई-दोरा-कात्री वगैरे वस्तू ठेवण्याची पिशवी (वा.).

तिलाम (تلام) पु. ['अ. 'तिलम्' (تلم) चे अनेक.] नोकरचाकर.

तिलावत (تلاوت) स्त्री. ('अ.) (१) पठण; पाठ (२) कुराणाचे पठण.

तिलावत (طلاوت) स्त्री. ('अ.) (१) प्रफुल्लितपणा; टवटवीतपणा; सौंदर्य. (२) जादू.

तिलिस्म (طلسم) पु. ('अ.) (१) जादू; इंद्रजाल; दृष्टिबंध; नजरबंदी. (२) मायाजाल. (३) जादूने भारावलेले स्थान. **–बंद** (بند –) वि. ('अ.+फ़ा.) जादूच्या प्रभावात सापडलेला; भारावलेला. [अनेक 'तिलिस्मात' (طلسمات) पु. (फ़ा.) जादू; मायानगरी; मायाजाल].

तिलिस्माती (طلسماتی); **तिलिस्मी** (طلسمی) वि. ('अ.) (१) जादूचा; जादूसंबंधी. (२) जादूने बनविलेला. (३) जादू करणारा.

तिस्'अीन (تسعین) वि. ('अ.) नव्वद (९०).

तिस्'अः (تسعہ) वि. ('अ.) नऊ (९).

तिह़ाल (طحال) स्त्री. ('अ.) प्लीहा; पांथरी.

तिही (تہی) वि. (फ़ा.) रिक्त; रिकामा; विरहित. **–क़िस्मत** (قسمت –) वि. (फ़ा.+'अ.) पोकळ भाग्याचा; दुर्दैवी. **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) कूस; ओटीपोट; उपस्थ. **–दस्त** (دست –) वि. (फ़ा.) रिक्तहस्त; गरीब; दरिद्री. **–दामन** (دامن –) वि. (फ़ा.) ज्याचा पदर रिकामा आहे असा; वंचित. **–दिमाग़** (دماغ –) वि. (फ़ा.+'अ.) ज्याचा मेंदू (डोके) रिकामा आहे असा; निर्बुद्ध. **–मग़ज़** (مغز –) वि. (फ़ा.) रेम्याडोक्या; मद्दड; मठ्ठ.

तीन (تین) पु. ('अ.) अंजीर (फळ).

तीन (طین) स्त्री. ('अ.) माती; खारी माती.

तीनत (طینت) स्त्री. ('अ.) स्वभाव; प्रकृती.

तीमार (تیمار) स्त्री. (फ़ा.) (१) रोग्याची सेवाशुश्रूषा. (२) सहानुभूती. **–ची** (چی –); **–दार** (دار –) वि. (फ़ा.) शुश्रूषा करणारा; परिचारक. **–दारी** (داری –) स्त्री. (फ़ा.) (१) शुश्रूषा; परिचर्या. (२) सहानुभूती.

तीर (تیر) पु. (फ़ा.) (१) बाण; शर. (२) एक इराणी महिना. हा हिंदी पंचांगानुसार श्रावणात येतो. (३) बुध (ग्रह). (४) शक्ती; जोर. **–अंदाज़** (انداز –) वि. (फ़ा.) बाण मारणारा; तिरंदाज; शिकारी. **–अंदाज़ी** (اندازی –) स्त्री. (फ़ा.) धनुर्विद्या; तिरंदाजी; शिकार. **–अफ़गन** (افگن –) वि. (फ़ा.) **–कश** (کش –) (पु.) (फ़ा.) (१) बाणांचा भाता; तूणीर. (२) किल्ल्यावरून बंदुकीच्या गोळ्यांचा मारा करता यावा म्हणून किल्ल्याच्या तटाला ठेवण्यात आलेली भोके. **–ख़ुर्दः** (خوردہ –) वि. (फ़ा.) बाणाचा मार खाल्लेला; जखमी; घायाळ. **–गर** (گر –) वि. (फ़ा.) बाण बनविणारा. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) बाण मारणारा. **–दान** (دان –) पु. (फ़ा.) बाणांचा भाता; तूणीर. **–ए-पुरताब** (پرتاب –) पु. (फ़ा.) (१) बाणाचा टप्पा. (२) दूरपर्यंत फेकण्याच्या कामी येणारा बाण. (हा मारण्यासाठी वापरला जात नाही). **–बहदफ़** (بہدف –) वि. (फ़ा.) अचूक लागणारा बाण; अमोघ; रामबाण.

तीर-ए-नज़र (تیر نظر); **तीर-ए-निगाह** (تیر نگاہ) पु. (फ़ा.) नजरेचा बाण; दृष्टीरुपी बाण.

तीर-ए-नीमकश (تیر نیم کش) पु. (फ़ा.) जो बाण अर्धा जखमेत व अर्धा बाहेर आहे असा; सलणारे दुःख.

को'ई मेरे दिल से पूछे तेरे तीर-ए-नीमकश को।

तीर-ए-हवा'ई (تیر ہوائی) पु. (फ़ा.+'अ.) (१) हवेत सोडावयाचा (नेम धरून न मारण्याचा) बाण. (२) शोभेच्या दारूचा बाण.

तीर-ए-हुक्मी (تیر حکمی) पु. (फ़ा.+'अ.) अचूक; अमोघ बाण; रामबाण.

तीरगी (تیرگی) स्त्री. (फ़ा.) काळोख; अंधःकार.

तीराबर (تیراور) वि. (फ़ा.) (१) धूर्त; कपटी; लुच्चा. (२) आपल्या पत्नीला शीलविक्रय करायला लावून त्यावर पोट भरणारा.

तीरः (تیرہ) वि. (फ़ा.) अंधकारपूर्ण; काळोखी. **–अब्र** (ابر –) पु. (फ़ा.) काळे ढग. **–ख़ाकदाँ** (خاکداں –) पु. (फ़ा.) मृत्यूलोक; इहलोक; जग. **–दरूँ** (درون –); **–दिल** (دل –); **–बातिन** (باطن –) वि. (फ़ा.) ज्याचे अंतःकरण अत्यंत काळेकुट्ट आहे असा; दुष्ट; मलिन हृदयाचा. **–बख़्त** (بخت –) वि. (फ़ा.) हतभागी; ज्याच्या दैवात काळोखच भरलेला आहे असा. **–रोज़** (روز –) वि. (फ़ा.) (१) दुर्दैवी. (२) फसवा; कपटी. **–रोज़गार** (روزگار –) वि. (फ़ा.) ज्याचे जग काळोखाने भरले आहे असा; दुर्दैवी. **–ओ-तार** (و تار –) वि. (फ़ा.) अत्यंत अंधकारपूर्ण; काळोखाने भरलेला.

तीयब (طیب) स्त्री. ('अ.) (१) प्रसन्नता; खुषी. (२) पावित्र्य. (३) मान्यता; स्वीकृती.

तीयबत (طیبت) स्त्री. ('अ.) (१) मनोरंजन. (२) पवित्र; विहित असणे.

तीयह (تیہ) पु. (फ़ा.) (१) घमेंड; गर्व. (२) ज्यातून बाहेर पडता येत नाही असे भयंकर अरण्य. (३) ज्यात हजरत मूसा (मोझेस) हे हजारो व्यक्तींसह वाट चुकून चाळीस वर्षे भटकत होते असे एक जंगल.

तुंग (تنگ) पु. (फ़ा.) (१) मातीचे एक प्रकारचे भांडे. याचे पोट मोठे, गळा बारीक व तोंड अरुंद असते. (२) धान्याचे पोते.

तुंद (تند) वि. (फ़ा.) (१) तीव्र; प्रचंड; जोरदार; वेगवान; बेफाम. (२) उग्र; भीषण; हिंसक; क्रुद्ध. (३) आवेशपूर्ण. **–ख़ू** (خو –) वि. (फ़ा.) तापट; रागीट; कडक स्वभावाचा.

जिधर निगाह उठी बिछ गयी सफ़-ए-'उश्शाक़ ।
बला है, क़हर है, वह तुर्क-ए-तुंद ख़ू क्या है ॥

–बाद (باد –) स्त्री. (फ़ा.) वावटळ; वादळ; झंझावात. **–मिज़ाज** (مزاج –) वि. (फ़ा.+'अ.) तापट; रागीट; उग्र. **–रफ़्तार** (رفتار –) वि. (फ़ा.) वेगवान. **–राय** (رائے –) वि. (फ़ा.) अदूरदर्शी. **–रौ** (رو –) वि. (फ़ा.) शीघ्रगती.

तुंदर (تندر) पु. (फ़ा.) (१) मेघगर्जना. (२) बुलबुल (पक्षी).

तुंदी (تندی) स्त्री. (फ़ा.) (१) तीव्रता; आवेग; जोश. (२) लिंगोत्थान. (३) क्रोध; कोप.

तुंबान (تنبان) पु. (तु.) (१) पहिलवानांचा कातडी लंगोट. (२) एक प्रकारचा सैल पायजमा; सलवार.

तुक्का (تکا); **तुक्कः** (تکّہ) पु. (फ़ा.) तोंडाशी पोलादी पात्याऐवजी गोळा असलेला बाण; बोथट बाण. [म्हण : **लगा तो तीर नहीं तो तुक्का** (لگا تو تیر نہیں تو تکا) काम यशस्वी झाले तरी ठीक, नाही झाले तरी वाहवा].

तुक्मः (تکمہ) पु. (फ़ा.) (१) काजे; काज (प्रचलित अर्थ). (२) गुंडी; बटन (मूळ अर्थ).

तुक्लान (تکلان) पु. ('अ.) (१) विश्वास; श्रद्धा; आस्था. (२) ईश्वरी इच्छा.

तुख़्म (تخم) पु. (फ़ा.) (१) बी; बीज. (२) कोय; बाठी; अठळी. (३) अंडे. (४) संतती (५) अंडवीर्य. **–पाशी** (پاشی –) स्त्री. (फ़ा.) बीजारोपण; पेरणी. **–रेज़ी** (ریزی –) स्त्री. (फ़ा.) पेरणी.

तुख़्म-ए-कत्ताँ (تخم کتاں) पु. (फ़ा.) अळशीचे बी; जवस.

तुख़्म-ए-काहू (تخم کاہو) पु. (फ़ा.) लेटिस या औषधी वनस्पतीचे बी.

तुख़्म-ए-मुर्ग़ (تخم مرغ) पु. (फ़ा.) (१) कोंबडीचे अंडे. (२) पक्ष्याचे अंडे.

तुख़्म-ए-रैहाँ (تخم ریحاں) पु. (फ़ा.+'अ.) दवण्याचे बी. (दवणा ही एक सुगंधित औषधी वनस्पती आहे).

तुख़्मी (تخمی) वि. (फ़ा.) बी लावून तयार केलेले झाड (कलमी नव्हे); गावठी आंबा (कलमी नव्हे).

तुख़्मः (تخم) पु. (फ़ा.) (१) संतती; मुलेबाळे. (२) अंड; अंडे.

तुख़्मः (تخمہ) पु. ('अ.) (१) अपचन. (२) अतिसार; हगवण.

तुग़यान (طغیان) पु. ('अ.) (१) अवज्ञा; अवहेलना. (२) बंडखोरी. (३) अडाणीपणा. (४) अत्याचार. (५) अनीती; पाप; पातक.

तुग़यानी (طغیانی) स्त्री. ('अ.) पूर (नदीचा).

तुग़्रल (طغرل) पु. (तु.) (१) बहिरीससाणा. (२) खंडचा पक्षी.

तुग़्रा (طغرا) पु. (तु.) (१) एक प्रकारचे नक्षीदार अक्षर. बादशहाचे नाव व पदव्या या अक्षरात लिहिल्या जातात. सरकारी कागदपत्रे व नाणी यांवर शिक्क्यासारखी ही अक्षरे वापरली जातात. (२) राजाची सही (आज्ञापत्रे व नाणी यावर केली जाणारी). **–कश** (کش –); **–नवीस** (نویس –) वि. (तु.+फ़ा.) नक्षीदार अक्षरे लिहून त्यात वेलबुट्टी व चित्रे काढणारा.

तुग्रिल (طغرل) पु. (तु.) तुर्कस्तानच्या सलजूकी घराण्यातील पहिला बादशहा याने इराणचा खुरासान प्रांत जिंकला होता.

तुग़लक (تغلق) पु. (तु.) (१) सरदार. (२) एका बादशहाचे नाव (मुहम्मद तघलक).

तुज़ुक (توزک) पु. (तु.) (१) सजावट; शोभा; आरास; मिरवणूक. (२) व्यवस्था. (३) सैन्याची तयारी, जमवाजमव. (४) नियम; कायदा. (५) स्वतः बादशहाने लिहिलेली हकीगत; आत्मचरित्र.

तुज्जार (تجار) पु. ['अ. 'ताजिर' (تاجر) चे अनेक.] व्यापारी.

तुतुक़ (تتق) पु. ('अ.) (१) चादर. (२) पडदा. (३) नववधूच्या मच्छरदाणीचा पदर.

तुनुक (تنک) वि. (फ़ा.) (१) सूक्ष्म; बारीक. (२) अल्प; थोडा. (३) मृदु; सुकुमार; नाजुक. (४) क्षीण; दुर्बल; हलका. **–अंदाम** (اندام –) वि. (फ़ा.) कोमलांगी. **–ज़र्फ** (ظرف –) वि. (फ़ा. + 'अ.) (१) उथळ; छचोर. (२) नीच; हलकट. (३) भडभड्या. (४) थोडीशी दारू पिताच बरळू लागणारा. (५) उच्चपद मिळताच घमेंड करणारा. **–जाम** (جام –) वि. (फ़ा.) थोडीशी मदिरा पिताच झिंगणारा. **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) (१) क्षुद्र; अनुदार. (२) कोमल अंतःकरणाचा. **–मायः** (مایہ –) वि. (फ़ा.) पत नसलेला; तुच्छ; नीच. **–मिज़ाज** (مزاج –) वि. (फ़ा. + 'अ.) चिडखोर; हुळहुळा; तिरसट; चिरचिरा. **–सब्र** (صبر –) वि. (फ़ा. + 'अ.) धीर नसलेला; उतावळा. **–हवास** (حواس –) वि. (फ़ा.+'अ.) हळवा; संवेदनाशील.

तुपक (تپک) स्त्री. [तु. 'तोप' (توپ) चे लघु.] (१) लहान तोफ. (२) बंदूक. **–ची** (چی –) पु. (तु.) (१) तोफ चालविणारा; गोलंदाज. (२) बरकंदाज; बंदुकवाला शिपाई.

तुफ़ंग (تفنگ) स्त्री. (फ़ा.) बंदूक. **–अंदाज** (انداز –); **–ची** (چی –) वि. (फ़ा.) बंदूक चालविणारा; बरकंदाज.

तुफ़ंग-ए-तहपुर (تفنگ تہپور) स्त्री. (फ़ा.) तोडग्याची बंदूक; काडतुसाची बंदूक.

तुफ़ंग-ए-दहनपुर (تفنگ دھنپر) स्त्री. (फ़ा.) तोंडाच्या बाजूने भरली जाणारी बंदूक; चापाची बंदूक.

तुफ़ंग-ए-सोज़नी (تفنگ سوزنی) स्त्री. (फ़ा.) ब्रीच लोडिंग रायफल. हिच्यात घोडा असत नाही; तोडग्याची बंदूक.

तुफ़ (تف) अव्य. (फ़ा.) थूः! छीः! धिक्कार असो! (पु.) थुंकी; थुंकणे.

तुफ़ (تف) पु. ('अ.) नखांतील मळ, घाण.

तुफ़क (تفک) स्त्री. (फ़ा.) छऱ्याची बंदूक.

तुफ़व (تفو) स्त्री. (फ़ा.) थुंकणे; थुंकी.

तुफ़ैल (طفیل) पु. ('अ.) मध्यस्थी; कारण; वशिला (अव्य.) द्वारे; मार्फत; वशिल्याने; कारणाने. (वि.) अनाहूतपणे भोजनसमारंभास हजर राहाणारा. [तुफ़ैल नावाचा एक कवी कूफा (इराक) शहरात होता. तो आमंत्रण नसताना कोणावरोवर तरी मेजवान्यांना हजर राहात असे. त्यावरून हा शब्द वनला].

तुफ़ैली (طفیلی) वि. ('अ.) (१) निमंत्रण नसताना एखाद्या निमंत्रित माणसाच्या आधाराने मेजवानीस हजर राहाणारा. (२) दुसऱ्याच्या आधाराने राहाणारा; आश्रित; परान्नपुष्ट.

तुफ़्फ़ाह़ (تفاح) पु. ('अ.) सफरचंद (फळ).

तमतराक़ (طمطراق) पु. (फ़ा.) (१) वैभव; थाटमाट; धामधूम. (२) अहंकार; ताठा; घमेंड.

तुमानियत (طمانیت) स्त्री. ('अ.) (१) संतोष; समाधान. (२) धीर; सांत्वन.

तुयूर (طیور) पु. [फ़ा. 'त़ा'इर' (طائر) चे अनेक.] अनेक पक्षी.

तुराब (تراب) स्त्री. ('अ.) (१) माती; धूळ. (२) पृथ्वी; जमीन.

तुरुंज (ترنج) पु. (फ़ा.) (१) मोठे लिंबू; गोड लिंबू. (२) मुसुंबे; मोसंबी. (३) सुरकुती; आठी.

तुरुंजीदः (ترنجیدہ) वि. (फ़ा.) ज्याच्या कपाळाला आठ्या पडल्या आहेत असा; क्रुद्ध; नाराज.

तुरुक़ (طرق) पु. ['अ. 'त़रीक़' (طریق) चे अनेक.] (१) रस्ते; मार्ग. (२) पद्धती.

तुरुश (ترش) वि. (फ़ा.) (१) आंबट; अम्ल. (२) कठोर; तापट. **–अब्रू** (ابرو –) वि. (फ़ा.) तापट; रागीट. **–तब'अ** (طبع –); **–मिज़ाज** (مزاج –) वि. (फ़ा. + 'अ.) **–रू** (رو –) वि. (फ़ा.) चिडखोर; चिरचिरा; रुक्ष; तापट.

तुर्क (ترک) पु. (तु.) (१) तुर्कस्तानचा रहिवासी. (२) सैनिक; योद्धा. (३) प्रेमपात्र; मापूक. **–ज़ादः** (زادہ –) पु. (तु.+फ़ा.) (१) तुर्काचा मुलगा. (२) प्रेमपात्र. (वि.) सुंदर; देखणा. **–ताज** (تاز –) स्त्री. (तु.+फ़ा.) लुटालूट; लूटमार. (पु.) (१) लुटारू. (२) सैनिक. **–बचः** (بچہ –) पु. (तु.+फ़ा.) पाहा 'तुर्कज़ादः'. **–मान** (مان –) पु. (तु.) तुर्कांची एक जाती. **–मिज़ाज** (مزاج –) वि. (तु. + 'अ.) (१) लुटारू. (२) नखरेल; माधुकासारखा.

तुर्किस्तान (ترکستان) पु. (तु.+फ़ा.) तुर्कस्तान.

तुर्की (ترکی) पु. (तु.) (१) तुर्कस्तानचा रहिवासी. (२) तुर्कस्तान. (३) तुर्की घोडा. (स्त्री.) (१) तुर्की भाषा. (२) मर्दानगी; शिपाईपणा. (३) घमेंड; अभिमान. **–ब.तुर्की जवाब देना** (بہ ترکی جواب دینا –)जशास तसे; ठणठणीत उत्तर देणे; निरुत्तर करणे. **–तमामशुद** (تمامشد –) वा. (तु. + फ़ा.) सारी घमेंड उतरली; ऐट, तोरा, फुशारकी नाहीशी झाली.

तुर्फ़गी (طرفگی) स्त्री. ('अ.+फ़ा.)अद्‌भुतता; अपूर्वता; दुर्लभता.

तुर्फ़ः (طرفہ) वि. ('अ.) (१) नवीन; नाविन्यपूर्ण. (२) अद्‌भुत; असामान्य. (पु.) अद्‌भुतता; विलक्षणता; असामान्य गोष्ट. **–यह है कि.** (یہ ہے کہ –) आश्चर्य असे की (स्त्री.).

तुर्ब (ترب) स्त्री. (फ़ा.) मुळा भाजी.

तुर्बत (تربت) स्त्री. ('अ.) समाधी; कबर; थडगे.

तुर्रः (طرہ) पु. ('अ.) (१) तुरा; गोंडा; कलगी. (२) डोकीचे केस; केशपाश; केसाची बट. (३) फुलांचा गुच्छ. (४) उत्कृष्टपणा; सर्वश्रेष्ठता. (५) अद्‌भुतता. **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) गोंडेदार.

तुर्रः-ए-तरार (طرۂ طرار) पु. ('अ.) कुरळे केस.

तुर्रः-ए-दस्तार (طرۂ دستار) पु. ('अ.+फ़ा.) पगडीचा तुरा; शिरमिळवा.

तुर्श (ترش) वि. (फ़ा.) आंबट.

तुर्शी (ترشی) स्त्री. (फ़ा.) (१) आंबटपणा; अम्लता. (२) वैर; वैमनस्य.

तुर्शः (ترشہ) पु. (फ़ा.) आंबटचुका (भाजी).

तुर्रहत (ترہت) स्त्री. ('अ.) (१) निरर्थक; वाह्यात गोष्ट. (२) असत्य. (३) रुक्ष जमीन. [अनेक 'तुर्रहात' (ترہات)].

तुलूअ (طلوع) पु. ('अ.) उदय; वर येणे; उगवणे.

तुल्लाब (طلاب) पु.['अ.'तालिब' (طالب) चे अनेक.] विद्यार्थीगण.

तुवंगर (تونگر) वि. (फ़ा.) (१) श्रीमंत; धनवान. (२) सामर्थ्यवान.

तुवाँ (تواں) स्त्री. (फ़ा.) सामर्थ्य; शक्ती.

तुवाना'ई (توانائی) स्त्री. (फ़ा.) शक्ती; जोर.

तुवाना-ए-मुत्लक़ (توانائے مطلق) वि. (फ़ा.+'अ.) सर्वशक्तिमान.

तुह्फ़गी (تحفگی) स्त्री. ('अ. + फ़ा.) (१) मोठा सद्‌गुण; उत्कृष्टता. (२) दुर्मिळता.

तुह्फ़ः (تحفہ) पु. (फ़ा.) (१) भेट; नजराणा; देणगी. (२) दुर्लभता; उत्कृष्टता. (वि.) उत्तम; उत्कृष्ट; दुर्मिळ.

तुहमत (تہمت) स्त्री. ('अ.) (१) तोहमत; आरोप; आळ. (२) शंका; संदेह.

तुहर (طہر) पु. ('अ.) (१) पावित्र्य; शुद्धता; स्वच्छता. (२) स्त्रीचे विटाळशीपणाचे दिवस संपणे. (३) स्त्री विटाळशी नसलेले दिवस.

तूग़ (توغ) पु. (तु.) सैन्याचा झेंडा, निशाण.

तूत (توت) पु. (फ़ा.) तुतीचे झाड व फळ; तूत; तुती.

तूतिया (توتیا) पु. ('अ.) (१) सुरमा; नेत्रांजन. (२) मोरचूद; ताम्रगर्भ.

दह (دہ) वि. (फ़ा.) दहा (१०). **–चंद** (چند –) वि. (फ़ा.) दसपट. **–दर दह** (دردہ –) वि. (फ़ा.) (१) १० × १०. (२) दहा गज लांब व दहा गज रुंद असलेला (हौद). **–दिलः** (دلہ –) वि. (फ़ा.) (१) शूर; वीर. (२) चिंतातुर. (३) लोभी; अधाशी. [म्हण : **दह दर दुनिया सद दर आख़िरत** (دہ در دنیا صد در آخرت) इहलोकी दहा दिलेत तर परलोकात शंभर मिळतील]. **–बाशी** (باشی –) पु. (फ़ा.+तु.) दहा शिपायांवरील अधिकारी. **–मर्दः** (مردہ –) वि. (फ़ा.) (१) खोटे बोलणारा. (२) बडबडघा. **–रोज़ः** (روزہ –) वि. (फ़ा.) थोड्या दिवसांचा; अस्थायी; नश्वर; तात्पुरता.

दहन (دہن) पु. (फ़ा.) तोंड; मुख. **–दरः** (دردہ –) पु. (फ़ा.) जांभई. **–दरीदः** (دریدہ –) वि. (फ़ा.) फटकळ; उद्धट.

दहन-ए-तेग़ (دہن تیغ) पु. (फ़ा.) (१) तलवारीची धार. (२) मृत्यूचा जबडा.

दहनः (دہنہ) पु. (फ़ा.) (१) नदीचा किनारा. (२) एखाद्या देशाची सरहद्द.

दहर (دہر) पु. ('अ.) युग; काळ; समय.

दहरी (دہری); **दहरियः** (دہریہ) वि. ('अ.) अनीश्वरवादी; जडवादी; नास्तिक.

दहलीज़ (دہلیز) स्त्री. (फ़ा.) (१) उंबरा; उंबरठा. (२) दाराची चौकट. (३) गॅलरी.

दहशत (دہشت) स्त्री. ('अ.) भीती; भय. **–अंगेज़** (– انگیز) वि. ('अ. + फ़ा.) भयानक; भीषण. **–अंगेज़ी** (– انگیزی) स्त्री ('अ.+फ़ा.) (१) दहशतवाद. (२) भीषणता. **–ज़दः** (– زدہ) वि. ('अ.+फ़ा.) भयभीत; भीतिग्रस्त. **–नाक** (– ناک) वि. ('अ.+फ़ा.) भयंकर; भीषण.

दहाँ (دہاں) पु. [फ़ा. 'दहान' (دہان) चे संक्षिप्त.] तोंड; मुख. **–बंद** (– بند) पु. (फ़ा.) शत्रूचे तोंड बंद करणारा मंत्र किंवा ताईत.

दहा (دہا) स्त्री. ('अ.) बुद्धीची कुशाग्रता; हुशारी; प्रतिभा.

दहा (دہا) पु. (फ़ा.) (१) मोहरमचे दहा दिवस. (२) ताबूत.

दहाक (ضحاک) पु. ('अ.) (१) फार हसणारा; खिदळणारा. (२) इराणचा एक अत्यंत अत्याचारी बादशहा. याला फिरीदूंने कैद केले होते. (शु. दहहाक).

दहाक़ीन (دہاقین) पु. ['अ. 'दिहक़ान' (دہقان) चे अनेक.] ग्रामीण लोक; शेतकरी; अडाणी लोक.

दहान (دہان) पु. (फ़ा.) (१) तोंड; मुख. (२) भोक. (३) जखम.

दहानः (دہانہ) पु. (फ़ा.) (१) तोंड; जबडा. (२) नदीचे मुख. (३) मोरी; नाली; गटार. (४) घोडघाचा काटेरी लगाम. (५) पखालीचे तोंड.

दहानः-ए-फ़िरंग (دہانۂ فرنگ) पु. (फ़ा.) पाचू; पन्ना. (हे रत्न विषनाशक समजले जाते).

दहुम (دہم) वि. (फ़ा.) दहावा; दशम.

दहे (دہے) स्त्री. (फ़ा.+हिं.) मोहरमचे दहा दिवस. (बा.).

दहेज़ (دہیز) पु. (फ़ा.) हुंडा (लग्नात दिला जाणारा पैसा वगैरे).

दाँ (داں) वि. (फ़ा.) तज्ज्ञ; माहितगार. (प्रत्य.) जाणणारा. [उदा. 'उर्दूदाँ' (اردو داں) वि. (फ़ा.) उर्दू भाषेचा जाणकार; तज्ज्ञ].

दांग (دانگ) स्त्री. पु. (फ़ा.) (१) सहावा हिस्सा. (२) सहा रतींचे वजन. (३) दिशा; बाजू. (४) तुकडा; भाग.

दा'इन (دائن) पु. ('अ.) कर्ज देणारा; ऋणदाता.

दा'इम (دائم) वि. ('अ.) सदैव; नित्य; निरंतर. **–उल्-ख़ुम्र** (– الخمر) वि. ('अ.) सदा दारूच्या नशेत असलेला. **–उल्-मरीद़** (– المریض); **–उल्-मर्द़** (– المرض) वि. ('अ.) जन्माचा रोगी; सदा आजारी असणारा. **–उल्-हब्स** (– الحبس) पु. ('अ.) जन्मठेप. (वि.) जन्मठेपेची शिक्षा झालेला.

दा'इ'अ (ضائع) वि. ('अ.) (१) नष्ट; वाया घालविलेला. (२) व्यर्थ.

दा'इमन् (دائماً) अव्य. ('अ.) सदैव; सदोदित; निरंतर.

दा'इमी (دائمی) वि. ('अ.) नित्याचा; कायमचा; स्थायी.

दा'इयः (داعیہ) पु. ('अ.) (१) अधिकार; जोर. (२) दावा. (३) दावा करणारी, हक्क सांगणारी स्त्री (बा.).

दा'इर (دائر) वि. ('अ.) (१) गोल फिरणारा; भ्रमण करणारा. (२) उपस्थित; रुजू. **–करना** (– کرنا) (फिर्याद) दाखल करणे; चालविणे. **–ओ-सा'इर** (– وسائر) वि. ('अ.) संपूर्ण अधिकार असलेला (पु.) फिरते कोर्ट; न्यायाधिशांची फेरी.

दा'इरत-उल्-बुरूज (دائرۃ البروج) पु. ('अ.) राशिचक्र; भचक्र.

दा'इरत-उल्-'उलूम (دائرۃ العلوم); **दा'इरत-उल्-म'आरिफ़** (دائرۃ المعارف) पु. ('अ.) ज्ञानकोश.

दा'इरत-उर्-रुसूम (دائرۃ الرسوم) पु. ('अ.) जकात नाके; टोल नाका.

दा'इरः (دائرہ) पु. ('अ.) (१) वर्तुळ; घेर; परीघ. (२) गोल; गोळा. (३) मंडळ; परिषद; सभा; मंडळी. (४) आश्रम; मठ. (५) पेठ; आळी; मोहल्ला. (६) डफ. (७) अक्षरांतील गोल आकार. ['जीम' (ج) अथवा 'ऐन' (ع) वगैरे अक्षरांचा गोल भाग]. **–दार** (– دار) पु. ('अ. + फ़ा.) मठाधीश. **–नुमा** (– نما) वि. ('अ. + फ़ा.) गोलाकार; वर्तुळाकार; गोल.

दा'ई (داعی) वि. ('अ.) (१) बोलावणारा; निमंत्रक. (२) दुवा (आशीर्वाद) देणारा.

दा'उ (داو) पु. (फ़ा.) (१) जुगाराचा डाव. (२) कपट; फसवणूक. (३) डावपेच.

दा'ऊद (داؤد) पु. ('अ.) एका प्रेषिताचे नाव. यांचा आवाज अत्यंत मधुर होता. (त्यांच्या पित्याचे नाव हजरत सुलेमान असे होते.) डेव्हिड.

दाख़िल (داخل) वि. ('अ.) (१) आत आलेला; प्रविष्ट; दाखल झालेला. (२) आत येणारा; प्रवेशेच्छु. (३) सामील; समाविष्ट. **–कुर्निदः** (– کنندہ) वि. ('अ.+फ़ा.) दाखल, प्रविष्ट करून घेणारा. **–ख़ारिज** (– خارج) पु. ('अ. + फ़ा.) सरकारी कागदपत्रात संपत्तीच्या किंवा जमिनीच्या एका मालकाचे नाव बदलून दुसऱ्याचे नाव नोंदविणे;

एकाचे नाव खोडून त्या जागी मालक म्हणून दुसऱ्याचे नाव लावणे. **–ए-दफ़्तर** (دفتر –) वि. ('अ.) दप्तरी जमा झालेला (अर्ज वगैरे); निकालात निघालेला; नामंजूर झालेला.

दाखिल-ए-दफ़्तर (داخل دفتر) वि. ('अ.) दप्तरी जमा झालेला; नामंजूर.

दाखिली (داخلی) वि. ('अ.) (१) अंतर्गत; आतील; स्वराष्ट्रीय. (२) मानसिक; आत्मिक; हार्दिक.

दाखिलः (داخلہ) पु. ('अ.) (१) प्रवेश; शिरकाव. (२) हस्तांतरण; सोपविणे. (३) पैसा जमा केल्याची पावती; पोच. (४) दाखल करण्याची फी. (वि.) अंतर्गत. **वजीर-ए-दाखिलः** (وزیر داخلہ) पु. ('अ.) गृहमंत्री.

दाख़ूल (داخول) पु. (फ़ा.) (१) शेतातील बुजगावणे. (२) बैठकीची जागा. (३) मोठ्या लोकांच्या वाड्यासमोर सामान्य लोकांना बसण्यासाठी तयार केलेली खोली. (४) चावडी.

दाग़ (داغ) पु. (फ़ा.) (१) डाग; डागळल्याची खूण. (२) चिन्ह; खूण. (३) काळिमा; कलंक. (४) दोष; अपराध. (५) भाजल्याची खूण. (६) दुःख; क्लेश. (७) मृत्युशोक. (८) जखमेची खूण. (९) द्वेष; जळफळाट. **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) कचेरी (जेथे कागदावर शिक्के मारले जातात.) **–दार** (دار –) वि. (फ़ा.) (१) डागळलेला; कलंकित. (२) दोषी; सदोष; अपराधी. **–बेल** (بیل –) स्त्री. (फ़ा.) (१) पाया खोदणे, रस्ता बनविणे वगैरेसाठी आधी कुदळीने आखलेल्या रेषा. (२) पाया. ['बेल' (بیل) कुदळ].

दाग़-ए-जिगर (داغ جگر) पु. (फ़ा.) (१) अपत्यशोक. (२) प्रीतीच्या आगीत होरपळणे.

दाग़-ए-दिल (داغ دل) पु. (फ़ा.) हृदयाला बसलेला चटका; प्रेमाग्नीचा डाग.

दाग़ी (داغی) वि. (फ़ा.) (१) डागळलेला; डाग पडलेला. (२) कलंकित. (३) ज्याला शिक्षा झालेली आहे असा; गुन्हेगार.

दाज (داج) पु. ('अ.) दाट काळोख; गडद अंधार; काळोखी रात्र.

दाद (داد) स्त्री. (फ़ा.) (१) न्याय; दाद. (२) दान. (३) प्रशंसा; कदर; वाहवा. (प्रत्य.) दिलेला. [उदा. 'खुदा दाद' (خداداد) वि. (फ़ा.) ईश्वरदत्त]. **–ख्वाह** (خواہ –) वि. (फ़ा.) न्याय इच्छिणारा; फिर्याद करणारा; वादी. **–गर** (گر –); **–गुस्तर** (گستر –) वि. (फ़ा.) न्याय देणारा; न्यायाधीश. **–तलब** (طلب –) वि. (फ़ा. + 'अ.) (१) न्याय इच्छिणारा. (२) प्रशंसेची अपेक्षा बाळगणारा. **–दिही** (دھی –) स्त्री. (फ़ा.) (१) न्याय देणे; तक्रार ऐकणे. (२) प्रशंसा करणे. **–फ़रियाद** (فریاد –) स्त्री. (फ़ा.) धावा करणे; न्यायासाठी प्रार्थना करणे. **दाद न. फ़रियाद** (داد نم فریاد) जुलूम; अन्याय. **–बख़्श** (بخش –); **–रस** (رس –) वि. (फ़ा.) न्याय देणारा; न्यायी. **–रसी** (رسی –) स्त्री. (फ़ा.) न्याय.

दाद-ओ-दिहिश (داد و دهش) स्त्री. (फ़ा) दानशूरता; उदारता.

दाद-ओ-सितद (داد و ستد) स्त्री. (फ़ा.) आर्थिक देवघेव; सावकारी.

दादनी (دادنی) स्त्री. (फ़ा.) आगाऊ दिलेली रक्कम; कर्ज; ऋण; तगाई. (वि.) देण्यायोग्य.

दादार (دادار) पु. (फ़ा.) न्याय देणारा; न्यायाधीश.

दादः (دادہ) वि. (फ़ा.) दिलेला.

दान (دان) प्रत्य. (फ़ा.) पात्र; भांडे. [उदा. 'गुलदान' (گلدان) पु. (फ़ा.) पुष्पपात्र; फ्लॉवर पॉट].

दाना (دانا) वि. (फ़ा.) (१) ज्ञाता; जाणकार. (२) बुद्धिमान; हुशार; चतुर. (३) प्रवीण; कुशल. **–ई** (ئی –) स्त्री. (फ़ा.) बुद्धिमत्ता; हुशारी; निपुणता. **–बिल** (دل –) वि. (फ़ा.) अंतर्यामी; अंतर्ज्ञानी. **–ओ-बीना** (و بینا –) वि. (फ़ा.) जो जाणतो व पाहातो असा; अत्यंत ज्ञानी व अनुभवी.

दानियाल (دانیال) पु. (फ़ा.) एका प्रेषिताचे नाव; डॅनियल.

दानिश (دانش) स्त्री. (फ़ा.) (१) बुद्धी; अक्कल; हुशारी. (२) ज्ञान; विद्या. **–आमोज़** (آموز –) वि. (फ़ा.) (१) विद्या शिकणारा (शिष्य). (२) विद्या शिकविणारा (गुरू). **–मंद** (مند –); **–वर** (ور –) वि. (फ़ा.) (१) बुद्धिमान; हुशार. (२) वैज्ञानिक. (३) विद्वान. **–मंदी** (مندی –) स्त्री. (फ़ा.) (१) बुद्धिमत्ता; हुशारी. (२) विद्वत्ता. (३) निपुणता.

दानिस्त (دانست); **दानिस्तगी** (دانستگی) स्त्री. (फ़ा.) ज्ञान; जाणीव; माहिती.

दानिस्तः (دانستہ) अव्य. (फ़ा.) जाणूनबुजून. (वि.) ज्ञात. **दीदः-ओ-दानिस्तः** (دیدہ و دانستہ) मुद्दाम; जाणूनबुजून.

दानः (دانہ) पु. (फ़ा.) (१) धान्याचा कण; दाणा; धान्य. (२) बीज. (३) भाजलेले धान्य; लाही. (४) द्राक्षाची एक जात. (५) लहान फोड. (६) देवी (रोग) चा फोड. (७) आंब्यांची संख्या. (बीस दाने) वीस आंबे. (८) रवा. (९) कण. (१०) मोत्याचा दाणा. **–ख़ोर** (خور –) वि. (फ़ा.) धान्य खाणारे जनावर; गुरू; ढोर. **–दार** (دار –) वि. (फ़ा.)

दाणेदार. **–बंदी** (بندی –) स्त्री. (फ़ा.) उभ्या पिकाची आणेवारी; कच्ची मोजणी. **–बदली** (بدلی –) स्त्री. (फ़ा.) (१) एकमेकांच्या चोचीत धान्यकण देणे (पक्ष्यांचे); अत्यंत प्रेम किंवा जवळीक व्यक्त करणे.

दानः-ए-ज़ंजीर (دانۂ زنجیر) पु. (फ़ा.) साखळीतील दुवा.

दाफ़ि'अ (دافع) वि. ('अ.) निवारक; नाशक. **–उत्-तिह़ाल** (الطحال –) वि. (फ़ा.) प्लीहेचा (पांथरीचा) विकार नाहीसा करणारे (औषध).

दाफ़ि'अ-उल्-बलाया (دافع البلایا) वि. ('अ.) आपत्तींचा नाश करणारा; दुःखहारक.

दाफ़ि'अ-ए-क़ब्ज़ (دافع قبض) वि. ('अ.) बद्धकोष्ठता दूर करणारा.

दाफ़ि'अ-ए-वरम (دافع ورم) वि. ('अ.+फ़ा.) सूज उतरविणारा; शोथनाशक.

दाफ़ि'अः (دافعہ) स्त्री. ('अ.) शरीरातील मलमूत्र व घाम बाहेर काढून टाकणारी शक्ती.

दाब (داب) पु. ('अ.) (१) पद्धती; ढंग. (२) वैभव; रुबाब.

दाबित् (ضابط) वि. ('अ.) संयमी; सहनशील.

दाबितगी (ضابطگی) स्त्री. ('अ.+फ़ा.) कायदेशीरपणा; नियमानुसारिता.

दाबितः (ضابطہ) पु. ('अ.) (१) नियम; व्यवस्था; कायदा. (२) पद्धती; प्रणाली; प्रथा. **–बरतना** (برتنا –) कायद्याप्रमाणे वागणे; नियमानुसार चालणे. **ख़िलाफ़-ए-दाबितः** (خلاف ضابطہ) अव्य. ('अ.) नियमाविरुद्ध. **बादाबितः** (باضابطہ) वि. अव्य. (फ़ा.+'अ.) नियमानुसार; कायदेशीर; सनदशीर; वैध; औपचारिक. **बेदाबितः** (بےضابطہ) वि. (फ़ा.+'अ.) नियमाविरुद्ध; बेकायदेशीर; असाधारण.

दाबितः-ए-दीवानी (ضابطۂ دیوانی) पु. ('अ.+फ़ा.) दिवाणी कायदा.

दाबितः-ए-फ़ौजदारी (ضابطۂ فوجداری) पु. ('अ.+फ़ा.) फौजदारी कायदा.

दाब्बः (دابہ) पु.('अ.) चतुष्पाद प्राणी; जनावर; पशू.

दाम (دام) पु. (फ़ा.) (१) पाश; बंधन; जाळे. (२) एका रुपयाचा चाळीसावा भाग (एक जुने नाणे). (३) एका पैशाचा पंचविसावा भाग (एक जुने नाणे). (४) १२ मासे किंवा १८ ते २१ मासे भाराचे वजन.

दाम-ए-अजल (دام اجل) पु. (फ़ा.+'अ.) मृत्युपाश.

दाम-ए-गेसू (دام گیسو) पु. (फ़ा.) केशपाश.

दाम-ए-मुह़ब्बत (دام محبت) पु. (फ़ा.+'अ.) प्रेमपाश; प्रेमबंधन.

दामन (دامن) पु. (फ़ा.) (१) पदर; अंचल. (२) सदरा, कोट वगैरेचा खाली लोंबणारा भाग. (३) डोंगराचा पायथा; मैदान; सपाट जमीन.

दामन पि. तेरे ग़ैर के माथे का पसीनः।
और वह भी मेरी चश्म-ए-गुहरबार के आगे।।

–अफ़्शाँ (افشاں –) वि. (फ़ा.) (१) पदर झटकणारा; रिक्तहस्त. (२) नखऱ्यात चालणारा. **–कशाँ** (کشاں –) वि. (फ़ा.) घमेंडखोर. **–गीर** (گیر –) वि. (फ़ा.) (१) पदर पकडणारा; अडविणारा. (२) आधार इच्छिणारा; शरणार्थी. (३) दावेदार. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) लांब-रुंद; मोठी (जखम).

दामन-ए-कोह (دامن کوہ) पु. (फ़ा.) एखाद्या डोंगराच्या तळाशी असलेले मैदान.

दामन-ए-दौलत (دامن دولت) पु. (फ़ा.+'अ.) संरक्षण; छत्रछाया.

दामन-ए-मर्यम (دامن مریم) पु. (फ़ा.+'अ.) (१) येशूची माता मरियम हिचा पदर. हा निष्कलंक होता. (२) सतीत्व.

दामन-ए-शब (دامن شب) पु. (फ़ा.) रात्रीचा शेवटचा भाग.

दामनी (دامنی) स्त्री. (फ़ा.) (१) बायकांची ओढणी. (२) स्त्रियांच्या शवपेटीवर टाकण्यात येणारी बिनशिवणीची चादर. (३) घोडघाचा घाम (स्वाराच्या कपडघाला लागू नये म्हणून त्याच्या पुठ्ठघावर (जिनाखाली) घातले जाणारे कापड.

दामाद (داماد) पु. (फ़ा.) जावई; जामात.

दामान (دامان) पु. (फ़ा.) पाहा 'दामन'.

दामिन (ضامن) वि. ('अ.) जामीन राहाणारा; हमीदार; जामीन. (पु.) जामीन; हमी. (हिं.) विरजण. (दुधाचे दही करण्यासाठी त्यात घालण्याचा पदार्थ; दही; लिंबू.) **–बर दामिन** (– बर ضامن) दूरचा, गौण जामीन. **फ़'आल दामिन** (فعال ضامن) वि. ('अ.) चांगल्या वर्तणुकीचा जामीन. **माल दामिन** (مال ضامن) वि. ('अ.) दुसऱ्याच्या कर्जाबद्दल जामीन राहाणारा. **ह़ाज़िर दामिन** (حاضر ضامن) वि. ('अ.) एखाद्या आरोपीला न्यायालयात हजर करण्याची जबाबदारी घेणारा.

दामिनी (ضامنی) स्त्री. ('अ.) जामीन; हमी; जबाबदारी. (वि.) हमीदार.

दाय'अ (ضایع); **दा'ए'अ** (ضائع) वि. अव्य. ('अ.) नष्ट; वाया; व्यर्थ; निरर्थक. **–करना** (– کرنا) नष्ट करणे; वाया घालविणे.

दायः (دایہ) स्त्री. (फ़ा.) (१) दाई; नर्स. (२) दुसऱ्याच्या मुलांना आपले दूध पाजविणारी स्त्री. **–गरी** (گری –) स्त्री. (फ़ा.) दाईचे काम किंवा पेशा.

दार (دار) स्त्री. (फ़ा.) (१) लाकूड. (२) मूळ; खोडा; फाशी. (प्रत्य.) असणारा; वाला; करणारा. [उदा. 'दाग़दार' (داغدار) वि. (फ़ा.) डाग असलेला; कलंकित]. **–कश** (کش –) वि. (फ़ा.) फाशी देणारा; मांग; सुळावर चढविणारा. **–पर खींचना** (پر کھینچنا –); **–पर चढ़ाना** (پر چڑھانا –) सुळावर चढविणे.

दार (دار) पु. ('अ.) (१) घर; गृह. (२) स्थान; जागा. (३) जग; लोक.

दार-उत्-तर्बियत (دارالتربیت) पु. ('अ.) प्रशिक्षण विद्यालय; ट्रेनिंग स्कूल.

दार-उत्-तश्ख़ीस् (دارالتشخیص) पु. ('अ.) रोग्यांना तपासण्याची खोली.

दार-उत्-तुहुफ़ (دارالتحف) पु. ('अ.) पदार्थ संग्रहालय; म्युझियम.

दार-उद्-दर्ब (دارالضرب) पु. ('अ.) टाकसाळ.

दार-उद्-दैफ़ (دارالضیف) पु. ('अ.) अतिथिगृह.

दार-उन्-न'ईम (دارالنعیم) पु. ('अ.) स्वर्ग.

दार-उल्-'अदालत (دارالعدالت) पु. ('अ.) न्यायालय.

दार-उल्-अमन (دارالامن) पु. ('अ.) शांतिस्थान.

दार-उल्-'अमल (دارالعمل) पु. ('अ.) (१) कर्मक्षेत्र; जग. (२) प्रयोगशाळा.

दार-उल्-अमान(دارالامان); **दार-उल्-अम्न** (دارالامن) पु. ('अ.) शांतता व सुरक्षितता असलेले स्थान. जेथे लढाई होत नाही असे ठिकाण.

दार-उल्-अमारत (دارالامارت) पु. ('अ.) राजधानी.

दार-उल्-आख़िरत (دارالاخرت) पु. ('अ.) परलोक; परमधाम.

दार-उल्-इक़ामः (دارالاقامہ) पु. ('अ.) (१) छात्रालय. (२) बोर्डिंग हाऊस; निवास.

दार-उल्-इमारत (دارالامارت) पु. ('अ.) राजधानी; शासन केंद्र.

दार-उल्-'इयार (دارالعیار) पु. ('अ.) सोन्याचांदीची पारख जेथे केली जाते ते स्थान.

दार-उल्-'इल्म (دارالعلم) पु. ('अ.) विद्यालय; शाळा.

दार-उल्-'उलूम (دارالعلوم) पु. ('अ.) विश्वविद्यालय; विद्यापीठ; युनिव्हर्सिटी.

दार-उल्-ऐताम (دارالایتام) पु. ('अ.) अनाथालय.

दार-उल्-क़दा (دارالقضا) पु. ('अ.) न्यायालय.

दार-उल्-क़रार (دارالقرار) पु. ('अ.) स्वर्ग.

दार-उल्-कुतुब (دارالکتب) पु. ('अ.) किताबघर; पुस्तकालय.

दार-उल्-क़ुमामः (دارالقمامہ) पु. ('अ.) (१) वेश्यांचा मोहल्ला. (२) उकीरडा.

दार-उल्-ख़िलाफ़त (دارالخلافت) पु. ('अ.) राजधानी.

दार-उल्-ख़ैर (دارالخیر) पु. ('अ.) (१) जेथे ख़ैरात (दानधर्म) केली जाते ते स्थान. (२) कल्याण केंद्र. (३) अजमेरचे विशेषण किंवा पदवी.

दार-उल्-जज़ा (دارالجزا) पु. ('अ.) परलोक; यमलोक.

दार-उल्-फ़ना (دارالفنا) पु. ('अ.) नश्वर लोक; जग; इहलोक.

दार-उल्-बक़ा (دارالبقا) पु. ('अ.) चिरंतन; लोक; परलोक.

दार-उल्-बवार (دارالبوار) पु. ('अ.) नरक.

दार-उल्-मिह्न (دارالمحن)पु. ('अ.) कष्टाचे घर; जग.

दार-उल्-मुकाफ़ात (دارالمکافات) पु. ('अ.) (१) जग; इहलोक. (२) जेथे कर्माची फळे मिळतात ते स्थान; प्रलय-दिवस; परलोक.

दार-उल्-मुतालि'अः (دارالمطالعہ) पु. ('अ.) अध्ययन गृह; वाचनालय; ग्रंथालय.

दार-उल्-मुल्क (دارالملک) पु. ('अ.) राजधानी.

दार-उल्-हरब (دارالحرب) पु. ('अ.) (१) जेथील राज्यकर्ते बिगर मुस्लिम (काफिर) असून आपल्या मुस्लिम प्रजेला धार्मिक स्वातंत्र्य देत नाहीत असा देश. अशा देशाविरुद्ध मुसलमान धर्मयुद्ध पुकारू शकतात. (२) युद्धभूमी; रणक्षेत्र.

दार-उल्-हुकूमत (دارالحکومت) पु. ('अ.) राजधानी.

दार-उश्-श'अ (دارالشرع) पु. ('अ.) इस्लामी न्यायालय.

दार-उश्-शिफ़ा (دارالشفا) पु. ('अ.) दवाखाना; आरोग्यालय.

दार-उश्-शूरॉ (دارالشوریٰ) पु. ('अ.) खलबतखाना; सल्लामसलत करण्याचे स्थान.

दार-उस्-सनम (دارالصنم) पु. ('अ.) मूर्तिगृह; मंदीर.

दार-उस्-सफ़ा (دارالصفا) पु. ('अ.) पवित्र घर; मक्का.

दार-उस्-सलाम (دارالسلام) पु. ('अ.) शांतिस्थान; स्वर्ग.

दार-उस्-सल्तनत (دارالسلطنت) पु. ('अ.) राजधानी.

दार-उस्-सुरूर (دارالسرور) पु. ('अ.) आनंदभवन; स्वर्ग.

दार-ओ-गीर (دارو گیر) स्त्री. (फ़ा.) (१) धरपकड; युद्ध; भांडण. (२) राज्य; सत्ता.

दार-ओ-मदार (دارومدار) पु. (फ़ा.) (१) आधार; आश्रय; अवलंब; आसरा; भरवसा. (२) आदर-सत्कार. (३) स्वच्छता.

दारचीनी (دارچینی) स्त्री. (फ़ा.) दालचिनी (झाड व त्याची साल).

दारचोब (دارچوب) स्त्री. (फ़ा.) घरात कपडे वाळत घालण्याची दांडी किंवा दोरी.

दारबस्त (داربست) स्त्री. (फ़ा.) घराच्या वरच्या मजल्याचे बांधकाम करताना आडवे-उभे वासे व फळ्या बांधून करतात तो माचा; परांची; पाड; पहाड; पायाड.

दारबाज (دارباز) वि. (फ़ा.) (१) डोंबारी. (२) जादूगार. (३) फसव्या.

दारहल्द (دارهلد) स्त्री. (फ़ा.) दारुहळद (सं. 'दारुहरिद्रा').

दारा (دارا) पु. (फ़ा.) (१) मालक; स्वामी; ईश्वर. (२) बादशहा. (३) शिकंदराकडून पराभूत झालेला इराणचा एक बादशहा. (४) श्रीमंत. **-ई** (ئی –) स्त्री. (फ़ा.) (१) राज्य; सत्ता. (२) ईश्वरत्व. (३) एक प्रकारचे रेशमी कापड.

दारिब (ضارب) वि. ('अ.) मारणारा; प्रहार करणारा.

दारू (دارو) स्त्री. (फ़ा.) (१) औषध; उपचार; इलाज. (२) शोभेची किंवा स्फोटाची दारू. (३) मदिरा; मद्य.

दारैन (دارین) पु. ('अ.) दोन्ही लोक; इहलोक व परलोक.

दारोग़ः (داروغہ) पु. (फ़ा.) (१) निरीक्षण; देखरेख ठेवणारा. (२) फौजदार. (३) ठाणेदार.

दारोग़ः-ए-महबस (داروغۂ محبس) पु. ('अ. + फ़ा.) तुरुंगाधिकारी; जेलर.

दार्र (ضار) वि. ('अ.) हानिकारक; अनिष्ट.

दाल (دال) पु. (फ़ा.) गरुड.

दालान (دالان) पु. (फ़ा.) (१) दालन; दिवाण-खाना. (२) ओसरी; व्हरांडा. **-बर दालान** (– در دالان) पु. (फ़ा.) दुहेरी दिवाणखाना.

दाव (داو) पु. (फ़ा.) डाव; पेच; फसवणूक.

द'अवत-ए-'आम है, राह-ए-वफ़ा है, मैं हूँ।
वह मेरे साथ चला आ'ए जो आसाँ समझे।।

दावर (داور) पु. (फ़ा.) (१) न्यायाधीश. (२) परमेश्वर. (३) सत्ताधीश.

दावर-ए-महशर (داورمحشر); **दावर-ए-हश्र** (داورحشر) पु. (फ़ा.+'अ.) जग प्रलयानंतर अंतिम न्यायदिनाच्या दिवशी न्याय करणारा; परमेश्वर.

दावरी (داوری) स्त्री. (फ़ा.) (१) न्याय. (२) सत्ता; राज्य. **-गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) न्यायालय.

दाश (داش) पु. (फ़ा.) (१) चुन्याची भट्टी. (२) कुंभाराचा आवा. **-मश्ती** (مشتی –) वि. (फ़ा.) (१) पोकीन; रंगेल. (२) उडाणटप्पू.

दाश्त (داشت) स्त्री. [फ़ा. 'दाश्तन' (داشتن) ठेवणे.] (१) देखरेख; काळजी. (२) पालनपोषण.

दाश्तः (داشتہ) स्त्री. (फ़ा.) घरात आणून ठेवलेली बाई; रखेली.

दास्ताँ (داستاں) स्त्री. [फ़ा. 'दास्तान' (داستان) चे संक्षिप्त.] कहाणी.

दास्तान (داستان) स्त्री. (फ़ा.) (१) कहाणी; कथा. (२) वृत्तांत; हकीगत. (३) लांबलचक कथा; चव्हाट. **-गो** (گو –); **-सरा** (سرا –) पु. (फ़ा.) कहाणी सांगणारा; गोष्टी सांगून पोट भरणारा.

दास्तानः (داستانہ) पु. (फ़ा.) हातमोजा.

दाह (داہ) पु. स्त्री. (फ़ा.) (१) दास; गुलाम. (२) दासी; मोलकरीण.

दाहाव (داهاو) पु. (फ़ा.) खिड; दरी.

दाहिक (ضاحک) वि. ('अ.) हसणारा; गमत्या.

दाहियः (داهیہ) स्त्री. ('अ.) आपत्ती; संकट; अपघात.

दाही (داهی) वि. ('अ.) बुद्धिमान; चतुर.

दाहूल (داهول) पु. (फ़ा.) बुजगावणे (शेतात उभे केले जाणारे).

दिक़ (دق) पु. स्त्री. ('अ.) क्षयरोग; राजयक्ष्मा.

दिक़ (دق) वि. ('अ.) (१) त्रस्त; हैराण. (२) अस्वस्थ; आजारी. (३) कृश; हडकुळा. **-करना** (کرنا –) त्रास देणे; सतावणे. **-दारी** (داری –) स्त्री. ('अ.) त्रास; अडचण; दारिद्र्य. **-होना** (ہونا –) त्रासणे.

दिक़्क़त (دقت) स्त्री. ('अ.) (१) अडचण; त्रास; संकट. (२) कठीणता. (३) सूक्ष्मता. (४) अचूक-पणा. **-तलब** (طلب –) वि. ('अ.) ज्यात अडचणीला तोंड द्यावे लागते असे; अवघड; कष्टसाध्य. **-पसन्द** (پسند –) वि. ('अ. + फ़ा.) सूक्ष्मताप्रिय; अवघड गोष्टी करण्याची आवड

असलेला. **–शिनास** (شناس –) वि. ('अ.+फ़ा.) सूक्ष्मदर्शी; शहाणा.

दिगर (دگر) वि. [फ़ा. 'दीगर' (دیگر) चे संक्षिप्त.] दुसरा; अन्य. **–गूं** (گوں –) वि. (फ़ा.) (१) उलटा; बदललेला. (२) दुसऱ्या रंगाचा.

दिजाज (دجاج) स्त्री. ('अ.) कोंबडी; कोंबडचा. (पु.) कोंबडा.

दिद (ضد) स्त्री. ('अ.) (१) हट्ट; दुराग्रह. (२) वैमनस्य; वैर. (३) विपरीत; विरुद्ध; उलट; (स्थिती, अर्थ वगैरे).

दिद्दन् (ضداً) अव्य ('अ.) हट्टाने.

दिद्दी (ضدی) वि. ('अ.) हट्टी; दृढनिश्चयी.

दिद्दैन (ضدین) पु. ('अ.) दोन परस्पर विरोधी गोष्टी (उदा. अग्नी व पाणी).

दिन'अत (دناءت) स्त्री. ('अ.) नीचता; हलकटपणा; मवालीगिरी.

दिफ़ा'अ (دفاع) पु. ('अ.) संरक्षण; बचाव.

दिफ़ा'ई (دفاعی) वि. ('अ.) संरक्षणविषयक; संरक्षणासंबंधी.

दिबाग़त (دباغت) स्त्री. ('अ.) कातडे कमावणे, रंगविणे वगैरे.

दिमन (دمن) पु. ('अ.) (१) विष्ठा; शेण. (२) उकीरडा.

दिमाग़ (دماغ) पु. ('अ.) (१) मेंदू; मस्तिष्क. (२) बुद्धी; अक्कल. (३) अहंकार; गर्व. (४) सहनशक्ती. (५) संज्ञा; चेतना; शुद्धी. **–चाटना** (چاٹنا –) बडबड करून डोके उठविणे. **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) (१) बुद्धिमान. (२) गर्विष्ठ. **–रोशन** (روشن –) स्त्री. ('अ.) तपकीर; नस्य. **–सोज़ी** (سوزی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) बौद्धिक परिश्रम; डोकेफोड.

दिमाग़ी (دماغی) वि. ('अ.) (१) बौद्धिक; मेंदूसंबंधी. (२) गर्विष्ठ.

दिमाद (ضماد) पु. ('अ.) लेप; मलम.

दिमिश्क़ (دمشق) पु. ('अ.+फ़ा.) इराकची राजधानी; दमास्कस. [नमरूदचा मुलगा 'दिमशाक़' (دمشاق) याने हे शहर वसविले, म्हणून त्याचे नाव या शहरास देण्यात आले].

दिम्न (ضمن) पु. ('अ.) (१) पत्राचा लखोटा; पत्रातील विषय. (२) विभाग; खंड. (३) आतील भाग. (४) विचार; कल्पना. (५) कलम (कायद्याचे); नियम. **–करना** (کرنا –) अंतर्भाव करणे. **–में** (میں –) अव्य. ('अ.+हिं.) अंतर्भूत; प्रसंगानुरोधाने.

दिम्नन् (ضمناً) अव्य. ('अ.) प्रसंगानुरोधाने; ओघाओघाने.

दिम्नी (ضمنی) वि. ('अ.) अंतर्भूत; गौण; दुय्यम प्रतीचा.

दियत (دیت) स्त्री. ('अ.) रक्ताचा मोबदला; प्राणांचे मूल्य. एखाद्याच्या हातून कोणी व्यक्ती मारली गेल्यास त्या व्यक्तीच्या वारसांना (त्यांनी मान्य केल्यास) मारणाऱ्याच्या प्राणांऐवजी पैसे दिले जात व मारणाऱ्याला मुक्त केले जाई. या रकमेला 'दियत' असे म्हणत.

दिया (ضیا) स्त्री. ('अ.) (१) प्रकाश; ज्योती; प्रभा. (२) सूर्यप्रकाश. **–गुस्तर** (گستر –); **–पाश** (پاش –); **–बार** (بار –) वि. ('अ.+फ़ा.) प्रकाश फैलावणारा; प्रभा पसरविणारा.

दियानत (دیانت) स्त्री. ('अ.) प्रामाणिकपणा; इमानदारी; सत्यनिष्ठा. **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) प्रामाणिक; विश्वासू; न्यायी. **–दारी** (داری –) स्त्री. ('अ. + फ़ा.) प्रामाणिकपणा; इमानदारी.

दियाफ़त (ضیافت) स्त्री. ('अ.) (१) पाहुणचार; आतिथ्य. (२) मेजवानी. **–ख़ानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) पाहुण्यांचे भोजनगृह.

दियार (دیار) पु. ['अ. 'दार' (دار) 'घर' चे अनेक; परंतु उर्दूत एकवचनी वापरला जातो]. (१) देश; प्रांत. (२) जग. (३) शहर.

दिरंग (درنگ) स्त्री. पु. (फ़ा.) उशीर; दिरंगाई.

दिरम (درم) पु. (फ़ा.) (१) चार आणे किमतीचे चांदीचे नाणे. (२) ३½ मासे (वजन).

दिरहम (درهم) पु. (फा.) पाहा 'दिरम' (दो. शु.).

दिरा (درا) पु. (फ़ा.) (१) मोठी घंटा पाहा 'दरा' (दो. शु.). (२) कापड किंवा जमीन मोजण्याचा गज.

दिराब (ضراب) पु. ('अ.) (१) तलवारीचा वार करणे. (२) नर व मादी यांचा संयोग; जुगणे.

दिरायत (درایت) स्त्री. ('अ.) (१) ज्ञान; माहिती. (२) बुद्धी; प्रतिभा.

दिरार (ضرار) पु. ('अ.) (१) एकमेकांचे नुकसान करणे; जुलूम करणे. (२) मक्का येथील एक मशीद. या मशिदीत मुहम्मद साहेबांचे शत्रू खलबते करीत असत. ती पाडून टाकण्याची आज्ञा अल्लाने दिली होती.

दिरासत (دراست) स्त्री. ('अ.) (१) बुद्धी; विवेक; शहाणपण. (२) घडा घेणे; घडा देणे; शिकविणे; शिकणे.

दिरी (درو) पु. स्त्री. (फ़ा.) शेताची कापणी (सुगीतील). **-गर** (گر -) वि. (फ़ा.) मळणीसाठी पीक कापणारा.

दिर्ग़ाम (ضرغام) पु. ('अ.) सिंह; वाघ.

दिर्रः (درہ) पु. ('अ.) हंटर; कातडघाचा चाबूक.

दिल (دل) पु. (फ़ा.) (१) हृदय; अंतःकरण. (२) मन. (३) उत्साह. (४) धैर्य; हिम्मत. (५) इच्छा. (६) उदारता; दातृत्व. **-अटकना** (اٹکنا -) प्रेम बसणे. **-अफ़गार** (افگار -) वि. (फ़ा.) घायाळ अंतःकरणाचा; दुःखी; आशिक. **-अफ़रोज़** (افروز -) वि. (फ़ा.) अंतःकरणाला प्रकाशित करणारा. **-आज़ार** (آزار -) वि. (फ़ा.) मन दुखविणारा; त्रास देणारा. **-आज़ुर्दः** (آزردہ -) वि. (फ़ा.) दुःखी; व्यथित; खिन्न. **-आरा** (آرا -) वि. (फ़ा.) हृदयाची शोभा वाढविणारा; प्रेमपात्र; माषूक. **-आरा'ई** (آرائی -) स्त्री. (फ़ा.) हृदयात स्थान मिळवून त्याची शोभा वाढविणे. **-आराम** (آرام -) वि. (फ़ा.) अंतःकरणाला आराम, सुख देणारा; प्रेमपात्र. **-आवर** (آور -) वि. (फ़ा.) (१) शूर; बहादूर. (२) उत्साही. **-आवरी** (آوری -) स्त्री. (फ़ा.) (१) शौर्य. (२) उत्साह. **-आवेज़** (آویز -) वि. (फ़ा.) चित्ताकर्षक; मनोहर; सुंदर; मोहक. **-आवेज़ी** (آویزی -) स्त्री. (फ़ा.) सौंदर्य; आकर्षकता; मोहकता. **-उचटना** (اچٹنا -) मन उडणे; लक्ष न लागणे. **-उलझना** (الجھنا -) प्रेमात पडणे. **-कड़ा करना** (کڑا کرنا -) मन घट्ट करणे; धीर धरणे. **-कश** (کش -) वि. (फ़ा.) चित्ताकर्षक; मनोहर. **-कशी** (کشی -) स्त्री. (फ़ा.) आकर्षकपणा; सौंदर्य; मोहकता. **-कुशा** (کشا -) वि. (फ़ा.) रमणीय; रम्य; मनोहर. **-के फफोले फोड़ना** (کے پھپھولے پھوڑنا -) एखाद्यावर राग काढणे; मनातील मळमळ ओकून टाकणे. **-ख़राश** (خراش -) वि. (फ़ा.) हृदयविदारक. **-ख़स्तः** (خستہ -) वि. (फ़ा.) दुःखी; भग्नहृदय. **-ख़ुशकुन** (خوش کن -) वि. (फ़ा.) हृदयाला आनंदित करणारा; आनंददायक. **-ख़्वाह** (خواہ -) वि. (फ़ा.) मनपसंत; मनाजोगा. **-गर्मी** (گرمی -) स्त्री. (फ़ा.) (१) प्रेम. (२) साहस. (३) उत्साह. **-गिरिफ़्तः** (گرفتہ -) वि. (फ़ा.) खिन्न; उदासीन. **-गीर** (گیر -) वि. (फ़ा.) दुःखी; उदास. **-गुदाज़** (گداز -) वि. (फ़ा.) हृदयद्रावक; दुःखदायक. **-गुर्दः** (گردہ -) वि. (फ़ा.) साहस; उत्साह; हिम्मत. **-चला** (چلا -) वि. (फ़ा.+हिं.) (१) धाडसी; शूर. (२) स्वच्छंदी; वेडा. **-चस्प** (چسپ -) वि. चित्ताकर्षक; मनोवेधक; मजेदार. **-चस्पी** (چسپی -) स्त्री. (फ़ा.) (१) गोडी; आवड; रुची. (२) मनोरंजन; आनंद. **-ज़दः** (زدہ -) वि. (फ़ा.) दुःखी; व्यथित. **-जम्'ई** (جمعی -) स्त्री. (फ़ा.+'अ.) (१) संतोष; खात्री. (२) मिलाफ. (३) एकाग्रता. (४) सांत्वन. **-जला** (جلا -) वि. (फ़ा.+हिं.) (१) भग्नहृदय. (२) प्रेमात सापडलेला. **-जो** (جو -) वि. (फ़ा.) सुंदर; मनोहर. **-जो'ई** (جوئی -) स्त्री. (फ़ा.) सांत्वन; धीर. **-तंग** (تنگ -) वि. (फ़ा.) (१) दुःखी. (२) कृपण; कंजूष. **-तफ़्तः** (تفتہ -) वि. (फ़ा.) दग्धहृदय; दुःखी. **-दादगी** (دادگی -) स्त्री. (फ़ा.) आसक्ती; मोहित होणे. **-दार** (دار -); **-दादः** (دادہ -) वि. (फ़ा.) मोहित; मुग्ध; प्रेमी; आसक्ती. वि. (फ़ा.) (१) प्रेमी; प्रिय. (२) उदार. (३) प्रेमिका. **-दारी** (داری -) स्त्री. (१) सांत्वन; धीर. (२) उदारता. **-दिही** (دہی -) स्त्री. (फ़ा.) (१) सांत्वन. (२) प्रीती. **-दुज़्द** (دزد -) वि. (फ़ा.) हृदय चोरणारा; प्रेमपात्र; माषूक. **-दोज़** (دوز -) वि. (फ़ा.) अंतःकरणात घुसणारा. **-नवाज़** (نواز -) (१) सांत्वन करणारा; धीर देणारा. (२) प्रेमपात्र; माषूक. **-नवाज़ी** (نوازی -) स्त्री. (फ़ा.) (१) मैत्री. (२) सांत्वन; धीर. **-नशीं** (نشیں -) वि. (फ़ा.) हृदयात घर केलेला; मनात ठसलेला. **-निहाद** (نہاد -) वि. (फ़ा.) प्रेमपात्र; प्रियतमा. **-पसन्द** (پسند -); **-पिज़ीर** (پذیر -) वि. (फ़ा.) मनपसंत; आवडता. **-फ़रेब** (فریب -) वि. (फ़ा.) (१) मनमोहक. (२) प्रेमिका. **-फ़रोज़** (فروز -) वि. (फ़ा.) हृदयाला प्रकाशमान बनविणारा. **-फ़रोश** (فروش -) वि. (फ़ा.) हृदय विकणारा; प्रेमी; आषक. **-फ़िगार** (فگار -) वि. (फ़ा.) घायाळ हृदयाचा; प्रेमी. **-बंद** (بند -) पु. (फ़ा.) हृदयाचा तुकडा; पुत्र. **-बर** (بر -) वि. (फ़ा.) (१) हृदय हरण करणारा; प्रियकर. (२) प्रेयसी. **-बरदाश्तः** (برداشتہ -) वि. (फ़ा.) उदास; खिन्न. **-बस्तगी** (بستگی -) स्त्री. (फ़ा.) (१) मनोरंजन; आवड. (२) प्रीती. **-बस्तः** (بستہ -) वि. (फ़ा.) ज्याचे एखाद्या व्यक्तीवर किंवा वस्तूवर प्रेम बसले आहे असा; प्रेमी. **-बाख़्तः** (باختہ -) वि. (फ़ा.) प्रेमाच्या द्यूतात आपले हृदय हरवून बसलेला; प्रेमी. **-बाज़** (باز -) वि. (फ़ा.) घाडसी; शूर. **-रुबा** (ربا -) वि. (फ़ा.) प्रियकर; प्रेयसी; हृदयाचे हरण करणारा; प्रेमपात्र. **-रुबा'ई** (ربائی -) स्त्री. (फ़ा.) (१) नखरा; हावभाव; प्रणय. (२) सौंदर्य; मोहकता. **-रेश** (ریش -) वि. (फ़ा.) भग्नहृदय; प्रेमी. **-लगी** (لگی -) स्त्री. (फ़ा.+हिं.) **-शाद** (شاد -) वि.

(फ़ा.) आनंदी; खूष. **–शिकन** (شکن –) वि. (फ़ा.) हृदय तोडणारा; दुःख देणारा; धीर खचविणारा. **–शिकनी** (شکنی –) स्त्री. (फ़ा.) हृदयावर आघात करणे; दुःख देणे; धीर खचविणे. **–शिकस्तः** (شکستہ –) वि. (फ़ा.) (१) भग्न-हृदय; दुःखी. (२) हतोत्साह; धीर खचलेला. **–शिगाफ़** (شگاف –) वि. (फ़ा.) हृदयविदारक. **–शुदः** (شدہ –) वि. (फ़ा.) ज्याचे हृदय हरवले आहे असा; प्रेमी. **–साज़** (ساز –) वि. (फ़ा.) आनंदित; खूष. **–सितां** (ستاں –) वि. (फ़ा.) पाहा 'दिल रुबा'. **–सोख़्तः** (سوختہ –) वि. (फ़ा.) दग्धहृदय; पोळलेल्या अंतःकरणाचा. **–सोज़** (سوز –) वि. (फ़ा.) (१) सहानुभूती बाळगणारा; दयाळू. (२) करुणाजनक; कारुण्यपूर्ण. **–सोज़ी** (سوزی –) स्त्री. (फ़ा.) सहानुभूती; कारुण्य.

दिल-ए-आगाह (دل آگاہ) पु. (फ़ा.) दिव्यदृष्टी असलेले हृदय; ऋषी-मुनींच्या अंतःकरणासारखे हृदय.

दिल-ए-ज़िन्दः (دل زندہ) पु. (फ़ा.) आनंदी मन; ईश्वरभक्तीत तल्लीन असलेले अंतःकरण.

दिल-ए-बेक़रार (دل بےقرار); **दिल-ए-मुज़्तर** (دل مضطر); **दिल-ए-मुज़्तरिब** (دل مضطرب) पु. (फ़ा.) अस्वस्थ अंतःकरण. प्रीतीच्या व्यथेने तळमळणारे हृदय.

दिल-ए-मुर्दः (دل مردہ) वि. (फ़ा.) (१) निरुत्साही हृदय. (२) ईश्वरभक्तीत न रमणारे मन.

दिल'अ (ضلع) पु. ('अ.) (१) जिल्हा; विभाग; जनपद; मंडल. (२) बरगडी. **–दार** (دار –) ('अ.+फ़ा.) (१) जिल्हा पातळीवरील अधिकारी. (२) जमीनदाराचा खंड वसूल करणारा. (३) पाणी पुरवठ्याच्या विभागातील एक अधिकारी.

दिला (دلا) अव्य. (फ़ा.) हे हृदया !

दिलासा (دلاسا) पु. (फ़ा.) धीर; सांत्वन.

दिली (دلی) वि. (फ़ा.) (१) हार्दिक. (२) घनिष्ठ.

दिलेर (دلیر) वि. (फ़ा.) (१) शूर; बहादूर. (२) धाडसी.

दिलेरानः (دلیرانہ) वि. (फ़ा.) वीरोचित; धाडसी; साहसपूर्ण.

दिलेरी (دلیری) स्त्री. (फ़ा.) शौर्य; वीरता; धाडस.

दिल्लगी (دل لگی) स्त्री. (फ़ा. + हिं.) (१) थट्टा; मस्करी. (२) मनाला लागणारी गोष्ट; टर. **–बाज़** (باز –) वि. (फ़ा.+हिं.) थट्टेखोर.

दिल्लत (ضلت) स्त्री. ('अ.) (१) वाट चुकणे; मार्गभ्रष्ट होणे (२) पाप.

दिश्नः (دشنہ) पु. (फ़ा.) खंजीर; जंबिया.

दिहक (ضحک) पु. ('अ.) खदखदा हसणे.

दिहिश (دهش) स्त्री. (फ़ा.) उदारता; दानीपणा. (हा शब्द 'दाद' या शब्दासह बोलला जातो). पाहा 'दाद-ओ-दिहिश'.

दिहक़ान (دهقان) पु. ('अ.) (१) शेतकरी. (२) ग्रामवासी. (वि.) गावठी; खेडवळ.

दिहक़ानियत (دهقانیت) स्त्री. ('अ.) गांवढळपणा; अडाणीपणा.

दिहक़ानी (دهقانی) पु. ('अ.) शेतकरी. (वि.) गांवढळ; अडाणी.

दीं (دیں) पु. ['अ. 'दीन' (دین) चे संक्षिप्त.] धर्म; पंथ; मत. **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) धार्मिक; धर्मनिष्ठ. **–पनाह** (پناہ –) वि. ('अ. + फ़ा.) धर्मरक्षक. **–परवर** (پرور –) वि. ('अ.+फ़ा.) धर्माचे पालन करणारा; धर्मपाल.

दी (دی) पु. (फ़ा.) कालचा दिवस; काल.

दीक (دیک) पु. ('अ.) कोंबडा.

दीक़ (ضیق) स्त्री. ('अ.) (१) टंचाई; अडचण. (२) संकोच. (३) क्षुद्रता. (४) दुःख; आपत्ती; संकट.

दीक़-उन्-नफ़स (ضیق النفس) पु. ('अ.) दमा; श्वासाचा त्रास.

दीगर (دیگر) वि. (फ़ा.) अन्य; दुसरा. (अव्य.) पुनः; आणखी.

दीद (دید) स्त्री. (फ़ा.) (१) दर्शन. (२) दृष्टी; नजर. **–न.शुनीद** (نہ شنید –) ना ओळख ना देख. **–वादीद** (وادید –) स्त्री. (फ़ा.) एकमेकांना भेटावयास जाणे.

दीदनी (دیدنی) वि. (फ़ा.) प्रेक्षणीय.

दीदबान (دیدبان) पु. (फ़ा.) (१) सभोवार नजर ठेवता येईल अशी उंच जागा. (२) उंच जागी राहून पहारा देणारा. (३) लक्ष्य निश्चित करावयाचे बंदुकीवरील भोक, माशी.

दीदबानी (دیدبانی) स्त्री. (फ़ा.) उंच स्थानावरून पहारा करणे; पहारा.

दीदान (دیدان) पु. ['अ. 'दूदः' (دودہ) चे अनेक.] किडे.

दीदान-उल्-अम्'आ (دیدان الامعا) पु. ('अ.) पोटातील किडे (जंत); पोटात जंत होण्याचा रोग.

दीदार (دیدار) पु. (फ़ा.) (१) दर्शन. (२) चेहरा. **–परस्त** (پرست –) वि. (फ़ा.) दर्शनाभिलाषी. **–बाज़** (باز –) पाहा 'दीदः बाज़'.

दीदारू (دیدارو) वि. (फ़ा.) प्रेक्षणीय; सुंदर; मोहक.

दीदः (دیدہ) पु. (फ़ा.) (१) डोळा; डोळ्याचे बुबुळ. (२) दृष्टी; नजर. (३) धाडस; धृष्टता. (वा.) (वि.) पाहिलेले. **–ओ-दानिस्तः** (– و دانستہ) अव्य. (फ़ा.) जाणूनबुजून; मुद्दाम. **–दिलेर** (– دلیر) वि. (फ़ा.) धृष्ट; निर्लज्ज; अगाऊ. **–दिलेरी** (– دلیری) स्त्री. (फ़ा.) निर्लज्जपणा; अगाऊपणा; धाष्ट्यं. **–धो'ई** (– دھوئی) वि. (फ़ा. + हिं.) (१) निर्लज्ज; धृष्ट. (२) शूर. **–बाज़** (– باز) वि. (फ़ा.) डोळे मारणारा; स्त्रियांकडे टक लावून पाहाणारा. **–बाज़ी** (– بازی) स्त्री. (फ़ा.) डोळा घालणे; अधाशी नजरेने पाहणे. **–रेज़ी** (– ریزی) स्त्री. (फ़ा.) डोळ्यावर ताण पडेल असे बारीक काम करणे; एकाद्या विषयाचा सूक्ष्म विचार करणे. **–वर** (– ور) वि. (फ़ा.) (१) पारखी; जवाहिऱ्या. (२) एखाद्या गोष्टीचे गुणदोष उत्तम प्रकारे जाणणारा; जाणकार. **–वरी** (– وری) स्त्री. (फ़ा.) पारख; सूक्ष्म विचार.

दीदः-ए-तर (دیدۂ تر); **दीदः-ए-नम** (دیدۂ نم); **दीदः-ए-नमनाक** (دیدۂ نمناک) पु. (फ़ा.) पाणावलेला नेत्र; अश्रूंनी भरलेला डोळा.

दीदः-ए-मिश्क़ाब़ (دیدۂ مقراض) पु. (फ़ा. + 'अ.) कात्रीचे डोळे; कात्रीच्या खालच्या भागात असलेली दोन भोके. (यात बोटे अडकवून कात्रीचा वापर केला जातो).

दीन (دین) पु. ('अ.) धर्म; पंथ; धर्मश्रद्धा. **–दार** (– دار) वि. ('अ. + फ़ा.) धर्मनिष्ठ; धर्मपरायण. **–दुनिया** (– دنیا) स्त्री. ('अ.) इहलोक व परलोक. **–पनाह** (– پناہ) वि. ('अ. + फ़ा.) धर्मरक्षक. **–पर्वर** (– پرور); **–परस्त** (– پرست) वि. ('अ. + फ़ा.) धर्मपरायण; धर्मनिष्ठ.

दीन-ए-क़य्यिम (دین قیم) पु. ('अ.) खरा धर्म; इस्लाम.

दीन-ए-हनीफ़ (دین حنیف) पु. ('अ.) हजरत इब्राहीम यांचा धर्म.

दीनार (دینار) पु. (फ़ा.) (१) एक सुवर्णमुद्रा; मोहर. (२) सोन्याचा वागिना.

दीनी (دینی) वि. ('अ.) धार्मिक; धर्मविषयक.

दीबा (دیبا) पु. स्त्री. (फ़ा.) जरीचे रेशमी कापड.

दीबाचः (دیباچہ); **दीबाजः** (دیباجہ) पु. (फ़ा.) प्रस्तावना; प्राक्कथन.

दीमक (دیمک) स्त्री. (फ़ा.) वाळवी (कीड). **–ख़ुर्दः** (– خوردہ) वि. (फ़ा.) वाळवीने खाल्लेला; वाळवी लागलेला.

दीरोज़ (دیروز) पु. (फ़ा.) काल; कालचा दिवस.

दीरोज़ः (دیروزہ) वि. (फ़ा.) कालचा.

दीवान (دیوان) पु. (फ़ा.) (१) न्यायालय; कचेरी; दरबार. (२) मंत्री; वजीर; दिवाण; सचिव; अर्थमंत्री. (३) गझलांचा संग्रह; कविता संग्रह. **–ख़ान** (– خانہ) पु. (फ़ा.) दिवाणखाना; बैठकीची खोली.

दीवान-ए-'आम (دیوان عام) पु. (फ़ा. + 'अ.) (१) सर्वसामान्य लोकांना प्रवेश असलेला दरबार. (२) सार्वजनिक दरबारचा दिवाणखाना.

दीवान-ए-अ'अलॉ (دیوان اعلیٰ) पु. (फ़ा. + 'अ.) पंतप्रधान.

दीवान-ए-ख़ालिस़ः (دیوان خالصہ) पु. (फ़ा. + 'अ.) ज्याच्याजवळ सरकारी शिक्कामोर्तब असते तो मंत्री.

दीवान-ए-ख़ास़ (دیوان خاص) पु. (फ़ा. + 'अ.) निवडक श्रेष्ठ लोकांचा दरबार; अशा दरबारचा दिवाणखाना.

दीवान-ए-जज़ा (دیوان جزا); **दीवान-ए-महशर** (دیوان محشر) पु. (फ़ा. + 'अ.) अंतिम न्यायनिवाडघाच्या (कयामतच्या) दिवशी लोकांच्या पापपुण्याचा हिशेब करणारा विभाग (खाते).

दीवानगी (دیوانگی) स्त्री. (फ़ा.) वेड; विक्षिप्तपणा.

दीवानी (دیوانی) स्त्री. (फ़ा.) (१) दिवाणी न्यायालय (कोर्ट). (२) दिवाणगिरी; मंत्रित्व.

दीवानः (دیوانہ) वि. (फ़ा.) (१) वेडा; विक्षिप्त; दिवाणा. (२) छंदिष्ट; नादी. (३) प्रेमी; पागल. **–गर** (– گر) वि. (फ़ा.) वेडा बनविणारा; वेड लावणारा. **–नवाज़** (– نواز) वेड्यांवर दया करणारा; प्रेयसी.

दीवार (دیوار) स्त्री. (फ़ा.) भित. **–गीर** (– گیر) पु. (फ़ा.) दिवा ठेवण्यासाठी भितीला केलेली जागा. (२) भितीला लावण्याचा दिवा. **–गीरी** (– گیری) स्त्री. (फ़ा.) (१) शोभेसाठी भितीला लावावयाचे कापड किंवा पडदा. (२) दिवा ठेवण्यासाठी भितीत ठेवलेले लाकूड किंवा दगड. (३) भितीला लावण्याचा दिवा. (४) भितीचा गिलावा.

दीवार-ए-क़हक़हः (دیوار قہقہہ) स्त्री. (फ़ा.) (१) चीनमधील विख्यात भित; खूप उंच तट. (२) शिकंदर बादशहाने बांधलेली एक भित. या भितीवर चढलेला मनुष्य भयंकर हसू लागे व शेवटी मरून जाई; अतोनात हसणे.

दीदार दिलरुबा का दीवार-ए-क़हक़हः है।
जिसने उधर को झाँका वह फिर इधर न. झाँका ॥

दीवार-ए-ज़िन्दाँ (دیوار زنداں) स्त्री. (फ़ा.) तुरुंगाची भित.

दीशब (دیشب) स्त्री. (फ़ा.) कालची रात्र.

दुंब (دنب) स्त्री. (फ़ा.) शेपूट; पुच्छ.

दुंबल (دنبل) पु. (फ़ा.) (१) फोड; व्रण. (२) शेपूट.

दुंबाल (دنبال) पु. (फ़ा.) शेपूट; पुच्छ.

दुंबालः (دنبالہ) पु. (फ़ा.) (१) शेपूट. (२) शेपटीच्या आकाराची वस्तू. (३) डोळ्यांतील सुरम्याची रेघ. नावेचा किंवा जहाजाचा मागील भाग. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) सपुच्छ; निमूळता.

दुंबः (دنبہ) पु. (फ़ा.) ज्याच्या जाडजूड शेपटीत भरपूर चरबी असते असा एक विशिष्ट प्रकारचा मेंढा.

दु (دو) वि. [फ़ा. 'दो' (دو) चे संक्षिप्त.] दोन. हे रूप सामान्यतः सामासिक शब्दांत वापरले जाते. [उदा. **दुगुना** (دوگنا) वि. (हि.) दुप्पट.] **–'अम्ली** (عملی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) द्विदल राज्य; **दोन** शासकांचे राज्य; एकाच राज्यात **वेगवेगळे** कायदे असणे. **–अस्पः** (اسپہ –) पु. (फ़ा.) शीघ्र गती; वेगाने धावणे. **–आतशः** (آتشہ –) (फ़ा.) दोनदा गाळलेली दारू; कडक मद्य. **–आब** (آب –); **–आबः** (آبہ –) पु.(फ़ा.) दो आब; दोन नद्यांमधील प्रदेश. **–'आलम** (عالم –) पु. (फ़ा.+'अ.) दोन्ही लोक; इहलोक व परलोक. **–आश्यानः** (آشیانہ –) पु. (फ़ा.) दोन खोल्या असलेला तंबू. **–'ई** (ئی –) स्त्री.(फ़ा.) द्वैतभाव; भिन्नत्व; जीवात्मा व परमात्मा वेगवेगळे आहेत असे समजणे. **–गानः** (گانہ –) पु. (फ़ा.) (१) एकत्र जोडली गेलेली दोन फळे; जुळी फळे. (२) देवाला धन्यवाद देण्यासाठी पढल्या जाणाऱ्या नमाजातील दोन रक्अता. पाहा 'रक्'अत'. **–गूनः** (گونہ –) वि. (फ़ा.) (१) दोन प्रकारचा. (२) दुप्पट. **–चंद** (چند –); **–चंदां** (چنداں –) वि. (फ़ा.) द्विगुणित; दुप्पट. **–चार** (چار –) अव्य. (फ़ा.) समोरासमोर. (पु.) भेट. **–चोबः** (چوبہ –) पु. (फ़ा.) दोन बांबूची राहुटी. **–ज़बां** (زباں –) वि. (फ़ा.) (१) दोन जिभा असलेला; दुतोंडचा. (२) आपला शब्द वारंवार बदलणारा. **–जहां** (جہاں –) पु. (फ़ा.) इहलोक व परलोक. **–ज़ानू** (زانو –) वि. (फ़ा.) गुडघे टेकून बसलेला. **–तर्फ़ः** (طرفہ –) अव्य. (फ़ा.) दुतर्फा; दोन्ही बाजूंस. **–ता** (تا –) वि. (फ़ा.) दुहेरी; वाकलेला. **–तारः** (تارہ –) पु. (फ़ा.) दोन तारा असलेले एक वाद्य. **–दम** (دم –) वि. (फ़ा.) दुधारी (तलवार). **–दस्तः** (دستہ –) अव्य. (फ़ा.) दुतर्फा; दोहोकडे. **–दस्ती** (دستی –) स्त्री. (फ़ा.) (१) दोन्ही हातांनी तलवार चालविणे. (२) कुस्तीतील एक डाव. **–दिलः** (دلہ –) वि. (फ़ा.) (१) चिंतित. (२) दुतोंडचा. **–नीम** (نیم –) वि. (फ़ा.) अर्धा-अर्धा. **–पायः** (پایہ –) वि. (फ़ा.) दोन पायांचा. **–पारः** (پارہ –) वि. (फ़ा.) दोन तुकडे झालेला; फाटलेला. **–पैकर** (پیکر –) पु. (फ़ा.) (१) मिथुन राशी. (२) दुधारी तलवार. **–फ़स्ली** (فصلی –) वि. (फ़ा.+'अ.) (१) वर्षातून दोनदा फळे येणारे (झाड). (२) दोन पिके निघणारी, दुपीकी (जमीन). **–बाज़ू** (بازو –) वि. (फ़ा.+हि.) (१)दोन रंगी पंख असलेले कबुतर. (२) गिधाड. **–बारः** (بارہ –) अव्य. (फ़ा.) दुसऱ्यांदा; पुनः. **–बाला** (بالا –) वि. (फ़ा.) दुप्पट. **–मंज़िलः** (منزلہ –) वि. (फ़ा. + 'अ.) दुमजली (घर). **–माहः** (ماہہ –) पु. (फ़ा.) दोन महिन्यांचा पगार. **–रंगी** (رنگی –) वि. (फ़ा.) आता एक व मग एक; आपले बोलणे बदलणे. **–रकाबः** (رکابہ –) पु. (फ़ा.) खूप उंच घोडा (दोन रिकिबींतून ज्याच्यावर चढावे लागते असा). **–रंगा** (رنگا –) वि. (फ़ा.) दोगला; वर्णसंकर. **–राहः** (راہہ –) पु. (फ़ा.) जेथे दोन रस्ते येऊन मिळतात ते स्थान. **–रुखः** (رخہ –) वि. (फ़ा.) (१) दुतोंडचा; दोहोकडील. (२) दोन्ही बाजूचा. (३) दोन्ही बाजूंस सारखे अथवा वेगवेगळे रंग असलेला. (अव्य.) दोन्हीकडे; दोहो बाजूंस. **–रूयः** (رویہ –) अव्य. (फ़ा.) दोहो बाजूंस. **–रोज़ः** (روزہ –) वि. (फ़ा.) दोन दिसांचा; अस्थायी; तात्पुरता. **दुवम** (دوم); **दुवमीं** (دومیں) वि. (फ़ा.) दुसऱ्या; द्वितीय. **–शंबः** (شنبہ –) पु. (फ़ा.) सोमवार. **–शाखः** (شاخہ –) वि. (फ़ा.) (१) दोन फांद्यांचे (झाड, लाकूड). (२) दोन मेणबत्त्या लावण्याचे शमादान. (३) भांग पिसण्याचे लाकूड. **–शालः** (شالہ –) पु. (फ़ा.) दोन शाली एकत्र जोडलेली शाल; दुहेरी शाल. **–सर** (سر –) वि. (फ़ा.) दोन डोक्यांचा. **–सरा** (سرا –) पु. (फ़ा.) दोन्ही लोक; इहलोक व परलोक. **–सरी** (سری –) स्त्री. (फ़ा.) मनात एक व बाहेर एक असणे; कपट. **–सालः** (سالہ –) वि. (फ़ा.) दोन वर्षांचा. **–सुख़नः** (سخنہ –) पु. (फ़ा.) अनेक प्रश्नांचे एकच उत्तर असलेली उखाणेवजा कविता. **–हर्फ़ी** (حرفی –) वि. (फ़ा.+'अ.) दोन अक्षरी; संक्षिप्त; अत्यंत लहान.

दु'अफ़ा (ضعفا) पु. ['अ. 'द्'अीफ़' (ضعیف) चे अनेक.] (१) दुर्बळ व अशक्त लोक; म्हातारे. (२) दीन, दुःखी लोक.

दु'आ (دعا) स्त्री. ('अ.) (१) ईशस्तुती; प्रार्थना. (२) विनंती; मागणे. (३) आशीर्वाद. **–गो** (گو –) वि. ('अ. + फ़ा.) एखाद्यासाठी परमेश्वराजवळ प्रार्थना करणारा; शुभचिंतक; हितचिंतक.

दु'आ-ए-ख़ैर (دعاے خیر) स्त्री. ('अ.) एखाद्याच्या कल्याणासाठी देवाची प्रार्थना करणे.

दु'आ-ए-दौलत (دعاے دولت) स्त्री. ('अ.) एखाद्याच्या भरभराटीसाठी ईश्वराची प्रार्थना करणे.

दुकां (دکاں) स्त्री. [फ़ा. 'दुकान' (دکان) चे संक्षिप्त.] दुकान.

दुकान (دکان) स्त्री. (फ़ा.) (१) दुकान; माल विकण्याचे बंदिस्त स्थान; पण्यशाला. (२) नाना प्रकारच्या वस्तू अस्ताव्यस्त पसरून ठेवणे. **–चः** (چہ –) पु. (फ़ा.) लहान दुकाने. **–दार** (دار –) वि. पु. (फ़ा.) (१) दुकानाचा मालक. (२) दुकानात विक्री करणारा; व्यापारी. (वि.) (१) ढोंगी. (२) सौदेबाज. **–दारी** (داری –) स्त्री. (फ़ा.) (१) दुकानाचे काम; खरेदी-विक्री. (२) सौदेबाजी.

दुक्कान (دخان) पु. ('अ.) (१) धूर. (२) वाफ.

दुक्कानी (دخانی) पु. ('अ.) वाफेवर चालणारे (जहाज वगैरे).

दुक्कूल (دخول) पु. ('अ.) दाखल होणे; घुसणे; प्रवेश करणे.

दुख्त (دخت) स्त्री. [फ़ा. 'दुख्तर' (دختر) चे संक्षिप्त.] कन्या; मुलगी.

दुख्त-ए-हव्वा (دخت حوا) स्त्री. (फ़ा.+'अ.) हव्वा (आदिमानवाची पत्नी) ची कन्या; स्त्री जाती.

दुख्तर (دختر) स्त्री. (फ़ा.) मुलगी; कन्या.

दुख्तर-ए-खानः (دخترخانم) स्त्री. (फ़ा.) कुमारी; अविवाहित मुलगी.

दुख्तर-ए-रज़ (دختر رز); **दुख्त-ए-रज़** (دخت رز) स्त्री. (फ़ा.) द्राक्षकन्या; मदिरा.

दुग़्तः (ضغط) पु. ('अ.) (१) संकोच; टंचाई. (२) जुलूम; कठोरता.

दुजां (دجاں) पु. ('अ.) रात्रीचा काळोख.

दुज्द (دزد) पु. (फ़ा.) चोर; तस्कर.

दुज्द-ए-शाहीन (دزد شاهین) पु. (फ़ा.) डोळ्यादेखत चोरी करणारा; पश्यतोहर.

दुज्द-ए-हिना (دزد حنا) पु. (फ़ा.) हाताला मेंदी लावताना तळहातावर एक छल्ला (कडे) ठेवतात. त्यायोगे तळहातावर एक गोल चिन्ह बनते. याला 'दुज्द-ए-हिना' असे म्हणतात.

दुज़्दः (دزدنده) वि. (फ़ा.) चोरी करणारा; चोरणारा.

दुज़्दी (دزدی) स्त्री. (फ़ा.) चोरी; चौर्यकर्म.

दुज़्दीदः (دزدیده) वि. (फ़ा.) चोरलेला; चोरटा; चोरीचा. **–नज़री** (نظری –) स्त्री. (फ़ा.+'अ.) **–निगाही** (نگاهی –) स्त्री. (फ़ा.) चोरटया नजरेने पाहणे; तिरप्या नजरेने पाहणे.

दुनियवी (دنیوی) वि. ('अ.) इहलौकिक; सांस्कृतिक; भौतिक.

दुनिया (دنیا) स्त्री. ('अ.) (१) जग; विश्व; मृत्युलोक. (२) संसार. (३) जगातील माणसे. **–दार** (دار –); **–परस्त** (پرست –) वि. ('अ.+फ़ा.) (१) संसारात गुरफटलेला. (२) संधिसाधू; व्यवहारकुशल. **–ओ-माफ़ीहा** (وما فیہا –) स्त्री. ('अ.) जग व जगातील सर्व गोष्टी. **–वी** (وی –) वि. ('अ.) इहलोकाशी संबंधित; भौतिक; संसारिक. **–साज** (ساز –) वि. ('अ.+फ़ा.) (१) तोंडावर खोटी स्तुती करणारा; खुशामत्या. (२) संधिसाधू; स्वार्थी. **–साजी** (سازی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) देखावा; बाह्य भपका; स्वार्थ.

दुनिया-ए-दनी (دنیاے دنی) स्त्री. ('अ.) **दुनिया-ए-दूं** (دنیاے دوں) स्त्री. ('अ.+फ़ा.) अधम जग; पापमय विश्व.

दुनिया-ए-फ़ानी (دنیاے فانی) स्त्री. (फ़ा.) नश्वर जग.

दुपल्का (دوپلکا) पु. (फ़ा.) एक प्रकाराचा अंगठीत बसविण्याचा खडा.

दुफ़ (دف) पु. ('अ.) डफ. **–नवाज़** (نواز –) वि. ('अ.+फ़ा.) डफ वाजविणारा.

दुबुर (دبر) स्त्री. ('अ.) (१) मागील भाग; पाठ; पिछाडी. (२) मलद्वार; गुदा.

दुब्ब (دب) पु. ('अ.) अस्वल.

दुब्ब-ए-अक्बर (دب اکبر) पु. ('अ.) उत्तर ध्रुवाजवळील अस्वलाच्या दोन आकृतींपैकी मोठी आकृती; सप्तर्षिमंडळ.

दुब्ब-ए-अस्गर (دب اصغر) पु. ('अ.) उत्तर ध्रुवाजवळील लहान सप्तर्षिमंडळ.

दुम (دم) स्त्री. (फ़ा.) (१) शेपूट. (२) मागील हिस्सा. (३) मागे लागणारा; अनुयायी. **–गज़ा** (گزا –) पु. (फ़ा.) (१) शेपटीचे मूळ; जेथून शेपूट फुटते ते स्थान. (२) सदैव मागे लागणारा. **–ची** (چی –) स्त्री. (फ़ा.) (१) घोडयाच्या शेपटीखालून घेतलेली खोगिराची चामडयाची बादी. (२) पाठीचा खालचा भाग. **–छल्ला** (چھلا –) पु. (फ़ा.+हि.) पतंगाची शेपटी. (वि.) सारखे मागे मागे असणारा. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) सपुच्छ. **–दार सितारा** (دار ستارا –) पु. (फ़ा.) धूमकेतू; शेंडे नक्षत्र. **–दबाकर भागना** (دباکر بھاگنا –) भिऊन पळून जाणे. **–में घुसना** (میں گھسنا –) (१) खुशामत करणे. (२) आश्रयास जाणे; आसरा घेणे. [म्हण : **दुम पकड़ी भेड़ की वार हु'ए न. पार** (دم پکڑی بھیڑ کی وار ہوئے نہ پار) क्षुद्र व्यक्तीचा आधार घेतल्याने काही फायदा होत नाही].

दुम-ए-गाव (دم گاو) स्त्री. (फ़ा.) मोठा चाबूक; हंटर.

दुम-ए-ता'ऊस (دم طاؤس) स्त्री. (फ़ा.) (१) मोरपुच्छ. (२) आकाश.

दुम-ए-लाबः (دم لاب) स्त्री. (फ़ा.) कुत्र्याचे शेपूट हलविणे; खुशामत.

दुमूर (ضمور) पु. ('अ.) क्षीणता; दुर्बलता.

दुम्मल (دمل) पु. ('अ.) फोड; व्रण.

दुर (در) पु. ('अ.) (१) मोती; मोत्ये. (२) रत्न. (३) कर्णफूल; इयरिंग. **–अफ़्शाँ** (افشاں –) ('अ.+फ़ा.) (१) मोती लुटविणारा; मोती उधळणारा; दानी; उदार. (२) मधुरभाषी; सदुपदेश देणारा. **–अफ़्शानी** (افشانی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) मोती मोती लुटविणे; मोत्यांची वृष्टी करणे; दातृत्व; उदारता. (२) सदुपदेश देणे. **–दानः** (دانہ –) पु. ('अ.+फ़ा.) मोत्याचा दाणा; एक मोती. **–बार** (بار –); **–रेज़** (ریز –) वि. ('अ.+फ़ा.) (१) मोत्यांचा वर्षाव करणारा; मधुरभाषी. (२) उदार.

दुर-ए-ना सुफ़्तः (در ناسفتہ) वि. (फ़ा.) (१) छिद्र न पाडलेला मोती. (२) कुमारी; अक्षता.

दुर-ए-यकता (در یکتا); **दुर-ए-यक दानः** (در یکدانہ) पु. (फ़ा.) एका शिपल्यात एकच असलेला मोती; खूप मोठा मोती.

दुर-ए-शहवार (در شہوار) पु. (फ़ा.) राजा महाराजांना योग्य असा मोती; खूप मोठा व मौल्यवान मोती.

दुरख़्श (درخش) स्त्री. (फ़ा.) (१) विद्युत; विजली; वीज. (२) ज्योती; प्रकाश.

दुरख़्शाँ (درخشاں) वि. (फ़ा.) प्रकाशमान; ज्योतिर्मय.

दुरफ़श (درفش) पु. (फ़ा.) झेंडयाचा वरच्या बाजूस लावले जाणारे त्रिकोणी कापड. (हे वाऱ्यावर फडफडते).

दुरफ़श-ए-काबियानी (درفش کاویانی) पु. (फ़ा.) (१) इराणमधील कावाँ (वः) नावाच्या लोहाराचा झेंडा. यात त्याने आपला भाता बांधला होता. या झेंडयाखाली जनतेला एकत्र करून त्याने 'कियानी' सत्ता उखडून टाकली होती. (२) झेंडयाच्या वरच्या बाजूस लावले जाणारे रेशमी भरजरी कापड.

दुरफ़्शाँ (درفشاں) वि. (फ़ा.) हलणारा; फडफडणारा.

दुरुश्त (درشت) वि. (फ़ा.) खरखरीत; खडबडीत; टणक. **–ख़ू** (خو –) वि. (फ़ा.) **–मिज़ाज** (مزاج –) वि. (फ़ा.+'अ.) रुक्ष स्वभावाचा; कठोर.

दुरुश्ती (درشتی) स्त्री. (फ़ा.) खरखरीतपणा; खडबडीतपणा; कठोरता.

दुरुस्त (درست) वि. (फ़ा.) (१) ठीक; शुद्ध; बरोबर. (२) खरे. (३) उचित. (४) संपूर्ण; अखंडित. (५) नीट; व्यवस्थित. (६) निरोगी; निकोप. (७) निर्दोष.

दुरुस्ती (درستی) स्त्री. (फ़ा.) सुधारणा; दुरुस्ती.

दुरूद (درود) स्त्री. (फ़ा.) (१) लाकूड कापण्याचे काम. (२) शेताची कापणी. **–गर** (گر –) पु. (फ़ा.) सुतार. **–गरी** (گری –) स्त्री. (फ़ा.) सुतारकाम. [म्हण : **दुरूद गरी कार-ए-बुज़िनः नीस्त** (درود گری کار بوزنہ نیست) सुतारी हे काही माकडाचे काम नव्हे. (ज्याचे काम त्यानेच करावे.)].

दुरूद (درود) स्त्री. पु. ('अ.) (१) प्रार्थना; स्तुती; नमस्कार. (२) आशीर्वाद. **–भेजना** (بھیجنا –) देवाची व विशेषतः पैगंबराची प्रार्थना, स्तुती करणे. **–ओ-सलाम** (وسلام –) मुसलमानांनी केलेली आपल्या पैगंबराची स्तुती व दिलेला दुवा.

दुरोग़ (دروغ) पु. (फ़ा.) (१) असत्य. (२) अपराध. (३) आळ; तोहमत. **–गो** (گو –); **–जन** (زن –) वि. (फ़ा.) **–बयाँ** (بیاں –) वि. (फ़ा.+'अ.) खोटे बोलणारा; मिथ्यावादी. **–बाफ़** (باف –) वि. (फ़ा.) आपल्या मनच्या खोटयानाटचा गोष्टी रचणारा.

दुरोग़-ए-मस्लहत आमेज़ (دروغ مصلحت آمیز) पु. (फ़ा.+'अ.) एखाद्याच्या हितासाठी किंवा भांडण मिटविण्यासाठी बोलले जाणारे असत्य.

दुर्ज (درج) स्त्री. ('अ.) दागिने ठेवण्याची डबी किंवा पेटी; मंजूषा.

दुर्द (درد); **दुर्दी** (دردی) स्त्री. (फ़ा.) (१) पातळ (तरल) पदार्थांच्या तळाशी साचणारा गाळ. (२) मद्याच्या तळाशी साठलेला गाळ; उरलेली दारू. **–आशाम** (آشام –); **–कश** (کش –) वि. (फ़ा.) तळाशी उरलेले मद्य पिणारा; पक्का दारुडया.

दुर्र (در) पु. ('अ.) पाहा 'दुर'

दुर्र-ए-नजफ़ (در نجف) पु. ('अ.) एक प्रकारचा मौल्यवान खडा. यात केस दिसतात. ते हजरत अली यांचे केस असल्याची श्रद्धा एका मुस्लिम संप्रदायामध्ये आहे. त्यामुळे ते लोक हा खडा पवित्र मानतात.

दुर्र-ए-मकनून (در مکنون) पु. ('अ.) दडवून ठेवण्याचा मोती; अत्यंत मौल्यवान मोती.

दुर्र-ए-यतीम (در یتیم) पु. ('अ.) शिपल्यात एकटाच तयार झालेला मोठा व पाणीदार मोती.

दुर्राज (دراج) पु. ('अ.) कवडा; होला (पक्षी).

दुर्रानी (درانی) पु. (फ़ा.) पठाणांची एक जमात. हे लोक कानात 'दुर' (दुर्र) म्हणजे मोती घालतात, त्यावरून हे नाव पडले आहे.

दुर्रः (دره) पु. ('अ.) मोठा मोती.

दुर्रः (دره) पु. (फ़ा.) चामडयाचा चाबूक; हंटर.

दुलदुल (دلدل) पु. ('अ.) (१) इस्कंदरिया (अलेक्झांड्रिया ईजिप्तमधील एक बंदर) येथील राज्यकर्त्याने हजरत मुहम्मद पैगंबर यांना भेट म्हणून दिलेली खेचरी. मुहम्मद साहेबांनी नंतर ही खेचरी आपल्या जावयांना (हजरत अली यांना) भेट म्हणून दिली. (२) घोडयाच्या आकाराचा तावूत. **–स्वार** (سوار –) पु. ('अ.+फ़ा.) हजरत अली यांची पदवी.

दुला'ई (دلائی) स्त्री. (फ़ा.) दुलई; रजई.

दुवल (دول) स्त्री. ['अ. 'दौलत.' (دولت) चे अनेक.] अनेक राष्ट्रे.

दुवार (دوار) पु. ('अ.) चक्कर येणे; घेरी.

दुवाल (دوال) स्त्री. (फ़ा.) (१) कातडी पट्टा. (२) नगारा वाजविण्याची कातडी वादी. **–बन्द** (بند –) पु. (फ़ा.) पट्टा बांधणारा; शिपाई. **–बाज** (باز –) वि. (फ़ा.) फसव्या; ठक; दगाबाज.

दुवुम (دوم); **दुवुमीं** (دومیں) वि. (फ़ा.) दुसरा; द्वितीय.

दुशंबः (دوشنبہ) पु. (फ़ा.) सोमवार.

दुश्त (دشت) वि. (फ़ा.) निकृष्ट; खराब; वाईट.

दुश्नाम (دشنام) स्त्री. (फ़ा.)अपशब्द; शिवी. **–तराज़ी** (طرازی –) स्त्री. (फ़ा.) शिव्या देणे; शिवीगाळ करणे. **–तराशी** (تراشی –) स्त्री. (फ़ा.) शिव्या तयार करणे. नवीन नवीन शिव्या बनविणे. **–दिही** (دھی –) स्त्री. (फ़ा.) शिव्या देणे.

दुश्मन (دشمن) पु. (फ़ा.) शत्रू; वैरी; प्रतिपक्षी. **–काम** (کام–) वि. (फ़ा.) शत्रूच्या इच्छेप्रमाणे जो संकटात सापडला आहे असा.

दुश्मन-ए-जां (دشمن جاں) वि. (फ़ा.) जानी दुश्मन; प्राणांवर उठलेला शत्रू.

दुश्मनी (دشمنی) स्त्री. (फ़ा.) शत्रुत्व; वैर; प्रतिद्वंद्विता.

दुश्वार (دشوار) वि. (फ़ा.) (१) कठीण; अवघड. (२) दुस्सह; असह्य. **–गुज़ार** (گزار –) वि. (फ़ा.) जेथून जाणे अवघड आहे असे स्थान किंवा मार्ग.

दुश्वारी (دشواری) स्त्री. (फ़ा.) (१) अडचण; मुष्कील; कठीणता. (२) आपत्ती; दारिद्र्य.

दुसूमत (دسومت) स्त्री. ('अ.) स्निग्धता; तेलकटपणा; चिकटपणा; चरबीयुक्त असणे.

दुहुल (دھل) पु. (फ़ा.) ढोल; नगारा. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) नगारा वाजविणारा. **–दरीदः** (دریدہ –) वि. (फ़ा.) (१) निंदित; बदनाम झालेला. (२)गप्प.

दुहूर (دھور) पु. ['अ.' दहर ' (دھر) चे अनेक.] अनेक कालखंड; जमाने.

दुहून (دھن) पु. ('अ.) तेल; तूप; चरबी.

दुह्मत (دھمت) स्त्री. ('अ.) काळेपणा; काळिमा.

दुं (دوں) वि. (फ़ा.) अधम; नीच; मवाली; गुंड. **–नवाज** (نواز–) वि. (फ़ा.) गुंडांचा पाठीराखा. **–हिम्मत** (ہمت –) वि. (फ़ा.) धीर सुटलेला; भ्यालेला.

दूक (دوک) पु. (फ़ा.) चरख्याची त्राक. **–दान** (دان –) पु. (फ़ा.) चरखा.

दूद (دود) पु. (फ़ा.) (१) धूर. (२) वाफ. (३) श्वास. **–आलूद** (آلود –) वि. (फ़ा.) धुरकट. **–आहंग** (آہنگ –); **–कश** (کش –) पु. (फ़ा.) धुराडे; धूर बाहेर जाण्याचे छिद्र.

दूद (دود) पु. ['अ. 'दूदः' (دودہ) चे अनेक.] किडे.

दूद-उल्-हरीर (دودالحریر) पु. ('अ.) रेशमाचा किडा.

दूद-ए-आह (دود آہ) पु. (फ़ा.) निश्वासाचा धूर; निश्वासरूपी अग्नीचा धूर.

दूद-ए-जिगर (دود جگر); **दूद-ए-दिल** (دود دل) पु. (फ़ा.) हृदयाच्या अग्नीचा धूर; निश्वास.

दूदमान (دودمان) पु. (फ़ा.) (१) उच्च वंश; घराणे; खानदान; कूळ. (२) पिढी. (३) जमात. (४) घर.

दूदी (دودی) वि. (फ़ा.) (१) वाफेवर चालणारा. (२) धुरासंबंधी.

दूदः (دودہ) पु. ('अ.) किडा.

दूदः (دودہ) पु. (फ़ा.) (१) काजळ; काजळी. (२) घराणे.

दून (دون) वि. (फ़ा.) (१) दुष्पट; घमेंड. **–की लेना** (– کی لینا); **की हांकना** (– کی ہانکنا) घमेंड मारणे; गर्व करणे; प्रौढी मिरविणे. (२) डोंगरातील घाट; दरी; डोंगराचा पायथा.

दूबदू (دوبدو) अव्य. (फ़ा.) समोरासमोर.

दूर (دور) अव्य. (फ़ा.) पुष्कळ अंतरावर; लांब; दूर. (वि.) (१) वेगळा; दूरचा. (२) अशक्य. **–अंदेश** (اندیش–) वि. (फ़ा.) दूरदर्शी. **–अंदेशी** (اندیشی–) स्त्री. (फ़ा.) दूरदर्शीपणा. **–अज़हाल** (از حال –) अव्य. (फ़ा.+'अ.) फार पूर्वी (जेव्हा आजच्या सारखी चांगली स्थिती नव्हती तेव्हा). **–तर** (تر –) वि. (फ़ा.) फार दूर. **–तरक** (ترک –) वि. (फ़ा.) अत्यंत दूर. **–दराज़** (دراز –) वि. (फ़ा.) खूप दूरचा; लांबचा. **–दस्त** (دست –) वि. (फ़ा.) दुर्गम; आवाक्या-बाहेरचा. **–पार** (پار –) अव्य. (फ़ा.) दूर राहो; ईश्वर न करो (वा.). **–बाश** (باش –) अव्य. (फ़ा.) दूर राहा; हट जाओ; बाजूला व्हा

(पु.) (फ़ा.) बादशहाच्या स्वारीपुढे मिरवत नेला जाणारा दोन पात्यांचा भाला. (हा भाला पाहून लोक बाजूला होत). **–बीं** (بیں –) वि. (फ़ा.) दूरदर्शी. **–बीन** (بین –) स्त्री. (फ़ा.) दुर्बीण; दूरदर्शक यंत्र. **–बीनी** (بینی –) स्त्री. (फ़ा.) दूरपर्यंत, लांववर पाहाणे.

दूर-ओ-दराज़ (دور و دراز) अव्य. (फ़ा.) खूप दूर.

दूरी (دوری) स्त्री. (फ़ा.) (१) अंतर. (२) फरक.

देग (دیگ) पु. स्त्री. (फ़ा.) (१) तपेली; हंडी. (२) हंडा; तपेले (अन्न शिजविण्याचे). **–चः** (چہ –) पु. **–ची** (چی –) स्त्री. (फ़ा.) लहान तपेले; तपेली. **–दान** (دان –) पु. (फ़ा.) चूल. **–शो** (شو –) वि. (फ़ा.) भांडी घासणारा.

देज़ (دیز) पु. (फ़ा.) रंग; वर्ण. [उदा. 'शबदेज़' (شب دیز) रात्रीच्या रंगाचा; काळा].

देबा (دیبا) स्त्री. (फ़ा.) एक प्रकारचे रंगीत व पातळ रेशमी भरजरी कापड.

देर (دیر) स्त्री. (फ़ा.) उशीर; विलंब; वेळ. [म्हण: **देर आयद दुरुस्त आयद** (دیر آید درست آید) जे काम उशीरा म्हणजे विचारपूर्वक केले जाते ते चांगले होते.] **–आश्ना** (آشنا –) वि. (फ़ा.) इतरांशी लवकर न मिसळणारा; उशीरा मित्र बनणारा; प्रत्येक कामात विलंब लावणारा; सुस्त. **–गाह** (گاہ –) अव्य. (फ़ा.) पुष्कळ दिवसपर्यंत. **–पा** (پا –) वि. (फ़ा.) टिकाऊ; मजबूत. **–मान** (مان –) वि. (फ़ा.) स्थायी; दृढ; मजबूत. **–बाज़** (باز –) पु. (फ़ा.) प्राचीन काळ. **–सवेर** (سویر –) स्त्री. (फ़ा.+हिं.) उशीर; अवेळ.

देरी (دیریں) वि. (फ़ा.) प्राचीन; पुरातन; जुन्या काळचा.

देरी (دیری) वि. [फ़ा. 'देर' (دیر) चे हिंदी रूप.] उशीर; विलंब (वा.).

देरीनः (دیرینہ) वि. (फ़ा.) (१) प्राचीन; जुना. (२) वृद्ध. **–साल** (سال –) वि. (फ़ा.) वयोवृद्ध; खूप जुना.

देव (دیو) पु. (फ़ा.) (१) राक्षस; दैत्य. (२) खवीस; पिशाच; भूत. (३) खूप धिप्पाड मनुष्य. (४) परीचा पती. **–ज़दः** (ज़दہ –) वि. (फ़ा.) भुताने पछाडलेला. **–ज़ाद** (زاد –) वि. (फ़ा.) (१) दैत्यपुत्र; खूप धिप्पाड व भयंकर माणूस. (२) धिप्पाड घोडा. **–दिली** (دلی –) स्त्री. (फ़ा.) बहादुरी; शूरता. **–बाद** (باد –) पु. (फ़ा.) भयंकर वावटळ. **–मार** (مار –) पु. (फ़ा.) अजगर. **–लाख** (لاخ –) पु. (फ़ा.) राक्षसांचे राहण्याचे ठिकाण. **–सार** (سار –) वि. (फ़ा.) दैत्यासारखा.

देवचः (دیوچہ) पु. (फ़ा.) (१) वाळवी (२) जळू.

देवदार (دیودار) पु. (फ़ा.) देवदाराचे झाड (सुरूच्या जातीतील).

देह (دہ) पु. (फ़ा.) खेडे; ग्राम. **–क़ान** (قان –) पु. (फ़ा.) ग्रामवासी; शेतकरी. **–क़ानियत** (قانیت –) स्त्री. (फ़ा.) गावढळपणा. **–क़ानी** (قانی –) वि. (फ़ा.) खेडचात राहाणारा; खेडवळ; अडाणी. (प्रत्य.) देणारा. [उदा. 'आराम देह' (آرام دہ) आराम देणारा; आरामशीर].

देहात (دھات) पु. [फ़ा. 'देह' (دہ) चे अनेक.] (१) खेडी. (२) खेडेगाव.

देहिश (دھش) स्त्री. (फ़ा.) दानशीलता; उदारता.

देही (دھی) वि. (फ़ा.) ग्रामीण (देहाती).

दै (دے) पु. (फ़ा.) एक इराणी महिना (भारतीय माघ); पानगळ महिना.

–दानिस्तगी (دانستگی –) स्त्री. (फ़ा.) अज्ञान; अनभिज्ञता. **–दानिस्तः** (دانستہ –) अव्य. (फ़ा.) अजाणता; नकळत. **–दानी** (دانی –) स्त्री. (फ़ा.) मूर्खता; अज्ञान. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) दरिद्री; निर्धन. **–दारी** (داری –) स्त्री. (फ़ा.) दारिद्र्य; निर्धनता. **–दिहन्द** (دھندہ –) वि. (फ़ा.) कर्ज घेऊन ते परत न करणारा. **–दिहन्दगी** (دھندگی –) स्त्री. (फ़ा.) कर्ज घेऊन ते परत न देणे. **–दीदः** (دیدہ –) वि. (फ़ा.) न पाहिलेला. **–दुरुस्त** (درست –) वि. (फ़ा.) (१) अशुद्ध; चूक; असत्य. (२) विघडलेला. **–पदीद** (پدید –) वि. (फ़ा.) अव्यक्त; लपलेला. **–पर्वा** (پروا –) वि. (फ़ा.) बेपर्वा. **–पसंद** (پسند –) वि. (फ़ा.) नापसंत; नावडता. **–पसंदीदगी** (پسندیدگی –) स्त्री. (फ़ा.) नापसंती; अरुची. **–पसंदीदः** (پسندیدہ –) वि. (फ़ा.) नापसंत. **–पाक** (پاک –) वि. (फ़ा.) (१) अपवित्र; अशुद्ध. (२) मलिनता; मलिनः; घाणेरडा. **–पाकी** (پاکی –) स्त्री. (फ़ा.) (१) अपवित्रता. (२) मलिनता. **–पा'इदार** (پائدار –) वि. (फ़ा.) डळमळीत; अस्थिर; अनिश्चित. **–पुख्तःकार** (پختہ کار –) वि. (फ़ा.) अननुभवी; कच्चा. **–पैद** (پید –); **–पैदा** (پیدا –) वि. (फ़ा.) (१) अप्राप्त; दुर्लभ; दुर्मिळ. (२) गुप्त; लुप्त. **–पैदाकनार** (پیداکنار –) वि. (फ़ा.) ज्याचा किनारा दिसत नाही असा; अपार. **–फ़र्जाम** (فرجام –) वि. (फ़ा.) ज्याचा परिणाम चांगला होत नाही असा. **–फ़र्मान** (فرمان –) वि. (फ़ा.) अवज्ञा करणारा; उद्धट; आज्ञा न पाळणारा. **–फ़र्मानी** (فرمانی –) स्त्री. (फ़ा.) अवज्ञा. **–फ़हम** (فہم –) वि. (फ़ा.+'अ.) एखादी गोष्ट ज्याला समजत नाही असा; अडाणी; मूर्ख. **–फ़हमी** (فہمی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) मूढता; मूर्खता; नादानपणा. **–बकार** (بکار –) वि. (फ़ा.) नालायक; नीच; अधम. **–बलद** (بلد –) वि. (फ़ा.) अनभिज्ञ; अपरिचित. **–बा'इस्तः** (بائستہ –) वि. (फ़ा.) असभ्य; अशिष्ट. **–बालिग़** (بالغ –) वि. (फ़ा.+'अ.) वयात न आलेला; अज्ञान. **–बीना** (بینا –) वि. (फ़ा.) दृष्टिहीन; आंधळा. **–बूद** (بود –) वि. (फ़ा.) (१) नष्ट; उध्वस्त. (२) नश्वर. **–मंज़ूर** (منظور –) वि. (फ़ा.+'अ.) अस्वीकृत; नापसंत; रद्द. **–मत्बू'अ** (مطبوع –) वि. (फ़ा.+'अ.) (१) अप्रकाशित. (२) अप्रिय. **–मर्द** (مرد –) वि. (फ़ा.) (१) भित्रा; भ्याड. (२) नपुसक; हिजडा. **–मर्दी** (مردی –) स्त्री. (फ़ा.) (१) भ्याडपणा. (२) नपुसकत्व. **–मर्दुम** (مردم –) वि. (फ़ा.) अधम; नीच; लोफर. **–मर्बूत** (مربوط –) वि. (फ़ा.+'अ.) असंबद्ध; विजोड. **–मशरू'अ** (مشروع –) वि. (फ़ा.+'अ.) धर्मबाह्य; निषिद्ध. **–महदूद** (محدود –) वि. (फ़ा.+'अ.) अमर्याद; अपार. **–महरम** (محرم –) वि. (फ़ा.+'अ.) (१) ज्याच्यासमोर स्त्रीने पडदा घेतला पाहिजे असा (पुरुष); अपरिचित. (२) जो घरात जाऊ शकत नाही व ज्याच्याशी घरच्या मुलीचे लग्न होऊ शकते, असा. **–म'अक़ूल** (معقول –) वि. (फ़ा.+'अ.) (१) अयोग्य; अनुचित. (२) अश्लील; असभ्य. (३) नालायक. **–मानूस** (مانوس –) वि. (फ़ा.+'अ.) (१) अपरिचित. (२) नापसंत. **–म'अलूम** (معلوم –) वि. (फ़ा.+'अ.) अज्ञात. **–मुवाफ़िक़** (موافق –) वि. (फ़ा.+'अ.) अननुकूल; प्रतिकूल. **–मुकम्मल** (مکمل –) वि. ('अ.+फ़ा.) अपूर्ण; अर्धवट. **–मुन्ताही** (متناهی –) वि. (फ़ा.+'अ.) असीम; अपार; अमर्याद. **–मुनासिब** (مناسب –) वि. (फ़ा.+'अ.) (१) अनुचित; अयोग्य. (२) अश्लील. **–मुम्किन** (ممکن –) वि. (फ़ा.+'अ.) असंभव; अशक्य. **–मुराद** (مراد –) वि. (फ़ा.) (१) विफल मनोरथ; निराश. (२) दुर्दैवी. **–मेहरबां** (مہربان –) वि. (फ़ा.) निर्दय; शत्रू. **–मो'अतबर** (معتبر –) वि. (फ़ा.+'अ.) अविश्वसनीय; बेभरवशाचा. **–मौज़ूं** (موزوں –) वि. (फ़ा.+'अ.) (१) अनुचित. (२) अश्लील; असभ्य. (३) तालात किंवा मात्रामध्ये न बसणारी काव्यपंक्ती. **–मौजूद** (موجود –) वि. (फ़ा.+'अ.) अनुपस्थित. **–मौजूदगी** (موجودگی –) स्त्री (फ़ा.+'अ.) गैरहजेरी; अनुपस्थिती. **–याब** (یاب –) वि. (फ़ा.) दुर्मिळ; अप्राप्य. **–रवा** (روا –) वि. (फ़ा.) (१) अनुचित; अयोग्य. (२) निषिद्ध. **–रस** (رس –) वि. (फ़ा.) न पिकलेले (फळ); कच्चा. **–रसा** (رسا –) वि. (फ़ा.) (१) पोहोचू न शकणारा; न मिळणारा. (२) भावहीन. (३) निराश. **–रसीदः** (رسیدہ –) वि. (फ़ा.) (१) कच्चे (फळ). (२) वयात न आलेला. (३) अननुभवी. **–राद** (راض –) वि. (फ़ा.+'अ.) नाखूष; क्रुद्ध. **–रादी** (راضی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) क्रोध; नाखुषी. **–रास्त** (راست –) वि. (फ़ा.) (१) सरळ नसलेला; वक्र. (२) असत्य. (३) अप्रामाणिक. **–ला'इक़** (لائق –) वि. (फ़ा.+'अ.) (१) अयोग्य. (२) नीच. (३) असभ्य. **–वाक़िफ़** (واقف –) वि. (फ़ा.+'अ.) (१) अनभिज्ञ; अपरिचित. (२) अडाणी. **–वाक़िफ़ियत** (واقفیت –) स्त्री. (फ़ा.+'अ.) अनभिज्ञता. **–वाजिब** (واجب –) वि. (फ़ा.+'अ.) अयोग्य; अनुचित. **–शनास** (شناس –) वि. (फ़ा.) न ओळखणारा; अनोळखी; अपरिचित. **–शनासा'ई** (شناسائی –) स्त्री. (फ़ा.) अनभिज्ञता; अपरिचय. **–शा'इस्तगी** (شائستگی –) स्त्री. (फ़ा.) (१) असभ्यपणा; असंस्कृतपणा. (२) अश्लीलता. **–शा'इस्तः** (شائستہ –) वि. (फ़ा.) (१) अयोग्य;

न शोभणारे. (२) असभ्य. (३) अश्लील. **–शाद** (شاد –); **–शादमाँ** (شادمان –) वि. (फ़ा.) (१)खिन्न; दुःखी. (२)दुर्दैवी. **–शादमानी** (شادمانی –) स्त्री (फ़ा.) खिन्नता; नाखुषी. **–शिकेब** (شکیب –); **–शिकेबा** (شکیبا –) वि. (फ़ा.) (१) व्याकुळ; बेचैन. (२) अधीर; आतुर. **–शिकेबा'ई** (شکیبائی –) स्त्री. (फ़ा.) (१) आतुरता; अधिरता. (२) व्याकुळता. **–शुक्र** (شکر –); **–शुक्रगुज़ार** (شکر گزار –); **–शुक्रा** (شکرا –) वि. (फ़ा. + 'अ.) कृतघ्न. **–शुक्रगुज़ारी** (شکر گزاری –); **–शुक्री** (شکری –) स्त्री. (फ़ा.+'अ.) कृतघ्नता. **–शुदनी** (شدنی –) वि. (फ़ा.) (१) अशक्य; असंभव. (२) दुर्दैवी. **–सज़ा** (سزا –) वि. (फ़ा.) (१) अयोग्य; अनुचित. (२) अश्लील. **–सबूर** (صبور –); **–सब्र** (صبر –) वि. (फ़ा.+'अ.) अधीर; आतुर; उतावळा. **–सरः** (سره –) वि. (फ़ा.) न चालणारे (नाणे); खोटा. **–सवाब** (صواب –) वि. (फ़ा.+'अ.) (१) असत्य; खोटा. (२) अशुद्ध. **–साज़** (ساز –) वि. (फ़ा.) (१) नादुरुस्त. (२)चुकीचा. (३) प्रतिकूल. **–साज़गार** (سازگار –) वि. (फ़ा.)अननुकूल; प्रतिकूल. **–सिपास** (سپاس –) वि. (फ़ा.) अकृतज्ञ; निमकहराम. **–सुफ़्तः** (سفته –) वि.(फ़ा.) (१)छेद न केलेला (मोती). (२)कुमारी; अक्षता. **–हंजार** (هنجار –)वि.(फ़ा.) अधम; नीच; दुराचारी. **–हक़** (حق –) (अव्य.) निष्कारण; व्यर्थ. (पु.)अन्याय. **–हक़कोश** (حق کوش –)वि.(फ़ा.+'अ.) अनीती व अन्याय करण्याकडे प्रवृत्ती असलेला. **–हक़शनास** (حق شناس –) वि. (फ़ा.+'अ.) सत्य न जाणणारा; परमेश्वराला न ओळखणारा. **–हमवार** (هموار –) वि. (फ़ा.) (१) एका पातळीत नसणारा; उंचसखल; खडबडीत. (२) असभ्य.

ना'इचः (ناچه) पु. (फ़ा.) हुक्क्याची नळी.

ना'इज़ः (نائزه) पु. ('अ.) (१) नळाची तोटी. (२) शिश्न; लिंग.

ना'इब (نائب) वि. ('अ.) सहायक; असिस्टंट.

ना'इबः (نائبه) स्त्री. ('अ.) (१) अपघात; दुर्घटना. (२) पाळीचा ताप. (३) 'ना'इब' चे स्त्रीलिंगी रूप.

ना'इम (نائم) वि. ('अ.) झोपणारा.

ना'इरः (نائره) पु. ('अ.) आगीची ज्वाला.

नाए (نائے) स्त्री. (फ़ा.) बासरी; मुरली.

नाक (ناک) प्रत्य. (फ़ा.) भरलेला; परिपूर्ण. [उदा. 'दर्दनाक' (دردناک) वि. (फ़ा.) दुःखपूर्ण].

नाक़िद (ناقد) वि. ('अ.) समालोचक; टीकाकार.

नाक़िल (ناقل) वि.('अ.) नक्कल करणारा (दुसऱ्याची किंवा कागदपत्राची); नकलाकार.

नाक़िस् (ناقص) वि. ('अ.) (१) अपूर्ण; उणीव असलेला. (२) दूषित; विकृत; खराब. (३) पाजी; नीच. (४) खोटा. (५) ज्याच्या शेवटी अलिफ, वाव किंवा ये हे अक्षर आहे असा अरबी भाषेतील शब्द. **–उल्-ख़िल्क़त** (الخلقت –) वि. ('अ.) ज्याच्या शरीरात काही व्यंग आहे असा.

नाक़ूस (ناقوس) पु. ('अ.) शंख.

नाकेह् (ناکح) वि. ('अ.) विवाह (निकाह) करणारा.

नाक़ः (ناقه) स्त्री. ('अ.) सांडणी; उंटीण. **–सवार** (سوار –) वि. ('अ. + फ़ा.) (१) सांडणीस्वार. (२) दूत; पत्रवाहक.

नाख (ناخ) पु. (फ़ा.) एक प्रकारचे फळ (नाशपातीच्या जातीचे).

नाख़िस (ناخس) वि. ('अ.) बोचणारा; टोचणारा.

नाख़ुदा (ناخدا) पु. (फ़ा.) नावाडी; कर्णधार. **–'ई** (ئی –) स्त्री. (फ़ा.) नौकानयन; नाव वल्हविणे.

नाख़ून (ناخن) पु. [फ़ा. 'नाख़ून' (ناخون) चे संक्षिप्त.] नख (हातापायाचे). **–तराश** (تراش –) पु. (फ़ा.) नखे काढण्याचे नचिकणे; नेलकटर.

नाग़ः (ناغه) पु. (तु.) (१) अनुपस्थिती; गैरहजेरी. (२) सुट्टी. **–नवीस** (نویس –) वि. (तु.+फ़ा.) नोकरांची हजेरी लिहिणारा.

नाज़ (ناز) पु. (फ़ा.) (१) हावभाव; नखरा. (२) घमेंड; अभिमान. **–परवर** (پرور –); **–परवर्दः** (پروردہ –) वि. (फ़ा.) लाडात वाढलेला; सुकुमार. **–पेशः** (پیشہ –) वि. (फ़ा.) (१) हावभाव करण्याचा धंदा करणारी; वेश्या. (२) प्रेयसी. **–बरदार** (بردار –) वि. (फ़ा.) नखरा सहन करणारा प्रियकर. **–बालिश** (بالش –) पु. (फ़ा.) कुशीत घ्यावयाची उशी. **–बू** (بو –) स्त्री. (फ़ा.) एक प्रकारची चमेली.

नाज़-ओ-नियाज़ (نازونیاز) पु. (फ़ा.) आपुक मापुकांचे चाळे.

नाज़नीं (نازنیں) स्त्री. (फ़ा.) सुंदरी; कोमलांगी; सुकुमारी.

नाज़ाँ (نازاں) वि. (फ़ा.) नखरा; गर्व करणारा; घमेंडखोर.

नाज़िम (ناظم) वि.('अ.) (१) व्यवस्थापक. (२) मंत्री. (३) कारभारी.

नाज़िर (ناظر) वि. ('अ.) (१) पाहाणारा; प्रेक्षक. (२) निरीक्षक; देखरेख करणारा; नाझर.

नाज़िरीन (ناظرین) वि. ['अ. 'नाज़िर' (ناظر) चे अनेक.] (१) प्रेक्षक. (२) वाचक.

नाज़िरः (ناظره) स्त्री. ['अ. 'नाज़िर' (ناظر) चे स्त्री. पाहाणारी. (पु.) पुस्तकात पाहून कुराण वाचणे.

(तोंडपाठ नसणे). **–ख़्वाँ** (خواں –) वि. ('अ.+फ़ा.) पाहून कुराण वाचणारा.

नाज़िल (نازل) वि. ('अ.) (१) वरून खाली येणारा; उतरणारा. (२) उतरलेला.

नाज़िलः (نازلہ) पु. ('अ.) आपत्ती; संकट.

नाज़िश (نازش) स्त्री. (फ़ा.) हावभाव; नखरा.

नाजी (ناجی) वि. ('अ.) मुक्त; मोक्ष मिळविणारा.

नाज़ीदः (نازیدہ) वि. (फ़ा.) गर्विष्ठ; मग्रूर.

नाज़ुक (نازک) वि. (फ़ा.) (१) मऊ; कोमल; सुकुमार. (२) सूक्ष्म; गूढ. (३) हलका. (४) दुर्बळ; क्षीण. (५) तीव्र. (६) गुंतागुंतीचा. **–अंदाम** (اندام –) वि. (फ़ा.) कृशांग; कोमल शरीराचा. **–ख़याल** (خیال –) वि. (फ़ा.+'अ.) आपल्या काव्यात सूक्ष्म व गूढ भाव गुंफणारा (कवी). **–तब्'अ** (طبع –); **–दिमाग़** (دماغ –); **–मिज़ाज** (مزاج –) वि. (फ़ा.+'अ.) (१) चिडखोर स्वभावाचा. (२) प्रेयसी.

नाज़ुर (ناظور) वि. ('अ.) पहारेकरी; राखणदार.

नाज़ूरः (ناظورہ) स्त्री. ('अ.) (१) माळीण. (२) प्रेयसी.

नातिक़ (ناطق) वि. ('अ.) (१) बोलणारा; वक्ता. (२) बुद्धिमान; बुद्धिवादी. (३) अंतिम; अटळ.

नातिक़ः (ناطقہ) पु. ('अ.) वाक्शक्ती; वाणी.

नादिम (نادم) वि. ('अ.) लज्जित; शरमिंदा; पश्चात्तप्त.

नादिर (نادر); **नादिरः** (نادرہ) वि. ('अ.) (१) अद्भुत; विचित्र. (२) श्रेष्ठ; उत्तम.

नादिरी (نادری) स्त्री. ('अ.) (१) नादिरशाही; अन्याय. (२) पत्त्यांतील एक्का. (३) एक प्रकारची बंडी.

नादिरः-ए-रोज़गार (نادرۂ روزگار) वि. ('अ.+फ़ा.) जगात सर्वश्रेष्ठ.

नादी (نادی) वि. ('अ.) पुकारणारा; बोलावणारा.

नान (نان) स्त्री. (फ़ा.) (१) चपाती; तंदूरची जाड रोटी. (२) भाकरी. **–कार** (کار–) स्त्री. (फ़ा.) राजाकडून त्याच्या सेवकांना त्यांच्या उपजीविकेसाठी मिळणारी जमीन. **–कोर** (کور –) वि. (फ़ा.) कृतघ्न; निमकहराम. **–ख़ता'ई** (خطائی –) स्त्री. (फ़ा.) एक प्रकारचे गोड बिस्किट. **–ख़ुरिश** (خورش –) स्त्री. (फ़ा.) तोंडी लावणे. **–ख़्वाह** (خواہ –) स्त्री. (फ़ा.) ओवा. **–पुज़** (پز –); **–बा** (با –); **–बा'ई** (بائی –) पु. (फ़ा.) पावरोटी; चपाती तयार करणारा; रोटीवाला.

नान-ए-जवीं (نان جویں) स्त्री. (फ़ा.) जवाची रोटी; जाडजूड व कोरडी भाकरी.

नाफ़ (ناف) स्त्री. (फ़ा.) बेंबी; नाभी; मध्यभाग. **–पेच** (پیچ –) स्त्री. (फ़ा.) मुरडा. (पोटात येणारी कळ).

नाफ़-ए-ज़मीं (ناف زمیں) स्त्री. (फ़ा.) पृथ्वीचा मध्यभाग. मक्का.

नाफ़-ए-हफ़्तः (ناف ہفتم) स्त्री. (फ़ा.) मंगळवार.

नाफ़ि'अ (نافع) वि. ('अ.) फायदेशीर; नफादायक.

नाफ़िज़ (نافذ) वि. ('अ.) जारी झालेला; लागू झालेला (हुकूम).

नाफ़िर (نافر) वि. ('अ.) घृणा; तिरस्कार करणारा.

नाफ़ी (نافی) वि. ('अ.) नाकारणारा; नकारात्मक.

नाफ़ः (نافہ) पु. (फ़ा.) मृगनाभी; कस्तूरीमृगाची बेंबी (हिच्यात कस्तुरी असते); कस्तुरीची थैली.

नाब (ناب) वि. (फ़ा.) शुद्ध; निर्भेळ.

नाब (ناب) पु. ('अ.) दात.

नाबदान (نابدان) स्त्री. (फ़ा.) मोरी; नाली; गटार.

नाबित (نابت) वि. (फ़ा.) (१) शुद्ध; निर्भेळ. (२) कडक मद्य.

नाबः (نابہ) वि. ('अ.) उगवणारा; अंकुरणारा.

नाम (نام) पु. (फ़ा.) (१) नाम; नाव. (२) ख्याती; लौकिक. (३) प्रतिष्ठा; इज्जत. (४) स्मरणचिन्ह; आठवण. (५) पदवी. (६) आरोप; दोष. **–आवर** (آور –) वि. (फ़ा.) प्रसिद्ध; विख्यात; नामांकित. **–आवरी** (آوری –) स्त्री. (फ़ा.) ख्याती; कीर्ती. **–ज़द** (زد –) वि. (फ़ा.) (१) नेमलेला; ठरविलेला; नियुक्त केलेला; निवड केलेला. (२) विख्यात. **–ज़दगी** (زدگی –) स्त्री. (फ़ा.) (१) निवडणुकीसाठी नाव दाखल करणे; उमेदवार होणे, करणे. (२) नेमणूक. **–जू** (جو –) वि. (फ़ा.) प्रसिद्धी इच्छिणारा. **–दार** (دار –); **–बरदार** (بردار –) वि. (फ़ा.) (१) नामांकित; प्रसिद्ध. (२) प्रतिष्ठित. **–निहाद** (نہاد –) वि. (फ़ा.) नाममात्र; फक्त नावापुरता; अवास्तविक. **–बुर्दः** (بردہ –) वि. (फ़ा.) पूर्वी सांगितलेली, उल्लेखिलेली (व्यक्ती); पूर्वोक्त. **–वर** (ور –) वि. (फ़ा.) (१) प्रसिद्ध; महशूर. (२) पुण्यश्लोक. **–वरी** (وری –) स्त्री. (फ़ा.) ख्याती; कीर्ती.

नाम-ए-ख़ुदा (نام خدا) अव्य. (फ़ा.) (१) इडापिडा टळो; नजर न लागो. (२) छान! वाहवा!

नामियः (نامیہ) स्त्री. ('अ.) उगवण्याची व वाढण्याची शक्ती.

नामी (نامی) वि. (फ़ा.) (१) नामवंत; नामांकित. (२) श्रेष्ठ. **–गिरामी** (گرامی –) वि. (फ़ा.) अत्यंत प्रसिद्ध; प्रख्यात.

नामूस (ناموس) पु. ('अ.) (१) लज्जा; लाज. (२) शील; पातिव्रत्य; मर्यादा. (३) पत्नी.

नामूस-ए-अक्बर (ناموس اکبر) पु. ('अ.) (१) मोठा कायदा; राज्यघटना. (२) जिब्रील.

नामूसियः (ناموسیہ) स्त्री. ('अ.) मच्छरदाणी.

नामः (نامہ) पु. (फ़ा.) (१) पत्र; चिट्ठी. (२) ग्रंथ. [उदा. 'शाहनामः' (شاہنامہ) बादशहाचे वर्णन देणारा ग्रंथ]. **–निगार** (نگار –) वि. (फ़ा.) बातमीदार. **–बर** (بر –); **–रसाँ** (رساں –) वि. (फ़ा.) पत्रवाहक; पोस्टमन. **–ए-सियाह** (سیاہ –) वि. (फ़ा.) ज्याचे कर्मपत्र अगदी काळेकुट्ट आहे असा; पापी.

नामः-ए-'अमल (نامۂ عمل); **नामः-ए-अ'अमाल** (نامۂ اعمال) पु. (फ़ा. + 'अ.) ज्यावर प्रत्येक व्यक्तीच्या पापपुण्याचा हिशेब लिहून ठेवण्यात येतो (चित्रगुप्ताकडून) तो कागद.

नामः-ए-शौक़ (نامۂ شوق) पु. (फ़ा.+'अ.) प्रेमपत्र.

नारंज (نارنج) पु. (फ़ा.) संत्रे; नारिंग.

नारंजी (نارنجی) वि. (फ़ा.) नारिंगी रंगाचा.

नार (نار) स्त्री. ('अ.) (१) आग; अग्नी. (२) नरक.

नार (نار) पु. (फ़ा.) डाळिंब. **–दान** (دان –) पु. (फ़ा.) डाळिंबाचे दाणे. **–पिस्ताँ** (پستاں –) वि. (फ़ा.) जिची वक्षस्थळे (स्तने) घट्ट, टणक आहेत अशी (स्त्री.). **–बुन** (بن –) पु. (फ़ा.) डाळिंबाचे झाड. **–वन** (ون –) पु. (फ़ा.) डाळिंबाचा एक प्रकार.

नार-ए-जहन्नम (نار جہنم) स्त्री. ('अ.) **नार-ए-दोज़ख़** (نار دوزخ) स्त्री. ('अ.+फ़ा.) नरकातील आग.

नार-ए-फ़ार्सी (نار فارسی) स्त्री. ('अ.+फ़ा.) उपदंश; गरमी (रोग).

नारजील (نارجیل) पु. (फ़ा.) नारळ; खोबरे.

नारी (ناری) वि. ('अ.) (१) नरकाशी संबंधित. (२) अग्नीपासून उत्पन्न झालेला; परी; भूत.

नाल (نال) स्त्री. (फ़ा.) (१) बोरूच्या आत असलेले सुतासारखे बारीक धागे; नार. (२) पोकळ बोरू. (३) नळ.

नालाँ (نالاں) वि. (फ़ा.) (१) विलाप करणारा; रडत असलेला; गाऱ्हाणे सांगणारा; तक्रार करणारा.

बहार आ'ई चमन में, और तू इतनी परीशाँ है।
बता बुलबुल! तुझे क्या दर्द है, तू किस से नालाँ है॥

(२) अनुचित; अयोग्य.

नालिदः (نالندہ) वि. (फ़ा.) रडणारा; विलाप करणारा.

नालिश (نالش) स्त्री. (फ़ा.) फिर्याद; गाऱ्हाणे; तक्रार; दावा.

नालिशी (نالشی) वि. (फ़ा.) फिर्याद करणारा; वादी.

नालीदः (نالیدہ) वि. (फ़ा.) रडलेला; रुदित.

नालः (نالہ) पु. (फ़ा.) (१) आक्रोश; विलाप. (२) गाऱ्हाणे; तक्रार. (३) कोलाहल; ओरडा. **–कश** (کش –); **–गर** (گر –); **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) (१) आक्रोश करणारा. (२) तक्रार करणारा.

नाव (ناو) स्त्री. (फ़ा.) नौका; नाव.

नावक (ناوک) पु. (फ़ा.) (१) तीर; बाण. (२) मधमाशीचा डंख. **–अंदाज़** (انداز –); **–अफ़्गन** (افگن –); **–फ़िगन** (فگن –) वि. (फ़ा.) नाव चालविणारा; नावाडी.

नावदान (ناودان) पु. (फ़ा.) मोरी; नाली; गटार.

नावनोश (ناونوش) स्त्री. (फ़ा.) मद्यपान; विलास.

नावर्द (ناورد) स्त्री. (फ़ा.) युद्ध; लढाई.

नावः (ناوہ) पु. (फ़ा.) (१) मोरी. (२) पन्हळ.

नाशिता (ناشتا) पु. (फ़ा.) न्याहारी; नास्ता.

नाशिर (ناشر) पु. ('अ.) (१) प्रकाशक. (२) प्रसारक.

नाशी (ناشی) वि. ('अ.) (१) उद्‌भव होणारा. (२) युवक; तरुण.

नाशपाती (ناشپاتی) स्त्री (फ़ा.) सफरचंदाच्या जातीचे एक फळ; नासपाती.

नास (ناس) पु. ('अ.) एक मनुष्य; अनेक माणसे.

नासिक (ناسک) वि. ('अ.) (१) ईश्वराची आराधना करणारा; साधक. (२) बलिदान देणारा; बळी देणारा.

नासिख़ (ناسخ) वि. ('अ.) (१) लिहिणारा. (२) रद्द करणारा; पुसून, खोडून टाकणारा.

नासिब (ناصب) वि. ('अ.) स्थापना करणारा; लावणारा.

नासिबी (ناصبی) वि. ('अ.) हजरत अली यांना नावे ठेवणारा एक मुस्लिम संप्रदाय; सदर संप्रदायातील व्यक्ती.

नासियः (ناصیہ) पु. ('अ.) कपाळ; ललाट; भाल. **–फ़र्सा** (فرسا –); **–सा** (سا –) वि. ('अ.+फ़ा.) (१) मस्तक (नाक) घासणारा; खुशामत करणारा. (२) जमिनीला डोके लावून प्रणाम करणारा.

नासिर (ناصر) वि. ('अ.) मदतगार; सहायक; पाठीराखा.

नासिर (ناثر) वि. ('अ.) गद्यलेखक.

नासी (ناسی) वि. ('अ.) विसराळू; विसरून जाणारा.

नासूत (ناسوت) पु. ('अ.) इहलोक; जग; मृत्युलोक.

नासूर (ناسور) पु. ('अ.) सतत वाहात राहाणारी जखम; नाणीव्रण.

नासेह (ناصح) वि. ('अ.) उपदेशक; कर्मठ.

नास्पाल (ناسپال) पु. ('अ.) डाळींबाची साल.

नाहार (ناهار) वि. (फ़ा.) सकाळपासून उपाशी असलेला; अनशेपोटी.

नाहियः (ناحیہ) पु. ('अ.) किनारा; सीमा; सरहद्द.

नाही (ناحی) वि. ('अ.) अडविणारा; प्रतिबंध करणारा.

नाहीद (ناهید) स्त्री. (फ़ा.) शुक्र (ग्रह).

नि'अम (نعم) स्त्री. ['अ. 'नि'अमत' (نعمت) चे अनेक.] चांगल्या गोष्टी.

नि'आल (نعال) पु. ['अ. 'न'अल' (نعل) चे अनेक.] (१) पादत्राणे; खडावा. (२) नाल (घोडयाचे अथवा वाहणांचे).

निक़ात (نقاط) पु. ['अ. 'नुक़्तः' (نقطہ) चे अनेक.] टिंबे; शून्ये; अनुस्वार.

निकात (نکات) पु. ['अ. 'नुक्तः' (نکتہ) चे अनेक.] सूक्ष्म व गूढ गोष्टी.

निक़ाब (نقاب) पु. स्त्री. ('अ.) (१) बुरखा. (२) तोंड झाकले जाईल अशा प्रकारे घेतलेला पदर. **–कुशा'ई** (–کشائی) स्त्री. ('अ. + फ़ा.) (१) वधूच्या मुखावरील पदर बाजूला सारण्याचा एक विधी. (२) अनावरण. **–पोश** (–پوش) वि. ('अ.+फ़ा.) बुरखेवाला; ज्याने आपल्या तोंडावर बुरखा घेतला आहे असा.

निक़ार (نقار) पु. ('अ.) द्वेष; वैर.

निकाह़ (نکاح) पु. ('अ.) (१) लग्न; विवाह. (२) मुस्लिम पद्धतीचा विवाह. **–नामः** (–نامہ) पु. ('अ.+फ़ा.) ज्यावर लग्नाच्या अटी लिहिलेल्या आहेत असा कागद; लग्नाचा करारनामा.

निकाह़-ए-सानी (نکاح ثانی) पु. ('अ.) पुनर्विवाह.

निको (نکو) वि. (फ़ा.) (१) उत्तम; श्रेष्ठ. (२) सुंदर. **–'ई** (–ئی) स्त्री. (फ़ा.) (१) उत्तमता; श्रेष्ठत्व; भलाई. (२) सौंदर्य. **–कार** (–کار) वि. (फ़ा.) सदाचारी. **–ख़्वाह** (–خواہ) वि. (फ़ा.) हितचिंतक. **–नाम** (–نام) नामांकित; कीर्तीमान.

निकोहिश (نکوہش) स्त्री. (फ़ा.) निर्भर्त्सना; धिक्कार.

निक़्मत (نقمت) स्त्री. ('अ.) (१) कष्ट; पीडा; यातना. (२) द्वेष.

निक्रिस (نقرس) पु. ('अ.) कमरेपासून पायाच्या अंगठ्यापर्यंत उठणारी कळ.

निखालिस़ (خالص) वि. ('अ.+हिं.) (१) निर्भेळ; शुद्ध. (२) भेसळयुक्त; अशुद्ध.

निख़्वत (خوت) स्त्री. ('अ.) अभिमान; अहंकार. **–पसंद** (–پسند) वि. ('अ. + फ़ा.) अभिमानी; अहंकारी; गर्विष्ठ.

निगंदः (نگندہ) पु. (फ़ा. + हिं.) रजई वगैरेमध्ये लांबलांब टाके घालून शिवणे; लांब टाक्यांची शिलाई (बा.).

निगर (نگر) प्रत्य. (फ़ा.) पाहणारा. [उदा. 'दस्त निगर' (دست نگر) वि. (फ़ा.) दुसऱ्याच्या हाताकडे पाहाणारा (आधारासाठी)].

निगरां (نگران) वि. (फ़ा.) (१) निरीक्षक; तपासनीस; देखरेख ठेवणारा. (२) संरक्षक; पालक. (३) प्रतीक्षा करणारा.

निगरानी (نگرانی) स्त्री. (फ़ा.) (१) निरीक्षण; देखरेख. (२) संरक्षण. (३) पालकत्व.

निगह (نگہ) स्त्री. [फ़ा. 'निगाह' (نگاہ) चे संक्षिप्त.] दृष्टी; नजर. **–दाश्त** (–داشت) स्त्री. (फ़ा.) संरक्षण; देखरेख. **–बान** (–بان) वि. (फ़ा.) संरक्षक; देखरेख ठेवणारा; पहारेकरी. **–बानी** (–بانی) स्त्री. (फ़ा.) देखरेख; संरक्षण.

निगार (نگار) पु. (फ़ा.) (१) चित्र; मूर्ती; प्रतिमा. (२) प्रेमपात्र; प्रेयसी. (३) हातापायावर मेंदीने काढलेली चित्रे. (प्रत्य.) (१) चित्रित करणारा. [उदा. 'तस्वीर निगार' (تصویر نگار) वि. (फ़ा.) चित्रकार]. (२) चित्रित केलेले. [उदा. 'ज़र निगार' (زر نگار) वि. (फ़ा.) सोन्याचे नक्षीकाम.] **–ख़ानः** (–خانہ) पु. (फ़ा.) (१) चित्रशाळा. (२) मूर्तिगृह. (३) जेथे अनेक सुंदर स्त्रिया आहेत असे स्थान.

निगार-ए-अर्मनी (نگار ارمنی) स्त्री. (फ़ा.) फरहादची प्रेयसी; शीरीन.

निगारिश (نگارش) स्त्री. (फ़ा.) (१) लेख; लिखाण. (२) चित्र; नक्षी.

निगारिस्तान (نگارستان) पु. (फ़ा.) (१) चित्रशाळा. (२) अनेक सुंदरींचे निवासस्थान.

निगारीं (نگارین) वि. (फ़ा.) (१) चित्रित; शृंगारीत. (२) मेंदी लावलेली (व्यक्ती).

निगाश्तः (نگاشتہ) वि. (फ़ा.) (१) लिहिलेला. (२) चित्रित.

निगाह (نگاہ) स्त्री. (फ़ा.) दृष्टी; नजर. **–दार** (–دار) वि. (फ़ा.) संरक्षक; देखरेख ठेवणारा. **–दाश्त** (–داشت) स्त्री. (फ़ा.) (१) संरक्षण. (२) पहारा; देखरेख. **–बान** (–بان) वि. (फ़ा.) (१) संरक्षक. (२) देखरेख ठेवणारा.

निगूं (نگوں) वि. (फ़ा.) (१) उपडा; उलटा; वाकडा. (२) विहिन; रहित. **–तालि'अ** (طالع –) वि. (फ़ा.+'अ.) **–बख़्त** (بخت –) वि. (फ़ा.) दुर्दैवी. **–सार** (سار –) वि. (फ़ा.) उपडा; उलटा. **–हिम्मत** (همت –) वि. (फ़ा.+'अ.) भ्याड; धीर खचलेला.

निज़ा'अ (نزاع) स्त्री. ('अ.) (१) भांडण; झगडा. (२) वैर; शत्रुत्व.

निज़ा'अ-ए-लफ़्ज़ी (نزاع لفظی) स्त्री. ('अ.) वाक्‌युद्ध; शाब्दिक कलह.

निज़ाम (نظام) पु. ('अ.) (१) व्यवस्था. (२) क्रम. (३) पद्धती; शैली. (४) संघटना. (५) हैदराबादचा निजाम. (६) मोत्यांची लड.

निज़ाम-ए-शम्सी (نظام شمسی) पु. ('अ.) सूर्यमध्यग्रहमाला.

निज़ामत (نظامت) स्त्री. ('अ.) (१) व्यवस्था. (२) सत्ता; शासन व्यवस्था. (३) 'नाजिम' चे कार्य, पद अथवा कचेरी.

निज़ामी (نظامی) वि. ('अ.) (१) व्यवस्थेशी संबंधित. (२) लष्करी.

निज़्द (نزد) अव्य. (फ़ा.) जवळ; निकट; समीप.

निदा (ندا) स्त्री. ('अ.) (१) आवाज. (२) हाक; साद; संबोधनाचा शब्द (अरे, अहो वगैरे).

निदा-ए-ग़ैब (ندائے غیب) स्त्री. ('अ.) आकाशवाणी; देववाणी.

निफ़ाक़ (نفاق) पु. ('अ.) (१) फाटाफूट. (२) वैमनस्य; शत्रुत्व. **–अंगेज़** (انگیز –) वि. ('अ.+फ़ा.) वितुष्ट; विरोध निर्माण करणारा.

निफ़ाक़-ए-बाहमी (نفاق باهمی) पु. ('अ. + फ़ा.) आपसातील वैमनस्य; यादवी.

निफ़ास (نفاس) पु. ('अ.) स्त्रीच्या प्रसूतीनंतर चाळीस दिवसपर्यंत चालणारा रक्तस्राव.

निफ़्त (نفت) पु. (फ़ा.) (१) रॉकेल. (२) स्फोटक दारू. **–अंदाज़** (انداز –) वि. (फ़ा.) गोलंदाज; तोफ डागणारा.

निफ़्तः (نفتہ) पु. ('अ.) फोड (भाजल्यामुळे किंवा घासल्यामुळे येणारा).

निफ़्रीं (نفریں) स्त्री. (फ़ा.) धिक्कार.

निब्रास (نبراس) पु. ('अ.) दीपक; दिवा.

निया (نیا) पु. (फ़ा.) (१) प्रतिष्ठा; इज्जत. (२) आजोबा (दोन्ही). (३) मामा. [अनेक 'नियागान' (نیاگان) पु. (फ़ा.) पूर्वज].

निया'इश (نیائش) स्त्री. (फ़ा.) (१) स्तुती; प्रशंसा. (२) शाबासकी.

नियाज़ (نیاز) पु. स्त्री. (फ़ा.) (१) प्रार्थना; विनंती; मागणे. (२) इच्छा. (३) परिचय. (४) भेट; मुलाखत. (५) देवाला अर्पण केलेली वस्तू; नैवेद्य; प्रसाद. (६) फातिहा (मृतासाठी प्रार्थना). (७) मृताच्या नावाने गरीबांना जेवण घालणे. (८) कृपा; प्रेम. (९) दीनता. **–केश** (کیش –); **–मंद** (مند –) वि. (फ़ा.) (१) आज्ञाधारक; ताबेदार. (२) कृपाभिलाषी. (३) परिचित. (४) भक्त. (५) मित्र.

नियाबत (نیابت) स्त्री. ('अ.) प्रतिनिधित्व; एखाद्याच्या जागी किंवा ऐवजी काम करणे; दूतकर्म; सहकार्य.

नियाम (نیام) पु. (फ़ा.) म्यान (तलवारीचे).

नियोश (نیوش) प्रत्य. (फ़ा.) ऐकणारा. [उदा. 'हक़ नियोश' (حق نیوش) वि. (फ़ा.+'अ.) सत्य ऐकणारा].

निर्ख़ (نرخ) पु. (फ़ा.) दर; भाव. **–नामः** (نامہ –) पु. (फ़ा.) दरांची यादी. **–बंदी** (بندی –) स्त्री. (फ़ा.) (१) दर, भाव ठरवून देणे. (२) भाव ठरविणे.

निवालः (نوالہ) पु. (फ़ा.) घास; ग्रास.

निविश्त (نوشت) वि. (फ़ा.) लिहिलेला; लिखित.

निविश्तः (نوشتہ) वि. (फ़ा.) लिहिलेला. (पु.) लेख; लिखाण.

निशस्त (نشست) स्त्री. (फ़ा.) (१) बैठक. (२) बसण्याची पद्धत; मुद्रा. (३) जागा (निवडणुकीतील). (४) सभा; मजलीस. **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) बैठकीचा दिवाणखाना.

निशस्त-ओ-बरख़ास्त (نشست و برخاست) स्त्री. (फ़ा.) उठणे-बसणे; येणे-जाणे.

निशां (نشاں) पु. [फ़ा. 'निशान' (نشان) चे संक्षिप्त.] (१) चिन्ह; खूण. (२) झेंडा. (प्रत्य.) वसविणारा; ठसविणारा. [उदा. 'ख़ातिर निशां' (خاطر نشاں) वि. ('अ. + फ़ा.) हृदयात ठसविणारा]. **–ज़दः** (زدہ –) वि. (फ़ा.) चिन्हित; खूण केलेला. **–देही** (دہی –) स्त्री. (फ़ा.) खूण सांगणे; पत्ता देणे.

निशाद (نژاد) स्त्री. (फ़ा.) कूळ; वंश; घराणे.

निशान (نشان) पु. (फ़ा.) (१) चिन्ह; खूण. (२) डाग. (३) शोध; धुंडणे. (४) पत्ता. (५) झेंडा; ध्वज. **–ची** (چی –) वि. (फ़ा.) (१) ध्वज घेऊन पुढे चालणारा. (२) उत्तम नेम मारणारा. **–बरदार** (بردار –) वि. (फ़ा.) झेंडा घेऊन चालणारा.

निशान-ए-मंज़िल (نشان منزل) पु. (फ़ा. + 'अ.) पोहोचण्याच्या ठिकाणाचा पत्ता, खूण.

निशान-ए-सौदागरी (نشان سوداگری) पु. (फ़ा.) ट्रेडमार्क.

निशानी (نشانی) स्त्री. (फ़ा.) (१) स्मृतिचिन्ह; स्मारक. (२) आठवण. (३) ओळख; परिचय. (४) खूण. (५) लक्षण. (६) लग्न ठरविताना दिली जाणारी अंगठी.

निशानः (نشانہ) पु. (फ़ा.) नेम; लक्ष्य. **–अंदाज़** (انداز –) वि. (फ़ा.) अचूक नेम मारणारा; लक्ष्यभेदी.

निशास्तः (نشاستہ) पु. (फ़ा.) (१) गव्हाचे सत्त्व. (२) खळ (चिकटविण्याची).

निशेद (نشید) पु. (फ़ा.) (१) गाणे; गीत. (२) संगीत; गाण्याचा स्वर. **–ख़्वाँ** (خواں –) वि. (फ़ा.) (१) गायक; गवई. (२) सुरावर म्हणणारा.

निशेब (نشیب) पु. (फ़ा.) सखल जमीन; खोलगट भाग; उतार.

निशेब-ओ-फ़राज़ (نشیب و فراز) पु. (फ़ा.) उंचसखल भाग; चढउतार.

निशेमन (نشیمن) पु. (फ़ा.) घरटे; घरकुल.

निश्कुंज (نشکنج) स्त्री. (फ़ा.) चिमटा (बोटांनी काढावयाचा); बोचकारा.

निश्तर (نشتر) पु. (फ़ा.)शल्य; नस्तर. **–कदः** (کدہ –) पु. (फ़ा.) ऑपरेशन रूम; शस्त्रक्रिया गृह. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) ऑपरेशन करणारा. **–लगाना** (لگانا –) शल्यक्रिया करणे; कापणे; चीरफाड करणे.

निश्तर-ए-फ़स्साद (نشتر فصاد) पु. (फ़ा. + 'अ.) शिरांतील किंवा नसांतील रक्त काढावयाचा नस्तर, चाकू.

निश्वर (نشور) स्त्री. (फ़ा.) रवंथ; चघळणे.

निसा (نسا) स्त्री. ('अ.) स्त्रिया; बायका.

निसाब (نصاب)पु.('अ.)(१) धन; संपत्ती; भांडवल. (२) पाठ्यक्रम. (३) आधार.

निसाब-ए-ज़कात (نصاب زکات) पु. ('अ.) ज्यावर 'जकात' (अडीच टक्के दान) देणे अनिवार्य असते असे धन (५० तोळे चांदी व साडे सात तोळे सोने).

निसाब-ए-त'अलीम (نصاب تعلیم) पु. ('अ.) अभ्यास-क्रम; पाठ्यक्रम; पाठ्यपुस्तके.

निसार (نثار) पु. ('अ.) बलिदान; ओवाळून टाकणे. (वि.) मुग्ध; मोहित.

निस्त्रीन (نسترین) पु. ('अ.) शेवंती (फूल).

निस्फ़ (نصف) वि. ('अ.) अर्धा; आधा.

निस्फ़-उन्-निहार (نصف النہار) पु. ('अ.) (१) दुपार; मध्यान्ह. (२) रेखांश.

निस्फ़-उल्-लैल (نصف اللیل) स्त्री. ('अ.) मध्यरात्र.

निस्बत (نسبت) स्त्री. ('अ.) (१) संबंध; संपर्क. (२) बाङ्निश्चय (लग्नाचा). (३) तुलना; बरोबरी. (अव्य.) विषयी; संबंधी.

निस्यां (نسیاں); **निस्यान** (نسیان) पु. ('अ.) (१) विस्मृती; विसर. (२) चूक.

निस्यः (نسیہ) पु. ('अ.) कर्ज; ऋण; उधारी.

निस्वत (نسوت); **निस्वाँ** (نسواں) स्त्री. ('अ.) स्त्रिया; महिला; बायका.

निस्वानियत (نسوانیت) स्त्री. ('अ.) स्त्रीत्व.

निस्वानी (نسوانی) वि. ('अ.) स्त्रियांचा; स्त्रियांशी संबंधित.

निहंग (نہنگ)पु.(फ़ा.) मगर; सुसर (शुद्ध : 'नहग').

निहाँ (نہاں) वि. (फ़ा.) गुप्त; लपलेला; दडलेला; न दिसणारा. **–खानः** (خانہ –) पु (फ़ा.) तळघर.

निहाद (نہاد) स्त्री. (फ़ा.) (१) स्वभाव; प्रकृती. (२) मूळ; आधार; पाया. (प्रत्य.) (१)स्वभावाचा. [उदा. 'नेक निहाद' (نیک نہاد) वि. (फ़ा.) सुस्वभावी.] (२) ठेवलेला. [उदा. 'दिल निहाद' (دل نہاد) वि. (फ़ा.) (१) जेथे हृदय ठेवले आहे असा.] (२) केवळ; पुरता. [उदा. 'नाम निहाद' (نام نہاد) वि. (फ़ा.) नावापुरता; नाममात्र; तथाकथित].

निहादः (نہادہ) वि. (फ़ा.) ठेवलेला.

निहानी (نہانی) वि. (फ़ा.) (१) आतील; आंतरिक. (२) गुप्त; लपलेला.

निहायत (نہایت) स्त्री. ('अ.) अंत; शेवट; टोक (वि.) अत्यंत; फार.

निहाल (نہال) पु. (फ़ा.)(१)रोपटे; रोप. (२)गादी. (३) शिकार. (वि.)(१) प्रफुल्ल; प्रसन्न. (२) समृद्ध. **–चः** (چہ –) पु. (फ़ा.) लहान मुलांचे अंथरूण.

निहाली (نہالیں); **निहाली** (نہالی) स्त्री. (फ़ा.) गादी; अंथरूण.

निहिंदः (نہندہ) वि. (फ़ा.) ठेवणारा.

निहुफ़्त (نہفت); **निहुफ़्तगी** (نہفتگی) स्त्री. (फ़ा.) गुप्तता; लपवालपवी.

निहुफ़्तः (نہفتہ) वि. (फ़ा.) गुप्त; लपविलेला; दडलेला.

निहेब (نہیب) पु. (फ़ा.) (१) भीती. (२) भयंकर आवाज. (३) लुटालूट.

नी (نی) प्रत्य. (फ़ा.) च्या योग्य. [उदा. 'कर्दनी' (کردنی) वि. (फ़ा.) करण्यास योग्य. 'गुफ़्तनी' (گفتنی) वि. (फ़ा.) सांगण्यायोग्य].

नीको (نیکو) वि. (फ़ा.) उत्तम; सुंदर. **–'ई** (ئی –) स्त्री. (फ़ा.) चांगलेपणा; खुपी; सौंदर्य. **–कार** (کار –) वि. (फ़ा.) सत्कार्य करणारा.

नीज़ (نیز) अव्य. (फ़ा.) आणि; अथवा; सुद्धा; तरीही.

नीम (نیم) वि. (फ़ा.) (१) अर्धा; अर्ध; निम्मा. (२) अल्प; थोडा. **–आस्ती** (آستین –) वि. (फ़ा.) अर्ध्या बाह्यांचा (सदरा); हाफशर्ट. **–कश** (کش –) वि. (फ़ा.) अर्धा आत व अर्धा बाहेर (बाण वगैरे); धनुष्याची दोरी जोरात न ओढता सोडलेला बाण. (हा नुसता घुसून बसतो. आरपार जात नाही.) प्रेयसीच्या नेत्र कटाक्षाला याची उपमा दिली जाते. **–कार** (کار –) वि. (फ़ा.) दुसऱ्यांच्या अबजारांनी काम करून आपल्या मजुरीतील हिस्सा त्यांना देणारा. **–कारः** (کار –) वि. (फ़ा.) अपूर्ण; अर्धवट. **–कुश्तः** (کشتہ –) वि. (फ़ा.) अर्धमेला; ज्याचा गळा अर्धवट कापून सोडून दिल्यामुळे जो तडफडत आहे असा; प्रेमी; प्रियकर. **–ख़ुर्दः** (خوردہ –) वि. (फ़ा.) अर्धवट खाल्लेला; उष्टा. **–ख़ेज़** (خیز –) वि. (फ़ा.) एखाद्याविषयी आदर दाखविण्याकरिता अर्धवट उठणे. **–ख़्वाब** (خواب –) वि. (फ़ा.) अर्धसुप्त; अर्धवट झोपेतून उठल्यानंतर डोळे जसे दिसतात तसे मादक डोळे (प्रेयसीचे). **–गर्म** (گرم –) वि. (फ़ा.) कोमट. **–चः** (چہ –) पु. (फ़ा.) लहान तलवार; कटयार. **–जाँ** (جاں –) वि. (फ़ा.) अर्धमेला; मृतप्राय. **–जोश** (جوش –) वि. (फ़ा.) अर्धवट उकडलेला; थोडा कच्चा. **–तस्लीम** (تسلیم –) वि. (फ़ा.) सलामाचा एक प्रकार (कमरेत वाकून हात पोटापर्यंत नेणे). **–दस्त** (دست –) पु. **–दस्ती** (دستی –) स्त्री. (फ़ा.) मोठया लोकांनी बसण्याची गादी; लहान गादी. **–निगाह** (نگاہ –) स्त्री. (फ़ा.) तिरपी नजर; कटाक्ष. **–पुख़्त** (پخت –); **–पुख़्तः** (پختہ –) वि. (फ़ा.) अर्धवट पिकलेला. **–बाज़** (باز –) वि. (फ़ा.) अर्धवट उघडा; किलकिला; मादक नेत्र. **–बिरिश्त** (برشت –) वि. (फ़ा.) अर्धवटा उकडलेला; (नीमबिरिश्त अंडा). **–बिरियाँ** (بریاں –) वि. (फ़ा.) अर्धवट जळलेला; अर्धवट भाजलेला. **–बिस्मिल** (بسمل –) वि. (फ़ा.) अर्धमेला; घायाळ; जखमी. **–रस** (رس –) वि. (फ़ा.) पाडास आलेला; पूर्ण न पिकलेला. **–रिदा** (رضا –) स्त्री. (फ़ा.+'अ.) अर्धवट संमती. **–रुख़** (رخ –) वि. (फ़ा.) चेहऱ्याच्या एका बाजूचा (चित्र वगैरे). **–रोज़** (روز –) पु. (फ़ा.) दुपार; मध्यान्ह. **–वा** (وا –) वि. (फ़ा.) अर्धवट उघडा. **–शब** (شب –) स्त्री. (फ़ा.) मध्यरात्र. **–सेर** (سیر –) वि. (फ़ा.) अर्धतृप्त. **–सोख़्तः** (سوختہ –) वि. (फ़ा.) अर्धवट जळलेला; होरपळलेला. **–हकीम** (حکیم –) पु. (फ़ा. + 'अ.) अननुभवी वैद्य. [म्हण: **नीम हकीम ख़तरः-ए-जान नीम मुल्ला ख़तरः-ए-ईमान** (نیم حکیم خطرۂ جان نیم ملّا خطرۂ ایمان) अननुभवी व्यक्तीकडून नुकसान होण्याची शक्यता असते].

नीमः (نیمہ) वि. (फ़ा.) अर्धा; निम्मा. (पु.) एक प्रकारचा पायजमा. हा गुडघ्याच्या खाली थोडा आलेला असतो. **–आस्ती** (آستین –) पु. (फ़ा.) अर्ध्या बाह्यांचा सदरा किंवा जाकीट. **–शाम** (شام –) स्त्री. (फ़ा.) सायंकाळ.

नीयत (نیت) स्त्री. ('अ.) इरादा; हेतू; इच्छा; संकल्प.

नीरू (نیرو) पु. (फ़ा.) शक्ती; बळ; जोर.

नील (نیل) पु. (फ़ा.) नीळ (रंग, झाड, पाने); मार लागल्याने शरीरावर पडणारा काळानिळा डाग. **–गर** (گر –) वि. (फ़ा.) नील बनविणारा. **–गाव** (گاو –) पु. (फ़ा.) नीलगाय. **–गूँ** (گوں –) वि. (फ़ा.) निळघा रंगाचा. **–फ़ाम** (فام –) वि. (फ़ा.) निळघा शरीराचा; घनःश्याम.

नीलम (نیلم) पु. (फ़ा.) नीलकांत मणी; नीलमणी (रत्न).

नीलाम (نیلام) पु. (पोर्तु.) लिलाव.

नीली (نیلی) वि. (फ़ा.) निळघा रंगाचा. **–फ़ाम** (فام –) वि. **–रिवाक़** (رواق –) पु. (फ़ा.) निळघा रंगाचे आकाश.

नीलोफ़र (نیلوفر) पु. (फ़ा.) नीलकमल; कुमुद.

नीलः (نیلہ) पु. (फ़ा.) नीलगाय.

नु'आस (نعاس) स्त्री. ('अ.) पेंग; झापड; तंद्री; डुलकी.

नु'ऊज़ (نعوظ) पु. ('अ.) लिंगोत्थान; कामवेगामुळे पुरुषाचे जननेंद्रिय ताठ होणे.

नुक़त (نقط) पु. ['अ. 'नुक़्तः' (نقطہ) चे अनेक.] टिंबे; शून्ये.

नुक़बा (نقبا) पु. ['अ. 'नक़ीब' (نقیب) चे अनेक.] भालदार; चोपदार.

नुक़ूल (نقول) स्त्री. ['अ. 'नक़्ल' (نقل) चे अनेक.] नकला; प्रती.

नुक़ूश (نقوش) पु. ['अ. 'नक़्श' (نقش) चे अनेक.] चित्रे; रेषा.

नुक्तः (نکتہ) पु. ('अ.) (१) सूक्ष्म गोष्ट; सूक्ष्मता. (२) गूढ; रहस्य; मर्म. (३) चुटका. (४) दोष; उणीव. (हिं.) घोडयाच्या तोंडावर बांधले जाणारे चामडे. **–गीर** (گیر –); **–चीं** (چیں –); **–चीन** (چین –) वि. ('अ.+फ़ा.) दोष

शोधणारा; छिद्रान्वेषी, टीकाकार. **–चीनी** (چینی –) स्त्री.('अ.+फ़ा.) दोषदर्शन; छिद्रान्वेषण. **–दाँ** (داں –) वि. ('अ.+फा.) एखाद्या गोष्टीतील सूक्ष्म गोष्टी जाणणारा; मर्मज्ञ. **–नवाज़** (نواز –) वि. ('अ.+फ़ा.) थोडक्यात प्रसन्न होणारा; आशुतोष; परमेश्वर. **–परवाज़** (پرداز –); **–परवर** (پرور–) वि. ('अ.+फ़ा.) (१) हुशार; बुद्धिमान. (२) कवी. **–बीं** (بیں –) वि. ('अ.+फ़ा.) दोष, उणीवा शोधणारा; छिद्रान्वेषक. **–रस** (رس –); **–संज** (سنج –) वि. ('अ.+फ़ा.) (१) मर्मज्ञ. (२) बुद्धिमान.

नुक़्तः (نقطہ) पु. ('अ.) (१) बिंदू. (२) टिंब; शून्य. (३) मुद्दा. (४) चिन्ह; खूण. **–गाह** (۴گاہ –) स्त्री. ('अ.+फ़ा.) वृत्ताचा केंद्रबिंदू.

नुक़्तः-ए-इंतिख़ाब (نقطۂ انتخاب) पु. ('अ.) एखादा मजकूर पसंत पडला असता पुस्तकात त्या ठिकाणी केली जाणारी खूण.

नुक़्तः-ए-तक़ात़ि'अ (نقطۂ تقاطع) पु. ('अ.) दोन सरळ रेषा ऐकमेकींना जेथे छेदतात तो बिंदू.

नुक़्तः-ए-नज़र (نقطۂ نظر) पु. ('अ.) दृष्टिकोन; दृष्टिबिंदू.

नुक़्तः-ए-पर्कार (نقطۂ پرکار) पु. ('अ.+फ़ा.) गोलाचा केंद्रबिंदू.

नुक़्तः-ए-मुक़ाबिल (نقطۂ مقابل) पु. ('अ.) प्रतिस्पर्धी; विरोधी.

नुक़्तः-ए-मौहूम (نقطۂ موہوم) पु. ('अ.) केवळ अंदाजाने ठरविता येईल इतका सूक्ष्मबिंदू.

नुक़्तः-ए-स्वेदा (نقطۂ سویدا) पु. (अ.) छातीवरील काळा तीळ.

नुक़्'ई (نقرئی) वि. (फ़ा.) (१) चांदीचा; रुप्याचा. (२) शुभ्र; धवल.

नुक़्रः (نقرہ) पु. (फ़ा.) चांदी; रजत.

नुक़्ल (نقل) पु. ('अ.) (१) दारू प्याल्यानंतर किंवा अन्य मादक पदार्थाचे सेवन केल्यानंतर खाल्ली जाणारी वस्तू; मिठाई. (२) चुटका; विनोदी गोष्ट. (३) एक प्रकारचे पक्वान्न.

नुक़्ल-ए-ख़्वाजः (نقل خواجہ) पु. ('अ.+फ़ा.) चारोळ्या.

नुक़्ल-ए-मज्लिस (نقل مجلس); **नुक़्ल-ए-महफ़िल** (نقل محفل) पु. ('अ.) (१) मित्र मंडळीसह खाण्यात येणारी मिठाई; फराळाचे पदार्थ. (२) विनोदी व्यक्ती; लोकांच्या मनोरंजनाचा विषय झालेली व्यक्ती.

नुक़्सान (نقصان) पु. ('अ.) (१) हानी. (२) तोटा. (३) दंड. (४) उणीव. (५) अडथळा. **–दिह** (۴دہ –); **–रसाँ** (رساں –) वि. ('अ.+फ़ा.) हानिकारक.

नुक़्सान-ए-माय: (نقصان مایہ) पु. ('अ.+फ़ा.) आर्थिक नुकसान.

नुख़ा'अ (نخاع) पु. ('अ.) पाठीचा कणा; मेरुदंड.

नुख़ालः (نخالہ) पु. ('अ.) भुसा; कोंडा.

नुख़ुस्त (نخست); **नुख़ुस्तीं** (نخستیں) वि. (फ़ा.) पहिला; प्राथमिक.

नुजबा (نجبا) पु. ['अ. 'नजीब' (نجیب) चे अनेक.] कुलीन लोक.

नुज़हत (نزہت) स्त्री. ('अ.) (१) उत्तमता; निर्दोषता. (२) पावित्र्य. (३) समृद्धी. (४) प्रसन्नता; संतोष. **–कदः** (۴کدہ –) पु. **–गाह** (۴گاہ –) स्त्री. ('अ.+फ़ा.) सहलीची जागा; मनोरंजनस्थान; हिरवळ व झाडे असलेली जागा.

नुज़हत-ए-ख़ातिर (نزہت خاطر) स्त्री. ('अ.) चित्ताची प्रसन्नता.

नुजूम (نجوم) पु. ['अ. 'नज्म' (نجم) चे अनेक.] (१) तारे; उडगण. (२) ज्योतिषशास्त्र. **–दाँ** (داں –) वि. ('अ. + फ़ा.) ज्योतिषी; खगोलशास्त्रज्ञ.

नुजूमी (نجومی) वि. ('अ.) ज्योतिषी; खगोलशास्त्रज्ञ.

नुज़ूल (نزول) पु. ('अ.) (१) वरून खाली येणे; उतरणे. (२) थांबणे. (३) सरकारी जमीन. (४) मोतीबिंदू (डोळ्यांतील रोग).

नुज़ूल-ए-इज्लाल (نزول اجلال) पु. ('अ.) एखाद्या महान व्यक्तीचे पदार्पण.

नुज़ूल-ए-मा (نزول ما) पु. ('अ.) मोतीबिंदू (डोळ्यांतील).

नुज़ूल-ए-वह्यी (نزول وحی) पु. ('अ.) एखाद्या प्रेषिताला ईश्वरी आदेश प्राप्त होणे.

नुज़्ल (نزل) पु. ('अ.) आतिथ्य; पाहुणचार.

नुतुब (نتو) पु. ('अ.) मूळ जागेपासून सरकणे, हलणे.

नुतुब-ए-रहिम (نتو رحم) पु. ('अ.) गर्भाशय सरकणे.

नुतूल (نطول) पु. ('अ.) औषधे घालून उकळलेल्या पाण्याने शरीराचा एखादा अवयव धुणे.

नुत्क़ (نطق) पु. ('अ.) शब्द; वाणी; वाक्शक्ती.

नुत्फ़: (نطفہ) पु. ('अ.) (१) वीर्य; शुक्र. (२) संतती; पिढी.

नुत्फ़:-ए-नातह़क़ीक़ (نطفۂ نا تحقیق) पु. ('अ.+फ़ा.) ज्याच्या बापाचा पत्ता नाही असा; जारज; संकरज.

नुद्बः (ندبہ) पु. ('अ.) मृत व्यक्तीसाठी शोक, विलाप करणे.

नुद्रत (ندرت) स्त्री. ('अ.) नूतनता; नाविन्य; अद्भुतता.

नुफ़ूज (نفوذ) पु. ('अ.) (१) आत घुसणे; शिरणे. (२) जारी, लागू होणे.

नुफ़ूर (نفور) पु. ('अ.) (१) पळून जाणे. (२) घृणा, तिरस्कार करणे.

नुफ़ूस (نفوس) पु. ['अ. 'नफ़्स' (نفس) चे अनेक.] अनेक लोक; व्यक्ती.

नुफ़ूस-ए-क़ुद्सियः (نفوس قدسیہ) पु. ('अ.) पुण्यात्मे.

नुबुवत (نبوت) स्त्री. ('अ.) नबी (प्रेषित, पैगंबर) असणे; प्रेषितत्व.

नुब्लः (نبلہ) पु. ('अ.) ज्याने इस्तिंजा करतात ते ढेकूळ. ['इस्तिंजा' (استنجا) लघ्वीनंतर शेवटचे थेंब टिपणे].

नुमा (نما) प्रत्य. (फ़ा.) दाखविणारा. [उदा. 'रहनुमा' (رهنما) वि. (फ़ा.) मार्गदर्शक].

नुमा'इंदगी (نمائندگی) स्त्री. (फ़ा.) प्रतिनिधित्व.

नुमा'इंदः (نمائندہ) पु. (फ़ा.) प्रतिनिधी.

नुमा'इश (نمائش) स्त्री. (फ़ा.) (१) प्रदर्शन. (२) देखावा. (३) थाट; शृंगार; सजावट. **–गाह** (–گاہ) स्त्री. (फ़ा.) प्रदर्शन-स्थान.

नुमा'इशी (نمائشی) वि. (फ़ा.) (१) दिखाऊ; वरवरचा. (२) प्रदर्शनासंबंधी.

नुमा'ई (نمائی) स्त्री. (फ़ा.) अभिव्यक्ती; प्रदर्शन. [तू जाहीर करावेस].

नुमायाँ (نمایاں) वि. (फ़ा.) जाहीर; प्रकट; व्यक्त; स्पष्ट.

नुमू (نمو) स्त्री. ('अ.) उगवणे; वाढणे. **–दार** (–دار) वि. (फ़ा.) अविर्भूत; व्यक्त; जाहीर. (पु.) नायक; सरदार; अध्यक्ष.

नुमूद (نمود) स्त्री. ('अ.) (१) अभिव्यक्ती. (२) थाटमाट. (३) ख्याती. (४) अस्तित्व. (वि.) प्रकट; प्रकाशित.

नुमूनः (نمونہ) पु. (फ़ा.) (१) नमुना; वानगी (२) उदाहरण. (३) आकृती.

नुम्रूद (نمرود) पु. (फा.) इराणमधील एक भयंकर अत्याचारी राजा. हा स्वतः ईश्वर म्हणवून घेत असे. याने हजरत इब्राहीम यांना आगीत टाकले होते; पण अग्नीची फुले बनली.

नुवेद (نوید) स्त्री. (फ़ा.) (१) शुभ वर्तमान. (२) निमंत्रण; आमंत्रण.

नुशूर (نشور) पु. ('अ.) मृत व्यक्तींचे अंतिम निवाडघाच्या दिवशी पुनः जिवंत होणे.

नुश्तर्वार (نشتروار) स्त्री. (फ़ा.) खंत.

नुसुक (نسک) स्त्री. ['अ. 'नुस्क' (نسک) चे अनेक.] उपासना; प्रार्थना; बलिदाने.

नुसैरी (نصیری) पु. ('अ.) हजरत अली यांना देव मानणारा एक संप्रदाय.

नुस्क (نسک) स्त्री. ('अ.) (१) पूजा; आराधना. (२) बळी, बलिदान.

नुस्खः (نسخہ) पु. ('अ.) (१) पुस्तक (२) हस्तलिखित; पांडूलिपी. (३) वैद्य-डॉक्टर लिहून देतात ती औषध-योजना. (४) उपाय; युक्ती. (५) आवृत्ती.

नुस्रत (نصرت) स्त्री. ('अ.) (१) सहायता; मदत. (२) समर्थन; पाठींबा.

नुह (نہ) वि. (फ़ा.) नऊ (९).

नुहज़त (نہضت) स्त्री. ('अ.) प्रस्थान; प्रयाण. **–फ़र्मा** (–فرما) वि. ('अ. + फ़ा.) जाणारा; कूच करणारा.

नुहबत (نہبت) स्त्री. ('अ.) लुटालूट.

नुहाक़ (نہاق) पु. ('अ.) गाढवाचे ओरडणे.

नुहातः (نحاتہ) पु. ('अ.) गहू वगैरे धान्याचा कोंडा.

नुहास (نحاس) पु. ('अ.) तांबे; ताम्र.

नुह्रम (نہم) वि. (फ़ा.) नववा; नवम.

नुहूसत (نحوست) स्त्री. ('अ.) (१) दुर्भाग्य. (२) अशुभ; अमंगल.

नूँ (نوں); **नून** (نون) पु. ('अ.) (१) न (अक्षर). (२) मासळी; मासा.

नून-ए-ग़ुन्नः (نون غنہ) पु. ('अ.) अनुस्वार; अनुनासिक.

नूर (نور) पु. ('अ.) (१) तेज; प्रकाश; ज्योती. (२) सौंदर्य; शोभा; रूप. **–अफ़्ज़ा** (–افزا) वि. ('अ.+फ़ा.) प्रकाश वाढविणारा; तेजवर्धक. **–अफ़्शाँ** (–افشاں) वि. ('अ. + फ़ा.) **–पाश** (–پاش) वि. ('अ.) **–फ़िशाँ** (–فشاں) वि. ('अ.+फ़ा.) प्रकाश पसरविणारा. **–बाफ़** (–باف) वि. ('अ. + फ़ा.) कापड विणणारा; विणकर; कोष्टी.

नूर-ए-माह (نور ماہ) पु. ('अ. + फ़ा.) चंद्रप्रकाश; चांदणे.

नूर-ए-मुजल्लाँ (نور مجلی) पु. ('अ.) स्वच्छ प्रकाश.

नूर-ए-मुजस्सम (نور مجسم) पु. ('अ.) मूर्तिमंत प्रकाश.

नूरा (نورا); **नूरः** (نورہ) पु. ('अ.) केशनाशक औषध (चुना व हरताळ यांचे मिश्रण).

नूरानी (نورانی) वि. ('अ.) प्रकाशमान; उज्वल; तेजस्वी.

नूरी (نوری) वि. ('अ.) प्रकाशाशी संबंधित; तेजाचा. (पु.) (फ़ा.) (१) एक प्रकारचा तांबडा पोपट. (२) जर्दाळू.

नूरुन्'अलॉनूर (نورٌ علیٰ نور) वि. ('अ.) (१) प्रकाशावर प्रकाश; अत्यंत प्रकाशमान. (२) अत्यंत मंगल व शुभ.

नूर-उल्-'ऐन (نورالعین); **नूर'ऐन** (نورعین) पु. ('अ.) **नरचश्म** (نورچشم); **नूरदीदः** (نوردیدہ) पु. ('अ.+फ़ा.) (१) नेत्रज्योती. (२) पुत्र.

नूरजहाँ (نورجہاں) वि. ('अ. + फ़ा.) जगाला प्रकाशमान करणारा. (स्त्री.) जहांगीरची राणी नूरजहान. (पु.) जगाचा प्रकाश.

नूह् (نوح) पु. ('अ.) (१) एक पैगंबर. यांच्या काळी जलप्रलय झाला होता. त्यावेळी यांनी एका होडीत प्रत्येक प्राण्याचे एकेक जोडपे घेऊन ती होडी किनाऱ्याला लावली. त्यामुळे पुनः जगाची उभारणी होऊ शकली. यांना दुसरे आदम (आदिमानव) असेही म्हणतात. (२) विलाप करणारा.

ने'अम-उल्-बदल (نعم البدل) पु. ('अ.) एखाद्या हरवलेल्या अथवा खाल्लेल्या वस्तूच्या जागी हुबेहूब तसलीच वस्तू आणून ठेवणे.

ने'अमत (نعمت) स्त्री. ('अ.) (१) परमेश्वराने दिलेले धन, संपत्ती वगैरे. (२) देणगी. (३) उत्तमोत्तम वस्तू, पक्वान्न वगैरे. (४) चांगल्या गोष्टी. **–कदः** (کدہ –) पु.('अ.+फ़ा.) स्वर्ग. **–खानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) (१) जेथे खाण्यापिण्याचे सामान असते असे घर, खोली. (२) जाळीदार लाकडी पेटी. हिच्यात खाण्याचे पदार्थ ठेवले जातात. (३) थोरामोठ्यांचे भोजनघर.

ने'अमत-ए-'उज़्मा (نعمت عظمیٰ) स्त्री. ('अ.) फार मोठी देणगी.

नेक (نیک) वि. (फ़ा.) (१) उत्तम; श्रेष्ठ. (२) शुभ. (३) सदाचारी; चांगला. (४) पुण्यवान. (५) कुलीन; सज्जन. (६) दयाळू. **–अंजाम** (انجام –) वि. (फ़ा.) सुपरिणामी. **–अंदेश** (اندیش –) वि. (फ़ा.) शुभचिंतक. **–अख़्तर** (اختر –) वि. (फ़ा.) ज्याचे ग्रह चांगले आहेत असा; भाग्यवान. **–अख़्लाक़** (اخلاق –) वि. ('अ.) सुस्वभावी. **–'अमल** (عمل –); **–अ'अमाल** (اعمال –) वि. (फ़ा.+'अ.) सदाचरणी. **–क़दम** (قدم –) वि. (फ़ा. + 'अ.) चांगल्या पायाचा; सुलक्षणी. **–किर्दार** (کردار –) वि. (फ़ा.) सच्छील. **–ख़स्लत** (خصلت –) वि. (फ़ा. + 'अ.) **–ख़ू** (خو –) वि. (फ़ा.) सुस्वभावी. **–ख़्वाह** (خواہ –) वि. (फ़ा.) हितचिंतक. **–गुफ़्तार** (گفتار –) वि. (फ़ा.) मधुरभाषी. **–गुमान** (گمان –) वि. (फ़ा.) सदिच्छा बाळगणारा. **–तीनत** (طینت –) वि. (फ़ा.+'अ.) सत्प्रवृत्त. **–नाम** (نام –) वि. (फ़ा.) कीर्तिमान; पुण्यश्लोक. **–निहाद** (نہاد –) वि. (फ़ा.) सच्चरित्र. **–नीयत** (نیت –) वि. (फ़ा.+'अ.) धर्मात्मा; प्रामाणिक; धर्मनिष्ठ. **–फ़र्जाम** (فرجام –) वि. (फ़ा.) (१) पुण्यात्मा. (२) पाहा 'नेक अंजाम' **–फ़ाल** (فال –) वि. (फ़ा.) ज्याची भेट, दर्शन व चर्चा शुभ आहे असा. **–बख़्त** (بخت –) वि. (फ़ा.) (१) भाग्यवान. (२) साधाभोळा. **–बीं** (بیں –) वि. (फ़ा.) केवळ चांगले पाहाणारा. **–मंज़र** (منظر –) वि. (फ़ा.+'अ.) सुंदर; मोहक **–म'आश** (معاش –) वि. (फ़ा.+'अ.) सन्मार्गाने पैसा मिळविणारा ('बद म'आश' च्या उलट). **–मनिश** (منش –) वि. (फ़ा.) सज्जन. **–महज़र** (محضر –) वि. (फ़ा. + 'अ.) इतरांच्या समोर अथवा मागे त्यांच्याबद्दल चांगलेच बोलणारा. **–रविश** (روش –) वि. (फ़ा.) सदाचारी. **–राय** (راے –) वि. (फ़ा.) ज्याचे मत व सल्ला ही नेहमी योग्य असतात असा. **–सिरिश्त** (سرشت –) वि. (फ़ा.) **–सीरत** (سیرت –) वि. (फ़ा.+'अ.) सुस्वभावी; सत्प्रवृत्त.

नेकी (نیکی) स्त्री. (फ़ा.) (१) चांगुलपणा; भलाई; हित; उपकार. (२) प्रामाणिकपणा. [म्हण: **नेकी कर्दन व ब आब अंदाख़्तन** (نیکی کردن و بآب انداختن) भलाई करावी व पाण्यात टाकावी; फळाची आशा न धरता सत्कर्म करावे].

नेकू (نیکو) वि. (फ़ा.) (१) उत्तम. (२) शुभ. (३) सदाचारी. **–'ई** (ئی –) स्त्री. (फ़ा.) (१) चांगुलपणा. (२) सौंदर्य. **–कार** (کار –) वि. (फ़ा.) सदाचारी; पुण्यात्मा. **–ख़स्ा'इल** (خصائل –); **–शमा'इल** (شمائل –) वि. (फ़ा.+'अ.) सुस्वभावी; सत्प्रवृत्त.

नेफ़ः (نبض) पु. (फ़ा.) विजारीची नाडी घालण्याची पोकळ जागा; नाडपट्टी.

नेश (نیش) पु. (फ़ा.) (१) डंख; दंश. (२) डुकराचे सुळे. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) डंख मारणारा. **–दुम** (دم –) पु. (फ़ा.) विंचू.

नेस्त (نیست) वि. (फ़ा.) (१) नसलेला; जो नाही असा. (२) उध्वस्त; नष्ट.

नेस्त-ओ-नाबूद (نیست و نابود) वि. (फ़ा.) नष्ट; नेस्तनाबूद.

नेस्ती (نیستی) स्त्री. (फ़ा.) (१) विध्वंस; नाश. (२) दारिद्र्य. (३) नसणे. (४) दुर्दैव.

नै (نے) स्त्री. (फ़ा.) (१) बोरू. (२) बासरी; अलगूज.

नैचः (نیچہ) पु. (फ़ा.) हुक्क्याची नळी. (यातून धूर ओढतात).

नैजार (نے زار) पु. (फ़ा.) बोरूचे जंगल.

नैज़ः (نیزہ) पु. (फ़ा.) (१) भाला; बरची. (२) लेखणीचा बोरू. **–दार** (دار –); **–बरदार** (بردار –) वि. (फ़ा.) भालाईत; भाला घेऊन चालणारा. **–बाज़** (باز –) वि. (फ़ा.) भाला फेकण्यात तरवेज.

नैयिर (نیر) पु. ('अ.) (१) सूर्य; रवी. (२) तेजस्वी तारा.

नैयिर-ए-अ'ज़म (نیر اعظم) पु. ('अ.) सूर्य.

नैयिर-ए-अस़्सार (نیر اصغر) पु. ('अ.) चंद्र.

नैरंग (نیرنگ) पु. (फ़ा.) (१) जादूटोणा; नजरबंदी. (२) कपट; फसवणूक; माया. (३) अद्भुत गोष्ट. (४) चित्राची रूपरेखा; आराखडा; स्केच. **–बाज़** (باز –); **–साज़** (ساز –) वि. (फ़ा.) (१) जादूगार. (२) धूर्त; फसव्या.

नैरंग-ए-'आलम (نیرنگ عالم) पु. (फ़ा. + 'अ.) जगाचा चित्रविचित्रपणा.

नैरंगि-ए-ख़याल (نیرنگئ خیال) पु. (फ़ा. + 'अ.) विचार; भ्रम.

नैरंगि-ए-ज़मानः (نیرنگئ زمانہ) स्त्री. (फ़ा.) काल-चक्र; जगरहाटी.

नैरंगि-ए-रोज़गार (نیرنگئ روزگار) स्त्री. (फ़ा.) भाग्य-चक्र.

नैरंगी (نیرنگی) स्त्री. (फ़ा.) (१) जादुगिरी; माया; भ्रम. (२) कपट; फसवेगिरी. (३) मनाची चंचलता.

नैल (نیل) पु. ('अ.) प्राप्ती; मिळणे.

नैल-ए-मराम (نیل مرام) पु. ('अ.) मनोरथ पूर्ण होणे; ध्येय साध्य होणे.

नैशकर (نے شکر) पु. (फ़ा.) ऊस.

नैसाँ (نیساں) पु. (फ़ा.) फर्वरदीन (वैशाख) महिन्यातील पाऊस. या पावसाचा शिंपल्यांत पडलेला प्रत्येक थेंब मोती बनतो. (आपल्याकडील स्वाती नक्षत्रावरील पावसाप्रमाणे).

नोक (نوک) स्त्री. (फ़ा.) (१) टोक; अग्र. (२) नखरेलपणा; नटवेपणा. (३) फुशारकी. (४) थाट. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) टोकदार.

नोज़दह (نوزدہ) वि. (फ़ा.) एकोणीस (१९).

नोश (نوش) पु. (फ़ा.) (१) अमृत. (२) पेय (स्वादिष्ट). (३) पिणे; पान करणे. (प्रत्य.) पिणारा. [उदा. 'मय नोश' (مے نوش) वि. (फ़ा.) मद्यपान करणारा]. **–ख़ंद** (خند –) पु. (फ़ा.) मधुर हास्य. **–फ़रमाना** (فرمانا –) पिणे; पान करणे. **–दारू** (دارو –) स्त्री. (फ़ा.) (१) विष उतरविणारे औषध. (२) मद्य.

नोशादर (نوشادر) पु. (फ़ा.) नवसागर (एक क्षार).

नोशानोश (نوشا نوش) स्त्री. (फ़ा.) खूप पिणे व सतत पिणे.

नोशाब (نوشاب); **नोशाबः** (نوشابہ) पु. (फ़ा.) (१) अमृत. (२) मदिरा.

नोशिंदः (نوشندہ) वि. (फ़ा.) पिणारा.

नोशी (نوشیں) वि. (फ़ा.) स्वादिष्ट.

नोशी (نوشی) स्त्री. (फ़ा.) पिण्याची क्रिया; पिणे, पान.

नौ (نو) वि. (फ़ा.) (१) नवीन; नूतन. (२) ताजा; हिरवागार. **–'अरूस** (عروس –) वि. (फ़ा. + 'अ.) नवविवाहित. **–'अरूसान-ए-चमन** (عروسان چمن –) वि. (फ़ा. + 'अ.) बागेत लावलेली नवीन झाडे. **–'अरूसी** (عروسی –) स्त्री. (फ़ा. + 'अ.) नवीन विवाह. **–आ'ईन** (آئین –) वि. (फ़ा.) सुशोभित; शोभिवंत. **–आबाद** (آباد –) वि. (फ़ा.) (१) नवीन वसविलेला प्रदेश; वसाहत. (२) नुकतीच लागवडीखाली आणलेली जमीन. **–आबादियात** (آبادیات –) स्त्री. (फ़ा.) पाश्चात्य राष्ट्रांच्या ताब्यातील वसाहती. **–आबादी** (آبادی –) स्त्री. (फ़ा.) वसाहत. **–आमदः** (آمدہ –) वि. (फ़ा.) नुकताच आलेला. **–आमोज़** (آموز –) वि. (फ़ा.) (१) नवशिका. (२) कच्चा. **–'उम्र** (عمر –) वि. (फ़ा. + 'अ.) अल्पवयस्क; लहान (मुलगा, मुलगी). **–कर्दः कार** (کردہ کار –) वि. (फ़ा.) ज्याने नुकतेच एखादे काम केले आहे असा. **–कार** (کار –) वि. (फ़ा.) अलीकडला; नुकताच घडलेला. **–कीसः** (کیسہ –) वि. (फ़ा.) नुकताच श्रीमंत झालेला; घमेंडखोर. **–ख़त़** (خط –) वि. (फ़ा.) नुकतीच मिसरूड फुटलेला; युवक. **–ख़ास्तः** (خاستہ –); **–ख़ेज़** (خیز –) वि. (फ़ा.) (१) नुकताच उगवलेला. (२) नवयुवक. (३) अननुभवी. **–चः** (چہ –); **–जवाँ** (جواں –); **–जवान** (جوان –) वि. (फ़ा.) नवयुवक; तरुण. **–जवानी** (جوانی –) स्त्री. (फ़ा.) तारुण्य; नवयौवन. **–ज़ा'ईदः** (زائیدہ –) वि. (फ़ा.) नुकताच जन्मास आलेला; नवजात. **–दामाद** (داماد –) पु. (फ़ा.) वर; नवरा-मुलगा. **–दौलत** (دولت –) वि. (फ़ा. + 'अ.) नुकताच श्रीमंत बनलेला; आढ्यताखोर. **–नियाज़** (نیاز –) वि. (फ़ा.) (१) नवशिका. (२) नवीन प्रेमी. **–निहाल** (نہال –) वि. (फ़ा.) (१) नवे रोप. (२) नवीन बालक. (३) नवयुवक. **–ब.नौ** (بہ نو –) वि. (फ़ा.) नवा-नवा; ताजा.

–बर्ग (برگ –) वि. (फ़ा.) नवी पालवी. **–बर्दः** (بردہ –) वि. (फ़ा.+तु.) नुकताच विकत घेतलेला; दास. **–बहार** (بہار –) स्त्री. (फ़ा.) (१) वसंत ऋतू. (२) टवटवीत वस्तू. **–मश्क़** (مشق –) वि. (फ़ा.+'अ.) नवशिका; अडाणी. **–मीद** (میدہ –) वि. (फ़ा.) निराश. **–मीदानः** (میدانہ –) अव्य. (फ़ा.) निराश झाल्याप्रमाणे. **–मीदी** (میدی –) स्त्री. (फ़ा.) निराशा. **–मुस्लिम** (مسلم –) वि. (फ़ा.+'अ.) नुकताच बाटून मुसलमान झालेला; खानदानी मुसलमान नसलेला. **–रस** (رس –) वि. (फ़ा.) नुकतेच पिकलेले (फळ); नवीन. **–रुस्तः** (رستہ –) वि. (फ़ा.) नुकताच उगवलेला. **–रोज** (روز –) पु. (फ़ा.) वर्षाचा पहिला दिवस. इराणी लोकांचा वर्षारंभ-दिन. (फर्वरदीन; महिन्याची पहिली तारीख). **–रोज़ी** (روزی –) वि. (फ़ा.) वर्षारंभदिनाशी संबंधित. [उदा. 'जश्न-ए-नौरोज़ी' (جشن نوروزی) पु. (फ़ा.) वर्षारंभ उत्सव.] **–वारिद** (وارد –) वि. (फ़ा.+'अ.) नवीन आलेला; नवागत. **–सफ़र** (سفر –) वि. (फ़ा.+'अ.) प्रथमच प्रवास करणारा. **–सवार** (سوار –) वि. (फ़ा.) जो नुकताच घोडयावर बसण्यास शिकला आहे असा.

नौ'अ (نوع) स्त्री. ('अ.) (१) जाती; वर्ग. (२) प्रकार. (३) आकार-प्रकार; रंग-ढंग.

नौ'अ-ए-इन्सान (نوع انسان); **नौ'अ-ए-इन्सानी** (نوع انسانی) स्त्री. ('अ.) मानव जाती.

नौ'अ-ए-दिगर (نوع دگر) वि. ('अ.+फ़ा.) (१) दुसऱ्या प्रकारचा; बदललेला. (२) विकृत. (३) अस्ता-व्यस्त; विसकटलेला.

नौ'अियत (نوعیت) स्त्री. ('अ.) (१) प्रकार. (२) वैशिष्ट्य.

नौकर (نوکر) पु. (तु.) सेवक; चाकर; दास.

नौज (نوج) अव्य. (हिं.) असे न होवो; देव असे न करो (वा.).

नौज़ (نوز) अव्य. [फ़ा. 'हनोज़' (هنوز) चे संक्षिप्त.] अजून; अद्यापि.

नौबत (نوبت) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) पाळी; प्रसंग. (२) स्थिती; दशा. (३) नगारा; डंका. **–ख़ानः** (خانہ –) पु. ('अ. + फ़ा.) नगारखाना. **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) (१) नगारखाना. (२) तुरुंग. **–ज़न** (زن –); **–नवाज़** (نواز –) वि. ('अ. + फ़ा.) नौबत, नगारा वाजविणारा. **–ब.नौबत** (بہ نوبت –) अव्य. ('अ. + फ़ा.) पाळीपाळीने; क्रमाने.

नौम (نوم) पु. ('अ.) झोप; स्वप्न; निद्रा.

नौरः (نورہ) पु. ('अ.) भितीला लावण्याचा चुना.

नौशेरवाँ (نوشیرواں) पु. (फ़ा.) सासानी वंशातील एक इराणी बादशहा. हा इ. स. ५३१ मध्ये गादीवर आला होता. हजरत मुहम्मद पैगंबरही याच्याच काळातील होते. नौशेरवाँ हा न्यायीपणाबद्दल विशेष प्रख्यात आहे.

नौशः (نوشہ) पु. (फ़ा.) वर; नवरा.

नौह़ः (نوحہ) पु. ('अ.) (१) मृत्युशोक; विलाप. (२) उर्दूतील एक विशेष काव्यप्रकार. यामध्ये करबल्याच्या हुतात्म्यासंबंधी शोक व्यक्त केलेला असतो. **–ख़्वाँ** (خواں –); **–गर** (گر –) वि. ('अ.+फ़ा.) (१) विलाप करणारा. (२) शोककाव्य वाचणारा. **–ख़्वानी** (خوانی –); **–गरी** (گری –) स्त्री. ('अ. + फ़ा.) (१) विलाप करणे. (२) मोहरमच्या सभेत शोकगीते म्हणणे.

नौह़ः-ए-ग़म (نوحۂ غم) पु. ('अ.) **नौह़ः-ए-मातम** (نوحۂ ماتم) पु. ('अ.+फ़ा.) मृत्युशोक; विलाप.

पंज (پنج) वि. (फ़ा.) (१) पाच; पाचची संख्या. (२) सात वर्षांचा घोडा. **–अर्कान** (ارکان –) पु. (फ़ा.+'अ.) मुसलमानांची पाच धार्मिक कृत्ये किंवा कर्मे: –'कलिमः', 'नमाज', 'रोज़ः', 'ज़कात' व 'हज'. **–आयत** (آیت –) स्त्री. (फ़ा.+'अ.) कुराणातील पाच लहान लहान वाक्ये. ही वाक्ये मुख्यतः 'फ़ातिह़ः' मध्ये म्हटली जातात. **–गंज** (گنج –) पु. (फ़ा.) (१) पंचेंद्रिये. (२) पाच वेळची नमाज. **–गानः** (گانہ –) वि. (फ़ा.) (१) पाच प्रकारचा. (२) पाच सिद्धांत असलेला; पंचसूत्री. (३) पाच वेळची नमाज. **–गुश्त** (گشت –) पु. (फ़ा.) पाच बोटांसारखी पाने असणारा एक वृक्ष; पंजगुश्त. (सँभालू-हिं.). **–गूनः** (گونہ –) वि. (फ़ा.) पाचपट; पाच प्रकारचा. **–गोशः** (گوشہ –) वि. (फ़ा.) पंचकोनी; पाच बाजू असलेला. **–तन-ए-पाक** (تن پاک –) पु. (फ़ा.) पाच पवित्र आत्मे–हजरत मुहम्मद, हजरत अली, हजरत फातिमा व त्यांचे दोन पुत्र इमाम हसन व इमाम हुसैन. **–नौबत** (نوبت –) स्त्री. (फ़ा.+'अ.) (१) राजाच्या दारी पाच वेळा वाजणारी नौबत. (२) नौबतीबरोबर वाजविली जाणारी पाच वाद्ये. (३) पाच वेळची बांग. **–पा** (پا –); **–पायः** (پایہ –) पु. (फ़ा.) पाच पायांचा खेकडा. **–रोज़ः** (روزہ –) वि. (फ़ा.) पाच दिवसांचा; थोडया दिवसांचा. **–वक़्तः** (وقتی –) वि. (फ़ा.+'अ.) पाच वेळचा; पाच वेळची नमाज. **–शंबः** (شنبہ –) पु. (फ़ा.) गुरुवार. **–सालः** (سالہ –) वि. (फ़ा.) पाच वर्षांचा; पंचवार्षिक. **–सूरः** (سورہ –) स्त्री. (फ़ा. + 'अ.) कुराणातील पाच लहान 'सुरे'. हे 'फ़ातिह़ः' मध्ये म्हटले जातात. **–हज़ारी** (هزاری –) पु. (फ़ा.) मोगलांच्या कारकीर्दीतील एक मोठा हुद्दा; पाच हजार

सैनिकांवरील अधिकारी. **–हिस्स** (حس –) स्त्री. (फ़ा.+अ.) पंचेंद्रिये.

पंजर (پنجر) पु. [फ़ा. 'पंजरः' (پنجره) चे संक्षिप्त.] शरीराचा सांगाडा; अस्थिपंजर; हाडांचा सापळा.

पंजरः (پنجره) पु. (फ़ा.) (१) कोणतीही जाळीदार वस्तू. (२) पिंजरा. (३) खिडकी.

पंजाह (پنجاه) वि. (फ़ा.) पन्नास.

पंजाहुम (پنجاهم) वि. (फ़ा.) पन्नासावा.

पंजी (پنجی) स्त्री.(फ़ा.) पाच शाखा असलेली मशाल; पाच ज्योतींची दिवटी.

पंजुम (پنجم); **पंजुमीं** (پنجمیں) वि. (फ़ा.) पाचवा.

पंजः (پنجہ) पु. (फ़ा.) (१) हाताचा पंजा. (२) पाच वस्तूंचा समुदाय. (३) ताबा; कब्जा. (४) पक्ष्यांतील पंजा. (५) साह्य; मदत. **–कश** (کش –) वि. (फ़ा.) पंजाने रेटारेटी करणारा. **–कशी** (کشی –)स्त्री. (फ़ा.) पंजाने रेटारेटी करून सामर्थ्य अजमावणे. **–नुमा** (نما –) वि. (फ़ा.) पंजाच्या आकाराचा.

पंजः-ए-अल्मास (پنجۂ الماس) पु. (फ़ा.) हाताच्या पंजाच्या आकाराचे एक लोखंडी साधन. यात पंजा घालून पैलवान रेटारेटी करतात.

पंजः-ए-आफ़्ताब (پنجۂ آفتاب); **पंजः-ए-ख़ुर्शीद** (پنجۂ خورشید) पु. (फ़ा.) सूर्य व त्याचे किरण.

पंजः-ए-मरियम (پنجۂ مریم) पु.(फ़ा.+अ.) पंजाच्या आकाराची एक वनस्पती. हिची मूठ झाकलेली असते. ती पाण्यात टाकली असता मूठ उघडते. प्रसववेदना होत असलेली स्त्री. ही वनस्पती पाहात राहिल्यास तिच्या वेदना नाहीशा होतात व सुलभ प्रसूती होते.

पंद (پند) स्त्री. (फ़ा.) (१) हितोपदेश; सदुपदेश. (२) धडा; पाठ. (३) योग्य सल्ला. **–आमेज़** (آمیز –) वि. (फ़ा.) बोधपूर्ण; उपदेशपूर्ण. **–आमोज़** (آموز –); **–गर** (گر –); **–गो** (گو –) वि. (फ़ा.) उपदेश करणारा; उपदेशक. **–नामः** (نامہ –) पु. (फ़ा.) उपदेशपर पत्र; हितोपदेशकांचे पुस्तक. **–नियोश** (نیوش –) वि. (फ़ा.) उपदेश ऐकणारा, मानणारा.

पंदिदः (پندندہ) वि. (फ़ा.) उपदेश करणारा; उपदेशक.

पंबकी (پنبکی)वि.(फ़ा.)कापसापासून बनविलेला; सुती.

पंबः (پنبہ) पु. (फ़ा.) कापूस. **–दरगोश** (درگوش –); **–बगोश** (بگوش –) वि. (फ़ा.) ज्याने कानात कापसाचा बोळा घातलेला आहे असा; दुसऱ्यांचे न ऐकणारा. **–दहन** (دہن –); **–दहाँ** (دہاں –) वि. (फ़ा.) ज्याच्या तोंडात कापूस भरलेला आहे असा; मूक; गप्प. **–दानः** (دانہ–) पु. (फ़ा.) सरकी.

पंबः-ए-ज़ख़्म (پنبۂ زخم) पु. (फ़ा.) जखमेवर लावावयाचा कापूस; कापसाचा बोळा; फाया.

पंबः-ए-मीना (پنبۂ مینا) पु. (फ़ा.) मद्याच्या बाटलीवर बुचासारखा बसविलेला कापसाचा बोळा. (पूर्वी बुचाच्या जागी कापसाचा बोळा वापरला जात असे).

पंबनः (پنبہ) वि. (फ़ा.) लठ्ठ व बुटका (माणूस).

पक्ष (پخ) स्त्री. (फ़ा.) (१) अडथळा; विघ्न; अडचण. (२) दोष; उणीव. (३) कुत्र्या-मांजरांना हाकलण्याचा शब्द; शुक; हुडुत. (४) आरडाओरडा; गोंधळ. **–पक्ष** (پخ –) अव्य. (फ़ा.) वाहवा ! छान !

पक्षिया (پخیا) वि. (फ़ा. + हिं.) (१) भांडखोर; भांडकुदळ. (२) अडथळा आणणारा.

पलच (پلچ) वि. (फ़ा.) (१) कुटलेला. (२) पसरविलेला. (३) कोमेजलेला.

पश्तू (پشتو) स्त्री. (फ़ा.) 'पुश्तू' भाषा. पाहा 'पुख्तो' (शु.).

पश्तून (پشتون) वि. (फ़ा.) 'पुश्तू' भाषा बोलणारा; पठाण.

पश्तूनिस्तान (پشتونستان) पु. (फ़ा.) पुश्तू भाषा बोलणाऱ्या लोकांचा देश; पठाणांचा देश

पश्तः (پشتہ) पु. (फ़ा.) सरकी काढलेला कापूस; रुई.

पश्मान (پشمان) वि. (फ़ा.) उदास; खिन्न; दुःखी.

पश्लीचः (پشلیچہ); **पश्लूचः** (پشلوچہ) पु. (फ़ा.) गुदगुली. (काखेत हात घालून गुदगुल्या करणे).

पश्स (پشس) वि. (फ़ा.) (१) वितळलेला; द्रवलेला. (२) कोमेजलेला; खिन्न.

पश्सीदः (پشسیدہ) वि. (फ़ा.) खिन्न; दुःखी.

पग (پگ) पु. (फ़ा.) गोळी. (स्त्री.) वयात आलेली मुलगी.

पगाह (پگاہ); **पगः** (پگہ) स्त्री. (फ़ा.) सकाळ; प्रभात. **–तर** (تر –) स्त्री. (फ़ा.) पहाट.

पचवाक (پچواک); **पचवः** (پچوہ) पु. (फ़ा.) (१) अनुवाद; भाषांतर. (२) लिप्यंतर.

पज (پج) पु. (फ़ा.) पर्वत; डोंगर.

पज (پز) प्रत्य. (फ़ा.) भाजणारा. [उदा. 'खिश्त पज' (خشت پز) वि. (फ़ा.) विटा भांजणारा].

पजार (پجار) पु. (फ़ा.) पर्वत; डोंगर.

पज़ीर (پذیر) प्रत्य. (फ़ा.) कबूल करणारा; मान्य करणारा. [उदा. 'गुनाह पज़ीर' (گناہ پذیر) वि. (फ़ा.) गुन्हा कबूल करणारा].

पज़ीरा (پذیرا) वि.(फ़ा.) स्वीकृत; अंगीकृत; कबूल.

पज़ीरा'ई (پذیرائی) स्त्री. (फ़ा.) स्वीकृती; मंजुरी; कबुली.

पज़ीरः (پذیرہ) पु. (फ़ा.) मान्य करणे; स्वीकृती; कबुली देणे.

पतंग (پتنگ) पु. (फ़ा.) खिडकी; झरोका.

पतगीर (پتگیر) स्त्री. (फ़ा.) छिन्नी; टाकी.

पतर (پتر) पु. (फ़ा.) लोखंडी पत्रा.

पतीरः (پتیرہ) पु. (फ़ा.) गलिच्छ व निकृष्ट वस्तू.

पतील (پتیل) पु. (फ़ा.) दिव्याची वात.

पत्यारः (پتیارہ) पु. (फ़ा.) आपत्ती; विपत्ती; संकट.

पद (پد) पु. (फ़ा.) ज्याला फळे येत नाहीत असे झाड.

पदरख़्तः (پدرختہ) वि.(फ़ा.) दुःखी; उदासीन; खिन्न.

पदीद (پدید); **पदीदार** (پدیدار) वि. (फ़ा.) प्रकट; व्यक्त; जाहीर.

पद्रूद (پدرود) स्त्री.(फ़ा.) (१) निरोप घेणे; दूर जाणे. (२) त्याग.

पनाह (پناہ) स्त्री. (फ़ा.) (१) रक्षण; त्राण. (२)आसरा; आश्रय; आधार; शरण. (३)समर्थन; पाठींबा. (४) जीव वाचविणे. **–गाह** (–گاہ) स्त्री. (फ़ा.) आश्रयस्थान; शरणस्थान. **–बख़ुदा** (–بخدا) वा. (फ़ा.) ईश्वर रक्षण करो.

पनीर (پنیر) पु. (फ़ा.) (१) चक्का. (२) दह्याच्या चक्क्यात मीठ घालून बनविलेला एक पदार्थ. **–मायः** (–مایہ) पु. (फ़ा.) एक औषध. उंटाच्या किंवा बकऱ्याच्या नुकत्याच जन्मलेल्या पिलाला त्याच्या आईचे खूप दूध (चीक) पाजवून त्याला ठार मारतात व मग त्याचा आमाशय वाळवून त्यापासून हे औषध तयार करतात.

पन्दार (پندار) पु. (फ़ा.) (१) विचार; कल्पना. (२) अहंकार.

पयंबर (پیمبر) पु. (फ़ा.) प्रेषित; पैगंबर; संदेशवाहक; अवतार.

पय (پے) पु. (फ़ा.) (१) पाय; चरण; पाऊल. (२) वेळ; खेप; पाळी. **–दरपय** (–در پے); **–ब.पय** (–بہ پے) अव्य. (फ़ा.) वारंवार; सतत.

पयादः (پیادہ) पु. (फ़ा.) (१) पायी चालणारा. (२) प्यादा; पायदळ सैनिक. (३) शिपाई; पट्टेवाला. (४) पत्रवाहक; पोस्टमन. (५) बुद्धिबळातील प्यादे. **–पा** (५–) वि. (फ़ा.) पायी चालणारा.

पयापय (پیاپے) अव्य. (फ़ा.) वारंवार; सतत.

पयाम (پیام) पु. (फ़ा.) (१) बातमी; वृत्त. (२) संदेश. (३) लग्नाचे बोलणे. **–बर** (–بر); **–रसाँ** (–رساں) वि. (फ़ा.) बातमी घेऊन जाणारा; संदेशवाहक; प्रेषित; पैगंबर.

पयामी (پیامی) वि. पु. (फ़ा.) (१) संदेशवाहक; बातमी घेऊन जाणारा. (२) बातमीदार.

परंद (پرند) पु. (फ़ा.) (१) पक्षी. (२) तलवार. (३) कृत्तिका. (४) रेशमी कापड.

परंदः (پرندہ) पु. (फ़ा.) पक्षी.

पर (پر) पु. (फ़ा.) पंख; पीस. **–अफ़्गंदः** (–افگندہ) वि. (फ़ा.) ज्याचे पंख झडून गेले आहेत असा; असमर्थ; विवश. **–अफ़्शाँ** (–افشاں) वि. (फ़ा.) (१) पंख फडफडविणारा. (२) संसारीक सुखांचा त्याग करणारा. **–अफ़्शानी** (–افشانی) स्त्री. (फ़ा.) संसारीक सुखाचा त्याग; निवृत्ती. **–क़ाज़ः** (–قاز) पु. (फ़ा.) चित्रकाराचा कुंचला; ब्रश. **–दार** (–دار) वि.(फ़ा.) पंख असलेला; सपक्ष. **–दोख़्तः** (–دوختہ) वि. (फ़ा.) ज्याचे पंख शिवून टाकले आहेत असा; असहाय. **–पा** (५–) पु. (फ़ा.) पायावर पंख असलेले कबूतर. **–फ़िशाँ** (–فشاں); **–फ़िशानी** (–فشانی) पाहा 'परअफ़्शाँ'; 'परअफ़्शानी'. **–बंद** (–بند); **–बस्तः** (–بستہ) वि. (फ़ा.) ज्याचे पंख बांधले आहेत असा; निरुपाय झालेला; असहाय. **–बुरीदः** (–بریدہ) वि. (फ़ा.) ज्याचे पंख कापून टाकले आहेत असा. **–रेख़्तः** (–ریختہ) वि. (फ़ा.) ज्याचे पंख झडून गेले आहेत असा; असमर्थ **–वाज़** (–واز) स्त्री. (फ़ा.) उडणे; उड्डाण.

अपने मर्कज़ की तरफ़ मायल-ए-परवाज़ था हुस्न ।
भूलता ही नहीं 'आलम तेरी अंगड़ा'ई का ।।

–वानः (–وانہ) पु. (फ़ा.) (१) पतंग. (किडा). (२) भक्त; मुग्ध झालेला; आसक्त. **–वानःवार** (–وانہ وار) अव्य. (फ़ा.) पतंगासारखा (वेगाने व उत्साहाने). **–शिकस्तः** (–شکستہ) वि. (फ़ा.) ज्याचे पंख तुटले आहेत असा. **–सोख़्तः** (–سوختہ) वि. (फ़ा.) ज्याचे पंख होरपळले आहेत असा.

पर-ए-काह (پرکاہ) पु. (फ़ा.) गवताची काडी.

पर-ए-त़ा'ऊस (پرطاؤس) पु. (फ़ा.) मोरपंख; मयूरपंख.

पर-ए-हुमा (پرھما) पु. (फ़ा.) (१) कलगी; तुरा (पक्ष्याचा). (२) हुमा पक्ष्याचे पीस. या पक्ष्याची सावली ज्याच्यावर पडते तो राजा होतो, अशी समजूत आहे.

पर-ओ-बाल (پر و بال) पु. (फ़ा.) (१) पक्ष्यांचे पंख व पिसे. (२) बल; शक्ती; जोर; सामर्थ्य. (३) सहायता; मदत.

परन (پرن) स्त्री. (फ़ा.) कृत्तिका नक्षत्र.

परवानगी (پروانگی) स्त्री. (फ़ा.) आज्ञा; अनुमती.

परवानः (پروانہ) पु. (फ़ा.) परवानगी; आदेशपत्र; हुकुमनामा.

परस्त (پرست) प्रत्य. (फ़ा.) पूजक; धार्जिणा; पक्षपाती. [उदा. 'बुत परस्त' (بت پرست) वि.(फ़ा.) मूर्तिपूजक. 'मुस्लिम परस्त' (مسلم پرست) वि. ('अ.+फ़ा.) मुसलमान धार्जिणा].

परस्तार (پرستار) वि. (फ़ा.) पूजक; उपासक; भक्त; मोहित झालेला. **–ज़ादः** (زادہ –) पु. (फ़ा.) दासीपुत्र.

परस्तारी (پرستاری) स्त्री. (फ़ा.) पूजा; आराधना.

परस्तिदः (پرستندہ) वि. (फ़ा.) पूजक; आराधक.

परस्तिश (پرستش) स्त्री. (फ़ा.) (१) पूजा; आराधना. (२) अत्यधिक प्रेम. **–कदः** (کدہ –); **–ख़ानः** (خانہ –) पु. **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) पूजास्थान; उपासनागृह; प्रार्थनागृह.

परस्तीदः (پرستیدہ) वि. (फ़ा.) पूज्य; आराध्य.

परहेज़ (پرہیز) पु. (फ़ा.) (१) पथ्य; संयम. (२) निषिद्ध वस्तूंपासून दूर राहाणे. **–गार** (گار –) वि. (फ़ा.) पथ्याने राहाणारा; संयमी. **–गारी** (گاری –) स्त्री. (फ़ा.) इंद्रियनिग्रह; पथ्याने राहाणे.

परागंदगी (پراگندگی) स्त्री. (फ़ा.) अस्ताव्यस्तता; अव्यवस्थितपणा.

परागंदः (پراگندہ) वि. (फ़ा.) (१) अस्ताव्यस्त; विस्कटलेला. (२) उद्विग्न. (३) असंबद्ध. **–ख़ातिर** (خاطر –) वि. (फ़ा.) ज्याचे मन ठिकाणावर नाही असा; उद्विग्न. **–मू** (مو –) वि. (फ़ा.) ज्याचे केस विस्कटले आहेत असा. **–रोज़गार** (روزگار –) वि. (फ़ा.) काळ ज्याला अनुकूल नाही असा. **–हाल** (حال –) वि. (फ़ा.+'अ.) दुर्दशाग्रस्त.

परानिदः (پرانندہ) वि. (फ़ा.) उडणारा.

परानीदः (پرانیدہ) वि. (फ़ा.) उडविलेला.

परिंद (پرند); **परिंदः** (پرندہ) पु. (फ़ा.) पक्षी.

परिस्तान (پرستان) पु. (फ़ा.) पऱ्यांचा देश.

परी (پری) स्त्री. (फ़ा.) अप्सरा; सुंदर स्त्री. **–अंदाज़** (انداز –) वि. (फ़ा.) पऱ्यांसारखे हावभाव करणारा (री). **–अंदाम** (اندام –) वि. (फ़ा.) पऱ्यांसारखे सुंदर शरीर असणारा (री). **–'अिज़ार** (عذار –) वि. (फ़ा. + 'अ.) पऱ्यांसारखे गाल असणारा (री). **–क़ामत** (قامت –) वि. (फ़ा.+'अ.) पऱ्यांसारखे शरीर, आकार असणारा (री). **–ख़्वाँ** (خواں –) वि.(फ़ा.) (१) जादूगार. (२) मांत्रिक. **–चम** (چم –) वि. (फ़ा.) पऱ्यांप्रमाणे ठुमकत चालणारा (री). **–चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) अप्सरांसारखे डोळे असणारा (री). **–ज़दः** (زدہ –) वि.(फ़ा.) भुताने झपाटलेला. **–जमाल** (جمال –) वि. (फ़ा.+'अ.) अप्सरेसारखे सौंदर्य असणारा (री). **–ज़ाद** (زاد –); **–ज़ादः** (زادہ –) पु. (फ़ा.) अप्सरा-पुत्र. **–तल'अत** (طلعت –) पाहा 'परी जमाल'. **–तिम्सा़ल** (تمثال –) वि. (फ़ा.+'अ.) अप्सरामुखी. **–पैकर** (پیکر –) पाहा 'परी अंदाम'. **–फ़ाम** (فام –) वि. (फ़ा.) परीसारखा गोरा रंग असलेला (ली). **–रुख़** (رخ –); **–रुख़सार** (رخسار –); **–रू** (رو –) वि. (फ़ा.) पऱ्यांसारखे रूप असणारा (री). **–वश** (وش –) वि. (फ़ा.) परीसारखा. **–सीरत** (سیرت –) वि. (फ़ा.+'अ.) अप्सरेसारखा स्वभाव असलेला (ली). **–सूरत** (صورت –) वि.(फ़ा.+'अ.) पाहा 'परी रू'

परीदोश (پریدوش) स्त्री. (फ़ा.) परवाची रात्र (भूतकालीन).

परीदः (پریدہ) वि. (फ़ा.) उडालेला; उडून गेलेला. **–रंग** (رنگ –) वि. (फ़ा.) ज्याचा रंग उडून गेला आहे असा; फिकट.

परीरोज़ (پریروز) पु.(फ़ा.) परवाचा दिवस (मागील).

परीशां (پریشاں); **परीशान** (پریشان) वि. (फ़ा.) (१) विसकटलेला; अस्ताव्यस्त. (२) व्याकुळ; बेचैन. (३) दुःखी. (४) चिंतित; त्रस्त; जिकीरीस आलेला (५) चकित. (६) ध्वस्त. **–ख़ातिर** (خاطر –) वि. (फ़ा.+'अ.) व्यग्रचित्त; अन्यमनस्क. **–गो'ई** (گوئی –) स्त्री. (फ़ा.) निरर्थक; असंबद्ध बडबड; बकवा; प्रलाप. **–रोज़गार** (روزگار –) वि. (फ़ा.) दुर्दशाग्रस्त. **–रोज़ी** (روزی –) वि. (फ़ा.) उपजीविकेचे निश्चित साधन नसलेला; बेकार. **–हाल** (حال –) वि. (फ़ा.) दुर्दशाग्रस्त; दरिद्री.

परेशानी (پریشانی) स्त्री. (फ़ा.) (१) त्रास; जिकीर; दगदग. (२) काळजी.

आज हम अपनी परीशानि-ए-ख़ातिर उन से ।
कहने जाते तो हैं, पर देख'ए क्या कहते हैं ॥

पर्कार (پرکار) स्त्री.(फ़ा.) कंपास; वर्तुळ काढण्याचे यंत्र.

पर्कालः (پرکالہ) पु. (फ़ा.) (१) ठिणगी; स्फुल्लिंग. (२) अंश; हिस्सा.

पर्कालः-ए-आतश (پرکالۂ آتش) पु. (फ़ा.) (१) आगीची ठिणगी. (२) अत्यंत धूर्त व कावेबाज व्यक्ती.

पर्ख़ाश (پرخاش) स्त्री. (फ़ा.) वैर; शत्रुत्व; वैमनस्य; द्वेष.

पर्गनः (پرگنہ) पु. (फ़ा.) (१) परगणा; जिल्ह्याचा एक भाग; तालुका. (२) गाव; खेडे.

पर्गार (پرگار) स्त्री. (फ़ा.) कंपास. पाहा 'पर्कार' (दो. शु.).

पर्चम (پرچم) पु. (फ़ा.) (१) झेंडा; ध्वज. (२) ध्वजाचे कापड. (३) चवरी. (४) केसाची बट. **–कुशा'ई** (کشائی –) स्त्री. (फ़ा.) ध्वजारोहण; झेंडा फडकविणे.

पर्ची (پرچی) स्त्री. (फ़ा.) कुंपण (काट्यांचे किंवा लाकडाचे).

पर्चः (پرچہ) पु. (फ़ा.) (१) कागदाचा तुकडा. (२) चिठ्ठी. (३) वृत्तपत्र. (४) प्रश्नपत्र (पेपर). (५) पोलीस रिपोर्ट. **–नवीस** (نویس –) वि. (फ़ा.) (१) बातमीदार. (२) गुप्त अहवाल लिहिणारा.

पर्चः-ए-इम्तिहां (پرچۂ امتحان) पु. (फ़ा. + 'अ.) परीक्षेतील प्रश्नपत्र (पेपर).

पर्चः-ए-हिसाब (پرچۂ حساب) पु. (फ़ा. + 'अ.) (१) वहीतील हिशेबाची नक्कल. (२) परीक्षेतील गणिताचे प्रश्नपत्र (पेपर).

पर्ताब (پرتاب) पु. (फ़ा.) (१) बाण फेकलेल्या जागेपासून तो जाऊन पोचलेल्या जागेपर्यंतचे अंतर. (२) दूर जाणारा एक प्रकारचा बाण.

पर्ताबी (پرتابی) वि. (फ़ा.) तिरंदाज; धनुर्धर.

पर्तो (پرتو) पु. (फ़ा.) (१) प्रकाश; चमक; तेज. (२) प्रतिबिंब; पडछाया. (३) सावली; छाया.

पर्दक (پردک) पु. (फ़ा.) कोडे; उखाणा.

पर्दगी (پردگی) स्त्री. (फ़ा.) (१) पडद्यात राहाणारी नायिका. (२) द्वारपाल.

पर्दाख्त (پرداخت) स्त्री. (फ़ा.) (१) देखरेख; निगराणी. (२) संरक्षण; पालनपोषण.

पर्दाख्तः (پرداختہ) वि. (फ़ा.) (१) सजविलेला; शोभिवंत केलेला. (२) पाळलेला; पोसलेला.

पर्दाज (پرداز) पु. (फ़ा.) (१) सजावट; वेलबुट्टी. (२) शौर्य. (३) निमग्नता. (४) चित्रातील सूक्ष्म रेषा. (प्रत्य.) सजविणारा. [उदा. 'इन्शा परदाज' (انشاپرداز) वि. ('अ.+फ़ा.) लिखाण सजविणारा; लेखक].

पर्दाज्दः (پردازندہ) वि. (फ़ा.) सजविणारा.

पर्दः (پردہ) पु. (फ़ा.) (१) पडदा; आडोसा. (२) बुरखा. (३) गाणे. (४) परपुरुषांपासून स्त्रियांनी आपला चेहरा लपविणे. (५) रहस्य. (६) सतार वगैरे वाद्यांतील पडदा. (७) आडोसा करण्यासाठी उभारलेली भित. **–दर** (دار –) वि. (फ़ा.) (१) स्त्रीचा पडदा काढून टाकणारा. (२) दोष उघड करणारा; निंदक; छिद्रान्वेषी. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) (१) दोष लपविणारा. (२) द्वारपाल. **–नशी** (نشیں –); **–नशीन** (نشین –) वि. (फ़ा.) पडद्यात राहाणारी स्त्री. **–पोश** (پوش –) वि. (फ़ा.) इतरांच्या दोषांवर पांघरूण घालणारा. **–सरा** (سرا –) पु. स्त्री. (फ़ा.) (१) अंतःपुर; जनानखाना. (२) डेरा; तंबू.

पर्दः-ए-'अन्बी (پردۂ عنبی) पु. (फ़ा. + 'अ.) डोळ्याच्या सात पडद्यांपैकी एक.

पर्दः-ए-नामूस (پردۂ ناموس) पु. (फ़ा. + 'अ.) शील; सतीत्व; मर्यादा.

पर्दः-ए-बकारत (پردۂ بکارت) पु. (फ़ा. + 'अ.) स्त्रीच्या योनीवर असलेला पातळ पडदा. हा पडदा पहिल्या संभोगाच्या वेळी फाटून जातो; योनि-पटल.

पर्दः-ए-सीमी (پردۂ سیمیں) पु. (फ़ा.) रुपेरी पडदा (सिनेमाचा); रजतपट.

पर्ना (پرنا); **पर्नियां** (پرنیاں) पु. (फ़ा.) एक प्रकारचे चित्रित रेशमी कापड.

पर्मक (پرمک) स्त्री. (तु.) बोट; अंगुली.

पर्मला (پرملا) स्त्री. (फ़ा.) पाणकोंबडा.

परी (پراں) वि. (फ़ा.) उडत असलेला.

परः (پر) पु. (फ़ा.) (१) सैन्याची ओळ. (२) गवताचे पाते, काडी. (३) किनारा.

पर्वज (پروز) स्त्री. (फ़ा.) सदरा वगैरच्या कडेला काढण्यात येणारी वेलबुट्टी.

पर्वर (پرور) प्रत्य. (फ़ा.) पालनपोषण, संरक्षण करणारा. [उदा. 'ग़रीब पर्वर' (غریب پرور) वि. ('अ.+फ़ा.) गरीबांचा वाली].

पर्वरिदः (پرورندہ) वि. (फ़ा.) पालनपोषण करणारा.

पर्वरिश (پرورش) स्त्री. (फ़ा.) (१) पालनपोषण. (२) कृपा; दया. (३) सहायता; मदत. **–ख़ानः** (خانہ –) पु. **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) लहान मुलांचे पालनपोषण जेथे केले जाते असे स्थान. **–याफ़्तः** (یافتہ –) वि. (फ़ा.) पाळलेला; पालनपोषण केलेला.

पर्वर्द (پرورد); **पर्वर्दः** (پروردہ) वि. (फ़ा.) पाळलेला; सेवक. (प्रत्य.) सुरक्षित ठेवलेला. [उदा. 'बर्फ पर्वर्दः' (برف پروردہ) वि. (फ़ा.) बर्फात घालून सुरक्षित ठेवलेला].

पर्वर्दिगार (پروردگار) पु. (फ़ा.) जगत्पालक; परमेश्वर; खुदा.

पर्वा (پروا) स्त्री. (फ़ा.) (१) चिंता; काळजी; फिकीर; पर्वा. (२) लक्ष; ध्यान. (३) भीती. (४) इच्छा.

पर्वाज (پرواز) स्त्री. (फ़ा.) उड्डाण; उडणे. (प्रत्य.) उडणारा. [उदा. 'बलंद पर्वाज' (بلند پرواز) वि. (फ़ा.) उंच उडणारा].

पर्वानक (پروانک) पु. (फ़ा.) वाघाच्या किंवा सिंहाच्या पुढे चालणारा तरसासारखा एक प्राणी.

पर्वानगी (پروانگی) स्त्री. (फ़ा.) परवानगी; आज्ञा; अनुमती.

पर्वानः (پروانہ) पु. (फ़ा.) (१) पतंग (किडा); शलभ. (२) परवानगी; आदेशपत्र; फर्मान. (३) पाहा 'पर्वानक'. (वि.) मोहित झालेला; फिदा झालेला.

पर्वानः-ए-राहदारी (پروانۂ راهداری) पु. (फ़ा.) पारपत्र; पासपोर्ट.

पर्वार (پروار) पु. (फ़ा.) जमिनीखाली बांधलेले घर; तळघर. यात खास जनावरे ठेवून ती चांगली धष्टपुष्ट केली जातात.

पर्वारी (پرواری) वि. (फ़ा.) 'पर्वार' मध्ये ठेवून चांगला धष्टपुष्ट बनविलेला (पशू).

पर्वारः (پروارہ) पु. (फ़ा.) (१) टेकू; आधार. (२) झरोका.

पर्वी* (پروین); **पर्वीन** (پروین) स्त्री. (फ़ा.) (१) कृत्तिका (नक्षत्र). (२) झुपका; गुच्छ.

पर्वीज (پرویز) वि. (फ़ा.) विजयी. (पु.) (१) मासळी. (२) चाळण. (३) नौशेरवाँचा नातू व शीरीनचा प्रियकर. **–न** (ن–) स्त्री. (फ़ा.) चाळण.

पर्सुम (پرسم) पु. (फ़ा.) पिठी (पोळया लाटताना लागणारी).

पलंग (پلنگ) पु. (फ़ा.) डहाण्या वाघ; बिब्या वाघ; चित्ता.

पलक (پلک) स्त्री. (फ़ा.) पापणी; नयनपट.

पलश्त (پلشت) वि. (फ़ा.) (१) मलिन; घाणेरडा. (२) अपवित्र.

पलारक (پلارک) पु. (फ़ा.) (१) उत्कृष्ट पोलाद, लोखंड. (२) तलवार; तलवारीचे पाणी.

पलाव (پلاو) पु. (फ़ा.) पुलाव; पुलावा (मसाल्याचा भात).

पलास (پلاس) पु. (फ़ा.) (१) पळस. (२) तरट; जाड व खरखरीत कापड.

पलीतः (پلیتہ) पु. (फ़ा.) (१) दिव्याची वात. (२) पलिता; टेंभा. (३) भूतबाधा दूर करण्यासाठी जाळली जाणारी वात.

पलीद (پلید) वि. (फ़ा.) (१) अपवित्र. (२) गलिच्छ; घाणेरडा. (३) दुष्ट; नीच.

पलः (پلہ) पु. (फ़ा.) पळस; पलाश.

पल्खम (پلخم) पु. (फ़ा.) गोफण.

पल्लः (پلہ) पु. (फ़ा.) (१) तराजूचे पारडे. (२) पदर. (३) पद; पदवी. (४) आधार; आश्रय. (५) शिडीचा दांडा.

पश् (پژ) पु. (फ़ा.) पू; मैला; घाण. (वि.) जीर्ण; जुनाट. **–मान** (مان –); **–मुर्दगी** (مردگی–) स्त्री. (फ़ा.) खिन्नता; उदासीनता. **–मुर्दः** (مردہ –) वि. (फ़ा.) खिन्न; उदासीन; कोमेजलेला **–मुर्दः खातिर** (مردہ خاطر –) वि. (फ़ा.) खिन्न-मनस्क; उदास. **–मुर्दःरू** (مردہ رو –) वि. (फ़ा.) ज्याचा चेहरा उतरला आहे असा.

पश़ावः (پژاوہ) पु. (फ़ा.) कुंभाराचा आवा; विटा किंवा चुनखडी भाजण्याची भट्टी.

पशीज (پشیز) पु. (फ़ा.) (१) पैसा; तांब्याचे नाणे. (२) तांब्याचा कण.

पशेमाँ (پشیماں); **पशेमान** (پشیمان) वि. (फ़ा.) (१) लज्जित; शरमिंदा. (२) पश्चात्ताप करणारा.

पशेमानी (پشیمانی) स्त्री. (फ़ा.) (१) लज्जा. (२) पश्चात्ताप.

पश़ोह (پژوہ) प्रत्य. (फ़ा.) शोधणारा. [उदा. 'हक़ पशोह' (حق پژوہ) वि. ('अ.+फ़ा.) सत्यशोधक; ईश्वराचा शोध घेणारा].

पश़ोहिदः (پژوهندہ) वि. (फ़ा.) (१) शोधणारा; धुंडणारा. (२) जिज्ञासू.

पश़ोहिदः (پژوهیدہ) वि. (फ़ा.) शोधलेला; धुंडलेला.

पश़ोहिश (پژوهش) स्त्री. (फ़ा.) (१) शोध; तपास. (२) जिज्ञासा.

पश्म (پشم) स्त्री. (फ़ा.) (१) लोकर; केस. (२) ओटीपोटाच्या खालच्या बाजूचे केस; शब्य. (३) तुच्छ वस्तू; नीच व्यक्ती. **–दीं*** (دیں –) वि. (फ़ा.) एक शिवी. **–पर मारना** (پر مارنا –); **–समझना** (سمجھنا –) मुळीच पर्वा न करणे.

पश्माक़ (پشماق) पु. (फ़ा.) घोडा; अश्व.

पश्मी* (پشمیں) वि. (फ़ा.) लोकरीचा.

पश्मीनः (پشمینہ) पु. (फ़ा.) अत्यंत उची व मऊ लोकरीचे कापड. (या प्रकारच्या कापडाच्या शाली मुख्यतः काश्मीरमध्ये तयार होतात).

पश्शः (پشہ) पु. (फ़ा.) डास; मच्छर. **–खानः** (خانہ –) पु. (फ़ा.) मच्छरदाणी.

पसंद (پسند) वि. (फ़ा.) आवडता; पसंत. (स्त्री.) (१) पसंती; आवड. (२) इच्छा. (३) स्वीकृती.

(प्रत्य.) (१) पसंत करणारा. [उदा. 'हक़ पसंद' (حق پسند) वि. ('अ.+फ़ा.) सत्य पसंत करणारा]. (२) पसंतीचा; आवडणारा. [उदा. 'दिल पसंद' (دل پسند) वि. (फ़ा.) मनपसंत; मनाला आवडणारा].

पसंदाज (پس انداز) वि. (फ़ा.) (१) खर्च केल्यानंतर उरणारे (धन); बचत. (२) काटकसरी.

पसंदाजी (پس اندازی) स्त्री. (फ़ा.) बचत; काटकसर.

पसंदीदगी (پسندیدگی) स्त्री. (फ़ा.) पसंती; रुची; आवड.

पसंदीदः (پسندیدہ) वि. (फ़ा.) पसंत केलेला; निवडलेला; मनपसंत.

पसंदः (پسندہ) पु. (फ़ा.) भाजून किंवा तळून खाल्ले जाणारे मांसाचे पातळ तुकडे.

पस (پس) अव्य. (फ़ा.) (१) नंतर; मागून. (२) अखेर. (३) म्हणून. (४) पुनः. (वि.) मागील; पाठीमागचा. **–अंदाज** (انداز –); **–अंदाजी** (اندازی –) पाहा 'पसंदाज', 'पसंदाजी'. **–अंदेश** (اندیش –) वि. (फ़ा.) केवळ मागे पाहाणारा; पुढचा विचार न करणारा; संकुचित दृष्टीचा. **–आवर्दः** (آوردہ –) पु. (फ़ा.) स्त्रीच्या पहिल्या पतीचा मुलगा. **–आहंग** (آہنگ –) पु. (फ़ा.) सैन्याचा मागील भाग; पिछाडी. **–ख़ुर्दः** (خوردہ –) वि. (फ़ा.) मागे उरलेले; उष्टे; उच्छिष्ट. **–पा** (پا –) वि. (फ़ा.) लढाईत मागे पाय घेतलेला; पराभूत. **–ए-फ़र्दा** (فردا –) पु. (फ़ा.) परवाचा दिवस; उद्याच्या नंतरचा दिवस. **–मांदगी** (ماندگی –) स्त्री. (फ़ा.) (१) प्रवासात मागे राहाणे. (२) दीनता; लाचारी. **–मांदः** (ماندہ –) वि. (फ़ा.) (१) उरलेला; वाचलेला. (२) वारस; उत्तराधिकारी. (३) प्रवासात मागे राहिलेला. **–रवी** (روی –) स्त्री. (फ़ा.) अनुसरण; अनुकरण. **–रौ** (رو –) वि. (फ़ा.) मागून चालणारा; अनुयायी.

पस-ए-पर्दः (پس پردہ) अव्य. (फ़ा.) पडद्याआड; मागील बाजूस.

आगया कौन है पस-ए-पर्दः।
नूर से झिलमिलाती है चिलमन ॥

पस-ए-पुश्त (پس پشت) अव्य. (फ़ा.) पाठीमागे; अनुपस्थितीत; पाठीशी.

पस-ए-मर्ग (پس مرگ); **पस-ए-मुर्दन** (پس مردن) अव्य. (फ़ा.) मेल्यानंतर.

पस-ओ-पेश (پس و پیش) पु. (फ़ा.) (१) मागेपुढे होणे; बुचकळा; घालमेल. (२) चिंता; काळजी.

पसीं (پسیں) वि. (फ़ा.) (१) अंतिम; अखेरचा. (२) मागील; नंतरचा.

पसेज (پسیج) पु. (फ़ा.) (१) संकल्प; इरादा. (२) तत्परता; तयारी.

पस्त (پست) वि. (फ़ा.) (१) खालचा; सखलातील. (२) अधम; नीच. (३) लहान; लघु; ह्रस्व. (४) निरुत्साही; पराभूत. **–अंदेश** (اندیش –) वि. (फ़ा.) (१) मंदबुद्धी. (२) संकुचित वृत्तीचा. **–क** (ک –) वि. (फ़ा.) (१) फार खालचा. (२) अत्यंत नीच. **–क़द** (قد –) वि. (फ़ा.) **–क़ामत** (قامت –) वि. (फ़ा. + 'अ.) बुटका; ठेंगणा. **–हिम्मत** (همت –); **–हौसलः** (حوصلہ –) वि. (फ़ा.+'अ.) (१) भित्रा; भ्याड. (२) उत्साहहीन.

पस्त-ओ-बलंद (پست و بلند) पु. (फ़ा.) सुख-दुःख; बरे-वाईट; उन्नती-अवनती.

पस्ती (پستی) स्त्री. (फ़ा.) (१) सखलपणा; खोलगटपणा. (२) नीचता. (३) भ्याडपणा.

पस्तः (پستہ) वि. (फ़ा.) लहान; ह्रस्व; लघु. **–क़द** (قد –) वि. (फ़ा.) ठेंगणा.

पह (پہ) अव्य. (फ़ा.) वाहवा! छान!

पहन (پہن) वि. (फ़ा.) (१) लांब-रुंद; विस्तृत. (२) महान. **–चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) निर्लज्ज.

पहनक (پہنک) पु. (फ़ा.) फीत.

पहना (پہنا) वि. (फ़ा.) विस्तृत; लांब-रुंद.

पहना'ई (پہنائی) स्त्री. (फ़ा.) विस्तार; लांबी-रुंदी.

पहलवान (پہلوان) पु. वि. (फ़ा.) (१) मल्ल. (२) शक्तिशाली. (३) घट्टाकट्टा; लठ्ठ.

पहलवी (پہلوی) स्त्री. (फ़ा.) इराणची एक प्राचीन भाषा.

पहलू (پہلو) पु. (फ़ा.) (१) अंग; बाजू; पैलू. (२) कूस; बगल. (३) दृष्टिकोन; दिशा. (४) पद्धती. (५) युक्ती. (६) निकटता. (७) संकेत. **–तिही** (تہی –) स्त्री. (फ़ा.) उपेक्षा; दुर्लक्ष; दूर राहाणे. **–नशीं** (نشیں –) वि. (फ़ा.) (१) जवळ वसणारा. (२) सार्थी; सभासद.

पांज़दः (پانزدہ) वि. (फ़ा.) पंधरा.

पा (پا). पु. (फ़ा.) पाय; पद; चरण. (प्रत्य.) टिकणारा; राहाणारा. [उदा. 'देर पा' (دیرپا) वि. (फ़ा.) अधिक काळ टिकणारा; मजबूत; टिकाऊ]. **–अंदाज** (انداز –) पु. (फ़ा.) पायपुसणे; पायपुसे; पाय पुसण्यासाठी दाराशी ठेवलेली काथ्याची जाड गादी किंवा तरट. **–अफ़ाज** (افراز –) पु. (फ़ा.) पादत्राण; पायताण. **–अफ़्शार** (افشار –) पु. (फ़ा.) खडावा **–'अलमदारां** (علم خواں –) वि. (फ़ा.) मोहरमच्या दिवसांत झेंड्याखाली उभा राहून करवल्यांचा

शोकगीते गाणारा. **-उफ्तादः** (-اُفتادہ) वि. (फ़ा.) (१) खाली पडलेला; पतित. (२) दीन; दुःखी. **-कोब** (-کوب) वि. (फ़ा.) नर्तक; नर्तकी. **-खानः** (-خانہ) पु. (फ़ा.) (१) पायखाना; शौचकूप; संडास. (२) विष्ठा. **-गाह** (-گاہ) स्त्री. (फ़ा.) पागा; अश्वशाला. **-गिरिफ्तः** (-گرفتہ) वि. (फ़ा.) पाय बांधलेला; चालू न शकणारा; स्थावर. **-गुंदः** (-غندہ) पु. (फ़ा.) पिंजलेला कापूस. **-गुर** (-غر) पु. (फ़ा. + अ.) पाय सुजण्याचा एक रोग; हत्तीरोग. **-गोश** (-غوش) पु (फ़ा.) वुडी; गोता. **-चंग** (-چنگ) पु. (फ़ा.) १) पादत्राण. (२) खिडकी. **-चाल** (-چال); **-चाह** (-چاہ) पु. (फ़ा.) मागाचा खड्डा. कपडा विणताना या खड्ड्यात विणकर आपले पाय लोंबकळत ठेवतो. **-चिलः** (-چلہ) पु. (फ़ा.) बर्फावरून चालताना वापरावयाचा जोडा. **-चुनार** (-چنار) पु. (फ़ा.) इराणमधील एक शहर. येथील लोक अत्यंत दुराचारी असतात असे समजले जात असे. **-ज़ंग** (-زنگ) पु. (फ़ा.) (१) जोडा. (२) खिडकी. **-ज़ाज** (-زاج) स्त्री. (फ़ा.) दाई; सुईण. **-जामः** (-جامہ) पु. (फ़ा.) विजार; पायजमा. **-ज़ेब** (-زیب) स्त्री. (फ़ा.) पायांना शोभा देणारा दागिना; नूपुर; पजण. **-ताबः** (-تابہ) पु. (फ़ा.) जोड्याच्या किंवा बुटाच्या आतील तळवा. **-तुराब** (-تراب) पु. (फ़ा.) प्रस्थान काढून ठेवणे; प्रवासाचा मुहूर्त साधण्यासाठी आपले स्थान सोडून थोड्या अंतरावर जाणे. **-दंग** (-دنگ) स्त्री. (फ़ा.) धान्य कांडण्याची ढेकी, कांडणी. **-दर हवा** (-در ہوا) वि. (फ़ा.) निराधार; काल्पनिक. **-दस्त** (-دست) पु. (फ़ा.) हातउसने; उधार. **-दाश** (-داش) स्त्री. (फ़ा.) (१) प्रतिकार; बदला; सूड. (२) शिक्षा; फळ (वाईट कर्मांचे). **-पियादः** (-پیادہ) वि. (फ़ा.) पायी चालणारा; पदयात्री. **-पोश** (-پوش) स्त्री. (फ़ा.) वहाण; पादत्राण. **-पोशकार** (-پوش کار) वि. (फ़ा.) चांभार. **-बंद** (-بند) वि. (फ़ा.) (१) बंदी; पकडलेला. (२) नियमांचे व वेळेचे पालन करणारा; वचनबद्ध. (३) विवश; नाइलाज असलेला. **-बंदी** (-بندی) स्त्री. (फ़ा.) (१) बंधन; अडथळा. (२) वचनबद्धता; नियमबद्धता. (३) नाइलाज. **-ब.गिल** (-بہ گل) वि. (फ़ा.) चिखलात रुतलेला; किंकर्तव्य; विमूढ. **-ब.ज़ंजीर** (-بہ زنجیر); **-ब.जूलाँ** (-بہ جولاں) वि. (फ़ा.) पायांत बेडया पडलेला; कैदी; असहाय. **-बरजा** (-برجا) वि. (फ़ा.) एका जागी पाय रोवून उभा असलेला; दृढनिश्चयी. **-बरहनः** (-برہنہ) वि. (फ़ा.) (१) अनवाणी; पायात पादत्राणे नसलेला. (२) एक वर्षापूर्वीचा. **-ब.रिकाब** (-بہ رکاب) वि. (फ़ा.) (१) रिकिबीत पाय घातलेला; जाण्यास तयार झालेला; सन्नद्धश्चर. (२) मरणासन्न. **-बस्त** (-بست) वि. (फ़ा.) (१) दृढ; मजबूत. (२) पाया. (३) बंदी; कैदी. (४) प्रतीक्षक. **-बस्तः** (-بستہ) वि. (फ़ा.) पाय बांधलेला; गिरफदार. **-बिरंजन** (-برنجن) स्त्री. (फ़ा.) पैजण; नूपुर. **-बोस** (-بوس) वि. (फ़ा.) पायाचे चुंबन घेणारा; खुशामतखोर. **-बोसी** (-بوسی) स्त्री. (फ़ा.) पदचुंबन; खुशामत. **-मर्द** (-مرد) वि. (फ़ा.) (१) सहायक; मदतगार. (२) धाडसी. (३) उत्साही. (४) शूर; बहादूर. **-मर्दी** (-مردی) स्त्री. (फ़ा.) (१) साह्य. (२) उत्साह. (३) शौर्य; हिम्मत. **-माल** (-مال) वि. (फ़ा.) पायदळी तुडविलेला; पददलित; उच्वस्त. **-मोज** (-موز) पु. (फ़ा.) ज्याचे पाय पिसांनी मोज्याप्रमाणे झाकून गेले आहेत असे कबुतर किंवा कोंबडा वगैरे. **-रोब** (-روب) स्त्री. (फ़ा.) (१) घोड्याच्या खुरांना लागलेली लीद वगैरे काढून टाकण्याचे फावडे. (२) वल्हे. **-लग़ज** (-لغز) पु. (फ़ा.) (१) निसरडे; पाय घसरणे. (२) पाप; गुन्हा. **-वर्क़** (-ورق) पु. (फ़ा.+अ.) पुस्तकाच्या पानाच्या शेवटी लिहिलेला पुढील पानाच्या सुरुवातीस येणारा शब्द. (पूर्वी जेव्हा पुस्तकाच्या पानावर पृष्ठसंख्या लिहिली जात नसे तेव्हा संदर्भ कळण्यासाठी ही पद्धती वापरली जात असे.) **-शिकस्तः** (-شکستہ) वि. (फ़ा.) ज्याचे पाय मोडले आहेत असा; विवश; असमर्थ. **-सब्ज़** (-سبز) वि. (फ़ा.) (१) पांढऱ्या पायाचा; अशुभ. (२) दलाल.

पा-ए-काश्त (پائے کاشت) पु. (फ़ा.) दुसऱ्या गावची जमीन करणारा शेतकरी.

पा-ए-कुलाग़ (پائے کلاغ) पु. (फ़ा.) (१) लेखणी. (२) वाईट अक्षर; कुत्र्या-मांजराचे पाय.

पा-ए-गाह (پائے گاہ) स्त्री. (फ़ा.) (१)पागा; तबेला (२) श्रीमंताची देवडी.

पा-ए-तख़्त (پائے تخت) पु. (फ़ा.) राजधानी; शासन केंद्र.

पा-ए-तर्सा (پائے ترسا) पु. (फ़ा.) मद्यचषक; मदिरेचा प्याला.

पा-ए-तोग़ (پائے توغ) पु. (तु.) सैन्यापुढे झेंडा घेऊन चालणाऱ्याचे पद किंवा हुद्दा.

पा-ए-दान (پائے دان) पु. (फ़ा.) (१) पादत्राणे ठेवण्याची जागा. (२) गाडीत चढताना पाय ठेवण्याची जागा; फूटबोर्ड.

पा-ए-रंज (پائے رنج) पु. (फ़ा.) राजदूत, पत्रवाहक अथवा अतिथी यांना निरोप देताना द्यावयाची भेट किंवा देणगी.

पा'इंदगी (پائندگی) स्त्री. (फ़ा.) नित्यता; स्थायित्व.

पा'इंदः (پائنده) वि. (फ़ा.) चिरंजीव; अनश्वर; स्थायी; चिरकाल टिकणारा. **–बाद** (باد –) वा. (फ़ा.) चिरंजीव होवो; अमर हो; चिरायू होवो.

पा'ईं (پائیں) वि. [फ़ा. 'पा'ईन' (پائین) चे संक्षिप्त.] शेवटचा; खालचा. **–कोह** (کوہ –) पु. (फ़ा.) डोंगराचा पायथा. **–परस्ती** (پرستی –) स्त्री. (फ़ा.) दासता. **–बाग़** (باغ –) पु. (फ़ा.) घराभोवतीची बाग.

पा'ईज़ (پائیز) पु. (फ़ा.) पानगळ ऋतू; शिशिर.

पा'ईदः (پائیده) वि. (फ़ा.) दृढ; स्थिर; मजबूत.

पा'ईन (پائین) वि. (फ़ा.) मागील; खालचा; शेवटचा. (स्त्री.) पायथा; पायाकडील भाग (अंथरुणाचा).

पा'एचः (پائچہ) पु. (फ़ा.) विजारीचा खालचा भाग, पाय.

पा'एजामः (پائجامہ) पु. (फ़ा.) पायजमा; विजार.

पा'एदार (پائدار) वि. (फ़ा.) (१) दृढ; मजबूत. (२) स्थिर; अचल.

पा'एमाल (پائمال) वि. (फ़ा.) (१) पददलित; पायदळी तुडविलेला. (२) दुर्दशाग्रस्त.

पाक (پاک) वि. (फ़ा.) (१) पवित्र; शुद्ध. (२) निर्मळ; स्वच्छ; निर्दोष. (३) निर्लिप्त. (४) सुरक्षित. (५) ज्याच्यावर कोणाचे कर्ज नाही असा. **–ज़ाद** (زاد –) वि. (फ़ा.) **–तीनत** (طینت –) वि. (फ़ा.+'अ.) शुद्धात्मा; पवित्र. **–दामन** (دامن –) वि. (फ़ा.) (१) सदाचारी; सच्छील. (२) पतिव्रता; साध्वी. **–बाज़** (باز –) वि. (फ़ा.) सदाचरणी. **–रू** (رو –) वि. (फ़ा.) सुस्वरूप; सुंदर. **–सिरिश्त** (سرشت –) वि. (फ़ा.) सत्प्रवृत्त.

पाकार (پاکار) पु. (फ़ा.) (१) सेवक; नोकर. (२) मजूर (३) भंगी.

पाकी (پاکی) स्त्री. (फ़ा.) (१) शुद्धता; पावित्र्य. (२) बेंबीच्या खालचे केस.

पाकीज़गी (پاکیزگی) स्त्री. (फ़ा.) (१) पावित्र्य; शुद्धता. (२) स्वच्छता.

पाकीज़ः (پاکیزه) वि. (फ़ा.) शुद्ध; पवित्र; स्वच्छ. **–ख़ू** (خو –) वि. (फ़ा.) सत्प्रवृत्त. **–गौहर** (گوهر –) वि. (फ़ा.) कुलीन. **–बूम** (بوم –) वि. (फ़ा.) पवित्र स्थानी राहाणारा. **–शि'आर** (شعار –) वि. (फ़ा.+'अ.) सदाचरणी. **–सूरत** (صورت –) वि. (फ़ा.+'अ.) सुस्वरूप.

पाचक (پاچک) पु. स्त्री. (फ़ा.) गोवरी; शेणकूट. **–दश्ती** (دشتی –) स्त्री. (फ़ा.) रानशेणी; रानात पडलेले शेण (वाळलेले).

पाचाँ (پاچاں) वि. (फ़ा.) शिपडणारा; वर्षाव करणारा.

पाचाक (پاچاک) स्त्री. (फ़ा.) गोवरी; शेणी.

पाजी (پاجی) वि. (फ़ा.) नीच; अधम; हलकट; दुष्ट.

पात (پات) पु. (फ़ा.) (१) पाट (लाकडी). (२) फळघांचा पलंग. (३) चौरंग.

पातिलः (پاتلہ) पु. (फ़ा.) पातेले.

पादज़हर (پادزهر) पु.(फ़ा.) एक विषनाशक औषधी.

पादशह (پادشہ) पु. [फ़ा. 'पादशाह' (پادشاہ) चे संक्षिप्त.] बादशहा.

पादशाह (پادشاہ) पु. (फ़ा.) सम्राट; बादशहा. **–ज़ादः** (زاد –) पु. (फ़ा.) राजकुमार; युवराज.

पादशाही (پادشاهی) स्त्री. (फ़ा.) राज्य; सत्ता; साम्राज्य.

पान (پان) पु. (फ़ा.) विडयाचे पान. **–दान** (دان –) पु. (फ़ा.) पानाचा डबा.

पानः (پانہ) स्त्री. (फ़ा.) लाकूड कापताना फटीत घालावयाची पाचर.

पापा (پپا) पु. (फ़ा.) पोप; सर्वोच्च पाद्री.

पायक (پایک) पु. (फ़ा.) दूत; प्यादा; पाईक.

पायचः (پائیچہ) पु. (फ़ा.+हिं.) विजारीचा पाय.

पायाँ (پایاں) पु. [फ़ा. 'पायान' (پایان) चे संक्षिप्त.] (१) हद्द; सीमा. (२) अंत.

पायान (پایان) पु. (फ़ा.) (१) तट; किनारा. (२) अंत; शेवट. (३) हद्द. (४) पराकाष्ठा.

पायान-ए-कार (پایان کار) पु. (फ़ा.) अखेर; शेवटी.

पायाब (پایاب) वि. (फ़ा.) उथळ; चालत पार करता येईल असा.

पायः (پایہ) पु. (फ़ा.) (१) खांब; स्तंभ. (२) पलंगाचा पाय. (३) मान; प्रतिष्ठा. (४) हद्दा; पद. **–ब.पायः** (بہ پایہ –) अव्य. (फ़ा.) क्रमशः; हळूहळू. **–शनास** (شناس –) वि. (फ़ा.) एखाद्याची प्रतिष्ठा व कदर जाणणारा.

पार (پار) पु. (फ़ा.) मागील वर्ष; गत वर्ष. **–साल** (سال –) पु. (फ़ा.) (१) मागील वर्ष. (२) पुढील वर्ष.

पारगानः (پارگانہ) पु. (फ़ा.) (१) तराजूचा पासंग. (२) खिडकी. (३) ख्याती. (४) यशोगान.

पारगी (پارگی) पु. (फ़ा.) (१) प्राचीनत्व. (२) जुनाटपणा.

पारगी (پارگی) स्त्री. (फ़ा.) घरातील व स्वयंपाक घरातील सांडपाणी ज्यात जमा होते ती कुंडी.

पारचः (پارچہ) पु. (फ़ा.) कापड; वस्त्र.

पारसंग (پارسنگ) पु. (फ़ा.) पासंग.

पारस (پارس) पु. (फ़ा.) इराण.

पारसा (پارسا) वि. (फ़ा.) संयमी; सदाचारी; ईश्वरभक्त.

पारसा'ई (پارسائی) स्त्री. (फ़ा.) संयम; इंद्रियनिग्रह; धर्मनिष्ठा.

पारसाल (پارسال) पु. (फ़ा.) गतवर्ष; मागील वर्ष.

पारसी (پارسی) पु. (फ़ा.) (१) पारशी; इराणी; अग्निपूजक. (२) फारसी भाषा.

पारसः (پارسہ) पु. (फ़ा.) भिकारी; फकीर.

पारार (پارار) पु. (फ़ा.) गतवर्षीच्या मागील वर्ष.

पारिकाबी (پارکابی) स्त्री. (फ़ा.) फार थोडा भाग; किंचित.

पारीनः (پارینہ) वि.(फ़ा.) प्राचीन; पुरातन; जुनाट.

पारः (پارہ).पु. (फ़ा.) (१) भाग; अंश. (२) खंड; तुकडा. (३) कण. (४) जोड; ठिगळ. (५) लाच. (६) भेट; देणगी. **–कार** (کار –) वि. (फ़ा.) नीच; हलकट; लोफर. **–दोज़** (دوز –) वि. (फ़ा.) ठिगळे लावणारा; रफू करणारा (शिंपी; चांभार). **–दोज़ी** (دوزی –) स्त्री. (फ़ा.) ठिगळ लावणे; रफू करणे. **–पारः** (پارہ –) वि. (फ़ा.) छिन्न-विच्छिन्न; चक्काचूर; तुकडे तुकडे केलेला.

पारः-ए-नाँ (پارۂ نان) पु. (फ़ा.) भाकरीचा तुकडा.

पार्चः (پارچہ) पु. (फ़ा.) कापड; वस्त्र. **–बाफ़** (باف –) वि. (फ़ा.) कापड विणणारा; कोष्टी.

पालगानः (پالگانہ) पु. (फ़ा.) (१) तराजूचा पासंग. (२) खिडकी. (३) ख्याती.

पालहंग (پالہنگ) पु. (फ़ा.) घोडघाचा लगाम.

पाला (پالا) पु. (फ़ा.) खास स्वारीचा घोडा.

पाला'इश (پالائش) स्त्री. (फ़ा.) सफाई; स्वच्छता.

पालान (پالان) पु. (फ़ा.) घामोळे; पलाण. (घोडघाच्या पाठीवर घालावयाचा कपडा. यावर जीन घातले जाते).

पालानी (پالانی) वि. (फ़ा.) ओझ्याचा घोडा (स्वारीचा नव्हे).

पालीदः (پالیدہ) वि. (फ़ा.) (१) साफ केलेला; धुतलेला. (२) शोधून काढलेला.

पालूदः (پالودہ) वि. (फ़ा.) साफ केलेला. (पु.) एक पेय; फालूदा.

पालूनः (پالونہ) पु. (फ़ा.) वस्त्रगाळ करण्याचे कापड.

पालेज़ (پالیز) स्त्री. (फ़ा.) टरबुजांचे किंवा खरबुजांचे शेत.

पालोश (پالوش) पु. (फ़ा.) कृत्रिम कापूर.

पाशंग (پاشنگ) पु. (फ़ा.) बियांसाठी ठेवलेले फळ (काकडी वगैरे).

पाश (پاش) पु. (फ़ा.) तुकडा; कण. (प्रत्य.) (१) शिंपडणारा. [उदा. 'गुलाब पाश' (گلاب پاش) पु. (फ़ा.) गुलाबदाणी.] (२) पसरविणारा. [उदा. 'दिया पाश' (ضیاپاش) वि. ('अ.+फ़ा.) प्रकाश, तेज पसरविणारा]. **–पाश** (پاش –) वि. (फ़ा.) चक्काचूर झालेला; तुकडे तुकडे केलेला.

पाशाँ (پاشاں) वि. (फ़ा.) (१) शिंपडत असलेला; पसरवित असलेला. (२) ज्यातील अक्षरे दूर दूर आहेत असे लिखाण.

पाशा (پاشا) पु. (तु.) तुर्कस्थानातील एक उच्च पद, हुद्दा; गव्हर्नर; राज्यपाल; वजीर.

पाशिंदः (پاشندہ) वि. (फ़ा.) शिंपडणारा; पसरविणारा.

पाशनः (پاشنہ) स्त्री. (फ़ा.) टाच. **–कोब** (کوب –) वि. (फ़ा.) पाठलाग करणारा. **–कोबी** (کوبی –) स्त्री. (फ़ा.) पाठलाग.

पासंग (پاسنگ) पु. (फ़ा.) (१) पासंग; तराजूच्या तोलातील विषमपणा. (२) दोन्ही पारडी सारखी करण्याकरिता वापरली जाणारी वस्तू.

पास (پاس) पु. (फ़ा.) (१) प्रहर; तीन तास. (२) निरीक्षक; देखरेख. (३) संरक्षण. (४) शील; संकोच; मर्यादा; भीड. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) (१) निरीक्षक; देखरेख ठेवणारा. (२) पाठीराखा; समर्थक. (३) सहायक; मदतगार. **–बाँ** (بان –); **–बान** (بان –) वि. (फ़ा.) (१) पहारेकरी; रक्षक. (२) निरीक्षक.

पास-ए-अदब (پاس ادب) पु. (फ़ा.+'अ.) एखाद्याचा मान ठेवणे.

पास-ए-अन्फ़ास (پاس انفاس) पु. (फ़ा. + 'अ.) मुसलमान सूफींचा एक योगाभ्यास. यामध्ये त्यांच्या प्रत्येक श्वासाबरोबर 'अल्लह' हा शब्द निघतो.

पास-ए-खातिर (پاس خاطر) पु. ('अ.+फ़ा.) एखाद्याचे मन राखणे.

पास-ए-नमक (پاس نمک) पु. (फ़ा.) कृतज्ञता; स्वामिभक्ती.

पास-ओ-लिहाज़ (پاس و لحاظ) पु. (फ़ा.) शील; संकोच; मर्यादा.

पासिन (پاسن) स्त्री. (फ़ा.) टाच.

पासुख़ (پاسخ) पु. (फ़ा.) उत्तर; जबाब.

पास्तान (پاستان) वि. (फ़ा.) प्राचीन; पुरातन.

पिगाँ (پگاں) स्त्री. (फ़ा.) घटिकापात्र (पाण्यात तरंगत ठेवण्याचे भांडे).

पिंदार (پندار) पु. (फ़ा.) (१) ध्यान; लक्ष. (२) कल्पना. (३) गर्व.

पिंदारिंदः (پندارنده) वि. (फ़ा.) विचारक; चिंतक.

पिंदारः (پندار) पु. (फ़ा.) (१) ध्यान; चिंतन. (२) विचार.

पिंदाश्तः (پنداشته) वि. (फ़ा.) विचार केलेला; जाणलेला.

पिज़िश्क (پزشک) पु. (फ़ा.) वैद्य; डॉक्टर; हकीम; उपचारक.

पिज़िश्की (پزشکی) स्त्री. (फ़ा.) उपचार; इलाज.

पिज़ीर (پذیر) प्रत्य. (फ़ा.) स्वीकार करणारा. [उदा. 'असर पिज़ीर' (اثر پذیر) वि. ('अ.+फ़ा.) प्रभावित होणारा].

पिज़ीरफ़्तार (پذیرفتار) वि. (फ़ा.) (१) स्वीकार करणारा. (२) आज्ञाधारक.

पिज़ीरा'ई (پذیرائی); **पिज़ीरिश** (پذیرش) स्त्री. (फ़ा.) स्वीकृती; कबुली; मंजुरी.

पिदंदर (پدندر) पु. (फ़ा.) सावत्र बाप.

पिदर (پدر) पु. (फ़ा.) जनक; पिता.

पिदरानः (پدرانه) वि. (फ़ा.) पितृतुल्य; वात्सल्यपूर्ण.

पिदरी (پدری) वि. (फ़ा.) पित्याचा; पैतृक; वडिलार्जित.

पिद्राम (پدرام) वि. (फ़ा.) (१) शृंगारीत; विभूषित. (२) हर्षित; प्रसन्नमुख.

पिद्रूद (پدرود) पु. (फ़ा.) (१) निरोप देणे. (२) त्याग करणे.

पिनहाँ (پنهاں) वि. (फ़ा.) गुप्त; लपलेला; अप्रकट. **–शिकंज** (شکنج –) वि. (फ़ा.) मनातल्या मनात झुरणारा; आपले दुःख बाहेर न दाखविणारा.

पिनहानी (پنهانی) वि. (फ़ा.) (१) आतील; आंतरिक. (२) मानसिक.

पियाज़ (پیاز) स्त्री. (फ़ा.) कांदा; कंदर्प.

पियाज़ी (پیازی) वि. (फ़ा.) कांद्याच्या रंगाचा; फिकट गुलाबी.

पियालः (پیاله) पु. (फ़ा.) (१) प्याला; पेला. (२) मद्यचषक.

पिरिस्तुक (پرستک); **पिरिस्तो** (پرستو); **पिरिस्तोक** (پرستوک) स्त्री. (फ़ा.) पाकोळीच्या जातीचा एक पक्षी.

पिरेज़िदान (پریزیدان) पु. (फ़ा.) प्रेसिडेंट; अध्यक्ष.

पिरेश (پریش) वि. (फ़ा.) त्रस्त होणारा.

पिल्लगाँ (پلگاں) पु. (फ़ा.) लाकडी शिडी.

पिशक (پشک) स्त्री. (तु.) मांजरी.

पिशमुर्दः (پژمرده) वि. (फ़ा.) खिन्न; उदासीन.

पिशीज़ (پشیز) पु. (फ़ा.) सर्वांत लहान नाणे (पैसा); तांब्याचा कण.

पिशो'इंदः (پشونده) वि. (फ़ा.) विसकटणारा.

पिशोलीदः (پژولیده) वि. (फ़ा.) सतावलेला; संत्रस्त केलेला.

पिश्क (پشک); **पिश्किल** (پشکل) स्त्री. (फ़ा.) उंट, शेळी वगैरे पशूंच्या लेंड्या.

पिश्वाज़ (پشواز) स्त्री. (फ़ा.) नृत्य करताना नेसावयाचा घागरा.

पिसंदर (پسندر) पु. (फ़ा.) सावत्र मुलगा.

पिसर (پسر) पु. (फ़ा.) पुत्र; मुलगा. **–ख़्वांदः** (خواندهٔ –) पु. (फ़ा.) दत्तक पुत्र. **–ज़ादः** (زادهٔ –) पु. (फ़ा.) मुलाचा मुलगा; नातू.

पिस्त (پست) पु. (फ़ा.) सातू, भाजलेले जव, गहू अथवा हरभरे यांचे एकत्र मिसळून तयार केलेले पीठ.

पिस्ताँ (پستاں) स्त्री. [फ़ा. 'पिस्तान' (پستان) चे संक्षिप्त.] स्तन; उरोज.

पिस्तान (پستان) स्त्री. (फ़ा.) (१) स्तन; उरोज. (२) छाती; वक्षस्थळ.

पिस्तः (پسته) पु. (फ़ा.) प्रसिद्ध फळ; पिस्ता. **–लब** (– لب) पातळ व नाजुक ओठ असलेला.

पी (پی) स्त्री. (फ़ा.) चरबी.

पीख़ाल (پیخال) स्त्री. (फ़ा.) पक्ष्यांची विष्ठा.

पीनक (پینک) स्त्री. (फ़ा.) अफूची गुंगी; धुंदी.

पीनकी (پینکی) वि. (फ़ा.) अफू खाऊन झिंगलेला; डुलक्या घेणारा.

पीनू (پینو) पु. (फ़ा.) चक्का; सुकविलेले दही.

पीनः (پینه) पु. (फ़ा.) (१) ठिगळ; रफू. (२) अतिश्रमाने हातापायाला पडलेला घट्टा. **–दोज़** (– دوز) वि. (फ़ा.) ठिगळ लावणारा; रफू करणारा.

पीर (پیر) वि. पु. (फ़ा.) (१) वृद्ध; म्हातारा. (२) धर्मगुरू; सिद्धपुरुष; महात्मा. (३) सोमवार. **–अफ़्शानी** (– افشانی) स्त्री. (फ़ा.) वृद्धपणात तरुणासारखे काम करणे. **–ज़न** (– زن) स्त्री. (फ़ा.) म्हातारी; वृद्धा. **–ज़ादः** (– زادهٔ) पु. (फ़ा.) धर्मगुरूचा मुलगा; संतपुरुषाचा मुलगा. **–परस्ती** (– پرستی) स्त्री. (फ़ा.) धर्मगुरु-भक्ती. साधु-भक्ती. **–मर्द** (– مرد) पु. (फ़ा.) वृद्ध व सदाचरणी पुरुष. **–साल** (– سال) वि. (फ़ा.) वयोवृद्ध.

पीर-ए-कन्'आं (پیر کنعاں) पु. (फ़ा.+'अ.) हजरत युसूफ यांचे पिता हजरत याकूब.

पीर-ए-खराबात (پیر خرابات) पु. (फ़ा.) दारूच्या गुत्याचा म्हातारा व्यवस्थापक.

पीर-ए-ज़मींगीर (پیر زمین گیر) पु. (फ़ा.) म्हातारपणामुळे कमर वाकून ज्याचे डोके जमिनीला लागत आहे असा.

पीर-ए-तरीक़त (پیر طریقت) पु. (फ़ा.) धर्मगुरू.

पीर-ए-फ़लक (پیر فلک) पु. (फ़ा. + 'अ.') (१) शनिग्रह. (२) जुने आकाश.

पीर-ए-फ़र्तूत (پیر فرتوت) पु. (फ़ा.) म्हातारपणामुळे बुद्धिभ्रष्ट झालेला; म्हातारचळ लागलेला.

पीर-ए-मुग़ाँ (پیر مغاں) पु. (फ़ा.) (१) अग्निपूजकांचा (पारशांचा) धर्मगुरू. (२) पाहा 'पीर-ए-खराबात'.

पीर-ए-हरम (پیر حرم) पु. (फ़ा. + 'अ.') 'क'अबः' मंदिराची सेवा करणारा; पूज्य व्यक्ती.

पीर-ओ-मुर्शिद (پیر و مرشد) पु. (फ़ा. + 'अ.') धर्मगुरू; आदरणीय वृद्ध पुरुष.

पीरानः (پیرانہ) वि. (फ़ा.) वृद्धांसारखा; म्हातारपणातील. **–सर** (سر –) वि. (फ़ा.) पिकलेल्या केसांचा; वृद्ध. **–साल** (سال –) वि. (फ़ा.) वयोवृद्ध. **–साली** (سالی –) स्त्री. (फ़ा.) वृद्धावस्था.

पीरायः (پیرایہ) पु. (फ़ा.) (१) शैली; पद्धती. (२) पोषाख.

पीरी (پیری) स्त्री. (फ़ा.) (१) वृद्धावस्था. (२) धर्मगुरूचा हुद्दा अथवा कार्य. (३) धूर्तता; लुच्चेगिरी. (४) हक्क; दावा; परवानगी. (५) सत्ता; प्रभुत्व. (६) चमत्कार.

पीरोज़ः (پیروزہ) पु. (फ़ा.) वैडूर्य (रत्न); हिरव्या रंगाचा मणी.

पील (پیل) पु. (फ़ा.) (१) हत्ती. (२) बुद्धिबळातील हत्ती. **–तन** (تن –) वि. (फ़ा.) (१) हत्तीसारखे शरीर असलेला; अवाढव्य. (२) रुस्तुम पैलवानाची पदवी. **–नशीं** (نشیں –) वि. (फ़ा.) ज्याच्या दारी हत्ती झुलतो असा; श्रीमंत. **–पा** (پا –) पु. (फ़ा.) हत्ती रोग (पाय सुजण्याचा). **–पायः** (پایہ –) पु. (फ़ा.) दगडी किंवा चुन्याचा मोठा खांब. **–बाग़** (باغ –) पु. (फ़ा.) हत्तीचा कमरपट्टा. **–बान** (بان –) वि. (फ़ा.) माहूत. **–माल** (مال –) वि. (फ़ा.) पायी दिलेला. **–स्तः** (ستہ –) पु. (फ़ा.) हस्तिदंत.

पील-ए-गर्दूं (پیل گردوں) पु. (फ़ा.) हत्तीरूपी आकाश. (हे सर्वांना आपल्या पायाखाली तुडवित असते).

पीलः (پیلہ) पु. (फ़ा.) (१) रेशमाचा किडा, कोष. (२) पापणी. (३) बुद्धिबळातील हत्ती. **–वर** (ور –) वि. (फ़ा.) (१) काचकाम करणारा. (२) अत्तार; सुगंधी. (३) रेशमाचा व्यापारी. (४) औषध विक्रेता

पीह (پیہ) स्त्री. (फ़ा.) चरबी; मेद.

पुंबः (پنبہ) पु. (फ़ा.) कापूस. **–दानः** (دانہ –) पु. (फ़ा.) सरकी.

पुख (پوخ) पु. (तु.) मल; विष्ठा.

पुख्त (پخت) स्त्री. (फ़ा.) पिकण्याची, शिजण्याची क्रिया. **–गी** (گی –) स्त्री. (फ़ा.) परिपक्वता; दृढता.

पुख्तो (پختو) स्त्री. (फ़ा.) पठाणांची भाषा; पुश्तो.

पुख्तोन (پختون) पु. (फ़ा.) पुश्तो भाषा बोलणारा; पख्तून; पठाण.

पुख्तोनिस्तान (پختونستان) पु. (फ़ा.) पुश्तो भाषा बोलणाऱ्यांचा देश.

पुख्तः (پختہ) वि. (फ़ा.) (१) पक्का; मजबूत; दृढ (२) परिपक्व. (३) स्थिर; टिकाऊ. (४) निश्चित. **–'अक़्ल** (عقل –) वि. (फ़ा. + 'अ.') परिपक्व बुद्धीचा; स्थिरमती. **–कार** (کار –) वि. (फ़ा.) अनुभवी; प्रवीण; दक्ष. **–राय** (راے –) वि. (फ़ा. + 'अ.') योग्य सल्ला देणारा.

पुत्क (پتک) पु. (फ़ा.) घण; हतोडा.

पुफ़ (پف) स्त्री. (फ़ा.) फुंकर; फूंक मारणे.

पुर (پر) वि. (फ़ा.) भरलेला; परिपूर्ण. **–अंदोह** (اندوہ –) वि. (फ़ा.) दुःखपूर्ण; क्लेशपूर्ण. **–अम्न** (امن –) वि. (फ़ा. + 'अ.') शांततापूर्ण. **–अलम** (الم –) वि. (फ़ा. + 'अ.') क्लेशपूर्ण. **–अश्क** (اشک –) वि. (फ़ा.) अश्रुपूर्ण; अश्रूंनी डबडबलेला (डोळा). **–आब** (آب –) वि. (फ़ा.) पाण्याने भरलेला; अश्रुपूर्ण. **–आशोब** (آشوب –) वि. (फ़ा.) घटनांनी व आपत्तींनी भरलेला. **–कार** (کار –) वि. (फ़ा.) चलाख; धूर्त; लबाड. **–कीं** (کیں –) वि. (फ़ा.) मनात द्वेष बाळगणारा. **–ख़तर** (خطر –) वि. (फ़ा.) आपत्तींनी व धोक्यांनी भरलेला; भयंकर; भीषण. **–ख़म** (خم –) वि. (फ़ा.) (१) तिरपा; वाकडा. (२) कुरळा (केस). (३) लिखाणातील वक्रोक्ती; शब्दावडंबर. **–ख़ार** (خار –) वि. (फ़ा.) काट्यांनी भरलेला; कंटकाकीर्ण. **–ख़ुमार** (خمار –) वि. (फ़ा. + 'अ.') झिंगलेला; धुंद. **–ख़ूं** (خوں –) वि. (फ़ा.) रक्ताने भरलेला; लाल भडक. **–गो** (گو –) वि. (फ़ा.) (१) बडबड्या. (२) खूप कविता करणारा. **–चीं** (چیں –) वि. (फ़ा.) आठ्या पडलेले (कपाळ); सुरकुत्या पडलेला. **–ज़र** (زر –) वि. (फ़ा.) धनसंपन्न. **–जोश** (جوش –) वि. (फ़ा.) आवेशपूर्ण; जोरदार; उत्साहपूर्ण. **–तकल्लुफ़** (تکلف –) वि. (फ़ा. + 'अ.') औपचारिक; संकोचशील; शिष्टाचारयुक्त. **–ताब**

(تاب–)वि.(फ़ा.)(१)प्रकाशमय.(२)शक्तिशाली. **–दिल** (دل –) वि. (फ़ा.)(१) शूर. (२) उत्साही. **–नम** (نم –) वि. (फ़ा.) (१) ओला; भिजलेला. (२) पाणावलेला (नेत्र). **–नूर** (نور –) वि. (फ़ा.+'अ.) ज्योतिर्मय; प्रकाशमान. **–पेच** (پیچ –) वि. (फ़ा.) (१) पेचदार. (२) वाकडातिकडा. **–फ़न** (فن –) वि. (फ़ा. + 'अ.) धूर्त; लबाड. **–फ़िदा** (فضا –)वि.(फ़ा.+'अ.) मोकळा; हवेशीर. **–बजिद** (بجد –) वि. (फ़ा. + 'अ.) कटिबद्ध; तत्पर; तयार. **–बहार** (بہار –) वि. (फ़ा.) फुलांनी भरलेले सुंदर स्थान. **–बाद** (باد –) वि. (फ़ा.) (१) हवा भरलेला; फुगलेला. (२) गर्विष्ठ. **–बार** (بار –) वि. (फ़ा.) (१) मोहोर अथवा फळे यांनी लवलेला. (२) गर्भवती (स्त्री). **–बास** (باس –) वि. (फ़ा.) दुःखपूर्ण. **–मग़्ज़** (مغز –) वि. (फ़ा. + 'अ.) सारगर्भ. **–मज़ाक़** (مذاق –) वि. (फ़ा. + 'अ.) विनोदी; हास्यप्रिय. **–मलाल** (ملال –) वि. (फ़ा. + 'अ.) खिन्न. **–मिज़ाह** (مزاح –) वि. (फ़ा. + 'अ.) थट्टेखोर; विनोदी. **–मिह्न** (محن –) वि. (फ़ा. + 'अ.) परिश्रमपूर्ण; संकटांनी भरलेला. **–शिकन** (شکن –) वि. (फ़ा.) (१) सुरकुत्या पडलेले (शरीर, कातडे). (२) कुरळे (केस). **–शिकम** (شکم –) वि. (फ़ा.) ज्याचे पोट भरले आहे असा. **–शिकोह** (شکوہ –) वि. (फ़ा.) भीषण. **–शु'ऊर** (شعور –) वि. (फ़ा.) (१) शिष्टतापूर्ण; सभ्य. (२) बुद्धिमान. **–शुकोह** (شکوہ –) वि.(फ़ा.) वैभवसंपन्न. **–शोर** (شور –) वि. (फ़ा.)(१) कोलाहलपूर्ण. (२) खारट. **–शौकत** (شوکت –) वि. (फ़ा.) वैभवशाली. **–सुकून** (سکون –) वि. (फ़ा.+'अ.) शांततापूर्ण; निवांत. **–सोज़** (سوز –) वि. (फ़ा.) (१) दुःखपूर्ण. (२) आतून जळत असलेला. **–हसरत** (حسرت –) वि. (फ़ा.+'अ.) निराशापूर्ण. **–हैबत** (هیبت –) वि. (फ़ा.+'अ.) भयानक. **–हौल** (هول –) वि. (फ़ा.) भीषण; भीतिदायक; भयंकर.

पुरिंदः (پرندہ) वि. (फ़ा.) भरणारा.

पुरीदः (پریدہ) वि. (फ़ा.) भरलेला; परिपूर्ण.

पुर्ज़ (پرز) पु. (फ़ा.) (१) रोम; अंगावरील केस. (२) ओढणी; दुपट्टा.

पुर्ज़ः (پرزہ) पु. (फ़ा.) (१) तुकडा (२) कागदाचा तुकडा; कात्रण. (३) यंत्राचा भाग; अवयव. (४) अंश; भाग.

पुर्स (پرس) स्त्री. (फ़ा.) विचारपूस; चौकशी. (प्रत्य.) विचारणारा. [उदा. 'हाल पुर्स' (حال پرس) वि. ('अ.+फ़ा.) विचारपूस करणारा].

पुर्सां (پرساں) वि. (फ़ा.) विचारणारा; विचारपूस करणारा; पृच्छक.

पुर्सिश (پرسش) स्त्री. (फ़ा.) विचारपूस; आदर-सत्कार.

पुर्सीदनी (پرسیدنی) वि. (फ़ा.) विचारण्यायोग्य.

पुर्सीदः (پرسیدہ) (फ़ा.) विचारलेला.

पुर्सः (پرسہ)पु. (फ़ा.) एखाद्या घरी मृत्यू झालेला असता तेथील लोकांच्या सांत्वनासाठी जाणे; समाचाराम जाणे.

पुल (پل) पु. (फ़ा.) पूल; सेतू.

पुलाव (پلاؤ) पु. (फ़ा.) मसालेभात (विशेषतः मांसयुक्त).

पुलुफ़्तः (پلفتہ) पु. (फ़ा.) टिणगी.

पुश्क (پشک) पु. (फ़ा.) लेंडी.

पुश्क (پشک) स्त्री. (तु.) मांजरी.

पुश्त (پشت) स्त्री. (फ़ा.) (१) पाठ. (२) मागील भाग; पिछाडी. (३) मदत. (४)वंश; पिढी. **–ख़म** (خم –) वि. (फ़ा.) कुबडा. **–गर्मी** (گرمی –) स्त्री. (फ़ा.) मदत; समर्थन; पाठींबा. **–दरपुश्त** (در پشت –) अव्य.(फ़ा.) पिढ्यान्‌पिढ्या. **–पनाह** (پناہ –) वि. (फ़ा.) पाठीराखा; सहायक. **–माही** (ماهی –) स्त्री. (फ़ा.) रात्र. **–बारः** (وارہ –) पु. (फ़ा.) पाठीवर घेऊन जाता येईल एवढे ओझे.

पुश्त-ए-दस्त (پشت دست) स्त्री. (फ़ा.) पंजाचा वरील भाग (तळहाताची पाठ).

पुश्तारः (پشتارہ) पु.[फ़ा.'पुश्तवारः' (پشتوارہ) चे संक्षिप्त.] पाठीवर घेऊन जाता येईल एवढे ओझे; गाठोडे.

पुश्ती (پشتی) स्त्री. (फ़ा.) (१) मदत; पाठींबा. (२) पालनपोषण. **–बान** (بان –) वि. (फ़ा.) मदतगार; समर्थक.

पुश्तेनी (پشتینی) वि. (फ़ा.) वंशपरंपरागत.

पुश्तो (پشتو) स्त्री. (फ़ा.) पठाणांची भाषा; पुख्तो.

पुश्तः (پشتہ) पु. (फ़ा.) (१) ढिगारा; टेकाड. (२) भितीला मजबुती येण्यासाठी तिच्या तळाशी घातलेली माती, दगड वगैरेची भर. (३) बंधारा; बांध; किनाऱ्यावरील भित. (४) पुस्तकाचा पुठ्ठा.

पुस (پس) पु. (फ़ा.) पुत्र; मुलगा.

पूच (پوچ) वि. (फ़ा.)(१) अधम; नीच. (२) अश्लील. (३) निरर्थक.

पूद (پود) पु. (फ़ा.) कापडाच्या विणीतील आडवा धागा; बाणा.

पूल (پول) पु. (तु.) पैसा. **–ची** (چی –) वि. (तु.) पैसे विकणारा.

पूर (پور); **पूरः** (پورہ) पु. (फ़ा.) पुत्र; मुलगा.

पेस्तः (پستہ) पु. (फ़ा.) मैदा; पिठी.

पेस्तारः (پستارہ) पु. (फ़ा.) निर्भर्त्सना; टोमणा.

पेच (پیچ) पु. (फ़ा.) (१) पेच; फिरकी; पीळ. (२) डावपेच. (३) कोडे; कूट प्रश्न; जटिलता. (४) यंत्र. (५) विवंचना. (६) कुस्तीचा डाव. (७) स्क्रू. (८) युक्ती; उपाय. (९) शिरपेच; तुरा. (१०) विघ्न; अडथळा. (११) कटकट. **–कश** (–کش) पु. (फ़ा.) स्क्रू ड्रायव्हर; बूट काढण्याचा स्क्रू. **–दरपेच** (در پیچ –) वि. (फ़ा.) (१) ज्या पेचामध्ये आणखी पेच आहेत असा. (२) जटिल; गुंतागुंतीचा. **–दार** (–دار) वि. (फ़ा.) (१) फिरकीचा. (२) जटिल; किचकट. **–रिश्तः** (–رشتہ) पु. (फ़ा.) चरख्यावर काढलेली सुताची गुंडी.

पेच-ओ-खम (پیچ و خم) पु. (फ़ा.) (१) वाकडे-तिकडेपणा; जटिलता; कठीणता. (२) वरखाली असणे. (३) खाचाखोचा.

पेच-ओ-ताब (پیچ و تاب) पु. (फ़ा.) (१) क्रोध; राग. (२) मनस्ताप.

पेचक (پیچک) स्त्री. (फ़ा.) सुताचे रीळ; पिळदार सुताची कुकडी.

पेचाँ (پیچاں) वि. (फ़ा.) (१) पेचदार; पिळदार. (२) गुंतागुंतीचा.

पेचाक (پیچاک) पु. (फ़ा.) (१) सुरकुती; आठी. (२) वक्रता. (३) केसाची वट. (४) तुरा; कलगी.

पेचानीदः (پیچانیدہ) वि. (फ़ा.) गुंडाळलेला; लपेटलेला.

पेचिश (پیچش) स्त्री. (फ़ा.) मुरडा; आमांश (पोटात उठणारी कळ).

पेचीदगी (پیچیدگی) स्त्री. (फ़ा.) (१) जटिलता; गुंतागुंत. (२) कठीणता; अवघडपणा. (३) गुंडाळा.

पेचीदः (پیچیدہ) वि. (फ़ा.) (१) पेचदार; फिरकीचा. (२) बिकट; कठीण; गुंतागुंतीचा. **–दस्त** (–دست) वि. (फ़ा.) दुर्बळ; कमजोर.

पेचः (پیچہ) पु. (फ़ा.) अमरवेल; आकाशवेल.

पेजन (پیزن) स्त्री. (फ़ा.) गाळण्याचे साधन; गाळणे.

पेजीदः (پیزیدہ) वि. (फ़ा.) गाळलेला.

पेश (پیش) पु. (फ़ा.) (१) पुढचा भाग; अग्रभाग. (२) उर्दूतील 'उ' कराचे चिन्ह अथवा मात्रा (ـُ). (३) माळेतील सर्वांत वरचा मणी. (अव्य.) (१) समोर; पुढे. (२) प्रथम; आधी. **–अंदाज** (–انداز) पु. (फ़ा.) जेवताना गुडघ्यांवर घातले जाणारे कापड. **–अंदेश** (–اندیش) वि. (फ़ा.) दूरदर्शी. **–आमद** (–آمد) पु. (फ़ा.) (१) अनुकंपा; दया. (२) पोच; शिरकाव; प्रवेश. (३) सूट. **–आहंग** (–آہنگ) पु. (फ़ा.) सैन्याच्या किंवा प्रवासी तांडघाच्या पुढे चालणारा. **–इमाम** (–امام) पु. (फ़ा.+'अ.) नमाजाचे मार्गदर्शन करणारा इस्लामी धर्मगुरू. **–क़दमी** (–قدمی) स्त्री. (फ़ा + 'अ.) (१) पुढाकार; नेतृत्व. (२) आक्रमण. **–क़ब्ज़** (–قبض) पु. (फ़ा.) (१) कटघार; जंबिया. (२) कुस्तीतील एक डाव. **–कश** (–کش) स्त्री. (फ़ा.) (१) भेट; देणगी; नजराणा. (२) सूचना. (३) विनंती. **–कार** (–کار) पु. (फ़ा.) (१) शिरस्तेदार; न्यायाधिशासमोर किंवा कोणत्याही अधिकाऱ्यासमोर कामाचे कागद ठेवणारा. (२) मदतगार; हाताखालचा नायब; मुतालिक. **–खानः** (–خانہ) पु. (फ़ा.) संसाराच्या वस्तू. **–खिदमत** (–خدمت) पु. (फ़ा. + 'अ.) सेवक; खाजगी चिटणीस. (स्त्री.) राण्या अथवा बेगमा यांच्या दासी. **–ख़ुर्द** (–خورد) पु. (फ़ा.) (१) सकाळची न्याहारी. (२) एखाद्या पदार्थातील तिखटमीठ चाखून पहाणे. **–ख़ेज़** (–خیز) पु. (फ़ा.) (१) चपळ नोकर. (२) गीत; संगीत. **–ख़ैमः** (–خیمہ) पु. (फ़ा.+'अ.) (१) एखाद्या भावी कार्याची प्रस्तावना, तरतूद, चिन्ह किंवा मुहूर्तमेढ. (२) श्रीमंताच्या प्रवासात पुढील मुक्कामावर आधी जाऊन ठोकण्यात येणारा तंबू. (३) सैन्यामध्ये सर्वांत पुढे ठोकला जाणारा तंबू. **–गाह** (–گاہ) स्त्री. (फ़ा.) बादशहाच्या सिंहासनापुढे अंथरला जाणारा गालिचा. (पु.) (१) अध्यक्ष; बादशहा. (२) अंगण; दरबार. (अव्य.) समोर; पुढे. **–गी** (–گی) स्त्री. (फ़ा.) तसलमात; इसार. **–गीर** (–گیر) पु. (फ़ा.) तोंड पुसण्याचा रुमाल. **–गो'ई** (–گوئی) स्त्री. (फ़ा.) भविष्यवाणी. **–तख़्तः** (–تختہ) पु. (फ़ा.) उतरते डेस्क. **–तर** (–تر) अव्य. (फ़ा.) पूर्वी; अगोदर; आधी. **–ताक़** (–طاق) पु. (फ़ा.) (१) अंगण. (२) प्रासादाचा मोठा दरवाजा. **–दंदाँ** (–دنداں) पु. (फ़ा.) सकाळची न्याहारी. **–दस्त** (–دست) वि. (फ़ा.) (१) हाताखालचा कारकून; पेशकार. (२) प्रतिनिधी. (३) सहायक; मदतनीस. (४) पुढाकार घेणारा; विजेता. **–दस्ती** (–دستی) स्त्री. (फ़ा.) (१) मदत. (२) आधी हात उचलणे (मारण्यासाठी). (३) खोडी काढणे. **–दाद** (–داد) स्त्री. (फ़ा.) एखाद्या कामासाठी आधी दिलेले द्रव्य; इसार. **–दामन** (–دامن) पु. (फ़ा.) सेवक; नोकर. **–नशीं** (–نشیں) वि. (फ़ा.) सभासमारंभात अग्रभागी बसविला जाणारा. **–निहाद** (–نہاد) पु. (फ़ा.) (१) इच्छा; हेतू. (२) ध्येय. **–बंद** (–بند) पु. (फ़ा.) घोडघाचा जेरबंद (जीन आवळून धरणारा घोडघाच्या पोटाखालून जाणारा कातडी पट्टा). **–बंदी** (–بندی) स्त्री. (फ़ा.) (१) एखाद्या कामाची पूर्वतयारी. (२) कट; षड्यंत्र.

–बाज़ (باز –) पु. (फ़ा.) स्वागत. (वि.) स्वागत करणारा. **–बी** (بیں –) वि. (फ़ा.) दूरदर्शी; हुशार. **–बीनी** (بینی –)स्त्री. (फ़ा.) (१) दूरदर्शीपणा. (२) हुशारी. **–यार** (یار –) पु. (फ़ा.) पाहा 'पेशकार'. **–रफ़्त** (رفت –) स्त्री. (फ़ा.) (१) पुढे जाणे; प्रगती करणे. (२)अधिकार; काबू. **–रवी** (روی –) स्त्री. (फ़ा.) (१) पुढे चालणे. (२) मार्गदर्शन करणे. **–रौ** (رو –) वि. (फ़ा.) अग्रगामी; पथप्रदर्शक. **–वा** (وا –) वि. (फ़ा.) (१)नेता; पुढारी. (२)मराठ्यांचे पंतप्रधान. **–वा'ई** (وائی –) स्त्री. (फ़ा.) (१) सामोरे जाणे; स्वागत करणे. (२) पेशव्यांची कारकीर्द. **–वाज़** (واز –) पु. (फ़ा.) नृत्य करताना नेसला जाणारा घागरा; घेरेदार पोषाख.

पेश-ए-नज़र (پیش نظر) अव्य. (फ़ा. + 'अ.) (१) दृष्टीसमोर. (२) लक्षात घेता; विचार करता.

पेश-ओ-पस (پیش و پس) पु. (फ़ा.) आगापीछा; बुचकळा; घालमेल.

पेशानी (پیشانی) स्त्री. (फ़ा.) (१) कपाळ; ललाट. (२) नशीब; भाग्य.

पेशाब (پیشاب) पु. (फ़ा.) मूत्र; लघ्वी. **–ख़ानः** (خانہ –) पु. (फ़ा.) मुतारी.

पेशी (پیشیں); **पेशीन** (پیشین) वि. (फ़ा.) (१) पहिला; प्रथम; आधीचा. (२) जुना; प्राचीन. **–गो** (گو–) वि. (फ़ा.) ज्योतिषी; भविष्य सांगणारा. **–गो'ई** (گوئی –) स्त्री. (फ़ा.) भविष्यकथन; ज्योतिष सांगणे; पुढचे आधी सांगणे.

पेशी (پیشی) स्त्री. (फ़ा.) (१) खटल्याची सुनावणी. (२) पुढे मांडणे; ठेवणे.

पेशीनाँ (پیشیناں) पु. (फ़ा.) पूर्वीचे लोक; पूर्वज.

पेशीनः (پیشینہ) वि. (फ़ा.) (१) पूर्वीचा. (२) जुना.

पेशः (پیشہ) पु. (फ़ा.) (१) व्यवसाय; धंदा; व्यापार; उद्योग. (२) वेश्यावृत्ती. **–वर** (ور –) वि. (फ़ा.) धंदेवाईक; व्यावसायिक. **–वरी** (وری –) स्त्री. (फ़ा.) उद्योगधंदा; व्यापार.

पेशतर (پیشتر) अव्य. (फ़ा.) पूर्वी; आधी; प्रथम.

पेस (پس) पु. (फ़ा.) कोड; श्वेतकुष्ठ.

पेसः (پیسہ) वि. (फ़ा.) कोड झालेला; श्वेतकुष्ठाचा रोगी.

पै (پے) पु. (फ़ा.) (१) स्नायू. (२) पदचिन्ह; पावलाची खूण. (३) पाठलाग. (४) खेप; वेळ. (५) शक्ती; बळ. (६) पाऊल. (अव्य.) साठी; करिता. **–ख़ानः** (خانہ –) पु. (फ़ा.) पायखाना; संडास. **–दरपै** (در پے –) अव्य. (फ़ा.) (१) निरंतर; सतत. (२) वारंवार. **–रौ** (رو –) वि. (फ़ा.) अनुयायी. **–सिपुर** (سپر –) वि. (फ़ा.) पददलित.

पैक (پیک) पु. (फ़ा.) (१) पत्रवाहक; पोस्टमन. (२) दूत; निरोप्या.

पैक-ए-अजल (پیک اجل) पु. (फ़ा.+'अ.) यमदूत; मृत्युदूत.

पैकर (پیکر) पु. (फ़ा.) (१) देह; शरीर. (२) आकृती. (३) चेहरा; रूप.

पैकाँ (پیکاں); **पैकान** (پیکان) पु. (फ़ा.) बाणाचे, भाल्याचे किंवा तलवारीचे टोक.

पैकानी (پیکانی) पु. (फ़ा.) (१) लाल (रत्न). (२) एक प्रकारचा नवसागर.

पैकार (پیکار) पु. (फ़ा.) (२) युद्ध; लढाई. (२) फेरीवाला. (३) दलाल.

पैग़ंबर (پیغمبر) पु. (फ़ा.) ईश्वर-दूत; संदेशवाहक; प्रेषित; अवतार.

पैग़ाम (پیغام) पु. (फ़ा.) (१) संदेश. (२) वर्तमान; समाचार. (३) वराकडून वधूकडील लोकांशी होणारे लग्नासंबंधीचे बोलणे. **–बर** (بر –); **–रसाँ** (رساں–) वि. (फ़ा.) संदेशवाहक; दूत.

पैग़ारः (پیغارہ) पु. (फ़ा.) (१) निर्भर्त्सना; झाटकणी. (२) टोमणा.

पैग़ुलः (پیغلہ); **पैग़ूलः** (پیغولہ) पु. (फ़ा.) कोपरा; एकांत.

पैज़ार (پیزار) स्त्री. (फ़ा.) वहाण; पादत्राण.

पैदा (پیدا) वि. (फ़ा.) (१) उत्पन्न झालेला, केलेला; जन्मास आलेला. (२) प्राप्त; मिळालेला. (३)व्यक्त; प्रकट. (पु.) प्राप्ती. **–वार** (وار –) स्त्री. (फ़ा.) (१) पीक; शेतातील उत्पन्न. (२) धंद्यातील प्राप्ती. (३) मालाचे उत्पादन. **–शुदः** (شدہ –) वि. (फ़ा.) उत्पन्न झालेला; जन्मास आलेला.

पैदा'इश (پیدائش) स्त्री. (फ़ा.) (१) उत्पत्ती; जन्म; उपज. (२) अभिव्यक्ती. (३) प्राप्त. (४) नफा; लाभ. (५) प्रारंभ.

पैदा'इशी (پیدائشی) वि. (फ़ा.) (१) जन्मसिद्ध; जन्मजात; जन्मापासूनचा. (२) स्वाभाविक.

पैमाँ (پیماں) पु. [फ़ा. 'पैमान (پیمان) चे संक्षिप्त.] प्रतिज्ञा; वायदा; शपथ; आणभाक; वचन. **–गुसिल** (گسل –); **–शिकन** (شکن –) वि. (फ़ा.) प्रतिज्ञा मोडणारा; वचनभंग करणारा.

पैमा (پیما) प्रत्य. (फ़ा.) (१) मोजणारा; मापणारा. [उदा. 'कोह पैमा' (کوہ پیما) वि. (फ़ा.) पर्वत मापणारा; गिर्यारोहक]. (२) पिणारा. [उदा. 'बादः पैमा' (بادہ پیما) वि. (फा.) मदिरा पिणारा].

पैमा'इंदः (پیمائندہ) वि. (फ़ा.) मापणारा; मोजणारा.

पैमा'इश (پیمائش) स्त्री. (फ़ा.) माप; मोजणी.

पैमान (پیمان) पु. (फ़ा.) वचन; प्रतिज्ञा; शपथ.

पैमानः (پیمانہ) पु. (फ़ा.) (१) माप; लांबी-रुंदी मोजण्याचे यंत्र किंवा साधन. (२) पातळ पदार्थ मापण्याचे साधन. (३) मद्यचषक; प्याला. **–कश** (–کش) वि. (फ़ा.) मद्यपान करणारा. **–कशी** (–کشی) स्त्री. (फ़ा.) मद्यपान. **–बकफ़** (–بکف); **–बदस्त** (–بدست) वि. (फ़ा.) हातात मद्यचषक घेतलेला. **–शिकन** (–شکن) वि. (फ़ा.) दारूचा प्याला फोडून टाकणारा; मद्यपानाला विरोध करणारा.

पैमूदः (پیمودہ) वि. (फ़ा.) मापलेला.

पैमूनः (پیمونہ) पु. (फ़ा.) पाहा 'पैमानः'.

पैरवी (پیروی) स्त्री. (फ़ा.) (१) अनुकरण; अनुसरण. (२) एखाद्याच्या वतीने कोर्टात खटला लढविणे; समर्थन करणे.

पैरहन (پیرہن) पु. (फ़ा.) (१) सदरा; पैरण; कुडते. (२) पोषाख; वस्त्र.

पैरा (پیرا) प्रत्य. (फ़ा.) सजविणारा; शोभविणारा. [उदा. 'चमन पैरा' (چمن پیرا) वि. (फ़ा.) बागेला शोभविणारा].

पैरा'इंदः (پیرائندہ) वि. (फ़ा.) सजविणारा.

पैरा'इश (پیرائش) स्त्री. (फ़ा.) शोभा; सजावट; आरास.

पैरामन (پیرامن); **पैरामुन** (پیرامن); **पैरामून** (پیرامون) पु. (फ़ा.) कपडघाचा पदर. (अव्य.) सर्वत्र; चोहोकडे; आजूबाजूस.

पैरायः (پیرایہ) पु. (फ़ा.) (१) शैली; पद्धती; ढंग. (२) सजावट; आरास. (३) पोषाख. (४) दागिने.

पैरास्तगी (پیراستگی) स्त्री. (फ़ा.) सजावट; आरास.

पैरास्तः (پیراستہ) वि. (फ़ा.) सजविलेला; शोभिवंत.

पैराहन (پیراہن) पु. (फ़ा.) (१) पैरण; कुडते; सदरा. (२) वस्त्र.

पैरो (پیرو) वि. (फ़ा.) अनुयायी. **–कार** (–کار) वि. (फ़ा.) बाजू मांडणारा; समर्थन करणारा.

पैवंद (پیوند) पु. (फ़ा.) (१) जोड; ठिगळ. (२) नाते (रक्ताचे). (३) झाडाचे कलम.

पैवंदी (پیوندی) वि. (फ़ा.) (१) ठिगळ लावलेला. (२) कलमी (फळ).

पैवस्त (پیوست); **पैवस्तः** (پیوستہ) वि. (फ़ा.) (१) जोडलेला; लागून असलेला. (२) व्यतीत झालेला. (अव्य.) सतत; सदैव.

पैसुराक (پیسراک) पु. (तु.) खेचर.

पैसः (پیسہ) पु. (फ़ा.) पैसा (तांब्याचे नाणे).

पैहम (پیہم) अव्य. (फ़ा.) (१) सतत; निरंतर. (२) वारंवार.

पोइयः (پویہ) पु. (फ़ा.) घोडघाची एक चाल; चौकचाल; सहजगती.

पोक (پوک) पु. (फ़ा.) शेतातील धान्य.

पोच (پوچ) वि. (फ़ा.) (१) अधम; नीच. (२) निरर्थक; बेकार; व्यर्थ. (३) अश्लील. (४) लंपट; लोफर. **–गो** (–گو); **–बाफ़** (–باف) वि. (फ़ा.) निरर्थक बडबड करणारा. **–बीं** (–بیں) वि. (फ़ा.) संकुचित दृष्टीचा.

पोचः (پوچہ) स्त्री. (फ़ा.) जळू.

बत्नन् ब'अद बत्न (بطناً بعد بطن) अव्य. ('अ.) पिढ्यान्पिढ्या; वंशपरंपरागत.

बत्श (بطش) स्त्री. ('अ.) आक्रमण; हल्ला.

बद (بد) वि. (फ़ा.) (१) वाईट; निकृष्ट; खराब. (२) दुष्ट; नीच; दंगेखोर. (३) अशुभ. (४) दुराचारी. **–अंजाम** (انجام –) वि. (फ़ा.) दुष्परिणाम. **–अंदेश** (اندیش –) वि. (फ़ा.) वाईट चितणारा; हितशत्रू. **–अख्तर** (اختر –) वि. (फ़ा.) दुर्दैवी. **–अख्लाक़** (اخلاق –) वि. (फ़ा. + 'अ.) असभ्य; असंस्कृत. **–अत्वार** (اطوار –) वि. (फ़ा.+'अ.) दुराचरणी. **–'अमली** (عملی –) स्त्री. (फ़ा. + 'अ.) अंदाधुंदी; अव्यवस्था; अनागोंदी. **–अम्नी** (امنی –) स्त्री. (फ़ा. + 'अ.) अशांतता; बंड; दंगा. **–अस्ल** (اصل –) वि. (फ़ा. + 'अ.) अकुलीन; नीच. **–'अहद** (عہد –) वि. (फ़ा. + 'अ.) वचनभंग करणारा; दगलबाज. **–आ'ईन** (آئین –) वि. (फ़ा.) सिद्धांतहीन. **–आग़ाज़** (آغاز –) वि. (फ़ा.) (१) ज्याची सुरुवात चांगली झालेली नाही असा. (२) अकुलीन. **–अ'अमाल** (اعمال –) वि. (फ़ा. + 'अ.) दुराचारी; बदचाल. **–आमोज़** (آموز –) वि. (फ़ा.) ज्याला वाईट शिक्षण मिळाले आहे असा. **–इंतिज़ामी** (انتظامی –) स्त्री. (फ़ा. + 'अ.) कुव्यवस्था; अनागोंदी. **–उस्लूब** (اسلوب –) वि. (फ़ा.+'अ.) (१) बेढंगी; कुरूप. (२) दुराचारी. **–ए'अतिक़ाद** (اعتقاد –) वि. (फ़ा.+'अ.) धर्माविर विश्वास नसणारा; चुकीच्या गोष्टीवर श्रद्धा ठेवणारा. **–औसान** (اوسان –) वि. ('अ.) घाबरलेला. **–किर्दार** (کردار –); **–कार** (کار–) वि. (फ़ा.) दुराचारी; व्यभिचारी. **–क़िस्मत** (قسمت –) वि. (फ़ा.+'अ.) दुर्दैवी. **–क़िस्मती** (قسمتی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) दुर्दैव. **–केश** (کیش –) वि. (फ़ा.) दुष्ट स्वभावाचा. **–ख़त्** (خط –) वि. (फ़ा.) वाईट अक्षर असलेला. **–ख़स्लत** (خصلت –); **–ख़ुल्क़** (خلق –) वि. (फ़ा.+'अ.) **–ख़ू** (خو –) वि. (फ़ा.) वाईट स्वभावाचा. **–ख़्वाबी** (خوابی –) स्त्री. (फ़ा.) (१) निद्रानाश. (२) वाईट स्वप्न. **–ख़्वाह** (خواہ –) वि. (फ़ा.) वाईट चितणारा; हितशत्रू. **–गिल** (گل–) वि. (फ़ा.) कुरूप. **–गुमान** (گمان –) वि. (फ़ा.) ज्याच्या मनात दुसऱ्याविषयी गैरसमज किंवा संशय उत्पन्न झाला आहे असा. **–गुमानी** (گمانی –) स्त्री. (फ़ा.) (१) गैरसमज. (२) दुराग्रही. **–गो** (گو –) वि. (फ़ा.) (१) शिवीगाळ करणारा. (२) चहाडखोर. **–गो'ई** (گوئی –) स्त्री. (फ़ा.) (१) शिवीगाळ. (२) निंदा; बदनामी. (३) चहाडी. **–गोश्त** (گوشت –) पु. (फ़ा.) रोगामुळे अंगावर वाढणारे फाजील मांस. **–चलन** (چلن –) वि. (फ़ा.+हिं.) दुराचारी; व्यभिचारी. **–चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) (१) ज्याची नजर लगेच लागते असा. (२) वाईट नजरेने पाहणारा. (३) मत्सरी. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.+'अ.) पाहा 'बद गुमान'. **–ज़बान** (زبان –) वि. (फ़ा.) शिवीगाळ करणारा; फटकळ; असभ्य. **–ज़ात** (ذات –) वि. (फ़ा. + 'अ.) (१) पाजी (२) अकुलीन. (३) लबाड. वि. **–तमीज़** (تمیز –) वि. (फ़ा. + 'अ.) (१) अशिष्ट; असभ्य. (२) शिवीगाळ करणारा; फटकळ. (३) धृष्ट. **–तर** (تر –) वि. (फ़ा.) अधिक वाईट. **–तरीन** (ترین –) वि. (फ़ा.) सर्वांत वाईट. **–तीनत** (طینت –) वि. (फ़ा.+'अ.) दुष्ट अंत:करणाचा; अधम. **–दिमाग़** (دماغ –) वि. (फ़ा. + 'अ.) (१) घमेंडखोर. (२) चिडखोर. **–दियानत** (دیانت –) वि. (फ़ा.+'अ.) बेइमान; द्रव्याचा अपहार करणारा. **–दु'आ** (دعا –) स्त्री. (फ़ा.+'अ.) शाप. **–नफ़्स** (نفس –) वि. (फ़ा. + 'अ.) वाईट अंत:करणाचा. **–नाम** (نام –) वि. (फ़ा.) कुप्रसिद्ध; निंदित. **–नीयत** (نیت –) वि. (फ़ा.+'अ.) (१) बेइमान; अप्रामाणिक. (२) लोभी.

–नुमा (نما –) वि. (फ़ा.) कुरूप. **–फ़े'अल** (فعل –) वि. (फ़ा. + 'अ.) बदफैली; दुराचारी; व्यभिचारी. **–फ़े'अली** (فعلی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) दुराचार; व्यभिचार. **–बख़्त** (بخت –) वि. (फ़ा.) दुर्दैवी. **–बातिन** (باطن –) वि. (फ़ा.+'अ.) वाईट अंत:करणाचा; दुरात्मा. **–बीं** (بیں –) वि. (फ़ा.) छिद्रान्वेषी. **–बीनी** (بینی –) स्त्री. (फ़ा.) छिद्रान्वेषण. **–बू** (بو –) वि. (फ़ा.) दुर्गंध. **–म'आश** (معاش –) वि. (फ़ा.+'अ.) (१) बदमाश; गुंड; लुच्चा. (२) वाईट मार्गाने पोट भरणारा; चोर. **–मज़गी** (مزگی –) स्त्री. (फ़ा.) (१) बेचव असणे. (२) उदासीनता. (३) बेबनाव. **–मज़ः** (مزہ –) वि. (फ़ा.) (१) बेचव. (२) दु:खी; उदासीन. **–मस्त** (مست –) वि. (फ़ा.) (१) झिंगलेला. (२) कामुक. **–मिज़ाज** (مزاج –) वि. (फ़ा.+'अ.) तुसडघा; चिडखोर. **–मु'आमलगी** (معاملگی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) देण्याघेण्याच्या व्यवहारातील किंवा बागण्यातील अप्रामाणिकपणा. **–मु'आमलः** (معاملہ –) वि. (फ़ा.+'अ.) अप्रामाणिक. **–राह** (راہ –) वि. (फ़ा.) वाईट मार्गाने जाणारा. **–रिकाब** (رکاب –) वि. (फ़ा.) स्वार वर बसताना जो खटघाळपणा करतो असा घोडा. **–रू** (رو –) वि. (फ़ा.) कुरूप. **–रौ** (رو –) वि. (फ़ा.) कुमार्गगामी. **–लगाम** (لگام –) वि. (फ़ा.) (१) लगामाला न जुमानणारा घोडा. (२) फटकळ माणूस. **–लिहाज़** (لحاظ –) वि. (फ़ा.) **–शु'ऊर** (شعور –) वि. (फ़ा. + 'अ.) निर्लज्ज; असभ्य. **–शुगून** (شگون –) वि. (फ़ा.) अपशकुनी; अशुभ. **–शौक़** (شوق –) वि. (फ़ा.+'अ.) लिहिण्या-वाचण्याची आवड नसलेला. **–सलीक़ः** (سلیقہ –) वि. (फ़ा. + 'अ.) असभ्य; अशिष्ट. **–सुलूकी** (سلوکی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) दुर्व्यवहार; वाईट वागणूक. **–सूरत** (صورت –) वि. (फ़ा.) कुरूप. **–हज़्मी** (ھضمی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) अपचन. **–हूवास** (حواس –) वि. (फ़ा.+'अ.) हतबुद्ध; गडबडलेला. **–हाल** (حال –) वि. (फ़ा. + 'अ.) दुर्दशाग्रस्त; कंगाल. **–हैयत** (ھیئت –) वि. (फ़ा.+'अ.) कुरूप. **–हैसियत** (حیثیت –) वि. (फ़ा.+'अ.) (१) अकुलीन. (२) पत नसलेला. (३) दरिद्री.

बदख़्शाँ (بدخشاں) पु. (फ़ा.) अफगाणिस्तानातील एक प्रदेश; येथील पद्मराग (लाल) रान फार मौल्यवान असते.

बदन (بدن) पु. ('अ.) (१) शरीर; देह. (२) योनी; भग.

बदनी (بدنی) वि. ('अ.) शरीरविषयक; शारीरिक.

बदर (بدر) अव्य. (फ़ा.) बाहेर. **–रौ** (رو –) स्त्री. (फ़ा.) मोरी; नाली; गटार.

बदल (بدل) पु. ('अ.) (१) फरक; बदल. (२) प्रतिकार; सूड. (३) नुकसानभरपाई. (वि.) तुल्य; समान; सारखा.

बदली (بدلی) स्त्री. ('अ.+हि.) (१) बदल; परिवर्तन. (२) नोकरीतील बदली.

बदलः (بدلہ) पु. ('अ. + हि.) (१) मोबदला. (२) नुकसानभरपाई; दंड. (३) बक्षीस. (४) पारिश्रमिक. (५) सूड. (६) शेवट; परिणाम.

बदाँ (بداں) वि. [फ़ा. 'बद' (بد) चे अनेक.] वाईट लोक.

बदाहत (بداھت) स्त्री. ('अ.) ज्यासाठी पुराव्याची जरुरी नाही अशी स्पष्ट गोष्ट.

बदीं (بدیں); **बदीन** (بدیں) अव्य. (फ़ा.) यामुळे; म्हणून. **–ग़रज़** (غرض –) अव्य. (फ़ा.+'अ.) या उद्देशाने. **–लिहाज़** (لحاظ –) अव्य. (फ़ा. + 'अ.) असा विचार करून.

बदी (بدی) स्त्री. (फ़ा.) (१) पाप; गुन्हा. (२) दोष. (३) निंदा. (४) अपकार; कृतघ्नता.

बदी'अ (بدیع) वि. ('अ.) अनुपम; अद्वितीय.

बदील (بدیل) वि. ('अ.) एखाद्या वस्तूच्या बदल्यात मिळालेली (वस्तू).

बदीही (بدیہی) वि. ('अ.) स्पष्ट; उघड; ज्याच्यासाठी पुरावा नको असा.

बदीहः (بدیہہ) पु. ('अ.) (१) आयत्या वेळी स्फुरलेली गोष्ट; सुचलेला विचार. (२) पूर्वतयारी शिवाय रचलेली कविता. **–गो'ई** (گوئی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) आयत्या वेळी व्याख्यान देणे किंवा कविता रचणे; शीघ्र कवित्व.

बदू (بدو) पु. ('अ.) अरबस्तानातील भटक्या माणूस; जंगली; गांवढळ व्यक्ती.

बदौलत (بدولت) अव्य. (फ़ा. + 'अ.) मुळे; द्वारा; कारणाने.

बद्र (بدر) पु. ('अ.) (१) पूर्णचंद्र; शुद्ध चतुर्दशीचा चंद्र. (२) अरबस्तानातील एक विहीर. हिच्याजवळ मुहम्मदसाहेब व नास्तिक लोक यांच्यात युद्ध झाले होते.

बद्रक़ः (بدرقہ) वि. ('अ.) (१) मार्गदर्शक. (२) रक्षक.

बनफ़्शः (بنفشہ) पु. (फ़ा.) एक औषधी वनस्पती; कामपुष्प; नीललोहित पुष्प.

बनात (بنات) स्त्री. ['अ. 'बित' (بنت) चे अनेक.] मुली; कन्यका.

बनात-उन्-न'अश (بنات‌النعش) स्त्री. ('अ.) सप्तर्षी (तारे).

बनादिर (بنادر) पु. ['अ. 'बंदर' (بندر) चे अनेक.] बंदरे.

बनानः (بنانہ) स्त्री. ('अ.) पायाचे बोट.

बनाम (بنام) अव्य. (फ़ा.) (१) नावाने. (२) विरुद्ध.

बनी (بنی) पु. ['अ. 'इब्न' (ابن) चे अनेक.] मुलगे; पुत्र. **-'अम** (عم -) पु. ('अ.) चुलत्याचे मुलगे; चुलतभाऊ. **-आदम** (آدم -) पु. ('अ.) मानव जाती; माणसे. **-इस्त्रा'ईल** (اسرائیل -) पु. ('अ.) यहुदी लोक. **-नौ'अ** (نوع -) पु. ('अ.) जाती; जमात. **-नौ'अ-ए-इन्सान** (نوع انسان -); **-नौ'अ-ए-बशर** (نوع بشر -) पु. ('अ.) मानवजाती.

बपा (بپا) वि. (फ़ा.) उपस्थित; कायम; पसरलेला.

बफ़ा (بفا) स्त्री. (हिं.) डोकीत होणारा कोंडा.

बबर (ببر) पु. ('अ.) (१) एक प्रकारचा छोटा वाघ. हा मोठ्या वाघाला मारतो. (२) सिंह.

बम (بم) पु. (फ़ा.) (१) थप्पड; धपाटा. (२) जोराचा आवाज.

बयाँ (بیاں); **बयान** (بیان) पु. ('अ.) (१) कथन; कैफियत. (२) वर्णन; वृत्तांत; विवरण. (३) संभाषण; व्याख्यान. (४) चर्चा. (५) सूचना. (६) पुस्तकाचे प्रकरण. (७) परिच्छेद.

बयाद (بیاض) स्त्री. ('अ.) (१) शुभ्रता; सफेती. (२) कवितेचे हस्तलिखित. (३) निवडक कविता किंवा लेख लिहिलेली वही. (४) स्मरण वही.

बयाबान (بیابان) पु. (फ़ा.) (१) जंगल; अरण्य. (२) वाळवंट; वैराणस्थान; निर्जन, ओसाड स्थान. पाहा 'बियाबाँ'.

बयारः (بیارہ) पु. (फ़ा.) वेलावेली.

बर (بر) अव्य. (फ़ा.) (१) वर; वरती. (२) बाहेर. (३) आत. (४) सह. (५) विरुद्ध. (वि.) श्रेष्ठ. (पु.) (१) छाती; स्तन. (२) फळ. (३) बगल; कूस. (४) मांडी. **-अंगेख़्तः** (انگیختہ -) वि. (फ़ा.) क्रुद्ध; भडकलेला. **-अंदाज़** (انداز -) वि. (फ़ा.) नष्ट करणारा. **-'अक्स** (عکس -) अव्य. (फ़ा.+'अ.) उलट; विरुद्ध. (वि.) प्रतिकूल. **-आना** (آنا -) पूर्ण होणे; सफल होणे. **-आमद** (آمد -) वि. (फ़ा.) बाहेर आलेला; बाहेर जाणारा; निर्यात (माल). **-आवर्द** (آورد -) स्त्री. (फ़ा.) (१) पगारपत्रक. (२) अंदाजपत्रक. (३) हिशेबपत्रक. **-आवुर्दः** (آوردہ -) वि. (फ़ा.) (१) बाहेर काढलेला. (२) एका खात्यातून काढून दुसऱ्या खात्यात टाकलेली (रक्कम). **-आशुफ़्तः** (آشفتہ -) वि. (फ़ा.) क्रुद्ध. **-उफ़्तादः** (افتادہ -) वि. (फ़ा.) (१) नष्ट; उध्वस्त. (२) पराभूत. **-क़रार** (قرار -) वि. (फ़ा.+'अ.) (१) स्थिर; शाबूत; कायम. (२) जिवंत. (३) पुनः नेमलेला. (४) सहीसलामत. **-ख़ास्त** (خاست -) वि. (फ़ा.) (१) बडतर्फ; काढून टाकलेला. (२) समाप्त; विसर्जन केलेला. (३) बंद. **-ख़ास्तगी** (خاستگی -) स्त्री. (फ़ा.) (१) समाप्ती; अंत. (२) बडतर्फी; पदच्युती. **-ख़ास्तः** (خاستہ -) वि. (फ़ा.) उठलेला; उडालेला. **-ख़ास्तः-ख़ातिर** (خاستہ خاطر -) वि. (फ़ा.+'अ.); **-ख़ास्तः-दिल** (خاستہ دل -) वि. (फ़ा.) ज्याचे मन उडालेले आहे असा; उद्विग्न; उदासीन. **-ख़िलाफ़** (خلاف -) अव्य. (फ़ा.+'अ.) उलट; विरुद्ध; प्रतिकूल. **-ख़ुर्द** (خورد -) वि. (फ़ा.) (१) फळ खाणारा. (२) सफल; यशस्वी. (३) सुदैवी. **-ख़ुर्दार** (خوردار -) वि. (फ़ा.) (१) भाग्यवान. (२) सफल-मनोरथ. (३) संपन्न. (पु.) पुत्र; कन्या. **-गश्तगी** (گشتگی -) स्त्री. (फ़ा.) (१) उलटणे; फिरणे. (२) बंड. **-गश्तः** (گشتہ -) वि. (फ़ा.) (१) फिरलेला; उलटलेला. (२) प्रतिकूल. (३) हुकूम न मानणारा. **-गश्तः-ऐयाम** (گشتہ ایام -) वि. (फ़ा.+'अ.) ज्याचे चांगले दिवस फिरले आहेत असा; दुर्दैवी. **-गश्तः-सर** (گشتہ سر -) वि. (फ़ा.) डोके फिरलेला; वेडा. **-गुज़ीदः** (گزیدہ -); **-चीदः** (چیدہ -) वि. (फ़ा.) (१) निवडलेला; पसंत केलेला. (२) पवित्र. **-ज़बान** (زبان -) वि. (फ़ा.) तोंडपाठ; कंठस्थ. **-जस्तः** (جستہ -) अव्य. (फ़ा.) आधी विचार न करता; आयत्या वेळी (सुचलेला); एकदम; तावडतोब. (वि.) योग्य; उत्तम. **-जस्तः-गो** (جستہ گو -) वि. (फ़ा.) आयत्या वेळच्या विषयावर बोलणारा (वक्ता); शीघ्रकवी; हजरजबाबी. **-जा** (جا -) वि. (फ़ा.) (१) एका स्थानावरील; एके ठिकाणचा. (२) योग्य. **-तबक़** (طبق -) अव्य. (फ़ा.+'अ.) (१) अनुसार; प्रमाणे. (२) तावडतोब. **-तर** (تر -) वि. (फ़ा.) अधिक श्रेष्ठ; उत्तम. **-तरफ़** (طرف -) वि. (फ़ा.+'अ.) (१) बडतर्फ; पदच्युत. (२) वेगळा; स्वतंत्र. **-तरफ़ी** (طرفی -) स्त्री. (फ़ा.+'अ.) बडतर्फी; पदच्युती. **-तरी** (تری -) स्त्री. (फ़ा.) श्रेष्ठत्व; उत्तमता. **-दार** (دار -) प्रत्य. (फ़ा.) उचलणारा; घेऊन जाणारा. [उदा. 'असाबरदार' (عصا بردار) वि. ('अ.+फ़ा.) दंडुका घेऊन चालणारा]. **-दाश्त** (داشت -) स्त्री. (फ़ा.) (१) ओझे उचलणे. (२) सहनशीलता. (३) उधारी. **-दाश्त-ख़ानः** (داشت خانہ -) पु. (फ़ा.) सामान ठेवण्याचे घर; गुदाम. **-दाश्तः** (داشتہ -) वि. (फ़ा.) उचललेला. **-दाश्तः-ख़ातिर** (داشتہ خاطر -) वि. (फ़ा.) (१) ज्याने आपले मन एखाद्या गोष्टीतून काढून घेतले आहे असा; विरक्त. (२) विघ्न. **-दोख़्तः** (دوختہ -) वि. (फ़ा.) शिवलेला;

जोडलेला. **–पा** (پا –) वि. (फ़ा.) (१) कायम; दृढ. (२) उभा केलेला. **–पा करना** (پا کرنا –) (१) कायम करणे. (२) माजविणे; पसरविणे. **–बिना** (بنا –) अव्य. (फ़ा. + 'अ.) नात्याने; कारणाने; मुळे. **–मला** (ملا –) अव्य. (फ़ा.) तोंडावर; समोरासमोर; उघडउघड. **–महल** (محل –) अव्य. (फ़ा. + 'अ.) योग्य वेळी; ऐन वेळी. (वि.) योग्य; ठणठणीत; निरुत्तर करणारा. **–रू** (رو –) अव्य. (फ़ा.) तोंडावर; समोर. **–बरू-ए-कार** (بروے کار –) अव्य. (फ़ा. + 'अ.) अंमलबजावणीच्या दृष्टीने; कार्यान्वित करताना. **–वक़्त** (وقت –) अव्य. (फ़ा. + 'अ.) अगदी वेळेवर. **–सबील** (سبیل –) अव्य. (फ़ा. + 'अ.) म्हणून; प्रमाणे; रूपाने; प्रसंगाने. **–सर-ए-'आम** (سر عام –) अव्य. (फ़ा. + 'अ.) सर्वांच्या समोर; उघडउघड. **–सर-ए-इक़्तिदार** (سر اقتدار –) अव्य. (फ़ा. + 'अ.) सत्तेवर (असलेला); अधिकारारूढ. **–सर-ए-कार** (سر کار –) अव्य. (फ़ा.) कामावर; नोकरीत. **–सर-ए-ख़ुद** (سر خود –); **–सर-ए-ख़्वेश** (سر خویش –) वि. (फ़ा.) स्वच्छंदी; स्वैराचारी. **–सर-ए-जंग** (سر جنگ –) वि. (फ़ा.) लढण्यास तयार झालेला. **–सर-ए-बाज़ार** (سر بازار –) अव्य. (फ़ा.) भरबाजारात; सर्वांच्या समोर. **–सर-ए-मौक़े'अ** (سر موقع –) अव्य. (फ़ा. + 'अ.) (१) ऐन वेळी. (२) घटना स्थळी. **–हम** (هم –) वि. (फ़ा. + 'अ.) (१) खरे; योग्य. (२) निःसंशय. (३) अनिवार्य. (पु.) भविष्य; भवितव्य. **–हक़** (حق –) वि. (फ़ा.) (१) विसकटलेला; अस्ताव्यस्त. (२) रागावलेला. (३) चिंताग्रस्त.

बर (بر) प्रत्य. (फ़ा.) नेणारा; वाहक. [उदा. 'नामःबर' (نامبر) वि. (फ़ा.) पत्रवाहक; दूत; निरोप्या].

बर'अत (برأت) स्त्री. ('अ.) (१) सुटका. (२) निर्दोष सुटणे. (३) बचाव.

बरद (برد) पु. ('अ.) गार (आकाशातून पडणारी).

बरबाद (برباد) वि. (फ़ा.) उध्वस्त; नष्ट; वैराण; निर्जन. **–कुन** (کن –) वि. (फ़ा.) नष्ट करणारा.

बरबादी (بربادی) स्त्री. (फ़ा.) विनाश; विध्वंस.

बरस़ (برص) पु. ('अ.) कोड; श्वेतकुष्ठ.

बरहनगी (برہنگی) स्त्री. (फ़ा.) नग्नता.

बरहनः (برہنہ) वि. (फ़ा.) नग्न; नागवा; विवस्त्र. **–गो** (گو –) वि. (फ़ा.) स्पष्टवक्ता. **–पा** (پا –) वि. (फ़ा.) अनवाणी. **–सर** (سر –) वि. (फ़ा.) बोडका; डोकीस काही नसलेला.

बरहमन (برہمن) पु. (फ़ा.) ब्राह्मण.

बराए (برائے) अव्य. (फ़ा.) करिता; साठी. **–ख़ुदा** (خدا –) अव्य. (फ़ा.) देवासाठी. **–नाम** (نام –) अव्य. (फ़ा.) नाममात्र.

बराज़ (براز) पु. ('अ.) (१) मैला; विष्ठा. (२) बाहेर जाणे; शौचाला जाणे.

बरात (برات) स्त्री. ('अ.) (१) फर्मान; आज्ञापत्र. (२) चेक; हुंडी. (३) हिस्सा.

बरादर (برادر) पु. (फ़ा.) (१) भाऊ; बंधू. (२) नातेवाईक.

बरादरानः (برادرانہ) वि. (फ़ा.) आपसातील; नात्यातील; भावासारखा.

बरादरी (برادری) स्त्री. (फ़ा.) जात; जमात; भाऊबंदी.

बराबर (برابر) वि. (फ़ा.) (१) समान; तुल्य; बरोबरीचा. (२) सपाट. (अव्य.) (१) सतत. (२) समीप; जवळ. (३) क्रमाने; पद्धतशीरपणे. (४) एकत्र. (५) वारंवार. **–बराबर** (برابر –) वि. (फ़ा.) जवळजवळ; अर्धा-अर्धा.

बराबरी (برابری) स्त्री. ('अ.) समानता; बरोबरी. (२) सामना; स्पर्धा.

बरामद (برآمد) वि. (फ़ा.) बाहेर आलेला; शोधून बाहेर काढलेला; बाहेर जाणारा; निर्यात (माल). **–गी** (گی –) स्त्री. (फ़ा.) (१) बाहेर येणे. (२) सापडणे. (३) निर्यात.

बरामदः (برآمدہ) पु. (फ़ा.) (१) घराचा ओटा; व्हरांडा (२) दालन.

बराया (برایا) ['अ. 'बरीयः' (برية) चे अनेक.] (१) सृष्टी; प्राणिमात्र. (२) मानवजाती.

बरार (برار) पु. (फ़ा.) (१) कर; महसूल. (२) वर किंवा समोर आणणे. (वि.) वर आणणारा; समोर आणलेला.

बरारी (برارى) पु. ['अ. 'बर्र' (بر) चे अनेक.] जंगल; अरण्य.

बराह-ए-अदब (براہ ادب) अव्य. (फ़ा. + 'अ.) अदबीने; आदरपूर्वक; शिष्टाचारपूर्वक.

बराह-ए-करम (براہ کرم) अव्य. (फ़ा. + 'अ.) कृपाकरून.

बराह-ए-रास्त (براہ راست) अव्य. (फ़ा.) सरळसरळ; प्रत्यक्षपणे.

बराहिमः (براہمہ) पु. [फ़ा. 'बरहमन' (برہمن) चे अनेक.] ब्राह्मण लोक.

बरी (بریں) वि. (फ़ा.) वरचा; उच्च; श्रेष्ठ.

बरी बिना (بریں بنا) अव्य. (फ़ा.) या आधारावर; या कारणाने; म्हणून.

बरी (بری) वि. ('अ.) (१) बंधमुक्त; सोडून दिलेला; सुटका झालेला. (२) निर्दोष. (३) अलग; पृथक. **–उज़्-ज़िम्मः** (الذمہ –) वि. ('अ.) जबाबदारीतून मुक्त; भारमुक्त.

बरीद (بريد) पु. ('अ.) (१) पत्रवाहक; दूत; निरोप्या. (२) टपाल.

बरीयत (بريت) स्त्री. ('अ.) सुटका; मुक्तता.

बरीयः (بريم) स्त्री. ('अ.) प्राणी.

बरेश (بريش); **बरेशम** (بريشم) पु. [फ़ा. 'अबरेशम' (ابريشم) चे संक्षिप्त.] कच्चे रेशीम; रेशमाचा कोष.

बरंयत (بريت) स्त्री. ('अ.) (१) सुटका. (२) निर्दोष असणे.

बरोमंद (برومند) वि. (फ़ा.) (१) लाभ घेणारा; फळ खाणारा. (२) यशस्वी. (३) भाग्यवान.

बर्क़ (برق) स्त्री. ('अ.) वीज; विद्युत; बिजली. **–अफ़गन** (افگن –) वि. ('अ.+फ़ा.) (१) वीज पाडणारा. (२) विनाश करणारा. **–ज़दः** (زدہ –) वि. ('अ.+फ़ा.) ज्याच्यावर वीज पडली आहे असा. **–दम** (دم –) वि. ('अ.+फ़ा.) तीक्ष्ण; तेजस्वी; धारदार. **–वश** (وش –) वि. ('अ.+फ़ा.) बिजलीसारखा चपळ; झगझगीत. **–शिताब** (شتاب –) वि. ('अ.+फ़ा.) विजेच्या चपळाईने काम करणारा.

बर्क़'अंदाज़ (برق انداز) वि. ('अ.+फ़ा.) (१) बंदूक, तोफ चालविणारा. (२) पट्टेवाला; शिपाई.

बर्क़ियः (برقیہ) पु. ('अ.) तार; टेलीग्राफ.

बर्क़ी (برقی) वि. ('अ.) विजेचा; विद्युत्संबंधी.

बर्ख़ (برخ) पु. (फ़ा.) अंश; भाग; तुकडा.

बर्ग (برگ) पु. (फ़ा.) (१) झाडाचे पान. (२) सामान. **–रेज़** (ریز –) वि. (फ़ा.) पानगळ (ऋतू).

बर्ग-ए-गुल (برگ گل) पु. (फ़ा.) गुलाबाची पाकळी; फुलाची पाकळी.

बर्ग-ओ-नवा (برگ و نوا) पु. (फ़ा.) खाण्यापिण्याची सामग्री; सामानसुमान.

बर्ग-ओ-बार (برگ وبار) पु. (फ़ा.) पाने-फुले-फळे.

बर्ग-ओ-साज़ (برگ و ساز) पु. (फ़ा.) सामानसुमान.

बर्ज़ (برز) पु. (फ़ा.) (१) शेती. (२) सौंदर्य; शोभा. **–गर** (گر –) वि. (फ़ा.) शेतकरी.

बर्ज़ख़ (برزخ) पु. ('अ.) दोन विरुद्ध टोकांमधील दुवा. (उदा. मनुष्य व जनावर यांच्यातील वानर हा दुवा).

बर्ज़न (برزن) पु. (फ़ा.) गल्ली; आळी.

बर्द (برد) पु. ('अ.) थंडी; हिवाळा.

बर्द-ए-अत्राफ़ (برد اطراف) पु. ('अ.) रोग्याच्या मृत्युसमयी त्याचे हातपाय गार पडणे.

बर्दः (بردہ) पु. (तु.) दास; गुलाम; दासी.

बर्ना (برنا) वि. (फ़ा.) तरुण; युवक.

बर्फ़ (برف) स्त्री. पु. (फ़ा.) (१) हिम; बर्फ. (२) दव. (३) कडाक्याची थंडी. **–पर्वदः** (پروردہ –) वि. (फ़ा.) बर्फात ठेवून गार केलेला. **–बारी** (باری –) स्त्री. (फ़ा.) हिमवृष्टी.

बर्फ़ानी (برفانی) वि. (फ़ा.) (१) बर्फाचा; बर्फाशी संबंधित; बर्फाळ. (२) अत्यंत थंड.

बर्फ़ी (برفی) स्त्री. (फ़ा.) बर्फी (मिठाई); कलाकंद.

बर्बत् (بربط) पु. (फ़ा.) सतारीसारखे एक तंतुवाद्य.

बर्बर (بربر) पु. ('अ.) (१) आफ्रिकेतील एक देश; बार्बेरिया. (२) जंगली मनुष्य. (३) कुरळे केस. (वि.) रानटी; असभ्य; उद्धट.

बर्बरियत (بربریت) स्त्री. ('अ.) (१) अत्याचार; जुलूम. (२) पाशविकता; पशुता.

बर्मक (برمک) पु. (फ़ा.) अफगाणिस्तानातील एक अग्निपूजक. याची मुले मोठी हुशार निघाली. याच्या वंशजांना 'बरामिकः' असे म्हणतात.

बर्मः (برمہ) पु. (फ़ा.) लाकडाला छेद पाडावयाचे हत्यार; गिरमिट.

बर्र (بر) पु. ('अ.) (१) कोरडी जमीन; भूमी. (२) जंगल. (३) परमेश्वर. (वि.) (१) सज्जन; दयाळू. (२) आज्ञाधारक.

बर्र-ए-अ'अज़म (براعظم) पु. ('अ.) अनेक देश असलेला भूभाग; खंड (आशिया, आफ्रिका वगैरे).

बर्र-ए-सग़ीर (برصغیر) पु. ('अ.) लहान खंड; द्वीपकल्प; महाद्वीप.

बर्रह (برہ) पु. (फ़ा.) (१) शेळीचे किंवा मेंढीचे पिलू. (२) मेष राशी.

बर्राक़ (براق) वि. ('अ.) (१) उज्वल; शुभ्र. (२) चमकदार. (३) वेगवान. (४) हुशार.

बर्राद (براد) वि. ('अ.) थंड करणारा. (पु.) चहादाणी; किटली.

बर्शकाल (برشکال) पु. (फ़ा.) पावसाळा; वर्षाकाल.

बर्स (برص) पु. ('अ.) कोड; श्वेतकुष्ठ.

बर्सास (برسام) पु. (फ़ा.) छातीची सूज; प्लूरसी.

बर्हमन (برھمن) पु. (फ़ा.) ब्राह्मण.

बलंद (بلند) वि. (फ़ा.) (१) उच्च. (२) उंच. (३) प्रतिष्ठित. (४) महान; श्रेष्ठ. (५) अधिक. **–अख़्तर** (اختر –) वि. (फ़ा.) उच्चीचे ग्रह असलेला; भाग्यवान. **–परवाज़** (پرواز –) वि. (फ़ा.) उंच उडणारा; उच्च विचार असणारा; प्रतिभावान. **–पायः** (پایہ –) वि. (फ़ा.) उच्च पदस्थ; प्रतिष्ठित. **–बांग** (بانگ –) वि. (फ़ा.)

जोराने बोलणारा. –बाला (ला–) वि. (फ़ा.) उंचापुरा; धिप्पाड.

बलंदी (بلندی) स्त्री. (फ़ा.) (१) उच्चता. (२) श्रेष्ठत्व. (३) उंची; उत्तुंगता. (४) अभिमान.

बलख (بلخ) पु. (फ़ा.) अफगाणिस्तानातील एक प्राचीन शहर.

बलग़म (بلغم) पु. ('अ.) कफ; श्लेष्मा.

बलद (بلد) पु. ('अ.) नगर; शहर.

बलद (بلد) पु. (फ़ा.) मार्गदर्शक; नेता.

बलवाँ (بلوا) पु. ('अ.) (१) दंगा. (२) बंड. (३) गर्दी. (४) आरडाओरडा.

बलाँ (بلی) अव्य. ('अ.) होय; अवश्य.

बला (بلا) स्त्री. ('अ.) (१) संकट; दैवी आपत्ती. (२) दुःख; कष्ट. (३) भूतप्रेतांची बाधा. (४) रोग; व्याधी. (५) हडळ (वि.) (१) लबाड; चलाख. (२) भयानक; भीषण. –कश (کش–) वि. ('अ.+फ़ा.) संकटे झेलणारा. –का (کا–) भयंकर; अत्यंत; बेहद्द. –गर्दां (گرداں –) वि. ('अ.+फ़ा.) (१) दुसऱ्याची आपत्ती स्वतःवर ओढवून घेणारा. (२) बळी जाणारा. –नोश (نوش –) वि. ('अ.+फ़ा.) भयंकर पिणारा; दारुडा.

बला-ए-नागहानी (بلائے ناگہانی) स्त्री. (फ़ा.) आकस्मिक आपत्ती.

बला-ए-मुजस्सम (بلائے مجسم) स्त्री. (फ़ा.) मूर्तिमंत संकट.

बलाग़ (بلاغ) पु. ('अ.) (१) पोचविणे; धाडणे. (२) नोटीस; सूचना. (३) पराकाष्ठा.

बलाग़त (بلاغت) स्त्री. ('अ.) (१) साहित्याची अलंकारयुक्त शैली; अलंकारिक भाषा. (२) वक्तृत्व; भाषणचातुर्य.

बलादत (بلادت) स्त्री. ('अ.) बुद्धिमांद्य; मूढता.

बलाबुर (بلابر) पु. ('अ.) बिब्बा; भल्लातक.

बलाहत (بلاہت) स्त्री. ('अ.) व्यवहारज्ञानाचा अभाव; मूढता.

बलीग़ (بلیغ) वि. ('अ.) (१) अलंकारशास्त्रवेत्ता. (२) अलंकारपूर्ण (भाषा). (३) पूर्णतेस पोचलेला. (४) बडबड्या.

बलीद (بلید) वि. ('अ.) मंदबुद्धी; मूढ.

बलीयत (بلیت) स्त्री. **बलीयः** (بلیہ) पु. ('अ.) आपत्ती; संकट. [अनेक 'बलीयात' (بلیات) स्त्री.].

बलूत (بلوط) पु. ('अ.) एक डोंगरी वृक्ष. याच्या सालीचा उपयोग कातडे रंगविण्यासाठी केला जातो.

बलूर (بلور) पु. (फ़ा.) बिलोरी आरसा.

बले (بلے) अव्य. (फ़ा.) होय; बरोबर; ठीक आहे; अस्स!

बलेलः (بلیلہ) पु. ('अ.) बेहडा (औषधी वनस्पती).

बल्क़ान (بلقان) पु. ('अ.) युरोपातील एक द्वीपकल्प. यात रुमानिया, बल्गेरिया, सर्व्हिया, मक्दूनिया, अल्बानिया, ग्रीस व इटली यांचा समावेश होतो.

बल्कि. (بلکہ) अव्य. (फ़ा.) इतकेच नव्हे तर; उलट; शिवाय; परंतु.

बल्ग़म (بلغم) पु. ('अ.) कफ; श्लेष्मा.

बल्दियः (بلدیہ) स्त्री. ('अ.) नगरपालिका; म्युनिसिपालिटी.

बल्दः (بلدہ) पु. ('अ.) (१) नगर; शहर; वस्ती. (२) उत्तरापाढा.

बल्लूर (بلور) पु. ('अ.) बिलोरी आरसा; स्फटिक मणी.

बल्वाँ (بلوا) पु. ('अ.) (१) दंगा. (२) बंड. (३) अशांती; गैरकारभार.

बल्सां (بلسان) पु. ('अ.) अरबस्तान व इजिप्त येथे आढळणारे एक झाड. याच्या पानांपासून तेल काढतात.

बवासीर (بواسیر) स्त्री. ('अ.) मूळव्याध.

बव्वाब (بواب) वि. ('अ.) द्वारपाल; पहारेकरी.

बव्वाल (بوال) वि. ('अ.) फार लघ्वी करणारा; मुत्रा.

बशर (بشر) पु. ('अ.) मनुष्य; मानव.

बशरः (بشرہ) पु. ('अ.) (१) त्वचा; चमडी. (२) चेहरा; रूप; आकृती.

बशर्ति कि. (بشرطے کہ) अव्य. (फ़ा.+'अ.) या अटीवर की; असे झाले तर.

बशारत (بشارت) स्त्री. ('अ.) शुभ संदेश; ईश्वरी आदेश; साक्षात्कार.

बशाशत (بشاشت) स्त्री. ('अ.) प्रसन्नता; खूषी; हर्ष; प्रफुल्लता.

बशीर (بشیر) वि. ('अ.) (१) शुभ संदेश आणणारा; ईश्वरी आदेश ऐकविणारा. (२) सुंदर. (३) मुहम्मद साहेबांची पदवी.

बश्काल (بشکال) स्त्री. (फ़ा.) पावसाळा.

बश्शाश (بشاش) वि. ('अ.) आनंदित; खूष.

बसंद (بسند) वि. (फ़ा.) पुष्कळ; पुरेसे.

बस (بس) वि. (फ़ा.) (१) पुष्कळ; पुरेसे. (२) समाप्त. (अव्य.) केवळ; फक्त. **–कि.** (کہ –) अव्य. (फ़ा.) कारण की; यासाठी.

बसर (بسر) स्त्री. (फ़ा.) निर्वाह; गुजारा: व्यतीत करणे. **–औक़ात** (اوقات –) स्त्री. (फ़ा.+'अ.) जीवन घालविणे; निर्वाह करणे.

बसर (بصر) स्त्री. ('अ.) दृष्टी; नजर.

बसरी (بصری) वि. ('अ.) दृष्टिविषयक.

बसां (بساں) वि. (फ़ा.) तुल्य; समान.

बसा (بسا) वि. (फ़ा.) पुष्कळ; अधिक. (अव्य.) प्रायः; बहुधा. **–औक़ात** (اوقات –) अव्य. (फ़ा.+'अ.) बहुधा; नेहमी; पुष्कळदा.

बसारत (بصارت) स्त्री. ('अ.) दृष्टी; नजर.

बसालत (بسالت) स्त्री. ('अ.) शौर्य; बहादुरी.

बसीत (بسیط) वि. ('अ.) (१) विशाल; विस्तृत; पसरलेला. (२) निर्भळ.

बसीम (بسیم) वि. ('अ.) स्मित करणारा; हसतमुख.

बसीर (بصیر) वि. ('अ.) पाहणारा; द्रष्टा; दिव्य-दृष्टी (पु.) ईश्वर.

बसीरत (بصیرت) स्त्री. ('अ.) (१) अंतर्दृष्टी. (२) प्रतिभा. (३) चातुर्य.

बस्त (بست) स्त्री. (फ़ा.) बांधणी; गाठ. **–गी** (گی–) स्त्री. (फ़ा.) (१) संबंध. (२) बांधणे. (३) बंद होणे; मलावरोध; बद्धकोष्ठ.

बस्त (بسط) पु. ('अ.) (१) विस्तार; प्रसार. (२) विवरण; तपशील.

बस्तनी (بستنی) स्त्री. (फ़ा.) अभ्रा; खोळ; गवसणी.

बस्तः (بستہ) वि. (फ़ा.) (१) बांधलेला; बंद केलेला. (२) गोळा केलेला. (३) घडी घातलेला. (पु.) (१) कागदपत्र बांधण्याचे फडके; दप्तर. (२) बंधन; गाठ. (प्रत्य.) बांधून. [उदा.' दस्त बस्तः ' (دست بستہ) अव्य. (फ़ा.) हात बांधून; हात जोडून]. **–आवाज़** (آواز –) वि. (फ़ा.) ज्याचा आवाज बसला आहे असा. **–कमर** (کمر –) वि. (फ़ा.) ज्याने कंबर कसली आहे असा. **–दहन** (دھن –) वि. (फ़ा.) ज्याचे तोंड बंद झालेले आहे असा; मूक.

बह (بہ); **ब.** (بہ) (प्रत्य.) सह; ने; आत; साठी. **–अक़्सात** (اقساط –) अव्य. (फ़ा.+'अ.) हप्त्याने; थोडे थोडे. **–अदब** (ادب –) अव्य. (फ़ा. + 'अ.) आदरपूर्वक. **–अहसन-ए-वुजूह** (احسن وجوہ –) अव्य. (फ़ा.+'अ.) उत्तम प्रकारे. **–इख़्तियार-ए-ख़ुद** (اختیار خود –) अव्य. (फ़ा.) आपल्या अधिकारात. **–इख़्तिसार** (اختصار –) अव्य. (फ़ा. + 'अ.) थोडक्यात. **–'इवज़** (عوض –) अव्य (फ़ा.+'अ.) ऐवजी; बदली. **–क़द्र** (قدر –) अव्य. (फ़ा.+'अ.) (१) इतका. (२) अनुसार; प्रमाणे. **–क़द्र-ए-ज़र्फ़** (قدر ظرف –) अव्य. (फ़ा. + 'अ.) जेवढे भांडे असेल तेवढे; जेवढी योग्यता असेल तेवढे. **–क़ौल** (قول –) अव्य. ('अ.) एखाद्या व्यक्तीच्या सांगण्या, म्हणण्याप्रमाणे. **–ख़ूबी** (خوبی –) अव्य. (फ़ा.) (१) उत्तम प्रकारे. (२) पूर्णपणे. **–ख़ैर** (خیر –) अव्य. (फ़ा.+'अ.) सुखरूपपणे. (वि.) खुशाल. **–जब्र** (جبر –) अव्य. (फ़ा.+'अ.) **–ज़ोर** (زور –) अव्य. (फ़ा.) बळजबरीने. **–तक़रीब** (تقریب –) अव्य. (फ़ा.+'अ.) प्रसंगी; समयी. **–तद्रीज** (تدریج –) अव्य. (फ़ा.+'अ.) क्रमाक्रमाने; हळूहळू. **–रादि-ए-तरफ़ैन** (راضیٔ طرفین –) अव्य. (फ़ा.+'अ.) दोन्ही पक्षांच्या संमतीने. **–तौर** (طور –) अव्य. (फ़ा.+'अ.) (१) तऱ्हेने; प्रकारे; रीतसर. (२) समान; सदृश. (३) म्हणून; यासाठी. **–तौर-ए-ख़ुद** (طور خود –) अव्य. (फ़ा.+'अ.) आपल्या बतीने; स्वतः होऊन. **–दस्तूर** (دستور –) अव्य. (फ़ा.) यथापूर्व; जशाचा तसा; नियमानुसार. **–दिक़्क़त** (دقت –); **–मुश्किल** (مشکل –) अव्य. (फ़ा.+'अ.) मोठ्या मुष्किलीने; कसेबसे. **–मूजिब** (موجب –) अव्य. (फ़ा.+'अ.) अनुसार; प्रमाणे. **–यक वक़्त** (یک وقت –) अव्य. (फ़ा.+'अ.) एकाच वेळी; एकदम. **–शर्तिकि.** (شرطے کہ –) अव्य. (फ़ा.+'अ.) या अटीवर; असे झाले तर. **–सद मुश्किल** (صد مشکل –) अव्य. (फ़ा.+'अ.) मोठ्या मुष्किलीने; कसेबसे. **–सबब** (سبب –) अव्य. (फ़ा.+'अ.) कारणाने; यामुळे. **–सराहत** (صراحت –) अव्य. (फ़ा.+'अ.) स्पष्टपणे. **–सर-ओ-चश्म** (سر و چشم –) अव्य. (फ़ा.) शिरोधार्य; मोठ्या आनंदाने. **–हद्दे कि.** (حدے کہ –) अव्य. (फ़ा.+'अ.) इतके की. **–हर कैफ़** (ہر کیف –); **–हरसूरत** (ہر صورت –); **–हरहाल** (ہر حال –) अव्य. (फ़ा. + 'अ.) कोणत्याही परिस्थितीत; कसेही करून. **–हालिकि.** (حالے کہ –) अव्य. (फ़ा.+'अ.) अशा स्थितीत की. **–हैअत-ए-मजमू'ई** (ہیئت مجموعی –) अव्य. (फ़ा. + 'अ.) पूर्णपणे; एकूण.

बहक़ (بہق) पु. ('अ.) कातडीवरील फिकट डाग.

बहबूद (بہبود)'; **बहबूदी** (بہبودی) स्त्री. (फ़ा.) (१) कल्याण; उपकार; उन्नती. (२) चांगली गोष्ट घडणे.

बहम (بہم) अव्य. [फ़ा. 'बाहम' (باہم) चे संक्षिप्त.] (१) परस्पर; आपसात. (२) एकत्र; मिळून. **–दीगर** (دیگر –) अव्य. (फ़ा.) परस्पर; एकमेकांसह. **–पहुंचाना** (پہنچانا –) (१) पुरवठा करणे; नेऊन पोहचविणे. (२) घडवून आणणे. **–रसानी** (رسانی –) स्त्री. (फ़ा.) एकत्र करणे; शोधून आणणे; पुरवठा करणे.

बहमन (بہمن) पु. (फ़ा.) (१) इराणी वर्षाचा अकरावा महिना (माघ). (२) लाल-पांढऱ्या रंगाचा एक औषधी कंद. (३) इस्फंदयारचा मुलगा.

बहर (بہر) अव्य. (फ़ा.) साठी; करिता.

बहर (بحر) स्त्री. ('अ.) कवितेचे वृत्त; छंद.

बहर (بحر) पु. ('अ.) समुद्र; महासागर.

बहर-उल्-'अलूम (بحرالعلوم) पु. ('अ.) विद्यासागर; महापंडित.

बहर-उल्-काहिल (بحرالکاهل) पु. ('अ.) प्रशांत महासागर.

बहर-उस्-सीन (بحرالصین) पु. ('अ.) चीन-सागर.

बहर-ए-अख़दर (بحراخضر) पु. ('अ.) कास्पियन समुद्र.

बहर-ए-अबयद (بحرابیض) पु. ('अ.) श्वेत समुद्र (रशियाच्या उत्तरेकडील).

बहर-ए-असवद (بحراسود) पु. ('अ.) काळा समुद्र. (रशियाच्या दक्षिणेकडील).

बहर-ए-अहमर (بحراحمر) पु. ('अ.) तांबडा समुद्र.

बहर-ए-अ'अज़म (بحراعظم) पु. ('अ.) महासागर.

बहर-ए-औक़ियानूस (بحراوقیانوس) पु. ('अ.) अटलांटिक महासागर.

बहर-ए-काहिल (بحرکاهل) पु. ('अ.) प्रशांत महासागर.

बहर-ए-क़ुलज़ुम (بحرقلزم) पु. ('अ.) तांबडा समुद्र.

बहर-ए-ज़ंग (بحرزنگ) पु. ('अ.+फ़ा.) ॲबिसिनियाच्या पूर्वेकडील समुद्र.

बहर-ए-ज़ुल्मात (بحرظلمات) पु. ('अ.) अटलांटिक महासागर.

बहर-ए-बेकरां (بحر بے کراں) पु. ('अ.+फ़ा.) ज्याला किनारा नाही असा समुद्र; अपार सागर.

बहर-ए-बेपायां (بحر بے پایاں) पु. ('अ.+फ़ा.) अथांग सागर.

बहर-ए-मग़रिब (بحرمغرب) पु. ('अ.) युरोपचा समुद्र.

बहर-ए-मुर्दार (بحرمردار) पु. ('अ.+फ़ा.) मृत सागर.

बहर-ए-रवां (بحرروان) पु. ('अ.+फ़ा.) नौका; जहाज.

बहर-ए-रूम (بحرروم) पु. ('अ.) तुर्की समुद्र.

बहराम (بهرام) पु. (फ़ा.) (१) मंगळ (ग्रह). (२) इराणचा एक बादशहा.

बहरियः (بحریہ) पु. ('अ.) जलसेना; आरमार.

बहरी (بحری) वि. ('अ.) समुद्रविषयक.

बहरैन (بحرین) पु. ('अ.) (१) इराणचे आखात. (येथे मोती सापडतात). (२) पांढरा समुद्र व काळा समुद्र.

बहरः (بهره) पु. (फ़ा.) (१) भाग; अंश; हिस्सा. (२) भाग्य; नशीब. **–मंद** (–مند); **–याब** (–یاب); **–वर** (–ور) वि. (फ़ा.) भाग्यवान.

बहलः (بهله) पु. (फ़ा.) (१) रुपये-पैसे ठेवण्याची पिशवी; थैली. (२) बहिरी ससाण्याची नखे लागू नयेत म्हणून शिकारी लोक हातावर घालतात तो कातडी हातमोजा.

बहस (بحث) स्त्री. ('अ.) (१) शास्त्रार्थ; चर्चा; वादविवाद. (२) वाक्‌युद्ध; हुज्जत; झगडा. (३) युक्तिवाद; तर्क. (४) मतलब; संबंध. (५) खटल्यामध्ये वादी-प्रतिवादीचे मांडले जाणारे म्हणणे. **–तलब** (–طلب) वि. ('अ.) ज्या बाबतीत चर्चा करण्याची आवश्यकता आहे असा मुद्दा.

बहा (بها) पु. (फ़ा.) (१) मूल्य; किंमत. (२) उत्तमता. (३) शोभा. (४) प्रकाश.

बहादुर (بهادر) वि. (तु.) शूर; वीर.

बहादुरानः (بهادرانہ) वि. (तु.+फ़ा.) शूरासारखा; वीरोचित.

बहादुरी (بهادری) स्त्री. (तु.) शौर्य; वीरता.

बहानः (بهانہ) पु. (फ़ा.) (१) सबब; निमित्त; कारण. (२) मिष; बहाणा. (३) स्वार्थ साधण्यासाठी खोटे बोलणे. (४) कपट. (५) संधी; मोका. **–खू** (–خو); **–गर** (–گر); **–जू** (–جو); **–बाज़** (–باز); **–साज़** (–ساز) वि. (फ़ा.) सबबी सांगणारा; थापाडया; खोटारडा; बहाणा करणारा.

बहार (بهار) स्त्री. (फ़ा.) (१) वसंत ऋतू. (२) बहर; फुलांचा मोसम. (३) शोभा; प्रफुल्लता; रमणीयता. (४) मनोरंजन. (५) आनंद; गंमत. (६) एका रागाचे नाव. (७) तारुण्य. **–आगीं** (–آگیں) वि. (फ़ा.) बहारदार; शोभिवंत.

बहारीं (بهاریں) वि. (फ़ा.) वासंतिक; वसंत ऋतू-संबंधी.

बहाल (بحال) वि. (फ़ा.) (१) यथास्थित; कायम; जशाचा तसा; स्थिर. (२) उत्तम स्थितीतील; आनंदी; प्रसन्न. (३) रोगमुक्त. (४) पुनः नेमलेला.

बहाली (بحالی) स्त्री. (फ़ा.) (१) रोगमुक्ती; आजारातून उठणे. (२) पुनर्नियुक्त; पूर्वीच्या जागेवर पुनः नेमणूक होणे. (३) प्रसन्नता. (४) मुखावरील तजेला.

बहीज (بهیج) वि. ('अ.) आनंदित; खूष.

बहीमः (بهیمہ) पु. ('अ.) पशू; जनावर.

बहीर (بهیر) स्त्री. (फ़ा.) (१) लष्कराच्या बाजाराचे लोक; बाजारबुणगे; गर्दी. (२) लष्करी सामान.

बहीरः (بحیرہ) पु. ('अ.) उपसागर.

बांग (بانگ) स्त्री. (फ़ा.) (१) स्वर; आवाज; ध्वनी. (२) कोंबडयाचे आरवणे. (३) नमाजासाठी लोकांना दिलेली हाक.

बांग-ए-जरस (بانگ جرس); **बांग-ए-दिरा** (بانگ درا) स्त्री. (फ़ा.) प्रवासी तांडघा (काफिला) बरोबर असणाऱ्या घंटेचा प्रस्थानसूचक आवाज.

बा (ب) उप. (फ़ा.) सह; वाला; पूर्ण. **–अदब** (ادب –) वि. (फ़ा. + 'अ.) अदबशीर; सभ्य. **–असर** (اثر –) वि. (फ़ा.+'अ.) परिणामकारक; प्रभावशाली. **–आँकि.** (آن کہ –) अव्य. (फ़ा.) असे असूनही. **–इक़्तिदार** (اقتدار –) वि. (फ़ा.+'अ.) सत्ताधारी. **–'अिस्मत** (عصمت –) वि. (फ़ा.+'अ.) पतिव्रता; साध्वी. **–ई हमः** (این همہ –) अव्य. (फ़ा.) या सर्व गोष्टी असूनही. **–ईसार** (ایثار –) वि. (फ़ा.+'अ.) त्यागी. **–कमाल** (کمال –) वि. (फ़ा.+'अ.) (१) निपुण; कलावंत. (२) अद्‌भुत सामर्थ्य असलेला. **–क़ा'अिदः** (قاعدہ –) अव्य. (फ़ा.) पद्धतशीरपणे; व्यवस्थितपणे. **–ख़बर** (خبر –) वि. (फ़ा.+'अ.) (१) अभिज्ञ; जाणता. (२) सावधान; हुशार. **–ख़ुदा** (خدا –) वि. (फ़ा.) ईश्वरनिष्ठ; सदाचारी. **–ख़ैर** (خیر –) वि. (फ़ा. +'अ.) (१) दानशूर. (२) सर्वांचे भले करणारा. **–दाबितः** (ضابطہ –) अव्य. (फ़ा.+'अ.) कायदेशीरपणे पद्धतशीरपणे. **–तमीज़** (تمیز –) वि. (फ़ा.+'अ.) सभ्य; शिष्ट; सुसंस्कृत; शालीन. **–तर्तीब** (ترتیب –) वि. (फ़ा. + 'अ.) क्रमबद्ध; नीट मांडलेला. **–तसल्सुल** (تسلسل –) अव्य. (फ़ा.+'अ.) क्रमशः; अनवरत; अखंड. **–दिल-ए-ख़ारख़ार** (دل خار خار –) अव्य. (फ़ा.) दुःखाने; नाइलाजाने. **–नवा** (نوا –) वि. (फ़ा.) (१) सुरेल; सस्वर. (२) समर्थ; संपन्न. **–मज़ाक़** (مذاق –) वि. (फ़ा. + 'अ.) (१) रसिक. (२) विनोदी. **–मुहाविरः** (محاورہ –) वि. (फ़ा. + 'अ.) वाक्‌प्रचारयुक्त; सुलभ; अलंकारयुक्त (भाषा). **–रो'अब** (رعب –) वि. (फ़ा. + 'अ.) रुबाबदार वक्ता. **–विक़ार** (وقار –) वि. (फ़ा.+'अ.) प्रतिष्ठित; श्रेष्ठ. **–वफ़ा** (وفا –) वि. (फ़ा.+'अ.) कृतज्ञ; स्वामिभक्त. **–वस्फ़** (وصف –); **–वुजूद** (وجود –); **–वुजूदे कि.** (وجودے کہ –) अव्य. (फ़ा.+'अ.) यद्यपि; असे असूनही; तरीही. **–शद** (شد –) क्रि. (फ़ा.) असेल (अव्य.) कदाचित. **–शद-ओ-मद** (شد و مد –) अव्य. (फ़ा.+'अ.) जोरजोराने; थाटामाटात. **–शु'ऊर** (شعور –) वि. (फ़ा.+'अ.) (१) बुद्धिमान. (२) शिष्टाचारयुक्त. **–सलीक़ः** (سلیقہ –) वि. (फ़ा. + 'अ.) (१) शिष्टाचारयुक्त. (२) पद्धतशीर. **–सुकून** (سکون –) अव्य. (फ़ा. + 'अ.) शांततापूर्ण. **–हमः-ओ-बेहमः** (ہمہ و بے ہمہ –) अव्य. (फ़ा.) सर्वांशी व कुणाशीही नाही. (सत्कर्मांत सर्वांसह व दुष्कर्मांत कुणाशीही संबंध नसणारा). **–हम** (ہم –) वि. (फ़ा.) (आपसातील); परस्पर. (अव्य.) मिळून मिसळून. **–हमी** (ہمی –) वि. (फ़ा.) आपसातील. **–हैसियत** (حیثیت –) वि. (फ़ा.+'अ.) पतदार; श्रीमंत; समर्थ; प्रतिष्ठित.

बा'अिस़ (باعث) पु. ('अ.) (१) कारण; निमित्त. (२) हेतू. (३) निर्माता. (४) घाया.

बा'अिस्तः (بائستہ) वि. (फ़ा.) (१) योग्य; लायक. (२) उत्तम.

बा'अे'अ (بائع) वि. ('अ.) विक्रेता.

बाक (باک) पु. (फ़ा.) (१) भय; भीती. (२) लज्जा; संकोच.

बाक़ियात (باقیات) स्त्री. पु. ('अ.) (१) उरलेल्या वस्तू. (२) शिल्लक रकमा. **–उस्-सालिहात** (الصالحات –) स्त्री. ('अ.) ज्यांच्या योगे नाव उरते अशा चांगल्या गोष्टी; चांगली मुलेबाळे.

बाक़िर (باقر) पु. ('अ.) (१) सिंह; वाघ. (२) विद्वान; पंडीत.

बाक़िरख़ानी (باقرخانی) स्त्री. (फ़ा.) एक प्रकारची कुरकुरीत भाकरी. (हिच्यात लोणी व दूध घातलेले असते).

बाकिरः (باکرہ) स्त्री. ('अ.) कुमारी; अविवाहित (स्त्री).

बाक़िलः (باقلہ) पु. ('अ.) मटार; वाटाणा.

बाकी (باکی) वि. ('अ.) रडणारा.

बाक़ी (باقی) वि. ('अ.) (१) शिल्लक उरलेला; बाकी; अवशिष्ट. (२) अमर. (३) ईश्वर. (स्त्री.) (१) बाकी. (२) वजाबाकी; वजा करणे. **–दार** (دار –) वि. ('अ. + फ़ा.) (१) ज्याच्याकडून काही येणे आहे. (२) ज्याला काही देणे आहे. **–मांदः** (ماندہ –) वि. ('अ. + फ़ा.) खाली उरलेला; अवशिष्ट.

बाख़िरः (باخرہ) स्त्री. ('अ.) आगबोट; स्टीमर.

बाख़ः (باخہ) पु. (तु.) कासव; कच्छप.

बाख़्तर (باختر) पु. (फ़ा.) पूर्व (दिशा).

बाख़्तः (باختہ) वि. (फ़ा.) (१) पराभूत. (२) गमावून, हरवून बसलेला.

बाग़ (باغ) पु. (फ़ा.) (१) उद्यान; वाटिका. (२) स्वर्ग. **–चः** (چہ –) पु. (फ़ा.) बगीचा; लहान बाग. **–पैरा** (پیرا –) वि. (फ़ा.) माळी. **–बाग़** (باغ –) वि. (फ़ा.) अत्यंत आनंदित. **–बान** (بان –) पु. (फ़ा.) उद्यानपाल; माळी. **–बानी** (بانی –) स्त्री. (फ़ा.) माळघाचे काम. **–बान-ए-अज़ल** (بان ازل –) पु. (फ़ा.+'अ.) परमेश्वर. [अनेक 'बाग़ात' (باغات) पु. (फ़ा.) अनेक बागा].

बाग़-ए-'अदन (باغ عدن) पु. (फ़ा.+'अ.) स्वर्ग; नंदनवन.

बाग़-ए-'आम (باغ عام) पु. (फ़ा.+'अ.) सार्वजनिक उद्यान.

बाग़-ओ-बहार (باغ و بہار) स्त्री. (फ़ा.) शोभा; थाट.

बाग़ाती (باغاتی) वि. (फ़ा. + हिं.) (१) बागाईत (जमीन). (२) बागांवरील कर.

बाग़ियानः (باغیانہ) वि. ('अ.+फ़ा.) बंडखोरांसारखा.

बाग़ी (باغی) वि. ('अ.) बंडखोर; हुकूम न मानणारा.

बाग़ीचः (باغیچہ) पु. (फ़ा.) बगीचा; लहान बाग.

बाज (باج) पु. (फ़ा.) कर; खंडणी; महसूल. **–गीर** (گیر –); **–दार** (دار –) वि. (फ़ा.) कर घेणारा; वसूल करणारा. **–गुज़ार** (گزار –) वि. (फ़ा.) कर, खंडणी देणारा.

बाज़ (باز) पु. (फ़ा.) बहिरीससाणा; श्येन.

बाज़ (باز) अव्य. (फ़ा.) पुनः; उलट; फिरून; परत. **–ख़्वास्त** (خواست –) स्त्री. (फ़ा.) (१) शोध; तपास. (२) दिलेली वस्तू परत मागणे. **–ख़्वाह** (خواہ –) वि. (फ़ा.) परत मागणारा; उत्तर मागणारा; चौकशी करणारा. **–गश्त** (گشت –) स्त्री. (फ़ा.) परत फिरणे; मागे येणे. **–द'अवा** (دعوی –) पु. (फ़ा.+'अ.) खटला काढून घेणे. दावा सोडणे. **–दीद** (دید –) स्त्री. (फ़ा.) परतभेट; जो भेटण्यासाठी आला असेल त्याच्या भेटीसाठी त्याच्याकडे जाणे. **–पसीं** (پسیں –) पु. (फ़ा.) शेवटचा क्षण; मरण्याची वेळ. **–पुर्स** (پرس –) स्त्री. (फ़ा.) पूसतपास; चौकशी. **–याफ़्तगी** (یافتگی –); **–याबी** (یابی –) स्त्री. (फ़ा.) पुनः मिळणे; हरवलेली वस्तू पुनः प्राप्त होणे.

बाज़रगां (بازرگاں) पु. (फ़ा.) व्यापारी.

बाज़रगानी (بازرگانی) स्त्री. (फ़ा.) व्यापार.

बाज़ार (بازار) पु. (फ़ा.) बाजार; व्यापारपेठ. **–गां** (گاں –) पु. (फ़ा.) व्यापारी.

बाज़ार-ए-हुस्न (بازار حسن) पु. (फ़ा.+'अ.) वेश्यांची गल्ली.

बाज़ारी (بازاری) वि. (फ़ा.) (१) बाजाराशी संबंधित. (२) हलकट; नीच. (३) वेश्या.

बाज़िन्दगी (بازندگی) स्त्री. (फ़ा.) (१) धूर्तता; लबाडी. (२) खेळाडूपणा.

बाज़िन्दः (بازندہ) वि. (फ़ा.) (१) धूर्त; लबाड. (२) खेळाडू.

बाज़िल (بازل) वि. ('अ.) दानशूर; उदार.

बाजी (باجی) वि. (फ़ा.) कर, खंडणी देणारा.

बाज़ी (بازی) स्त्री. (फ़ा.) (१) गंमत; मजा. (२) खेळ. (३) पण; शर्त; पैज. (४) कपट; जादू. (५) पत्ते. (६) बुद्धिबळे वगैरेचा एक डाव. (७) थट्टा; मस्करी. **–खाना** (کھانا –) हरणे; पराभूत होणे. **–गर** (گر –) वि. (फ़ा.) (१) जादूगार. (२) खेळ करणारा. **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) क्रीडांगण. **–चः** (چہ –) पु. (फ़ा.) खेळणे; खेळ; गंमत. **–चः-ए-अत्फ़ाल** (چۂ اطفال –) पु. (फ़ा.+'अ.) पोरखेळ.

बाज़ू (بازو) पु. (फ़ा.) (१) बाहू; भुजा; दंड. (२) बाही. (३) पक्ष्यांचे मोठे पंख जेथे असतात तो भाग. (४) साह्य; मदत. (५) जोर. (६) गवयाची साथ करणारा. (७) बाजू; भाग. **–बंद** (بند –) पु. (फ़ा.) दंडावर बांधावयाचा एक दागिना. **–शिकन** (شکن –) वि. (फ़ा.) शक्तिशाली; ताकदवान. **–शिकस्तः** (شکستہ –) वि. (फ़ा.) ज्याचे बाहू मोडले आहेत असा; असमर्थ; दुःखी.

बातिन (باطن) पु. ('अ.) (१) अंतःकरण; हृदय. (२) आतील भाग.

बातिनियः (باطنیہ) पु. ('अ.) मुसलमानांचा एक संप्रदाय.

बातिनी (باطنی) वि. ('अ.) (१) मानसिक; आंतरिक. (२) आतील.

बातिल (باطل) वि. ('अ.) (१) खोटे; असत्य. (२) चूक. (३) खंडित; रद्द. (४) व्यर्थ; निरर्थक; प्रभावहीन. **–शिकन** (شکن –) वि. ('अ.+फ़ा.) सत्यवान.

बादंजान (بادنجان) पु. (फ़ा.) वांगे.

बाद (باد) स्त्री. (फ़ा.) (१) हवा; वायू; वारा. (२) घमेंड; गर्व. **–कश** (کش –) पु. (फ़ा.) छताला अडकविलेला पंखा. (दोरी ओढून हा पंखा चालविला जातो). **–खायः** (خایہ –) पु. (फ़ा.) अंडवृद्धी (रोग). **–ख़ोरः** (خورہ –) पु. (फ़ा.) (१) टक्कल. (२) घोडघाचे केस गळण्याचा रोग. **–ख़्वां** (خواں –) वि. (फ़ा.) (१) बढाईखोर. (२) खुशामत्या. **–गीर** (گیر –) स्त्री. (फ़ा.) खिडकी. **–ज़न** (زن –) पु. (फ़ा.) पंखा; व्यजन. **–दस्त** (دست –) वि. (फ़ा.) (१) उघळघा. (२) दरिद्री. **–नुमा** (نما –) पु. (फ़ा.) वाऱ्याचा वेग व दिशा दर्शविणारे यंत्र. **–परां** (پراں –) वि. (फ़ा.) बढाईखोर. **–पर्वा** (پروا –) पु. (फ़ा.) खिडकी. **–पा** (پا –); **–पैमा** (پیما –) वि. (फ़ा.) वायु-वेगाने धावणारा; वेगवान. **–फ़राह** (فراہ –) पु. (फ़ा.) पापाबद्दल मिळणारी शिक्षा. **–फ़रोश** (فروش –) वि. (फ़ा.) (१) थापाडघा; फुशारकी मारणारा. (२) खुशामत्या. **–बान** (بان –) पु. (फ़ा.)

जहाजाचे शीड. **–बान-ए-अख़्दर** (بان اخضر –) पु. (फ़ा.+'अ.) आकाश. **–रीश** (ریش –) पु. (फ़ा.) अभिमान; अहंकार. **–संज** (سنج –) वि. (फ़ा.) (१) निरर्थक काम करणारा. (२) लोभी. **–ए-हवा'ई** (هوائی –) स्त्री. (फ़ा.) (१) थाप. (२) खोटा नायदा.

बाद (باد) क्रि. (फ़ा.) झाला; होवो. [फ़ा. 'बवाद' (بواد) चे संक्षिप्त]. [उदा. 'ज़िन्दः बाद' (زندہ باد) जिवंत राहो; अमर होवो. 'मुर्दः बाद' (مردہ باد) नष्ट होवो.] **–बाक़ी** (باقی–) स्त्री. (फ़ा.+'अ.) रोकड.

बाद-ए-'ईसां (باد عیسیٰ) स्त्री. (फ़ा.+'अ.) येशू ख्रिस्ताची फुंकर. (हिने मेलेले जीव जिवंत होत).

बाद-ए-ख़िज़ां (باد خزاں) स्त्री. (फ़ा.) पानगळ ऋतूतील वारा.

बाद-ए-तुंद (باد تند) स्त्री. (फ़ा.) जोराची वावटळ; झंझावात.

बाद-ए-फ़त्क़ (باد فتق) स्त्री. (फ़ा.+'अ.) अंडवृद्धी.

बाद-ए-फ़िरंग (باد فرنگ) स्त्री. (फ़ा.) उपदंश; गरमी (रोग).

बाद-ए-सबा (باد صبا) स्त्री. (फ़ा.+'अ.) सकाळचा वारा.

बाद-ए-समूम (باد سموم) स्त्री. (फ़ा.+'अ.) (१) गरम वाऱ्याची झळ; लू. (२) विषारी वायू.

बाद-ए-सर्सर (باد صرصر) स्त्री. (फ़ा.) झंझावात; वावटळ.

बाद-ए-सहर (باد سحر) स्त्री. (फ़ा.+'अ.) सकाळचा गार, मंद व सुगंधित वारा.

बादयान (بادیان) स्त्री. (फ़ा.) बडीशेप.

बादशह (بادشہ); **बादशाह** (بادشاہ) पु. (फ़ा.) राजा; सम्राट.

बादशाहत (بادشاہت); **बादशाही** (بادشاہی) स्त्री. (फ़ा.) राज्य; सत्ता.

बादाम (بادام) पु. (फ़ा.) बदाम.

बादामी (بادامی) वि. (फ़ा.) बदामी; फिक्कट पिवळा (रंग). (स्त्री.) दागिन्यांची डबी. (पु.) ज्याचे जननेंद्रिय अत्यंत लहान आहे असा जनानखान्यावरील हिजडा.

बादामः (بادامہ) पु. (फ़ा.) (१) एक प्रकारचे रेशमी कापड. (२) रेशमाचा कोष. (३) गोधडी.

बादियः (بادیہ) पु. ('अ.) वन; जंगल; अरण्य. **–गर्द** (گرد –); **–पैमा** (پیما –) वि. ('अ.+फ़ा.) जंगलात भटकणारा; रानोमाळ फिरणारा.

बादियः (بادیہ) पु. (तु.) मोठा पेला; तांब्याची मोठी वाटी.

बादी (بادی) वि. ('अ.) (१) प्रारंभकर्ता; सुरुवात करणारा. (२) व्यक्त; जाहीर.

बादी (بادی) वि. (फ़ा.) वाऱ्याशी संबंधित; वातकर.

बादी-उन्-नज़र (بادی النظر) स्त्री. ('अ.) पहिली दृष्टी; वरवरची नजर.

बादः (بادہ) स्त्री. (फ़ा.) मदिरा; मद्य. **–आशाम** (آشام –); **–कश** (کش –); **–ख़ोर** (خور –); **–ख़्वार** (خوار –); **–गुसार** (گسار –); **–नोश** (نوش –) वि. (फ़ा.) मद्यपी; दारू पिणारा. **–चश** (چش –) वि. (फ़ा.) केवळ तोंडाची चव बदलण्यासाठी थोडीशी दारू पिणारा, चाखणारा. **–परस्त** (پرست –) वि. (फ़ा.) मदिराभक्त. **–पैमा** (پیما –); **–फ़र्सा** (فرسا –); **–संज** (سنج –) वि. (फ़ा.) मद्यपान करणारा. **–साज़** (ساز –) वि. (फ़ा.) दारू तयार करणारा.

बादः-ए-अंगबीं (بادۂ انگبیں) स्त्री. (फ़ा.) मधाची दारू.

बादः-ए-रैहानी (بادۂ ریحانی) स्त्री. (फ़ा.+'अ.) अनेक प्रकारच्या फुलांपासून तयार केलेली दारू.

बान (بان) प्रत्य. (फ़ा.) वाला; रक्षक; चालविणारा. [उदा. 'बाग़बान' (باغبان) पु. (फ़ा.) माळी].

बान (بان) पु. ('अ.) एक सुगंधी झाड. याच्या फळांचे तेल औषधी असते.

बानात (بانات) स्त्री. (फ़ा.) एक प्रकारचे जाड लोकरीचे कापड; बनात.

बानी (بانی) वि. ('अ.) (१) एखाद्या कामाचा पाया घालणारा; सुरुवात करणारा. (२) नेता. (३) निमित्त; कारण. **–ए-कार** (کار–) वि. ('अ.+फ़ा.) धूर्त; लबाड. **–मबानी** (مبانی –) वि. ('अ.+फ़ा.) मूळ कारण; मूळ.

बानू (بانو) स्त्री. (फ़ा.) (१) सरदाराची बायको; पत्नी; महिला; बेगम. (२) मधाची सुरई.

बानः (بانہ) पु. (फ़ा.) ओटीपोट; उपस्थ.

बाफ़ (باف) प्रत्य. (फ़ा.) विणणारा. [उदा. 'शाल बाफ़' (شال باف) वि. (फ़ा.) शाल विणणारा.] **–कार** (کار–) वि. (फ़ा.) विणकर.

बाफ़ी (بافی) स्त्री. (फ़ा.) विणाई.

बाफ़्त (بافت) स्त्री. (फ़ा.) वीण.

बाफ़्तः (بافتہ) वि. (फ़ा.) विणलेला. (पु.) एक प्रकारचे रेशमी कापड.

बाब (باب) पु. ('अ.) (१) दार; दरवाजा. (२) अध्याय; प्रकरण (पुस्तकाचे). (३) प्रकार; विषय; मामला.

बाब (باب) पु. (फ़ा.) संबंध. (वि.) योग्य; लायक. **–क** (ک –) वि. (फ़ा.) सत्यनिष्ठ; इमानदार.

बाब-उस्-समा (باب السما) पु. ('अ.) आकाशगंगा.

बाब-ए-'अदम (باب عدم) पु. ('अ.) यमलोकाचे द्वार; यमलोक.

बाबज़न (بابزن) स्त्री. (फ़ा.) कबाब भाजण्याची लोखंडी सळई.

बाबत (بابت) स्त्री. (फ़ा.) (१) संबंध. (२) बशिला; शिफारस. (अव्य.) संबंधी; विषयी; बाबतीत.

बाबर (بابر) पु. (तु.) हुमायूनचा पिता, बाबर बादशहा. (मूळ उच्चार : बाबुर).

बाबा (بابا) पु. ('अ.) (१) पिता; बाप. (२) आजोबा. (३) सरदार. (४) साधू; बुवा.

बाबा-ए-मिल्लत (بابائے ملت); **बाबा-ए-क़ौम** (بابائے قوم) पु. ('अ.) राष्ट्रपिता.

बाबिल (بابل) पु. ('अ.) इराकचे एक प्राचीन शहर; बॅबिलोनिया.

बाबी (بابی) पु. (फ़ा.) सैय्यद अली मुहम्मद इराणी याने स्थापन केलेला एक पंथ.

बाबूनः (بابونہ) पु. (फ़ा.) एक औषधी वनस्पती.

बाबूर (بابور) पु. ('अ.) आगबोट; स्टीमर.

बाम (بام) पु. (फ़ा.) गच्ची; छत. **–गाह** (گاہ–) स्त्री. (फ़ा.) पहाट; प्रभात. **–दाद** (داد –) अव्य. (फ़ा.) सकाळी; पहाटे.

बाम-ए-'अर्श (بام عرش) पु. (फ़ा. + 'अ.) आठव्या स्वर्गाची गच्ची; सर्वोच्च स्थान.

बाम-ए-दुनिया (بام دنیا) पु. (फ़ा.+'अ.) जगाचे छत; पामीरचे पठार.

बायद (باید) क्रि. (फ़ा.) पाहिजे; हवा. (अव्य.) जसा हवा तसा.

बायद-ओ-शायद (باید وشاید) वि. (फ़ा.) (१) अद्भुत; विचित्र. (२) जसा हवा तसा; योग्य.

बायस्तः (بایستہ) वि. (फ़ा.) (१) आवश्यक. (२) योग्य; लायक.

बार (بار) पु. (फ़ा.) (१) ओझे; भार. (२) गर्भ. (३) फळ; झाडाचे मूळ; फांदी. (४) आज्ञा; परवानगी. (५) दार; दरवाजा. (६) प्रवेश; पोच. (७) कर्ज; ऋण. (स्त्री.) वेळ; खेप; पाळी. (वि.) नावडता; कष्टदायक; भारी. (प्रत्य.) वर्षाव करणारा. [उदा. 'अश्कबार' (اشک بار) वि. (फ़ा.) अश्रू ढाळणारा.] **–अंदाज़** (انداز –) पु. (फ़ा.) उतरणे; थांबणे; मुक्काम करणे. **–आवर** (آور –) वि. (फ़ा.) (१) फळे लागलेला; फळदार. (२) गर्भवती. (३) सफळ; परिणामकारक. **–कश** (کش –) वि. (फ़ा.) (१) भारवाहक; हमाल. (२) ओझे वाहणारे जनावर. **–खानः** (خانہ –) पु. (फ़ा.) (१) सामान ठेवण्याचे घर; खोली. (२) सामान-सुमान. **–गह** (گہ –); **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) (१) दरबार; राजसभा. (२) न्यायालय; कचेरी. **–गी** (گی –) (फ़ा.) घोडा. **–गीर** (گیر –) पु. (फ़ा.) (१) ओझ्याचे जनावर; घोडा, उंट, बैल. (२) साईस; मोतद्दार. (३) स्वतःचा घोडा नसलेला सैनिक, घोडेस्वार. **–दान** (دان –); **–दानः** (دانہ –) पु. (फ़ा.) ज्यात सामान, ओझे ठेवले जाते अशी वस्तू; पोते; बोरा. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) (१) फळांनी लवलेला; फलित. (२) गर्भवती स्त्री. **–फ़रोश** (فروش –) वि. (फ़ा.) मालाची ठोक विक्री करणारा. **–बर** (بر –); **–बरदार** (بردار –) वि. (फ़ा.) ओझे वाहणारा; हमाल. **–याब** (یاب –) वि. (फ़ा.) ज्याला दरबारात किंवा इतर मोठ्या जागी जाण्याची परवानगी मिळालेली आहे असा. **–वर** (ور –) वि. (फ़ा.) (१) फळे लागलेला; फलित. (२) सफल; यशस्वी. (३) मुलेबाळे असलेला.

बार-ए-'आम (بار عام) पु. (फ़ा. + 'अ.) सर्वांना प्रवेश; मुक्तद्वार.

बार-ए-ख़ातिर (بار خاطر) पु. (फ़ा.+'अ.) मनावरील ओझे; अप्रिय, कष्टदायक गोष्ट.

बारहा (بارہا) अव्य. (फ़ा.) अनेकदा; वारंवार; बहुधा; प्रायः.

बारां (باراں); **बारान** (باران) पु. (फ़ा.) (१) पाऊस. (२) पावसाळा. **–गीर** (گیر –) पु. (फ़ा.) घराचे छप्पर किंवा गच्ची. **–दीदः** (دیدہ –) वि. (फ़ा.) (१) ज्याच्यावर पाऊस पडला आहे असा. (२) अनुभवी; बनेल. **–बार** (بار–) पु. (फ़ा.) अत्यंत अधिक पावसाचा प्रदेश.

बारान-ए-रहमत (باران رحمت) पु. (फ़ा. + 'अ.) वर्षा; फायदेशीर पाऊस.

बारानी (بارانی) स्त्री. (फ़ा.) रेनकोट. (वि.) केवळ पावसाच्या पाण्यावर पिकणारी जमीन.

बारिक़ (بارق) वि. ('अ.) प्रकाशमान; तेजस्वी.

बारिक़ः (بارقہ) स्त्री. ('अ.) (१) बीज; विद्युत. (२) तलवार.

बारिज़ (بارز) वि. ('अ.) (१) प्रकट; व्यक्त; जाहीर; स्पष्ट. (२) आविर्भूत; उत्पन्न.

बारिद (بارد) वि. ('अ.) (१) थंड; गार. (२) नीरस बेचव.

बारिया (باریا) वि. (फ़ा.) पाखंडी, नास्तिक.

बारियादत (باریاضت) वि. (फ़ा.+'अ.) तपस्वी; योगी.

बारिश (بارش) स्त्री. (फ़ा.) (१) पाऊस; वर्षा. (२) पावसाळा.

बारी (باری) पु. ('अ.) सृष्टिकर्ता; निर्माता; परमेश्वर.

बारी (باری) स्त्री. (फ़ा.) पाळी; प्रसंग.

बारीक (باریک) वि. (फ़ा.) (१) बारीक; पातळ. (२) लहान; सूक्ष्म. (३) नाजुक. (४) कौशल्यपूर्ण. **-ख़याल** (خیال –) वि. (फ़ा.+'अ.) सूक्ष्म विचार करणारा. **-बीं** (بیں –) वि. (फ़ा.) सूक्ष्मदर्शी. **-मियाँ** (میاں –) वि. (फ़ा.) कृशकटी, बारीक कंबर असलेली. **-रौ** (رو –) वि. (फ़ा.) काटकसरी; मितव्ययी.

बारीकी (باریکی) स्त्री. (फ़ा.) (१) सूक्ष्मता. (२) बारीकपणा. (३) खुबी; मक्खी. (४) गूढता; जटिलता. **-निकालना** (نکالنا –) सूक्ष्म गुणदोष शोधून काढणे; टीका करणे.

बारीक: (باریکہ) पु. (फ़ा. + हिं.) (१) सूक्ष्म रेषा काढण्याचा चित्रकारांचा कुंचला, ब्रश. (२) समास; कड.

बारूत (باروت); **बारूद** (بارود) स्त्री. (फ़ा.) (१) स्फोटाची दारू. (२) शोभेची दारू.

बारे (بارے) अव्य. (फ़ा.) (१) असो; अस्तु. (२) एक वेळ. (३) अखेर; शेवटी.

बार: (بارہ) पु. (फ़ा.) (१) विषय; संबंध. (२) प्रसंग; वेळ. **-में** (میں –) (अव्य.) विषयी; संबंधी.

बार:इमाम (بارہ امام) पु. (हिं. + 'अ.) मुसलमानांचे बारा धार्मिक नेते. (सर्व हज़रत 'अली; हसन; हुसैन; ज़ैन-उल्-'आबिदीन; बाक़र; ज'अफ़र सादिक़; मूसा काज़िम; 'अली रज़ा; मुहम्मद नक़ी; मुहम्मद तक़ी; हसन 'अस्करी; मेहदी).

बार:वफ़ात (بارہ وفات) स्त्री. (हिं.+फ़ा.) रबी-उल्-अव्वल महिन्याची बारावी तारीख; मुहम्मद साहेबांची पुण्यतिथी.

बाल (بال) पु. ('अ.) (१) प्राण; जीव. (२) दशा; स्थिती. (३) समृद्धी; सुख; संपत्ती. (४) वैभव. (५) श्रेष्ठत्व.

बाल (بال) पु. (फ़ा.) (१) खांद्यापासून बोटापर्यंत संपूर्ण हात. (२) ज्यांच्या आधाराने पक्षी उडतो ते मोठे पंख. **-अफ़्शाँ** (افشاں –) वि. **-कुशा** (کشا –) (फ़ा.). पंख पसरविलेला; पंख फडफडविणारा.

बाल-ए-जिब्रील (بال جبریل) पु. (फ़ा.+'अ.) जिब्रील या देवदूताचे पंख; जिब्रीलचा आकाशातील विहार.

बाल-ए-हुमा (بال ہما) पु. (फ़ा.) हुमा पक्ष्याचे पंख. (याची सावली ज्याच्यावर पडते तो राजा होतो, अशी समजूत).

बाल-ओ-पर (بال و پر) पु. (फ़ा.) पंख व बाहू; सामर्थ्य.

बाला (بالا) वि. (फ़ा.) (१) उंच; वरचा. (२) वरील; उल्लिखित. (३) श्रेष्ठ. (पु.) शरीर; देह. (अव्य.) वर; वरती; समोर; पुढे. **-खान:** (خانہ –) पु. (फ़ा.) गच्चीवरील खोली; बैठकीची माडी. **-तर** (تر –) वि. (फ़ा.) उच्चतर. **-दवी** (دوی –)स्त्री. (फ़ा.) शीघ्रगती; वेग. **-दस्त** (دست –) वि. (फ़ा.) (१) श्रेष्ठ; मुख्य. (२) बलवान. (३) उच्च अधिकारी. **-नशीं** (نشیں –) वि. पु. (फ़ा.) (१) पूज्य; प्रतिष्ठित. (२) अध्यक्ष. (३) सर्वोच्च आसन. (४) उच्च पदस्थ. **-पोश** (پوش –) पु. (फ़ा.) सर्वांत वरचा कपडा; पलंगपोस. **-बाला** (بالا –) अव्य. (फ़ा.) (१) वरच्यावर. (२) गुप्तपणे; न बोलता.

बाला-ए-ताक़ (بالائے طاق) वि. (फ़ा.) खुंटीवर ठेवलेला; वेगळा; अलग.

बाला'ई (بالائی) वि. (फ़ा.) वरचा; वरील; मूळच्या व्यतिरिक्त; जास्तीचा. (स्त्री.) साय; मलई.

बालिग़ (بالغ) वि.('अ.) वयात आलेला; प्रौढ. **-नज़र** (نظر –) वि. ('अ.) (१) अनुभवी; परिपक्व. (२) मर्मज्ञ. **-निगार** (نگار –) वि. ('अ.+फ़ा.) ज्याच्या लिखाणात खोली व गांभीर्य आहे असा.

बालिश (بالش) पु. (फ़ा.) (१) उशी; उसे. (२) तक्या.

बालिश्त (بالشت) स्त्री. (फ़ा.) (१) वीत (माप). (२) उशी. **-क** (ک –) पु. (फ़ा.) टाचण्या खोचून ठेवण्याची उशी; पिन कुशन.

बाली (بالیں); **बालीन** (بالین) स्त्री. (फ़ा.) (१) उशी; तक्या. (२) उसे. **-परस्त** (پرست –) वि. (फ़ा.) अंथरुणात लोळणारा; सुखासीन.

बालीदगी (بالیدگی) स्त्री. (फ़ा.) विकास; वाढ.

बालीद: (بالیدہ) वि. (फ़ा.) वाढलेला; विकसित.

बालू'अ: (بالوعہ) पु. ('अ.) पावसाचे किंवा घरातील सांडपाणी जिच्यात गोळा होते ती कुंडी.

बालून (بالون) पु. ('अ.) फुगा; आकाशयान.

बावर (باور) पु. (फ़ा.) विश्वास; खात्री.

बावर्ची (باورچی) पु.(फ़ा.+तु.) आचारी; स्वयंपाकी, वबर्जी. **-खान:** (خانہ –) पु. (तु.+फ़ा.) स्वयंपाकघर. **-गरी** (گری –) स्त्री. (तु.+फ़ा.) स्वयंपाक्याचे काम, पेशा.

बाश (باش) क्रि. (फ़ा.) राहा; थांब. (प्रत्य.) राहाणारा. [उदा. 'हादिर बाश' (حاضر باش) वि. ('अ. + फ़ा.) थोरामोठ्यांजवळ सदैव हजर राहाणारा].

बाशद (باشد) क्रि. (फ़ा.) असेल. (अव्य.) कदाचित; काहीही असो; त्याची पर्वा नाही.

बाशा (باشا) पु. (तु.) एक मोठी पदवी बाशा.

बाशिंदः (باشندہ) वि. (फ़ा.) राहाणारा; निवासी.

बाशी (باشی) पु. (तु.) नायक; सरदार.

बाशः (باشہ) पु. (फ़ा.) एक शिकारी पक्षी.

बासक (باسک) स्त्री. (फ़ा.) जांभई.

बासलीक़ून (باسلیقون) स्त्री. ('अ.) (१) शाई. (२) काळिमा; काळेपणा.

बासित (باسط) वि. ('अ.) उन्नती व विकास करणारा; ईश्वर.

बासिरः (باصرہ) स्त्री. ('अ.) दृष्टी; नजर; दृक्शक्ती.

बासूर (باسور) स्त्री. ('अ.) (१) मूळव्याध. (२) नाकातील मांस वाढणे.

बास्तां (باستان) वि. (फ़ा.) प्राचीन; पुरातन.

बाह (باہ) स्त्री. ('अ.) कामशक्ती; मैथुनशक्ती.

बाहिर (باہر) वि. ('अ.) स्पष्ट; व्यक्त; जाहीर.

बाहूर (باحور) पु. ('अ.) अत्यंत कडक उन्हाळ्याचे आठ दिवस.

बित (بنت) स्त्री. ('अ.) मुलगी; कन्या.

बित-उल्-'अम्म (بنت العم) स्त्री. ('अ.) काकाची मुलगी; चुलत बहीण.

बित-उल्-'अिन्ब (بنت العنب) स्त्री. ('अ.) द्राक्ष-कन्या; मदिरा.

बिअल्क़ाबिहि (بالقاب) अव्य. ('अ.) आपल्या साऱ्या पदव्यांसह. (ज्याच्या नावापुढे पुष्कळ पदव्या असतील त्याच्या बाबतीत सर्व पदव्या न लिहिता हा शब्द लिहिला जातो).

बि'आद (بعاد) स्त्री. ('अ.) अंतर; दूरत्व.

बिक्र (بکر) स्त्री. ('अ.) कुमारी. (वि.) पूर्वी कधी न झालेले काम.

बिग (بگ) पु. [तु. 'बेग' (بیگ) चे संक्षिप्त.] नायक; सरदार. **-ताश** (تاش –); **-यारुक़** (یارق –) पु. (तु.) (१) ज्याच्याजवळ पुष्कळ दासदासी आहेत असा. (२) एकाच मालकाचे दास व दासी. **-बाशी** (باشی –) पु. (तु.) सेनापती.

बिग़ाल (بغال) पु. ('अ.) खेचर.

बिज़न (بزن) पु. (फ़ा.) (१) वध; कत्तल. (२) सामुदायिक कत्तल. (क्रि.) मार ठार मार.

बिज़ातिहि (بذاتہ) अव्य. ('अ.) स्वतः; आपण होऊन.

बिजिन्सिहि (بجنسہ) अव्य. ('अ.) अगदी तसाच; हूबेहूब.

बितमामिहि (بتمام) अव्य. ('अ.) पूर्णपणे; संपूर्णतया.

बित्तालत (بطالت) स्त्री. ('अ.) शौर्य; बहादुरी.

बित्तीख़ (بطیخ) पु. ('अ.) खरबूज.

बित्तीख़-ए-अख़्ज़र (بطیخ اخضر) पु. ('अ.) टरबूज; कलिंगड.

बित्यारः (بتیارہ) पु. (फ़ा.) (१) आपत्ती; संकट (२) जादू; हातचलाखी. (३) भूतपिशाच.

बित्रीक़ (بطریق) पु. ('अ.) पाद्री; ख्रिश्चन धर्मगुरू.

बिद'अत (بدعت) स्त्री. ('अ.) (१) नवीन गोष्ट; प्रथा. (२) इस्लाम धर्मामध्ये मुहम्मद साहेबांच्या वेळी नसलेली व नंतर आलेली गोष्ट; प्रथा. (३) युद्ध; भांडण. (४) जुलूम; अत्याचार.

बिदा'अत (بدائت) स्त्री. ('अ.) आरंभ; सुरुवात.

बिदा'अत (بضاعت) स्त्री. ('अ.) (१) सामर्थ्य. (२) भांडवल; पैसा. (३) हिस्सा.

बिबिस्त (بدست) स्त्री. (फ़ा.) वीत (माप).

बिबून (بدون) अव्य. ('अ.) शिवाय; खेरीज; विना.

बि'द्-दरूर (بالضرور) अव्य. ('अ.) अवश्य; जरूर.

बि'द्-दरूरत (بالضرورت) अव्य. ('अ.) जरूर पडल्यास; गरजेच्या वेळी.

बिद्रुद (بدرود) स्त्री. (फ़ा.) (१) निरोप देणे; पाठवणी करणे. (२) त्याग करणे.

बिन (بن) पु. ['अ. 'इब्न' (ابن) पासून.] पुत्र; मुलगा.

बिनसर (بنصر) स्त्री. ('अ.) करंगळीजवळचे बोट; अनामिका.

बिना (بنا) स्त्री. ('अ.) (१) पाया. (२) आधार. (३) कारण. (४) उद्गम; मूळ; आरंभ

बिना-ए-मुख़ासमत (بنائے مخاصمت) स्त्री. ('अ.) भांडणाचे मूळ; फिर्यादीचा आधार.

बिना'अन्'अलैह (بناءً علیہ) अव्य. ('अ.) या कारणाने; या आधारावर.

बिनाबर (بنابر) अव्य. ('अ. + फ़ा.) यासाठी; म्हणून.

बिनीयः (بنیہ) स्त्री. ('अ.) (१) पाया; आधार. (२) सृष्टी; निर्मिती. (३) प्रकृती; स्वभाव. (४) अस्तित्व.

बिफ़द्लिहि (بفضلہ) अव्य. ('अ.) ईश्वराच्या कृपेने.

बियाबां (بیابان); **बियाबान** (بیابان) पु. (फ़ा.) अरण्य; जंगल. **-गर्द** (گرد –); **-नवर्द** (نورد –) वि. (फ़ा.) जंगलात भटकणारा.

बियाबान-ए-क़ुद्स (بیابان قدس) पु. (फ़ा.+'अ.) जेरूसलेमचे जंगल.

बिरंज (برنج) पु. (फ़ा.) तांदूळ.

बिरजीस (برجیس) पु. ('अ.) गुरू; बृहस्पती.

बिरिंज (برنج) पु. (फ़ा.) (१) पितळ; तांबे व जस्त मिसळून तयार केलेली एक धातू; ब्रॉझ. (२) तांदूळ.

बिरिंदतः (برشتہ) वि. (फ़ा.) भाजलेला; पोळलेला; होरपळलेला. **–क़ल्ब** (قلب –) वि. (फ़ा.+'अ.) ज्याचे हृदय पोळलेले आहे असा; प्रेमी.

बिर्यां (بریاں) वि. (फ़ा.) भाजलेला; तळलेला.

बिर्यानी (بریانی) स्त्री. (फ़ा.) तळलेले किंवा भाजलेले मांसाचे तुकडे ज्यात घातले आहेत असा मसालेभात; पुलाव.

बिर्र (بر) पु. ('अ.) (१) उपकार; भलाई. (२) पुण्य. (३) दान.

बिला (بلا) अव्य. ('अ.) विना; शिवाय; रहित. **–इश्तिबाह** (اشتباہ –) अव्य. ('अ.) निःसंदेह; खात्रीने. **–तकल्लुफ़** (تکلف –) अव्य. ('अ.) निःसंकोचपणे. **–तवक्कुफ़** (توقف –) अव्य. ('अ.) अविलंब; ताबडतोब. **–तिहाशा** (تحاشا –); **–दिरेग़** (دریغ –) अव्य. ('अ.) (१) अविचाराने (२) भरघाव. **–नाग़ः** (ناغہ –) अव्य. ('अ.+तु.) न चुकता; अखंडपणे. **–बजह** (وجہ –) अव्य. ('अ.) विनाकारण; निष्कारण. **–वासितः** (واسطہ –) अव्य. ('अ.) प्रत्यक्षपणे; सरळसरळ. **–शक** (شک –); **–शुबः** (شبہ –) अव्य. ('अ.) निःसंशय; नक्की; खात्रीने.

बिलाद (بلاد) पु. ['अ. 'बलद' (بلد) चे अनेक.] नगर; राष्ट्र.

बिलाद-ए-इस्लामियः (بلاد اسلامیہ) पु. ('अ.) जेथे मुसलमानांची सत्ता आहे अशी राष्ट्रे.

बिलाहत (بلاہت) स्त्री. ('अ.) संसारिक गोष्टींत बुद्धी न चालणे.

बिलौर (بلور); **बिल्लौर** (بلور) पु. ('अ.) (१) बिलोरी आरसा. (२) स्फटिक मणी.

बि'ल्-'अक्स (بالعکس) अव्य. ('अ.) उलट; विरुद्ध; विपरीत.

बि'ल्-आख़िर (بالآخر) अव्य. ('अ.) शेवटी; अखेर.

बि'ल्-'उमूम (بالعموم) अव्य. ('अ.) सामान्यतः; बहुधा; प्रायः.

बि'ल्-क़स्द (بالقصد) अव्य. ('अ.) जाणूनबुजून; मुद्दाम.

बि'ल्-कुल (بالکل) अव्य. ('अ.) (१) पूर्णपणे; अत्यंत. (२) मुळीच. (३) अगदी; बिलकुल.

बि'ल्-ख़ुसूस (بالخصوص) अव्य. ('अ.) विशेषतः; खास करून; मुख्यत्वे.

बि'ल्-जब्र (بالجبر) अव्य. ('अ.) बळजबरीने; जबरदस्तीने.

बि'ल्-जुम्लः (بالجملہ) अव्य. ('अ) (१) एकूण; थोडक्यात. (२) सामान्यतः. (३) पूर्णपणे.

बि'ल्-फ़र्ज़ (بالفرض) अव्य. ('अ.) गृहीत धरून; कल्पना करून.

बि'ल्-फ़'अल (بالفعل) अव्य. ('अ.) या वेळी; आता.

बि'ल्-मुक़ाबिल (بالمقابل) अव्य. ('अ.) समोरासमोर; विरुद्ध.

बि'ल्-मुक़ित'अ (بالمقطع) वि. ('अ.) बाकी न ठेवता दिलेली (रक्कम); पूर्ण केलेला (हिशेब).

बि'ल्-यक़ीन (بالیقین) अव्य. ('अ.) खात्रीपूर्वक.

बि'ल्-वजह (بالوجہ) अव्य. ('अ.) कारणवश; कारणाने; सबबीवरून.

बि'ल्-वास्तः (بالواسطہ) अव्य. ('अ.) अप्रत्यक्षपणे; एखाद्याच्या मार्फत.

बिशारत (بشارت) स्त्री. ('अ.) शुभ समाचार; शुभ वर्तमान; ईश्वरी आदेश.

बिसात (بساط) स्त्री. ('अ.) (१) अंथरण्याची वस्तू; सतरंजी; अंथरूण. (२) सोंगट्या किंवा बुद्धिबळे याचा पट; सारीपट. (३) साहस; हिम्मत. (४) सामर्थ्य. (५) भांडवल. (६) पत. (७) अस्तित्व. (८) थर.

बिसात-ए-ख़ाक (بساط خاک) स्त्री. ('अ.+फ़ा.) पृथ्वीतल.

बिसात-ख़ानः (بساط خانہ) पु. ('अ.+फ़ा.) स्टेशनरी मालाचे दुकान; स्टेशनरी मालाचा बाजार.

बिसाती (بساطی) पु. ('अ.) (१) किरकोळ वस्तू विकणारा; जनरल मर्चंट; स्टेशनरी माल विकणारा. (२) फेरीवाला.

बिस्त (بست) वि. (फ़ा.) बीस.

बिस्तर (بستر) पु. (फ़ा.) बिछाना; शय्या. **–बंद** (بند –) पु. (फ़ा.) होल्डॉल.

बिस्मिल (بسمل) वि. (फ़ा.) (१) घायाळ; जखमी. (२) बळी दिलेला पशू. (३) प्रियकर; प्रेमी. **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) (१) वधस्थान. (२) बलिवेदी.

बिस्मि'ल्लह (بسم اللہ) ('अ.) (१) देवाच्या नावाने. [कुराणातील पहिले वाक्य असे आहे: **बिस्मि'ल्-लह हि'र्-रहमानि'र्-रहीम** (بسم اللہ الرحمن الرحیم) अत्यंत दयाळू व कनवाळू अशा त्या परमेश्वराच्या नावाने मी सुरुवात करतो. या वाक्यातील हा अंश

आहे.] कोणतेही कार्य सुरू करताना हा शब्द उच्चारला जातो. (२) श्रीगणेशा; प्रारंभ.

बिस्यार (بسیار) वि. (फ़ा.) अधिक; प्रचुर; पुष्कळ. **–खोर** (خور –) वि. (फ़ा.) खादाड. **–गो** (گو –) वि. (फ़ा.) बडबड्या.

बिस्यारी (بسیاری) स्त्री. (फ़ा.) बाहुल्य; आधिक्य.

बिह (به) वि. (फ़ा.) उत्तम; चांगला.

बिहिल (بهل) वि. (फ़ा.) माफ; क्षमा.

बिहिश्त (بهشت) पु. (फ़ा.) स्वर्ग.

बिहिश्त-ए-बरीं (بهشت برین) पु. (फ़ा.) सर्वांत वरचा स्वर्ग.

बिहिश्ती (بهشتی) वि. (फ़ा.) स्वर्गीय.

बिही (بهی) पु. (फ़ा.) एक कठीण आंबट फळ. **–दानः** (دانه –) पु. (फ़ा.) बिट्टी फळाचे बी; एक औषध.

बीं (بین) प्रत्य. (फ़ा.) पाहाणारा. [उदा. 'दूर बीं' (دوربین) वि. (फ़ा.) दूरचे पाहाणारा; दूरदर्शी].

बी (بی) स्त्री. (फ़ा.) [तु. 'बीबी' (بی بی) चे संक्षिप्त.] स्त्री; महिला; बाईसाहेब. **–चः** (چه –) पु. (फ़ा.+तु.) प्रेमपात्र. (स्त्री.) प्रेयसी.

बीना (بینا) वि. (फ़ा.) (१) पाहाणारा; डोळस. (२) बुद्धिमान; हुशार. **–'ई** (ئی –) स्त्री. (फ़ा.) (१) पाहाण्याची शक्ती; दृष्टी. (२) बुद्धिमत्ता.

बीनिश (بینش) स्त्री. (फ़ा.) दृष्टी; नजर.

बीनी (بینی) स्त्री. (फ़ा.) नाक; नासिका.

बीबी (بی بی) स्त्री. (तु.) (१) बेगम; कुलीन स्त्री. (२) पत्नी.

बीम (بیم) पु. (फ़ा.) (१) भीती; भय. (२) निराशा. (३) धोका.

बीम-ओ-रजा (بیم و رجا) पु. (फ़ा.+'अ.) निराशा व आशा.

बीमार (بیمار) वि. (फ़ा.) आजारी; रोगी; रुग्ण. **–खानः** (خانه –) पु. (फ़ा.) रुग्णालय; हॉस्पिटल. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) (१) रोग्याची शुश्रूषा करणारा. (२) परिचारिका. **–पुर्सी** (پرسی –) स्त्री. (फ़ा.) आजाऱ्याची विचारपूस.

बीमारी (بیماری) स्त्री. (फ़ा.) आजार; रोग; व्याधी.

बीमः (بیمه) पु. (फ़ा.) (१) विमा. (२) एखादा माल किंवा रक्कम दुसऱ्या ठिकाणी सुरक्षित नेऊन पोचविण्यासाठी दिला जाणारा कर (सरकारला किंवा व्यक्तीला). (३) हमी.

बीर (بیر) पु. ('अ.) विहीर; आड.

बीवी (بیوی) स्त्री. (तु. + फ़ा.) (१) पत्नी. (२) बेगम; कुलीन स्त्री.

बुंदुक़ः (بندقه) पु. ('अ.) गोळी; बंदुकीची गोळी.

बुक़'अः (بقعه) पु. ('अ.) (१) घर. (२) मंदीर; मठ. (३) स्थान.

बुक़चः (بقچه) पु. (फ़ा.) कपड्यांचे लहान गाठोडे.

बुका (بکا) स्त्री. ('अ.) रुदन; विलाप.

बुकावुल (بکاول) पु. (फ़ा.) बादशहाच्या स्वयंपाक-घरावरील (मुदपाकखान्यावरील) अधिकारी.

बुक़ूल (بقول) स्त्री. ['अ. 'बक़्लः' चे अनेक.] पालेभाज्या; फळभाज्या.

बुक्म (بکم) वि. ['अ. 'अबकुम' (ابکم) मुके लोक.] मुकी माणसे.

बुख़ला (بخلا) वि. ['अ. 'बखील' (بخیل) चे अनेक.] कृपण माणसे.

बुख़ार (بخار) पु. (फ़ा.) (१) ताप; ज्वर. (२) वाफ; बाष्प. (३) द्वेष; क्रोध.

बुख़ारा (بخارا) पु. (फ़ा.) रशियन तुर्कस्थानचे एक प्रसिद्ध शहर व राजधानी. (येथील सौंदर्य प्रसिद्ध आहे).

बुख़ारात (بخارات) पु. [फ़ा. 'बुख़ार' (بخار) चे अनेक.] वाफा.

बुख़ारी (بخاری) वि. (फ़ा.) वाफेसंबंधी; वाफेवर चालणारे (यंत्र); बुख़ारा येथील राहाणारा. (स्त्री.) धान्याची कोठी.

बुख़ूर (بخور) पु. ('अ.) धूप वगैरेची धुरी; औषधी वस्तूंची धुरी.

बुख़्ल (بخل) पु. ('अ.) कृपणता; चिक्कूपणा.

बुग़ारः (بغاره) पु. (फ़ा.) (१) मालवाहू नौका. (२) कपड्याला किंवा भितीला पडलेले मोठे भोक; भोसका.

बुग़्चः (بغچه) पु. (फ़ा.) काखेत घेता येईल असे लहान गाठोडे.

बुग़्ज़ (بغض) पु. ('अ.) द्वेष; शत्रुत्व (मनात ठेवलेले).

बुज़ (بز) स्त्री. (फ़ा.) शेळी; बकरी. **–अख़फ़श** (اخفش –) वि. (फ़ा.) अडाणी; काही कळत नसताना मान डोलावणारा. **–गर** (گر –) वि. (फ़ा.) मेंढ्यांची टक्कर लावणारा. **–गालः** (غاله –) पु. (फ़ा.) शेळीचे पारडू; कोकरू. **–गीर** (گیر –) वि. (फ़ा.) (१) चोर. (२) लबाड. **–जिगर** (جگر –); **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) भित्रा; भ्याड. **–दिली** (دلی –) स्त्री. (फ़ा.) भ्याडपणा; भित्रेपणा. **–बाज़** (باز –) वि. (फ़ा.) माकडवाला; शेळी व माकड यांचा खेळ करणारा.

बुज्ञाक़ (بزاق) पु. ('अ.) थुंकी; लाळ.

बुज़ुर्ग (بزرگ) वि. (फ़ा.) (१) श्रेष्ठ; प्रतिष्ठित; पूज्य. (२) वयोवृद्ध. (३) पूर्वज. (४) महात्मा; साधुसंत. (व्यंग.) लबाड; बदमाश. **–ज़ादः** (زاده –) वि. पु. (फ़ा.) उच्चकुलीन; खानदानी. **–वार** (وار –) वि. (फ़ा.) (१) पूज्य; आदरणीय. (२) वृद्ध. (३) पूर्वज. **–साल** (سال –) वि. (फ़ा.) वयोवृद्ध.

बुज़ुर्गी (بزرگی) स्त्री. (फ़ा.) (१) प्रतिष्ठा; अदब; मान. (२) श्रेष्ठत्व. (३) वृद्धत्व.

बुज़ूर (بزور) पु. ['अ. 'बज़र' (بزر) चे अनेक.] भाज्या वगैरेचे बी.

बुत (بت) पु. (फ़ा.) (१) मूर्ती; प्रतिमा. (२) प्रेयसी; नायिका. (३) गप्प बसलेला. **–कदः** (کده –); **–ख़ानः** (خانه –) पु. (फ़ा.) (१) मंदीर; मूर्तिगृह. (२) प्रेयसीचे निवासस्थान. **–तराश** (تراش –) वि. (फ़ा.) मूर्तिकार. **–परस्त** (پرست –) वि. (फ़ा.) (१) मूर्तिपूजक. (२) प्रेमी; प्रियकर. **–परस्ती** (پرستی –) स्त्री. (फ़ा.) मूर्तिपूजा. **–फ़रोश** (فروش –) वि. (फ़ा.) मूर्ती विकणारा. **–शिकन** (شکن –) वि. (फ़ा.) मूर्तिभंजक. [अनेक 'बुतान' (بتان) अनेक मूर्ती].

बुतान-ए-आज़री (بتان آذری) पु. (फ़ा.) हजरत इब्राहीम यांचे पिता आज़र यांनी बनविलेल्या सुंदर व कलापूर्ण मूर्ती.

बुतून (بطون) पु. ['अ. 'बत्न' (بطن) चे अनेक.] (१) पोटे. (२) रहस्ये.

बुतैन (بطین) पु. ('अ.) भरणी (नक्षत्र).

बुत्लान (بطلان) पु. ('अ.) (१) खंडन; खोडून काढणे. (२) नाश.

बुद (بد) क्रि. [फ़ा. 'बूद' (بود) चे संक्षिप्त.] होता.

बुद्द (بد) पु. ('अ.) उपचार; उपाय.

बुन (بن) स्त्री. पु. (फ़ा.) (१) वृक्ष; झाड. (२) झाडाचे मूळ. (३) कॉफीचे बुंद. (४) शेवट; अखेर. **–गाह** (گاه –) स्त्री. (फ़ा.) कोठार.

बुनागोश (بناگوش) स्त्री. (फ़ा.) कानाचे पाळे.

बुनियाद (بنیاد) स्त्री. (फ़ा.) **बुन्यान** (بنیان) स्त्री. ('अ.) (१) पाया; आधार. (२) मूळ; प्रारंभ. (३) सामर्थ्य. (४) अस्तित्व. (५) सृष्टी; निर्मिती. (६) मुद्दल; भांडवल.

बुनीयः (بنیه) स्त्री. ('अ.) (१) आधार; पाया. (२) स्वभाव; प्रकृती. (३) अस्तित्व. (४) सृष्टी; निर्मिती.

बुन्करी (بنکری) स्त्री. (फ़ा.) खरपुडी; भांडघाच्या तळाला लागलेला भात.

बुयूत (بیوت) पु. ['अ. 'बैत' (بیت) चे अनेक.] अनेक घरे.

बुराक़ (براق) पु. ('अ.) (१) ज्याच्यावर बसून हजरत मुहम्मद पैगंबर स्वर्गात गेले होते तो घोडा. (२) घोडघाचे शरीर व माणसाचा चेहरा असलेला ताबूत.

बुरादः (براده) पु. (फ़ा.) चूर्ण; चुरा; भुसा (मुख्यतः लाकडाचा किंवा धातूचा).

बुरिंदः (برنده) वि. (फ़ा.) कापणारा; चिरणारा.

बुरिश (برش) स्त्री. (फ़ा.) धार (तलवारीची); तीक्ष्णता.

बुरीद (برید) स्त्री. (फ़ा.) कापणी; कापणे.

बुरीदः (بریده) वि. (फ़ा.) कापलेला; विच्छिन्न. **–गोश** (گوش –) वि. (फ़ा.) ज्याचे कान कापले आहेत असा.

बुर्रे (برون); **बुरून** (برون) अव्य. (फ़ा.) बाहेर.

बुरूक़ (بروق) स्त्री. ['अ. 'बर्क़' (برق) चे अनेक.] विजा.

बुरूज (بروج) पु. ['अ. 'बुर्ज' (برج) चे अनेक.] राशी.

बुरूत (بروت) स्त्री. ('अ.) मिशी; मिशा.

बुरूदत (برودت) स्त्री. ('अ.) थंडी; शीतलता.

बुर्क़'अ (برقع) पु. ('अ.) बुरखा; मुखवस्त्र. **–पोश** (پوش –) वि. ('अ.+फ़ा.) बुरखा घेतलेला.

बुर्ज (برج) पु. ('अ.) (१) घुमट. (२) बुरूज; मनोरा. (३) मंडप. (४) राशी. (५) खुराडे.

बुर्ज-ए-'अक़्रब (برج عقرب) पु. ('अ.). वृश्चिक राशी.

बुर्ज-ए-असद (برج اسد) पु. ('अ.) सिंह राशी.

बुर्ज-ए-आतशी (برج آتشی) पु. ('अ.+फ़ा.) अग्नितत्त्वाशी संबंध असलेल्या तीन राशी—मेष; सिंह; धनू.

बुर्ज-ए-आबी (برج آبی) पु. ('अ.+फ़ा.) जलतत्त्वाशी संबंधित तीन राशी—कर्क; वृश्चिक; मीन.

बुर्ज-ए-कबूतर (برج کبوتر) पु. ('अ.+फ़ा.) कबुतरांचे खुराडे.

बुर्ज-ए-क़ौस (برج قوس) पु. ('अ.) धनू राशी.

बुर्ज-ए-ख़ाकी (برج خاکی) पु. ('अ.+फ़ा.) पृथ्वीतत्त्वाशी संबंध असलेल्या तीन राशी—वृषभ; कन्या; मकर.

बुर्ज-ए-जदी (برج جدی) पु. ('अ.) मकर राशी.

बुर्ज-ए-जौज़ा (برج جوزا) पु. ('अ.) मिथुन राशी.

बुर्ज-ए-दलव (برج دلو) पु. ('अ.) कुंभ राशी.

बुर्ज-ए-बादी (برج بادی) पु. ('अ.+फ़ा.) वायुतत्त्वाशी संबंधित तीन राशी—मिथुन; तुला (तूळ); कुंभ.

बुर्ज-ए-मीज़ान (برج میزان) पु. ('अ.) तूळ राशी.
बुर्ज-ए-संबुलः (برج سنبلہ) पु. ('अ.) कन्या राशी.
बुर्ज-ए-सर्तान (برج سرطان) पु. ('अ.) कर्क राशी.
बुर्ज-ए-सौर (برج ثور) पु. ('अ.) वृषभ राशी.
बुर्ज-ए-हूमल (برج حمل) पु. ('अ.) मेष राशी.
बुर्ज-ए-हूत (برج حوت) पु. ('अ.) मीन राशी.
बुर्जी (برجی) स्त्री. ('अ.) (१) लहान बुरूज. (२) कंगोरा. (३) घुमट. (४) मनोरा.
बुर्तुलः (برطلہ) पु. ('अ.) टोपी.
बुर्द (برد) स्त्री. (फ़ा.) (१) बुद्धिबळाच्या डावातील अर्धी मात. (त्यावेळी हरणाऱ्याजवळ बादशहाखेरीज दुसरे मोहरे नसते). (२) फायदा; फुकटचा नफा. (३) लाच; वरची प्राप्ती. (४) नक्षीदार चादर. **–बार** (بار –) वि. (फ़ा.) (१) गंभीर; शांत. (२) सहनशील. **–बारी** (باری –) स्त्री. (फ़ा.) (१) गंभीरता; महत्ता. (२) सहनशीलता.
बुर्दः (بردہ) वि. (फ़ा.) नेण्यात आलेला.
बुर्रां (براں); **बुर्रान** (بران) वि. (फ़ा.) तीक्ष्ण; धारेचा.
बुर्रिश (برش) स्त्री. (फ़ा.) धार; तीक्ष्णता.
बुर्हान (برہان) स्त्री. पु. ('अ.) प्रमाण; आधार; पुरावा.
बुलबुल (بلبل) स्त्री. ('अ.) (१) एक गाणारा पक्षी. (याचे फुलांवर प्रेम असते अशी कविकल्पना.) (२) प्रेमी. **–चश्म** (چشم –) पु. (फ़ा.) एक प्रकारचे रेशमी कापड. (यावर बुलबुलाच्या डोळ्यांसारखी नक्षी असते).
बुलबुल-ए-शीराज़ (بلبل شیراز) पु. (फ़ा.) शीराजचा बुलबुल; प्रख्यात फारसी कवी शेख सादी याची पदवी.
बुलबुल-ए-हज़ारदास्तां (بلبل هزار داستاں) वि. (फ़ा.) मधुरभाषी; नाना प्रकारची गाणी गाणारा बुलबुल.
बुलाक (بلاق) स्त्री. (तु.) (१) नाकाच्या मधोमध असलेले हाड. (२) लहान नथ.
बुलूग़ (بلوغ) पु. ('अ.) तारुण्य; वयात येणे.
बु'ल्-हवस (بوالہوس) वि. ('अ. + फ़ा.) लोभी; अधाशी.
बुशक़ाब (بشقاب) स्त्री. (तु.) मोठी थाळी; परात.
बुशारत (بشارت) स्त्री. ('अ.) **बुशरा** (بشریٰ) पु. ('अ.) शुभ वर्तमान; ईश्वरी आदेश.
बुश्रः (بشرہ) पु. ('अ.) चेहरा; चेहरेपट्टी.
बुसुद (بسد) पु. ('अ.) प्रवाळ; विद्रुम.
बुस्तां (بستاں); **बुस्तान** (بستان) पु. (फ़ा.) उद्यान; बाग. **–पैरा** (پیرا –) वि. (फ़ा.) माळी. **–सरा** (سرا –) पु. (फ़ा.) धराभोवतालची बाग.
बुहतत (بہتت) स्त्री. ('अ.) आश्चर्य; विस्मय.
बुहतान (بہتان) पु. ('अ.) आरोप; आळ; बदनामी.
बुहरान (بحران) पु. ('अ.) (१) संघर्ष. (२) रोगामध्ये होणारे आकस्मिक परिवर्तन (उतार पडणे किंवा वाढणे).
बुहलूल (بہلول) पु. ('अ.) (१) हसतमुख व्यक्ती. (२) सर्वश्रेष्ठ व्यक्ती. (३) एका सत्पुरुषाचे नाव.
बुहीरः (بحیرہ) पु. ('अ.) लहान समुद्र.
बुहूर (بحور) पु. ['अ. 'बहर' (بحر) चे अनेक.] वृत्ते; छंद.
बू (بو) स्त्री. (फ़ा.) (१) वास; गंध. (२) दुर्गंध. (३) सुगंध. (४) चिन्ह; लक्षण. (५) रहस्य. (६) थाट; शोभा. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) (१) दुर्गंधयुक्त. (२) शिकारीच्या वासावर असलेला कुत्रा. (३) यमन देशात तयार होणारे सुगंधी कातडे.
बू-ए-अफ़्राज़ (بوے افراز) पु. (फ़ा.) गरम मसाला.
बूक़ (بوق) पु. (फ़ा.) तुतारी; शिंग (वाद्य).
बूक़ (بوق) पु. ('अ.) कपट; फसवणूक; असत्य.
बूक़लमूं (بوقلموں) वि. (फ़ा.) (१) चित्रविचित्र; रंगीबेरंगी. (२) अद्भुत. (पु.) (१) सरडा. (२) क्षणोक्षणी रंग बदलणारे एक रेशमी कापड.
बूग़दान (بوغدان) पु. (फ़ा.) गारुडघाची पोतडी.
बूज़िनः (بوزنہ); **बूज़ीनः** (بوزینہ) पु. (फ़ा.) माकड; वानर. **–चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) निर्लज्ज. **–वश** (وش –) वि. (फ़ा.) माकडचेष्टा करणारा; खटपाळ.
बूज़ः (بوزہ) स्त्री. (फ़ा.) यवाचे मद्य; बियर.
बूतीमार (بوتیمار) पु. (फ़ा.) बगळा; बक.
बूतुराब (بوتراب) पु. ('अ.) हजरत अली यांची पदवी.
बूतः (بوتہ) पु. (फ़ा.) सोने, चांदी, वगैरे वितळविण्याची मूस.
बूतः-ए-ख़ाक (بوتۂ خاک) पु. (फ़ा.) मानवशरीर.
बूतः-ए-ज़र (بوتۂ زر) पु. (फ़ा.) सोने वितळविण्याची मूस.
बूदः (بود) क्रि. (फ़ा.) होता. (स्त्री.) (१) अस्तित्व. (२) पत; मर्यादा.
बूद-ओ-बाश (بود و باش) स्त्री. (फ़ा.) निवास; राहाणी; जीवन पद्धती.
बूदगी (بودگی) स्त्री. (फ़ा.) (१) अस्तित्व. (२) स्थान; मर्यादा.

बूदमबेदाल (بودم بےدال) पु. (फ़ा.) (१) घुबड. (२) मूर्ख. ['बूदम' (بودم) या शब्दातील 'दाल' (د) काढून टाकल्यास 'बूम' (بوم) म्हणजे घुबड असा शब्द उरतो].

बूदः (بودہ) क्रि. (फ़ा.) होता.

बूबक (بوبک) स्त्री. (तु.) कुमारी; मुलगी. (वि.) मूर्ख; अडाणी.

बूबू (بوبو) स्त्री. ('अ.) (१) बहीण; थोरली बहीण. (२) घरंदाज स्त्री.

बूम (بوم) पु. (फ़ा.) (१) घुबड. (२) मूर्ख. (३) ओसाड जमीन. **–खस्लत** (خصلت –) वि. (फ़ा.+'अ.) घुबडासारखा स्वभाव असलेला. (ओसाड जागा पसंत करणारा; चांगली जागा ओसाड बनविणारा).

बूमी (بومی) वि. (फ़ा.) देशाचा; देशवासी.

बूया (بویا) वि. (फ़ा.) वासाचा; सुगंधित.

बू'यीदः (بوئیدہ) वि. (फ़ा.) हुंगलेला.

बूरानी (بورانی) स्त्री. (फ़ा.) वांग्याचे भरीत.

बूरः (بورہ) पु. ('अ.) टाकणखार.

बे (بے) उप. (फ़ा.) अभाव, नकार किंवा निषेध दर्शविणारा उपसर्ग. **–अंदाम** (اندام –) वि. (फ़ा.) अशिष्ट; घृष्ट; असभ्य. **–अदब** (ادب –) वि. (फ़ा.+'अ.) असभ्य; अशिष्ट. **–'अमल** (عمل –) वि. (फ़ा. + 'अ.) निष्क्रिय; अकर्मण्य. **–अस्ल** (اصل –) वि. (फ़ा.) निराधार. **–आज़ार** (آزار –) वि. (फ़ा.) इतरांना त्रास न देणारा. **–आब** (آب –) वि. (फ़ा.) निस्तेज. **–आबरू** (آبرو –) वि. (फ़ा.) बदनाम; अपमानित. **–इंतिहा** (انتہا –) वि. (फ़ा. +'अ.) असीम; अपार. **–इख्तियार** (اختیار –) वि. (फ़ा.+'अ.) असमर्थ. (अव्य.) आपोआप; सहजासहजी; न राहवून; नाइलाजाने. **–इश्तिबाह** (اشتباہ –) अव्य. (फ़ा.+'अ.) निःसंशय. **–'उज्र** (عذر –) वि. (फ़ा.+'अ.) काही हरकत न घेता; निमूटपणे करणारा. **–'उन्वानी** (عنوانی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) अव्यवस्था; अनियमितता. **–उस्ल** (اصول –) वि. (फ़ा.+'अ.) ज्याच्या जीवनात काही सिद्धांत नाही असा. **–इ'अतिदाली** (اعتدالی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) अतिरेक; समतोल नसणे; कुपथ्य. **–इ'अतिना'ई** (اعتنائی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) उपेक्षा; बेपर्वाई. **–इ'अतिबार** (اعتبار –) वि. (फ़ा.+'अ.) (१) अविश्वसनीय; बेभरवशाचा. (२) दुसऱ्यावर विश्वास न ठेवणारा. **–'ऐब** (عیب –) वि. (फ़ा. + 'अ.) निर्दोष. **–क़दर** (قدر –) वि. (फ़ा.) अप्रतिष्ठित; अपमानित. **–कम-ओ-कास्त** (کم و کاست –); **–कम-ओ-बेश** (کم و بیش –) वि. अव्य. (फ़ा.) जशाचा तसा; कमीजास्त न करता. **–करां** (کراں –); **–करानः** (کرانہ –) वि. (फ़ा.) ज्याला किनारा नाही असा; अपार; असीम. **–क़रार** (قرار –) वि. (फ़ा.+'अ.) बेचैन; व्याकुळ. **–क़रीनः** (قرینہ –) वि. (फ़ा.+'अ.) असंबद्ध; अस्ताव्यस्त. **–कल** (کل –) वि. (फ़ा.) बेचैन. **–कस** (کس –) वि. (फ़ा.) (१) दुःखी. (२) पीडित. (३) निराधार; असहाय्य. **–क़ा'इदगी** (قاعدگی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) (१) असंबद्धता. (२) अनियमितता. (३) बेकायदेशीरपणा. **–क़ाबू** (قابو –) वि. (फ़ा.) निरंकुश. **–कार** (کار –) वि. (फ़ा.) (१) निरुद्योगी. (२) निरर्थक. (३) अपंग. (अव्य.) निष्कारण. **–क़ियास** (قیاس –) वि. (फ़ा. +'अ.) अत्यधिक; अपेक्षेहून अधिक. **–क़ैद** (قید –) अव्य. (फ़ा.+'अ.) बिनशर्त; अनिर्बंध. **–कैफ़-ओ-कम** (کیف و کم –) वि. (फ़ा.+'अ.) बरोबर; यथार्थ. **–ख़तर** (خطر –) अव्य. (फ़ा.+'अ.) निर्भयपणे. **–ख़ता** (خطا –) वि. (फ़ा.+'अ.) अमोघ; अचूक. **–ख़बर** (خبر –) वि. (फ़ा.+'अ.) (१) भानावर नसलेला; बेशुद्ध. (२) माहिती नसलेला; अनभिज्ञ. (३) बेफिकीर. **–ख़ानुमाँ** (خانماں –) वि. (फ़ा.) घरदार नसलेला; ज्याचे घरदार नष्ट झाले आहे असा. **–ख़ार** (خار –) वि. (फ़ा.) निष्कंटक. **–ख़िरद** (خرد –) वि. (फ़ा.) निर्बुद्ध. **–ख़ुद** (خود –) वि. (फ़ा.) निश्चेष्ट; बेशुद्ध. **–ख़ुदी** (خودی –) स्त्री. (फ़ा.) अचैतन्य; तल्लीनता; तादाम्य. **–ख़वेश** (خویش –) वि. (फ़ा.) ज्याचा आपला कोणी नाही असा. **–ख़्वाबी** (خواب –) स्त्री. (फ़ा.) निद्रानाश. **–ख़्वास्त** (خواست –) वि. (फ़ा.) अनिमंत्रित; अनाहूत. **–ग़मी** (غمی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) निश्चितता. **–ग़रज़** (غرض –) वि. (फ़ा.+'अ.) निःस्वार्थी. **–ग़ायत** (غایت –) वि. (फ़ा.+'अ.) अत्यंत; फार. **–गाह** (گاہ –); **–गाहाँ** (گاہاں –) पु. (फ़ा.) सायंकाळ; संध्याकाळ. **–ग़िल-ओ-ग़िश** (غل و غش –) अव्य. (फ़ा.+'अ.) (१) निश्चितपणे. (२) निःसंकोचपणे. **–गुमाँ** (گماں –) अव्य. (फ़ा.) (१) अचानक. (२) निःसंदेह. **–चारगी** (چارگی –) स्त्री. (फ़ा.) (१) दीनता; असहाय्यता. (२) दारिद्र्य. **–चारः** (چارہ –) वि. (फ़ा.) (१) दुःखी. (२) असहाय्य. (३) दरिद्री. **–चिराग़** (چراغ –) वि. (फ़ा.) ज्याच्या घरात दिवा जळत नाही असा; निःसंतान. **–चूं** (چوں –) वि. (फ़ा.) अद्वितीय; अनुपम. **–चून-ओ-चरा** (چوں و چرا –) अव्य. (फ़ा.) हू का चू न करता; निमूटपणे. **–ज़र** (زر –) वि. (फ़ा.) निर्धन. **–ज़रर** (ضرر –) वि. (फ़ा.+'अ.) ज्याच्यापासून काही धोका नाही असा; निर्धोक. **–जा** (جا –) वि. (फ़ा.) अयोग्य; अनुचित. **–जान** (جان –) वि. (फ़ा.) निर्जीव; निष्प्राण. **–जिगर** (جگر –) वि.

(फ़ा.) (१) निर्भय. (२) म्याड. **–जिनहार** (زنہار –) वि. (फ़ा.) ज्याच्यापासून बचाव होणे शक्य नाही असा. **–जिहत** (جہت –) अव्य. (फ़ा. + 'अ.) निष्कारण. **–त'अम्मुल** (تامل –) वि. (फ़ा.+'अ.) निःसंकोच; निर्भय. **–त'अल्लुक़** (تعلق –) वि. (फ़ा. + 'अ.) संबंध नसलेला; निर्लिप्त. **–त'अस्सुब** (تعصب –) वि. (फ़ा.+ 'अ.) धार्मिक किंवा जातीय पक्षपात मनात न बाळगणारा. **–तकल्लुफ़** (تکلف –) वि. (फ़ा.) मनमोकळा; निःसंकोच; साधाभोळा. **–तकान** (تکان –) अव्य. (फ़ा.) न थकता; निरंतर. **–तम'अ** (طمع –) वि. (फ़ा. + 'अ.) निस्पृह. **–तमीज़** (تمیز –) वि. (फ़ा. + 'अ.) अशिष्ट; असभ्य. **–तरद्दुद** (تردد –) वि. (फ़ा. + 'अ.) (१) निश्चित; निर्भय. (२) पडीत (जमीन). **–तरह्** (طرح –) अव्य. (फ़ा. + 'अ.) (१) गैर-वाजवी. (२) असाधारणरीत्या; अत्यधिक; फार. **–तलब** (طلب –) अव्य. (फ़ा.+'अ.) न मागता; अनाहूतपणे. **–तहाशा** (تحاشا –) अव्य. (फ़ा.+ 'अ.) (१) भरधाव. (२) जीव घेऊन; धावरून. (३) अविचाराने; बेधडक. **–ताब** (تاب –) वि. (फ़ा.) (१) व्याकुळ; बेचैन. (२) अधीर. **–तौक़ीर** (توقیر –) वि. (फ़ा.+'अ.) अपमानित; तिरस्कृत. **–दख़ल** (دخل –) वि. (फ़ा. + 'अ.) अधिकारच्युत; काढून टाकलेला. **–दख़ली** (دخلی –) स्त्री. (फ़ा. + 'अ.) अधिकारच्युत करणे; कुळांना जमिनीवरून हुसकून लावणे. **–दम** (دم –) वि. (फ़ा.) अशक्त; दुर्बळ. **–दर्द** (درد –) वि. (फ़ा.) निर्दय. **–दस्त-ओ-पा** (دست و پا –) वि. (फ़ा.) निराधार. **–दाग़** (داغ –) वि. (फ़ा.) निष्कलंक. **–दाद** (داد –) स्त्री. (फ़ा.) अत्याचार; जुलूम. **–दादगर** (داد گر –) वि. (फ़ा.) अत्याचारी. **–दानः** (دانم –) वि. (फ़ा.) बिनबियाचा (पेरू वगैरे). (पु.) बी नसलेले डाळिंब. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) जागा झालेला; जागृत. **–दिरंग** (درنگ –) अव्य. (फ़ा.) दिरंगाई न करता; तावडतोब. **–दिरेग** (دریغ –) अव्य. (फ़ा.) निःसंकोचपणे; विचार न करता. **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) उदास; खिन्न; विमनस्क. **–दीन** (دین –) वि. (फ़ा.+ 'अ.) नास्तिक. **–नंग-ओ-नामूस** (ننگ و ناموس –) वि. (फ़ा.+'अ.) निर्लज्ज. **–नज़ीर** (نظیر –) वि. (फ़ा.+'अ.) अद्वितीय; अनुपम. **–नवा** (نوا –) वि. (फ़ा.) दरिद्री. **–नाम-ओ-निशाँ** (نام و نشاں –); **–नाम-ओ-नुमूद** (نام و نمود –) वि. (फ़ा.) ज्याचे कायही नावनिशाण नाही असा. **–नियाज़** (نیاز –) वि. (फ़ा.) (१) निस्पृह. (२) स्वच्छंद. (३) बेपर्वा. **–नुक़्त** (نقط –) वि. (फ़ा.+'अ.) (१) ज्या शब्दांवर टिंबे नाहीत असे. (२) शिवीगाळी. **–पर-ओ-बाल** (پر و بال –) वि. (फ़ा.) पंख व बाहू नसलेला; निराधार; विवश. **–पर्दगी** (پردگی –) स्त्री. (फ़ा.) पडदा किंवा बुरखा न घेता उघडपणे स्त्रियांनी बाहेर पडणे. **–पर्दः** (پردہ –) वि. (फ़ा.) (१) उघडउघड. (२) आडपडदा न ठेवता. (३) पडदा न घेतलेली (स्त्री). **–पायाँ** (پایاں –) वि. (फ़ा.) अनंत; असीम. **–पीर** (پیر –) वि. (फ़ा.) (१) ज्याला गुरू नाही असा. (२) निर्दय. **–फ़ैद** (فیض –) वि. (फ़ा.) (१) कृपण; कंजूष. (२) ज्याच्यापासून कोणाचा फायदा होत नाही असा. **–बक़ा** (بقا –) वि. (फ़ा. + 'अ.) अनित्य; नश्वर. **–बर्ग-ओ-नवा** (برگ و نوا –) वि. (फ़ा.) निर्धन; निराधार. **–बर्ग-ओ-बार** (برگ و بار –) वि. (फ़ा.) (१) फूल-फळ नसलेला; निसंतान. (२) निर्धन. **–बसर** (بصر –) वि. (फ़ा.+'अ.) दृष्टिहीन; आंधळा. **–बहरः** (بہرہ –) वि. (फ़ा.) (१) वंचित; इतरांपासून लाभ करून न घेणारा. (२) दुर्दैवी. **–बहा** (بہا –) वि. (फ़ा.) अमूल्य; बहुमूल्य. **–बाक** (باک –) वि. (फ़ा.) (१) धीट. (२) फटकळ. (३) निर्लज्ज. **–बाक़** (باق –) वि. (फ़ा.+'अ.) ऋणमुक्त. **–बाल-ओ-पर** (بال و پر –) वि. (फ़ा.) (१) निराधार. (२) निर्धन. **–बुनियाद** (بنیاد –) वि. (फ़ा.) निराधार; खोटा. **–मज़गी** (مزگی –) स्त्री. (फ़ा.) नीरसता; आनंदाचा अभाव. **–मसरफ़** (مصرف –) वि. (फ़ा.+'अ.) निरर्थक; निरुद्योगी; बेकार. **–महल** (محل –) वि. (फ़ा.+'अ.) अवेळचा; अनुचित; अप्रासंगिक. **–महाबा** (محابا –) अव्य. (फ़ा.) बेधडक; उघडउघड. **–महारत** (مہارت –) वि. (फ़ा.+'अ.) अकुशल; ओबडधोबड. **–म'अनी** (معنی –) वि. (फ़ा. + 'अ.) निरर्थक; व्यर्थ; निष्फळ. **–मायगी** (مایگی –) स्त्री. (फ़ा.) (१) दारिद्र्य. (२) विद्याहीनता. **–मायः** (مایہ –) वि. (फ़ा.) (१) दरिद्री. (२) अविद्य. **–मिसाल** (مثال –) वि. (फ़ा. + 'अ.) अनुपम. **–मिहार** (مہار –) वि. (फ़ा.) ज्याच्या नाकात वेसण नाही असा; निरंकुश; स्वच्छंद. **–मेहर** (مہر –) वि. (फ़ा. + 'अ.) निर्भय; निर्दय. **–रग** (رگ –) वि. (फ़ा.) निर्लज्ज. **–रब्त** (ربط –) वि. (फ़ा.+ 'अ.) असंबद्ध; बेढंगी. **–रहम** (رحم –) वि. (फ़ा.+ 'अ.) निष्ठुर; निर्दय. **–राहरवी** (راہ روی –) स्त्री. (फ़ा.) कुमार्गाने जाणे. **–रिया** (ریا –) वि. (फ़ा.) अवडंबररहित; निष्कपट. **–रुख़ी** (رخی –) स्त्री. (फ़ा.) उपेक्षा; दुर्लक्ष. **–रू-ओ-रि'आयत** (رو و رعایت –) अव्य. (फ़ा.+'अ.) कोणाच्याही बाबतीत पक्षपात न करता. **–रीश** (ریش –) वि. (फ़ा.) मिसरूड न फुटलेला पोरगा. **–रेशः** (ریشم –) वि. (फ़ा.) ज्यात केसर किंवा तंतू

नाहीत असा. [उदा. 'बेरेश:आम' (بےریش آم) केसर नसलेला आंबा]. **–लगाम** (–لگام) वि. (फ़ा.) (१) निरंकुश; स्वच्छंद. (२) फटकळ. **–लौस़** (–لوث) वि. (फ़ा.+'अ.) निःस्वार्थी; पवित्र; निष्कलंक. **–वक़्'अत** (–وقعت); **–वक़ार** (–وقار) वि. (फ़ा.+'अ.) (१) निर्धन. (२) पत नसलेला; तिरस्कृत; तुच्छ. **–वजह** (–وجہ) अव्य. (फ़ा. + 'अ.) निष्कारण. **–वफ़ा** (–وفا) वि. (फ़ा.+'अ.) (१) कृतघ्न. (२) बेमुर्वतखोर. **–वासितः** (–واسطہ) अव्य. (फ़ा. + 'अ.) (१) निष्कारण. (२) अप्रत्यक्षपणे. **–वुक़ूफ़** (–وقوف) वि. (फ़ा.+'अ.) निर्बुद्ध; मूर्ख. **–शक** (–شک); **–शा'इबः** (–شائبہ) अव्य. (फ़ा.+'अ.) निःसंदेह; अवश्य. **–शीराज़ः** (–شیرازہ) वि. (फ़ा.) विसकटलेला; असंबद्ध. **–शु'ऊर** (–شعور) वि. (फ़ा.+'अ.) असभ्य; निर्बुद्ध. **–शुमार** (–شمار) वि. (फ़ा. + 'अ.) असंख्य; बेसुमार. **–सत्री** (–ستری) स्त्री. (फ़ा. + 'अ.) पडदा न घेणे; अंगावर वस्त्र नसणे. **–सबब** (–سبب) अव्य. (फ़ा.+'अ.) निष्कारण. **–सबब आज़ार** (–سبب آزار) वि. (फ़ा.+'अ.) विनाकारण त्रास देणारा. **–सब्र** (–صبر) वि. (फ़ा.+अ.) अधीर; आतुर. **–सर-ओ-पा** (–سروپا) वि. (फ़ा.) शेंडाबुडखा नसलेला; निराधार; खोटा. **–सर्फ़ः** (–صرف) वि. (फ़ा. + 'अ.) व्यर्थ; निरर्थक. **–सलीक़ः** (–سلیقہ) वि. (फ़ा.+'अ.) ज्याला काम करण्याची पद्धत नाही असा; अशिष्ट; भोंगळ. **–साख्तः** (–ساختہ) वि. (फ़ा.) निःसंकोच; साधा; अलंकाररहित. (अव्य.) अचानक; एकदम. **–सिक्कः** (–سکہ) वि. (फ़ा.) तुच्छ; नीच; अपमानित. **–सूद** (–سود) वि. (फ़ा.) निरर्थक; व्यर्थ. **–हद** (–حد) वि. (फ़ा.+'अ.) असीम; बेहद्द. **–हमता** (–ہمتا); **–हमाल** (–ہمال) वि. (फ़ा.) अनुपम; अद्वितीय. **–हमीयत** (–حمیت); **हया** (–حیا) वि. (फ़ा.+'अ.) निर्लज्ज. **–हया'ई** (–حیائی) स्त्री. (फ़ा.+'अ.) निर्लज्जपणा. **–हवास** (–حواس) वि. (फ़ा.+'अ.) बेशुद्ध; बेचैन. **–हाल** (–حال) वि. (फ़ा.+'अ.) (१) बेशुद्ध. (२) हलाखीच्या स्थितीत असलेला. **–हासिल** (–حاصل) वि. (फ़ा.+'अ.) निष्फळ; निरर्थक. **–हिजाब** (–حجاب) वि. (फ़ा.+'अ.) (१) पडदा, पदर न घेतलेली (स्त्री). (२) उघड. (३) निर्लज्ज. **–हिस** (–حس) वि. (फ़ा.+'अ.) (१) सुन्न; चेतनाशून्य. (२) स्वाभिमानशून्य. **–हिसाब** (–حساب) वि. (फ़ा. + 'अ.) असंख्य; अगणित. **–हुज़ूर** (–حضور) वि. (फ़ा. + 'अ.) अनुपस्थित; लुप्त. **–हुर्मत** (–حرمت) वि. (फ़ा.+'अ.) अपमानित; अप्रतिष्ठित. **–हुर्मती** (–حرمتی) स्त्री. (फ़ा. + 'अ.) अपमान; बेइज्जती. **–हैसियत** (–حیثیت) वि. (फ़ा. + 'अ.) (१) अप्रतिष्ठित. (२) निर्धन. (३) पत नसलेला. **–होश** (–ہوش) वि. (फ़ा.) (१) बेशुद्ध. (२) गाफिल. **–होशी** (–ہوشی) स्त्री. (फ़ा.) (१) बेशुद्धी; मूर्च्छितावस्था. (३) गाफिलपणा. **–हौसलगी** (–حوصلگی) स्त्री. (फ़ा.+'अ.) (१) निरुत्साह. (२) म्याडपणा. **–हौसलः** (–حوصلہ) वि. (फ़ा. + 'अ.) (१) निरुत्साही. (२) धीर सुटलेला; भित्रा.

बेख़ (بیخ) स्त्री. (फ़ा.) मूळ; पाया. **–कन** (–کن) वि. (फ़ा.) पाळेमुळे खणणारा; नाश करणारा.

बेख़्तः (بیختہ) वि. (फ़ा.) गाळलेला; गाळून घेतलेला.

बेग (بیگ) पु. (तु.) नायक; अध्यक्ष; सरदार. [अनेक 'बेगमात' (بیگمات)].

बेगम (بیگم) स्त्री. (तु.) (१) श्रीमती; कुलीन स्त्री. (२) पत्नी. (३) राणी. [अनेक 'बेगमान' (بیگمان)].

बेगानगी (بیگانگی) स्त्री. (फ़ा.) (१) परकेपणा; अपरिचितपणा. (२) अज्ञान.

बेगानः (بیگانہ) वि. (फ़ा.) (१) परका; परकीय. (२) अपरिचित. **–वश** (–وش) वि. (फ़ा.) परक्यांप्रमाणे वागणारा.

बेगार (بیگار) स्त्री. (फ़ा.) फुकट काम करून घेणे; वेठ.

बेगारी (بیگاری) वि. (फ़ा.) वेठीस धरला गेलेला; मन न लावता काम करणारा.

बेज (بیز) प्रत्य. (फ़ा.) गाळणारा; पसरविणारा. [उदा. 'मुश्क बेज' (مشک بیز) वि. (फ़ा.) कस्तुरीचा सुगंध पसविणारा].

बेज़ार (بیزار) वि. (फ़ा.) (१) विमुख; पराङ्मुख; उदास. (२) क्रुद्ध; नाखूष.

बेद (بید) पु. (फ़ा.) एक प्रकारचे डोंगरी झाड. याला फळे येत नाहीत. याच्या फांद्या नाजूक व लवचिक असतात; वेत; वेताची काठी. **–इंजीर** (–انجیر) पु. (फ़ा.) एरंड. **–बाफ़** (–باف) वि. (फ़ा.) वेताचे विणकाम करणारा.

बेद-ए-मजनूं (بید مجنوں) पु. (फ़ा. + 'अ.) 'बेद' वृक्षाचा एक प्रकार.

बेद-ए-मुश्क (بید مشک) पु. (फ़ा.) एक प्रकारचे सुगंधी झाड. याच्या फुलाचा अर्क औषधात वापरतात.

बेरूँ (بیروں); **बेरून** (بیرون) अव्य. (फ़ा.) बाहेर. **–जात** (–جات) पु. (फ़ा.) उपनगरे.

बेल (بیل) पु. (फ़ा.) (१) फावडे; खोरे. (२) कुदळ. (३) मोठ्या चमच्यासारखे एक

अवजार. याने जमीन उकरणे व माती भरणे ही दोन्ही कामे होतात. **–चक** (چک –); **–चः** (چہ –) पु. (फ़ा.) लहान फावडे. **–ज़न** (زن –); **–दार** (دار –) वि. (फ़ा.) खोऱ्याने (कुदळीने) जमीन उकरणारा; शेतकरी.

बेवगी (بیوگی) स्त्री. (फ़ा.) वैधव्य.

बेवः (بیوہ) स्त्री. (फ़ा.) विधवा.

बेश (بیش) वि. (फ़ा.) अधिक; जास्त; श्रेष्ठ. **–अज़पेश** (ازپیش –) वि. (फ़ा.) पूर्वीपेक्षा जास्त. **–अज़बेश** (ازبیش –) वि. (फ़ा.) जास्तीत जास्त. **–क़रार** (قرار –) वि. (फ़ा.+'अ.) पुरेसा; पुष्कळ. **–क़ीमत** (قیمت –) वि. (फ़ा.+'अ.) बहुमूल्य; भारी किंमतीचा. **–तर** (تر –) वि. (फ़ा.) अधिकांश. **–बहा** (بہا –) वि. (फ़ा.) मौल्यवान.

बेशी (بیشی) स्त्री. (फ़ा.) आधिक्य; वृद्धी.

बेसवा (بیسوا) स्त्री. (फ़ा.) वेश्या; गणिका.

बेहूदगी (بیہودگی) स्त्री. (फ़ा.) (१) असभ्यता; अशिष्टपणा; भोंगळपणा; वाह्यातपणा. (२) अश्लीलता.

बेहूदः (بیہودہ) वि. (फ़ा.) (१) अशिष्ट; असभ्य; वाह्यात. (२) अश्लील. (३) निरर्थक. (४) मवाली; वदचलन.

बै'अ (بیع) स्त्री. ('अ.) विकणे; विक्री करणे. **–नामः** (نامہ –) पु. ('अ.+फ़ा.) विक्रीपत्र; खरेदीपत्र.

बै'अत (بیعت) स्त्री. ('अ.) (१) गुरूच्या हातावर हात ठेवून त्याचा शिष्य बनणे. (२) आज्ञाधारकता. (३) लग्नाचे अभिवचन.

बै'आनः (بیعانہ) पु. ('अ. + फ़ा.) वयाणा; विसार; खरेदी नक्की झाल्यानंतर मालकाला दिली जाणारी आगाऊ रक्कम.

बैज़क़ (بیزق) पु. ('अ.) बुद्धिबळातील प्यादे.

बैत (بیت) पु. ('अ.) घर; गृह; स्थान. (स्त्री.) एक शेर; दोन चरण (कविता). **–बहसी** (بحثی –) स्त्री. ('अ.) **–बाज़ी** (بازی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) अंत्याक्षरी; भेंडघा लावण्याचा खेळ.

बैत-उन्-नुत्फ़ (بیت النطف) पु. ('अ.) वेश्यांची गल्ली.

बैत-उल्-'अतीक़ (بیت العتیق) पु. ('अ.) (१) प्राचीन घर. (२) काबा (मक्केतील मंदीर).

बैत-उल्-'अरूस (بیت العروس) पु. ('अ.) (१) वधूची खोली. (२) कावा.

बैत-उल्-'उलूम (بیت العلوم) पु. ('अ.) विश्वविद्यालय; विद्यापीठ.

बैत-उल्-ख़ला (بیت الخلا) पु. ('अ.) शौचकूप; संडास.

बैत-उल्-ग़ज़ल (بیت الغزل) स्त्री. ('अ.) गझलातील सर्वोत्कृष्ट शेर (दोन चरण).

बैत-उल्-म'अमूर (بیت المعمور) पु. ('अ.) चौथ्या स्वर्गातील मशीद. ही काब्याच्या वर आहे.

बैत-उल्-माल (بیت المال) पु. ('अ.) (१) सरकारी खजिना. (२) बेवारशी माल जमा करण्याचे स्थान. (३) सार्वजनिक कामासाठी असलेला खजिना.

बैत-उल्-मुक़द्दस (بیت المقدس) पु. ('अ.) (१) जेरूसलेम; जेरूसलेमची मशीद. (२) सीरीयातील 'मस्जिद-ए-अक़्सा' (مسجد اقصیٰ) नावाची मशीद. (३) खुदाचे घर; क'अबः (मक्कः); पवित्र घर.

बैत-उल्-हमल (بیت الحمل) पु. ('अ.) मेष राशी.

बैत-उल्-हराम (بیت الحرام) पु. ('अ.) पवित्र स्थान; काबा (मक्केतील मंदीर).

बैत-उल्-हुज़्न (بیت الحزن) पु. ('अ.) शोकगृह.

बैत-उल्-लह (بیت اللہ) पु. ('अ.) ईश्वराचे घर; काबा.

बैत-उश्-शरफ़ (بیت الشرف) पु. ('अ.) ज्या राशीत एखादा ग्रह उच्चीचा असतो ती रास.

बैत-उस्-सक़र (بیت السقر) पु. ('अ.) नरक.

बैत-उस्-सनम (بیت الصنم) पु. ('अ.) (१) मूर्तिगृह; मंदीर. (२) प्रेयसीचे घर.

बैत-उस्-सिलाह (بیت السلاح) पु. ('अ.) शस्त्रागार.

बैतार (بیطار) पु. ('अ.) गुरांचा डॉक्टर; अश्वचिकित्सक.

बैद् (بیض) पु. [अ. 'बैदः' (بیضہ) चे अनेक.] (१) अंडी. (२) अंडकोष.

बैबक (بیدق) पु. ('अ.) बुद्धिबळातील प्यादे.

बैद्वी (بیضوی) वि. ('अ.) अंडाकार; अंडघाच्या आकाराचा; लंबगोल.

बैदा (بیدا) पु. ('अ.) वन; अरण्य.

बैदा (بیضا) वि. ('अ.) (१) प्रकाशमान; उज्वल. (२) पांढरा. (पु.) (१) सूर्य. (२) इराणमधील एक शहर.

बैदः (بیضہ) पु. ('अ.) (१) अंडे. (२) अंडकोष. (३) शिरस्त्राण; लोखंडी टोपी.

बैन (بین) अव्य. ('अ.) मध्ये; दरम्यान; मध्यभागी.

बैन-उल्-अक़्वाम (بین الاقوام); **बैन-उल्-अक़्वामी** (بین الاقوامی) वि. ('अ.) आंतरराष्ट्रीय.

बैन-उल्-मुल्की (بین الملکی) वि. ('अ.) अंतर्देशीय.

बैया'अ (بیاع) वि. ('अ.) (१) विक्रेता. (२) दलाल.

बैयिन (بین) वि. ('अ.) स्पष्ट; जाहीर.

बैरक़ (بیرق) पु. (तु.) झेंडा; निशाण.

बैरून (بیرون) अव्य. (फ़ा.) बाहेर; शिवाय; खेरीज. (पु.) आसपासचा प्रदेश. **–जात** (جات –) पु. (फा.) उपनगरे.

बैरूनी (بیرونی) वि. (फ़ा.) बाहेरचा; बाह्य; परकीय.

बो'ईदः (بوئیدہ) वि. (फ़ा.) हुंगलेला.

बोग़बान (بوغبان) पु. (फ़ा.) गारुडघाची पोतडी.

बोग़बंद (بوغبند) पु. (फ़ा.) ज्यात काही बांधले किंवा गुंडाळले जाते असे कापड.

बोग़मा (بوغما) पु. (फ़ा.) (१) एक अश्वरोग. (यात घोडघाच्या सर्वांगाला घाम सुटतो). (२) चिंध्या; कचरा. (बा.) इडापिडा; भूतपिशाच.

बोज़नः (بوزنہ) पु. (फ़ा.) माकड; वानर.

बोतः (بوتہ) पु. (फ़ा.) (१) सोनाराची मूस. (२) झुडुप. (वि.) लठ्ठ.

बोदनः (بودنہ) पु. (तु.) होला (पक्षी).

बोया (بویا) वि. (फ़ा.) सुगंधित; सुवासिक.

बोरिया (بوریا) पु. (फ़ा.) चटई; खजुरीच्या पानांची चटई. **–नशीं** (نشیں –) वि. (फ़ा.) चटईवर बसणारा; फकीर. **–बाफ़** (باف –) वि. (फ़ा.) चटई विणणारा.

बोश (بوش) पु. ('अ.) (१) वैभव; थाट. (२) गर्दी. (वि.) लबाड.

बोस (بوس) प्रत्य. (फ़ा.) चुंबन घेणारा. [उदा. 'फ़लक बोस' (فلک بوس) वि. ('अ.+फ़ा.) गगनचुंबी].

बोसीदगी (بوسیدگی) स्त्री. (फ़ा.) जुनाटपणा; खराबपणा; बुरसेपणा.

बोसीदः (بوسیدہ) वि. (फ़ा.) (१) चुंबन घेतलेला; चुंबिलेला. (२) जुनाट; फाटका तुटका; खराब; बुरसटलेला.

बोसः (بوسہ) पु. (फ़ा.) चुंबन; पापा; मुका. **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) जिचे चुंबन घेतले जाते अशी जागा. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) चुंबन घेणारा. **–ब.पैग़ाम** (بہ پیغام –) वि. (फ़ा.) एखाद्याच्या मध्यस्थीने आपला हेतू साधणे.

क़ासिद के हाथ चूम लि'ए मैंने लेके ख़त।
यह एक तरह का बोसः ब.पैग़ाम हो गया॥

–बाज़ी (بازی –) स्त्री. (फ़ा.) चुंबाचुंबी; एकमेकांचे चुंबन घेणे.

बोस्तां (بوستاں); **बोस्तान** (بوستان) पु. (फ़ा.) (१) बाग; उद्यान. (२) शेख सादीचा प्रख्यात **पैरा** (پیرا –) वि. (फ़ा.) माळी, उद्यानपाल.

बोज़क (بوزک) स्त्री. (फ़ा.) बुरशी; बुरा.

बौल (بول) पु. ('अ.) मूत्र; लघ्वी. **–गाह** (گاہ –) स्त्री. ('अ.+फ़ा.) मुतारी. **–दान** (دان –) पु. ('अ.+फ़ा.) लघ्वीचे भांडे. **–फ़ि'ल्-फ़िराश** (فی الفراش –) पु. ('अ.) अंथरुणात (शोपेत) लघ्वी होण्याचा रोग (विशेषतः लहान मुलांमध्ये आढळणारा).

मंज़र (منظر) पु. ('अ.) (१) दृश्य. (२) चेहरा. (३) हवा खाण्याचे ठिकाण.

मंज़र-ए-'आम (منظرعام) पु. ('अ.) सार्वजनिक स्थान.

मंज़िल (منزل) स्त्री. ('अ.) (१) मुक्कामाची जागा; पडाव. (२) इमारतीचा मजला; माळा. (३) टप्पा. मजल. (४) उद्दिष्ट; लक्ष्य. (५) नक्षत्र.

मंज़िल-ए-अव्वल (منزل اول) स्त्री. ('अ.) थडगे; स्मशान (मृत्युनंतरचा पहिला मुक्काम).

मंज़िल-ए-क़मर (منزل قمر) स्त्री. ('अ.) नक्षत्र (चंद्राच्या मार्गातील २७ मुक्कामांपैकी एक).

मंज़िल-ए-मक़्सूद (منزل مقصود) स्त्री. ('अ.) पोचण्याचे ठिकाण; उद्दिष्ट; लक्ष्य.

मंज़िलत (منزلت) स्त्री. ('अ.) (१) आदर; सत्कार. (२) हुद्दा; पद.

मंज़ू'अ (منزوع) वि. ('अ.) काढलेला; वेगळा केलेला.

मंज़ूम (منظوم) वि. ('अ.) पद्यबद्ध; छंदोबद्ध.

मंज़ूमात (منظومات) स्त्री. ('अ.) 'नज़्म' या काव्य प्रकाराचा संग्रह; कविता संग्रह.

मंज़ूर (منظور) वि. ('अ.) (१) स्वीकृत; कबूल. (२) पसंत. (३) दृष्टिगोचर.

मंज़ूरी (منظوری) स्त्री. ('अ.) स्वीकृती; अनुमती.

मंतिक़ (منطق) स्त्री. ('अ.) (१) तर्कशास्त्र. (२) वक्तृत्व; चर्चा; बडबड; वितंडवाद. **–छांटना** (چھانٹنا –); **–बघारना** (بگھارنا –) मोठे तत्त्वज्ञान सांगणे; वितंडवाद घालणे.

मंतिक़ी (منطقی) पु. ('अ.) तर्कशास्त्री; तत्त्वज्ञ. (वि.) तार्किक; तर्कशास्त्रीय.

मंद (مند) प्रत्य. (फ़ा.) वाला; असणारा. [उदा. "अक़्ल मंद' (عقل مند) वि. ('अ.+फ़ा.) बुद्धिमान].

मंदल (مندل) पु. (फ़ा.) घेरा; मंडल.

मंदूब (مندوب) पु. (फ़ा.) प्रतिनिधी; डेलीगेट. [अनेक 'मंदूबीन' (مندوبیں)].

मंदूबः (مندوبہ) स्त्री. (फ़ा.) स्त्री-प्रतिनिधी.

मंब'अ (منبع) पु. ('अ.) (१) स्रोत; झरा. (२) उगम.

मंबित (منبت) पु. ('अ.) उगमस्थान.

म'अक़ूद (معقود) वि. ('अ.) (१) ग्रंथित; गाठ मारलेला. (२) विवाहित.

म'अक़ूल (معقول) वि. ('अ.) (१) उचित; योग्य. (२) लायक. (३) उत्तम; उत्कृष्ट. (४) सभ्य. (५) शुद्ध. (६) प्रतिपक्षाची गोष्ट मान्य करणारा.

म'अक़ूलात (معقولات) स्त्री. ('अ.) न्यायशास्त्र व विज्ञान या विषयांचे ग्रंथ अथवा पाठ्यक्रम.

म'अक़ूलियत (معقولیت) स्त्री. ('अ.) (१) औचित्य. (२) सज्जनता. (३) उत्तमता.

म'अक़ूली (معقولی) पु. वि. ('अ.) न्यायशास्त्री; न्यायीक.

म'अकूस (معکوس) वि. ('अ.) उपडा; उलटा; अधोमुख; विपरीत.

म'अज़िरत (معذرت) स्त्री. ('अ.) (१) नाइलाज; विवशता. (२) सबब; बहाणा. (३) क्षमायाचना.

म'अजून (معجون) स्त्री. ('अ.) औषधमिश्रित अवलेह.

म'अज़ूर (معذور) वि. ('अ.) (१) असमर्थ; लाचार. (२) कुचकामाचा; निरुपयोगी.

म'अज़ूरी (معذوری) स्त्री. ('अ.) असमर्थता; विवशता; लाचारी.

म'अज़ूल (معزول) वि. ('अ.) काढून टाकलेला; पदच्युत.

म'अज़ूली (معزولی) स्त्री. ('अ.) पदच्युती.

म'अतफ़ (معطوف) वि.('अ.) दुसऱ्या शब्दावरोबर बोलला जाणारा शब्द. [उदा. ' राम व लक्ष्मण ' यातील राम हा शब्द मातूफ़ आहे.] –**अलैह** (علیہ –) वि. ('अ.) दोन शब्दांतील नंतरचा शब्द. [उदा. ' राम व लक्ष्मण ' यापैकी लक्ष्मण हा शब्द मातूफ़ अलैह आहे].

म'अतूब (معتوب) वि. ('अ.) ज्याच्यावर क्रोध, कोप झालेला आहे असा.

म'अदिन (معدن) पु. ('अ.) खाण.

म'अदिनियात (معدنیات) स्त्री. ('अ.) (१) खनिज पदार्थ. (२) खनिज विज्ञान.

म'अदिनी (معدنی) वि. ('अ.) खाणीतून निघालेला; खनिज.

म'अदिलत (معدلت) स्त्री. ('अ.) न्याय. –**गुस्तर** (گستر –) वि. ('अ.+फा.) न्यायी; न्यायनिष्ठ.

म'अदूद (معدود) वि. ('अ.) काही; थोडे.

म'अदूद-ए-चंद (معدود چند) वि. ('अ.+फ़ा.) फार थोडे; मोजके.

म'अदूम (معدوم) वि. ('अ.) (१) नष्ट; उध्वस्त. (२) लुप्त; अंतर्धान पावलेला.

म'अदूमी (معدومی) स्त्री. ('अ.) विनाश; विध्वंस.

म'अन् (معاً) अव्य. (१) अकस्मात; अचानक. (२) ताबडतोब.

म'अनन् (معناً) अव्य. ('अ.) अर्थाच्या दृष्टीने.

म'अनवी (معنوی) वि. ('अ.) (१) अर्थाचा; अर्थासंबंधी. (२) आंतरिक.

म'अनां (معنیٰ) पु. ('अ.) (१) अर्थ; आशय; अभिप्राय. (२) कारण. (३) अंतर; अंतःकरण; आंतरिक भाग. (अनेक वचनातही वापरला जातो).

म'अनी (معنی) पु. ('अ.) (१) अर्थ. (२) आंतरिक भाग.

म'अबद (معبد) पु. ('अ.) उपासनागृह; मंदीर.

म'अबर (معبر) पु. ('अ.) नदी वगैरे ओलांडण्याचे स्थान; घाट.

म'अबूद (معبود) वि. ('अ.) उपास्य; पूजिलेला; परमेश्वर.

म'अबूदियत (معبودیت) स्त्री ('अ.) ईश्वरत्व.

म'अमूर (معمور) वि. ('अ.) (१) वसलेला. (२) भरलेला; परिपूर्ण. (३) बंद; बंदिस्त; कुलुपात असलेला.

म'अमूरः (معمورہ) पु. ('अ.) वस्ती; लोकवस्ती.

म'अमूल (معمول) पु. ('अ.) (१) पद्धत; रीत; रिवाज. (२) नेहमीचा नियम; नित्यकर्म; रोजची गोष्ट. [अनेक ' म'अमूलात ' (معمولات)].

म'अमूली (معمولی) वि. ('अ.) (१) रोजचा (२) सामान्य; साधारण.

म'अयूब (معیوب) वि. ('अ.) (१) सदोष; दूषित; खराब. (२) निकृष्ट. (३) लज्जास्पद.

म'अरिफ़ः (معرکہ) पु. ('अ.) (१) मैदान; क्षेत्र. (२) रणांगण. (३) युद्ध; दंगा; दंगल. (४) वादविवाद. –आरा (آرا –) वि. ('अ.+फ़ा.) योद्धा; लढणारा; लढाऊ.

म'अरिद् (معرض) पु. ('अ.) जाहीर; व्यक्त होण्याचे स्थान. (अव्य.) (१) दरम्यान; मध्यंतरी. (२) साठी; करिता.

म'अरिफ़त (معرفت) स्त्री. ('अ.) (१) अध्यात्म विद्या; ब्रह्मज्ञान. (२) परिचय. (अव्य.) मार्फत; द्वारा; द्वारे.

म'अरिफ़ः (معرف) पु. ('अ.) विशेषनाम.

म'अरूद (معروض) वि. ('अ.) सांगितलेला; कथित; उक्त.

म'अरूदः (معروضہ) पु. ('अ.) प्रार्थना; विनंती; अर्ज. [अनेक ' म'अरूदात ' (معروضات)].

म'अक्रूफ़ (معروف) वि. ('अ.) (१) प्रसिद्ध; प्रख्यात. (२) ज्याचा कर्ता ज्ञात आहे असे क्रियापद.

म'अलूम (معلوم) वि. ('अ.) (१) ज्ञात; माहीत. (२) स्पष्ट; जाहीर. [अनेक 'म'अलूमात' (معلومات) स्त्री. ('अ.) (१) माहिती. (२) अनुभव. (३) पांडित्य].

म'अलूल (معلول) वि. ('अ.) सकारण; कारणसहित.

म'अशर (معشر) पु. ('अ.) (१) इष्टमित्रांचा जमाव. (२) जमात. (३) समुदाय.

म'अशूक़ (معشوق) वि. ('अ.) प्रेमपात्र; प्रेयसी; प्रियतमा.

म'अशूक़ानः (معشوقانہ) वि. ('अ.+फ़ा.) प्रेमपात्रासारखा; नखरेबाज.

म'अशूक़ः (معشوقہ) स्त्री. ('अ.) प्रेयसी; प्रिया; कांता.

म'असियत (معصیت) स्त्री. ('अ.) (१) पाप; पातक. (२) गुन्हा. (३) अवज्ञा; बंडखोरी.

म'असूम (معصوم) वि. ('अ.) (१) निर्दोष; निरपराध; निष्पाप. (२) निरागस.

म'असूमियत (معصومیت) स्त्री. ('अ.) निरागसता; भोळेपणा.

म'अहूद (معہود) वि. ('अ.) अंतःकरणात ठसलेली (गोष्ट).

म'आ'इब (معائب) पु. ['अ. 'म'ऑब' (معیب) चे अनेक.] दोष; दुर्गुण.

म'आज़ (معاذ) वि. ('अ.) रक्षणस्थान; शरणस्थान. **–अल्-लह** (اللہ –) वा. ('अ.) ईश्वर रक्षण करो.

म'आद (معاد) पु. ('अ.) परत जाण्याचे ठिकाण; यमलोक.

म'आनी (معانی) पु. ['अ. 'म'अनॉ' (معنیٰ) चे अनेक.] अर्थ; आशय. हा शब्द मुख्यतः अनेकवचनी. वापरला जातो. पण याचा अर्थ मात्र एकवचनी घेतला जातो. [उदा. 'इसके म'अनी' (اسکے معنی) याचा अर्थ].

मआब (مآب) पु. ('अ.) (१) स्थान; ठिकाण. (२) जेथे माणूस परत येतो असे स्थान; परतण्याचे ठिकाण. (३) प्रत्य. ('अ.) युक्त; सहित. [उदा. 'फ़दीलत मआब' (فضیلت مآب) वि. ('अ.) प्रतिष्ठावान].

म'आबिद (معابد) पु. ['अ. 'म'अबद' (معبد) चे अनेक.] उपासनास्थाने; मंदिरे; मशिदी; चर्च.

म'आरिज (معارج) पु. ['अ. 'मे'अराज' (معراج) चे अनेक.] शिडघा; जिने; पायऱ्या.

म'आरिफ़ (معارف) पु. ['अ. 'मु'अर्रफ़' (معرف) चे अनेक.] (१) परिचय; ओळख. (२) ['अ. 'म'अरिफ़ः' (معرفہ) चे अनेक.] परिचित लोक; मित्रमंडळी].

मआल (مآل) पु. ('अ.) (१) परिणाम; फळ. (२) निष्कर्ष. (३) अंत; शेवट. (४) बदल्यात मिळणारी गोष्ट. **–अंदेश** (اندیش –); **–बीं** (بیں –) वि. ('अ.+फ़ा.) परिणामाचा विचार करून वागणारा. **–अंदेशी** (اندیشی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) दूरदर्शीपणा; परिणामाचा विचार करून वागणे.

म'आश (معاش) स्त्री. ('अ.) (१) भाकरी; उपजीविकेचे साधन. (२) एखाद्या कामासाठी इनाम मिळालेली जमीन

म'आशियात (معاشیات) स्त्री. ('अ.) अर्थशास्त्र.

म'आशी (معاشی) वि. ('अ.) (१) उपजीविकेसंबंधी. (२) आर्थिक.

मआसीर (مآثر) पु. ['अ. 'मासूरः' (ماثور) चे अनेक.] चांगल्या खुणा; चांगली स्मृतिचिन्हे; सत्कृत्ये.

म'ऑब (معیب) पु. ('अ.) दोष; अवगुण.

म'ऑयत (معیت) स्त्री. ('अ.) साथ; बरोबर जाणे.

म'ऑशत (معیشت) स्त्री. ('अ.) (१) जीवन. (२) आजीविका. (३) जीवनावश्यक गोष्टी.

म'ऊनत (معونت) स्त्री. ('अ.) साह्य; मदत.

मक़न्न'अ (مقنع) पु. ('अ.) (१) लग्नाच्या वेळी वराला नेसविण्यात येणारे झिरझिरीत कापड. (२) मलमल; पातळ कापड.

मक़र्रर (مقرر) पु. ('अ.) निवासस्थान; पडाव.

मक़र्रर-उल्-ख़िलाफ़त (مقرر الخلافت) पु. ('अ.) राजधानी.

मक़स्सस (مقسس) पु. ('अ.) चावलेले स्थान; दंशित स्थळ.

मकातिब (مکاتب) पु. ['अ. 'मक्तब' (مکتب) चे अनेक.] प्राथमिक शाळा.

मकातीब (مکاتیب) पु. ['अ. 'मक्तूब' (مکتوب) चे अनेक.] पत्रे; चिठ्ठ्या.

मकान (مکان) पु. ('अ.) (१) घर; गृह. (२) स्थान. (३) जग. [अनेक 'मकानात' (مکانات)]. **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) घरमालक.

मक़ाबिर (مقابر) पु. ['अ. 'मक़बरः' (مقبرہ) चे अनेक.] मकबरे; थडगी; समाध्या.

मक़ाम (مقام) पु. ('अ.) (१) मुक्काम; पडाव. (२) स्थान; घर. (३) संधी; अवसर. (४) प्रतिष्ठा. [अनेक 'मक़ामात' (مقامات)].

मक़ामी (مقامی) वि. ('अ.) स्थानिक; स्थानिय.

मक़ाल (مقال) पु. ('अ.) संभाषण; बातचित.

मक़ालः (مقالہ) पु. ('अ.) (१) लेख; निबंध. (२) प्रबंध. (३) उक्ती; वचन. **–नवीस** (نویس –); **–निगार** (نگار –) वि. ('अ.+फ़ा.) निबंधकार.

मक़ासिद (مقاصد) पु. ['अ. 'मक़्सद' (مقصد) चे अनेक.] हेतू; उद्देश; उद्दिष्टे.

मकीं (مکیں); **मकीन** (مکین) वि. ('अ.) घरचा मालक; घरात राहाणारा.

फ़लक है, ज़मीं है, मकाँ है, मकीं है।
सभी कुछ है, लेकिन मुहब्बत नहीं है॥

मक़ूलः (مقولہ) पु. ('अ.) (१) वचन; उक्ती. (२) म्हण. [अनेक 'मक़ूलात' (مقولات)].

मक़्'अद (مقعد) स्त्री. ('अ.) मलद्वार; गुदा.

मक्कार (مکار) वि. ('अ.) (१) धूर्त; लबाड. (२) कपटी. [स्त्री. 'मक्कारः' (مکارہ)].

मक्कारी (مکاری) स्त्री. ('अ.) (१) धूर्तपणा; लबाडी. (२) कपट.

मक्कः (مکہ) पु. ('अ.) मुसलमानांचे प्रमुख तीर्थक्षेत्र. (हजरत मुहम्मद साहेबांचे जन्मस्थान. अरबस्तानची राजधानी. येथेच 'क'अबः' आहे).

मक़्त'अ (مقطع) पु. ('अ.) (१) गझलचा शेवटचा शेर (श्लोक). यात सामान्यतः कवीचे टोपणनाव असते. (२) शेवट. (३) ताटातूट होणे.

मक्तब (مکتب) पु. ('अ.) पाठशाळा; विद्यालय. **–खानः** (خانہ –) पु. **–गाह** (گاہ –) ('अ.+फ़ा.) विद्यालय. [यातील 'खानः' (خانہ) व 'गाह' (گاہ) हे शब्द द्विरुक्ती करणारे म्हणून अशुद्ध आहेत].

मक़्तल (مقتل) पु. ('अ.) वधस्थान; वधभूमी.

मक़्तू'अ (مقطوع) वि. ('अ.) विच्छिन्न; कापला गेलेला.

मक्तूब (مکتوب) वि. ('अ.) लिखित; लिहिलेला. (पु.) पत्र; चिठ्ठी. **–इलैह** (الیہ –) वि. ('अ.) ज्याला पत्र लिहावयाचे तो.

मक्तूम (مکتوم) वि. ('अ.) गुप्त; गुह्य; लपलेला.

मक़्तूल (مقتول) वि. ('अ.) ज्याची कत्तल करण्यात आली आहे असा; निहत; वधित.

मक़्दूनियः (مقدونیہ) पु. ('अ.) बाल्कन देशातील एक देश; शिकंदराचा देश.

मक़्दूर (مقدور) पु. ('अ.) (१) शक्ती; सामर्थ्य; मगदूर (२) ताबा; काबू. (३) समावेश; मावणे. (४) संपत्ती. (५) साहस.

मक़्नातीस (مقناطیس) पु. ('अ.) लोहचुंबक.

मक्नून (مکنون) वि. ('अ.) लपविलेला; गुप्त. (पु.) रत्न्य.

मक्फ़ूफ़ (مکفوف) वि. ('अ.) कापड गुंडाळलेला. (पु.) उर्दू वृत्तातील सात अक्षरगण.

मक्फ़ूल (مکفول) वि. ('अ.) गहाण ठेवलेला.

मक़्बरः (مقبرہ) पु. ('अ.) ज्याच्यावर इमारत अथवा घुमट आहे असे थडगे; समाधी; मजार; दरगा.

मक़्बूज़ः (مقبوضہ) वि. ('अ.) कब्जात असलेला; ताब्यातील; व्यापलेला.

मक़्बूल (مقبول) वि. ('अ.) (१) लोकप्रिय. (२) पसंत केलेला. (३) स्वीकृत; मंजूर; कबूल केलेला.

मक़्बूलियत (مقبولیت) स्त्री. ('अ.) (१) लोकप्रियता. (२) पसंती; रुची.

मक्र (مکر) पु. ('अ.) (१) फसवणूक; दगा; कपट. (२) बहाणा; मिष. (३) लबाडी.

मक्रमत (مکرمت) स्त्री. ('अ.) (१) कृपा; दया; अनुकंपा. (२) प्रतिष्ठा; सन्मान.

मक्रूक़ (مقروق); **मक्रूक़ः** (مقروقہ) वि. (तु.) जप्त केलेला.

मक़्रूज़ (مقروض) वि. ('अ.) ऋणी; कर्जदार.

मक़्रून (مقرون) अव्य. ('अ.) जवळ; समीप; निकट. (वि.) जवळ केलेला; जोडलेला.

मक्रूब (مکروب) वि. ('अ.) दुःखी; शोकाकुल.

मक्रूह (مکروہ) वि. ('अ.) (१) किळसवाणा; घाणेरडा. (२) इस्लामी धर्माप्रमाणे निषिद्ध नसलेली परंतु खाण्यास चांगली नसलेली वस्तू.

मक़्लूब (مقلوب) वि. ('अ.) उलटलेला; पालटलेला. (पु.) सरळ व उलटीकडून सारखाच वाचता येणारा शब्द.

मक्शूफ़ (مکشوف) वि. ('अ.) प्रकट; व्यक्त; जाहीर.

मक़्सद (مقصد) पु. ('अ.) (१) उद्देश; ध्येय. (२) इच्छा; आकांक्षा.

मक़्सूद (مقصود) वि. ('अ.) उद्दिष्ट; अभिप्रेत; गर्भित. (पु.) (१) इच्छा; अभिलाषा. (२) उद्देश.

मक्सूब (مکسوب) वि. ('अ.) कमावलेला; पैदा केलेला; मिळविलेला.

मक़्सूम (مقسوم) वि. ('अ.) (१) विभागलेला; विभाजित; वाटणी केलेला. (पु.) भाग्य; नशीब. (२) भाज्य (गणित). **–'अलैह** (علیہ –) पु. ('अ.) भाजक (संख्या).

मक़्सूर (مقصور) वि. ('अ.) लहान किंवा कमी केलेला; ह्रस्व.

मक्सूर (مکسور) वि. ('अ.) (१) भग्न. (२) ज्याच्या खाली 'इ'कारार्थ दर्शक 'कसर' अथवा 'जेर' चे चिन्ह (‐) दिलेले आहे असे अक्षर.

मक़्हूर (مقهور) वि. ('अ.) ज्याच्यावर देवाचा कोप झालेला आहे असा.

मख़ाफ़ (مخاف) पु. ('अ.) भयस्थान; धोक्याचे ठिकाण.

मख़ाफ़त (مخافت) स्त्री. ('अ.) (१) भय. (२) शंका. (३) चिंता.

मख़ीज (مخیز) पु. ('अ.) ताक; मठ्ठा.

मख़ील (مخول) पु. (हिं.) थट्टा; टर.

मख़्जन (مخزن) पु. ('अ.) (१) कोप; भांडार. (२) गोदाम. (३) खजिना. (४) खाण. (५) मासिक-पत्र.

मख़्ज़ून (مخزون) वि. ('अ.) (१) खजिन्यात ठेवलेला. (२) गाडलेला; पुरून ठेवलेला.

मख़्ज़ूल (مخزول) वि. ('अ.) अपमानित; तिरस्कृत.

मख़्तूत: (مخطوط) पु. ('अ.) (१) प्राचीन हस्तलिखित पत्र वगैरे. (२) मुद्रणप्रत. [अनेक 'मख़्तूतात' (مخطوطات)].

मख़्तून (مختون) वि. ('अ.) ज्याचा 'खत्नः' (सुंता) झालेला आहे असा.

मख़्तूबः (مخطوبہ) स्त्री. ('अ.) जिचे लग्न ठरले आहे किंवा जिचा साखरपुडा झाला आहे अशी स्त्री.

मख़्तूम (مختوم) वि. ('अ.) मोहरबंद; मुद्रांकित.

मख़्दूम (مخدوم) वि. ('अ.) स्वामी; मालक; मुस्लिम धर्माचार्य. (ज्याची खिदमत किंवा सेवा केली जाते असा).

मख़्दूश (مخدوش) वि. ('अ.) (१) भयंकर; धोक्याचा. (२) शंकाकुल.

मख़्नूक़ (مخنوق) वि. ('अ.) ज्याला मान मुरगळून ठार मारण्यात आलेले आहे असा.

मख़्फ़ी (مخفی) वि. ('अ.) गुप्त; लपलेला.

मख़्बूत (مخبوط) वि. ('अ.) चक्रम; वेडपट; विक्षिप्त; छांदिष्ट.

मख़्मल (مخمل) स्त्री. (फ़ा.) मखमल.

मख़्मसः (مخمصہ) पु. ('अ.) (१) कटकट; भानगड. (२) चिंता (३) भीती.

मख़्मूर (مخمور) वि. ('अ.) कैफात, धुंदीत असलेला; झिंगलेला; धुंद.

मख़्रज (مخرج) पु. ('अ.) (१) उगम. (२) व्युत्पत्ती. (३) अक्षराच्या उच्चाराचे स्थान.

मख़्रूत् (مخروط); **मख़्रूती** (مخروطی) वि. ('अ.) (१) निमुळता; गाजराच्या आकाराचा. (२) नाम-लेला; सोललेला.

मख़्लिसी (مخلصی) स्त्री. (फ़ा.) सुटका; बंधनातून मुक्ती.

मख़्लू'अ (مخلوع) वि. ('अ.) बाहेर काढलेला.

मख़्लूक़ (مخلوق) वि. ('अ.) उत्पन्न झालेला; निर्मित. (स्त्री.) जग; सृष्टी; मानव. [अनेक 'मख़्लूक़ात' (مخلوقات) स्त्री. ('अ.) जगातील सर्व गोष्टी].

मख़्लूत् (مخلوط) वि. ('अ.) मिसळलेला; मिश्रित; भेसळ झालेला.

मख़्सूस् (مخصوص) वि. ('अ.) खास; प्रमुख; विशेष; निवडक.

मग़ (مغ) वि. (फ़ा.) गंभीर; गहन; खोल. (पु.) लहान नदी.

मगर (مگر) अव्य. (फ़ा.) पण; परंतु.

मगस (مگس) स्त्री. (फ़ा.) माशी; मक्षिका. **-गीर** (گیر –) वि. (फ़ा.) माशी पकडणारा. (स्त्री.) कोळी (किडा). **-रां** (راں –) वि. (फ़ा.) माशी उडविणारा. (पु.) चवरी; मोरचल.

मग़ाक (مغاک) पु. (फ़ा.) खड्डा; गर्त.

मग़ारः (مغارہ) पु. ('अ.) (१) डोंगरातील गुहा; गुंफा. (२) लुटालूट करण्याची जागा.

मग़्ज (مغز) पु. (फ़ा.) (१) मेंदू; मस्तिष्क. (२) गीर; गर. (३) बुद्धी. (४) सार; सत्त्व; तत्त्व. (५) निष्कर्ष.

मग़्दूब (مغضوب) वि. ('अ.) ज्याच्यावर कोप झालेला आहे असा.

मग़्फ़िरत (مغفرت) स्त्री. ('अ.) मोक्ष; मुक्ती; सुटका.

कहते हैं आज जौक़ जहाँ से गुज़र गया ।
क्या ख़ूब आदमी था ख़ुदा मग़्फ़िरत करे ॥

मग़्फ़ूर (مغفور) वि. ('अ.) मोक्षास गेलेला; मृत; परलोकवासी.

मग़्बूत (مغبوط) वि. ('अ.) इतर लोक ज्याचा हेवा करतात असा.

मग़्मूज (مغموز) वि. ('अ.) (१) ज्याच्यावर आरोप करण्यात आला आहे असा. (२) दूषित; विकृत.

मग़्मूम (مغموم) वि. ('अ.) दुःखी; शोकग्रस्त; व्यथित.

मग़्रिब (مغرب) पु. ('अ.) पश्चिम (दिशा); अस्ताचल.

मग़्रिबी (مغربی) वि. ('अ.) पश्चिमी; पाश्चिमात्य; पाश्चात्य; युरोपीय.

मग़्रूर (مغرور) वि. ('अ.) अहंकारी; घमेंडखोर.

मग़्रूरी (مغروری) स्त्री. ('अ.) गर्व; अहंकार; घमेंड.

मग़्लतः (مغلطہ) पु. ('अ.) जेथे एखादी व्यक्ती भ्रमात पडते असे स्थान.

मग़्लूक़ (مغلوق) वि. ('अ.) ज्याची दारे बंद आहेत असा दरवाजा.

मरलूब (مغلوب) वि. ('अ.) (१) पराभूत. (२) अधीन; तावडीत सापडलेला.

मरलूल (مغلول) वि. ('अ.) शृंखलित; ज्याच्या गळघात शिक्षेचे कडे पडलेले आहे असा.

मरशूश (مغشوش) वि. ('अ.) भेसळ केलेला; जिच्यात हलकी वस्तू मिसळलेली आहे अशी शुद्ध वस्तू.

मरस (مغص) स्त्री. ('अ.) मुरडा (पोटातील कळ).

मरसूल (مغسول) वि. ('अ.) (१) आंघोळ घातलेला; धुतलेला. (२) एखाद्या अर्कात घोटलेले औषध.

मज़म्मत (مذمت) स्त्री. ('अ.) (१) अपमान; तिरस्कार. (२) खरडपट्टी.

मज़ल्लत (مذلت) स्त्री. ('अ.) तिरस्कार; अपमान.

मजल्लः (مجلہ) पु. ('अ.) वृत्तपत्र; नियतकालिक; मासिक.

मज़ाक़ (مذاق) पु. ('अ.) (१) थट्टा; मस्करी; गंमत; विनोद. (२) रसिकता; सुरुची.

मजाक़-ए-अदब (مذاق ادب) पु. ('अ.) साहित्य; रसिकता.

मज़ाक़न् (مذاقاً) अव्य. ('अ.) गंमत म्हणून; थट्टेने.

मज़ाक़ियः (مذاقیہ) वि. ('अ.) थट्टेखोर; विनोदी; गमतीचा.

मजाज़ (مجاز) पु. ('अ.) (१) ईश्वराव्यतिरिक्त सारे विश्व. (२) भ्रम; अवास्तविक गोष्ट. (३)जाण्याचा रस्ता. (४) लाक्षणिक वाक्य. (५) अधिकार; सामर्थ्य; पात्रता. (वि.) अधिकारी; समर्थ.

मजाज़न् (مجازاً) अव्य. ('अ.) लाक्षणिक अर्थाने.

मजाज़ी (مجازی) वि. ('अ.) (१) संसारिक; ऐहिक; भौतिक. (२) नकली; खोटा.

मज़ामीर (مزامیر) पु. ['अ. 'मिज़मार' (مزمار) चे अनेक.] (१) वासऱ्या; मुरल्या. (२) सर्व प्रकारची वाद्ये.

मजार (مزار) पु. ('अ.) (१) समाधी; संत-महात्म्याची कबर. (२) धार्मिक भावनेने लोक जेथे दर्शनासाठी जातात अशी समाधी.

मजाल (مجال) स्त्री. ('अ.) (१) शक्ती; सामर्थ्य. (२) हिम्मत.

मज़ालिम (مظالم) पु. ['अ. 'मज़लमः' (مظلمہ) चे अनेक.] जुलूम; अत्याचार.

मजालिस (مجالس) स्त्री. ['अ. 'मज्लिस' (مجلس) चे अनेक.] सभा; मैफली.

मज़ाहिब (مذاہب) पु. ['अ. 'मज़्हब' (مذہب) चे अनेक.] अनेक धर्म, पंथ.

मज़ाहिर (مظاہر) पु. ['अ. 'मज़्हर' (مظہر) चे अनेक.] व्यक्त होण्याचे स्थान; प्रतीके; व्यक्त; जाहीर गोष्टी.

मज़िन्नः (مظنہ) पु. ('अ.) शंकास्थान; ज्याच्याविषयी शंका घेता येईल असा मनुष्य.

मज़िल्लत (مزلت) स्त्री. ('अ.) निसरडे; घसरणे.

मज्जी (مزی) स्त्री. ('अ.) संभोगाच्या वेळी पुरुषाच्या जननेंद्रियातून बाहेर पडणारा चिकट पदार्थ.

मजीद (مجید) वि. ('अ.) पूज्य; आदरणीय; प्रतिष्ठित.

मज़ीद (مزید) वि. ('अ.) अधिक; अतिरिक्त; आणखी; जास्तीचा.

मजूस (مجوس) पु. ('अ.) अग्निपूजक लोक; पारशी; चंद्र-सूर्य पूजक.

मज़ः (مزہ) पु. (फ़ा.) (१) स्वाद; लज्जत. (२) मौज; आनंद; गंमत. (३) चटक. (४) सहल; सफर; मनोरंजन. (५) शिक्षा; दंड. **–दार** (دار –) (उच्चार : मज़ेदार) वि. (फ़ा.) (१) मजेदार. (२) स्वादिष्ट. (३) मनोरंजक; गमतीदार.

मज़्कूर (مذکور) वि.('अ.) सांगितलेला; उल्लिखित. (पु.) चर्चा; उल्लेख.

मज़्कूरी (مذکوری) पु. ('अ.) (१)पट्टेवाला; शिपाई. (२) समन्स बजावणारा कोर्टाचा शिपाई.

मज़्कूरः (مذکورہ) वि. ('अ.) सांगितलेली; उल्लिखित (गोष्ट).

मज़्कूरः-ए-बाला (مذکورۂ بالا) वि. ('अ.+फ़ा.) वर उल्लेखिलेला; उल्लिखित.

मज़्ज़ूब (مجذوب) वि. ('अ.) (१) ओढला गेलेला; आकर्षित केलेला; शोषण केलेला. (२) तल्लीन; तन्मय. (पु.) वाह्यतः वेडा वाटणारा परंतु वस्तुतः ब्रह्मलीन असणारा साधू.

मज़्ज़ूम (مجزوم) वि. ('अ.) महारोगी.

मज़्ज़ूर (مجزور) पु. ('अ.) वर्गफळ; एखाद्या संख्येला त्याच संख्येने गुणून येणारा गुणाकार.

मज्द (مجد) पु. ('अ.) श्रेष्ठता; पावित्र्य; महानता.

मज़्दूर (مزدور) पु. (फ़ा.) मजूर; श्रमजीवी; कामगार.

मज़्दूरी (مزدوری) स्त्री. (फ़ा.) मजुरी; मजुराचे काम; मेहनत; परिश्रम.

मज्नूं (مجنوں) वि. ('अ.) वेडा; विक्षिप्त; छांदिष्ट.

मज़्बलः (مزبلہ) पु. ('अ.) उकीरडा; मैला टाकण्याची जागा.

मज़्बह (مذبح) पु. ('अ.) वधस्थळ; बलिवेदी.

मज्बूर (مجبور) वि. ('अ.) (१) नाइलाज झालेला; विवश; भाग पाडला गेलेला. (२) लाचार; निराधार. (३) दरिद्री.

मज्बूरन् (مجبوراً) अव्य. ('अ.) नाइलाजाने; निरुपायास्तव; अनिच्छापूर्वक.

मज्बूरी (مجبوری) स्त्री. ('अ.) विवशता; नाइलाज; लाचारी; निरुपाय.

मज्बूल (مجبول) वि. ('अ.) नैसर्गिक; प्राकृतिक.

मज्बूह (مذبوح) वि. ('अ.) ठार केलेला; घळी दिलेला.

मज्म'अ (مجمع) पु. ('अ.) (१) लोकांची गर्दी; जमाव; समुदाय. (२) सभा.

मज्मू'अ (مجموع) वि. ('अ.) एकत्रित; समस्त; सारा.

मज्मू'ई (مجموعی) वि. ('अ.) एकूण; सामूहिक; सामुदायिक; एकत्रित.

मज्मू'अः (مجموعہ) पु. ('अ.) अनेक वस्तू एकत्र करणे; संग्रह; लेखसंग्रह.

मज्मूम (مزموم) वि. ('अ.) अश्लील; दूषित.

मज्र'अ (مزرع) पु. ('अ.) (१) शेती; शेत. (२) लहान गाव; खेडे.

मज्र'अः-ए-आखिरत (مزرعۂ آخرت) पु. ('अ.) परलोकाची शेती; पाप व पुण्य.

मज्रॉ (مجریٰ) पु. ('अ.) वाहाण्याचे स्थान; जारी होण्याचे ठिकाण.

मज्रू'अ (مزروع); **मज्रू'अः** (مزروعہ) वि. ('अ.) नांगरलेले, परलेले (शेत); लागवडीखाली असलेली (जमीन).

मज्र्र (مجرور) वि. ('अ.) ज्याला खाली 'इ' कारदर्शक 'जेर' चे चिन्ह (ـِـ) देण्यात आलेले आहे असे (अक्षर).

मज्रूह (مجروح) वि. ('अ.) (१) घायाळ; जखमी. (२) उलट तपासणीत डळमळलेली जबानी.

मज़्लिम (مظلم) पु. ('अ.) काळोखाने भरलेली जागा.

मज्लिस (مجلس) स्त्री. ('अ.) (१) सभा; संमेलन. (२) मैफल. (३) संस्था; समिती; संघ. (४) करबल्याच्या हुतात्म्यासाठी भरविलेली दुखवटधाची सभा.

मज्लिस-ए-'आमिलः (مجلس عاملہ) स्त्री. ('अ.) कार्यकारी समिती; कार्यकारीणी; कार्य समिती; विषय नियामक समिती.

मज्लिस-ए-क़ानूनसाज़ (مجلس قانون ساز) स्त्री. ('अ.) कायदे मंडळ; विधानसभा; घटना परिषद.

मज़्लूम (مظلوم) वि. ('अ.) अत्याचार पीडित; जुलूम झाला आहे असा.

मज़्हब (مذہب) पु. ('अ.) धर्म; पंथ; मत; संप्रदाय.

मज़्हबी (مذہبی) वि. ('अ.) धार्मिक; धर्मासंबंधी.

मज़्हर (مظہر) पु. ('अ.) प्रकट होण्याचे स्थान; अभिव्यक्ती.

मज्हूल (مجہول) वि. ('अ.) (१) अज्ञात. (२) आळशी; सुस्त. (३) थकलेला.

मत'ऊन (مطعون) वि. ('अ.) (१) कुप्रसिद्ध; बदनाम. (२) दोषी; लांछित.

मत़ब (مطب) पु. ('अ.) औषधालय; दवाखाना.

मत़र (مطر) पु. ('अ.) पाऊस; वर्षा.

मता'अ (متاع) पु. स्त्री. ('अ.) (१) भांडवल संपत्ती; मालमत्ता. (२) सामानसुमान.

किसी के काम आयेगा मता'अ-ए-रायगाँ हो कर।
कहाँ जाता है यारब, दिल मेरा अश्क-ए-रवाँ हो कर ।।

मतानत (متانت) स्त्री. ('अ.) गंभीर्यता; दृढता; सभ्यता.

मत़ाफ़ (مطاف) पु. ('अ.) प्रदक्षिणेचा मार्ग; प्रदक्षिणा; फेरी.

मत़ाबि'अ (مطابع) पु. ['अ. 'मत्ब'अ' (مطبع) चे अनेक.] छापखाने; मुद्रणालये.

मत़ार (مطار) पु. ('अ.) उडण्याचे स्थान.

मत़ालिब (مطالب) पु. ['अ. 'मत़्लब' (مطلب) चे अनेक.] अर्थ; आशय.

मतीन (متین) वि. ('अ.) (१) गंभीर; स्थिरबुद्धी; शांतचित्त. (२) परमेश्वर.

मत़ीर (مطیر) वि. ('अ.) वर्षणारा (ढग).

मत्न (متن) पु. ('अ.) (१) पुस्तकातील मूळ मजकूर. (ज्याच्यावर टीका किंवा भाष्य केले जाते). (२) मध्य; मधला भाग.

मत्ब'अ (مطبع) पु. ('अ.) छापखाना; मुद्रणालय.

मत्बख (مطبخ) पु. ('अ.) स्वयंपाकघर; पाकशाळा.

मत्बखी (مطبخی) पु. ('अ.) आचारी; स्वयंपाकी.

मत्बू'अ (متبوع) वि. ('अ.) अनुकरणीय; अनुसरणीय.

मत्बू'अ (مطبوع); **मत्बू'अः** (مطبوعہ) वि. ('अ.) (१) छापलेला; मुद्रित. (२) पसंत पडलेला.

मत्बू'आत (مطبوعات) स्त्री. वि. ('अ.) (१) छापलेली, प्रकाशित झालेली (पुस्तके). (२) पसंत, आवडत्या (गोष्टी).

मत्बूख (مطبوخ) वि. ('अ.) विस्तवावर शिजवलेली (वस्तू); उकळलेला (काढा).

मत्रूक (متروک); **मत्रूकः** (متروکہ) वि. ('अ.) सोडून दिलेला; परित्यक्त; परित्यक्ता; टाकून दिलेला; मागे राहिलेला.

मत्रूद (مطرود) वि. ('अ.) बहिष्कृत; बाहेर काढलेला; पळवून लावलेला.

मत्ल'अ (مطلع) पु. ('अ.) (१) गझलाचा पहिला शेर. याचे दोन्ही चरण सानुप्रास असतात. (२) सूर्योदयाचे स्थान; क्षितिज: आकाश; पूर्व दिशा.

मत्लब (مطلب) पु. ('अ.) (१) तात्पर्य; आशय; सारांश. (२) अर्थ. (३) उद्देश; हेतू; प्रयोजन. (४) हित; स्वार्थ. (५) इच्छा. (६) संबंध. **–आश्ना** (آشنا –) वि. ('अ.+फ़ा.) स्वार्थी.

मत्लबी (مطلبی) वि. ('अ.) स्वार्थी; स्वार्थपरायण.

मत्लूब (مطلوب) वि. ('अ.) मागितलेला; मागविलेला; अभीप्सित. [स्त्री. 'मत्लूबः' (مطلوبہ) स्त्री. वि. ('अ.) प्रेयसी; अभीप्सित वस्तू].

मत्वी (مطوی) वि. ('अ.) लपेटलेला; गुंडाळलेला.

मद (مد) स्त्री. ('अ.) जमाखर्चाच्या वहीमध्ये ओढण्यात येणारी लांब रेष. या रेषेखाली वेगवेगळघा रकमा लिहिल्या जातात. (पु.) (१) उर्दू लिपीतील 'अलिफ़' (ا) वर दिली जाणारी आडवी रेष (~). हिच्यामुळे 'अ' चा 'आ' बनतो. (२) समुद्राची भरती.

मद'ऊ (مدعو) वि. ('अ.) निमंत्रित; भोजनासाठी बोलाविलेला; आमंत्रित.

मदक़ूक़ (مدقوق) वि. ('अ.) क्षयाचा रोगी; क्षयरोग.

मदखनः (مدخنہ) स्त्री. ('अ.) घुरांडे.

मदख़ल (مدخل) पु. ('अ.) (१) दाखल होण्याचे स्थान; प्रवेशद्वार. (२) प्राप्ती; आवक.

मदख़लः (مدخلہ) वि. ('अ.) दाखल, जमा केलेला; ठेवलेला; भरलेला.

मदख़ूल (مدخول) वि. ('अ.) दाखल केलेला; आत आणलेला.

मदख़ूलः (مدخولہ) स्त्री. ('अ.) रखेली; उपपली.

मदद (مدد) स्त्री. ('अ.) (१) मदत; साह्य; आश्रय. (२) समर्थन. (३) मजुराचे काम. **–गार** (گار –) वि. ('अ. + फ़ा.) (१) मदतनीस; सहाय्यक. (२) समर्थक; पाठीराखा; आश्रयदाता.

मदनी (مدنی) वि. ('अ.) (१) मदीना शहराचा रहिवासी. (२) नागरिक.

मदफ़न (مدفن) पु. ('अ.) कबरस्थान; स्मशान; समाधिभवन.

मदफ़ू'अ (مدفوع) वि. ('अ.) दूर केलेला; काढून टाकलेला; निवारण केलेला.

मदफ़ून (مدفون) वि. ('अ.) (१) दफन केलेला; गाडलेला; पुरलेला. (२) गुप्त.

मदबूग़ (مدبوغ) वि. ('अ.) कमावलेले (कातडे).

मदबूत (مضبوط) वि. ('अ.) (१) दृढ; पक्का; निश्चित. (२) शक्तिशाली. (३) स्थायी.

मदबूती (مضبوطی) स्त्री. ('अ.) (१) दृढता; निश्चय; खात्री. (२) शक्ती. (३) स्थायित्व.

मदमून (مضمون) पु. ('अ.) (१) मजकूर. (२) निबंध. (३) विषय. (४) स्थिती. **–नवीस** (نویس –); **–निगार** (نگار –) वि. ('अ. + फ़ा.) लेखक; निबंधकार.

मदमूम (مضموم) वि. ('अ.) (१) जोडलेला; संबद्ध. (२) ज्याच्यावर 'दम' किंवा 'पेश' (ـُ) हे उकारदर्शक चिन्ह लागलेले आहे असे (अक्षर).

मदयून (مدیون) वि. ('अ.) ऋणी; कर्जदार.

मदरज (مدرج) स्त्री. ('अ.) चालण्याचे व जाण्याचे स्थान; पायरी.

मदरसः (مدرسہ) पु. ('अ.) पाठशाळा; विद्यालय.

मदरूब (مضروب) वि. ('अ.) (१) बडविलेला; घायाळ केलेला; मारलेला. (२) ज्या संख्येला गुणण्यात आले आहे अशी. **–फ़ीहि** (فیہ –) पु. ('अ.) गुण्य (जिला गुणले जाते ती संख्या). **–मिनहु** (منہ –) पु. ('अ.) गुणक (जिने गुणले जाते ती संख्या).

मदर्रत (مضرت) स्त्री. ('अ.) हानी; नुकसान.

मदह (مدح) स्त्री. ('अ.) (१) प्रशंसा; स्तुती. (२) वंदना; प्रार्थना. (पु.) **–ख्वाँ** (خواں –); **–गो** (گو –); **–संज** (سنج –); **–सरा** (سرا –) वि. ('अ.+फ़ा.) प्रशंसक; स्तुती करणारा.

मदहिकः (مضحکہ) पु. ('अ.) (१) थट्टा; विनोद; उपहास. (२) निंदा.

मदहोश (مدھوش) वि. ('अ.) (१) नशेत चूर असलेला; झिंगलेला; मस्त. (२) बेशुद्ध. (३) हतबुद्ध; भयभीत.

मर्वा (مضیٰ) क्रि. ('अ.) गेला. (वि.) गेलेला; व्यतीत झालेला.

मदाख़िल (مداخل) पु. ['अ. 'मदख़ल' (مدخل) चे अनेक.] (१) प्रवेशद्वार. (२) प्राप्ती; आवक (अनेक).

मदाख़िलत (مداخلت) स्त्री. ('अ.) प्रवेश; कब्जा; हस्तक्षेप; अडथळा.

मदाख़िलत-ए-बेजा (مداخلت بیجا) स्त्री. ('अ.+फ़ा.) परवानगीशिवाय प्रवेश करणे.

मदामीन (مضامین) पु. ['अ. 'मदमून' (مضمون) चे अनेक.] विषय; लेख; लेखसंग्रह.

मदार (مدار) पु. ('अ.) (१) आधार; आश्रय. (२) आस; कणा. (३) फिरण्याचा मार्ग; कक्षा.

–उल्-महाम (المهام –) पु. ('अ.) पंतप्रधान; दिवाण. महामंत्री.

मदारा (مدارا); **मदारात** (مدارت) स्त्री. ('अ.) (१) नम्रता. (२) आदरसत्कार.

मदारिज (مدارج) पु. ['अ. 'मदरज' (مدرج) चे अनेक.] (१) हुद्दे. (२) दर्जे; श्रेणी; वर्ग. (३) पायऱ्या.

मदारिस (مدارس) पु. ['अ. 'मदरसः' (مدرسہ) चे अनेक.] शाळा; विद्यालये.

मदीद (مدید) वि. ('अ.) लांब; उंच; दीर्घ.

मदीनः (مدینہ) पु. ('अ.) (१) नगर; शहर. (२) अरबस्तानातील प्रसिद्ध शहर व तीर्थक्षेत्र.

मदीह् (مدیح) स्त्री. ('अ.) प्रशंसा; स्तुती. (वि.) प्रशंसक; स्तुतिपाठक.

मद्द-ए-नज़र (مدنظر) अव्य. ('अ.) दृष्टीसमोर; लक्षात (घेता). (वि.) दृष्टीसमोरचा; मनात ठसलेला; मनोवांछित.

मद्द-ए-मुक़ाबिल (مدمقابل) पु. ('अ.) प्रतिद्वंद्वी; विरोधी; शत्रू.

मद्द-ओ-जज़्र (مدوجذر) पु. ('अ.) समुद्राची भरती-ओहोटी.

मद्द ज़िल्लुहु (مدظلہ) वा. ('अ.) त्यांची सावली लांब पडो. त्यांना भरपूर आयुष्य लाभो.

मद्दाह् (مداح) वि. ('अ.) प्रशंसक; स्तुतिकर्ता; भक्त.

मन (من) पु. (फ़ा.) (१) मण (चाळीस शेर). (२) एक शेर (दोन रत्तल). (सर्व.) मी; अहम्.

मन'अ (منع) वि. ('अ.) मनाई केलेला; प्रतिबंधित; निषिद्ध; वर्ज्य.

मनाज़िर (مناظر) पु. ['अ. 'मंज़र' (منظر) चे अनेक.] दृश्ये.

मनाज़िल (منازل) स्त्री. ['अ. 'मंज़िल' (منزل) चे अनेक.] मजले; टप्पे.

मनाज़िल-ए-क़मर (منازل قمر) स्त्री. ('अ.) २७ नक्षत्रे.

मनात् (مناط) स्त्री. ('अ.) (१) मूळ आधार; पाया गुंडाळणे. (२) टांगणे.

मनाब (مناب) पु. ('अ.) उभे राहण्याचे स्थान; दुसऱ्यांच्या जागी उभे राहणें.

मनाम (منام) पु. ('अ.) शयननगर; झोपणे.

मनार (منار); **मनारः** (منارہ) पु. ('अ.) (१) मनोरा. (२) स्तंभ. (३) दीपस्तंभ.

मनाल (منال) पु. ('अ.) धन; संपत्ती; मालमत्ता.

मनाही (مناهی) पु. ['अ. 'मन्ही' (منہی) चे अनेक.] धर्माने निषिद्ध अथवा वर्ज्य ठरविलेल्या गोष्टी. (स्त्री.) मनाई; बंदी.

मनिश (منش) स्त्री. (फ़ा.) स्वभाव; प्रकृती; वृत्ती. (प्रत्य.) स्वभावाचा. [उदा. 'आज़ाद मनिश' (آزاد منش) वि. (फ़ा.) स्वतंत्र वृत्तीचा].

मनी (منی) स्त्री. ('अ.) वीर्य; शुक्र; धातू.

मनी (منی) पु. (फ़ा.) ममत्व; अहंकार; अस्मिता.

मनी'अ (منیع) वि. ('अ.) (१) अडविणारा; मनाई करणारा. (२) दृढ; मजबूत.

मनीयत (منیت) स्त्री. ('अ.) मृत्यू; मरण.

मनूब (منوب) वि. ('अ.) ज्याचे प्रतिनिधित्व केले जाते असा. –'अनहु (عنہ –) वि. ('अ.) प्रतिनिधी.

मन्क़बत (منقبت) स्त्री. ('अ.) साधुसंतांचे यशोगान.

मन्क़ल (منقل) स्त्री. ('अ.) शेगडी.

मन्क़िदत (منقضت) स्त्री. ('अ.) परस्पर विरोध; तोडणे; तोड.

मन्क़िसत (منقصت) स्त्री. ('अ.) (१) ऱ्हास. (२) दोष; उणीव. (३) तिरस्कार.

मन्क़ूत् (منقوط); **मन्क़ूतः** (منقوطہ) वि. ('अ.) ज्यात (वर किंवा खाली) नुक्ता अथवा टिंब आहे असे उर्दूचे अक्षर (ث ج ذ ب ش) वगैरे.

मन्कूब (منکوب) वि. ('अ.) दरिद्री; कंगाल.

मन्क़ूल (منقول) वि. ('अ.) (१) स्थानांतरीत; एका ठिकाणाहून हलवून दुसरीकडे ठेवलेला. (२) नक्कल; प्रतिलिपी केलेला; उद्धृत. (३) एकाचे ऐकून दुसऱ्याला सांगितलेले.

मन्क़ूलः (منقولہ) वि. ('अ.) (१) जंगम, स्थानांतरीत करता येणारी वस्तू. (२) नक्कल; प्रतिलिपी केलेला.

मन्क़ूश (منقوش) वि. ('अ.) चित्रित, अंकित केलेला; खोदलेला; कोरलेला.

मन्कूह् (منکوح) वि. पु. ('अ.) निकाह केलेला; विवाहित (पुरुष).

मन्कूहः (منکوحہ) स्त्री. वि. ('अ.) विवाहित स्त्री.

मन्खिर (منخر) पु. ('अ.) नाकपुडी.

मन्ना'अ (مناع) वि. ('अ.) मनाई करणारा; प्रतिरोधक.

मन्नान (منان) वि. ('अ.) पुष्कळ उपकार करणारा; परमेश्वर.

मन्फ़'अत (منفعت) स्त्री. ('अ.) (१) लाभ; फायदा. (२) फळ; परिणाम; निकाल.

मन्फ़ज़ (منفز) पु. ('अ.) (१) छिद्र; विवर. (२) मार्ग.

मन्फ़ी (منفی) वि. ('अ.) (१) नष्ट केलेला; पुसून टाकलेला; रद्द केलेला. (२) कमी केलेला. (३) मनाई केलेला.

मन्फ़ूश (منفوش) वि. ('अ.) पिंजलेला कापूस (किंवा दुसरी एखादी वस्तू).

मन्शा (منشا) पु. ('अ.) (१) मनीषा; इच्छा. (२) उद्देश; हेतू. (३) कारण. (४) अर्थ; तात्पर्य.

मन्शूर (منشور) वि. ('अ.) अस्ताव्यस्त; विसकटलेला. (पु.) राजाज्ञा; फर्मान.

मन्सक (منسک) पु. ('अ.) (१) उपासनागृह. (२) बलिवेदी.

मन्सब (منصب) पु. ('अ.) (१) दर्जा; हुद्दा. (२) काम. (३) अधिकार; हक्क. (४) कर्तव्य. **–दार** (دار –) वि. ('अ. + फ़ा.) हुद्देदार; अधिकारी.

मन्सूख़ (منسوخ) वि. ('अ.) (१) रद्द; निकालात काढलेला. (२) टाकाऊ.

मन्सूब (منسوب) वि. ('अ.) (१) संबंधित. (२) लग्न ठरलेला; साखरपुडा झालेला. (३) संदर्भ लावलेला.

मन्सूब (منصوب) वि. ('अ.+फ़ा.) (१) उभा केलेला; लावलेला; जोडलेला. (२) ज्यावर 'अ' कारदर्शक 'ज़बर' (ـَ) चे चिन्ह लावलेले आहे असे अक्षर.

मन्सूबः (منصوبہ) पु. ('अ.) (१) विचार; इरादा; संकल्प. (२) इच्छा. (३) योजना. **–बंदी** (بندی –) स्त्री. ('अ. + फ़ा.) (१) नियोजन. (२) संकल्प करणे.

मन्सूर (منثور) वि. ('अ.) (१) गद्य (लिखाण). (२) अनघड (मोती).

मन्सूर (منصور) वि. ('अ.) विजेता; विजयी. (पु.) एक सूफी संत. याने 'अन'अल्-हक़्क़' (انا الحق) (अहं ब्रह्मास्मि) म्हटल्याबद्दल त्याला ठार मारण्यात आले होते.

मन्सूस (منصوص) वि. ('अ.) शोधून काढलेला; कुराणातील स्पष्ट उल्लेखांवरून प्रमाणित होणारी (गोष्ट).

मन्ही (منہی) वि. ('अ.) (१) मनाई केलेला. (२) वर्ज्य; निषिद्ध.

मन्हूस (منحوس) वि. ('अ.) (१) अशुभ; अमंगल. (२) उदास; रडघा. (३) दुर्दैवी.

मफ़'अूल (مفعول) पु. ('अ.) (१) कर्म (व्या.) (२) द्वितीया विभक्ती. (३) गुदामैथुन करवून घेणारा.

मफ़र (مفر) पु. ('अ.) (१) पळून जाण्याचे, लपण्याचे स्थान. (२) आश्रय घेण्याचे स्थान. (३) आसरा; संरक्षण. (४) उपाय.

मफ़ाज़ (مفاز) पु. ('अ.) (१) पोहोचण्याचे स्थान; ध्येय; उद्दिष्ट. (२) मुक्काम.

मफ़ाद (مفاد) पु. ('अ.) लाभ; फायदा. [अनेक 'मफ़ादात' (مفادات) फायदे].

मफ़ाद-ए-'आम्मः (مفاد عامہ) पु. ('अ.) लोककल्याण; सार्वजनिक हित.

मफ़ासिद (مفاسد) पु. ['अ. 'मफ़्सिदः' (مفسدہ) चे अनेक.] भांडणे; दंगे; उपद्रव.

मफ़ासिल (مفاصل) पु. ['अ. 'मफ़्सिल' (مفصل) चे अनेक.] शरीरातील सांधे.

मफ़्तूं (مفتوں); **मफ़्तून** (مفتون) वि. ('अ.) आसक्त; अनुरक्त; मोहित.

मफ़्तूल (مفتول) वि. ('अ.) वळलेला; पीळ दिलेला (दोर किंवा तार).

मफ़्तूह (مفتوح) वि. ('अ.) (१) जित; पराभूत. (२) ज्यावर 'अ' कारदर्शक 'फ़तह्' किंवा 'ज़बर' (ـَ) आहे असे अक्षर.

मफ़्क़ूक़ (مفروق) वि. ('अ.) (१) वेगळा काढलेला. (२) मोठघा संख्येतून वजा केलेली लहान संख्या.

मफ़्रूज़ (مفروض) वि. ('अ.) (१) काल्पनिक; गृहीत धरलेला. (२) अनिवार्य; अपरिहार्य. (अवश्य केली पाहिजे अशी धार्मिक गोष्ट).

मफ़्रूज़ः (مفروضہ) पु. ('अ.) (१) काल्पनिक; गृहीत धरलेली गोष्ट. (२) भ्रम; कल्पना. [अनेक 'मफ़्रूज़ात' (مفروضات) कल्पनातरंग].

मफ़्रूर (مفرور) वि. ('अ.) पळून गेलेला; फरारी.

मफ़्रूश (مفروش) वि. ('अ.) अंथरलेला; पसरलेला. (पु.) बिछाईत; अंथरूण.

मफ़्लूक (مفلوک) वि. ('अ.) दुर्दशाग्रस्त; दरिद्री.

मफ़्लूज (مفلوج) वि. ('अ.) ज्याला अर्धांगवायू झालेला आहे असा.

मफ़्सदः (مفسدہ) पु. ('अ.) दंगा; उपद्रव; भांडण.

मफ़्सल (مفصل) पु. ('अ.) शरीरातील सांधा.

मफ़्हूम (مفہوم) पु. ('अ.) (१) अर्थ; तात्पर्य. (२) उद्देश; मनीषा.

मबाद (مباد); **मबादा** (مبادا) वा. (फ़ा.) असे न होवो.

मबादी (مبادی) पु. ['अ. 'मब्दअ' (مبدأ) चे अनेक.] शिक्षणातील प्रारंभिक किंवा मूलभूत गोष्टी.

मबाल (مبال) पु. ('अ.) मूत्रेंद्रिय.

मबी'अ (مبیعہ) वि. ('अ.) (१) विकलेला; विक्रीत (२) खरेदी केलेला; क्रीत.

मबी'अः (مبيعہ) स्त्री. ('अ.) (१) विकलेली वस्तू. (२) विकत घेतलेली वस्तू.

मब्'ऊस् (مبعوث) वि. ('अ.) (१) अवतार घेतलेला. (२) ईश्वराने धाडलेला.

मब्गूद् (مبغوض) वि. ('अ.) शत्रू; वैरी.

मब्ज़ूल (مبذول) वि. ('अ.) (१) दिलेला. (२) आकृष्ट; प्रवृत्त.

मब्दा (مبدا) पु. ('अ.) (१) उगम; प्रारंभ करण्याचे स्थान; मूल; उत्पत्तिस्थान. (२) परमेश्वर.

मब्नी (مبنی) वि. ('अ.) (१) आधारित; अवलंबून असलेला. (२) ज्याचा पाया घातला गेला आहे असा. (३) अव्यय (व्या.).

मब्रज़ (مبرز) पु. ('अ.) गुदद्वार; मलद्वार.

मब्रूर (مبرور) वि. ('अ.) ईश्वराची दया मिळविलेला; पापमुक्त; मोक्षप्राप्त.

मब्रूस् (مبروص) वि. ('अ.) कोड (श्वेतकुष्ठ) झालेला.

मब्लग़ (مبلغ) पु. ('अ.) (१) सीमा; हद्द. (२) अंत; शेवट. (३) संख्या. (४) प्रमाण.

मब्सूत् (مبسوط) वि. ('अ.) विस्तृत; सविस्तर; पसरलेला.

मब्हूत (مبہوت) वि. ('अ.) थक्क; आश्चर्यचकित.

ममर (ممر) पु. ('अ.) (१) मार्ग; रस्ता. (२) कारण.

ममात (ممات) स्त्री. ('अ.) मृत्यू; मरण; निधन.

ममालिक (ممالک) पु. ['अ. 'मम्लुकत' (مملکت) चे अनेक.] अनेक देश; राष्ट्रे.

ममालीक (مماليک) पु. ['अ. 'मम्लूक' (مملوک) चे अनेक.] गुलाम; दास.

मम्जूज (ممزوج) वि. ('अ.) मिश्रित; मिसळलेला.

मम्दूद (ممدود) वि. ('अ.) ओढलेला; वाढविलेला; लांब केलेला.

मम्दूदः (ممدودہ) वि. ('अ.) ज्यावर 'अ' कारदर्शक 'मद' (~) दिलेला आहे असे अलिफ (آ) हे अक्षर.

मम्दूह् (ممدوح) वि. ('अ.) (१) ज्याची स्तुती, प्रशंसा करण्यात आलेली आहे असा. (२) प्रशंसनीय; स्तुत्य. [स्त्री. 'मम्दूहः' (ممدوحہ)].

मम्नू'अ (ممنوع) वि. ('अ.) (१) निषिद्ध; वर्ज्य. (२) मनाई केलेला.

मम्नून (ممنون) वि. ('अ.) कृतज्ञ; आभारी; अनुग्रहीत.

मम्लुकत (مملکت) स्त्री. ('अ.) राष्ट्र; राज्य; सत्ता.

मम्लू (مملو) वि. ('अ.) पूर्ण; भरलेला; परिपूर्ण.

मम्लूक (مملوک) वि. ('अ.) दास; गुलाम.

मम्लूकः (مملوکہ) वि. ('अ.) मालकीची (वस्तू); ताब्यातील (वस्तू).

मम्लूह् (مملوح) वि. ('अ.) खारा; खारट; लवणयुक्त.

मय-ए-तहूर (مئے طہور) स्त्री. (फ़ा. + 'अ.) पवित्र (स्वर्गात मिळणारी मदिरा).

मय-ए-पिंदार (مئے پندار) स्त्री. (फ़ा.) अहंकाराची मदिरा.

मय-ए-वस्ल (مئے وصل) स्त्री. (फ़ा.+'अ.) मीलनाची मदिरा; संभोग; मैथुन.

मयस्सर (میسر) वि. ('अ.) (१) उपलब्ध; प्राप्त. (२) सुलभ. **-होना** (ہونا –) मिळणे; प्राप्त होणे.

मरंजान-ए-मरंज (مرنجان مرنج) वि. (फ़ा.) स्वतःही दुःखी न होणारा व इतरांनाही दुःखी न करणारा.

मर'अत (مرأت) स्त्री. ('अ.) आरसा.

मरज (مرج) पु. ('अ.) काम बिघडणे; नाश; विध्वंस.

मरद् (مرض) पु. ('अ.) (१) रोग; आजार. (२) व्यसन; वाईट सवय.

मरद्-ए-मुत'अद्दी (مرض متعدی) पु. ('अ.) सांसर्गिक रोग.

मरद्-ए-मोहलिक (مرض مہلک) पु. ('अ.) प्राणघातक रोग.

मरम्मत (مرمت) स्त्री. ('अ.) (१) दुरुस्ती; जीर्णोद्धार. (२) मारपीट; शिक्षा; हड्डी नरम करणे.

मराकिज (مراکز) पु. ['अ. 'मर्कज' (مرکز) चे अनेक.] केंद्रे.

मराकिब (مراکب) पु. ['अ. 'मर्कब' (مرکب) चे अनेक.] घोडे; वाहने.

मराक्रिश (مراقش) पु. ('अ.) आफ्रिकेतील एक प्रसिद्ध देश; मोरोक्को.

मरातिब (مراتب) पु. ['अ. 'मर्तबः' (مرتبہ) चे अनेक.] (१) मजले; टप्पे. (२) हुद्दे; दर्जे.

मराम (مرام) पु. ('अ.) (१) इच्छा; मनोकामना. (२) आशा.

मरारत (مرارت) स्त्री. ('अ.) कटुता; कडूपणा.

मरासिम (مراسم) पु. ['अ. 'रस्म' (رسم) चे अनेक.] मैत्री; आत्मीयता; मिलाप.

मराहिल (مراحل) पु. ['अ. 'मर्हलः' (مرحلہ) चे अनेक.] (१) मजले. (२) मुक्काम; पडाव.

मरियम (مریم) स्त्री. ('अ.) (१) येशू ख्रिस्ताची माता, मेरी. (२) कुमारी. पाहा 'मर्यम' (शु.).

मरीद् (مریض) वि. पु. ('अ.) रोगी, आजारी.

मरीद (مرید) वि. ('अ.) (१) अवज्ञा करणारा; बंडखोर. (२) घर्मेंडखोर.

मर्'आी (مرعی) वि. ('अ.) ज्याची काळजी घेतली जाते असा.

मर्'अूब (مرعوب) वि. ('अ.) बदललेला; घाबरलेला: छाप पडलेला.

मर्कज़ (مرکز) पु. ('अ.) (१) केंद्र; मध्यबिंदू. (२) मध्यवर्ती सरकार. (३) राजधानी. (४) मुक्कामाचे ठिकाण.

मर्कज़-ए-सिक़्ल (مرکز ثقل) पु. ('अ.) गुरुत्वाकर्षण; गुरुत्वमध्याकर्षण; गुरुत्व केंद्र.

मर्कज़ी (مرکزی) वि. ('अ.) केंद्रीय; मध्यवर्ती.

मर्क़द (مرقد) पु. ('अ.) समाधी; कबर; थडगे.

मर्कब (مرکب) पु. ('अ.) (१) वाहन. (२) घोडा.

मर्कूज़ (مرکوز) वि. ('अ.) (१) केंद्रित. (२) बसविलेला; दृढ केलेला.

मर्कूब (مرکوب) वि. ('अ.) ज्याच्यावर आरूढ व्हावयाचे ते (वाहन).

मर्क़ूम; **मर्क़ूमः** (مرقوم) वि. ('अ.) लिहिलेला; लिखित.

मर्ग़ (مرغ) पु. (फ़ा.) दुर्वा; हिरवळ. **-ज़ार** (زار –) पु. (फ़ा.) हिरवळ; कुरण.

मर्ग (مرگ) स्त्री. (फ़ा.) मृत्यू; मरण.

मर्ग-ए-नागहाँ (مرگ ناگہاں) स्त्री. (फ़ा.) आकस्मिक मृत्यू.

मर्गामर्गी (مرگا مرگی) स्त्री. (फ़ा.) महामारी; साथ.

मर्ग़ूब (مرغوب) वि. ('अ.) मनपसंत; आवडता.

मर्ग़ूल; **मर्ग़ूलः** (مرغولہ) वि. ('अ.) (१) वेडावाकडा; पेचदार. (२) कुरळे (केस). (३) तानेची फिरत (आवाज).

मर्ज़ (مرز) पु. (फ़ा.) (१) शेतजमीन. (२) उद्यान. (३) सरहद्द. **-बान** (بان –) वि. (फ़ा.) शेतकरी. **-बूम** (بوم –) स्त्री. (फ़ा.) जन्मभूमी; मातृभूमी.

मर्ज'अ (مرجع) पु. ('अ.) रक्षणस्थान; शरणस्थान.

मर्जा' (مرجان); **मर्जान** (مرجان) पु. ('अ.) प्रवाळ.

मर्जू'अ (مرجوع); **मर्जू'अः** (مرجوعہ) वि. ('अ.) (१) परतविलेला. (२) न्यायालयात रुजू केलेला. (३) आकर्षित झालेला.

मर्जूम (مرجوم) वि. ('अ.) दगडांनी मारलेला; बहिष्कृत केलेला.

मर्जूह (مرجوح) वि. ('अ.) पराजित; पराभूत.

मर्तबत (مرتبت) स्त्री. ('अ.) (१) प्रतिष्ठा; मान. (२) पद; हुद्दा.

मर्तबान (مرتبان) पु. ('अ.) (१) बरणी (लोणचे वगैरे ठेवण्याची). (२) काचेचे, चिनी मातीचे किंवा रोगण लावलेले मातीचे बरणीच्या आकाराचे भांडे.

मर्तबः (مرتبہ) पु. ('अ.) (१) पद; हुद्दा; दर्जा. (२) प्रतिष्ठा. (स्त्री.) वेळ; खेप. **-दाँ** (داں –); **-शनास** (شناس –) वि. ('अ. + फ़ा.) प्रतिष्ठा ओळखणारा.

मर्तूब (مرطوب) वि. ('अ.) (१) आर्द्र; ओला. (२) वातकारक.

मर्द (مرد) पु. (फ़ा.) (१) मनुष्य; मानव. (२) पुरुष; नर; पती. (३) शूर; बहादूर **-अफ़्गन** (افگن –); **-आज़्मा** (آزما –) वि. (फ़ा.) शक्तिशाली; पैलवानांना चीत करणारा. **-बच्चः** (بچہ –); **-बच्चः** (بچہ –) वि. (फ़ा.) (१) मानवपुत्र. (२) शूर. **-शनास** (شناس –) वि. (फ़ा.) माणसाची पारख असलेला.

मर्द-ए-ख़ुदा (مرد خدا) पु. (फ़ा.) पुण्यात्मा; देवमाणूस; ईश्वरभक्त.

मर्दक (مردک) वि. पु. (फ़ा.) तुच्छ; नीच; अधम; तिरस्कृत (व्यक्ती).

मर्दानगी (مردانگی) स्त्री. (फ़ा.) (१) शौर्य; वीरता. (२) हिम्मत; घाडस. (३) पौरुष.

मर्दानः (مردانہ) वि. (फ़ा.) (१) मर्दानी; पौरुषी (२) वीरोचित. (३) पुरुषी.

मर्दी (مردی) स्त्री. (फ़ा.) (१) मानवता; माणुसकी. (२) शौर्य; घाडस.

मर्दी (مرضی) स्त्री. ('अ.) (१) इच्छा; मर्जी. (२) स्वीकृती; मान्यता. (३) परवानगी; आज्ञा; हुकूम.

मर्दुम (مردم) पु. (फ़ा.) (१) मनुष्य. (२) पुरुष. (३) डोळघातील बाहुली (वि.) सभ्य; सुसंस्कृत. **-आज़ार** (آزار –) वि. (फ़ा.) अत्याचारी; जुलमी. **-आमेज़** (آمیز –) वि. (फ़ा.) लोकांत मिळून मिसळून राहाणारा. **-क** (ک –) स्त्री. (फ़ा.) डोळघातील बाहुली. **-कुश** (کش –) वि. (फ़ा.) मनुष्यहिंसा करणारा. **-ख़ोर** (خور –) वि. (फ़ा.) नरमांसभक्षक. **-ज़न** (زن –) वि. (फ़ा.) मांग; वध करणारा. **-ज़ाद** (زاد –) पु. (फ़ा.) मानव. **-शनास** (شناس –) वि. (फ़ा.) माणसांची पारख असणारा. **-शुमारी** (شماری –) स्त्री. (फ़ा.) खानेसुमारी; जनगणना.

मर्दुमी (مردمی) स्त्री. (फ़ा.) (१) माणुसकी. (२) पौरुष. (३) मर्दुमकी; शौर्य.

मर्दूद (مردود) वि. ('अ.) (१) तिरस्कृत; तुच्छ. (२) नीच; अधम. (३) बहिष्कृत; रद्द केलेला; अस्वीकृत.

मर्दः (مرد) वि.(फ़ा.)(१) वीर; शूर. (२)घाडसी.

मर्फ़ा (مرفا) पु. (फ़ा.) ढोल.

मर्फ़ूअ (مرفوع) वि. ('अ.) (१) वर उचललेला; उंच केलेला. (२) ज्यावर 'उ' कारदर्शक 'पेश' (ـُـ) दिलेला आहे असे अक्षर.

मर्बूत (مربوط) वि. ('अ.) क्रमबद्ध; सुसंगत; प्रसंगोचित.

मर्मर (مرمر) पु. (फ़ा.) काळा किंवा पांढरा संगमरवर (दगड).

मर्मरी (مرمریں) वि. (फ़ा.) संगमरवरी.

मर्मूज़ (مرموز) वि. ('अ.) (१) ज्याच्याकडे इशारा किंवा संकेत केला आहे असा. (२) खुणेने किंवा सांकेतिकपणे सांगितलेली (गोष्ट).

मर्यम (مریم) स्त्री. ('अ.) येशू ख्रिस्ताची माता, मेरी. **–पंजः** (پنجہ –) पु. (फ़ा.) एक प्रकारची वनस्पती. प्रसूतिवेदना दूर करण्यासाठी हिचा वापर केला जातो.

मर्व (مرو) पु. (फ़ा.) (१) इराणच्या खुदासान प्रांतातील एक शहर. (२) मरवा (सुगंधित वनस्पती).

मर्वारीद (مروارید) पु. (फ़ा.) मौक्तिक; मोती.

मर्वारीद-ए-नासुफ़्तः (مروارید ناسفتہ) पु. (फ़ा.) अनघड मोती (औषधाच्या कामी येणारे).

मर्वी (مروی) वि. ('अ.) दुसऱ्याचे ऐकून सांगितलेला.

मर्सियः (مرثیہ) पु. ('अ.)(१) शोकगीत; शोकांजली. (२) हजरत इमाम हुसैन यांच्या बलिदानाचे वर्णन करणारे करुणरसपूर्ण काव्य. (३) विलाप; मृत्युशोक. **–ख़्वाँ** (خواں –); **–गो** (گو –) वि.('अ.+फ़ा.) शोकगीत लिहिणारा, गाणारा किंवा वाचून दाखविणारा. (विशेषतः मोहरमच्या दिवसांत). **–ख़्वानी** (خوانی –); **–गो'ई** (گوئی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) शोकगीत लिहिणे किंवा गाणे (विशेषतः मोहरमच्या मिरवणुकीत).

मर्सूब (مرسوب) वि. ('अ.) तळाशी बसलेला; गाळ.

मर्सूम (مرسوم) वि. ('अ.) (१) कायदा बनविलेला. (२) रोजचे किंवा मासिक वेतन; रोजमुरा; पगार. (३) चिन्हित; खूण केलेला.

मर्सूस (مرصوص) वि. ('अ.) इमारतीच्या पायात शिसे भरलेला; मजबूत बनविलेला.

मर्हब (مرحب) पु. ('अ.) खुली जागा.

मर्हबा (مرحبا) अव्य. ('अ.) शाबास! धन्य! वाहवा! छान!

मर्हम (مرہم) पु. (फ़ा.) मलम; लेप.

मर्हमत (مرحمت) स्त्री. ('अ.) (१) दया; कृपा; अनुग्रह. (२) अनुदान; बक्षीस.

मर्हलः (مرحلہ) पु. ('अ.) (१) मुक्काम; उतरण्याचे स्थान. (२) उद्दिष्ट. (३) टप्पा. (४) मजला. (५) अवघड कार्य; समस्या.

मर्हून (مرہون) वि. ('अ.) गहाण ठेवलेली (वस्तू किंवा मालमत्ता).

मर्हून-ए-मिन्नत (مرہون منت) वि. ('अ.) कृतज्ञ; आभारी.

मर्हूम (مرحوم) वि. ('अ.) दिवंगत; स्वर्गीय; मृत. [स्त्री. 'मर्हूमः' (مرحومہ)].

मलंग (ملنگ) पु. (फ़ा.) (१) स्वच्छंद फकीर; मुका साधू. (२) निश्चित व्यक्ती.

मल'अब (ملعب) पु. ('अ.) क्रीडांगण.

मल'ऊन (ملعون) वि. ('अ.) (१) धिक्कार केलेला; तिरस्कृत. (२) दुष्टात्मा; खवीस.

मलक (ملک) पु. ('अ.) देवदूत; देव.

मलक-उल्-मौत (ملک الموت) पु. ('अ.) मृत्युदूत; यमराज.

मलकात (ملکات) पु. ['अ. 'मलकः' (ملکہ) चे अनेक.] स्वभावगुण.

मलकात-ए-फ़ाज़िलः (ملکات فاضلہ) पु.('अ.) सत्त्वगुण.

मलकात-ए-मज़मूम (ملکات مزموم) पु. ('अ.) तमोगुण.

मलकात-ए-रदियः (ملکات رديہ) पु. ('अ.) रजोगुण.

मलकी (ملکی) वि. ('अ.) देवांचा; देवदूतांचा.

मलकूत (ملکوت) पु. ('अ.) (१) सत्ता; राज्य; शासन. (२) देवलोक. (३) देवदूत.

मलकः (ملکہ) पु. ('अ.) (१) अभ्यास; सराव; हस्तकौशल्य. (२) प्रकृती; सृष्टी. (३) स्वभाव; अभिरुची.

मलख (ملخ) स्त्री. (फ़ा.) टोळ.

मलग़ोबा (ملغوبا) पु.. (तु.) घाण; मैला; पुष्कळ ओलसर वस्तू मिळून बनलेली घाण.

मला (ملا) पु. ('अ.) सज्जन व श्रेष्ठ लोकांचा समूह.

मला'इक (ملائک); **मला'इकः** (ملائکہ) पु. ['अ. 'मलक' (ملک) चे अनेक.] अनेक देव; देवदूत.

मलाज़ (ملاذ) पु. ('अ.) रक्षणस्थान; शरणस्थान.

मलाम (ملام) पु. **मलामत** (ملامت) स्त्री. ('अ.) (१) निर्भर्त्सना; निंदा; धिक्कार. (२) घाण; दूषित अंश.

मलाल (ملال) पु. **मलालत** (ملالت) स्त्री. ('अ.) (१) दुःख; उद्विग्नता. (२) पश्चात्ताप. (३) उदासीनता. (४) वैमनस्य.

मलासत (ملاست) स्त्री. ('अ.) (१) नम्रता. (२) स्वच्छता. (३) समता.

मलाहत (ملاحت) स्त्री. ('अ.) (१) लावण्य; सौंदर्य. (२) खारटपणा.

मलिक (ملک) पु. ('अ.) बादशहा; सम्राट; नरेश.

मलिक-उश्-शु'अरा (ملک الشعرا) पु. ('अ.) कविसम्राट.

मलिकः (ملکہ) स्त्री. ('अ.) राणी; सम्राज्ञी; महाराणी.

मलीक (ملیک) पु. ('अ.) (१) स्वामी; मालक. (२) पती.

मलीदः (ملیدہ) पु. (फ़ा.) (१) मलिदा; चुरमा. (२) अत्यंत मऊ लोकरी कापड.

मलीह् (ملیح) वि. ('अ.) (१) लवणयुक्त. (२) सुंदर; देखणा.

मलूम (ملوم) वि. ('अ.) निंदित; निर्भर्त्सना केलेला.

मलूल (ملول) वि. ('अ.) उदासीन; दुःखी.

मल्जा (ملجا) पु. ('अ.) प्राण वाचविण्याचे ठिकाण.

मल्जूम (ملزوم) वि. ('अ.) ज्याच्यासाठी एखादी गोष्ट अनिवार्य केलेली आहे असा; संबद्ध.

मल्फ़ूज़ (ملفوظ); **मल्फ़ूज़ः** (ملفوظہ) वि. ('अ.) बोललेला; उच्चारलेला. (पु.) संतवाणी; साधुसंतांची प्रवचने.

मल्फ़ूज़ात (ملفوظات) पु. ['अ. 'मल्फ़ूज़' (ملفوظ) चे अनेक.] थोर पुरुषांची वचने, प्रवचने; अशा प्रवचनांचा संग्रह.

मल्फ़ूफ़ (ملفوف) वि. ('अ.) (१) लिफाफ्यात बंद केलेला; पाकिटात घातलेला. (२) कागदात किंवा कपडयात गुंडाळलेला.

मल्बूस (ملبوس) पु. ('अ.) वस्त्र; पोषाख. [अनेक 'मल्बूसात' (ملبوسات)].

मल्मस (ملمس) पु. ('अ.) त्वचा; कातडी.

मल्लाह् (ملاح) पु. ('अ.) (१) नाविक; नावाडी; कर्णधार. (२) मीठ बनविणारा.

मल्हूमः (ملحمہ) पु. ('अ.) (१) फार मोठा दंगा; युद्ध. (२) रणभूमी.

मल्हूज़ (ملحوظ) वि. ('अ.) ज्याचा विचार करण्यात आलेला आहे, ज्याची काळजी घेण्यात आलेली आहे, ज्याच्याकडे प्रेमाने लक्ष देण्यात आलेले आहे असा.

मवद्दत (مودت) स्त्री. ('अ.) मैत्री; दोस्ती.

मवा'अिज़ (مواعظ) पु. ['अ. 'मौ'अिज़त' (موعظت) चे अनेक.] धार्मिक उपदेश; हितोपदेश.

मवाक़ि'अ (مواقع) पु. ['अ. 'मौक़'अ' (موقع) चे अनेक.] प्रसंग; मोके.

मवाजिब (مواجب) पु. ['अ. 'मौजिब' (موجب) चे अनेक.] पगार; तनखे.

मवाज़ी (موازی) पु. ('अ.) (१) रक्कम. (२) बेरीज. (वि.) एकूण; सर्व. (अव्य.) बरोबर; जवळजवळ; सुमारे.

मवात (موات) वि. ('अ.) निष्प्राण; निर्जीव. (स्त्री.) पडीत, नापीक जमीन.

मवाद (مواد) पु. ('अ.) (१) सामग्री; मालमसाला. (२) पू; घाण. (३) पुरावा; प्रमाण.

मवाद्दि'अ (مواضع) पु. ['अ. 'मौद्'अ' (موضع) चे अनेक.] गावे; खेडी.

मवाली (موالی) पु. ['अ. 'मौला' (مولا) चे अनेक.] (१) नोकरचाकर. (२) मित्रमंडळी. (३) मालक. (४) मवाली; गुंड; बदमाश.

मवालीद (مواليد) पु. ['अ. 'मौलूद' (مولود) चे अनेक.] मुलगे; पुत्र; मुले.

मवालीद-ए-सलासः (مواليد ثلاثہ) पु. ('अ.) सृष्टीतील तिन्ही वर्ग—प्राणी, वनस्पती व जड पदार्थ.

मवाशी (مواشی) पु. ['अ. 'माशियः' (ماشیہ) चे अनेक.] गुरे; जनावरे.

मवीज़ (مویز) पु. ('अ.) सुकी द्राक्षे; मनुका.

मवेशी (مویشی) पु. (फ़ा.) गुरे; जनावरे; चतुष्पाद प्राणी. **-खानः** (-خانہ) पु. (फ़ा.) गोठा.

मव्वाज (موّاج) वि. ('अ.) उसळणारा; लाटा उठत असलेला.

मश'अल (مشعل) स्त्री. ('अ.) मशाल. **-ची** (-چی) वि. ('अ.+फ़ा.) मशालजी.

मश'ऊफ़ (مشعوف) वि. ('अ.) अनुरक्त; मोहित.

मश'ऊम (مشئوم) वि. ('अ.) अनिष्ट; अशुभ; अमंगल.

मशक़्क़त (مشقت) स्त्री. ('अ.) (१) परिश्रम; मेहनत. (२) कष्ट; त्रास. (३) मजुरी. (४) तपस्या.

मशा'इख़ (مشائخ) पु. ['अ. 'शेख' (شیخ) चे अनेक.] (१) साधुसंत; महात्मे. (२) वैद्य. (३) वडीलधारी मंडळी.

मशाग़िल (مشاغل) पु. ['अ. 'मश्ग़लः' (مشغلہ) चे अनेक.] (१) कामे; व्यवसाय. (२) कर्तव्ये.

मशाम (مشام) पु. ('अ.) (१) वास; घ्राणेंद्रिय. (२) मेंदू.

मशाहीर (مشاهير) पु. ['अ. 'मश्हुर' (مشهور) चे अनेक.] प्रख्यात लोक.

मशी (مشی) पु. ('अ.) चालणे; फिरणे.

मशीखत (مشيخت) स्त्री. ('अ.) (१) मोठेपणा. (२) घमेंड; बढाई. **-पनाह** (پناہ -) वि. ('अ.+फ़ा.) **-मआब** (مآب -) वि. ('अ.) बढाईखोर.

मशीमः (مشیم) पु. ('अ.) मूल जन्मताना त्याच्या-भोवती असणारी वार.

मशीयत (مشیت) स्त्री. ('अ.) (१) ईश्वरी इच्छा. (२) दैवी शक्ती.

मशूम (مشوم) वि. ('अ.) अशुभ; अनिष्ट; अमंगल.

मश्क़ (مشق) स्त्री. ('अ.) अभ्यास; सवय; सराव.

मश्क (مشک) स्त्री. (फ़ा.) पखाल (पाणी भरण्याची).

मश्कीज़ः (مشکیزہ) पु. ('अ.) लहान पखाल.

मश्कूक (مشکوک) वि. ('अ.) संदिग्ध; शंकाकुल; शंकायुक्त.

मश्कूर (مشکور) वि. ('अ.) कृतज्ञ; आभारी.

मश्कोए (مشکوے) पु. (फ़ा.) (१) मूतिगृह. (२) अंतःपुर; जनानखाना.

मश्ग़ूलः (مشغلہ) पु. ('अ.) (१) काम; व्यवसाय; उद्योग. (२) विनोद; मनोरंजन.

मश्ग़ूल (مشغول) वि. ('अ.) (१) कार्यमग्न; व्यग्र. (२) तल्लीन.

मश्ग़ूलियत (مشغولیت) स्त्री. ('अ.) (१) व्यवसाय; काम. (२) तल्लीनता; निमग्नता.

मश्मूम (مشموم) वि. ('अ.) हुंगलेला; वास घेतलेला.

मश्मूल (مشمول) वि. ('अ.) सामील केलेला; सम्मिलित.

मश्रब (مشرب) (१) पिण्याचे स्थान; तलाव. (२) धर्म; मत; पंथ.

मश्रिक़ (مشرق) पु. ('अ.) पूर्व; उदयाचल.

मश्रिक़ियात (مشرقیات) स्त्री. ('अ.) पौर्वात्य (आशियाई) संस्कृतीशी संबंधित विज्ञान.

मश्रिक़ी (مشرقی) वि. ('अ.) पौर्वात्य; भारतीय; आशियाई.

मश्रिक़ैन (مشرقین) पु. ('अ.) पूर्व व पश्चिम (दोन्ही पूर्वा).

मश्रू'अ (مشروع) वि. ('अ.) धर्मशास्त्राला धरून केलेला; इस्लामी धर्मशास्त्राप्रमाणे केलेला.

मश्रूत (مشروط) वि. ('अ.) सशर्त; काही अटींवर अवलंबून असलेला.

मश्रूब (مشروب) वि. ('अ.) (१) पिण्याची वस्तू; पेय. (२) प्यालेला.

मश्रूह (مشروح) वि. ('अ.) सटीक; विवरणसहित.

मश्वरत (مشورت); **मश्वरः** (مشورہ) पु. ('अ.) (१) सल्ला; विचार; उपदेश. (२) कट. **-ख़ानः** (خانہ -) पु. ('अ.+फ़ा.) खलबतखाना; विचारविनिमयाचे स्थान.

मश्वी (مشوی) वि. ('अ.) (१) भाजलेला. (२) भ्रष्ट.

मश्शाक़ (مشاق) वि. ('अ.) (१) दक्ष; कुशल; प्रवीण. (२) अभ्यस्त.

मश्शाक़ी (مشاقی) स्त्री. ('अ.) दक्षता; कुशलता; प्रवीणता.

मश्शातः (مشاطہ) स्त्री. ('अ.) (१) स्त्रियांचा शृंगार करणारी स्त्री; प्रसाधिका. (२) कुंटीण.

मश्हद (مشہد) पु. ('अ.) (१) उपस्थित होण्याचे स्थान. (२) हुतात्मा होण्याचे स्थान. (३) हुतात्म्यांचे स्मशान. (४) इराणमधील एक शहर; तूस.

मश्हूद (مشہود) वि. ('अ.) (१) उपस्थित केलेला. (२) ज्याच्या बाबतीत साक्ष देण्यात आलेली आहे असा. (३) ध्येय; उद्दिष्ट. (४) सिद्ध केलेला.

मश्हून (مشہون) वि. ('अ.) भरलेला; परिपूर्ण.

मश्हूर (مشہور) वि. ('अ.) प्रसिद्ध; प्रख्यात.

मश्हूर-ओ-म'अरूफ़ (مشہور و معروف) वि. ('अ.) सुप्रसिद्ध; विख्यात; नामांकित.

मस् (مس) पु. ('अ.) चोखणे; शोषणे.

मस (مس) पु. ('अ.) (१) स्पर्श; स्त्री-संभोग. (२) रुची; प्रवृत्ती.

मस'अलः (مسئلہ) पु. ('अ.) (१) समस्या; प्रश्न. (२) विषय.

मस'ऊद (مسعود) वि. ('अ.) इष्ट; कल्याणकारक; शुभ.

मस'ऊद (مسئود) वि. ('अ.) (१) विचारलेला. (२) जबाबदार; उत्तरदायी.

मसर्रत (مسرت) स्त्री. ('अ.) हर्ष; आनंद; खुषी. **-अंगेज़** (انگیز -) वि. ('अ.+फ़ा.) हर्षवर्धक **-आमेज़** (آمیز -) वि. ('अ.+फ़ा.) आनंदपूर्ण.

मसल (مثل) स्त्री. ('अ.) म्हण; लोकोक्ती. (वि.) तुल्य; सारखा; समान.

मसलन् (مثلاً) अव्य. ('अ.) उदाहरणार्थ; जणू; जसे.

मसह (مسح) पु. ('अ.) (१) नमाजापूर्वी हात-पाय धुवून डोकीवरून ओला हात फिरविणे. (२) हाताने चोळणे.

मसहूक़ (مسحوق) वि. ('अ.) घासलेला; चोळलेला.

मसहूब (مصحوب) वि. ('अ.) सहकारी; साथी.

मसहूर (مسحور) वि. ('अ.) मंत्रमुग्ध; ज्यावर जादू केली आहे असा.

मसा'इब (مصائب) पु. ['अ. 'मुसीबत' (مصيبت) चे अनेक.] आपत्ती; संकटे.

मसा'इल (مسائل) पु. ['अ. 'मस'अलः' (مسئلہ) चे अनेक.] समस्या; प्रश्न.

मसाकिन (مساكن) पु. ['अ. 'मस्कन' (مسكن) चे अनेक.] घरे; स्थाने.

मसाकीन (مساكين) पु. ['अ. 'मिस्कीन' (مسكين) चे अनेक.] गरीब; दरिद्री लोक.

मसाजिद (مساجد) स्त्री. ['अ. 'मस्जिद' (مسجد) चे अनेक.] मशिदी.

मसादिर (مصادر) पु. ['अ. 'मस्दर' (مصدر) चे अनेक.] धातू (व्या.); मूळरूपे.

मसानः (مثانہ) पु. ('अ.) मूत्राशय.

मसाफ़ (مصاف) पु. ('अ.) (१) युद्ध; लढाई. (२) रणक्षेत्र.

मसाफ़त (مسافت) स्त्री. ('अ.) (१) दोन स्थानांतील अंतर; लांबी. (२) प्रवास. (३) श्रम.

मसाम (مسام) पु. ('अ.) रोम छिद्र; शरीराच्या कातडीतील छिद्र. [अनेक 'मसामात' (مسامات)].

मसारिफ़ (مصارف) पु. ['अ. 'मस्रिफ़' (مصرف) चे अनेक.] नाना प्रकारचे खर्च.

मसालिक (مسالک) पु. ['अ. 'मस्लक' (مسلک) चे अनेक.] रस्ते; मार्ग.

मसालिह (مصالح) पु. ['अ. 'मस्लिहत' (مصلحت) चे अनेक.] दूरदर्शीपणाची कामे; योग्य गोष्टी.

मसास (مساس) पु. ('अ.) (१) संभोगाच्या वेळी स्त्रीचे अवयव चोळणे; मर्दन करणे. (२) अंग-मर्दन; चोळणे.

मसाहत (مساحت) स्त्री. ('अ.) (१) मोजणी; माप. (२) सर्वेक्षण. (३) भूमिती.

मसीर (مسیر) पु. ('अ.) (१) जाणे; फिरणे. (२) फिरण्याची जागा.

मसीर (مصیر) पु. ('अ.) परत येणे; प्रत्यागमन.

मसील (مثیل) वि. ('अ.) समान; तुल्य; सदृश.

मसीह (مسیح); **मसीहा** (مسیحا) पु. ('अ.) येशू ख्रिस्त. **-दम** (دم –) वि. ('अ.+फ़ा.) **-नफ़्स** (نفس –) वि. ('अ.) येशू ख्रिस्ताप्रमाणे ज्याच्या फुंकरीमध्ये मृतांना जिवंत करण्याचा गुण आहे असा.

मसीहा'ई (مسیحائی) स्त्री. ('अ.) येशूचे कार्य; मृतांना जिवंत करणे.

तू जो चाहे तो मरीद-ए-राम-ए-उल्फ़त बच जा'ए।
तेरी रहमत में निहाँ शान-ए-मसीहा'ई है।।

मसीही (مسیحی) वि. ('अ.) ख्रिश्चन; किरिस्ताव.

मसून (مصون) वि. ('अ.) सुरक्षित.

मस्क़त (مسقط) पु. ('अ.) अरबस्तानातील एक राज्य व त्याची राजधानी.

मस्कन (مسکن) पु. ('अ.) घर; निवासस्थान.

मस्कनत (مسکنت) स्त्री. ('अ.) (१) नम्रता. (२) दीनता; अजीजी. (३) दारिद्र्य.

मस्क़त् (مسقط) पु. ('अ.) पडण्याचे स्थान.

मस्क़त्-उर्-रास (مسقط الراس) पु. ('अ.) डोके पडण्याचे स्थान; जन्मभूमी. (जन्मास येताना प्रथम डोके जमिनीला लागते, त्यावरून).

मस्कूक (مسکوک) वि. ('अ.) (१) शिक्का मारलेला. (२) टाकसाळीत तयार झालेला.

मस्कून (مسکون); **मस्कूनः** (مسکونہ) वि. ('अ.) वसलेला.

मस्क़ूल (مصقول) वि. ('अ.) चकचकीत केलेला; पॉलीश केलेला; चमकदार.

मस्कः (مسکہ) पु. (फ़ा.) लोणी; नवनीत.

मस्ख (مسخ) वि. ('अ.) विकृत; बिघडलेला.

मस्ख़रः (مسخرہ) वि. पु. ('अ.) (१) थट्टेखोर; विनोदी; मस्करा. (२) नकलाकार. (३) विदूषक.

मस्जिद (مسجد) स्त्री. ('अ.) मशीद; नमाज पढण्याची जागा.

मस्जूद (مسجود) वि. ('अ.) ज्याला प्रणाम केला आहे असा; ईश्वर.

मस्जूद-ए-मला'इक (مسجود ملائک) पु. ('अ.) हजरत आदम; आदिमानव. (यांना देवदूतांनी प्रणाम केला होता).

मस्त (مست) वि. (फ़ा.) (१) झिंगलेला; धुंद. (२) मदोन्मत्त; उन्मत्त. (३) कामातुर. (४) निश्चेष्ट; बेशुद्ध. (५) खूष. (६) बेपर्वा. (७) निस्पृह.

मस्तगी (مصطگی) स्त्री. (फ़ा.) एक प्रकारचा औषधी डिंक.

मस्तबः (مصطبہ) पु. ('अ.) मदिरालय; दारूचा गुत्ता.

मस्तानः (مستانہ) वि. (फ़ा.) (१) गुंग; चूर; धुंद; निमग्न. (२) झिंगलेला. (३) मस्त; उन्मत्त.

मस्ती (مستی) स्त्री. (फ़ा.) (१) नशा; धुंदी. (२) उन्माद. (३) कामवेग; मद. (४) बेशुद्धी. (५) ईश्वरातील तल्लीनता.

मस्तूर (مسطور) वि. ('अ.) लिहिलेला; लिखित.

मस्तूर (مستور) वि. ('अ.) लपलेला; गुप्त.

मस्तूरात (مستورات) स्त्री. ['अ. 'मस्तूरः' (مستور) चे अनेक.] (१) स्त्रिया; महिला. (२) पडद्यातील स्त्री.

मस्तूरी (مستوری) स्त्री. ('अ.) गुप्तता; लपणे.

मस्तूरः (مستور) वि. ('अ.) लपलेली (वस्तू). (स्त्री.) पडदानशीन स्त्री.

मस्तूल (مستول) पु. (पो.) डोलकाठी; जहाजावरील शिडाचा मधला खांब.

मस्दर (مصدر) पु. ('अ.) (१) उगम; उत्पत्तिस्थान. (२) धातू (व्या.).

मस्दूद (مسدود) वि. ('अ.) (१) अडविलेला; थांबविलेला. (२) बंद केलेला.

मस्नद (مسند) स्त्री. ('अ.) (१) लोड. (२) बैठकीची गादी. (३) बैठक.

मस्नवी (مثنوی) स्त्री. ('अ.) उर्दूतील खंडकाव्य; एकाच वृत्तातील दीर्घकाव्य (कथा किंवा उपदेश असलेले).

मस्नू'अ (مصنوع) वि. ('अ.) बनविलेला; कारागिराने तयार केलेला.

मस्नू'अी (مصنوعی) वि. ('अ.) (१) नकली; कृत्रिम; बनावटी. (२) अस्वाभाविक.

मस्नू'अः (مصنوعہ) वि. ('अ.) बनविलेली (वस्तू); हाताने तयार केलेली (वस्तू). [अनेक 'मस्नू'आत' (مصنوعات) स्त्री. ('अ.) हाताने तयार केलेल्या वस्तू].

मस्फ़ूफ़ (مسفوف) वि. ('अ.) पूर्ण केलेला; वस्त्रगाळ.

मस्बूक़ (مسبوق) वि. ('अ.) पूर्वी होऊन गेलेला; आधी आलेला.

मस्बूग़ (مصبوغ) वि. ('अ.) रंगविलेला.

मस्मू'अ (مسموع) वि. ('अ) ऐकलेला.

मस्मूम (مسموم) वि. ('अ.) विष मिसळलेला; विषारी.

मस्रिफ़ (مصرف) पु. ('अ.) (१) खर्चाची बाब. (२) वापर. (३) कारण.

मस्रू'अ (مصروع) वि. ('अ.) अपस्मार (झटके) रोगाचा रोगी.

मस्रूक़ (مسروق); **मस्रूक़ः** (مصروقہ) वि. ('अ.) चोरलेला; चोरीचा.

मस्रूफ़ (مصروف) वि. ('अ.) (१) कार्यमग्न; व्यग्र; तल्लीन. (२) सवड नसलेला. (३) खर्च केलेला.

मस्रूफ़ियत (مصروفیت) स्त्री. ('अ.) (१) कार्यमग्नता; गढून जाणे. (२) सवड नसणे.

मस्रूर (مسرور) वि. ('अ.) आनंदित; प्रसन्न; प्रफुल्ल; उल्हसित.

मस्लक (مسلک) पु. ('अ.) (१) मार्ग; रस्ता. (२) पंथ; मत. (३) पद्धती.

मस्लख़ (مسلخ) पु. ('अ.) कसाईखाना

मस्लहत (مصلحت) स्त्री. ('अ.) (१) सल्ला; उपदेश. (२) हित; कल्याण. **-अंदेश** (-اندیش) वि. ('अ. + फ़ा.) बऱ्यावाईटाचा विचार करून वागणारा.

मस्लहत-ए-वक़्त (مصلحت وقت) स्त्री. ('अ.) काळाची गरज.

मस्लहतन् (مصلحتاً) अव्य. ('अ.) नीट विचार करून; हिताच्या दृष्टीने.

मस्लूक (مسلوک) वि. ('अ.) उपकृत; ज्याच्यावर उपकार केला आहे असा.

मस्लूब (مصلوب) वि. ('अ.) ज्याला सुळावर किंवा क्रुसावर चढविण्यात आले आहे असा.

मस्लूब (مسلوب) वि. ('अ.) (१) हिरावून घेतलेला. (२) नष्ट झालेला. (३) शिथिल; वृद्ध.

मस्लूब-उल्-'अक़्ल (مسلوب العقل) वि. ('अ.) हतबुद्ध.

मस्लूब-उल्-हवास (مسلوب الحواس) वि. ('अ.) संज्ञाहीन; म्हातारपणामुळे ज्याची इंद्रिये कार्यक्षम राहिलेली नाहीत असा.

मस्लूल (مسلول) वि. ('अ.) (१) क्षयी; फुप्फुसांतून रक्तस्राव होणारा क्षयाचा रोगी. (२) बाहेर काढलेला; आवरण काढलेला.

मस्लः (مسلم) पु. ('अ.) (१) समस्या; प्रश्न. (२) विषय. (३) मुस्लिम शास्त्राज्ञा.

मस्वदः (مسودہ) पु. ('अ.) (१) मसुदा; कच्चा खर्डा. (२) युक्ती; उपाय.

मस्साह (مساح) वि. ('अ.) मोजणी करणारा.

मह (م) पु. [फ़ा. 'माह' (ماہ) चे संक्षिप्त.] चंद्र; चांद.

महकमः (محکمہ) पु. ('अ.) (१) विभाग; सरकारी खाते. (२) कचेरी; न्यायालय.

महकमः-ए-आबकारी (محکمۂ آبکاری) पु. ('अ.+फ़ा.) अबकारी खाते.

महकमः-ए-आबादकारी (محکمۂ آبادکاری) पु. ('अ.+फ़ा.) पुनर्वसन विभाग.

महकमः-ए-नश्र-ओ-इशा'अत (محکمۂ نشر و اشاعت) पु. ('अ.) प्रचार व प्रकाशन विभाग.

महकमः-ए-माल (محکمۂ مال) पु. ('अ.) अर्थ विभाग.

महकमः-ए-मेहनत (محکمۂ محنت) पु. ('अ.) मजूर खाते.

महकूक (محکوک) वि. ('अ.) सोललेला; खरचटलेला; फाटका तुटका.

महकूम (محکوم); **महकूमः** (محکومہ) वि. ('अ.) (१) शासित; अधीन; आश्रित; ताठ्याखालील. (२) दास; गुलाम. (३) प्रजा.

महकूमी (محکومی) स्त्री. ('अ.) दास्य; गुलामी; पराधीनता.

महज़ूं (محزوں) वि. ('अ.) शोकग्रस्त; दुःखी; कष्टी.

महज़ूज़ (محظوظ) वि. ('अ.) आनंदित; प्रसन्न; खूष.

महज़ूनी (محزونی) स्त्री. ('अ.) शोक; दुःख; त्रास.

महज़ूफ़ (محذوف) वि. ('अ.) लुप्त झालेले; पुसले गेलेले अक्षर किंवा शब्द.

महज़ूब (محجوب) वि. ('अ.) लज्जित; शरमिंदा.

महज़ूम (محزوم) वि. ('अ.) पराजित; पराभूत; हरलेला.

महजूर (مہجور) वि. ('अ.) विरही; वियोगी; सोडून दिलेला.

महजूरी (مہجوری) स्त्री. ('अ.) विरह; वियोग.

महज़ूल (مہزول) वि. ('अ.) क्षीण; जीर्ण; हडकुळा.

महताब (مہتاب) पु. [फ़ा. 'माहताब' (ماہتاب) चे संक्षिप्त.] (१) चंद्र; चांद. (२) चांदणे.

महताबी (مہتابی) स्त्री. (फ़ा.) (१) एक प्रकारची शोभेची दारू; चंद्रज्योती. (२) ईडलिंबू. (३) जर; वर्ख. (४) कठडा असलेली गच्ची.

महद् (محض) अव्य. ('अ.) केवळ; फक्त. (वि.) शुद्ध; निर्भेळ.

महद (مہد) पु. ('अ.) पाळणा; झोपाळा.

महद-ए-'उलया (مہد علیا) स्त्री. ('अ.) युवराजाची माता असलेली राणी.

महदर (محضر) पु. ('अ.) (१) हजर होण्याचे स्थान. (२) सामुदायिक अर्ज. **-नामः** (نامہ-) पु. ('अ.+फ़ा.) (१) अनेक लोकांनी मिळून सह्या केलेला अर्ज. (२) ज्यावर अनेक व्यक्तींच्या सह्या आहेत असे प्रमाणपत्र.

महदी (مہدی) वि. ('अ.) (१) ज्याला हिदायत (दीक्षा) मिळालेली आहे असा; दीक्षित. (२) हादी; धार्मिक नेता. (३) शिया संप्रदायाचे १२ वे इमाम. (अंतिम निवाडघाच्या वेळी हे पुनः स्वर्गातून खाली येतील अशी शिया लोकांची श्रद्धा आहे).

महदूद (محدود) वि. ('अ.) (१) मर्यादित; सीमित. (२) घेरलेला. (३) थोडा.

महदूम (مہدوم) वि. ('अ.) उध्वस्त; नष्ट.

महदूम (مہضوم) वि. ('अ.) पचलेला; पचन झालेला.

महफ़िज़ः (محفظہ) पु. ('अ.) स्मरणवही; टिप्पणवही.

महफ़िल (محفل) स्त्री. ('अ.) (१) सभा; संमेलन; बैठक. (२) मैफल; जलसा.

महफ़ूज़ (محفوظ) वि. ('अ.) (१) सुरक्षित; राखीव. (२) तोंडपाठ.

महबस (محبس) पु. ('अ.) कारागृह; तुरुंग.

महबिल (مہبل) स्त्री. ('अ.) योनिद्वार; योनिमुख.

महबूब (محبوب) पु. ('अ.) प्रेमपात्र; प्रियकर; प्रेयसी. (वि.) प्रिय.

महबूबी (محبوبی) स्त्री. ('अ.) प्रेम; प्रणय; प्रणयभावना.

महबूबः (محبوبہ) स्त्री. ('अ.) प्रेमिका; प्रेयसी.

महबूस (محبوس) वि. ('अ.) बंदी; कैदी; तुरुंगात पडलेला.

महब्बत (محبت) स्त्री. ('अ.) (१) प्रेम; प्रीती. (२) मैत्री. (३) वात्सल्य. (४) कृपा; दया. **-नामः** (نامہ-) पु. ('अ.+फ़ा.) प्रेमपत्र.

महम (مہم) पु. ('अ.) (१) चिंता; काळजी. (२) मोठे व महत्त्वाचे काम. (३) अवघड कार्य. (४) मोहीम.

महमिदत (محمدت) स्त्री. ('अ.) यशोगान; प्रशंसा.

महमिल (محمل) पु. ('अ.) उंटावरील हौदा. (यात मुख्यतः स्त्रियाच बसतात). **-नशीं** (نشیں-) वि. ('अ.+फ़ा.) (१) उंटावरील हौद्यात बसणारी. (२) लैला (मजनूची प्रेयसी).

महमूज़ (مہموز) वि. ('अ.) (१) विकृत; दूषित. (२) ज्यात अलिफ ('अ.) आहे असा अरबी शब्द.

महमूद (محمود) वि. ('अ.) (१) ज्याची स्तुती किंवा प्रशंसा करण्यात आलेली आहे असा; प्रशंसित. (२) श्रेष्ठ; उत्तम. (३) शुभ; इष्ट. [स्त्री. 'महमूदः' (محمودہ)].

महमूदी (محمودی) स्त्री. ('अ.) (१) एक प्रकारची झिरझिरीत मलमल. (२) एक प्रकारचे नाणे. (वि.) महमूदाशी संबंधित.

महमूम (محموم) वि. ('अ.) ज्याला ताप आलेला आहे असा; ज्याचे अंग कढत आहे असा.

महमूल (محمول) वि. ('अ.) लादलेला; ज्याची कल्पना करण्यात आली आहे असा.

महमूलः (محمولہ) स्त्री. ('अ.) (१) लादलेली वस्तू. (२) कल्पना; कल्पित गोष्ट.

महर (مہر) पु. (फ़ा.) लग्नामध्ये वराने वधूस द्यावयाची कबूल केलेली रक्कम; वराने वधूला द्यावयाचा ठरलेला हुंडा.

महर-ए-मु'अज्जल (مہر معجل) पु. ('अ.) लग्नाच्या वेळीच वधूला दिला जाणारा हुंडा.

महर-ए-मुवज्जल (مہر موجل) पु. ('अ.) नवऱ्याच्या मृत्यूनंतर किंवा घटस्फोटानंतर पत्नीला मिळणारी हुंड्याची रक्कम किंवा संपत्ती.

महरम (محرم) वि. पु. ('अ.) (१) रहस्य जाणणारा; अंतरंग-मित्र; घनिष्ठ; परिचित. (२) ज्याच्याशी लग्नसंबंध होऊ शकत नाहीत असा नातेवाईक. (हा जनानखान्यात जाऊ शकतो).

महरम-ए-राज़ (محرم راز) वि. ('अ. + फ़ा.) रहस्य जाणणारा; मर्मज्ञ.

महरुख़ (رمرخ; महरू (مہرو) वि. (फ़ा.) चंद्रासारखा सुंदर चेहरा असलेला (ली); चंद्रमुखी; चंद्रानना.

महरूक़ (محروق) वि. ('अ.) जळालेला; दग्ध.

महरूम (محروم) वि. ('अ.) (१) ज्याला एखादी गोष्ट मिळालेली नाही असा; वंचित. (२) निराश; नाउमेद. (३) दुर्दैवी.

महरूमियत (محرومیت); **महरूमी** (محرومی) स्त्री. ('अ.) (१) दुर्दैव; दुर्भाग्य. (२) निराशा. (३) वंचित राहाणे; न मिळणे. (४) अपयश; निष्फळता.

किस से महरूमि-ए-क़िस्मत की शिकायत कीजे।
हम ने चाहा था कि मर जाएँ सो वह भी न. हुआ ॥

महरूर (محرور) वि. ('अ.) (१) तापलेला; गरम. (२) तापट; रागीट.

महरूस (محروس) वि. ('अ.) नियंत्रित; ताब्यात असलेला.

महरूसः (محروسہ) वि. ('अ.) ताब्यातील वस्तू; अधीन; दुसऱ्याच्या नियंत्रणाखाली किंवा देखरेखीखाली असलेला देश, व्यक्ती अथवा वस्तू.

महल. (محل) पु. ('अ.) (१) घर; निवासस्थान. (२) महाल; राजवाडा; प्रासाद. (३) अंतःपुर. (४) पत्नी; राणी. (५) संधी; वेळ; प्रसंग. **–सरा** (سرا–) पु. ('अ. + फ़ा.) अंतःपुर; जनानखाना.

महलक (مہلک) पु. ('अ.) जिवाला धोका असलेले स्थान.

महलूक़ (مخلوق) वि. ('अ.) सोललेला; भादरलेला.

महलूल (محلول) वि. ('अ.) (१) सोडविलेला (प्रश्न); मोकळा केलेला. (२) विरघळलेला; विलीन.

महल्लात (محلات) पु. ('अ.) (१) प्रसंग. (२) मोठ्या लोकांच्या बायका; जनानखाना.

महल्लः (محلہ) पु. ('अ.) शहराचा एक भाग; मोहल्ला; आळी; पेठ. **–दार** (دار–) पु. ('अ.+ फ़ा.) आळीचा पुढारी; पेठेतील प्रमुख व्यक्ती.

महव (محو) वि. ('अ.) (१) तन्मय; तल्लीन; निमग्न. (२) पुसलेला, नष्ट केलेला.

महवश (مہوش) वि. (फ़ा.) चंद्रमुखी; चंद्रानना.

महवियत (محویت) स्त्री. ('अ.) तल्लीनता; तादात्म्य; ब्रह्मलीनता.

महशर (محشر) पु. ('अ.) (१) महाप्रलय; कयामत; अंतिम निवाडघाचा दिवस अथवा स्थान. (जगाच्या अंती थडग्यांतील सारी प्रेते जिवंत होतील व त्यांच्या पापपुण्यांचा निवाडा केला जाईल, असे मुसलमान मानतात). (२) मोठी दंगल.

महशरिस्तान (محشرستان) पु. ('अ.+फ़ा.) 'महशर' चे मैदान.

महशूर (محشور) वि. ('अ.) 'महशर' च्या दिवशी जिवंत केलेला.

महसूद (محسود) वि. ('अ.) लोक ज्याचा हेवा करतात असा.

महसूब (محسوب) वि. ('अ.) हिशेबात धरलेला; हिशेबात नमूद केलेला.

महसूर (محصور) वि. ('अ.) चोहोबाजूंनी वेढलेला; शत्रूंनी घेरलेला.

महसूल (محصول) पु. ('अ.) (१) माल आणण्या-नेण्याचे भाडे. (२) जमीन महसूल; शेतसारा. (३) कर. **–दार** (دار–) वि. ('अ.+फ़ा.) कर देणारा.

महसूली (محصولی) वि. ('अ.) (१) जिचा शेतसारा भरावा लागतो अशी जमीन. (२) जिच्यावर कर द्यावा लागतो अशी वस्तू.

महसूस (محسوس) वि. ('अ.) (१) अनुभूत; इंद्रियगम्य. (२) ज्ञात; स्पष्ट; जाहीर.

महसूसात (محسوسات) पु. स्त्री. ('अ.) अनुभूती; इंद्रियगम्य गोष्टी.

महाकिम (محاکم) पु. ['अ. 'महकमः' (محکمہ) चे अनेक.] विभाग; खाती.

महाज़ (محاذ) पु. ('अ.) आघाडी; रणक्षेत्र.

महाब (مہاب) पु. ('अ.) भयस्थान; धोक्याचे ठिकाण.

महाबत (مہابت) स्त्री. ('अ.) (१) भय; दहशत. (२) श्रेष्ठत्व; महात्म्य.

महाम (مہام) पु. ['अ. 'मुहिम' (مہم) चे अनेक.] (१) मोठी व महत्त्वाची कामे; अवघड कार्ये. (२) मोहिमा.

महार (مہار) स्त्री. (फ़ा.) उंटाची वेसण.

महारत (مہارت) स्त्री. ('अ.) (१) निपुणता; चातुर्य; कौशल्य. (२) सराव; अभ्यास.

महाल (محال) पु. ['अ. 'महल' (محل) चे अनेक.] (१) स्थाने; जागा. (२) अनेक गावांचा समुदाय; छोटा तालुका. (३) गावाचा भाग; आळी.

महाल (مہال) वि. ('अ.) भयानक; भीषण; भयंकर.

महासिन (محاسن) पु. ['अ. 'हुस्न' (حسن) चे अनेक.] (१) उत्तम गोष्टी. (२) दाढी; श्मश्रू.

महासिल (محاصل) पु. ('अ.) (१) कर; आवक. (२) शेतसारा.

महीद् (محیض) स्त्री. ('अ.) स्त्रीचे विटाळशीपण; रजस्वला दशा.

महीन (مہین) वि. ('अ.) (१) बारीक; सूक्ष्म. (२) पातळ; तलम. (३) जीर्ण. (४) कोमल. (५) दुबळा.

महीनः (مہینہ) पु. [फ़ा. 'माहीनः' (ماہینہ) चे संक्षिप्त.] महिना; मास.

महीब (مہیب) वि. ('अ.) भीषण; भयंकर; अकाळ-विक्राळ.

महील (مہیل) वि. ('अ.) भयस्थान; घोक्याचे ठिकाण.

माँ (ماں) स्त्री. (फ़ा.) माता; आई.

मांद (ماند) वि. (फ़ा.) राहिलेला; उरलेला. (हिं.) (१) शेण. (२) ढीग; ढिगारा. (वि.) फिका; निस्तेज. **–गी** (گی –) स्त्री. (फ़ा.) (१) आजार; आजारीपणाचा रोग. (२) क्लांती; सुस्ती; थकवा.

मांद-ओ-बूद (ماند و بود) स्त्री. (फ़ा.) राहणी; जीवन पद्धती.

मांदः (ماندہ) वि. (फ़ा.) (१) थकलेला; क्लांत; श्रांत. (२) आजारी. (३) उरलेला; राहिलेला; सोडलेला.

मा (ما) अव्य. ('अ.) (१) नाही. (२) काय. (३) जो. (४) हा, याचा. (५) मध्ये; दरम्यान.

मा (ما) पु. ('अ.) (१) पाणी; पातळ पदार्थ. (२) चमक; तेज.

मा (ما) सर्व. (फ़ा.) आम्ही; आमचा; आम्हांला.

मा'इदः (مائدہ) पु. ('अ.) खाद्यपदार्थांनी भरलेली थाळी किंवा ट्रे.

मा'इल (مائل) वि. ('अ.) (१) आकर्षित; प्रवृत्त; झुकलेला. (२) आसक्त. (३) किंचित. थोडासा. **–ब.'अरूज** (بہ عروج –) वि. ('अ. + फ़ा.) उन्नतीच्या दिशेला कललेला; उत्थानोन्मुख. **–ब. ज़वाल** (بہ زوال –) वि. ('अ.+फ़ा.) पतनोन्मुख **–ब.सियाही** (بہ سیاہی –) वि. ('अ. + फ़ा.) किंचित काळसर.

मा'ई (مائی) वि. ('अ.) पाण्याचा; पाण्यासंबंधी.

मा-उल्-अजबन (ماءالعجبن) पु. ('अ.) नासवलेल्या दुधाचे पाणी (आजाऱ्यांना दिले जाणारे).

मा-उल्-लहम (ماءاللحم) पु. ('अ.) मांस व औषधी पदार्थ एकत्र करून काढण्यात येणारा एक पौष्टिक अर्क.

मा-उल्-वर्द (ماءالورد) पु. ('अ.) गुलाबपाणी.

मा-उल्-हयात (ماءالحیات) पु. ('अ.) अमृत.

मा'ऊफ़ (ماؤف) वि. ('अ.) विकृत; दूषित; बिघडलेला.

मा'ए'अ (مائع) पु. ('अ.) द्रव पदार्थ; तरल पदार्थ

माकदिर (ماکدر) वि. ('अ.) अस्वच्छ; अशुद्ध, घाणेरडा.

माक़ब्ल (ماقبل) वि. ('अ.) पूर्वीचा आधीचा.

माकियान (ماکیان) स्त्री. (फ़ा.) कोंबडी कोंबडी

माकिर (ماکر) वि. ('अ.) फसव्या; फसविणारा.

माकूल (ماکول) वि. ('अ.) (१) खाल्लेले; खाल्लेली वस्तू. (२) खाद्यपदार्थ; आहार. [अनेक 'माकूलात' (ماکولات)].

माख़ज़ (ماخذ) पु. ('अ.) घेण्याचे स्थान; ज्यातून एखादा उतारा किंवा लेख घेण्यात आलेला आहे असा ग्रंथ.

माख़ूज़ (ماخوذ) वि. ('अ.) (१) घेतलेला; उद्धृत केलेला. (२) पकडलेला; अटक केलेला.

माख़ूलिया (ماخولیا) पु. ['अ. 'मालीख़ूलिया' (مالیخولیا) चे संक्षिप्त.] वेड; उन्माद (रोग).

माचीन (ماچین) पु. ('अ.) हिंद-चीन; इंडोचायना.

माजरा (ماجرا) पु. ('अ.) (१) घटना; गोष्ट. (२) वृत्तांत. (३) मामला; भानगड. (४) स्थिती.

माजिद (ماجد) वि. ('अ.) (१) पवित्र; पुनितात्मा. (२) प्रतिष्ठित; माननीय.

माजिदः (ماجدہ) स्त्री. ('अ.) साध्वी; सदाचारी स्त्री.

माज़ू (مازو) पु. (फ़ा.) मायफळ; माजूफल.

माज़ूर (ماجور) वि. ('अ.) ज्याला एखाद्या कामाचे पारिश्रमिक देण्यात आलेले आहे असा.

मात (مات) स्त्री. ('अ.) (१) पराभव. (२) बुद्धि-बळातील मात; डाव. (शब्दशः अर्थ–मेला).

मातम (ماتم) पु. (फ़ा.) (१) मृत्युशोक; विलाप. (२) दुःख. **–कदः** (کدہ –); **–खानः** (خانہ –) पु. (फ़ा.) जेथे एखाद्या व्यक्तीच्या मृत्युबद्दल विलाप केला जात आहे असे स्थान. **–ज़दः** (زدہ –) वि. (फ़ा.) शोकग्रस्त. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) शोक करणारा. **–पुर्सी** (پرسی –) स्त्री. (फ़ा.) मृत व्यक्तीच्या नातेवाईकास भेटावयास जाणे; दारावर जाणे; समाचारास जाणे. **–सरा** (سرا –) स्त्री. (फ़ा.) शोकगृह.

मातमी (ماتمی) वि. (फ़ा.) शोकासंबंधी; शोकसूचक.

मातहूत (ماتحت) वि. ('अ.) अधीन; आश्रित; हाताखालचा.

मातहूती (ماتحتی) स्त्री. ('अ.) अधीनता; पराधीनता; गुलामी.

मादर (مادر) स्त्री. (फ़ा.) माता; आई. **–ज़न** (زن –) स्त्री. (फ़ा.) सासू. **–ज़ाद** (زاد –) वि. (फ़ा.) जन्मजात; उपजत; जन्मतः [उदा. 'मादरज़ाद अंधा' (مادرزاد اندھا) जन्मजात आंधळा.] (अव्य.) पूर्णपणे; अत्यंत. **–बख़्ता** (بخطا –) वि. (फ़ा.) एक शिवी; लेकावळा; जारज. (तुझी आई व्यभिचारीणी होती).

मादर-ए-'अल्लाती (مادر علاتی) स्त्री. (फ़ा.+'अ.) सावत्र आई.

मादर-ए-गिती (مادر گیتی) स्त्री. (फ़ा.) मातृभूमी; प्रियभूमी.

मादर-ए-रिदा'ई (مادر رضائی) स्त्री. (फ़ा.) दूध पाजविणारी; दाई.

मादर-ए-हक़ीक़ी (مادرحقیقی) स्त्री. (फ़ा.) सख्खी आई.

मादरानः (مادرانہ) वि. (फ़ा.) मातेचा; मातेसारखा; मायाळू.

मादरी (مادری) वि. (फ़ा.) मातेचा; जन्मजात. **–ज़बान** (زبان –) स्त्री. (फ़ा.) मातृभाषा.

मादाम (مادام) अव्य. ('अ.) सदा; सर्वदा; हमेशा.

मादियः (ماضیہ) वि. ('अ.) भूतकालीन; व्यतीत झालेली.

मादिह् (مادح) वि. ('अ.) प्रशंसक; स्तुतिपाठक.

मादी (ماضی) वि. ('अ.) भूतपूर्व; व्यतीत झालेला; माजी. (पु.) भूतकाळ. **–इस्तिम्रारी** (استمراری –) पु. ('अ.) अपूर्ण भूतकाळ (वह करता था). **–एहतिमाली** (احتمالی –) पु. ('अ.) संदिग्ध भूतकाळ (किया होगा). **–क़रीब** (قریب –) पु. ('अ.) पूर्ण वर्तमान काळ (किया है). **–तमन्ना'ई** (تمنائی –) पु. ('अ.) इच्छार्थक भूतकाळ (करता). **–नातमाम** (ناتمام –) पु. ('अ.+फ़ा.) अपूर्ण भूतकाळ. **–ब'ईद** (بعید –) पु. ('अ.) पूर्ण भूतकाळ (किया था). **–म'अतूफ़ः** (معطوفہ –) पु. ('अ.) जे दोन भूतकाळ उभयान्वयी अव्ययाने किंवा ऊन प्रत्ययांत धातुसाधिताने जोडले जातात ते. (खाया और गया; खाकर गया). **–मुत्लक़** (مطلق –) पु. ('अ.) सामान्य भूतकाळ (किया). **–शक्की** (شکی –) पु. ('अ.) पाहा 'मादी एहतिमाली'. **–शर्ती** (شرطی –) पु. ('अ.) अट असलेला भूतकाळ (अगर वह गया होता....).

मादीन (مادین) स्त्री. (फ़ा.) मादी; स्त्री प्राणी.

मादून (مادون) अव्य. ('अ.) शिवाय; व्यतिरिक्त.

मादः (مادہ) स्त्री. (फ़ा.) मादी; स्त्री. **–रू** (رو –) वि. (फ़ा.) (१) बाईसारखा दिसणारा, हिजडा. (२) दाढीमिशी न आलेला मुलगा.

माद्दियत (مادیت) स्त्री. ('अ.) भौतिकता; जडवाद.

माद्दी (مادی) वि. ('अ.) आधिभौतिक; जड.

माद्दः (مادہ) पु. ('अ.) (१) मूलतत्त्व. (२) योग्यता; पात्रता. (३) मूळ; पाया. (४) विवेक. (५) जाणीव; ज्ञान. (६) निसर्ग: प्रकृती. (७) शरीर; अस्तित्व; सृष्टीची मूलतत्त्वे. **–परस्त** (پرست –) वि. ('अ.+फ़ा.) जडवादी.

माद्दः-ए-मनविय्यः (مادۂ منویہ) पु. ('अ.) वीर्य; शुक्र; रेत.

मानंद (مانند) (शु.) वि. (फ़ा.) समान; सदृश.

माना (مانا) वि. (फ़ा.) सारखा; समान; तुल्य.

मानिंद (مانند) वि. (फ़ा.) समान; सदृश.

मानि'अ (مانع) वि. ('अ.) (१) अडविणारा. (२) बाधक. (३) हस्तक्षेप करणारा.

मानूस (مانوس) वि. ('अ.) माणसाळलेला; परिचित; प्रेम करणारा; स्नेही.

माफ़ात (مافات) वि. (फ़ा.) निघून गेलेला; व्यतीत झालेला.

माफ़ि'द्-दमीर (مافی الضمیر) पु. ('अ.) मनातील गोष्ट; आशय; हेतू.

माफ़ीहा (مافیہا) पु. ('अ.) जे काही त्यात आहे. हा शब्द 'दुनिया' या शब्दाबरोबर येतो. (जग व जगात जे काही आहे ते सर्व).

माफ़ौक़ (مافوق) अव्य. ('अ.) वर; उपरी.

माफ़ौक़-उज़्-ज़िक्र (مافوق الذکر) वि. ('अ.) उपरोल्लेखित; उल्लिखित.

माफ़ौक़-उल्-'आदत (مافوق العادت) वि. ('अ.) अस्वाभाविक; अनैसर्गिक.

मा ब'अद (مابعد) वि. ('अ.) मागील; नतरचा. (अव्य.) नंतर; यानंतर.

मा बक़ा (مابقا) वि. ('अ.) बाकी; उरलेला.

माबून (مابون) वि. ('अ.) गुदामैथुन करविण्याचे व्यसन असलेला.

माबैन (مابین) अव्य. ('अ.) मध्ये; दरम्यान; मध्यंतरी.

मामन (مامن) पु. ('अ.) (१) स्थान; ठिकाण. (२) आश्रयस्थान.

मामा (مامہ) स्त्री. (फ़ा.) मोलकरीण; दासी.

मामून (مامون) वि. ('अ.) सुरक्षित; शांततापूर्ण.

मामूर (مامور) वि. ('अ.) ज्याला आदेश देण्यात आलेला आहे असा; नेमलेला; नियुक्त.

मामूल (مامول) वि. ('अ.) आशान्वित; उमेद असलेला.

मायुक़्का (مايقرا) वि. ('अ.) वाचता येण्यासारखा; सुवाच्च.

मायूस (مايوس) वि. ('अ.) निराश; हताश; उदास. **–कुन** (کن –) वि. ('अ.+फ़ा.) निराशाजनक.

मायूसी (مايوسی) स्त्री. ('अ.) निराशा; नाउमेदी; उदासीनता.

मायः (مايہ) स्त्री. (फ़ा.) (१) धन; संपत्ती. (२) भांडवल; मुद्दल. (३) उपकरणे; सामान. (४) योग्यता. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) भांडवलदार; श्रीमंत.

मायः-ए-नाज़ (مایۂ ناز) पु. (फ़ा.) अभिमानास्पद गोष्ट.

मार (مار) पु. (फ़ा.) साप; नाग; सर्प. **–गज़ीदः** (گزیدہ –) वि. (फ़ा.) ज्याला साप चावला आहे असा. **–गीर** (گیر –) वि. (फ़ा.) साप पकडणारा: गारुडी. **–गुर्ज़ः** (گرز –) पु. (फ़ा.) फणा असलेला साप, नाग. **–पेच** (پیچ –) वि. (फ़ा.) नागमोडी; वेडावाकडा. **–मुहरः** (مہرہ –) पु. (फ़ा.) नागाच्या मस्तकातील मणी.

मार-ए-आस्तीं (مار آستیں) पु. (फ़ा.) अस्तनीतील साप, निखारा; जवळचा शत्रू.

मारक़ (مارق) पु. ('अ.) चिन्ह; छाप.

मारक़ः (مارقہ) वि. ('अ.) चिन्ह; छाप असलेला.

मारिक़ (مارق) वि. ('अ.) नास्तिक; धर्मलंड.

मारूत (ماروت) पु. ('अ.) एक देवदूत. ('हारूत' (هاروت) नावाच्या दुसऱ्या एका देवदूताबरोबर हा 'बाबिल' (بابل) च्या विहिरीत राहात असतो व लोकांना जादू शिकवतो, अशी समजूत आहे).

माल (مال) प्रत्य. (फ़ा.) तुडवलेला; कुस्करलेला. **पामाल** (پامال) वि. (फ़ा.) पायदळी तुडविलेला.

माल (مال) पु. ('अ.) (१) माल; सामान. (२) धन; संपत्ती. (३) महत्त्व. (४) गोडधोड खाणे; पक्वान्ने. (५) मौल्यवान वस्तू. (६) शेतसारा. (७) सुंदर स्त्री. (८) परिणाम; फळ. **–खानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) (१) माल ठेवण्याचे ठिकाण; गोदाम; भांडार. (२) खजिना. **–गुज़ार** (گزار –) वि. ('अ. +फ़ा.) शेतसारा गोळा करून सरकारला देणारा; जमीनदार. **–गुज़ारी** (گزاری –) स्त्री. ('अ.+फ़ा.) शेतसारा; धारा; सरकारला द्यावयाचा भूमिकर. **–ज़ादः** (زادہ –) पु. ('अ. + फ़ा.) वेश्यापुत्र. **–दामिन** (ضامن –) पु. ('अ.) दुसऱ्यासाठी जामीन राहाणारा. **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) श्रीमंत; धनवान. **–मुज़्रिम** (مجرم –) वि. ('अ.) चोर; माल चोरणारा.

माल-ए-अमवात (مال اموات) पु. ('अ.) मृतांचा माल; बेवारशी माल.

माल-ए-कासिद (مال کاسد) पु. ('अ.) भेसळ असलेला मांल (सोने वगैरे).

माल-ए-ग़नीमत (مال غنیمت) पु. ('अ.) युद्धामध्ये शत्रूच्या प्रदेशातून लुटून आणलेला माल; लुटीचा माल.

माल-ए-तैयिब (مال طیب) पु. ('अ.) निढळाच्या घामाने कमावलेली संपत्ती.

माल-ए-मक़्रूक़ (مال مقروق) पु. ('अ. + तु.) जप्त केलेला माल.

माल-ए-सा'इर (مال سائر) पु. ('अ.) मालगुजारी खेरीज इतर मार्गांनी (जकात वगैरे) मिळालेला कर किंवा संपत्ती.

माल-ओ-मता'अ (مال و متاع) पु. ('अ. + फ़ा.) मालमत्ता; संपत्ती व सामान.

मालामाल (مالامال) वि. ('अ.+फ़ा.) (१) समृद्ध; संपन्न. (२) भरपूर; पुष्कळ.

मालायन्हल (مالاینحل) वि. ('अ.) न सुटणारी समस्या; असाध्य.

मालिक (مالک) पु. ('अ.) (१) स्वामी; मालक. (२) पती. (३) ईश्वर. (४) सरकार.

मालिकानः (مالکانہ) अव्य. ('अ. + फ़ा.) मालकासारखा. (पु.) मालकी हक्क म्हणून मिळणारी रक्कम.

मालिकः (مالکہ) स्त्री. ('अ.) मालकीण; स्वामिनी.

मालियत (مالیت) स्त्री. ('अ.) (१) संपत्ती. (२) मूल्य; किंमत. [अनेक 'मालियात' (مالیات)].

मालियानः (مالیانہ); **मालियः** (مالیہ) पु. ('अ.) कर; शेतसारा.

मालिश (مالش) स्त्री. (फ़ा.) मर्दन; अंगमर्दन; मालिश.

माली (مالی) वि. ('अ.) मालासंबंधी; आर्थिक.

मालीख़ूलिया (مالیخولیا) पु. ('अ.) डोके फिरणे; वेड लागणे; उन्माद (रोग).

मालीदः (مالیدہ) वि. (फ़ा.) मर्दन केलेला; चोळलेला; कुस्करलेला; (पु.) (१) मलिदा. (२) एक प्रकारचे उत्तम लोकरीचे कापड. **–गोश** (گوش –) वि. (फ़ा.) (१) ज्याचे कान उपटले आहेत असा; कानपिचक्या देण्यात आलेला. (२) सावध; हुशार.

मालूफ़ (مالوف) वि. ('अ.) प्रिय; ज्याच्यावर प्रेम आहे असा.

मालेह (مالح) वि. ('अ.) (१) खारा; लवणयुक्त. (२) सुंदर; लावण्यपूर्ण.

मावजब (ماوجب) वि. ('अ.) यथोचित; यथायोग्य.

मावरा (ماورا) अव्य. ('अ.) व्यतिरिक्त; शिवाय; खेरीज. **–उन्-नहर** (النهر –) पु. ('अ.) नदीच्या पलीकडील प्रदेश तूरान (तुर्कस्तान) जैहून नदीच्या पलीकडे असल्यामुळे इराणी लोकांनी त्याला 'मावरा-उन्-नहर' असे नाव दिले.

मावरा-ए-'अक़्ल (ماورائے عقل) वि. ('अ.) बुद्धीच्या पलीकडील; दुर्बोध.

मावरा-ए-हिस (ماورائے حس) वि. ('अ.) इंद्रियातीत.

मावा (ماوا) पु. ('अ.) आश्रयस्थान; रक्षणस्थान; शरणस्थान.

माश (ماش) पु. (फ़ा.) उडीद (कडधान्य).

माशा'अल्लह (ماشاءالله) वा. ('अ.) (१) ईश्वर वाईट दृष्टीपासून वाचवो. इडापिडा टळो. (२) वाहवा! छान!

माशित: (ماشطہ) स्त्री. ('अ.) बायकांची (विशेषत: वधूची) वेणीफणी करणारी स्त्री; प्रसाधिका.

माशिय: (ماشیہ) पु. ('अ.) चतुष्पाद प्राणी; जनावर; पशू.

माशी (ماشی) वि. ('अ.) (१) पायांनी चालणारा. (२) चहाडखोर.

माश: (ماشہ) पु. (फ़ा.) मासा (वजन) आठ रतींचे (गुंजांचे) वजन.

मासफ़ा (ماصفا) वि. ('अ.) स्वच्छ व पवित्र वस्तू.

मासबक़ (ماسبق) वि. ('अ.) पूर्वीचा; पूर्वोक्त; उपर्युक्त.

मासलफ़ (ماسلف) वि. ('अ.) व्यतीत झालेला; गेलेला.

मासिर (ماصر) पु. ('अ.) तुरुंग; कारागार.

मासिर (مآثر) पु. ('अ.) (१) उत्तम काम. (२) चिन्ह; खूण. (३) शोध; तपास.

मासिवाअल्लह (ماسوا الله); **मासिवा** (ماسوا) अव्य. ('अ.) (१) या खेरीज; या व्यतिरिक्त. (२) ईश्वरा-खेरीज इतर गोष्टी.

मास्त (ماست) पु. (फ़ा.) दही. **–बंद** (بند –) वि. (फ़ा.) चक्का (पनीर) तयार करणारा.

माह (ماہ) पु. (फ़ा.) (१) चंद्र; चांद. (२) महिना. **–चः** (چہ –) पु. (फ़ा.) टोपी किंवा झेंडा यावरील चांद. **–जबीं** (جبیں –) वि. (फ़ा.) चंद्रासारखे सुंदर कपाळ असलेली; चंद्रानना; सुंदर; सुंदरी. **–ताब** (تاب –) पु. (फ़ा.) (१) चंद्र. (२) चांदणे. (३) पत्यांतील गुलाम. (४) चंद्रज्योती (शोभेची दारू). **–ताबी** (تابی –) स्त्री. (फ़ा.) (१) चंद्रज्योती. (२) बागेतील हौदावर चांदण्यातील विहारासाठी बनविलेली लहानशी इमारत. **–नामः** (نامہ –) पु. (फ़ा.) मासिकपत्र. **–पारः** (پارہ –) पु. (फ़ा.) चंद्राचा तुकडा. (वि.) चंद्रासारखा देखणा (णी). **–पैकर** (پیکر –) वि. (फ़ा.) चंद्राप्रमाणे सुंदर. **–ब.माह** (بماہ –) अव्य. (फ़ा.) दरमहा; प्रत्येक महिन्यास. **–रुख़** (رخ –) वि. **–रू** (رو –) (फ़ा.) चंद्रमुखी; चंद्रानना. **–वार** (وار –) वि. (फ़ा.) मासिक. (अव्य.) दर महिन्यास. **–वारी** (وارى –) वि. (फ़ा.) मासिक. (स्त्री.) मासिक पगार. (स्त्री.) स्त्रियांचा मासिक धर्म; विटाळशीपणा.

माह-ए-कन्'आं (ماہ کنعاں) पु. (फ़ा.+'अ.) हजरत यूसुफ.

माह-ए-क़मरी (ماہ قمری) पु. (फा.+'अ.) चांद्रमास.

माह-ए-कामिल (ماہ کامل) पु. (फ़ा.+'अ.) पूर्णचंद्र; शुद्ध चतुर्दशीचा चंद्र.

माह-ए-ख़ानगी (ماہ خانگی) स्त्री. (फ़ा.) रखेली.

माह-ए-गिरिफ़्त: (ماہ گرفتہ) पु. (फ़ा.) ग्रहण लागलेला चंद्र.

माह-ए-नौ (ماہ نو) पु. (फ़ा.) नवीन चंद्र; बीजेची चंद्रकोर.

माह-ए-मुबारक (ماہ مبارک) पु. (फ़ा.+'अ.) रमजानचा महिना.

माह-ए-शम्सी (ماہ شمسی) पु. (फ़ा.+'अ.) सौरमास.

माहूदर (ماحضر) पु. ('अ.) (१) जे काही उपस्थित, हजर, तयार आहे. (२) घरात तयार असलेले जेवण. (३) साधी मीठभाकर.

माहुसल (ماحصل) पु. ('अ.) (१) जे काही मिळाले आहे ते; प्राप्ती; उत्पन्न. (२) निष्कर्ष; फळ; परिणाम.

माहान: (ماہانہ) वि. (फ़ा.) मासिक. (अव्य.) दर महिन्यास.

माहियत (ماہیت) स्त्री. ('अ.) (१) मूलतत्त्व; तथ्य; वास्तविक स्थिती. (२) गुण; वैशिष्ट्य.

माहियान: (ماہیانہ) पु. (फ़ा.) मासिक वेतन; पगार.

माहिर (ماہر) वि. ('अ.) (१) दक्ष; कुशल; निपुण. (२) सराव असलेला; अभ्यस्त.

माही (ماہی) वि. ('अ.) पुसून टाकणारा; नष्ट करणारा.

माही (ماهی) स्त्री. पु. (फ़ा.) मासा; मासळी. **–ख़ोर** (–خور); **–ख़्वार** (–خوار) वि. (फ़ा.) मत्स्याहारी (पु.) बगळा. **–गीर** (–گیر) वि. (फ़ा.) मासे पकडणारा; कोळी. **–चः** (–چہ) स्त्री. (फ़ा.) शेवया. **–पुश्त** (–پشت) वि. (फ़ा.) मध्यभागी फुगीर असलेला. **–मरातिब** (–مراتب) वि. (फ़ा.+'अ.) मासे वगैरे प्राण्यांच्या आकारांची निशाणे; बादशहा, नबाब वगैरे लोकांच्या स्वारीच्या वेळी ही निशाणे अग्रभागी हत्तीवर असतात. मानसन्मान; मानमरातब.

माहीनः (ماہینہ) वि. (फ़ा.) मासिक; महिन्याचा. (पु.) महिन्याचा पगार.

माहूदानः (ماہودانہ) पु. (फ़ा.) जमालगोटा (औषधी वनस्पती).

मिजल (منجل) स्त्री. ('अ.) विळा; खुरपे.

मिंतक़ (منطق); **मिंतक़ः** (منطقہ) पु. ('अ.) (१) पट्टा; कंबरपट्टा. (२) कटिबंध (उष्ण, शीत वगैरे) (भू.).

मिंतक़ः-ए-बारिदः (منطقۂ باردہ) पु. ('अ.) शीत कटिबंध.

मिंतक़ः-ए-मो'अतदिलः (منطقۂ معتدلہ) पु. ('अ.) समशीतोष्ण कटिबंध.

मिंतक़ः-ए-मोहरिक़ः (منطقۂ محرقہ); **मिंतक़ः-ए-हारः** (منطقۂ حارہ) पु. ('अ.) उष्ण कटिबंध.

मिंतक़त-उल्-बुरूज (منطقتہ البروج) पु. ('अ.) राशिचक्र.

मिंदील (منديل) पु. ('अ.) (१) कमरेला किंवा डोकीला बांधण्याचा एक विशिष्ट रुमाल; मंदील. (२) टॉवेल; नॅपकिन.

मिंबर (منبر) पु. ('अ.) मशिदीतील उंच चबुतरा. याच्यावर बसून किंवा उभा राहून इमाम अथवा मुल्ला उपदेश देतो.

मि'आ (معا) स्त्री. ('अ.) आतडे.

मिक़स् (مقص) स्त्री. ('अ.) दुभत्या जनावराची धार काढताना त्याचे मागील पाय बांधण्याची दोरी.

मिक़्दार (مقدار) स्त्री. ('अ.) प्रमाण; मात्रा; वजन; अंदाज (वजनाचा).

मिक्नसः (مکنسہ) स्त्री. ('अ.) केरसुणी; झाडू.

मिक़्न'अ (مقنع) पु. ('अ.) (१) वराने डोकीवरून घ्यावयाचे झिरझिरीत उपरणे. यावर बाशिंग बांधलेले असते. (२) बायकांची ओढणी.

मिक़्नातीस (مقناطیس) पु. ('अ.) लोहचुंबक.

मिक्नास (مکناس) पु. ('अ.) केरसुणी.

मिक्याल (مکیال) पु. ('अ.) कोरडे पदार्थ मापण्याचे भांडे किंवा माप.

मिक़्यास (مقیاس) पु. ('अ.) मोजमाप करण्याचे साधन; अनुमान काढण्याचे यंत्र.. **–उल्-मत्र** (–المطر) पु. ('अ.) पाऊस मोजण्याचे यंत्र. **–उल्-लबन** (–اللبن) पु. ('अ.) दुधातील भेसळ जाणण्याचे यंत्र. **–उल्-हरारः** (–الحرارہ) पु. ('अ.) तापमापक यंत्र; थर्मामीटर.

मिक़्राज़ (مقراض) स्त्री. ('अ.) कात्री; कर्तनी.

मिक़्वल (مقول) पु. ('अ.) जीभ; जिव्हा.

मिक़्वी (مقوی) पु. ('अ.) पुष्टा; एखादी वस्तू पुष्ट करण्याचा पदार्थ.

मिक्यात (مکوات) स्त्री. ('अ.) (१) इस्त्री (२) शरीराला डाग देण्याचे यंत्र.

मिक्हल (مکحل) स्त्री. ('अ.) सुरमा घालण्याची काडी; अंजन-शलाका.

मिख़्लात (مخلات) पु. ('अ.) घोडघाचा तोबरा (कातडी पिशवी).

मिग़्फ़र (مغفر) पु. ('अ.) शिरस्त्राण.

मिग़्फ़रः (مغرفہ) पु. ('अ.) चमचा; पळी.

मिजमर (مجمر) स्त्री. ('अ.) (१) धूपदाणी; धूप घालण्याचे भांडे. (२) शेगडी.

मिज़्मर (مزمر) पु. ('अ.) बासरी; मुरली.

मिज़्मार (مزمار) स्त्री. ('अ.) बासरी; मुरली.

मिजस (مجس) पु. ('अ.) हातावरील नाडी पाहाण्याचे स्थान.

मिज़ाज (مزاج) पु. ('अ.) (१) स्वभाव. (२) प्रकृती; तब्येत. (३) गुण; गुणधर्म; वैशिष्ट्य. (४) घमेंड; नखरा. (५) मन. **–दार** (–دار) वि. ('अ.+फ़ा.) घमेंडखोर; हट्टी. **–पुर्सी** (–پرسی) स्त्री. ('अ.+फ़ा.) एखाद्याला भेटावयास जाणे; आजाऱ्याच्या समाचाराला जाणे.

मिज़ाज-ए-'आली (مزاج عالی); **मिज़ाज-ए-मुबारक** (مزاج مبارک); **मिज़ाज-ए-शरीफ़** (مزاج شریف) पु. ('अ.) आपण खुशाल आहात ना? कसे काय? (भेटीच्या वेळी विचारावयाचा प्रश्न).

मिज़ाजी (مزاجی) वि. ('अ.) (१) घमेंडखोर. (२) हट्टी. (३) तऱ्हेवाईक.

मिज्वाफ़ (مجداف) पु. ('अ.) नावेचे वल्हे.

मित्रक़ः (مطرقہ) पु. ('अ.) हतोडा.

मितहून (مطحن) स्त्री. ('अ.) जाते; चक्की.

मिदाद (مداد) स्त्री. ('अ.) शाई.

मिद्फ़'अ (مدفع) पु. ('अ.) तोफ.

मिद्राब (مضراب) स्त्री. ('अ.) सतार वाजविण्याची तारेची अंगठी; नखी.

मिद्हत (مدحت) स्त्री. ('अ.) प्रशंसा; स्तुती; कीर्तन. **–सरा** (سرا –) वि. ('अ. + फ़ा.) स्तुतिपाठक; कीर्तनकार.

मिन (من) अव्य. ('अ.) पासून; वर; आतून; चा. **–कुलि'ल्-वुजह** (كل الوجوه –) वा. ('अ.) सर्व प्रकारे; पूर्णपणे. **–जानिब** (جانب –) अव्य. ('अ.) कडून; बाजूने. **–जुम्लः** (جملہ –) अव्य. ('अ.) च्या पैकी; एकूण; सामान्यतः.

मिनक़ार (منقار) स्त्री. ('अ.) चोच; चंचू.

मिनखल (منخل) स्त्री. ('अ.) चाळण; चाळणी.

मिना (منا) पु. ('अ.) मक्केतील एक ठिकाण. (येथे हजच्या दुसऱ्या दिवशी यात्रेकरू 'कुर्बानी' करतात व हजामत करवून घेतात).

मिन्नत (منت) स्त्री. ('अ.) (१) उपकार; कल्याण. (हिं.) विनवणी; मनधरणी. **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) उपकृत.

मिन्हा (منہا) वि. ('अ.) (१) त्या सर्वांतून. (२) कमी केलेला; घटविलेला; वजा केलेला.

मिन्हा'ई (منہائی) स्त्री. ('अ.) (१) कपात. (२) वजा करणे. (३) उणीव; फरक.

मिन्हाज (منہاج) स्त्री. ('अ.) (१) मार्ग; रस्ता. (२) राजमार्ग.

मियाँ (میاں) पु. (हिं.) (१) मालक. (२) वारस. (३) अधिकारी. (४) महाशय; महाराज. (५) मुसलमान. (बा.) पती; नवरा. **–आदमी** (آدمی –) पु. (हिं.+फ़ा.) सज्जन पुरुष.

मियाँ (میاں) अव्य. [फ़ा. 'मियान' (میان) चे संक्षिप्त.] दरम्यान; मध्ये. (पु.) (१) मध्य; मधला भाग. (२) कमर (स्त्री.) तलवारीचे म्यान. **–जी** (جی –) पु. (फ़ा.) (१) दूत; राजदूत. (२) मध्यस्थ. (३) शिक्षक. **–तिही** (تہی –) वि. (फ़ा.) ज्याचा मधला भाग रिकामा आहे असा; मध्ये कापूस नसलेले अंथरूण. **–बंद** (بند –) पु. (फ़ा.) कंबरपट्टा; कटिबंध. **–बाला** (بالا –) वि. (फ़ा.) मध्यम उंचीचा.

मियान (میان) अव्य. (फ़ा.) दरम्यान; मध्ये. (पु.) मध्य भाग. (स्त्री.) (१) कंबर; कमर. (२) म्यान.

मियानः (میانہ) पु. (फ़ा.) (१) पालखी; मेणा. (२) मध्यभाग; केंद्र. (वि.) मधला; मध्यम आकाराचा; माध्यमिक. **–क़द** (قد –) वि. (फ़ा.+'अ.) मध्यम उंचीचा. **–रवी** (روی –) स्त्री. (फ़ा.) मध्यम मार्गाने जाणे; सुवर्णमध्य.

मिर'अत (مرأت) पु. ('अ.) आरसा; दर्पण.

मिरज़'ई (مرزئی) स्त्री. (हिं.) (१) लांब व ढिल्या बाह्यांचा कमरेपर्यंतचा डगला. (२) अर्ध्या बाह्यांचा सदरा. (३) बंडी.

मिराक़ (مراق) पु. ('अ.) वेड; डोके फिरणे; उन्माद (रोग).

मिराक़ी (مراقی) वि. ('अ.) वेडा; डोके फिरलेला.

मिर्क़ात (مرقات) पु. ('अ.) शिडी; जिना; सोपान; पायरी.

मिर्ज़ा (مرزا) पु. [फ़ा. 'मीरजा' (میرزا) चे संक्षिप्त.] (१) सरदाराचा मुलगा. (२) बादशाही घराण्यातील लोकांची पदवी. (३) मुगल वंशातील व्यक्ती. **–'ई** (ئی –) स्त्री. ('अ.) मिर्जा ही पदवी.

मिर्फ़क़ (مرفق) स्त्री. ('अ.) कोपर.

मिर्रीख़ (مریخ) पु. ('अ.) मंगळ (ग्रह).

मिर्वहः (مروحہ) पु. ('अ.) पंखा; व्यजन.

मिर्सद (مرصاد) पु. ('अ.) राजमार्ग; रुंद सडक.

मिल्क (ملک); **मिल्कत** (ملکت) स्त्री. ('अ.) (१) जमिनीची मालकी; जमीनदारी; जहागीर; मालकीची मालमत्ता. (२) मालकी हक्क. (३) सन्मार्ग.

मिल्कियत (ملکیت) स्त्री. ('अ.) (१) मालकी; स्वामित्व. (२) संपत्ती; मालमत्ता.

मिल्की (ملکی) वि. ('अ.) जमीनदारी संबंधीचा; मालकीचा. (पु.) जमीनदार.

मिल्लत (ملت) स्त्री. ('अ.) (१) धर्म. (२) पंथ; संप्रदाय; जमात. (३) राष्ट्र.

मिल्ली (ملی); **मिल्लियः** (ملیہ) वि. ('अ.) (१) पंथीय; सांप्रदायिक; धार्मिक. (२) राष्ट्रीय.

मिल्ह (ملح) पु. ('अ.) मीठ; लवण.

मिश्ग़ाँ (مژگاں) स्त्री. [फ़ा. 'मिश्ह' (مژہ) चे अनेक.] डोळ्यांच्या पापण्या.

मिश्ह (مژہ) स्त्री. (फ़ा.) डोळ्याची पापणी.

मिश्क (مشک) पु. (फ़ा.) कस्तुरी; मृग-नाभी.

मिश्कॉत (مشکوٰۃ) स्त्री. ('अ.) कंदील किंवा दिवा ठेवण्याचा कोनाडा अथवा भितीत मारलेली फळी.

मिश्त (مشط) स्त्री. ('अ.) फणी; कंगवा.

मिस (مس) पु. (फ़ा.) तांबा; ताम्र. **–गर** (گر –) वि. (फ़ा.) तांबट.

मिसाल (مثال) स्त्री. ('अ.) (१) उदाहरण. (२) उपमा; तुलना. (३) म्हण. (४) चित्र; तसबीर. (५) आदेशपत्र; परवाना. (६) आदर्श; नमुना.

मिसालन् (مثالاً) अव्य. ('अ.) उदाहरणार्थ.

मिसाली (مثالی) वि. ('अ.) आदर्श; नमुन्याचा.

मिसी (مسی) वि. (फ़ा.) तांब्याचा. (स्त्री.) मिश्री (दंतमंजन).

मिस्क (مسک) स्त्री. ('अ.) कस्तुरी.

मिस्क़ल (مصقل); **मिस्क़लः** (مصقلہ) पु. ('अ.) तलवार वगैरे चमकदार बनविण्याचे यंत्र.

मिस्क़ाल (مثقال) पु. ('अ.) साडेचार माशांचे वजन.

मिस्की (مسکیں); **मिस्किन** (مسکین) वि. ('अ.) (१) दीन; असहाय. (२) दरिद्री. (३) विनम्र. (४) साधा; भोळा.

मिस्कीनी (مسکینی) स्त्री. ('अ.) (१) दीनता. (२) दारिद्र्य.

मिस्त़बः (مصطبہ) वि. ('अ.) मदिरालय; दारूचा गुत्ता.

मिस्त़र (مسطر) पु. (अ.) कागदावर ओळी आखण्याचे उपकरण.

मिस्दाक़ (مصداق) वि. ('अ.) (१) लागू पडणारा; लागू होणारा. (२) साक्षीदार. (३) प्रमाण; पुरावा.

मिस्बाह़ (مصباح) पु. ('अ.) दिवा; दीप.

मिस्मार (مسمار) वि. ('अ.) उध्वस्त; जमीनदोस्त.

मिस्र (مصر) पु. ('अ.) ईजिप्त.

मिस्र'अ (مصرع) पु. ('अ.) कवितेतील एक चरण; शेराचा अर्धा भाग.

मिस्र'अ-ए-त़रह़ (مصرع طرح) पु. ('अ.) कवी संमेलनासाठी कवींनी लिहून आणावयाच्या कवितांसाठी नमुन्यादाखल आधी दिला जाणारा एक चरण (समस्यापूर्तीप्रमाणे).

मिस्री (مصری) पु. ('अ.) ईजिप्तचा रहिवासी. (स्त्री.) (१) ईजिप्तची भाषा. (२) खडीसाखर.

मिस्ल (مثل) वि. ('अ.) सारखा; समान. (अव्य.) प्रमाणे; अनुसार. (स्त्री.) (१) समानता; सारखेपणा. (२) खटला, दावा इत्यादींचे कागदपत्र; फाईल.

मिस्वाक (مسواک) स्त्री. ('अ.) (१) दातण; दात घासण्याची काडी. (२) दंतधावन.

मिस्सी (مسی) स्त्री. (फ़ा.) एक प्रकारचे काळे दंतमंजन. (हे सौंदर्यवर्धक समजले जाते व फक्त स्त्रियाच ते वापरतात).

मिह (مہ) वि. (फ़ा.) मोठा; श्रेष्ठ; महान; थोर. **–तर** (تر –) वि. (फ़ा.) (१) अधिक मोठा; श्रेष्ठ. (२) सरदार. (३) भंगी. **–तरी** (تری –) स्त्री. (फ़ा.) (१) श्रेष्ठत्व. (२) अध्यक्षता; नेतृत्व.

मिह्र (مہر) स्त्री. (फ़ा.) (१) सूर्य. (२) प्रेम; ममता. (३) कृपा; दया. **–बान** (بان –) वि. (फ़ा.) (१) दयाळू; कृपावंत. (२) मित्र. **–बानी** (بانی –) स्त्री. (फ़ा.) दया; कृपा; अनुग्रह.

मिहार (مہار) स्त्री. ('अ.) उंटाची वेसण.

मी'आद (میعاد) स्त्री. ('अ.) (१) समय; काळ. (२) अवधी; मुदत. (३) वायदा; करार. (४) निश्चित काळ; ठरलेली वेळ..

मी'आदी (میعادی) वि. ('अ.) मुदतीचा.

मीकलः (میکلہ) स्त्री. ('अ.) हाडी; तपेले.

मीज़नः (میذنہ) पु. ('अ.) मशिदीतील बांग देण्याचे स्थान.

मीज़ान (میزان) स्त्री. ('अ.) (१) बेरीज. (२) तराजू. (३) तूळ राशी.

मीज़ानियः (میزانیہ) पु. ('अ.) अंदाजपत्रक; बजेट.

मीना (مینا) पु. (फ़ा.) (१) मद्याची सुरई; मदिरेचे मोठे काचेचे भांडे. (२) काचेचा मुलामा; मिना; सोन्याचांदीच्या वस्तूंवर बसविण्यात येणाऱ्या रंगीत दगडाचा पातळ रांधा. **–'ई** (ئی –) वि. (फ़ा.) (१) मद्याशी संबंधित. (२) शाहमीना यांचा वंशज. **–कार** (کار –) वि. (फ़ा.) मिन्याचे, जडावाचे काम करणारा; मिनेगार. **–कारी** (کاری –) स्त्री. (फ़ा.) मिन्याचे काम; जडावाचे काम. **–फ़ाम** (فام –) वि. (फ़ा.) निळघा रंगाचा. **–बाज़ार** (بازار –) पु. (फ़ा.) अकबराने चालू केलेला एक विशिष्ट बाजार. या बाजारात फक्त स्त्रियाच खरेदी-विक्री करीत असत.

मीनार (مینار) पु. ('अ.) (१) मनोरा. (२) उंच स्तंभ. (३) दीपमाळ; दीपस्तंभ. (४) मैलाचे दगड.

मीनू (مینو) पु. (फ़ा.) (१) स्वर्ग. (२) मिना. (वि.) निळघा रंगाचा.

मीम (میم) पु. ('अ.) उर्दूतील एक अक्षर; म (नायिकेच्या मुखाला याची उपमा देतात).

मीर (میر) पु. (फ़ा.) (१) अग्रगण्य. (२) सरदार; नायक. (३) अध्यक्ष. **–ए-'अर्ज़** (عرض –) पु. (फ़ा. + 'अ.) लोकांचे अर्ज बादशहाला सादर करणारा. **–ए-आख़ुर** (آخور –) पु. (फ़ा.) अश्वशाळेचा निरीक्षक. **–ए-आतश** (آتش –) पु. (फ़ा.) तोफखान्यावरील अधिकारी. **–ए-आब** (آب –) पु. (फ़ा.) आरमाराचा सेनापती. **–ए-'इमारत** (عمارت –) पु. (फ़ा. + 'अ.) सरकारी इमारतींची देखरेख करणारा. **–ज़ा** (زا –) पु. (फ़ा.) बादशाही घराण्यांतील लोकांची पदवी; मुगल वंशातील व्यक्ती. **–ज़ा'ई** (زائی –) स्त्री. (फ़ा.) सरदारकी. **–ज़ादः** (زادہ –)

पु. (फ़ा.) राजपुत्र. **–ज़ामनिश** (زامنش –) वि. (फ़ा.) भला माणूस; सज्जन. **–ए-तूज़ुक** (توزک –) पु. (फ़ा.+तु.) सेनापती; सैन्याची व्यवस्था पाहाणारा. **–फ़र्श** (فرش –) पु. (फ़ा.) (१) बैठकीच्या चारी कोपऱ्यांवर दाबासाठी ठेवण्यात येणारे दगड किंवा वजनदार वस्तू. (२) आपल्या जागेवरून न हालणारी व्यक्ती. **–बख़्शी** (بخشی –) पु. (फ़ा.) पगारवाटप करणारा अधिकारी. **–ए-बह्र** (بحر –) पु. (फ़ा.+'अ.) आरमाराचा सेनापती. **–ए-मजलिस** (مجلس –) पु. (फ़ा.+'अ.) सभापती; अध्यक्ष. **–ए-मत्बख़** (مطبخ –) पु. (फ़ा.+'अ.) सरकारी मुदपाकखान्यावरील अधिकारी. **–ए-मुंशी** (منشی –) पु. (फ़ा.+'अ.) हेडक्लार्क; शिरस्तेदार. **–ए-मैदाँ** (میداں –) पु. (फ़ा.) योद्धा; वीर. **–ए-शबगीर** (شب گیر –) पु. (फ़ा.) शहर कोतवाल; रात्री पहारा करणारा. [अनेक 'मीरां' (میراں)पु. (फ़ा.) मोठे लोक].

मीरास़ (میراث) स्त्री. ('अ.) (१) वारसाहक्काने मिळालेली मालमत्ता, जमीनजुमला वगैरे. (२) इनाम जमीन.

मीरासी (میراثی) पु. ('अ.) गवयाचा पेशा करणारी एक मुस्लिम जमात.

मीरी (میری) स्त्री. (फ़ा.) अमीरी; श्रीमंती. (वि.) सर्वप्रथम.

मील (میل) पु. ('अ.) (१) सुरमा घालण्याची काडी; अंजन-शलाका. (२) मैल. (३) मैलाचा दगड.

मीलाद (میلاد) पु. ('अ.) (१) जन्मकाळ. (२) हजरत मुहम्मद साहेबांच्या जयंतीची सभा. **–ख़्वाँ** (خواں –) वि. ('अ. +फ़ा.) मीलाद-कथेचे वाचन करणारा; हजरत मुहम्मद साहेबांचे गुणगान करणारा.

मीसाक़ (میثاق) पु. ('अ.) (१) प्रतिज्ञा. (२) वायदा; वचन.

मुंजज़िब (منجذب) वि. ('अ.) मुरणारा; शोषला जाणारा; तल्लीन होणारा.

मुंज़जिर (منزجر) वि. ('अ.) दूर राहाणारा.

मुंजमिद (منجمد) वि. ('अ.) गोठलेला; घट्ट झालेला.

मुंजर (منجر) वि. ('अ.) परिवर्तित; ओढला गेलेला.

मुंज़ल (منزل) वि. ('अ.) खाली उतरणारा; उतरता.

मुंजली (منجلی) वि. ('अ.) (१) प्रकाशमान; उज्वल; स्पष्ट. (२) हद्दपार होणारा.

मुंज़वी (منزوی) वि. ('अ.) संसारातून विरक्त होऊन एकांतात राहाणारा.

मुंजिद (منجد) वि. ('अ.) सहाय्यक; मदतगार.

मुंज़िर (منزر) वि. ('अ.) भिवविणारा.

मुंज़िल (منزل) वि. ('अ.) खाली उतरणारा; वीर्यपात करणारा.

मुंजिस (منجس) वि. ('अ.) अपवित्र करणारा.

मुंजी (منجی) वि. ('अ.) मुक्ती देणारा.

मुंतक़िम (منتقم) वि. ('अ.) (१) पापाबद्दल अद्दल घडविणारा; ईश्वर. (२) सूड घेणारा.

मुंतक़िल (منتقل) वि. ('अ.) जागा बदलणारा; एका जागेहून दुसऱ्या जागी गेलेला, नेलेला; स्थानांतरित.

मुंतख़ब (منتخب) वि. ('अ.) (१) निवडलेला; निवडक; निवडून आलेला. (२) संकलित केलेला.

मुंतख़िबात (منتخبات) पु. ('अ.) निवडक गद्यपद्य वेच्यांचा संग्रह.

मुंतज़'अ (منتزع) वि. ('अ.) अस्ताव्यस्त होणारा; उन्मळणारा.

मुंतज़र (منتظر) वि. ('अ.) ज्याची प्रतीक्षा केली जात आहे असा.

मुंतज़िम (منتظم) वि. ('अ.) व्यवस्थापक; मॅनेजर. [स्त्री. 'मुंतज़िमः' (منتظمہ)].

मुंतजिम (منتجم) वि. ('अ.) प्रकाशमान; दीप्त.

मुंतज़िर (منتظر) वि. ('अ.) प्रतीक्षा करणारा.

मुंतफ़'अ (منتفع) वि. ('अ.) फायदा घेणारा; लाभान्वित.

मुंतफ़ी (منتفی) वि. ('अ.) नष्ट होणारा.

मुंत़फ़ी (منطفی) वि.('अ.) विझणारा; विझत असलेला.

मुंत़ब'अ (منطبع) वि. ('अ.) छापला जाणारा; मुद्रित होणारा.

मुंत़बिक़ (منطبق) वि. ('अ.) लागू होणारा.

मुंतशिर (منتشر) वि. ('अ.) (१) विसकटलेला; अस्ताव्यस्त. (२) उद्विग्न.

मुंतसिब (منتسب) वि. ('अ.) संबद्ध; संबंधित.

मुंतहा (منتہا) स्त्री. ('अ.) पराकाष्ठा; अंतिम सीमा; हद्द.

मुंतही (منتہی) वि. ('अ.) (१) पराकाष्ठेचा; शेवटपर्यंत जाऊन पोचणारा. (२) एखाद्या विद्येत पारंगत होणारा; स्नातक; दक्ष; ज्ञाता.

मुंतिज (منتج) वि. ('अ.) (१) फळ देणारा. (२) परिणाम देणारा.

मुंतिन (منتن) वि. ('अ.) दुर्गंधयुक्त.

मुंदरिज (مندرج) वि.('अ.) नमूद केलेला; लिहिलेला; प्रविष्ट; अंकित.

मुंदरिज-ए-ज़ैल (مندرج ذیل) वि. ('अ.) निम्नलिखित; खाली लिहिल्याप्रमाणे.

मुंदरिस (مندرس) वि. ('अ.) फाटका-तुटका; जीर्ण-शीर्ण.

मु'अंबर (معنبر) वि. ('अ.) मु'अंबरी (معنبری) वि. ('अ.+फ़ा.) अंबराने सुगंधित; अंबरासारखा सुवास असलेला.

मु'अक़्क़द (معقد) वि. ('अ.) गाठाळ; गाठ असलेला; संदिग्ध.

मु'अक़्क़र (مؤقر) वि. ('अ.) (१) प्रतिष्ठित; पूज्य. (२) जबाबदार.

मु'अक़्क़िद (معقد) वि. ('अ.) गाठ मारणारा.

मु'अज्जज़ (معزز) वि. ('अ.) आदरणीय; पूज्य; प्रतिष्ठित.

मु'अज़्ज़म (معظم) वि. ('अ.) प्रतिष्ठित; श्रेष्ठ; थोर.

मु'अज़्ज़मः (معظمہ) वि. स्त्री. ('अ.) (१) पूज्य स्त्री. (२) पूज्य स्थान. [उदा. 'मक्कः-ए-मु'अज़्ज़मः' (مکہ معظمہ) पूज्य मक्का].

मु'अज्जल (معجل) वि. ('अ.) (१) शीघ्रता केलेला; जलदी केलेला. (२) लग्नाच्या वेळीच वधूला दिला जाणारा हुंडा.

मु'अज़्ज़िन (مؤذن) पु. ('अ.) मशिदीतून लोकांना नमाजासाठी पुकारणारा; बांग देणारा.

मु'अज़्ज़िब (معذب) वि. ('अ.) (१) भयंकर यातना देणारा. (२) पापाबद्दल शिक्षा देणारा.

मु'अज्जिल (معجل) वि. ('अ.) घाई करणारा; उतावळा.

मु'अत्तर (معطر) वि. ('अ.) सुगंधित; सुवासिक.

मु'अत्तल (معطل) वि. ('अ.) काही मुदतीपुरता कामावरून दूर केलेला; सस्पेंड केलेला.

मु'अत्तिश (معطش) वि. ('अ.) जी खाल्ली असता तहान लागते अशी वस्तू.

मु'अद्दद (معدد) वि. ('अ.) मोजलेला; गणती केलेला.

मु'अद्दब (مودب) वि. ('अ.) अदबशीर; सुसभ्य; सुसंस्कृत.

मुअद्दॉ (مودی) वि. ('अ.) परतफेड केलेला; देऊन टाकलेला.

मु'अद्दिल (معدل) वि. ('अ.) दोन समान भाग करणारा.

मु'अद्दिल-उन्-नहार (معدل النہار) पु. ('अ.) विषुववृत्त.

मु'अद्दी (مؤدی) वि. ('अ.) पोचविणारा; धाडणारा; प्रेषक.

मु'अन्नस (مؤنث) पु. ('अ.) स्त्रीलिंग.

मु'अन्वन (معنون) वि. ('अ.) एखाद्याच्या नावाने समर्पित केलेला ग्रंथ.

मु'अम्मर (معمر) वि. ('अ.) वयोवृद्ध.

मु'अम्मा (معما) पु. ('अ.) कोडे; उखाणा; गूढ; समस्या; कूट प्रश्न. (वि.) आंधळा.

मु'अय्यन (معین) वि. ('अ.) निश्चित ठरलेला; मुक्रर; नियत.

मु'अरिब (معرب) वि. ('अ.) (१) वर्णन करणारा. (२) अक्षराला मात्रा देणारा.

मु'अर्रब (معرب) वि. ('अ.) इतर भाषांतील अरबी बनविलेला (शब्द); अरबीकृत.

मु'अर्रा (معرا) वि. ('अ.) (१) विहीन; रिक्त; नग्न; रिकामा. (२) साधा; अवडंबररहित. (३) टीका नसलेला; केवळ मूल (ग्रंथ).

मु'अर्रिख (مؤرخ) वि. ('अ.) इतिहासकार.

मु'अर्रिफ़ (معرف) वि. ('अ.) प्रशंसक; स्तुती करणारा.

मु'अल्लक़ (معلق) वि. ('अ.) (१) अधांतरी लोंबकळणारा. (२) टळलेला (मृत्यू).

मु'अल्लक़ः (معلقہ) वि. ('अ.) जिला तिचा पती नांदवितही नाही व घटस्फोटही देत नाही अशी स्त्री.

मु'अल्लफ़ (مؤلف) वि. ('अ.) संपादित; रचित.

मु'अल्ला (معلی) वि. ('अ.) (१) उच्च; श्रेष्ठ; उत्तुंग; महान. (२) प्रतिष्ठित.

मु'अल्लिफ़ (مؤلف) पु. ('अ.) संपादक; संग्राहक.

मु'अल्लिम (معلم) पु. ('अ.) शिक्षक; अध्यापक.

मु'अल्लिम-उल्-मलकूत (معلم الملکوت) पु. ('अ.) देवदूतांना शिकविणारा; सैतान.

मु'अव्वज (معوج) वि. ('अ.) वाकडा; वक्र.

मु'अस्सिर (مؤثر) वि. ('अ.) गुणकारक; परिणामकारक; प्रभावशाली.

मु'आक़िब (معاقب) वि. ('अ.) पीडा, यातना, कष्ट देणारा.

मुआख़ज़ः (مواخذہ) पु. ('अ.) (१) पकड. (२) प्रतिकार. (३) जबाबदारी. (४) अद्दल.

मुआखात (مواخات) स्त्री. ('अ.) बंधुत्व.

मुआज़नः (موازنہ) पु. ('अ.) तुलना; समता; बरोबरी.

मु'आतिफ़त (معاطفت) स्त्री. ('अ.) कृपा; दया; अनुग्रह.

मु'आतिब (معاتب) वि. ('अ.) क्रुद्ध; रागीट.

मु'आदलत (معادلت) स्त्री. ('अ.) न्याय; नीती.

मु'आदा (معادا) पु. मु'आदात (معادات) स्त्री. ('अ.) यादवी; आपसातील वैर.

मु'आदिद (معاضد) वि. ('अ.) सहाय्यक; समर्थक.

मु'आदिल (معادل) ('अ.) न्यायी; न्यायाधीश.

मु'आनक़ः (معانقہ) पु. ('अ.) आलिंगन; मिठी मारणे.

मु'आनदत (معاندت) स्त्री. ('अ.) परस्पर द्वेष; वैर.

मु'आनसत (موانست) स्त्री. ('अ.) परस्पर मैत्री; दोस्ती.

मु'आफ़ (معاف) वि. ('अ.) माफ; क्षमा केलेला.

मुआफ़क़त (موافقت) स्त्री. ('अ.) (१) अनुकूलता. (२) समानता. (३) मैत्री.

मुआफ़िक़ (موافق) वि. ('अ.) (१) अनुकूल; अनुसार. (२) समान; सदृश. (३) मित्र.

मु'आफ़ी (معافی) स्त्री. ('अ.) माफी; क्षमा. **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) ज्याला इनाम (शेतसारा नसलेली) जमीन मिळलेली आहे असा.

मु'आमरत (معامرت) स्त्री. ('अ.) विचारविनिमय; सल्लामसलत.

मु'आमलः (معاملہ) पु. ('अ.) (१) सहकार्याने एखादे काम करणे; व्यवसाय; देणे-घेणे. (२) घटना; भानगड; मामला. (३) तह; तडजोड. (४) भांडण; दावा; फिर्याद. (५) विषय; गोष्ट; संबंध. (६) आचरण; वागणूक. [अनेक 'मु'आमलात' (معاملات)].

मु'आयनः (معاینہ) पु. ('अ.) (१) तपासणी; पर्यवेक्षण. (२) निरीक्षण; तपास.

मु'आरद्‌ः (معارضہ) पु. ('अ.) (१) भांडण; झगडा; तंटा. (२) वादविवाद; चर्चा.

मु'आरिद्‌ (معارض) वि. ('अ.) (१) भांडण करणारा; भांडखोर. (२) विरोधी. (३) वादविवाद करणारा.

मु'आलजः (معالجہ) पु. ('अ.) (१) उपचार; इलाज. (२) उपाय. [अनेक 'मु'आलाजत' (معالجات) पु. ('अ.) उपचार संग्रह; उपचार ग्रंथ].

मुआलफ़त (موالفت) स्त्री. ('अ.) मैत्री; प्रीती.

मुआला (موالا); **मुआलात** (موالات) स्त्री. ('अ.) परस्पर साह्य; सहकार्य; मैत्री.

मु'आलिज (معالج) पु. ('अ.) इलाज, उपचार करणारा; वैद्य.

मु'आवदत (معاودت) स्त्री. ('अ.) परत येणे; प्रत्यागमन.

मु'आवदः (معاوضہ) पु. ('अ.) (१) मोबदला; मूल्य. (२) नुकसानभरपाई.

मु'आवनत (معاونت) स्त्री. ('अ.) परस्पर साह्य; मदत.

मु'आविन (معاون) वि. ('अ.) (१) सहाय्यक; मदतगार. (२) मोठ्या नदीला जाऊन मिळणारी नदी; उपनदी. (३) समर्थक; पाठीराखा.

मु'आशरत (معاشرت) स्त्री. **मु'आशरः** (معاشرہ) पु. ('अ.) (१) सहजीवन; समाजजीवन. (२) सभ्यता; नागरिकता; संस्कृती.

मु'आशरती (معاشرتی) वि. ('अ.) सामाजिक; सांस्कृतिक.

मु'आशिर (معاشر) वि. ('अ.) (१) नागरिक. (२) मित्र; साथी.

मु'आसरत (معاصرت) स्त्री. ('अ.) समकालीनत्व; समकालीन असणे.

मुआसा (مواسا) पु. **मुआसात** (مواسات) स्त्री. ('अ.) (१) साह्य; मदत. (२) सहानुभूती. (३) शील.

मु'आसिर (معاصر) वि. ('अ.) समकालीन.

मु'आहदत (معاہدت) स्त्री. **मु'आहदः** (معاہدہ) पु. ('अ.) (१) करार; ठराव; अॅग्रीमेंट; कॉंट्रॅक्ट. (२) आणभाक; परस्पर प्रतिज्ञा.

मु'आहिद (معاہد) वि. ('अ.) प्रतिज्ञा करणारा; करार करणारा.

मु'अिज़्ज़ (معز) वि. ('अ.) (१) सन्मान; प्रतिष्ठा देणारा. (२) परमेश्वर.

मु'अिद (معد) वि. ('अ.) कटिबद्ध; तयार करणारा.

मु'अीद (معید) वि. ('अ.) एखादे काम वारंवार करणारा.

मु'ईन (معین) वि. ('अ.) (१) सहाय्यक; मदतगार. (२) समर्थक; पाठीराखा.

मु'अैयन (معین); **मु'अैयनः** (معینہ) वि. ('अ.) निश्चित; ठरलेला; मुक्रर.

मुअैयिद (موید) वि. ('अ.) समर्थक; पाठीराखा.

मुकज़्ज़िब (مکذب) वि. ('अ.) एखाद्याला खोटे ठरविणारा; एखादी गोष्ट खोटी असल्याचे सिद्ध करणारा.

मुक़त्त'अ (مقطع) वि. ('अ.) (१) निवडलेला; काटछाट केलेला. (२) सुसंस्कृत; सुशील.

मुक़त्तर (مقطر) वि. ('अ.) (१) थेंब थेंब करून गाळलेला. (२) वरचे स्वच्छ, नितळ पाणी.

मुक़द्दम (مقدم) वि. ('अ.) मुख्य; पुढारी, पुढे असणारा. (पु.) गावाचा प्रमुख.

मुक़द्दमः (مقدمہ) पु. ('अ.) (१) खटला; दावा. (२) ग्रंथाची प्रस्तावना; प्राक्कथन. (३) विषय. (४) कार्य. **–बाज़** (باز –) वि. ('अ.+फ़ा.) मुकदमेबाज; प्रत्येक गोष्टीत कोर्टाकडे धावणारा.

मुक़द्दर (مقدر) पु. ('अ.) (१) भाग्य; नशीब; प्रारब्ध. (२) अध्याहृत.

मुकद्दर (مکدر) वि. ('अ.) (१) मळकट; घाणेरडा. (२) नाखूष; नाराज.

मुक़द्दस (مقدس) वि. ('अ.) पवित्र; पुनीत; थोर.

मुक़ाम्रितः (مقننہ) स्त्री. ('अ.) विधानसभा; लेजिस्लेटिव्ह असेंब्ली.

मुक़न्निन (مقنن) वि. ('अ.) (१) कायदा जाणणारा; वकील. (२) कायदा बनविणारा.

मुक़फ़्फ़ल (مقفل) वि. ('अ.) कुलूप लावलेला.

मुक़फ़्फ़ा (مقفیٰ) वि. ('अ.) अनुप्रासयुक्त गद्य.

मुकब्बर (مکبر) पु. ('अ.) मशिदीमधील एक उच्च स्थान. येथे उभा राहून एक गृहस्थ नमाजाच्या वेळी 'तक्बीर' (تکبیر) 'अल्लहो अकबर' (اللہ اکبر) म्हणतो. हे स्थान फक्त मोठ्या मशिदींतून असते.

मुकम्मल (مکمل) वि. ('अ.) (१) संपूर्ण; परिपूर्ण. (२) समाप्त. (३) सर्वांग परिपूर्ण.

मुकम्मिल (مکمل) वि. ('अ.) परिपूर्ती करणारा; समाप्त करणारा.

मुकय्यद (مقید) वि. ('अ.) कैदेत असलेला; कैदी.

मुक़र्रद (مقرض) वि. ('अ.) कात्रीने कापलेला; कातरलेला.

मुक़र्रब (مقرب) वि. ('अ.) जवळचा; निकटस्थ; जवळ बसणारा; घनिष्ठ मित्र.

मुकर्रम (مکرم) वि. ('अ.) प्रतिष्ठित; पूज्य.

मुकर्रर (مکرر) अव्य. ('अ.) पुनः; दुसऱ्यांदा.

मुक़र्रर (مقرر) वि. ('अ.) (१) निश्चित; नक्की. (२) नेमलेला; नियुक्त. (३) ठराविक.

मुकर्रर्रात (مکررات) पु. ('अ.) पुनरुक्ती.

मुक़र्रर: (مقرره) वि. ('अ.) (१) ठरीव. (२) निश्चित. (पु.) ठराविक वेतन.

मुक़र्रिर (مقرر) वि. ('अ.) व्याख्यान देणारा; वक्ता.

मुकल्लफ़ (مکلف) वि. ('अ.) (१) शिष्टाचारयुक्त; संकोचशील. (२) सुसज्जित; सुशोभित.

मुकल्लल (مکلل) वि. ('अ.) (१) मुकुट धारण केलेला; टोपी घातलेला. (२) चमकदार.

मुक़ल्लिद (مقلد) वि. ('अ.) (१) अनुयायी; अनुकरण करणारा; शिष्य. (२) खुदा व रसूल यांच्या व्यतिरिक्त चारी इसमांना मानणारा एक मुस्लिम संप्रदाय.

मुकल्लिफ़ (مکلف) वि. ('अ.) (१) तकलीफ देणारा; त्रासदायक. (२) आमंत्रण देणारा.

मुक़ल्लिब (مقلب) वि. ('अ.) बदलविणारा; उलटे करणारा.

मुक़व्वी (مقوی) वि. ('अ.) (१) शक्तिवर्धक; पौष्टिक. (२) कामवर्धक.

मुक़शशर (مقشر) वि. ('अ.) सोललेला; तासलेला.

मुक़स्सर (مقصر) वि. ('अ.) (१) सदोष. (२) उणा; अपुरा; कमी, लहान केलेला.

मुकस्सर (مکثر) वि. ('अ.) (१) अधिक केलेला. (२) दोन असमान संख्यांचा गुणाकार. (३) श्रीमंत.

मुकस्सर (مکسر) वि. ('अ.) तुटलेला; तुकडे केलेला.

मुकातबत (مکاتبت) स्त्री. ('अ.) आपसातील पत्र-व्यवहार.

मुक़ातलः (مقاتلہ) पु. ('अ.) एकमेकांची कत्तल करणे; युद्ध; कत्तल.

मुक़ातिल (مقاتل) वि. ('अ.) कत्तल करणारा; हिंसक.

मुक़ाति'अ (مقاطع) वि. ('अ.) (१) कापणारा; विच्छेदक. (२) ठेकेदार.

मुकाफ़ात (مکافات) स्त्री. ('अ.) पापाची शिक्षा; प्रत्युपकार.

मुक़ाबलतन् (مقابلتاً) अव्य. ('अ.) तुलनेने; पेक्षा.

मुक़ाबलः (مقابلہ) पु. ('अ.) (१) सामना; लढाई; भांडण; विरोध. (२) बरोबरी; समानता. (३) तुलना. (४) टक्कर.

मुक़ाबिल (مقابل) अव्य. ('अ.) समोर; प्रत्यक्ष. (वि.) (१) बरोबर; समान. (२) वैरी; विरोधी; विरुद्ध.

मुक़ाबः (مقابہ) पु. ('अ.) वेणीफणीची पेटी.

मुक़ाम (مقام) पु. ('अ.) (१) मुक्काम; मुक्कामाची जागा. (२) वेळ; संधी. (३) घर; निवासस्थान. (४) विश्राम; थांबणे. [अनेक 'मुक़ामात' (مقامات)].

मुक़ामी (مقامی) वि. ('अ.) स्थानिक.

मुक़ारनत (مقارنت) स्त्री. ('अ.) (१) एका जागी एकत्र होणे. (२) दोन ग्रह एका राशीत येणे.

मुक़ारबत (مقاربت) स्त्री. ('अ.) समीपता; निकटता.

मुकालमः (مکالمہ) पु. ('अ.) संवाद; संभाषण.

मुकाशफ़ः (مکاشفہ) पु. ('अ.) (१) इतरांना न दिसणारे; दिव्यदृष्टीने, आत्मशक्तीच्या द्वारे पाहाणे. (२) समोरासमोर लढाई करणे.

मुकाशहत (مکاشحت) स्त्री. ('अ.) वैर; विरोध; शत्रुत्व.

मुक़ासमत (مقاسمت) स्त्री. ('अ.) आपसात वाटणी करणे; विभाजन.

मुक़ासात (مقاسات) स्त्री. ('अ.) दुःख, कष्ट, सहन करणे.

मुक़िर (مقر) वि. ('अ.) (१) कबूल करणारा; मान्य करणारा. (२) वचन देणारा. (३) अंमलबजावणी करणारा.

मुक़िल (مقل) वि. ('अ.) (१) भीक मागणारा; भिकारी. (२) कमी करणारा.

मुक़ी (مقی) वि. ('अ.) उलटी करणारा पदार्थ; जे खाल्ले असता उलटी होते असे औषध.

मुक़ीत (مقيت) वि. ('अ.) (१) अन्नदाता; नोकरी देणारा. (२) राखणारा. (३) बलवान. (४) साक्षीदार. (५) उपस्थित; हजर.

मुकीद (مكيد) वि. ('अ.) फसव्या; लबाड.

मुक़ीम (مقيم) वि. ('अ.) मुक्काम करणारा; थोडे दिवस राहिलेला.

मुक़ैयद (مقيد) वि. ('अ.) कैद केलेला; कैदी; बंदी.

मुकोकब (مكوكب) वि. ('अ.) कलाबतूचे काम केलेला; जरीची वेलबुट्टी असलेला.

मुक़ैयश (مقيش).पु. ('अ.) (१) सोन्याचांदीच्या रुंद तारा. (२) जरीची वेलबुट्टी असलेला कपडा.

मुक्ततम (مكتتم) वि. ('अ.) गुप्त; लपलेला.

मुक़्तदब (مقتضب) वि. ('अ.) कापलेला.

मुक़्तदर (مقتدر) वि. ('अ.) अधीन; ताब्यातील.

मुक़्तदा (مقتدا) वि. ('अ.) ज्याचे अनुकरण इतर लोक करतात असा नेता; पूज्य; श्रेष्ठ.

मुक़्तदा (مقتضا) वि. ('अ.) तगादा; मागणी; आवश्यकता.

मुक़्तदिब (مقتضب) वि. ('अ.) कापणारा; तोडणारा.

मुक़्तदिर (مقتدر) वि. ('अ.) सत्ताधारी.

मुक़्तदी (مقتضى) वि. ('अ.) तगादा करणारा; मागणारा; इच्छुक.

मुक़्तदी (مقتدى) वि. ('अ.) अनुयायी; अनुकरण करणारा; शिष्य.

मुक्तनिफ़ (مكتنف) वि. ('अ.) एकांतवासी; निवृत्त.

मुक्तफ़ी (مكتفى) वि. ('अ.) पुरेसा; पुष्कळ; पर्याप्त.

मुक़्तफ़ी (مقتفى) वि. ('अ.) मागून येणारा.

मुक़्तर (مقتر) वि. ('अ.) (१) दरिद्री; कंगाल. (२) भिकारी; फकीर.

मुक्तसिब (مكتسب) वि. ('अ.) कमावणारा; मिळवता.

मुक़्तसिर (مقتصر) वि. ('अ.) कमी करणारा.

मुक्तसी (مكتسى) वि. ('अ.) (१) घोंगडी पांघरणारा. (२) कपडे घालणारा.

मुक़्तहिम (مقتحم) वि. ('अ.) (१) अत्याचारी; जुलमी. (२) विजेता.

मुक्नत (مكنت) स्त्री. ('अ.) (१) शक्ती; सामर्थ्य. (२) श्रीमंती.

मुक़्बिल (مقبل) वि. ('अ.) (१) स्वीकार, कबूल करणारा. (२) भाग्यवान; समृद्ध.

मुक़फ़्फ़ी (مكفى) वि. ('अ.) पुरेसा; पुष्कळ.

मुक़्री (مقرى) वि. ('अ.) शिकविणारा; अध्यापक.

मुख़ (مخ) पु. ('अ.) (१) मज्जा; हाडांतील गर; मेंदू. (२) सार; तत्त्व; निष्कर्ष.

मुख़त्तत़ (مخطط) वि. ('अ.) (१) रेघारेघांचा. (२) चेहऱ्यावर दाढीचे केस असलेला; नुकतीच दाढी आलेला.

मुख़द्दरः (مخدرة) स्त्री. वि. ('अ.) पडदानशीन स्त्री.

मुख़द्दिर (مخدر) वि. ('अ.) बधिर करणारे औषध.

मुख़न्नस़ (مخنث) पु. ('अ.) हिजडा; नपुसक पुरुष.

मुख़फ़्फ़फ़ (مخفف) वि. ('अ.) (१) ज्यात काही कमी केले आहे असा. (२) काही अक्षरे कमी केलेले शब्द; संक्षिप्त रूप. [उदा. 'माह' (ماه) (चंद्र) चे 'मह' (مه) हे मुख़फ़्फ़फ़ आहे].

मुख़बिर (مخبر) पु.('अ.) गुप्तपणे बातम्या देणारा; हेर.

मुख़बिरी (مخبرى) स्त्री. ('अ.) हेरगिरी; गुप्तपणे बातम्या पुरविणे.

मुख़म्मस़ (مخمس) पु. ('अ.) (१) पंचपदी; पाच चरणांची कविता. (२) पाच पैलूंची वस्तू.

मुख़य्यलः (مخيلة) वि. ('अ.) विचार, कल्पना केलेला; कल्पित. (पु.) मेंदू.

मुख़य्यिर (مخير) वि. ('अ.) मुक्तहस्त; दानशूर; उदार.

मुख़य्यिलः (مخيلة) स्त्री. ('अ.) विचारशक्ती; कल्पनाशक्ती.

मुख़र्रब (مخرب) वि. ('अ.) उध्वस्त; नष्ट.

मुख़र्रिब (مخرب) वि. ('अ.) खराब करणारा; उध्वस्त करणारा.

मुख़लिस़ (مخلص) वि. ('अ.) (१) निर्भेळ; शुद्ध. (२) एकटा; अविवाहित. (३) सच्चा.

मुख़लिसी (مخلصى) स्त्री. ('अ.) (१) निर्भेळपणा; विशुद्धता. (२) पाहा 'मख़्लिसी'.

मुख़ल्लद (مخلد) वि. ('अ.) नश्वर; नित्य; चिरंतन.

मुख़ल्ली (مخلى) वि. ('अ.) (१) रिकामा केलेला. (२) स्वच्छंद; स्वतंत्र.

मुख़ात़ (مخاط) स्त्री. ('अ.) नाक.

मुख़ात़ब (مخاطب) वि. ('अ.) संबोधित केलेला; ज्याच्याशी बोलले जाते तो.

मुख़ात़बः (مخاطبة) पु. ('अ.) (१) संबोधन. (२)संभाषण. (३) पत्रव्यवहार. [अनेक 'मुख़ात़बात' (مخاطبات)].

मुख़ात़रः (مخاطرة) पु. ('अ.) भय; धोका.

मुख़ातिब (مخاطب) वि. ('अ.) संबोधित करणारा; बोलणारा. (अव्य.) उद्देशून.

मुख़ाती (مخاطى) वि. ('अ.) (१) अपराध करणारा. (२) दूषित कफ.

मुखादि'अ (مخادع) वि. ('अ.) फसव्या; कंपटी.

मुखालत़त (مخالطت) स्त्री. ('अ.) घनिष्ठता; मैत्री.

मुखालफ़त (مخالفت) स्त्री. ('अ.) (१) विरोध. (२) शत्रुत्व; वैमनस्य.

मुखालिफ़ (مخالف) वि. पु. ('अ.) विरोधक; आक्षेपक; शत्रू. (वि.) विरुद्ध. [अनेक 'मुखालिफ़ीन' (مخالفين)].

मुखासमत (مخاصمت) स्त्री. ('अ.) (१) शत्रुत्व; द्वेष. (२) युद्ध; भांडण.

मुखासिम (مخاصم) वि. ('अ.) शत्रू; द्वेष्टा.

मुखिल (مخل) वि. ('अ.) विघ्नकर्ता; हस्तक्षेप करणारा; अडथळा आणणारा.

मुख्ततम (مختتم) वि. ('अ.) समाप्त; खतम; निर्णित.

मुख्तफ़ी (مختفی) वि. ('अ.) गुप्त; लपलेला.

मुख्तर'अ (مخترع) पु. ('अ.) शोध; नवीन शोधून काढलेली वस्तू.

मुख्तरि'अ (مخترع) वि. ('अ.) संशोधक.

मुख्तल (مختل) वि. ('अ.) (१) दूषित; विकृत. (२) अस्ताव्यस्त.

मुख्तलत़ (مختلط) वि. ('अ.) (१) प्रेमसंबंध असलेला. (२) मिसळलेला.

मुख्तलिफ़ (مختلف) वि. ('अ.) (१) निरनिराळा; वेगळा; विभिन्न. (२) अन्य; दुसरा.

मुख्तस़ (مختص) वि. ('अ.) खास; विशेष.

मुख्तस़र (مختصر) वि. ('अ.) (१) संक्षिप्त; सारभूत. (२) थोडा; लहान.

मुख्तस़रन् (مختصراً) वि. ('अ.) थोडक्यात; संक्षेपतः; सारांश.

मुख्तार (مختار) वि. पु. ('अ.) (१) प्रतिनिधी; एजंट; व्यवस्थापक. (२) तालुका कचेरीतील वकील. (खालच्या दर्जाचा वकील.) (३) खुद-मुखत्यार; स्वतंत्र; अधिकार मिळालेला. **–नामः** (–نامہ) पु. ('अ.) अधिकारपत्र; मुखत्यारनामा.

मुख्तार-ए-आम (مختار عام); **मुख्तार-ए-कुल** (مختار کل) पु. ('अ.) एखाद्या जहागिरीतील सर्व प्रकारची कामे चालविण्याचा अधिकार असलेला प्रतिनिधी.

मुख्तार-ए-कार (مختار کار) वि. ('अ. + फ़ा.) व्यवस्थापक;

मुख्तार-ए-ख़ास (مختار خاص) वि. ('अ.) विशिष्ट कामे सोपविलेला अधिकारी.

मुख्तारी (مختاری) स्त्री. ('अ.) मुखत्यारी; तालुका कचेरीतील वकिली. (सर्वसामान्य वकिलीपेक्षा ही कमी दर्जाची समजली जाते).

मुख्ताल (مختال) वि. ('अ.) अभिमानी; अहंकारी; घमेंडखोर.

मुख्त़ी (مخطی) वि. ('अ.) अपराधी; दोषी; गुन्हेगार.

मुग (مغ) पु. (फ़ा.) (१) अग्निपूजक. (२) मद्य पाजविणारा; साकी.

मुगन्नी (مغنی) पु. ('अ.) गवई; गायक. [स्त्री. 'मुगन्निय:' (مغنیہ)].

मुग़य्यर (مغیر) वि. ('अ.) परिवर्तित; बदललेला.

मुग़य्यिर (مغیر) वि. ('अ.) बदलणारा; परिवर्तन करणारा.

मुग़र्रक़ (مغرق) वि. ('अ.) (१) बुडालेला. (२) गर्क झालेला. (३) सोन्याचांदीचे पाणी दिलेला.

मुग़र्रा (مغرا) वि. ('अ.) आश्चर्यचकित; स्तब्ध; थक्क.

मुग़ल (مغل) पु. (तु.) (१) तुर्कस्तानचा रहिवासी; तुर्क. (२) तार्तर; मंगोलियाचा रहिवासी. (३) मुसलमानांतील एक जात.

मुग़लक़ (مغلق) वि. ('अ.) (१) दारे बंद असलेले घर. (२) कूट; गूढ.

मुग़लानी (مغلانی) स्त्री. ('अ.) (१) मुगल स्त्री. (२) दासी. (३) शिवणकाम करणारी स्त्री.

मुग़ल्लज़ (مغلظ) वि. ('अ.) (१) दाट; घट्ट; कठीण. (२) अपशब्द; शिवी.

मुग़ाँ (مغاں) पु. [फ़ा. 'मुग़' (مغ) चे अनेक.] (१) अग्निपूजक. (२) मदिरा पाजविणारे साकी. (३) प्रेमपात्रे.

मुग़ा'इर (مغائر) वि. ('अ.) प्रतिकूल; विरुद्ध; परका.

मुग़ादरत (مغادرت) स्त्री. ('अ.) दगाबाजी; क्रूरता.

मुग़ायरत (مغایرت) स्त्री. ('अ.) (१) परकेपणा. (२) प्रतिकूलता.

मुग़ालत़: (مغالطہ) पु. ('अ.) (१) कपट; फसवणूक. (२) भ्रम; संदेह. (३) उणीव. (४) चूक.

मुग़ील (مغیل); **मुग़ीलाँ** (مغیلاں) पु. ('अ.) बाभूळ; बाभळीचे झाड.

मुग़ीस़ (مغیث) वि. ('अ.) (१) फिर्याद करणारा; वादी. (२) न्यायाधीश.

मुग़ैर (مغیر) वि. ('अ.) लुटारू; दरवडेखोर.

मुग़्तनम (مغتنم) वि. ('अ.) (१) सर्वांत चांगला; उत्कृष्ट. (२) पाहा 'ग़नीमत'.

मुग़नी (مغنی) वि. ('अ.) समृद्धी देणारा; ईश्वर.

मुग़्बर (مغبر) वि. ('अ.) खाकी रंगाचा; मळक्या रंगाचा.

मुलिम्म (مغلم) वि. ('अ.) गुदामैथुन करणारा.

मुग्वी (مغوی) वि. ('अ.) पळवून नेणारा; अपहरण करणारा.

मुचलका (مچلکا) पु. (त.) अपराधी व्यक्तीने लिहून द्यावयाचे वचनपत्र; करारनामा; जामीनपत्र.

मुज़क्कर (مذکر) पु. ('अ.) (१) नर; पुरुष. (२) पुल्लिग. (वि.) पुल्लिगी.

मुज़ख़्ख़रफ़ (مزخرف) पु. ('अ.) (१) खरी वाटणारी खोटी गोष्ट; नकली वस्तू. (२) वाह्यात बडबड.

मुजद्दिद (مجدد) पु. ('अ.) जीर्णोद्धारक; सुधारक; नवे रूप देणारा.

मुजफ़्फ़फ़ (مجفف) वि. ('अ.) वाळविलेला; सुकविलेला.

मुज़फ़्फ़र (مظفر) वि. ('अ.) विजेता; विजयी.

मुज़बज़ब (مذبذب) वि. ('अ.) (१) अनिश्चित; संदिग्ध. (२) गोंधळलेला; घोटाळघात पडलेला.

मुज़म्मः (مزم) पु. ('अ.) (१) घोडयाच्या मागील बाजूस बांधावयाची वादी. (२) खरडपट्टी; कानपिचक्या.

मुजर्रद (مجرد) वि. ('अ.) (१) एकटा; एकाकी. (२) अविवाहित. (३) संन्यासी.

मुजर्रब (مجرب) वि. ('अ.) अजमावलेला; अनुभव घेतलेला; तपासून पाहिलेला; परीक्षित.

मुजर्रबात (مجربات) पु. ('अ.) अनुभव घेऊन पाहिलेली औषधे.

मुजल्लद (مجلد) वि. ('अ.) बांधणी केलेले (पुस्तक).

मुज़ल्लफ़ (مزلف) वि. ('अ.) केसांच्या बटी विखुरलेला; कुरळे केस असलेला.

मुजल्लॉ (مجلیٰ) वि. ('अ.) (१) चकचकीत; चमकदार. (२) प्रकाशमान.

मुजल्ली (مجلی) वि. ('अ.) प्रकाशित करणारा; चकचकीत बनविणारा.

मुजव्वज़ः (مجوزہ) वि. ('अ.) (१) नियोजित; ठरविलेला. (२) सुचविलेला; सांगितलेला. (३) संकल्पित.

मुजव्वफ़ (مجوف) वि. ('अ.) आतून पोकळ.

मुजव्विज़ (مجوز) वि. ('अ.) निर्णय करणारा; ठरविणारा.

मुजव्विज़-ए-क़ानून (مجوز قانون) पु. ('अ.) (१) कायदे बनविणारा. (२) कायदे मंडळ.

मुजस्सम (مجسم) वि. ('अ.) मूर्तिमंत; साक्षात; साकार.

मुजस्समः (مجسمہ) पु. ('अ.) (१) प्रतिमा; मूर्ती. (२) रूप; आकृती.

मुज़हब (مذهب) वि. ('अ.) सोन्याने मढविलेला; सोन्याचे पाणी दिलेला.

मुज़हिर (مظہر) वि. ('अ.) (१) जाहीर करणारा. (२) साक्षीदार (३) हेर.

मुज़ाकरः (مذاکرہ) पु. ('अ.) आपसातील चर्चा; संभाषण.

मुजाज़ (مجاز) वि. ('अ.) अधिकार प्राप्त झालेला.

मुजाबलः (مجادلہ) पु. ('अ.) (१) युद्ध; लढाई. (२) वादविवाद.

मुजादिल (مجادل) वि. ('अ.) योद्धा; लढवैया.

मुजानिस (مجانس) वि. ('अ.) समानलिंगी; एका जातीचे.

मुज़ाब (مذاب) वि. ('अ.) वितळलेला.

मुजाब (مجاب) वि. ('अ.) उत्तर दिलेला; उत्तरित.

मुजामअ'अत (مجامعت) स्त्री. ('अ.) संभोग; मैथुन.

मुजामि'अ (مجامع) वि. ('अ.) मैथुन करणारा.

मुज़ारि'अ (مزارع) वि. पु. ('अ.) शेतकरी.

मुजारियः (مجاریہ) वि. ('अ.) (१) प्रचलित; जारी असलेला. (२) नियमबद्ध.

मुजालसत (مجالست) स्त्री. ('अ.) एकत्र बसणे.

मुज़ावजत (مزاوجت) स्त्री. ('अ.) लग्न; विवाह; निका.

मुजावरत (مجاورت) स्त्री. ('अ.) शेजार; जवळ राहाणे.

मुज़ावलत (مزاولت) स्त्री. ('अ.) सराव; अभ्यास.

मुजाविर (مجاور) वि. ('अ.) शेजारी; जवळ राहाणारा. (पु.) एखाद्या दरग्याची सेवा करणारा पुजारी.

मुजाहदः (مجاهدہ) पु. ('अ.) (१) तपस्या; इंद्रियनिग्रह. (२) पराक्रम.

मुज़ाहमत (مزاحمت) स्त्री. ('अ.) हस्तक्षेप; अडकाठी.

मुज़ाहरः (مظاہرہ) पु. ('अ.) (१) निदर्शन. (२) प्रयोग; प्रात्यक्षिक.

मुजाहिद (مجاهد) वि. ('अ.) (१) धर्मासाठी लढणारा; धर्मयोद्धा. (२) विधर्मियांशी लढणारा. (३) पराक्रमी. (४) प्रयत्नशील. [अनेक 'मुजाहिदीन' (مجاهدین)].

मुज़ाहिम (مزاحم) वि. ('अ.) (१) हस्तक्षेप करणारा; अडकाठी आणणारा. (२) त्रास देणारा.

मुज़ीब (مزیب) वि. ('अ.) वितळविणारा; विरघळविणारा.

मुजीब (مجیب) वि. ('अ.) उत्तर देणारा; ऐकणारा; जबाबदार; स्वीकार करणारा; ईश्वर.

मुजीब-उद्-द'अवात (مجيب الدعوات) पु. ('अ.) प्रार्थना, मागणी मान्य करणारा ईश्वर.

मुजील (مزيل) वि. ('अ.) नष्ट करणारा; निवारक.

मुज़ैयन (مزين) वि. ('अ.) सुसज्जित; शृंगारलेला.

मुज़्ज़म्मिल (مزمل) स्त्री. ('अ.) कुराणातील एक अध्याय.

मुज्जात (مزجات) वि. ('अ.) थोडा; अल्प.

मुज्तबाँ (مجتبىٰ) वि. ('अ.) सन्मानित; प्रतिष्ठित; थोर.

मुज्तमि'अ (مجتمع) वि. ('अ.) एकत्रित; गोळा झालेला; जमलेला.

मुज्तस् (مجتث) वि. ('अ.) मुळापासून उपटून काढलेला. उन्मूलित.

मुज्तहिद (مجتهد) पु. ('अ.) (१) परिश्रम, प्रयत्न करणारा. (२) धार्मिक बाबतीत विवेकपूर्ण निर्णय करणारा; योग्य मार्ग दाखविणारा. (३) शिया संप्रदायाचा आचार्य.

मुज्द (مزد) स्त्री. (फ़ा.) पारिश्रमिक; मजुरी. **–बर** (بر –) वि. (फ़ा.) मजूर; कामगार.

मुज्दहिम (مزدحم) वि. ('अ.) गर्दी करणारा.

मुज़्निब (مذنب) वि. ('अ.) पापी; पातकी; गुन्हेगार.

मुज्मल (مجمل) वि. ('अ.) संक्षिप्त; साररूप.

मुज्मिन (مزمن) वि. ('अ.) पुष्कळ दिवसांचा; जुना; पुरातन.

मुज्रा (مجرىٰ) पु. वि. ('अ.) (१) कमी केलेला; वजा केलेला. (२) कपात; जारी केलेला; वाहविलेला. (३) प्रमाण; अभिवादन; सलाम. (४) गायिकेने (कलावंतिणीने) बसून म्हटलेले गाणे; बैठकीचे गाणे.

मुज्रा'ई (مجرائی) वि. ('अ. + फ़ा.) (१) मुजरा, सलाम करणारा. (२) मर्सिआ (शोक गीत) गाणारा. (पु.) कपात; कमी करणे.

मुज्रिम (مجرم) वि. ('अ.) अपराधी; गुन्हेगार; दोषी.

मुज्रिमानः (مجرمانہ) वि. ('अ.+फ़ा.) गुन्हेगारासारखा; अपराधपूर्ण.

मुज़्लिक़ (مزلق) वि. ('अ.) घसरविणारा; निसरडे असलेला.

मुज़्लिम (مظلم) वि. ('अ.) काळोखी; अंधकारपूर्ण.

मुतंजन (متنجن) पु. (फ़ा.) लिंबू घालून आंबटपणा आणलेला गोड पुलाव.

मुतअख़्ख़िर (متاخر) वि. ('अ.) मागून येणारा; नंतरचा.

मुतअख़्ख़िरीन (متاخرين) पु. ('अ.) नंतरच्या काळातील लोक.

मुत'अज्जिब (متعجب) वि. ('अ.) आश्चर्यचकित; थक्क.

मुत'अज़्ज़िर (متعذر) वि. ('अ.) अवघड; दुष्कर.

मुतअज़्ज़ी (متاذى) वि. ('अ.) कष्टदायक; क्लेशकारक.

मुत'अद्दिद (متعدد) वि. ('अ.) (१) पुष्कळ; अनेक. (२) काही; थोडे.

मुत'अद्दी (متعدى) वि. ('अ.) (१) आपल्या मर्यादा सोडून पुढे जाणारा. (२) सांसर्गिक (रोग). (३) सकर्मक (क्रियापद).

मुत'अन्निद (متعند) वि. ('अ.) द्वेष्टा; शत्रू; वैरी.

मुत'अफ़्फ़िन (متعفن) वि. ('अ.) दुर्गंधयुक्त; कुजलेला.

मुत'अब्बिद (متعبد) वि. ('अ.) आराधना, उपासना करणारा.

मुतअम्मिल (متامل) वि. ('अ.) गोंधळात पडलेला; घोटाळ्यात पडलेला.

मुत'अर्रिद् (متعرض) वि. ('अ.) (१) लागू होणारा. (२) पुढे येणारा; अर्ज करणारा. (३) मागणारा; याचक.

मुत'अल्लिक़ (متعلق) वि. ('अ.) (१) संबंधी; संबंधित. (२) सम्मिलित; जोडलेला. (३) नोकर. (अव्य.) विषयी; संबंधी.

मुत'अल्लिक़ीन (متعلقين) पु. ('अ.) (१) घरचे लोक; मुलेबाळे. (२) नातेवाईक.

मुत'अल्लिक़ः (متعلقہ) वि. ('अ.) संबंधित; संपर्क ठेवणारी वस्तू.

मुत'अल्लिम (متعلم) पु. ('अ.) (१) वाचक. (२) शिकणारा; विद्यार्थी.

मुत'अव्विद (متعود) वि. ('अ.) (१) व्यसनी. (२) सवय असलेला.

मुतअस्सिफ़ (متاسف) वि. ('अ.) पश्चात्तप्त; खेद करणारा.

मुत'अस्सिब (متعصب) वि. ('अ.) धार्मिक बाबतीत पक्षपात करणारा; कट्टर जातीयवादी; संकुचित जमातवादी.

मुतअस्सिर (متاثر) वि. ('अ.) प्रभावित; प्रभाव पडलेला; परिणाम झालेला.

मुत'अस्सिर (متعسر) वि. ('अ.) कठीण; दुष्कर; अवघड.

मुत'अह (متعہ) पु. ('अ.) (१) हंगामी विवाह; शिया जमातीत रूढ असलेले, विशिष्ट मुदतीपुरते केले जाणारे लग्न. (२) भाग घेणे.

मुत'अहिद (متعهد) वि. ('अ.) (१) प्रतिज्ञा करणारा. (२) परिचारक. (३) जबाबदार; ठेकेदार.

मुत'आक्विब (متعاقب) वि. ('अ.) मागे धावणारा; पाठलाग करणारा.

मुत'आरिफ़ (متعارف) वि. ('अ.) परिचित; ओळखणारा.

मुत'अैयिन (متعين) वि. ('अ.) (१) निश्चित; मुक्रर; नक्की. (२) नियुक्त.

मुतक़द्दिम (متقدم) वि. ('अ.) पूर्वीचा; आधी होऊन गेलेला.

मुतक़द्दिमीन (متقدمين) पु. ('अ.) पूर्वीचे लोक; प्राचीन माणसे.

मुतकफ़्फ़िल (متكفل) वि. ('अ.) (१) जामीनदार; जामीन. (२) पालनपोषण करणारा.

मुतकब्बिर (متكبر) वि. ('अ.) अहंकारी; घमेंडखोर.

मुतकल्लिफ़ (متكلف) वि. ('अ.) संकोच करणारा; लाजणारा.

मुतकल्लिम (متكلم) वि. ('अ.) (१) संभाषण करणारा. (२) मीमांसक. (पु.) प्रथम पुरुष (व्या.).

मुतकव्विन (متكون) वि. ('अ.) उत्पन्न होणारा; रूप धारण करणारा.

मुतकस्सिर (متكسر) वि. ('अ.) भग्न; खंडित.

मुतक़ादी (متقاضى) वि. ('अ.) तगादा करणारा; मागणारा.

मुतक़ाबिल (متقابل) अव्य. ('अ.) समोर; प्रत्यक्ष; समोरासमोर.

मुतख़य्यलः (متخيلہ) पु. ('अ.) विचार करण्याचे स्थान; मेंदू. (वि.) विचार केलेला; मनात आणलेला.

मुतख़य्यिलः (متخيلہ) स्त्री. ('अ.) विचारशक्ती; कल्पनाशक्ती.

मुतख़ल्ख़ल (متخلخل) वि. ('अ.) पोकळ.

मुतख़ल्लिक़ (متخلق) वि. ('अ.) सुशील; सुस्वभावी; सदाचारी.

मुतख़ल्लिल (متخلل) वि. ('अ.) विघ्न आणणारा; अडथळा आणणारा.

मुतख़ल्लिस् (متخلص) वि. ('अ.) टोपणनाव धारण करणारा.

मुतख़ासिम (متخاصم) वि. ('अ.) शत्रू; वैरी.

मुतग़य्यिर (متغير) वि. ('अ.) (१) परिवर्तित; बदललेला. (२) बिघडलेला; विकृत.

मुतग़ा'इर (متغائر) वि. ('अ.) (१) पृथक; वेगळा. (२) विरुद्ध; विपरीत.

मुतज़क्किरः (متذكرہ) वि. ('अ.) सांगितलेला; उल्लेखिलेला.

मुतज़ब्ज़िब (متذبذب) वि. ('अ.) दुग्ध्यात पडलेला; दोलायमान.

मुतज़ल्ज़िल (متزلزل) वि. ('अ.) थरथरणारा; कंपित होणारा.

मुतजल्ली (متجلى) वि. ('अ.) चमकणारा; प्रकाशमान.

मुतजस्सिस (متجسس) वि. ('अ.) (१) शोधणारा; संशोधक. (२) जिज्ञासू.

मुतजाविज़ (متجاوز) वि. ('अ.) उल्लंघन करणारा.

मुतदम्मिन (متضمن) वि. ('अ.) सम्मिलित; सामील; संयुक्त.

मुतदय्यिन (متدين) वि. ('अ.) (१) सत्यनिष्ठ; प्रामाणिक. (२) धर्मनिष्ठ.

मुतदाद (متضاد) वि. ('अ.) परस्पर विरुद्ध (विधान वगैरे).

मुतनफ़्फ़िर (متنفر) वि. ('अ.) (१) घृणा, तिरस्कार करणारा. (२) दूर, अलिप्त राहाणारा.

मुतनफ़्फ़िस (متنفس) वि. ('अ.) श्वासोच्छ्वास करणारा; प्राणी; मनुष्य.

मुतनब्बी (متنبى) वि. ('अ.) आपण प्रेषित (नबी) आहोत असा खोटा दावा करणारा; खोटा नबी.

मुतनब्बेह (متنبہ) वि. ('अ.) सावधान; तत्पर.

मुतनाक़िद् (متناقض) वि. ('अ.) विरोधी; प्रतिकूल; खंडन करणारा.

मुतनाक़िस् (متناقص) वि. ('अ.) सदोष; अपूर्ण.

मुतनाज़ि'अ (متنازع) वि. ('अ.) वादविवाद करणारा.

मुतनाज़ि'अफ़ीहि (متنازع فيه); **मुतनाज़ि'अः** (متنازعہ) वि. ('अ.) ज्या विषयासंबंधी भांडण आहे असा; विवादग्रस्त.

मुतनाफ़िर (متنافر) वि. ('अ.) घृणा, तिरस्कार करणारा.

मुतनासिब (متناسب) वि. ('अ.) प्रमाणबद्ध.

मुतनाही (متناهى) वि. ('अ.) अंतिम मर्यादेपर्यंत जाऊन पोचलेला; अतिरेकी; अत्यधिक.

मुतफ़क्किर (متفكر) वि. ('अ.) संचित; चिंताग्रस्त.

मुतफ़न्निन (متفنن) वि. ('अ.) अनेक कला जाणणारा.

मुतफ़न्नी (متفنى) वि. ('अ.) धूर्त; लबाड; कपटी.

मुतफ़र्रिक़ (متفرق) वि. ('अ.) (१) विविध; विभिन्न; पृथक. (२) फुटकळ; किरकोळ. (३) विसकटलेला; अस्ताव्यस्त. [अनेक 'मुतफ़र्रिक़ात' (متفرقات)].

मुतफ़र्रिद (متفرد) वि. ('अ.) एकटा; एकाकी.

मुतफ़ा'इल (متفائل) वि. ('अ.) शकुन पाहाणारा.

मुतबन्नॉ (متبنى) पु. ('अ.) दत्तकपुत्र; दत्तक घेतलेला.

मुतबर्रिक (متبرک) वि. ('अ.) पवित्र; पुनीत; प्रतिष्ठित.

मुतबस्सिम (متبسم) वि. ('अ.) (१) स्मित करणारा; हसतमुख. (२) उमललेला.

मुतबह्हिर (متبحر) वि. ('अ.) विद्यासागर; प्रकांड पंडित.

मुतबा'इन (متباین) वि. ('अ.) विरुद्ध; उलट.

मुतबादिल (متبادل) वि. ('अ.) अदलाबदल होणारा.

मुतम'इन (مطمئن) वि. ('अ.) (१) संतुष्ट; तृप्त. (२) शांत. (३) सुरक्षित.

मुतमक्किन (متمکن) वि. ('अ.) थांबलेला; स्थिर.

मुतमद्दिन (متمدن) वि. ('अ.) (१) सुसंस्कृत; सभ्य. (२) शहरी; नागरिक.

मुतमन्नाँ (متمنی) वि. ('अ.) इच्छित; ज्याची अभिलाषा आहे असा.

मुतमन्नी (متمنی) वि. ('अ.) अभिलाषी; इच्छुक.

मुतमर्रिद (متمرد) वि. ('अ.) बंडखोर; अवज्ञा करणारा.

मुतमल्लिक (متملق) वि. ('अ.) खुशामतखोर; भाट.

मुतमव्विज (متموج) वि. ('अ.) उसळणारा; लाटा उठत असलेला.

मुतमव्विल (متمول) वि. ('अ.) धनाढ्य; श्रीमंत.

मुतय्यब (مطیب) वि. ('अ.) सुगंधित; सुवासिक.

मुतरक्किब (مترقب) वि. ('अ.) आशा बाळगणारा; प्रतीक्षा करणारा.

मुतरज्जिम (مترجم) वि. ('अ.) अनुवादक; भाषांतरकार.

मुतरद्दिद (متردد) वि. ('अ.) संचित; संत्रस्त.

मुतरन्निम (مترنم) वि. ('अ.) (१) गाणारा; गायक. (२) सुरेल (आवाज).

मुतरस्सिल (مترسل) वि. ('अ.) पत्र धाडणारा; प्रेषक.

मुतराक्की (مترقی) वि. ('अ.) जादूगार.

मुतरादिफ़ (مترادف) वि. ('अ.) समानार्थक; पर्यायवाची. (अव्य.) सतत; निरंतर.

मुतर्जम (مترجم); **मुतर्जमः** (مترجم) वि. ('अ.) अनुवादित.

मुतर्जिम (مترجم) वि. ('अ.) अनुवादक; भाषांतरकार.

मुतलक़्क़ी (متلقی) वि. ('अ.) भेट घेणारा; मुलाखत घेणारा.

मुतल्लक़ः (مطلقہ) वि. स्त्री. ('अ.) घटस्फोटित स्त्री; तलाक दिलेली स्त्री.

मुतलज्जिज़ (متلذذ) वि. ('अ.) स्वाद घेणारा; लज्जत घेणारा.

मुतलत्तिफ़ (متلطف) वि. ('अ.) कृपा करणारा.

मुतलव्विन (متلون) वि. ('अ.) रंग बदलणारा; अस्थिर; चंचल.

मुतलात्तिम (متلاطم) वि. ('अ.) लाटा घेणारा; उसळणारा.

मुतलाशी (متلاشی) वि. (तु.) शोधणारा; तपास करणारा; संशोधक.

मुतलाशी (متلاشی) वि. ('अ.) उध्वस्त; नष्ट.

मुतल्लक़ः (مطلقہ) वि. ('अ.) जिला तलाक (घटस्फोट) दिला गेला आहे अशी (स्त्री).

मुतल्ला (متلا) वि. ('अ.) ज्यावर सोन्याचा मुलामा देण्यात आला आहे असा.

मुतवक़्क़'अ (متوقع) वि. ('अ.) आशा बाळगणारा.

मुतवक़्क़िफ़ (متوقف) वि. ('अ.) थांबणारा; उशीर लावणारा.

मुतवक्किल (متوکل) वि. ('अ.) ईश्वरावर भरवसा ठेवणारा; समाधानी.

मुतवज्जिह (متوجہ) वि. ('अ.) ध्यान, लक्ष देणारा; प्रवृत्त; (कडे) तोंड करणारा.

मुतवत्तिन (متوطن) वि. ('अ.) निवासी; रहिवासी.

मुतवफ़्फ़ी (متوفی) वि. ('अ.) मृत; दिवंगत; स्वर्गीय; मरहूम.

मुतवर्रि'अ (متورع) वि. ('अ.) संयमी.

मुतवर्रिम (متورم) वि. ('अ.) सुजलेला.

मुतवल्लिद (متولد) वि. ('अ.) उत्पन्न होणारा; जन्मास येणारा.

मुतवल्ली (متولی) पु. ('अ.) एखादी धार्मिक संस्था, विश्वस्त निधी अथवा देवस्थान यांची व्यवस्था पाहाणारा; विश्वस्त; ट्रस्टी.

मुतवस्सित् (متوسط) वि. ('अ.) मध्यम आकाराचा; सर्वसामान्य; मधला.

मुतवस्सिल (متوسل) वि. ('अ.) (१) आश्रय शोधणारा. (२) आश्रित; अवलंबित.

मुतवाज़िन (متوازن) वि. ('अ.) समतोल; सारख्या वजनाचे.

मुतवाज़ी (متوازی) वि. ('अ.) समानांतर; समांतर.

मुतवातिर (متواتر) अव्य. ('अ.) सतत; निरंतर; अखंड.

मुतवाज़ि'अ (متواضع) वि. ('अ.) आदरसत्कार व आतिथ्य करणारा; विनम्र.

मुतवारिद (متوارد) वि. ('अ.) एकाच वेळी, एकदम येणारा.

मुतवारी (متواری) वि. ('अ.) लपणारा; गुप्त.

मुतवाली (متوالی) वि. ('अ.) वारंवार येणारा; सतत होणारा.

मुतशक्किर (متشکر) वि. ('अ.) कृतज्ञ; आभारी.

मुतशक्की (متشکی) वि. ('अ.) शंका घेणारा; साशंक.

मुतशत्तित (متشتت) वि. ('अ.) (१) अस्ताव्यस्त. (२) उद्विग्न.

मुतशद्दिद (متشدد) वि. ('अ.) अत्याचार करणारा.

मुतशाबिह (متشابہ) वि. ('अ.) समान; सदृश; तुल्य.

मुतशाबिहात (متشابہات) स्त्री. ('अ.) ज्यांचा अर्थ स्पष्ट नाही अशी कुराणातील वाक्ये; संदिग्ध सूक्ती.

मुतसद्दी (متصدی) वि. ('अ.) (१) व्यवस्थापक. (२) हिशोबनवीस. (३) कारकून. (४) गुमास्ता. (५) शिरस्तेदार.

मुतसल्ली (متسلی) वि. ('अ.) संतुष्ट; समाधानी; सांत्वन झालेला.

मुतसव्वर (متصور) वि. ('अ.) ज्याचे ध्यान केले जाते तो; काल्पनिक.

मुतसव्विर (متصور) वि. ('अ.) ध्यान, कल्पना करणारा.

मुतसा'अिद (متصاعد) वि. ('अ.) वर चढणारा.

मुतसादिम (متصادم) वि. ('अ.) आदळणारा; टक्कर होणारा.

मुतसावी (متساوی) वि. ('अ.) सम; समान; बरोबर.

मुतसावीयु'स्-साक़ैन (متساوی الساقین) पु. ('अ.) समद्विभुज त्रिकोण.

मुतहक्किक़ (متحقق) वि. ('अ.) निश्चित; नक्की; प्रमाणित.

मुतहज्जिर (متحجر) वि. ('अ.) दगड बनणारा; दगडासारखा घट्ट बनलेला (फोड, जखम वगैरे).

मुतहज़्ज़ी (متحظی) वि. ('अ.) (१) सफल; यशस्वी. (२) भाग्यवान.

मुतहम्मिल (متحمل) वि. ('अ.) सहिष्णू; सहनशील.

मुतहय्यिर (متحیر) वि. ('अ.) आश्चर्यचकित; थक्क.

मुतहर (مطہر) वि. ('अ.) पवित्र; शुद्ध.

मुतहर्रिक (متحرک) वि. ('अ.) हालचाल करणारा; गतिमान.

मुतहस्सिन (متحصن) वि. ('अ.) किल्ल्यात अडकलेला; घेरला गेलेला.

मुता'अ (مطاع) वि. ('अ.) ज्याची आज्ञा पाळली जाते असा.

मुताबिक़ (مطابق) अव्य. ('अ.) अनुसार; प्रमाणे; समान.

मुताबिक़त (مطابقت) स्त्री. ('अ.) (१) सादृश्य; समानता. (२) अनुकूलता.

मुतायबः (مطایبہ) पु. ('अ.) आपसातील हास्य-विनोद; मनोरंजन.

मुताल'अः (مطالعہ) पु. ('अ.) (१) एखाद्या गोष्टीची संपूर्ण माहिती मिळविण्यासाठी बारकाईने तिची पाहणी करणे; निरीक्षण. (२) अध्ययन; अभ्यास.

मुतालबः (مطالبہ) पु. ('अ.) (१) मागणी; तगादा. (२) हिशेबाची बाकी; येणे. (३) प्रार्थना; विनंती.

मुताव'अत (مطاوعت) स्त्री. ('अ.) आज्ञापालक; आज्ञाधारकपणा.

मुती'अ (مطیع) वि. ('अ.) (१) आज्ञाधारक. (२) अनुयायी. (३) अधीन.

मुत्तकॉ (متکیٰ) वि. ('अ.) आश्रय; आधार.

मुत्तकी (متکی) वि. ('अ.) आधार घेणारा.

मुत्तक़ी (متقی) वि. ('अ.) संयमी; इंद्रियनिग्रही; सदाचारी.

मुत्तफ़क़ (متفق); **मुत्तफ़क़ः** (متفقہ) वि. ('अ.) ज्या बाबतीत एकमत झालेले आहे असा (विषय).

मुत्तफ़िक़ (متفق) वि. ('अ.) सहमत, एकमत होणारा.

मुत्तफ़िक़-उर्-राए (متفق الرائے) वि. ('अ.) सहमत; एकमताने झालेला.

मुत्तलि'अ (مطلع) वि. ('अ.) सूचित; ज्याला सूचना दिली गेली आहे असा.

मुत्तलि'अ (مطلع) वि. ('अ.) सूचना देणारा; सूचक.

मुत्तसिल (متصل) वि. ('अ.) जवळचा; निकटस्थ. (अव्य.) (१) जवळ. (२) सतत.

मुत्तहद (متحد) वि. ('अ.) (१) संयुक्त; जोडलेला. (२) सहमत.

मुत्तहदः (متحدہ) वि. ('अ.) संयुक्त केलेला; जोडलेला.

मुत्तहफ़ (متحف) वि. ('अ.) ज्याला भेट किंवा नजराणा देण्यात आला आहे असा.

मुत्तहम (متہم) वि. ('अ.) (१) आरोपी. (२) ज्याच्यावर आळ घेतला गेला आहे असा.

मुत्तिनब (مطنب) वि. ('अ.) लांबड लावणारा; वाढविणारा; बडबडघा.

मुत्फ़ी (مطفی) वि. ('अ.) आग विझविणारा; दिवा मालवणारा.

मुत्मइन (مطمئن) वि. ('अ.) (१) संतुष्ट; समाधानी. (२) निश्चित. (३) खुशाल.

मुत्रिब (مطرب) पु. ('अ.) गायक; गवई.

मुतलक़ (مطلق) अव्य. ('अ.) (१) मुळीच; बिलकुल; यत्किंचितही. (२) अत्यंत; पूर्णपणे. (वि.) (१) स्वच्छंद; निरंकुश. (२) सामान्य.

मुतलक़-उल्-'अिनान (مطلق العنان) वि. ('अ.) स्वच्छंद; निरंकुश; बेलगामी.

मुत्लिफ़ (متلف) वि. ('अ.) नष्ट करणारा; बिघडविणारा.

मुदक्किक़ (مدقق) वि. ('अ.) निष्कारण कीस काढणारा; काथ्याकूट करणारा.

मुद्ग़ः (مضغہ) पु. ('अ.) (१) गोळा; मांसाचा गोळा. (२) घास.

मुद्तर (مضطر) वि. ('अ.) (१) बेचैन; अस्वस्थ; व्याकुळ. (२) विवश; नाइलाज झालेला.

मुद्तरिब (مضطرب) वि. ('अ.) (१) अस्वस्थ. (२) अधीर. (३) घाबरलेला.

मुद्बतः (مضبطہ) पु. ('अ.) विनंतीपत्र; स्मरणपत्र; अर्ज.

मुदब्बिर (مدبر) वि. ('अ.) (१) व्यवस्थाकुशल; निपुण. (२) हुशार; दूरदर्शी; बुद्धिमान. (३) राजनीतिज्ञ; मुत्सद्दी. (४) सल्लागार.

मुद्मर (مضمر) वि. ('अ.) गुप्त; लपलेला.

मुद्मह्लि (مضمحل) वि. ('अ.) क्लांत; श्रांत; थकलेला; उदासीन.

मुद्मिर (مضمر) वि. ('अ.) लपविणारा.

मुदम्मिग़ (مدمغ) वि. ('अ.) घमेंडखोर; अहंकारी; मग्रूर.

मुदर्रिस (مدرس) पु. वि. ('अ.) शिकविणारा; शिक्षक; अध्यापक.

मुदल्लल (مدلل) वि. ('अ.) साधार; तर्कसंगत; सप्रमाण.

मुदव्वन (مدون) वि. ('अ.) संगृहीत; संपादित; संकलित.

मुदव्वर (مدور) वि. ('अ.) गोल; वाटोळा; गोलाकार.

मुद्हिक (مضحک) वि. ('अ.) हसविणारा; विनोदी; हास्यास्पद.

मुदा'अफ़ (مضاعف) वि. ('अ.) दुप्पट; द्विगुणित.

मुदा'इक़ः (مضائقہ) पु. ('अ.) (१) हरकत. (२) हानी. (३) भीती.

मुदाख़लत (مداخلت) स्त्री. ('अ.) (१) अडथळा; हस्तक्षेप. (२) विघ्न. (३) कब्जा; तावा.

मुदाफ़ (مضاف) वि. ('अ.) (१) जोडलेला; मिळविलेला. (२) वाढविलेला.

मुदाफ़'अत (مدافعت) स्त्री. ('अ.) हल्ल्यापासून बचाव करणे; आक्रमणाला तोंड देणे; संरक्षण; निवारण.

मुदाफ़ात (مضافات) पु. ['अ. 'मुदाफ़' (مضاف) चे अनेक.] (१) वाढविलेले भाग. (२) उपनगरे.

मुदाम (مدام) अव्य. ('अ.) (१) सदैव; नित्य; निरंतर. (२) सतत. (स्त्री.) मदिरा.

मुदारा (مدارا) पु. **मुदारात** (مدارات) स्त्री. ('अ.) आदरसत्कार.

मुदारि'अ (مضارع) वि. ('अ.) (१) समान; सदृश. (२) भागीदार; सहभागी.

मुदावा (مداوا) पु. **मुदावात** (مداوات) स्त्री. ('अ.) उपचार; इलाज.

मुदाहिकः (مضاحکہ) वि. ('अ.) हास्यविनोद; थट्टामस्करी.

मुदाहिन (مداهن) वि. ('अ.) मनात एक व बाहेर एक असणारा; खुशामत्या.

मुदि'अ (مضیع) वि. ('अ.) नष्ट करणारा; विनाशक.

मुदिर (مضر) वि. ('अ.) हानिकारक; अपायकारक; वाईट.

मुदिल (مضل) वि. ('अ.) चुकीच्या मार्गाला नेणारा; पथभ्रष्ट करणारा.

मुदीर (مدیر) पु. ('अ.) संपादक.

मुदीर-ए-अ'अलॉ (مدیر اعلیٰ) पु. ('अ.) मुख्य संपादक.

मुदीर-ए-मु'आविन (مدیر معاون) पु. ('अ.) उपसंपादक.

मुदीर-ए-मस'ऊल (مدیر مسؤل) पु. ('अ.) बातम्यांचा संपादक.

मुद्द'आ (مدعا) पु. ('अ.) (१) उद्देश; हेतू. (२) अर्थ; मतलब; मुद्दा. (३) स्वार्थ. (४) तात्पर्य. (५) दावा केलेला. **-'अलैह** (-علیہ) पु. ('अ.) प्रतिवादी. **-बिहा** (-بہا) स्त्री. ('अ.) वादवस्तू; वादाचा विषय किंवा मुद्दा.

मुद्द'ई (مدعی) पु. ('अ.) (१) वादी. (२) शत्रू.

मुद्दत (مدت) स्त्री. ('अ.) (१) मुदत; अवधी. (२) समय; काळ. (३) विलंब; उशीर.

मुद्रिक (مدرک) वि. ('अ.) विवेकी; बुद्धिमान.

मुद्रिकः (مدرکہ) स्त्री. ('अ.) विवेकशक्ती.

मुन'अक़िद (منعقد) वि. ('अ.) उपस्थित होणारा; भरणारी (सभा वगैरे).

मुन'अकिस (منعکس) वि. ('अ.) प्रतिबिंबित.

मुन'अदिम (منعدم) वि. ('अ.) नष्ट होणारा; उध्वस्त.

मुन'अमी (منعمی) वि. ('अ.) इनाम देणारा; बक्षिसाचा.

मुन'अिम (منعم) वि. ('अ.) (१) इनाम देणारा; चांगल्या चांगल्या गोष्टी देणारा. (२) धनाढ्य.

मुनक़्क़श (منقش) वि. ('अ.) चित्रित; कोरलेले; नक्षीकाम केलेला.

मुनक़्क़ह (منقح) वि. ('अ.) (१) खरा; निर्भेळ; शुद्ध. (२) सुस्पष्ट.

मुनक़्क़ॉ (منقّی) वि. ('अ.) (१) ज्याचे पोट साफ केलेले आहे असा; बेदाणा; मनुका. (२) शुद्ध; निर्मळ. (३) पालनपोषण केलेला.

मुनक़्क़िद (منقد) वि. ('अ.) टीकाकार; समालोचक.

मुनक़्क़िस (منقص) वि. ('अ.) अपमान, तिरस्कार करणारा.

मुनक़्क़ी (منقی) वि. ('अ.) पोट साफ करणारा; रेचक (औषध); शुद्ध करणारा.

मुनक़्क़ेह (منقح) वि. ('अ.) समीक्षक; खऱ्याखोट्याची पारख करणारा.

मुनग़्ग़स (منغص) वि. ('अ.) (१) मलीन; मळकट. (२) दुःखी; उदासीन.

मुनज़्ज़म (منظم) वि. ('अ.) (१) क्रमबद्ध; व्यवस्थित. (२) संघटित.

मुनज़्ज़ल (منزل) वि. ('अ.) खाली उतरलेला; पतित.

मुनज़्ज़ह (منزه) वि. ('अ.) पवित्र; शुद्ध; निर्दोष.

मुनज्जिम (منجم) वि. ('अ.) ज्योतिषी.

मुनज़्ज़िम (منظم) वि. ('अ.) संघटणा उभारणारा; संघटित करणारा.

मुनब्बत (منبت) वि. ('अ.) कापडावरील किंवा लाकडावरील उठावदार वेलबुट्टी.

मुनव्वर (منور) वि. ('अ.) प्रकाशमान; उज्वल.

मुनश्शी (منشی) वि. ('अ.) मादक.

मुनाक़ज़त (مناقضت) स्त्री. **मुनाक़ज़ः** (مناقض) पु. ('अ.) (१) दुसऱ्यांच्या विधानाचे खंडन करणे. (२) भांडण; वैर.

मुनाक़बत (مناقبت) स्त्री. ('अ.) (१) अकस्मात पाहाणे. (२) पैगंबरांच्या कुटुंबियांची स्तुती.

मुनाक़शः (مناقشہ) पु. ('अ.) यादवी; कलह.

मुनाकहत (مناکحت) स्त्री. ('अ) विवाह; पाणिग्रहण.

मुनाक़िद (مناقض) वि. ('अ.) शत्रू; भांडण लावणारा.

मुनाज़'अत (منازعت) स्त्री. **मुनाज़'अः** (منازعہ) पु. ('अ.) (१) कलह; भांडण. (२) वादविवाद.

मुनाज़मः (مناظمہ) पु. ('अ.) एकमेकांना कविता ऐकविणे; ज्यात केवळ 'नज़्म' हा काव्यप्रकार ऐकविला जातो असे कवी संमेलन (मुशा'अरः).

मुनाज़रः (مناظرہ) पु. ('अ.) शास्त्रार्थ; वादविवाद.

मुनाजात (مناجات) स्त्री. ('अ.) (१) ईश्वर-प्रार्थना. (२) गाऱ्हाणे; विनंती.

मुनाज़िर (مناظر) वि. ('अ.) शास्त्रार्थ करणारा.

मुनादी (منادی) स्त्री. ('अ.) घोषणा; दवंडी. (वि.) पुकारणारा; दवंडी पिटणारा.

मुनाफ़'अत (منافعت) स्त्री. **मुनाफ़'अ** (منافع) पु. ('अ.) (१) लाभ; फायदा; प्राप्ती; मिळकत. (२) फळ; परिणाम.

मुनाफ़क़त (منافقت) स्त्री. ('अ.) मनात एक व ओठावर एक असणे.

मुनाफ़रत (منافرت) स्त्री. ('अ.) घृणा; किळस; तिरस्कार.

मुनाफ़सः (منافسہ) पु. ('अ.) (१) हेवा; ईर्ष्या. (२) बरोबरी; तुलना करणे.

मुनाफ़ात (منافات) स्त्री. ('अ.) एकमेकांस नष्ट करणे; उध्वस्त करणे.

मुनाफ़ि'अ (منافع) वि. ('अ.) लाभदायक; फायदेशीर.

मुनाफ़िक़ (منافق) स्त्री. ('अ.) (१) बाहेरून प्रेम दाखविणारा व आतून द्वेष करणारा; ढोंगी. (२) धर्मद्रोही.

मुनाफ़िर (منافر) वि. ('अ.) घृणा, तिरस्कार करणारा.

मुनाफ़ी (منافی) वि. ('अ.) विरुद्ध; उलटा; प्रतिकूल.

मुनासबत (مناسبت) स्त्री. ('अ.) (१) संबंध. (२) अनुकूलता. (३) प्रमाण. (४) औचित्य.

मुनासिब (مناسب) वि. ('अ.) (१) उचित; योग्य. (२) समतोल; प्रमाणबद्ध. (३) भरपूर; पुरेसा. (अव्य.) अनुसार; प्रमाणे.

मुनीफ़ (منیف) वि. ('अ.) (१) पवित्र. (२) श्रेष्ठ; उच्च. (३) अधिक.

मुनीब (منیب) पु. ('अ.) (१) प्रतिनिधी; एजंट; मुनीम. (२) स्वामी; मालक. (३) कूळ.

मुनीर (منیر) वि. ('अ.) उज्वल, प्रकाशमान करणारा.

मुनक़त'अ (منقطع) वि. ('अ.) खंडित; विच्छिन्न.

मुन्कदिर (منکدر) वि. ('अ.) (१) मळकट; गलिच्छ. (२) अस्पष्ट.

मुन्क़ज़ी (منقضی) वि. ('अ.) (१) निघून जाणारा; नाहीसा होणारा. (२) समाप्त.

मुन्क़न'अ (منقنع) वि. ('अ.) निस्पृह; निवृत्त; संतुष्ट.

मुन्क़बिज़ (منقبض) वि. ('अ.) अप्रसन्न; उदासीन; खिन्न.

मुन्कर (منکر) वि. ('अ.) घृणित; तिरस्कृत; निकृष्ट.

मुन्करनकीर (منکر نکیر) पु. ('अ.) थडग्यांमध्ये मृतात्म्यांची उलट तपासणी घेणारे किंवा प्रश्नोत्तरे करणारे दोन देवदूत.

मुन्क़लिब (منقلب) वि. ('अ.) उलटलेला; उपडा; अस्ताव्यस्त; परिवर्तनशील.

मुन्कशिफ़ (منکشف) वि. ('अ.) प्रकट; व्यक्त; जाहीर.

मुन्क़सिम (منقسم) वि. ('अ.) (१) विभाजित; विभक्त. (२) विभागणी होणारा.

मुन्कसिर (منکسر) वि. ('अ.) (१) भग्न; खंडित. (२) नम्र. (३) सच्छील.

मुन्क़ाद (منقاد) वि. ('अ.) आज्ञाधारक; अधीन; ताब्यातील.

मुन्किर (منکر) वि. ('अ.) नाकारणारा; नास्तिक; कृतघ्न.

मुन्क़ुल (منقل); **मुन्क़ुलः** (منقلہ) स्त्री. ('अ.) शेगडी.

मुन्ख़फ़िद् (منخفض) वि. ('अ.) खड्ड्यात पडलेला; अवनत; पतीत.

मुन्ग़मिस (منغمس) वि. ('अ.) पाण्यात बुडालेला; निमग्न.

मुन्फ़'अत (منفعت) स्त्री. ('अ.) नफा; फायदा.

मुन्फ़'अिल (منفعل) वि. ('अ.) (१) लज्जित; शरमिंदा. (२) प्रभाव ग्रहण करणारा.

मुन्फ़क (منفک) वि. ('अ.) वेगळा होणारा; सुटलेला; मुक्त.

मुन्फ़जिर (منفجر) वि. ('अ.) वाहणारा; स्रोत.

मुन्फ़तिर (منفطر) वि. ('अ.) विदीर्ण; फाटलेला.

मुन्फ़रिज (منفرج) वि. ('अ.) (१) विशाल; विस्तृत. (२) समृद्ध.

मुन्फ़रिजः (منفرجہ) वि. ('अ.) (१) रुंद; विस्तृत. (२) ९० अंशांहून अधिक मोठा कोन.

मुन्फ़रिद (منفرد) वि. ('अ.) (१) एकटा; एकाकी. (२) अद्वितीय.

मुन्फ़रिह् (منفرح) वि. ('अ.) हर्षित; आनंदित.

मुन्फ़सिख़ (منفسخ) वि. ('अ.) दूषित; विकृत.

मुन्फ़सिल (منفصل) वि. ('अ.) (१) वेगळा; पृथक. (२) निर्णित.

मुन्फ़सिलः (منفصلہ) वि. ('अ.) निर्णय; निवाडा केला गेलेला.

मुन्यत (منیت) स्त्री. ('अ.) उद्देश; हेतू.

मुन्श'आत (منشعات) पु. ('अ.) पत्रसंग्रह; लेखसंग्रह.

मुन्श'अिब (منشعب) वि. ('अ.) शाखांत विभागलेला; विसकटलेला.

मुन्शक़ (منشق) वि. ('अ.) विदीर्ण; फाटलेला.

मुन्शरेह् (منشرح) वि. ('अ.) उघडणारा; उघडलेला.

मुन्शी (منشی) पु. ('अ.) (१) गद्यलेखक; साहित्यिक. (२) कारकून. (३) वकिलाचा कारकून. (४) कचेरीत अर्ज लिहिणारा. **–गरी** (گری –) स्त्री. ('अ.+फ़ा.) लिहिण्याचे काम; व्यवसाय.

मुन्शी-ए-फ़लक (منشئی فلک) पु. ('अ.) बुध (ग्रह).

मुन्सद (منسد) वि. ('अ.) थांबलेला; अवरुद्ध.

मुन्सबिग़ (منصبغ) वि. ('अ.) रंगलेला.

मुन्सरिफ़ (منصرف) वि. ('अ.) एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जाणारा; परिवर्तित होणारा. (व्या.) अनन्वय.

मुन्सरिम (منصرم) पु. ('अ.) (१) व्यवस्थापक; संचालक. (२) न्यायालयातील अथवा कचेरीतील मुख्य कारकून. (३) प्रतिनिधी.

मुन्सलिक (منسلک) वि. ('अ.) (१) ओवलेला. (२) जोडलेला; सम्मिलित; सामील केलेला.

मुन्सिफ़ (منصف) वि. पु. ('अ.) (१) न्यायाधीश; न्याय करणारा. (२) दिवाणी कोर्टातील एक उच्च अधिकारी; मुन्सफ. **–मिज़ाज** (مزاج –) वि. ('अ.) न्यायी; न्यायनिष्ठ.

मुन्सिफ़ानः (منصفانہ) अव्य. ('अ. + फ़ा.) न्याय्य; न्यायमुक्त.

मुन्सिफ़ी (منصفی) स्त्री. ('अ.) (१) न्याय. (२) मुन्सफाची कचेरी अथवा हुद्दा.

मुन्हज़िम (منہزم) वि. ('अ.) पराभूत; हरलेला.

मुन्हतिक (منہتک) वि. ('अ.) (१) ज्याचा पडदा फाटला आहे असा; ज्याचे दोष उघड झाले आहेत असा. (२) अपमानित.

मुन्हदिम (منہضم) वि. ('अ.) पचलेला; पचन झालेला.

मुन्हदिम (منہدم) वि. ('अ.) उध्वस्त; कोसळलेली (इमारत वगैरे).

मुन्हनी (منحنی) वि. ('अ.) दुर्बळ; क्षीण; कृशांग.

मुन्हमिक (منہمک) वि. ('अ.) तन्मय; तल्लीन.

मुन्हरिफ़ (منحرف) वि. ('अ.) (१) अवज्ञा करणारा; बंडखोर. (२) परत वक्र फिरणारा.

मुन्हल (منحل) वि. ('अ.) विस्तृत; विशाल; लांब-रुंद.

मुन्हसिर (منحصر) वि. ('अ.) अवलंबून असलेला; आधारित; निर्भर; आश्रित.

मुफ़क्किर (مفکر) वि. ('अ.) विचारक; चिंतन करणारा.

मुफ़ख़्ख़म (مفخم) वि. ('अ.) प्रतिष्ठित; सन्मानित; थोर.

मुफ़ख़्ख़र (مفخر) वि. ('अ.) ज्याच्याविषयी सर्वांना अभिमान वाटावा असा; पूज्य; मान्यवर.

मुफ़त्तिश (مفتش) वि. ('अ.) शोध लावणारा; शोधणारा.

मुफ़रिह् (مفرح) वि. ('अ.) आनंद देणारा; उत्साहवर्धक (औषध).

मुफ़व्वद् (مفوض) वि. ('अ.) सुपूर्द केलेला; सोपविलेला.

मुफ़स्सल (مفصل) वि. ('अ.) (१) सविस्तर; विस्तृत. (२) स्पष्ट. (३) उपनगर.

मुफ़स्सलात (مفصلات) पु. ('अ.) उपनगरे.

मुफ़स्सिर (مفسر) पु. ('अ.) भाष्यकार; 'हदीस' (حديث) ची व्याख्या किंवा भाष्य करणारा.

मुफ़स्सिल (مفصل) वि. ('अ.) स्पष्टीकरण, विवरण करणारा.

मुफ़ाक़ः (مفاقم) पु. ('अ.) मनोरंजन; मनोविनोद.

मुफ़ाख़रत (مفاخرت) स्त्री. ('अ.) गर्व; अभिमान; घमेंड.

मुफ़ाख़िर (مفاخر) वि. ('अ.) गर्व करणारा; घमेंडखोर.

मुफ़ाजा (مفاجا) पु. **मुफ़ाजात** (مفاجات) स्त्री. ('अ.) आकस्मिकपणे; अचानक; एकाएकी.

मुफ़ारक़त (مفارقت) स्त्री. ('अ.) (१) वेगळेपणा; फारकत. (२) वियोग; विच्छेद; घटस्फोट.

मुफ़ावदत (مفاوضت) स्त्री. ('अ.) (१) एकमेकांच्या हवाली करणे. (२) सहभागी होणे. (३) मैथुन करणे.

मुफ़ावदः (مفاوضہ) पु. ('अ.) (१) मोठ्यांनी लहानास लिहिलेले पत्र. (२) पत्र; चिठ्ठी. (३) समानता; बरोबरी.

मुफ़ाहमत (مفاهمت) स्त्री. ('अ.) (१) एकमेकांना समजणे. (२) तडजोड. (३) निवाडा.

मुफ़िर (مفر) वि. ('अ.) पळून जाणारा; फरारी होणारा.

मुफ़ीद् (مفيض) वि. ('अ.) (१) यश देणारा. (२) उपकार करणारा.

मुफ़ीद (مفيد) वि. ('अ.) लाभदायक; फायदेशीर; हितकारक.

मुफ़्त (مفت) वि. ('अ.) (१) मोफत; फुकट; विनामूल्य. (२) निष्कारण. (३) व्यर्थ. **–ख़ोर** (خور –) वि. ('अ.+फ़ा.) फुकटचा; ऐतखाऊ. **–बर** (بر –) वि. ('अ.+फ़ा.) दुसऱ्याची संपत्ती गिळंकृत करणारा.

मुफ़्तक़िर (مفتقر) वि. ('अ.) दरिद्री; भिकारी.

मुफ़्तख़िर (مفتخر) वि. ('अ.) गर्विष्ठ; मग्रूर.

मुफ़्तर (مفتر) वि. ('अ.) (१) दुर्बळ. (२) गळून गेलेला; सुस्त.

मुफ़्तरदात (مفترضات) पु. ('अ.) काल्पनिक गोष्टी; हवेतील मनोरे.

मुफ़्तरिक़ (مفترق) वि. ('अ.) फाटाफूट करणारा; शत्रुत्व निर्माण करणारा.

मुफ़्तरी (مفترى) वि. ('अ.) (१) लबाड; धूर्त. (२) खोटा आळ घेणारा.

मुफ़्ती (مفتى) पु. ('अ.) फतवा देणारा; मुस्लिम धर्मशास्त्रज्ञ, शास्त्रार्थ सांगणारा.

मुफ़्रद (مفرد) वि. ('अ.) एक; एकटा; एकाकी.

मुफ़्रदात (مفردات) स्त्री. ('अ.) (१) वेगवेगळी लिहिलेली अक्षरे; वर्णमाला (२) एकमेकात न मिसळलेली औषधे.

मुफ़्रित् (مفرط) वि. ('अ.) अत्यधिक; विपुल; प्रचुर.

मुफ़्लिस (مفلس) वि. ('अ.) दरिद्री; गरीब; निर्धन.

मुफ़्लिसी (مفلسى) स्त्री. ('अ.) दारिद्र्य; गरिबी.

मुफ़्सिद (مفسد) वि. ('अ.) उपद्रवकारक; भांडखोर; दूषित करणारा.

मुबज़्ज़िर (مبذر) वि. ('अ.) उधळ्या; अपव्ययी.

मुबद्दल (مبدل) वि. ('अ.) बदललेला; परिवर्तित.

मुबद्रिक़ (مبدرق) वि. ('अ.) मार्गदर्शक.

मुबय्यनः (مبين) वि. ('अ.) सांगितलेला; वर्णन केलेला; उक्त.

मुबर्रा (مبرا) वि. ('अ.) (१) सोडून दिलेला; मुक्त. (२) पवित्र; शुद्ध. (३) पृथक; वेगळा. (४) विरक्त.

मुबर्रिद (مبرد) वि. ('अ.) थंड करणारा; शीत प्रभावी (औषध).

मुबल्लिग़ (مبلغ) वि. ('अ.) प्रचारक; धर्मप्रचारक.

मुबस्सिर (مبصر) वि. ('अ.) पारखी; मर्मज्ञ.

मुबादरत (مبادرت) स्त्री. ('अ.) (१) चपळता; शीघ्रता. (२) वीरता; साहस.

मुबादलः (مبادلہ) पु. ('अ.) अदलाबदल; देवाणघेवाण; मोबदला.

मुबादा (مبادا) अव्य. (फ़ा.) असे न होवो.

मुबारक (مبارک) वि. ('अ.) (१) शुभ; मंगलप्रद. (२) फलदायी. (३) भाग्यशाली; अनुकूल. (पु.). (१) अभिनंदन; धन्यवाद. (२) शुभ वर्तमान. **–बाद** (باد –) पु. **–बादी** (بادى –) स्त्री. ('अ.+फा.) अभिनंदन; शुभेच्छा.

मुबारज़त (مبارزت) स्त्री. ('अ.) (१) संग्राम; युद्ध (२) द्वंद्वयुद्ध.

मुबारिज़ (مبارز) वि. ('अ.) योद्धा; लढवैया.

मुबालग़ः (مبالغہ) पु. ('अ.) अतिशयोक्ती. **–आमेज़** (–آمیز) वि. ('अ. + फ़ा.) अत्युक्तिपूर्ण; अतिरंजित.

मुबाशरत (مباشرت) स्त्री. ('अ.) संभोग; मैथुन.

मुबाह् (مباح) वि. ('अ.) विहित; धर्मसंमत.

मुबाह़सः (مباحثہ) पु. ('अ.) वादविवाद.

मुबाहात (مباہات) स्त्री. ('अ.) घमेंड; गर्व.

मुबीन (مبین) वि. ('अ.) स्पष्ट; साफ.

मुबैयनः (مبینہ) वि. ('अ.) वर्णन केलेला; सांगितलेला; उक्त.

मुब्तज़ल (مبتذل) वि. ('अ.) (१) अपमानित; तिरस्कृत. (२) नीच; लोफर.

मुब्तदा (مبتدا) वि. ('अ.) सुरू केलेला. (स्त्री.) प्रारंभ. (व्या.) कर्ता.

मुब्तदी (مبتدی) वि. ('अ.) (१) सुरू करणारा; नवशिक्या. (२) प्रारंभिक.

मुब्तला (مبتلا) वि. ('अ.) (१) अडकलेला; ग्रस्त. (२) मुग्ध; मोहित.

मुब्तिल (مبطل) वि. ('अ.) खंडन करणारा; खोटा ठरविणारा.

मुब्दल (مبدل) वि. ('अ.) बदललेला; परिवर्तित.

मुब्दा (مبدا) पु. ('अ.) (१) मूलस्रोत; आरंभस्थान. (२) ईश्वर.

मुब्दि'अ (مبدع) वि. ('अ.) आपल्या मनाने एखादी गोष्ट रचणारा.

मुब्रम (مبرم) वि. ('अ.) दृढ; मजबूत.

मुब्लग़ (مبلغ) वि.('अ.) (१) धाडलेला; प्रेषित; प्रेष्य. (२) खरा. (३) रक्कम; संख्या (मुख्यतः रुपयांची).

मुब्हम (مبہم) वि. ('अ.) अस्फुट; अस्पष्ट; निगूढ.

मुमस्सिल (ممثل) पु. ('अ.) नट; अभिनेता.

मुमस्सिलः (ممثلہ) स्त्री. ('अ.) नटी; अभिनेत्री.

मुमान'अत (ممانعت) स्त्री. ('अ.) बंदी; मनाई; प्रतिबंध.

मुमारस्त (ممارست) स्त्री. ('अ.) सराव; अभ्यास; प्रयत्न; परिश्रम.

मुमारात (ممارات) स्त्री. ('अ.) (१) बरोबर जाणे. (२) शत्रुत्व करणे; युद्ध करणे.

मुमारिस (ممارس) वि. ('अ.) अनुभवी; तरबेज.

मुमासिख (مماسخ) वि. ('अ.) सुंदराला कुरूप बनविणारा.

मुमासिल (مماثل) वि. ('अ.) सदृश; समान; एकरूप.

मुमिद (ممد) वि.('अ.) मदतगार; समर्थक; आश्रयदाता.

मुम्किन (ممکن) वि. ('अ.) संभवनीय; संभाव्य; शक्य; संभव. (स्त्री.) सामर्थ्य.

मुम्तद (ممتد) वि. ('अ.) लांब; लांबट; ओढलेला.

मुम्तनि'अ (ممتنع) वि. ('अ.) मनाई करणारा; अडविणारा.

मुम्तली (ممتلی) वि. ('अ.) भरलेला; पूर्ण.

मुम्तहन (ممتحن) वि. ('अ.) परीक्षार्थी; ज्याची परीक्षा घेतली जाते तो.

मुम्तहिन (ممتحن) वि. ('अ.) परीक्षक; परीक्षा घेणारा.

मुम्ताज़ (ممتاز) वि. ('अ.) अग्रणी; निवडक; प्रतिष्ठित; मुख्य; विशिष्ट; सन्माननीय.

मुम्सिक (ممسک) वि. ('अ.) कृपण; कंजूष.

मुर (مر) वि. ('अ.) कटु; कडू.

मुरक़्क़'अ (مرقع) पु. ('अ.) (१) चित्र; तसबीर. (२) चित्रमंजुषा; अल्बम.

मुरक्कब (مرکب) वि. ('अ.) मिश्रित; मिसळलेला; संमिश्र.

मुरक़्क़म (مرقم) वि. ('अ.) लिखित; लिहिलेला.

मुरख़्ख़स् (مرخص) वि. ('अ.) ज्याला जाण्याची परवानगी दिली आहे असा; निरोप दिलेला.

मुरज्जब (مرجب) वि. ('अ.) प्रतिष्ठित; सन्मानित.

मुरत्तब (مرتب) वि. ('अ.) (१) क्रमबद्ध केलेला; व्यवस्थित लावलेला. (२) संपादित; संगृहित.

मुरत्तिब (مرتب) वि. ('अ.) संपादक; संग्राहक.

मुरद्दब (مردد) वि. ('अ.) ज्याचे खंडन केले आहे असा; रद्द केलेला.

मुरद्दिब (مردد) वि. ('अ.) खंडन करणारा; रद्द करणारा.

मुरफ़्फ़ह (مرفہ) वि. ('अ.) संपन्न; समृद्ध.

मुरब्ब'अ (مربع) वि. ('अ.) (१) समभुज चौकोन. (२) चतुष्पदी (पद्य).

मुरब्बा (مربی) वि.('अ.) साखरेच्या पाकात घातलेली फळे; मुरंबा.

मुरब्बी (مربی) वि. ('अ.) पालक; पालनपोषण करणारा; समर्थक.

मुरम्मिम (مرمم) वि. ('अ.) सुधारणारा; दुरुस्ती करणारा.

मुरव्वज (مروج); **मुरव्वजः** (مروجہ) वि. ('अ.) प्रचलित; रूढ.

मुरव्वत (مروت) स्त्री. ('अ.) (१) मुरवत; संकोच; भीड. (२) शील. (३) माणुसकी.

मुरस्स'अ (مرصع) वि. ('अ.) (१) जडावाचा; जडित. (२) सुसज्जित; सजविलेला. **–कार** (کار –); **–साज** (ساز –) वि. ('अ. + फ़ा.) जडावाचे काम करणारा; रत्नजडित दागिने बनविणारा.

मुरा'आत (مراعات) स्त्री. ('अ.) (१) देखरेख; संरक्षण. (२) ध्यान; लक्ष. (३) प्रेम. (४) मुरवत.

मुराक़बः (مراقبہ) पु. ('अ.) ध्यानधारणा; समाधी; ईश्वरचिंतन.

मुराक़िब (مراقب) वि. ('अ.) समाधी लावलेला; तल्लीन.

मुराज'अत (مراجعت) स्त्री. ('अ.) परत येणे; प्रत्यागमन.

मुराद (مراد) स्त्री. ('अ.) (१) इच्छा; अभिलाषा; कामना. (२) नवस. (३) उद्देश; हेतू.

मुरादिफ़ (مرادف) वि. ('अ.) (१) एखाद्याच्या मागे बसणारा. (२) समानार्थक.

मुरादी (مرادی) वि. ('अ.) (१) इच्छानुकूल. (२) काल्पनिक (स्त्री); मोड (पैशाची); आणे; विशिष्ट संख्या (आण्यांची).

मुराफ़'अः (مرافعہ) पु. ('अ.) फेरविचारासाठी केलेला अर्ज; अपील.

मुराफ़िक़ (مرافق) वि. ('अ.) सहचर; साथी; मित्र.

मुराबहत (مرابحت) स्त्री. ('अ.) नफा घेऊन एखादी वस्तू विकणे; नफा.

मुरासलत (مراسلت) स्त्री. ('अ.) पत्रव्यवहार. [अनेक 'मुरासलात' (مراسلات)].

मुरासलः (مراسلہ) पु. ('अ.) पत्र; खलिता.

मुरीद (مرید) वि. ('अ.) शिष्य; चेला; अनुयायी.

मुरूर (مرور) पु. ('अ.) जाणे; गमन करणे; व्यतीत होणे.

मुर्ग़ (مرغ) पु. (फ़ा.) पक्षी; कोंबडा. **–अंदाज़** (انداز –) पु. (फ़ा.) न चावता गिळलेला घास.

मुर्ग़-ए-आतशख़्वार (مرغ آتش خوار) पु. (फ़ा.) अग्निभक्षक पक्षी; चकोर.

मुर्ग़-ए-क़िब्लःनुमा (مرغ قبلہ نما) पु. (फ़ा.+'अ.) होकायंत्राची सुई (काटा).

मुर्त'इश (مرتعش) वि. ('अ.) कंपायमान; थरथरणारा.

मुर्तकिब (مرتکب) वि. ('अ.) पाप किंवा दोष करणारा; कर्ता.

मुर्तद (مرتد) वि. ('अ.) बाटलेला; परधर्मात जाणारा.

मुर्तज़ा (مرتضیٰ) वि. ('अ.) रोचक; मनपसंत. (पु.) हजरत अली.

मुर्तफ़'अ (مرتفع) वि. ('अ.) उच्च; उत्तुंग.

मुर्तशी (مرتشی) वि. ('अ.) लाच खाणारा.

मुर्तहिन (مرتہن) पु. ('अ.) गहाण ठेवणारा.

मुर्ताज़ (مرتاض) वि. ('अ.) (१) शिस्त लावलेला; प्रशिक्षित. (२) तपस्वी.

मुर्दनी (مردنی) स्त्री. (फ़ा.) (१) प्रेतकळा. (२) प्रेतयात्रेस जाणे. (३) मृत्यू.

मुर्दार (مردار) वि. (फ़ा.) (१) आपोआप मेलेला (पशू); मृत. (२) अपवित्र. (३) व्यभिचारीणी. (४) मरगळलेला; निरुत्साही.

मुर्दि'अः (مرضعہ) स्त्री. ('अ.) दूध पाजविणारी स्त्री; दाई.

मुर्दः (مردہ) पु. (फ़ा.) प्रेत; शव. (वि.) (१) मृत; मेलेला. (२) त्राण नसलेला; मरतुकडा. (३) विझलेला. (४) कोमजलेला; उदास. **–ख़ोर** (خور –) वि. (फ़ा.) मेलेली जनावरे खाणारा. **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) निरुत्साही; उद्विग्न. **–शो** (شو –) वि. (फ़ा.) प्रेताला स्नान घालणारा.

मुर्शिद (مرشد) वि. पु. ('अ.) (१) धर्मगुरू; साधू; योगी. (२) शिक्षक. (३) वस्ताद; धूर्त.

मुर्सल (مرسل) वि. ('अ.) पाठविलेला. (पु.) ज्याच्याद्वारे अपौरुषेय दैवी ग्रंथ प्रकट होतो असा प्रेषित.

मुर्सलः (مرسلہ) वि. ('अ.) प्रेषित; पाठविलेला.

मुर्सिल (مرسل) वि. ('अ.) पाठविणारा; प्रेषक.

मुल (مل) स्त्री. (फ़ा.) मदिरा; मद्य.

मुलक़्क़ब (ملقب) वि. ('अ.) पदवी, किताब किंवा उपाधी दिलेला.

मुलख़्ख़स़ (ملخص) वि. ('अ.) संक्षिप्त. (पु.) तत्त्व; सार.

मुलज़्ज़िज़ (ملذذ) वि. ('अ.) आनंद देणारा; लज्जत वाढविणारा.

मुलम्म'अ (ملمع) पु. ('अ.) (१) कल्हई; मुलामा; गिलिट. (२) बनावट; दिखाऊपणा.

मुलव्वन (ملون) वि. ('अ.) रंगीत; रंगीबेरंगी; चित्रविचित्र.

मुलव्वस़ (ملوث) वि. ('अ.) बरबटलेला; भरलेला; पापातील भागीदार.

मुला'अबत (ملاعبت) स्त्री. ('अ.) (१) खेळ; मनोरंजन. (२) प्रेमलीला; प्रणयक्रीडा.

मुला'इम (ملائم) वि. ('अ.) (१) मऊ; मृदु. (२) कोमल; नाजुक; सूक्ष्म. (३) मधुर. (४) हलका. (५) घिमा. (६) थंड.

मुला'इमत (ملائمت) स्त्री. ('अ.) कोमलता; मऊपणा.

मुलाक़ात (ملاقات) स्त्री. ('अ.) (१) भेट; मुलाखत. (२) परिचय; ओळख. (३) मैत्री; सहवास.

मुलाक़ी (ملاقی) वि. ('अ.) (१) भेटणारा. (२) संयुक्त. (पु.) मित्र.

मुलाज़मत (ملازمت) स्त्री. ('अ.) नोकरी; सेवा; चाकरी.

मुलाज़िम (ملازم) पु. ('अ.) नोकर; सेवक; चाकर.

मुलाज़िमः (ملازمہ) स्त्री. ('अ.) दासी; मोलकरीण; नोकरी करणारी.

मुलातफ़त (ملاطفت) स्त्री. ('अ.) (१) कृपा; दया. (२) नम्रता. (३) कोमलता.

मुलाहज़ः (ملاحظہ) पु. ('अ.) (१) निरीक्षण; देखरेख. (२) भीड; मुरवत. (अव्य.) समोर; सन्मुख.

मुलूक (ملوک) पु. ['अ. 'मलिक' (ملک) चे अनेक.] बादशहा; सम्राट.

मुलैयिन (ملین) वि. ('अ.) (१) मऊपणा आणणारा. (२) सौम्य रेचक.

मुल्क (ملک) पु. ('अ.) (१) देश; राष्ट्र. (२) प्रदेश; मुलूख; प्रांत. (३) जन्मभूमी. **–गीरी** (–گیری) स्त्री. ('अ.+फ़ा.) मुलूखगिरी; इतर देश जिंकणे. **–रानी** (–رانی) स्त्री. ('अ.+फ़ा.) राज्य करणे; सत्ता चालविणे.

मुल्की (ملکی) वि. ('अ.) देशी; देशातील; स्थानिक.

मुल्ज़म (ملزم) पु. ('अ.) अपराधी; आरोपी.

मुल्ज़िम (ملزم) वि. ('अ.) आरोप करणारा.

मुल्तक़त (ملتقط) वि. ('अ.) (१) निवडलेला; निवडक. (२) रफू केलेला.

मुल्तजी (ملتجی) वि. ('अ.) प्रार्थना करणारा; अर्ज करणारा; इच्छुक.

मुल्तफ़ित (ملتفت) वि. ('अ.) आकृष्ट; प्रवृत्त.

मुल्तमिस (ملتمس) वि. ('अ.) प्रार्थना, विनंती, अर्ज करणारा.

मुल्तवी (ملتوی) वि. ('अ.) थांबलेला; स्थगित; तहकूब.

मुल्ला (ملا) पु. ('अ.) (१) मौलवी; विद्वान. (२) मशिदीतून अज़ान. (बांग) देणारा. (३) लहान मुलांना शिकविणारा; नमाज वगैरे शिकविणारा. [म्हण : **मुल्ला की दौड़ मस्जिद तक** (ملا کی دوڑ مسجد تک) सरडघाची धाव कुंपणापर्यंत].

मुल्हक़ (ملحق) वि. ('अ.) चिकटलेला; जोडलेला; जवळचा.

मुल्हिद (ملحد) वि. ('अ.) नास्तिक; अनीश्वरवादी; धर्मभ्रष्ट.

मुल्हिम (ملہم) वि. ('अ.) हृदयात प्रवेश करणारा. (स्त्री.) विवेक; सद्सद्विवेकबुद्धी.

मुवक़्क़र (موقر) वि. ('अ.) प्रतिष्ठित; सन्माननीय.

मुवक्किल (موکل) पु. ('अ.) (१) अशील; पक्षकार. (२) देवदूत.

मुवज्जल (موجل) वि. ('अ.) ताबडतोब दिला न जाणारा (वधूस द्यावयाचा हुंडा).

मुवज्जह (موجہ) वि. ('अ.) (१) उचित; योग्य. (२) प्रमाणित; सकारण; साधार.

मुवर्रिख़ (مورخ) पु. ('अ.) इतिहासकार; इतिहास लेखक.

मुवर्रिख़ः (مورخہ) वि. ('अ.) तारखेचा.

मुवस्सॉ (موصیٰ) वि. ('अ.) ज्याच्या नावाने मृत्युपत्र केलेले आहे असा.

मुवस्सी (موصی) वि. ('अ.) मृत्युपत्र करणारा.

मुवह्हिद (موحد) वि. ('अ.) एकेश्वरवादी; फक्त ईश्वर मानणारा (त्याचे अवतार किंवा ग्रंथ न मानणारा).

मुवाज़रत (موازرت) स्त्री. ('अ.) मंत्रिपद; मंत्री बनणे.

मुवाजहः (مواجہہ) पु. ('अ.) समोर; विद्यमान असणे.

मुवाज़ात (موازات) स्त्री. ('अ.) बरोबरी; समानता.

मुवाज़ी (موازی) वि. ('अ.) तोलाचा; बरोबरीचा.

मुवाफ़ात (مواطات) स्त्री. ('अ.) अनुकूलता.

मुवाद'अत (موادعت) स्त्री. ('अ.) निरोप घेणे, देणे.

मुवाज़बत (مواظبت) स्त्री. ('अ.) एखादे काम नियमितपणे सतत करणे.

मुवाला (موالا) पु. **मुवालात** (موالات) स्त्री. ('अ.) परस्पर सहयोग; मैत्री.

मुवासलत (مواصلت) स्त्री. ('अ.) (१) मुलाखत; भेट. (२) सहवास; संभोग.

मुवाहनत (مواہنت) स्त्री. ('अ.) आळस; सुस्ती.

मुवाहबत (مواہبت) स्त्री. ('अ.) दान; बक्षीस.

मुशंग (مشنگ) पु. (फ़ा.) लुटारू; डाकू; दरवडेखोर.

मुश'अश'अ (مشعشع) वि. ('अ.) प्रकाशमान; ज्योतिर्मय.

मुशक्कल (مشکل) वि. ('अ.) साकार; साक्षात; विशेष रूपाने आलेला.

मुशख़्ख़स (مشخص) वि. ('अ.) (१) तपासलेला. (२) अंदाजिलेला. (३) रोगाचे निदान केलेला.

मुशज्जर (مشجر) वि. ('अ.) वेलबुट्टीदार (कापड).

मुशत्तत (مشتت) वि. ('अ.) (१) अस्ताव्यस्त; विसकटलेला. (२) उद्विग्न.

मुशदः (مژدہ) पु. (फ़ा.) शुभ वर्तमान. **–बाद** (باد –) वा. (फ़ा.) भले होवो; अभिनंदन; धन्यवाद.

मुशद्दद (مشدد) वि. ('अ.) तश्दीद (द्वित्वा) ची खूण असलेला.

मुशब्बक (مشبک) वि. ('अ.) जाळीदार; अनेक छिद्रे असलेला.

मुशब्बह (مشبہ) पु. ('अ.) उपमेय (मुखाला चंद्राची उपमा दिली असता 'मुख' हे मुशब्बह बनते). **–बिह** (بہ –) पु. ('अ.) उपमान (वरील उपमेतील चंद्र).

मुशब्बेह (مشبہ) वि. ('अ.) उपमा देणारा.

मुशय्यन (مشین) वि. ('अ.) (१) रुबाबदार. (२) सुस्वरूप; सुंदर.

मुशर्रफ़ (مشرف) वि. ('अ.) प्रतिष्ठित; सन्मानित.

मुशर्रह (مشرح) वि. ('अ.) सटीक; ज्यावर भाष्य केले आहे असा.

मुशर्रिह (مشرح) वि. ('अ.) भाष्यकार.

मुशव्वश (مشوش) वि. ('अ.) घाबरलेला; उद्विग्न.

मुशव्वाँ (مشوی) वि. ('अ.) भाजलेला.

मुशश्शर (مششدر) वि. (फ़ा.) चकित; स्तब्ध.

मुशह्हर (مشہر) वि. ('अ.) कीर्तिमान; विख्यात.

मुशह्ही (مشہی) वि. ('अ.) ज्यायोगे भूक लागते असे औषध.

मुशा'अरः (مشاعرہ) पु. ('अ.) कवी संमेलन; मुशायरा.

मुशाजरत (مشاجرت) स्त्री. **मुशाजरः** (مشاجرہ) पु. ('अ.) प्रतिकूलता; विरोध.

मुशातमत (مشاتمت) स्त्री. ('अ.) शिवीगाळी; अपशब्द.

मुशाबहत (مشابہت) वि. ('अ.) एकरूपता; समानता.

मुशाबः (مشابہ) वि. ('अ.) एकरूप; समान; सदृश; तुल्य.

मुशायख़ (مشایخ) पु. ['अ. 'शेख़' (شیخ) चे अनेक.] (१) शेख, मुल्ला वगैरे धार्मिक नेते. (२) वैद्य. (३) वडीलधारी माणसे.

मुशार (مشار) वि. ('अ.) ज्याच्याकडे इशारा म्हणजे संकेत किंवा खूण करण्यात आली आहे असा.

मुशारुन्इलैह (مشار الیہ) वि. ('अ.) वर उल्लेखिलेला; वर दर्शविलेला; मशारनिल्हे.

मुशावरत (مشاورت) स्त्री. ('अ.) विचारविनिमय; सल्ला.

मुशावरती (مشاورتی) वि. सल्लागार (मंडळ).

मुशाविर (مشاور) वि. ('अ.) सल्ला घेणारा; विचारविनिमय करणारा.

मुशाहदः (مشاہدہ) पु. ('अ.) (१) निरीक्षण; दर्शन. (२) अनुभव. (३) साक्षात्कार.

मुशाहरः (مشاہرہ) पु. ('अ.) पगार; मासिक वेतन.

मुशाहिद (مشاہد) पु. ('अ.) पाहाणारा; साक्ष देणारा; साक्षी.

मुशीर (مشیر) वि. ('अ.) (१) सल्लागार. (२) इशारा देणारा. (३) मंत्री.

मुश्क (مشک) पु. (फ़ा.) कस्तुरी. **–फ़ाम** (فام –) वि. (फ़ा.) कृष्णवर्ण. **–बेद** (بید –) पु. (फ़ा.) सुगंधित पानाची एक वनस्पती.

मुश्काब (مشکاب) स्त्री. (तु.) मोठी बशी; तबक.

मुश्किल (مشکل) वि. ('अ.) (१) कठीण; अवघड. (२) जटिल. (३) गूढ; सूक्ष्म. (स्त्री.) (१) जटिलता; अवघडपणा; अडचण. (२) गूढता; सूक्ष्मता. **–कुशा** (کشا –) पु. ('अ. + फ़ा.) अडचण दूर करणारा; ईश्वर.

मुश्की (مشکیں) वि. (फ़ा.) कस्तुरीसारखा सुगंधित किंवा काळा. **–मोहरः** (مہرہ –) वि. (फ़ा.) पृथ्वी; धरती.

मुश्की (مشکی) वि. (फ़ा.) (१) कस्तुरीसारखा (काळा, सुगंधित). (२) काळा घोडा.

मुश्कोए (مشکوے) पु. (फ़ा.) (१) अंतःपुर; जनानखाना. (२) प्रासाद; महाल.

मुश्त (مشت) स्त्री. (फ़ा.) (१) मूठ; मुष्टी. (२) ठोसा. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) (१) मल्ल; पहिलवान. (२) हस्तमैथुन करणारा. **–पर** (پر –) पु. (फ़ा.) मूठभर पिसे असलेला, लहानसा पक्षी. **–माल** (مال –) पु. (फ़ा.) चोळणे; मर्दन करणे. **–वारः** (وار –) वि. पु. (फ़ा.) मूठभर; मूठभर गव्हाच्या लोंढघा. **–रस** (رس –) वि. (फ़ा.) मुठीत आलेली; चोरलेली (वस्तू).

मुश्त-ए-उस्तुख़्वाँ (مشت استخواں) पु. (फ़ा.) मूठभर हाडे; मरतुकडा माणूस.

मुश्त'अिल (مشتعل) वि. ('अ.) (१) भडकलेला; क्रुद्ध. (२) प्रज्वलित.

मुश्तक़ (مشتق) पु. ('अ.) दुसऱ्या शब्दापासून बनलेला शब्द.

मुश्तग़िल (مشتغل) वि. ('अ.) तल्लीन; तन्मय.

मुश्तबेह (مشتبہ) वि. ('अ.) संशयात टाकणारा.

मुश्तबः (مشتبہ) वि. ('अ.) (१) संदिग्ध; अनिश्चित (२) संदेहयुक्त; संशयास्पद.

मुश्तमिल (مشتمل) वि. ('अ.) सम्मिलित; सामील.

मुश्तरक (مشترک); **मुश्तरकः** (مشترکہ) वि. ('अ.) समाईक; भागीदारीतील.

मुश्तरी (مشتری) वि. ('अ.) (१) खरेदीदार; ग्राहक. (२) गुरू (ग्रह).

मुश्तहर (مشتہر) वि. ('अ.) जाहिरात झालेला; प्रसिद्ध; प्रकाशित.

मुश्तहिर (مشتہر) वि. ('अ.) जाहिरात करणारा; विज्ञापक.

मुश्तही (مشتہی) वि. ('अ.) इच्छा करणारा; इच्छुक.

मुश्ताक़ (مشتاق) वि. ('अ.) उत्सुक; अभिलाषी; इच्छुक.

मुश्फ़िक़ (مشفق) वि. ('अ.) (१) कपाळू; दयाळू. (२) मित्र. (३) भीती दाखविणारा.

मुश्रिक (مشرک) वि. ('अ.) (१) सामील करणारा. (२) देवाच्या गुणांमध्ये इतरांनाही सामील करणारा; एकेश्वरवाद न मानणारा; नास्तिक; काफिर.

मुश्रिक़ (مشرق) वि. ('अ.) चमकणारा. (पु.) तारा.

मुश्रिफ़ (مشرف) वि. ('अ.) (१) उत्तुंग; उच्च. (२) ज्ञाता. (पु.) हेडक्लार्क; मुख्य अधिकारी.

मुसदल (مصندل) वि. ('अ.) चंदनाचा सुगंध असलेला.

मुसक़्क़फ़ (مسقف) वि. ('अ.) छत असलेला; गच्ची असलेला.

मुसक्कित (مسکت) वि. ('अ.) गप्प बसविणारा; तोंड बंद करणारा.

मुसक्किन (مسکن) वि. ('अ.) आराम, शांती देणारा.

मुसक्किर (مسکر) वि. ('अ.) मादक (वस्तू). [अनेक 'मुसक्किरात' (مسکرات)].

मुसख़्ख़र (مسخر) वि. ('अ.) (१) जित; जिंकलेला. (२) ताब्यात असलेला. (३) मोहित.

मुसख़्ख़िर (مسخر) वि. ('अ.) (१) विजेता. (२) मुग्ध करणारा.

मुसज्जअ (مسجع) वि. ('अ.) सानुप्रास; लयबद्ध.

मुसज्जल (مسجل) वि. ('अ.) (१) मुशोभित; नजविलेला. (२) शिक्का मारलेला; रजिस्टर केलेला.

मुसत्तर (مسطر) वि. ('अ.) रेघा आखलेला.

मुसत्तर (مستر) वि. ('अ.) गुप्त; गुह्य.

मुसत्तह (مسطح) वि. ('अ.) सपाट; समतोल.

मुसद्दक़ (مصدق) वि. ('अ.) (१) सप्रमाण; साधार. (२) अनुभव घेऊन, प्रयोग करून पाहिलेला.

मुसद्दस (مسدس) वि. ('अ.) सहा पैलू असलेला. (पु.) सहा चरणांची कविता; षट्पदी; सहा चरणांचे एक कडवे व अशी अनेक कडवी असलेली कविता; खंडकाव्य. (हे काव्य मुख्यतः उपदेशपर किंवा वर्णनात्मक असते).

मुसद्दिक़ (مصدق) वि. ('अ.) प्रमाणित करणारा; समर्थन करणारा.

मुसन्नफ़ (مصنف); **मुसन्नफ़ः** (مصنفہ) वि. ('अ.) लिखित; संपादित; रचित; प्रणीत.

मुसन्ना (مثنیٰ) वि. ('अ.) दोन तुकडे केलेला; दुहेरी; नक्कल; प्रतिलिपी.

मुसन्निफ़ (مصنف) पु. ('अ.) ग्रंथकार; लेखक; रचयिता.

मुसफ़्फ़ा (مصفیٰ) वि. ('अ.) (१) साफ केलेला; शुद्ध. (२) उज्वल; चमकदार. (३) कल्हई केलेला.

मुसफ़्फ़ी (مصفی) वि. ('अ.) शुद्ध, स्वच्छ करणारा.

मुसब्बअ (مسبع) वि. ('अ.) सात भाग केलेला; सात चरणांची (कविता); सात कोन असलेला.

मुसब्बिब (مسبب) पु. (वि.) ('अ.) कारण निर्माण करणारा; मूळ कारण. **–उल्-असबाब** (–الاسباب) पु. ('अ.) कारणांचे कारण; आदिकारण; परमेश्वर.

मुसब्बिहः (مسبحہ) स्त्री. ('अ.) अंगठ्याजवळचे बोट; तर्जनी.

मुसब्बेह (مسبح) वि. ('अ.) जप करणारा; जपमाळ फिरविणारा.

मुसम्मत (مسمط) पु. ('अ.) (१) मोत्यांची माळ; लडी. (२) काव्याचा एक प्रकार. (यातील काही चरण एका यमकात व काही दुसऱ्या यमकात असतात).

मुसम्मन (مثمن) वि. ('अ.) अष्टकोनी.

मुसम्मन (مسمن) वि. ('अ.) खायला घालून लठ्ठ बनविलेला.

मुसम्मम (مصمم) वि. ('अ.) (१) दृढ; मजबूत. (२) निश्चित; खात्रीचा.

मुसम्मा (مسمیٰ) वि. ('अ.) नावाचा; नाव असलेला; श्रीयुत या अर्थाने सरकारी कागदपत्रांत पुरुषाच्या नावापूर्वी लावला जाणारा शब्द.

मुसम्मात (مسماۃ) स्त्री. ('अ.) नावाची; श्रीमती या अर्थाने सरकारी कागदपत्रांत स्त्रियांच्या नावापूर्वी लावला जाणारा शब्द.

मुसम्मिम (مصمم) वि. ('अ.) निश्चय करणारा.

मुसर्रेह (مصرح) वि. ('अ.) (१) स्पष्ट वक्ता. (२) व्याख्या, भाष्य करणारा.

मुसल्मान (مسلمان) पु. ('अ.) इस्लामचा अनुयायी; मुस्लिम.

मुसल्मानी (مسلمانی) स्त्री. ('अ.) (१) मुसलमानांचा धर्म, कर्तव्य. (२) खत्ना; सुन्नत.

मुसल्मीन (مسلمين) पु. ['अ. 'मुस्लिम' (مسلم) चे अनेक.] मुसलमान लोक.

मुसल्लत् (مسلط) वि. ('अ.) चोहोबाजूंनी आच्छादलेला.

मुसल्लम (مسلم); **मुसल्लमः** (مسلم) वि. ('अ.) (१) सर्वमान्य; स्वीकृत. (२) प्रमाणित; शाबीत केलेला; सिद्ध. (३) संपूर्ण; अखंड.

मुसल्लस (مثلث) पु. ('अ.) (१) त्रिभुज; त्रिकोण. (२) तीन चरणांची कविता. (वि.) त्रिकोणी.

मुसल्लह् (مسلح) वि. ('अ.) सशस्त्र; हत्यारबंद.

मुसल्ला (مصلّا) पु. ('अ.) (१) जिच्यावर नमाज पढतात ती सतरंजी अथवा चटई. (२) नमाज पढण्याची जागा; ईदगाह.

मुसल्ली (مصلی) वि. ('अ.) नमाज पढणारा.

मुसल्सल (مسلسل) वि. ('अ.) (१) सतत; निरंतर. (२) शृंखलाबद्ध; कैद. (३) क्रमबद्ध. (४) पुनः-पुनः; वारंवार.

मुसव्वदः (مسودہ) पु. ('अ.) (१) कच्चा खर्डा; मसुदा; प्रारूप. (२) पांडुलिपी.

मुसव्वर (مصور); **मुसव्वरः** (مصورہ) वि. ('अ.) चितारलेला; चित्रित; नक्षी काढलेला.

मुसव्विर (مصور) वि. पु. ('अ.) चित्रकार. [स्त्री. 'मुसव्विरः' (مصورہ)].

मुसव्विरी (مصوری) स्त्री. ('अ.) चित्रकला; चित्रकारी.

मुसह्हफ़ (مصحف) पु. ('अ.) (१) कुराण शरीफ. (२) लहान पुस्तकांचा संग्रह.

मुसहिल (مسہل) पु. ('अ.) रेचक; विरेचक.

मुसह्हद (مصہد) वि. ('अ.) जागृत केलेला; जागे केलेला.

मुसा'अदत (مساعدت) स्त्री. ('अ.) साह्य; मदत.

मुसा'अिद (مساعد) वि. ('अ.) सहाय्यक; मदतगार.

मुसाफ़रत (مسافرت) स्त्री. ('अ.) सफर; प्रवास; यात्रा; प्रवास करणे.

मुसाफ़हः (مصافحہ) पु. ('अ.) हस्तांदोलन.

मुसाफ़हः (مسافحہ) पु. ('अ.) व्यभिचार दुराचार.

मुसाफ़ात (مصافات) स्त्री. ('अ.) मैत्री; दोस्ती; निष्कपटता.

मुसाफ़िर (مسافر) पु. ('अ.) प्रवासी; पथिक; यात्रेकरू. **–खानः** (خانہ –) पु. ('अ. + फ़ा.) धर्मशाळा; पथिकाश्रम; वेटिंग रूम.

मुसाब (مصاب) वि. ('अ.) दुःखी; व्यथित.

मुसाबक़त (مسابقت) स्त्री. ('अ.) पुढे जाणे; उपक्रमशीलता.

मुसाबरत (مصابرت) स्त्री. ('अ.) (१) धीर धरणे; सबूर करणे. (२) समाधान मानणे.

मुसालहत (مصالحت) स्त्री. ('अ.) तडजोड; तह; समझोता.

मुसावात (مساوات) स्त्री. ('अ.) समानता; बरोबरी.

मुसावी (مساوی) वि. ('अ.) समान; तुल्य; बरोबरीचा.

मुसाहक़ः (مساحقہ) पु. ('अ.) स्त्रियांचा आपसातील संभोग.

मुसाहबत (مصاحبت) स्त्री. ('अ.) थोरामोठ्यांजवळ असणे, राहाणे.

मुसाहमत (مساهمت) स्त्री. ('अ.) भागीदारी; वाटा.

मुसाहलत (مساهلت) स्त्री. ('अ.) आळस; सुस्ती.

मुसाहिब (مصاحب) पु. ('अ.) (१) श्रीमंत किंवा राजे लोकांजवळ राहाणारा. (२) दरबारी.

मुसाहिम (مساهم) वि. ('अ.) भागीदार; वाटेकरी.

मुसिन (مسن) वि. ('अ.) वृद्ध; म्हातारा.

मुसिह्हि (مصحح) वि. ('अ.) दुरुस्त करणारा; सुधारणारा.

मुसीब (مصیب) वि. ('अ.) एखाद्या विषयाच्या तळापर्यंत जाणारा; सत्य शोधून काढणारा.

मुसीबत (مصیبت) स्त्री. ('अ.) (१) दुःख; क्लेश; आपत्ती; संकट. (२) अपघात. **–ज़दः** (زدہ –) वि. ('अ.+फ़ा.) संकटग्रस्त; आपत्तीत सापडलेला.

मुस्तंजिम (مستنجم) वि. ('अ.) प्रकाशमान; प्रज्वलित.

मुस्त'अजिल (مستعجل) वि. ('अ.) (१) अधीर; आतुर. (२) उतावळा.

मुस्त'अफ़ी (مستعفی) वि. ('अ.) राजीनामा, त्यागपत्र देणारा.

मुस्त'अमर (مستعمر) वि. ('अ.) नवीन वसविलेला; नवी वसाहत.

मुस्त'अमल (مستعمل) वि. ('अ.) (१) प्रचलित; व्यवहृत. (२) अमलात आणलेला.

मुस्त'आर (مستعار) वि. ('अ.) मागितलेली (वस्तू); उधार; उसनवार.

मुस्त'अिद (مستعد) वि. ('अ.) (१) तत्पर; सिद्ध; तयार. (२) हुशार; तरतरीत; चपळ.

मुस्त'ईन (مستعین) वि. ('अ.) साह्य, मदत मागणारा.

मुस्त'ओर (مستعیر) वि. ('अ.) सवलत इच्छिणारा.

मुस्तक़र (مستقر) पु. ('अ.) मुक्कामाचे ठिकाण, स्थान.

मुस्तक़िल (مستقل) वि. ('अ.) (१) अढळ; दृढ. (२) कायमचा; चिरस्थायी. (३) निरंतर; सतत. **-मिजाज** (مزاج -) वि. ('अ.) दृढनिश्चयी.

मुस्तक़ीम (مستقيم) वि. ('अ.) सरळ; ऋजू; वक्रता नसलेला.

मुस्तकबिर (مستكبر) वि. ('अ.) अहंकारी; घमेंडखोर.

मुस्तक़्बिल (مستقبل) पु. ('अ.) (१) आगामी; भविष्यकाळ. (२) भवितव्य.

मुस्तख़ीफ़ (مستخيف) वि. ('अ.) (१) भयभीत; त्रस्त. (२) भीषण; भयानक.

मुस्तग़ास़ (مستغاث) वि. ('अ.) न्यायाधीश; मॅजिस्ट्रेट.

मुस्तग़ीस़ (مستغيث) वि. ('अ.) फिर्यादी; वादी.

मुस्तग़नी (مستغنى) वि. ('अ.) निस्पृह; निरिच्छ.

मुस्तग़्रक़ (مستغرق) वि. ('अ.) (१) बुडालेला. (२) गर्क; तल्लीन; निमग्न.

मुस्तज़ाद (مستزاد) वि. ('अ.) वाढविलेला; अतिरिक्त. (पु.) एक काव्यप्रकार. यात प्रत्येक चरणामध्ये लहानसा तुकडा जोडला जातो.

मुस्तजाब (مستجاب) वि. ('अ.) स्वीकृत; मंजूर, कबूल केलेला.

मुस्तजार (مستجار) वि. ('अ.) शरण, आसरा देणारा; रक्षक.

मुस्तजीब (مستجيب) वि. ('अ.) स्वीकार, मान्य, कबूल करणारा.

मुस्तजीर (مستجير) वि. ('अ.) आसरा, शरण, त्राण इच्छिणारा.

मुस्तज्मः (مستجم) वि. ('अ.) एकत्र; एकत्रित.

मुस्तत़ा'अ (مستطاع) वि. ('अ.) आज्ञाधारक.

मुस्तत़ाब (مستطاب) वि. ('अ.) (१) शुभ; कल्याणकारक. (२) स्वादिष्ट.

मुस्ततिर (مستتر) वि. ('अ.) गुप्त; लपलेला.

मुस्तत़ी'अ (مستطيع) वि. ('अ.) (१) समृद्ध; धनाढ्य. (२) समर्थ.

मुस्तत़ील (مستطيل) पु. ('अ.) समांतरभुज चौकोन; आयत.

मुस्तद'ओ (مستدعى) वि. ('अ.) प्रार्थना, विनंती करणारा.

मुस्तदाम (مستدام) वि. ('अ.) नित्य; नित्यता इच्छिणारा; सदैव राहाणारा.

मुस्तदीर (مستدير) वि. ('अ.) गोल; वाटोळा.

मुस्तनद (مستند) वि. ('अ.) (१) प्रमाणित; सनद मिळविलेला. (२) विश्वस्त; विश्वसनीय.

मुस्तफ़वी (مصطفوى) वि. ('अ.) मुस्तफाशी संबंधित.

मुस्तफ़ा (مصطفىٰ) वि. ('अ.) (१) शुद्ध; पवित्र. (२) मुहम्मद साहेबांचे नाव.

मुस्तफ़ाद (مستفاد) वि. ('अ.) प्राप्त; लब्ध.

मुस्तफ़ीद (مستفيض) वि. ('अ.) लाभ घेणारा; नफा इच्छिणारा.

मुस्तफ़ीद (مستفيد) वि. ('अ.) फायदा इच्छिणारा; लाभ घेणारा.

मुस्तफ़िसर (مستفسر) वि. ('अ.) विचारणारा; प्रश्नकर्ता; पृच्छक.

मुस्तब्सिर (مستبصر) वि. ('अ.) दिव्यदृष्टी असणारा.

मुस्तमंद (مستمند) वि. (फ़ा.) (१) दुःखी; उदासीन. (२) गरजू. (३) इच्छुक.

मुस्तरद (مسترد) वि. ('अ.) (१) रद्द केलेला. (२) परत केलेला.

मुस्त़लहः (مصطلح) वि. ('अ.) पारिभाषिक.

मुस्तवी (مستوى) वि. ('अ.) (१) सपाट; समतल. (२) सम; समान.

मुस्तशीर (مستشير) वि. ('अ.) सल्ला घेणारा.

मुस्तश़फ़ा (مستشفىٰ) वि. ('अ.) रुग्णालय; इस्पितळ.

मुस्तश्रिक़ (مستشرق) वि. ('अ.) (१) दीप्त; प्रकाशित. (२) पौर्वात्य भाषा व विज्ञान जाणणारा युरोपियन.

मुस्तस्ना (مستثنىٰ) वि. ('अ.) (१) अट किंवा बंधन काढून घेतलेला; बंधमुक्त. (२) एखाद्या नियमाच्या अंतर्गत न येणारा. (३) प्रतिष्ठित. (४) वगळलेला; अपवादभूत.

मुस्तह़क़ (مستحق) वि. ('अ.) (१) हक्कदार; अधिकार असलेला. (२) योग्य; पात्र.

मुस्तह़कम (مستحكم) वि. ('अ.) (१) दृढ; मजबूत; पक्का. (२) चिरस्थायी; अटळ. (३) निश्चित.

मुस्तह़ज़र (مستحذر) वि. ('अ.) सदैव स्मरणात राहाणारा.

मुस्तह़ब (مستحب) वि. ('अ.) (१) उत्तम प्रकारे जाणलेला. (२) प्रिय. (३) पुनीत. (४) जे केल्याने पुण्य लागते पण न केल्याने पाप लागत नाही.

मुस्तह़सन (مستحسن) वि. ('अ.) (१) उत्तम; श्रेष्ठ. (२) पुनीत; पवित्र.

मुस्तहान (مستهان) वि. ('अ.) तिरस्कृत; अपमानित.

मुस्तहाम (مستهام) वि. ('अ.) (१) उद्विग्न; व्यग्र. (२) चकित; थक्क.

मुस्तह़ील (مستحيل) वि. ('अ.) असंभव; अशक्य.

मुस्ताजिर (مستاجر) पु. ('अ.) (१) ठेकेदार. (२) एकाधिकारी. (३) जमीनदार. (४) कूळ.

मुस्तामिन (مستامن) वि. ('अ.) शांतता व आसरा इच्छिणारा.

मुस्तासिल (مستاصل) वि. ('अ.) उन्मूलन करणारा; समूळ नष्ट करणारा.

मुस्तोक्रिब (مستوقد) वि. ('अ.) आग भडकविणारा.

मुस्तौजिब (مستوجب) वि. ('अ.) (१) योग्य; पात्र; लायक. (२) जबाबदार.

मुस्तौफ़ी (مستوفی) वि. ('अ.) (१) व्यापक. (२) गृहीत. (पु.) हिशेब तपासणारा.

मुस्नद (مسند) वि. ('अ.) (१) दत्तक (पुत्र). (२) जारज. (पु.) काल; समय. (व्या.) विधेय.

मुस्बत (مثبت) वि. ('अ.) शाबित केलेला; प्रमाणित. (पु.) बेरीज; अधिक.

मुस्रिफ़ (مسرف) वि. ('अ.) उधळघा; उधळपट्टी करणारा.

मुस्लिम (مسلم) पु. ('अ.) मुसलमान. [अनेक 'मुस्लिमीन' (مسلمین)].

मुस्लेह (مصلح) वि. ('अ.) (१) सुधारक. (२) शरीरातील धातूचे दोष दूर करणारे, शोधक (औषध).

मुहंबिस (مهندس) पु. ('अ.) (१) गणितज्ञ; आकडे शास्त्रज्ञ. (२) इंजिनियर.

मुहक्क (حق) वि. ('अ.) हक्कदार; ज्याच्या बाजूला न्याय आहे असा.

मुहकम (محکم) वि. ('अ.) (१) दृढ; मजबूत. (२) स्थिर; टिकाऊ. (३) निश्चित.

मुहकमात (محکمات) स्त्री. ('अ.) ज्यांचा अर्थ स्पष्ट आहे अशी कुराणातील वाक्ये.

मुहक्कक़ (محقق) वि. ('अ.) प्रमाणित; नक्की; तपासलेला.

मुहक्कर (محقر) वि. ('अ.) तुच्छ; क्षुद्र; अधम.

मुहक्किक़ (محقق) वि. ('अ.) (१) संशोधक; शास्त्रज्ञ. (२) तत्त्वज्ञानी.

मुहज्ज़ब (مهذب) वि. ('अ.) सभ्य; सुसंस्कृत; शिष्टाचार पाळणारा.

मुहतजिब (محتجب) वि. ('अ.) लपलेला; गुप्त.

मुहतदी (مهتدی) वि. ('अ.) उपदेशक ; दीक्षा देणारा.

मुहतम (مهتم) वि. ('अ.) व्यवस्थित; क्रमबद्ध. **–बि'श्-शान** (بالشان –) वि. ('अ.) ज्याची व्यवस्था उत्तम ठेवली आहे असा; भव्य; विशाल.

मुहतमल (محتمل) वि. ('अ.) संदिग्ध; शंकास्पद; अस्पष्ट.

मुहतमिम (مهتمم) वि. ('अ.) व्यवस्थापक; संचालक.

मुहतरम (محترم) वि. ('अ.) (१) पूज्य; प्रतिष्ठित; श्रेष्ठ. (२) श्रीयुत; महाशय.

मुहतरमः (محترمہ) स्त्री. ('अ.) (१) आदरणीय (स्त्री). (२) श्रीमती.

मुहतरिज़ (محترز) वि. ('अ.) (१) अलिप्त, दूर राहाणारा. (२) संयमी.

मुहतशिम (محتشم) वि. ('अ.) नोकरचाकर असलेला; वैभवशाली.

मुहतसिब (محتسب) वि. ('अ.) हिशेब घेणारा; चौकशी करणारा. (पु.) लोकांनी मद्यपान करू नये म्हणन त्यांच्यावर पाळत ठेवणारा व गुत्त्यांवर देखरेख ठेवणारा; लोकांच्या आचरणावर देखरेख ठेवणारा.

मुहताज (محتاج) वि. ('अ.) (१) गरजू. (२) व्यंगयुक्त; सदोष. (३) गरीब; दरिद्री. **–खानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) अनाथालय; भिकारखाना.

मुहतात् (محتاط) वि. ('अ.) सावध; अत्यंत सावधगिरी बाळगणारा.

मुहताल (محتال) वि. ('अ.) धूर्त; लबाड; कपटी.

मुहद्दिस (محدث) पु. ('अ.) 'हदीस' चा जाणकार; विद्वान; धर्माचार्य.

मुहब्भब (مهذب) वि. ('अ.) दुसऱ्या भाषेतून घेऊन हिंदी बनविलेला शब्द. [उदा. 'आबख़ोरः' (آبخورہ) (पाणी पिण्याचे मातीचे परळ) यापासून बनलेला 'अमखोरा' हा शब्द].

मुहब्बत (محبت) स्त्री. ('अ.) (१) प्रेम; प्रणय; वात्सल्य. (२) मैत्री.

मुहमल (مهمل) वि. ('अ.) (१) निरर्थक; अर्थहीन. (२) बेकार. (३) बेभरवशाचा. **–गो** (گو –) वि. ('अ.+फ़ा.) वाह्यात बडबड करणारा.

मुहम्मद (محمد) वि. ('अ.) ज्याची स्तुती, प्रशंसा करण्यात आली आहे असा. (पु.) हजरत मुहम्मद पैगंबर.

मुहम्मदी (محمدی) वि. ('अ.) मुहम्मदांशी संबंधित; मुसुलमान.

मुहर (مہر) स्त्री. (फ़ा.) (१) अंगठी. (२) शिक्का; छाप; मोहर; सील. (३) मोहोर (नाणे); सुवर्ण-मुद्रा. **–कन** (کن –) वि. (फ़ा.) मोहर खोदणारा, कोरणारा.

मुहरक़ (محرق) वि. ('अ.) जळलेला; भस्म; भस्मीभूत.

मुहरः (مہرہ) पु. (फ़ा.) (१) सापाचे विष उतरविणारा एक मणी. (२) नागमणी. (३) बुद्धिबळातील मोहरे. (४) इस्त्री. (५) कवडी; शंख; शिपला. (६) हतोडा. (७) मानेतील व पाठीतील मणका.

–ची (چی –); **–बाज़** (باز –) वि. (फ़ा.) धूर्त; लबाड; फसव्या.

मुहर्रफ़ (محرف) वि. ('अ.) (१) वक्र; विकृत. (२) मूळ अर्थापासून बदललेला.

मुहर्रम (محرم) वि. ('अ.) (१) 'हराम' (निषिद्ध) ठरविलेला (२) अरबी वर्षाचा पहिला महिना. (इस्लामच्या उदयापूर्वी या महिन्यात रक्तपात निषिद्ध होता). (३) मोहरम. (४) शोक.

मुहर्रमी (محرمی) वि. ('अ.+हिं.) (१) मोहरमसंबंधी. (२) उदास; दुःखी.

मुहर्रा (مہرا) वि. ('अ.) पूर्णपणे शिजविलेला.

मुहर्रिक (محرک) वि. ('अ.) (१) गती देणारा; चालविणारा; संचालक. (२) उत्तेजक. (३) ठराव मांडणारा; प्रस्तावक.

मुहर्रिर (محرر) वि. ('अ.) (१) लेखक; लिहिणारा. (२) कारकून; वकिलाचा कारकून.

मुहलत (مہلت) स्त्री. ('अ.) (१) मुद्दी; फुरसत. (२) अवधी; मुदत. (३) विलंब; ढील; उशीर.

मुहलिक (مہلک) वि. ('अ.) घातक; प्राणघातक; जालीम.

मुहव्वल (محول) वि. ('अ.) (१) सोपविलेला; हवाली केलेला. (२) आधार दिलेला.

मुहव्विस (مہوس) वि. ('अ.) रसायनशास्त्रज्ञ; किमयागर.

मुहश्शा (محشیٰ) वि.('अ.)समास (मार्जिन)सोडलेला; समासात लिहिलेला; टीपांसह असलेला.

मुहसिन (محسن) वि. ('अ.) (१) उपकार, कल्याण करणारा; उदार. (२) संकटकाळी मदत करणारा. **–कुश** (کش –) वि. ('अ.+फ़ा.) कृतघ्न.

मुहाकमः (محاکمہ) पु. ('अ.) (१) अधिकाऱ्याकडे न्यायासाठी जाणे. (२) न्याय करणे. (३) निर्णय; निवाडा.

मुहाका (محاکا) पु. **मुहाकात** (محاکات) स्त्री. ('अ.) संभाषण; संवाद.

मुहाजरत (مہاجرت) स्त्री. ('अ.) स्थानत्याग; देशत्याग.

मुहाज़ात (محاذات) स्त्री. ('अ.) (१) सामना, विरोध करणे. (२) समोर येणे. (३) बरोबरी करणे.

मुहाजात (مہاجات) स्त्री. ('अ.) (१) एकमेकांची निंदा करणे. (२) एकमेकांचे विडंबन करणाऱ्या कविता लिहिणे.

मुहाजिर (مہاجر) पु. ('अ.) 'हिज्रत' (देशत्याग) करून परदेशात जाणारा; निर्वासित; शरणार्थी. [अनेक 'मुहाजिरीन' (مہاجرین)].

मुहाजी (محاذی) वि. ('अ.) समोरचा; बरोबरीचा.

मुहाफ़ज़त (محافظت) स्त्री. ('अ.) (१) रक्षण; संरक्षण. (२) देखरेख. (३) पालनपोषण.

मुहाफ़िज़ (محافظ) वि. ('अ.) (१) रक्षक; संरक्षक. (२) निरीक्षक. (३) पालक. **–खानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) जुने कागदपत्र ठेवण्याचे स्थान. **–ए-दफ़्तर** (دفتر –) पु. ('अ.) कचेरीतील कागदपत्रांची काळजी घेणारा.

मुहाफ़ः (محافہ) वि. (फ़ा.) पडदे असलेली मोठी पालखी.

मुहाबा (محابا); **मुहाबात** (محابات) पु. ('अ.) (१) भय; भीती. (२) चिंता; संकोच.

मुहारबः (محاربہ) पु. ('अ.) युद्ध; लढाई; संग्राम.

मुहारिब (محارب) वि. ('अ.) योद्धा; लढवय्या.

मुहाल (محال) वि. ('अ.) (१) अशक्य; असंभव. (२) अवघड; दुष्कर.

मुहावरत (محاورت) स्त्री. ('अ.) संभाषण; संवाद.

मुहाविरः (محاورہ) पु. ('अ.) (१) वाक्प्रचार. (२) सवय; अभ्यास.

मुहासदः (محاسدہ) पु. ('अ.) हेवा; ईर्ष्या.

मुहासबः (محاسبہ) पु. ('अ.) (१) हिशेब; हिशेबाची तपासणी. (२) जाब (मागणे).

मुहासरः (محاصرہ) पु. ('अ.) वेढा; वेढणे; वेढा घालणे.

मुहासिद (محاسد) वि. ('अ.) हेवा, ईर्ष्या करणारा.

मुहासिब (محاسب) वि. ('अ.) (१) हिशेब करणारा; गणितज्ञ. (२) जाब मागणारा.

मुहिब (محب) वि. ('अ.) प्रेम करणारा; प्रेमी; मित्र.

मुहिम (مہم) स्त्री. ('अ.) (१) एखादे मोठे, अवघड काम. (२) लढाई; मोहीम. (३) हल्ला; आक्रमण.

मुही (محی) वि. ('अ.) जिवंत करणारा; प्राणदाता. (पु.) परमेश्वर.

मुहीत् (محیط) वि. ('अ.) (१) आच्छादलेला; घेरलेला. (२) पसरलेला; व्यापक. (पु.) नदी; समुद्र.

मुहीब (مہیب) वि. ('अ.) भीषण; भयानक.

मुहील (محیل) वि. ('अ.) कपटी; धूर्त; लबाड.

मुहैया (مہیا) वि. ('अ.) (१) तयार; तत्पर. (२) उपलब्ध; प्राप्त; उपार्जित. (३) एकत्र; एकत्रित **–करना** (کرنا –) पुरवठा करणे; गोळा करणे.

मुहैयिर (محیر) वि. ('अ.) आश्चर्यचकित, थक्क करणारा.

मू (مو) पु. (फ़ा.) (१) डोकीचे केस; केश. (२) अंगावरील केस; रोम. **–क़लम** (قلم –) पु. (फ़ा.+'अ.) चित्रकाराचा कुंचला; ब्रश. **–चीनः** (چین –) पु. (फ़ा.) केस उपटून काढण्याचा चिमटा. **–तराश** (تراش –) पु. (फ़ा.) वस्तरा. **–ब.मू** (بمو –) अव्य. (फ़ा.) शब्दशः; अक्षरशः; कणन्‌कण. **–बाफ़** (باف –) पु. (फ़ा.) वेणी बांधण्याची फीत; अगवळ; रिबीन. **–शिग़ाफ़** (شگاف –) वि. (फ़ा.) (१) अर्थ, कीस काढणारा; काथ्याकूट करणारा; केसाची चीर-फाड करणारा. (२) सूक्ष्मदर्शी; सखोल टीकाकार. **–शिगाफ़ी** (شگافی –) स्त्री. (फ़ा.) छिद्रान्वेषण.

मू-ए-आतश दीदः (موے آتش دیدہ) वि. (फ़ा.) अग्नीवर धरलेला केस (असा केस वाकडा होतो); कुरळे केस.

मूजज़ (موجز) वि. ('अ.) साररूप; संक्षिप्त.

मूजिद (موجد) वि. ('अ.) शोध लावणारा; संशोधक.

मूजिब (موجب) पु. ('अ.) कारण; हेतू.

मूजिबः (موجبہ) स्त्री. ('अ.) (१) आवश्यक वस्तू. (२) जिचा मोबदला परलोकात मिळतो अशी गोष्ट.

मज़ी (موذی) वि. ('अ.) (१) त्रास देणारा; दुःख देणारा; अत्याचारी. (२) दुष्ट; पाजी. (३) खटयाळ.

मूनिस (مونس) वि. ('अ.) मित्र; दोस्त; सहकारी.

मूबिद (موبد) पु. (फ़ा.) (१) अग्निहोत्री; अग्नि-पूजकांचा, पारशांचा भटजी. (२) तत्त्वज्ञ; शास्त्रज्ञ; बुद्धिमान. (३) दारू विकणारा.

मूमाँ (موسیٰ) वि. ('अ.) ज्याच्याकडे इशारा, खूण केली आहे असा.

मूमी (موسی) वि. ('अ.) इशारा, खूण करणारा.

मूरिस़ (مورث) वि. ('अ.) (१) पूर्वज; मूळ पुरुष. (२) उत्पन्न करणारा.

मूश (موش) पु. (फ़ा.) मूषक; उंदीर.

मूश-ए-कोर (موش کور) पु. (फ़ा.) घूस; वेश्मनकुल.

मूश-ए-ख़ुर्मा (موش خرما) स्त्री. (फ़ा.) खार (प्राणी).

मूश-ए-पर्रां (موش پراں) पु. (फ़ा.) वटवाघूळ.

मूशक (موشک) स्त्री. (फ़ा.) लहान उंदीर; उंदराची मादी; चिचुंद्री.

मूसवी (موسوی) वि. ('अ. + फ़ा.) हजरत मूसा (मोझेस) शी संबंधित.

मूसां (موسیٰ) पु. ('अ.) मोझेस (एक पैगंबर).

मूसाँ (موصیٰ) वि. ('अ.) मृत्युपत्र केलेला; ज्याच्या नावाने मृत्युपत्र केले आहे असा.

मूसा'ई (موسائی) वि. ('अ.) मूसाचा अनुयायी; यहूदी.

मूसिर (موثر) वि. ('अ.) स्वार्थत्याग करणारा.

मूसिर (موسر) वि. ('अ.) (१) शक्तिशाली. (२) धनाढ्य.

मूसिल (موصل) वि. ('अ.) घाडणारा; पोचविणारा; प्रेषक.

मूसी (موصی) वि. ('अ.) मृत्युपत्र करणारा.

मूसीक़ार (موسیقار) पु. ('अ.) (१) गवई; संगीतज्ञ. (२) एक गाणारा पक्षी.

मूसीक़ी (موسیقی) स्त्री. ('अ.) संगीत; गानविद्या.

मूहिन (موهن) वि. ('अ.) अपमान करणारा.

मूहिम (موهم) वि. ('अ.) भ्रमात पाडणारा.

मूहिश (موحش) वि. ('अ.) (१) दुःखदायक. (२) खेदजनक.

मे'अदः (معدہ) पु. ('अ.) पोट.

मे'अमार (معمار) पु. ('अ.) गवंडी; बांधकाम करणारा.

मे'अमारी (معماری) स्त्री. ('अ.) गवंडघाचे काम.

मे'अराज (معراج) स्त्री. ('अ.) (१) शिडी; पायरी. (२) सर्वोच्च स्थान; परमगति. (३) मुहम्मद साहेबांना दिसलेला दिव्य प्रकाश. जिच्यावरून मुहम्मद साहेब स्वर्गात गेले ती शिडी.

मेख़ (میخ) स्त्री. (फ़ा.) खुंटी; खिळा; मेख. **–कोब** (کوب –); **–चू** (چو –) स्त्री. (फ़ा.) हतोडा. **–दोज़** (دوز –) वि. (फ़ा.) एका जागी खिळलेला; नुसता बसून राहाणारा; रिकामटेकडा.

मेग़ (میغ) पु. (फ़ा.) मेघ; ढग.

मेज़ (میز) स्त्री. (फ़ा.) (१) मेज; टेबल. (२) भोजनाचे पदार्थ. **–बान** (بان –) वि. (फ़ा.) आतिथ्य करणारा; यजमान. **–बानी** (بانی –) स्त्री. (फ़ा.) आतिथ्य.

मेवः (میوہ) पु. (फ़ा.) (१) फळ. (२) सुकी फळे (बदाम, पिस्ते वगैरे). **–फ़रोश** (فروش –) वि. (फ़ा.) (१) फळविक्रेता. (२) भाजी विकणारा.

मेश (میش) स्त्री. (फ़ा.) मेष; मेंढा; मेंढी. **–चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) काळेभोर डोळे असलेला.

मेहनत (محنت) स्त्री. ('अ.) (१) श्रम; परिश्रम; मजुरी. (२) व्यायाम. **–कश** (کش –) वि. ('अ.+फ़ा.) परिश्रम करणारा.

मेहनतानः (محنتانہ) पु. ('अ.) मेहनताना; पारिश्रमिक; मजुरी; फी.

मेहनती (محنتی) वि. ('अ.) परिश्रम करणारा; उद्योगी.

मेहमाँ (مہماں); **मेहमान** (مہمان) पु. (फ़ा.) अतिथी; पाहुणा. **–दार** (دار –); **–नवाज़** (نواز –) वि. (फ़ा.) आतिथ्यशील; पाहुणचारात आनंद मानणारा.

मेहमानी (مہمانی) स्त्री. (फ़ा.) आतिथ्य; पाहुणचार.

मेहमेज़ (مہمیز) स्त्री. (फ़ा.) टाच; घोडघाला टाच मारण्यासाठी बुटाच्या तळाला मारलेला खिळा.

मेहर (مہر) स्त्री. (फ़ा.) (१) प्रेम; माया; ममता. (२) दया; कृपा; करुणा.

मेहरबाँ (مہرباں); **मेहरबान** (مہربان) वि. (फ़ा.) (१) दयाळू; कृपाळू. (२) मित्र.

मेहरबानी (مہربانی) स्त्री. (फ़ा.) कृपा; दया; करुणा.

मैतः (میّت) वि. ('अ.) मेलेला; मृत.

मैदान (میدان) पु. (फ़ा.) (१) मैदान; मोकळी सपाट जमीन. (२) क्रीडांगण. (३) रणांगण. (४) शर्यतीचे मैदान; रेसकोर्स. (५) कार्यक्षेत्र.

मैदान-ए-'अमल (میدان عمل) पु. (फ़ा.+'अ.) कार्यक्षेत्र.

मैदान-ए-जंग (میدان جنگ) पु. (फ़ा.) रणक्षेत्र; समरांगण.

मैदः (میدہ) पु. (फ़ा.) सपीठ; बारीक पीठ.

मैमनत (میمنت) स्त्री. ('अ.) कल्याण; उन्नती.

मैमनः (میمنہ) पु. ('अ.) सैन्याचा उजवीकडील भाग.

मैमून (میمون) वि. ('अ.) शुभ; कल्याणकारक.

मैमून (میمون); **मैमूनः** (میمونہ) पु. (फ़ा.) वानर; कपी.

मैय (مے) स्त्री. (फ़ा.) मद्य; मदिरा. (अव्य.) सह; बरोबर. **-आशाम** (آشام –); **-कश** (کش –); **-ख्वार** (خوار –); **-गुसार** (گسار –); **-नोश** (نوش –); **-परस्त** (پرست –) वि. (फ़ा.) मद्यपी; दारुडा. **-कदः** (کدہ –); **-खानः** (خانہ –) पु. (फ़ा.) दारूचा गुत्ता; मदिरालय. **-खुश** (خوش –) वि. (फ़ा.) आंबटगोड. **-गूं** (گوں –) वि. (फ़ा.) दारूच्या रंगाचा; लालूस. **-फ़रोश** (فروش –) वि. (फ़ा.) दारू विकणारा; कलाल. **-साज़** (ساز –) वि. (फ़ा.) दारू बनविणारा.

मैयत (میت) स्त्री. ('अ.) (१) मृत्यू. (२) शव; प्रेत.

मैल (میل); **मैलान** (میلان) पु. ('अ.) (१) प्रवृत्ती; रुची. (२) ओढ; आकर्षण.

मैसरः (میسرہ) पु. ('अ.) सैन्याचा डावीकडील भाग.

मैसूर (میسور) वि. (फ़ा.) (१) सुगम; सरळ; सोपा. (२) संपन्न; समृद्ध.

मो'अजिज़ (معجز) वि. ('अ.) थक्क करणारा. **-निगार** (نگار –) वि. ('अ.+फ़ा.) अत्यंत उत्कृष्ट लेखक; लेखणीचा जादूगार.

मो'अजिज़ः (معجزہ) पु. ('अ.) चमत्कार; साधुसंत किंवा पैगंबर यांनी करून दाखविलेला दैवी चमत्कार.

मो'अजिब (معجب) वि. ('अ.) अभिमानी; अहंकारी; घमेंडखोर.

मो'अतक़िद (معتقد) वि. ('अ.) श्रद्धाळू; भक्त; धर्मावर श्रद्धा असणारा.

मो'अतकिफ़ (معتکف) वि. ('अ.) एकांतवासात ईश्वराधना करणारा.

मो'अतज़लः (معتزلہ) पु. ('अ.) ईश्वर दिसणे शक्य नाही, तो काही करीत, करवीत नाही, माणूस स्वतःच सर्व काही करतो असे मानणारा एक संप्रदाय.

मो'अतदिल (معتدل) वि. ('अ.) (१) समशीतोष्ण; (२) नेमस्त; मवाळ. (३) समतोल.

मो'अतबर (معتبر) वि. ('अ.) विश्वसनीय; भरवशाचा.

मो'अतमद (معتمد) वि. ('अ.) विश्वास; खात्रीचा.

मो'अतमिद (معتمد) वि. ('अ.) विश्वास टाकणारा; विश्वास ठेवणारा.

मो'अतरिद (معترض) वि. ('अ.) हरकत घेणारा; अडकाठी करणारा.

मो'अतरिफ़ (معترف) वि. ('अ.) स्वीकार, कबूल, मान्य करणारा.

मो'आताद (معتاد) स्त्री. ('अ.) प्रमाण; औषधाचा भाग; डोस. (वि.) व्यसनी.

मो'अती (معطی) वि. (फ़ा.) देणारा; दान करणारा; ईश्वर.

मोज़ः (موزہ) पु. (फ़ा.) (१) पायमोजा. (२) बूट. (३) पिंडरीच्या खालचा भाग. **-गीर** (گیر –) पु. स्वाराच्या पायाला चावणारा घोडा.

मोम (موم) पु. (फ़ा.) मेण. **-जामः** (جامہ –) पु. (फ़ा.) मेणकापड. **-बत्ती** (بتی –) स्त्री. (फ़ा.+हिं.) मेणबत्ती.

मोमिन (مومن) पु. ('अ.) (१) इमान (धर्मश्रद्धा) बाळगणारा; धर्मनिष्ठ; मुसलमान. (२) मुस्लिम विणकर.

मोमिया'ई (مومیائی) स्त्री. (फ़ा.) दगडातून निघणारा एक प्रकारचा औषधी चीक; शिलाजीत.

मोमी (موسی) वि. (फ़ा.) मेणाचा; मेणाच्या रंगाचा.

मोर (مور) स्त्री. (फ़ा.) मुंगी; मुंगळा.

मोरचाल (مورچال) पु. (फ़ा.) शत्रूवर मारा करण्यासाठी खणलेले खंदक.

मोरचः (مورچہ) पु. (फ़ा.) (१) गंज; जंग; कीट; (२) लहान मुंगी. (३) माऱ्याची जागा; मोर्चा; खाई; खंदक. **-बंदी** (بندی –) स्त्री. (फ़ा.) माऱ्याची जागा; खंदक तयार करणे. **-लेना** (لینا –) सामना करणे; लढा देणे.

मोहमल (مہمل) वि. ('अ.) (१) निरर्थक; अर्थहीन. (२) बेकार; लफंगा. (३) निरर्थक बडबड.

–गो (گو–) वि. ('अ.+फ़ा.) वाह्यात, वायफळ बडबड करणारा.

मौ'अिज़त (موعظت) स्त्री. ('अ.) सदुपदेश; हितोपदेश.

मौ'अिदत (موعدت) स्त्री. ('अ.) प्रतिज्ञा; वचन; वायदा.

मौक़'अ (موقع) पु. ('अ.) (१) संधी; योग्य वेळ; मोका. (२) घटनास्थळ; जागा.

मौक़िफ़ (موقف) पु. ('अ.) (१) उभे राहाण्याची जागा; स्थान. (२) निश्चय.

मौकिब (موكب) पु. ('अ.) सैन्य; फौज.

मौक़ूफ़ (موقوف) वि. ('अ.) (१) तहकूब; स्थगित. (२) पदच्युत; बडतर्फ. (३) परित्यक्त; सोडून दिलेला. (४) रद्द. (५) अवलंबित.

मौज (موج) स्त्री. **मौजः** (موجہ) पु. ('अ.) (१) पाण्याची लाट; लहर; तरंग. (२) मौज; मनाचा उत्साह; आनंद; तल्लीनता. **–ख़ेज़** (خیز –) वि. ('अ.+फ़ा.) नदी; समुद्र. **–ज़न** (زن –) वि. ('अ.+फ़ा.) लाटा उठत असलेला; उसळणारा.

मौज़ (موز) पु. ('अ.) (१) केळे. (२) केळीचे झाड.

मौज़ूं (موزوں) वि. ('अ.) (१) उचित; योग्य. (२) लायक. (३) समतोल; अक्षरे, मात्रा वगैरे वरोवर असलेली (कविता). **–तब'अ** (طبع –) वि. ('अ.) कविता करणारा; काव्याची अभिरुची असणारा.

मौजूद (موجود) वि. ('अ.) (१) विद्यमान; जिवंत; उपस्थित; हजर. (२) तयार. (३) उपलब्ध.

मौजूदगी (موجودگی) स्त्री. ('अ.) (१) उपस्थिती; हजिरी. (२) अस्तित्व.

मौजूदात (موجودات) स्त्री. ['अ. 'मौजूदः' (موجود) चे अनेक.] (१) जगातील सर्व विद्यमान वस्तू, गोष्टी; अखिल विश्व. (२) गणती.

मौजूदः (موجود) वि. ('अ.) सध्याचा; चालू; विद्यमान; सद्यःस्थितीतील.

मौज़ूनियत (موزونیت) स्त्री. ('अ.) (१) औचित्य. (२) योग्यता. (३) तब्येत ठीक असणे.

मौत (موت) स्त्री. ('अ.) (१) मृत्यू; निधन; मरण. (२) विनाश. (३) दुर्दशा.

मौतिन (موطن) पु. ('अ.) जन्मभूमी; मातृभूमी.

मौद'अ (موضع) पु. ('अ.) (१) खेडे; गाव. (२) स्थान.

मौद'अ (موضوع) वि. ('अ.) ठेवलेला. (पु.) विषय; मुद्दा.

मौफ़ूर (موفور) वि. ('अ.) पुष्कळ; अधिक.

मौरिद (مورد) वि. ('अ.) (१) मुक्कामाची जागा. (२) योग्य; पात्र.

मौरिद-ए-'अिनायत (مورد عنایت) वि. ('अ.) कृपापात्र.

मौरूसी (موروثی) वि. ('अ.) (१) वडिलार्जित; पैतृक. (२) पिढ्यान्‌पिढ्या कसल्यामुळे कुळाची मालकी जिच्यावर प्रस्थापित झाली आहे अशी (जमीन).

मौलवी (مولوی) पु. ('अ.) (१) इस्लामी धर्माचार्य. (२) पंडित; विद्वान. (३) मुलांना शिकविणारा.

मौलॉ (مولیٰ) पु. ('अ.) (१) स्वामी; मालक. (२) ईश्वर. (३) गुलाम. (४) मुक्त केलेला गुलाम. (५) मित्र. (६) शेजारी. (७) नेता; अध्यक्ष.

मौलाना (مولانا) पु. ('अ.) विद्वान; पंडित.

मौलिद (مولد) स्त्री. ('अ.) जन्मभूमी.

मौलूद (مولود) पु. ('अ.) (१) नुकतेच जन्मलेले मूल; शिशू. (२) मुहम्मद साहेबांचा जन्मोत्सव. (३) वाढदिवस; जयंती.

मौसम (موسم) पु. ('अ.) (१) ऋतू; मोसम; हंगाम. (२) योग्य वेळ; मौसम.

मौसूफ़ (موصوف) वि. ('अ.) (१) प्रशंसित. (२) उल्लेखित; सदरहू. (व्या.) विशेष्य.

मौसूम (موسوم) वि. ('अ.) नावाचा; नामक.

मौसूल (موصول) वि. ('अ.) (१) मिळालेला; वसूल झालेला. (२) जोडलेला; चिकटलेला.

मौहूब (موهوب) वि. ('अ.) दिलेला; बक्षीस दिलेला.

मौहूम (موهوم) वि. ('अ.) (१) काल्पनिक. (२) भ्रममूलक; भ्रमात्मक.

यंग (ینگ) पु. (फ़ा.) (१) कायदा. (२) परंपरा. (वि.) (१) समान; तुल्य. (२) प्रकाशमान; तेजस्वी.

यंगा (ینگا); **यंगः** (ینگہ) स्त्री. (फ़ा.) (१) भावजय; वहिनी. (२) काकी. (३) विवाहित स्त्री. (४) न्हाव्याची पत्नी.

यंबू'अ (ینبوع) पु. ('अ.) (१) नदी. (२) झरा; प्रवाह.

य'अक़ूब (یعقوب) पु. ('अ.) हजरत यूसुफ यांचे पिता. (आपल्या पुत्राच्या वियोगामुळे हे आंधळे झाले होते).

य'अनी (یعنی) अव्य. ('अ.) म्हणजे; अर्थ असा की. **–चि** (چہ –) अव्य. ('अ.+फ़ा.) का ? याचा अर्थ काय ?

य'अफ़ूर (یعفور) पु. ('अ.) हरीण; मृग.

य'अबूब (یعبوب) पु. ('अ.) (१) वेगवान घोडा. (२) वेगाने वाहणारा प्रवाह.

य'अमल (یعمل) पु. ('अ.) घष्टपुष्ट व मालवाहू उंट.

य'अमूर (یعمور) पु. ('अ.) शेळीचे किंवा मेंढीचे कोकरू.

य'असूब (یعسوب) पु. ('अ.) (१) मधमाशांचा राजा; राणीमाशी. (२) पुढारी; सरदार.

य'ऊस (یئوس) वि. ('अ.) निराश; हताश; नाउमेद.

यक (یک) वि. (फ़ा.) एक (पु.) एक्का. [म्हण : **यक अनार सद बीमार** (یک انار صد بیمار) एक डाळिंब आणि खाणारे मात्र शेकडो; अपुरी वस्तू.] **–अस्पः** (اسپ –) वि. (फ़ा.) (१) एका घोडयाचा मालक. (२) एकाकी; एकटा जाणारा घोडेस्वार. (पु.) सूर्य. **–क़लम** (قلم –) वि. (फ़ा. + 'अ.) संपूर्ण; सर्व. (अव्य.) (१) ताबडतोब. (२) अत्यंत; पूर्णपणे; बिलकुल. (३) जरूर; अवश्य. **–गूनः** (گونہ –) वि. (फ़ा. + 'अ.) **–चंद** (چند –) वि. (फ़ा.) किंचित; थोडासा. **–चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) (१) एकाक्ष; तिरळा. (२) समदर्शी. (पु.) सूर्य. **–जदी** (جدی –) वि. (फ़ा.+'अ.) एका आजोबाची (पितामहाची) संतती. **–ज़बां** (زباں –) वि. (फ़ा.) (१) सहमत; एकमत. (२) आपल्या शब्दावर दृढ राहाणारा. **–जां** (جاں –) वि. (फ़ा.) घनिष्ठ; प्राणप्रिय. **–जा** (جا –) वि. (फ़ा.) एकत्रित; सम्मिलित; सामील. **–जा'ई** (جائی –) वि. (फ़ा.) (१) एकत्र आलेले. (२) एकूण. (स्त्री.) एकत्रता. **–जान दो क़ालिब** (جان دو قالب –) अत्यंत घनिष्ठ मित्र. **–जिन्सी** (جنسی –) स्त्री. (फ़ा.) एकाच वंशाचे असणे; समवयस्क असणे. **–जिहती** (جہتی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) (१) सहमती; एकमत. (२) मैत्री. **–तन** (تن –); **–तनः** (تنہ –) वि. (फ़ा.)एकटा; एकाकी. **–तरफ़ः** (طرفہ –) वि. (फ़ा. + 'अ.) (१) एका बाजूचा. (२) एकतर्फी; पक्षपातयुक्त. **–तही** (تہی –) वि. (फ़ा.) एकेरी. (कपडा) **–ता** (تا–) वि. (फ़ा.) (१) अद्वितीय; अनुपम; ईश्वर; एकटा; वेगळा. **–ता'ई** (تائی –) स्त्री. (फ़ा.) (१)अद्वितीयत्व.(२) अद्वैत. (३) एकटेपणा. **–तार** (تار–) वि.(फ़ा.) किंचित; थोडा. **–तारः** (تارہ –) पु. (फ़ा.) (१) एकतारी (वाद्य). (२) एक प्रकारची मलमल. **–दस्त** (دست –) वि. (फ़ा.) (१) समान. (२) संपूर्ण. **–दिगर** (دگر –) वि. (फ़ा.) परस्पर. **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) (१) एकदिलाचा; घनिष्ठ. (२) संयुक्त; संघटित. **–दिलः** (دلہ –) वि. (फ़ा.) (१) शूर; वीर. (२) सहमत. **–दिश** (دش –) वि. (फ़ा.) संकरज; जारज. **–दीगर** (دیگر –) वि. (फ़ा.) परस्पर; आपसातील. **–नफ़स** (نفس –) अव्य. (फ़ा.+'अ.) क्षणभर; थोडा वेळ.(वि.) घनिष्ठ मित्र; सहकारी. [म्हण : **यक न. शुद दो शुद** (یک نہ شد دو شد) आधीच असलेल्या संकटात भर पडणे; भरीस भर.] **–न'अल** (نعل –) वि. अत्यंत अधिक; मुबलक. [म्हण : **यक पीरी व सद 'ऐब** (یک پیری و صد عیب) एक म्हातारपण शंभर रोगांच्या बरोबर आहे.] **–ब यक** (بیک –) (अव्य.) (फ़ा.) अचानक; अकस्मात; एकाएकी. **–बारगी** (بارگی –) अव्य. (फ़ा.) (१) अचानक; अकस्मात. (२) एकूण. (३) एकदा. **–मुश्त** (مشت –) अव्य. (फ़ा.) (१) एकाच वेळी. (२)एक हाती. (३) एकरकमी; एकदम. **–रंग** (رنگ –) वि. (फ़ा.) (१) आतून बाहेरून सारखा. (२) निष्कपट; मित्र. **–रक़ीब** (رقیب –) पु. (फ़ा.) ईश्वर; खुदा. **–रां** (راں –) पु. (फ़ा.) अस्सल जातीचा घोडा. **–रा'ई** (رائی –) स्त्री. (फ़ा.) एकमत; मतैक्य. **–रिकाबी** (رکابی –) स्त्री. (फ़ा.) (१) कार्यतत्परता; तल्लीनता. (२) शीघ्रता. (वि.) खास स्वारीचा घोडा. **–रिश्तः** (رشتہ –) वि. (फ़ा.) अनुकूल. **–रुखी** (رخی –) वि. (फ़ा.) एकपक्षीय; एकतर्फी. (स्त्री.) दोहोबाजूंनी सारखेच दिसणे. **–रू** (رو –) वि. (फ़ा.) घनिष्ठ; सच्चा मित्र. **–लख्त** (لخت –) वि. (फ़ा.) संपूर्ण; सर्व. (अव्य.) (१) पूर्णपणे; अत्यंत; बिलकुल. (२) अचानक; आकस्मिकपणे. **–शंबः** (شنبہ –) पु. (फ़ा.) रविवार. **–शिस्त** (شست –) वि. (फ़ा.) सहचर; साथी. **–सर** (سر –) अव्य.(फ़ा.) पूर्णपणे; अत्यंत; मुळीच.(वि.) समग्र; संपूर्ण. **–सां** (ساں –) वि. (फ़ा.) एकसारखा; समान; बरोबर. **–सानियत** (سانیت –) स्त्री. (फ़ा.) साम्य; सादृश्य; बरोबरी. **–सू** (سو –) अव्य. (फ़ा.) एकीकडे. (वि.) निश्चित; एकाग्र; सेवानिवृत्त. **–सू'ई** (سوئی –) स्त्री. (फ़ा.) (१) निश्चितता. (२) निवृत्ती. (३) फुरसत. (४) एकांत.

यक़क़ (یقق) वि. ('अ.) अत्यंत शुभ्र.

यक़ज़ः (یقظہ) पु. ('अ.) (१) जागृती. (२) निद्रानाश (रोग).

यकायक (یکایک) अव्य. (फ़ा.) (१) एकाएकी; अचानक; अकस्मात. (२) त्वरित.

यकीता (یکیتا) पु. (फ़ा.) शिक्षक; अध्यापक.

यक़ीन (یقین) पु. ('अ.) (१) दृढविश्वास; खात्री. (२) भरवसा. **–लाना** (لانا –) विश्वास ठेवणे; मानणे.

यक़ीनन् (یقیناً) अव्य. ('अ.) नक्की; निश्चितपणे; खात्रीपूर्वक; अवश्यमेव; निःसंदेह.

यक़ीनी (یقینی) वि. ('अ.) निश्चित; नक्की.

यकुम (یکم) वि. (फ़ा.) पहिला; प्रथम.

यके (یکے) वि (फ़ा.) एक; कोणीतरी. **–ब'अद दिगरे** (بعد دیگرے –) अव्य. (फ़ा.) एकामागून दुसरा; एकामागून एक; उत्तरोत्तर.

यक्कः (یکہ) वि. (फ़ा.) (१) एकटा; एकाकी. (२) अनुपम; अद्वितीय. (पु.)एक्का; एका घोडयाकडून चालविणे जाणारे टांग्यासारखे एक वाहन. **–ताज़** (تاز –) वि. (फ़ा.) एकटा अनेकांशी लढणारा; महारथी. **–वान** (بان –) पु. (फ़ा.) एक्केवाला.

–ओ-तन्हा (– و تنها) वि. (फ़ा.) एकाकी; एकटा.

यख़ (یخ) पु. (फ़ा.) बर्फ; गोठलेले पाणी; हिम. **–ख़ुर्दः** (خورده –) वि. (फ़ा.) उपेक्षित. **–चः** (چ –) पु. (फ़ा.) गार (पावसाची). **–दान** (دان –) पु. (फ़ा.) तयार झालेले खाद्यपदार्थ ठेवण्याचे कपाट; रेफ्रिजरेटर.

यख़नी (یخنی) स्त्री. (फ़ा.) (१) उकडलेल्या मांसाचे पाणी, रस्सा. यात मसाला घातलेला नसतो व ते रोग्यांना दिले जाते. (२) जरुरीच्या वेळी उपयोगी पडावे म्हणून साठविलेले धान्य किंवा घन.

यगाँ (یگاں) वि. (फ़ा.) (१) एकटा; एकाकी. (२) अद्वितीय. (३) सामान्य लोक. **–यगाँ** (یگاں –) अव्य. (फ़ा.) एकामागून एक.

यगानगत (یگانگت); **यगानगी** (یگانگی) स्त्री. (फ़ा.) (१) नाते; स्वजनता. (२) सहमती; ऐक्य. (३) एकटेपणा; एकाकीपणा. (४) अद्वितीयत्व.

यगानः (یگانہ) वि. (फ़ा.) (१) स्वजन; आत्मीय; नातेवाईक. (२) अद्वितीय; अनुपम. (३) एकटा; एकाकी. **–गो** (گو –) वि. (फ़ा.) सत्यवक्ता; सत्यवादी.

यग़ाम (یغام) पु. (फ़ा.) जंगलांत भटकणारी भुते-खेते.

यग़ूस़ (یغوث) पु. ('अ.) सिंहाच्या आकाराचा एक देव. याची पूजा इस्लामच्या पूर्वी अरबस्तानात केली जात असे.

यग़मा (یغما) पु. (तु.) लुटालूट; लूटमार; दरवडा.

यज़क (یزک) पु.('अ.) सैन्याची आघाडी; सैन्य. **–दार** (دار –) पु. (फ़ा.) आघाडीवरील सैन्याचा सेनापती.

यज़ीद (یزید) पु. ('अ.) अमीर मुआवियाचा दुराचारी व दुष्ट मुलगा. याने इमाम हुसैन यांची हत्या घडवून आणली होती. (वि.) क्रूर; निर्दय; घमेंडखोर.

यज़्द (یزد) पु. (फ़ा.) इराणच्या शीराझ प्रांतातील एक शहर.

यज़्दाँ (یزداں); **यज़्दान** (یزدان) पु. (फ़ा.) अग्निपूजक (पारशी) लोकांचा पुण्याचा देव. (पापाच्या देवाला 'अहरमन' (اهرمن) अशी संज्ञा आहे.) **–परस्त** (پرست –) वि. (फ़ा.) अग्निपूजक; पारशी; आस्तिक.

यज़्दानी (یزدانی) वि. (फ़ा.) ईश्वरी. (पु.) पारशी.

यज़्नः (یزنہ) पु. (फ़ा.) मेहुणा; बहिणीचा नवरा.

यताक़ (یتاق) पु. (तु.) पहारा; देखरेख.

यतीम (یتیم) वि. पु. ('अ.) (१) अनाथ; पोरका मुलगा. (२) मोठा मोती; बहुमूल्य रत्न. **–उत्-तरफ़ैन** (الطرفین –) वि. ('अ.) आई व बाप दोन्ही नसलेला. **–खानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) अनाथालय.

यतीमी (یتیمی) स्त्री.('अ.) अनाथ अवस्था; पोरकेपणा.

यत्न (یتن) पु. ('अ.) पायाळू मूल.

यद (ید) पु. ('अ.) हात.

यद-ए-बैज़ा (یدبیضا) पु. ('अ.) (१) चकाकणारा हात. (२) हजरत मूसा (मोझेस) यांचा हात. त्यात ईश्वरी तेज भरलेले होते. (३) चमत्कार.

यदक (یدک) पु. (फ़ा.) खास (खाशा) स्वारीचा घोडा.

यदु'ल्लह् (یدالله) पु. ('अ.) ईश्वराचा हात; ईश्वरी सहायता.

यदैन (یدین) पु. ('अ.) दोन्ही हात.

यनग्लू (ینگلو) स्त्री. (फ़ा.) (१) बाजारपेठ. (२) प्रवाशांचा तांडा.

यफ़न (یفن) पु. ('अ.) 'साठी बुद्धी नाठी' झालेला म्हातारा.

यफ़ा'अ (یفاع) पु. ('अ.) टेकडी.

यफ़्तः (یفتہ) पु. (फ़ा.) नावाची पाटी; साइन बोर्ड.

यब (یب) वि. (फ़ा.) वृद्ध; म्हातारा.

यबस (یبس) पु. ('अ.) शुष्क होणे; वाळणे.

यबाब (یباب) वि. ('अ.) वैराण; ओसाड (जमीन); उध्वस्त; शुष्क; कोरडी (जमीन).

यबूसत (یبوست) स्त्री. ('अ.) (१) कोरड; कोरडेपणा. (२) बद्धकोष्ठता.

यम (یم) पु. (फ़ा.) नदी.

यमन (یمن) पु. ('अ.) अरबस्तानातील एक देश. येथील लाल रत्न अत्यंत उत्कृष्ट समजले जाते.

यमनी (یمنی); **यमान** (یمان); **यमानी** (یمانی) वि. ('अ.) यमनचा; यमनसंबंधी.

यमाम (یمام) पु. ('अ.) जंगली कबुतर.

यमीन (یمین) वि. ('अ.) उजवा. (पु.) (१) उजवा हात. (२) शपथ. (३) शक्ती. (४) श्रेष्ठत्व.

यमीन-ओ-यसार (یمین و یسار) पु.('अ.) डावी-उजवी-कडील भाग; सैन्याची डावी व उजवी बाजू.

यमीनः (یمینہ) पु. ('अ.) पोट; मोठे आतडे; पंक्वाशय.

यरक़ (یرق) पु. (तु.) पाप; गुन्हा.

यरक़ान (یرقان)पु. ('अ.) (१) कावीळ. (२) पंडूरोग.

यरा (یرا) स्त्री. (फ़ा.) सुरकुती; आठी.

यरा'अः (یراعہ) पु. ('अ.) (१) काजवा. (२) मुरली. (३) बोरू.

यराक़ (یراق) पु. (तु.) शस्त्रास्त्र; युद्धोपयोगी सामग्री.

यराग (يراغ) पु. (तु.) बेगाने धावणारा, टपालाचा घोडा.

यर्ग़माल (يرغمال) पु. (तु.) आपल्या मुलाला किंवा इतर प्रिय व्यक्तीला ओलीस ठेवणे; जामीन.

यर्ता (يرغا); **यर्तः** (يرغم) पु. (तु.) (१) वेगवान घोडा. (२) भरभर चालणारा माणूस. (३) हल्ला; आक्रमण.

यर्तू (يرغو) स्त्री. (तु.) (१) राजनीती; राजकारण. (२) शिक्षा; दंड.

यर्म'अ (يرمع) पु. ('अ.) शुभ्र व चमकदार दगड (रत्न).

यल (يل) पु. (फ़ा.) (१) मल्ल; पैलवान. (२) धष्ट-पुष्ट. (३) शूर; वीर.

यलब (يلب); **यल्बः** (يلبم) पु. ('अ.) (१) कातडी चिलखत. (२) कातडी ढाल.

यलूज (يلوج) पु. (तु.) ईश्वरी दूत; पैगंबर; प्रेषित.

यलः (يلم) वि. (फ़ा.) (१) सोडून दिलेला; मुक्त केलेला. (२) डागलेली; सोडलेली; उडविलेली (तोफ किंवा बंदूक). (स्त्री.) व्यभिचारीणी.

यल्गार (يلغار); **यल्ग़ार** (يلغار) स्त्री. (तु.) हल्ला; आक्रमण; चढाई.

यल्दा (يلدا) स्त्री. (फ़ा.) (१) सर्वांत मोठी रात्र. (सूर्य धनू राशीतील ११ व्या अंशावर येतो तेव्हा ही रात्र पडते.) ही रात्र अशुभ मानली जाते. (२) काळोखी रात्र.

यशब (يشب); **यशम** (يشم) पु. (फ़ा.) गोमेद; एक प्रकारचा हिरव्या रंगाचा टणक दगड. (हृदयाची धडपड थांबविण्याच्या कामी याचा उपयोग होतो).

यश्माक़ (يشماق) पु. (तु.) स्त्रियांनी डोकीला बांधावयाचा रुमाल.

यसर: (يسر) पु. ('अ.) डावीकडून उजवीकडे लिहिल्या जाणाऱ्या लिप्या (नागरी, इंग्रजी वगैरे).

यसल (يسل) पु. ('अ.) सैन्याची रांग; पंक्ती.

यसाक़ (يساق) पु. (तु.) (१) लढाईची तयारी. (२) दरबार.

यसार (يسار) पु. ('अ.) (१) डावा हात; डावी बाजू; वाम पक्ष. (२) श्रीमंत.

यसावुल (يساول) पु. (तु.) (१) चोपदार. (२) दरबार; सैन्य वगैरेची व्यवस्था ठेवणारा.

यसिर (يسر) वि. ('अ.) सुगम; सोपा.

यसीर (يسير) वि. ('अ.) (१) सहज; सोपा. (२) थोडा. (हिं.) मातृहीन बालक.

यस्रिब (يثرب) पु. ('अ.) मदीना (अरबस्तानचे प्रसिद्ध शहर).

यहूद (يهود) पु. [हिब्रू 'यहूदी' (يهودى) चे अनेक.] (१) यहुदी लोक. (२) यहुद्यांचा देश.

यहूदा (يهودا) पु. ('अ.) हजरत यूसुफ यांचे थोरले बंधू.

यहूदी (يهودى) पु. (हिब्रू) हजरत मूसा (मोझेस) चा अनुयायी; यहुदी; ज्यू; इस्त्राईली.

या (يا) अव्य. (फ़ा.) अथवा; किंवा ('अ.) संबोधनाचा अथवा आश्चर्य व्यक्त करणारा शब्द; हे, अरे! (स्त्री.) अरबीतील ईकार, एकार व यकार दर्शविणारे अक्षर (ے).

या-ए-म'अरूफ़ (یاے معروف) स्त्री. ('अ.) 'ई' कार-दर्शक 'ये' (ی).

या-ए-मजहूल (یاے مجہول) स्त्री. ('अ.) 'ए' कार दर्शक 'ये' (ے).

याक़ूत (ياقوت) पु. ('अ.) लाल (रत्न); माणिक.

याक़ूत-ए-रवाँ (ياقوت روان) पु. ('अ. + फ़ा.) लाल मद्य.

याक़ूती (ياقوتى) वि. ('अ.) याकूताच्या रंगाचा; लाल. (स्त्री.) ज्यात याकूत घातलेला आहे असे एक पौष्टिक औषध.

याक़ः (ياقم) पु. (तु.) सदऱ्याचा गळा; कॉलर.

याख़्तः (ياختم) वि. (फ़ा.) (१) व्यक्त; प्रकट. (२) एखादे काम करण्यासाठी बाहेर पडलेला.

याग़ (ياغ) पु. (तु.) तेल; रोगण.

याग़ी (ياغى) वि. (तु.) (१) बंडखोर. (२) शत्रू.

याज़दः (يازده) वि. (फ़ा.) अकरा (११).

याज़ाँ (يازان) वि. (फ़ा.) हल्ला, आक्रमण करणारा; हात पुढे करणारा.

याज़िश (يازش) स्त्री. (फ़ा.) (१) इच्छा; इरादा. (२) हस्तक्षेप.

याजूज-ओ-माजूज (ياجوج و ماجوج) पु. ('अ.) हजरत नूह यांच्या नातवाचे वंशज. हे अत्यंत भांडखोर व उपद्रवकारक होते.

याद (ياد) स्त्री. (फ़ा.) (१) स्मरण; आठवण; स्मृती. (२) स्मारक. (३) स्मरणशक्ती. **-आवरी** (آورى –) स्त्री. (फ़ा.) (१) आठवण काढणे. (२) पत्र लिहिणे. (३) खुशाली विचारणे. **-गार** (گار –); **-गारी** (گارى –) स्त्री. (फ़ा.) स्मारक; स्मृतीचिन्ह. **-दाश्त** (داشت –) स्त्री. (फ़ा.) (१) स्मरणशक्ती; स्मरण. (२) आठवणीसाठी वहीत केलेली नोंद; स्मरणवही; स्मरणपत्र. **-दिहानी** (دهانى –) स्त्री. (फ़ा.) आठवण करणे; आठवण देणे. **-दिही** (دهى –) स्त्री. (फ़ा.) आठवण ठेवणे. **-फ़रामोश** (فراموش –) वि. (फ़ा.) विसराळू. **-फ़र्मा'ई** (فرمائى –) स्त्री. (फ़ा.)

(१) आठवण काढणे. (२) जवळ बोलावणे. **–बूद** (بود –) स्त्री. ('अ.) (फ़ा.) स्मृतीचिन्ह; स्मारक.

याद-ए-ऐयाम (یاد ایام) स्त्री. (फ़ा. + 'अ.) जुन्या काळची सुखकर आठवण.

यादर (یادر) पु. (फ़ा.) प्रत्येक इराणी महिन्याची बारावी तारीख.

यादशबख़ैर (یادش بخیر) वा. (फ़ा.+'अ.) ज्याची आठवण आपण काढीत आहोत तो खुशाल राहो. (अनुपस्थित व्यक्तीविषयी उच्चारले जाणारे वाक्य).

यादः (یاد٭) पु. (फ़ा.) स्मरणशक्ती.

यानः (یانہ) पु. (तु.) दिशा; बाजू.

याफ़ः (یافہ) पु. (तु.) कपडयाचा गळा, कॉलर. (फ़ा.) वायफळ बडबड.

याफ़्त (یافت) स्त्री. (फ़ा.) (१) लाभ; प्राप्ती; मिळकत. (२) लाच. **–नी** (نی –) वि. (फ़ा.) मिळण्यास योग्य; येणे; बिल.

याफ़्तः (یافتہ) प्रत्य. (फ़ा.) मिळविलेला; ज्याने मिळविला आहे असा. [उदा. 'तअलीम याफ़्तः' (تعلیم یافتہ) वि. ('अ.+फ़ा.) सुशिक्षित].

याब (یاب) प्रत्य. (फ़ा.) (१) मिळणारा. [उदा. 'कमयाब' (کمیاب) वि. (फ़ा.) दुष्प्राप्य]. (२) मिळविणारा. [उदा. 'फ़तह याब.' (فتح یاب) वि. ('अ.+फ़ा.) विजयी; विजेता].

याबान् (یابان) पु. ('अ.) जपान (देश).

याबिंदगी (یابندگی) स्त्री. (फ़ा.) प्राप्ती; मिळविणे.

याबिंदः (یابندہ ٭) वि. (फ़ा.) प्राप्त करणारा, मिळविणारा.

याबिस (یابس) वि. ('अ.) शुष्क; कोरडा.

याबी (یابی) स्त्री. (फ़ा.) प्राप्ती; मिळविणे. [शब्दाच्या शेवटी येणारा प्रत्यय. उदा. 'फ़तह याबी' (فتح یابی) स्त्री. ('अ.+फ़ा.) विजयप्राप्ती].

याबू (یابو) पु. (तु.) तट्टू; लहान घोडा.

याम (یام); **यामः** (یامہ) पु. (फ़ा.) टपालाचा घोडा.

यामिन (یامن) अव्य. ('अ.) उजवीकडे. (पु.) उजवी बाजू.

यार (یار) पु. (फ़ा.) (१) मित्र. (२) मदतगार. (३) प्रेमपात्र; माषूक. (४) जार; वेश्येचा प्रियकर. (प्रत्य.) असणारा; वाला. [उदा. 'होशयार' (هوش یار) वि. (फ़ा.) शुद्धी असलेला]. **–फ़रोश** (فروش –) वि. (फ़ा.) मित्राची स्तुती करणारा, खुशामत्या. **–बाज़** (باز –) स्त्री. (फ़ा.) व्यभिचारीणी; बदफैली स्त्री. **–बाश** (باش –) वि. (फ़ा.) सर्वांशी मैत्री ठेवणारा; मिळून मिसळून वागणारा. **–मंद** (مند –) वि. (फ़ा.) (१) खरा मित्र. (२) मदतगार.

यार-ए-ग़ार (یار غار) पु. (फ़ा.+'अ.) खरा व घनिष्ठ मित्र. (हजरत मुहम्मद साहेब गुहेत लपले असता त्यांच्याबरोबर असलेले अबुबक्र सिद्दीक यांच्याकडून हा शब्द बनला आहे).

यार-ए-जानी (یار جانی) पु. (फ़ा.) जानी दोस्त; प्राणप्रिय मित्र.

यारक (یارک) स्त्री. (फ़ा.) गर्भाशय.

यारगी (یارگی) स्त्री. (फ़ा.) सामर्थ्य; जोर.

यारनामः (یارنامہ) पु. (फ़ा.) पुण्यकर्म; सत्कृत्य.

यारब (یارب) अव्य. (फ़ा. + 'अ.) हे ईश्वरा ! अरे देवा !

यारस्तः (یارستہ) वि. (फ़ा.) शक्तिशाली.

यारां (یاراں) पु. [फ़ा. 'यार' (یار) चे अनेक.] मित्रमंडळी.

यारा (یارا) पु. (फ़ा.) (१) सामर्थ्य; शक्ती. (२) हिम्मत. (३) सहनशीलता.

यारा'ई (یارائی) स्त्री. (फ़ा.) (१) साह्य; मदत. (२) उपचार; इलाज.

यारान-ए-'अदम (یاران عدم); **यारान-ए-रफ़्तः** (یاران رفتہ) पु. (फ़ा.+'अ.) मेलेले मित्र; परलोकवासी.

यारानः (یارانہ) पु. (फ़ा.) मैत्री. (अव्य.) मित्रासारखा; मैत्रीपूर्ण.

यारी (یاری) स्त्री. (फ़ा.) (१) मैत्री. (२) मदत. **–गर** (گر –) वि. (फ़ा.) मदतगार.

यारः (یارہ ٭) पु. (फ़ा.) (१) कंकण; बांगडी. (२) सामर्थ्य. (३) अदमास.

याल (یال) स्त्री. (पु.) (फ़ा.) (१) गळा; मान. (२) आयाळ (घोडयाची). **–गूपाल** (گوپال –) पु. (फ़ा.) वैभव; थाटमाट.

यालः (یالہ) पु. (फ़ा.) शिंग; शृंग.

यावर (یاور) वि. (फ़ा.) सहाय्यक; मदतगार; समर्थक.

यावरी (یاوری) स्त्री. (फ़ा.) साह्य; मदत.

यावः (یاوہ ٭) वि. (तु.) (१) निरर्थक; व्यर्थ. (२) वाह्यात; वायफळ. **–गो** (گو –); **–दिरा** (درا –); **–सरा** (سرا –) वि. (तु. + फ़ा.) बडबडया; घमेंडखोर.

यास (یاس) स्त्री. ('अ.) निराशा; नाउमेदी. **–अंगेज़** (انگیز –) वि. ('अ. + फ़ा.) निराशाजनक. **–आमेज़** (آمیز –) वि. ('अ.+फ़ा.) निराशापूर्ण.

यास (یاس) स्त्री. (फ़ा.) चमेली; जाई.

यासज (یاسج) पु. (फ़ा.) (१) दुधारी बाण. (२) भाला. (३) दुःखिताचा निःश्वास.

यासमन (یاسمن); **यासमीन** (یاسمین); **यासमून** (یاسمون) स्त्री. ('अ.) चमेली; जाई.

यासा (یاسا) पु. (तु.) (१) विलाप; मृत्युशोक. (२) वध; कत्तल. (३) लुटालूट. (४) प्रतिहिंसा.

यासीन (یاسین) स्त्री. ('अ.) मरणोन्मुख मुस्लिम व्यक्तीजवळ म्हटला जाणारा कुराणातील एक अध्याय (सूरा). याच्या प्रारंभी 'यासीन' हा शब्द आलेला आहे.

यासः (یاسہ) पु. (फ़ा.) (१) इच्छा; अभिलाषा. (२) आदेश; हुकूम. (३) राजकारण. (४) कायदा.

याहू (یاهو) पु. (फ़ा.) 'याहू याहू' असे बोलणारे पांढऱ्या रंगाचे एक कबुतर.

याहू (یاهو) अव्य. ('अ.) हे ईश्वरा !

यिर्लीग़ (یرلیغ) पु. (तु.) राजाज्ञा; फर्मान.

यील (ییل) पु. (तु.) वर्ष; संवत्सर.

यीलाक़ (ییلاق) पु. (तु.) थंड हवेचे ठिकाण.

युबूसत (یبوست) स्त्री. **युबुस** (یبس) पु. ('अ.) शुष्कता; कोरडेपणा.

युम्न (یمن) पु. ('अ.) (१) भाग्य; कल्याण. (२) यश; सफलता.

युराश (یراش) पु. (फ़ा.) (१) प्रस्थान; कूच. (२) लक्ष; ध्यान.

युल (یول) पु. (तु.) मार्ग; रस्ता. **–ची** (–چی) वि. (तु.) (१) मार्गदर्शक. (२) पहारेकरी. (३) रस्त्यात बसून भीक मागणारा.

युसुर (یسر) पु. ('अ.) (१) सुगम, सोपे असणे (२) श्रीमंती. (३) भाग्य.

यूज (یوز) पु. (फ़ा.) (१) चित्ता (प्राणी). (२) शोधणे.

यूज (یوز) वि. (तु.) शंभर (१००). **–बाशी** (–باشی) पु. (तु.) शंभर लोकांचा नेता; शंभर सैनिकांवरील अधिकारी.

यूज़ीदः (یوزیدہ) वि. (फ़ा.) (१) शोधलेला; तपास केलेला. (२) बोलावलेला.

यूनान (یونان) पु. (हिब्रू) ग्रीस (देश).

यूनानी (یونانی) वि. (हिब्रू+फ़ा.) (१) ग्रीक (भाषा व लोक). (२) एक उपचार पद्धती.

यूनुस (یونس) पु. ('अ.) एक पैगंबर. यांना माशाने गिळले होते.

यूरिश (یورش) स्त्री. (तु.) (१) हल्ला; आक्रमण. (२) भांडण; दंगा.

यूसुफ़ (یوسف) पु. ('अ.) एक पैगंबर. हे अत्यंत देखणे होते. मिस्र (ईजिप्त) देशाची सुंदरी जुलेखा यांच्यावर लुब्ध होती. **–जमाल** (–جمال) वि. ('अ.) अत्यंत सुंदर.

यूसुफ़-ए-सानी (یوسف ثانی) वि. ('अ.) प्रति-यूसुफ; अत्यंत देखणा.

यूह (یوح) पु. ('अ.) सूर्य.

यूहाँ (یوحنّا) पु. ('अ.) एक प्रकारचा साप. याच्या बाबतीत अशी समजूत आहे की तो हजार वर्षे जगला तर त्याला बाटेल ते रूप धारण करता येते.

योग़ (یوغ) पु. (फ़ा.) बैलाच्या मानेवरील जू.

योयः (یویہ) पु. (फ़ा.) मनीषा; इच्छा; संकल्प.

यौम (یوم) पु. ('अ.) दिन; दिवस.

यौम-उत्-तनाद (یوم التناد); **यौम-उन्-नशूर** (یوم النشور) पु. ('अ.) अंतिम निवाडघाचा दिवस; प्रलयदिन.

यौम-उल्-अर्बा'अ (یوم الاربع) पु. ('अ.) बुधवार.

यौम-उल्-अहद (یوم الاحد) पु. ('अ.) रविवार.

यौम-उल्-इस्नैन (یوم الاثنین) पु. ('अ.) सोमवार.

यौम-उल्-खमीस (یوم الخمیس) पु. ('अ.) गुरुवार.

यौम-उल्-जज़ा (یوم الجزا); **यौम-उल्-हश्र** (یوم الحشر); **यौम-उल्-हिसाब** (یوم الحساب) पु. ('अ.) अंतिम निवाडघाचा दिवस; कयामत; या दिवशी सारे मृतात्मे थडग्यांतून बाहेर येतील व त्यांच्या पापपुण्याचा हिशेब होऊन प्रत्येकाला त्याच्या कर्माप्रमाणे फळ मिळेल अशी मुसलमानांची श्रद्धा आहे.

यौम-उस्-सबत (یوم السبت) पु. ('अ.) शनिवार.

यौम-उस़्-सलासः (یوم الثلاثم) पु. ('अ.) मंगळवार.

यौम-ए-आज़ादी (یوم آزادی) पु. ('अ. + फ़ा.) स्वातंत्र्यदिन.

यौम-ए-विलादत (یوم ولادت) पु. ('अ.) जन्म-दिवस; जयंती.

यौमन्-फ़यौमन् (یوماً فیوماً) अव्य. ('अ.) दिवसे-दिवस; हळूहळू.

यौमियः (یومیہ) वि. ('अ.) दैनिक; दैनंदिन. (पु.) रोजची मजुरी; रोजचा खर्च; रोजचे भोजन. रोजची प्राप्ती.

रंग (رنگ) पु. (फ़ा.) (१) वर्ण; रंग. (२) आनंद; हर्ष. (३) शोभा. (४) ढंग; पद्धती. (५) भोग; विलास. (६) नाच-गाणे. (७) स्थिती; अवस्था. (८) आचरण. (९) प्रभाव. (१०) मनाची लहर. **–अंदाज़** (–انداز) वि. (फ़ा.) रंग उडविणारा. **–आमेज़** (–آمیز) वि. (फ़ा.) रंग भरणारा (पु.) चित्रकार. **–त** (–ت) स्त्री. (फ़ा.+हिं.) (१) रंग; रूप. (२) मजा (३) शोभा. **–तरः** (–ترہ) पु. (फ़ा.) नारिंग,

संत्रे. –परीदः (پریدہ –) वि. (फ़ा.) (१) ज्याचा रंग उडाला आहे असा. (२) लाजेने किंवा भीतीने फिका पडलेला. –पाश (پاش –) वि. (फ़ा.) रंग उधळणारा(री). –बरंग (برنگ–) वि. (फ़ा.) रंगीबेरंगी; चित्रविचित्र. –बस्त (بست –) वि. (फ़ा.) पक्का रंग. –महल (محل –) पु. (फ़ा.+'अ.) विलासगृह. –रज (رز –) वि. (फा.) रंगारी. –रेज (ریز –) वि. (फ़ा.) (१) चित्रकार. (२) रंगारी. –साज (ساز –) वि. (फ़ा.) (१) रंग तयार करणारा. (२) रंगविणारा; पेंटर.

रंग-ए-शिकस्तः (رنگ شکستہ) पु. (फ़ा.) फिका रंग; उतरलेला रंग.

रंगारंग (رنگارنگ) वि. (फ़ा.) रंगीबेरंगी; चित्रविचित्र; विविध.

रंगी (رنگیں); रंगीन (رنگین) वि. (फ़ा.) (१) रंगीत; रंगदार. (२) आनंदी; विनोदी. (३) विलासी. (४) शोभिवंत. –अंदाम (اندام –) वि. (फ़ा.) गौरवर्ण; गोरा. –अिबार (عذار –) वि. (फ़ा.+'अ.) गुलाबी गालांचा(ची). –तब्'अ (طبع –) वि. (फ़ा.+'अ.) रसिक; विनोदी; विलासी. –मश्रब (مشرب –); –मिजाज (مزاج –) वि. (फ़ा. + 'अ.) रंगेल; विलासी; ऐषआरामी.

रंगीनी (رنگینی) वि. (फ़ा.) (१) रंगेलपणा; विलास. (२) नखरा; शोभा. (३) मस्ती.

रंज (رنج) पु. (फ़ा.) (१) दुःख; खेद; पश्चात्ताप. (२) कष्ट; त्रास; पीडा. (३) शोक. (४) आघात; आपत्ती. –आगीं (آگیں –) वि. (फ़ा.) दुःखपूर्ण.

रंजिश (رنجش) स्त्री. (फ़ा.) (१) बेबनाव; वैमनस्य. (२) नाराजी. (३) शत्रुत्व.

रंजीदगी (رنجیدگی) स्त्री. (फ़ा.) दुःख; खेद.

रंजीदः (رنجیدہ) वि. (फ़ा.) (१) दुःखी; कष्टी; उदास. (२) नाराज. –ख़ातिर (خاطر –) वि. (फ़ा.+'अ.) (१) दुःखी. (२) नाराज.

रंजूर (رنجور) वि. (फ़ा.) (१) दुःखी; खिन्न. (२) आजारी.

रंजः (رنج) पु. (फ़ा.) (१) दुःख. (२) कष्ट. –ख़ातिर (خاطر –) वि. (फ़ा.) दुःखी; खिन्न.

रंधः (رندہ) पु. (फ़ा.) रंधा (सुताराचा).

र'अद (رعد) पु. ('अ.) विजेचा कडकडाट.

र'अना (رعنا) वि. (फ़ा.) सुंदर; रूपवान; देखणा.

र'अना'ई (رعنائی) स्त्री. (फ़ा.) (१) सौंदर्य; देखणेपणा. (२) शृंगार; सजावट.

र'अशः (رعشہ) पु. ('अ.) ज्यात शरीराचे अवयव थरथर कापतात तो रोग; कंपरोग.

र'ईयत (رعیت) स्त्री. ('अ.) (१) प्रजा; रयत. (२) जनता. (३) कूळ. –आज़ार (آزار –) वि. ('अ. + फ़ा.) प्रजेला छळणारा; जुलमी. –नवाज़ (نواز –); –पर्वर (پرور –) वि. ('अ.+फ़ा.) प्रजेशी प्रेमाने वागणारा; प्रजापालक. –वारी (واری –) स्त्री. ('अ.+फ़ा.) रयतवारी पद्धती.

र'ईस (رئیس) पु. ('अ.) (१) सरदार; सत्ताधीश. (२) श्रीमंत. (३) जमीनदार.

र'ऊनत (رعونت) स्त्री. ('अ.) घमेंड; अभिमान.

रक'अत (رکعت) स्त्री. ('अ.) नमाजामधील एक भाग ['क़याम' (قیام) उभे राहाणे, 'रुकू'अ' (رکوع) खाली वाकणे व 'सज्दः' (سجدہ) जमिनीवर डोके टेकणे].

रक़बः (رقبہ) पु. ('अ.) क्षेत्रफळ. (पु.) मान; ग्रीवा.

रक़म (رقم) स्त्री. ('अ.) (१) लेखन; लिहिणे. (२) अंक; संख्या. (३) रक्कम. (४) छाप; मोहोर. (५) दागिना. (६) प्रकार. (वि.) धूर्त; चलाख. (प्रत्य.) लिहिणारा. [उदा. 'ज़ुद रक़म' (زود رقم) वि. (फ़ा.+'अ.) भरभर लिहिणारा]. –ज़न (زن –); –तराज़ (طراز –) वि. ('अ.+फ़ा.) लिहिणारा; लेखक.

रक़मी (رقمی) वि. ('अ.) (१) लिखित; लिहिलेला. (२) खूण केलेला.

रकाकत (رکاکت) स्त्री. ('अ.) (१) नीचता; अधमता. (२) तुच्छता; तिरस्कार. (३) सुस्ती.

रक़ाबत (رقابت) स्त्री. ('अ.) स्पर्धा; प्रतिद्वंद्विता. (एका प्रेयसीसाठी दोन प्रियकरांमध्ये असणारे शत्रुत्व).

रक़ीक़ (رقیق) वि. ('अ.) (१) पातळ; तरल; द्रव. (२) कोमल.

रकीक (رکیک) वि. ('अ.) अधम; तुच्छ.

रकीन (رکین) वि. ('अ.) दृढ; मजबूत.

रक़ीब (رقیب) पु. ('अ.) एका प्रेयसीचे दोन प्रियकर एकमेकांचे रकीब असतात; प्रतिस्पर्धी; शत्रू. [स्त्री. 'रक़ीबः' (رقیبہ)].

रक़ीम (رقیم) वि. ('अ.) लिखित; लिहिलेला.

रक़ीमः (رقیمہ) पु. ('अ.) लिखित कागद; कागदपत्र; चिठ्ठी.

रक़्क़ास (رقاص) पु. ('अ.) नर्तक; नृत्य करणारा.

रक़्क़ास-ए-फ़लक (رقاص فلک) पु. ('अ.) शुक्र (ग्रह).

रक़्क़ासः (رقاصہ) स्त्री. ('अ.) नर्तकी.

रक़्स (رقص) पु. ('अ.) नृत्य; नाच.

रक़्सां (رقصاں) वि. ('अ.+फ़ा.) नाचत असलेला; नाचणारा.

रख़ावत (رخاوت) स्त्री. ('अ.) सुस्ती; शैथिल्य.

रख़ीम (رخیم) वि. ('अ.) (१) खालच्या आवाजाचा. (२) संयमी. (३) दुर्बळ.

रख़ीस् (رخیص) वि. ('अ.) स्वस्त.

रख़्त (رخت) पु. (फ़ा.) (१) सामान; उपकरणे. (२) वस्त्रे; कपडे. **–कश** (–کش) वि. (फ़ा.) सामान उचलणारा; प्रवासी.

रख़्नः (رخنہ) पु. (फ़ा.) (१) छिद्र; छेद. (२) दोष. (३) हस्तक्षेप; अडथळा. (४) कलह; तंटा. **–अंदाज़** (–انداز) वि. (फ़ा.) हस्तक्षेप करणारा; अडथळा आणणारा. **–बंदी** (–بندی) स्त्री. (फ़ा.) (१) छिद्र बुजविणे. (२) भांडण थांबविणे.

रख़्श (رخش) पु. (फ़ा.) (१) घोडा. (२) किरण; प्रकाश. (३) रुस्तमचा घोडा.

रख़्शाँ (رخشاں) वि. (फ़ा.) चकाकणारा; प्रकाशमान.

रख़्शीदः (رخشیدہ) वि. (फ़ा.) (१) प्रदीप्त; प्रज्वलित. (२) चकचकीत.

रख़्शः (رخشہ) पु. (फ़ा.) अग्निज्वाला.

रग (رگ) स्त्री. (फ़ा.) (१) शीर; नस; धमनी. (२) स्नायू. (३) नाडी. (४) पानांतील रेशा; शीर. (५) डोळ्यांतील रेषा. (६) धागा. (७) वंश; जाती. **–जन** (–زن) वि. (फ़ा.) शीर कापून रक्त बाहेर काढणारा.

रग-ए-अब्र (رگ ابر) स्त्री. (फ़ा.) ढगाची काळी कडा.

रग-ए-ग़ैरत (رگ غیرت) स्त्री. (फ़ा.+'अ.) स्वाभिमान.

रग-ए-जाँ (رگ جاں) स्त्री. (फ़ा.) शरीरातील मुख्य रक्तवाहिनी; मोठी शीर.

रग-ओ-पै (رگ و پے) पु. (फ़ा.) नसा व स्नायू; सारे शरीर.

रग-ओ-रेशः (رگ و ریشہ) पु. (फ़ा.) स्वभाव; प्रकृती; आंतरिक स्थिती.

रग़बत (رغبت) स्त्री. ('अ.) (१) इच्छा; अभिलाषा. (२) प्रवृत्ती; अभिरुची.

रग़ीफ़ (رغیف) स्त्री. ('अ.) (१) भाकरी किंवा चपाती बनविण्यासाठी तयार केलेला पिठाचा गोळा. (२) लहान व जाड भाकरी.

रग़ीब (رغیب) वि. ('अ.) (१) लोभी. (२) इच्छुक; अभिलाषी.

रग़्म (رغم) वि. ('अ.) (१) विपरीत; उलटा. (२) लज्जेने मान खाली घालणे.

रज़ (رز) पु. (फ़ा.) द्राक्ष.

रज'अत (رجعت) स्त्री. ('अ.) (१) परत येणे; प्रत्यागमन. (२) घटस्फोट दिलेल्या स्त्रीला पुनः पत्नी म्हणून ग्रहण करणे. **–परस्त** (–پرست); **–पसंद** (–پسند) वि. ('अ.+फ़ा.) प्रतिगामी; सनातनी; प्रतिक्रियावादी.

रजब (رجب) पु. ('अ.) अरबी वर्षाचा सातवा महिना.

रजा (رجا) स्त्री. ('अ.) (१) आशा; उमेद. (२) भीती; भय. **–'ई** (–ئی) वि. ('अ.) आशावादी.

रज़ालत (رذالت) स्त्री. ('अ.) अधमता; नीचता.

रज़ालः (رذالہ) वि. ('अ.) अधम; नीच; लोफर.

रजी'अ (رجیع) पु. ('अ.) (१) फेकून दिलेली रद्दी वस्तू. (२) विष्ठा; शेण.

रज़ीदः (رزیدہ) वि. (फ़ा.) रंगविलेला; रंगीत.

रज़ील (رذیل) वि. ('अ.) (१) अधम; नीच. (२) खालच्या, हलक्या जातीचा.

रजुल (رجل) पु. ('अ.) (१) मनुष्य; मानव. (२) वयात आलेली व्यक्ती.

रज़्ज़ाक़ (رزاق) वि. पु. ('अ.) (१) अन्नदाता; पोटाला लावणारा. (२) ईश्वर.

रज़्ज़ाक़ी (رزاقی) स्त्री. ('अ.) अन्नास लावणे; अन्न देणे; पालनपोषण.

रज़्फ़ (رجف); **रज़्फ़ः** (رجفہ) पु. ('अ.) भूकंप.

रज़्म (رجم) पु. ('अ.) दगडफेक; दगडांनी मारणे. (२) आळ घेणे; शिवी देणे.

रज़्म (رزم) स्त्री. (फ़ा.) युद्ध; लढाई. **–आरा** (–آرا) वि. (फ़ा.) लढणारा. **–गाह** (–گاہ) स्त्री. (फ़ा.) समरांगण.

रज़्मियः (رزمیہ); **रज़्मी** (رزمی) वि. (फ़ा.) युद्ध-विषयक; युद्धासंबंधीचा.

रत्ल (رطل) पु ('अ.) (१) रत्तल; एक पौंड; अर्धा शेर. (२) मद्याचा प्याला.

रत्बत (رطوبت) स्त्री. ('अ.) आर्द्रता; ओलेपणा.

रत्ब (رطب) वि. ('अ.) (१) आर्द्र; ओला. (२) ताजा; हिरवागार.

रत्ब-उल्-लिसान (رطب اللسان) वि. ('अ.) (१) प्रशंसा करणारा; गोड बोलणारा. (२) कृतज्ञ.

रज़ा'अत (رضاعت) स्त्री. ('अ.) लहान मुलाची अंगावरील दूध पिण्याची अवस्था.

रद़ा'अत (رداعت) स्त्री. ('अ.) विकार; विकृती; दोष.

रद़ी (رضی) वि. ('अ.) (१) मनपसंत. (२) संतुष्ट.

रद़ी'अ (رضیع) पु. ('अ.) दूधभाई; एकाच स्त्रीचे स्तनपान ज्यांनी केले आहे असे. [स्त्री. 'रद़ी'अः' (رضیعہ)].

रदीफ़ (ردیف) वि. ('अ.) घोडधावर किंवा उंटावर स्वाराच्या मागे बसणारा. (स्त्री.) (१) गझलामध्ये प्रत्येक चरणाच्या शेवटी येणारा (किंवा येणारे) शब्द. (२) राखीव सैन्य. **–वार** (–وار) अव्य. ('अ.+फ़ा.) अकार विल्हेवारीने.

रद्दीयः (رضیہ) स्त्री. ('अ.) राजी केलेली; प्रसन्न केलेली.

रद्द (رد) वि. ('अ.) (१) रद्द; रहीत. (२) परत केलेला; नापसंत. (पु.)(१) त्याग. (२) उलटी; ओकारी.

रद्द-ए-'अमल (رد عمل) पु. ('अ.) प्रतिक्रिया.

रद्द-ए-सलाम (رد سلام) पु. ('अ.) नमस्काराला प्रतिनमस्काराने उत्तर न देणे.

रद्द-ओ-कद (رد و کد)स्त्री. पु. ('अ.) (१) वादविवाद. (२) भांडण.

रद्द-ओ-बदल (رد و بدل) पु. ('अ.) बदल; फेरफार; परिवर्तन.

रद्दी (ردی) वि. ('अ.) (१) टाकलेला; फेकून दिलेला; कुचकामाचा; टाकाऊ; निरुपयोगी. (२) विकृत; दूषित. (स्त्री.) रद्दी; निरुपयोगी वस्तू.

रद्दः (ردہ) पु. (फ़ा.) भित बांधण्यासाठी विटेवर वीट रचणे; थर लावणे; घडीवर घडी ठेवणे.

रफ़ (رف) पु. (फ़ा.) सामान ठेवण्यासाठी भितीला मारलेली फळी.

रफ़'अ (رفع) पु. ('अ.) (१) उचलणे; उंच करणे. (२) 'उ' कारदर्शक 'पेश'. (३) दूर करणे; निवारण करणे.

रफ़'अ (رفع) वि. ('अ.) (१) दूर केलेला; काढून टाकलेला. (२) शांत; निवृत्त. (पु.) (१) उंच करणे. (२) दूर करणे. **–रफ़'अ करना**(– دفع کرنا) (१) क्षमा करणे. (२) निकालात काढणे.

रफ़'अत (رفعت)स्त्री.('अ.) उंची; उच्चता; उच्च पद.

रफ़क़ (رفق) स्त्री. ('अ.) (१) मऊपणा. (२) कृपा; दया.

रफ़द् (رفض) पु. ('अ.) त्याग; सोडून देणे; ऐन वेळी आपल्या स्वामीला सोडून जाणे.

रफ़रफ़ (رفرف) पु. ('अ.) (१) मेराजच्या रात्री मुहम्मद साहेब ज्यावर बसून स्वर्गात गेले होते तो घोडा; बुराक़. (२) कपाट. (३) वृत्तपत्रातील स्तंभ, कॉलम.

रफ़ह् (رفہ) पु. ('अ.) हित; कल्याण; सुख.

रफ़ाक़त (رفاقت) स्त्री. ('अ.) (१) मैत्री; निष्ठा. (२) संगत; सहकार; साथ.

रफ़ाह् (رفاہ); **रफ़ाहत** (رفاهت); **रफ़ाहियत** (رفاهیت) स्त्री. ('अ.) (१) आराम; चैन; सुख. (२) कल्याण.

रफ़ी'अ (رفیع) वि. ('अ.) (१) उच्च; उंच. (२) श्रेष्ठ; उत्तम. **–उश्-शान** (– الشان) वि. ('अ.) प्रतिष्ठित; श्रेष्ठ.

रफ़ीक़ (رفیق) पु. ('अ.) मित्र; सहकारी; साथी; सहचर.

रफ़ीक़ः (رفیقہ) स्त्री. ('अ.) मैत्रीण; सखी.

रफ़ीक़ः-ए-हयात (رفیقۂ حیات) स्त्री. ('अ.) जीवनसंगिनी; पत्नी.

रफ़ीदः (رفیدہ) पु. (फ़ा.) (१) जिच्यावर रोटी (पोळी, भाकरी)ठेवून भट्टीत ठेवतात ती पट्टी (पॅड). (२) गोल व बेडौल पगडी. (३) जखमेवरील पट्टी.

रफ़ू (رفو) पु. (फ़ा.) (१) फाटलेल्या कपडयाची शिलाई (छिद्र विणून बुजविणे). (२) विशिष्ट प्रकारची शिवण. **–कारी** (– کاری) स्त्री. (फ़ा.)रफू करणे. **–गर**(– گر)पु.(फ़ा.) रफू करणारा. **–चक्कर** (– چکر) वि. (फ़ा. + हिं.) पळून गेलेला; अदृश्य झालेला; फरारी.

रफ़्त (رفت) स्त्री. [फ़ा. 'रफ़्तन' (رفتن) जाणे.] चालणे; जाणे. **आमद-ओ-रफ़्त** (آمد و رفت) स्त्री. (फ़ा.) येणे-जाणे; आवक-जावक.

रफ़्त-ओ-गुज़श्त (رفت وگزشت) वि. (फ़ा.) गेलेला; समाप्त; कालग्रस्त झालेला.

रफ़्तगाँ (رفتگاں) पु. [फ़ा. 'रफ़्तः' (رفتہ) चे अनेक.] गेलेले; मेलेले.

रफ़्तगान-ए-ख़ाक (رفتگان خاک) पु. (फ़ा.) जमिनीत, मातीत गेलेले; मृत.

रफ़्तनी (رفتنی) वि. (फ़ा.) जाण्यास योग्य. (स्त्री.) (१) निर्यात. (२) निर्गमन.

रफ़्तार (رفتار)स्त्री. (फ़ा.)(१) गती; वेग. (२)चाल. (३) आचरण. (४) ढंग; पद्धती. (५) स्थिती.

रफ़्तार-ओ-गुफ़्तार (رفتار و گفتار) स्त्री. (फ़ा.) राहाण्याची व बोलण्याची पद्धत; ढंग.

रफ़्तः (رفتہ) वि. (फ़ा.)(१) गेलेला; गत. (२) मृत; मेलेला. **–रफ़्तः** (رفتہ –) अव्य. (फ़ा.) धीरे धीरे; हळूहळू; क्रमाने.

रब (رب)पु.('अ.)(१) परमेश्वर; खुदा. (२) स्वामी; मालक. (३) पती. (४) पालक.

रब-उन्-नौ'अ (رب النوع) पु. ('अ.) देव; देवदूत.

रब-उल्-'आलिमीन (رب العالمین) पु. ('अ.) अनेक विश्वांनी युक्त असलेला ब्रह्मांडाचा स्वामी; ईश्वर.

रबात् (رباط) स्त्री. ('अ.) धर्मशाळा; पथिकाश्रम.

रबाब (رباب) पु. (फ़ा.) सतारीसारखे एक तंतुवाद्य.

रबाबी (ربابی) पु. (फ़ा.) रबाबवादक.

रबी'अ (ربیع) स्त्री. ('अ.)(१) वसंत ऋतू. (२)वसंत ऋतूत कापले जाणारे रब्बीचे पीक.

रबी'अ-उल्-अव्वल (ربیع الاول) पु. ('अ.) अरबी वर्षाचा तिसरा महिना.

रबी'अ-उल्-आखिर (ربیع الآخر); **रबी'अ-उस्-सानी** (ربیع الثانی) पु. ('अ.) अरबी वर्षाचा चौथा महिना.

रबीब (ربیب) पु. ('अ.) (१) सावत्र मुलगा. (२) बायकोच्या पहिल्या नवऱ्यापासून तिला झालेला मुलगा. [स्त्री. 'रबीबः' (ربیبہ)].

रबूदगी (ربودگی) स्त्री. (फ़ा.) तंद्री; गुंगी (आजार).

रबूदन (ربودن) क्रि. (फ़ा.) लुबाडणे; पळवून नेणे.

रबून (ربون) पु. ('अ.) विसार; बयाणा.

रब्त् (ربط) पु. ('अ.) (१) घनिष्ठ संबंध; मैत्री. (२) सराव; सवय. **–दब्त्** (ضبط –) पु. ('अ.) मेळ; मिलाफ; घनिष्ठता.

रब्बानियत (ربانیت) स्त्री. ('अ.) ईश्वरत्व.

रब्बानी (ربانی); **रब्बी** (ربی) वि. ('अ.) (१) ईश्वरी; दैवी. (२) अकल्पित; आकस्मिक.

रम (رم) पु. (फ़ा.) (१) घाबपळ; पळापळी. (२) भीती. (३) घृणा. (४) झुंड; कळप. **–कर्दः** (کردہ –); **–ख़ुर्दः** (خوردہ –); **–दीदः** (دیدہ –) वि. (फ़ा.) (१) पळून गेलेला. (२) घाबरलेला.

रमक़ (رمق) स्त्री. ('अ.) (१) थोडासा उरलेला प्राण; शेवटचे क्षण. (२) थोडीशी उरलेली वस्तू.

रमद (رمد) पु. ('अ.) डोळे येणे (आजार).

रमदान (رمضان) पु. ('अ.) अरबी वर्षाचा नववा महिना. या महिन्यात मुसलमान लोक दिवसभर कडक उपवास करतात.

रमल (رمل) पु. ('अ.) (१) फाशांवरून वर्तविले जाणारे भविष्य. (२) रेती; वाळू.

रमाद (رماد) स्त्री. ('अ.) राख; भस्म.

रमीदगी (رمیدگی) स्त्री. (फ़ा.) (१) घाबपळ; पलायन; पळापळी. (२) घृणा; तिटकारा.

रमीदः (رمیدہ) वि. (फ़ा.) पळालेला; पळून गेलेला.

रमीम (رمیم) वि. ('अ.) (१) जुना; पुरातन. (२) जुनाट; जीर्ण.

रम्कः (رمکہ) स्त्री. ('अ.) घोडी.

रम्ज़ (رمز) पु. ('अ.) (१) खूण; इशारा; संकेत. (२) रहस्य. (३) सूक्ष्म गोष्ट. **–आगाह** (آگاہ –); **–आश्ना** (آشنا –); **–शनास** (شناس –) वि. ('अ.+फ़ा.) रहस्य जाणणारा; मर्मज्ञ.

रम्नः (رمنہ) पु. (फ़ा.) कुरण; गोचर जमीन.

रम्माज़ (رماز) वि. ('अ.) (१) गुप्तचर; हेर. (२) रहस्य जाणणारा. (३) खुणांनी आपले म्हणणे व्यक्त करणारा.

रम्माल (رمال) वि. ('अ.) (१) रमल विद्या जाणणारा; ज्योतिषी. (२) सवय, सराव केलेला.

रवाँ (رواں) वि. (फ़ा.) (१) वाहाणारा; प्रवाही. (२) सवय, सराव केलेला. (३) चालणारा; प्रचलित; रूढ. (४) तीक्ष्ण; धारदार. (पु.) अर्थ न लावता एखादे पुस्तक भरभर वाचणे. (स्त्री.) (१) प्राण. (२) आत्मा. (३) प्राणवायू. **–दवाँ** (دواں –) वि. (फ़ा.) वेगाने वाहाणारा.

रवा (روا) वि. (फ़ा.) (१) उचित; योग्य. (२) विहीत; धर्मसंमत. (प्रत्य.) पूर्ण करणारा. [उदा. 'हाजत रवा' (حاجت روا) वि. ('अ.+फ़ा.) इच्छा पूर्ण करणारा.] **–दार** (دار –) वि. (फ़ा.) (१) आपल्या वागण्याने इतरांना त्रास होऊ नये याची खबरदारी घेणारा; सहिष्णू. (२) उदार. **–दारी** (داری –) स्त्री. (फ़ा.) (१) सहिष्णुता; उदारता. (२) औचित्य. **–रवी** (روی –) स्त्री. (फ़ा.) घाई; जलदी; धावपळ. **–रौ** (رو –) (फ़ा.) रहदारी; येणे-जाणे.

रवा'ई (روائی) स्त्री. (फ़ा.) (१) पूर्ण होणे (आशा). (२) शोभा. (३) प्रथा; परंपरा.

रवाज (رواج) पु. ('अ.) रिवाज; प्रथा; परंपरा; चालरीत; रुढी.

रवाजी (رواجی) वि. ('अ.) (१) प्रचलित. (२) सामान्य. (३) मामुली.

रवानगी (روانگی) स्त्री. (फ़ा.) (१) प्रस्थान; प्रयाण. (२) पाठवणी; रवानगी.

रवानी (روانی) स्त्री. (फ़ा.) (१) प्रवाह. (२) वेग. (३) तीक्ष्णता; धार.

रवानः (روانہ) वि. (फ़ा.) (१) निघालेला. (२) पाठविलेला.

रविश (روش) स्त्री. (फ़ा.) (१) गती; चाल. (२) तऱ्हा; पद्धत; बागणूक. (३) बागेतील पायवाट. (४) शैली.

रवैयः (رویہ) पु. (फ़ा.) (१) बागणूक; वर्तणूक. (२) चालरीत; पद्धत.

रशद (رشد) पु. ('अ.) (१) दीक्षा. (२) सन्मार्गाने चालणे; नीतिमत्ता.

रशहः (رشحہ) पु. ('अ.) (१) ठिबकणे; स्रवणे. (२) बिंदू; थेंब.

रशीद (رشید) वि. ('अ.) (१) सन्मार्ग दाखविणारा. (२) सन्मार्गाने जाणारा; गुरूची सेवा करून विद्या प्राप्त करणारा. (३) ईश्वर.

रश्क (رشک) पु. (फ़ा.) (१) ईर्ष्या; मत्सर; हेवा. (२) शत्रुत्व; वैर.

रश्क-ए-जिनां (رشک جناں) वि. (फ़ा.+'अ.) स्वर्गालाही हेवा वाटावा असा मनोहर (देश).

रश्क-ए-परी (رشک پری) वि. स्त्री. (फ़ा.) अप्सरेलाही हेवा वाटावा इतकी सुंदर स्त्री.

रश्फ़ (رشف) पु. ('अ.) शोषणे; शोषून घेणे.

रश्मीज़ (رشمیز) स्त्री. (फ़ा.) वाळवी.

रस (رس) प्रत्य. (फ़ा.) पोहोचणारा. [उदा. 'फ़लक रस' (فلک رس) वि. ('अ.+फ़ा.) आकाशापर्यंत जाऊन पोचणारा; अस्मानाला भिडणारा].

रसद (رصد) स्त्री. ('अ.) (१) पाहाणी करण्याचे उंच स्थान; टक लावून पाहाणे. (२) वेधशाळा. **–गाह** (گاہ –) स्त्री. ('अ.+फ़ा.) वेधशाळा.

रसद (رسد) स्त्री. (फ़ा.) (१) अंश; भाग. (२) खाद्यसामग्री; शिधा. (३) अन्नपुरवठा.

रसदी (رسدی) वि. ('अ.) हिश्शानुसार; वाटणीप्रमाणे आलेला.

रसन (رسن) स्त्री. (फ़ा.) दोरी; रज्जू. **–बाज़** (باز –) वि. (फ़ा.) (१) दोरीवरून चालणारा; डोंबारी. (२) धूर्त. **–बाफ़** (باف –) वि. (फ़ा.) दोऱ्या वळणारा.

रसां (رساں) प्रत्य. (फ़ा.) पोहोचविणारा. [उदा. 'चिट्ठी रसां' (چٹھی رساں) वि. (हिं.+फ़ा.) पत्र पोहोचविणारा; पत्रवाहक; पोस्टमन].

रसा (رسا) वि. (फ़ा.) पोहोचणारा.

रसा'इल (رسائل) पु. [अ. 'रिसालः' (رسالہ) चे अनेक.] मासिके; नियतकालिके.

रसा'ई (رسائی) स्त्री. (फ़ा.) पोहोच; प्रवेश.

रसानिंदः (رساننده) वि. (फ़ा.) पोहोचविणारा; पाठविणारा; पुरविणारा.

रसानी (رسانی) स्त्री. (फ़ा.) पुरवठा.

रसास (رصاص) पु. ('अ.) (१) शिसे (धातू). (२) कथील.

रसीद (رسید) स्त्री. (फ़ा.) (१) पावती. (२) प्राप्ती; वसुली.

रसीदः (رسیدہ) वि. प्रत्य. (फ़ा.) (१) पोहोचलेला; आलेला. (२) परिपक्व. [उदा. 'अम्र रसीदः' (عمر رسیدہ) वि. ('अ.+फ़ा.) पुष्कळ वय झालेला; वृद्ध].

रसूम (رسوم) पु. ('अ.) (१) कर; जकात. (२) शुल्क; फी.

रसूल (رسول) पु. ('अ.) (१) पाठविलेला दूत; प्रेषित. (२) ईश्वरी संदेश आणणारा; ईश्वराचा अवतार. (३) पैगंबर; मुहम्मद साहेब.

रसूलु'ल्लह (رسول اللہ) पु. ('अ.) ईश्वरी दूत.

रस्तख़ेज़ (رستخیز) स्त्री. (फ़ा.) महाप्रलय; अंतिम निवाडघाचा दिवस.

रस्तगार (رستگار) वि. (फ़ा.) बंधमुक्त; स्वतंत्र.

रस्तगारी (رستگاری) स्त्री. (फ़ा.) मुक्ती; सुटका.

रस्ताख़ेज़ (رستاخیز) स्त्री. (फ़ा.) पाहा 'रस्तख़ेज़'

रस्तः (رستہ) वि. (फ़ा.) बंधमुक्त. (पु.) (१) मार्ग; सडक. (२) ओळ; पंक्ती.

रस्म (رسم) स्त्री. ('अ.) (१) परंपरा; रिवाज; रुढी; चालरीत; प्रथा. (२) फोटो. (३) संस्कार; विधी. (४) मेळ; मिलाफ. (५) पद्धती. (६) पगार; फी.

रस्म-उल्-ख़त (رسم الخط); **रस्म-ए-ख़त** (رسم خط) पु. ('अ.) लिपी.

रस्म-ओ-रिवाज (رسم و رواج) पु. ('अ.) रूढी व परंपरा; प्रथा.

रस्मन् (رسماً) अव्य. ('अ.) परंपरेनुसार; प्रथा म्हणून; विशेष महत्त्व न देता.

रस्मी (رسمی) वि. ('अ.) (१) परंपरागत. (२) सामान्य; मामुली.

रस्ल (رسل) पु. ('अ.) बातमी पाठविणे; सूचना धाडणे.

रस्साम (رسام) वि. ('अ.) (१) चित्रकार. (२) नक्षीकाम करणारा.

रह (راہ) स्त्री. [फ़ा. 'राह' (راہ) चे संक्षिप्त]. रस्ता; मार्ग; पथ. **–आवर्द** (آورد –) पु. (फ़ा.) प्रवासास गेलेली व्यक्ती बाहेरून जो नजराणा आणून देते तो; दूरच्या गावाहून आणलेली भेटवस्तू. **–गीर** (گیر –) वि. (फ़ा.) पथिक; प्रवासी. **–गुज़र** (گزر –) स्त्री. (फ़ा.) राजमार्ग; सडक. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) लुटारू; वाटमाऱ्या. **–ज़नी** (زنی –) स्त्री. (फ़ा.) वाटमारी; दरवडा. **–नुमा** (نما –) वि. (फ़ा.) मार्गदर्शक. **–नुमा'ई** (نمائی –) स्त्री. (फ़ा.) मार्गदर्शन. **–बर** (بر –) वि. (फ़ा.) मार्गदर्शक. **–बरी** (بری –) स्त्री. (फ़ा.) मार्गदर्शन. **–रवी** (روی –) स्त्री. (फ़ा.) मार्गक्रमण; चालणे; प्रवास. **–रौ** (رو –) वि. (फ़ा.) पथिक; वाटसरू. **–वार** (وار –) पु. (फ़ा.) घोडा.

रहत् (رهط) पु. ('अ.) गर्दी; समुदाय; जमाव.

रहन (رهن) पु. ('अ.) गहाण ठेवणे. **–दर रहन** (در رهن –) पु. ('अ.+फ़ा.) दोन ठिकाणी गहाण ठेवलेली मालमत्ता. **–दार** (دار –) पु. (फ़ा.) गहाण ठेवून घेणारा; सावकार. **–नामः** (نامہ –) (सावकाराने गहाण ठेवलेली मालमत्ता त्यानेच दुसरीकडे गहाण ठेवणे.) पु. (फ़ा.) गहाण खत.

रहबानियत (رهبانیت) स्त्री. ('अ.) आजन्म ब्रह्मचारी राहून संयमी जीवन घालविणे. (हे इस्लामच्या विरुद्ध आहे).

रहम (رحم) पु. ('अ.) (१) करुणा; दया; कृपा. (२) कीव. (३) पाहा 'रहिम'. **–दिल** (دل –) वि. ('अ.+फ़ा.) दयाळू; कनवाळू.

रहमत (رحمت) स्त्री. ('अ.) दया; कृपा; करुणा.

रहमत-ए-'आलम (رحمت عالم) स्त्री. ('अ.) विश्वावर कृपादृष्टी ठेवणारा; जगावर दया करणारा; हजरत मुहम्मद पैगंबर.

रहमान (رحمان) वि. ('अ.) दयाळू; कृपाळू. (पु.) ईश्वर.

रहल (رحل) स्त्री. ('अ.) ज्यावर कुराण (किंवा इतर धार्मिक ग्रंथ) ठेवून वाचतात तो लाकडी स्टँड किंवा डेस्क; घोडी; वाचपीठ.

रहा (رها) वि. (फ़ा.) मुक्त; बंधमुक्त; सुटका झालेला.

रहा'ई (رهائی) स्त्री. (फ़ा.) सुटका; मुक्तता.

रहिम (رحم) पु. ('अ.) गर्भाशय.

रही (رهی) पु. (फ़ा.) दास; सेवक; गुलाम.

रहीक़ (رحیق) स्त्री. ('अ.) मदिरा; मद्य.

रहीन (رهین) स्त्री. ('अ.) गहाण ठेवलेली वस्तू.

रहीन-ए-मिन्नत (رهین منت) वि. ('अ.) कृतज्ञ; आभारी.

रहीम (رحیم) वि. ('अ.) दयाळू; कृपाळू. (पु.) ईश्वर.

रहील (رحیل) पु. ('अ.) प्रस्थान; कूच; प्रयाण.

रां (راں) प्रत्य. (फ़ा.) चालविणारा. [उदा. 'हुक्म रां' (حکمراں) वि. ('अ. + फ़ा.) हुकूम चालविणारा; शासक].

रांदः (راندہ) वि. (फ़ा.) हाकललेला; बहिष्कृत; काढून टाकलेला.

रा (را) विभक्ती (फ़ा.) स; ला; ना (द्वितीया, चतुर्थी); साठी.

रा'अि'ल-'अिबाद (راعی العباد) पु. ('अ.) प्रजापालक; राजा.

रा'इज (رائج) वि. (फ़ा.) चालू; प्रचलित; कायदेशीर.

रा'इद (رائض) वि. ('अ.) चाबूकस्वार; घोडघाला तयार करणारा.

रा'ई (رائی) वि. ('अ.) (१) मेंढपाळ; धनगर. (२) राजा; बादशहा.

रा'ए (رائے) स्त्री. ('अ.) (१) मत; विचार. (२) मत. **–'आम्मः** (عامہ –) स्त्री. ('अ.) लोकमत; सर्व लोकांचे मत. **–ज़नी** (زنی –) स्त्री. ('अ.) आपले मत सांगणे; विचार व्यक्त करणे. **–दिहिंदः** (دہندہ –) वि. ('अ.+फ़ा.) (१) मतदार. (२) मत देणारा. **–दिही** (دہی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) मत देणे. (२) मतदान. **–शुमारी** (شماری –) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) मतमोजणी. (२) सार्वमत.

रा'एगां (رائگاں) वि. (फ़ा.) (१) व्यर्थ; निष्फळ. (२) नष्ट; वाया घालविलेला.

राकि'अ (راکع) वि. ('अ.) नमाज पढणारा; नमाजामध्ये वाकणारा.

राक़िब (راقب) वि. ('अ.) (१) प्रतीक्षा करणारा; वाट पाहाणारा. (२) आशा बाळगणारा. (३) प्रतिस्पर्धी.

राकिब (راکب) वि. ('अ.) घोडेस्वार; अश्वारोही; स्वार.

राक़िम (راقم) वि. पु. ('अ.) लिहिणारा; पत्रलेखक. **–उल्-हुरूफ़** (الحروف –) वि. ('अ.) पत्रलेखक; खाली सही करणारा.

राक़ी (راقی) पु. ('अ.) जादूगार; जादूटोणा करणारा.

राग़ (راغ) पु. (फ़ा.) (१) डोंगराचा पायथा; तराई. (२) जंगल; अरण्य.

राग़िब (راغب) वि. ('अ.) (१) आकर्षित; प्रवृत्त झालेला. (२) इच्छुक.

राज़ (راز) पु. (फ़ा.) (१) रहस्य; मर्म. (२) मूलतत्त्व; सार. **–आश्ना** (آشنا –); **–दां** (داں –); **–दार** (دار –) वि. (फ़ा.) (१) रहस्य जाणणारा; मर्मज्ञ. (२) साथी; सहकारी.

राज़-ए-सरबस्तः (راز سربستہ) पु. (फ़ा.) कोणालाही माहीत नसलेले; न कळणारे रहस्य.

राज़-ओ-नियाज़ (راز و نیاز) पु. (फ़ा.) (१) प्रीतीच्या गुलगुल गोष्टी. (२) प्रार्थना.

राजयानः (رازیانہ) स्त्री. (फ़ा.) बडीशेप.

राज़िक़ (رازق) वि. ('अ.) (१) अन्नदाता. (२) पालनपोषण करणारा. (पु.) ईश्वर.

राजी (راجی) वि. ('अ.) आशा बाळगणारा.

रातिब (راتب) पु. ('अ.) (१) रोजचे अन्न; रतीब (२) कुत्रा, घोडा वगैरे पशूंचा रोजचा खुराक (३) दैनिक वेतन **–ख़ोर** (خور –) वि. ('अ.+फ़ा.) ज्याला ठराविक आहार किंवा वेतन मिळते असा.

रातिबः (راتبہ) पु. ('अ.) (१) पगार; वेतन (२) छात्रवृत्ती. (३) पेन्शन.

राद्दी (راضی) वि. ('अ.) (१) खूष; प्रसन्न; आनंदी. (२) सुखी. (३) संमत; तयार; राजी (४) निरोगी; खुशाल. **–नामः** (نامہ –) पु. ('अ. + फ़ा.) (१) तडजोडपत्र. (२) तहनामा

–बरदा (برضا –) वि. ('अ. + फ़ा.) एखाद्याच्या (विशेषतः देवाच्या) मर्जीवर सोपविणारा.

रान (ران) स्त्री. (फ़ा.) मांडी; जांघ.

राफ़त (رافت) स्त्री. ('अ.) कृपा; दया; मेहेरबानी.

राफ़ि'अ (رافع) वि. ('अ.) (१) वर उचलणारा; उंच करणारा; उन्मादक. (२) वर उठणारा. (३) 'उ' कारदर्शक 'पेश' देणारा.

राफ़िद् (رافض) वि. ('अ.) (१) संकटात सापडलेल्या मालकाला सोडून पळून जाणारा. (२) सरदाराला सोडून पळून जाणारे सैन्य.

राबि'अ (رابع) वि. ('अ.) चौथा; चतुर्थ.

राबि'अः (رابعہ) स्त्री. ('अ.) (१) चौथी स्त्री. (२) बसरा येथे राहात असलेली एक अत्यंत साध्वी व पवित्र स्त्री.

राबित् (رابط) वि. ('अ.) जोडणारा; संपर्क प्रस्थापित करणारा.

राबितः (رابطہ) पु. ('अ.) (१) संबंध; संपर्क. (२) प्रेमसंबंध; मिलाफ.

राम (رام) वि. (फ़ा.) (१) अधीन; ताब्यातील. (२) सेवक.

रामिश (رامش) स्त्री. (फ़ा.) (१) आनंद; मौज. (२) संगीत. **–गर** (گر –) पु. (फ़ा.) गवई; गायक.

रामी (رامی) वि. पु. ('अ.+फ़ा.) (१) फेकणारा; मारणारा. (२) धनुर्धर; तिरंदाज. (३) आरोप करणारा.

रायत (رایت) पु. ('अ.) (१) पताका; ध्वज. (२) सैन्याचा झेंडा.

रावंद (راوند)स्त्री.(फ़ा.) एक औषधी मूळ; रेवाचिनी.

राविक़ (راوق) स्त्री. (फ़ा.) (१) मद्य गाळण्याचे गाळणे; सोदणे. (२) मदिरा.

रावी (راوی) वि. ('अ.) (१) एखाद्याकडून एखादी गोष्ट ऐकून ती जशीच्या तशी दुसऱ्याला सांगणारा. (२) हजरत मुहम्मद यांच्याकडून ऐकलेली प्रवचने त्यांच्याच भाषेत दुसऱ्यांना सांगणारा. (३) इतिहासकार.

राश (راش) पु. (फ़ा.) अन्नाचा ढीग; रास.

राशिद (راشد) वि. ('अ.) (१) ज्याने गुरूकडून दीक्षा घेतली आहे असा; दीक्षित. (२) धर्मभीरू; सन्मार्गाने चालणारा.

राशी (راشی) वि. ('अ.) लाच देणारा.

रास (راس) पु. ('अ.) (१) डोके; मस्तक. (२) गुरांची संख्या दर्शविणारा शब्द. [उदा. 'एक रास बैल' (ایک راس بیل) एक बैल]. (३) भूशिर. (४) राशी; रास. (५) राहू (ग्रह).

रास (راس) स्त्री. (फ़ा.) मार्ग; रस्ता.

रास-उल्-माल (راس المال) पु. ('अ.) मूलधन; मुद्दल.

रासिख़ (راسخ) वि. ('अ.) दृढ; अढळ; पक्का; मजबूत.

रासिद (راصد) वि. ('अ.) (१) ज्योतिषी; ग्रह-ज्योतिष जाणणारा. (२) पहारेकरी.

रासिब (راسب) वि. ('अ.) खाली बसणारा; गाळ.

रासियः (راسیہ) वि. ('अ.) (१) मजबूत; दृढ. (२) पर्वत; डोंगर.

रासू (راسو) पु. (फ़ा.) मुंगूस.

रास्त (راست) वि. (फ़ा.) (१) सरळ; सीधा; रास्त. (२) ठीक; बरोबर; सत्य; खरा. (३) उचित; योग्य. (४) उजवीकडील; दक्षिण. **–किर्दार** (کردار –) वि. (फ़ा.) सदाचारी; सच्छील. **–गुफ़्तार** (گفتار –); **–गो** (گو –) वि. (फ़ा.) सत्यवादी; स्पष्ट वक्ता. **–बाज़** (باز –) वि. (फ़ा.) (१) सच्चा; सत्यनिष्ठ; प्रामाणिक. (२) सदाचारी. **–मिज़ाज** (مزاج –) वि. (फ़ा.+'अ.) सरळ स्वभावाचा; प्रामाणिक. **–मु'आमलगी** (معاملگی –) स्त्री. (फ़ा. + 'अ.) देण्याघेण्यातील व व्यवहारातील प्रामाणिकपणा. **–रवी** (روی –) स्त्री.(फ़ा.) सदाचार. **–रौ** (رو –) वि. (फ़ा.) सदाचारी.

रास्ती (راستی) स्त्री. (फ़ा.) (१) सरळपणा. (२) सच्चाई; प्रामाणिकपणा. (३) सदाचार. **–शि'आर** (شعار –) वि. (फ़ा.+'अ.) सत्यनिष्ठ; धर्मनिष्ठ.

रास्तः (راستہ) पु. (फ़ा.) रस्ता; मार्ग; पथ.

राह् (راح) स्त्री.('अ.) (१) खुषी; आनंद. (२) मद्य; मदिरा.

राह (راہ) स्त्री. (फ़ा.) (१) मार्ग; रस्ता. (२) प्रतीक्षा. (३) आशा. (४) ढंग; पद्धती. (५) युक्ती; उपाय. (६) प्रथा; चाल. (७) नियम. **–ख़र्च** (خرچ –) पु. (फ़ा.) प्रवासखर्च; मार्गव्यय. **–गीर** (گیر –) वि. (फ़ा.) प्रवासी; मुसाफीर. **–गुज़र** (گزر –) स्त्री. (फ़ा.) मार्ग; पथ. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) वाटमाऱ्या; लुटारू. **–ज़नी** (زنی –) स्त्री. (फ़ा.) वाटमारी; दरोडेखोरी. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) चौकीदार; पहारेकरी. (पु.) रेघारेघांचे कापड. **–दारी** (داری –) स्त्री. (फ़ा.) (१) पारपत्र; पासपोर्ट. (२) महसूल; जकात. **–नशीं** (نشیں –) वि. (फ़ा.) रस्त्यात बसलेला; मार्गस्थ. **–नवर्द** (نورد –) वि. (फ़ा.) प्रवासी; पथिक. **–नुमा** (نما –) वि. (फ़ा.) मार्गदर्शक; पुढारी. **–नुमा'ई** (نمائی –) स्त्री. (फ़ा.)

मार्गदर्शन; नेतृत्व. **–पैमा** (پیما–) वि. (फ़ा.) (१) रस्ता मोजणारा. (२) प्रवासी; पथिक. **–बर** (بر–) वि. (फ़ा.) मार्गदर्शक. **–रवी** (روی–) (फ़ा.) मार्गक्रमण; प्रवास. **–रौ** (رو–) वि. (फ़ा.) प्रवासी. **–वार** (وار–) पु. (फ़ा.) घोडा; साध्या गतीने चालणारा घोडा. **–वारी** (واری–) स्त्री. (फ़ा.) घोडयाची साधी चाल.

राह-ओ-रब्त (راه و ربط) पु. (फ़ा.+'अ.) मेळ; मिलाफ; प्रेमव्यवहार.

राह-ओ-रविश (راه و روش) स्त्री. (फ़ा.) चाल-चलणूक; रंगढंग; वर्तणूक.

राहत (راحت) स्त्री. ('अ.) (१) आराम; सुख; चैन. (२) दुःखनिवारण; रोगाला उतार पडणे. (३) सुगमता; सहजता. (४) शांती; एकांत; निवांतपणा. **–अफ़्ज़ा** (افزا–) वि. ('अ. + फ़ा.) शांती व सुख वाढविणारा. **–कदः** (کدہ–) (पु.) **–गाह** (گاہ–) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) सुख-विश्राम गृह. (२) शयनागार. **–तलब** (طلب–) वि. ('अ.) सुखासीन; कामचुकार. **–परस्त** (پرست–) वि. ('अ. + फ़ा.) आरामात पडून राहाणारा; कामचुकार. **–रसाँ** (رساں–) वि. ('अ. + फ़ा.) सुखदायक; आरामशीर.

राहत-ए-जाँ (راحت جاں) वि. ('अ. + फ़ा.) (१) जिवाला सुख देणारा; पुत्र. (२) प्रेयसी.

राहती (راحتی) स्त्री. ('अ.) आजाऱ्याच्या पलंगाजवळ शौच वगैरेसाठी ठेवलेले कमोड.

राह बुरीदः (راہ بریدہ) पु. (फ़ा.) वाटमारीच्या भीतीमुळे बंद असलेला रस्ता.

राहिन (راهن) वि. ('अ.) गहाण ठेवणारा.

राहिब (راهب) पु. ('अ.) संन्यासी; निवृत्त पुरुष; साधू; ख्रिश्चन पाद्री.

राहिम (راحم) वि. ('अ.) दया करणारा; दयाळू.

राहिल (راحل) वि. ('अ.) प्रस्थान, प्रयाण करणारा; पायी चालणारा.

राहिलः (راحلہ) पु. ('अ.) (१) सवारीचे, बसणीचे जनावर (घोडा, उंट वगैरे); वाहन. (२) तांडा; काफिला.

राही (راهی) वि. (फ़ा.) यात्रेकरू; प्रवासी; मुसाफीर.

रिंद (رند) वि. पु. (फ़ा.) (१) मद्यपी; दारुडा. (२) रंगेल; रसिक. (३) निश्चित. (४) लंपट; उच्छृंखल. (५) झिंगलेला. (६) धार्मिक बंधनापासून मुक्त.

रिंद-ए-पार्सा (رند پارسا) पु. (फ़ा.) संयमी व निग्रही मद्यपी.

रिंदानः (رندانہ) वि. (फ़ा.) दारुड्यासारखा; उच्छृंखल; उन्मुक्त.

रिंदी (رندی) स्त्री. (फ़ा.) रंगेलपणा; लंपटता; मनमौजीपणा.

रि'अयत (رعایت) स्त्री. ('अ.) (१) सवलतीचा; किमत कमी करणे. (२) पक्षपात; तरफदारी. (३) विचार; लक्ष; ध्यान. (४) औचित्य; दया-पूर्ण वर्तणूक.

रि'आयती (رعایتی) वि. ('अ.) सवलतीचा; कमी केलेल्या किमतीचा. **–छुट्टी** (چھٹی–) स्त्री. ('अ.+हि.) सवलतीची, हक्काची रजा.

रि'आया (رعایا) स्त्री. ['अ. 'र'अियत' (رعیت) चे अनेक.] प्रजा; कुळे.

रिक़ (رق) स्त्री. ('अ.) (१) दास्य; गुलामी. (२) सेवा; परिचर्या.

रिकाज़ (رکاز) पु. ('अ.) जमिनीत पुरलेले धन.

रिक़ाब (رقاب) पु. ['अ. 'रक़बः' (رقبہ) चे अनेक.] (१) गळे; माना. (२) गुलाम; सेवक.

रिकाब (رکب) स्त्री. ('अ.) रिकीब. **–दार** (دار–) वि. ('अ.+फ़ा.) घोडयावर बसविणारा नोकर.

रिकाब (رکاب) स्त्री. (फ़ा.) (१) नौका. (२) अष्ट-कोनी पेला. **–दार** (دار–) पु. (फ़ा.) आचारी; खानसामा; बटलर.

रिकाबी (رکابی) स्त्री. (फ़ा.) (१) तबक. (२) वशी; ताटली; प्लेट.

रिकेब (رکیب) स्त्री. (फ़ा.) रिकीब.

रिक़्क़त (رقت) स्त्री. ('अ.) (१) आर्द्रता; ओलेपणा. (२) नम्रता; नरमपणा; कोमलता. (३) पातळ-पणा. (४) रुदन; रडणे. (५) दया; अनुकंपा.

रिजाल (رجال) पु. ['अ. 'रजुल' (رجل) चे अनेक.] माणसे. **–उल्-ग़ैब** (الغیب–) पु. ('अ.) देवदूत; दैवी शक्ती (योगिनी).

रिजाल-ए-म'अियत (رجال معیت) पु. ('अ.) वैयक्तिक नोकर; पर्सनल स्टाफ.

रिज़्क़ (رزق) पु. ('अ.) (१) अन्न; आहार. (२) आजीविका.

रिज़्ज़ (رجز) पु. ('अ.) (१) पाप. (२) अपवित्रता. (वि.) अपवित्र; अशुद्ध.

रिज़्स (رجس) पु. ('अ.) (१) अपवित्रता; अशुद्धता. (२) पाप; पापाची शिक्षा.

रिदा (ردا) स्त्री. ('अ.) (१) उपरणे. (२) चादर. (३) पांघरूण.

रिदा (رضا) स्त्री. ('अ.) (१) खुषी; इच्छा. (२) स्वीकृती; मंजुरी. (३) आज्ञा; परवानगी. (४) मुद्दी. **–कार** (کار–) वि. ('अ. + फ़ा.)

(१) स्वयंसेवक. (२) अवैतनिक कार्यकर्ता. **–मंद** (مند –) वि. ('अ. + फ़ा.) मान्य करणारा; राजी; सहमत. **–मंदी** (مندی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) स्वीकृती; मान्यता; अनुमती.

रिदा'अ (رضاع) स्त्री. ('अ.) मुलाची अंगावरील दूध पिण्याची अवस्था.

रिदा'ई (رضاعی) वि. ('अ.) दुसऱ्या स्त्रीचे दूध पिण्यात सहभागी होणारा (री). [उदा. 'रिदा'ई भाई' (رضائی بھائی) दूधभाऊ].

रिदवां (رضوان); **रिदवान** (رضوان) पु. ('अ.) स्वर्गद्वारावरील अधिकारी.

रिदवी (رضوی) वि. ('अ.) इमाम अली मूसा रिजा यांचे वंशज अथवा अनुयायी.

रिफ़अत (رفعت) स्त्री. ('अ.) (१) उंची; उत्तुंगता. (२) उन्नती. (३) महत्त्व.

रिफ़ह (رفہ) पु. (१) हित; कल्याण. (२) सुख; आराम.

रिफ़ाक़त (رفاقت) स्त्री. ('अ.) (१) मैत्री. (२) सहकार्य.

रिफ़ाह (رفاہ) स्त्री. ['अ. 'रिफ़ः' (رفہ) चे अनेक.] (१) हिते; कल्याणे. (२) सुखे.

रिफ़ाह-ए-'आम्मः (رفاہ عامہ) स्त्री. ('अ.) (१) लोककल्याण. (२) सार्वजनिक हित.

रिफ़्क़ (رفق) स्त्री. ('अ.) नम्रता; मृदुलता; कोमलता.

रिब्तः (ربط) पु. ('अ.) (१) बंडल; पुडके. (२) नेकटाय; गळोटी.

रिया (ریا) स्त्री. ('अ.) (१) धोका; दगा; कपट. (२) पाखंड; अवडंबर; ढोंग; दिखावटीपणा. (३) शत्रुत्व. **–'ई** (ئی –) वि. ('अ.) (१) दिखावटी. (२) लबाड. **–कार** (کار–) वि. ('अ. + फ़ा.) दगलबाज; कपटी; ढोंगी. **–कारी** (کاری–) स्त्री. ('अ.+फ़ा.) ढोंग; कपट; लबाडी.

रियाज़ (ریاض) पु. ['अ. 'रौज़ः' (روضہ) चे अनेक.] (१) बागा; उपवने. (२) अभ्यास; मेहनत. (३) परिश्रम; कष्ट. (४) तपस्या.

रियाज़त (ریاضت) स्त्री. ('अ.) (१) परिश्रम; उद्योग. (२) व्यायाम; मेहनत. (३) तपस्या; इंद्रियदमन. (४) अभ्यास; सराव. (५) मजुरी. **–कश** (کش–) वि. ('अ. + फ़ा.) (१) तपस्या करणारा. (२) अभ्यास, मेहनत करणारा. **–कशी** (کشی–) स्त्री. ('अ. + फ़ा.) तपस्या; तपश्चर्या. **–गाह** (گاہ –) स्त्री. ('अ. + फ़ा.) तपोवन; तपश्चर्येचे स्थान.

रियाज़ती (ریاضتی) वि. ('अ.) (१) व्यायाम करणारा. (२) संयमी; तपस्वी.

रियाज़ी (ریاضی) स्त्री. ('अ.) गणित; बीजगणित; गणितविद्या. **–दां** (داں –) वि. ('अ.+फ़ा.) गणितज्ञ.

रियाल (ریال) पु. ('अ.) एक नाणे; डॉलर.

रियासत (ریاست) स्त्री. ('अ.) (१) अध्यक्षता; स्वामित्व; नेतृत्व. (२) सत्ता; शासन; राज्य; संस्थान; जहागीर; मोठी जमीनदारी. (३) वैभव; ऐश्वर्य.

रियाह (ریاح) पु. ['अ. 'रीह' (ریح) चे अनेक.] (१) वारे; वायू. (२) अपानवायू; पाद.

रियः (ریہ) पु. ('अ.) फुप्फुस.

रिवाक़ (رواق) पु. ('अ.) सज्जा; गॅलरी.

रिवाज (رواج) पु. ('अ.) प्रथा; रुढी; परंपरा; चाल.

रिवायत (روایت) स्त्री. ('अ.) (१) एखाद्याच्या तोंडून ऐकलेली गोष्ट जशीच्या तशी दुसऱ्याला सांगणे. हजरत मुहम्मद पैगंबर यांच्या तोंडून ऐकलेली गोष्ट त्यांच्याच शब्दांत इतरांना सांगणे. (२) इतिहास. [अनेक 'रिवायात' (روایات)].

रिशा (رشا) स्त्री. ('अ.) (१) दोरी. (२) उत्तरा; भाद्रपदा (नक्षत्र).

रिश्तः (رشتہ) पु. (फ़ा.) (१) कातलेला धागा; दोरा. (२) संबंध; नाते. (३) नारू (रोग). **–दार** (دار –) वि. (फ़ा.) नातेवाईक; आप्त. **–दारी** (داری –) स्त्री. (फ़ा.) नाते; स्वजनता. **–बपा** (بپا –); **–बरपा** (برپا –) वि. (फ़ा.) ज्याच्या पायाला दोरा बांधलेला आहे असा (पक्षी).

रिश्तः-ए-जां (رشتۂ جاں) पु. (फ़ा.) प्राणसूत्र; श्वास; श्वासोच्छ्वास.

रिश्तः-ए-पेचां (رشتۂ پیچاں) पु. (फ़ा.) वळवळणारा, सरपटणारा साप.

रिश्त-ए-शम'अ (رشتۂ شمع) पु. (फ़ा.+'अ.) मेणबत्तीतील दोरा.

रिश्तः-ए-हुलवः (رشتۂ حلوہ) पु. (फ़ा. + 'अ.) शेवया.

रिश्वत (رشوت) स्त्री. ('अ.) लाच; लाचलुचपत. **–ख़ोर** (خور –) वि. ('अ.+फ़ा.) लाचखाऊ. **–दिही** (دھی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) लाच देणे. **–सितानी** (ستانی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) लाच घेणे, खाणे.

रिसालत (رسالت) स्त्री. ('अ.) (१) संदेश; समाचार. (२) दूतकर्म; प्रेषितत्त्व; पैगंबरी. **–पनाह** (پناہ –) वि. ('अ.+फ़ा.) पैगंबर; प्रेषित. **–मआब** (مآب –) वि. ('अ.) पैगंबर.

रिसालः (رسالہ) पु. ('अ.) (१) नियतकालिक; मासिक. (२) पुस्तिका; चोपडे. (३) घोडदळ; अश्वारोही सेना. **–दार** (دار –) पु. ('अ.+फ़ा.) घोडदळावरील अधिकारी.

रिसालः-ए-बक़ियः (رسالۂ برقیہ) पु. ('अ.) तार.

रिहल (رحل) स्त्री. ('अ.) पुस्तक ठेवण्याची लाकडी घोडी.

रिहलत (رحلت) स्त्री. ('अ.) (१) प्रस्थान; प्रयाण. (२) मृत्यू.

रिहा (رہا) वि. (फ़ा.) मुक्त केलेला; सोडून दिलेला.

रिहा'ई (رہائی) स्त्री. (फ़ा.) सुटका; मुक्ती; मोकळीक.

रिहान (رہان) पु. ['अ. 'रहन' (رہن) चे अनेक.] (१) अटी. (२) शर्यत; पैज. (३) गहाण ठेवणे.

रीक़ (ریق) पु. ('अ.) थुंकी; लाळ.

रीख (ریخ) स्त्री. (फ़ा.) (१) विष्ठा (माणसांची किंवा पक्ष्यांची). (२) जुलाब.

रीचार (ریچار); **रीचाल** (ریچال) पु. (फ़ा.) लोणचे.

रीश (ریش) स्त्री. (फ़ा.) दाढी; श्मश्रू. **–खंद** (–خند) वि. (फ़ा.) (१) हसतमुख; हसणारा. (२) हास्यास्पद. (पु.) थट्टा. **–गाव** (–گاؤ) वि. (फ़ा.) मठ्ठ; मूर्ख. **–बच्चः** (–بچہ) पु. (फ़ा.) हनुवटीवरील दाढीचे केस. **–बाबा** (–بابا) पु. (फ़ा.) द्राक्षाची एक जात.

रीश-ए-क़ादी (ریش قاضی) स्त्री. (फ़ा. + 'अ.) (१) काझीची दाढी. (२) दारू सोदण्याचे गाळणे.

रीशमाल (ریشمال) वि. (फ़ा.) आपल्या बायकोला शीलविक्रय करावयास लावून त्यावर पोट भरणारा; निर्लज्ज.

रीह् (ریح) स्त्री. ('अ.) (१) वायू; वात; वारा. (२) गंध; वास. (३) पाद; अपानवायू.

रीही (ریحی) वि. ('अ.) वातरोगाचा; वाताचा.

रु'ऊनत (رعونت) स्त्री. ('अ.) (१) अहंकार; घमेंड. (२) बंडखोरी.

रु'ऊसा (رؤسا) पु. ['अ. 'र'ईस' (رئیس) चे अनेक.] श्रीमंत लोक; अमीरउमराव.

रुकू'अ (رکوع) पु. ('अ.) नमाजामध्ये गुडघ्यांवर हात ठेवून खाली वाकणे; नम्रतेने खाली वाकणे.

रुक़्'अः (رقعہ) पु. ('अ.) (१) कागदाचा तुकडा; चिठोरा. (२) पत्र; चिठ्ठी; बिल; निमंत्रणपत्र. (३) ठिगळ; चिंधी.

रुक्न (رکن) पु. ('अ.) (१) स्तंभ; खांब; आधारस्तंभ. (२) सभासद; कार्यकर्ता.

रुक्न-ए-रकीन (رکن رکین) पु. ('अ.) मुख्य सभासद; आधारस्तंभ.

रुक्बः (رکبہ) पु. ('अ.) गुडघा; जानू.

रुख़ (رخ) पु. (फ़ा.) (१) गाल; कपोल. (२) आकृती. (३) चेहरा; तोंड; समोरचा भाग. (४) बुद्धिबळातील हत्ती. (५) बाजू; पैलू; दिशा. (६) कृपादृष्टी.

रुख़ाम (رخام) पु. ('अ.) संगमरवर.

रुख़्शां (رخشاں) वि. (फ़ा.) चकचकीत; चमकदार; उज्वल.

रुख़्शिंदगी (رخشندگی) स्त्री. (फ़ा.) दीप्ती; प्रकाश; चमक.

रुख़्शिंदः (رخشندہ) वि. (फ़ा.) चमकणारा; ज्वलंत; तळपणारा.

रुख़्सत (رخصت) स्त्री. ('अ.) (१) निरोप. (२) प्रस्थान; प्रयाण. (३) आज्ञा; परवानगी. (४) रजा; मोकळीक; फुरसत. (५) वधूचे वरगृही जाणे. **–तलब** (–طلب) वि. ('अ.) जाण्याची परवानगी मागणारा.

रुख़्सतानः (رخصتانہ) पु. ('अ. + फ़ा.) निरोपाच्या वेळी दिला जाणारा नजराणा; भेट अथवा हक्काची रक्कम.

रुख़्सती (رخصتی) स्त्री. ('अ.) (१) वधूला वरगृही पाठविणे; पाठवणी. (२) निरोपाच्या वेळी दिली जाणारी रक्कम.

रुख़्सार (رخسار); **रुख़्सारः** (رخسارہ) पु. (फ़ा.) गाल; कपोल.

रुजहान (رجحان) पु. ('अ.) (१) वृत्ती; प्रवृत्ती; कल. (२) रुची; गोडी; आकर्षण; ध्यान; लक्ष.

रुजू'अ (رجوع) स्त्री. ('अ.) (१) आकर्षण; ओढ. (२) प्रवृत्ती; कल. (३) परत येणे. (४) खटल्याची सुनावणी; फेरविचार; अपील. (वि.) (१) प्रवृत्त; आकर्षित; आकृष्ट. (२) कार्यमग्न; तल्लीन. [अनेक 'रुजू'आत' (رجوعات) परंतु एकवचनीच प्रयोग केला जातो].

रुजूलियत (رجولیت) स्त्री. ('अ.) पौरुष; कामशक्ती.

रुत़्ब (رطب) पु. ('अ.) पिकलेला खजूर.

रुत़्बत (رطوبت) स्त्री. ('अ.) (१) आर्द्रता; ओलेपणा. (२) रस.

रुत्बः (رتبہ) पु. ('अ.) (१) पदवी; हुद्दा; दर्जा. (२) प्रतिष्ठा; मान. (३) महत्त्व; श्रेष्ठता. **–शनास** (–شناس) वि. ('अ. + फ़ा.) दुसऱ्याची योग्यता ओळखणारा व कदर करणारा.

रुफ़क़ा (رفقا) पु. ['अ. 'रफ़ीक़' (رفیق) चे अनेक.] मित्र; सहकारी.

रुफ़्तः (رفتہ) वि. (फ़ा.) झाडलेला; झटकलेला; पुसलेला.

रुब (رب) पु. ('अ.) शिजवून घट्ट केलेला फळांचा रस.

रुबा (ربا) प्रत्य. (फ़ा.) पळवून नेणारा; चोरणारा. [उदा. 'दिल रुबा' (دلربا) वि. (फ़ा.) हृदय चोरणारा; प्रेमपात्र].

रुबा'ओ (رباعی) स्त्री. ('अ.) चार चरणांची कविता. [अनेक 'रुबा'अियात' (رباعیات) स्त्री. ('अ.) रुबाया].

रुबायंदः (رباینده) वि. (फ़ा.) पळविणारा; चोरणारा.

रुबूबियत (ربوبیت) स्त्री. ('अ.) ईश्वरत्व.

रुमूज़ (رموز) पु. ['अ. 'रम्ज़' (رمز) चे अनेक.] रहस्ये.

रुम्मान (رمان) पु. ('अ.) डाळिंब.

रुम्मानी (رمانی) वि. ('अ.) लालभडक.

रुश्द (رشد) पु. ('अ.) (१) सद्गुरूकडून मिळालेली दीक्षा. (२) सन्मार्ग.

रुसवा (رسوا) वि. (फ़ा.) बदनाम; अपमानित.

रुसवा'ई (رسوائی) स्त्री. (फ़ा.) बदनामी; निंदा; अपमान.

रुसुल (رسل) पु. ['अ. 'रसूल' (رسول) चे अनेक.] अनेक प्रेषित; पैगंबर; अवतार.

रुसूख़ (رسوخ) पु. ('अ.) (१) प्रवेश; पोहोच; वशिला. (२) प्रेम; स्नेह. (३) दक्षता; कुशलता. (४) दृढता; धैर्य; विश्वास.

रुसूख़ियत (رسوخیت) स्त्री. ('अ.) सातत्य; अखंड मैत्री.

रुसूब (رسوب) पु. ('अ.) खाली बसलेला गाळ.

रुसूम (رسوم) पु. ['अ. 'रस्म' (رسم) चे अनेक.] (१) चाली; रुढी; प्रथा; परंपरा. (२) नियम; कायदे. (स्त्री.) कर; फी; पोस्टेज.

रुस्तख़ेज़ (رستخیز) स्त्री. (फ़ा.) प्रलय; अंतिम निवाडघाचा दिवस.

रुस्तनी (رستنی) स्त्री. (फ़ा.) भाजी; हिरवळ; झाडेझुडपे.

रुस्तम (رستم) पु. (फ़ा.) इराणचा प्रसिद्ध योद्धा व पहिलवान; अत्यंत शूर वीर.

रुस्ती (رستی) स्त्री. (फ़ा.) (१) सुख; समृद्धी. (२) आजीविका.

रू (رو) पु. (फ़ा.) (१) चेहरा; मुख; आकृती. (स्त्री.) (२) कारण; सबब. (३) तळ; बूड. (४) अग्रभाग; पुढचा भाग. (५) आशा. (६) ढंग; पद्धती. **–कश** (–کش) वि. (फ़ा.) (१) लज्जित; शर्मिंदा. (२) प्रतिस्पर्धी; लज्जित करणारा. **–कार** (–کار) स्त्री. (फ़ा.) घराचा पुढील भाग. **–गर्दां** (–گردان) वि. (फ़ा.) (१) तोंड फिरविलेला; पराङ्मुख. (२) अवज्ञा करणारा. **–दररू** (–در رو) अव्य. (फ़ा.) समोरासमोर; तोंडावर; स्पष्टपणे. **–दार** (–دار) वि. (फ़ा.) प्रतिष्ठित; पूज्य. **–दारी** (–داری) स्त्री. (फ़ा.) प्रतिष्ठा; मान. **–नुमा'ई** (–نمائی) स्त्री. (फ़ा.) (१) तोंड दाखविणे; लग्नात वधूचा चेहरा वराला दाखविण्याचा विधी. (२) वधूचा चेहरा पाहून तिला वरपक्षाकडून दिली जाणारी रक्कम. (लग्नातील एक विधी). **–पाक** (–پاک) पु. (फ़ा.) रुमाल. **–पोश** (–پوش) वि. (फ़ा.) तोंड लपविलेला; फरारी. **–बंद** (–بند) पु. (फ़ा.) बुरखा; पडदा. **–ब.क़फ़ा** (–بہ قفا) वि. (फ़ा.+'अ.) तोंड मागे वळविलेला; मान खाली घातलेला. **–ब.कार** (–بہ کار) वि. (फ़ा.) कामात मग्न असलेला. (पु.) (१) कोर्टाने दिलेला हुकूम; आज्ञापत्र; वॉरंट. (२) सादर करणे. **ब.दीवार** (–بہ دیوار) वि. (फ़ा.) स्तब्ध; चकित; थक्क. **–बराह** (–براہ) वि. (फ़ा.) (१) प्रवासास निघालेला; तयार. (२) योग्य मार्गावर असलेला. (३) दुरूस्त केलेला; सुधारलेला. **–बरू** (–برو) अव्य. (फ़ा.) प्रत्यक्ष; समोरासमोर. **–माल** (–مال) पु. (फ़ा.) तोंड पुसण्याचा कपडा; रुमाल. **–यत** (–یت) स्त्री. ('अ.) दर्शन; पाहाणे. **–रि'आयत** (–رعایت) स्त्री. (फ़ा.) पक्षपात; विशेष सवलत. **–शनास** (–شناس) वि. (फ़ा.) (१) तोंडओळख असलेला. (२) परिचित. **–सफ़ेद** (–سفید) वि. (फ़ा.) (१) सुप्रसिद्ध; सदाचारी. (२) गोरा. **–सियाह** (–سیاہ) वि. (फ़ा.) (१) काळतोंड्या. (२) पापी. (३) बदनाम. **–सियाही** (–سیاهی) वि. (फ़ा.) (१) दुराचार; बदचाल. (२) बदनामी.

रू-ए-किताब (روے کتاب) पु. (फ़ा.+'अ.) लांबट चेहरा.

रू-ए-ज़मीं (روے زمیں) स्त्री. (फ़ा.) धरातल; पृथ्वीतल.

रू-ए-दाद (روئداد) स्त्री. (फ़ा.) (१) वृत्तांत; समाचार. (२) कामकाज; कार्यवाही.

रू-ए-सुख़न (روے سخن) पु. (फ़ा.) ज्याला उद्देशून बोलले जाते तो; संबोधन.

रूदाद (روداد) स्त्री. (फ़ा.) (१) वृत्तांत; हकीगत. (२) कामकाज; कार्यवाही.

रूम (روم) पु. ('अ.) (१) तुर्कस्तान. (२) रोम.

रूमी (رومی) वि. ('अ.+फ़ा.) तुर्कस्तानचा रहिवासी; तुर्क. (स्त्री.) तुर्की (भाषा).

रूयत (رویت) स्त्री. ('अ.) दृश्य; दर्शन.

रूया (رویا) पु. ('अ.) (१) स्वप्न. (२) निद्रा.

रूस्ता (روستا) पु. (फ़ा.) (१) खेडे; ग्राम. (२) ग्रामीण व्यक्ती. **–'ई** (–ئی) वि. (फ़ा.) खेडवळ; गावठी; गांवढळ. (पु.) शेतकरी.

रूह (روح) स्त्री. ('अ.) (१) आत्मा; जीव; प्राण; प्राणवायू. (२) सत्त्व; सार; तथ्य. (३) अत्तर; अर्क. **–अफ़्ज़ा** (–افزا) वि. ('अ.+फ़ा.) (१) प्राणवर्धक; जीवन वाढविणारा. (२) चित्त प्रसन्न

करणारा. **–फ़र्सा** (فرسا –) वि. ('अ. + फ़ा.) अंतःकरणाला यातना देणारा.

रूह-उल्-अमीन (روح الامین); **रूह-उल्-क़ुदुस** (روح القدس) पु. ('अ.) हजरत जिब्रील.

रूह-उल्-लह (روح الله) पु. ('अ.) येशू ख्रिस्त.

रूह-ए-मुत्लक़ (روح مطلق) पु. ('अ.) ईश्वर; परमात्मा.

रूह-ए-रवाँ (روح رواں) स्त्री. ('अ.+फ़ा.) प्राणवायू; आधारस्तंभ; मूलतत्त्व.

रूहानियत (روحانیت) स्त्री. ('अ.) आध्यात्मिकता; अध्यात्मवाद.

रूहानियाँ (روحانیاں) पु. **रूहानियान** (روحانیان) ('अ.+फ़ा.) देवदूत (अनेक).

रूहानियात (روحانیات) स्त्री. ('अ.) अध्यात्मशास्त्र; अध्यात्मवाद.

रूहानी (روحانی); **रूही** (روحی) वि. ('अ.) (१) आत्मिक; आत्म्याविषयक. (२) हार्दिक. (३) आध्यात्मिक.

रेख़्ता (ریختہ) वि. (फ़ा.) खाली पडलेला; विसकटलेला; अस्ताव्यस्त. (पु.) उर्दू भाषेचे जुने नाव; उर्दूचे काव्य; हिंदुस्तानी भाषा (संमिश्र स्वरूपाची). **–गर** (گر –) वि. (फ़ा.) धातूंचे ओतकाम करणारा; धातूची भांडी बनविणारा. **–गो** (گو –) वि. (फ़ा.) उर्दूत काव्य रचणारा. **–दम** (دم –) वि. (फ़ा.) बोथट; धार नसलेला. **–पा** (پا –) वि. (फ़ा.) भरभर चालणारा; वेगवान. **–मू** (مو –) वि. (फ़ा.) ज्याचे केस गळून पडले आहेत असा.

रेख़्ती (ریختی) स्त्री. (फ़ा.) बायकांच्या (बायकी) भाषेत केलेली उर्दू कविता.

रेग (ریگ) स्त्री. (फ़ा.) वाळू; रेती. **–दान** (دان –) पु. (फ़ा.) वालुकापात्र. (लिहिलेल्या कागदावरील शाई वाळावी म्हणून टाकली जाणारी वाळू ठेवण्याचे भांडे). **–माल** (مال –) पु. (फ़ा.) वाळूचा कागद. **–माही** (ماهی –) स्त्री. (फ़ा.) वाळूत उत्पन्न होणारी (सरडघासारखी) एक प्रकारची मासळी. ही औषधाच्या कामी वापरली जाते. **–शो** (شو –) पु. (फ़ा.) माती साफ करून तिच्यातून सोने काढणारा.

रेग-ए-रवाँ (ریگ رواں) स्त्री. (फ़ा.) (१) चकाकणारी वाळू; ही प्रवाही असल्याचा भास होतो. (२) वाऱ्याने इकडे तिकडे वाहणारी वाळू.

रेगिस्तान (ریگستان) पु. (फ़ा.) वाळवंट; मरुभूमी.

रेज़ (ریز) प्रत्य. (फ़ा.) पसरविणारा; वृष्टी करणारा. [उदा. 'अश्क रेज़' (اشک ریز) वि. (फ़ा.) अश्रू ढाळणारा.] (स्त्री.) पक्ष्यांची चिवचिव.

रेज़गारी (ریزگاری); **रेज़गी** (ریزگی) स्त्री. (फ़ा.) (१) मोड; खुर्दा; चिल्लर. (२) लहान तुकडा; कण.

रेज़ाँ (ریزاں) वि. (फ़ा.) पसरवीत असलेला; टाकत, पाडत असलेला.

रेज़िंदः (ریزندہ) वि. (फ़ा.) पसरविणारा; वर्षविणारा.

रेज़िश (ریزش) स्त्री. (फ़ा.) (१) पसरणे; वाहाणे. (२) पडशामुळे नाक वाहाणे.

रेज़ः (ریزہ) पु. (फ़ा.) (१) कण; लहान तुकडा. (२) कात्रण. (३) रेशमी कापडाचे ठाण. (४) मजूर; कामगार मुलगा. **–कार** (کار –) वि. (फ़ा.) खूप बारीक नक्षीकाम करणारा. **–ख़्वाँ** (خواں –) वि. (फ़ा.) गायक; गवई. **–रेज़ः** (ریزہ –) वि. (फ़ा.) चूर चूर; तुकडे तुकडे; भुगा. **–सरा** (سرا –) वि. (फ़ा.) गायक.

रेवंद (ریوند); **रेवंदचिनी** (ریوند چینی) स्त्री. (फ़ा.) रेवाचिनी नावाची एक औषधी वनस्पती.

रेव (ریو) पु. (फ़ा.) (१) कपट; फसवेगिरी. (२) शंका; संदेह.

रेश (ریش) पु. (फ़ा.) जखम; व्रण; क्षत.

रेशम (ریشم) पु. (फ़ा.) रेशीम; रेशमाची गाठ.

रेशमीं (ریشمیں); **रेशमी** (ریشمی) वि. (फ़ा.) रेशमी; रेशमाचा.

रेशः (ریشہ) पु. (फ़ा.) (१) तंतू; तात. (२) आंब्यातील घसकटे; केसर. (३) लाकडातील रेशा, नार. **–ख़त्मी** (خطمی –) (वि.) (१) मोहित; मुग्ध. (२) हसतमुख. (स्त्री.) एक औषधी मुळी. **–दवानी** (دوانی –) स्त्री. (फ़ा.) भांडणतंटा करणे; उपद्रव देणे. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) तंतुमय; रेशा असलेला.

रेसीदः (ریسیدہ) वि. (फ़ा.) कातलेला.

रेस्माँ (ریسماں); **रेस्मान** (ریسمان) स्त्री. (फ़ा.) (१) दोरी; दोर. (२) दोरा. **–बाज़** (باز –) वि. (फ़ा.) डोंबारी; दोरावरील कसरत करणारा

रेहन (رھن) पु. ('अ.) गहाण ठेवणे. पाहा 'रहन'.

रैं'आन (ریعان) पु. ('अ.) (१) आरंभ; सुरुवात. (२) यौवनारंभ; नवजवानी.

रैहाँ (ریحاں); **रैहान** (ریحان) पु. ('अ.) (१) तुळशीसारखे एक सुगंधित झुडुप. (२) सुगंधित गवत किंवा झुडुप. (३) एक प्रकारची अरबी लेखन पद्धती. (४) गुलाबाखेरीज इतर प्रकारचे फूल.

रैहानी (ریحانی) स्त्री. ('अ.) (१) एक प्रकारचे सुगंधित मद्य. (२) एक प्रकारची तंबाखू. (वि.) रैहानाच्या वासाचा.

रैहानः (ریحانہ) स्त्री. ('अ.) जेथे रैहान उगवले आहे अशी जमीन.

रैब (ریب) पु. ('अ.) (१) शंका; संदेह. (२) अपघात.

रो (رو) प्रत्य. [फ़ा. 'रुस्तन' (رستن) उगवणे.] उगवणारा. [उदा. 'खुदरो' (خود رو) वि. (फ़ा.) आपोआप उगवणारे (झाड वगैरे)].

रो'अब (رعب) पु. ('अ.) (१) रुबाब; ऐट. (२) वचक; वजन; धाक; तेज. **–दार** (دار –) वि. ('अ. + फ़ा.) रुबाबदार; ऐटबाज; तेजस्वी.

रो'ईदगी (روئیدگی) स्त्री. (फ़ा.) (१) उत्पत्ती; उगवणे. (२) वनस्पती.

रो'ईन (روئین) वि. (फ़ा.) धातूचा; पितळेचा **–तन** (تن –) वि. (फ़ा.) वज्रासारखे मजबूत शरीर असलेला; लोहपुरुष.

रोज (روز) पु. (फ़ा.) (१) दिवस; दिन. (२) एका दिवसाची मजुरी. (अव्य.) दररोज; नित्य. **–अफ़ज़ुं** (افزوں –) वि. (फ़ा.) दररोज वाढणारा; वृद्धिगत होणारा. **–गार** (گار –) पु. (फ़ा.) (१) उद्योग; व्यवसाय; पेशा; धंदा; नोकरी; व्यापार. (२) काळ; समय; युग. **–नामचः** (نامچہ –) पु. (फ़ा.) दैनंदिनी; रोजनिशी; डायरी. **–नामः** (نامہ –) पु. (फ़ा.) दैनिकपत्र. **–बरोज़** (بروز –) अव्य. (फ़ा.) दररोज; नित्य. **–मर्रः** (مرہ –) अव्य. (फ़ा.) रोजच्या रोज; प्रतिदिन. (स्त्री.) रोजच्या व्यवहारातील भाषा; व्यावहारिक बोलीभाषा.

रोज-ए-क़ियामत (روز قیامت); **रोज-ए-जज़ा** (روز جزا) पु. (फ़ा. + 'अ.) अंतिम निवाड्याचा दिवस.

रोज-ए-वसीं (روز بسیں) पु. (फ़ा.) मृत्युदिन.

रोज-ए-रौशन (روز روشن) पु. (फ़ा.) निरभ्र दिवस; उत्तम हवा असलेला दिवस.

रोज-ए-शुमार (روز شمار); **रोज़-ए-हिसाब** (روز حساب) पु. (फ़ा. + 'अ.) कर्मफल देण्याचा दिवस.

रोज-ओ-शब (روز و شب) पु. (अव्य.) (फ़ा.) रात्रदिवस; अहोरात्र.

रोज़न (روزن) पु. (फ़ा.) (१) छिद्र; भोक. (२) झरोका.

रोज़ानः (روزانہ) अव्य. (फ़ा.) दररोज; नित्य; प्रत्येक दिवशी.

रोज़ी (روزی) स्त्री. (फ़ा.) (१) उपजीविका; रोजगार. (२) रोजचा भोजनखर्च. (३) मजुरी. **–रसां** (رساں –) वि. (फ़ा.) (१) अन्नदाता; नोकरी देणारा. (२) परमेश्वर.

रोज़ीनः (روزینہ) पु. (फ़ा.) (१) एका दिवसाची मजुरी. (२) रोजचा खर्च. (३) छात्रवृत्ती; पेन्शन. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) (१) रोजची मजुरी मिळविणारा. (२) पगारदार.

रोज़ः (روزہ) पु. (फ़ा.) व्रत; उपवास; उपोषण; रमजानच्या महिन्यात मुसलमान लोक दिवसभर करतात तो उपास. (प्रत्य.) दिवसांचा. [उदा. 'पंज रोज़ः' (پنج روزہ) वि. (फ़ा.) पाच दिवसांचा]. **–कुशा'ई** (کشائی –) स्त्री. (फ़ा.) (१) उपवासाचे पारणे. (२) उपवास करणाऱ्यांसाठी उपास सोडण्याकरिता अन्न पाठविणे किंवा आपल्या घरी बोलावून जेवू घालणे. **–ख़ोर** (خور –) वि. (फ़ा.) उपास न करणारा; उपवासाच्या दिवशी भोजन करणारा. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) उपास करणारा; व्रतस्थ. **–शिकनी** (شکنی –) स्त्री. (फ़ा.) उपास मोडणे.

रोज़ः-ए-मरियम (روزۂ مریم) पु. (फ़ा.) येशूच्या जन्मदिनी मेरी माताने मौनपूर्वक केलेला उपास. (स्त्री.) मौन; शांती.

रोद (رود) पु. (फ़ा.) (१) नदी. (२) कालवा; ओढा. **–बार** (بار –) पु. (फ़ा.) (१) जेथे अनेक नद्या वाहतात असा प्रदेश. (२) मोठा कालवा; खाडी.

रोदः (رودہ) पु. (फ़ा.) (१) आतडे. (२) तात; धनुष्याची दोरी.

रोब (روب) प्रत्य. (फ़ा.) झाडणारा; साफ करणारा. [उदा. 'खाकरोब' (خاک روب) वि. (फ़ा.) धूळ झाडणारा].

रोबकार (روبکار) पु. (फ़ा.) सरकारी हुकूम; आदेशपत्र.

रोबकारी (روبکاری) स्त्री. (फ़ा.) खटल्याची सुनावणी; कार्यवाही; कामकाज.

रोबाह (روباہ); **रोबः** (روبہ) स्त्री. (फ़ा.) कोल्हा; खोकड. **–बाज़** (باز –) वि. (फ़ा.) लुच्चा; लबाड; धूर्त.

रोयत (رویت) ('अ.) पाहाणे; दर्शन.

रोया (رویا) पु. ('अ.) स्वप्न.

रोशन (روشن) वि. (फ़ा.) (१) प्रकाशित; प्रकाशमान; चकचकीत; प्रज्वलित. (२) प्रकट; स्पष्ट; उघड; जाहीर. (३) प्रसिद्ध; प्रकाशित. **–चौकी** (چوکی –) स्त्री. (फ़ा. + हिं.) वाजंत्र्यांचा ताफा; सनई; वाजंत्री. **–दमीर** (ضمیر –) वि. (फ़ा. + 'अ.) (१) सहृदय; सत्प्रवृत्त. (२) बुद्धिमान. (३) अंतर्यामी.

रोसपी (روسپی) स्त्री. (फ़ा.) व्यभिचारीणी; कुलटा.

रौ (رو) प्रत्य. [फ़ा. 'रफ़्तन' (رفتن) जाणे; चालणे.] जाणारा; चालणारा. [उदा. 'पेशरौ' (پیش رو) वि. (फ़ा.) पुढे जाणारा; पथप्रदर्शक; पुढारी].

रौ (رو) स्त्री. (फ़ा.) (१) पाण्याचा प्रवाह; धारा. (२) आवेश. (३) क्रोध.

रौग़न (روغن) पु. (फ़ा.) (१) तेल. (२) तूप. (३) रोगण; वॉर्निश. (४) चमक; पॉलीश. (५) तेलकटपणा; चिकटपणा. **–गर** (گر–) वि. ('अ.+फ़ा.) तेली. **–ए-ज़बानी** (زبانی–) स्त्री. ('अ.+फ़ा.) गोडगोड बोलणे; लाडीगोडी; खुशामत. **–दार** (دار –) वि. ('अ. + फ़ा.) तेलाची फोडणी दिलेला.

रौग़न-ए-क़ाज़ (روغن قاز) पु. ('अ.+फ़ा.) (१) राजहंसाची चरबी. ही अत्यंत चिकट व बुळबुळीत असते. (२) खुशामत.

रौग़न-ए-कुंजद (روغن کنجد) पु. ('अ.+फ़ा.) तिळाचे तेल.

रौग़न-ए-गाव (روغن گاو) पु. ('अ.+फ़ा.) गाईचे तूप.

रौग़न-ए-ज़र्द (روغن زرد) पु. ('अ.+फ़ा.) (१) तूप; घृत. (२) गाईचे तूप.

रौग़न-ए-तल्ख़ (روغن تلخ); **रौग़न-ए-सियाह** (روغن سیاہ) पु. ('अ. + फ़ा.) मोहरीचे तेल; कडू तेल; दिव्यासाठी वापरण्याचे तेल.

रौग़नी (روغنی) वि. (फ़ा.) (१) स्नेहयुक्त; तेलकट. (२) तूप चोपडलेली (रोटी)

रौज़न (روزن) पु. ('अ.) (१) छिद्र; भोक. (२) लहान खिडकी; झरोका.

रौज़ः (روضہ) पु. ('अ.) (१) उद्यान; बाग; हिरवळीचे मैदान. (२) एखाद्या साधूची किंवा थोर पुरुषाची समाधी; (वर इमारत आणि घुमट असलेली) मक़बरः. **–ख़्वाँ** (خوان–) वि. ('अ.+फ़ा.) मिंबरवर बसून कर्बल्याच्या शोककारक घटनांचे वर्णन करणारा; 'मरसियः' पढणारा.

रौज़ः-ए-रयाहीन (روضہ ریاحین); **रौज़ः-ए-रिज़्वाँ** (روضہ رضواں) पु. ('अ.) स्वर्ग; नंदनवन.

रौनक़ (رونق) स्त्री. (फ़ा.) (१) शोभा; सौंदर्य. (२) तेज; दीप्ती; कांती. (३) आनंद; मौज. **–अफ़्ज़ा** (افزا –); **–अफ़रोज़** (افروز –); **–आरा** (آرا –); **–फ़िज़ा** (فزا –) वि. (फ़ा.) (१) शोभा वाढविणारा; सौंदर्य वृद्धिगत करणारा. (२) उपस्थित; आगमन करणारा.

रौशन (روشن) वि. (फ़ा.) (१) प्रकाशमान; चकचकीत. (२) स्पष्ट; जाहीर. पाहा 'रोशन'. **–गुहर** (گہر –) वि. (फ़ा.) कुलीन. **–जबीं** (جبیں –) वि. (फ़ा.) उज्वल-ललाट. **–ज़मीर** (ضمیر –) वि. (फ़ा. + 'अ.) अंतर्यामी. **–तब'अ** (طبع –) वि. ('अ.) तीव्रबुद्धी. **–दान** (دان –) पु. (फ़ा.) घरात प्रकाश येण्याचे स्थान; झरोका; खिडकी. **–दिमाग़** (دماغ –) वि. ('अ.) तीक्ष्णबुद्धी; प्रतिभावान. (पु.) तपकीर. **–सवाद** (سواد –) वि. ('अ.) सुशिक्षित.

रौशना'ई (روشنائی) स्त्री. (फ़ा.) (१) प्रकाश; उजेड. (२) नेत्रज्योती. (३) शाई.

रौशनी (روشنی) स्त्री. (फ़ा.) (१) प्रकाश; तेज. (२) नेत्रज्योती. **–करना** (کرنا –) दिवा लावणे.

रौह् (روح) ('अ.) स्त्री. (१) प्रफुल्लता; ताजेपणा. (२) थंड वारा; गार वारे. (३) सुगंध. (४) सुख; आराम. [अनेक 'रौहात' (روحات)].

लंग (لنگ) पु. (फ़ा.) (१) लंगडा; लुळा (माणूस). (२) लंगडेपणा; पंगुता. (३) लिंग; शिश्न.

लंगर (لنگر) पु. (फ़ा.) (१) नांगर (जहाजाचा). (२) गोरगरिबांना दररोज जेथे फुकट जेवण मिळते ते स्थान; सदावर्त. (३) जाडजूड दोर; साखळदंड. (४) एक प्रकारचा लंगोट. (५) लंबक. (६) लोढणे; पायांतील बेडी. **–अंदाज़** (انداز –) वि. (फ़ा.) नांगर टाकलेले, नांगरलेले (जहाज). **–ख़ानः** (خانہ –) पु. (फ़ा.) अन्नछत्र; सदावर्त. **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) जहाजे थांबतात ती जागा; गोदी.

लंगरी (لنگری) पु. (फ़ा.) (१) एक प्रकारचा मोठा पेला. (२) थाळी; परात. (वि.) लंगराशी संबंधित.

लंज (لنج) पु. (फ़ा.) नखऱ्याने, तोऱ्याने चालणे.

लंदरा (لندرا) पु. (फ़ा.+तु.) लंडन (शहर).

ल'अन (لعن) स्त्री. ('अ.) (१) धिक्कार; निर्भर्त्सना. (२) शाप. **–त'अन** (طعن –) स्त्री. ('अ.) शिव्याशाप; टोमणे मारणे.

ल'अनत (لعنت) स्त्री. ('अ.) धिक्कार; निर्भर्त्सना. **–भेजना** (بھیجنا –) शिव्याशाप देणे; निर्भर्त्सना करणे. **–मलामत** (ملامت –) ('अ.) शिव्याशाप; निर्भर्त्सना; लज्जित करणे; खरडपट्टी.

ल'अब (لعب) पु. ('अ.) (१) खेळ; क्रीडा. (२) सहल; सफर.

ल'अबत (لعبت); **ल'अबतः** (لعبتہ) स्त्री. ('अ.) खेळणे; बाहुली.

ल'अल (لعل) पु. [फ़ा. 'लाल' (لال) चे अरबी रूप:] माणिक; पद्मराग. **–गूँ** (گوں –); **–फ़ाम** (فام –) वि. ('अ. + फ़ा.) तांबडा; माणकाच्या रंगाचा.

ल'आब (لعاب) वि. ('अ.) गारुडी; जादूगार.

ल'ईन (لعین) वि. ('अ.) ज्याचा धिक्कार करण्यात आला आहे असा; धिक्कृत; शापित.

ल'ईम (لئیم) वि. ('अ.) कृपण; कंजूष.

ल'ऊक़ (لعوق) पु. ('अ.) चाटण; अवलेह.

लक (لک) पु. (फ़ा.) (१) मूर्ख; निर्बुद्ध. (२) लाख (स्त्री.).

लकद (لکد) स्त्री. (फ़ा.) लाथ. **–कोब** (–کوب); **–ज़न** (–زن) लाथ मारणारा; लाथा झाडणारा.

लकन (لکن) पु. ('अ.) बोलताना अडखळणे; तोतरे बोलणे.

लक़ब (لقب) पु. ('अ.) (१) पदवी; किताब. (२) उपनाव.

लक़लक़ (لقلق) पु. ('अ.) (१) करकोचा; सारस. (२) जीभ; जिव्हा.

लक़लक़: (لقلقہ) पु. ('अ.) (१) करकोच्याचे ओरडणे. (२) प्रभाव; वजन. (३) वाक्पटुता.

लक़वः (لقوہ) पु. ('अ.) अर्धांगवायू (रोग). **–ज़दः** (–زدہ) वि. ('अ.+फ़ा.) अर्धांगवायू झालेला.

लक़ह (لقح) पु.('अ.) (१) गरोदर होणे. (२) गाभण असणे.

लक़ा (لقا) पु. ('अ.) मैथुन. पाहा 'लिक़ा'

लक़ा (لقا) पु. (फ़ा.) चेहरा; आकृती.

लक़िन (لقن) वि. ('अ.) एखादी गोष्ट चटकन समजणारा; बुद्धिमान.

लकिन (لکن) वि. ('अ.) अडखळत बोलणारा; तोतरा.

लक़्क़ (لق) वि. ('अ.) तुळतुळीत; सफाचट; केस नसलेला.

लक़्क़-ओ-दक़्क़ (لق و دق) वि. ('अ.) वैराण; ओसाड मैदान.

लख़लख़ (لخلخ) वि. (फ़ा.) दुबळा; कमजोर.

लख़लख़ाना (لخلخانا) क्रि. (फ़ा.+हिं.) भुकेने किंवा तहानेने व्याकुळ होणे; धापा टाकणे.

लख़लख़ः (لخلخہ) पु. ('अ.) अनेक सुगंधित वस्तूंचे एक उग्र मिश्रण. हे सामान्यतः आजाऱ्याला हुंगावयास देतात.

लख़चः (لخچہ) पु. (फ़ा.) ठिणगी; निखारा; ज्वाला.

लख़्त (لخت); **लख़्तः** (لختہ) पु. (फ़ा.) (१) तुकडा; भाग; अंश. (२) थोडासा भाग. ['यक लख़्त' (یک لخت) अव्य. (फ़ा.) एकूण; एका रकमेने; सारांश रूपाने; एकदम].

लख़्त-ए-जिगर (لخت جگر) पु. (फ़ा.) (१) काळजाचा तुकडा. (२) पुत्र; कन्या.

लख़्ते (لختے) वि. (फ़ा.) थोडासा; किंचित.

लख़्शाँ (لخشاں) वि. (फ़ा.) निसरडा; ज्यावरून पाय घसरतो असा; गुळगुळीत.

लग़त़ (لغط) पु. ('अ.) कोलाहल; आरडाओरडा.

लगन (لگن) स्त्री. (फ़ा.) (१) हात घुण्याचे भांडे. (२) मेणबत्ती पेटवून ठेवण्याची थाळी; पितळेची समई. (३) शेगडी.

लगाम (لگام) स्त्री. (फ़ा.) (१) लगाम (घोड्याचा). (२) लगामाच्या वाद्या किंवा दोऱ्या.

लग़ायत (لغایت) अव्य. ('अ.) (१) शेवटपर्यंत; पर्यंत. (२) सहित.

लग़ूनः (لغونہ) पु. (फ़ा.) तोंडाला लावण्याची पावडर; मुखचूर्ण.

लग़्ज़िश (لغزش) स्त्री. (फ़ा.) (१) निसरडे; घसरणे. (२) चूक; अपराध. (३) थरथरणे; कंप; कापणें.

लग़्व (لغو) वि. ('अ.) (१) व्यर्थ; निरर्थक. (२) असत्य; मिथ्या. (३) मूर्खपणाचा; हास्यास्पद; वाह्यात. **–गो** (–گو) वि. ('अ.+फ़ा.) (१) खोटे बोलणारा. (२) वाह्यात बडबड करणारा; बाष्कळ.

लग़्वियत (لغویت) स्त्री. ('अ.) (१) निरर्थकपणा. (२) असत्यता; (३) वाह्यातपणा. [अनेक 'लग़्वियात' (لغویات) स्त्री. ('अ.) असत्य, बाष्कळ गोष्टी].

लज़्म (لزم) पु. ('अ.) आवश्यक, अपरिहार्य असणे.

लज़ा (لظی) स्त्री. ('अ.) (१) भडकलेली आग. (२) नरकातील एक भाग.

लज़ा'इज़ (لذائذ) पु. ['अ. 'लज़ूज़त' (لذت) चे अनेक.] (१) अनेक लज्जती; स्वाद. (२) स्वादिष्ट पदार्थ.

लजाज (لجاج) पु. ('अ.) युद्ध; लढाई.

लजाजत (لجاجت) स्त्री. ('अ.) (१) युद्ध करणे. (२) गयावया करणे. (३) खुशामत; अजीजी; दीनता.

लज़िज़ (لزج) वि. ('अ.) चिकटणारा; चिकट.

लज़ीज़ (لذیذ) वि. ('अ.) लज्जतदार; स्वादिष्ट.

लज़ूम (لزوم) पु. ('अ.) आवश्यकता; अपरिहार्यता; अनिवार्यता.

लज़्ज़ (لجز) पु. ('अ.) (१) चिकटणे. (२) घसरणे; निसरणे.

लज़ूज़त (لذت) स्त्री. ('अ.) (१) स्वाद; रुची; मजा. (२) आनंद; सुख. **–आमेज़** (–آمیز) वि. ('अ. + फ़ा.) स्वादयुक्त. **–आश्ना** (–آشنا) वि. ('अ.+फ़ा.) रसज्ञ; अनुभवी; ज्याने लज्जत अनुभविली आहे असा. **–चश** (–چش) वि. ('अ.+फ़ा.) स्वाद चाखणारा.

लत (لت) पु. (फ़ा.) (१) पोट. (२) पाय; लाथ.

लत़ा'इफ़ (لطائف) पु. ['अ. 'लतीफ़ः' (لطیفہ) चे अनेक.] चुटके; विनोदी गोष्टी; सूक्ष्म विनोद. **–उल्-हियल** (–الحیل) पु. ('अ.) चांगले बहाणे; जे बहाणे आहेत असे वाटत नाही असे बहाणे.

लताफ़त (لطافت) स्त्री. ('अ.) (१) कोमलता; सुकुमारता. (२) सूक्ष्मता. (३) शुद्धता; पावित्र्य. (४) नाविन्य; ताजेपणा. (५) स्वाद; मजा.

लतीफ़ (لطیف) वि. ('अ.) (१) स्वादिष्ट; रुचकर. (२) सूक्ष्म. (३) कोमल. (४) उत्तम; छान. (५) नवीन; ताजा. (६) पचावयास सोपा, हलका. **–मिजाज** (مزاج –) वि. ('अ.) (१) कोमल अंतःकरणाचा. (२) रसिक.

लतीफ़ः (لطیفہ) पु. ('अ.) (१) चुटका; विनोदी गोष्ट. (२) अद्‌भुत गोष्ट. **–गो** (گو –); **–संज** (سنج –) वि. ('अ.+फ़ा.) विनोदी चुटके सांगून हसविणारा.

लत्मः (لطم) पु. ('अ.) थप्पड; सपाटा; रपाटा; ठोसा.

लदीम (لدیم) पु. ('अ.) जुना कपडा; ठिगळ लावलेले वस्त्र.

लदूद (لدود) वि. ('अ.) भांडखोर.

लनतरानी (لن ترانی) वा. ('अ.) (१) 'तू मला मुळीच पाहू शकणार नाहीस'. (मोझेसने परमेश्वराला दिव्यज्योती दाखविण्याची प्रार्थना केली तेव्हा झालेली आकाशवाणी). (२) घमेंड; प्रौढी.

लफ़ंग (لفنگ) वि. (फ़ा.) (१) लुच्चा; लबाड; लफंगा. (२) घमेंडखोर.

लफ़ीफ़ (لفیف) वि. ('अ.) (१) लपेटलेला; गुंडाळलेला. (२) मिसळलेला. (पु.) (१) मित्र. (२) गर्दी.

लफ़्च (لفچ) पु. (फ़ा.) जाड ओठ. (स्त्री.) व्यभिचारिणी.

लफ़्ज़ (لفظ) पु. ('अ.) (१) शब्द. (२) वचन; उक्ती. **–ब.लफ़्ज़** (ب لفظ –) अव्य. ('अ.) शब्दशः; संपूर्णपणे.

लफ़्ज़न् (لفظاً) वि. ('अ.) शब्दाने; शब्दशः.

लफ़्ज़ी (لفظی) वि. ('अ.) (१) शाब्दिक. (२) कोशातील मूळ (अर्थ).

लफ़्फ़ (لف) पु. ('अ.) (१) गुंडाळणे; लपेटणे. (२) मिसळणे; जोडणे.

लफ़्फ़ाज़ (لفاظ) वि. ('अ.) (१) बडबडघा; थापाडघा; गप्पीदास. (२) मधुरभाषी.

लफ़्फ़ाज़ी (لفاظی) स्त्री. ('अ.) (१) बडबड; बढाई. (२) वाक्पटुता.

लब (لب) पु. (फ़ा.) (१) ओठ; अधर. (२) किनारा; काठ (३) लाळ; थुंकी. **–खुश्क** (خشک –) वि. (फ़ा.) तहानेला. **–गीर** (گیر –) पु. (फ़ा.) तंबाखू ओढण्याचा पाईप. **–बंद** (بند –) वि. (फ़ा.) गप्प; मूक. **–ब.लब** (ب لب –) वि. (फ़ा.) ओठांवर ओठ ठेवलेला; जवळजवळ. **–बस्तः** (بستہ –) वि. (फ़ा.) मूक; गप्प. **–रेज़** (ریز –) वि. (फ़ा.) काठोकाठ भरलेला; परिपूर्ण

लब-ए-आब (لب آب) पु. (फ़ा.) नदी, समुद्र, वगैरेचा किनारा.

लब-ए-गोया (لب گویا) पु. (फ़ा.) बोलणारा (रे) ओठ.

लब-ए-गोर (لب گور) वि. (फ़ा.) (१) थडग्याचा किनारा; थडग्याजवळ जाऊन पोचलेला. (२) मरणासन्न.

लब-ए-जू (لب جو) पु. (फ़ा.) नदीचा किनारा.

लब-ए-म'अशूक़ (لب معشوق) पु. (फ़ा.+'अ.) हुक्का (वाजिद अली शाहने ठेवलेले नाव).

लब-ओ-दंदां (لب و دندان) पु. (फ़ा.) (१) योग्यता. (२) विद्वत्ता.

लब-ओ-लहजः (لب ولہجہ) पु. (फ़ा.) बोलण्याची पद्धत; शैली; उच्चारण.

लबन (لبن) पु. ('अ.) (१) दूध. (२) दही.

लबनीयः (لبنیہ) पु. ('अ.) खीर.

लबलबः (لبلبہ) वि. ('अ.) चिकट.

लबाद (لباد) पु. (फ़ा.) पावसाळी कोट; रेनकोट.

लबादः (لبادہ) पु. (फ़ा.) आत कापूस भरलेला मोठा डगला.

लबालब (لبالب) वि. (फ़ा.) काठोकाठ भरलेला; पुरेपूर.

लबीक़ (لبیق) वि. ('अ.) (१) बुद्धिमान; प्रतिभावान. (२) बडबडघा.

लबूस (لبوس) पु. ('अ.) (१) वस्त्र; पोषाख. (२) चिलखत; कवच.

लब्बैक (لبیک) वा. ('अ.) 'मी सेवेशी हजर आहे'; 'जी हां! उपस्थित'

लब्स (لبس) पु. ('अ.) कपडे घालणे.

लब्स (لبث) पु. ('अ.) उशीर करणे; विलंब.

लम (لم) अव्य. ('अ.) नाही; नव्हे. पाहा 'लिम'.

लम'अः (لمعہ) पु. ('अ.) प्रकाश; तेज. [अनेक 'लम'आत' (لمعات)].

लमहः (لمحہ) पु. ('अ.) क्षण; पळ. [अनेक 'लमहात' (لمحات)].

लम्क़ (لمق) पु. ('अ.) (१) शुद्ध करणे. (२) डोळे चोळणे.

लम्माज़ (لماز) वि. ('अ.) (१) दोष, अपराध करणारा. (२) डोळा घालणारा, मारणारा.

लम्स (لمس) पु. ('अ.) (१) स्पर्श. (२) भावना. (३) मैथुन.

लयान (لیان) पु. ('अ.) सुख; समृद्धी; वैभव.

लरज़ाँ (لرزاں) वि. (फ़ा.) थरथरणारा ; कापणारा.

लरज़िश (لرزش) स्त्री. (फ़ा.) थरथर; थरकाप; कंपन.

लरज़ः (لرزہ) पु. (फ़ा.) (१) थरकाप; कंप; कंपन. (२) भूकंप. (३) हिवतापाचा ज्वर. (४) रोमांच. (५) घाबरगुंडी. **–ख़ेज़** (خیز –) वि. (फ़ा.) भयंकर; भीषण.

लवाज़िम (لوازم); **लवाज़िमः** (لوازمہ) ['अ. 'लाज़िम' (لازم) चे अनेक.] आवश्यक गोष्टी; सामानसुमान; संबंधित गोष्टी; लवाजमा.

लवात़त (لواطت) स्त्री. ('अ.) गुदामैथुन; लौंडेबाजी.

लवाहिक़ (لواحق) पु. ['अ. 'लाहिक़ः' (لاحقہ) चे अनेक.] (१) मूळ वस्तूच्या शेवटी जोडल्या जाणाऱ्या वस्तू. (२) नातेवाईक; भाऊबंद. (३) नोकर-चाकर. (४) बरोबर असलेले सामान.

लव्वाम (لوام) वि. ('अ.) निर्भर्त्सना करणारा.

लश्कर (لشکر) पु. (फ़ा.) (१) सैन्य; लष्कर. (२) छावणी; कँप. (३) गर्दी; जमाव. **–आरा** (آرا –) वि. (फ़ा.) सैन्य सज्ज करणारा. **–कशी** (کشی –) स्त्री. (फ़ा.) आक्रमण; चढाई. **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) छावणी; पडाव.

लश्करी (لشکری) वि. (फ़ा.) (१) सैन्याचा; सैनिकी; लष्करी. (२) सैनिक. **–बोली** (بولی –) स्त्री. (फ़ा. + हि.) भेसळभाषा; –उर्दू.

लसिन (لسن) वि. ('अ.) (१) भाषाविद्. (२) शुद्ध व सोपी भाषा बोलणारा.

लस्सा'अ (لساع) वि. ('अ.) चावणारा; डसणारा (साप, विंचू वगैरे).

लस्सान (لسان) वि. ('अ.) (१) बडबडघा. (२) गोड बोलणारा.

लस्सानी (لسانی) स्त्री. ('अ.) वायफळ बडबड.

लह़जः (لہجہ) पु. ('अ.) (१) बोलण्याची किंवा वाचण्याची ढब, पद्धती, शैली. (२) गाण्याचा स्वर, तऱ्हा, पद्धत; आवाज.

लह़ज़ः (لحظہ) स्त्री. ('अ.) डोळघाच्या कोपऱ्यातून पाहाणे; तिरप्या नजरेने बघणे.

लह़ज़ः (لحظہ) पु. ('अ.) पळ; क्षण. **–ब.लह़ज़ः** (بہ لحظہ –) अव्य. ('अ. + फ़ा.) क्षणोक्षणी; हरघडी.

लह़द (لحد) स्त्री. ('अ.) (१) कबर; थडगे; समाधी. (२) थडग्यामध्ये एका बाजूस शव ठेवण्यासाठी केलेला कोनाडा.

लह़न (لحن) पु. ('अ.) (१) आवाज; स्वर (गाण्यातील). (२) राग; सूर.

लह़फ़ (لہف) पु. ('अ.) पस्तावणे; दुःख करणे.

लह़म (لحم) पु. ('अ.) मांस.

लह़मः (لحمہ) पु. ('अ.) (१) मांसाचा गोळा. (२) लहान मूल.

लह़िम (لحم) वि. ('अ.) मांसाहारी.

लह़ीम (لحیم) वि. ('अ.) मांसल; लठ्ठ. **–उल्-जुस्स** (الجثہ –) वि. ('अ.) घष्टपुष्ट; जाडजूड; लठ्ठ-भारती.

लह़ीम-ओ-शह़ीम (لحیم و شحیم) वि. ('अ.) मांसल; लठ्ठ; जाडजूड.

लह़व (لہو) पु. ('अ.) (१) खेळ; नाचरंग; संभोग. (२) धार्मिक कृत्यांपासून परावृत्त करणारी गोष्ट.

ला (لا) अव्य. ('अ.) (१) नाही; नको. (२) शिवाय; खेरीज. (उप.) नकार-अभावदर्शक शब्द. **–'अिलाज** (علاج –) वि. ('अ.) (१) असाध्य. (२) निरुपाय, नाइलाज झालेला. **–'अिल्म** (علم –) वि. ('अ.) (१) अशिक्षित. (२) अपरिचित; अनभिज्ञ; माहिती नसलेला. **–उबाली** (ابالی –) वा. ('अ.) 'मला पर्वा नाही'. (वि.) (१) निश्चित. (२) बेपर्वा. (३) निस्पृह. **–ओ-न'अम** (و نعم –) स्त्री. ('अ.) होय नाही. **–ओह़सी** (احصی –) वा. ('अ.) हा कुराणातील एका वाक्याचा अंश आहे. त्या वाक्याचा अर्थ असा आहे की, हे परमेश्वरा, मी तुझ्या गुणांना मर्यादित करू शकत नाही. **–कलाम** (کلام –) अव्य. ('अ.) (१) निःसंदेह; निःशंक. (२) अवश्य. **–किन** (کن –) अव्य. ('अ.) परंतु. **–क़िस** (قس –) वि. ('अ.) दोष, अपराध करणारा. **–ख़िराज** (خراج –) वि. ('अ.) कर-मुक्त; इनामी (जमीन). **–चार** (چار –) वि. ('अ. + फ़ा.) (१) असमर्थ; असहाय; निरुपाय झालेला. (२) दीन; दुःखी. **–चारी** (چاری –) स्त्री. ('अ. + फ़ा.) असमर्थता; निरुपाय; नाइलाज. (यांची शुद्ध रूपे 'नाचार' व 'नाचारी' अशी आहेत). **–जरम** (جرم –) वि. ('अ.) (१) अवश्यभावी. (२) निःसंशय. (३) असाध्य. **–जवाब** (جواب –) वि. ('अ.) (१) निरुत्तर; चूप. (२) अद्वितीय; अनुपम. (३) लज्जित. **–ज़वाल** (زوال –) वि. ('अ.) अविनाशी; शाश्वत. **–ता'इल** (طائل –) अव्य. ('अ.) व्यर्थ; निरर्थक. **–ति'अदाद** (تعداد –) वि. ('अ.) असंख्य; अगणित. **–तोह़सॉ** (تحصیٰ –) वि. ('अ.) अमर्याद; असीम. **–दवा** (دوا –) वि. ('अ.) असाध्य; ज्याचा इलाज होऊ शकत नाही असा. **–द'अवॉ** (دعویٰ –) वि. ('अ.) ज्याने आपली फिर्याद काढून घेतली आहे असा; ज्याचा काही हक्क

नाही असा. (पु.) अंग काढून घेणे; हक्क सोडून देणे. **–पतः** (پتہ –) वि. ('अ.+फ़ा.) बेपत्ता, नाहीसा झालेला. **–पर्वा** (پروا –) वि. ('अ. + फ़ा.) बेफिकीर; निष्काळजी; बेपर्वा. **–पर्वा'ई** (پروائی –) स्त्री. ('अ.+फ़ा.+हिं.) बेफिकीरी; बेपर्वा; गाफिलपणा. **–फ़ानी** (فانی –) वि. ('अ.) अविनाशी; शाश्वत. **–बुद** (بد –) वि. ('अ.) अनिवार्य; अपरिहार्य. **–मकान** (مکان –) वि. ('अ.) घर नसलेला. (पु.) ईश्वर. **–मज़्हब** (مذہب –) वि. ('अ.) कोणताही धर्म न मानणारा; नास्तिक. **–मुहालः** (محالہ –) अव्य. ('अ.) (१) अखेर. (२) नाइलाजाने. (३) नक्की. **–महदूद** (محدود –) वि. ('अ.) अमर्याद; बेहद्द. **–मुतनाही** (متناہی –) वि. ('अ.) अपार; असीम. **–यज़ाल** (یزال –) वि. ('अ.) अविनाशी; शाश्वत. (पु.) परमेश्वर. **–यन्फ़क** (ینفک –) वि. ('अ.) अविच्छिन्न. **–यमूत** (یموت –) वि. ('अ.) अमर. **–य'अनी** (یعنی –) वि. ('अ.) निरर्थक; व्यर्थ. **–रैब** (ریب –) अव्य. ('अ.) निःसंशय; नक्की. **–वलद** (ولد –) वि. ('अ.) अपत्यहीन; निस्संतान. **–वारिस़** (وارث –) वि. ('अ.) बेवारशी. **–शरीक** (شریک –) वि. ('अ. + फ़ा.) एकटा. (पु.) परमेश्वर. **–सानी** (ثانی –) वि. ('अ.) अद्वितीय; अप्रतिम. **–हक़** (حق –) वि. ('अ.) (१) मागून आलेला. (२) मिळालेला. **–हल** (حل –) वि. ('अ.) न सुटणारा (प्रश्न); जटिल. **–हासिल** (حاصل –) वि. ('अ.) (१) निष्फळ; व्यर्थ; निरर्थक. (२) जिच्यापासून काही प्राप्ती होत नाही अशी (ज़मीन). **–हौल** (حول –) वा. ('अ.) (१) तिरस्कारदर्शक शब्द. (२) भूतपिशाचांना पळवून लावण्याचा मंत्र. [मूळ वाक्य असे आहे : **ला हौल वला क़ुव्वतः इल्ला बि'ल्लह** (لاحول ولا قوۃ الاباللہ) परमेश्वराखेरीज दुसऱ्या कोणाच्याही ठिकाणी सामर्थ्य किंवा सद्गुण नाही].

ला (لا) पु. (फ़ा.) थर; घडी. **–बरला** (برلا –) वि. (फ़ा.) थरावर थर रचलेला.

ला'इंदः (لائندہ) वि. (फ़ा.) बडबडघा.

ला'इक़ (لائق) वि. ('अ.) (१) लायक; योग्य; पात्र. (२) विद्वान.

ला'इहः (لائحہ) पु. ('अ.) (१) चकाकणारी वस्तू. (२) कार्यक्रम. (३) सूची; यादी.

ला'ईदन (لائیدن) क्रि. (फ़ा.) (१) आरडाओरडा करणे. (२) बढाई मारणे.

ला'ए (لاے) स्त्री. (फ़ा.) गाळ; तळाशी साचलेला पदार्थ.

ला'एह (لائح) वि. ('अ.) (१) चकाकणारा. (२) उत्पन्न होणारा.

ला'वलश्कर (لاؤلشکر) पु. (फ़ा.) (१) फौजफाटा; सैन्य व त्याच्या बरोबरचे बाजारबुजणे वगैरे. (२) गर्दी; जमाव.

लाक (لاک) स्त्री. ('अ.) लाख (झाडापासून निघणारी).

लाक (لاک) पु. (फ़ा.) लाकडी पेला. **–पुश्त** (پشت –) पु. (फ़ा.) कासव.

लाख (لاخ) पु. (फ़ा.) स्थान; जागा. हा शब्द एकटा येत नाही, दुसऱ्या शब्दाशी जोडून येतो. [उदा. 'संग लाख' (سنگ لاخ) पु. (फ़ा.) खडकाळ जमीन].

लाग (لاغ) पु. (फ़ा.) थट्टा; विनोद; गंमत.

लाग़र (لاغر) वि. (फ़ा.) क्षीण; कृश; हडकुळा.

लाग़री (لاغری) स्त्री. (फ़ा.) क्षीणता; दुर्बलता; कृशता.

लाची (لاچی) स्त्री. (फ़ा.) वेलदोडा; वेलची.

लाचीन (لاچین) पु. (तु.) बहिरीससाणा; श्येन.

लाजवर्द (لاجورد) पु. (फ़ा.) वैडूर्य; रत्न; नीलोत्पल.

लाजवर्दी (لاجوردی) वि. (फ़ा.) निळा; अस्मानी.

लाज़िक़ (لازق) वि. ('अ.) चिकटणारा.

लाज़िब (لازب) वि. ('अ.) (१) चिकटणारा. (२) आपली खूण ठेवून जाणारा.

लाज़िम (لازم) वि. ('अ.) (१) आवश्यक; अनिवार्य; अपरिहार्य. (२) योग्य; उचित. (३) निश्चित; नक्की. (४) अकर्मक क्रियापद.

लाज़िम-ओ-मल्ज़ूम (لازم و ملزوم) वि. ('अ.) परस्परावलंबी.

लाज़िमन् (لازماً) अव्य. ('अ.) (१) नक्की. (२) अनिवार्यपणे.

लाज़िमी (لازمی) वि. ('अ.) आवश्यक; अनिवार्य; अपरिहार्य.

लात (لات) पु. ('अ.) इस्लामच्या पूर्वी अरबस्तानात पूजिल्या जाणाऱ्या तीन मूर्तींपैकी एक. हजरत शुएब यांचे अनुयायी या मूर्तीची पूजा करीत असत.

लातीनी (لاطینی) स्त्री. ('अ.) लॅटिन (भाषा).

लाद (لاد) पु. (फ़ा.) भितीच्या बांधणावळीतील एक थर.

लादिरा (لادغ) वि. ('अ.) चावणारा; डसणारा.

लादः (لادہ) वि. (फ़ा.) मूर्ख; अडाणी.

लान (لان) पु. (फ़ा.) (१) आझर बैजानचा एक पर्वत. येथील तुर्क अत्यंत देखणे असतात. (२) स्थान. (३) कृतघ्नता.

लाफ़ (لاف) स्त्री. (फ़ा.) (१) घमेंड; प्रौढी. (२) थाप. **–गो** (گو –); **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.)

(१) घमेंडखोर; बढाईखोर. (२) थापाडधा; बडबडधा.

लाफ़-ओ-गुज़ाफ़ (لاف و گزاف) स्त्री. (फ़ा.) (१) थापा; बाष्कळ बडबड. (२) घमेंड.

लाफ़ीदन (لافیدن) क्रि. (फ़ा.) (१) थापा मारणे. (२) घमेंड करणे.

लाबः (لابہ) पु. (फ़ा.) (१) खुशामत; अजीजी. (२) विनंती. (३) कपट; ढोंग. **–कार** (کار –); **–गो** (گو –) वि. (फ़ा.) खुशामत्या; खुशामतखोर.

लाम (لام) पु. ('अ.) (१) अरबी वर्णमालेतील २३ वे अक्षर ल. (२) प्रेयसीच्या केसाची बट. (३) चिलखते. **–काफ़** (کاف –) पु. ('अ.) शिवीगाळी; अपशब्द.

लाम (لام) स्त्री. (फ्रेंच) (१) फौज; सैन्य. (२) सैन्याची तुकडी; ब्रिगेड. (३) ओळ. **–बांधना** (باندھنا –) चोहोबाजूंनी लष्कर गोळा करणे; सैन्याची तुकडी तयार करणे.

लामान (لامان) पु. (फ़ा.) (१) कपट; ढोंग. (२) कृतघ्नता. (३) खड्डा.

लामि'अ (لامع) वि. ('अ.) चमकणारा; चकाकणारा; प्रकाशमान.

लामिस (لامس) वि. ('अ.) (१) स्पर्श करणारा. (२) संभोग करणारा.

लामिसः (لامسہ) स्त्री. ('अ.) (१) स्पर्शज्ञान; स्पर्शशक्ती. (२) स्पर्श करणारी.

लायक़ (لایق) वि. ('अ.) (१) योग्य; पात्र. (२) उपयुक्त.

लायः (لایہ) पु. (फ़ा.) (१) भितीचा थर. (२) कागदाची, कापडाची घडी.

लाल (لال) वि. (तु.) मुका; मूक.

लाल (لال) वि. (फ़ा.) तांबडा; लाल. (पु.) लाल (रत्न) पद्मराग; माणिक.

लालः (لالہ) पु. (फ़ा.) (१) लाल रंगाचे एक फूल. (२) अफूच्या झाडाचे फूल. **–गूं** (گوں –) वि. (फ़ा.) तांबडा; रक्तवर्ण. **–ज़ार** (زار –) पु. (फ़ा.) (१) बाग; लाल पुष्पाचे उपवन. (२) अफूचे शेत. **–फ़ाम** (فام –) वि. (फ़ा.) लाल रंगाचा; तांबडा. **–रुख़** (رخ –); **–रुख़सार** (رخسار –); **–रू** (رو –) वि. (फ़ा.) (१) लाल पुष्पाप्रमाणे (गाजरासारखे) लाल व नाजुक गाल, चेहरा असलेला (ली). (२) सुंदरी. (३) प्रेयसी.

ला'ब (لاؤ) वि. (फ़ा.) खुशामतखोर. (पु.) घराच्या भिती रंगविण्याची पांढरी माती; शाडू.

लावः (لاوہ) पु. (फ़ा.) विटीदांडू (खेळ).

लाश (لاش) स्त्री. (तु.) (१) प्रेत; शव. (२) मृत शरीर.

लाशः (لاشہ) वि. (फ़ा.) मरतुकडा. (पु.) प्रेत; शव.

लाह् (لاہ) पु. ('अ.) ईश्वर; अल्ला. (वि.) पोलंडचे रहिवासी.

लाहिक़ (لاحق) वि. ('अ.) जोडला जाणारा; संयुक्त होणारा.

लाहिम (لاحم) वि. ('अ.) मांस विकणारा; मांस खाऊ घालणारा.

लाही (لاہی) वि. ('अ.) (१) बेशुद्ध. (२) गाफील. (३) खेळाडू. (पु.) हेग (शहर).

लाहूत (لاہوت) पु. ('अ.) (१) इहलोक. (२) ब्रह्मलीन होण्याची अवस्था.

लाहूती (لاہوتی) वि. ('अ.) (१) इहलोकातील जीव; प्राणी. (२) ब्रह्मलीन.

लिंग (لنگ) पु. (फ़ा.) पाय; टांग.

लि'आन (لعان) पु. ('अ.) (१) एकमेकांचा धिक्कार करणे. (२) पतीने पत्नीवर व्यभिचाराचा आरोप करून घटस्फोट मिळविणे.

लिक़ा (لقا) स्त्री. ('अ.) (१) दर्शन. (२) भेट; मुलाखत. (३) चेहरा.

लिक़ाह् (لقاح) पु. ('अ.) गर्भ धारण करणे; गर्भवती असणे.

लिगाम (لغام); **लिजाम** (لجام) पु. ('अ.) (१) लगाम. (२) मुस्के.

लिबाद (لداد) पु. ('अ.) कपडधांना किंवा वाहणांना ठिगळ लावणे.

लिफ़ाफ़ियः (لفافیہ) वि. ('अ.) भपकेबाज; दिखाऊ.

लिफ़ाफ़ः (لفافہ) पु. ('अ.) (१) वरून गुंडाळण्याची वस्तू. (२) कागदाचे पाकीट. (३) प्रेतवस्त्र; कफन. (४) वरपांगी देखावा; अवडंबर.

लिबास (لباس) पु. ('अ.) पोषाख; पेहराव.

लिबासी (لباسی) वि. ('अ.) पोषाखी; दिखाऊ.

लिब्नः (لبنہ) स्त्री. ('अ.) कच्ची वीट.

लिब्स (لبس) पु. ('अ.) वस्त्रे ('अ.) कपडे; पोषाख.

लिम (لم) स्त्री. ('अ.) (१) कारण. (२) आरोप; आळ. (अव्य.) का ? कशासाठी ?

लियाक़त (لیاقت) स्त्री. ('अ.) (१) योग्यता; लायकी; पात्रता. (२) विद्वत्ता; ज्ञान. (३) उत्साह. (४) सामर्थ्य.

लियास (لیاس) वि. ('अ.) निर्लज्ज; बायकोला शरीरविक्री करावयास लावणारा.

लिल्लह (لله) अव्य. ('अ.) ईश्वरासाठी; ईश्वराच्या नावाने.

लिल्लहि'ल्-हम्द (لله الحمد) वा. ('अ.) देवाचे आभार (कृपा); सर्व स्तुती ईश्वरासाठी आहेत.

लिवा (لوا) पु. ('अ.) झेंडा; ध्वज.

लिवाज़ (لواذ) पु. ('अ.) संरक्षण.

लिवात़त (لواطت) स्त्री. ('अ.) गुदामैथुन; पुरुष मैथुन.

लिस् (لص) वि. पु. ('अ.) चोर; तस्कर.

लिसान (لسان) स्त्री. ('अ.) (१) भाषा; बोली. (२) जीभ; जिव्हा.

लिसान-उल्-'अस्र (لسان العصر) पु. ('अ.) आपल्या युगाचा प्रतिनिधी; आपल्या कालखंडाचा प्रवक्ता; आपल्या काळचा उत्कृष्ट वक्ता.

लिसान-उल्-क़ौम (لسان القوم) पु. ('अ.) आपल्या राष्ट्राचा, जातीचा प्रतिनिधी (प्रवक्ता).

लिसान-उल्-ग़ैब (لسان الغيب) स्त्री. ('अ.) आकाशवाणी; देववाणी. (पु.) (१) भविष्य जाणणारा. (२) हाफ़िज़ (कवी).

लिसानियात (لسانيات) स्त्री. ('अ.) भाषाशास्त्र; भाषाविज्ञान.

लिसानी (لسانی) वि. ('अ.) भाषिक; भाषाविषयक.

लिस़ाम (لثام) पु. ('अ.) गुरांच्या तोंडाला घालावयाची जाळी; मुस्के.

लिस्मः (لثمہ) पु. ('अ.) हिरडी.

लिहाज़ (لحاظ) पु. ('अ.) (१) आदर. (२) मुरवत; भीड. (३) कृपादृष्टी. (४) लज्जा; संकोच. (५) स्वाभिमान. (६) भीती. (७) पक्षपात. (८) लक्ष; ध्यान; विचार.

लिहाज़ा (لہٰذا) अव्य. ('अ.) याकरिता; म्हणून; यासाठी.

लिहाफ़ (لحاف) पु. ('अ.) जाडजूड रजई.

लीक़ (ليق); **लीक़ः** (ليقہ) पु. ('अ.) दौतीत टाकण्याचे फडके.

लीग़ (ليغ) वि. (फ़ा.) उदासीन; दुःखी.

लीनत (لينت) स्त्री. ('अ.) कोमलता; मऊपणा.

लुंग (لنگ) पु. (फ़ा.) (१) लुंगी; पंचा. (२) लंगोट. **–क** (ـک–) पु. (फ़ा.) लहान लुंगी; टॉवेल.

लुंगी (لنگی) स्त्री. (फ़ा.+हिं.) लुंगी; पंचा.

लुंज (لنج) पु. (फ़ा.) ओठ; अधर.

लुंज (لنج) वि. (फ़ा.) **लुंजा** (لنجا) वि. (फ़ा.+हिं.) (१) थोटा; लुळापांगळा. (२) वठलेला (वृक्ष).

लु'आब (لعاب) पु. ('अ.) (१) चीक; लस. (२) थुंकी; लाळ.

लुक्नत (لكنت) स्त्री. ('अ.) तोतरेपणा; अडखळत बोलणे.

लुक़मान (لقمان) पु. ('अ.) (१) एक अत्यंत विद्वान वैद्य व शास्त्रज्ञ. (२) विद्वान व्यक्ती.

लुक़मः (لقمہ) पु. ('अ.) घास; ग्रास.

लुग़ाज़ (لغز) स्त्री. ('अ.) कोडे; समस्या; चक्रव्यूह; उखाणा.

लुग़त (لغت) पु. ('अ.) (१) शब्द. (२) शब्दकोश. **–तराशना** (تراشنا –) मोठमोठे शब्द तयार करणे; जाडजूड शब्द वापरणे. **–दाँ** (دان –) वि. ('अ.+फ़ा.) पुष्कळ शब्द जाणणारा.

लुग़वी (لغوی) वि. ('अ.) शाब्दिक; कोशातील. **–म'अनी** (معنی –) पु. ('अ.) शब्दार्थ.

लुग़ात (لغات) पु. ['अ. 'लुग़त' (لغت) चे अनेक.] (१) अनेक शब्द. (२) शब्दकोश.

लुच्च (لچ) वि. (तु.) (१) नग्न; नंगा. (२) तिरळा. (३) लुच्चा; मवाली.

लुच्चन (لچن) स्त्री. (तु.) व्यभिचारीणी; कुलटा.

लुज़ूजत (لزوجت) स्त्री. ('अ.) चिकटपणा; चीक.

लुज़ूम (لزوم) पु. ('अ.) अपरिहार्यता; अनिवार्यता.

लुज्जः (لجہ) पु. ('अ.) नदीतील सर्वांत खोल स्थान; डोह.

लुत्फ़ (لطف) पु. ('अ.) (१) आनंद; मजा. (२) स्वाद; चव. (३) करुणा; दया. (४) कृपा; मेहेरबानी. (५) उदारता. (६) उत्तमता; खुबी.

लुत्मः (لطمہ) पु. ('अ.) थप्पड; धपाटा.

लुत्रः (لترہ) वि. (फ़ा.) (१) चहाडखोर; लावालावी करणारा. (२) जुनाट; फाटका. (३) रिकामटेकडा.

लुबाद (لباد) पु. ('अ.) बैलाच्या मानेवरील जू.

लुबान (لبان) पु. ('अ.) धूप.

लुबाब (لباب) पु. ('अ.) (१) तत्त्व; सार. (२) गीर; गर.

लुबूब (لبوب) पु. ('अ.) (१) सार; सत्त्व. (२) एक प्रकारचा कामवर्धक अवलेह.

लुब्नान (لبنان) पु. ('अ.) (१) सीरीयातील एक सुंदर डोंगर. (२) लेबॅनॉन.

लुब्ब (لب) पु. ('अ.) (१) बुद्धी. (२) सार; सत्त्व. (३) गर; गीर.

लुब्ब-ए-लुबाब (لب لباب) पु. ('अ.) सार; सत्त्व; तात्पर्य; सारांश.

लुमास (لماس) स्त्री. ('अ.) (१) कामना; इच्छा. (२) आवश्यकता.

लुर (لر) वि. (फ़ा.) मूर्ख; मठ्ठ; असभ्य.

लूच (لوچ) वि. (तु.) (१) नग्न; नंगा. (२) तिरळा. (३) लुच्चा.

लूत (لوت) वि. (फ़ा.) नग्न; नागवा.

लूत (لوط) पु. ('अ.) एक पैगंबर. यांचे अनुयायी गुदा-मैथुन धर्मसंमत (विहीत) मानीत होते. त्यामुळे खुदाने त्यांना नष्ट केले.

लूती (لوطي) वि. ('अ.) (१) गुदामैथुन करणारा. (२) स्वच्छंद; अनिर्बंध.

लून (لون) पु. (फ़ा.) मीठ; लवण.

लूब (لوب) पु. ('अ.) जेथे पाणी नाही अशी खडकाळ जमीन.

लूलू (لولو) पु. ('अ.) मोती; मोत्ये.

लेक (ليک) अव्य. [फ़ा. 'लेकिन' (ليکن) चे संक्षिप्त.] पण; परंतु.

लेकिन (ليکن) अव्य. ['अ. 'लाकिन' (لاكن) चे फ़ारसी रूप.] पण; परंतु.

लेज़म (ليزم) स्त्री. (फ़ा.) लेझीम.

लेमूं (ليمون) पु. (फ़ा.) लिंबू.

लेमूनी (ليموني) वि. (फ़ा.) लिंबाचा रस असलेला; लिंबाचा.

लेस (ليس) प्रत्य. (फ़ा.) चाटणारा. [उदा. 'कास: लेस' (كاسه ليس) वि. ('अ.+फ़ा.) (१) पेला चाटणारा. (२) खुशामतखोर].

लेसिंदः (ليسندة) वि. (फ़ा.) चाटणारा.

लेसीदः (ليسيدة) वि. (फ़ा.) चाटलेला.

लेह्यान (لحيان) वि. ('अ.) लांब दाढी असलेला.

लेह्यः (لحيم) स्त्री. ('अ.) दाढी.

लैत (ليت) अव्य. ('अ.) असे व्हावे; देव असे करील तर!

लैत-ओ-ल'अल (ليت و لعل) पु. ('अ.) टाळाटाळ; वहाणा; चालढकल; उडवाउडव.

लैमूं (ليمون); **लैमून** (ليمون) पु. ('अ.) लिंबू.

लैमूनी (ليموني) वि. ('अ.) ज्यात लिंबू घातले आहे असा.

लैल (ليل); **लैलः** (ليلة) स्त्री. ('अ.) रात्र; निशा.

लैल-ओ-निहार (ليل و نهار) पु स्त्री. (फ़ा.+'अ.) रात्र व दिवस. (अव्य.) अहोरात्र; रात्रंदिवस.

लैलत-उल्-अस्रा (ليلة الاسرى) स्त्री. ('अ.) 'मे'अराज (معراج) ची रात्र. पाहा 'लैलत-उल्-मे'अराज'.

लैलत-उल्-क़द्र (ليلة القدر) स्त्री. ('अ.) रमजानच्या महिन्यातील एक रात्र.

लैलत-उल्-बद्र (ليلة البدر) स्त्री. ('अ.) पौर्णिमा.

लैलत-उल्-बर'अत (ليلة البرات) स्त्री. ('अ.) शबेबरात; शबरात; शाबान महिन्यातील चौदावी रात्र.

लैलत-उल्-मे'अराज (ليلة المعراج) स्त्री. ('अ.) हजरत मुहम्मद पैगंबर नमाजांची देणगी आणण्यासाठी स्वर्गात गेले होते ती रात्र.

लैलॉ (ليلى); **लैली** (ليلى) स्त्री. ('अ.) मजनूची प्रेमिका.

लैस (ليث) पु. ('अ.) सिंह; वाघ.

लो'अबत (لعبة) स्त्री. ('अ.) (१) खेळणे; बाहुली. (२) डोळघातील बाहुली.

लोक (لوک); **लोकां** (لوكان) वि. (फ़ा.) रांगणारा; गुडघ्यांवर सरपटत चालणारा; दुर्बळ. (पु.) मालवाहू उंट (मरतुकडा).

लोत (لوت); **लोतपोत** (لوت پوت) पु. (फ़ा.) उत्तमोत्तम खाद्यपदार्थ.

लोदी (لودی) पु. (फ़ा.) पठाणांची एक जात.

लोबान (لوبان) पु. (फ़ा.) धूप (सुगंधी डिंक).

लोबिया (لوبيا) पु. (फ़ा.) एक प्रकारची भाजीची शेंग; सोयाबीन.

लोर (لور) पु. (फ़ा.) (१) पिंजण (कापूस पिंजण्याचे अवजार). (२) पुराच्या पाण्याने वाहून गेलेली जमीन.

लोल (لول) वि. (फ़ा.) (१) निर्लज्ज. (२) व्यभिचारी. (३) चंचल.

लोली (لولى) स्त्री. (फ़ा.) नायकीण; वारांगना; नाचणारी; कलावंतीण.

लोश (لوش) वि. (फ़ा.) बेशुद्ध. (पु.) चिखल; गाळ.

लोस (لوس) पु. (फ़ा.) खुशामत; खोटी स्तुती.

लोहनः (لهنة) पु. ('अ.) फराळ; मुख्य जेवण तयार होईपर्यंतच्या वेळेकरिता पाहुण्याला दिलेले खाद्य-पदार्थ.

लोहमः (لحم) पु. ('अ.) (१) बहिरीससाण्याने केलेली शिकार व तिचे मांस. (२) कापडातील आडवा धागा.

लौ (لو) पु. (फ़ा.) ओठ.

लौ'अ (لوع) स्त्री. ('अ.) प्रेमातील व्याकुळता; तल्लीनता; दाह.

लौज़ (لوز) पु. ('अ.) (१) बदाम. (२) बर्फी.

लौज़ियात (لوزيات); **लौज़ीनः** (لوزينة) पु. (फ़ा.) बदामाचा हलवा (मिठाई).

लौन (لون) पु. ('अ.) रंग; वर्ण.

लौम (لوم) पु. ('अ.) (१) निर्भर्त्सना; निंदा. (२) कृपणता.

लौस् (لوث) पु. ('अ.) (१) संपर्क; संबंध. (२) मिश्रण; भेसळ. (३) सुस्ती.

लौस्-ए-दुनिया (لوث دنیا) पु. ('अ.) संसारिक बंधन; मायाजाल.

लौह् (لوح) स्त्री. ('अ.) (१) लहान मुलांची लिहिण्याची दगडी पाटी. (२) समाधीवर शिलालेख लिहिण्याची दगडी पाटी. (३) पुस्तकाचे मुखपृष्ठ.

लौह्-ए-क़ब्र (لوح قبر) स्त्री. ('अ.) थडग्यावर लिहिलेला शिलालेख.

लौह्-ए-पेशानी (لوح پیشانی) स्त्री. ('अ.+फ़ा.) भाग्य; नशीब; ललाटपटल.

लौह्-ए-मज़ार (لوح مزار) स्त्री. ('अ.) थडग्यावरील शिलालेख.

लौह्-ए-मश्क़ (لوح مشق) स्त्री. ('अ.) (१) अभ्यास करण्याची पाटी. (२) फार वापरलेली वस्तू.

वंद (وند) पु. (फ़ा.) पात्र; भांडे. (प्रत्य.) स्वामी; मालक. ['खुदावंद' (خداوند) पु. ('अ.) स्वामी; परमेश्वर].

व (و) अव्य. ('अ.) (१) आणि; तसेच. (२) यद्यपि. **–इल्ला** (الا –) अव्य. ('अ.) नाहीतर; उलटपक्षी. **–गर** (گر–) अव्य. ('अ.+फ़ा.) जर; यदि. **–गरनः** (گرنہ –) अव्य. ('अ. + फ़ा.) नाहीतर. **–ग़ैरः** (غیرہ –) अव्य. ('अ.) आणि, इतर वगैरे; इत्यादी. **–या** (یا –) अव्य. ('अ.+फ़ा.) अथवा; किंवा. **–ले** (لے –); **–लेक** (لیک –); **–लेकिन** (لیکن –) अव्य. ('अ.+फ़ा.) परंतु; पण.

व'अज़् (وعظ) पु. ('अ.) (१) धर्मोपदेश. (२) उपदेश. **–ख़्वां** (خواں –); **–गो** (گو –) वि. ('अ.+फ़ा.) धर्मोपदेश करणारा.

व'अदः (وعدہ) पु. ('अ.) (१) वचन; प्रतिज्ञा. (२) वायदा; आश्वासन. (३) करार. **–ख़िलाफ़** (خلاف –) वि. ('अ.) दिलेला शब्द मोडणारा; वचनभंग करणारा. **–फ़रामोश** (فراموش –) वि. ('अ.+फ़ा.) दिलेले वचन अथवा केलेला वायदा विसरणारा. **–फ़र्मा** (فرما –) वि. ('अ. + फ़ा.) वचन देणारा. **–वफ़ा** (وفا –) वि. ('अ.) वचनपूर्ती, प्रतिज्ञापालन करणारा. **–शिकन** (شکن –) वि. ('अ.+फ़ा.) वचनभंग करणारा.

व'अलैकुम-अस्-सलाम (وعلیکم السلام) वा. ('अ.) आणि तुलाही शांतता व सुरक्षितता लाभो आणि तुझेही कुशल असो. (प्रतिनमस्कार करताना म्हणावयाचे वाक्य). (पु.) नमस्कार; नमस्ते.

व'ईद (وعید) स्त्री. ('अ.) शिक्षेची धमकी, भीती.

वक़'अ (وقع) पु. ('अ.) प्रतिष्ठा. (स्त्री.) उच्च स्थान.

वक़'अत (وقعت) स्त्री. ('अ.) (१) प्रतिष्ठा; सन्मान; आदर. (२) महत्त्व. (३) उच्च स्थान. (४) सामर्थ्य.

वक़'आः (وقعہ) पु. ['अ. 'वक़'आ'चे 'अ' (وقائع) चे अनेक.] (१) घटना. **–नवीस** (نویس –); **–निगार** (نگار –) वि. ('अ. + फ़ा.) इतिहास लेखक; वाकनीस: समाचार लेखक

वक़ार (وقار) पु. ('अ.) (१) मोठेपणा; गुरुत्व; वजनदारपणा. (२) महत्त्व; प्रतिष्ठा. (३) वैभव; थाट. (४) शालीनता; शिष्टता; गंभीरता.

वकालत (وکالت) स्त्री. ('अ.) (१) वकिली; वकिलाचा पेशा. (२) प्रतिनिधित्व; मैत्री. (३) आपले काम दुसऱ्याकडे सोपविणे. (४) दुसऱ्याच्या ऐवजी, जागी काम करणे. (५) अभिवचन; अभिभाषण.

वकालतन् (وکالتاً) अव्य. ('अ.) वकिलाच्या मार्फत.

वक़ाह् (وقاح) वि. ('अ.) (१) निर्लज्ज; बेशरम. (२) असभ्य; आडदांड. **–त** (ت –) स्त्री. ('अ.) निर्लज्जता.

वकी'अ (وکیع) वि. ('अ.) दृढ; मजबूत.

वक़ी'अ (وقیع) वि. ('अ.) (१) उच्च; उंच. (२) प्रतिष्ठित; श्रेष्ठ.

वक़ी'अत (وقیعت) स्त्री. ('अ.) (१) एखाद्याच्या मागे त्याची निंदा करणे. (२) पहाडी. (३) युद्ध.

वकील (وکیل) पु. ('अ.) (१) वकील; विधिज्ञ; प्रतिनिधी. (२) राजदूत.

वक़ीह् (وقیح) वि. ('अ.) निर्लज्ज; बेशरम.

वक़ूद (وقود) पु. ('अ.) जळण; इंधन.

वक़्क़ाद (وقاد) वि. ('अ.) (१) भडकणारा; पेटणारा. (२) भरभर चालणारा.

वक़्त (وقت) पु. ('अ.) (१) वेळ; समय; काळ. (२) संधी; अवसर. (३) ऋतू; मोसम. (४) विलंब; उशीर. (५) सवड. (६) खेप; पाळी. (७) मुदत; अवधी. (८) आपत्ती. **–गुज़ारी** (گزاری –) स्त्री. ('अ.+फ़ा.) वेळ घालविणे; कालमापन. **–ब-वक़्त** (بوقت –) अव्य. ('अ. + फ़ा.) वेळोवेळी; अधूनमधून. **–बे-वक़्त** (بے وقت –) अव्य. ('अ.+फ़ा.) वेळी-अवेळी; सुख-दुःखात.

वक़्त-ए-वापसी (وقت واپسیں) पु. ('अ.+फ़ा.) अंतःकाळ; मृत्युसमय.

वक़्तन् फ़ वक़्तन् (وقتاً فوقتاً) अव्य. ('अ.) अधूनमधून; कधीकधी.

वक़्ती (وقتی) वि. ('अ.) (१) वेळेचा. (२) वर्तमानकालीन. (३) तात्पुरता; अस्थायी; हंगामी.

वक़्फ़ (وقف) पु. ('अ.) (१) धर्मादाय संपत्ती; देवस्थानाची मालमत्ता. (२) थांबणे. (३) सातत्य. **–नामः** (نامہ –) पु. ('अ.+फ़ा.) दानपत्र.

वक़्फ़ः (وقفہ) पु. ('अ.) (१) दोन कार्यांमधील मध्यंतर; थांबणे. (२) विलंब; उशीर; ढिलाई.

वक़्र (وقر) पु. ('अ.) प्रतिष्ठा; मोठेपणा; सन्मान; अब्रू.

वग़ा (وغا) स्त्री. ('अ.) लढाई; युद्ध.

वज'अ (وجع) पु. ('अ.) पीडा; व्यथा; वेदना.

वज़्ग़ (وزغ); **वज़्गः** (وزغہ) पु. ('अ.) (१) बेडूक. (२) सरडा. (३) सूर्यपूजक.

वजब (وجب) पु. ('अ.) वीत (माप).

वजह (وجہ) स्त्री. ('अ.) (१) कारण; हेतू. (२) साधन. (पु.) चेहरा; आकृती. (३) ढंग; पद्धती. (४) पगार; प्राप्ती. (५) बाजू; पैलू.

वजह-ए-तस्मियः (وجہ تسمیہ) स्त्री. ('अ.) नाव ठेवण्याचे, पडण्याचे कारण.

वजह-ए-म'आश (وجہ معاش) स्त्री. ('अ.) उपजीविकेचे साधन.

वजह-ए-मुबज्जह (وجہ موجہ) स्त्री. ('अ.) योग्य कारण.

वजह-ए-वहशत (وجہ وحشت) स्त्री. ('अ.) दूर राहणे, पळून जाणे किंवा तिरस्कार करणे यांचे कारण.

वजह-ए-हसीन (وجہ حسین) स्त्री. ('अ.) सुंदर, देखणा चेहरा.

वजा (وجا) पु. ('अ.) भय; भीती.

वज़ा'इफ़ (وظائف) पु. ['अ. 'वज़ीफ़ः' (وظیفہ) चे अनेक.] (१) शिष्यवृत्त्या. (२) पगार. (३) रोजच्या प्रार्थना; जपतप.

वजाहत (وجاہت) स्त्री. ('अ.) (१) सौंदर्य; तेज; कांती. (२) रुबाब; प्रतिष्ठा.

वजी'अ (وجیع) वि. ('अ.) (१) मजबूत; घष्टपुष्ट. (२) जाडजूड (कापड).

वज़ीफ़ः (وظیفہ) पु. ('अ.) (१) शिष्यवृत्ती. (२) निवृत्तिवेतन (पेन्शन); पगार; मजुरी. (३) मंत्राचा जप; आन्हिक; रोजची धर्मकृत्ये. **–ख़्वाँ** (خواں –) वि. ('अ.+फ़ा.) मंत्राचा जप करणारा. **–ख़्वार** (خوار –) वि. ('अ. + फ़ा.) पेन्शनर. **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) ज्याला शिष्यवृत्ती किंवा निवृत्तिवेतन मिळत आहे असा.

वज़ीर (وزیر) पु. ('अ.) (१) मंत्री; दिवाण; प्रधान. (२) बुद्धिबळातील वजीर.

वज़ीर-ए-अ'ज़म (وزیر اعظم) पु. ('अ.) पंतप्रधान; महामंत्री; महामात्य.

वज़ीर-ए-आबकारी (وزیر آبکاری) पु. ('अ. + फ़ा.) अबकारी मंत्री.

वज़ीर-ए-आबपाशी (وزیر آبپاشی) पु. ('अ. + फ़ा.) पाणीपुरवठा मंत्री; पाटबंधारे मंत्री.

वज़ीर-ए-आबादकारी (وزیر آبادکاری) पु. ('अ.+फ़ा.) पुनर्वसाहत मंत्री.

वज़ीर-ए-अ'अला (وزیر اعلیٰ) पु. ('अ.) मुख्यमंत्री.

वज़ीर-ए-इत्तिला'आत (وزیر اطلاعات) पु. ('अ.) माहिती मंत्री.

वज़ीर-ए-उमूर-ए-ख़ारिजः (وزیر امورخارجہ); **वज़ीर-ए-ख़ारिजः** (وزیر خارجہ) पु. ('अ.) परराष्ट्र मंत्री; विदेश मंत्री.

वज़ीर-ए-उमूर-ए-दाख़िलः (وزیر امور داخلہ); **वज़ीर-ए-दाख़िलः** (وزیر داخلہ) पु. ('अ.) गृह मंत्री.

वज़ीर-ए-ज़िरा'अत (وزیر زراعت) पु. ('अ.) शेतकी मंत्री; कृषी मंत्री.

वज़ीर-ए-तरक़्क़ियात (وزیر ترقیات) पु. ('अ.) विकास मंत्री.

वज़ीर-ए-त'अमीरात (وزیر تعمیرات) पु. ('अ.) बांधकाम मंत्री.

वज़ीर-ए-त'अलीम (وزیر تعلیم) पु. ('अ.) शिक्षण मंत्री.

वज़ीर-ए-तिजारत (وزیر تجارت) पु. ('अ.) व्यापार मंत्री.

वज़ीर-ए-दिफ़ा'अ (وزیر دفاع) पु. ('अ.) संरक्षण मंत्री.

वज़ीर-ए-नौआबादियात (وزیر نوآبادیات) पु. ('अ.+फ़ा.) वसाहत मंत्री.

वज़ीर-ए-बल्दियात (وزیر بلدیات) पु. ('अ.) स्थानिक स्वराज्य मंत्री.

वज़ीर-ए-मफ़ाद-ए-'आम्मः (وزیر مفاد عامہ) पु. ('अ.) सार्वजनिक कल्याण मंत्री.

वज़ीर-ए-माल (وزیر مال) पु. ('अ.) अर्थ मंत्री.

वज़ीर-ए-मुवासिलात (وزیر مواصلات) पु. ('अ.) दळणवळण मंत्री.

वज़ीर-ए-मेहनत (وزیر محنت) पु. ('अ.) मजूर मंत्री.

वज़ीर-ए-रस्ल-ओ-रसा'इल (وزیر رسل و رسائل) पु. ('अ.) दळणवळण मंत्री.

वज़ीर-ए-सन्'अत-ओ-हिर्फ़त (وزیر صنعت و حرفت) पु. ('अ.) उद्योग मंत्री.

वज़ीर-ए-सेहत (وزیر صحت) पु. ('अ.) आरोग्य मंत्री.

वज़ीर-ए-हुकूमत (وزیر حکومت) पु. ('अ.) राज्य मंत्री.

वज़ीरी (وزیری) स्त्री. ('अ.+हिं.) मंत्रीपद; दिवाणगिरी.

वजीह (وجیہ) वि. ('अ.) सुंदर; देखणा. (२) श्रीमंत; प्रतिष्ठित.

वज्द (وجد) पु. ('अ.) आनंदातिशयाने स्वत:ला विसरणे; आत्मविस्मृती; तल्लीनता; तन्मयता.

वज्द-ओ-हाल (وجد و حال) पु. ('अ.) गाण्याच्या वेळी आनंदातिरेकाने तल्लीन होऊन मान डोलावणे.

वज़न (وزن) पु. ('अ.) (१) वजन; भार; ओझे. (२) महत्त्व. (३) छंद; वृत्त (कविता). (४) प्रतिष्ठा. **–कश** (کش –) वि. ('अ.+फ़ा.) वजन करणारा. **–दार** (دار –) वि. ('अ. + फ़ा.) (१) वजनदार; भारी. (२) प्रतिष्ठित.

वज़नी (وزنی) वि. ('अ.) वजनदार; जड; भारी.

वतद (وتد) पु. ('अ.) (१) मेख; खुंटा. (२) तीन अक्षरी शब्द.

वतन (وطن) पु. ('अ.) स्वदेश; मातृभूमी; जन्मभूमी. **–कुश** (کش –) वि. ('अ.+फ़ा.) देशद्रोही. **–दोस्त** (دوست –); **–परस्त** (پرست –) वि. ('अ.+फ़ा.) देशभक्त; देशप्रेमी.

वतन परस्त शहीदों की ख़ाक लायेंगे।
हम अपनी आंख का सुरमः उसे बनायेंगे॥

वतनियत (وطنیت) स्त्री. ('अ.) देशभक्ती; देशप्रेम.

वतनी (وطنی) वि. ('अ.) देशातील; देशी; देशबंधू.

वतर (وتر) पु. ('अ.) (१) प्रत्यंचा; धनुष्याची दोरी. (२) वाद्याची तार.

वती (وطی) स्त्री. ('अ.) (१) संभोग; मैथुन. (२) कुसकरणे.

वतीरः (وتیرہ) पु. ('अ.) (१) ढंग; पद्धती. (२) आचरण.

वद्'अ (وضع) स्त्री. ('अ.) (१) रचना; बांधणी. (२) फॅशन; ढंग; वेशभूषा. (३) शैली; पद्धती. (४) स्थिती. (५) विणे; बाळंत होणे. (६) उणे करणे; वजा करणे; कपात. (७) शेवटपर्यंत एका पद्धतीने राहाणे. **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) (१) डौलदार; चांगल्या घडणीचा. (२) आपल्या तत्त्वांप्रमाणे चालणारा.

वद्'अ-उल्-हम्ल (وضع الحمل); **वद्'अ-ए-हम्ल** (وضع حمل) पु. ('अ.) प्रसूती; जनन.

वद्'अ-ओ-क़त्'अ (وضع و قطع) स्त्री. ('अ.) (१) वेशभूषा; फॅशन. (२) घडण.

वद्'ई (وضعی) वि. ('अ.) बनविलेला; घडविलेला.

वदा'अ (وداع) स्त्री. ('अ.) (१) गमन; जाणे. (२) निरोप घेणे; निरोप.

वदा'अत (وضاعت) स्त्री. ('अ.) अधमता; नीचता.

वदाद (وداد) पु. ('अ.) इच्छा; आकांक्षा.

वदाहत (وضاحت) स्त्री. ('अ.) तपशील; वर्णन; विस्तार; विवरण.

वदि'अत (ودیعت) स्त्री. ('अ.) ठेव; ठेवा.

वदिद (ودید) वि. ('अ.) मित्र; दोस्त.

वदी'अ (ودیع) वि. ('अ.) निरोप देणारा.

वदी'अ (وضیع) वि. ('अ.) अधम; नीच.

वज़ू (وضو) पु. ('अ.) नमाजापूर्वी हातपाय धुण्याचे पाणी.

वफ़ा (وفا) स्त्री. ('अ.) (१) प्रतिज्ञापालन; दिलेला शब्द पाळणे; वचनपूर्ती. (२) भक्ती; एकनिष्ठा; कळकळ. (३) प्रेम; हितचिंतन. **–ओ-जफ़ा** (وجفا –) स्त्री. ('अ.) प्रियकराकडून निष्ठा व प्रेयसीकडून अत्याचार. **–आशना** (آشنا –); **–केश** (کیش –) **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) एकनिष्ठ; प्रामाणिक; भक्त; प्रियकर. **–ना आशना** (ناآشنا –); **–बेगानः** (بیگانہ –) वि. ('अ.+फ़ा.) ज्याच्याजवळ निष्ठा नाही असा; प्रेयसी; प्रेमपात्र.

वफ़ात (وفات) स्त्री. ('अ.) मृत्यू; मरण.

वफ़ी (وفی) वि. ('अ.) संपूर्ण; समग्र; सर्व.

वफ़ूर (وفور) पु. ('अ.) आधिक्य; प्राचुर्य.

वफ़्क़ (وفق) वि. ('अ.) अनुकूल. (अव्य.) अनुसार; प्रमाणे.

वफ़्द (وفد) पु. ('अ.) शिष्टमंडळ; प्रतिनिधी मंडळ.

वबा (وبا) स्त्री. ('अ.) (१) सांसर्गिक रोग. (२) साथ. (३) महामारी. **–ई** (ئی –) वि. ('अ.) सांसर्गिक; सार्वत्रिक.

वबाल (وبال) पु. ('अ.) (१) आपत्ती; संकट. कष्ट; कटकट. (२) केलेल्या कर्माचे फळ; शिक्षा. (३) दु:ख; अद्दल.

वर (ور) प्रत्य. (फ़ा.) असणारा; वान; वाला. [उदा. 'जानवर' (جانور) वि. पु. (फ़ा.) (१) प्राणवान. (२) प्राणी].

वर (ور) अव्य. (फ़ा.) जर; यदि. (पु.) वक्षस्थळ; छाती. (स्त्री.) उष्णता.

वर'अ (ورع) स्त्री. ('अ.) (१) ईश्वराचे भय; पापभीरुता. (२) संयम; इंद्रियनिग्रह.

वरक़ (ورق) पु. ('अ.) (१) पुस्तकाचे पान, पृष्ठ. (२) झाडाचे पान. (३) फुलाची पाकळी. (४) गंजिफ्याचा पत्ता. (५) वर्ख. (६) पत्र. **–गर्दानी** (گردانی –) स्त्री. ('अ. + फ़ा.) पुस्तकाची पाने उलटणे; संपूर्ण वाचन न करता अधूनमधून डोकावणे. **–दाग़** (داغ –) पु. ('अ.+फ़ा.) पुस्तकाचा पृष्ठांक. **–साज़** (ساز –) वि. ('अ.) सोन्याचांदीचा वर्ख बनविणारा.

वरक़-उल्-ख़याल (ورق الخیال) पु. ('अ.) भांग; भांगेची पाने (मादक पदार्थ).

वरक़-ए-का'इनात (ورق کائنات) पु. ('अ.) विश्व; विश्वपटल.

वरक़-ए-ख़ाम (ورق خام) पु. ('अ.+फ़ा.) (१) कच्ची वही. (२) अंडी-पिल्ली.

वरक़ी (ورق) वि. ('अ.) वर्ख्यासारखा पातळ घडघा असलेला.

वरक़ः (ورقہ) पु. ('अ.) (१) पुस्तकाचे पान; पृष्ठ. (२) झाडाचे पान; पत्र. (३) तिकीट. (४) पत्र.

वरम (ورم) पु. ('अ.) सूज; शोथ.

वरसः (ورثہ) पु. ['अ. 'वारिस्' (وارث) चे अनेक.] (१) वारसदार. (२) वारसा; धन.

वरा (ورا) सर्व. (फ़ा.) त्याला; त्याच्या बाबतीत.

वरा (ورا) अव्य.('अ.)(१) मागे. (२) पलीकडे; दूर. (३) व्यतिरिक्त; खेरीज. (पु.) विश्व; जग.

वरा-ए-पस्त-ओ-बलंद (ورائے پست و بلند) पु. (फ़ा.) आकाश.

वराज़ (وراز) पु. (फ़ा.) वराह; डुक्कर.

वरासत (وراثت) स्त्री. ('अ.)(१) वारसा.(२)वारसाहक्काने मिळालेली संपत्ती. **–नामः** (نامہ –) पु. ('अ.+फ़ा.) उत्तराधिकारपत्र; वारसपत्र.

वरासतन् (وراثتاً)अव्य.('अ.)वारसाहक्काने; वारसाने.

वरिक (ورک) पु. ('अ.) नितंब; ढुंगण.

वर्ग़लाना (ورغلانا) स्त्री.(फ़ा.+हिं.) (१)बहकाविणे; भडकाविणे. (२) दिशाभूल करणे.

वर्ग़लानिंदः (ورغلانندہ) वि. (फ़ा.) बहकाविणारा; भडकविणारा; चुकीच्या मार्गाने नेणारा.

वर्ज़िश (ورزش) स्त्री. (फ़ा.) (१) अभ्यास; सराव. (२) व्यायाम. **–ख़ानः** (خانہ –) पु. **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) व्यायामशाळा; आखाडा.

वर्तः (ورطہ) पु. ('अ.) (१) भोवरा (पाण्यातील). (२) धोक्याचे स्थान.

वर्द (ورد) पु. ('अ.) गुलाब; गुलाबाचे फूल.

वर्द-ए-मुरब्बा (ورد مربیٰ) पु. ('अ.) गुलकंद.

वर्दी (وردی) वि. ('अ.) गुलाबी; गुलाबासारखा. (स्त्री.) (हिं.) (१) गणवेश. (२) नियमित वेळी वाजणारी नौबत.

वर्नः (ورنہ) अव्य. (फ़ा.) नाहीतर; उलट.

वर्सः (ورثہ) पु. ('अ.) वारसा.

वलंदीज़ (ولندیز) पु. ('अ.) हॉलंड.

वलद (ولد) पु. ('अ.) मुलगा; पुत्र.

वलद-उज़्-ज़िना (ولدالزنا); **वलद-उल्-हराम** (ولدالحرام) पु.('अ.) जारज; दोगला; लेकावळा.

वलदियत (ولدیت) स्त्री. ('अ.) (१) पुत्रवान असणे. (२) पित्याचे नाव; वंश.

वलियः (ولیہ) स्त्री. ('अ.) (१) उत्तराधिकारीणी; वारसदार स्त्री. (२) महात्मा स्त्री; साक्षात्कारीणी.

वली (ولی) पु. ('अ.) (१) उत्तराधिकारी; वारस. (२) सहाय्यक; मित्र; मदतनीस. (३) मालक. (४) पालक. (५) अधिकारी. (६) महात्मा; ऋषी; साधू; योगी. **–उ'ल्लह** (اللہ –) पु. ('अ.) ईश्वराचा मित्र; महात्मा; महर्षी. **–'अहद** (عہد –) पु. ('अ.) राज्याचा वारस; युवराज. **–जः** (جہ –) वि. ('अ.) घनिष्ठ मित्र. **–नि'अमत** (نعمت –) पु. ('अ.) स्वामी; मालक; पालक.

वलीद (ولید) पु. ('अ.) पोऱ्या; लहान वयाचा नोकर.

वलीमः (ولیمہ) पु. ('अ.) लग्नानंतर वरपक्षाकडून दिले जाणारे जेवण; जेवणावळ.

वलूद (ولود) स्त्री. ('अ.) बहुप्रसवा स्त्री.

व'ल्लह (واللہ) अव्य. ('अ.) देवाची शपथ; खरोखर.

वल्वलः (ولولہ) पु. ('अ.) (१) उत्साह; आवेश; आवेग. (२) आत्मविस्मृती; तल्लीनता; तन्मयता. **–अंगेज़** (انگیز –) वि. ('अ.+फ़ा.) उत्साहवर्धक.

वश (وش) प्रत्य.(फ़ा.)समान; तुल्य. [उदा. 'माह वश' (ماہ و ش) वि. (फ़ा.) चंद्रासारखा].

वसा'इक़ (وثائق) पु. ['अ. 'वसीक़ः' (وثیقہ) चे अनेक.] दस्तऐवज.

वसा'इल (وسائل) पु. ['अ. 'वसीलः' (وسیلہ) चे अनेक.] साधने.

वसातत (وساطت) स्त्री. ('अ.) माध्यम; साधन.

वसायत (وصایت) स्त्री. ('अ.) अज्ञानपालकत्व.

वसाया (وصایا) पु. ['अ. 'वसीयत' (وصیت) चे अनेक.] मृत्युपत्रे.

वसालत (وسالت) स्त्री. ('अ.) माध्यम; साधन.

वसी (وصی) वि. ('अ.) (१) ज्याच्या नावाने मृत्युपत्र करण्यात आले आहे असा. (२) मृत्युपत्राची अंमलबजावणी करणारा.

वसी'अ (وسیع) वि. ('अ.) विस्तृत; विशाल; व्यापक.

वसी'अ-उत्-तज्रिबः (وسیع التجربہ) वि. ('अ.) खूप अनुभव असलेला.

वसी'अ-उल्-मश्रब (وسیع المشرب) वि. ('अ.) सर्व धर्मांवर श्रद्धा ठेऊन कोणाचेही मन न दुखविणारा.

वसीक़ (وثیق) वि. ('अ.) दृढ; मजबूत; पक्का.

वसीक़त (وثیقت) स्त्री. **वसीक़ः** (وثیقہ) पु. ('अ.) (१) दृढता. (२) प्रतिज्ञापत्र. (३) करारनामा; दस्तैवज. (४) प्रमाणपत्र; सर्टिफिकेट. (५) ज्यावर

ब्याज मिळते अशी प्रॉमिसरी नोट किंवा सरकारी कागद. (६) नातलगांना ब्याज मिळावे म्हणून सरकारात ठेवलेली रक्कम. (७) एखादी मालमत्ता सरकारजमा झाल्यानंतर तिच्या मालकाला मिळणारे निवृत्तिवेतन (पेन्शन). **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) ज्याला सरकारातून निवृत्तिवेतन किंवा ब्याज मिळते असा.

वसीत (وسيط) वि. ('अ.) (१) मध्यम; मधला. (२) जन्माने उच्च कुळातील नसलेला, परंतु मोठ्या हुद्यावर असलेला.

वसीम (وسيم) वि. ('अ.) (१) सुंदर; शोभिवंत. (२) खूण केलेला.

वसीयत (وصيت) स्त्री. ('अ.) अंतसमयी केलेली मालमत्तेची व्यवस्था. **–नामः** (نامہ –) पु. ('अ.+फ़ा.) वारसापत्र (कायदेशीर शिक्कामोर्तब झालेले); मृत्युपत्र.

वसीलः (وسيلہ) पु. ('अ.) (१) साधन; माध्यम; उपकरण. (२) आधार. (३) संबंध. (४) प्रसंग.

वसूक़ (وثوق) पु. ('अ.) (१) दृढता; मजबुती. (२) भरवसा; विश्वास.

वसूक़ (وثق) पु. ('अ.) (१) खात्री; विश्वास. (२) दृढता.

वस्ख़ (وسخ) पु. ('अ.) मलिनता; गलिच्छता.

वस्त (وسط) पु. ('अ.) मध्य भाग; मध्य.

वस्ती (وسطی) वि. ('अ.) मधला; माध्यमिक.

वस्न (وثن) पु. ('अ.) मूर्ती; प्रतिमा.

वस्नी (وثنی) वि. ('अ.) मूर्तिपूजक.

वस्नी (وسنی) स्त्री. ('अ.) सवत; एका पतीच्या दोन किंवा अधिक बायका.

वस्फ़ (وصف) पु. ('अ.) (१) गुण; वैशिष्ट्य. (२) प्रशंसा; वर्णन. (३) उत्तमता.

वस्मः (وسمہ) पु. (फ़ा.) निळीच्या झाडाची पाने. (यांपासून कलप तयार केला जात असे).

वस्ल (وصل) पु. ('अ.) (१) मिलाफ; मीलन; संयोग. (२) मेळ; एकीकरण. (३) पावती.

वस्लचः (وصلچہ) पु. ('अ.) कापडाचा किंवा कागदाचा तुकडा.

वस्ली (وصلی) स्त्री. ('अ.) लिखाणाचा सराव करण्याचे जाड व गुळगुळीत कागद.

वस्वसः (وسوسہ); **वस्वास** (وسواس) पु. ('अ.) (१) आशंका; संदेश; अनिष्टाची शंका. (२) माणसाच्या मनात सैतानाकडून उत्पन्न केला जाणारा धर्मबाह्य विचार. (३) भ्रम; वहीम. (४) भीती. (५) टाळाटाळ.

वस्वासी (وسواسی) वि. ('अ.) (१) डळमळीत विचार असणारा. (२) शंकेखोर.

वस्साफ़ (وصاف) वि. ('अ.) प्रशंसक; खूप तारीफ करणारा.

वहूदत (وحدت) स्त्री. ('अ.) एकतत्त्व; एकता; एकेश्वरवाद. **–परस्त** (پرست –) वि. ('अ.+फ़ा.) एकेश्वरवादी; अद्वैती.

वहूदत-उल्-वुजूद (وحدت الوجود) स्त्री. ('अ.) जगात सर्वत्र ईश्वर भरलेला आहे, एका ईश्वराखेरीज जगात दुसरे काही नाही, प्रत्येक प्राण्यात ईश्वराचा वास आहे—हा सिद्धांत.

वहूदत-ए-इरादी (وحدت ارادی) स्त्री. ('अ.) सर्वांनी स्वच्छेने एक होणे.

वहूदत-ए-क़हरी (وحدت قہری) स्त्री. ('अ.) जबरदस्तीने सर्वांना एकत्र आणणे.

वहूदानियत (وحدانیت) स्त्री. ('अ.) एकत्व; एकेश्वरवाद; अद्वैतवाद.

वहूदानी (وحدانی) वि. ('अ.) एकाशी संबंध असणारा.

वहब (وهب) स्त्री. ('अ.) ईश्वरी देणगी; दान; बक्षीस.

वहबी (وهبی) वि. ('अ.) ईश्वरदत्त.

वहम (وهم) पु. ('अ.) (१) भ्रम; लोकभ्रम. (२) वहीम; आळ. (३) शंका; संशय. (४) भीती. (५) गैरसमज. **–असास** (اساس –) वि. ('अ.) भ्रममूलक. **–नाक** (ناک –) वि. ('अ.+फ़ा.) भ्रमपूर्ण.

वहमी (وهمی) वि. ('अ.) शंकेखोर; लोकभ्रमात गुरफटलेला; संशयी.

वहलः (وهلہ) पु. ('अ.) (१) भय; भीती. (२) खेप; पाळी.

वहूश (وحش) पु. ['अ. 'वहशी' (وحشی) चे अनेक.] जंगली प्राणी.

वहूशत (وحشت) स्त्री. ('अ.) (१) माणसाला बुजणे; बुजरेपणा. (२) जंगलीपणा; असभ्यता. (३) वेड; वेडेपणा. (४) तिटकारा. (५) भय; दहशत. (६) उद्धटपणा. **–अंगेज़** (انگیز –) वि. ('अ.+फ़ा.) भीषण; भयानक. **–कदः** (کدہ –) पु. ('अ.+फ़ा.) जेथून पळून जावे असे वाटते असे स्थान; उजाड, वैराण स्थान. **–खेज़** (خیز –) वि. ('अ.+फ़ा.) भीती उत्पन्न करणारा, वाढविणारा; भयजनक. **–ज़दः** (زدہ –) वि. ('अ.+फ़ा.) (१) भयभीत. (२) वेडा. **–नाक** (ناک –) वि. ('अ.+फ़ा.) भयंकर; भीषण.

वहूशियानः (وحشیانہ) वि. ('अ.+फ़ा.) (१) जंगली; रानटी. (२) निर्दय. (३) वेडयासारखा.

वहशी (وحشی) वि. ('अ.) (१) माणसांना बुजणारे जंगली जनावर; जंगली; असभ्य; असंस्कृत. (२) बुजणारा; वेडा. **-तब्'अ** (-طبع); **-मिज़ाज** (-مزاج) वि. ('अ.) जंगली जनावराप्रमाणे माणसांना बुजणारा; दूर पळून जाणारा; एकांतप्रिय.

वह्यी (وحی) स्त्री. ('अ.) ईश्वरी आदेश; पैगंबराच्या (प्रेषिताच्या) द्वारे व्यक्त झालेला ईश्वरी संदेश.

वह्दीब (وحید) वि. ('अ.) एकटा; एकमेव; अद्वितीय.

वह्हाज (وهاج) वि. ('अ.) ज्योतिर्मय; प्रकाशमान; चमकदार.

वह्हाब (وهاب) वि. ('अ.) खूप दान करणारा; दानशूर; उदार; ईश्वर.

वह्हाबी (وهابی) पु. ('अ.) अब्दुल वहाब नजदी यांनी स्थापन केलेला मुसलमानांतील एक पंथ व त्याचा अनुयायी. या पंथाचे लोक फक्त 'हदीस' प्रमाण मानतात. (वि.) ईश्वरी.

वा (وا) वि. (फ़ा.) पसरलेला; उघडलेला; उघडा; खुला. (अव्य.) (१) पुनः. (२) अरेरे! हाय हाय!

वा'अजबा (واعجبا) वा. ('अ.) किती आश्चर्याची गोष्ट आहे!

वाअसफ़ा (وا اسفا) अव्य. ('अ.) अरेरे! हाय हाय!

वा'अिज़ (واعظ) वि. पु. ('अ.) (१) धर्मोपदेशक. (२) उपदेशाच्या गोष्टी (वाज़) सांगणारा.

वा'अिद (واعد) वि. ('अ.) वायदा करणारा; वचन देणारा.

वाए (وائے) अव्य (फ़ा.) हाय हाय! अरेरे! **-क़िस्मत** (-قسمت) अव्य. ('अ.+फ़ा.) हाय रे दैवा!

वाक़ि'अ (واقع) वि. ('अ.) (१) होणारा; घडणारा. (२) झालेला; घडलेला.

वाक़ि'अत (واقعت) स्त्री. ('अ.) सत्य; वास्तविकता.

वाक़ि'अतन् (واقعتاً) अव्य. ('अ.) वस्तुतः; खरोखरी.

वाक़ि'अी (واقعی) वि.('अ.)खरा; वास्तविक. (अव्य.) खरोखरी; वस्तुतः.

वाक़ि'अः (واقعہ) पु. ('अ.)(१) घटना. (२) वृत्तांत. (३) अपघात; दुर्घटना. **-नवीस** (-نویس); **-निगार** (-نگار) वि. ('अ.+फ़ा.) घटनांचे वृत्तांत लिहून ठेवणारा; इतिहास लेखक; वाकनीस. [अनेक 'वाक़ि'आत' (واقعات)].

वाक़ि'अः-ए-हा'एलः (واقعۂ هائلہ) पु. ('अ.) भयंकर अपघात; फार मोठी दुर्घटना.

वाक़िफ़ (واقف)वि. ('अ.) (१) परिचित. (२) जाणकार; ज्ञाता; अनुभवी. (३) दान (वक़्फ़) करणारा दाता.

वाक़िफ़कार (واقف کار) वि. ('अ. + फ़ा.) एखाद्या विशिष्ट कामाचा जाणकार, अनुभवी.

वाक़िफ़ियत (واقفیت) स्त्री. ('अ.) (१) परिचय, ओळख. (२) ज्ञान; माहिती; अनुभव.

वाक़ी (واق) वि. ('अ.) निरीक्षक; देखरेख ठेवणारा.

वाख्वास्त (واخواست) पु. (फ़ा.) (१) हिशेब मागणे, समजावून घेणे. (२) परत घेणे.

वागुज़ार (واگزار) वि. (फ़ा.) सोडणारा, सोडून देणारा.

वागुज़ारी (واگزاری) स्त्री. (फ़ा.) सुटका; मोकळीक.

वागुज़ाश्त (واگزاشت) स्त्री. (फ़ा.) स्वातंत्र्य; सुटका; मोकळे होणे.

वागोयः (واگویم) पु. (फ़ा.) संभाषण; चर्चा.

वाचीदः (واچیدہ) वि. (फ़ा.) निवडलेला; टिपलेला.

वाजिद (واجد) वि. ('अ.) (१) प्राप्त करणारा. (२) संशोधक; नवीन गोष्ट शोधून काढणारा; (३) अस्तित्व देणारा; ईश्वर.

वाजिब (واجب) वि. ('अ.) (१) उचित; योग्य; वाजवी. (२) आवश्यक; अनिवार्य. (३) लायक. (पु.) ईश्वर. [अनेक 'वाजिबात' (واجبات) पु. ('अ.) अवश्य केली पाहिजेत अशी धर्मकृत्ये].

वाजिब-उज़्-ज़ियारत (واجب الزیارت) वि. ('अ.) दर्शन घेण्यायोग्य; दर्शनीय.

वाजिब-उत्-त'अज़ीम (واجب التعظیم) वि. ('अ.) आदरणीय.

वाजिब-उत्-त'अज़ीर (واجب التعزیر) वि. ('अ.) शिक्षा देण्यास योग्य; दंडनीय.

वाजिब-उत्-त'अमील (واجب التعمیل) वि. ('अ.) पालन, अंमलबजावणी करण्यास योग्य.

वाजिब-उत्-तलब (واجب الطلب) वि. ('अ.) (१) मागण्यास योग्य; वसूल करण्यालायक. (२) बोलविण्यास योग्य.

वाजिब-उत्-तस्लीम (واجب التسلیم) वि. ('अ.) मान्य करण्यास योग्य; स्वीकारार्ह.

वाजिब-उर्-रहम (واجب الرحم) वि. ('अ.) दयनीय; कीव करण्यासारखा.

वाजिब-उर्-रि'आयत (واجب الرعایت) वि. ('अ.) सवलत देण्यासारखा; दया करण्यास योग्य.

वाजिब-उल्-अदा (واجب الادا) वि. ('अ.) देय; देण्यास योग्य.

वाजिब-उल्-'अर्ज़ (واجب العرض) वि. ('अ.) प्रार्थना; कथन, अर्ज करण्यास योग्य. (पु.) शेतकरी व जमीनदार यांच्यात झालेला करार.

वाजिब-उल्-इ'आनत (واجب الاعانت) वि. ('अ.) मदत करण्यास योग्य.

वाजिब-उल्-इत्तिबा'अ (واجب الاتباع) वि. ('अ.) अनुकरणीय.

वाजिब-उल्-इम्तिसाल (واجب الامتثال) वि. ('अ.) ज्याची आज्ञा पाळणे आवश्यक आहे असा.

वाजिब-उल्-ईफ़ा (واجب الایفا) वि. ('अ.) जिचे पालन करणे आवश्यक आहे अशी (गोष्ट).

वाजिब-उल्-क़त्ल (واجب القتل) वि. ('अ.) वध्य.

वाजिब-उल्-मद्ह (واجب المدح) वि. ('अ.) ज्याची स्तुती करणे आवश्यक आहे असा.

वाजिब-उल्-वुजूब (واجب الوجود) वि. ('अ.) स्वयंभू; ईश्वर.

वाजिब-उस्-सना (واجب الثنا) वि. ('अ.) प्रशंसनीय; स्तुत्य.

वाजिबियत (واجبیت) स्त्री. ('अ.) (१) औचित्य; (२) अनिवार्यता.

वाजिबी (واجبی) वि. ('अ.) उचित; वाजवी; योग्य.

वादि'अ (واضع) वि. ('अ.) बनविणारा; तयार करणारा; रचणारा.

वादि'आन-ए-दस्तूर (واضعان دستور) पु. ('अ.) घटना, कायदे बनविणारे; आमदार.

वादिह् (واضح) वि. ('अ.) स्पष्ट; उघड; दिसणारा.

वादी (وادی) स्त्री. ('अ.) (१) घाट (डोंगरातील). (२) डोंगराच्या पायथ्याची उतरती जमीन. (३) दरी; खिंड. (४) खोरे. (५) जंगल; वन. **–गर्द** (گرد–); **–नवर्द** (نورد–); **–पैमा** (پیما–) वि. ('अ. + फ़ा.) (१) रानावनांतून भटकणारा. (२) वेडा. (३) रानटी.

वान (وان) प्रत्य. (फ़ा.) (१) सारखा; सदृश. (२) वाला.

वापस (واپس) वि. (फ़ा.) (१) परत आलेला. (२) परत केलेला. (अव्य.) परत.

वापसीं (واپسیں) वि. (फ़ा.) अंतिम; अखेरचा.

वापसी (واپسی) स्त्री. (फ़ा.) परतणी; परत येणे, देणे, करणे; प्रत्यागमन.

वाफ़िद (وافد) पु. ('अ.) (१) प्रतिनिधी. (२) दूत; पत्रवाहक. (३) सांडणीस्वार.

वाफ़िर (وافر) वि. ('अ.) पुष्कळ; अधिक; प्रचुर.

वाफ़ी (وافی) वि. ('अ.) (१) संपूर्ण; समग्र. (२) पुष्कळ. (३) पुरेसा.

वाबस्तगां (وابستگاں); **वाबस्तगान** (وابستگان) पु. [फ़ा. 'वाबस्तः' (وابستہ) चे अनेक.] संबद्ध; संबंधित लोक.

वाबस्तगी (وابستگی) स्त्री. (फ़ा.) संबंध; संपर्क; प्रेम; आत्मीयता.

वाबस्तः (وابستہ) वि. (फ़ा.) संबद्ध; बांधलेला; संबंधित; संलग्न. (पु.) नातलग; स्वजन.

वाम (وام) पु. (फ़ा.) (१) ऋण; कर्ज. (२) रंग; वर्ण.

वामांदगी (واماندگی) स्त्री. (फ़ा.) (१) थकवा. (२) दमून रस्त्यात बसणे. (३) दीनता; असहायता.

वामांदः (واماندہ) वि. (फ़ा.) (१) थकलेला; दमून मागे राहिलेला; मागासलेला. (२) दीन; दुःखी; असहाय. (३) उच्छिष्ट; उष्टा.

वामिक़ (وامق) पु. ('अ.) (१) प्रियकर; प्रेमी. (२) मित्र. (३) 'अज्रा' वर प्रेम करणारा अरबी प्रेमिक.

वार (وار) पु. (फ़ा.) (१) आघात. (२) आक्रमण. (३) पद्धती. (प्रत्य.) (१) पात्र; योग्य. [उदा. 'सज़ावार' (سزاوار) वि. (फ़ा.) शिक्षेस पात्र.] (२) करणारा; वाला. [उदा. 'क़ुसूरवार' (قصوروار) वि. ('अ.+फ़ा.) अपराध करणारा; अपराधी].

वारफ़्तगी (وارفتگی) स्त्री. (फ़ा.) आत्मविस्मृती; तल्लीनता.

वारफ़्तः (وارفتہ) वि. (फ़ा.) (१) आत्मविस्मृत; तल्लीन. (२) थकलेला. (पु.) प्रेमी.

वारसीदः (وارسیدہ) वि. (फ़ा.) (१) पोहोचलेला; गेलेला. (२) सूचना दिलेला.

वारस्तगी (وارستگی) स्त्री. (फ़ा.) (१) स्वच्छंदता; स्वैरता. (२) स्वातंत्र्य. (३) निश्चितता.

वारस्तः (وارستہ) वि. (फ़ा.) (१) स्वच्छंद; स्वैर. (२) निश्चित. (३) स्वतंत्र.

वारिद (وارد) वि. ('अ.) (१) येणारा. (२) आलेला. (पु.) दूत.

वारिद-ओ-सादिर (وارد و صادر) पु. ('अ.) (१) प्रवासी. (२) अतिथी.

वारिदात (واردات) स्त्री. ['अ. 'वारिद' (وارد) चे अनेक.] (१) घटना. (२) दंगा; मारामारी; अपघात. (उर्दूत हा शब्द एकवचनी वापरला जातो).

वारिस् (وارث) पु. ('अ.) (१) वारस; उत्तराधिकारी. (२) पालक. (३) मालक.

वाला (والا) वि. (फ़ा.) (१) प्रतिष्ठित. (२) श्रेष्ठ; मान्यवर. (३) उच्च; उत्तुंग; महान. **–क़द्र** (قدر–) वि. (फ़ा. + 'अ.) प्रतिष्ठित; सन्माननीय. **–गुहर** (گہر–) वि. (फ़ा.) कुलीन; उच्च कुळातील. **–जाह** (جاہ–) वि. (फ़ा.) उच्च पदस्थ. **–नामः** (نامہ–) पु. (फ़ा.) आवरपत्र; कृपापत्र. **–मर्तबत**

(مرتبت –); –शान (شان –) वि. (फ़ा.+'अ.) भव्य; रुबाबदार; प्रतिष्ठित.

वालि-ए-'अक़्ब (والئ عقرب) पु. ('अ.) मंगळ (ग्रह) (वृश्चिक राशीचा स्वामी).

वालि-ए-मुल्क (والئ ملک) पु. ('अ.) राजा; बादशहा.

वालिद (والد) पु. ('अ.) पिता; बाप.

वालिदैन (والدین) पु. ('अ.) आईबाप; मातापिता.

वालिदः (والدہ) स्त्री. ('अ.) माता; आई.

वालिहानः (والہانہ) अव्य. वि. ('अ.) प्रेमिकांसारखा; प्रेमपूर्वक.

वाली (والی) पु. ('अ.) (१) संरक्षणकर्ता; मदतगार; समर्थक. (२) राज्यकर्ता; राजा.

वालेह् (والہ) वि. ('अ.) मुग्ध; मोहित; फिदा झालेला; प्रेमी.

वावैला (واویلا) पु. ('अ.) (१) विलाप; आक्रोश. (२) हाहाःकार; आरडाओरडा.

वाशगूं (واژگوں) वि. (फ़ा.) (१) उपडा; उलटा. (२) अशुभ.

वाशिगाफ़ (واشگاف) वि. (फ़ा.) प्रकट; स्पष्ट; उघड.

वाशी (واشی) वि. ('अ.) (१) खोटा; मिथ्यावादी. (२) निंदक; चहाडखोर.

वाशुव (واشد) स्त्री. (फ़ा.) प्रफुल्लता; विकसित होणे. –गी (گی –) स्त्री. (फ़ा.) (१) विकास; प्रफुल्लता. (२) संकोच, बंधन, दूर होणे.

वाशुदः (واشدہ) वि. (फ़ा.) प्रफुल्ल; विकसित; उमललेला.

वाशूं (واژوں) वि. (फ़ा.) उपडा; उलटा; अधोमुख. –बख़्त (بخت –) वि. (फ़ा.) हतभागी; उलटघा नशिबाचा.

वासि'अ (واسع) वि. ('अ.) (१) पसरणारा; विस्तार करणारा. (२) विस्तृत. (पु.) ईश्वर.

वासिक़ (واثق) वि. ('अ.) दृढ; मजबूत; न तुटणारा.

वासित् (واسط) वि. ('अ.) (१) मधला; मध्यवर्ती. (२) मध्यस्थ.

वासितः (واسطہ) पु. ('अ.) (१) माध्यम. (२) संबंध; संपर्क; मैत्री.

वासिफ़ (واصف) वि. ('अ.) प्रशंसक; तारीफ करणारा.

वासिल (واصل) वि. ('अ.) (१) भेटणारा; भेट घेणारा. (२) जोडलेला; संयुक्त. (३) वसूल होणारा; मिळणारा. –ब.हक़्क़ होना (بہ حق ہونا –) ईश्वराला जाऊन भेटणे; मरणे. –बाक़ी (باقی –) स्त्री. ('अ.) जमा व बाकी (येणे) याचा हिशेब; देण्याघेण्याचा हिशेब. –बाक़ी नवीस (باقی نویس –) पु. ('अ.+फ़ा.) तालुका कचेरीतील जमा व बाकी यांचा हिशेब ठेवणारा कारकून.

वासिलात (واصلات) स्त्री. ('अ.) (१) एकूण जमेची बेरीज. (२) बेकायदेशीरपणे एखादी मालमत्ता बळकावून बसलेल्या व्यक्तीने त्या मालमत्तेतून वसूल केलेली रक्कम.

वासोख़्त (واسوخت) पु. [फ़ा. 'वासोख़्तन' (واسوختن) नाखूष, दुःखी होणे.] प्रेयसीच्या कठोर वागणुकीमुळे नाराज व बेजार झालेल्या प्रियकराच्या दुःखाचे व प्रीतीविषयीच्या तिटकाऱ्याचे वर्णन असलेले काव्य. –गी (گی –) स्त्री. (फ़ा.) जळफळाट; दुःख; नाराजी.

वासोख़्तः (واسوختہ) वि. (फ़ा.) (१) जळालेला; विदग्ध. (२) नाराज.

वासोज़ (واسوز) पु. (फ़ा.) (१) जळजळ; ज्वाला. (२) आवेश.

वास्ते (واسطے) अव्य. (फ़ा.) (१) साठी; करिता. (२) सबब; कारण; हेतूने.

वाह (واہ) अव्य. (फ़ा.) वाहवा! छान! शाबास! –वाह (واہ –) अव्य. (फ़ा.) वाहवा!

वाहिद (واحد) वि. ('अ.) एक; एकमेव; अद्वितीय. (पु.) ईश्वर. –शाहिद होना (شاہد ہونا –) (१) परिचित होणे; पाहाणे. (२) एखादी वस्तू देणे, मिळविणे. (३) प्रेमाने, दयाळूपणे वागविणे.

वाहिद-उल्-'ऐन (واحد العین) वि. ('अ.) एकाक्ष; तिरळा.

वाहिदः (واحدہ) पु. ('अ.) घटक.

वाहिब (واہب) वि. ('अ.) देणारा; दाता.

वाहिम (واہم) वि. ('अ.) शंकेखोर; लोकभ्रमात अडकलेला; भ्रमात असलेला.

वाहिमः (واہمہ) पु. ('अ.) (१) भ्रम; भ्रांती; वहीम (२) कल्पनाशक्ती.

वाहियात (واہیات) स्त्री. ['अ. 'वाही' (واہی) चे अनेक.] निरर्थक व बाष्कळ गोष्टी. (वि.) वाह्यात; बाष्कळ; वायफळ.

वाही (واہی) वि. ('अ.) (१) शिथिल; सुस्त. (२) निरर्थक; व्यर्थ; बेकार; उडाणटप्पू; मवाली. –तबाही (تباہی –) वि. ('अ.+फ़ा.) वायफळ; निरर्थक; मूर्खासारखा. (स्त्री.) वाह्यात बडबड.

विक़ा'अ (وقاع) पु. ('अ.) (१) युद्ध; लढाई. (२) मैथुन.

विक़ायत (وقایت) स्त्री. ('अ.) (१) देखरेख. (२) संरक्षण.

विक़ाये'अ (وقايع) पु. ['अ. 'वक़'अ:' (وقعہ) चे अनेक.] (१) लढाया; युद्धे. (२) बातम्या. (३) घटना.

विक़ाय: (وقايہ) पु. ('अ.) (१) संरक्षण. (२) देखरेख.

विक़ार (وقار) पु. ('अ.) (१) गुरुत्व. (२) प्रतिष्ठा.

विज़ारत (وزارت) स्त्री. ('अ.) (१) मंत्रीपद; मंत्रीत्व. (२) मंत्रालय. **–खाना** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) मंत्र्याची कचेरी; मंत्रालय. (इतर संयुक्त शब्दांसाठी पाहा 'वज़ीर').

विज़ारत-ए-'उज़्मा (وزارت عظمیٰ) स्त्री. ('अ.) पंतप्रधानाचे पद किंवा मंत्रालय.

विज्द (وجد) पु. ('अ.) (१) शक्तिशाली होणे. (२) धनवान असणे. (३) प्राप्त होणे.

विज्दान (وجدان) पु. ('अ.) (१) हरवलेले मिळविणे, जाणणे. (२) शोधणे. (३) काव्य रसज्ञता; रसिकता. (४) तल्लीनता; आल्हाद.

विदा'अ (وداع) स्त्री. ('अ.) (१) रवानगी; प्रस्थान. (२) निरोप.

विदा'ई (وداعی) स्त्री. ('अ.+हिं.) (१) निरोप; पाठवणी. (२) बिदागी (धन). (३) वधूचे श्वशुरगृही गमन.

विदाद (وداد) स्त्री. ('अ.) मैत्री; दोस्ती.

विफ़ाक़ (وفاق) पु. ('अ.) (१) अनुकूलता. (२) मैत्री. (३) अनेक राष्ट्रांची संयुक्त आघाडी.

विफ़ाक़त (وفاقت) स्त्री. ('अ.) (१) अनुकूलता. (२) मैत्री.

विरास़त (وراثت) स्त्री. ('अ.) वारसा; उत्तराधिकार. पाहा 'वरास़त' (दो. शु.).

विर्द (ورد) पु. ('अ.) एखादी गोष्ट सतत बोलणे किंवा करणे; नित्यकर्म.

विला (ولا) स्त्री. ('अ.) (१) प्रेम; प्रीती. (२) मैत्री. (३) आस्था. (४) श्रद्धा.

विलादत (ولادت) स्त्री. ('अ.) जन्म; उत्पत्ती.

विलायत (ولایت) स्त्री. ('अ.) (१) परदेश; दुसरा देश; युरोप (इंग्लंड). (पूर्वी हा शब्द मुख्यत: इराण, तुर्कस्तान वगैरे देशांसाठी वापरला जात असे). (२) वली किंवा ऋषी असणे; संतपणा.

विलायती (ولایتی) वि. ('अ.) विदेशी; परदेशी. **–बैंगन** (بیگن –) पु. ('अ.+हिं.) टोमॅटो; बेलवांगे.

विसाद (وسادہ) पु. ('अ.) मोठा तक्या; मसनद.

विसाल (وصال) पु. ('अ.) (१) संयोग; मेळ. (२) प्रेमी युगुलाचे मीलन. (३) एखाद्या महापुरुषाचे निधन.

वीरां (ویراں); **वीरान** (ویران) वि. (फ़ा.) (१) ओसाड; उजाड; वैराण. (२) निस्तेज. **–कुन** (کن –); **–गर** (گر –) वि. (फ़ा.) (१) वैराण, उध्वस्त करणारा. (२) लुटारू; दरोडेखोर.

वीरानी (ویرانی) स्त्री. (फ़ा.) (१) निर्जनता. (२) वैराणपणा. (३) विध्वंस.

वीरान: (ویرانہ) पु. (फ़ा.) (१) उध्वस्त, वैराण स्थान. (२) जंगल. (३) उदासीनता.

वु'आज़ (وعاظ) पु. ['अ. 'वा'इज़' (واعظ) चे अनेक.] धर्मोपदेशक लोक.

वुक़ू'अ (وقوع) पु. ('अ.) (१) जाहीर होणे; प्रकट होणे; घडणे. (२) घटना.

वुक़ू'अ: (وقوعہ) पु. ('अ.) (१) घटना. (२) अपघात; दुर्घटना.

वुक़ूफ़ (وقوف) पु. ('अ.) (१) ज्ञान; परिचय. (२) माहिती. (३) शिष्टाचार.

वुज़रा (وزرا) पु. ['अ. 'वज़ीर' (وزیر) चे अनेक.] मंत्री (अनेक).

वुजूद (وجود) पु. ('अ.) (१) अस्तित्व. (२) उपस्थिती. (३) देह; शरीर.

वुजूब (وجوب) पु. ('अ.) योग्य; आवश्यक; अनिवार्य असणे.

वुजूह (وجوہ) पु. ['अ. 'वजह' (وجہ) चे अनेक.] कारणे; उपाय.

वुज्न: (وجنہ) पु. ('अ.) कपोल; गाल.

वुज़ू (وضو) पु. ('अ.) (१) चेहऱ्याची सफाई; स्वच्छता. (२) नमाजापूर्वी हात, पाय व तोंड धुणे. **–शिकन** (شکن –) वि. ('अ.) तपोभंग करणारा (विशेषत: सौंदर्य).

वुफ़ूद (وفود) पु. ['अ. 'वफ़्द' (وفد) चे अनेक.] शिष्टमंडळे.

वुफ़ूर (وفور) पु. ('अ.) आधिक्य; प्राचुर्य; बाहुल्य.

वुरसा (ورثا) पु. ['अ. 'वारिस्' (وارث) चे अनेक.] वारसदार लोक.

वुरूद (ورود) पु. ('अ.) (१) आगमन. (२) प्रवेश.

वुरूद-ए-मस्'ऊद (ورود مسعود); **वुरूद-ए-मुबारक** (ورود مبارک) पु. ('अ.) शुभागमन.

वुसूल (وصول) पु. ('अ.) (१) प्राप्ती मिळणे. (२) पोचणे. (वि.) प्राप्त मिळालेला; पोचलेला. **–याब** (یاب –) वि. ('अ.+फ़ा.) वसूल झालेला; प्राप्त.

वुसूली (وصولی) स्त्री. ('अ.) (१) प्राप्ती; वसुली. (२) वसूल व्हावयाचा असलेला.

वुस्'अ (وسع) स्त्री. ('अ.) (१) विस्तार; लांबी-रुंदी. (२) शक्ती; सामर्थ्य.

वुस्'अत (وسعت) स्त्री. ('अ.) (१) विस्तार; फैलाव. (२) सामर्थ्य. **-पिज़ीर** (پذیر –) वि. ('अ.+फ़ा.) विस्तृत; विशाल.

वुस्'अत-ए-क़ल्ब (وسعت قلب) स्त्री. ('अ.) हृदयाची विशालता; उदारता.

वुस्'अत-ए-सहरा (وسعت صحرا) स्त्री. ('अ.) अरण्याचा विस्तार.

वुस्'अत-ए-हौसलः (وسعت حوصلہ) स्त्री. ('अ.) धाडस; साहस; खूप वाढणे.

वुस्तॉ (وسطیٰ) वि. ('अ.) मधला; दरम्यानचा. (पु.) मधले बोट.

वुस्लत (وصلت) स्त्री. ('अ.) (१) ठिगळ; जोड. (२) मीलन. (३) नाते; स्वजनता.

वुहूश (وحوش) पु. ['अ. 'वहश' (وحش) चे अनेक.] जंगली जनावरे; रानटी प्राणी.

वैल (ویل) पु. ('अ.) (१) आपत्ती; दुःख. (२) शत्रुत्व. (३) दुर्दैव. (४) शिक्षा; अद्दल. **-कश** (کش –) वि. ('अ. + फ़ा.) सूड घेणारा; पापाची अद्दल घडविणारा.

वैस (ویس) पु. ('अ.) धिक्कार; शाप.

वैह (ویح) अव्य. ('अ.) (१) वाहवा! छान! (२) हाय हाय! हा हन्त!

वैह़क'ल्लह (ویحک اللہ) वा. ('अ.) देव तुझा सत्यानाश करो.

शंग (شنگ); **शंगुल** (شنگل) वि. (फ़ा.) (१) नखरेल. (२) हसतमुख (प्रेयसीसाठी). (पु.) चोर; लुटारू; लबाड.

शंगर्फ़ (شنگرف); **शंजर्फ़** (شنجرف) पु. (फ़ा.) हिंगूळ.

शंद-ओ-उस्ता (ژند و اوستا) पु. (फ़ा.) पारशांचा मूळ धर्मग्रंथ 'जंद' व त्याच्यावरील महाकाव्य 'उस्ता'; झिंदावेस्ता.

शंद-ओ-पाशंद (ژند و پاژند) पु. (फ़ा.) पारशांचा मूळ धर्मग्रंथ 'जंद' व त्याच्यावरील महाभाष्य 'पाजंद'.

शंबः (شنبہ) पु. (फ़ा.) वार; दिवस; शनिवार.

श'अब (شعب) पु. ('अ.) (१) खड्डा. (२) गुंफा. (३) फट. (४) कूळ; वंश.

श'अबदः (شعبدہ) पु. ('अ.) (१) जादू; नजरबंदी; जादूटोणा. (२) चमत्कार; अद्भुत गोष्ट. (३) कपट. **-गर** (گر –); **-बाज़** (باز –); **-संज** (سنج –) वि. ('अ.+फ़ा.) जादूगार.

श'अबान (شعبان) पु. ('अ.) अरबी वर्षाचा आठवा महिना.

श'अश'अः (شعشعہ) पु. ('अ.) (१) चमकणे; किरण; उन्ह. (२) मदिरा.

श'आ'इर (شعائر) पु. ['अ. 'श'ओरः' (شعیرہ) चे अनेक.] (१) आराधना; पूजा. (२) बलिदाने; बळी.

श'आफ़ (شعاف) पु. ('अ.) वेड; उन्माद (रोग).

श'ओरः (شعیرہ) स्त्री. ('अ.) (१) पशुबली; कुरबानी. (२) आराधना; पूजा.

शक (شک) पु. ('अ.) शंका; संशय. **-आफ़ी** (آفریں –) वि. ('अ.+फ़ा.) शंका निर्माण करणारा; संशयास्पद.

शकर (شکر) स्त्री. (फ़ा.) साखर; शर्करा. **-अफ़्शानी** (افشانی –) स्त्री. (फ़ा.) साखरपेरणी; गोड बोलणे. **-आब** (آب –) स्त्री. (फ़ा.) प्रियकर व प्रेयसी यांच्यातील लटका रुसवा; मामुली भांडण. **-क़ंद** (قند –) पु. (फ़ा.) रताळे. **-ख़ंद** (خند –); **-ख़ंदः** (خندہ –) मधुर हास्य; गोड हसणे. **-ख़श** (خش –) पु. (फ़ा.) नमुना; वानगी. **-ख़ा** (خا –) वि. (फ़ा.) साखर चघळणारा; मधुरभाषी. **-ख़ोर** (خور –); **-ख़्वार** (خوار –) वि. (फ़ा.) साखर, मिठाई खाणारा. (पु.) मिठाई खाणारा एक पक्षी. **-ख़्वाब** (خواب –) पु. (फ़ा.) गोड निद्रा; पहाटेची झोप. **-गुफ़्तार** (گفتار –) वि. (फ़ा.) मधुरभाषी. **-चश** (چش –) वि. (फ़ा.) साखर चाखणारा; नमुना पाहाणारा. **-तरी** (تری –) स्त्री. (फ़ा.) साखरचा. **-पा** (پا –) वि. (फ़ा.) लंगडा. **-पारः** (پارہ –) पु. (फ़ा.) (१) शंकरपाळे. (२) एक गोड फळ. **-पेच** (پیچ –) पु. (फ़ा.) मिठाईवर गुंडाळलेला कागद. **-फ़रोश** (فروش –) वि. (फ़ा.) (१) साखर विकणारा. (२) मधुरभाषी. **-बूज़ः** (بوزہ –) पु. (फ़ा.) करंजी; कानोला. **-रंग** (رنگ –) वि. (फ़ा.) (१) रंग उडालेला. (२) नाराज. **-रंगी** (رنگی –); **-रंजी** (رنجی –) स्त्री. (फ़ा.) मित्रांमध्ये होणारी मामुली धुसफूस; नाराजी. **-रेज़ी** (ریزی –) स्त्री. (फ़ा.) (१) वेधुवरावरून साखर ओवाळून टाकणे. (२) मधुर भाषण. **-लब** (لب –) वि. (फ़ा.) (१) मधुरभाषी. (२) ज्याचा ओठ फाटला आहे असा. **-हर्फ़** (حرف –) वि. (फ़ा.+'अ.) मधुरभाषी.

शकरिस्तान (شکرستان) पु. (फ़ा.) (१) उसाचे शेत. (२) साखरेचा कारखाना.

शकरीं (شکریں); **शकरी** (شکری) वि. (फ़ा.) साखरेचा; गोड.

शक्का'इक़ (شقائق) पु. ('अ.) लाल रंगाचे एक फूल.

शक़ावत (شقاوت) स्त्री. ('अ.) (१) हृदयाची कठोरता; निष्ठुरता. (२) आपत्ती; दुर्दैव.

शक़ी (شقی) वि. ('अ.) (१) निष्ठुर; निर्दय. (२) दुर्दैवी.

शक़ीक़ (شقیق) पु. ('अ.) (१) खंड; तुकडा; भाग. (२) भाऊ.

शक़ीक़ः (شقیقہ) पु. ('अ.) (१) कानशील; गंडस्थळ. (२) अर्धशिशी (आजार).

शकील (شکیل) वि. ('अ.) सुंदर; देखणा; रूपवान. [स्त्री. 'शकीलः' (شکیلہ)].

शक़ीह् (شقیح) वि. ('अ.) निकृष्ट; कुरूप; घाणेरडा.

शकूक (شکوک) वि. ('अ.) संशयी; संशयखोर.

शकूर (شکور) वि. ('अ.) आभारी; कृतज्ञ; धन्यवाद देणारा.

शक़्क़ (شق) पु. ('अ.) फाटणे; चिरले जाणे. (वि.) फाटलेला; विदीर्ण.

शक़्क़-उल्-क़मर (شق القمر) पु. ('अ.) चंद्राचे दोन तुकडे होणे. (हजरत मुहम्मद पैगंबरांनी चंद्राचे दोन तुकडे केले होते).

शक्की (شکی) वि. ('अ.) शंकेखोर; संशयी.

शक्ल (شکل) स्त्री. ('अ.) (१) आकृती; आकार. (२) रूप; चेहरा. (३) दशा; परिस्थिती. (४) उपाय. (५) प्रकार.

शक्ल-ओ-शबाहत (شکل و شباهت); **शक्ल-ओ-सूरत** (شکل و صورت) स्त्री. ('अ.) रूप; आकारप्रकार; डोलडौल; ठेवणे; बांधा.

शक्ल-ओ-शमा'इल (شکل و شمائل) स्त्री. ('अ.) रूप व गुण; आकार व स्वभाव.

शक्वॉ (شکوی) पु. ('अ.) तक्रार; गाऱ्हाणे.

शख़ (شخ) पु. [फ़ा. 'शाख' (شاخ) चे संक्षिप्त.] डोंगर; पर्वत. (स्त्री.) फांदी; डहाळी. (वि.) दृढ; मजबूत. **-कमाँ** (کماں -) वि. (फ़ा.) सामर्थ्यशाली; ज्याचे धनुष्य दुसऱ्याला चालविता येत नाही असा.

शख़ीदः (شخیدہ) वि. (फ़ा.) निसरलेला; घसरलेला.

शख़ूदः (شخودہ) वि. (फ़ा.) नखांनी ओरबडलेला.

शख़्स (شخص) पु. ('अ.) व्यक्ती; मनुष्य; माणूस.

शख़्सियत (شخصیت) स्त्री. ('अ.) (१) व्यक्तित्व; व्यक्तिमत्व. (२) प्रतिष्ठा. (३) अहंकार.

शख़्सी (شخصی) वि. ('अ.) वैयक्तिक.

शग़फ़ (شغف) पु. ('अ.) (१) रुची; आवड. (२) तल्लीनता; तन्मयता.

शग़ब (شغب) पु. ('अ.) कोलाहल; आरडाओरडा.

शग़ल (شغل) पु. ('अ.) (१) कार्य; काम; व्यवसाय. (२) छंद; मनोरंजनाचे काम. (३) ईशचिंतन.

शग़ाल (شغال) पु. (फ़ा.) कोल्हा; शृगाल. **-तीनत** (طینت -) वि. (फ़ा.+'अ.) लुच्चा; धूर्त.

शजन (شجن) पु. ('अ.) (१) शोक; दुःख. (२) आवश्यकता. (३) इच्छा.

शजर (شجر) पु. ('अ.) झाड; वृक्ष.

शजर-ए-कलीम (شجر کلیم); **शजर-ए-तूर** (شجر طور) पु. ('अ.) हजरत मूसा (मोझेस) ज्यावर ईश्वरी तेज दिसले होते तो वृक्ष.

शजर-ए-मम्नू'अः (شجر ممنوعہ) पु. ('अ.) निषिद्ध झाड. गव्हाचे झाड (रोप) आदमाला (आदिमानवाला) ईश्वराने गहू खाण्याची मनाई केली होती.

शजरी (شجری) वि. ('अ.) झाडाचा; वृक्षाच्या आकाराचा.

शजरः (شجرہ) पु. ('अ.) (१) वंशवृक्ष; वंशावळ. (२) शेताचा नकाशा. **-क़ुल्लः** (قلم -) पु. ('अ.+हि.) (१) चीजवस्तू; सामानसुमान. (२) साधुसंत आपल्या शिष्यांना प्रसाद म्हणून देतात ती टोपी व आपल्या पूर्वजांची नावे लिहिलेला कागद. **-क़ुल्लः उठाना** (قلم اٹھانا -) अंथरूण गुंडाळून व सामानसुमान बांधून जाण्याची तयारी करणे.

शजा'अत (شجاعت) स्त्री. ('अ.) शौर्य; बहादुरी; रणकौशल्य.

शजी'अ (شجیع) वि. ('अ.) शूर; वीर.

शत्त (شط) स्त्री. ('अ.) (१) नदी; नाला; कालवा. (२) नदीचा किनारा.

शत्ताह् (شطاح) वि. ('अ.) (१) निर्लज्ज; असभ्य. (२) धर्मविरोधी बोलणारा.

शत्म (شتم) पु. ('अ.) अपशब्द; शिवीगाळी.

शत्रंज (شطرنج) स्त्री. (फ़ा.) बुद्धिबळ (खेळ). **-बाज़** (باز -) वि. (फ़ा.) बुद्धिबळपटू.

शत्रंजी (شطرنجی) स्त्री. (फ़ा.) सतरंजी (बुद्धिबळाच्या पटासारखे खाने असलेली मजबूत विणीची जाड सुती अंथरी (बिछाईत). (वि.) बुद्धिबळे खेळणारा. **-बाफ़** (باف -) वि. (फ़ा.) सतरंजी विणणारा.

शदा'इद (شدائد) पु. ['अ. 'शदीदः' (شدیدہ) चे अनेक.] अडचणी; संकटे; आपत्ती; जुलूम.

शदीद (شدید) वि. ('अ.) (१) प्रचंड; फार मोठा. (२) तीव्र. (३) अवघड; दुष्कर. (४) जुलूम करणारा.

शदीद-उल्-'अदावत (شدید العداوت) वि. ('अ.) एखाद्याशी भयंकर वैर करणारा.

शदीद-उल्-'अमल (شدید العمل) वि. ('अ.) (१) दुःसाध्य. (२) जुलूम करणारा.

शदीदः (شدیدہ) स्त्री. ('अ.) आपत्ती; संकट; अडचण; अवघड गोष्ट.

शद्द (شد) पु.('अ.) (१) दृढ करणे; मजबूत बनविणे. (२) जोर; जुलूम. (३) आवाज चढविणे.

शद्द-ए-मुखालिफ़ (شد مخالف) पु. ('अ.) शत्रूला दिलेले आव्हान.

शद्द-ओ-मद्द (شد و مد) पु. ('अ.) गाजावाजा; धामधूम.

शद्दाद (شداد) पु. ('अ.) (१) भयंकर अत्याचार करणारा. (२) एक प्राचीन बादशहा. हा स्वतः ईश्वर समजत असे. याने एक कृत्रिम स्वर्गही तयार केला होता, परंतु त्यात प्रवेश करताना तो घोडावरून पडून मरण पावला.

शद्दः (شدہ) पु. ('अ.) (१) झेंडा; निशाण; मोहरमच्या (ताबुतांच्या) मिरवणुकीत मिरविले जाणारे झेंडे. (२) बंडल; पार्सल.

शनवा (شنوا) वि. (फ़ा.) ऐकणारा.

शना'अत (شناعت) स्त्री. ('अ.) निकृष्टता; हलकेपणा; वाईटपणा.

शनाख़्त (شناخت) स्त्री. (फ़ा.) (१)ओळख; परिचय. (२) ओळखण्याची खूण; चिन्ह; लक्षण.

शनाख़्तः (شناختہ) वि. (फ़ा.) ओळखलेला; ओळखीचा; परिचित.

शनास (شناس) प्रत्य. (फ़ा.) ओळखणारा. [उदा. 'मर्दुम शनास' (مردم شناس) वि.(फ़ा.) माणसाची पारख असणारा].

शनासा (شناسا) वि. (फ़ा.) ओळखणारा; जाणकार; परिचित.

शनासा'ई (شناسائی) स्त्री. (फ़ा.) परिचित; ओळख.

शनासिदः (شناسیدہ) वि. (फ़ा.) ओळखलेला; परिचित.

शनी'अ (شنیع) वि. ('अ.) वाईट; निकृष्ट; नीच.

शनी'अः (شنیعہ) स्त्री.('अ.) वाईट गोष्ट; नीच कृत्य.

शनीद (شنید) स्त्री. (फ़ा.) सुनावणी; ऐकणे.

शपाशप (شپاشپ) अव्य. (फ़ा.) (१) सपासप; पाण्यात घुसण्याचा किंवा तलवार चालविण्याचा. आवाज. (२) जलद; शीघ्र.

शपुश (شپش) स्त्री. (फ़ा.) ऊ (केसात अथवा कपडघात होणारी).

शप्पर (شپر); **शप्परः** (شپرہ) पु. (फ़ा.) वटवाघूळ.

शप्लक़ (شپلق) पु. (तु.) थप्पड; सपाटा.

शफ़क़ (شفق) स्त्री. ('अ.) (१) उषा; अरुणिमा. (२) सकाळी व सायंकाळी क्षितिजावर दिसणारा लालिमा. (वि.) अत्यंत सुंदर

शफ़क़त (شفقت) स्त्री. ('अ.) कृपा; दया; मेहेरबानी; ममता; सहानुभूती.

शफ़त (شفت) पु. ('अ.) ओठ; अधर.

शफ़वी (شفوی) वि. ('अ.) (१) ओठांचा; ओठ असलेला. (२) ओष्ठ्य (अक्षर).

शफ़ा (شفا) पु. ('अ.) (१) तट; किनारा. (२) जीवनाचा अंतिम भाग. पाहा 'शिफ़ा'.

शफ़ा'अत (شفاعت) स्त्री. ('अ.) (१) शिफारस; वशिला. (२) आपल्या अनुयायांना पापांपासून मुक्ती (मोक्ष) मिळावी म्हणून ईश्वराकडे केलेली शिफारस. **–गर** (گر –) वि. ('अ.+फ़ा.) शिफारस करणारा; पैगंबर.

शफ़ी'अ (شفیع) वि. ('अ.) (१) दुसऱ्यासाठी शिफारस करणारा. (२) अंतिम निवाडघाच्या दिवशी मोक्ष देवविणारा. (३) 'शुफ़'अ' चा हक्क सांगणारा.

शफ़ीक़ (شفیق) वि. ('अ.) (१) दयाळू; कृपाळू. (२) सहानुभूती बाळगणारा. (पु.) मित्र.

शफ़्तल (شفتل) वि. (हिं.) (१) दुराचारी; नालायक. (२) व्यभिचारीणी (बा.).

शफ़्तालू (شفتالو) पु. (फ़ा.) सप्ताळू; एक फळ.

शफ़्फ़ाफ़ (شفاف) वि. ('अ.) (१) स्वच्छ; निर्मळ; साफ. (२) कल्हई केलेला.

शफ़्फ़ाफ़ी (شفافی) स्त्री. ('अ.) स्वच्छता; निर्मळता; कल्हईची चकाकी.

शब (شب) स्त्री. (फ़ा.) रात्र; निशा. **–अंदरोज़** (اندر روز –)पु. (फ़ा.) एक प्रकारचे कापड. **–अफ़ोज़** (افروز –) पु. (फ़ा) रुपेरी पार्श्वभूमी असलेले जरीचे कापड. (वि.) (१) रात्रीला प्रकाशमान बनविणारा चंद्र. (२) काजवा. **–आहंग** (آھنگ –) पु. (फ़ा.) (१) बुलबुल (पक्षी). (२) सायंकाळी चमकणारा एक तारा. **–कोर** (کور –) वि. (फ़ा.) रातांधळा; निशांध. **–कोरी** (کوری –) स्त्री. (फ़ा) रातांधळे; रात्री न दिसणे (रोग). **–ख़ूं** (خوں –); **–ख़ून** (خون –)पु. (फ़ा.) रात्रीच्या अंधारात सैन्याने शत्रूवर केलेला हल्ला. **–ख़ेज़** (خیز –) वि. (फ़ा.) रात्री उठून जपतप करणारा; रात्र सरण्यापूर्वीच जागा होणारा. **–ख़्वां** (خواں –)पु.(फ़ा.) बुलबुल. **–ख़्वाबी** (خوابی –) स्त्री. (फ़ा.)रात्री झोपताना वापरण्याचे कपडे. **–गर्द** (گرد –) वि. (फ़ा.) **–गश्त** (گشت –) रात्री फिरून पहारा देणारा; कोतवाल; गस्त घालणारा. **–गर्दी** (گردی –)स्त्री.(फ़ा.)रात्री पहारा देणे; गस्त घालणे. **–गीर** (گیر –) वि. (फ़ा.) उत्तररात्री उठणारा व जपजाप्य करणारा. (पु.) (१)उत्तररात्र; पहाट. (२)बुलबुल. **–गूं** (گوں –) वि. (फ़ा.) रात्रीच्या रंगाचा; काळा. **–चिराग़**

(چراغ –) पु. (फ़ा.) (१) रात्रीचा दिवा; चंद्र. (२) रात्री चकाकणारे एक रत्न; लाल. **–जिंदःदार** (زندہ دار –) वि. (फ़ा.) रात्रभर जागून जपतप करणारा. **–ताज़** (تاز –) वि. (फ़ा.) रात्री हल्ला करणारा, छापा घालणारा. **–ताब** (تاب –) वि. (फ़ा.) रात्री चकाकणारा (मोती वगैरे). (पु.) चंद्र. **–देग** (دیگ –) स्त्री. (फ़ा.) रात्रभर मंदाग्नीवर हंडा ठेवून शिजविलेले अन्न (विशेषतः मांसाहारी). **–देज़** (دیز –) पु. (फ़ा.) काळा घोडा. **–नम** (نم –) स्त्री. (फ़ा.) (१) दव. (२) एक प्रकारची मलमल. **–नमी** (نمی –) स्त्री. (फ़ा.) मच्छरदाणी; दवापासून रक्षण करण्यासाठी लावले जाणारे कापड. **–परः** (پر –) पु. (फ़ा.) वटवाघूळ. **–बख़ैर** (بخیر –) वा. (फ़ा.+'अ.) तुमची रात्र सुखाची जावो. **–बरात** (برات –) स्त्री. (फ़ा.+'अ.) मुसलमानांचा एक सण (शाबान महिन्याच्या १४ तारखेस येणारा). **–बाश** (باش –) वि. (फ़ा.) (१) रात्रीपुरता राहाणारा. (२) संभोग करणारा. **–बाशी** (باشی –) स्त्री. (फ़ा.) (१) रात्रीपुरता मुक्काम (२) संभोग; मैथुन. **–बू** (بو –) पु. (फ़ा.) रातराणी; निशिगंध. **–बेदार** (بیدار –) वि. (फ़ा.) रात्रभर जागणारा; रात्रभर भजन वा जप करणारा. **–बेदारी** (بیداری –) स्त्री. (फ़ा.) जागरण; रात्रभर जागून भगवद्भजन करणे. **–मांदः** (ماندہ –) वि. (फ़ा.) रात्रीचा शिळा. **–मुर्दः** (مردہ –) वि. (फ़ा.) रात्रभर डाराडूर झोपणारा. **–यार** (یار –) पु. (फ़ा.) रात्री घेण्याचे रेचक. **–रंग** (رنگ –) वि. (फ़ा.) काळा. **–रवी** (روی –) स्त्री. (फ़ा.) (१) रात्री भटकणे; निशाचरी. (२) चोरी. **–रौ** (رو –) वि. (फ़ा.) (१) निशाचर. (२) रात्री प्रवास करणारा. (३) चोर. (४) रात्री जपजाप्य करणारा.

शब-ए-'आशूरः (شب عاشورہ) स्त्रीं. (फ़ा. + 'अ.) मुहर्रम महिन्याच्या दहाव्या तारखेची रात्र.

शब-ए-क़द्र (شب‌قدر) स्त्री. (फ़ा.+'अ.) रमझान महिन्याच्या २७ तारखेची रात्र.

शब-ए-ज़िफ़ाफ़ (شب‌زفاف) स्त्री. (फ़ा. + 'अ.) वधुवरांची पहिली मीलन-रात्र.

शब-ए-तार (شب‌تار); **शब-ए-तारीक** (شب تاریک) स्त्री. (फ़ा.) अत्यंत काळोखी रात्र.

शब-ए-देजूर (شب دیجور) स्त्री. (फ़ा. + 'अ.) अमावास्या; अमावास्येची रात्र.

शब-ए-फ़िराक़ (شب فراق) स्त्री. (फ़ा. + 'अ.) विरहाची रात्र.

शब-ए-बर'अत (شب برأت) स्त्री. (फ़ा. + 'अ.) एक मुस्लिम सण. पाहा 'शब बरात' (दो. शु.).

शब-ए-माह (شب ماہ) स्त्री. (फ़ा.) चांदणी रात्र.

शब-ए-यल्दा (شب یلدا) स्त्री. (फ़ा.) काळोखी रात्र; अमावास्येची रात्र.

शब-ए-वस्ल (شب وصل) स्त्री. (फ़ा. + 'अ.) मीलनाची रात्र.

शब-ए-व'अदः (شب وعدہ) स्त्री. (फ़ा. + 'अ.) प्रेयसीने प्रियकराला भेटण्याचे वचन दिलेली रात्र.

शब-ए-विसाल (شب وصال) स्त्री. (फ़ा. + 'अ.) (१) मीलनाची रात्र. (२) साधुपुरुषाच्या परलोकगमनाची रात्र.

शब-ए-शहादत (شب شہادت) स्त्री. (फ़ा. + 'अ.) (१) बलिदानाची रात्र. (२) मोहरमची नववी रात्र.

शब-ए-हिज्र (شب هجر); **शब-ए-हिज्रां** (شب هجراں) स्त्री. (फ़ा.+'अ.) विरह.

शबक (شبک); **शबकः** (شبکہ) पु. ('अ.) (१) जाळे; पाश; बंधन. (२) लोखंडी जाळी (भितीत बसविण्याची). (३) मोठे छिद्र. [अनेक 'शबकात' (شبکات)].

शबनम (شبنم) पु. ('अ.) (१) हिवाळा. (२) थंडी.

शबह (شبہ) पु. ('अ.) पितळ (धातू).

शबह (شبح) पु. ('अ.) शरीर; देह.

शबान (شبان) पु. (फ़ा.) (१) गुराखी. (२) धनगर; मेंढपाळ. **–गाह** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) सायंकाळ; रात्र.

शबानी (شبانی) स्त्री. (फ़ा.) गुरे चारणे; गुरांवर देखरेख ठेवणे.

शबानः (شبانہ) वि. (फ़ा.) (१) रात्रीचा. (२) शिळा.

शबाब (شباب) पु. ('अ.) (१) तारुण्य; जवानी. (२) उन्नती. **–आवर** (آور –) वि. ('अ.+फ़ा.) पुनः तरुण बनविणारा.

शबाशब (شباشب) अव्य. (फ़ा.) रात्रीतल्या रात्रीत; एका रात्रीत.

शबाहत (شباہت) स्त्री. ('अ.) (१) आकृती; रूप. (२) साम्य; एकरूपता.

शबिस्तां (شبستاں) पु. (फ़ा.) (१) रात्री राहाण्याचे स्थान. (२) शयनागार. (३) अंतःपुर. (४) जेथे रात्रभर ईश्वरभक्ती चालते असे मशीदीतील स्थान.

शबीनः (شبینہ) वि. (फ़ा.) (१) रात्रीचा. (२) शिळा. (पु.) रमझान महिन्यात एका रात्रीत केला जाणारा कुराणाचा पाठ.

शबीह (شبیہ) स्त्री. (फ़ा.) (१) चित्र; तसबीर. (२) छायाचित्र. (३) साम्य. (वि.) समान; सदृश.

शबः (شبہ) पु. (फ़ा.) लहान लहान मोती.

शब्ब (شب) स्त्री. ('अ.) (१) तुरटी. (२) युद्ध. (३) तारुण्य; वियोग रजनी.

शब्बर (شبر) पु. ('अ.) हजरत इमाम हुसैन.

शब्बीर (شبير) पु. ('अ.) हजरत इमाम हसन. (हुसैनचे थोरले बंधू).

शब्बो (شبو) स्त्री. (फ़ा.) (१) रातराणी. (२) निशिगंध.

शम'अ (شمع) स्त्री. ('अ.) (१) मेणबत्ती. (२) दिवा; दीपक. **–दान** (دان –) पु. ('अ.+फ़ा.) मेणबत्तीचे घर; शामदान. **–रुख़** (رخ –); **–रू** (رو –) वि. ('अ.+फ़ा.) तेजस्वी चेहरा असलेला (ली); सुंदर. **–साज़** (ساز–) वि. ('अ.+फ़ा.) मेणबत्त्या तयार करणारा.

शम'अ-ए-'आलमताब (شمع عالم تاب) स्त्री. ('अ.+फ़ा.) सूर्य.

शम'अ-ए-ऐमन (شمع ايمن) स्त्री. ('अ.) हजरत मूसा (मोझेस) यांना दिसलेले दिव्य तेज.

शम'अ-ए-कुश्तः (شمع كشته) स्त्री. ('अ.+फ़ा.) विझलेला दिवा.

शम'अ-ए-सहर (شمع سحر) स्त्री. ('अ.) (१) प्रातःकाळचा दीप; विझू लागलेला दिवा. (२) मरणोन्मुख व्यक्ती.

शम'अी (شمعى) वि. ('अ.) मेणाचा.

शमा'इम (شمائم) पु. ['अ. 'शमीमः' (شميم) चे अनेक.] अनेक प्रकारचे सुगंध, सुवास.

शमा'इल (شمائل) पु. ['अ. 'शमीलः' (شميل) चे अनेक.] सवयी; स्वभाव.

शमातत (شماتت) स्त्री. ('अ.) एखाद्याची हानी किंवा अवनती झाली असता त्याबद्दल आनंद मानणे.

शमामः (شمام) पु. ('अ.) सुगंध; सुवास.

शमीदः (شميده) वि. (फ़ा.) (१) हुंगलेला. (२) मूर्च्छित. (३) उद्विग्न.

शमीम (شميم) पु. स्त्री. ('अ.) (१) सुगंध; सुवास. (२) सुगंधित वारे.

शमीमः (شميمه) स्त्री. ('अ.) हुंगण्याचा पदार्थ; सुगंध.

शमीलः (شميله) स्त्री. ('अ.) स्वभाव; सवय; प्रकृती.

शम्मास (شماس) पु. वि. ('अ.) सूर्यपूजक; सूर्योपासक.

शम्मः (شمه) पु. ('अ.) किंचित सुवास. (वि.) थोडा; किंचित.

शम्लः (شمله) पु. ('अ.) पगडी, रुमाल, पटका, वगैरेचा डोक्याच्या मागे लोंबणारा सोगा; समला.

शम्शाद (شمشاد) पु. (फ़ा.) सुरूचे झाड. (नायिकेच्या शरीराला याची उपमा दिली जाते).

शम्शीर (شمشير) स्त्री. (फ़ा.) तलवार; खड्ग. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) असिजीवी; शिपाई. **–बक़फ़** (بكف –) वि. (फ़ा.) हातात तलवार घेतलेला; वध करण्यास तयार झालेला.

शम्शीर-ए-अजल (شمشير اجل) स्त्री. (फ़ा.+'अ.) मृत्यूची तलवार.

शम्शीर-ए-दुदम (شمشير دودم) स्त्री. (फ़ा.) दुधारी तलवार.

शम्शीर-ए-बरहनः (شمشير برهنه) स्त्री. (फ़ा.) नंगी तलवार.

शम्शीर-ए-हिलाली (شمشير هلالى) स्त्री. (फ़ा.+'अ.) (१) चंद्रकोररूपी तलवार. (२) वाकडी तलवार.

शम्स (شمس) पु. ('अ.) सूर्य; रवी.

शम्स-उल्-'उलमा (شمس العلما) पु. ('अ.) महामहोपाध्याय (विद्वानांतील सूर्य). [इंग्रजी अमदानीत मुस्लिम विद्वानांना दिली जाणारी सन्माननीय पदवी].

शम्सियः (شمسيه) स्त्री. ('अ.) छत्री.

शम्सी (شمسى) वि. ('अ.) सूर्याचा; सूर्यासंबंधीचा; सौर.

शम्सः (شمسه) पु. ('अ.) (१) साणे; छपरात ठेवलेली खिडकी. (२) माळेतील मधला मोठा मणी. (३) हारातील मधला फुलांचा झुपका.

शय (شے) स्त्री. ('अ.) वस्तू; पदार्थ; द्रव्य.

शयातीन (شياطين) पु. ['अ. 'शैतान' (شيطان) चे अनेक.] सैतान; पिशाचगण.

शर (شر) पु. ('अ.) (१) वाईट गोष्ट. (२) त्रास; उपद्रव; दंगा. (३) दुष्टता; नीचता. (४) भांडण; फाटाफूट. (५) खटपाळपणा; खोडकरपणा. **–अंगेज़** (انگيز –) वि. ('अ.+फ़ा.) भांडण लावून देणारा; दंगा करविणारा. **–पसंद** (پسند –) वि. ('अ.+फ़ा.) भांडणप्रिय.

शर'अ (شرع) स्त्री. ('अ.) (१) मुस्लिम धर्मशास्त्र; धर्माचा राजमार्ग; धर्म. (२) रुंद सडक; राजमार्ग. (३) धार्मिक रीतीरिवाज; परिपाटी.

शर'अ-ए-मुहम्मदी (شرع محمدى) स्त्री. ('अ.) इस्लामी धर्मशास्त्र.

शर'अन् (شرعاً) अव्य. ('अ.) धर्मशास्त्राप्रमाणे; मुस्लिम कायद्यानुसार. **–ओ-'अर्फ़न्** (و عرفاً –) अव्य. ('अ.) देवाच्या (धर्माच्या) व समाजाच्या कायद्याला अनुसरून.

शर'अी (شرعى) वि. ('अ.) (१) मुस्लिम धर्मशास्त्राचा; धार्मिक. (२) मुस्लिम कायद्याला अनुसरून असलेला. **–डाढ़ी** (ڈاڑھى –) स्त्री. ('अ.+हिं.) एक मूठ व दोन बोटे लांब असलेली दाढी. **–पैजामः** (پيجامه –) पु. ('अ.+हिं.) घोटयांच्यावर असलेला पायजमा.

शरतैन (شرطین) स्त्री. ('अ.) अश्विनी (नक्षत्र).

शरफ़ (شرف) पु. ('अ.) (१) श्रेष्ठता; उत्तमता. (२) सन्मान; सत्कार. (३) प्रतिष्ठा; कुलीनता. (४) उत्तुंगता. (५) मोठा हुद्दा. (६) भाग्य. **–याब** (یاب –) वि. ('अ.+फ़ा.) (१) प्रतिष्ठित. (२) भाग्यवान. (३) यशस्वी.

शरर (شرر) पु. ('अ.) ठिणगी; स्फुल्लिंग. **–अंगेज़** (انگیز –); **–अफ़शाँ** (افشاں –); **–फ़िशाँ** (فشاں –) वि. ('अ.+फ़ा.) (१) ठिणग्या उडविणारा. (२) उपद्रव देणारा; भांडण, दंगा करविणारा. **–बार** (بار –) वि. ('अ.+फ़ा.) अग्निवर्षाव करणारा.

शरह् (شرح) स्त्री. ('अ.) (१) टीका; विस्तार; व्याख्या; स्पष्टता. (२) दर; भाव. **–नवीस** (نویس –) वि. ('अ.+फ़ा.) टीकाकार; भाष्यकार. **–बंदी** (بندی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) किंमत ठरवून देणे. (२) किमतीची सूची. **–वार** (وار –) वि. ('अ.+फ़ा.) तपशीलवार.

शरह्-ए-म'आनी (شرح معانی) स्त्री. ('अ.) अवघड शब्दांचा अर्थ.

शरह्-ए-सूद (شرح سود) स्त्री. ('अ.+फ़ा.) व्याजाचा दर.

शरह्-ओ-बस्त (شرح و بست) स्त्री. ('अ. + फ़ा.) विस्तार; व्याख्या; स्पष्टीकरण.

शरह्ः (شرحہ) पु. ('अ.) तुकडा; खंड.

शरॉं (شریں) स्त्री. ('अ.) पित्त उठणे (अंगावर).

शरा'इत् (شرائط) पु. ['अ. 'शर्त' (शर्त) चे अनेक.] (१) अटी. (२) प्रतिज्ञा.

शरा'ए'अ (شرائع) पु. ['अ. 'शरी'अत' (شریعت) चे अनेक.] धर्मशास्त्रे.

शराकत (شراکت) स्त्री. ('अ.) (१) भागीदार. (२) सहभागीपणा; सहकार्य. **–नामः** (نامہ –) पु. ('अ.) भागीदारीच्या अटी लिहिलेला कागद.

शराफ़त (شرافت) स्त्री. ('अ.) भलेपणा; सज्जनता; सौजन्य; माणुसकी.

शराब (شراب) स्त्री. ('अ.) मदिरा; मद्य. **–कश** (کش –) वि. ('अ. + फ़ा.) मद्यपान करणारा. **–खानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) दारूचा गुत्ता. **–ख़ोर** (خور –); **–ख़्वार** (خوار –) वि. ('अ.+फ़ा.) दारुडघा; मद्यपी. **–ख़ोरी** (خوری –); **–ख़्वारी** (خواری –) स्त्री. ('अ.+फ़ा.) मद्यपान; दारूचे व्यसन.

शराब-ए-'असल (شراب عسل) स्त्री. ('अ.) मधाची दारू.

शराब-ए-अर्ग़वानी (شراب ارغوانی) स्त्री. ('अ. + फ़ा.) लाल रंगाची मदिरा.

शराब-ए-ख़ानःख़राब (شراب خانہ خراب) स्त्री. ('अ. + फ़ा.) घर उजाड करणारी दारू.

शराब-ए-ख़ानःसाज़ (شراب خانہ ساز) स्त्री. ('अ. + फ़ा.) घरात बनविलेली दारू.

शराब-ए-तहूर (شراب طہور) स्त्री. ('अ.) स्वर्गात मिळणारी मदिरा.

शराब्-ए-दुआतिशः (شراب دو آتشہ) स्त्री. ('अ.+फ़ा.) दोनदा गाळलेली दारू; कडक मद्य.

शराब-ए-दोशीनः (شراب دو شینہ) स्त्री. ('अ.+फ़ा.) रात्रीची उरलेली दारू.

शराब-ए-मुक़त्तर (شراب مقطر) स्त्री. ('अ.) थेंब-थेंब गाळलेली दारू; उत्कृष्ट मद्य.

शराबी (شرابی) वि. ('अ.) दारुबाज; दारुडघा.

शरार (شرار) पु. ('अ.) ठिणगी. पाहा 'शरर'.

शरारत (شرارت) स्त्री. ('अ.) (१) दुष्टपणा; नीचपणा. (२) दंगा; दांडगाई. (३) खटघाळपणा; हुडपणा. (४) चिडविण्यासाठी केलेले कृत्य. **–आमेज़** (آمیز –) वि. ('अ.+फ़ा.) (१) दुष्टतापूर्ण. (२) खटघाळ; खोडकर.

शरारतन् (شرارتاً) अव्य. ('अ.) (१) दुष्टपणाने. (२) खटघाळपणाने.

शरारती (شرارتی) वि. ('अ.+हिं.) (१) दुष्ट; पाजी. (२) खटघाळ; खोडकर (बा.).

शरारः (شرارہ) पु. ('अ.) ठिणगी. पाहा 'शरर'.

शरी'अत (شریعت) स्त्री. ('अ.) (१) धर्मशास्त्र. (२) मुस्लिम धर्मशास्त्र, कायदा. (३) ईश्वरी मार्ग. (४) राजमार्ग.

शरीक (شریک) वि. ('अ.) सम्मिलित; सामील; सहभागी. (पु.) (१) पातीदार; भागीदार. (२) मित्र; मदतगार. (३) सहकारी. **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) भागीदार; साथीदार.

शरीक-ए-ग़ालिब (شریک غالب) वि. ('अ.+फ़ा.) भागीदारांमध्ये सर्वांत मोठा वाटा असणारा.

शरीक-ए-जुर्म (شریک جرم) वि. ('अ.) गुन्ह्यातील भागीदार; गुन्ह्यास मदत करणारा.

शरीक-ए-राय (شریک رائے) वि. ('अ.) सहमत.

शरीक-ए-हयात (شریک حیات) वि. ('अ.) (१) जीवनसाथी; पती. (२) जीवनसंगिनी; पत्नी.

शरीक-ए-हाल (شریک حال) वि. ('अ.) सुखदुःखात बरोबर राहाणारा; मित्र.

शरीफ़ (شریف) वि. ('अ.) (१) कुलीन; खानदानी; सभ्य; सज्जन; शिष्टाचारयुक्त. (२) निष्कपट; सरळ. (३) पवित्र. [उदा. 'मक्कःशरीफ़' (مکہ شریف)

पवित्र मक्का.] **–ज़ादः** (۴زاد –) पु. ('अ.+फ़ा.) उच्च कुळातील मुलगा; आर्यपुत्र. **–तब्'अ** (طبع –) वि. ('अ.) स्वभावतः संज्जन व सुसभ्य.

शरीफ़ः (شریفہ) स्त्री. ('अ.) कुलीन स्त्री; सभ्य स्त्री. (पु.) सीताफळ.

शरीर (شریر) वि. ('अ.) (१) खटघाळ; खोडकर. (२) दुष्ट; बदमाष; भांडण लावून देणारा; दंगा करविणारा.

शर्क़ (شرق) पु. ('अ.) पूर्व (दिशा).

शर्क़-ओ-ग़र्ब (شرق و غرب) पु. ('अ.) पूर्व व पश्चिम; सारे जग.

शर्क़ी (شرقی) वि. ('अ.) पूर्वेचा; पौर्वात्य.

शर्ज़ः (۴زرہ) वि. (फ़ा.) (१) क्रुद्ध; रागीट. (२) सामर्थ्यवान; जोरदार. (३) वाघासारखा डरकाळघा फोडणारा; भयंकर.

शर्त (شرط) स्त्री. ('अ.) (१) करार; पण; प्रतिज्ञा. (२) अट; शर्त. (३) जुगार; पैज. (४) खूण; चिन्ह. (५) अनिवार्य, अपरिहार्य गोष्ट.

शर्तिय्यः (شرطیہ) वि. ('अ.) खात्रीचा; निश्चित; रामबाण. (अव्य.) खात्रीपूर्वक.

शर्ती (شرطی) वि. ('अ.) (१) अट, पैज असलेला. (२) निश्चित; नक्की.

शर्बत (شربت) स्त्री. ('अ.) सरबत; पाणी व साखर घालून तयार केलेले पेय.

शर्बत-ए-मर्ग (شربت مرگ) पु. ('अ. + फ़ा.) मृत्यू; मरण; निधन.

शर्बती (شربتی) वि. ('अ.) (१) फिकट गुलाबी किंवा फिकट पिवळा (रंग). (२) रसदार (लिंबू). (पु.) एक प्रकारची मलमल.

शर्म (شرم) स्त्री. (फ़ा.) (१) लाज; शरम. (२) संकोच; भीड. (३) अब्रू; प्रतिष्ठा. **–गाह** (۴گہ –) स्त्री. (फ़ा.) गुह्येंद्रिय; लिंग; भग; योनी. **–गीं** (گیں –) वि. (फ़ा.) लज्जित; शरमिंदा. **–नाक** (ناک –) वि. (फ़ा.) लज्जास्पद. **–सार** (سار –) वि. (फ़ा.) (१) लज्जित; शरमिंदा. (२) लाजाळू. (३) पश्चात्ताप. **–सारी** (ساری –) स्त्री. (फ़ा.) (१) लज्जा. (२) पश्चात्ताप.

शर्म-ए-हुज़ूरी (شرم حضوری) स्त्री. (फ़ा. + 'अ.) समोर जवळ येण्याची लाज; संकोच.

शर्म-ओ-हया (شرم و حیا) स्त्री. (फ़ा. + 'अ.) लाजलज्जा; संकोच.

शर्माना (شرمانا) क्रि. (फ़ा. + हिं.) (१) लाजणे. (२) लाजविणे.

शर्मिन्दगी (شرمندگی) स्त्री. (फ़ा.) (१) लज्जा; शरम. (२) पश्चात्ताप. (३) लाजाळूपणा.

शर्मिन्दः (۴شرمندہ) वि. (फ़ा.) लाजलेला; लज्जित; ओशाळलेला; शरमिंदा.

शर्मीला (شرمیلا) वि. (फ़ा.+हिं.) लाजाळू; लाजणारा.

शलंग (شلنگ) स्त्री. (फ़ा.) लांब उडी; उड्डाण.

शल (شل) वि. ('अ.) (१) थकलेला; शिथिल. (२) सुस्त; आळशी. (३) अपंग; ज्याचे हातपाय सुन्न झालेले आहेत असा.

शलग़म (شلغم) पु. (फ़ा.) **शलजम** (شلجم) पु. ('अ.) नवलकोल (भाजी); सलगम.

शलताक़ (شلتاق) पु. (तु.) (१) युद्ध; लढाई. (२) कलह; भांडण.

शलतूक (شلتوک) पु. (फ़ा.) साळ; भात.

शलवार (شلوار) स्त्री. (फ़ा.) (१) एक प्रकारचा पेशावरी पायजमा (सैल). (२) विजारीच्या आत नेसण्याची चड्डी.

शल्फ़ (شلف) स्त्री. (फ़ा.) व्यभिचारीणी; कुलटा.

शल्ल (شل) वि. ('अ.) (१) शिथिल; सुस्त. (२) सुन्न; निर्जीव.

शल्लक (شلک) स्त्री. (तु.) बंदुकांची किंवा तोफांची सलामी, सरबत्ती.

शल्लाक़ (شلاق) पु. (तु.) (१) थप्पड, ठोसा मारणे; छडीने किंवा चाबकाने मारणे. (२) नखरेल. (३) आगलाव्या.

शवाहिद (شواهد) पु. ['अ. 'शाहिद' (شاهد) चे अनेक.] (१) साक्षीदार. (२) पुरावे.

शव्वाल (شوال) पु. ('अ.) अरबी वर्षांचा दहावा महिना.

शश (شش) वि. (फ़ा.) सहा; षट् (६). **–जिहत** (جہت –) स्त्री. (फ़ा.+'अ.) सहाही दिशा (पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर, उर्ध्व, अधर); सारे विश्व. **–दर** (در –) पु. (फ़ा.) (१) जग; विश्व. (२) जेथून सुटका होणे कठीण आहे असे स्थान. (वि.) चकित; थक्क. **–दरः** (۴درہ –) वि. पु. (फ़ा.) (१) सहा दरवाजांची इमारत. (२) मरण-स्थान. (३) थक्क होणे. **–दांग** (دانگ –) स्त्री. (फ़ा.) पाहा 'शशजिहत'. **–पहलू** (پہلو –) वि. (फ़ा.) षट्कोण; षट्कोणी. **–पा** (پا –) वि. (फ़ा.) षट् पद; सहा पायांचा. **–पायः** (پایہ –) वि. (फ़ा.) सहा खांब असलेली इमारत. **–माहः** (ماہہ –) वि. (फ़ा.) सहा महिन्यांचा. **–माही** (ماہی –) वि. (फ़ा.) सहामाही; षण्मासिक. **–रोज़** (روز –) पु. (फ़ा.) ईश्वराने जेव्हा सृष्टी निर्माण केली तेव्हाचे सहा दिवस. **–रोज़ः** (۴روزہ –) वि. (फ़ा.) सहा दिवसांचा. (पु.) जग; सृष्टी. **–सरी** (سری –) पु. (फ़ा.) बावनकशी, शुद्ध सोने.

शश-ओ-पंज (شش و پنج) पु. (फ़ा.) (१) गोंधळ (मानसिक); घोटाळा; अनिश्चय; बुचकळा. (२) शंका. (३) आश्चर्य.

शशुम (ششم) वि. (फ़ा.) सहावा; षष्ठ.

शशः (ششم) पु. (फ़ा.) शब्बाल महिन्यातील पहिले सहा दिवस. या दिवसांत उपवास केले जातात.

शस्त (شست) वि. (फ़ा.) साठ (६०). (पु.) (१) शल्य; वस्तरा. (२) मासे पकडण्याचा गळ. (३) जानवे; यज्ञोपवीत. (४) सतार वाजविण्याची तारेची अंगठी; नखी. (५) अंगठा. (स्त्री.) (१) लक्ष्य; नेम. (२) शिपी व तिरंदाज बोटात घालतात ते टोपण. **–क** (–ک) पु. (फ़ा.) कातडी लिग, शिश्न. (याच्या साह्याने स्त्रिया अथवा गुदामैथुन करविणारे पुरुष आपली इच्छा तृप्त करून घेतात). **–गीर** (–گیر) वि. (फ़ा.) धनुर्धर; तिरंदाज.

शस्त (شصت) वि. (फ़ा.) साठ (६०).

शस्तुम (شصتم) वि. (फ़ा.) साठावा.

शहंशाह (شہنشاہ) पु. (फ़ा.) राजाधिराज; सम्राट.

शहंशाही (شہنشاهی) स्त्री. (फ़ा.) साम्राज्य.

शह (شہ) पु. [फ़ा. 'शाह' (شاہ) चे संक्षिप्त.] (१) बादशहा. (२) नवरा मुलगा; वर. (स्त्री.) (१) बुद्धिबळातील शह. (२) उत्तेजन देणे; भडकविणे. (३) साह्य; मदत. (वि.) मोठा; श्रेष्ठ. **–ज़ादः** (–زادہ) पु. (फ़ा.) राजकुमार; राजपुत्र; युवराज. **–ज़ोर** (–زور) वि. (फ़ा.) बलवान; शिरजोर. **–तीर** (–تیر) पु. (फ़ा.) तुळई. **–तूत** (–توت) पु. (फ़ा.) तुतीचे झाड किंवा फळ. **–नाज़** (–ناز) स्त्री. (फ़ा.) नवरी; वधू. **–पर** (–پر) पु. (फ़ा.) ज्यांच्या साह्याने पक्षी उडतो ते सर्वांत मोठे पंख. **–बाज़** (–باز) पु. (फ़ा.) मोठा बहिरीससाणा. **–बाला** (–بالا) पु. (फ़ा.) लग्नात नवऱ्या मुलाबरोबर असणारा लहान मुलगा. **–मात** (–مات) स्त्री. (फ़ा.) बुद्धिबळातील मात. **–मात करना** (–مات کرنا) मान्य करावयास लावणे; तोंड बंद करणे. **–रग** (–رگ) स्त्री. (फ़ा.) शरीरातील मुख्य रक्तवाहिनी. **–सवार** (–سوار) वि. (फ़ा.) घोडघावर बसण्यात पटाईत.

शहद (شہد) पु. (फ़ा.) मध.

शहना'ई (شہنائی) स्त्री. (फ़ा.) सनई (वाद्य).

शहबरः (شہبرہ) स्त्री. (फ़ा.) म्हातारी; वृद्ध स्त्री.

शहम (شحم) स्त्री. ('अ.) (१) चरबी. (२) लठ्ठपणा.

शहमः (شحم) पु. ('अ.) (१) थोडीशी चरबी. (२) कानातील मळ.

शहर (شہر) पु. (फ़ा.) नगर; शहर. **–ग़रीब** (–غریب) वि. (फ़ा.+'अ.) प्रवासी; नवखा; अपरिचित. **–गर्द** (–گرد) पु. (फ़ा.) शहरात फिरून पहारा करणारा; गरज घालवणारा. **–ताश** (–تاش) वि. (फ़ा.+तु.) एका शहरात राहाणारे. **–पनाह** (–پناہ) स्त्री. (फ़ा.) शहराभोवतालचा तट; कोट. **–बंद** (–بند) पु. (फ़ा.) (१) दुर्ग; किल्ला. (२) तट. (३) तुरुंग; स्थानबद्धता. **–बदर** (–بدر) वि. (फ़ा.) शहरातून हाकलून लावलेला; हद्दपार केलेला; तडीपार. **–यार** (–یار) पु. (फ़ा.) (१) आपल्या काळचा सर्वांत मोठा बादशहा. (२) नागरिकांचा मित्र व संरक्षक.

शहर (شہر) पु. ('अ.) (१) महिना. (२) चंद्र. (३) अभिव्यक्ती; प्रकटन.

शहर-ए-ख़मोशां (شہر خموشاں) पु. (फ़ा.) कबरस्तान; स्मशान.

शहर-ए-ग़रीबां (شہر غریباں) पु. (फ़ा.) अपरिचित, नवख्या लोकांचे शहर.

शहरवा (شہروا) पु. (फ़ा.) एखाद्या विशिष्ट शहरात चालणारे नाणे; खोटे नाणे.

शहरियत (شہریت) स्त्री. (फ़ा.) (१) नागरिकत्व. (२) सभ्यता; सुसंस्कृतपणा.

शहरी (شہری) वि. (फ़ा.) (१) शहराशी संबंधित. (२) नागरिक; शहरात राहाणारा.

शहला (شہلا) स्त्री. ('अ.) (१) काळेभोर डोळे असलेली स्त्री. (२) ज्यात पिवळघाऐवजी काळा भाग आहे असे नर्गिसचे फूल.

शहलः (شہلہ) स्त्री. ('अ.) म्हातारी; वृद्धा.

शहवत (شہوت) स्त्री. ('अ.) (१) कामवासना; कामातुरता. (२) अभिलाषा. (३) भूक. **–अंगेज़** (–انگیز) वि. ('अ. + फ़ा.) कामोद्दीपक. **–कुशी** (–کشی) स्त्री. ('अ. + फ़ा.) इंद्रियदमन. **–परस्त** (–پرست); **–रां** (–راں) वि. ('अ.+फ़ा.) लंपट; कामुक; व्यभिचारी. [अनेक 'शहवात' (شہوات)].

शहवानी (شہوانی); **शहवी** (شہوی) वि. ('अ.) वासनाविषयक; कामवासनेशी संबंधित.

शहा (شہا) अव्य. (फ़ा.) हे राजा! (शाहचे संबोधन).

शहादत (شہادت) स्त्री. ('अ.) (१) साक्ष; पुरावा. (२) हौतात्म्य; बलिदान. **–गाह** (–گاہ) स्त्री. ('अ.+फ़ा.) बलिवेदी; बलिदानाचे स्थान. **–नामः** (–نامہ) पु. ('अ.+फ़ा.) (१) प्रमाणपत्र; सनद. (२) एखाद्याच्या (विशेषतः हजरत इमाम हुसैन यांच्या) बलिदानाचे वर्णन असलेले काव्य किंवा ग्रंथ.

शहानः (شہانہ) वि. ('अ.+फ़ा.) राजासारखा; भव्य; रुबाबदार. (पु.) (हि.) (१) एक राग; शहाणा. (२) लग्नात घालावयाच्या लाल रंगाच्या बांगड्या. (३) लाल रंगाचा वराचा पोषाख.

शहाब (شهاب) पु. (फ़ा.) (१) लाल रंग. (२) कुत्र्याचे पिल्लू.

शहाबी (شهابی) वि. (फ़ा.) लालभडक; तांबडा. (स्त्री.) लाल रंगाची आतषबाजी.

शहामत (شهامت) स्त्री. ('अ.) (१) श्रेष्ठत्व; मोठेपणा. (२) शौर्य; बहादुरी. (३) खुशी.

शही (شهی) स्त्री. [फ़ा. 'शाही' (شاهی) चे संक्षिप्त.] साम्राज्य; बादशाही. (वि.) राजासारखा.

शहीद (شهید) वि. ('अ.) (१) धर्मयुद्धात मारला जाणारा; हुतात्मा. (२) ईश्वर; सर्वज्ञ. (३) साक्षीदार.

शहीद-ए-अ'अज़म (شهید اعظم) पु. ('अ.) सर्वांत मोठा हुतात्मा; हजरत इमाम हुसैन.

शहीम (شحیم) वि. ('अ.) लठ्ठ; स्थूल; ज्याच्या शरीरात खूप चरबी आहे असा.

शहीर (شهیر) वि. ('अ.) प्रसिद्ध; प्रख्यात.

शहीह् (شحیح) वि. ('अ.) कृपण; कंजूष.

शहुन (شحون) वि. ('अ.) (१) शक्तिशाली; सामर्थ्यवान. (२) पूज्य; श्रेष्ठ; थोर.

शा'इक़ (شائق) वि. ('अ.) (१) इच्छुक; अभिलाषी. (२) घोकीन; व्यसनी. (३) उत्कंठित. [अनेक 'शा'इक़ीन' (شائقین)].

शा'इबः (شائبہ) पु. ('अ.) (१) लवलेश. (२) मिश्रण; भेसळ. (वि.) किंचित; थोडा.

शा'इर (شاعر) पु. ('अ.) कवी; शाहीर.

शा'इरानः (شاعرانہ) वि. ('अ.+फ़ा.) कवीसारखा.

शा'इरी (شاعری) स्त्री. ('अ.) कविता; काव्यरचना.

शा'इरः (شاعرہ) स्त्री. ('अ.) कवयित्री.

शा'इस्तगी (شائستگی) स्त्री. (फ़ा.) (१) सौजन्य; शिष्टाचार; सभ्यता; संस्कृती. (२) माणुसकी. (३) योग्यता; पात्रता. (४) सफाई. (५) उत्तमता.

शा'इस्तः (شائستہ) वि. (फ़ा.) (१) शिष्ट; सभ्य; सुसंस्कृत. (२) योग्य; पात्र. (३) उत्तम; श्रेष्ठ; उमदा. **–'अमल** (عمل–) वि. (फ़ा.+'अ.) सदाचारी; सुसंस्कृत. **–कलाम** (کلام–) वि. (फ़ा.+'अ.) सभ्यपणे, सौजन्याने बोलणारा.

शा'ए'अ (شائع) वि. ('अ.) (१) प्रकट; जाहीर. (२) प्रकाशित. (३) प्रसारित. (४) छापलेला. **–कर्दः** (کردہ–) वि. ('अ.+फ़ा.) (१) प्रकाशित केलेला. (२) छापलेला. **–कुनिंदः** (کنندہ–) वि. ('अ.+फ़ा.) (१) प्रकाशक. (२) मुद्रक.

शा'एगाँ (شائگاں) वि. (फ़ा.) (१) उत्तम; उमदा. (२) विस्तृत; रुंद. (पु.) (१) 'पर्वेज' चा खजिना. (२) वेठ; बिगार.

शाक़ (شاق) वि. ('अ.) (१) असह्य. (२) कठीण; दुष्कर. (३) अप्रिय; नापसंत.

शाक (شاک) पु. ('अ.) सैनिक; शिपाई.

शाकिर (شاکر) वि. ('अ.) ईश्वराला धन्यवाद देणारा; आभारी; कृतज्ञ. [स्त्री. 'शाकिरः' (شاکرہ)].

शाकी (شاکی) वि. ('अ.) तक्रार करणारा; गाऱ्हाणे सांगणारा.

शाक़ूल (شاقول) स्त्री. ('अ.) गवंडघांचा ओळंबा; लंबक.

शाक़्क़ः (شاقہ) वि. ('अ.) अत्यंत अवघड; कडक; कठीण.

शाख (شاخ) स्त्री. (फ़ा.) (१) शाखा; फांदी; डहाळी. (२) शिंग; शृंग. (३) अडचण; अडथळा. (४) खंड; तुकडा. (५) मद्याचा प्याला किंवा सुरई. **–चः** (چہ–) पु. (फ़ा.) लहान फांदी; डहाळी. **–चः-बंदी** (چہ بندی–) स्त्री. (फ़ा.) (१) कलम लावणे. (२) आळ घेणे; आरोप करणे. **–दर शाख** (در شاخ–) वि. (फ़ा.) (१) फांद्या फुटलेला; दूरवर गेलेला. (२) गुंतागुंतीचा **–दार** (دار–) वि. (फ़ा.) (१) अनेक फांद्या असलेला. (२) शिंगे असलेला. (पु.) आपल्या बायकोला शरीरविक्रय करावयास लावून त्यावर पोट भरणारा. **–बदीवार** (بدیوار–) वि. (फ़ा.) मग्रूर; घमेंडखोर. **–शाख** (شاخ–) अव्य. (फ़ा.) तुकडे तुकडे. **–शानः** (شانہ–); **–सानः** (سانہ–) (पु.) (फ़ा.) (१) बेअब्रू; नालस्ती. (२) आळ. (३) अडथळा. (४) भांडण; वादविवाद; तक्रार. (५) बहाणा; ढोंग. **–सार** (سار–) पु. (फ़ा.) वन; जंगल.

शाख-ए-आहू (شاخ آہو) स्त्री. (फ़ा.) (१) हरणाचे शिंग. (२) धनुष्य. (३) खोटा वायदा.

शाख-ए-गुल (شاخ گل) स्त्री. (फ़ा.) (१) फुलांचो फांदी. (२) प्रेयसी.

शाख-ए-ज़'अफ़रान (شاخ زعفران) स्त्री. (फ़ा.+'अ.) विचित्र, अद्‌भुत वस्तू. (जाफ़रान म्हणजे केशर. याला फांदी नसते).

शाख-ए-दर्या (شاخ دریا) स्त्री. (फ़ा.) नदीचा फाटा; उपनदी.

शाख-ए-नबात (شاخ نبات) स्त्री. (फ़ा.) (१) खडीसाखर तयार करताना वापरल्या जाणाऱ्या बांबूच्या कामट्या. (२) एक प्रेमिका.

शाख-ए-सुस्त (شاخ سست) स्त्री. (फ़ा.) (१) जिच्यावर घरटे बांधले असता ती मोडण्याचे भय असते अशी कमजोर फांदी. (२) जग.

शाख-ओ-बुन (شاخ و بن) स्त्री. (फ़ा.) फांदी व मूळ; सर्व; संपूर्ण (वस्तू).

शाखाबः (شاخابہ) पु. (फ़ा.) खाडी.

शाख़िल (شاخل); **शाख़ुल** (شاخل) पु. ('अ.+फ़ा.) तूर (धान्य).

शाख़ः (شاخہ) पु. (फ़ा.) मानखोडा; गुन्हेगाराला शिक्षा करण्याचा खोडा.

शागिर्द (شاگرد) पु. (फ़ा.) (१) सेवक; नोकर. (२) विद्यार्थी; शिष्य; चेला. **–पेशः** (پیشہ –) पु. (फ़ा.) नोकरचाकर.

शागिर्द-ए-रशीद (شاگرد رشید) पु. (फ़ा.+'अ.) गुरूने ज्याला आपल्या जवळील सारे ज्ञान दिलेले आहे असा सुयोग्य विद्यार्थी. गुरूचा आवडता शिष्य.

शागिर्दी (شاگردی) स्त्री. (फ़ा.) (१) शिष्यत्व. (२) सेवा; नोकरी.

शाग़िल (شاغل) वि. ('अ.) व्यग्र; गुंतलेला; मशगूल झालेला.

शाज़ (شاذ) वि. ('अ.) (१) एकटा; एकाकी. (२) एकमेव; अद्वितीय; असाधारण.

शाज़-ओ-नादिर (شاذ و نادر) अव्य. ('अ.) कधीकधी; क्वचित; क्वचितच.

शात (شات) स्त्री. ('अ.) शेळी; बकरी.

शातिन (شاطن) वि. ('अ.) दुराचारी; व्यभिचारी.

शातिर (شاطر) वि. ('अ.) (१) धूर्त; चलाख; लबाड. (२) हुशार. (३) नखरेल. (४) चोर; लुच्चा. (५) बुद्धिबळपटू. (६) दूत.

शाती (شاطی) पु. ('अ.) (१) नदीचा किनारा; तट. (२) सपाट मैदान.

शातू (شاتو) पु. (तु.) शिडी; पायरी; जिना.

शाद (شاد) वि. (फ़ा.) (१) प्रसन्न; आनंदित. (२) भरलेला; परिपूर्ण. **–काम** (کام–) वि. (फ़ा.) (१) प्रसन्नचित्त. (२) सफलमनोरथ; यशस्वी. **–ख़्वार** (خوار–) वि. (फ़ा.) (१) खूप दारू पिणारा. (२) सुखवस्तू. **–गूनः** (گونہ–) स्त्री. (फ़ा.) (१) गादी. (२) कलावंतीण; गायिका. **–बहर** (بہر–) वि. (फ़ा.) (१) भाग्यवान. (२) समृद्ध; सुखवस्तू. **–बाद** (باد –); **–बाश** (باش–) वा. (फ़ा.) सुखी राहा; आनंदी राहा. (अव्य.) शाबास! वाहवा! **–मां** (ماں –) वि. (फ़ा.) प्रसन्न; आनंदित. **–मानी** (مانی –) स्त्री. (फ़ा.) प्रसन्नता; हर्ष; खुषी.

शादां (شاداں) वि. (फ़ा.) आनंदित; प्रफुल्ल.

शादाब (شاداب) वि. (फ़ा.) हिरवागार; ताजा; प्रफुल्ल.

शादिन (شادن) पु. (फ़ा.) हरणाचे पाडस; मृगशावक.

शादियानः (شادیانہ) पु. (फ़ा.) (१) अभिनंदन. (२) आनंदोत्सवाच्या वेळी गायिली जाणारी गीते; मंगलवाद्ये; शहाजणे. (३) जमीनदाराकडील लग्नाच्या वेळी जमीनदाराला कुळांनी द्यावयाचे पैसे; लग्नकर.

शादी (شادی) स्त्री. (फ़ा.) (१) हर्ष; आनंद. (२) लग्न; विवाह. (३) उत्सव; सण. **–ए-मर्ग** (مرگ–) वि. (फ़ा.) आनंदातिशयाने मरणारा. (स्त्री.) आनंदातिशयाने येणारा मृत्यू.

शादुर्वान (شادروان) पु. (फ़ा.) (१) शामियाना. (२) पडदा. (३) छत.

शान (شان) स्त्री. ('अ.) (१) वैभव; थाटमाट; सजावट. (२) तोरा; ऐट; रुबाब. (३) भव्यता. (४) सामर्थ्य. (५) अब्रू; प्रतिष्ठा. (६) तेज; प्रताप. (७) श्रेष्ठत्व; विभूतिमत्व. **–दार** (دار –) वि. ('अ.+फ़ा.) भव्य; रुबाबदार; छान; थाटाचा.

शान (شان) पु. (फ़ा.) मधाचे पोळे.

शान-ए-ख़त् (شان خط) स्त्री. ('अ.) अक्षराचे वळण; लिहिण्याची शैली.

शान-ए-नुज़ूल (شان نزول) स्त्री. ('अ.) कुराणातील किंवा एखाद्या अपौरुषेय ग्रंथातील एखादे सुभाषित किंवा मंत्र कोणत्या परिस्थितीत अवतरला त्याचे कारण; आकाशवाणीचे कारण.

शान-ओ-शौकत (شان و شوکت) स्त्री. ('अ.) थाटमाट; वैभव; रुबाब.

शानी (شانی) वि. ('अ.) शत्रू; वैरी.

शानः (شانہ) पु. (फ़ा.) (१) खांदा. (२) फणी; विणकरांची फणी. **–गर्दानी** (گردانی–) स्त्री. (फ़ा.) उपेक्षा; दुर्लक्ष. **–बशानः** (بشانہ–) अव्य. (फ़ा.) खांद्याला खांदा भिडवून; एकत्र मिळून. **–बीं** (بیں–) वि. (फ़ा.) शकुन पाहाणारा.

शाफ़ि'अ (شافع) वि. ('अ.) शिफारस करणारा; ईश्वराजवळ शिफारस करून मोक्ष देवविणारा.

शाफ़ि'ई (شافعی) पु. ('अ.) सुन्नी संप्रदायाच्या चार इमामांपैकी एक, इमाम शाफ़िई. (वि.) इमाम शाफ़िई यांचे अनुयायी (मुसलमान).

शाफ़ी (شافی) वि. ('अ.) (१) रोगमुक्त करणारा; बरे करणारा. (२) सांत्वन करणारा.

शाफ़ी-ए-मुत्लक़ (شافی مطلق) पु. ('अ.) पूर्ण रोगमुक्त करणारा; ईश्वर.

शाफ़ः (شافہ) पु. ('अ.) (१) औषधात भिजविलेला कापसाचा बोळा किंवा कापडाची वात्ती. (ही जखमेत किंवा गुदद्वारात ठेवली जाते). (२) एनिमा.

शाब (شاب) वि. पु. ('अ.) युवक; तरुण.

शाबाश (شاباش) अव्य. [फ़ा. 'शादबाश' (شادباش) चे संक्षिप्त.] शाबास! वाहवा! छान!

शाबाशी (شاباشی) स्त्री. (फ़ा. + हिं.) शाबासकी; प्रशंसा.

शाम (شام) पु. ('अ.) सीरीया (देश).

शाम (شام) स्त्री. (फ़ा.) सायंकाळ; संध्याकाळ. **–गाह** (–گاہ) स्त्री. (फ़ा.) सायंकाळ.

शाम-ए-ग़रीबाँ (شام غریباں) स्त्री. ('अ.+फ़ा.) परदेशातील संध्याकाळ; उदास संध्याकाळ; संकटांनी भरलेली सायंकाळ.

शामत (شامت) स्त्री. ('अ.) (१) अहित; अकल्याण. (२) दुर्भाग्य. (३) दुर्दशा.

शामत-ए-अ'अमाल (شامت اعمال) स्त्री. ('अ.) वाईट कर्माचे फळ; पापाचे प्रायश्चित्त; वाईट दिवस.

शामियानः (شامیانہ) पु. (फ़ा.) (१) छत; चांदवा. (२) मोठा तंबू.

शामिल (شامل) वि. ('अ.) (१) सामील; सम्मिलित. (२) एकत्रित. (३) अंतर्गत. (४) संयुक्त. (५) भागीदार; वाटेकरी. (६) सहकारी; मदतनीस.

शामिल-ए-हाल (شامل حال) वि. ('अ.) सुखदुःखात सहभागी झालेला.

शामी (شامی) वि. ('अ.) सीरीयाचा रहिवासी. **–कबाब** (–کباب) पु. ('अ.) मसाला घालून उकडलेले मांस वाटून त्याच्या चकत्या करतात व त्या तळतात. याला शामी कबाब म्हणतात. (सीरीयातील पदार्थ).

शाम्मः (شامہ) स्त्री. ('अ.) घ्राणशक्ती.

शायद (شاید) अव्य. (फ़ा.) कदाचित; बहुतेक.

शायद-ओ-बायद (شاید و باید) वि. (फ़ा.) अद्‌भुत; अनुपम; विचित्र.

शायाँ (شایاں); **शायान** (شایان) वि. (फ़ा.) उचित; योग्य; उपयुक्त; लायक.

शायान-ए-शान (شایان شان) अव्य. (फ़ा. + 'अ.) एखाद्याच्या योग्यतेस अनुरूप.

शार (شار) स्त्री. (फ़ा.) (१) शहर; नगर. (२) वस्ती. (३) उंच इमारत. (४) साडी.

शारक़ (شارک) स्त्री. (फ़ा.) मैना; सारिका.

शारमार (شارمار) पु. (फ़ा.) अजगर; मोठा साप.

शारि'अ (شارع) पु. ('अ.) (१) इस्लामी धर्मशास्त्र रचणारा; हजरत मुहम्मद पैगंबर. (२) धर्मशास्त्रज्ञ. (३) मोठी सडक; राजमार्ग. (वि.) (१) सुरू करणारा. (२) कायदे बनविणारा.

शारिक़ (شارق) वि. ('अ.) पळणारा. (पु.) सूर्य.

शारिब (شارب) वि. ('अ.) पिणारा.

शारिह़ (شارح) वि. ('अ.) टीकाकार; भाष्यकार.

शाल (شال) स्त्री. (फ़ा.) लोकरीची किंवा रेशमी चादर; शाल. **–दोज़** (–دوز); **–बाफ़** (–باف) वि. (फ़ा.) शाल विणणारा.

शाली (شالی) पु. (फ़ा.) साळ; भात.

शाश (شاش) पु. (फ़ा.) मूत्र; लघ्वी.

शाहंशाह (شاہنشہ); **शाहंशाह** (شاہنشاہ) पु. (फ़ा.) सम्राट; चक्रवर्ती.

शाह (شاہ) पु. (फ़ा.) (१) बादशहा; सम्राट. (२) साधू; महात्मा. (३) बुद्धिबळातील राजा. (वि.) श्रेष्ठ; उत्कृष्ट. **–कार** (–کار) पु. (फ़ा.) उत्कृष्ट कृती. **–ज़ादगी** (–زادگی) स्त्री. (फ़ा.) युवराजत्व. **–ज़ादी** (–زادی) स्त्री. (फ़ा.) राजकन्या. **–ज़ादः** (–زادہ) पु. (फ़ा.) युवराज; राजकुमार. **–दरः** (–درہ) पु. (फ़ा.) राजमार्ग; राजमहालाच्या खालच्या बाजूस असलेली वस्ती. **–नशीं** (–نشیں) स्त्री. (फ़ा.) बसण्याची उंच जागा. **नामः** (पु.) एखाद्या देशाच्या राज्याचे वर्णन (इतिहास) असलेले महाकाव्य. **–पर** (–پر) पु. (फ़ा.) ज्यांच्या साह्याने पक्षी उडतो ते मोठे पंख. **–बल्लूत़** (–بلوط) पु. (फ़ा.) अक्रोडाचे किंवा ओकचे झाड. (ख्रिश्चन लोक याला पवित्र मानतात.) **–बाज़** (–باز) पु. (फ़ा.) मोठ्या जातीचा बहिरी-ससाणा. (वि.) शूर; वीर. **–रग** (–رگ) स्त्री. (फ़ा.) शरीरातील सर्वांत मोठी व मुख्य रक्तवाहिनी. **–राह** (–راہ) स्त्री. (फ़ा.) राजमार्ग. **–वार** (–وار) वि. (फ़ा.) राजाच्या योग्यतेचा; बहुमूल्य. **–सवार** (–سوار) वि. (फ़ा.) पटाईत घोडेस्वार.

शाह-ए-ख़ावर (شاہ خاور) पु.(फ़ा.) पूर्वेचा बादशहा; सूर्य.

शाह-ए-नजफ़ (شاہ نجف) पु. (फ़ा.+'अ.) हजरत अली.

शाह-ए-वक़्त (شاہ وقت) पु. (फ़ा. + 'अ.) वर्तमानकालीन राज्यकर्ता.

शाह-ए-हिजाज़ (شاہ حجاز) पु. (फ़ा.+'अ.) मक्का व मदीना यांचा शासक; हजरत मुहम्मद पैगंबर.

शाहानः (شاہانہ) वि. (फ़ा.) (१) राजेशाही. (२) बहुमूल्य. (३) थाटाचा.

शाहिक़ (شاهق) वि. ('अ.) उच्च; उत्तुंग; श्रेष्ठ. (पु.) प्रासाद; महाल.

शाहिद (شاهد) पु. ('अ.) साक्षीदार. (वि.) (फ़ा.) सुंदर; श्रेष्ठ. (स्त्री.) प्रेयसी; नायिका. **–परस्त** (–پرست); **–बाज़** (–باز) वि. (फ़ा.) (१) सुंदर स्त्रियांचा शौकीन; रंडीबाज. (२) सौंदर्योपासक.

शाहिद-ए-'आदिल (شاهد عادل) वि. ('अ.) खरा, सत्यनिष्ठ साक्षीदार.

शाहिद-ए-ग़ैब (شاهد غیب) वि. ('अ.) परोक्षाचा ज्ञाता; ईश्वर.

शाहिद-ए-बाज़ारी (شاهد بازاری) स्त्री. ('अ.+फ़ा.) बाजारबसवी; वेश्या.

शाहिद-ए-हाल (شاهد حال) वि. ('अ.) एखादी घटना प्रत्यक्ष पाहिलेला साक्षीदार.

शाहिदी (شاهدی) स्त्री. ('अ.) (१) सांक्ष; पुरावा. (२) तराजूची दांडी. (३) नायिका किंवा प्रेयसी असणे.

शाही (شاهی); **शाहीन** (شاهین) पु. (फ़ा.) (१) बहिरीससाणा. (२) तराजूची दांडी. **–बुरुद** (دزد –) पु. (फ़ा.) वजनाच्या वेळी दांडी मारणारा; कमीजास्त तोलणारा. **–बचः** (بچہ –) पु. (फ़ा.) (१) बहिरीससाण्याचे पिलू. (२) वीरपुत्र.

शाही (شاهی) वि. (फ़ा.) (१) राजेशाही; थाटाचा; भव्य. (२) सरकारी. (स्त्री.) सत्ता; राज्य; राष्ट्र.

शि'आर (شعار) पु. ('अ.) (१) स्वभाव; सवय. (२) आचरण; बागणूक. (३) पद्धती; नियम. (४) चिन्ह; खूण. (प्रत्य.) स्वभावाचा. [उदा. 'करम शि'आर' (کرم شعار) वि. ('अ.) दयाळू स्वभावाचा].

शिद (ژند) पु. (फ़ा.) पारशांचा धर्मग्रंथ; झिंदावेस्ता; अवेस्ता.

शिकंज (شکنج) स्त्री. (फ़ा.) (१) आठी. (२) सुरकुती. (३) चिमटा.

शिकंजः (شکنجہ) पु. (फ़ा.) (१) अपराध्याला शिक्षा देण्याचे यंत्र; खोडा. (२) कागद वगैरे दाबण्याचे व कापण्याचे यंत्र. (३) पिळून काढण्याचे यंत्र. (४) दुःख; यातना.

शिकंबः (شکنبہ) पु. (फ़ा.) लहान आतडे; पक्वाशय; कोठा.

शिक़ (شق) स्त्री. ('अ.) (१) तुकडा; हिस्सा; विभाग. (२) पक्ष; बाजू. (३) अडथळा. (४) प्रकार. **–दार** (دار –) पु. ('अ.+फ़ा.) एखाद्या विशिष्ट भागाचा अधिकारी.

शिकन (شکن) स्त्री. (फ़ा.) सुरकुती; आठी. **–दर शिकन** (درشکن –) वि. (फ़ा.) (१) गुंतागुंतीचा. (२) खूप सुरकुत्या पडलेला. (३) कुरळे (केस). (प्रत्य.) तोडणारा; फोडणारा. [उदा. 'बुत शिकन' (بت شکن) वि. (फ़ा.) मूर्तिभंजक].

शिकनी (شکنی) स्त्री. प्रत्य. (फ़ा.) तोडणे; फोडणे. [उदा. ''अहद शिकनी' (عہد شکنی) स्त्री. ('अ.+फ़ा.) प्रतिज्ञाभंग; करारभंग].

शिकम (شکم) पु. (फ़ा.) पोट; उदर; कोठा. **–परस्त** (پرست –); **–परवर** (پرور –); **–बंदः** (بندہ –) वि. (फ़ा.) पोटपूजक; पोटार्थी; स्वार्थी; खादाड. **–पुर** (پر –); **–सेर** (سیر –) वि. (फ़ा.) ज्याचे पोट भरले आहे असा; भोजनतृप्त.

शिकमी (شکمی) वि. (फ़ा.) (१) पोटाचा; पोटातील. (२) आंतरिक. (३) जन्मजात. **–काश्तकार** (کاشتکار –) पु. (फ़ा.) पोट खंडकरी; पोटकूळ.

शिकरः (شکرہ) पु. (फ़ा.) बहिरीससाणा.

शिकवः (شکوہ) पु. (फ़ा.) तक्रार; गाऱ्हाणे. **–गुज़ार** (گزار –); **–तराज़** (طراز –); **–पर्वर** (پرور –); **–संज** (سنج –) वि. ('अ.+फ़ा.) तक्रार करणारा; गाऱ्हाणे सांगणारा; दोष देणारा.

शिकस्त (شکست) स्त्री. (फ़ा.) (१) पराभव. (२) मोडतोड. **–कुनिंदः** (کنندہ –) वि. (फ़ा.) तोडणारा; भंजक. **–ख़ुर्दः** (خوردہ –) वि. (फ़ा.) (१) पराभूत. (२) मोडलेला. **–गी** (گی –) स्त्री. (फ़ा.) मोडतोड.

शिकस्त-ए-क़ीमत (شکست قیمت) स्त्री. (फ़ा.+'अ.) भाव उतरणे; किंमत कमी होणे.

शिकस्त-ए-फ़ाश (شکست فاش) स्त्री. (फ़ा.) उघड, स्पष्ट पराभव; अपमानास्पद पराभव.

शिकस्तः (شکستہ) वि. (फ़ा.) (१) मोडकातोडका; भग्न. (२) भरभर लिहिलेला. (उर्दू लिपीचे एक वळण). **–ख़ातिर** (خاطر –) वि. (फ़ा.+'अ.) भग्नहृदय. **–ज़बाँ** (زباں –) वि. (फ़ा.) तोतरा; बोबडा. **–पर** (پر –); **–बाल** (بال –) वि. (फ़ा.) ज्याचे पंख तुटले आहेत असा; असहाय. **–बाज़ू** (بازو –) वि. (फ़ा.) भग्नबाहू; निराधार; ज्याचा महत्त्वाचा सहकारी नाहीसा झाला आहे असा. **–हाल** (حال –) वि. (फ़ा.+'अ.) गांजलेला; दुर्दशाग्रस्त; दरिद्री.

शिक़ा (شقا) स्त्री. ('अ.) दुर्भाग्य; दुर्दैव.

शिक़ाक़ (شقاق) पु. ('अ.) शत्रुत्व; वैर.

शिकायत (شکایت) स्त्री. ('अ.) (१) तक्रार; गाऱ्हाणे. (२) निंदा; चहाडी. (३) रोग; आजार. (४) दुःख; त्रास. **–नामः** (نامہ –) पु. ('अ.+फ़ा.) तक्रारवही. [अनेक 'शिकायात' (شکایات)].

शिकार (شکار) पु. (फ़ा.) (१) शिकार; मृगया. (२) ज्याची शिकार करावयाची ते जनावर. (३) भक्ष्य; मांस. (४) जाळघात अडकलेली व्यक्ती. **–गाह** (گہ –) स्त्री. (फ़ा.) शिकारीची जागा. **–बंद** (بند –) पु. (फ़ा.) केलेली शिकार बांधून आणावयाची दोरी किंवा वादी.

शिकारी (شکاری) पु. (फ़ा.) शिकार करणारा; व्याध.

शिकाल (شکال) पु. (फ़ा.) (१) उद्दाम घोड्याच्या पायाला बांधावयाची दोरी. (२) फसवणूक. (३) व्यंग असलेला घोडा.

शिकेब (شکیب) पु. (फ़ा.) धीर; सहनशीलता; सहिष्णुता.

शिकेबा (شکیبا) वि. (फ़ा.) धैर्यवान; सहिष्णू.

शिकेबा'ई (شکیبائی) स्त्री. (फ़ा.) धीर; सहनशीलता.

शिकोह (شکوہ) पु. (फ़ा.) (१) भीती; भय. (२) रुबाब; थाट.

शिख़ार (شخار) स्त्री. (फ़ा.) कपडे धुण्याची खारी माती; सज्जीखार.

शिगाफ़ (شگاف) पु. (फ़ा.) (१) चीर; भेग; फट. (२) भोक; छिद्र. (३) ऑपरेशन. (प्रत्य.) छेद करणारा. [उंदा. 'खारा शिगाफ़' (خارا شگاف) वि. (फ़ा.) दगडाला छिद्र पाडणारा; पाषाणभेदी].

शिगाल (شگال) पु. (फ़ा.) कोल्हा; शृगाल.

शिगिफ़्त (شگفت) पु. (फ़ा.) आश्चर्य; अचंबा.

शिगुफ़्त (شگفت); **शिगुफ़्तगी** (شگفتگی) स्त्री. (फ़ा.) (१) प्रसन्नता. (२) विकसित; प्रफुल्लीत होणे.

शिगुफ़्तः (شگفتہ) वि. (फ़ा.) (१) उमललेला; विकसित. (२) प्रसन्न; प्रफुल्लीत. **–ख़ातिर** (خاطر –) वि. (फ़ा.+'अ.) प्रसन्नचित्त. **–पेशानी** (پیشانی –); **–रू** (رو –) वि. (फ़ा.) हसतमुख.

शिगूफ़ः (شگوفہ) पु. (फ़ा.) (१) कळी. (२) फूल. (३) नवी, विलक्षण गोष्ट. **–कारी** (کاری –); **–तराशी** (تراشی –) स्त्री. (फ़ा.) वेलबुट्टी, नक्षी काढणे.

शिजा'अ (شجاع) वि. ('अ.) वीर; शूर.

शिता (شتا) पु. ('अ.) हिवाळा; शरद ऋतू.

शिताब (شتاب) अव्य. (फ़ा.) लवकर; घाईने. (स्त्री.) जलदी; घाई. **–कार** (کار –) वि. (फ़ा.) घाई करणारा; उतावळा; चपळ.

शिताबाँ (شتاباں) वि. (फ़ा.) (१) घाई करीत असलेला. (२) धावत असलेला.

शिताबा (شتابا) पु. (फ़ा. + हिं.) शोभेच्या किंवा स्फोटक दारूत भिजवून वाळविलेला कागद (तोफ डागण्यासाठी याचा उपयोग केला जातो).

शिताबी (شتابی) स्त्री. (फ़ा.) शीघ्रता; घाई; जलदी.

शितालंग (شتالنگ) पु. (तु.) घोटा (पायाचा).

शिद्दत (شدت) स्त्री. ('अ.) (१) अधिकता; वैपुल्य. (२) तीव्रता; उग्रता. (३) कडकपणा; कठोरता. (४) जुलूम; हिंसा. **–पसंद** (پسند –) वि. ('अ.+फ़ा.) अतिरेकी.

शिना (شنا) स्त्री. (फ़ा.) पोहणे. **–वर** (ور –) वि. (फ़ा.) पोहणारा; जलतरणपटू.

शिफ़ा (شفا) स्त्री. ('अ.) रोगमुक्ती; आजारातून बरे होणे; आरोग्य. **–ख़ानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) (१) रुग्णालय; इस्पितळ. (२) दवाखाना.

शिबह (شبہ) वि. ('अ.) समान; तुल्य; सदृश.

शिब्क (شبک) पु. ('अ.) चरख्याचा तकुला.

शिब्ब (شب) स्त्री. ('अ.) तुरटी.

शिब्ल (شبل) पु. ('अ.) वाघाचा (सिंहाचा) छावा (शिकार करू शकणारा).

शिब्ली (شبلی) पु. ('अ.) (१) अबूबकर यांच्या वंशातील एक थोर महात्मा. (२) सर सयद समूहातील एक उर्दू व्यक्ती.

शिमाल (شمال) पु. ('अ.) उत्तर (दिशा).

शिमाली (شمالی) वि. ('अ.) उत्तरेकडील; उत्तरेचा.

शिमः (شمہ) स्त्री. (फ़ा.) साय; मलई.

शियाफ़ (شیاف) पु. ['अ. 'शाफ़ः' (شافہ) चे अनेक. परंतु वापर एकवचनी.] उगाळून डोळ्यांत घालण्याची एक गोळी.

शिरा (شرا) पु. ('अ.) (१) खरेदी. (२) विक्री.

शिरा'अ (شراع) पु. ('अ.) नावेचे शीड.

शिराक (شراک) पु. ('अ.) वहाणेची वादी; खडावाची पट्टी.

शिर्क (شرک) पु. ('अ.) ईश्वरत्वामध्ये ईश्वराखेरीज इतरांना सामील करणे; अनेक देव मानणे. (मुसलमानांच्या मते हे नास्तिकतेचे लक्षण आहे).

शिर्क-ए-ख़फ़ी (شرک خفی) पु. ('अ.) वरवर पाहाता अनेकेश्वरवाद न दिसणारा.

शिर्क-ए-जली (شرک جلی) पु. ('अ.) उघड उघड अनेकेश्वरवाद; मूर्तिपूजा.

शिर्कत (شرکت) स्त्री. ('अ.) (१) पाती; हिस्सा; वाटा; भाग. (२) सहभागी, सामील होणे; सहयोग.

शिर्यान (شریان) स्त्री. ('अ.) शुद्ध रक्तवाहिनी; नाडी; धमनी.

शिर्वान (شروان) पु. (फ़ा.) इराणातील एक शहर.

शिर्वानी (شروانی) वि. (फ़ा.) शिर्वानचा राहाणारा.

शिल्क (شلک) पु. (तु.) (१) विलायती तोफ. (२) बंदुकांचा भडिमार.

शिवा (شوا) वि. (फ़ा.) भाजलेला. (पु.) भाजलेले मांस.

शिह्नः (شحنہ) पु. ('अ.) शहराची देखरेख व पहारा करणारा; कोतवाल.

शिहाब (شہاب) पु. ('अ.) (१) तेजःपुंज तारा (२) उल्का; तुटणारा तारा. (३) अग्निज्वाला.

शी'अ (شیعی) वि. ('अ.) शिया संप्रदायाचा.

शी'अः (شیعہ) पु. ('अ.) शिया; हजरत अलीखेरीज इतर खलिफांना न मानणारा (मुसलमान).

शीदी (شیدی) वि. [फ़ा. 'शीद' (شید) सूर्यप्रकाश.] शिद्दी; हबशी.

शीमः (شیم) स्त्री. ('अ.) स्वभाव; प्रकृती; सवय.

शीर (شیر) पु. (फ़ा.) दूध; क्षीर; चीक (झाडांचा). **–अंदाज़** (انداز –) पु. (फ़ा.) दुग्धयुक्त स्तन. **–खानः** (خانہ –) पु. (फ़ा.) (१) दुग्धालय. (२) मदिरालय. **–खिश्त** (خشت –) स्त्री. (फ़ा.) एक प्रकारचा रेचक डिंक किंवा चीक. **–ख़ुर्मा** (خرما –) पु. (फ़ा.) दुधात भिजविलेल्या खारका. **–ख़ोर** (خور –); **–ख़्वार** (خوار –) वि. (फ़ा.) तान्हा; दूध पिणारे (मूल). **–गर्म** (گرم –) वि. (फ़ा.) कोमट. **–दान** (دان –) पु. (फ़ा.) (१) दुधाळ जनावराची कास. (२) दुग्धपात्र. **–बा** (با –); **–बिरंज** (برنج –) स्त्री. (फ़ा.) खीर; तांदुळाची खीर. **–मस्त** (مست –) वि. (फ़ा.) हसत खिदळत; खेळत असलेले मूल. **–माल** (مال –) स्त्री. (फ़ा.) पीठ भिजवून केलेली तुपातील पोळी, भाकरी किंवा पाव.

शीर-ए-मादर (شیر مادر) पु. (फ़ा.) आईचे दूध.

शीर-ए-मुर्ग़ (شیر مرغ) पु. (फ़ा.) पक्ष्याचे दूध; अश्यक्य, असंभाव्य गोष्ट.

शीर-ए-ल'आब (شیر لعاب) पु. (फ़ा.+'अ.) **शीर-ओ-शकर** (شیر و شکر) वि. (फ़ा.) घनिष्ठ; एकरूप; एकजीव झालेला.

शीरनी (شیرنی) स्त्री. (फ़ा. + हि.) मिठाई; साधु-संतांचा प्रसाद म्हणून वाटली जाणारी मिठाई.

शीराज़ (شیراز) पु. (फ़ा.) इराणचे प्रसिद्ध शहर. (सादी व सहाफिज या सुप्रसिद्ध कवींचे निवासस्थान).

शीराज़ः (شیرازہ) पु. (फ़ा.) (१) पुस्तकाची शिलाई; पुस्तकाच्या बांधणीनंतर दोन्ही बाजूंना उरणारा दोरा किंवा फीत बांधणी. (२) संघटन. **–बंदी** (بندی –) स्त्री. (फ़ा.) (१) पुस्तकाची बांधणी. (२) संघटन. **–बिखरना** (بکھرنا –) विघटन होणे; विस्कळित होणे; विसकटणे.

शीरीं (شیریں) वि. (फ़ा.) (१) मधुर; गोड. (२) मजेदार; स्वादिष्ट. (३) प्रिय; मनपसंत. (स्त्री.) फरहादची प्रेयसी; शीरीन. **–कलाम** (کلام –); **–मक़ाल** (مقال –) वि. (फ़ा.+'अ.) मधुरभाषी; गोड बोलणारा.

शीरीनी (شیرینی) स्त्री. (फ़ा.) माधुर्य; गोडी.

शीरः (شیرہ) पु. (फ़ा.) (१) पाक (साखरेचा वगैरे). (२) फळांचा रस. (३) अर्क.

शीश महल (شیش محل) पु. (फ़ा. + 'अ. + हि.) आरसेमहाल.

शीशाक (شیشاک) पु. (फ़ा.) एक वर्ष वयाचे कोकरू.

शीशी (شیشی) स्त्री. (फ़ा. + हि.) बाटली; कुपी. **–सुंघाना** (سنگھانا –) भूल (क्लोरोफॉर्म) देणे.

शीशः (شیشہ) पु. (फ़ा.) (१) काच; काचेचे सामान. (२) आरसा. (३) काचेची बाटली; काचेची सुरई. **–गर** (گر –) वि. (फ़ा.) काचेच्या वस्तू बनविणारा. **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) भित्रा; भ्याड. **–बाज़** (باز –) वि. (फ़ा.) (१) जादूगार. (२) लबाड; धूर्त. (३) डोंबारी.

शीशः-ए-दिल (شیشۂ دل) पु. (फ़ा.) काचेसारखे नाजुक हृदय.

शीशः-ए-सा'अत (شیشۂ ساعت) पु. (फ़ा.) वाळू भरलेले काचेचे घडघाळ.

शीस (شیث) पु. ('अ.) एक पैगंबर. (हजरत आदम यांचे तृतीय पुत्र).

शीहः (شیہہ) पु. (फ़ा.) घोडघाचे खिकाळणे.

शु'अरा (شعرا) पु. ['अ. 'शा'इर' (شاعر) चे अनेक.] कविगण.

शु'आ'अ (شعاع) स्त्री. ('अ.) (१) सूर्याचा किरण. (२) प्रकाश किरण; प्रकाश.

शु'ऊर (شعور) पु. ('अ.) (१) बुद्धी; विवेक; प्रज्ञा. (२) सद्सद्विवेक; तारतम्य. (३) सभ्यता; शिष्टाचार. (४) ढंग; पद्धती. (५) योग्यता; कुशलता.

शु'ऐब (شعیب) पु. ('अ.) एक पैगंबर. (मोझेस यांचे श्वशुर).

शुक़ूक़ (شقوق) पु. ['अ. 'शक़' (شق) चे अनेक.] (१) भेगा; फटी. (२) तळपायाला पडणाऱ्या भेगा; पाँय फुटणे.

शुकूक (شکوک) पु. ['अ. 'शक' (شک) चे अनेक.] शंका-कुशंका; संशय.

शुकोह (شکوہ) स्त्री. (फ़ा.) थाट; रुबाब; अवडंबर.

शुक़्क़ः (شقّہ) पु. ('अ.) (१) कागदाचा तुकडा. (२) पत्र. (३) हुकूमनामा; आदेशपत्र.

शुक्र (شکر) पु. ('अ.) (१) कृतज्ञता. (२) धन्यवाद; आभार. **–गुज़ार** (گزار –) वि. ('अ.+फ़ा.) कृतज्ञ; आभारी. **–गुज़ारी** (گزاری –) स्त्री. ('अ.+फ़ा.) कृतज्ञता; आभार प्रदर्शन.

शुक्रानः (شکرانہ) पु. (फ़ा.) ठरलेल्या मेहेनतान्या-व्यतिरिक्त भेट किंवा पारितोषिक म्हणून काम करणाऱ्याला (विशेषतः वकिलाला) दिले जाणारे द्रव्य.

शुक्रियः (شکریہ) पु. ('अ.) आभार; धन्यवाद.

शुगुन (شگن); **शुगून** (شگون) पु. (फ़ा.) शकुन; मुहूर्त.

शुगुल (شغل); **शुग़ल** (شغل) पु.('अ.)(१) काम; धंदा; व्यवसाय. (२) तल्लीनता.

शुजा'अ (شجاع) वि. ('अ.) वीर; शूर; बहादूर.

शुजा'अत (شجاعت) स्त्री. ('अ.) शौर्य; बहादुरी.

शुतुर (شتر) पु. (फ़ा.) उंट. **–अराबः** (ارابہ –) पु. (फ़ा.) उंट-गाडी. **–कीनः** (کینہ –) वि. (फ़ा.) दीर्घद्वेषी. **–गमज़ः** (غمزہ –) पु. (फ़ा. + 'अ.) (१) निरर्थक नखरा; म्हातारपणातील नखरा. (२) दुष्टपणा; नीचता. **–गा'व** (گاؤ –) पु. (फ़ा.) जिराफ. **–गुर्बः** (گربہ –) पु. (फ़ा.) (१) दोन असमान वस्तू; एक उंच व दुसरी ठेंगणी वस्तू. (२) काव्यातील एक दोष. (एका शब्दासाठी एके ठिकाणी एकवचन व दुसरीकडे अनेकवचन वापरणे.) **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) भित्रा; भ्याड. **–नाल** (نال –) स्त्री. (तु.) उंटाच्या पाठीवरून नेली जाणारी लहान तोफ. **–बान** (بان –) वि. (फ़ा.) उंटवाला. **–मुर्ग़** (مرغ –) पु. (फ़ा.) शहामृग. **–सवार** (سوار –) वि. (फ़ा.) सांडणीस्वार; उष्ट्रारोही.

शुतुर-ए-बेमिहार (شتر بے مہار) पु. (फ़ा.) बेसण नसलेला उंट. (वि.) निरंकुश; स्वच्छंदी; स्वैराचारी.

शुद (شد) क्रि. [फ़ा. 'शुदन' (شدن) होणे; जाणे.] झाला; गेला. (पु.) प्रारंभ. **–आमद** (آمد –) स्त्री. (फ़ा.) (१) मिलाफ; मैत्री. (२) दळणवळण; आवक-जावक. (३) रीतीरिवाज. **–बुद** (بد –) स्त्री. (फ़ा.) (१) अक्षरओळख. (२) थोडेसे ज्ञान; अल्पज्ञान. **–यार** (یار –) स्त्री. (फ़ा.) नांगरलेली जमीन.

शुदनी (شدنی) स्त्री. (फ़ा.) (१) भवितव्य; भविष्य. (२) भावी संकट. (वि.) होणारा; भविष्यकालीन.

शुदः (شدہ) प्रत्य. (फ़ा.) झालेला. [उदा. 'शादीशुदः' (شادی شدہ) विवाहित; लग्न झालेला.] **–शुदः** (شدہ –) अव्य. (फ़ा.) (१) हळूहळू; धीरे धीरे. (२) थोडा थोडा. (३) एकाकडून दुसऱ्याला व दुसऱ्याकडून तिसऱ्याला याप्रमाणे; क्रमशः.

शुन'अत (شنعت) स्त्री. (फ़ा.) (१) वाईटपणा. (२) दोष; निंदा.

शुपुश (شپش) स्त्री. (फ़ा.) ऊ (केसात पडणारी).

शुफ़'अः (شفعہ) पु. ('अ.) शेजाऱ्याचे घर किंवा शेजारची जमीन विकत घेण्याचा अग्रहक्क; शेजारामुळे मिळालेला खरेदीतील अग्रहक्क.

शुबह् (شبہ) पु. ('अ.) शंका; संशय; वहीम. [अनेक 'शुबहात' (شبہات)].

शुमार (شمار); **शुमारः** (شمارہ) पु. (फ़ा.) (१) गणती; मोजणी; गणना. (२) संख्या. (३) हिशेब. (४) बेरीज. **–कुनिंदः** (کنندہ –) वि. (फ़ा.) गणक; गणना करणारा. (पु.) अंश (गणित).

शुमारी (شماری) स्त्री. प्रत्य. (फ़ा.) मोजणीचे काम; गणना. [उदा. 'मर्दुम शुमारी' (مردم شماری) स्त्री. (फ़ा.) जनगणना; खानेसुमारी].

शुमाल (شمال) पु. ('अ.) उत्तर (दिशा). **–मग़रिब** (مغرب –) पु. ('अ.) वायव्य. **–मश्रिक़** (مشرق –) पु. ('अ.) ईशान्य. **–नुमा** (نما) ('अ. + फ़ा.) होकायंत्र.

शुमुर्दः (شمردہ) वि. (फ़ा.) मोजलेला; गणती केलेला.

शुमू'अ (شموع) स्त्री. ['अ. 'शम'अ' (شمع) चे अनेक.] मेणबत्त्या; दिवे.

शुमूल (شمول); **शुमूलियत** (شمولیت) स्त्री. ('अ.) (१) समावेश. (२) सामील होणे. (३) संपूर्णता.

शुयू'अ (شیوع) पु. ('अ.) प्रकट; जाहीर, प्रकाशित होणे.

शुयूख़ (شیوخ) पु. ['अ. 'शेख़' (شیخ) चे अनेक.] वृद्ध; थोर पुढारी.

शुरका (شرکا) पु. ['अ. 'शरीक' (شریک) चे अनेक.] भागीदार; सहभागी मंडळी.

शुरफ़ा (شرفا) पु. ['अ. 'शरीफ़' (شریف) चे अनेक.] कुलीन, सज्जन लोक.

शुरू'अ (شروع) पु. ('अ.) (१) आरंभ; सुरुवात. (२) आरंभीची जागा.

शुरू'आत (شروعات) स्त्री. ('अ.) सुरुवात; प्रारंभ.

शुरूक़ (شروق) पु. ('अ.) (१) सूर्योदय; उदय. (२) प्रकाश.

शुरूत् (شروط) स्त्री. ['अ. 'शर्त्' (شرط) चे अनेक.] अटी; शर्ती.

शुर्त् (شرط) पु. ('अ.) (१) पोलीस; पहारेकरी. (२) लक्षण; चिन्ह. (३) नौकानयनास अनुकूल वारा.

शुर्ब (شرب) पु. ('अ.) पिणे; मद्यपान. **–उल्-यहूद** (الیہود –) पु. ('अ.) चोरून, लपून मद्यपान करणे.

शुल्लः (شلہ) पु. (तु.) (१) पातळ खिचडी, (२) पुलाव.

शुल्लः (شلہ) स्त्री. (फ़ा.) (१) उकीरडा. (२) बिटाळशीपणात घ्यावयाचे फडके. (३) योनी; भग.

शुश (شش) पु. (फ़ा.) फुप्फुस.

शुस्त (شست) स्त्री. (फ़ा.) धुलाई; धुणे; सफाई. **–गी** (گی –) स्त्री. (फ़ा.) (१) शुद्धता. (२) स्वच्छता. (३) सभ्यता; सज्जनता.

शुस्त-ओ-शू (شست و شو) स्त्री. (फ़ा.) धुणे; धुलाई; सफाई; स्वच्छता.

शुस्तः (شستہ) वि. (फ़ा.) (१) धुतलेला; स्वच्छ; साफ; निर्मळ. (२) शुद्ध. (३) सभ्य; सज्जन; सुसंस्कृत. (४) सुशोभित. **–ओ-रुफ़्तः** (– و رفتہ) वि. (फ़ा.) स्वच्छ; शुद्ध, पवित्र व निर्मळ. **–रू** (– رو) वि. (फ़ा.) ज्याने आपले तोंड धुतले आहे असा.

शुहदा (شہدا) पु. ['अ. 'शहीद' (شہید) चे अनेक.] हुतात्मे; धर्मासाठी बलिदान करणारे.

शुहरत (شہرت) स्त्री. ('अ.) (१) प्रसिद्धी; कीर्ती; ख्याती. (२) प्राविण्यावद्दल ख्याती. **–तलब** (– طلب) वि. ('अ.) प्रसिद्धिलोलुप. **–याफ़्तः** (– یافتہ); **–याब** (– یاب) वि. ('अ. + फ़ा.) ख्यातिप्राप्त; प्रसिद्ध.

शुहरः (شہرہ) पु. ('अ.) ख्याती; कीर्ती. **–ए-आफ़ाक़** (– آفاق) वि. ('अ.) विश्वविख्यात. **–वर** (– ور) वि. ('अ.+फ़ा.) विख्यात; महशूर.

शुहूद (شہود) पु. ['अ. 'शाहिद' (شاہد) चे अनेक.] (१) अनेक साक्षीदार. (२) उपस्थिती. (३) प्रत्यक्ष पाहाणे; साक्षात्कार.

शुहूर (شہور) पु. ['अ. 'शहर' (شہر) चे अनेक.] महिने.

शूख (شوخ) पु. (फ़ा.) मळ; घाण. **–गीं** (– گیں) वि. (फ़ा.) मलिन; गलिच्छ.

शूम (شوم) वि. (फ़ा.) (१) अशुभ; अनिष्टकारक. (२) कृपण; कंजूष. **–क़दम** (– قدم) (फ़ा.+'अ.) पांढऱ्या पायाचा; अशुभ.

शूमी (شومی) स्त्री. (फ़ा.) (१) अनिष्ट; अशुभ; दुर्दैव. (२) कृपणता; कंजुषी.

शूरां (شوریٰ) पु. ('अ.) (१) सल्ला. (२) उपदेश. (३) विचारविनिमय.

शे'अर (شعر) पु. ('अ.) उर्दू कवितेचे दोन चरण; कविता. **–ख्वानी** (– خوانی) स्त्री. ('अ. + फ़ा.) कविता म्हणणे; काव्यवाचन; काव्यगायन. **–गो** (– گو) वि. ('अ.+फ़ा.) कविता म्हणणारा, रचणारा; कवी. **–गो'ई** (– گوئی) स्त्री. ('अ.+फ़ा.) कविता करणे. **–फ़हम** (– فہم) वि. ('अ.) काव्यमर्मज्ञ; रसिक.

शे'अर-ए-तर (شعر تر) पु. ('अ.+फ़ा.) काव्यरसपूर्ण कविता.

शे'अर-ओ-शा'अिरी (شعر و شاعری); **शे'अर-ओ-सुख़न** (شعر و سخن) पु. ('अ.+फ़ा.) काव्य व साहित्य; काव्यशास्त्र विनोद.

शेख़ (شیخ) पु. ('अ.) (१) वृद्ध. (२) पुढारी. **–चिल्ली** (– چلی) पु. ('अ. + हिं.) (१) एक काल्पनिक मूर्ख व्यक्ती. (२) मनोराज्ये करणारा शेख महमद. पाहा 'शैख' (शु.).

शेख़ी (شیخی) स्त्री. ('अ. + हिं.) (१) मिजास; गर्व; घमेंड. (२) ऐट; तोरा; रुबाब. **–बघारना** (– بگھارنا) बाता मारणे; ऐट मिरविणे.

शेफ़्तगी (شیفتگی) स्त्री. (फ़ा.) मोह; आसक्ती; मोहित होणे.

शेफ़्तः (شیفتہ) वि. (फ़ा.) मुग्ध; मोहित; आसक्त; फिदा.

शेब (شیب) स्त्री. (फ़ा.) उतार; खोलगट भाग; खालचा भाग.

शेर (شیر) पु. (फ़ा.) (१) वाघ. (२) सिंह. **–अंदाम** (– اندام) वि. (फ़ा.) (१) वाघासारखा शूर व धाडसी. (२) रुंद छाती व बारीक कंबर असलेली धाडसी व्यक्ती. **–अफ़गन** (– افگن) वि. (फ़ा.) वाघाचा पराभव करणारा; शूर; धाडसी. **–गीर** (– گیر) वि. (फ़ा.) (१) खूप दारू पिऊनही ज्याचा तोल जात नाही असा. (२) प्रतिष्ठित. (३) अर्धवट शुद्धीत असलेला. **–दहाँ** (– دھاں) वि. (फ़ा.) व्याघ्रमुख. (पु.) दर्शनी भाग रुंद व मागील बाजू अरुंद असलेले घर. **–दिल** (– دل) वि. (फ़ा.) धाडसी; शूर; निर्भय. **–बच्चः** (– بچہ) पु. (फ़ा.) सिंहाचा, वाघाचा छावा. **–मर्द** (– مرد) वि. (फ़ा.) नरकेसरी.

शेर-ए-आबी (شیر آبی) पु. (फ़ा.) पाण्यातील वाघ; मगर; सुसर.

शेर-ए-क़ालीं (شیر قالیں) पु. (फ़ा.) गालिचावर काढलेला वाघ (निरुपद्रवी प्राणी).

शेर-ए-ख़ुदा (شیر خدا) पु. (फ़ा.) हजरत अली.

शेर-ए-बबर (شیر ببر) पु. (फ़ा.) सिंह.

शेर-ए-शियाँ (شیر ژیاں) पु. (फ़ा.) हिंस्र वाघ; खवळलेला वाघ.

शेवन (شیون) पु. (फ़ा.) रुदन; विलाप; आक्रोश. **–गर** (– گر) वि. (फ़ा.) विलाप करणारा.

शेवा (شیوا) वि. (फ़ा.) संभाषणपटू. **–बयाँ** (– بیاں) वि. (फ़ा.+'अ.) सुंदर व कलापूर्ण पद्धतीने संभाषण करणारा.

शेवः (شیوہ) पु. (फ़ा.) (१) शैली; पद्धती; ढंग. (२) प्रथा; परिपाटी.

शैख़ (شیخ) पु. ('अ.) (१) वृद्ध, म्हातारा पुरुष. (२) अध्यक्ष. (३) सरदार; पुढारी; धर्मगुरू (४) कुलप्रमुख. (वि.) श्रेष्ठ; प्रतिष्ठित; थोर.

शैख़-उत्-तरीक़त (شیخ الطریقت) पु. ('अ.) धर्मगुरू.

शैख़-उल्-इस्लाम (شیخ الاسلام) पु. ('अ.) इस्लामी धर्मशास्त्राचा सर्वांत मोठा विद्वान.

शैख़-उल्-जामि'अः (شیخ الجامع) पु. ('अ.) विद्यापीठाचा कुलपती.

शैख़-उश्-शुयूख़ (شیخ الشیوخ) पु. ('अ.) सर्व धर्मगुरूंचा गुरू; धर्माचार्य.

शैख़-ओ-शाब (شیخ و شاب) पु. ('अ.) म्हातारे व तरुण; सर्व लोक.

शैख़ूख़त (شیخوخت) स्त्री. ('अ.) वृद्धावस्था; म्हातारपण.

शैतनत (شیطنت) स्त्री. ('अ.) (१) सैतानीपणा; दुष्टपणा. (२) खटचाळपणा; नखरेलपणा.

शैतान (شیطان) पु. ('अ.) (१) सैतान. हा पूर्वी एक देवदूत होता. परंतु याने ईश्वरी आज्ञेचे उल्लंघन केल्यामुळे याला स्वर्गातून हद्दपार करण्यात आले. तेव्हापासून तो जगातील लोकांना धर्मभ्रष्ट बनवून पाप करण्यास प्रवृत्त करतो. (२) दुष्ट, उपद्रवी व्यक्ती. **–का लश्कर** (– کا لشکر) खोडकर मुले. **–की आंत** (– کی آنت) लांबच लांब वस्तू. **–की ख़ालः** (– کی خالہ) ढालगज भवानी; जहांबाज बाई. **–सीरत** (– سیرت) वि. ('अ.) दुष्ट स्वभावाचा.

शैतानी (شیطانی) वि. ('अ.) सैतानाचा; निकृष्ट; पापमय. (स्त्री.) नीचता; दुष्टता.

शैद (شید) पु. ('अ.) कपट; फसवणूक.

शैदा (شیدا); **शैदा'ई** (شیدائی) वि. (फ़ा.) (१) मोहित; फिदा. (२) वेडा. (३) उद्विग्न. (४) उत्सुक; आतुर झालेला.

शैन (شین) पु. (फ़ा.) (१) दोष; उणीव. (२) कलंक; मानहानी. (३) विलाप.

शैपूर (شیپور) पु. (फ़ा.) रणशिंग; तुतारी; बिगुल.

शैब (شیب) पु. **शैबत** (شیبت) स्त्री. **शैबः** (شیبہ) पु. ('अ.) वृद्धावस्था; म्हातारपण.

शैय (شے) स्त्री. ('अ.) वस्तू; पदार्थ; द्रव्य.

शैय-ए-लतीफ़ (شئے لطیف) स्त्री. (फ़ा. + 'अ.) (१) प्रतिभा. (२) बुद्धी.

शो (شو) प्रत्य. (फ़ा.) घुणारा. [उदा. 'मुर्दः शो' (مردہ شو) प्रेताला न्हाऊ घालणारा].

शो'अबदः (شعبدہ) पु. ('अ.) (१) जादू; नजरबंदी. (२) फसवणूक; कपट. **–गर** (– گر); **–बाज़** (– باز) वि. (फ़ा.) (१) जादूगार. (२) फसवा; लबाड.

शो'अबः (شعبہ) पु. ('अ.) (१) विभाग; खाते. (२) शाखा; फांदी. (३) तुकडा; खंड.

शो'अलः (شعلہ) पु. ('अ.) आगीची ज्वाला; झळ; झोत. **–अंगेज़** (– انگیز); **–अफ़शां** (– افشاں) वि. ('अ. + फ़ा.) आग ओतणारा; पसरविणारा; अग्निवर्षाव करणारा. **–ख़ू** (– خو) वि. ('अ. + फ़ा.) उग्र; रागीट; तापट. **–ज़न** (– زن) वि. ('अ. + फ़ा.) आग फेकणारा; रेगाने पसरणारी आग. **–ज़बां** (– زباں) वि. ('अ. + फ़ा.) भरभर बोलणारा; जोरदार भाषण देणारा. **–ज़ादः** (– زادہ) वि. ('अ. + फ़ा.) सैतान; भूत. **–रुख़** (– رخ); **–रू** (– رو) वि. ('अ. + फ़ा.) अग्नीसारखे तेजस्वी व लाल गाल असणारा (री); सुंदर; प्रेयसी.

शो'अलः-ए-जौलां (شعلۂ جولاں) पु. ('अ. + फ़ा.) चालती बोलती आग; प्रेयसी; प्रेमिका.

शो'अलः-ए-ताक (شعلۂ تاک) पु. ('अ. + फ़ा.) द्राक्षासव; द्राक्षाची दारू.

शोए (شوے) पु. (फ़ा.) पती; भर्ता; स्वामी.

शोख़ (شوخ) वि. (फ़ा.) (१) चंचल; चपळ; खटचाळ. (२) नखरेल. (३) गडद (रंग). (४) धीट; उद्धट; धृष्ट. (५) असभ्य; अशिष्ट. **–चश्म** (– چشم) **–दीदः** (– دیدہ) वि. (फ़ा.) (१) बेशरम; निर्लज्ज. (२) धीट; धृष्ट; खटचाळ. **–तब्'अ** (– طبع); **–मिज़ाज** (– مزاج) वि. (फ़ा. + 'अ.) (१) खटचाळ; चंचल. (२) नखरेल. (३) विनोदी.

शोख़-ओ-शंग (شوخ و شنگ) वि. (फ़ा.) नखरेल; नटवा, चतुर व सुंदर.

शोख़ी (شوخی) स्त्री. (फ़ा.) (१) धृष्टता; धीटपणा. (२) नटवेपणा; नखरा. (३) खटचाळपणा. (४) अशिष्टता. (५) गडदपणा (रंगाचा).

शोब (شوب) पु. (फ़ा.) (१) धुलाई; धुणे. (२) पगडी. (वि.) धुणारा.

शोबीदः (شوبیدہ) वि. (फ़ा.) धुतलेला.

शोर (شور) पु. (फ़ा.) (१) कोलाहल; आरडाओरड; गोंधळ. (२) धामधूम. (३) ख्याती; बोलबाला. (४) वेड; प्रीतीचे वेड. (५) मीठ; क्षार. (वि.) खारट; क्षारयुक्त. **–अंगेज़** (– انگیز) वि. (फ़ा.) (१) गोंधळ करणारा. (२) वेड वाढविणारा. **–गार** (– غار) स्त्री. (फ़ा.) तुरटी. **–चश्म** (– چشم) वि. (फ़ा.) ज्याची दृष्टी लागते असा. **–पुश्त** (– پشت) वि. (फ़ा.) (१) उदंड; उद्धट. (२) भांडखोर. (३) स्वैर; निरंकुश. **–बख़्त** (– بخت) वि. (फ़ा.) दुर्दैवी; हतभागी. **–मोर** (– مور) स्त्री. (फ़ा.) मुंगी.

शोर-ए-क़ियामत (شور قیامت); **शोर-ए-महशर** (شور محشر) पु. (फ़ा. + 'अ.) महाप्रलयाच्या वेळचा कोलाहल; खूप जोराचा आरडाओरडा; गोंधळ.

शोर-ओ-ग़ुल (شور و غل) (फ़ा.) **शोर-ओ-शग़ब** (شور و شغب) पु. (फ़ा. + 'अ.) कोलाहल; गोंधळ.

शोर-ओ-शर (شور و شر) पु. (फ़ा.+'अ.) दंगल; दंगा; आरडाओरडा व भांडण.

शोरबा (شوربا) पु. (फ़ा.) मांसाचा रस्सा.

शोराब (شوراب); **शोराबः** (شورابہ) पु. (फ़ा.) खारट पाणी.

शोरिंदः (شورندہ) वि. (फ़ा.) आरडाओरड करणारा.

शोरियत (شوریت) स्त्री. (फ़ा.) खारटपणा.

शोरिश (شورش) स्त्री. (फ़ा.) (१) दंगा; हुल्लड; गोंधळ; बंड. (२) खळबळ. (३) वेड; उन्माद (रोग). (४) खारटपणा. **–अंगेज़** (انگیز –) वि. (फ़ा.) दंगल माजविणारा. **–कदः** (کدہ –) पु. (फ़ा.) भांडणाचे व उपद्रवाचे स्थान.

शोरिशी (شورشی) वि. (फ़ा.) दंगल, हुल्लड करणारा.

शोरीदगी (شوریدگی) स्त्री. (फ़ा.) (१) उद्विग्नता; खिन्नता. (२) वेड.

शोरीदः (شوریدہ) वि. (फ़ा.) (१) उद्विग्न; चिंतित. (२) व्याकुळ. (३) आश्चर्यचकित. (४) वेडा. **–ख़ातिर** (خاطر –) वि. (फ़ा. + 'अ.) खिन्न; दुःखी. **–बख़्त** (بخت –) वि. (फ़ा.) दुर्दैवी. **–सर** (سر –) वि. (फ़ा.) विकृत मेंदूचा; वेडा. **–हाल** (حال –) वि. (फ़ा.+'अ.) दुर्दशाग्रस्त; उद्विग्न.

शोरः (شور) पु. (फ़ा.) (१) सोडा. (२) सोरा. **–गर** (گر –) वि. (फ़ा.) सोरा तयार करणारा. **–पुश्त** (پشت –) वि. (फ़ा.) (१) उद्धट; फटकळ; असभ्य. (२) अवज्ञा करणारा; बंडखोर. (३) भांडखोर. (४) स्वैर; निरंकुश. **–बूम** (بوم –) स्त्री. (फ़ा.) पडीत, नापीक जमीन.

शोल (ژول) पु. (फ़ा.) (१) कोळी (किडा). (२) कापड विणणारा; कोष्टी.

शोलीदः (ژولیدہ) वि. (फ़ा.) (१) गुंतागुंत झालेला; गुंतागुंतीचा; क्लिष्ट. (२) अस्ताव्यस्त; विसकटलेला. **–बयाँ** (بیاں –) वि. (फ़ा.) असंबद्ध बोलणारा; बरळणारा. **–बयानी** (بیانی –) स्त्री. (फ़ा.) बरळणे; असंबद्ध बोलणे. **–मू** (مو –) वि. (फ़ा.) ज्याचे केस विसकटले आहेत असा. **–हाल** (حال –) वि. (फ़ा. + 'अ.) दुर्दशाग्रस्त. **–हाली** (حالی –) स्त्री. (फ़ा.+'अ.) दुर्दशा; दुःस्थिती.

शोलः (شولہ) पु. (फ़ा.) पातळ खिचडी (आजाऱ्यांना द्यावयाची).

शोशः (شوشہ) पु. (फ़ा.) (१) खंड; तुकडा. (२) 'सीन' (س) व 'शीन' (ش) या अक्षरांच्या सुरुवातीचा दंतुर भाग (سـ وـ). (३) सोन्यांचांदीची लगड. (४) टोक. (हिं.) चुटका; विनोदी गोष्ट; अद्भुत गोष्ट.

शोहूदः (شہدہ) पु. (फ़ा. + हिं.) (१) गुंड; बदमाश; मवाली. (२) व्यभिचारी.

शौक़ (شوق) पु. ('अ.) (१) चोक; चैन; हौस. (२) आवड; लालसा. (३) व्यसन. (४) प्रवृत्ती. (५) उत्साह. **–ी** (ـے –) खुशाल; मजेत. [म्हण : **शौक़ में ज़ौक़ वस्तूरी में लड़का** (شوق میں ذوق دستوری میں لڑکا) एक गोष्ट करताना दुसरी आपोआप मिळाली].

शौक़-ओ-ज़ौक़ (شوق و ذوق) पु. ('अ.) हौस; चोक.

शौकत (شوکت) स्त्री. ('अ.) (१) वैभव; ऐश्वर्य. (२) रुबाब; दबदबा. (३) सामर्थ्य.

शौक़ियः (شوقیہ) वि. ('अ.) हौशी; शौकीन. (अव्य.) हौस म्हणून.

शौक़ीन (شوقین) वि. ('अ. + फ़ा.) हौशी; शौकीन; चैनी; रंगेल; रसिक. [म्हण : **शौक़ीन बुढ़िया चटा'ई का लहंगा** (شوقین بڑھیا چٹائی کا لہنگا) बुढ्ढी घोडी लाल लगाम. वयाला न शोभणारा पोषाख करणे].

शौलः (شولہ) पु. ('अ.) मूळ नक्षत्र.

शौहर (شوہر) पु. (फ़ा.) पती; नवरा. **–परस्त** (پرست –) वि. स्त्री. (फा.) पतीला देव मानणारी; पतिव्रता.

संग (سنگ) पु. (फ़ा.) (१) दगड; फत्तर. (२) वजन; ओझे. (३) मूल्य. **–अंदाज़** (انداز –) पु. (फ़ा.) (१) दगड फेकण्याचे साधन; गोफण. (२) जेथून बंदुकांचा मारा केला जातो ती किल्ल्याच्या तटातील भोके. **–ज़नः** (زن –) पु. (फ़ा.) गार (पावसाची). **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) पासंग असलेला तराजू; कमी वजन करणारा तराजू. **–ए-ज़र** (زر –) पु. (फ़ा.) कस पाहाण्याचा दगड; निकष-पाषाण. **–ए-ज़राहत** (جراحت –) पु. (फ़ा.+'अ.) संगजिरे (जखम भरणारा दगड). **–ए-जाँ** (جاں –) वि. (फ़ा.) निष्ठुर; निर्दय. **–तरः** (ترہ –) पु. (फ़ा.) संत्रे; नारिंग (दगडासारखे फळ). **–तराश** (تراش –) पु. (फ़ा.) पाथरवट. **–दान** (دان –); **–दानः** (دانہ –) पु. (फ़ा.) पक्ष्यांचे पोट. (यात खडे असतात). **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) निर्दय; निष्ठुर. **–पुश्त** (پشت –) पु. (फ़ा.) कासव; कूर्म. **–बस्त** (بست –); **–बस्तः** (بستہ –) वि. (फ़ा.) (१) घट्ट; मजबूत. (२) दगडी. (३) कच्चे, न पिकलेले (फळ). **–रू** (رو –) वि. (फ़ा.) निर्लज्ज; कठोर. **–रेज़ः** (ریزہ –) पु. (फ़ा.) खडी; बारीक खडे; कॉंक्रीट. **–लाख** (لاخ –) वि. (फ़ा.) कठोर; कठीण. (पु.) खडकाळ जमीन. **–साज़** (ساز –) वि. (फ़ा.) शिळा-प्रेस (लिथो) वर मुद्रणातील चुका दुरुस्त करणारा. **–सार** (سار –) वि. (फ़ा.) दगड मारून ठार

केलेला. (पु.) गुन्हेगाराला जमिनीत कमरेपर्यंत पुरून व त्याच्या डोकीवर दगडांचा मारा करून त्याला ठार मारण्याची दिली जाणारी शिक्षा.

संग-ए-अस्वद (سنگ اسود) पु. (फ़ा. + 'अ.) काळा दगड; काबा (मक्का) येथील भितीत लावलेला दगड. (मक्केची यात्रा करणारे भाविक मुसलमान काब्याची एक प्रदक्षिणा पूर्ण झाली की या दगडाचे चुंबन घेतात किंवा दुरून प्रदक्षिणा पूर्ण झाली की दुरून हाताने चुंबनाची खूण करतात).

संग-ए-आस्ताँ (سنگ آستاں); **संग-ए-आस्तानः** (سنگ آستانہ) पु. (फ़ा.) उंबऱ्याचा दगड; दगडी उंबरा. (इराणात उंबरा लाकडी असत नाही).

संग-ए-आहन रुबा (سنگ آہن ربا) पु. (फ़ा.) लोहचुंबक.

संग-ए-क़ना'अत (سنگ قناعت) पु. (फ़ा.+'अ.) भुकेची वेदना कमी करण्यासाठी पोटाला बांधण्याचा दगड (अरबस्तानातील प्रथा).

संग-ए-ख़ारा (سنگ خارا) पु. (फ़ा.) गारेचा दगड; खडबडीत व लालसर असलेला अत्यंत टणक दगड.

संग-ए-पा (سنگ پا) पु. (फ़ा.) पाय घासण्याचा दगड; वज्री.

संग-ए-फ़सां (سنگ فساں) पु. (फ़ा.) शस्त्रांना धार लावण्याचा दगड; सहाण.

संग-ए-बसरी (سنگ بصری) पु. (फ़ा.) डोळ्याच्या रोगावरील औषध म्हणून वापरला जाणारा एक प्रकारचा दगड.

संग-ए-बारां (سنگ باراں) पु. (फ़ा.) गार (पावसाची).

संग-ए-बुनियाद (سنگ بنیاد) पु. (फ़ा.) पायाचा दगड; कोनशिला.

संग-ए-बेनून (سنگ بے نون) पु. (फ़ा.) (१) कुत्रा. (२) पाजी माणूस. ['संग' (سنگ) शब्दातील 'नून' (ن) काढून टाकण्याने 'सग' (سگ) असा शब्द बनतो. त्याचा अर्थ कुत्रा].

संग-ए-मक़्तल (سنگ مقتل) पु. (फ़ा.+'अ.) वधशिला.

संग-ए-मक़्नातीस (سنگ مقناطیس) पु. (फ़ा. + 'अ.) लोहचुंबक.

संग-ए-मज़ार (سنگ مزار) पु. (फ़ा.+'अ.) थडग्यावर मृत व्यक्तीचे नाव वगैरे लिहिलेला दगड.

संग-ए-मर्मर (سنگ مرمر) पु. (फ़ा.) संगमरवर.

संग-ए-मश्क़ः (سنگ مشانہ) पु. (फ़ा. + 'अ.) मूतखडा.

संग-ए-मूसों (سنگ موسیٰ) पु. (फ़ा. + 'अ.) एक प्रकारचा काळा दगड.

संग-ए-यमन (سنگ یمن) पु. (फ़ा.+'अ.) पद्मराग; लालरत्न.

संग-ए-यश्ब (سنگ یشب) पु. (फ़ा.+'अ.); हृद्रोगावर वापरले जाणारे एक हिरव्या रंगाचे रत्न; पाचू.

संग-ए-राह (سنگ راہ) पु. (फ़ा.) रस्त्यातील धोंड; अडथळा.

संग-ए-शजरी (سنگ شجری) पु. (फ़ा.) पोवळे; प्रवाळ; झाडाच्या खुणा असलेले एक रत्न.

संग-ए-संदलसा (سنگ صندل سا) पु. (फ़ा.) चंदन घासण्याचा दगड; गंध उगाळण्याची सहाण.

संग-ए-समाक़ (سنگ سماق) पु. (फ़ा. + 'अ.) सर्वांत अधिक टणक असलेला दगड. (याचा खलबत्ता बनवून त्यात मोती वगैरे वाटतात).

संग-ए-सरमाही (سنگ سرماهی) पु. (फ़ा.) मोठ्या माशाच्या डोकीतून निघणारा औषधी दगड.

संग-ए-सुलैमानी (سنگ سلیمانی) पु. (फ़ा. + 'अ.) दोन रंगी किंवा रेघा असलेला एक दगड. या दगडांच्या माळा फकीर लोक गळ्यांत घालतात.

संगीं (سنگیں); **संगीन** (سنگین) वि. (फ़ा.) (१) कडक; टणक. (२) कठोर. (३) टिकाऊ; मजबूत. (४) दगडी. (५) अवघड; बिकट; कठीण. **–जिगर** (جگر –) वि. (फ़ा.) निर्दय; कठोर. **–दस्त** (دست –) वि. (फ़ा.) सुस्त; आळशी; कामचुकार. **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) निर्दय.

संगी (سنگی) वि. (फ़ा.) दगडाचा; दगडी.

संगीन (سنگین) स्त्री. (फ़ा. + हिं.) बंदुकीच्या पुढे जोडतात ते तीक्ष्ण शस्त्र; बायोनेट.

संगीनी (سنگینی) स्त्री. (फ़ा.) टणकपणा; घट्टपणा; दृढता.

संज (سنج) प्रत्य. (फ़ा.) वजन करणारा; पारख करणारा. [उदा. 'सुखनसंज' (سخن سنج) वि. (फ़ा.) शब्दांचे वजन, पारख करणारा; कवी; वक्ता.] (पु.) झांज; टाळ.

संजाफ़ (سنجاف) स्त्री. पु. (फ़ा.) कडा; गोट; काठ; किनार; झालर.

संजाफ़ी (سنجافی) वि. (फ़ा.) किनार असलेला.

संजाब (سنجاب) स्त्री. (फ़ा.) घुशीच्या आकाराचा एक प्राणी. याच्या केसाळ कातडयाचे कोट, हातमोजे, टोप्या वगैरे बनवितात.

संजीदगी (سنجیدگی) स्त्री. (फ़ा.) (१) गंभीरता. (२) सहिष्णुता. (३) प्रतिष्ठितपणा.

संजीदः (سنجیدہ) वि. (फ़ा.) (१) गंभीर; शांत; समजदार; सभ्य; सुशील. (२) वजन केलेला; समतोल. (३) सहिष्णू. (४) प्रत्येक गोष्ट लक्षपूर्वक ऐकणारा व विचार करणारा. **–गुफ़्तार** (گفتار –) वि. (फ़ा.) विचारपूर्वक, शांतपणे

बोलणारा. –रफ़्तार (رفتار –) वि. (फ़ा.) गंभीरपणे व जबाबदारीने वागणारा.

संजुक्त (سنجق) पु. (तु.) (१) फौजेचा झेंडा; पताका; ध्वज. (२) कमरपट्टा.

संजः (سنجر) पु. (फ़ा.) वजन (तराजूतील).

संबल (صندل) पु. ('अ.) चंदन. –सा (سا –) पु. (फ़ा.) चंदन उगाळण्याची सहाण.

संबली (صندلی); संबली (صندلی) वि. (फ़ा.) चंदनाचा; चंदनी.

संदास (سنداس) पु. [फ़ा. 'संदह' (سندہ) मानवी विष्ठा.] शौचकूप; संडास.

संबूक़ (صندوق) पु. ('अ.) पेटी; ट्रंक. –चः (چہ –) पु. ('अ.+फ़ा.) लहान पेटी; बॅग. –उल्-बुस्तः (البوسطہ –) पु. ('अ.) पत्रे टाकण्याची पोस्टाची पेटी; लेटरबॉक्स.

संबूक़-ए-मुर्दः (صندوق مردہ) पु. ('अ. + फ़ा.) शवपेटी; ताबूत.

संबूक़ी (صندوقی) वि. ('अ.) पेटीच्या आकाराचा. (स्त्री.) आत कोनाडा (बगली) नसलेले थडगे.

स'अतरबाज़ (صعتر باز); स'अतरी (صعتری) स्त्री. ('अ.+फ़ा.) दुसऱ्या स्त्रीच्या जननेंद्रियावर आपले जननेंद्रिय घासून संभोगाचा आनंद मिळविणारी स्त्री.

स'अद (سعد) वि. ('अ.) (१) शुभ; सुलक्षणी. (२) श्रेष्ठ; पुनीत. (३) श्रवण (नक्षत्र).

स'अद-उस्-स'ऊद (سعدالسعود) पु. ('अ.) (१) गुरू (ग्रह); बृहस्पती. (२) शततारका (नक्षत्र).

स'अद-ए-ज़ाबेह (سعد ذابح) पु. ('अ.) श्रवण (नक्षत्र).

स'अदैन (سعدین) पु. ('अ.) गुरू व शुक्र (ग्रह).

स'अब (صعب) वि. ('अ.) (१) कठीण; अवघड. (२) बंडखोर; उद्धट.

स'अब (سعب) वि. ('अ.) (१) अवघड. (२) त्रासदायक. (३) बंडखोर.

स'अलब (ثعلب) स्त्री. ('अ.) कोल्हा; खोकड; कोल्ही.

स'आदत (سعادت) स्त्री. ('अ.) (१) सचोटी. (२) भाग्य; सुदैव. (३) कल्याण. (४) तेज; प्रताप. –मंद (مند –); –वर (ور –); –शि'आर (شعار –); –संज (سنج –) वि. ('अ.+फ़ा.) (१) भाग्यवान. (२) आज्ञाधारक. (३) सुयोग्य.

स'ई (سعی) पु. स्त्री. ('अ.) (१) प्रयत्न. (२) पराक्रम. (३) परिश्रम; धडपड. (४) शिफारस.

स'ईद (سعید) वि. ('अ.) (१) शुभ; कल्याणकारक. (२) भाग्यवान.

स'ईर (سعیر) स्त्री. ('अ.) (१) अग्निज्वाला; आग. (२) नरकातील चौथा मजला. (मूर्तिपूजकांना या भागात टाकले जाते).

स'ईस (سئیس) पु. ('अ.) मोतद्दार; साईस.

सऊद (صعود) पु. ('अ.) (१) वर चढणे; चढण; उंच भाग. (२) यातना; पीडा.

स'ऊबत (صعوبت) स्त्री. ('अ.) (१) कष्ट; व्यथा; पीडा. (२) कठीणता; अवघडपणा.

स'ऊल (سئول) वि. ('अ.) फार विचारणारा; जास्त प्रश्न करणारा.

सक़त (سقط) पु. ('अ.) (१) चूक; लिहिण्यातील चूक; हिशेबातील चूक. (२) गळालेला; खाली पडलेला. (३) अपशब्द; शिवी; निंदा. –गो (گو –) वि. ('अ. + फ़ा.) शिव्या देणारा. –ची (چی –) वि. ('अ. + फ़ा.) पडलेल्या वस्तू, तुकडे वगैरे गोळा करणारा.

सकनः (سکنہ) पु. ['अ. 'साकिन' (ساکن) चे अनेक.] राहाणारे; रहिवासी.

सक़नक़ूर (سقنقور) पु. ('अ.) एक प्रकारचा मोठा मासा. (याचे मांस कामवर्धक असते).

सक़म (سقم) पु. ('अ.) (१) दोष; उणीव. (२) रोग; आजार.

सक़मूनिया (سقمونیا) पु. (यू.) एक प्रकारचा रेचक गोंद (डिंक).

सक़र (سقر) पु. ('अ.) नरक.

सकरात (سکرات) स्त्री. ('अ.) (१) बेशुद्धी; मूर्च्छा. (२) प्राण जाताना होणाऱ्या यातना.

सकरान (سکران) वि. ('अ.) घुंदीत असलेला; झिंगलेला.

सक़लान (ثقلان); सक़लैन (ثقلین) पु. ('अ.) (१) दोन वर्ग (मानव व पिशाचे). (२) इहलोक व परलोक.

सक़ाफ़त (ثقافت) स्त्री. ('अ.) (१) बुद्धिमान असणे. (२) वजनाने हलके असणे. (३) संस्कृती.

सक़ाम (سقام) पु. ('अ.) रोग; व्याधी; आजार.

सक़ालत (ثقالت) स्त्री. ('अ.) ओझे; गुरुत्व; वजन; जडपणा.

सकीनत (سکینت) स्त्री. ('अ.) (१) आराम; सुख. (२) मंदपणा; धीर; हळूपणा.

सकीनः (سکینہ) स्त्री. ('अ.) हजरत इमाम हुसैन यांची कन्या. ही अत्यंत शूर होती. हिने हुसैनांच्या बलिदानानंतर यजीदच्या विरुद्ध खूप जोराचा प्रचार केला.

सक़ीफ़ः (سقیفہ) पु. ('अ.) (१) सल्ला; खलबतखाना; विचारविनिमय करण्याची खोली. (२) खोटी गोष्ट; बडबड; असत्य. (३) आरोप; आळ.

सक़ीम (سقیم) वि. ('अ.) (१) रुग्ण; आजारी. (२) दुर्दशाग्रस्त.

सक़ील (ثقیل) वि. ('अ.) (१) वजनदार; जड; भारी. (२) पचण्यास जड.

सक्कोरः (سکورہ) पु. (फ़ा.) परळ; मातीचा पेला.

सक़्क़ान (سقّان); **सक़्क़ानी** (سقّانی) स्त्री. ('अ.+हिं.) पाणी भरणारी बाई.

सक़्क़ा'ई (سقائی) स्त्री. ('अ.) पाणी भरण्याचे किंवा पाजविण्याचे काम, धंदा.

सक्काक (سکّاک) वि. ('अ.) (१) लोहार; चाकू-कात्र्या बनविणारा. (२) नाण्यांवर शिक्के मारणारा.

सक़्क़ाः (سقّا) पु. ('अ.) (१) पाणी भरणारा; भिश्ती. (२) पाणी पाजविणारा.

सक्तः (سکتہ) पु. ('अ.) (१) मूर्च्छा; झीट; फीट (रोग). (२) निःस्तब्धता. (३) काव्यातील यतिभंग.

सक़्फ़ (سقف) पु. स्त्री. ('अ.) (१) छत; छप्पर; गच्ची. (२) आकाश.

सक़्क़ी (سقّی) स्त्री. ('अ.) तुळई.

सख़ा (سخا); **सख़ावत** (سخاوت) स्त्री. ('अ.) दानशूरता; उदारता.

सख़ाफ़त (سخافت) स्त्री. ('अ.) (१) तुच्छता; नीचता; अधमपणा. (२) निर्बुद्धपणा. (३) हलकेपणा; वजन कमी असणे.

सख़ी (سخی) वि. ('अ.) उदार; दानशूर.

सख़ीन (ثخین) वि. ('अ.) (१) घट्ट; घट्ट विणीचा. (२) दृढ; मजबूत. (३) पुष्ट. (४) टणक.

सख़ीफ़ (سخیف) वि. ('अ.) (१) हलका. (२) पातळ; विरळ. (३) छचोर; अनुदार.

सख़ुन (سخن) पु. (फ़ा.) (१) काव्य. (२) कथन; उक्ती. पाहा 'सुखन'.

सख़्त (سخت) वि. (फ़ा.) (१) कठीण; टणक. (२) अत्यधिक; फार. (३) बिकट; अवघड. (४) प्रचंड; तीव्र. (५) निर्दय; क्रूर. (६) अशुभ; दुर्दैवी. **-कमान** (کمان –) वि. (फ़ा.) (१) पहिल-वान; मल्ल. (२) योद्धा. (३) तिरंदाज; धनुर्धर. (४) शक्तिशाली. **-कोश** (کوش –) वि. (फ़ा.) अत्यंत पराक्रमी. **-गीर** (گیر –) वि.. (फ़ा.) कडक; सवलत न देणारा. **-चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) निर्लज्ज. **-जाँ** (جاں –) वि. (फ़ा.) (१) ज्याचे प्राण लवकर जात नाहीत असा; निर्लज्जपणे जगणारा. (२) निर्दय; कठोर. (३) परा-क्रमी; परिश्रमी. **-दिल** (دل –) वि. (फ़ा.) निर्दय; निष्ठुर. **-बाजू** (بازو –) वि. (फ़ा.) अत्यंत पराक्रमी; परिश्रमी. **-जीर** (میر –) वि. (फ़ा.) ज्याचे प्राण लवकर जात नाहीत असा. **-लगाम** (لگام –) वि. (फ़ा.) उद्दाम घोडा. **-सा** (سا –) पु. (फ़ा.) कुस्तीतील घिस्सा.

सख़्ती (سختی) स्त्री. (फ़ा.) (१) जुलूम; क्रूरता. (२) टणकपणा; कडकपणा; कठोरता. (३) दृढता; मजबुती. (४) अवघडपणा; काठीण्य. (५) तीव्रता. (६) निर्लज्जता; असभ्यपणा. **-कश** (کش –) वि. (फ़ा.) संकटे सहन करणारा.

सग (سگ) पु. (फ़ा.) कुत्रा; श्वान. **-गजीदा** (گزیدہ –) वि. (फ़ा.) ज्याला कुत्रे चावले आहे असा. **-जाँ** (جاں –) वि. (फ़ा.) हावरा; लोभी. **-सार** (سار –) वि. (फ़ा.) कुत्र्यासारखा अपवित्र व निकृष्ट.

सग़ीर (صغیر) वि. ('अ.) लहान; लघु. **-सिन** (سن –) वि. ('अ.) अल्पवयीन; वयात न आलेला.

सग़ीर-ओ-कबीर (صغیر و کبیر) पु. ('अ.) लहान व मोठा; लहान मोठे सर्व.

सग़ीरः (صغیرہ) वि. स्त्री. ('अ.) लहान; कमी वयाची. (पु.) लहान पाप.

सज्'अ (سجع) पु. ('अ.) (१) यमक; अनुप्रास. (२) एखाद्या व्यक्तीचे नाव सहज गुंफले जाईल अशा पद्धतीने लिहिलेले वाक्य किंवा कवितेचा चरण. (३) पक्ष्यांचा कलरव; मंजुळ शब्द.

सज़ा (سزا) स्त्री. (फ़ा.) (१) शिक्षा; दंड. (२) पापाची शिक्षा; अद्दल. (वि.) योग्य; पात्र. **-याफ़्तः** (یافتہ –) वि. (फ़ा.) शिक्षा झालेला; पूर्वीच्या शिक्षा असलेला. **-याब** (یاب –) वि. (फ़ा.) ज्याला शिक्षा झाली आहे असा; दंडित. **-वार** (وار –) वि. (फ़ा.) पात्र; योग्य.

सज़ा-ए-अ'अमाल (سزائے اعمال) स्त्री. (फ़ा.+'अ.) कर्मफल; केलेल्या कृत्यांबद्दल शिक्षा.

सज़ा-ए-महज़ (سزائے محض) स्त्री. (फ़ा.+'अ.) साधी शिक्षा.

सज़ा-ए-सख़्त (سزائے سخت) स्त्री. (फ़ा.) सक्त-मजुरीची शिक्षा.

सज़ावल (سزاول) वि. (तु.) वसुली करणारा; कर वसूल करणारा.

सजियः (سجیہ) पु. ('अ.) स्वभाव; प्रकृती.

सज़ीदः (سزیدہ) वि. (फ़ा.) लायक; योग्य; पात्र.

सज्जाद (سجّاد) वि. ('अ.) खूप सज्दे (प्रणाम) करणारा; मोठा ईश्वरोपासक.

सज्जादः (سجّادہ) पु. ('अ.) (१) एखाद्या मोठ्या पीराची किंवा फकिराची गादी. (२) जिच्यावर नमाज पढतात ती सतरंजी किंवा चटई. **-नशीं**

(نشیں –) वि. ('अ.) पीर अथवा फकीर यांच्या गादीवर बसणारा.

सज्दः (سجدہ) पु. ('अ.) (१) डोके टेकणे; मस्तक नमविणे. (२) ईश्वराला प्रणाम करणे; नमाज पढताना डोके टेकणे. **–गाह** (گاہ –) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) प्रणाम करण्याचे स्थान. (२) शिया लोक नमाज पढताना जिच्यावर डोके टेकतात ती लाकडी किंवा मातीची गोल चकती. **–गुजार** (گزار –); **–रेज** (ریز –) वि. ('अ. + फ़ा.) प्रणाम करणारा; नमाज पढणारा.

सज्दः-ए-रिया'ई (سجدۂ ریائی) पु. ('अ.+फ़ा.) खोटा प्रणाम; वरवरची नमाज.

सतर (ستر) पु. (फ़ा.) (१) अस्तर (२) खेचर.

सतर (سطر) स्त्री. ('अ.) (१) रेघ; रेषा. (२) ओळ; रांग. **–बंदी** (بندی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) रेखा; ओळी मारणे.

सतरबन (سترون) स्त्री. (फ़ा.) वंध्या; वांझ स्त्री.

सतवत (سطوت) स्त्री. ('अ.) (१) धाक; भीती. (२) तेज; प्रताप; सामर्थ्य.

सतह (سطح) स्त्री. ('अ.) (१) पृष्ठभाग; सपाटी. (२) विस्तार; व्याप.

सतह-ए-आब (سطح آب) स्त्री. ('अ. + फ़ा.) (१) पाण्याची पातळी. (२) समुद्रसपाटी.

सतह-ए-मुस्तवी (سطح مستوی) स्त्री. ('अ.) सपाट, समतल पृष्ठभाग.

सतही (سطحی) वि. ('अ.) वरवरचा; बाह्य.

सतूह (سطوح) पु. ('अ.) प्रत्येक वस्तूचा पृष्ठभाग.

सत्तार (ستار) वि. ('अ.) पांघरूण घालणारा; दोष झाकणारा. (पु.) परमेश्वर.

सत्र (ستر) पु. ('अ.) (१) लपविणे; आडपडदा. (२) स्त्रीचे गुह्यांग. (वि.) लपविलेला.

सद (صد) वि. (फ़ा.) शंभर; एकशे. **–आफ़रीं** (آفریں –) अव्य. (फ़ा.) शेकडो धन्यवाद. **–चाक** (چاک –); **–पारः** (پارہ –) वि. (फ़ा.) शेकडो तुकडे झालेला; चिंध्या झालेला. **–पा** (پا –) पु. (फ़ा.) गोम (किडा). **–बर्ग** (برگ –) पु. (फ़ा.) शंभर पाकळ्यांचे फूल; शतदल; झेंडू. **–बार** (بار –) अव्य. (फ़ा.) शंभर वेळा; अनेकदा. **–रहमत** (رحمت –) अव्य. (फ़ा.+'अ.) (१) ईश्वराची किती कृपा! (२) धन्य! (३) शाबास! **–हा** (ہا –) वि. (फ़ा.) शेकडो; अनेक.

सदक़ः (صدقہ) पु. ('अ.) (१) दान; खैरात; समर्पण. (२) ओवाळून टाकणे.

सदफ़ (صدف) स्त्री. ('अ.) शिप; शुक्ती.

चश्म-ए-तर अश्क से दामन मेरा भर देती है।
कैसे कैसे यह सदफ़ मुझ को गुहर देती है॥

सदफ़-ए-पेचाक (صدف پیچاک) पु. स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) शंख. (२) गोगलगाय.

सदफ़-ए-मर्वारीद (صدف مروارید) स्त्री. ('अ.+फ़ा.)

सदफ़-ए-सादिक़ (صدف صادق) स्त्री. ('अ.) मोती असलेला शिपला; मुक्ताशुक्ती.

सदा (صدا) स्त्री. ('अ.) (१) आवाज; ध्वनी. (२) प्रतिध्वनी. (३) फकीर किंवा बैरागी यांचा याचनेचा ध्वनी; मागणे.

सदा-ए-गुंबद (صدائے گنبد); **सदा-ए-बाज़गश्त** (صدائے بازگشت) स्त्री. ('अ.+फ़ा.) प्रतिध्वनी.

सदाक़त (صداقت) स्त्री. ('अ.) (१) खरेपणा; सत्यता. (२) मैत्री. (३) यथार्थता. **–केश** (کیش –); **–मआब** (مآب –) वि. ('अ.) **–मदार** (مدار –) वि. ('अ.+फ़ा.) सत्यनिष्ठ; सत्यपाल; धर्मनिष्ठ.

सदारत (صدارت) स्त्री. ('अ.) अध्यक्षता; अध्यक्षपद.

सदी (صدی) स्त्री. ('अ.) शताब्दी; शतक.

सदीक़ (صدیق) वि. ('अ.) मित्र; दोस्त.

सद् (سد) पु. ('अ.) (१) अडथळा. (२) आडपडदा. (स्त्री.) भित.

सद्द-ए-बाब (سد باب) पु. ('अ.) (१) मनाई; बंदी. (२) निवारण.

सद्द-ए-रमक़ (سد رمق) वि. ('अ.) किंचिन्मात्र; थोडासा. (पु.) प्राण जाण्यातील अडथळा: मृत्यूच्या यातना.

सद्द-ए-राह (سد راہ) स्त्री. ('अ.+फ़ा.) रस्त्यातील धोंड; अडथळा; (वि.) बाधक.

सद्द-ए-सिकंदर (سد سکندر) स्त्री. ('अ.) (१) चीनची मोठी भित. (२) अलेक्झांडरने बांधविलेली प्रचंड भित (काल्पनिक). (३) अत्यंत मजबूत वस्तू.

सद्दः (سدہ) पु. ('अ.) इराणी लोकांचा एक महोत्सव.

सदमः (صدمہ) पु. ('अ.) (१) आघात; धक्का. (२) दुःख; शोक. (३) पश्चात्ताप. (४) यातना; पीडा. [अनेक 'सदमात' (صدمات)].

सद्र (صدر) पु. ('अ.) (१) अध्यक्ष; सभापती; प्रधान. (२) केंद्रीय, मुख्य स्थान; सदर मुक्काम. (३) छावणी; कँप. (४) छाती; वक्षस्थळ. (५) घराचा पुढील भाग; आंगण. (वि.) (१) मुख्य; प्रमुख. (२) मोठा; महान. (३) खास; विशेष. **–नशीं** (نشیں –) पु. ('अ.) अध्यक्ष. (वि.) अग्रगण्य. **–मक़ाम** (مقام –) पु. ('अ.) (१) मुख्य ठिकाण. (२) राजधानी.

सद्र-उस्-सदूर (صدر الصدور) पु. ('अ.) सरन्यायाधीश.

सद्र-ए-अमीन (صدر امین) पु. ('अ.) दुय्यम न्यायाधीश.

सद्र-ए-अ'अला (صدر اعلیٰ) पु. ('अ.) मुख्य न्यायाधीश; सेशन-जज्ज; सब-जज्ज.

सद्र-ए-जहाँ (صدر جہاں) पु. ('अ.+फ़ा.) (१) जगाचा प्रमुख. (२) एक काल्पनिक साधू.

सद्र-ए-दीवान (صدر دیوان) पु. ('अ. + फ़ा.) (१) पंतप्रधान. (२) महाकोषाध्यक्ष; मुख्य खजीनदार.

सद्री (صدری) स्त्री. ('अ.) (१) कोपरी; गंजी. (२) चोळी. (३) जाकीट; बंडी. (वि.) छाती-संबंधीचा.

सद्रः (صدرہ) पु. ('अ.) (१) छाती झाकणारी बंडी. (२) हाफशर्ट; कोपरी. (३) जाकीट.

सन (سن) पु. ('अ.) (१) वर्ष; संवत्सर. (२) संवत; सन.

सन-ए-'ओसवी (سن عیسوی) पु. ('अ.) इसवी सन.

सन-ए-हिज्री (سن ہجری) पु. ('अ.) हजरत मुहम्मद पैगंबर मक्केहून मदीनेला गेले, त्या दिवसापासून सुरू झालेला संवत.

सन'अत (صنعت) स्त्री. ('अ.) (१) कला; शिल्प. (२) कारागिरी. (३) उद्योग. (४) अलंकार; शब्दालंकार.

सन'अती (صنعتی) वि. ('अ.) (१) औद्योगिक. (२) कलाविषयक.

सनद (سند) स्त्री. ('अ.) (१) पुरावा; प्रमाण. (२) प्रमाणपत्र; सर्टिफिकेट; दाखला; सनद. (३) आश्रय; आधार. (४) उदाहरण; नमुना. (५) आदर्श. (६) पदवी; डिग्री. **–याफ़्तः** (یافتہ –) वि. ('अ.+फ़ा.) (१) पदवीधर; ग्रॅज्युएट. (२) प्रमाणपत्र मिळविलेला.

सनद-ए-फ़दीलत (سند فضیلت); **सनद-ए-फ़राग़त** (سند فراغت) स्त्री. ('अ.) एखाद्या विषयात पारंगत झाल्याबद्दल मिळालेली पदवी.

सनदन् (سنداً) अव्य. ('अ.) (१) उदाहरणार्थ. (२) पुरावा म्हणून.

सनदी (سندی) वि. ('अ.) प्रमाणित; सप्रमाण.

सनम (صنم) पु. ('अ.) (१) मूर्ती; प्रतिमा. (२) प्रेयसी; माषूक. **–कदः** (کدہ –); **–खानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) (१) मंदीर; मूर्तिगृह. (२) प्रेयसीचे निवासस्थान. **–परस्त** (پرست –) वि. ('अ.+फ़ा.) मूर्तिपूजक.

सनवात (سنوات) पु. ['अ. 'सन' (سن) चे अनेक.] वर्षे.

सनवी (سنوی) वि. ('अ.) (१) वर्षाचा. (२) वार्षिक.

सना (ثنا) स्त्री. ('अ.) (१) स्तुती; प्रार्थना; प्रशंसा. (२) मुहम्मद साहेबांचे गुणगान.

सना (سنا) स्त्री. (फ़ा.) एका रेचक वनौषधीची पाने; सोनामुखी.

सना'ए'अ (صنائع) पु. ['अ. 'सन'अत' (صنعت) चे अनेक.] (१) कला; कलाकौशल्ये; कारागिऱ्या. (२) अलंकार; शब्दालंकार. **–बदा'ए'अ** (بدائع –) पु. ('अ.) (१) अद्भुत कलाकौशल्ये. (२) अलंकार-युक्त भाषा; साहित्यातील अनेक अलंकार; अलंकार-शास्त्र.

सनीन (سنین) पु. ['अ. 'सन' (سن) चे अनेक.] वर्षे.

सनून (سنون) पु. ('अ.) दंतमंजन.

सनोबर (صنوبر) पु. (फ़ा.) चीड (वृक्ष); देवदार; सुरू.

सनः (سنہ) पु. ('अ.) (१) वर्ष; संवत्सर. (२) संवत; सन.

सन्ना'अ (صناع) वि. ('अ.) (१) कारागीर; कुशल. (२) कलावंत; शिल्पकार.

सन्ना'ई (صناعی) स्त्री. ('अ.) कारागिरी; कला; हस्तकला.

सपंद (سپند) पु. (फ़ा.) दृष्ट काढण्यासाठी वापरले जाणारे एक बी; मोहरी.

सपेद (سپید) वि. (फ़ा.) शुभ्र; पांढरा. पहा 'सफेद' (दो. शु.).

सफ़ (صف) स्त्री. ('अ.) (१) ओळ; रांग; पंक्ती. (२) रेषा; रेघ. (३) लांब चटई. **–आरा** (آرا –) वि. ('अ.+फ़ा.) (१) युद्धासाठी सैन्य सज्ज करणारा; सैन्याची रांग बनविणारा. (२) युद्धास सज्ज झालेला; समोर उभा ठाकलेला (युद्धासाठी). **–आरा'ई** (آرائی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) युद्धास सज्ज होणे, करणे. (२) कवायत करणे. (३) रांगा बनविणे. **–कशी** (کشی –) स्त्री. ('अ. + फ़ा.) सैन्याची रचना (युद्धासाठी); चढाई; हल्ला. **–दर** (در –) वि. ('अ.+फ़ा.) सैन्याची फळी फोडणारा; महारथी; शूर. (पु.) हजरत अली. **–बंदी** (بندی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) सैन्याच्या रांगा करणे; युद्धासाठी सैन्य सुसज्ज करणे. **–बस्तः** (بستہ –) वि. ('अ.+फ़ा.) पंक्तिबद्ध; ओळीने उभे केलेले.

सफ़-ए-जंग (صف جنگ) स्त्री. ('अ.+फ़ा.) सैन्याची रांग; मोर्चा; रणांगण.

सफ़-ए-नि'आल (صف نعال) स्त्री. ('अ.) वहाणा ठेवण्याची जागा; सर्वांत खालची जागा.

सफ़-ए-मातम (صف ماتم) स्त्री. ('अ.+फ़ा.) मृत्युशोक व्यक्त करण्यासाठी लोक जेथे एकत्र जमतात ती चटई किंवा सतरंजी.

सफ़र (صفر) पु. ('अ.) अरबी वर्षाचा दुसरा महिना.

सफ़र (سفر) पु. ('अ.) (१) प्रवास; पर्यटन. (२) प्रस्थान; कूच. **–खर्च** (خرچ –) पु. ('अ.+फ़ा.) प्रवासखर्च. **–नामः** (نامہ –) पु. ('अ.+फ़ा.) प्रवासवर्णनाचे पुस्तक.

सफ़र-ए-आख़िरत (سفر آخرت) पु. ('अ.) अंतिम यात्रा; मृत्यू.

सफ़रजल (سفرجل) पु. ('अ.) पेरूसारखे एक फळ.

सफ़रा (صفرا) पु. ('अ.) पित्त (दोष). **–वी** (وی –) वि. ('अ.) पित्ताशी संबंधित. **–शिकन** (شکن –) वि. ('अ.+फ़ा.) पित्तनाशक.

सफ़री (سفری) वि. ('अ.) (१) प्रवासाचा; प्रवासाशी संबंधित. (पु.) (२) प्रवासातील तरतूद; पाथेय; पेरू (फळ).

सफ़रः (سفرہ) पु. ('अ.) ज्यावर ताटे ठेवून जेवण करतात ते कापड, टेबलक्लॉथ. **–ची** (چی –) पु. ('अ.+फ़ा.) वाढपी.

सफ़वी (صفوی) वि. ('अ.) इराणमधील एक सत्पुरुष 'शाह सफ़ी' यांच्याशी संबंधित. (यांचे वंशज पुढे इराणचे राजे झाले).

सफ़हः (صفحہ) पु. ('अ.) (१) पुस्तकाचे पान; पृष्ठ. (२) पृष्ठभाग.

सफ़हः-ए-हस्ती (صفحۂ ہستی) पु. ('अ. + फ़ा.) अस्तित्वरूपी पृष्ठ (पान); जग.

सफ़ा (صفا) स्त्री. ('अ.) (१) स्वच्छता; सफाई. (२) पावित्र्य. (वि.) (१) पवित्र. (२) स्वच्छ. (अव्य.) स्पष्टपणे; निक्षून. **–केश** (کیش –) वि. ('अ.+फ़ा.) सदाचारी; शुद्धात्मा.

सफ़ा'ई (صفائی) स्त्री. ('अ.) (१) स्वच्छता; निर्मळपणा. (२) पावित्र्य. (३) निर्दोषता. (४) स्पष्टता. (५) सरळपणा; सांधेपणा. (६) बाकी न ठेवणे. (७) बचाव; कैफियत (न्यायालयातील). (८) निर्लज्जपणा.

सफ़ाहत (سفاہت) स्त्री. ('अ.) (१) मूर्खपणा. (२) नीचता; अधमता.

सफ़ियः (صفیہ) स्त्री. ('अ.) (१) शुद्ध अंतःकरणाची. (२) मुहम्मद पैगंबरांच्या एका पत्नीचे नाव.

सफ़ी (صفی) वि. ('अ.) (१) स्वच्छ; निर्मळ. (२) शुद्ध; पवित्र. (३) मित्र; सहकारी. (पु.) (१) इराणचे एक सत्पुरुष. (२) हजरत आदम. **–उल्-लह्** (اللہ –) पु. ('अ.) ईश्वराचा मित्र; हजरत आदम.

सफ़ीनः (سفینہ) पु. ('अ.) (१) नाव; नौका; होडी. (२) परवानगी; आज्ञापत्र. (३) कविता-संग्रह. (४) स्मरणवही; स्मरणपत्र.

सफ़ीर (سفیر) पु. ('अ.) (१) पत्रवाहक दूत. (२) राजदूत; परराष्ट्रीय वकील.

सफ़ीर (صفیر) स्त्री. ('अ.) (१) पक्ष्यांची किलबिल. (२) शीळ.

सफ़ीह् (سفیہ) वि. ('अ.) (१) मूर्ख; अडाणी. (२) नादान; अधम; नीच.

सफ़ूफ़ (سفوف) पु. ('अ.) चूर्ण; पूड; भुकटी.

सफ़ेद (سفید) वि. (फ़ा.) (१) शुभ्र; पांढरा. (२) गोरा. (३) कोरा; साधा. (४) भीतीने फिक्का पडलेला. **–चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) निर्लज्ज. **–पोश** (پوش –) वि. (फ़ा.) (१) पांढरे कपडे घालणारा; श्वेतांबर. (२) पांढरपेशा. (३) सज्जन. **–बख़्त** (بخت –) वि. (फ़ा.) भाग्यवान.

सफ़ेदी (سفیدی) स्त्री. (फ़ा.) (१) शुभ्रपणा; पांढरेपणा. (२) भिंतीना चुन्याचा रंग देणे.

सफ़ेदः (سفیدہ) पु. (फ़ा.) (१) सफेता; जस्तफूल; (२) पांढरेपणा. (३) आंबा व टरबूज यांची एक जात.

सफ़्क (سفک) पु. ('अ.) रक्तपात; हिंसा; कत्तल.

सफ़्फ़ाक (سفاک) वि. ('अ.) (१) रक्तपात, कत्तल करणारा. (२) क्रूर; निर्दय.

सफ़्फ़ाकी (سفاکی) स्त्री. ('अ.) (१) रक्तपात; हिंसा. (२) जुलूम.

सफ़्लां (سفلی) वि. ('अ.) खालचा; हलका; हलकट; नीच.

सब'अ (سبع); **सब'अः** (سبعہ) वि. ('अ.) सात (७).

सबक़ (سبق) पु. ('अ.) (१) पाठ; धडा. (२) बोध; शिकवण; उपदेश. (३) अद्दल; शिक्षा. **–आमोज़** (آموز –) वि. ('अ.+फ़ा.) बोधप्रद; उपदेशप्रद.

सबक़त (سبقت) स्त्री. ('अ.) (१) पुढे जाणे; पुढाकार. (२) वरचढपणा; श्रेष्ठत्व. **–ले जाना** (لے جانا –) वरचढ ठरणे; पुढे जाणे; मागे टाकणे.

सबद (سبد) स्त्री. (फ़ा.) टोपली.

सबब (سبب) पु. ('अ.) (१) कारण. (२) साधन. (३) सबब.

सबल (سبل) पु. ('अ.) मोतीबिंदू (नेत्ररोग).

सबा (صبا) स्त्री. ('अ.) सकाळी पूर्वेकडून वाहाणारा मंद वारा; समीर. **–ख़िराम** (خرام –) वि. ('अ.+फ़ा.) सकाळच्या वाऱ्याप्रमाणे हळूहळू व नखऱ्यात चालणारा (री); गजगामिनी.

सबात (ثبات) पु. ('अ.) (१) दृढता; स्थिरता. (२) चिरस्थायित्व.

सबाह् (صباح) स्त्री. ('अ.) प्रातःकाळ; पहाट; प्रभात. (वि.) गोरा; सुंदर.

सबाह्-उल्-खैर (صباح الخير) अव्य. ('अ.) सुप्रभातम्.

सबाहत (صباحت) स्त्री. ('अ.) (१)गोरेपणा; शुभ्रता. (२) सौंदर्य; रूप.

सबी (صبی) पु. ('अ.) (१) लहान मूल; मातेचे दूध पिण्याचे बंद झालेले मूल. (२) अंगावर दूध पिणारे मूल. (३) तरुण.

सबील (سبیل) स्त्री. ('अ.) (१) मार्ग; रस्ता. (२) उपाय; युक्ती. (३) पद्धती; शैली. (४)पाणपोई; मोहरममध्ये सरबत देण्याचे स्थान.

सबीह् (صبیح) वि. ('अ.) गोरापान; सुंदर; रूपवान.

सबुक (سبک) वि. (फ़ा.) (१) हलका. (२) चलाख; चपळ. पाहा 'सुबुक' (दो. शु.).

सबू (سبو) पु. (फ़ा.) (१) घडा; घागर. (२)मद्यघट; मदिरेचे गाडगे. **–कश** (کش –) वि.(फ़ा.) घागरभर दारू पिणारा; पक्का दारुडा. **–चः** (چہ –) पु. (फ़ा.) लहान घागर; कळशी; गाडगे. **–साज़** (ساز –) वि. (फ़ा.) कुंभार.

सबूत (ثبوت) पु. ('अ.) पुरावा; आधार.

सबूर (صبور) वि. ('अ.) धैर्यवान; धीर धरणारा.

सबूरी (صبوری) स्त्री. ('अ.) धैर्य; धीर.

सबूस (سبوس) स्त्री. (फ़ा.) कोंडा; भुसा.

सबूह् (صبوح) वि. ('अ.) भल्या सकाळी पिण्याची मदिरा.

सबूही (صبوحی) स्त्री. ('अ.) सकाळी पिण्याची दारू.

सब्ग़ (صبغ) पु. ('अ.) रंगविणे.

सब्ज़ (سبز) वि. (फ़ा.) (१) हिरवा. (२) कच्चा. (३) ताजा. (४) शुभ. **–क़दम** (قدم –) वि. (फ़ा.+'अ.) **–पा** (پا –) वि. (फ़ा.) पांढऱ्या पायाचा; अपशकुनी. **–पोश** (پوش –) वि. (फ़ा.) (१) हिरवे कपडे परिधान केलेला. (२) शोकसूचक कपडे घातलेला. **–फ़ाम** (فام –) वि. (फ़ा.) हिरवा; हरितांग. **–बख़्त** (بخت –) वि. (फ़ा.) भाग्यवान. **–बाग़ दिखलाना** (باغ دکھلانا –) लालूच दाखविणे; फसविणे.

सब्ज़ान-ए-चमन (سبزان چمن) पु. (फ़ा.) बागेतील झाडे.

सब्ज़ी (سبزی) स्त्री. (फ़ा.) (१) हिरवेपणा; हिरवा रंग. (२)हिरवळ. (३)भाजी; पालेभाजी. (४)भांग (मादक पदार्थ). **–ख़ोर** (خور –) वि. (फ़ा.) शाकाहारी. **–मंडी** (منڈی –) स्त्री. (फ़ा.+हि.) मंडई; भाजीबाजार.

सब्ज़ः (سبزہ) पु. (फ़ा.) (१) हिरवळ. (२) हिरव्या (करडया) रंगाचा घोडा. (३) सबजा; भांग. (४) कानातील हिरवे रत्न; लोलक. (५) पन्ना. (६) नीलकंठ(पक्षी). (७) नुकतीच उगवलेली दाढी व मिसरूड. **–आग़ाज़** (آغاز –) वि. (फ़ा.) मिसरूड फुटू लागलेला. **–ख़त़** (خط –) वि. (फ़ा.) मिसरूड फुटलेला. **–ज़ार** (زار –) पु. (फ़ा.) हिरवळ असलेले मैदान; कुरण.

सब्त़ (ثبت) स्त्री. ('अ.) (१) लेखन; लिखाण. (२) अंकित करणे; कोरणे. (३) शिक्का; मोहोर. (४) निश्चितपणा; दृढता.

सब्त (سبت) पु. ('अ.) शनिवार.

सब्ब (صب) पु. ('अ.) (१) पाणी वाहविणे. (२) मोहित होणे.

सब्ब (سب) स्त्री. ('अ.) (१) शिवीगाळी; अपशब्द. (२) कापणे; भाला मारणे.

सब्ब-ओ-शतम (سب و شتم) पु. ('अ.) शिवीगाळी.

सब्बाक (سباک) वि. ('अ.) (१) सोनार. (२) नाणी पाडणारा.

सब्बाग़ (صباغ) वि. ('अ.) रंगारी; रंगविणारा.

सब्बाबः (سبابہ) स्त्री. ('अ.) तर्जनी; अंगठ्याजवळचे बोट.

सब्बाह् (سباح) वि. ('अ.) पोहणारा; जलतरणपटू.

सब्बियः (صبیہ) स्त्री. ('अ.) मातेचे दूध पिणारी मुलगी.

सब्बी (صبی) पु. ('अ.) तान्हे मूल; आईच्या अंगावर पिणारे मूल.

सब्बूह् (سبوح) वि. ('अ.) स्तुती, प्रशंसा, गुणगान करणारा.

सब्र (صبر) पु. ('अ.) धीर; धैर्य; सबुरी; सहनशक्ती. **–आज़मा** (آزما –) वि. ('अ.+फ़ा.) सहनशक्तीची परीक्षा घेणारा; खूप विलंब लागणारे (काम).

समंद (سمند) पु. (फ़ा.) उत्तम जातीचा घोडा; अश्व.

समंदर (سمندر) पु. (फ़ा.) अग्नीतून उत्पन्न होणारा उंदरासारखा एक प्राणी. (आगीतून बाहेर पडताच हा मरतो).

सम (سم) पु. ('अ.) (१) विष; जहर. (२) सुईचे नेढे.

सम'अ (سمع) पु. स्त्री. ('अ.) (१) श्रवण; ऐकणे. (२) कान. **–ख़राश** (خراش –) वि. ('अ.+फ़ा.) कान किटविणारा; व्यर्थ वडबड करणारा.

समक (سمک) स्त्री. ('अ.) (१) मासा; मत्स्य. (२) ज्याच्या पाठीवर ही पृथ्वी आधारलेली आहे तो मासा. (३) पृथ्वीचा सर्वांत खालचा भाग.

समद (صمد) वि. ('अ.) श्रेष्ठ; पूज्य; निस्पृह; अनश्वर; ज्याच्यावर सर्व अवलंबून आहेत पण जो कोणावरही अवलंबून नाही असा; ईश्वर.

सम्दियत (صمدیت) स्त्री. ('अ.) श्रेष्ठत्व; निस्पृहता.

सम्न (ثمن) पु. ('अ.) मूल्य; किमत. (इं.) समन्स; कोर्टाचा हुकूम.

समन (سمن) स्त्री. ('अ.) चमेली; फूल. **–अंदाम** (اندام –) वि. (फ़ा.) चमेलीप्रमाणे गोरापान रंग असलेला (ली). **–साक़** (ساق –) वि. (फ़ा.) चमेलीसारख्या गोऱ्या पिंडऱ्या असलेली सुंदरी.

सम्म (صمم) पु. ('अ.) बधिरता; बहिरेपणा.

समर (سمر) पु. ('अ.) कथा; कहाणी.

.सम्र (ثمر); **सम्रः** (ثمرة) पु. ('अ.) (१) फळ. (२) लाभ; चांगला परिणाम. (३) संतती. (४) धन; संपत्ती. (५) मोबदला; प्रतिफळ. [अनेक 'सम्रात' (ثمرات)].

समाँ (سماں) पु. ('अ.) (१) दृश्य; सुंदर देखावा. (२) रागरंग. (३) वेळ.

समा (سما) पु. ('अ.) आकाश; आभाळ.

समा'अ (سماع) पु. ('अ.) (१) श्रवण; ऐकणे. (२) तन्मय होऊन मान डोलावणे.

समा'अत (سماعت) स्त्री. ('अ.) (१) श्रवण; ऐकणे. (२) श्रवणशक्ती. (३) सुनावणी (खटल्याची).

समा'ई (سماعی) वि. ('अ.) (१) ऐकलेला. (२) अनियामक (व्या.).

समाक़ (سماق) पु. ('अ.) एक प्रकारचा टणक व पांढरा दगड. (याचे खलबत्ते अत्यंत मौल्यवान असतात).

समाजत (سماجت) स्त्री. ('अ.) (१) खुशामत; अजीजी; विनंती. (२) निकृष्टता.

सम्नियः (ثمانیہ) वि. ('अ.) आठ (८).

सम्नीन (ثمانین) वि. ('अ.) ऐंशी (८०).

समावात (سماوات) पु. ['अ. 'समा' (سما) चे अनेक.] आकाशे; आभाळे.

समावार (سماوار) पु. (फ़ा.) चहा उकळविण्याचे बंबासारखे, तोटी असलेले भांडे.

समावी (سماوی) वि. ('अ.) (१) अस्मानी; आकाशाचा; वरचा. (२) दैवी.

समाह् (سماح) पुं. **समाहत** (سماحت) स्त्री. ('अ.) दानशूरता; उदारता.

सम्मी (سمی) वि. ('अ.) (१) नावाचा; नाव ठेवलेला. (२) एकच नाव असलेले; सहनाम. (३) समान; तुल्य.

सम्मी'अ (سمیع) वि. ('अ.) (१) ऐकणारा; ईश्वर. (२) ऐकविणारा.

सम्मीन (سمین) वि. ('अ.) लठ्ठ; गुबगुबीत.

सम्मीन (ثمین) वि. ('अ.) मौल्यवान; महाग.

सम्मोम (صمیم) वि. ('अ.) (१) निर्मळ; शुद्ध; निर्भेळ. (२) प्रामाणिक; सच्चा.

सम्मीर (ثمیر) वि. ('अ.) फळझाड; फळे येणारा.

समूम (سموم) स्त्री. ('अ.) विषारी वारा; उन्हाच्या झळा; गरम वारे.

समूर (سمور) पु. ('अ.) (१) ज्याच्या कातडयाची उत्कृष्ट 'फर' (केसाळ कातडे) बनते असा एक पशू. (२) फर (केसाळ कातडे).

समोसः (سموسہ) पु. (फ़ा.) (१) त्रिकोण. (२) सामोसा (पक्वान्न). (३) त्रिकोणी घडी घातलेला कपडा.

सम्त (صمت) पु. ('अ.) स्तब्धता; शांतता; मौन.

सम्त (سمت) स्त्री. ('अ.) (१) दिशा; बाजू. (२) सदाचार. (३) सरळ मार्ग. (४) आकृती. (५) इरादा; संकल्प.

सम्त-उर्-रास (سمت الراس) स्त्री. ('अ.) (१) खमध्य. (२) कळस; अत्युच्च स्थान; पराकाष्ठा.

सम्म (سم) पु. ('अ.) विष; जहर.

सम्म-उल्-फ़ार (سم الفار) पु. ('अ.) सोमल (विष).

सम्म-ए-क़ातिल (سم قاتل) पु. ('अ.) प्राणघातक विष.

सम्मी (سمی) वि. ('अ.) (१) विषारी. (२) पाहा 'समी'.

सम्साम (صمصام) स्त्री. ('अ.) तीक्ष्ण धार असलेली तलवार.

सय्याद (صیاد) वि. पु. ('अ.) (१) शिकारी. (२) व्याध. (३) पारधी.

सय्याद-ए-अजल (صیاد اجل) पु. ('अ.) मृत्युरूपी व्याध.

सय्याफ़ (سیاف) वि. ('अ.) (१) तलवार चालविणारा. (२) कत्तल करणारा; मांग.

सय्यार (سیار) वि. ('अ.) फिरणारा; मुसाफीर; भटक्या. (पु.) फिरणारा तारा; ग्रह.

सय्यारः (سیارہ) पु. ('अ.) (१) ग्रह तारा. (२) प्रवासी; मुसाफीर.

सय्याल (سیال) वि. ('अ.) तरल; प्रवाही.

सय्याह् (سیاح) वि. ('अ.) प्रवास करणारा; भटकणारा; फिरस्ता.

सय्याही (سیاحی) स्त्री. ('अ.) प्रवास; पर्यटन.

सर (سر) पु. (फ़ा.) (१) डोके; शिर. (२) सरदार; नेता. (३) अत्युच्च भाग; शिखर; अग्रभाग. (४) प्रारंभ. (५) चिंतन; विचार. (६) जोर; सामर्थ्य. (७) अभिलाषा; इच्छा; इरादा. (८) शीर्षक. (वि.) श्रेष्ठ; उत्तम; प्रमुख. (अव्य.) (१) वर. (२) अवलंबून; सोपविलेला; स्वाधीन. **–अंगश्त**

(انگشت –) स्त्री. (फ़ा.) बोटाचे पेर; बोटाचा अग्रभाग. **–अंजाम** (انجام –) पु. (फ़ा.) (१) समाप्ती; परिपूर्ती. (२) परिणाम; निष्कर्ष. (३) व्यवस्था. (४) सामग्री; सामान; सरंजाम. **–अंदाज** (انداز –) पु. (फ़ा.) (१) ओढणी. (२) घुंघट; पदर (डोकीवरून घेतलेला). (वि.) नखऱ्यात चालणारा (री). **–अफ़गंदः** (افگندہ –) वि. (फ़ा.) (१) मान खाली घातलेला; लज्जित; शरमिंदा. (२) गप्प. (३) घमेंडखोर. **–अफ़राज़** (افراز –) वि. (फ़ा.) (१) मस्तक उंच असलेला; उच्च पदस्थ. (२) घमेंडखोर. **–आग़ाज़** (آغاز –) पु. (फ़ा.) (१) अध्यक्ष; सरदार. (२) पती; पु. (फ़ा.) (१) शीर्षक. (२) कपाळ. **–आमद** (آمد –) स्वामी (वि.) (१) सर्वश्रेष्ठ; उत्तम. (२) परिपूर्ण; संपूर्ण. **–कर्दगी** (کردگی –) स्त्री. (फ़ा.) नेतृत्व; पुढारीपण. **–कर्दः** (کردہ –) वि. (फ़ा.) नेता; पुढारी. **–कश** (کش –) वि. (फ़ा.) (१) बंडखोर; आज्ञा न मानणारा. (२) उद्धट; अशिष्ट; असंस्कृत; फटकळ. (३) स्वैर. **–कशी** (کشی –) स्त्री. (फ़ा.) (१) अवज्ञा; बंडखोरी. (२) उद्धटपणा; फटकळपणा. **–कोब** (کوب –) वि. (फ़ा.) डोके ठेचणारा; मुस्कटदाबी करणारा. **–कोबी** (کوبی –) स्त्री. (फ़ा.) (१) शिक्षा. (२) दडपशाही. **–ख़त्** (خط –) पु. (फ़ा.) (१) भाडेचिठ्ठी. (२) नोकराचा पगार वगैरे लिहिलेला कागद. (३) आज्ञापत्र; परवाना. (४) कर्जखत. (५) हिशेबाचा कागद. (६) करारनामा. **–ख़ुद** (خود –) वि. (फ़ा.) स्वतंत्र. **–ख़ुश** (خوش –) वि. (फ़ा.) मद्याच्या किंचित धुंदीत असलेला; मजेत असलेला. **–ख़ैल** (خیل –) वि. (फ़ा.) नायक; सरदार. **–ग़नः** (غنہ –) वि. (फ़ा.) सरदार; अग्रणी. **–गरदां** (گرداں –) वि. (फ़ा.) (१) हैराण; त्रस्त. (२) वाट चुकलेला. **–गर्म** (گرم –) वि. (फ़ा.) (१) तन्मय; तल्लीन. (२) तत्पर; उत्साही. **–गर्मी** (گرمی –) स्त्री. (फ़ा.) (१) उत्साह; चपळता. (२) तन्मयता. (३) तत्परता. **–गश्तगी** (گشتگی –) स्त्री. (फ़ा.) (१) उद्विग्नता. (२) वाटे चुकणे. **–गश्तः** (گشتہ –) वि. (फ़ा.) (१) उद्विग्न; हैराण. (२) वाट चुकलेला. **–गिरां** (گراں –) वि. (फ़ा.) (१) रुष्ट; क्रुद्ध. (२) घमेंडखोर. **–गिरानी** (گرانی –) स्त्री. (फ़ा.) (१) रोष; क्रोध. (२) घमेंड. **–गुज़श्त** (گزشت –) स्त्री. (फ़ा.) (१) घटना; प्रसंग. (२) वृत्तांत; हकीगत; जीवनचरित्र. (३) स्वानुभव. **–गुरोह** (گروہ –) वि. (फ़ा.) पुढारी; नायक. **–गोशी** (گوشی –) स्त्री. (फ़ा.) कानगोष्टी; कुजबुज. **–चंग** (چنگ –) पु. (फ़ा.) थप्पड. **–चश्मः** (چشمہ –) पु. (फ़ा.) (१) नदीचा उगम. (२) झरा; स्रोत. **–जंग** (جنگ –) पु. (फ़ा.) सेनापती. **–ज़द** (زد –) वि. (फ़ा.) घडलेला; प्रकट; जाहीर. **–ज़दः** (زدہ –) वि. (फ़ा.) निश्चेष्ट; बेशुद्ध. (अव्य.) अचानक; भरघाव. **–ज़न** (زن –) वि (फ़ा.) हुकूम न मानणारा; बंडखोर. **–ज़निश** (زنش –) स्त्री. (फ़ा.) (१) निर्भर्त्सना. (२) तंबी; धमकावणी. **–ज़मीं** (زمیں –) स्त्री. (फ़ा.) (१) देश; मुलूख. (२) भूमी. **–ज़ोर** (زور –) वि. (फ़ा.) (१) शिरजोर; जबरदस्त. (२) बंडखोर; आज्ञा न मानणारा. **–तराश** (تراش –) वि. (फ़ा.) न्हावी. **–ताज** (تاج –) वि. (फ़ा.) (१) शिरोमणी; सर्वश्रेष्ठ. (२) पती. (३) स्वामी; मालक. (४) नायक; सरदार. **–तान** (طان –) पु. ('अ.) पाहा 'सर्तान'. **–ता पा** (تاپا –) अव्य. (फ़ा.) नखशिखांत; आपादमस्तक; सुरुवातीपासून अखेरपर्यंत. **–ताब** (تاب –) वि. (फ़ा.) बंडखोर; उद्दाम. **–ता सर** (تاسر –) वि. (फ़ा.) संपूर्ण. (अव्य.) पूर्णपणे. **–तेज़** (تیز –) वि. (फ़ा.) (१) लढवैया. (२) टोकदार. **–तेज़ः** (تیزہ –) पु. (फ़ा.) संगीन; लांब सुरा. **–दफ़्तर** (دفتر –) वि. पु. (फ़ा.) हेडक्लार्क. वि. पु. (फ़ा.) हेडक्लार्क. **–दर गिरेबां** (درگریباں –) वि. (फ़ा.) विचारात पडलेला. **–दर्द** (درد –); **–दर्दी** (دردی –) स्त्री. (फ़ा.) (१) डोकेदुखी. (२) कटकट; त्रास. (३) परिश्रम. **–ए-दस्त** (دست –) वि. (फ़ा.) तुच्छ; हलका. (पु.) फकिरांच्या हातांतील सोटा. **–नविश्त** (نوشت –) स्त्री. (फ़ा.) (१) भाग्यलेख; नशीब. (२) वृत्तांत. **–नाम** (نام –) वि. (फ़ा.) प्रसिद्ध; नामांकित. **–नामः** (نامہ –) पु. (फ़ा.) (१) पत्रावरील पत्ता. (२) पत्राचा मायना; शीर्षक. **–निगूं** (نگوں –) वि. (फ़ा.) (१) अधोमुख; मान खाली घातलेला. (२) शरमिंदा; लज्जित. **–पंजः** (پنجہ –) पु. (फ़ा.) हाताचा पंजा. (वि.) (१) सामर्थ्यवान. (२) अत्याचारी. **–परस्त** (پرست –) वि. (फ़ा.) (१) पालक; संरक्षक. (२) पक्षपाती; समर्पक. **–परस्ती** (پرستی –) स्त्री. (फ़ा.) (१) देखरेख; संरक्षण. (२) समर्थन. **–पेच** (پیچ –) पु. (फ़ा.) शिरपेच; पगडीला, पागोटघाला लावण्याचा मोत्यांचा तुरा. **–पोश** (پوش –) पु. (फ़ा.) झाकण. **–पोशीदः** (پوشیدہ –) स्त्री. (फ़ा.) कुमारी (मुलगी). **–फ़राज़** (فراز –) वि. (फ़ा.) प्रतिष्ठित; माननीय. **–फ़रोश** (فروش –) वि. (फ़ा.) आपल्या प्राणावर उदार झालेला; आत्मबलिदान करणारा; शूर. **–फ़रोशी** (فروشی –) स्त्री. (फ़ा.) आत्मबलिदान. **–बकफ़** (بکف –) वि. (फ़ा.) तळहातावर शिर घेतलेला; मरणास तयार. **–ब.गिरेबां** (بہ گریباں –) वि. (फ़ा.) (१) विचारात पडलेला. (२) लज्जित. **–बज़ानू** (بزانو –) वि. (फ़ा.) गुडघ्यांत डोके घालून बसलेला; उदास; चिंतित. **–ब.मुहर** (بہ مہر –) वि. (फ़ा.)

शिक्कामोर्तब केलेला; मोहरबंद केलेला. **-बर आवर्दः** (-بر آوردہ) वि. (फ़ा.) प्रतिष्ठित; माननीय; प्रमुख. **-बराह** (-براہ) पु. (फ़ा.) (१) व्यवस्थापक; मुन्शी. (२) मजुरांवरील मुकादम. **-बराह-ए-कार** (-براہ کار) पु. (फ़ा.) (१) कारभारी. (२) एजंट; प्रतिनिधी. **-बराही** (-براہی) स्त्री. (फ़ा.) व्यवस्था; सरबराई. **-बलंब** (-بلند) वि. (फ़ा.) प्रतिष्ठित; श्रेष्ठ. **-बलंदी** (-بلندی) स्त्री. (फ़ा.) (१) प्रतिष्ठा. (२) उत्थान; उन्नती. **-बसर** (-بسر) अव्य. (फ़ा.) अत्यंत; पूर्णपणे; बिलकुल. **-बस्तः** (-بستہ) वि. (फ़ा.) (१) मोहरबंद; बंद केलेला. (२) लपलेला; गुप्त. **-बाज़** (-باز) वि. (फ़ा.) जिवावर उदार झालेला. (पु.) शिपाई. सैनिक. **-बाज़ारी** (-بازاری) वि. (फ़ा.) अधम; नीच; हलकट. **-बाज़ी** (-بازی) स्त्री.(फ़ा.) शौर्य; बहादुरी. **-बाला** (-بالا) वि. (फ़ा.) सरदार; नेता. **-मश्क़** (-مشق) पु.(फ़ा.) (१) कित्ता. (२) अक्षर घटविण्याची फळी किंवा पाटी. **-मस्त** (-مست) वि. (फ़ा.) (१) धुंद; बेहोष. (२) उन्मत्त. **-मायः** (-مایہ) पु. (फ़ा.) (१) भांडवल; मुद्दल. (२) संपत्ती. **-मायःदार** (-مایہ دار) वि. (फ़ा.) भांडवलदार; श्रीमंत. **-मायःदारी** (-مایہ داری) स्त्री. (फ़ा.) भांडवलशाही. **-रिश्तः** (-رشتہ) पु. (फ़ा.) (१) विभाग; खाते. (२) योग्यता. (३) अधिकार. (४) इच्छा. (५) दोरा; सूत्र. **-लश्कर** (-لشکر) वि. (फ़ा.) सेनापती. **-वर** (-ور) वि. (फ़ा.) सरदार; सर्वश्रेष्ठ; नायक. **-वरक़** (-ورق) पु. (फ़ा. + 'अ.) पुस्तकाचे मुखपृष्ठ. **-वर-ए-का'एनात** (-ور کائنات) पु. (फ़ा. + 'अ.) साऱ्या सृष्टीचा नेता; विश्वाचा सरदार; हजरत मुहम्मद पैगंबर. **-शार** (-شار) वि. (फ़ा.) (१) काठोकाठ भरलेला; परिपूर्ण. (२) धुंद; मस्त. **-शीर** (-شیر) स्त्री. (फ़ा.) दुधाची साय; मलई. **-शेब** (-شیب) वि. (फ़ा.) अधोमुख; उपडा. **-सब्ज़** (-سبز) वि. (फ़ा.) (१) हिरवागार; ताजा. (२) समृद्ध; श्रीमंत. (३) सुपीक. (४) सफल; यशस्वी; उन्नतिशील. **-हंग** (-ہنگ) पु. (फ़ा.) (१) सेनापती. (२) सैनिक; शिपाई. (वि.) बंडखोर. **-हद** (-حد) स्त्री. (फ़ा.) सीमा; सरहद्द. **-हदी** (-حدی) वि. (फ़ा.) सरहद्दीवरील; सीमाप्रदेशात राहाणारा. **-हल्क़ः** (-حلقہ) वि. (फ़ा.) सरदार; अध्यक्ष. **-हिसाब** (-حساب) वि. (फ़ा. + 'अ.) (१) सावधान; सूचना दिलेला. (२) परिचित.

सर-ए-दस्त (سر دست) अव्य. (फ़ा.) तत्काळ; आताच; ताबडतोब.

सर-ए-नौ (سر نو) अव्य. (फ़ा.) नव्याने; पुनः; पहिल्यापासून; सुरुवातीपासून.

सर-ए-पा (سر پا) स्त्री. (फ़ा.) ठोकर; ठेच. (पु.) पायाचा अग्रभाग.

सर-ए-बाज़ार (سر بازار) अव्य. (फ़ा.) जाहीररीत्या; उघडपणे.

सर-ए-बाली (سر بالیں) अव्य. (फ़ा.) उशाशी. (पु.) उसे.

सर-ए-मू (سر مو) वि. (फ़ा.) केसाच्या टोकाएवढे; थोडाही; किंचिन्मात्र.

सर-ए-राह (سر راہ) अव्य. (फ़ा.) भर रस्त्यात.

सर-ए-शाम (سر شام) अव्य. (फ़ा.) सायंकाळी. (स्त्री.) संध्याकाळ.

सर-ओ-कार (سروکار) पु. (फ़ा.) (१) संबंध. (२) जरूर; गरज.

सर-ओ-पा (سر و پا) पु.(फ़ा.) डोके व पाय; शेंडा-बुडखा.

सर-ओ-बंद (سر و بند) पु. (फ़ा.) काळ; समय; जमाना.

सर-ओ-बर्ग (سر و برگ) पु. (फ़ा.) ध्यान; लक्ष.

सर-ओ-बुन (سر و بن) पु. (फ़ा.) आदि-अंत. (वि.) संपूर्ण.

सर-ओ-सामान (سر و سامان) पु. (फ़ा.) सामग्री; सामानसुमान; उपकरणे.

सर'अ (صرع) स्त्री. ('अ.) अपस्मार; मूर्च्छा (रोग).

सरआग़ोश (سر آغوش) पु. (फ़ा.) डोक्याच्या केसांवर घालण्याची जाळी.

सरकार (سرکار) स्त्री. (फ़ा.) (१) राज्य; संस्थान. (२) शासक; सत्ताधीश; मालक. (३) राजसत्ता. (४) कचेरी; न्यायालय; दरबार.

सरकारी (سرکاری) वि. (फ़ा.) राज्याचा; राजसत्तेशी संबंधित; सरकारचा.

सरक़ः (سرقہ) पु. ('अ.) चोरी.

सरतान (سرطان) पु. ('अ.) (१) खेकडा. (२) कर्क राशी. (३) एक प्रकारचा टणक फोड; कॅन्सर (रोग).

सरदा (سردا) पु. (फ़ा.) काबुलहून येणारे एक प्रकारचे टरबूज.

सरदार (سردار) पु. (फ़ा.) (१) पुढारी; नायक. (२) अध्यक्ष. (३) सत्ताधीश.

सरदारी (سرداری) स्त्री. (फ़ा.) नेतृत्व; अध्यक्षता.

सरमद (سرمد) वि. (फ़ा.) नित्य; शाश्वत. (पु.) (१) अनंतत्व. (२) ईश्वरत्व; ईश्वर. (३) एक सूफी साधू.

सरमदी (سرمدی) स्त्री. (फ़ा.) नित्यता; शाश्वतता.

सरयान (سریان) पु.(फ़ा.) एका वस्तूचे दुसरीत विलयन.

सरवत (ثروت) स्त्री. ('अ.) (१) श्रीमंती; वैभव; ऐश्वर्य. (२) सत्ता; अधिकार.

सरसर (صرصر) स्त्री. ('अ.) (१) वादळ; वावटळ; सोसाटघाचा वारा. (२) गरम वाऱ्याच्या झळा.

सरसरी (سرسری) अव्य. (फ़ा.) (१) घाईघाईने. (२) वरवर; स्थूलमानाने. (३) सरासरीने. (स्त्री.) घाईने केलेले काम.

सरसाम (سرسام) पु. ('अ.) सन्निपात.

सरॉ (ثرى) पु. ('अ.) (१) जमिनीचा खालचा भाग; पाताळ. (२) ओली माती.

सरा (سرا) स्त्री. (फ़ा.) (१) घर; गृह. (२) धर्मशाळा; पथिकाश्रम. (३) स्थान. (प्रत्य.) गाणारा. [उदा. 'नग़मः सरा' (نغمہ سرا) वि. ('अ.+फ़ा.) सुरेल आवाजात गाणारा].

सरा-ए-फ़ानी (سرائے فانی) स्त्री. (फ़ा. + 'अ.) नश्वर स्थान; मर्त्यलोक.

सरा'इंदः (سرائندہ) वि. (फ़ा.) गाणारा.

सराचः (سراچہ) पु. (फ़ा.) (१) लहान घर (२) मोठा तंबू.

सरापर्दः (سراپردہ) पु. (फ़ा.) (१) पडदा असलेले घर. (२) दरबार. (३) मोठा तंबू. (४) तंबूच्या सभोवती लावलेली कनात.

सरापा (سراپا) अव्य. (फ़ा.) नखशिखांत; आद्योपान्त; पूर्णपणे. (पु.) (१) (नायिकेच्या) शरीराच्या सर्व अवयवांचे वर्णन असलेले काव्य. (२) भेट म्हणून दिला जाणारा संपूर्ण पोषाख.

सराब (سراب) पु. (फ़ा.) (१) मृगजळ. (२) फसवणूक.

सराम़त (صرامت) स्त्री. ('अ.) (१) कापणे; कर्तन. (२) शौर्य. (३) श्रेष्ठत्व. (४) चपळता.

सराय (سرائے) स्त्री. (फ़ा.) (१) स्थान; घर. (२) धर्मशाळा; पथिकाश्रम.

सरायत (سرایت) स्त्री. (फ़ा.) (१) एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूत प्रवेश; घुसणे. (२) प्रभाव; परिणाम.

सरासर (سراسر) अव्य. (फ़ा.) (१) एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत. (२) अगदी; बिलकुल; पूर्णपणे. (३) प्रत्यक्ष.

सरासरी (سراسری) स्त्री. (फ़ा.) (१) घाई. (२) सरासरी. (३) सारांश; संक्षेप. (४) विशेषाधिकार असलेले न्यायालय. (अव्य.) घाईने; विशेष विचार न करता.

सरासीमगी (سراسیمگی) स्त्री. (फ़ा.) उद्विग्नता; व्याकुळता.

सरासीमः (سراسیمہ) वि. (फ़ा.) उद्विग्न; व्याकुळ; हैराण.

सऱ़ाहत (صراحت) स्त्री. ('अ.) (१) स्पष्टीकरण; विवरण; तपशील. (२) भाष्य; टीका.

सऱ़ाहतन् (صراحتاً) अव्य. ('अ.) (१) तपशीलवार; सविस्तर. (२) स्पष्ट; उघडपणे.

सरियः (سریہ) पु. ('अ.) (१) लहान सैन्य. (२) मुहम्मद पैगंबरांच्या काळी ते स्वतः ज्यात सहभागी नव्हते अशा लढाया.

सरिश्तः (سرشتہ) पु. [फ़ा. 'सररिश्तः' (سررشتہ) चे संक्षिप्त.] (१) विभाग; खाते. (२) दोरीचे टोक; संबंध. (३) रिवाज; प्रथा. (४) उपाय; युक्ती. (५) कचेरी. (६) नोकरचाकर. **-दार** (دار –) पु. (फ़ा.) (१) शिरस्तेदार. (२) एखाद्या विभागाचा प्रमुख.

सरी (سری) स्त्री. (फ़ा.) सरदारकी; अध्यक्षता.

सरी'अ (سریع) वि. ('अ.) घाई करणारा; उतावळा.

सरी'अ-उज़्-ज़वाल (سریع الزوال) वि. ('अ.) लवकर नष्ट होणारा; क्षणभंगुर.

सरी'अ-उत्-तासीर (سریع التاثیر); **सरी'अ-उल्-'अमल** (سریع العمل); **सरी'अ-उल्-असर** (سریع الاثر) वि. ('अ.) त्वरित परिणाम करणारा; शीघ्र गुणकारी.

सरी'अ-उल्-इन्हिज़ाम (سریع الانہضام) वि. ('अ.) लवकर पचणारा.

सऱ़ीमः (صریم) पु. ('अ.) काम बंद करणे; संप; हरताळ.

सरीर (سریر) पु. ('अ.) (१) सिंहासन. (२) सोफा. **-आरा** (آرا –) वि. ('अ. + फ़ा.) सिंहासनाधिष्ठित; सत्ताधीश.

सऱ़ीर (صریر) स्त्री. ('अ.) (१) लिहिताना होणारा टाकाचा किंवा लेखणीचा आवाज. (२) चालताना होणारा पावलांचा आवाज; चाहूल.

सरीरत (سریرت) स्त्री. **सरीरः** (سریرہ) पु. ('अ.) रहस्य; मर्म.

सऱ़ीह़ (صریح) वि. ('अ.) स्पष्ट; जाहीर; उघड.

सऱ़ीहन् (صریحاً) अव्य. ('अ.) उघड उघड; स्पष्टपणे.

सरेश (سریش) पु. (फ़ा.) सरस.

सरो (سرو) पु. (फ़ा.) सुरूचे झाड. पाहा 'सर्व'. **-अंदाम** (اندام –) वि. (फ़ा.) **-क़द** (قد –) वि. (फ़ा.+'अ.) उंच; सुडौल शरीराचा.

सरोद (سرود) पु. (फ़ा.) (१) एक तंतुवाद्य. (२) गीत. (३) राग (संगीत).

सरोश (سروش) पु. (फ़ा.) (१) शुभसंदेश आणणारा देवदूत. (२) जिब्राईल.

सरः (سرد) वि. (फ़ा.) खरा; निर्भेळ; निखालस.

सर्द (سرد) वि. (फ़ा.) (१) थंड; गार. (२) ढिला; सुस्त; मंद. (३) श्रीहीन; निस्तेज. (४) नपुसक.

–बाजारी (بازاری –) स्त्री. (फ़ा.) (१) श्रीहीनता; निस्तेजता. (२) मंदी. **–मिजाज** (مزاج –) वि. (फ़ा.+'अ.) (१) ज्याची प्रकृती किंवा वृत्ती थंड आहे असा; सुस्त. (२) निष्ठुर. **–मेहर** (مہر –) वि. (फ़ा.) कठोर; निर्दय.

सर्दाबः (سردابہ) पु. (फ़ा.) (१) गार पाण्याचे स्थान. (२) तळघर.

सर्दी (سردی) स्त्री. (फ़ा.) (१) थंडी; हिवाळा. (२) पडसे. (३) शीतलता.

सर्फ़ (صرف) पु. ('अ.) (१) खर्च; व्यय. (२) उपभोग; वापर; उपयोग. (३) व्याकरण; व्युत्पत्तिशास्त्र.

सर्फ़-ओ-नहव (صرف و نحو) स्त्री. ('अ.) व्याकरण; वाक्यविश्लेषण.

सर्फ़ी (صرفی) वि. ('अ.) (१) व्युत्पत्तिशास्त्राचा. (२) व्युत्पत्तिशास्त्र जाणणारा. (३) व्याकरणाचा ज्ञाता.

सर्फ़ः (صرفہ) पु. (फ़ा.) (१) नफा; लाभ. (२) खर्च; उघळपट्टी. (३) कृपणता. (४) उत्तरा; उत्तराफाल्गुनी (नक्षत्र). (५) न्याय. (६) आधिक्य.

सर्मा (سرما) पु. (फ़ा.) हिवाळा.

सर्राफ़ (صراف) वि. ('अ.) (१) सराफ; सोने-चांदी विकणारा. (२) सावकार.

सर्राफ़ः (صرافہ) पु. ('अ.) सराफकट्टा; सोन्या-चांदीचा बाजार.

सर्व (سرو) पु. (फ़ा.) सुरूचे झाड. पाहा 'सरो'.

सर्व-ए-आजाद (سرو آزاد) पु. (फ़ा.) फांद्या नसलेले सुरूचे झाड.

सर्व-ए-चिराग़ां (سرو چراغاں) पु. (फ़ा.) सुरूच्या आकाराचे काचेचे झुंबर.

सर्शफ़ (سرشف) स्त्री. (फ़ा.) मोहरी (तेलधान्य).

सलफ़ (سلف) पु. ('अ.) (१) पूर्वज. (२) पूर्वीचा काळ. (३) एखाद्या वस्तूची किंमत आधी देणे; तसलमान. [अनेक 'सलफ़ः' (سلفہ)].

सल्ब (سلب) पु. ('अ.) (१) निवारण; दूर करणे. (२) विनाश. (३) हिरावून घेणे; शोषून घेणे; गिळंकृत करणे.

सलम (سلم) पु. ('अ.) (१) सुरक्षितता. (२) शांती. (३) प्रणाम. (४) एखाद्या वस्तूची किंमत आधी देणे. (वि.) मजबूत; दृढ.

सल्मां (سلمیٰ) स्त्री. ('अ.) अरबस्तानातील एक सुंदर स्त्री; सुंदरी.

सलमः (سلمہ) पु. ('अ.) कलाबूत; भरतकाम.

सलवात (صلوات) स्त्री. ['अ. 'सलॉत' (صلوٰۃ) चे अनेक.] (१) नमाज; प्रार्थना]. (२) शुभेच्छा. (व्यं.) शिवीगाळी. **सलवातें सुनाना** (صلواتیں سنانا) टोमणे मारणे; टोचून बोलणे; शिवीगाळ करणे.

सला (صلا) स्त्री. ('अ.) (१) बोलावणे; हाक मारणे; पुकारणे. (२) आव्हान देणे.

सलाख (سلاخ) स्त्री. (तु.) (१) सळई; काडी; छड. (२) रेघ.

सलॉत (صلوٰۃ) स्त्री. ('अ.) नमाज; प्रार्थना.

सलातीन (سلاطین) पु. ['अ. 'सुल्तान' (سلطان) चे अनेक.] अनेक बादशहा; सत्ताधीश; अनेक सुलतान.

सलाबत (صلابت) स्त्री. ('अ.) (१) कठोरता; धाक. (२) दृढता. (३) जुलूम.

सलाम (سلام) पु. ('अ.) (१) प्रणाम. (२) शांतता; शांती. (३) सुरक्षितता. (४) निरोप. (५) पावित्र्य. **–'अलैकुम** (علیکم –) वा. ('अ.) तुला शांती मिळो; तू सुरक्षित राहा; नमस्ते.

सलाम-ओ-पयाम (سلام و پیام) पु. ('अ. + फ़ा.) (१) नमस्कारासह निरोप (येणे किंवा पाठविणे). (२) लग्नाचे बोलणे.

सलामत (سلامت) वि. ('अ.) (१) सुरक्षित. (२) जिवंत. (३) निरोगी; खुशाल; उत्तम प्रकृती असलेला. (४) पूर्ण; अखंड; कायमचा. (५) दृढ; मजबूत. (६) चांगला. **–बाशीद** (باشید –) वा. ('अ.+फ़ा.) आयुष्मान भव; चिरंजीव हो. **–रवी** (روی –) स्त्री. (फ़ा.) (१) सर्वांशी मिळून मिसळून वागणे; मध्यमार्ग अनुसरणे. (२) काटकसर. **–रौ** (رو –) वि. (फ़ा.) हुशारीने वागणारा; काटकसरी.

सलामती (سلامتی) स्त्री. ('अ.) (१) शांती. (२) सुरक्षा; सुरक्षितता. (३) आरोग्य; स्वास्थ्य. (४) अस्तित्व. **–कौन्सिल** (کونسل –) स्त्री. ('अ.+इं.) सुरक्षा परिषद.

सलामी (سلامی) स्त्री. ('अ.) (१) मानवंदना; सलामी (तोफा, बंदुका वगैरेची). (२) स्वागत. (३) वधुवरांना दिल्या जाणाऱ्या भेटी (रुपये, दागिने वगैरे). (४) शस्त्रे वर उचलून केलेले स्वागत.

सलामुन 'अलैकुम (سلام علیکم); **सलामु 'अलैकुम** (سلام علیکم) वा. ('अ.) तुला शांती (सुरक्षितता) मिळो; नमस्कार.

सलासत (سلاست) स्त्री. ('अ.) (१) तरलता; प्रवाहीपणा. (२) समतलता; सपाटपणा. (३) कोमलता; नाजुकता. (४) सुगमता; साधेपणा. (५) नम्रता. (६) भाषेतील सोपेपणा, सुटसुटीतपणा, प्रसादगुण; माधुर्य.

सलासिल (سلاسل) स्त्री. ['अ. 'सिलसिलः' (سلسلہ) चे अनेक.] (१) बेडघा; साखळघा; शृंखला. (२) क्रम.

सलासी (ثلاثی) वि. ('अ.) त्रिकोणी; तिहेरी.

सलाह (صلاح) स्त्री. ('अ.) (१) सल्ला; मत. (२) विचारविनिमय. (३) भलेपणा; चांगुलपणा. (४) उद्देश. (५) उपाय. **–अंदेश** (اندیش –) वि. ('अ. + फ़ा.) शुभचिंतक. **–कार** (کار–) वि. ('अ. + फ़ा.) (१) सल्लागार. (२) सदाचारी. (३) सदुपदेशक.

सलाहियत (صلاحیت) स्त्री. ('अ.) (१) क्षमता. (२) भलाई; चांगुलपणा. (३) कोमलता; नाजुकपणा. (४) सदाचार; इंद्रियनिग्रह. (५) योग्यता; पात्रता. (६) विद्वत्ता. (७) गांभीर्य. (८) प्रवाशांची दैनंदिन नोंद. (पोलीस किंवा धर्मशाळावाले ठेवतात ती).

सलिस-उल्-बौल (سلس البول) पु. ('अ.) वारंवार लघ्वी होण्याचा रोग; बहुमूत्र.

सलीक (سلیک) वि. ('अ.) (१) गुंफलेला. (२) टाचलेला; अडकविलेला; जोडलेला.

सलीक़ः (سلیقہ) पु. ('अ.) (१) शिष्टता; सभ्यता; शिष्टाचार. (२) क्रम. (३) ढंग; पद्धत; कला. (४) योग्यता. (५) टापटीप. **–दार** (دار –); **–मंद** (مند –); **–शि'आर** (شعار –) वि. ('अ.+फ़ा.) (१) शिष्टाचारसंपन्न; सुसंस्कृत. (२) वाकबगार; तज्ज्ञ; चतुर.

सलीब (صلیب) स्त्री. ('अ.) (१) शूळ. (२) येशू ख्रिस्ताचा क्रूस.

सलीम (سلیم) वि. ('अ.) (१) गंभीर; शांत. (२) शांतताप्रिय; सहनशील. (३) आरोग्ययुक्त. (४) पूर्ण; परिपूर्ण. (५) शुद्ध अंतःकरणाचा. (६) योग्य; बरोबर.

सलीम-उत्-तब्'अ (سلیم الطبع) वि. ('अ.) (१) सौम्य स्वभावाचा. (२) शांतताप्रिय. (३) कोमल अंतःकरणाचा. (४) सुशील.

सलीस (سلیس) वि. ('अ.) (१) कोमल; मऊ; मृदु. (२) सुगम; सुबोध; सोपा; बाळबोध; प्रसादगुणयुक्त. (३) प्रवाही; सरळ.

सल्ख (سلخ) पु. ('अ.) (१) कातडे काढणे, सोलणे (मृत पशू). (२) कपडे काढणे. (३) कृष्णपक्षातील शेवटचा दिवस.

सल्जम (سلجم) पु. ('अ.) सलगम (भाजी).

सल्जूक़ (سلجوق) पु. (तु.) सल्जूकी नावाच्या एका राजवंशाचा संस्थापक व मूळ पुरुष.

सल्तनत (سلطنت) स्त्री. ('अ.) (१) सत्ता; राज्य; शासन; अंमल; अमदानी. (२) राष्ट्र; देश.

सल्ब (سلب) पु. ('अ.) (१) निवारण. (२) नाश होऊ न देणे.

सल्ब-ए-मरद् (سلب مرض) पु. ('अ.) एखाद्याचा आजार आत्मशक्तीने नाहीसा करणे.

सल्म (سلم) स्त्री. ('अ.) लहान मुलांची लिहिण्याची पाटी.

सल्मान (سلمان) पु. ('अ.) पैगंबर साहेबांचे एक मित्र व सहकारी.

सल्ल-ए-'अलॉ (صل علیٰ) वा. ('अ.) ईश्वर पवित्र आहे; 'सुबहान'अल्लह' (سبحان اللہ) ('अ.) छान.

सल्लाख़ (سلاخ) पु. ('अ.) (१) कातडे सोलणारा. (२) फाशी देणारा; मांग.

सल्लाख़ी (سلاخی) स्त्री. ('अ.) कातडे सोलणे; कातडे सोलून ठार मारण्याची शिक्षा.

सल्लि'ल्लहे'अलैहि व सल्लम (صلی اللہ علیہ وسلم) वा. ('अ.) हजरत मुहम्मद पैगंबर यांच्यावर परमेश्वराची कृपादृष्टी राहो.

सल्वॉ (سلویٰ) स्त्री. ('अ.) लावी पक्षीण; लाव पक्षी.

सल्सबील (سلسبیل) स्त्री. ('अ.) (१) स्वर्गातील झरा. (२) मदिरा.

सवा (سوا) वि. ('अ.) समान; सारखा. (पु.) (१) समता. (२) दुपार.

सवाद (سواد) पु. ('अ.) (१) काळेपणा; कृष्णवर्ण. (२) शाई. (३) मोठे शहर; शहराच्या सभोवतालचा प्रदेश. (४) प्रतिभा; बुद्धिमत्ता. (५) लिहिता-वाचता येणे.

सवानिह् (سوانح) पु. ['अ. 'सानिहः' चे अनेक.] पुष्कळ घटना; प्रसंग. **–'उम्री** (عمری –) स्त्री. ('अ.) चरित्र; जीवनकथा. **–नवीस** (نویس –); **–निगार** (نگار –) वि. ('अ.+फ़ा.) (१) बातमीपत्रे लिहिणारा; घटना नमूद करणारा. (२) इतिहास लेखक. (३) चरित्रकार.

सवानिह्-ए-'उम्र (سوانح عمر); **सवानिह्-ए-हयात** (سوانح حیات) पु. ('अ.) चरित्र; जीवनकथा.

सवाब (صواب) वि. ('अ.) (१) यथार्थ; योग्य; वास्तविक. (२) श्रेष्ठ; उत्तम.

सवाब (ثواب) पु. ('अ.) (१) पुण्य; पुण्यकर्माचे फळ. (२) सत्कर्म. **–अंदेश** (اندیش –) वि. ('अ.+फ़ा.) योग्य विचार करणारा; शुभचिंतक.

सवाबित (ثوابت) पु. ['अ. 'साबित' (ثابت) चे अनेक.] स्थिर तारे.

सवार (سوار) वि. पु. (फ़ा.) (१) आरूढ; वर बसलेला; स्वार. (२) घोडेस्वार.

सवारी (سواری) स्त्री. (फ़ा.) (१) अश्वारोहण; आरोहण. (२) वाहन. (३) वर बसणारा; वाहनात बसणारा; स्वारी.

सवाल (سوال) पु. ('अ.) (१) प्रश्नसमस्या. (२) पृच्छा; विचारणा. (३) अर्ज; विनंती. **–ख़्वानी** (خوانی –)

स्त्री. ('अ. + फ़ा.) न्यायालयात सार्वजनिक अर्ज घेण्याकरिता केला जाणारा पुकार. **–नामः**(نامہ –) पु. ('अ. + फ़ा.) प्रश्नपत्र. [अनेक 'सवालात' (سوالات)].

सवाली (سوالی) वि. ('अ.) याचक; भिकारी.

सवाहिल (سواحل) पु. ['अ. 'साहिल' (ساحل) चे अनेक.] (१) समुद्रकिनारे. (२) बंदरे.

सहक़ (سحق) पु. ('अ.) (१) घासणे; चोळणे; कुटणे. (२) स्त्रियांनी आपली जननेंद्रिये एकमेकांवर घासणे.

सहज (سحج) स्त्री. ('अ.) (१) मुरडा (पोटातील). (२) तासणे; सोलणे.

सहन (صحن) पु. ('अ.) (१) अंगण; आंगण. (२) एक प्रकारचे उत्तम रेशमी कापड. (३) मोठी थाळी.

सहन-ए-लामकाँ (صحن لا مکاں) पु. ('अ.) अंतरिक्ष; आकाशाची पोकळी.

सहनक (صحنک) स्त्री. (फ़ा.) (१) लहान थाळी; तबक; ताटली. (२) लहान आंगण. (३) मुहम्मद साहेबांची कन्या बीबी फातिमा हिच्या नावाने केलेले श्राद्ध व श्राद्धाचे जेवण.

सहनची (صحنچی) स्त्री. (फ़ा.) (१) मोठघा दालनाच्या आजूबाजूच्या खोल्या. (२) शेजारी बांधलेले लहान घर.

सहबा (صہبا) स्त्री. ('अ.) मदिरा; लाल रंगाचे मद्य.

सहबा'ई (صہبائی) वि. ('अ.+फ़ा.) मद्यपान करणारा; दारुडा.

सहम (سہم) पु. ('अ.) (१) तीर; बाण. (२) भाग; अंश; हिस्सा.

सहम (سہم) पु. (फ़ा.) भय; भीती. **–गीं** (گیں –) वि. (फ़ा.) भयभीत. **–नाक** (ناک –) वि. (फ़ा.) (१) भयंकर. (२) भयभीत.

सहम-उल्-ग़ैब (سہم الغیب) पु. ('अ.) जन्मपत्रिकेतील शुभ ग्रहांचा योग (युती).

सहर (سحر) स्त्री. ('अ.) प्रातःकाळ; सकाळ; पहाट. **–ख़ंद** (خند –) वि. ('अ. + फ़ा.) (१) दात दिसतील असे (हास्य). (२) सकाळच्या प्रकाशाप्रमाणे उज्वल किंवा उमललेला. (३) मुहास्यवदन; स्मित करणारा. **–ख़ेज** (خیز –) वि. ('अ. + फ़ा.) (१) भल्या पहाटे उठणारा. (२) चोर; उचल्या; खिसेकापू. **–गही** (گہی –) स्त्री. ('अ. + फ़ा.) रमजानच्या दिवसांत सूर्योदयापूर्वी केले जाणारे जेवण. **–गाह** (گاہ –) स्त्री. ('अ. + फ़ा.) पहाट; प्रातःकाळ. **–गाही** (گاہی –) वि. ('अ.+फ़ा.) पहाटेचा; सकाळचा. **–दम** (دم –) अव्य. ('अ.+फ़ा.) भल्या पहाटे.

सहरा (صحرا) पु. ('अ.) (१) वन; अरण्य; जंगल. (२) सहारा (वाळवंट); वाळवंट. **–गर्द** (گرد –); **–नवर्द** (نورد –) वि. ('अ.+फ़ा.) जंगलात भटकणारा; अरण्यांचा शोध करणारा. **–नशीं** (نشیں –) वि. ('अ. + फ़ा.) अरण्यात राहाणारा.

सहरा-ए-अ'अज़म (صحرائے اعظم) पु. ('अ.) आफ्रिकेतील सहाराचे वाळवंट.

सहरा'ई (صحرائی) वि. ('अ.+फ़ा.) (१) जंगलातील. (२) जंगली; असभ्य; असंस्कृत.

सहरी (سحری) वि. ('अ.) सकाळचा; पहाटेचा. (स्त्री.) पाहा 'सहरगही'.

सहल (سہل) वि. ('अ.) सोपा; सहज; सरळ; साधा. **–अंगार** (انگار –) वि. ('अ.+फ़ा.) सुगमता शोधणारा; सुखासीन; आळशी.

सहल-उल्-वसूल (سہل الوصول) वि. ('अ.) सहजासहजी वसूल होणारा.

सहव (سہو) पु. ('अ.) (१) विस्मरण. (२) चूक.

सहव-ए-क़लम (سہو قلم) पु. ('अ.) लिहिण्यातील चूक; काहीतरी भलतेच लिहिले जाणे.

सहव-ए-सज्दः (سہو سجدہ) पु. ('अ.) नमाज पढताना एक सज्दा केला की दोन याचे स्मरण न राहाणे.

सहवन् (سہواً) अव्य. ('अ.) चुकून; विस्मरणाने.

सहा'इफ़ (صحائف) पु. ['अ. 'सहीफ़ः' (صحیفہ) चे अनेक.] (१) पुस्तके; ग्रंथ. (२) अपौरुषेय ग्रंथ; धर्मग्रंथ.

सहाफ़ी (صحافی) वि. ('अ.) पत्रकार; वृत्तपत्रकार.

सहाब (سحاب) पुं. ('अ.) ढग; मेघ.

सहाबत (صحابت) स्त्री. ('अ.) (१) मैत्री करणे; साह्य करणे. (२) मैत्री; सहवास.

सहाबी (صحابی) पु. ('अ.) मुहम्मद साहेबांचे घनिष्ठ मित्र व त्यांचे वंशज.

सहाबः (صحابہ) पु. ('अ.) (१) मैत्री. (२) मित्र; मुहम्मद साहेबांचे घनिष्ठ मित्र.

सहाम (سہام) पु. ['अ. 'सहम' (سہم) चे अनेक.] (१) हिस्से; अंश; भाग. (२) पुष्कळ बाण.

सहारां (صحاری) पु. ['अ. 'सहरा' (صحرا) चे अनेक.] अरण्ये; जंगले.

सहाह (صحاح) वि. ('अ.) (१) निरोगी. (२) निर्दोष. (स्त्री.) (१) आरोग्य. (२) पावित्र्य.

सही (سہی) अव्य. (हिं.) (१) खरा; ठीक. (२) समजा; कल्पना करा. (३) खूप झाले.

सही (سہی) वि. (फ़ा.) सरळ; सरळसोट (उंच). **–क़द** (قد –); **–बाला** (بالا –) वि. (फ़ा.) उंच व सरळ आकाराचा.

सहीक्र (سحیق) वि. ('अ.) वाटलेला; चूर्ण केलेला. (पु.) चूर्ण; भुगा.

सह़ीफ़ः (صحیفہ) पु. ('अ.) (१) पुस्तक; ग्रंथ; धर्मग्रंथ. (२) पान; पृष्ठ.

सहीम (سہیم) वि. ('अ.) भागीदार; वाटेकरी; सहभागी.

सह़ीह़ (صحیح) वि. ('अ.) (१) खरा; सत्य; बरोबर; ठीक; यथार्थ. (२) निर्दोष. (३) निरोगी. (४) पूर्ण; अखंड. (५) योग्य. (पु.) 'अलिफ़', 'वाव' व 'ये' यांव्यतिरिक्त इतर अरबी अक्षरे. **–करना** (–کرنا) (१) दुरूस्त करणे. (२) सही करणे; पुष्टी करणे; बरोबर असल्याबद्दल हस्ताक्षर करणे. **–सालिम** (–سالم) वि. ('अ.) (१) सहीसलामत; सुरक्षित. (२) जिवंत. (३) संपूर्ण; अखंड; जशाच्या तसा. (४) निरोगी; रोगमुक्त.

सह़ीह़-उन्-नसब (صحیح النسب) वि. ('अ.) (१) शुद्ध वंशाचा; खानदानी. (२) कायदेशीर वारस.

सह़ूर (سحور) स्त्री. ('अ.) रमजानच्या दिवसांतील पहाटेचे भोजन.

सह़्ह़ाफ़ (صحاف) पु. ('अ.) पुस्तकबांधणी करणारा.

सह़्ह़ाम (سہام) वि. ('अ.) तिरंदाज; धनुर्धारी.

सां (ساں) वि. (फ़ा.) सारखा; समान; तुल्य.

सा (سا) वि. (फ़ा.) समान; सारखा. (प्रत्य.) घासणारा. [उदा. 'जबिं सा' (جبیں سا) वि. (फ़ा.) जमिनीवर कपाळ घासणारा; विनम्र; दीन].

सा'अ (صاع) पु. ('अ.) (१) सखल जमीन. (२) २ शेर, १४ छटाक व ४ तोळे इतके वजन.

सा'अत (ساعت) स्त्री. ('अ.) (१) एक तास; अडीच घटका. (२) मुहूर्त. (३) शुभ किंवा अशुभ क्षण. (४) क्षण. (५) घडघाळ. (६) समय. (७) प्रलयाचा दिवस.

सा'अत-ए-'अमूमी (ساعت عمومی) स्त्री. ('अ.) घडघाळमिनार; घंटाघर.

सा'अत-ए-मज्लिसी (ساعت مجلسی) स्त्री. ('अ.) भितीला लावण्याचे मोठे घडघाळ.

सा'अत-ए-संगीं (ساعت سنگیں) स्त्री. ('अ. + फ़ा.) संकटकाळ.

सा'इंदः (سائندہ) वि. (फ़ा.) घासणारा; पिसणारा.

सा'इक़ (سائق) वि. ('अ.) आंघळघाला मागून आधार देऊन पुढे चालविणारा.

सा'इक़ः (صاعقہ) स्त्री. ('अ.) वीज (आकाशातून जमिनीवर कोसळणारी) तडित. **–अफ़गन** (–افگن); **–क़िगन** (–فگن) वि. ('अ.+फ़ा.) विद्युत्पात करणारा (री); वीज कोसळविणारी दृष्टी. **–बार** (–بار) वि. ('अ.+फ़ा.) विद्युत वर्षाव करणारा (करणारी दृष्टी).

सा'इग़ (صائغ) वि. ('अ.) सोनार; सुवर्णकार.

सा'इद (ساعد) पु. स्त्री. ('अ.) (१) मनगट; कोपरापासून मनगटापर्यंतचा हात. (२) हात; भुजा; दंड; बाहू.

सा'इद (صاعد) वि. ('अ.) वर चढणारा; उन्नती करणारा.

सा'इब (صائب) वि. ('अ.) (१) सरळ जाणारा; पोचणारा. (२) शुद्ध; बरोबर.

सा'इबान (سائبان) पु. (फ़ा.) घराचे पुढील छप्पर; छपरी; गवताचे छप्पर असलेली पडवी.

सा'इम (صائم) पु. ('अ.) रोजा (उपवास) करणारा; व्रतस्थ.

सा'इर (سائر) वि. ('अ.) (१) हिंडणारा, फिरणारा. (२) सर्व; संपूर्ण. (३) उरलेला; बाकी. (स्त्री.) जकात; टोल. [अनेक 'सा'इरजात' (سائرجات)].

सा'इल (سائل) वि. पु. ('अ.) (१) प्रश्नकर्ता; विचारणारा. (२) भीक मागणारा; भिकारी. (३) अर्ज करणारा. (४) उमेदवार; आशा बाळगणारा.

सा'ई (ساعی) वि. ('अ.) प्रयत्न करणारा; धावपळ करणारा.

सा'ईस (سائیس) पु. ('अ.) मोतद्दार; घोडघाची चाकरी करणारा.

साक़ (ساق) स्त्री. ('अ.) (१) पिंडरी; पोटरी. (२) झाडाचे खोड. (३) भाजीचे देठ.

साकित (ساکت) वि. ('अ.) (१) गप्प; मूक. (२) गतिहीन; निश्चल.

साक़ित् (ساقط) वि. ('अ.) (१) पडलेला; पडणारा. (२) गेलेला; सोडलेला. **–करना** (–کرنا) गर्भपात करणे; पोटचे पाडणे.

साक़ित्-उल्-ए'अतिबार (ساقط الاعتبار) वि. ('अ.) ज्याचा विश्वास उडालेला आहे असा.

साक़ित्-उल्-मिल्कियत (ساقط الملکیت) वि. ('अ.) ज्याचा संपत्तीवरील अधिकार नाहीसा झाला आहे असा.

साकिन (ساکن) वि. ('अ.) (१) स्थिर; अचल. (२) रहिवासी; राहाणारा. (३) व्यंजन; हलन्त; स्वररहित व्यंजन.

साक़िन (ساقن) स्त्री. ('अ.+हिं.) भांग, तंबाखू, दारू वगैरे विकणारी बाजारू स्त्री. ['साक़ी' (ساقی) चे स्त्रीलिंग].

साक़िब (ثاقب) वि. ('अ.) चमकणारा; चकचकीत; प्रकाशमान.

साकिया (ساقیا) पु. ('अ.+फ़ा.) हे साकी ! अरे मद्यपान करविणाऱ्या !

साकियः (ساقیہ) स्त्री. ('अ.) (१) मद्यपान करविणारी. (२) लहान नदी. (३) रहाट.

साक़ी (ساقی) पु. ('अ.) (१) मद्यपान करविणारा; दारू पाजणारा. (२) प्रेयसी; माषूक.

साक़ी-ए-महशर (ساقیٔ محشر) पु. ('अ.) अंतिम निवाडघाच्या दिवशी स्वर्गाचे मद्य पाजविणारा; हजरत मुहम्मद पैगंबर.

साक़ूल (ساقول) पु. ('अ.+तु.) ओळंबा.

साक़ैन (ساقین) स्त्री. ('अ.) दोन्ही पोटऱ्या; पिंडऱ्या.

साक़ः (ساقہ) पु. ('अ.) सैन्याची पिछाडी; मागील सैन्य.

साख़्त (ساخت) स्त्री. (फ़ा.) (१) घडण; रचना; बनावट. (२) बनावटीपणा; कृत्रिमता. (३) फॅशन; ढंग. (४) मिप; बहाणा. **–गी** (گی–) स्त्री. (फ़ा.) रचना; घडण.

साख़्तः (ساختہ) वि. (फ़ा.) (१) बनविलेला; घडविलेला. (२) कृत्रिम; नकली. **–परदाख़्तः** (پرداختہ –) वि. (फ़ा.) (१) तयार केलेला. (२) पाळलेला-पोसलेला. (३) आश्रित. **–रू** (رو –) वि. (फ़ा.) (१) नट्टापट्टा केलेला; पावडर, लिपस्टिक वगैरे लावलेली (स्त्री). (२) लज्जित.

सागर (ساغر) पु. (फ़ा.) (१) मद्यचषक; दारूचा प्याला. (२) पेला. **–कश** (کش –); **–नोश** (نوش –); **–पैमा** (پیما –) वि. (फ़ा.) मद्यपान करणारा; दारुडघा.

सागरी (ساغری) स्त्री. (तु.) (१) मलद्वार; गुदा. (२) घोडघाची शेपटी व गुदा यांच्यामधील जागा.

साचिक़ (ساچق) स्त्री. (तु.) मुसलमानांच्या विवाहांतील एक विधी. लग्नाच्या आदल्या दिवशी वराकडून वधूकडे मेंदी, तेल, कपडे वगैरे पाठविले जाणे. (हळदी लावण्याची प्रथा).

साज़ (ساز) पु. (फ़ा.) (१) उपकरणे; सामग्री; सामान. (२) व्यवस्था. (३) वाद्य; हत्यार; अवजार. (४) मेळ; मिलाफ; मैत्री. (५) अनुकूलता. (६) सजावट; थाटमाट. (७) घोडघावरील सामान. (खोगीर वगैरे). (प्रत्य.) तयार करणारा. [उदा. 'घड़ी साज़' (گھڑی ساز) वि. (हिं. + फ़ा.) घडघाळजी; घडघाळे तयार करणारा.] **–गर** (گر –) वि. (फ़ा.) वाद्ये तयार करणारा. **–गार** (گار –) वि. (फ़ा.) (१) अनुकूल; योग्य. (२) शुभ; कल्याणप्रद. **–बाज़** (باز –) पु. स्त्री. (फ़ा.) (१) कटु; वाईट कामासाठी गुप्त योजना बनविणे. (२) मेळ; मिलाफ. (३) भपकेबाजपणा. **–मंद** (مند –) वि. (फ़ा.) (१) सुशोभित. (२) अनुकूल.

साज़-ओ-बर्ग (ساز و برگ); **साज़-ओ-सामान** (ساز وسامان) पु. (फ़ा.) (१) उपकरणे; साधन-सामग्री. (२) थाटमाट. (३) श्रीमंती.

साज़िंदगी (سازندگی) स्त्री. (फ़ा.) गायन, वादन, नृत्य वगैरेच्या वेळी वाद्य वाजवून साथ करणे; नृत्याच्या वेळी सारंगी वाजविणे.

साज़िंदः (سازندہ) वि. (फ़ा.) वाद्य वाजवून साथ करणारा; साथीच्या वेळी तबला, सारंगी, पेटी वगैरे वाजविणारा.

साजिद (ساجد) वि. ('अ.) 'सज्दः' करणारा; ईश्वरापुढे गुडघे टेकविणारा.

साज़िश (سازش) स्त्री. (फ़ा.) गुप्त कट; षड्यंत्र.

साज़िशी (سازشی) वि. (फ़ा.) कट करणारा.

सातिअ (ساطع) वि. ('अ.) (१) उत्तुंग; उंच. (२) उज्वल; धवल. (३) प्रकाशमान.

सातिर (ساتر) वि. ('अ.) लपविणारा; दडविणारा.

सातूर (ساطور) पु. ('अ.) मोठा सुरा; खंजीर.

सात्गीं (ساتگیں) पु. स्त्री. (तु.) (१) प्रेयसी; माषूक. (२) मद्यचषक.

साद (صاد) पु. ('अ.) (१) अरबी लिपीतील चौदावे अक्षर (ص = स). (२) बरोबर किंवा शुद्ध असल्याबद्दल करावयाची खूण. (३) डोळा. **–करना** (کرنا –) बरोबर असल्याची खूण करणे; सही करणे.

सादगी (سادگی) स्त्री. (फ़ा.) (१) साधेपणा. (२) निष्कपटता; सरळपणा; भोळेपणा.

सादात (سادات) पु. ['अ. 'सैयद' (سید) चे अनेक.] (१) सैयद घराण्यातील लोक; सैयद जाती. (२) हजरत अली याचे वंशज. (३) श्रेष्ठजन.

सादिक़ (صادق) वि. ('अ.) (१) सत्यनिष्ठ; सच्चा. (२) न्यायनिष्ठ. (३) स्वामिभक्त. (४) शुद्ध; पवित्र. (५) बरोबर लागू होणारा; चपखल बसणारा.

सादिक़-उल्-ए'अतिक़ाद (صادق الاعتقاد) वि. ('अ.) दृढ धर्मश्रद्धा असलेला.

सादिक़-उल्-क़ौल (صادق القول) वि. ('अ.) दिलेला शब्द पाळणारा; सत्यव्रती.

सादिर (صادر) वि. ('अ) (१) जारी केलेला; प्रचारित केलेला. (२) निघालेला; चालू झालेला. **–करना** (کرنا –) हुकूम काढणे. **–वारिद** (وارد –) वि. ('अ.) अतिथी; पाहुणा; प्रवासी; मुसाफीर.

सादिस (سادس) वि. ('अ.) सहावा; षष्ठ.

सादः (سادہ) वि. (फ़ा.) (१) साधा; सोपा; सरळ. (२) निर्भेळ; शुद्ध. (३) निष्कपटी. (४) कोरा; कलाकुसर नसलेला. (५) भोळा; भोळसट; मूर्ख.

–कार (کار–) वि. (फ़ा.) सोन्याचांदीवर नक्षीकाम करणारा; सोनार. **–तब्'अ** (طبع –); **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) (१) निष्कपट; भोळा. (२) मूर्ख. **–पुरकार** (پرکار –) वि. (फ़ा.) वरून साधाभोळा दिसणारा, पण आतून लबाड असणारा. **–रुख़** (رخ –); **–रू** (رو –) वि. (फ़ा.) दाढी-मिशा न उगवलेला (तरुण). **–लौह** (لوح –) वि. (फ़ा. + 'अ.) (१) साधाभोळा. (२) मूर्ख. **–वज़्'अ** (وضع –) वि. (फ़ा.+'अ.) साधे कपडे वापरणारा; बाळबोध वळणाचा.

सान (سان) पु. (फ़ा.) सहाण; चाकू-कात्रीला धार लावण्याचा दगड. **–ज़दः** (زدہ –) वि. (फ़ा.) धार लावलेला.

सानवी (ثانوی) वि. (फ़ा.) दुसरा; द्वितीय; दुय्यम.

सानि'अ (صانع) वि. ('अ.) (१) निर्माता; रचयिता. (२) कारागीर.

सानियन् (ثانیاً) अव्य. ('अ.) दुसऱ्यांदा; पुनः.

सानियः (ثانیہ) पु. ('अ.) मिनीट; क्षण; पळ.

सानिह् (سانح) वि. ('अ.) (१) प्रकट होणारा. (२) घडणारा.

सानिहः (سانحہ) पु. ('अ.) (१) घटना. (२) दुर्घटना; अपघात. (३) दुःखद समाचार.

सानी (ثانی) वि. ('अ.) (१) दुसरा. (२) बरोबरीचा; जोडीचा. **–उल्-ह़ाल** (الحال –) अव्य. ('अ.) दुसऱ्यांदा; पुनः.

साफ़ (صاف) वि. ('अ.) (१) स्वच्छ; निर्मळ. (२) शुद्ध; पवित्र. (३) निर्दोष; निर्भेळ. (४) उज्वल; कोरा. (५) चमकदार. (६) निष्कपट. (७) सुगम; सोपा. (८) सपाट. (अव्य.) (१) पूर्णपणे; मुळीच. (२) स्पष्टपणे. **–गो** (گو–) वि. ('अ.+फ़ा.) स्पष्ट वक्ता; फटकळ. **–गो'ई** (گوئی–) स्त्री. ('अ. + फ़ा.) स्पष्टवक्तेपणा; फटकळपणा. **–तब्'अ** (طبع–); **–तीनत** (طینت –); **–ज़मीर** (ضمیر –); **–बातिन** (باطن –) वि. ('अ.) शुद्ध अंतःकरणाचा; निष्कपट.

साफ़िन (صافن) स्त्री. ('अ.) घोटचाजवळील किंवा पोटरीतील एक शीर.

साफ़िल (سافل) वि. ('अ.) (१) खालचा. (२) निकृष्ट.

साफ़ी (صافی) वि. ('अ.) साफ, शुद्ध करणारा. (स्त्री.) (१) रुमाल. (२) स्वयंपाकाची भांडी चुलीवरून खाली घेताना वापरण्याचे फडके. (३) भांग वगैरे गाळण्याचे फडके. (४) चिलमीभोवती गुंडाळावयाचे फडके. (५) फळा पुसण्याचे फडके.

साफ़ः (صافہ) पु. ('अ.) पागोटे; पगडी; फेटा.

साबि'अ (سابع) वि. ('अ.) सातवा; सप्तम.

साबिक़ (سابق) वि. ('अ.) (१) मागील; भूतपूर्व; माजी. (२) पुढे जाणारा.

साबिक़-उज़्-ज़िक्र (سابق الذکر) वि. ('अ.) पूर्वी उल्लेखिलेला; उल्लेखित.

साबिक़-ए-दस्तूर (سابق دستور) वि. अव्य. ('अ.) पूर्वीसारखाच; पहिल्याप्रमाणेच.

साबिक़ः (سابقہ) वि. ('अ.) पूर्वीची; माजी. (पु.) (१) संबंध; गाठ. (२) जुनी ओळख; मैत्री. (३) भेट; मुलाखत. (व्या.) उपसर्ग.

साबिग़ (سابغ) वि. ('अ.) रंगविणारा; रंगारी.

स़ाबित (ثابت) वि. ('अ.) (१) शाबूत; अखंड; अभंग. (२) स्थिर; कायम राहाणारा. (३) प्रमाणित; शाबित; सिद्ध झालेला. (४) ठीक; दुरूस्त. (५) दृढ; मजबूत. **–क़दम** (قدم –) वि. ('अ.) दृढनिश्चयी.

स़ाबिर (صابر) वि. ('अ.) सबूर करणारा; धीर धरणारा; सहनशील; ईश्वरावर हवाला ठेवणारा.

स़ाबी (صابی) वि. ('अ.) (१) धर्मांतर करणारा. (२) इहलोकातून परलोकी जाणारा.

स़ाबुन (صابن); **स़ाबून** (صابون) पु. ('अ.) साबण. **–साज़ी** (سازی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) साबण तयार करणे.

स़ाबूनी (صابونی) स्त्री. ('अ.) एक प्रकारची मिठाई.

साम (سام) पु. (फ़ा.) (१) सूज. (२) व्यथा. (३) अग्नी. (४) रुस्तमच्या बापाचे नाव.

साम (سم) पु. ('अ.) मृत्यू; मरण. (वि.) विष घालणारा.

साम-ए-अब्रस़ (سام ابرص) स्त्री. ('अ.) पाल (प्राणी).

सामान (سامان) पु. (फ़ा.) (१) चीजवस्तू; सामान-सुमान. (२) उपकरणे; सामग्री. (३) मालमसाला. (४) सजावट; आरास. (५) व्यवस्था. (६) हत्यारे; अवजारे.

सामि'अ (سامع) वि. ('अ.) ऐकणारा; श्रोता.

सामि'ईन (سامعین) वि. ['अ. 'सामि'अ' (سامع) चे अनेक.] श्रोते; ऐकणारे.

सामि'अः (سامعہ) स्त्री. ('अ.) श्रवणशक्ती. **–ख़राश** (خراش –) वि. ('अ. + फ़ा.) कर्णकटु. **–नवाज़** (نواز –) वि. ('अ.+फ़ा.) कर्णप्रिय.

सामित (سامت) वि. ('अ.) मूक; गप्प.

स़ामिन (ثامن) वि. ('अ.) आठवा; अष्टम.

सामिरी (سامری) पु. ('अ.) 'सामिरा' नगरात राहाणारा एक जादूगार. याने गाईची पूजा प्रचलित केली. **–फ़न** (فن –) पु. ('अ.) (१) जादूगार. (२) लबाड; फसवा.

सामी (سامي) वि. (फ़ा.) (१) उच्च; उत्तुंग. (२) श्रेष्ठ; पूज्य.

सायः (سايہ) पु. (फ़ा.) (१) छाया; सावली. (२) प्रतिबिंब. (३) भूतबाधा. (४) आश्रय; आधार; शरण. (५) पक्षपात; समर्थन. (६) प्रभाव; परिणाम. **–अफ़्गन** (افگن –) वि. (फ़ा.) (१) सावली करणारा. (२) संरक्षण देणारा. **–गाह्** (گاہ –) स्त्री. (फ़ा.) सुरक्षित स्थान. **–ज़दः** (زدہ –) वि. (फ़ा.) भूतबाधा झालेला; पछाडलेला. **–दार** (دار –) वि. (फ़ा.) सावलीदार. **–परवर** (پرور –); **–पर्वदः** (پروردہ –); **–रस्त** (رست) वि. (फ़ा.) (१) लाडका; लाडात वाढलेला. (२) कृपाछत्राखाली वाढलेला.

सायः-ए-दस्त (سایۂ دست) पु. (फ़ा.) (१) मदत; साह्य. (२) संरक्षण.

सार (سار) पु. (फ़ा.) उंट. (स्त्री.) सारिका; मैना. (प्रत्य.) (१) समान; सारखा. [उदा. 'खाकसार' (خاکسار) वि. (फ़ा.) धुळीसारखा; विनम्र]. (२) असणारा; वाला. [उदा. 'शर्मसार' (شرمسار) वि. (फ़ा.) लज्जित; शरमिंदा.] (३) आधिक्य; वैपुल्य. [उदा. 'कोहसार' (کوہسار) वि. (फ़ा.) डोंगराळ; अनेक डोंगर असलेला]. **–बान** (بان –) वि. (फ़ा.) उंट हाकणारा; उंटावर बसणारा.

सारा (سارا) वि. (फ़ा.) (१) निर्भेळ; शुद्ध. (२) अकृत्रिम; नैसर्गिक.

सारिक़ (سارق) पु. ('अ.) चोर; तस्कर.

सारिफ़ (سارف) वि. ('अ.) (१) खर्च करणारा. (२) उपभोक्ता; वापरणारा. (३) बदलणारा. (४) कालचक्र.

सारी (ساری) वि. ('अ.) (१) प्रवेश करणारा. (२) परिणाम करणारा.

सारः (سارہ) पु. (फ़ा.) (१) एक प्रकारची चादर. (२) पडदा; थर; पापुद्रा. (३) आडपडदा. (४) लाचलुचपत.

साल (سال) पु. (फ़ा.) वर्ष; संवत्सर. **–ख़ुर्द** (خورد –); **–ख़ुर्दः** (خوردہ –) वि. (फ़ा.) वयोवृद्ध; म्हातारा. **–गिरह** (گرہ –) स्त्री. (फ़ा.) वाढदिवस; जन्मतिथी. **–नामः** (نامہ –) पु. (फ़ा.) एखाद्या नियतकालिकाचा वार्षिक विशेषांक. **–बसाल** (بسال –) अव्य. (फ़ा.) दरसाल; प्रतिवर्षी.

साल-ए-कबीसः (سال کبیسہ) पु. (फ़ा.) अधिक मास असलेले वर्ष; ज्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात २९ दिवस असतात ते वर्ष.

साल-ए-पैवस्तः (سال پیوستہ) पु. (फ़ा.) गत वर्ष; मागील वर्ष.

साल-ए-फ़स्ली (سال فصلی) पु. (फ़ा.+'अ.) पिकांना धरून असलेले शेतकऱ्याचे वर्ष.

साल-ए-रवाँ (سال رواں) पु. (फ़ा.) चालू वर्ष.

साल-ए-शम्सी (سال شمسی) पु. (फ़ा. + 'अ.) सौर वर्ष.

साल-ए-हिजरी (سال ہجری) पु. (फ़ा.+'अ.) मुहम्मद पैगंबर साहेब मक्का सोडून मदिनेस गेले त्या दिवसापासून सुरू असलेले मुसलमानांचे चांद्र वर्ष. हे सौर वर्षापेक्षा १०–११ दिवसांनी लहान असते.

सालहा साल (سالہا سال) अव्य. (फ़ा.) वर्षानुवर्षे; अनेक वर्षेपर्यंत.

सालानः (سالانہ) वि. (फ़ा.) वार्षिक; दरसालचा.

सालार (سالار) पु. (फ़ा.) (१) सेनापती. (२) अध्यक्ष. (३) नायक; सरदार.

सालार-ए-जंग (سالار جنگ) पु. (फ़ा.) सेनापती.

सालारी (سالاری) स्त्री. (फ़ा.) सेनापतीत्व; नेतृत्व.

सालिक (سالک) वि. (फ़ा.) (१) पथिक; मुसाफीर. (२) गृहस्थाश्रमात राहून साधकाचे जीवन घालविणारा; ईश्वरभक्त.

सालिफ़ (سالف) वि. ('अ.) पूर्वीचा; आधीचा.

सालिब (سالب) वि. ('अ.) निवारण करणारा; निवारक.

सालिम (سالم) वि. ('अ.) (१) संपूर्ण; अखंड; अभंग. (२) निरोगी. (३) सुरक्षित; सहीसलामत. (४) जशाचा तसा.

सालिमन् (سالماً) वि. ('अ.) (१) पूर्णपणे. (२) सुरक्षितपणे.

सालियाँ (سالیاں) पु. [फ़ा. 'साल' (سال) चे अनेक.] वर्षे.

सालियानः (سالیانہ) वि. (फ़ा.) वार्षिक. (पु.) दरसाल मिळणारी रक्कम; वार्षिक वृत्ती.

सालिस़ (ثالث) वि. ('अ.) (१) तिसरा. (२) पंच; मध्यस्थ. **–बि'ल्-ख़ैर** (بالخیر –) पु. ('अ.) निष्पक्षपणे निर्णय देणारा पंच.

सालिसी (ثالثی) स्त्री. ('अ.) पंचायत; मध्यस्थी.

सालिह् (صالح) वि. ('अ.) सदाचारी; चारित्र्यवान.

सालिहः (صالحہ) स्त्री. ('अ.) साध्वी; चारित्र्यवान स्त्री.

साली (سالی) वि. (फ़ा.) जीर्ण; जुना. (प्रत्य.) वर्ष असणे. [उदा. 'खुश्क साली' (خشک سالی) स्त्री. (फ़ा.) दुर्भिक्ष्य; दुष्काळ].

सालूस (سالوس) वि. (फ़ा.) (१) खुशामत्या; चाटुकार. (२) ढोंगी; कपटी.

सालूसी (سالوسی) स्त्री. (फ़ा.) (१) खुशामत. (२) ढोंग; कपट; लबाडी.

सालेह् (صالح) वि. ('अ.) सदाचारी; चारित्र्यवान.

सालः (سال) प्रत्य. (फ़ा.) वर्षाचा. [उदा. 'पंज सालः' (پنج سال) वि. (फ़ा.) पाच वर्षांचा; पंचवार्षिक].

सास (ساس) पु. (फ़ा.) ढेकुण; मत्कुण.

सासानी (ساسانی) वि. (फ़ा.) बहमनचा मुलगा; सासान याचे वंशज.

साहत् (ساحت) पु. स्त्री. ('अ.) (१) घराभोवतालची मोकळी जागा. (२) विस्तार. (३) समुद्रकिनारा. (४) देशाचा भाग.

साहिब (صاحب) पु. ('अ.) (१) साहेब. (२) मालक; परमेश्वर; स्वामी. (३) मित्र; दोस्त. (४) साथी; सहकारी. (प्रत्य.) वाला; असणारा. [उदा. 'साहब-ए-'अिल्म' (صاحب علم) वि. ('अ.) इल्म म्हणजे विद्या असणारा; विद्वान]. **-ए-'आलम** (عالم –) पु. ('अ.) दिल्लीच्या राजपुत्रांची पदवी. **-ए-कमाल** (کمال –) वि. ('अ.) कलावंत; गुणवान. **-ए-क़िरां** (قران –) वि. ('अ.) (१) भाग्यवान; ज्याच्या पत्रिकेतील शुभग्रह चांगल्या राशीत गोळा झाले आहेत असा. (२) शिकंदराची पदवी. **-ए-ख़ानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) घराचा मालक; गृहस्वामी. **-ए-ग़रज़** (غرض –) वि. ('अ.) (१) गरजू. (२) स्वार्थी. **-ज़ादः** (زادہ –) पु. ('अ.+फ़ा.) (१) मुलगा; सुपुत्र. (२) श्रीमंताचा मुलगा. **-ए-दिल** (دل –) वि. ('अ.+फ़ा.) (१) सहृदय. (२) माणसाची पारख व कदर करणारा. (३) ईश्वरभक्त; साक्षात्कारी. **-ए-नज़र** (نظر –) वि. ('अ.) दृष्टी असणारा; पारखी. **-ए-नसीब** (نصیب –) वि. ('अ.) भाग्यवान. **-सलामत** (سلامت –) स्त्री. ('अ.) (१) नमस्कार; रामराम. (२) ओळख; तोंडओळख.

साहिब-उज़्-ज़मां (صاحب الزماں) वि. ('अ.) युगपुरुष; हजरत इमाम मेहदी.

साहिब-उल्-जरिदः (صاحب الجریدہ) पु. ('अ.) वृत्तपत्राचा मालक.

साहिब-ए-क़लम (صاحب قلم) वि. ('अ.) लेखणीवर प्रभुत्व असलेला; लेखणीबहाद्दर.

साहिब-ए-क़ुव्वत (صاحب قدرت) वि ('अ.) समर्थ; शक्तिशाली.

साहिब-ए-क़ुर्आन (صاحب قرآن) पु. ('अ.) हजरत मुहम्मद पैगंबर (ज्यांना कुराण स्फुरले असे).

साहिब-ए-जमाल (صاحب جمال) वि. ('अ.) सुंदर; रूपवान.

साहिब-ए-जलाल (صاحب جلال) वि. ('अ.) (१) तेजस्वी. (२) उग्र; रागीट.

साहिब-ए-ज़ौक़ (صاحب ذوق) वि. ('अ.) रसिक; सहृदय; मर्मज्ञ.

साहिब-ए-तख़्त-ओ-ताज (صاحب تخت و تاج) वि. ('अ.+फ़ा.) बादशहा; सम्राट; राजा.

साहिब-ए-तदबीर (صاحب تدبیر) वि. ('अ.) (१) राजनीतीज्ञ; मुत्सद्दी. (२) बुद्धिमान.

साहिब-ए-दिमाग़ (صاحب دماغ) वि. ('अ.) (१) घमेंडखोर. (२) चिडखोर. (३) बुद्धिवान.

साहिब-ए-दिल'अ (صاحب ضلع) पु. ('अ.) जिल्हाधिकारी; कलेक्टर.

साहिब-ए-दीवान (صاحب دیوان) वि. ('अ.) ज्याच्या कवितांचा संपूर्ण संग्रह तयार किंवा प्रसिद्ध झाला आहे असा.

साहिब-ए-फ़िराश (صاحب فراش) वि. ('अ.) अंथरुणाला खिळलेला; आजारी; रोगी.

साहिब-ए-मज्लिस (صاحب مجلس); **साहिब-ए-महफ़िल** (صاحب محفل) वि. ('अ.) (१) अध्यक्ष. (२) ज्याच्या घरी मैफल होते तो.

साहिब-ए-विलायत (صاحب ولایت) वि. ('अ.) मोठा सत्पुरुष; दैवी शक्ती असलेला महात्मा.

साहिब-ए-हैसियत (صاحب حیثیت) वि. ('अ.) पत असलेला; प्रतिष्ठित; श्रीमंत.

साहिबान (صاحبان) पु. ['अ. 'साहिब' (صاحب) चे अनेक.] लोक; प्रतिष्ठित माणसे.

साहिबी (صاحبی) स्त्री. ('अ.) (१) अध्यक्षता; नेतृत्व. (२) स्वामित्व; मालकी.

साहिबः (صاحبہ) स्त्री. ('अ.) प्रतिष्ठित स्त्री, बाई; श्रीमती.

साहिर (ساحر) वि. पु. ('अ.) जादूगार; मंत्रतंत्र व जादूटोणा करणारा.

साहिरः (ساحرہ) स्त्री. ('अ.) चेटकीण.

साहिल (ساحل) पु. ('अ.) नदीतट; समुद्रकिनारा.

सिंद (سند) वि. (फ़ा.) हरामखोर; नीच; दोगला. (पु.) (१) सिंध प्रांत. (२) सिंधुनद.

सिंदबाद (سندباد) पु. (फ़ा.) हकीम अर्जक याने लिहिलेला एक ग्रंथ. यात गोष्टींच्या रूपाने उपदेश दिलेला आहे.

सिंदान (سندان) पु. स्त्री. (फ़ा.) ऐरण.

सि'अत (سعت) स्त्री. ('अ.) विस्तार; लांबी-रुंदी.

सि'आयत (سعایت) स्त्री. ('अ.) (१) निंदा; बदनामी. (२) चहाडी.

सिकंजुबीन (سکنجبین) स्त्री. (फ़ा.) (१) शिरका मिश्रित लिंबाचे सरबत. (२) लिंबाचे सरबत.

सिकंदर (سکندر) पु. (फ़ा.) ग्रीसचा सम्राट अलेक्झांडर; शिकंदर. (वि.) भाग्यवान. **–सौलत** (صولت –); **–हशम** (حشم –) वि. (फ़ा.+'अ.) शिकंदरासारखा दरारा व वैभव असलेला.

सिकंदरी (سکندری) स्त्री. (फ़ा.) घोडघाचे ठेच लागून पडणे; घोड्याला ठेच लागणे.

सिक़ायः (سقایہ) पु. ('अ.) पाण्याचा हौद (मशिदीत वगैरे असलेला).

सिकीज़ः (سکیزہ) पु. (फ़ा.) (१) उडी मारणे. (२) लाथ मारणे.

सिक़ः (ثقہ) वि. पु. ('अ.) विश्वसनीय व्यक्ती; सज्जन; विश्वासू.

सिक्कीन (سکین) स्त्री. ('अ.) सुरी; सुरा.

सिक्कः (سکہ) पु. ('अ.) (१) नाणे; रुपया; मुद्रा. (२) छाप; मोहोर. (३) सत्ता; प्रभुत्व. (४) दरारा. (५) पद्धती; ढंग. (६) प्रथा. **–ज़न** (زن –) वि. ('अ.+फ़ा.) नांणी पाडणारा; टाकसाळ चालविणारा.

सिक्कः-ए-क़ल्ब (سکۂ قلب); **सिक्कः-ए-कासिद** (سکۂ کاسد) पु. ('अ.) खोटे नाणे, नकली नाणे.

सिक्कः-ए-रा'इज (سکۂ رائج) पु. ('अ.) चलनी नाणे, चालू नाणे.

सिक़्त़ (سقط) पु. ('अ.) (१) मृत बालक जन्मणे. (२) चकमकीतून बाहेर पडणारी ठिणगी. (३) बाळूचा ढीग. (४) घसरणे.

सिक़्ल (ثقل) पु. ('अ.) वजन; वजनदारपणा; गुरुत्व; जडपणा.

सिक़्ल-ए-बत्न (ثقل بطن) पु. ('अ.) पोटाचा जडपणा; अपचन.

सिक़्ल-ए-समा'अत (ثقل سماعت) पु. ('अ.) कमी ऐकू येणे; बधिरता; बहिरेपणा.

सिक़्लात (سقلات) पु. (तु.) सकलात (द); लोकरीचे उंची कापड.

सिग़र (صغر) वि. ('अ.) लहानपणा; लघुत्व. **–सिन** (سن –) वि. ('अ.) अल्पवयीन; लहान. **–सिनी** (سنی –) स्त्री. ('अ.) बाल्यावस्था.

सिग़ार (صغار) पु. ['अ. 'सग़ीर' (صغیر) चे अनेक.] (१) लहान वयाचे मुलगे. (२) स्त्री. ['अ. 'सुग़्रा' (صغریٰ) चे अनेक.] लहान वयाच्या मुली.

सिगाल (سگال) स्त्री. (फ़ा.) (१) चिंता. (२) चिंतन; मनन. (३) विचार. (प्रत्य.) विचार करणारा. [उदा. 'ख़ैर सिगाल' (خیر سگال) वि. (फ़ा.) हितचिंतक].

सिगालिदः (سگالندہ) वि. (फ़ा.) विचार करणारा.

सिजंजल (سجنجل) पु. ('अ.) आरसा; दर्पण.

सिजाफ़ (سجاف) पु. स्त्री. (फ़ा.) गोट; किनार. पाहा 'संजाफ़'.

सिजिल्ल (سجل) पु. स्त्री. ('अ.) (१) शिक्कामोर्तब झालेला दस्तऐवज; खरेदी-विक्रीपत्र. (२) करारनामा. (३) न्यायाधिशाचा शिक्का.

सिज्जीन (سجین) स्त्री. ('अ.) (१) भयंकर तुरुंग; नरकातील एक विभाग. (२) पापी लोकांच्या पापाची नोंद. (३) गुन्हेगारांचे वर्णन असलेले पुस्तक.

सिज्न (سجن) पु. ('अ.) तुरुंग; कारागृह.

सितंबः (ستنبہ) पु. (फ़ा.) (१) अकाळविकाळ आकृती; स्वप्नात भीती दाखविणारे भूत. (२) शूर; वीर; मजबूत.

सितब (ستد) स्त्री. (फ़ा.) घेणे; घेवाण. [हा शब्द स्वतंत्रपणे येत नाही, 'दाद' (داد) शब्दाशी जोडून येतो. 'दाद-ओ-सितद' (داد و ستد) स्त्री. (फ़ा.) देवाणघेवाण].

सितम (ستم) पु. (फ़ा.) (१) जुलूम; अत्याचार. (२) अन्याय. (३) ईश्वरी कोप. (४) गहजब. (५) हट्ट. (६) अंदाधुंदी. **–ईजाद** (ایجاد –) वि. (फ़ा.+'अ.) (१) नवनवे जुलूम शोधून काढणारा; भयंकर अत्याचारी. (२) प्रेयसी; माषूक. **–कश** (کش –) वि. (फ़ा.) अन्याय पीडित; जुलूम सहन करणारा. **–केश** (کیش –) वि. (फ़ा.) स्वभावतः अत्याचारी असणारा; जुलमी. **–गर** (گر –) वि. (फ़ा.) जुलूम करणारा; अत्याचारी; अन्यायी.

मैं ने चाहा था कि. अंदोह-ए-जफ़ा से छूटूं।
वह सितमगर मेरे मरने पि. भी रादी न. हुंआ॥

–गिर्वीदः (گرویدہ –) वि. (फ़ा.) प्रेयसीकडून होणाऱ्या अत्याचारांवर मोहित झालेला; प्रियकर. **–ज़दः** (زدہ –) वि. (फ़ा.) अत्याचार पीडित. **–ज़रीफ़** (ظریف –) वि. (फ़ा.+'अ.) हसत हसत जुलूम करणारा; हसता हसता ठार मारणारा. **–तोड़ना** (توڑنا –) जुलूम करणे. **–रसीदः** (رسیدہ –) वि. (फ़ा.) अत्याचार पीडित. **–रानी** (رانی –) स्त्री. (फ़ा.) जुलूम करणे; अत्याचार. **–शि'आर** (شعار –) वि. (फ़ा.) अत्याचार करण्याचा स्वभाव असलेला.

सितां (ستاں) प्रत्य. (फ़ा.) (१) घेणारा; हिरावून घेणारा. [उदा. 'जाँ सितां' (جانستاں) वि. (फ़ा.) प्राण घेणारा; प्राणघातक.] (२) स्थान; एखाद्या वस्तूचे वैपुल्य असलेले ठिकाण. [उदा. 'गुलसितां' (گلستاں) पु. (फ़ा.) बाग; उपवन].

सिता (ستا) प्रत्य. (फ़ा.) प्रशंसा करणारा. [उदा. 'खुदसिता' (خود ستا) वि. (फ़ा.) आत्मश्लाघा करणारा]. **–'इंदः** (ئندہ –) वि. (फ़ा.) प्रशंसक;

तारीफ करणारा. **–'इश** (ثش –) स्त्री. (फ़ा.) (१) प्रशंसा; श्लाघा. (२) स्तुती; ईशस्तुती.

सितादः (ستادہ) वि. [फ़ा. 'इस्तादः' (استادہ) चे संक्षिप्त.] उभा; ताठलेला.

सिताम (ستام) पु. (फ़ा.) (१) घोडयावरील सरंजाम, दागिने वगैरे. (२) उंबरठा.

सितार (ستار) पु. (फ़ा.) सतार (तंतुवाद्य). **–ज़न** (زن –); **–नवाज़** (نواز –); **–बाज़** (باز –) वि. (फ़ा.) सतारवादक.

सितारः (ستارہ) पु. (फ़ा.) (१) तारा; नक्षत्र. (२) ग्रह. (३) भाग्य. (४) टिकली (गोल चकचकीत तुकडे). (५) अश्रू. **–जबीं** (جبیں –); **–पेशानी** (پیشانی –) वि. (फ़ा.) कपाळावर पांढरा डाग असलेला घोडा. (अशुभ). **–दाँ** (داں –); **–बीं** (بیں –); **–शनास** (شناس –) वि. (फ़ा.) ज्योतिषी; फलज्योतिषी.

सिती (ستی) स्त्री. (फ़ा.) सती; साध्वी.

सितूदः (ستودہ) वि. (फ़ा.) प्रशंसित; तारीफ केलेला.

सितेज़ (ستیز); **सितेज़ः** (ستیزہ) पु. स्त्री. (फ़ा.) (१) भांडण. (२) युद्ध. (३) शत्रुत्व. (४) प्रतिकूलता.

सित्तः (ستہ) वि. ('अ.) सहा.

सित्र (ستر) पु. ('अ.) (१) पडदा; आडपडदा. (२) डोकीवरून घेतलेला पदर; घुंघट.

सित्रः (سترہ) पु. ('अ.) तट; कोट (किल्ल्याचा).

सिद्क़ (صدق) पु. ('अ.) (१) सत्य. (२) खरेपणा; यथार्थता. (३) निष्कपटता; शुद्धता. **–मक़ाल** (مقال –) वि. ('अ.) सत्यवादी; आपला शब्द पाळणारा. **–शि'आर** (شعار –) वि. ('अ.) सत्यनिष्ठ.

सिद्क़-ए-अ'अमाल (صدق اعمال) पु. ('अ.) (१) आचरणशुद्धी. (२) फलाची अपेक्षा न बाळगता कर्म करणे.

सिद्क़-ए-नीयत (صدق نیت) पु. ('अ.) अंतःशुद्धी; मनःशुद्धी.

सिद्दीक़ (صدیق) वि. ('अ.) सच्चा; सत्यनिष्ठ; अत्यंत विश्वासू.

सिद्रत-उल्-मुन्तहाँ (سدرۃ المنتہیٰ) पु. ('अ.) सातव्या स्वर्गातील बोरीचे झाड. येथपर्यंत (काही लोकांच्या मते यांच्यापुढे) जिब्रील व हज़रत मुहम्मद पैगंबर यांच्याखेरीज कोणीही मानवी प्राणी गेलेला नाही.

सिद्रः (سدرہ) पु. ('अ.) स्वर्गातील सर्वोच्च भागातील बोरीचे झाड.

सिन (سن) पु. ('अ.) (१) वय. (२) आयुष्य. (३) दात. **–रसीदः** (رسیدہ –) वि. ('अ. + फ़ा.) वयोवृद्ध; वृद्ध.

सिन-ए-तमीज़ (سن تمیز); **सिन-ए-शु'ऊर** (سن شعور) पु. ('अ.) सद्सद्विवेक करू शकण्याचे वय; प्रौढवय.

सिन-ए-बुलूग़ (سن بلوغ) पु. ('अ.) युवावस्था.

सिनाँ (سناں); **सिनान** (سنان) स्त्री. (फ़ा.) (१) बाण; बाणाचे टोक. (२) भाला; बरच्छी. **–कश** (کش –) वि. (फ़ा.) धनुर्धर; तिरंदाज.

सिना'अत (صناعت) स्त्री. ('अ.) (१) व्यवसाय. (२) उपजीविका. (३) कारागिरी.

सिनीन (سنین) पु. ['अ. 'सिन' (سن) चे अनेक.] वर्षे.

सिन्नौर (سنور) स्त्री. ('अ.) मांजरी; भाटी.

सिन्फ़ (صنف) स्त्री. ('अ.) (१) जाती. (२) वर्ग. (३) वंश.

सिन्फ़-ए-नाज़ुक (صنف نازک); **सिन्फ़-ए-लतीफ़** (صنف لطیف) स्त्री. ('अ.) स्त्री जाती; स्त्रिया.

सिपंज (سپنج) पु. (फ़ा.) (१) चार दिवसांचा पाहुणा. (२) कुरण. (३) इहलोकीचे चार दिवस.

सिपंजीसराय (سپنجی سرائے) स्त्री. (फ़ा.) (१) गुराख्यांची झोपडी. (२) जग; क्षणभंगुर निवास.

सिपंद (سپند) पु. (फ़ा.) दृष्ट काढण्याचे काळे धान्य; मोहरी.

सिपर (سپر) स्त्री. (फ़ा.) (१) तलवार वगैरे शस्त्रांचा मारा अडविण्याचे साधन; ढाल; फरी. (२) चिलखत; कवच. **–अंदाख़्तः** (انداختہ –) वि. (फ़ा.) ढाल फेकून देणारा; शरण आलेला; दीन. **–अंदाज़ी** (انداز –) स्त्री. (फ़ा.) पराभव मान्य करणे; शरण येणे.

सिपरी (سپری) वि. (फ़ा.) (१) निघून गेलेली; व्यतीत झालेली. (२) तुच्छ. (३) मृत (व्यक्ती).

सिपस (سپس) अव्य. (फ़ा.) त्यानंतर; पुष्कळ दिवसांनंतर.

सिपस्ताँ (سپستاں) पु. (फ़ा.) भोकर; एक प्रकारचे चिकट फळ.

सिपह (سپہ) स्त्री. [फ़ा. 'सिपाह' (سپاہ) चे संक्षिप्त.] सैन्य; फौज. **–गरी** (گری –) स्त्री. (फ़ा.) (१) शिपाईगिरी; सैनिकी पेशा. (२) शौर्य. **–दार** (دار –); **–बुद** (بد –); **–सालार** (سالار –) पु. (फ़ा.) सेनापती; सेनानायक; कमांडर.

सिपारिंदः (سپارندہ) वि. (फ़ा.) सोपविणारा; हस्तांतरित करणारा.

सिपारी (سپاری) स्त्री. (फ़ा.) सुपारी.

सिपारः (سپارہ) पु. (फ़ा.) कुराणाच्या तीस अध्यायांपैकी एक. पाहा 'सीपारा'.

सिपास (سپاس) स्त्री. (फ़ा.) (१) कृतज्ञता; आभार. (२) स्तुती; गुणगान; प्रशंसा. **–गुज़ार** (گزار –); **–गो** (گو –) वि. (फ़ा.) (१) आभार मानणारा; कृतज्ञ. (२) स्तुतिपाठक; प्रशंसक. **–नामः** (نامہ –) पु. (फ़ा.) मानपत्र; अभिनंदनपत्र.

सिपाह (سپاہ) स्त्री. (फ़ा.) सैन्य; फौज. **–गरी** (گری –) स्त्री. (फ़ा.) शिपाईगिरी; सैनिकाचा व्यवसाय. पाहा 'सिपह'.

सिपाहियानः (سپاہیانہ) वि. (फ़ा.) सैनिकासारखा; वीरतापूर्ण.

सिपाही (سپاہی) पु. (फ़ा.) (१) सैनिक; योद्धा. (२) शिपाई. (३) शूर; वीर.

सिपिस्तां (سپستاں) पु. (फ़ा.) भोकर; एक प्रकारचे चीक असलेले फळ.

सिपिहर (سپہر) पु. (फ़ा.) आकाश; आभाळ.

सिपिहर-ए-बरीं (سپہر بریں) पु. (फ़ा.) सर्वांत उंच नववे आकाश.

सिपुर्द (سپرد) वि. (फ़ा.) (१) हवाली केलेला; सोपविलेला. (२) हवाली करणे.

सिपुर्दगी (سپردگی) स्त्री. (फ़ा.) (१) हवाली करणे. (२) ताब्यात देणे; कच्ची कैद.

सिपुर्दार (سپردار) पु. (फ़ा.) ज्याच्या स्वाधीन काही माल (विशेषत: जप्त केलेला माल) केलेला आहे असा.

सिपुर्दः (سپردہ) वि. (फ़ा.) सोपविलेला; हवाली केलेला.

सिपेद (سپید) वि. (फ़ा.) सफेत; शुभ्र.

सिपेदी (سپیدی) स्त्री. (फ़ा.) शुभ्रता; सफेती; पांढरेपणा.

सिपेदः (سپیدہ) पु. (फ़ा.) सफेता. **–दम** (دم –) पु. (फ़ा.) पहाट; सकाळ.

सिपोख़्तः (سوختہ); **सिपोज़ीदः** (سوزیدہ) वि. (फ़ा.) दुसऱ्या वस्तूत घुसविलेली (वस्तू); दुसऱ्या वस्तूतून काढलेली (वस्तू).

सिफ़त (صفت) स्त्री. ('अ.) (१) गुण; वैशिष्ट्य. (२) लक्षण. (३) स्वभाव; प्रकृती. (४) प्रशंसा; तारीफ. (५) उत्तमता. (६) प्रभाव. (व्या.) विशेषण.

सिफ़र (صفر) पु. ('अ.) (१) शून्य; बिंदू; टिंब. (२) पोकळी.

सिफ़वत (صفوت) स्त्री. ('अ.) पावित्र्य; श्रेष्ठत्व. (वि.) पवित्र; श्रेष्ठ.

सिफ़ात (صفات) स्त्री. पु. ['अ. 'सिफ़त' (صفت) चे अनेक.] गुण; वैशिष्ट्ये.

सिफ़ाती (صفاتی) वि. ('अ.) अंगभूत नसलेले; तात्पुरते गुण-दोष.

सिफ़ाद (صفاد) स्त्री. ('अ.) बेडी; हातकडी.

सिफ़ालत (سفالت) स्त्री. (फ़ा.) (१) हस्तकला; कारागिरी. (२) जहाजे बांधण्याचे काम. (३) नौकानयनाचे काम.

सिफ़ारत (سفارت) स्त्री. ('अ.) (१) परराष्ट्रीय वकील अथवा राजदूत यांचे कार्य, पद वगैरे. (२) मैत्री किंवा तह करण्यासाठी परदेशात पाठविलेले शिष्टमंडळ. **–ख़ानः** (خانہ –) पु. ('अ. + फ़ा.) परराष्ट्रीय वकिलात; दूतावास.

सिफ़ारिश (سفارش) स्त्री. (फ़ा.) (१) शिफारस. (२) वशिला.

सिफ़ाल (سفال) स्त्री. (फ़ा.) (१) मातीचे भांडे. (२) ठिकरी; तुकडा. (३) कौल; खापरी. **–गर** (گر –) वि. पु. (फ़ा.) कुंभार. **–पोश** (پوش –) वि. (फ़ा.) कौलारू.

सिफ़ाली (سفالی) वि. (फ़ा.) मातीचा; मृण्मय.

सिफ़ाह (سفاح) स्त्री. ('अ.) (१) व्यभिचार. (२) खून; हत्या.

सिफ़्तः (سفتہ) वि. (फ़ा.) लठ्ठ; जाडजूड. (पु.) जाड कापड.

सिफ़्ल (سفل) पु. ('अ.) अवनती; निम्नता. **–गी** (گی –) स्त्री. ('अ.) (१) नीचता; अधमता. (२) उथळपणा; छचोरपणा; मवालीगिरी.

सिफ़्ली (سفلی) वि. ('अ.) नीच कोटीचा; हलका; हलकट. **–'अमल** (عمل –) पु. ('अ.) भूतबाधा.

सिफ़्लः (سفلہ) वि. ('अ.) नीच; हलकट; अधम; पाजी; लोफर. **–ख़ू** (خو –); **–निहाद** (نہاد –) वि. ('अ.+फ़ा.) **–मिज़ाज** (مزاج –) वि. ('अ.) नीच स्वभावाचा; क्षुद्रप्रकृती. **–नवाज़** (نواز –); **–पर्वर** (پرور –) वि. ('अ.+फ़ा.) नीच लोकांना पाठीशी घालून सज्जनांना त्रास देणारा.

सिबाक़ (سباق) पु. ('अ.) शर्यतीत पुढे जाणे.

सिब्ग़ (صبغ) पु. ('अ.) वर्ण; रंग.

सिब्ग़तु'ल्लह (صبغتہ اللہ) पु. ('अ.) इस्लाम धर्म.

सिब्त (سبط) पु. ('अ.) नातू; मुलीचा मुलगा.

सिब्त-ए-नबी (سبط نبی) पु. ('अ.) मुहम्मद साहेबांचा नातू; फातिमा बीबीचा मुलगा.

सिब्तैन (سبطین) पु. ('अ.) मुहम्मद साहेबांचे नातू; इमाम हसन व इमाम हुसैन.

सिब्र (صبر) पु. ('अ.) कोरफड (औषधी वनस्पती).

सिमा'अ (سماع) पु. ('अ.) गाणे ऐकणे; रंगून जाणे.

सिमाक (سماک) पु. ('अ.) चित्रा (नक्षत्र).

सिमाख (سماخ) पु. ('अ.) कानाचे छिद्र; कर्णविवर.

सिमात (سماط) स्त्री. ('अ.) (१) रस्ता. (२) ओळ; रांग. (३) टेबलक्लॉथ. (जेवणाच्या टेबलावर घालावयाचे कापड). (४) जेवणाचे निमंत्रण.

सिमात (سمات) पु. ['अ. 'सम्त' (سمت) चे अनेक.] अनेक दिशा, बाजू.

सिम्त (سمت) स्त्री. ('अ.) दिशा; बाजू. पाहा 'सम्त' (शु.).

सिम्त् (سمط) स्त्री. ('अ.) मोती; मौक्तिक.

सिम्सिम (سمسم) स्त्री. ('अ.) तीळ (तेलधान्य).

सियर (سیر) स्त्री. ['अ. 'सीरत' (سیرت) चे अनेक.] जीवनचरित्रे.

सियह (سیہ) वि. [फ़ा. 'सियाह' (سیاہ) चे संक्षिप्त.] (१) काळा; कृष्ण. (२) अशुभ (जोडशब्दांसाठी).

सियाक़ (سیاق) पु. ('अ.) (१) हाकणे; चालविणे. (२) बहिरीससाण्याच्या पायांत बांधावयाची दोरी. (३) गणित; हिशेब. (४) जमाखर्च. (५) पद्धती; शैली; ढंग.

सियाक़त (سیاقت) स्त्री. ('अ.) चालविणे; हाकणे.

सियादत (سیادت) स्त्री. ('अ.) (१) नेतृत्व; अध्यक्षता; सरदारी. (२) सत्ता. (३) प्रतिष्ठा; श्रेष्ठत्व. (४) 'सैयिद' असणे; सैयदत्व.

सियानत (صیانت) स्त्री. ('अ.) संरक्षण; देखरेख.

सियाम (صیام) पु. ['अ. 'सौम' (صوم) चे अनेक.] उपवासाचे दिवस; व्रते; रोजे.

सियासत (سیاست) स्त्री. ('अ.) (१) राजनीती; राजकारण. (२) देशाची व्यवस्था; देशरक्षण. (३) लबाडी; कपट. (४) धाक; शिक्षा; धमकी. **–गर** (گر–) वि. ('अ.+फ़ा.) शिक्षा देणारा; क्रूर; रक्तपात करणारा. **–दाँ** (داں –) वि. ('अ.+फ़ा.) राजनीतिज्ञ.

सियासत-ए-मुदन (سیاست مدن) स्त्री. ('अ.) शहराचा कारभार; नगरव्यवस्था.

सियासियात (سیاسیات) स्त्री. ('अ.) राजनीतिशास्त्र; राजकारण.

सियासी (سیاسی) वि. ('अ.+फा.) राजकीय; देशाच्या व्यवस्थेशी संबंधित.

सियाह (صیاح) पु. ('अ.) (१) जोराचा आवाज; ओरडा. (२) विलाप; रडारड.

सियाह (سیاہ) वि. (फ़ा.) (१) काळा; कृष्णवर्ण. (२) अशुभ; वाईट. **–क़लम** (قلم –) स्त्री. (फ़ा.+'अ.) (१) काळ्या रंगाचे चित्र. (२) काळी प्रेयसी. **–क़ल्ब** (قلب –) वि. (फ़ा.+'अ.) (१) पापात्मा; पापी. (२) कठोर; क्रूर. **–काम** (کام –) वि. (फ़ा.) (१) अयशस्वी. (२) दुर्दैवी. **–कार** (کار –) वि. (फ़ा.) दुश्चरित्र; पापी; गुन्हेगार. **–कासः** (کاسہ –) वि. (फ़ा.) कृपण; कंजूष. **–ख़ानः** (خانہ –) पु. (फ़ा.) (१) आपत्तीचे घर. (२) तुरुंग. (३) ज्याचे घरदार उध्वस्त झाले आहे असा; दुर्दैवी. **–गिलीम** (گلیم –) वि. (फ़ा.) दुर्दैवी; निर्धन. **–गोश** (گوش –) पु. (फ़ा.) कुत्र्याच्या आकाराचा एक जंगली प्राणी. याला वाघ भितो असे म्हणतात. **–चश्म** (چشم –) वि. (फ़ा.) (१) काळे डोळे असलेला (ली) सुंदर. (२) कृतघ्न; प्रेयसी. (३) चारित्र्यहीन; निर्लज्ज. **–ज़बाँ** (زباں –) वि. (फ़ा.) ज्याचा शाप लगेच बाधतो असा. **–ताब** (تاب –) पु. (फ़ा.) (१) चमकदार काळा रंग. (२) साफ लोखंडाला लिंबू लावून तापविल्यानंतर येणारा रंग. **–तालि'अ** (طالع –) वि. (फ़ा.+'अ.) दुर्दैवी. **–दस्त** (دست –) वि. (फ़ा.) कृपण; कंजूष. **–दानः** (دانہ –) पु. (फ़ा.) दृष्ट काढण्याचे काळे बी; मोहरी. **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) (१) पापी. (२) निष्ठुर. **–नामः** (نامہ –) वि. (फ़ा.) कृष्णकृत्ये करणारा; पापी. **–पीर** (پیر –) पु. (फ़ा.) म्हातारा नोकर; स्वामिभक्त. **–पोश** (پوش –) वि. (फ़ा.) काळे कपडे परिधान केलेला; सुतकी. **–फ़ाम** (فام –) वि. (फ़ा.) काळ्या रंगाचा; कृष्णवर्ण. **–बख़्त** (بخت –) वि. (फ़ा.) दुर्दैवी. **–बातिन** (باطن –) वि. (फ़ा.+'अ.) कपटी; ढोंगी; पापी; दुराचारी. **–मस्त** (مست –) वि. (फ़ा.) खूप झिंगलेला. **–रू** (رو –) वि. (फ़ा.) काळतोंड्या; दुराचारी. **–रू'ई** (روئی –) स्त्री. (फ़ा.) (१) दुराचार. (२) बदनामी. **–रोज़** (روز –) वि. (फ़ा.) ज्याचे दिवस वाईट आले आहेत असा; दुर्दैवी. **–साल** (سال –) पु. (फ़ा.) दुष्काळाचे वर्ष **–सोख्तः** (سوختہ –) वि. (फ़ा.) जळून काळा झालेला.

सियाह-ओ-सफ़ेद (سیاہ و سفید) पु. (फ़ा.) काळे-पांढरे; संपूर्ण; सर्व.

सियाही (سیاہی) स्त्री. (फ़ा.) (१) काळिमा; काळेपणा. (२) अंधकार; काळोख. (३) काजळ. (४) शाई. (५) कलंक; डाग.

सियाहः (سیاہہ) पु. (फ़ा.) मुलकी खात्याकडील रोजचा कच्चा जमाखर्च; जमाखर्चाची वही; रजिस्टर. **–करना** (کرنا –) नोंद करणे; टिपून ठेवणे. **–नवीस** (نویس –) वि. (फ़ा.) (१) हिशेब लिहिणारा. (२) नोंद करणारा.

सिर (سر) पु. ('अ.) मर्म; रहस्य.

सिराज (سراج) पु. ('अ.) दिवा; दीप.

सिरात् (صراط) स्त्री. ('अ.) मार्ग; रस्ता.

सिरात्-ए-मुस्तक़ीम (صراط مستقیم) स्त्री. ('अ.) सरळ मार्ग; सन्मार्ग; धर्मपंथ.

सिरिश्क (سرشک) पु. (फ़ा.) (१) अश्रू; आसू. (२) थेंब; बिंदू.

सिरिश्त (سرشت) स्त्री. (फ़ा.) (१) स्वभाव; प्रकृती. (२) शील. (३) गुण; धर्म. (प्रत्य.) स्वभावाचा. [उदा. 'सादः सिरिश्त' (سادہ سرشت) वि. (फ़ा.) साधाभोळा].

सिरिश्तः (سرشتہ) वि. (फ़ा.) गुंफलेला.

सिरेश (سریش) पु. स्त्री. (फ़ा.) सरस (चिकटविण्याचा).

सिर्कः (سرکہ) पु. (फ़ा.) फळे, ऊस, ताड, वगैरेचा उन्हात ठेवून आंबविलेला रस; आसव; शिरका. **–जबीं** (جبیں –); **–पेशानी** (پیشانی –) वि. (फ़ा.) कपाळाला आठ्या घालणारा; चिडखोर; रागीट.

सिर्फ़ (صرف) वि. ('अ.) (१) शुद्ध; निर्भेळ. (२) एकटा; एकाकी. (अव्य.) केवळ; फक्त.

सिर्हान (سرہان) पु. ('अ.) छांडगा.

सिल (سل) स्त्री. ('अ.) (१) फुफ्फुसातील जखम; (यावर उपचार न झाल्यास क्षयरोग होतो). (२) क्षय; राजयक्ष्मा. (३) सतत येणारा ताप.

सिलम (سلم) पु. ('अ.) (१) समेट. (२) प्रेम. (३) समेट करणारे.

सिलसिलः (سلسلہ) पु. ('अ.) (१) पंक्ती; ओळ. (२) क्रम; परंपरा. (३) शृंखला; साखळी. (४) बेडी. (५) व्यवस्था. (६) वंश; घराणे; गोत्र; वंशवृक्ष. **–ए-जुंबां** (جنباں –) वि. ('अ.+फ़ा.) एखादे काम हाती घेणारा; एखादी चळवळ सुरू करणारा. **–बंदी** (بندی –) स्त्री. ('अ.+फ़ा.) (१) क्रमबद्धता. (२) पंक्तिबद्धता. (३) संबंध; परंपरा. **–वार** (وار –) अव्य. ('अ.+फ़ा.) क्रमाने; क्रमशः.

सिलह् (سلح) पु. ('अ.) शस्त्र; आयुध; हत्यार. **–ख़ानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) शस्त्रागार. **–दस्त** (دست –); **–दार** (دار –); **–पोश** (پوش –); **–बंद** (بند –); **–बर्दार** (بردار –); **–शोर** (شور –) वि. ('अ.+फ़ा.) हातात शस्त्र घेतलेला; सशस्त्र; शिलेदार; सैनिक; योद्धा.

सिलायः (صلایہ) पु. ('अ.) पाटा-वरवंटा.

सिलाह् (صلاح) पु. ('अ.) (१) संधी; तह; तडजोड. (२) मैत्री. (३) शांतता.

सिलाह् (سلاح) पु. ('अ.) शस्त्र; आयुध; हत्यार; अवजार. (जोड शब्दांसाठी).

सिलाही (سلاحی) पु. ('अ.) सैनिक; योद्धा.

सिलः (صلہ) पु. ('अ.) (१) इनाम; पारितोषिक. (२) मोबदला; फळ; पापपुण्याचे फळ. (३) प्रभाव; परिणाम. [अनेक 'सिलात' (صلات)].

सिलः-ए-रहिम (صلۂ رحم) पु. ('अ.) आपल्या कुटुंबीजनांवर प्रेम करणे व यथाशक्ती त्यांना मदत करणे.

सिल्क (سلک) पु. ('अ.) (१) तंतू; धागा; दोरा. (२) तार. (३) क्रम. (४) रस्ता. (५) मोत्यांची लड.

सिल्क-ए-कहरुबा'ई (سلک کہربائی) पु. ('अ.) विजेची तार; विजेच्या तारांची लाईन.

सिल्की (سلکی) वि. ('अ.) दोऱ्याचा; तारेचा.

सिवा (سوا) अव्य. ('अ.) (१) शिवाय; व्यतिरिक्त; वाचून. (२) खेरीज; विना. (वि.) (१) अधिक; जादा. (२) अन्य; दुसरा.

सिवुम (سوم) वि. (फ़ा.) (१) तिसरा; तृतीय. (२) मुसलमान व्यक्तीच्या मृत्यूच्या तिसऱ्या दिवशी पढला जाणारा 'फ़ातिहः'.

सिह (سہ) वि. (फ़ा.) तीन. (३) **–गूनः** (گونہ –) वि. (फ़ा.) तिप्पट. **–गोशः** (گوشہ –) वि. (फ़ा.) त्रिकोणी. (पु.) त्रिकोण. **–चंद** (چند –) वि. (फ़ा.) तिप्पट; तिहेरी. **–शंबः** (شنبہ –) पु. (फ़ा.) मंगळवार.

सिह्र (سحر) पु. ('अ.) (१) जादूटोणा. (२) मंत्रतंत्र; मूठ मारणे. **–अंगेज़** (انگیز –) वि. ('अ.+फ़ा.) आश्चर्यकारक. **–आफ़री** (آفریں –) वि. ('अ.+फ़ा.) जादू करणारा; चमत्कार करून दाखविणारा. **–आमेज़** (آمیز –) वि. ('अ.+फ़ा.) जादूने भरलेला; भारलेला; आश्चर्यकारक. **–कार** (کار –); **–तराज़** (طراز –) वि. ('अ.+फ़ा.) जादूगार. **–ए-बयान** (بیان –) वि. ('अ.) ज्याच्या बोलण्यात अथवा लिहिण्यात जादू आहे असा; सुंदर वर्णन करणारा. **–बाज़** (باز –); **–संज** (سنج –); **–साज़** (ساز –) वि. ('अ.+फ़ा.) जादूगार.

सिह्हाब (صحاب) पु. ['अ. 'साहब' (صاحب) चे अनेक.] मित्रगण.

सिह्हाम (سہام) पु. ['अ. 'सहम' (سہم) चे अनेक.] (१) भाग; हिस्से. (२) बाण.

सिह्हाह् (صحاح) पु. ['अ. 'सहीह' (صحیح) चे अनेक.] निरोगी माणसे. (स्त्री.) 'हदीस' चा एक सुप्रसिद्ध ग्रंथ.

सिह्हत (صحت) स्त्री. ('अ.) (१) आरोग्य; आजारातून उठणे. (२) सुधारणा; दुरुस्ती. **–अफ़ज़ा** (افزا –) वि. ('अ.+फ़ा.) आरोग्यवर्धक. **–ख़ानः** (خانہ –) पु. ('अ.+फ़ा.) शौचकूप; संडास. **–नामः** (نامہ –) पु. ('अ.+फ़ा.) शुद्धिपत्र (ग्रंथाचे). **–बख़्श** (بخش –) वि. ('अ.+फ़ा.) आरोग्यदायक; आजारातून बरा करणारा. **–मंद** (مند –) वि. ('अ.+फ़ा.) (१) आरोग्ययुक्त; निरोगी. (२) निर्दोष; उत्तम.

सी (سی) वि. (फ़ा.) तीस (३०). **–पारः** (پارہ –) वि. पु. (फ़ा.) तीस भागांत विभागलेला; कुराणाच्या तीस अध्यायांपैकी एक.

सीकी (سیکی) स्त्री. (फ़ा.) उकळून $\frac{1}{3}$ राहिलेली दारू; कडक दारू.

सीख (سیخ) स्त्री. (फ़ा.) (१) लोखंडी सळई; छड; कांब. (२) कबाब (मांस) भाजण्याची लोखंडी सळई. **–चः** (چہ –) पु. (फ़ा.) लहान सळई. **–पर** (پر –) पु. (फ़ा.) पंख न फुटलेले पक्ष्याचे पिलू.

सीग़ः (صیغہ) पु. ('अ.) (१) विभाग; खाते. (२) साचा. (३) व्यापार; व्यवसाय. (४) शिया लोकांचे लग्न. (५) विभक्ती, पुरुष, काळ वगैरे (व्या.). **–पढ़ना** (پڑھنا –) लग्न, निका लावणे.

सीग़ः-ए-ग़ाइब (صیغۂ غائب) पु. ('अ.) तृतीय पुरुष (व्या.).

सीग़ः-ए-मुतकल्लिम (صیغۂ متکلم) पु. ('अ.) प्रथम (उत्तम) पुरुष (व्या.).

सीग़ः-ए-हाज़िर (صیغۂ حاضر) पु. ('अ.) द्वितीय (मध्यम) पुरुष (व्या.).

सीत (صیت) स्त्री. ('अ.) (१) चर्चा; उल्लेख. (२) ख्याती.

सीदी (سیدی) वि. (हिं.) शिद्दी; हबशी; निग्रो.

सीन (صین) पु. ('अ.) चीन (देश).

सीन (سین) पु. ('अ.) अरबीचे १२ वे, फारसीचे १५ वे व उर्दूचे १८ वे अक्षर.

सीना (سینا) पु. ('अ.) सीरीयातील एक पर्वत, तूर. (या पर्वतावर मोझेसला ईश्वरीतेज दिसले होते).

सीनियः (صینیہ) स्त्री. ('अ.) **सीनी** (سینی) स्त्री. (फ़ा.) (१) नाव; नौका. (२) थाळी; तबक.

सीनः (سینہ) पु. (फ़ा.) (१) वक्षस्थळ; छाती. (२) स्तन. **–अफ़गार** (افگار –) वि. (फ़ा.) भग्नहृदय. **–कावी** (کاوی –) स्त्री. (फ़ा.) खूप परिश्रम करणे; हाडाची काडे करणे. **–कोबी** (کوبی –) स्त्री. (फ़ा.) छाती बडवून विलाप करणे. **–चाक** (چاک –) वि. (फ़ा.) (१) ज्याची छाती फाटली आहे असा; दुःखी; शोकग्रस्त. (२) प्रेमी. **–ज़न** (زن –) वि. (फ़ा.) छाती बडवून शोक करणारा. **–ज़ोर** (زور –) वि. (फ़ा.) अत्याचारी; जबरदस्त. **–ज़ोरी** (زوری –) स्त्री. (फ़ा.) जुलूम; अत्याचार. **–पोश** (پوش –) पु. (फ़ा.) छाती झाकणारे कापड किंवा कपडा. **–फ़िगार** (فگار –) वि. (फ़ा.) भग्नहृदय; दुःखी. **–बंद** (بند –) पु. (फ़ा.) (१) चोळी. (२) लाळेरे (लहान मुलांच्या गळ्यांत लाळेसाठी बांधले जाणारे फडके). (३) थंडीच्या दिवसांत छातीला ऊब यावी म्हणून वापरले जाणारे एक वस्त्र. **–बाज़** (باز –) वि. (फ़ा.) (१) उघडघा छातीचा. (२) रुंद छातीचा. **–बीं** (بیں –) स्त्री. पु. (फ़ा.) स्टेथॉस्कोप. **–रेश** (ریش –) वि. (फ़ा.) (१) घायाळ हृदयाचा; दुःखी. (२) प्रेमी. **–सिपर** (سپر –) वि. (फ़ा.) छाती पुढे करून सामना करण्यास आलेला; दृढपणे विरोध करणारा. **–सियाह** (سیاہ –) वि. (फ़ा.) (१) कुटिल; पापी. (२) निष्ठुर; निर्दय. **–सोख़्तः** (سوختہ –) वि. (फ़ा.) दग्धहृदय; दुःखी.

सीम (سیم) स्त्री. (फ़ा.) (१) चांदी. (२) धन; संपत्ती. **–अंदाम** (اندام –) वि. (फ़ा.) गोरा; गौर वर्ण. **–कारी** (کاری –) स्त्री. (फ़ा.) हावभाव; नखरा. **–कुश** (کش –) वि. (फ़ा.) उघळघा. **–तन** (تن –) वि. (फ़ा.) गोऱ्या शरीराचा (ची); गौरवर्ण. **–बर** (بر –) वि. (फ़ा.) चांदीसारखे गोरे व टणक वक्षस्थळ असलेली (नायिका). **–साक़** (ساق –) वि. (फ़ा.) चांदीसारख्या गोऱ्या व टणक पोटऱ्या असलेली. **–सुरीं** (سریں –) वि. (फ़ा.) नितंबिनी; सुंदर नितंब असलेली.

सीम-ओ-ज़र (سیم و زر) पु. (फ़ा.) सोने-चांदी; संपत्ती; धन.

सीमा (سیما) स्त्री. (फ़ा.) (१) चिन्ह; खूण. (२) कपाळ; भाळ; मस्तक.

सीमाब (سیماب) पु. (फ़ा.) पारा; पारद. (वि.) अस्वस्थ; बेचैन. **–गूं** (گوں –) वि. (फ़ा.) पाऱ्याच्या रंगाचा; शुभ्र. **–दरगोश** (درگوش –) वि. (फ़ा.) बहिरा. **–दिल** (دل –) वि. (फ़ा.) अधीर; आतुर. **–वार** (وار –) वि. (फ़ा.) चंचल; अस्थिर.

सीमाब-ए-कुश्तः (سیماب کشتہ) पु. (फ़ा.) पाऱ्याचे भस्म; पारदभस्म.

सीमाबी (سیمابی) वि. (फ़ा.) पाऱ्याचा.

सीमिया (سیمیا) स्त्री. ('अ.) परकायाप्रवेश विद्या.

सीमीं (سیمیں) वि. (फ़ा.) चांदीचा; चांदीसारखा; गोरा. जोडशब्दांसाठी पाहा 'सीम'.

सीमुर्ग़ (سیمرغ) पु. (फ़ा.) एक प्रचंड काल्पनिक पक्षी.

सीर (سیر) पु. (फ़ा.) लसूण.

सीरत (سیرت) स्त्री. ('अ.) (१) स्वभाव; प्रकृती. (२) गुण; धर्म. (३) शील. (४) चरित्र. (५) सौजन्य.

सीरत (سیرت) अव्य. ('अ.) स्वभावतः.

सीली (سیلی) स्त्री. (फ़ा.) गचांडी; अर्धचंद्र; थप्पड.

सीस्तान (سیستان) पु. (फ़ा.) इराणच्या दक्षिणपूर्व भागातील एक प्रदेश. (रुस्तम पहिलवानाची जन्मभूमी).

सुंबुक (سنبک) स्त्री. (फ़ा.) मोठपा नावेबरोबर असणारी लहान नाव.

सुंबुल (سنبل) स्त्री. पु. (फ़ा. + 'अ.) (१) एक प्रकारची सुगंधी वनस्पती. (हिची उपमा केसांना दिली जाते). (२) केस. (३) गव्हाची लोंबी.

सुंबुलः (سنبلہ) पु. ('अ.) (१) कन्या (राशी). (२) गव्हाची लोंबी.

सुंबः (سنبہ) पु. (फ़ा.) लोखंडात किंवा लाकडात छिद्र पाडण्याचे अवजार; गिरमिट.

सु'आद (سعاد) स्त्री. ('अ.) अरबस्तानची एक सुंदरी.

सु'आल (سعال) स्त्री. ('अ.) खोकला.

सु'आल (سوال) पु. ('अ.) प्रश्न; सवाल.

सु'ऊद (صعود) पु. ('अ.) (१) वर चढणे; वर जाणे. (२) उन्नती. (३) घात; गुणाकार.

सु'ऊद (سعود) पु. ['अ. 'स'अद' (سعد) चे अनेक.] शुभ ग्रह (गुरू, शुक्र व चंद्र).

सु'ऊबत (صعوبت) स्त्री. ('अ.) (१) कष्ट; त्रास. (२) पीडा; व्यथा.

सुक़रात (سقرات) पु. (यू. + 'अ.) सॉक्रेटीस (ग्रीक तत्त्वज्ञ).

सुकीनः (سکینہ) स्त्री. ('अ.) हजरत इमाम हुसैन यांची कन्या; सकीना.

सुकुर्रः (سکرہ) पु. ('अ.) मातीचा लहान पेला; परळ.

सुक़ूत (سقوط) पु. ('अ.) पडणे; पतन.

सुकूत (سکوت) पु. ('अ.) (१) मौन; स्तब्धता; निःशब्दता. (२) शांतता.

सुकून (سکون) पु. ('अ.) (१) निःस्तब्धता. (२) शांतता. (३) आजारातील उतार. (४) स्थिरता. (५) आराम; विश्रांती. (६) संतोष; समाधान. (७) धीर; धैर्य. (८) अक्षर हलन्त (स्वररहित) होणे.

सुकूनत (سکونت) स्त्री. ('अ.) निवास; वास्तव्य. **–पिज़ीर** (پذیر –) वि. ('अ. + फ़ा.) निवास करणारा; राहाणारा.

सुकूनती (سکونتی) वि. ('अ.) राहाण्याचा; राहाण्यास योग्य.

सुक्कर (سکر) स्त्री. ('अ.) साखर; शर्करा.

सुक्कान (سکان) पु. ['अ. 'साकिन' (ساکن) चे अनेक.] राहाणारे; रहिवासी.

सुक़्तः (سقطہ) पु. ('अ.) (१) एखाद्या वस्तूचा गळून पडलेला तुकडा. (२) मेघाचा तुकडा.

सुक्न (سکن) पु. ('अ.) (१) ज्यांच्यामुळे सुख होते असे कुटुंबीजन (पत्नी, मुले वगैरे); कुटुंब. (२) प्रेम. (३) दया.

सुक्नां (سکناں) स्त्री. ('अ.) (१) निवास; वास्तव्य. (२) निवास करणारा.

सुक़्बः (ثقبہ) पु. ('अ.) छिद्र; भोक.

सुक्र (سکر) पु. ('अ.) (१) मद; धुंदी; मस्ती. (२) घमेंड; अभिमान.

सुख़न (سخن) पु. (फ़ा.) (१) काव्य; कविता. (२) बोलणे; संभाषण; भाषा. (३) शब्द; ध्वनी. (४) वचन; वायदा; प्रतिज्ञा. (५) प्रवचन. (६) म्हण; लोकोक्ती. (७) हरकत. **–आफ़ी** (– آفریں); **–आरा** (– آرا); **–गुस्तर** (– گستر); **–गो** (– گو); **–गोया** (– گویا) वि. (फ़ा.) कवी; शायर. **–चीं** (– چیں) वि. (फ़ा.) (१) टीकाकार; छिद्रान्वेषी. (२) निंदक. (३) चहाडखोर. **–चीनी** (– چینی) स्त्री. (फ़ा.) (१) छिद्रान्वेषण. (२) चहाडी. **–तकियः** (– تکیہ) पु. (फ़ा. + 'अ.) बोलण्यात वारंवार यणारा निरर्थक शब्द. पाहा 'तकियः कलाम'. **–तराज़** (– طراز) वि. (फ़ा.) कवी. **–दां** (– داں) वि. (फ़ा.) (१) कवी. (२) काव्यमर्मज्ञ. **–नवाज़** (– نواز) वि. (फ़ा.) कवींची कदर करणारा; काव्यप्रेमी. **–परदाज़** (– پرداز) वि. (फ़ा.) कवी. **–पर्वर** (– پرور) वि. (फ़ा.) (१) कवी. (२) आपलेच म्हणणे खरे आहे असे म्हणणारा; दुराग्रही. **–फ़रामोश** (– فراموش) वि. (फ़ा.) दिलेले वचन विसरणारा; केलेला वायदा विसरणारा. **–फ़हम** (– فہم) वि. (फ़ा. + 'अ.) (१) काव्यातील गुणदोष ओळखणारा; काव्यमर्मज्ञ. (२) एखाद्या गोष्टीच्या मुळापर्यंत जाणारा; चतुर; समजदार. **–बाफ़** (– باف) वि. (फ़ा.) बडबडघा. **–रस** (– رس) वि. (फ़ा.) चतुर; बुद्धिमान. **–वर** (– ور) वि. (फ़ा.) कवी; शायर. **–शनास** (– شناس) वि. (फ़ा.) मर्मज्ञ; गुणग्राहक. **–संज** (– سنج) वि. (फ़ा.) (१) कवी. (२) काव्यमर्मज्ञ. **–सरा** (– سرا) वि. (फ़ा.) (१) कवी. (२) काव्यगायन करणारा; सुराबर आपली कविता म्हणणारा. **–साज़** (– ساز) वि. (फ़ा.) (१) कवी. (२) थापाडघा; धूर्त; लबाड.

सुख़न-ए-गर्म (سخن گرم) पु. (फ़ा.) रागाचे बोलणे; राग आणणारी गोष्ट.

सुख़न-ए-तल्ख़ (سخن تلخ) पु. (फ़ा.) कटु भाषण; पथ्यकर पण अप्रिय भाषण.

सुख़ूनत (سخونت) स्त्री. ('अ.) उष्णता; उष्णिमा; कढत, गरम होणे.

सुख़्त (سخط) पु. ('अ.) कोप; क्रोध; राग.

सुख़्तः (سختہ) वि. (फ़ा.) वजन केलेला; तोललेला.

सुख़्रत (سخرت) स्त्री. ('अ. + फ़ा.) (१) विनोद; मनोरंजन. (२) उपरोध; उपहास.

सुख्रः (سخره) स्त्री. (फ़ा.) वेठ; बिगार.

सुख्रः (سخره) पु. ('अ.) (१) मनोरंजन; विनोद. (२) विदूषक. (वि.) हास्यास्पद.

सुग़रॉं (صغریٰ) स्त्री. ('अ.) (१) लहान स्त्री; मुलगी. (२) लहान वस्तू.

सुग़राक़ (سغراق) पु. (तु.) मोठा प्याला; मोठा मद्यचषक.

सुगाचः (سگاچه) पु. (फ़ा.) कोणीतरी गळा दाबत असल्याचे स्वप्न पडण्याचा रोग.

सुजूद (سجود) पु. ('अ.) प्रणाम; दंडवत; नमाजामध्ये गुडघे टेकून प्रणाम करणे.

सुतुर्ग (سترگ) वि. (फ़ा.) ज्येष्ठ; मोठा; श्रेष्ठ.

सुतुर्दः (سترده) वि. (फ़ा.) मुंडित; मुंडन केलेला.

सुतुर्लाब (صطرلاب) पु. ['अ. 'उस्तुर्लाब' (اصطرلاب) चे संक्षिप्त.] ग्रह व तारे यांचे अंतर मोजण्याचे यंत्र.

सुतू'अ (سطوع) पु. ('अ.) उंच होणे.

सुतूदः (ستوده) वि. (फ़ा.) प्रशंसित; प्रशंसनीय; प्रशंसा केलेला.

सुतून (ستون) पु. (फ़ा.) (१) स्तंभ; खांब; कॉलम. (२) मिनार; मनोरा.

सुतूर (سطور) स्त्री. ['अ. 'सत्र' (سطر) चे अनेक.] ओळी; रांगा; पंक्ती.

सुतूर (ستور) पु. (फ़ा.) चतुष्पाद प्राणी; जनावर, (घोडा, गाय, बैल, उंट वगैरे).

सुतूह़ (سطوح) स्त्री. ['अ. 'सतह़' (سطح) चे अनेक.] थर; घडघा.

सुतोह़ (ستوه) वि. (फ़ा.) त्रासलेला; दुःखी. (स्त्री.) दुःख; अस्वस्थता.

सुदा'अ (سداع) पु. ('अ.) डोकेदुखी.

सुदुस (سدس) वि. ('अ.) सहावा; षष्ठ.

सुद्दूर (صدور) पु. ('अ.) प्रचलित होणे; निघणे; जारी होणे.

सुद्ग़ (صدغ); **सुद्ग़ः** (صدغه) पु. ('अ.) कानशील.

सुद्ग़तैन (صدغتين) पु. ('अ.) दोन्ही कानशिले.

सुद्दः (سده) पु. ('अ.) (१) आतड्यात किंवा रक्तवाहिनीत तयार होणारी मळाची गाठ. (२) चौकट; उंबरा.

सुन'अ (صنع) स्त्री. ('अ.) निर्मिती; सृष्टी; कारागिरी, रचना.

सुनान (صنان) स्त्री. ('अ.) काखेतील दुर्गंध.

सुन्नत (سنت); **सुन्नः** (سنه) स्त्री. ('अ.) (१) नियम; पद्धती; रीती; प्रथा; परंपरा. (२) मार्ग. (३) स्वभाव; प्रकृती. (४) मुहम्मद पैगंबर यांनी केलेले काम. (५) खत्ना; सुंता.

सुन्नत-ए-आबा (سنت آبا) स्त्री. ('अ.) पूर्वजांची परंपरा; वाडवडिलांची प्रथा.

सुन्नी (سنی) पु. ('अ.) (१) चारही खलिफांना पूज्य मानणारा मुसलमानांचा एक पंथ; या पंथाचा अनुयायी. (२) मुसलमान.

सुपार (سپار) पु. (फ़ा.) नांगर. (प्रत्य.) सोपविणारा. [उदा. 'जां सुपार' (جانسپار) वि. (फ़ा.) सोपविणारा, प्राण हवाली करणारा].

सुपारिश (سپارش) स्त्री. (फ़ा.) (१) शिफारस. (२) वशिला.

सुपुर्ज़ (سپرز) स्त्री. (फ़ा.) पांथरी; प्लीहा.

सुपुर्द (سپرد); **सुपुर्दः** (سپرده) वि. (फ़ा.) सोपविलेला; दिलेला.

सुपुश (سپش) स्त्री. (फ़ा.) ऊ.

सुफ़यान (سفيان) वि. ('अ.) पवित्र; व्रतस्थ.

सुफ़रा (سفرا) पु. ['अ. 'सफ़ीर' (سفير) चे अनेक.] राजदूत; परराष्ट्रीय वकील.

सुफ़रः (سفره) पु. (फ़ा.) गुदा; मलद्वार.

सुफ़रः (سفره) पु. ('अ.) (१) जेवण्याच्या टेबलावर अंथरण्याचे कापड; टेबलक्लॉथ. (२) टिफिन कॅरियर. **–ची** (چی –) वि. पु. ('अ.+फ़ा.) उष्टे खाणारा; दास; गुलाम. **–ची** (چی –) वि. पु. ('अ.+फ़ा.) वाढपी.

सुफ़ारिश (سفارش) स्त्री. (फ़ा.) शिफारस; वशिला.

सुफ़ुल (ثفل) पु. ('अ.) (१) केर; कचरा; चोथा. (२) मल; विष्ठा. **–दान** (دان –) पु. ('अ.+फ़ा.) (१) पिकदाणी. (२) कचऱ्याची टोपली, पेटी.

सुफ़ूफ़ (سفوف) पु. ('अ.) चूर्ण; चुरा; भुगा.

सुफ़ूल (سفول) पु. ('अ.) (१) सखल, उतरता भाग (२) खाली उतरणे. (३) अवनती; पतन.

सुफ़्त (سفت) पु. (फ़ा.) छिद्र; भोक. **–जः** (جه –) स्त्री. (फ़ा.) हुंडी; चेक; धनादेश.

सुफ़्तः (سفته) वि. (फ़ा.) (१) छिद्र (भोक) पाडलेला. (२) ओवलेला; गुंफलेला. **–गोश** (گوش –) वि. (फ़ा.) (१) ज्याचे कान टोचले आहेत असा; कानाला छिद्र असलेला. (२) गुलाम; दास.

सुफ़्फ़ः (صفه) पु. ('अ.) कडीपाट असलेले घर; छप्पर; सज्जा; छपरी; सोपा.

सुफ़्ची (سفرچی) पु. (फ़ा.) वाढपी; खानसामा.

सुफ़त (صفرت) स्त्री. ('अ.) पिवळेपणा; पिवळटपणा.

सुफ़्ल (سفل) पु. ('अ.) (१) सखल भाग; उतार. (२) अवनती; अधोगती.

सुफ़्लां (سفلی) स्त्री. ['अ. 'अस्फ़ल' (اسفل) चे स्त्रीलिंग.] अधम, निकृष्ट स्त्री.

सुबहू (صبح) स्त्री. ('अ.) (१) सकाळ; प्रभात. (२) सकाळची नमाज. **–ख़ंद** (خند –) पु. ('अ.+फ़ा.) दात दिसतील असे स्मित; किंचित स्मित. **–ख़ेज** (خیز –) वि. ('अ. + फ़ा.) (१) पहाटे उठण्याची सवय असलेला. (२) प्रवाशांच्या आधी उठून त्यांचे सामान चोरणारा चोर. **–गाह** (گاہ –) पु. ('अ.+फ़ा.) पहाट. (अव्य.) भल्या पहाटे. **–दम** (دم –) अव्य. ('अ.+फ़ा.) भल्या पहाटे; काळोख असताना.

सुबहू-ए-अज़ल (صبح ازل) स्त्री. ('अ.) (१) सृष्टी निर्माण झाली ती वेळ. (२) जिची कधी संध्याकाळ होत नाही अशी सकाळ.

सुबहू-ए-काज़िब (صبح کاذب) स्त्री. ('अ.) खोटी पहाट; उत्तर रात्री थोडा वेळ प्रकाश पडून पुनः अंधार पसरतो ती वेळ. (अर्थात या अंधारानंतर पुनः लवकरच प्रकाश येतो).

सुबहू-ए-सादिक़ (صبح صادق) स्त्री. ('अ.) खरी पहाट; उषःकाल.

सुबहू-ओ-मसा (صبح و مسا) स्त्री. अव्य. ('अ.) अहोरात्र; रात्रंदिवस.

सुबहान (سبحان) वि. ('अ.) पवित्र; निर्मळ. **–अ'ल्लह** (اللہ –) अव्य. वा. ('अ.) (१) परमेश्वर पवित्र आहे. (२) वाहवा ! छान !

सुबहूः (سبحہ) पु. ('अ.) जपाची माळ; स्मरणी. **–ख़्वां** (خواں –); **–गर्दां** (گرداں –) वि. ('अ.+फ़ा.) जपमाळ फिरविणारा; जप करणारा.

सुबा'ओ (سباعی) स्त्री. ('अ.) (१) सात चरणांची कविता. (२) सात ग्रहांचा समुदाय. (३) सात स्वर्ग.

सुबात (سبات) पु. ('अ.) (१) समय; काळ. (२) स्वप्न. (३) निद्रा. (४) फार झोप येण्याचा एक रोग.

सुबुक (سبک) वि. (फ़ा.) (१) वजनाने हलका; नाजुक. (२) अधम; नीच; मवाली. (३) चपळ; चलाख. (स्त्री.) शीघ्रता; जलदी. **–'अनां** (عناں –); **–ख़िराम** (خرام –) वि. (फ़ा.) वेगवान; शीघ्रगती; शीघ्रगामी. **–ख़ेज** (خیز –) वि. (फ़ा.) (१) भल्या पहाटे उठणारा. (२) शीघ्रगामी; वेगवान. **–गाम** (گام –) वि. (फ़ा.) (१) भरभर चालणारा. (२) हलकेच चालणारा. **–जौलां** (جولاں –) वि. (फ़ा.) शीघ्रगामी. **–दस्त** (دست –) वि. (फ़ा.) (१) चपळ; भरभर काम करणारा. (२) कुशल कारागीर. **–दस्ती** (دستی –) स्त्री. (फ़ा.) हस्तकौशल्य. **–दोश** (دوش –) वि. (फ़ा.) भारमुक्त; जबाबदारीतून मोकळा झालेला; निवृत्त; निश्चिंत; मुक्त. **–पर्वाज़** (پرواز –) वि. (फ़ा.) देगाने उडणारा; उंच उडणारा. **–पा'ई** (پائی –) स्त्री. (फ़ा.) भरभर चालणे. **–बार** (بار –) वि. (फ़ा.) ज्याच्या डोकीवरील भार उतरला आहे असा; निवृत्त; निश्चिंत. **–बाल** (بال –) वि. (फ़ा.) वेगाने उडणारा. **–मग़्ज** (مغز –) वि. (फ़ा.) (१) मंदबुद्धी; मठ्ठ. (२) तिरस्कृत; अपमानित. **–रफ़्तार** (رفتار –) वि. (फ़ा.) वेगवान. **–रवी** (روی –) स्त्री. (फ़ा.) भरभर, वेगाने चालणे. **–रूह** (روح –) वि. (फ़ा.+'अ.) (१) हसतमुख. (२) वैराग्यशील; निरीच्छ. (३) हुशार; कुशल. (४) निर्वैर. **–संग** (سنگ –); **–सर** (سر –) वि. (फ़ा.) (१) अधम; नीच; क्षुद्र. (२) मूर्ख. **–सार** (سار –) वि. (फ़ा.) संसारिक बंधनांतून मुक्त झालेला; निवृत्त. **–सैर** (سیر –) वि. (फ़ा.) वेगवान.

सुबुकतिगीं (سبکتگیں) पु. (तु.) सबक्तगीन; सुलतान महमूदाचा पिता.

सुबुकी (سبکی) स्त्री. (फ़ा.) (१) हलकेपणा. (२) नीचता. (३) अपमान; लज्जा.

सुबू (سبو) पु. (फ़ा.) (१) घागर; घडा. (२) पेला; प्याला. (३) सुरई.

सुबूचः (سبوچہ) पु. (फ़ा.) (१) लहान घागर; कळशी. (२) मडके. (३) प्याला.

सुबूत (ثبوت) पु. ('अ.) (१) पुरावा; प्रमाण; आधार. (२) उदाहरण; उपमा.

सुबूह (صبوح) स्त्री. ('अ.) (१) पहाट; प्रभात. (२) सकाळचे मदिरापान.

सुबूह (سبوح) वि. ('अ.) अत्यंत पवित्र; ईश्वर.

सुम (سم) पु. (फ़ा.) जनावराचा खूर; टाप.

सुम'अत (سمعت) स्त्री. ('अ.) आपल्या चांगल्या गोष्टी लोकांना सांगणे; बढाई; ढोंग.

सुमुव (سمو) पु. ('अ.) (१) उत्तुंगता; उच्चता. (२) हिज हायनेस.

सुमूत (صموت) पु. ('अ.) गप्प राहाणें; मौन.

सुम्चः (سمچہ) पु. (फ़ा.) तळघर.

सुम्न (ثمن) वि. ('अ.) आठवा भाग; अष्टमांश.

सुम्म (ثم) अव्य. ('अ.) पुनः.

सुम्माक़ (سماق) पु. ('अ.) एक आंबट औषधी फळ.

सुराग़ (سراغ) पु. (तु.) (१) पावलाची खूण; चिन्ह. (२) पत्ता. (३) शोध; तपास. **–रसाँ** (رساں –) वि. (तु.+फ़ा.) (१) तपास करणारा; शोधणारा. (२) गुप्तचर; हेर. **–रसानी** (رسانی –) स्त्री. (तु.+फ़ा.) (१) शोध; तपास. (२) हेरगिरी.

सुराग़ी (سراغی) पु. (तु.+फ़ा.) हेर; गुप्तचर.

सुरादिक़ (سرادق) पु. ('अ.) मोठा तंबू; शामियाना.

सुराह़ (صراح) पु. ('अ.) सार; निष्कर्ष; इत्यर्थ.

सुराही (صراحی) स्त्री. ('अ.) सुरई; खुजा. **–दार** (دار –); **–नुमा** (نما –) वि. ('अ. + फ़ा.) सुरईच्या आकाराचा; शंकूसारखा; निमूळता.

सुरीं (سریں); **सुरीन** (سرین) स्त्री. (फ़ा.) ढुंगण; नितंब.

सुरुब (سرب) पु. ('अ.) शिसे (धातू).

सुरूद (سرود) पु. (फ़ा.) (१) गाणे; गायन. (२) राग (संगीत). (३) सरोद (वाद्य).

सुरून (سرون) स्त्री. (फ़ा.) नितंब; ढुंगण.

सुरूर (سرور) पु.('अ.) (१) हर्ष; आनंद. (२) किंचित धुंदी; नशा.

सुरैया (ثریا) स्त्री. ('अ.) (१) कृत्तिका नक्षत्राचा पुंजका. (२) कानातील डूल. (३) झुंबर.

सुरोद (سرود) पु. (फ़ा.) (१) गाणे; गीत. (२) राग (संगीत). (३) सरोद (वाद्य).

सुरोश (سروش) पु. (फ़ा.) (१) शुभ समाचार देणारा देवदूत. (२) जिब्रील.

सु'अंत (سرعت) स्त्री. ('अ.) (१) शीघ्रता; जलदी. (२) घाई; उतावळेपणा.

सु'अंत-ए-इंज़ाल (سرعت انزال) स्त्री. ('अ.)संभोगाच्या वेळी लवकर वीर्यपात होण्याचा रोग.

सुर्ख़ (سرخ) वि. (फ़ा.) लाल; तांबडा. (स्त्री.) गुंज; एका गुंजेचे (रतीचे) वजन. **–गूं** (گوں –) वि. (फ़ा.) लाल रंगाचा; तांबडा. **–चः** (چہ –) पु. (फ़ा.) गोवर (आजार) **–पोश** (پوش –) वि. (फ़ा.) लाल कपडे घालणारा; लाल डगलेवाला. **–रू** (رو –) वि. (फ़ा.) (१) तेजस्वी; कौतिमान. (२) प्रतिष्ठित. (३) यशस्वी; सफल.

सुर्ख़रू होता है इन्साँ ठोकरें खाने के ब'अद ।
रंग लाती है हिना पत्थर पि. पिस जाने के ब'अद ।।

–रू'ई (روئی –) स्त्री. (फ़ा.) (१) सन्मान; प्रतिष्ठा. (२) यश; सफलता.

सुर्ख़ाब (سرخاب) पु. (फ़ा.) चवका; चक्रवाक (पक्षी). **–का पर लगना** (کا پر لگنا –) अद्‌भुत गोष्ट असणे; वैशिष्ट्य असणे.

सुर्ख़ी (سرخی) स्त्री. (फ़ा.) (१) लाली; लालिमा. (२) लेखाचे शीर्षक. (३) विटांची पूड. **–मायल** (مایل –) वि. (फ़ा.) लालसर; तांबूस.

सुर्ख़ः (سرخہ) पु. (फ़ा.) (१) रांजणवाडी (डोळ्यांतील). (२) एक प्रकारचे लाल रंगाचे कबुतर. (३) लाल घोडा. (४) मदिरा.

सुर्ना (سرنا); **सुर्नाए** (سرنائے) पु. (फ़ा.) सनई (वाद्य).

सुर्नाची (سرناچی) वि. (फ़ा.) सनई वाजविणारा.

सुर्फ़ः (سرفہ) पु. (फ़ा.) खोकला.

सुर्मं'ई (سرمئی) वि.(फ़ा.) सुरम्याच्या रंगाचा; करडा; निळसर तांबूस.

सुर्मंगीं (سرمگیں) वि.(फ़ा.) सुरमा घातलेला (डोळा).

सुर्मः (سرمہ) पु. (फ़ा.) सुरमा; नेत्रांजन **–आगीं** (آگیں –); **–आलूद** (آلود –) वि. (फ़ा.) सुरमा घातलेला. **–ख़ुर्दः** (خوردہ –) वि. (फ़ा.) ज्याने सुरमा खाल्ला आहे असा, बोलता न येणारा; मुका. (सुरमा खाल्ल्यास आवाज बंद होतो). **–चोब** (چوب –) स्त्री. (फ़ा.) सुरमा घालण्याची सळई; शलाका. **–दरगलू** (درگلو –) पाहा 'सुर्मः ख़ुर्दः'. **–दान** (دان –) पु. **–दानी** (دانی –) स्त्री. (फ़ा.) सुरम्याची डबी. **–सा** (سا –) वि. (फ़ा.) वस्त्रगाळ; बारीक.

सुर्रः (سرہ) स्त्री. (फ़ा.) बेंबी; नाभी.

सुर्रः (صرہ)पु. ('अ.) (१) पिशवी; थैली. (२) पुरचुंडी. **–बस्तः** (بستہ –) वि. ('अ.+फ़ा.) पुरचुंडी बांधून (कपडयात गुंडाळून) उकळले जाणारे औषध.

सुलतान (سلطان) पु. ('अ.) बादशहा; सम्राट; सत्ताधीश.

सुलतानी (سلطانی) स्त्री. ('अ.) सत्ता; शासन; राज्य. (वि.) शाही; राजाचा.

सुलतानः (سلطانہ) स्त्री. ('अ.) राणी; सम्राज्ञी.

हूरीस् (حریص) वि. ('अ.) अधाशी; लोभी.

हूर्जमर्ज (هرج مرج) पु. (फ़ा.) उपद्रव; दंगल; गडबड.

हूर्जानः (هرجانہ) पु. (फ़ा.) नुकसानभरपाई.

हूर्जः (هرجہ) पु. (फ़ा.) नुकसानभरपाई; क्षतिपूर्ती.

हूर्त्तः (هرزہ) वि. (फ़ा.) व्यर्थ; निरर्थक; वाह्यात. **–गर्द** (گرد –) वि. (फ़ा.) उडाणटप्पू; भटक्या. **–गो** (گو –); **–चानः** (چانہ –); **–दिरा** (درا –); **–ला** (لا –); **–सरा** (سرا –) वि. (फ़ा.) निरर्थक बडबड करणारा; बाष्कळ बडबडणारा.

हूर्फ़ (حرف) पु. ('अ.) (१) अक्षर; वर्ण. (२) दोष; उणीव; कलंक. (३) गोष्ट. (४) शब्द.

(व्या.) अव्यय. **–अंदाज** (انداز –) वि. ('अ.+ फ़ा.) धूर्त; चलाख. **–आश्ना** (آشنا –) वि. ('अ. + फ़ा.) केवळ अक्षरओळख असलेला; अल्पशिक्षित. **–गीर** (گیر –) वि. ('अ. + फ़ा.) (१) टीका करणारा. (२) दोष काढणारा; छिद्रान्वेषी. **–चीं** (چیں –) वि. ('अ. + फ़ा.) छिद्रान्वेषी. **–ज़न** (زن –) वि. ('अ.+फ़ा.) बोलणारा; संभाषण करणारा. **–ना आश्ना** (نا آشنا –) वि. ('अ.+फ़ा.) निरक्षर. **–ब.हर्फ़** (بہ حرف –) अव्य. ('अ. + फ़ा.) शब्दशः; अक्षरशः. **–शनास** (شناس –) पाहा 'हर्फ़आश्ना'.

हर्फ़-ए-'अत्फ़ (حرف عطف) पु. ('अ.) उभयान्वयी अव्यय (व). [वाव (و) 'व'].

हर्फ़-ए-आख़िर (حرف آخر) पु. ('अ.) शेवटचा शब्द; न बदलणारी गोष्ट.

हर्फ़-ए-इज़ाफ़त (حرف اضافت) पु. ('अ.) षष्ठीचा प्रत्यय.

हर्फ़-ए-'अिल्लत (حرف علت) पु. ('अ.) स्वर [अलिफ़ (الف), वाव (و), ये (ی)].

हर्फ़-ए-नफ़ी (حرف نفی) पु. ('अ.) नकारदर्शक शब्द; नकारार्थी शब्द.

हर्फ़-ए-निदा (حرف ندا) पु. ('अ.) संबोधन.

हर्फ़-ए-सहीह़ (حرف صحیح) पु. ('अ.) (१) व्यंजन. (२) खरी गोष्ट.

हर्फ़-ओ-हिकायत (حرف و حکایت) स्त्री. ('अ.) संभाषण.

हर्फ़न्हर्फ़न् (حرفاً حرفاً) अव्य. ('अ.) अक्षरशः; एकेक अक्षर; सविस्तर.

हर्ब (حرب) पु. ('अ.) युद्ध; लढाई. **–गाह** (گاہ –) स्त्री. ('अ.+फ़ा.) समरांगण.

हर्ब-ओ-ज़र्ब (حرب و ضرب) पु. ('अ.) कापाकापी; हाणामारी; रक्तपात.

हर्बः (حربہ) पु. ('अ.) (१) शस्त्र; हत्यार. (२) आक्रमण. (३) आघात; वार. (४) शक्ती.

हर्राफ़ (حراف) वि. ('अ.) (१) बडबडघा; वाचाळ. (२) धूर्त; लबाड.

हर्राफ़ः (حرافہ) स्त्री. ('अ.) (१) वाचाळ; जहांबाज स्त्री. (२) कुलटा; व्यभिचारीणी.

हर्रास़ (حراث) वि. ('अ.) शेतकरी; कूळ.

हर्स़ (حرث) पु. ('अ.) शेती.

हर्स (حرس) पु. ('अ.) पकडणे; कच्ची कैद.

हल (حل) पु. ('अ.) (१) निराकरण; उत्तर; उलगडा; सोडविणे (प्रश्न, गणित, समस्या). (२) विरघळणे; विलयन. (३) सुगमता; सरलता. (४) शब्दकोडघातील रिकामे चौकोन भरणे.

हलब (حلب) पु. ('अ.) (१) निरसे दूध; नुकतेच काढलेले दूध. (२) सीरीयातील एका शहराचे नाव. (येथील आरसे प्रसिद्ध आहेत).

हलबी (حلبی) वि. ('अ.) हलब येथे तयार झालेला (आरसा).

हलमः (حلمہ) स्त्री. ('अ.) स्तनाग्र.

हलवा (حلوا) पु. ('अ.) (१) शिरा; सांजा. (२) गोड पदार्थ; मिठाई.

हलवा-ए-बेदूद (حلوائے بیدود) पु. ('अ. + फ़ा.) धूररहित अग्नीवर तयार झालेली मिठाई; झाडावर पिकलेली गोड फळे.

हलवा'ई (حلوائی) पु. ('अ.) मिठाई तयार करणारा, विकणारा.

हलाक (هلاک) वि. (फ़ा.) (१) ठार; मृत. (२) नष्ट झालेला. (३) थकलेला. **–ख़ोर** (خور –) वि. (फ़ा.) मृत पशूचे मांस खाणारा.

हलाकत (هلاکت); **हलाकी** (هلاکی) स्त्री. (फ़ा.) (१) विनाश; मृत्यू; वध. (२) थकवा.

हलाकू (هلاکو) वि. (फ़ा.) अत्याचारी; जुलमी. (पु.) चंगेजखानाचा नातू. हा अत्यंत जुलमी होता.

हलाल (حلال) वि. ('अ.) शास्त्रसंमत; विहित. (पु.) इस्लामी धर्माप्रमाणे ज्याचे मांस खाणे (किंवा ज्याचे पान करणे) विहित आहे असा; विशिष्ट पद्धतीने ठार मारलेला पशू. **–ख़ोर** (خور –) पु. ('अ. + फ़ा.) (१) भंगी. (२) न्याय्य मार्गाने पोट भरणारा. **–ज़ादः** (زادہ –) पु. ('अ.+फ़ा.) कुलीन; औरस पुत्र.

हलावत (حلاوت) स्त्री. ('अ.) माधुर्य; गोडी.

हलाहिल (هلاهل) पु. (फ़ा.) भयंकर विष; हलाहल.

हलीफ़ (حلیف) वि. ('अ.) शपथ घेतलेला. (पु.) मित्र.

हलीब (حلیب) पु. ('अ.) ताजे दूध; निरसे दूध.

हलीम (حلیم) वि. ('अ.) (१) शांत; सहनशील. (२) गंभीर. (पु.) खिचडी.

हलीम-उत्-तब्'अ (حلیم الطبع) वि. ('अ.) स्वभावतः सहिष्णू व गंभीर असलेला.

हलीमः (حلیمہ) स्त्री. ('अ.) (१) सहनशील स्त्री. (२) जिने मुहम्मद साहेबांना दूध पाजविले होते ती स्त्री.

हलील (حلیل) पु. ('अ.) (१) पती; स्वामी. (२) शेजारी. (३) एकाच घरात राहाणारा.

हलीलः (حلیلہ) स्त्री. ('अ.) पत्नी.

हलीलः (هلیلہ) पु. ('अ.) हिरडा; हरीतकी.

हूलक (حلق) पु. ('अ.) (१) कंठ; गळा; घसा. (२) मुंडन. (३) तोंड; जीभ. **-ची** (-چی) स्त्री. ('अ.+फ़ा.) जिलेबी.

हूलक-ए-रास (حلق راس) पु. ('अ.) डोकीचे केस कापणे; मुंडन.

हूलकान (هلکان) वि. (तु.) (१) थकलेला; श्रांत; क्लांत. (२) अर्धमेला.

हूलकी (حلقی) वि. ('अ.) गळ्यासंबंधीचा; कंठ्य (अक्षर).

हूलक़ूम (حلقوم) पु. ('अ.) कंठ; गळा; घसा.

हूलक़ः (حلقہ) पु. ('अ.) (१) वर्तुळ. (२) परीघ; घेरा. (३) समुदाय; थवा; मंडळी; जमाव. (४) क्षेत्र; इलाखा. (५) मोहल्ला; गावांचा समूह; मंडळ. (६) काजे. **-नुमा** (نما-) वि. ('अ.+फ़ा.) गोल; गोलाकार. **-दरगोश** (درگوش-); **-ब गोश** (بگوش-) वि. ('अ.+फ़ा.) (१) ज्याच्या कानात दास्याचे कडे पडलेले आहे असा; गुलाम. (२) भक्त.

हूलक़ः-ए-इरादत (حلقۂ ارادت) पु. ('अ.) भक्तगण; अनुयायी.

हूलक़ः-ए-गिर्दाब (حلقۂ گرداب) पु. ('अ.+फ़ा.) पाण्यातील भोवरा.

हूलक़ः-ए-मक़'अद (حلقۂ مقعد) पु. ('अ.) गुदद्वार.

हूल्जून (حلزون) पु. ('अ.) शंख.

हूलफ़ (حلف) पु. ('अ.) शपथ. **-दरोगी** (-دروغی) स्त्री. ('अ.+फ़ा.) न्यायालयात खोटी शपथ घेणे. **-नामः** (-نامہ) पु. ('अ.+फ़ा.) शपथपत्र; शपथेवर लिहून दिलेला जबाब.

हूलफ़न् (حلفاً) अव्य. ('अ.) शपथपूर्वक; शपथेवर.

हूल्लाक़ (حلاق) पु. ('अ.) न्हावी; नापित.

हूल्लाज (حلاج) पु. ('अ.) पिंजारी.

हूल्लाफ़ (حلاف) वि. ('अ.) शपथ घेण्याची सवय असलेला.

हूल्लाल (حلال) वि. ('अ.) (१) गाठ सोडविणारा. (२) निराकरण करणारा.

हवनक़ (هونق) वि. ('अ.) मठ्ठ; मूर्ख.

हूवल (حول) पु. ('अ.) तिरळेपणा.

हवस (هوس) स्त्री. ('अ.) (१) लोभ; हव्यास. (२) अभिलाषा; उत्कंठा. **-नाक** (-ناک); **-परस्त** (-پرست) वि. ('अ.+फ़ा.) लोभी; हावरा; अधाशी.

हवा (هوا) स्त्री. ('अ.) (१) हवा; वारा. (२) इच्छा; आकांक्षा; वासना; अभिलाषा. (३) श्वासोच्छ्वास. (४) लोभ; हव्यास. (५) धाक; दरारा. (६) प्रेम; मैत्री; हित. (७) अफवा. (८) विनाश; उडून जाणे. (९) भूत-प्रेत. (१०) सूक्ष्म वस्तू. (११) काळ; जमाना. (१२) ढंग; वळण. (१३) वेड; भ्यास. **-खोरी** (-خوری) स्त्री. ('अ.+फ़ा.) हवा खाण्यासाठी फिरावयास जाणे (मुख्यतः सकाळी). **-ख़्वाह** (-خواہ) वि. ('अ. + फ़ा.) हितचिंतक. **-दार** (-دار) वि. ('अ. + फ़ा.) (१) हवेशीर. (२) हितचिंतक; मित्र. (३) एक प्रकारची उघडी पालखी. **-परस्त** (-پرست) वि. ('अ. + फ़ा.) वारा वाहील तशी पाठ फिरविणारा; संधिसाधू. **-बाज** (-باز) वि. ('अ. + फ़ा.) वैमानिक; पायलट.

हवा'इज (حوائج) पु. ['अ. 'हाजत' (حاجت) चे अनेक.] निकडीच्या गोष्टी; गरजा.

हवा'इज-ए-सित्तः (حوائج ستہ) पु. ('अ.) जीवनाच्या सहा मुख्य गरजा: (१) लघ्वी-शौच. (२) खाणे-पिणे. (३) झोपणे-जागणे. (४) चालणे-फिरणे. (५) श्वासोच्छ्वास. (६) सुख-दुःख.

हवा'ई (هوائی) वि. ('अ.) (१) हवेसंबंधीचा. (२) आकाशातील. (३) काल्पनिक. (स्त्री.) एक प्रकारची शोभेची दारू; बाण.

हवादिस् (حوادث) पु. ['अ. 'हादिसः' (حادثہ) चे अनेक.] दुर्घटना; अपघात; संकटे.

हवान (هوان) स्त्री. ('अ.) अपमान; तिरस्कार.

हवाम (هوام) पु. ('अ.) जमिनीखाली राहणारे प्राणी (साप, विंचू, मुंग्या वगैरे).

हवारी (حواری) पु. ('अ.) (१) येशू ख्रिस्ताचा सहचर. (२) सहाय्यक; मदतनीस. (वि.) प्रतिष्ठित; थोर.

हवालात (حوالات) स्त्री. ['अ. 'हवालः' (حوالہ) चे अनेक.] खटल्याचा निकाल लागेपर्यंत आरोपीला कच्च्या कैदेत ठेवणे; पोलीस कोठडी.

हवालाती (حوالاتی) स्त्री. ('अ.) कच्च्या कैदेत असलेला.

हवाली (حوالی) पु. स्त्री. ('अ.) आसपासचा भाग; सभोवतालची ठिकाणे.

हवाली-ए-शहर (حوالئ شہر) पु. ('अ. + फ़ा.) शहराच्या सभोवतालचा मुलूख.

हवालः (حوالہ) पु. ('अ.) (१) पुरावा; दाखला; हवाला; उदाहरण. (२) पत्ता; खूण. (३) सोपविणे; हवाली करणे. (४) अवतरण. **-दार** (-دار) पु. ('अ.+फ़ा.) हवालदार; सैनिकांवरील खालचा अधिकारी.

हवास (حواس) पु. ['अ. 'हास्सः' (حاسہ) चे अनेक.] (१) इंद्रिये (पाच ज्ञानेंद्रिये व पाच

कर्मेंद्रिये). (२) बुद्धी; अक्कल. (३) शुद्धी. **–बरजा** (برجا –) वि. ('अ. + फ़ा.) शुद्धीवर असलेला; बुद्धी ठिकाणावर असलेला. **–बाख़्तः** (باختہ –) वि. ('अ. + फ़ा.) ज्याची बुद्धी ठिकाणावर नाही असा; घाबरगुंडी उडालेला; बेशुद्ध.

हूवासिल (حواصل) पु. ['अ. 'हौसलः' (حوصلہ) चे अनेक.] (१) उत्साह. (२) पोट मोठे असलेला एक जलपक्षी.

हूवेली (حویلی) स्त्री. (फ़ा.) (१) मोठी व पक्की इमारत. (२) प्रासाद; भवन.

हूव्वा (حوا) स्त्री. ('अ.) आदम (आदिमानवा)ची पत्नी; मानवाची माता.

हूशफ़ः (حشفہ) पु. ('अ.) पुरुषाच्या जननेंद्रियाचा अग्रभाग.

हूशम (حشم) पु. ['अ. 'हाशिम' (حاشم) चे अनेक.] आपल्या स्वामीसाठी लढणारे सेवक; नोकरचाकर.

हूशमत (حشمت) पु. ('अ.) (१) नोकरचाकर. (२) पाहा 'हिश्मत'.

हूशरात-उल्-अर्द (حشرات الارض) पु. ('अ.) जमिनीत बिळे करून राहाणारे किडे.

हूशरः (حشرہ) पु. ('अ.) वळवळणारा किडा. [अनेक 'हूशरात' (حشرات)].

हूशा (حشا) पु. ('अ.) पोट व छाती यात असलेले अवयव.

हूशाशत (هشاشت) स्त्री. ('अ.) प्रफुल्लता; प्रसन्नता.

हूशीश (حشیش) पु. ('अ.) (१) वाळलेले गवत. (२) भांग (मादक पदार्थ).

हूश्त (هشت) वि. (फ़ा.) आठ (८). **–अंगुश्त** (انگشت –) वि. (फ़ा) (१) आठ बोटे असलेला. (२) आठ अंगुळे लांब, उंच. **–गंज** (گنج –) पु. (फ़ा.) खुसरौ पर्वेज याचे आठ खजिने. **–गोशः** (گوشہ –) वि. (फ़ा.) अष्टकोनी. **–निकाती** (نکاتی –) वि. (फ़ा.) आठ मुद्दे असलेला; अष्टसूत्री.

हूश्तुम (هشتم) वि. (फ़ा.) आठवा.

हूश्र (حشر) पु. ('अ.) (१) महाप्रलय; अंतिम निवाड्याचा दिवस; मुसलमानांच्या श्रद्धेप्रमाणे ज्या दिवशी सर्व प्रेते थडग्यातून उठणार आहेत व त्यांच्या पाप-पुण्याचा हिशेब होणार आहे तो दिवस. (२) शोक; विलाप. (३) आपत्ती; संकट. (४) कोलाहल; गोंधळ. **–अंगेज़** (انگیز –) वि. ('अ. + फ़ा.) प्रलयंकार; दंगल घडविणारा. **–क़ामत** (قامت –) वि. ('अ.) प्रेयसी; नायिका. **–ख़िराम** (خرام –) वि. ('अ.+फ़ा.) आपल्या चालीने प्रलय निर्माण करणारा (री); नखरेल.

हूश्व (حشو) पु. ('अ.) (१) भरण; आत भरण्याची वस्तू. (२) पादपूरक (शब्द).

हूश्शाश (حشاش) वि. ('अ.) भांग पिणारा; भंगड.

हूश्शाश (هشاش) वि. ('अ.) हर्षयुक्त; प्रफुल्ल; आनंदित.

हूश्शाश-ओ-बश्शाश (هشاش و بشاش) वि. ('अ.) अत्यंत प्रसन्न; खूप.

हूसक (هسک) पु. (फ़ा.) सूप.

हूसक (حسک) पु. ('अ.) (१) सराटा. (२) सराट्यासारखे लोखंडी खिळे.

हूसद (حسد) पु. ('अ.) ईर्ष्या; हेवा; मत्सर.

हूसन (حسن) वि. ('अ.) (१) सुंदर; रूपवान; देखणा. (२) उत्तम; श्रेष्ठ; उत्कृष्ट. (पु.) हजरत अली यांचे थोरले चिरंजीव.

हूसनी (حسنی) वि. ('अ.) इमाम हसन यांच्याशी संबंधित; इमाम हसन यांचा अनुयायी किंवा वंशज.

हूसनैन (حسنین) पु. ('अ.) दोन हसन; हसन व हुसैन.

हूसनः (حسنہ) पु. ('अ.) (१) चांगली गोष्ट; सुंदर वस्तू. (२) कल्याण. (३) सौंदर्य. (४) सज्जनता; सुकृती. [अनेक 'हसनात' (حسنات)].

हूसब (حصب) स्त्री. ('अ.) इंधन; जळाऊ लाकूड.

हूसब (حسب) पु. ('अ.) (१) गणना; गणती. (२) अनुमान; अंदाज. (३) श्रेष्ठत्व. (अव्य.) प्रमाणे; अनुसार. पाहा 'हस्ब'.

हूसब-ओ-नसब (حسب و نسب) पु. ('अ.) कुलीनता व श्रेष्ठता; वांशिक प्रतिष्ठा.

हूसात (حصات) स्त्री. ('अ.) (१) खडा; दगड. (२) मूतखडा. [अनेक 'हसा' (حصا)].

हूसाफ़त (حصافت) स्त्री. ('अ.) (१) बुद्धीची परिपक्वता. (२) संवेदनशीलता. (३) अनुभवीपणा.

हूसीद (حصید) वि. ('अ.) कापलेला; कापलेले शेत.

हूसीन (حصین) वि. ('अ.) सुदृढ; अविचल; स्थिर.

हूसीन (حسین) वि. ('अ.) सुंदर; रूपवान; सुस्वरूप.

हूसीन-उल्-वजह (حسین الوجہ) वि. ('अ.) रूपवान; सुंदर.

हूसीनः (حسینہ) स्त्री. ('अ.) सुंदरी; रूपवती स्त्री.

हूसीब (حسیب) वि. ('अ.) (१) हिशेब करणारा. (२) पूज्य. (३) ईश्वर.

हूसीर (حصیر) स्त्री. ('अ.) खजुरीच्या पानांची चटई.

हूसीर (حسیر) वि. ('अ.) (१) दुःखी; कष्टी. (२) थकलेला; गळून गेलेला.

हूसूक (حسوک) वि. ('अ.) (१) काटेरी. (२) त्रासदायक; दुष्ट.

हसूद (حسود) वि. ('अ.) अत्यंत ईर्ष्या करणारा; हेवा करणारा.

हसून (حصون) वि. ('अ.) संयमी; इंद्रियनिग्रही.

हसूर (حصور) वि. ('अ.) स्त्रीकडे आकृष्ट न होणारा पुरुष (नपुसक नसताही).

हस्त (هست) क्रि. (फ़ा.) आहे; अस्ति. (स्त्री.) (१) अस्तित्व. (२) उपस्थिती.

हस्त-ओ-नीस्त (هست و نیست) पु.(फ़ा.) (१) उत्पत्ती व विनाश. (२) असणे व नसणे. (३) सर्व; संपूर्ण.

हस्त-ओ-बूद (هست و بود) स्त्री. (फ़ा.) आहे व होता.

हस्ती (هستی) स्त्री. (फ़ा.) (१) अस्तित्व; जीवन; आयुष्य. (२) जग. (३) प्राणी. (४) उपस्थिती; विद्यमानिता. (५) सामर्थ्य. (६) वस्तुस्थिती.

हस्ना (حسنا) स्त्री. ('अ.) (१) सुंदर स्त्री. (२) कोणतीही सुंदर वस्तू.

हस्ब (حسب) अव्य. ('अ.) अनुसार; प्रमाणे.

हस्ब-उत्-तलब (حسب الطلب) अव्य. ('अ.) (१) बोलावण्याप्रमाणे. (२) मागणीप्रमाणे.

हस्ब-उत्-तहरीर (حسب التحریر) अव्य. ('अ.) (१) लिहिल्याप्रमाणे. (२) आज्ञेनुसार.

हस्ब-उल्-अम्र (حسب الامر) अव्य. ('अ.) (१) कथनानुसार. (२) आदेशानुसार.

हस्ब-ए-इत्तिफ़ाक़ (حسب اتفاق) अव्य. ('अ.) योगायोगाने; अकल्पितपणे.

हस्ब-ए-ईमा (حسب ایما) अव्य. ('अ.) (१) संकेतानुसार. (२) आज्ञेनुसार.

हस्ब-ए-ज़ैल (حسب ذیل) अव्य. ('अ.) खाली दिल्याप्रमाणे; पुढीलप्रमाणे.

हस्ब-ए-दस्तूर (حسب دستور) अव्य. ('अ.) यथाविधी; नियमानुसार; नेहमीप्रमाणे.

हस्ब-ए-म'अमूल (حسب معمول) अव्य. ('अ.) नेहमीप्रमाणे.

हस्ब-ए-मज़्कूर (حسب مذکور) अव्य. ('अ.) वर उल्लेखिल्याप्रमाणे.

हस्ब-ए-हाल (حسب حال) अव्य. ('अ.) परिस्थितीनुसार.

हस्म (حسم) पु. ('अ.) विच्छेद; कापणे.

हस्र (حصر) पु. ('अ.) (१) अवलंबन; आधार. (२) वेढा; तटबंदी.

हस्रत (حسرت) स्त्री. ('अ.) (१) हळहळ; दुःख. (२) अभिलाषा; लालसा. (३) निराशा. (४) आपत्ती. (५) पश्चात्ताप; खेद. **-अंगेज़** (انگیز –) वि. ('अ.+फ़ा.) निराशाजनक. **-ख़ेज़** (خیز –) वि. ('अ.+फ़ा.) निराशाग्रस्त. **-नाक** (ناک –) वि. ('अ.+फ़ा.) दुःखपूर्ण. **-मआब** (مآب –) वि. ('अ.) निराशावादी; प्रेमी; नायक.

हस्रती (حسرتی) वि. ('अ.) (१) निराशा. (२) इच्छुक; अभिलाषी.

हस्साद (حصاد) वि. ('अ.) शेताची कापणी करणारा.

हस्सान (حسان) वि. ('अ.) अत्यंत सुंदर; अत्युत्कृष्ट.

हस्सास (حساس) वि. ('अ.) (१) स्वाभिमानी. (२) संवेदनशील. (पु.) प्राणी.

हाँ (هاں) अव्य. (फ़ा.) सावधान! खबरदार! हां!

हा (ها) अव्य. (फ़ा.) अरेरे! हाय हाय! (प्रत्य.) बहुवचन सूचक प्रत्यय. [उदा. 'दरख़्तहा' (درختہا) पु. (फ़ा.) झाडे]. (स्त्री.) 'हे' (४); 'हे' (ح) अक्षर.

हा-ए-मख़्लूत (هاے مخلوط) स्त्री. ('अ.) दुसऱ्या शब्दास जोडून येणारी 'हे'. [उदा. 'कुम्हार' (کمہار) मधील 'हे'].

हा-ए-मुख़्तफ़ी (هاے مختفی) स्त्री. ('अ.) अनुच्चारीत 'हे' शेवटचे अक्षर हलन्त नाही हे दर्शविण्यासाठी येणारी 'हे'. [उदा. 'परवानः' (پروانہ)].

हा-ए-मुज़हर (هاے مظہر) स्त्री. ('अ.) प्रकट; व्यक्त होणारी 'हे'. [उदा. 'जगह' (جگہ)].

हा-ए-मुदव्वरः (هاے مدورہ) स्त्री. ('अ.) लहान 'हे' (४).

हा-ए-मुश़क़्क़क़ (هاے مشقق) स्त्री. ('अ.) दोचश्मी 'हे' (ھ).

हा-ए-हव्वज़ (هاے هوز) स्त्री. ('अ.) लहान 'हे' (४).

हा-ए-हुत्ती (هاے حطی) स्त्री. ('अ.) मोठी 'हे' (ح).

हा'इत् (حائط) स्त्री. ('अ.) भित.

हा'इद् (حائض) स्त्री. ('अ.) वयात आलेली स्त्री.

हा'इद्ः (حائضہ) स्त्री. ('अ.) विटाळशी; रजस्वला स्त्री.

हा'इब (هائب) वि. ('अ.) भिणारा.

हा'इम (هائم) वि. ('अ.) आसक्त; प्रेममग्न.

हा'इर (حائر) वि. ('अ.) (१) स्तब्ध. (२) चकित. (३) उद्विग्न. (४) दुर्बल; क्षीण. (५) पाण्यातील भोवरा. (६) हजरत हुसैन जेथे हुतात्मा झाले होते ते स्थान.

हा'इल (حائل) वि. ('अ.) आड येणारा; आडकाठी आणणारा.

हा'इल (هائل) वि. ('अ.) भयंकर; अकाळविकाळ.

हाए (هائے) अव्य. (फ़ा.) हाय! अरेरे! (विव्हळण्याचा आवाज).

हाक़ (حاق) अव्य. ('अ.) मधोमध; मध्ये; दरम्यान.

हाकिम (حاکم) वि. पु. ('अ.) (१) अधिकारी. (२) स्वामी; मालक. (३) शासक; सत्ताधीश. (४) राजा; बादशहा. (५) अध्यक्ष; सरदार.

हाकिम-ए-हक़ीक़ी (حاکم حقیقی) पु. ('अ.) ईश्वर; परमात्मा.

हाकिमानः (حاکمانہ) वि. ('अ. + फ़ा.) अधिकाऱ्यासारखा; रुबाबदार.

हाकिमी (حاکمی) स्त्री. ('अ.) (१) अधिकार. (२) मालकी. (३) शासन; सत्ता. (४) अध्यक्षता; सरदारी.

हाज (حاج) वि. ('अ.) हज्ज करणारा; हाजी.

हाजत (حاجت) स्त्री. ('अ.) (१) इच्छा; अभिलाषा. (२) गरज; जरूर. (३) कच्ची कैद. (४) शौच, लघ्वी वगैरे. **–रवाह** (–خواہ); **–मंद** (–مند) वि. ('अ.+फ़ा.) (१) इच्छापूर्ती इच्छिणारा; अभिलाषी; इच्छुक. (२) गरजू. (३) निर्धन. **–रवा** (–روا) वि. ('अ.+फ़ा.) इच्छा पूर्ण करणारा; गरज भागविणारा.

हाजती (حاجتی) वि. ('अ.) इच्छुक; गरजू. (स्त्री.) आजाऱ्याच्या पलंगाजवळ मलमूत्र विसर्जनासाठी ठेवलेले भांडे; कमोड.

हाज़ा (هٰذا) सर्व. ('अ.) हा; हा एक मनुष्य.

हाज़िक़ (حاذق) वि. ('अ.) दक्ष; प्रवीण; कुशल.

हाजिज (حاجز) पु. ('अ.) आडपडदा; पडदा.

हाजिब (حاجب) पु. ('अ.) (१) द्वारपाल. (२) चोपदार. (३) भुवई.

हाजिन (هاجن) स्त्री. ('अ.) (१) वयात न आलेली विवाहित स्त्री. (२) कोणत्याही प्राण्याचे स्त्रीलिंगी पिलू (मादी).

हाज़िम (حازم) वि. ('अ.) (१) दूरदर्शी. (२) बुद्धिमान.

हाजिर (هاجر) वि. ('अ.) 'हिजरत' करणारा; घरदार सोडून निघून जाणारा; देशत्याग करणारा; निर्वासित.

हाजिर (حاجر) वि. ('अ.) अडविणारा; मनाई करणारा. (स्त्री.) नदीचा उंच काठ; दरड.

हाज़िल (هازل) वि. ('अ.) अश्लील बोलणारा, लिहिणारा; वाह्यात बडबड करणारा.

हाजी (حاجی) वि. पु. ('अ.+हिं.) हज (मक्केची यात्रा) करणारा.

हाजी (هاجی) वि. ('अ.) (१) निंदा, विडंबन करणारा. (२) नकल्या.

हातिफ़ (هاتف) वि. ('अ.) बोलावणारा; हाक मारणारा. (पु.) देवदूत.

हातिब (حاطب) वि. ('अ.) लाकूडतोड्या; लाकडे विकणारा.

हातिम (حاتم) पु. ('अ.) (१) यमन (अरबस्तान) चा एक अत्यंत उदार व दानशूर सरदार. हा 'बनीतय' घराण्यातील असल्यामुळे 'हातिम ताई' या नावाने प्रसिद्ध आहे. (२) न्यायाधीश. (वि.) अत्यंत उदार; दानशूर.

हाद (حاد) वि. ('अ.) तीव्र; प्रचंड.

हादिम (هاضم) वि. ('अ.) पाचक.

हादिम (هادم) वि. ('अ.) नष्ट करणारा; विध्वंसक.

हादिम-उल्-लज़्ज़ात (هادم اللذات) पु. ('अ.) (१) यमदूत. (२) यमराज.

हादिमः (هاضمہ) पु. ('अ.) पचनशक्ती.

हाद़िर (حاضر) वि. ('अ.) (१) उपस्थित; विद्यमान; हजर. (२) तयार. (३) न्यायालयात वगैरे आणून हजर केलेला. **–जवाब** (–جواب) वि. ('अ.) हजरजबाबी; प्रत्युत्पन्नमती. **–दामिन** (–ضامن) वि. ('अ.) एखाद्या व्यक्तीला न्यायालयात हजर करण्याची जबाबदारी घेणारा. **–बाश** (–باش) वि. ('अ. + फ़ा.) थोरामोठ्यांच्या संगतीत सदैव असणारा.

हाद़िर-ओ-नाज़िर (حاضر و ناظر) पु. ('अ.) ईश्वर (उपस्थित व पाहाणारा).

हाद़िरात (حاضرات) स्त्री. ['अ. 'हादिरः' (حاضرہ) चे अनेक.] (१) उपस्थित स्त्रिया. (२) अंगात येणे; अंगात आणणे.

हाद़िराती (حاضراتی) पु. ('अ.) अंगात येणारा, आणणारा; मांत्रिक.

हाद़िरी (حاضری) स्त्री. ('अ.) (१) हजिरी; उपस्थिती. (२) न्याहारी. (३) मृत व्यक्तीच्या घरातील माणसांसाठी घाडले जाणारे जेवण.

हाद़िरीन (حاضرین) पु. ['अ. 'हादिर' (حاضر) चे अनेक.] उपस्थित लोक; श्रोते; प्रेक्षक.

हादिस़ (حادث) वि. ('अ.) (१) नवीन उत्पन्न होणारी (वस्तू); नवा; आधुनिक. (२) नश्वर. (३) मूलतत्त्व.

हादिस़ः (حادثہ) पु. ('अ.) (१) दुर्घटना; अपघात. (२) आपत्ती. (३) नवी घटना.

हादी (حادی) पु. ('अ.) उंटवाला; सांडणीस्वार.

हादी (هادی) वि. ('अ.) (१) मार्गदर्शक; नेता. (२) आदेश देणारा.

हादी-ए-मुत्लक़ (هادئ مطلق) वि. ('अ.) खरा सन्मार्गदर्शक; ईश्वर.

हादूम (هاضوم) वि. ('अ.) पाचक; औषधी.

हाद्दः (حادّة) वि. ('अ.) (१) प्रचंड; तीव्र. (२) आखडलेला. (३) लघु (कोन).

हानम (هانم) स्त्री. (तु.) श्रीमती; बाईसाहेब; खानम.

हानिस़ (حانث) वि. ('अ.) शपथ मोडणारा.

हानूत (حانوت) स्त्री. ('अ.) (१) दुकान. (२) दारूचा गुत्ता.

हाफ़िज़ (حافظ) पु. ('अ.) (१) रक्षणकर्ता. (२) कुराण तोंडपाठ असलेला. (३) ज्याची स्मरणशक्ती उत्कृष्ट आहे असा.

हाफ़िज़-ए-हक़ीक़ी (حافظ حقيقى) पु. ('अ.) खरा रक्षक; ईश्वर.

हाफ़िज़ः (حافظه) पु. ('अ.) स्मरणशक्ती.

हाफ़िद (حافد) वि. ('अ.) (१) मित्र. (२) सेवक. (३) नातू (मुलाचा किंवा मुलीचा मुलगा).

हाफ़िर (حافر) वि. ('अ.) (१) खड्डा; विहीर खोदणारा. (२) घोडयाची टाप.

हाफ़ी (حاف) वि. ('अ.) (१) अनवाणी हिंडणारा. (२) न्यायाधीश.

हाबित़ (هابط) वि. ('अ.) खाली उतरणारा; वरून खाली येणारा.

हाबिस (حابس) वि. ('अ.) अडविणारा; अवरोधक.

हाबी (هابى) स्त्री. ('अ.) थडग्याची माती.

हाबील (هابيل) पु. ('अ.) हजरत आदम (आदिमानव) यांचा मुलगा. (याला कावीलने ठार मारले).

हाम (حام) पु. ('अ.) हजरत नूह (नोहा) यांचा मुलगा.

हामान (هامان) पु. ('अ.) फिरऔन बादशहाचा मंत्री. हा अत्यंत जुलमी होता.

हामिज (هامز) वि. ('अ.) (१) निंदा करणारा. (२) डोळघाने खूण करणारा.

हामिद (حامض) वि. ('अ.) आंबट; अम्ल.

हामिद (حامد) वि. ('अ.) प्रशंसक; तारीफ करणारा.

हामिल (حامل) वि. ('अ.) (१) ओझे वाहणारा हमाल. (२) धारण करणारा.

हामिल-ए-वह्यी (حامل وحى) पु. ('अ.) ईश्वरी आदेश ग्रहण करणारा; पैगंबर.

हामिलः (حامله) वि. स्त्री. ('अ.) गर्भवती; गरोदर.

हामिश (هامش) पु. ('अ.) (१) किनारा; काठ. (२) समास.

हामी (هامى) वि. ('अ.) (१) चकित; थक्क. (२) व्याकुळ.

हामी (حامى) वि. ('अ.) (१) समर्थन करणारा; पाठीराखा; सहाय्यक. (२) मित्र.

हामूं (هامون) पु. (फ़ा.) (१) जंगल; अरण्य. (२) ओसाड मैदान; वाळवंट. **–नवर्द** (نورد –) वि. (फ़ा.) जंगलातून भटकणारा.

हामः (هامه) स्त्री. ('अ.) ललाट; कपाळ. (पु.) आपल्या जातीचा पुढारी.

हार (حار) वि. ('अ.) उष्ण; गरम; उष्णता निर्माण करणारा.

हार (هار) वि. ('अ.) खाली पडलेला; उध्वस्त.

हार (هار) पु. (फ़ा.) (१) हार; माला. (२) पिसाळलेले कुत्रे. (वि.) शूर; बहादूर.

हारिज (حارج) वि. ('अ.) (१) दंगल करणारा; अडथळा आणणारा. (२) गुन्हेगार. (३) हानिकारक.

हारिब (هارب) वि. ('अ.) पलायन करणारा; पळणारा.

हारिस़ (حارث) पु. ('अ.) (१) वाघ. (२) शेतकरी.

हारिस (حارس) वि. ('अ.) संरक्षक देखरेख ठेवणारा.

हारिस़ (حارص) वि. ('अ.) अधाशी; हावरा; लोभी.

हारूत (هاروت) पु. ('अ.) एक जादूगार देवदूत. हा 'मारूत' सह बाबिलच्या विहिरीत राहात असून लोकांना जादू शिकवितो अशी समजूत आहे.

हारूती (هاروتى) वि. ('अ.) जादूचा (स्त्री.) जादुगिरी.

हारून (هارون) पु. ('अ.) (१) मूसाचा भाऊ. (२) बगदादचा खलिफा (अब्बासी घराण्यातील पाचवा व मुहम्मद साहेबांपासून सव्वीसावा खलिफा); हारून रशीद. (३) दूत; राजदूत. (४) संरक्षक. (५) पहारेकरी.

हारूनी (هارونى) स्त्री. ('अ.) (१) संरक्षण. (२) दूतकर्म. (३) पहारा.

हाल (هال) पु. (फ़ा.) (१) वेलदोडा (पांढरा). (२) सुख. (३) नृत्य. (४) पोलोचा चेंडू. **–गाह** (–گاه) स्त्री. (फ़ा.) पोलोचे मैदान.

हाल (حال) पु. ('अ.) (१) दशा; स्थिती. (२) वृत्तांत; समाचार. (३) वर्तमानकाळ. (४) तल्लीनता. (अव्य.) नुकताच; हल्ली.

हालत (حالت) स्त्री. ('अ.) (१) स्थिती; दशा; अवस्था. (२) वृत्तांत; समाचार. (३) घटना; प्रसंग.

हालांकि. (حالانكه) अव्य. ('अ.+फा.) यद्यपि; जरी.

हालात (حالات) पु. ['अ. 'हाल' (حال) व 'हालत' (حالت) यांचे अनेक.] दशा (प्रसंग; अवस्था).

हालिक (هالک) वि. ('अ.) प्राण घेणारा; घातक.

हालियः (حالیہ) वि. ('अ.) (१) आधुनिक. (२) अलीकडील. (३) नवा; ताजा.

हाली (حالی) वि. ('अ.) (१) आधुनिक; सध्याचा. (२) आभूषित; शृंगारित. (३) प्रचलित; चलनी (नाणे).

हालः (هالہ) पु. (फ़ा.) (१) चंद्र किंवा सूर्य यांच्याभोवती पडणारे खळे. (२) मंडळ. (३) घेरा; वृत्त.

हावन (هاون) पु. (फ़ा.) (१) लाकडी उखळ. (२) लोखंडी खल. **–बस्तः** (– دستہ) पु. (फ़ा.) लोखंडी खलबत्ता.

हाबियः (هاویہ) पु. ('अ.) नरकातील सातवा मजला; सर्वांत भयंकर नरक.

हावी (حاوی) वि. ('अ.) (१) आच्छादिलेला; पसरलेला. (२) काबूत ठेवणारा. (३) प्रवीण; कुशल. (४) जबरदस्त.

हाशा (حاشا) अव्य. ('अ.) (१) कदापि; मुळीच. (२) त्राहि; शरण. (३) पण; परंतु. (पु.) पावित्र्य. (एखाद्या बाबतीतील आपले अज्ञान वा निष्पक्षता व्यक्त करण्यासाठी हा शब्द वापरला जातो.)

हाशा-ओ-कल्ला (حاشا و کلا); **सुम्मः हाशा** (ثم حاشہ) अव्य. ('अ.) मुळीच नाही.

हाशिम (هاشم) पु. ('अ.) हजरत मुहम्मद साहेबांचे पूर्वज; मूळ पुरुष. (वि.) पेल्यात भाकरी कुसकरणारा.

हाशिर (حاشر) पु. ('अ.) हजरत मुहम्मद साहेब.

हाशियः (حاشیہ) पु. ('अ.) (१) काठ; किनार; कडा. (२) समास; मार्जिन. (३) तळटीप. **–नशीं** (– نشیں) वि. ('अ. + फ़ा.) दरबार वगैरेमध्ये सभोवती (कोंडाळे करून) बसणारे; सभासद.

हासिब (حاسد) वि. ('अ.) हेवा, ईर्ष्या करणारा; जळफळणारा; मत्सरग्रस्त.

हासिर (حاسر) वि. ('अ.) हळहळणारा; पश्चात्ताप करणारा.

हासिल (حاصل) वि. ('अ.) (१) प्राप्त; उपलब्ध. (२) वसूल. (पु.) (१) बाकी. (२) हातचा आकडा (गणित). (३) प्राप्ती; नफा; आवक. (४) जमिनीचा खंड; महसूल. (५) निष्कर्ष; सार; परिणाम. **–खेज** (– خیز) वि. ('अ. + फ़ा.) सुपीक. **–वुसूल** (– وصول) पु. ('अ.) (१) लाभ; नफा. (२) परिणाम; निष्कर्ष.

हासिल कलाम (حاصل کلام) पु. ('अ.) सारांश; तात्पर्य.

हासिल जम'अ (حاصل جمع) पु. ('अ.) बेरीज.

हासिल ज़र्ब (حاصل ضرب) पु. ('अ.) गुणाकार; गुणनफल.

हासिल तक़्सीम (حاصل تقسیم) पु. ('अ.) भागफल; भागाकार.

हिंतः (حنطہ) पु. ('अ.) गहू.

हिंद (ہند) पु. (फ़ा.) भारत; हिंदुस्थान.

हिंदसः (ہندسہ) पु. ('अ.) (१) संख्या. (२) गणित. **–दाँ** (– داں) वि. ('अ.+फ़ा.) गणितज्ञ.

हिंदी (ہندی) वि. (फ़ा.) हिंदुस्थानचा; भारतीय; भारतात तयार झालेली तलवार. (स्त्री.) देवनागरी लिपी; हिंदी भाषा. **–दाँ** (– داں) वि. (फ़ा.) हिंदी भाषा जाणणारा; हिंदी-तज्ज्ञ. **–नशाद** (– نژاد) वि. (फ़ा.) भारतात जन्मलेला; भारतीय.

हिंदुवानः (ہندوانہ) पु. (फ़ा.) टरबूज; कलिंगड.

हिंदुस्तां (ہندوستاں); **हिंदुस्तान** (ہندوستان) पु. (स्त्री.) भारत; हिंदुस्थान.

हिंदुस्तानी (ہندوستانی) वि. (फ़ा.) भारतीय; हिंदी. (स्त्री.) उर्दू मिश्रित हिंदी भाषा.

हिंदू (ہندو) पु. [फ़ा. 'सिंधू' (سندھو) चे फ़ारसी रूप]. (१) मूर्तिपूजा करणारा भारतीय. (२) भारतीय; हिंदुस्थानात राहाणारा. (३) काळा. (४) सेवक; दास. (५) प्रेमिका; प्रेयसी. **–कुश** (– کش); **–कोह** (– کوہ) पु. (फ़ा.) हिंदुकुश पर्वत. **–ज़न** (– زن) स्त्री. (फ़ा.) (१) जादुगारीण. (२) पतिव्रता; साध्वी.

हिंदोस्तां (ہندوستاں); **हिंदोस्तान** (ہندوستان) पु. (फ़ा.) भारत; हिंदुस्थान.

हिंदोस्तानी (ہندوستانی) वि. (फ़ा.) भारतीय; हिंदी. (स्त्री.) हिंदी व उर्दू यांचे मिश्रण असलेली भाषा.

हिकायत (حکایت) स्त्री. ('अ.) (१) कथा; कहाणी. (२) वृत्तांत; इतिहास. **–गार** (– گر) वि. ('अ.+फ़ा.) कहाणी सांगणारा. [अनेक 'हिकायात' (حکایات)].

हिक्कः (حکم) स्त्री. ('अ.) खाज, कंडू.

हिक़्द (حقد) पु. ('अ.) (१) द्वेष. (२) शत्रुत्व.

हिक्मत (حکمت) स्त्री. ('अ.) (१) विज्ञान; शास्त्र. (२) आयुर्वेद. (३) बुद्धिमत्ता; चातुर्य. (४) युक्ती; उपाय. (५) तत्त्वज्ञान; दर्शन. (६) इलाज; चिकित्सा. **–आ'ईन** (– آئین) वि. ('अ. + फ़ा.) ज्ञान व युक्ती यांनी परिपूर्ण.

हिक्मत-ए-'अमली (حکمت عملی) स्त्री. ('अ.) (१) मुत्सद्देगिरी; कूटनीती. (२) धोरण.

हिक्मत-ए-इलाही (حکمت الٰہی) स्त्री. ('अ.) ईश्वरेच्छा.

हिक्मत-ए-मुदनी (حکمت مدنی) स्त्री. ('अ.) (१) नागरिक शास्त्र. (२) नगर व्यवस्था.

हिक्मती (حکمتی) वि. ('अ. + हि.) (१) हुशार; चतुर. (२) तत्त्वज्ञ; दार्शनिक. (३) शास्त्रज्ञ; वैज्ञानिक.

हिजा (ہجا) स्त्री ('अ.) (१) निंदा. (२) अपकीर्ती. (३) स्पेलिंग; शुद्धलेखन; अक्षरांचा त्यांच्या मात्रासह उच्चार करणे.

हिजा'अ (هزاع) वि. ('अ.) (१) दुर्बळ; कृश. (२) उदासीन; खिन्न.

हिजाज (حجاز) पु. ('अ.) मक्का व मदिना यांचा समावेश असलेला अरबस्तानचा प्रदेश.

हिजाब (حجاب) पु. ('अ.) (१) पडदा; आड. (२) लज्जा; संकोच

हिज्जे (هجے) पु. ('अ.) स्पेलिंग; शुद्धलेखन.

हिज्जः (حج) पु. ('अ.) (१) वर्ष. (२) एकदा 'हज' (حج) मक्केची यात्रा करणे.

हिज्ब (حزب) पु. ('अ.) (१) पक्ष. (२) जमात.

हिज्ब-उल्-अहरार (حزب الاحرار) पु. ('अ.) प्रागतिक; नेमस्त पक्ष.

हिज्ब-उल्-'अम्माल (حزب العمال) पु. ('अ.) मजूर पक्ष.

हिज्ब-उल्-मुस्तब्बिदीन (حزب المستبدین) पु. ('अ.) रूढिवादी, सनातनी पक्ष.

हिज्बु'ल्लह (حزب اللہ) पु. ('अ.) सज्जनांचा, संतांचा समुदाय; साधुसमाज.

हिज्र (هجر) पु. ('अ.) वियोग; विरह.

हिज्रत (هجرت) स्त्री. ('अ.) (१) देशत्याग. (२) परदेशगमन; विदेशवास.

हिज्रां (هجراں) पु. ('अ.) वियोग; विरह.

हिज्री (هجری) वि. ('अ.) (१) देशत्याग करणारा. (२) मुहम्मद साहेबांच्या देशत्यागापासून सुरू झालेला मुस्लिम संवत (सन).

हिदायत (هدایت) स्त्री. ('अ.) (१) शिकवण; उपदेश. (२) सूचना; मार्गदर्शन. (३) हुकूम; आज्ञा; आदेश. (४) दीक्षा. **–नामः** (نامہ –) पु. ('अ.+ फ़ा.) आदेशपत्र; सूचनापत्र.

हिद्दत (حدت) स्त्री. ('अ.) (१) तीव्रता; उग्रता. (२) उष्णता. (३) क्रोध. (४) प्रकोप.

हिना (حنا) स्त्री. (फ़ा.) मेंदी. **–बंद** (بند –) वि. (फ़ा.) मेंदी लावणारा.

हिफ़ाज़त (حفاظت) स्त्री. ('अ.) (१) संरक्षण; देखरेख. (२) सावधानी; सावधगिरी; हुशारी.

हिफ़ादत (حفادت) स्त्री. ('अ.) (१) दया; अनुकंपा. (२) आनंद; हर्ष.

हिफ़्ज़ (حفظ) पु. ('अ.) (१) संरक्षण. (२) अदब. (अव्य.) तोंडपाठ; कंठस्थ.

हिफ़्ज़-ए-मरातिब (حفظ مراتب) पु. ('अ.) मान ठेवणे; अदबीने वागणे.

हिफ़्ज़-ए-मातक़द्दम (حفظ ماتقدم) पु. ('अ.) संकटाला तोंड देण्यासाठी आधीपासून केलेली उपाययोजना.

हिफ़्ज़ान (حفظان) पु. ('अ.) (१) संरक्षण. (२) अदब. (अव्य.) तोंडपाठ; कंठस्थ.

हिबः (ہبہ) पु. ('अ.) (१) दान; अनुदान. (२) पारितोषिक; बक्षीस. **–नामः** (نامہ –) पु. ('अ.+फ़ा.) दानपत्र; बक्षिसपत्र.

हिमाक़त (حماقت) स्त्री. ('अ.) (१) मूर्खता; अज्ञान. (२) धृष्टता.

हिमायत (حمایت) स्त्री. ('अ.) (१) पक्षपात; तरफदारी; समर्थन. (२) मदत. (३) मित्र.

हिमायती (حمایتی) वि. ('अ.) (१) समर्थक; पाठीराखा. (२) मित्र.

हिमार (حمار) पु. ('अ.) गाढव; गर्दभ.

हिम्मत (همت) स्त्री. ('अ.) (१) धाडस; पराक्रम; धीर. (२) उत्साह. (३) धृष्टता. **–अफ़्ज़ा'ई** (افزائی –) स्त्री. ('अ. + फ़ा.) प्रोत्साहन. **–वर** (ور –) वि. ('अ.+फ़ा.) धाडसी.

हियातत (حیاطت) स्त्री. ('अ.) (१) संरक्षण; देखरेख. (२) सावधगिरी.

हिरास (هراس) पु. (फ़ा.) (१) भय. (२) शंका. (३) निराशा.

हिरासत (حراست) स्त्री. ('अ.) (१) देखरेख; पहारा. (२) कच्ची कैद; नजरबंदी.

हिरासां (هراساں) वि. (फ़ा.) (१) भयभीत. (२) निराश.

हिरासा (هراسا) पु. (फ़ा.) बुजगावणे; बुजगबाहुले (शेतातील).

हिर्ज़ (حرز) पु. ('अ.) (१) शरण-स्थान; दृढ-स्थान. (२) ताईत; मंत्र.

हिर्दी (هردی) स्त्री. (फ़ा.) हळद.

हिर्फ़त (حرفت) स्त्री. ('अ.) (१) उद्योग; व्यवसाय. (२) कारागिरी. (३) धूर्तता; लबाडी.

हिर्फ़ः (حرفہ) पु. ('अ.) (१) उद्योग; धंदा. (२) कारागिरी; कलाकौशल्य.

हिर्मं (حرم) वि. ('अ.) निषिद्ध खाद्यपदार्थ.

हिर्मां (حرمان) पु. ('अ.) (१) निराशा; नैराश्य. (२) दुर्भाग्य.

हिर्स् (حرص) स्त्री. ('अ.) लोभ; तृष्णा; अधाशीपणा.

हिर्स्-ओ-हवा (حرص و هوا) स्त्री. ('अ.) लोभ व तृष्णा.

हिलाल (هلال) पु. ('अ.) नवीन चंद्र; बालचंद्र; बीजेची चंद्रकोर.

हिलाली (هلالی) वि. ('अ.) (१) चंद्रकोरीसारखा. (२) वक्र; बाकदार.

हिल्म (حلم) पु. ('अ.) (१) सहिष्णुता. (२) गंभीरता. (३) नम्रता. (४) शांतता.

हिल्यः (حلیہ) पु. ('अ.) (१) मुखाकृती; चेहेरेपट्टी. (२) आभूषण; दागिना.

हिल्लत (حلت) स्त्री. ('अ.) विहित, धर्मसंमत असणे (एखादा पदार्थ खाणे).

हिल्लः (حلہ) पु. ('अ.) (१) स्थान. (२) उद्दिष्ट. (३) सभा.

हिश्मत (حشمت) स्त्री. ('अ.) (१) दरारा; प्रताप. (२) लज्जा. (३) श्रेष्ठत्व. (४) क्रोध.

हिस (حس) स्त्री. ('अ.) (१) संवेदना; अनुभूती. (२) संवेदनशक्ती. (३) गती; हालचाल.

हिस्स् (حصص) पु. ['अ. 'हिस्सः' (حصہ) चे अनेक.] हिस्से; अंश; खंड; तुकडे.

हिसानत (حصانت) स्त्री. ('अ.) दृढता; मजबुती.

हिसाब (حساب) पु. ('अ.) (१) हिशेब; गणना; गणित. (२) भाव; दर. (३) देवाण-घेवाण; व्यवहार. (४) अंतिम निवाडा. (५) जमाखर्च.

हिसाब-ओ-किताब (حساب و کتاب) पु. ('अ.) जमाखर्च; देण्याघेण्याचा हिशेब.

हिसाबी (حسابی) वि. ('अ.) (१) हिशेबासंबंधीचा. (२) हिशेब जाणणारा.

हिसार (حصار) पु. ('अ.) (१) घेरा; परीघ; मंडल. (२) वेढा. (३) किल्ला; शहराचा तट.

हिसेब (حسیب) पु. (फ़ा.) हिशेब.

हिस्न (حصن) पु. ('अ.) किल्ला; किल्ल्याचा तट; तटबंदी.

हिस्सी (حسی) वि. ('अ.) इंद्रियविषयक.

हिस्सः (حصہ) पु. ('अ.) (१) भाग; तुकडा; खंड. (२) भागीदारी; वाटणी. **–कशी** (–کشی) स्त्री. ('अ. + फ़ा.) भाग पाडणे; वाटण्या करणे. **–दार** (–دار) वि. ('अ. + फ़ा.) हिस्सेदार; भागीदार. **–बुखरः** (–بخرہ) पु. ('अ.) लहान लहान तुकडे करून वाटणे.

हिस्स:-ए-रसदी (حصہ رسدی) पु. ('अ.) हिश्शाप्रमाणे वाटणी; हिस्सेरशी.

हीज़ (هیز) वि. (फ़ा.) हिजडा; नपुसक.

हीत: (حیطہ) पु. ('अ.) (१) घेरा; परीघ. (२) सीमा; हद्द.

हीन (حین) पु. ('अ.) समय; काल. **–हयात** (–حیات) अव्य. ('अ.) आजन्म; आमरण; तहहयात.

हीमिया (هیمیا) स्त्री. ('अ.) जादू. **–गर** (–گر); **–दाँ** (–داں) वि. पु. ('अ.+फ़ा.) जादूगार.

हील (هیل) स्त्री. (फ़ा.) वेलदोडा.

हीलतन् (حیلتاً) अव्य. ('अ.) कपटाने; फसवून; मिषाने.

हीलाज (هیلاج) पु. ('अ.) जन्मकुंडली; जन्मपत्रिका.

हील: (حیلہ) पु. ('अ.) (१) बहाणा; मिष; निमित्त; सबब. (२) कपट. (३) असत्य. (४) टोलवाटोलवी. **–गर** (–گر); **–बाज** (–باز); **–साज** (–ساز) वि. ('अ.+फ़ा.) बहाणा करणारा; सबबी सांगणारा. **–तराश** (–تراش) वि. ('अ.+फ़ा.) नवनवीन सबबी शोधून काढणारा; लबाड. **–हवाल:** (–حوالہ) पु. ('अ.) छक्केपंजे; टोलवाटोलवी.

हुकमा (حکما) पु. ['अ. 'हकीम' (حکیم) चे अनेक.] (१) वैद्य. (२) वैज्ञानिक. (३) तत्त्वज्ञ.

हुक़ूक़ (حقوق) पु. ['अ. 'हक़' (حق) चे अनेक.] (१) हक्क; अधिकार. (२) कर्तव्ये.

हुक़ूक़-ए-निस्वानी (حقوق نسوانی) पु. ('अ.) स्त्रियांचे अधिकार.

हुक़ूक़-ए-शहरियत (حقوق شہریت) पु. ('अ.) नागरिकांचे अधिकार.

हुकूमत् (حکومت) स्त्री. ('अ.) (१) सत्ता; अधिकार. (२) राज्य; राष्ट्र. (३) सरकार. (४) जुलूम.

हुकूमत-ए-इलाही (حکومت الٰہی) स्त्री. ('अ.) ईश्वरी सत्ता.

हुकूमत-ए-खुद इख्तियारी (حکومت خوداختیاری) स्त्री. ('अ.+फ़ा.) स्वायत्त शासन; स्वराज्य.

हुकूमत-ए-जम्हूरी (حکومت جمہوری) स्त्री. ('अ.) लोकशाही; जनतंत्र; गणतंत्र.

हुकूमत-ए-शख्सी (حکومت شخصی) स्त्री. ('अ.) एकाधिकार शाही; अनियंत्रित सत्ता.

हुक्काम (حکام) पु. ['अ. 'हाकिम' (حاکم) चे अनेक.] मोठे अधिकारी.

हुक्कः (حقہ) पु. ('अ) (१) हुक्का; गुडगुडी. (२) डबा; दागिन्यांची डबी. (३) जादुगाराची पोतडी. **–बाज** (باز –) वि. पु. ('अ. + फ़ा.) (१) जादूगार. (२) लबाड.

हुक्कः (حکم) स्त्री. (फ़ा.) उचकी.

हुक्नः (حقنہ) पु. ('अ.) वस्ती; एनिमा; डुश.

हुक्म (حکم) पु. ('अ.) (१) आज्ञा; हुकूम; आदेश. (२) परवानगी. (३) निर्णय; निवाडा. (४) प्रभुत्व; अधिकार. (५) जुलूम. (६) कायदा. **–अंदाज़** (انداز –) वि. ('अ.+फ़ा.) नेमबाज. **–'अदूली** (عدولی –) स्त्री. ('अ.) आज्ञेचे उल्लंघन. **–नामः** (نامہ –) पु. ('अ. + फ़ा.) आदेशपत्र; फर्मान. **–बरदार** (بردار –) वि. ('अ. + फ़ा.) सेवक; आज्ञाधारक. **–रां** (راں –) वि. ('अ. + फ़ा.) शासक; सत्ताधीश. **–रानी** (رانی –) स्त्री. ('अ.+ फ़ा.) सत्ता; शासन.

हुक्म-ए-आखिर (حکم آخر); **हुक्म-ए-क़त्'ई** (حکم قطعی) पु. ('अ.) अंतिम निर्णय; न बदलणारी आज्ञा; आदेश.

हुक्म-ए-इम्तिना'ई (حکم امتناعی) पु. ('अ.) एखादे काम तहकूब ठेवण्याचा आदेश; मनाई हुकूम.

हुक्म-ए-गश्ती (حکم گشتی) पु. ('अ.+फ़ा.) परिपत्र.

हुक्म-ए-रब्बी (حکم ربی) पु. ('अ.) ईश्वरी आदेश; अटळ गोष्ट.

हुक्मी (حکمی) वि. ('अ.) हुकमी; अचूक; खात्रीचा.

हुज़ाल (هزال) पु. ('अ.) (१) अशक्तपणा; कृशता. (२) क्षयरोगाचा एक टप्पा.

हुजूम (هجوم) पु. ('अ.) गर्दी; जमाव; समुदाय.

हुज्जत (حجت) स्त्री. ('अ.) (१) हुज्जत; झगडा; तंटा. (२) वादविवाद. (३) पुरावा.

हुज्जत-ए-मोह्कम (حجت محکم) पु. ('अ.) (१) जोरदार पुरावा. (२) मखमलीचे कृत्रिम लिंग (पुरुषाचे जननेंद्रिय). हे कमरेला बांधून एक स्त्री दुसरीशी संभोग करते.

हुज्जती (حجتی) वि. ('अ.) (१) वादविवाद करणारा. (२) हुज्जत घालणारा.

हुज्जतु'ल्लह (حجت اللہ) स्त्री. ('अ.) ईश्वराच्या अस्तित्वाचा पुरावा.

हुज्जाज (حجاج) पु. ['अ. 'हाज' (حاج) चे अनेक.] हाजी लोक; मक्केची यात्रा करणारे.

हुज़्न (حزن) पु. ('अ.) दुःख; शोक.

हुज़्नियः (حزنیہ) पु. ('अ.) शोकांतिका.

हुतमः (حطمہ) स्त्री. ('अ.) प्रचंड अग्नी; नरकातील तिसरा तळमजला.

हुद'आ (هدعا) पु. ('अ.) (१) सरळ मार्ग. (२) सत्यता. (३) योग्य मार्ग दाखविणे.

हुदहुद (هدهد) पु. ('अ.) (१) सुतारपक्षी. (२) टिटवी. (३) डोकीवर तुरा व सुंदर पिसारा असलेला एक पक्षी.

हुदूद (حدود) स्त्री. ['अ. 'हद' (حد) चे अनेक.] हद्दी; सीमा; मर्यादा.

हुदूद-ए-अर्ब'अ (حدود اربع) पु. ('अ.) चतुःसीमा.

हुदूर (حضور) पु. ('अ.) उपस्थिती; हजिरी; विद्यमानता; समीपता. (अव्य.) (१) समोर; प्रत्यक्ष. (२) महाराज; सरकार (संबोधन). (३) दरबार; कचेरी.

हुदूर-ए-वाला (حضور والا) पु. ('अ.+फ़ा.) महाराज; महाशय.

हुदूरी (حضوری) स्त्री. ('अ.) (१) उपस्थिती. (२) दरबार. (३) समोर असणे. (पु.) हुजऱ्या.

हुदूस (حدوث) पु. ('अ.) नवीनता; नाविन्य.

हुनर (هنر) पु. (फ़ा.) (१) कला; कारागिरी. (२) गुण; वैशिष्ट्य. (३) विद्या. **–मंद** (مند –) वि. (फ़ा.) कलावंत; गुणवान; हुन्नरी.

हुफ़्फ़ाज़ (حفاظ) पु. ['अ. 'हाफ़िज़' (حافظ) चे अनेक.] कुराण तोंडपाठ असलेले लोक.

हुफ़्रः (حفرہ) पु. ('अ.) खड्डा; छिद्र.

हुबल (هبل) पु. ('अ.) इस्लामच्या पूर्वी मक्केतील 'क'अबः' (کعبہ) च्या मंदिरात असलेली मूर्ती.

हुबाब (حباب) पु. ('अ.) (१) मैत्री. (२) साप. (३) बुडबुडा; काचेचा गोळा. (४) पिशाच; राक्षस.

हुबाहिब (حباحب) पु. ('अ.) काजवा; खद्योत.

हुबूत (هبوط) पु. ('अ.) (१) खाली उतरणे. (२) किंमत घसरणे. (३) सखल भाग.

हुब्ब (حب) पु. स्त्री. ('अ.) प्रेम; स्नेह; भक्ती.

हुब्ब-उल्-वतन (حب الوطن) पु. ('अ.) देशप्रेमी; देशभक्ती.

हुमाक़ (حمق) पु. ('अ.) (१) मूर्खता; अडाणीपणा. (२) अज्ञान.

हुमा (هما) पु. (फ़ा.) उर्दू-फारसी साहित्यातील एक काल्पनिक पक्षी. ह्याची छाया ज्याच्यावर पडेल तो राजा होतो, अशी समजूत. हा पक्षी केवळ हाडे खातो व कोणालाही त्रास देत नाही.

हुमायूं (همایوں); **हुमायून** (همایون) वि. (फ़ा.) (१) शुभ; मंगल. (२) भाग्यवान.

हुमूदत (حموضت) स्त्री. ('अ.) आंबटपणा; अम्लता.

हुम्मां (حمّى) पु. ('अ.) ज्वर; ताप.

हुम्रत (حمرت) स्त्री. ('अ.) रक्तिमा; लाली.

हुर (ر) वि. ('अ.) (१) स्वतंत्र; मुक्त. (२) प्रतिष्ठित.

हुरूफ़ (حروف) पु. ['अ. 'हर्फ़' (حرف) चे अनेक.] अक्षरे; वर्णमाला.

हुरूफ़-ए-क़मरी (حروف قمری) पु. ('अ.) ज्यात अरबीचे 'ल' हे अक्षर मिसळत नाही अशी अक्षरे.

[ا، ب، ج، ح، خ، ع، غ، ف، ق،
ک، م، و، ہ، ی
(उदा. 'अल्-क़मर' (القمر) चंद्र.)]

हुरूफ़-ए-शम्सी (حروف شمسی) पु. ('अ.) ज्यात अरबीचे 'ल' हे अक्षर मिसळून त्याचे द्वित्व होते अशी अक्षरे.

[ت، ث، د، ذ، ر، ز، س، ش، ص،
ض، ط، ظ، ن، ل
(उदा. 'अश्-शम्स' (الشمس) सूर्य.)]

हुरूब (حروب) पु. ['अ. 'हर्ब' (حرب) चे अनेक.] लढाया; युद्धे.

हुर्क़त (حرقت) स्त्री. ('अ.) जळजळ; आग.

हुर्मत (حرمت) स्त्री. ('अ.) (१) प्रतिष्ठा; मान; अब्रू. (२) सतीत्व. (३) मनाई; वर्ज्य असणे (धार्मिक-दृष्ट्या).

हुर्मुज़ (هرمز) पु. (फ़ा.) (१) सौर महिन्याचा पहिला दिवस. (२) गुरू (ग्रह). (३) नौशेरवानचा मुलगा.

हुर्रियत (حریت) स्त्री. ('अ.) स्वातंत्र्य; बंधनमुक्ती.

हुलफ़ा (حلفا) पु. ['अ. 'हलीफ़' (حلیف) चे अनेक.] मैत्रीची शपथ घेतलेले लोक; मित्रराष्ट्रे.

हुलयः (حلیہ) पु. ('अ.) (१) आभूषण; दागिना. (२) चेहेरेपट्टी; अंगावरील खाणाखुणा.

हुलूल (حلول) पु. ('अ.) एकजीव होणे; एका आत्म्याचा दुसऱ्या शरीरात प्रवेश.

हुल्क (هلک) पु. ('अ.) विनाश; वध; हत्या; कत्तल.

हुल्म (حلم) पु. ('अ.) स्वप्न.

हुल्लः (حلہ) पु. ('अ.) स्वर्गात दिला जाणारा पोषाख.

हुल्व (حلو) वि. ('अ.) मधुर; गोड.

हुव'ल्लह (هوالله) वा. ('अ.) तोच ईश्वर आहे.

हुवहुव (هو هو) अव्य. ('अ.) अक्षरशः; शब्दशः; हुबेहूब.

हुवैदा (هویدا) वि. (फ़ा.) स्पष्ट; व्यक्त; प्रकट; जाहीर.

हुश्यार (هشیار) वि. [फ़ा. 'होशयार' (هوشیار) चे संक्षिप्त.] (१) हुशार; बुद्धिमान. (२) चलाख; चतुर. (३) सावध.

हुश्यारी (هشیاری) वि. [फ़ा. 'होशयारी' (هوشیاری) चे संक्षिप्त.] (१) हुशारी. (२) चलाखी. (३) सावधगिरी.

हुसान (حسان) वि. ('अ.) सुंदर; रूपवान.

हुसाम (حسام) पु. ('अ.) तलवार; खड्ग.

हुसूद (حسود) पु. ['अ. 'हासिद' (حاسد) चे अनेक.] जळफळणारे, द्वेष करणारे लोक.

हुसूल (حصول) पु. ('अ.) (१) प्राप्ती. (२) लाभ; नफा. (३) आवक. (४) परिणाम; फळ. (५) निष्कर्ष.

हुसैन (حسین) पु. ('अ.) करबलाच्या युद्धात हुतात्मे झालेले, मुसलमानांचे तिसरे इमाम, अली यांचे पुत्र.

हुस्न (حسن) पु. ('अ.) (१) सौंदर्य; शोभा. (२) उत्तमता. (३) श्रेष्ठत्व. (४) वैशिष्ट्य. **–आरा** (آرا –) वि. ('अ. + फ़ा.) सुंदर; सौंदर्याला शोभविणारा. **–परस्त** (پرست –) वि. ('अ.+फ़ा.) सौंदर्योपासक. **–फ़रोश** (فروش –) स्त्री. ('अ.+फ़ा.) वेश्या. **हुस्नां** (حسنیٰ) स्त्री. ('अ.) अत्यंत लावण्यवती स्त्री.

हुस्न-ए-इत्तिफ़ाक़ (حسن اتفاق) पु. ('अ.) सुयोग; सुसंधी.

हुस्न-ए-ज़न (حسن ظن) पु. ('अ.) चांगले मत.

हुस्न-ए-तदबीर (حسن تدبیر) पु. ('अ.) (१) चांगली युक्ती. (२) मुख्यवस्था. (३) मुत्सद्देगिरी.

हुस्न-ए-नमकीं (حسن نمکیں); **हुस्न-ए-बिरिश्तः** (حسن برشتہ) पु. ('अ. + फ़ा.) सावळे सौंदर्य; लावण्य.

हुस्न-ए-फ़िरंग (حسن فرنگ) पु. ('अ. + फ़ा.) युरोपियन सौंदर्य; बाह्य भपका.

हुस्न-ए-मत्ल'अ (حسن مطلع) पु. ('अ.) गझलातील दुसरा शेर. [मत्ल'अ (مطلع) पहिला शेर].

हुस्न-ए-सिमा'अ (حسن سماع) पु. ('अ.) (१) श्रवणरस. (२) संगीतातील सौंदर्य.

हुस्न-ए-सुलूक (حسن سلوک) पु. ('अ.) (१) शिष्टाचार. (२) दीनदुःखी लोकांना आर्थिक साह्य देणे.

हूं (ہوں) अव्य. (फ़ा.) (१) हूं; हा; होय. (२) नाही; ऊहूं.

हू (ہو) पु. स्त्री. (फ़ा.) (१) ब्रह्म; ईश्वर. (२) शून्य; पोकळी. (३) निःस्तब्धता. **–का 'आलम** (کا عالم –) निर्जन व भीतिप्रद स्थान.

हूत (حوت) स्त्री. ('अ.) (१) मोठा मासा. (२) मीन (राशी).

हूबः (هودہ) वि. (फ़ा.) योग्य; उचित.

हूबहू (هو بهو) वि. (फ़ा.) हुबेहूब; समान; सदृश.

हूर (حور) स्त्री. ['अ. 'हौरा' (حورا) चे अनेक. परंतु एकवचनी वापर.] स्वर्गातील अप्सरा; सुंदरी.

हूर-उल्-'ऐन (حور العين) स्त्री. ('अ.) सुंदर नेत्र असलेली स्त्री.

हूर-ओ-क़ुसूर (حور و قصور) पु. ('अ.) स्वर्ग व अप्सरा.

हूश (هوش) वि. (फ़ा.) (१) जंगली जनावर. (२) जंगली माणूस.

हूहूक़ (هوحق) स्त्री. ('अ.) आरडाओरडा; गोंधळ.

हेच (هيچ) वि. (फ़ा.) (१) तुच्छ; निरर्थक. (२) अत्यल्प. (अव्य.) क्वचित; कोणीतरी. **–कस** (–کس) वि. (फ़ा.) अधम; नीच. **–कारः** (–کارہ) वि. (फ़ा.) कुचकामाचा; निरुपयोगी. **–मुर्दा** (–مردان) वि. (फ़ा.) अडाणी; मूर्ख. **–मयर्ज़** (–میرز) वि. (फ़ा.) तुच्छ.

हेम (هيم); हेमियः (هيميہ) स्त्री. (फ़ा.) जळाऊ लाकूड; इंधन.

हैअत (هيئت) स्त्री. ('अ.) (१) रूप; आकृती. (२) खगोल विद्या; ज्योतिष. **–दाँ** (–دان) वि. ('अ.+फ़ा.) ज्योतिषी; खगोल शास्त्रवेत्ता.

हैकल (هيكل) स्त्री. ('अ.) (१) मूर्ती. (२) रूप; आकृती. (३) मंदीर. (४) प्रासाद; भवन. (५) ताईत. (६) शोभा. (७) वेशभूषा.

हैजा (هيجا) पु. ('अ.) युद्ध; लढाई.

हैजान (هيجان) पु. ('अ.) (१) दंगल; अशांती. (२) आवेश.

हैज़ुम (هيزم) स्त्री. (फ़ा.) जळाऊ लाकूड; इंधन. **–कश** (–کش) वि. (फ़ा.) (१) लाकूडतोडघा. (२) लावालावी करणारा.

हैद् (حيض) पु. ('अ.) (१) विटाळ; आर्तव; रज. (२) विटाळशीपणी घेतले जाणारे फडके.

हैद्-उर्-रेजाल (حيض الرجال) पु. ('अ.) निंदा; चहाडी.

हैदर (حيدر) पु. ('अ.) (१) वाघ; (२) सिंह.

हैदः (هيضہ) पु. ('अ.) कॉलरा; पटकी.

हैफ़ (حيف) अव्य. ('अ.) हाय! अरेरे! (पु.) (१) दुःख; खेद. (२) अत्याचार.

हैबत (هيبت) स्त्री. ('अ.) (१) भय. (२) धाक. (३) प्रताप; तेज. **–अंगेज** (–انگيز) वि. ('अ.+फ़ा.) भयंकर. **–ज़दः** (–زدہ) वि. ('अ.+फ़ा.) भयभीत. **–नाक** (–ناک) वि. ('अ. + फ़ा.) भयंकर; रौद्र.

हैयाल (حيال) वि. ('अ.) अत्यंत धूर्त; लबाड.

हैयिज़ (حيز) पु. ('अ.) (१) स्थान; जागा. (२) किनारा.

हैयः (حيہ) पु. ('अ.) साप.

हैरत (حيرت) स्त्री. ('अ.) (१) आश्चर्य; विस्मय. (२) निःस्तब्धता. **–अंगेज** (–انگيز) वि. ('अ.+फ़ा.) आश्चर्यकारक; अद्भुत. **–ज़दः** (–زدہ) वि. ('अ. + फ़ा.) आश्चर्यचकित; थक्क. **–नाक** (–ناک); **–सामाँ** (–ساماں) वि. ('अ.+फ़ा.) आश्चर्यकारक; अद्भुत.

हैरती (حيرتی) वि. ('अ.) (१) थक्क; निःस्तब्ध. (२) तल्लीन.

हैरान (حيران) वि. ('अ.) (१) थक्क; चकित. (२) हैराण; त्रस्त.

हैरानी (حيرانی) स्त्री. ('अ.) (१) विस्मय. (२) त्रास; उद्विग्नता.

हैल (حيل) स्त्री. ('अ.) शक्ती; सामर्थ्य.

हैवान (حيوان) पु. ('अ.) (१) पशू; जनावर. (२) प्राणी. (३) जंगली, अडाणी माणूस. [अनेक 'हैवानात' (حيوانات)].

हैवान-ए-ज़ाहिक (حيوان ضاحک) पु. ('अ.) हसणारा प्राणी; वानर.

हैवान-ए-नातिक़ (حيوان ناطق) पु. ('अ.) बोलणारा प्राणी; मानव.

हैवान-ए-मुत्लक़ (حيوان مطلق) पु. ('अ.) निव्वळ पशू; जंगली, अडाणी मनुष्य.

हैवानियत (حيوانيت) स्त्री. ('अ.) (१) पशुता; जंगलीपणा. (२) निर्दयता.

हैवानी (حيوانی) वि. ('अ.) पाशवी; जनावरां-सारखा; जंगली.

हैस् (حيص) स्त्री. ('अ.) (१) युद्ध. (२) वाममार्ग. **–बैस्** (–بيص–) स्त्री. ('अ.) वादविवाद; बोलाचाली; भांडण.

हैसियत (حيثيت) स्त्री. ('अ.) (१) आर्थिक स्थिती; पत. (२) सामर्थ्य. (३) प्रतिष्ठा; योग्यता. (४) दर्जा. **–दार** (–دار); **–मंद** (–مند) वि. ('अ. + फ़ा.) (१) पत असलेला; प्रतिष्ठित. (२) श्रीमंत. **–से** (–سے) त्याने म्हणून.

हैसियत-ए-'उर्फ़ी (حيثيت عرفی) स्त्री. ('अ.) सर्वांनी मान्य केलेली प्रतिष्ठा, पत.

हैहात (هيهات) अव्य. ('अ.) हा हन्त! अरेरे! हाय हाय!

होज़ (هوز) वि. (फ़ा.) (१) चकित. (२) हैराण; त्रस्त.

होज़ाँ (هوزاں) वि. (फ़ा.) प्रफुल्ल; विकसित. (स्त्री.) नर्गिसचे फूल.

होर (هور) पु. (फ़ा.) सूर्य.

होरख़श (هورخش) पु. (फ़ा.) सूर्य; रवी.

होरमुज़ (هورمز) पु. (फ़ा.) गुरू (ग्रह).

होशंग (هوشنگ) पु. (फ़ा.) इराणचा एक प्राचीन बादशहा.

होश (هوش) पु. (फा.) (१) बुद्धी. (२) चेतना; संज्ञा; शुद्धी. (३) ज्ञान; विवेक. **–बाख़्तः** (باختہ –) वि. (फ़ा.) ज्याचे डोके ठिकाणावर नाही असा. **–मंद** (مند –) वि. (फ़ा.) (१) बुद्धिमान; हुशार. (२) सावध. **–मंदी** (مندی –) स्त्री. (फ़ा.) (१) हुशारी. (२) सावधगिरी. **–यार** (یار –) वि. (फ़ा.) (१) हुशार; बुद्धिमान. (२) प्रवीण; कुशल. (३) चलाख; लबाड. (४) सावध. **–यारी** (یاری –) स्त्री. (फ़ा.) (१) हुशारी. (२) चातुर्य. (३) कुशलता; प्राविण्य. (४) सावधगिरी. **–रुबा** (ربا –) वि. (फ़ा.) (१) बेशुद्ध करणारा. (२) घाबरगुंडी उडविणारा.

होश-ओ-ख़िरद (هوش و خرد); **होश-ओ-हवास** (هوش و حواس) पु. (फ़ा.+'अ.) चेतना; शुद्धी.

हौज (هوج) स्त्री. ('अ.) (१) अज्ञान. (२) आतुरता; अधीरता.

हौद (حوض) पु. ('अ.) (१) पाण्याचा हौद; कुंड. (२) तळे; डबके.

हौदज (هودج) पु. ('अ.) अंबारी; हौदा.

हौदः (حوضہ) पु. ('अ.) लहान हौद. (फ़ा.) अंबारी; हौदा.

हौन (هون) पु. ('अ.) (१) सुख. (२) शांती. (३) प्रतिष्ठा. (४) नम्रता.

हौब (حوب) पु. ('अ.) (१) पाप, गुन्हा करणे. (२) इच्छा. (३) दुःख.

हौबत (حوبت) स्त्री. ('अ.) पाप; गुन्हेगारी.

हौबा (حوبا) स्त्री. ('अ.) (१) सुखेच्छा; सुखासीनता. (२) आळस.

हौबः (حوبہ) पु. ('अ.) आजोळ.

हौरा (حورا) स्त्री. ('अ.) केस व डोळे काळेभोर असलेली गोरी स्त्री; सुंदरी.

हौल (هول) पु. ('अ.) भय; भीती. **–अंगेज़** (انگیز –) वि. ('अ. + फ़ा.) भयंकर. **–ज़दः** (ہ زدہ –) वि. ('अ. + फ़ा.) भयभीत. **–दिल** (دل –) वि. ('अ. + फ़ा.) घाबरलेला; हवालदिल. **–दिल** (دل –) वि. ('अ. + फ़ा.) भित्रा; घाबरट. **–नाक** (ناک –) वि. ('अ. + फ़ा.) भयंकर; भयानक.

हौल (حول) पु. ('अ.) (१) आसपासचा प्रदेश. (२) शक्ती.

हौश (حوش) पु. ('अ.) (१) घर. (२) स्थान.

हौसलः (حوصلہ) पु. ('अ.) (१) उत्साह; उल्हास. (२) साहस; हिम्मत; धाडस. (३) हौस; इच्छा; अभिलाषा. (४) आवेश. (५) धृष्टता. **–अफ़ज़ा** (افزا –) वि. ('अ.+फ़ा.) उत्साहवर्धक. **–अफ़ज़ा'ई** (افزائی –) स्त्री. ('अ. + फ़ा.) प्रोत्साहन. **–मंद** (مند –) वि. ('अ. + फ़ा.) (१) उत्साही. (२) धाडसी. (३) हौशी. **–शिकन** (شکن –) वि. ('अ. + फ़ा.) निरुत्साही करणारा; भिवविणारा. **–शिकनी** (شکنی –) स्त्री. ('अ. + फ़ा.) धीर खचविणे; निरुत्साही करणे.